# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:- १७-०२-२०२१

**उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. १७-०२-२०२१ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.**

३

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा बुधवार दिनांक १७/०२/२०२१ रोजी दुपारी १२.३० वाजता आयोजित करण्यात आली. सदर सभेत महापौर, श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ् होत्या व खालील दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते/होत्या. मा. उप सचिव, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग यांचेकडील दिनांक ३ जुलै, २०२० रोजीचे पत्रान्वये ऑनलाईन ॲपद्वारे सभा आयोजित केली होती.

१.श्रीमती. लिलाबाई लक्ष्मण आशान – महापौर

२. श्री. भगवान भालेराव- उप महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती अचर्ना गोकुळ करणकाळे | ३४ | श्रीमती कविता लाल पंजाबी |
| ४ | श्री. मंगल बालकृष्ण् वाघे | ३५ | श्री. जीवन चंद्रभान इदनानी |
| ५ | श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड | ३६ | श्रीमती सविता प्रविण तोरणे (रगडे) |
| ६ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ३७ | श्री. गजानन प्रल्हाद शेळके |
| ७ | श्रीमती मिनाकौर अजितसिंग लबाना | ३८ | श्रीमती ज्योती प्रकाश बठिजा |
| ८ | श्रीमती पंचम उमेश कालानी | ३९ | श्री. दिपक लक्ष्मदास सिरवानी (साई) |
| ९ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | ४० | श्रीमती ज्योत्स्ना सुरेश जाधव |
| १० | श्रीमती आशा नाना बिराडे | ४१ | श्री. चंद्रशेखर केशव यादव |
| ११ | चरणजितकौर राजेंद्रसिंह भुल्लर | ४२ | श्रीमती मिताली राजेश चान्पूर |
| १२ | श्री. राजेंद्रसिंह विरसिंग भुल्लर | ४३ | श्रीमती वसुधा धनंजय बोडारे |
| १३ | श्री. स्वप्नील मिलींद बागुल | ४४ | श्री. धनंजय बाबुराव बोडारे |
| १४ | श्रीमती सुरेखा हनुमंत आव्हाड | ४५ | श्रीमती दिप्ती नविन दुधानी |
| १५ | श्री. कलवंतसिंग गुरुदेव सोहता | ४६ | श्रीमती कांचन अमर लुंड |
| १६ | श्री. राजू किशनचंद जग्यासी | ४७ | श्री. शंकर गोविंदराम लुंड |
| १७ | श्रीमती मिना कुमार आयलानी | ४८ | श्रीमती सुनिता बाबुराव बगाडे |
| १८ | श्रीमती गीता लालचंद साधनानी | ४९ | श्री. भारत रामचंद राजवानी (गंगोत्री) |
| १९ | डॉ. प्रकाश घनश्यामदास नाथानी | ५० | श्री. सतरामदास पुतनदास जेसवानी |
| २० | श्रीमती सरोजिनी टेकचंदानी | ५१ | श्रीमती अंजली चंद्रकांत साळवे |
| २१ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | ५२ | श्री. प्रमोद नामदेव टाले |

| | | | |
|---|---|---|---|
| २२ | श्री. महेश पहिलराज सुखरामनी | ५३ | श्रीमती कविता सुधिर बागुल |
| २३ | श्रीमती अपेक्षा भगवान भालेराव | ५४ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २४ | श्रीमती शुभांगीनी निकम | ५५ | श्री. किशोर नारायणदास वनवारी |
| २५ | श्रीमती छाया सुजित चक्रवर्ती उर्फ अडसुळ | ५६ | श्रीमती मिना चंद्रगुप्त सोनेजी |
| २६ | श्री. राजेश नानिकराम वदारिया | ५७ | श्री. विजय चाहू पाटील |
| २७ | श्रीमती डिम्पलनरेंद्र ठाकुर (कुमारी) | ५८ | श्रीमती कविता सुरेश गायकवाड |
| २८ | श्रीमती दिपा नारायण पंजाबी | ५९ | श्री. आकाश परशुराम पाटील |
| २९ | श्री. अजित प्रभुनाथ गुप्ता | ६० | श्री. विकास परशुराम पाटील |
| ३० | श्रीमती पुष्पा नाना बागुल | ६१ | श्री. मनोज दिलीपकुमार सयानी |
| ३१ | श्री. राजेंद्र शांताराम चौधरी | ६२ | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |
| ३२ | श्री. रवी किशनचंद जग्यासी | ६३ | श्री. अरुण लक्ष्मण आशान |
| ३३ | श्रीमती इंदिरा जमनादास उदासी | ६४ | श्रीमती आशा जीवन इदनानी |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते / होत्या.

१ .श्रीमती जयश्री ज्ञानेश्वर पाटील, २. श्री. रविंद्र दशरथ बागुल, ३. श्रीमती अंजना अंकुश म्हस्के, ४. श्रीमती रेखा अशोक ठाकुर, ५. श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग, ६. श्रीमती ज्योती प्रशांत पाटील, ७. श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी, ८. श्रीमती शुभांगी मनोहर बेहनवाल, ९. श्री. सुमित सोनकांबळे, १०. श्रीमती ज्योती शामराव माने, ११. श्री. रमेश महादेव चव्हाण, १२. श्रीमती संगिता नितीन सपकाळे, १३. श्रीमती शीतल चंद्रकांत कदम,१४. श्रीमती ज्योती रमेश चैनानी, १५. श्रीमती सुमन राजेश सचदेव, १६.श्रीमती मिनाक्षी रवी पाटील, १७. श्री. सुरेंद्र बाळकृष्ण् सावंत.

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

१. डॉ. राजा दयानिधी, आयुक्त

२. श्रीमती करुणा जुईकर, अतिरिक्त आयुक्त

३. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र.महापालिका सचिव

४. श्री. मदन सोंडे, उप आयुक्त (मुख्यालय)

५. श्री. अप्पा गुरगुळे, नगररचनाकार

६. श्री. मंगेश गावडे, मुख्य लेखा परिक्षक

७. श्री. महेश सितलानी, शहर अभियंता

८. डॉ. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी

९. श्री. अशोक मोरे, उप लेखा परिक्षक

१०. श्री.अजयकुमार एडके, सहाय्यक आयुक्त

११. श्री. हनुमंत खरात, उप अभियंता  विदयुत विभाग

१२. श्री. विनोद खामितकर, कनिष्ठ अभियंता

१३. श्री. महेंद्र धिंडे, कनिष्ठ अभियंता

१४. श्रीम. श्रध्दा सपकाळे, **सिस्टम ॲनेलेसिस मॅनेजर**

१५. श्री. राजा बुलानी, प्र. विधी अधिकारी

१६. श्री . संतोष लोणे, कनिष्ठ अभियंता

१७. श्री. अच्च्युत सासे, प्र. सहाय्यक आयुक्त

१८. श्रीमती विशाखा सावंत, प्र. मालमत्ता व्यवस्थापक

१९. श्री. यशवंत सगळे, प्र.वाहन व्यवस्थापक

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्रीम. मनिषा महाजन, वरिष्ठ लिपीक
२. श्रीम. नर्गीस खान, लिपीक

१. श्री. बाळू भांगरे, लिपीक

२. श्रीम. विद्या आढळ, लिपीक

दुपारी ०२. ०७ वाजता सभा सुरु करण्यात आली.

महापालिका सचिव विषय क्र. १ वाचून दाखवतात

---

⇨ **विषय क्र. १ :—** प्रश्नोत्तरे

---

**सदस्य, श्री. राजेश वानखेडे:-** मा. महापौरजी, कुर्ला कॅम्पचा रोड पुर्णपणे तुटलेला आहे, ही कामे झाली नाही तर त्याची जबाबदारी कोण घेणार?

**सदस्य, श्री शंकर लुंड:-** आमच्या पॅनलमध्ये रोडची कामे झाली नाहीत, रत्यावर मोठमोठे खडडे पडलेले आहेत.

**सदस्य, श्री प्रदिप रामचंदानी:-** खडयांच्या बाबतीत ठराव करण्यात यावा.

**महापालिका सचिव:-** नाही, नाही असा ठराव करता येणार नाही.

**उप महापौर, श्री भगवान भालेराव:-** सदस्य, श्री. वानखेडेंचा विषय आयुक्तांना कळविण्यात आला आहे.

**सदस्य, श्री. राजेश वानखेडे:-** संपुर्ण रस्ते तुडलेले आहेत...

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** प्रश्नोत्तराचा तास वगळण्यात येत आहे.

**महापालिका सचिव:-** प्रश्नोत्तराचा तास वगळण्यात येत आहे.

**सदस्य, श्री. राजेश वानखेडे:-** साहेब, ही कामे ५ (२) (२) मध्ये करण्यात यावीत.

**महापालिका सचिव:-** मा. उप महापौर साहेबांनी सांगितले आहे, प्रश्नोत्तराचा तास वगळण्यात येत आहे.

**काही सदस्य :—**पास—पास......

**महापौर तथा पीठासीन अधिकारी:—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय :—** प्रश्नोत्तराचा तास वगळण्याबाबत

सूचकाचे नांव :— श्री. राजेंद्र चौधरी

अनुमोदकाचे नांव :— श्री. कलवंतसिंह सोहता

**महासभा ठराव क्र.११ अ** **दिनांक :—१७/०२/२०२१**

ही महासभा आज दिनांक १७/०२/२०२१ रोजीच्या महासभेतील प्रश्नोत्तराचा काळ वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर/पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव:-** विषय क्र. २ वाचून दाखवितात.

⇨ **विषय क्र. २:—** मागील विशेष सभेचे दिनांक २२/०९/२०२० (त्यात १२/१०/२०२० व १८/०१/२०२१) रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** पास...पास...

**काही सदस्य:—** पास—पास......

**महापौर तथा पीठासीन अधिकारी:—** मागील विशेष सभेचे दिनांक २२/०९/२०२० (त्यात १२/१०/२०२० व १८/०१/२०२१) रोजीचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे.

☑**विषय क्र. २ :—** मागील विशेष महासभा दिनांक २२/९/२०२० (त्यात १२/१०/२०२० व १८/१/२०२१) रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्र चौधरी

अनुमोदकाचे नाव :— श्री. प्रमोद टाले

**महासभा ठराव क्र.११ ब** **दिनांक :१७/०२/२०२१**

ही महासभा महापालिका सचिवांनी प्रस्तृत केलेल्या दिनांक २२/०९/२०२० (त्यात १२/१०/२०२० व १८/०१/२०२१) रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे पृष्ठ क्र. १ ते २० पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर/ पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव:—** विषय क्र. ३ वाचुन दाखवितात.

———————————————————————————————————————

⇨**विषय क्र. ३ :—**उल्हासनगर महानगरपालिका मा. परिवहन समिती बरखास्त करणे.

———————————————————————————————————————

**सदस्य, श्री राजेश वानखेडे :-** खर म्हटलं तर प्रस्ताव कोणी आणलाय. आधी कुर्ला कॅम्पचा रस्ता तुटला आहे तो दुरुस्त करण्यात यावा.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी :-**हॅलो, आवाज येतोय काय. अचानक कस काय आणलय काय कारण आहे. कोण बोलणार आहे याच्यावर.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** वाहन विभागाचे उपआयुक्त् कुठे आहेत?

**सदस्या, श्रीमती कांचन लुंड:-**आवाज येत नाही.

**सदस्य,श्री राजेश वानखेडे:-**आवाज येत नाही. सचिव मॅडम.

**श्री अशोक मोरे, उप-आयुक्त, वाहन :-** येतोय आवाज

**सदस्य, श्री. शंकर लुंड :-**आवाज येत नाही. सचिव मॅडम येतो, आवाज नाही.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी :-**सत्ताधा-यांना सुध्दा येत नाही आवाज. तर विरोधी पक्षांना काय.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी :-**भाऊ काय सर्व ठिक आहे ना. कुणाकुणाला आवाज येत नाही.

**सदस्या, श्रीमती अंजली साळवे:-** आवाज नाही येत.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी :-**सचिव मॅडमबघा ना. सचिव मॅडम.

**सदस्य, श्री.राजेश वानखेडे :-** आवाज मला येतो बघाना.

**श्री. अशोक मोरे, उप-आयुक्त, वाहन:-** परिवहन सेवा २०१६ पासुन सुरु करण्यात आली होती सदरची निविदा तीन वेळा प्रसिध्द करुन देखील तरी प्रतिसाद मिळाला नाही. तसेच सदर परिवहन सेवेबाबत वारंवार बरखास्त करण्या संदर्भात पत्र व्यवहार होत होते. तसेच तारांकित प्रश्न् ही उदभवत होते. म्हणुन सदरचा प्रस्ताव आपणापुढे सादर करण्यात येत आहे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:**-एक सांगा यामध्ये मा. महापौरजी, आपण सत्ताधारी आहात, प्रशासन असक्षमझाले आहे काम करण्यासाठी.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:**-प्रशासनाकडे तक्रार कोणी केली आहे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:**-आपल्या कार्यकाळात आपण परिवहन सेवा देवु शकत नाहीत,परत परिवहन सेवा बरखास्त करणार. लोकांना काहीही देवू शकत नाही.

**सदस्या, श्रीमती कांचन लुंड:-** मॅडमजी परिवहन सेवा बरखास्त करु नका लोकांना आधीच त्रासआहे. पहिलेच कोरोनाचा काळ आहे.त्यातच बस बंद करत आहे. आपले बस चालवा लोकांना या सुविधा दया. का त्यातच आपण टेंडर प्रकियेमध्ये जात आहेत. यामध्ये का निविदा मागवतात, माझा विरोध आहे. लोकांना किती त्रास देणार. याला माझा विरोध आहे. परिवहन समिती बंद नाही व्हायला पाहिजे.

**सदस्य श्री शंकर लुंड:**-२५ लाख रुपयास एक बस येत आहे. सध्या ४ बस जरी चालवाल्या तर एक करोड होतात नविन निविदा मागवा.

**सदस्या, श्रीमती कांचन लुंड:-** का टेंडर चालवतात. लोकांना या सुविधा दया.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:**-मा. महापौरजी, आपण मध्येच बोलत आहात.

**सदस्य, श्री. शंकर लुंड:**-चौधरी साहेब बोलतात.

**सदस्य, श्री.किशोर वनवारी:**-मा. आयुक्त साहेब, ही परिवहन सेवा ठाण्याला आहे, संपुर्ण महाराष्ट्रात चालु आहे.

**सदस्य श्री. अरुण आशान :**-मा.आयुक्त साहेब, खर म्हटले तर हा प्रस्ताव प्रशासनाने का आणला.

**सदस्य, श्री.मनोज सयानी:**-अरुण घाई का आहे. लग्नाला जायचे आहे का.

**सदस्या, श्रीमती कांचन लुंड:-** मॅडमजी परिवहन सेवा बरखास्त करु नका. लोकांवर अन्याय करु नका. पहिलेच कोरोनामुळे महागाई झाली आहे. १० वर्षापासून थोडा वेळ बाकीत्यासाठी लोकांनातयार आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:**-जमनुजी झाल का आपले.

**सदस्य, श्री.जमनादास पुनस्वानी:**-बोला, बोला, चौधरी साहेब बोला.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी :**-थांबाना शेरी बोला, शेरी बोला.

**सदस्य श्री. शंकर लुंड:-** ट्रान्स्पोर्टचे काम आहे.दोन मिनिट थांबा. दोन मिनिट ऐकून घ्या. मी प्रस्ताव देतो की ४ बस खरेदी केल्या पाहिजेत व आपले ड्रायवर बसवर ठेवले पाहिजेत. आयुक्त साहेब १ करोड लावायचे आहेत. उल्हासनगर

महानगरपालिका परिवहन सेवा तिथे पोहचणार. तर दिवसा १० फे-या मारायच्या १० फे-या व ४० लोक, तर १२०० लोक रोज याचा फायदा घेउु शकतील. फक्त १ करोड लावावे लागतील. जास्त् नाही.

**सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी:-** मा. महापौर माझी विनंती आहे, त्यांना सेवा देण्यासाठी. कारण कल्याण डोंबिवली महानगरपालिका जीएमएमवरमिळालेली आहे. अजूनपर्यंत कोणालाही लाभ मिळालेला नव्हता. कोणाची ही सत्ता असु दे. आमची असु दे, की तुमची असु दे. सध्या परिस्थितीची आहे.तुम्ही २५ बस लोकांसाठी. सर्व गोरगरीबांना सेवा मिळाली पाहिजे

**<u>सदस्य श्री. मनोज सयानी</u>:-** कृपया सर्व संमतीने हा प्रस्ताव रदद करा. आपली बससेवा सुरु झाली पाहिजे. महापालिकेची बससेवा सुरू झाली पाहिजे. पाहिजे बस सेवा. महापालिकेची बस सेवा सुरु झाली पाहिजे. शिवशाही बससेवा नाव ठेवा, शिवशाही बससेवा नाव ठेवा, उल्हासनगरची बस सेवा झाली पाहिले.

**<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-</u>** तुमचे बोलणे झाले का आता आम्हांला बोलायचे आहे.सदस्यांच्या तक्रारी असतील त्याबाबत खुलासा झाला पाहिजे. सदस्यांच्या तक्रारी नसतील तर ब्लॅकमेलर तक्रार करत असेल आम्हांला खुलासा झाला पाहिजे.मा. सदस्यांची आपण चर्चा करावी आणि चर्चा केल्यानंतर ठरवावे आपण आय.ए.एस. आयुक्त् आहात डॉक्टर आहात.

**<u>सदस्य श्री. मनोज सयानी</u>:-** बससेवा सुरु झाली पाहिजे आणि येणा-या चेटीचंद पर्यंत आणि येण्साा-या गुढीपाडव्यापर्यंत त्या सुरु झाल्या पाहिजेत. आणि त्याचे नाव ठेवले पाहिजे शिवशाही बससेवा.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी</u>:-**माझा आयुक्त साहेबांना हा प्रश्न आहे. सर्व विरोधी पक्ष नेता, सभागृह नेता यांच्याशी चर्चा का नाही केली आणि चर्चा केली नाही तर का आणला. कोणीतरी तक्रार केली आहे असे कुण्या एका अधिका-याने सांगितले आहे. आणि कुणी ब्लॅकमेलर तक्रार करतो त्याच्या सांगण्याने तुम्ही प्रस्ताव आणता. शासनाचा नियम काय आहे.मला वाटते की शासनाच्या नियमाप्रमाणे महागनगरपालिका परिवहन सेवा असली पाहिजे ती रदद न करता चालू कशी होईल. स्पष्ट शब्दात बोललो उल्हासनगरच्या नागरीकांना सेवा नाही देवू शकत. परिवहन सेवा रदद नाही केली पाहिजे.

**<u>सदस्य, श्री. मनोज सयानी</u>:-** मा. महापौरजी, हा प्रस्ताव प्रशासनाने आणला आहे कृपया सर्वसंमतीने हा प्रस्ताव रदद करा. १ एप्रिल,गुढीपाडवा दिवशी आणि चेटीचंदच्या दिवशी महानगरपालिका आपली बससेवा चालू करणार असा ठराव करा.

**<u>सदस्य श्रर. चंद्रशेखर यादव:-</u>**मा. महापौर,मा. चौधरी साहेबांनी यांनी सांगितल्याप्रमाणे आम्हीपण सांगितले.चौधरी साहेबांनी जे सांगितले. विरोधी पक्षांनी पण सांगितले रदद नाही झाले पाहिजे.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी</u>:-** आम्हांला रस आहे, तो रद्द नाही झाला पाहिजे.

**<u>सदस्य श्री. अरुण आशान:-</u>**बरोबर आहे. बरोबर आहे. प्रदिपजी

**<u>सदस्य, श्री.प्रदिप रामचंदानी</u>:-** नामंजूर, नामंजूर, नामंजूर, नामंजूर. एक मिनिट एक मिनिट-

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी —</u>** ठराव रद्द करा.

**<u>महपौर तथा पिठासिन अधिकारी:-</u>** ठराव रदद करा.

**<u>महापालिका सचिव :-</u>** मा. पिठासीन अधिकारी यांनी ठराव रदद करण्यास सांगितला आणि श्री. मनोज सयानी यांनी सांगितले १ एप्रिल पर्यंत प्रशासनाने स्व्त:च्या बस सेवा खरेदी करुन चालू कराव्यात.

**<u>सदस्य श्री. शंकर लुंड:—</u>**धन्यवाद! धन्यवाद!

**<u>सदस्य श्री. मनोज सयानी</u>-**पुढे घ्या, पुढे घ्या.

**<u>काही सदस्य :—</u>**पास—पास……

**<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ३ :—**उल्हासनगर महानगरपालिका मा. परिवहन समिती बरखास्त करणेबाबत.

## <u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रात प्रवासी बससेवा सुरू करणेबाबत सन २००७ मध्ये मा. विशेष महासभा ठराव क्र. ३५, दिनांक १३/०७/२००७ अन्वये जुलै २००७ मध्ये निविदा मागविण्यात आली होती. तसेच

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २५ (१) (२) व मा. महासभा ठराव क्र. ४०, दिनांक २३/०८/२००७ अन्वये परिवहन समितीची रचना करण्यात आलेली आहे.

तसेच शासनाचे पत्र क्र. संकीर्ण-१७०६/१४३१/नवि-२८, दिनांक ०५/१०/२००७ अन्वये उल्हासनगर शहरातबी.ओ.ओ.टी. तत्वावर पी.पी.पी. अंतर्गत परिवहन सेवा उपक्रम सुरू करण्याच्या प्रस्ताव स्थगीत ठेवावे असे कळविले होते. त्यामुळे परिवहन सेवा उपक्रम सुरू करणेबाबतची सन २००७ मध्ये प्रसिध्द करण्यात आलेली निविदा रद्द करण्यात आली होती.

अ) उल्हासनगर महानगरपालिका शहरात परिवहन सेवा सुरू करण्यासाठी मनपात मार्फत खालील प्रमाणे ठराव करण्यात आले.

१) मा. विशेष महासभा ठराव क्र. ३५, दिनांक १३/०७/२००७
२)मा. महासभा ठराव क्र. ४०, दिनांक २३/०८/२००७
३) मा. महासभा ठराव क्र. ७४, दिनांक ११/०२/२०१०
४) मा.परिवहन समिती ठराव क्र. १५, दिनांक २०/१२/२०११
५)मा. महासभेने देखील ठराव क्र. २३, दिनांक २१/१०/२०१३
६) मा. स्थायी समिती ठराव क्र. १०, दिनांक २०/०६/२०१४
७)मा. महासभा ठराव क्र. २२, दिनांक ०४/०७/२०१४
८) मा. महासभा ठराव क्र ७, दिनांक १४/०५/२०१५
९)मा. परिवहन समिती ठराव क्र. ०८, दिनांक १४/१२/२०१५
१०) मा. महासभा ठराव क्र. ७२, दिनांक १९/०३/२०१६
११)मा.परिवहन समिती ठराव क्र. ०३, दिनांक ०८/०२/२०१८
१२)मा. महासभा ठराव क्र. २४ दिनांक ०४/९/२०१८
१३) मा. विशेष सभा ठराव क्र. ३९ दिनांक २०/१०/२०१८
१४) मा. परिवहन समिती ठराव क्र. १ दिनांक ०१/२/२०१८

आ) उक्त् ठरावाच्या अनुषंगाने खालील प्रमाणे काम करण्यात आली.

**१) अनुक्रम १ व २ नुसार** उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात प्रवासी बससेवा सुरू करणेबाबत मान्यता दिली असता जुलै २००७ मध्ये निविदा मागविण्यात आली होती तसेच अनुक्रमे २ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २५ (१) (२) परिवहन समितीची रचना करण्यात आलेली आहे.

**२)** तसेच शासनाचे पत्र क्र. संकीर्ण-१७०६/१४३१/नवि-२८, दिनांक ०५/१०/२००७ अन्वये उल्हासनगर शहरात पी.पी.पी. अंतर्गत बी.ओ.ओ.टी. तत्वावर परिवहन सेवा उपक्रम सुरू करण्याच्या प्रस्तावास स्थगीत ठेवावे असे कळविले होते. त्यामुळे परिवहन सेवेबाबतची निविदा सन २००७ मध्ये रद्द करण्यात आली होती.

**३)** याबाबत शासनाने पत्र क्र. उमपा/२३२८/४६७/प्र.क्र.०८/नवि-२१, दिनांक १८/११/२००८ अन्वये शहरात पी.पी.पी. अंतर्गत बी.ओ.ओ.टी. तत्वावर परिवहन सेवा सुरू करण्याबाबतची स्थगीती उठवली असता पुनश्च: निविदा मागविण्यासाठी निविदा सुचना दैनिक लोकसत्ता, इंडियन एक्सप्रेस या वृत्तपत्रात दिनांक १७/१२/२००८ मध्ये जाहिरात प्रसिध्द करण्यात आली असून माहे जानेवारी २००९ मध्ये निविदा उघडली असता सदर निविदेत (१) मे. अषिश कन्ट्रकशन, नवी मुंबई (२) मे. आर.एस. कन्ट्रकशन, रायगड (३) मे. क्रेस्ट्रल इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. उल्हासनगर या तीन निविदाकारांनी भाग घेतला होता परंतु मे. क्रेस्ट्रर इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. उल्हासनगर यांनी प्रति कि.मी. रू. ०.५५ नुसार महापालिकेस रॉयल्टी देण्याचे मान्य केले असल्यामुळे मे.क्रेस्ट्रल इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि., उल्हासनगर यांना करारनाम्याच्या अटी व शर्तीच्या अधारे दहा वर्षासाठी रॉयल्टी बेसेसवर १४ मार्गावर २५ बसेसने परिवहन सेवा सुरू करणेकरीता वाहन विभागामार्फत जा क्र.उमपा/वाहन/७९, दिनांक २९/०७/२००९ अन्वये कार्यादेश देण्यात आला होता. परंतु ठेकेदारा मार्फत दिनांक २७/०१/२०१० मध्ये बी.ओ.ओ.टी. तत्वावर परिवहन सेवा सुरू करण्यात आली होती.

**४) अनुक्रम ३ नुसार** दिनांक २८/०७/२००९ रोजी ठेकेदारानी महापालिकेशी केलेल्या् करारातील अट क्रं २३ प्रमाणे महापालिकेकडे पार्किंगसाठी किंवा बस थांब्यांसाठी जर काही जागा उपलब्ध् झाली तर ठेकेदारास कराराच्या कालावधीपर्यंत तात्पुरत्या स्वरूपात योग्य् त्या भाडयात देता येईल. या अनुषंगाने मा महासभेने ठराव क्रं ७४ दिनांक ११/०२/२०१० अन्वये पुढील तीन जागा (१) हॉटल ॲम्ब्रोसीयाच्या बाजूला विठ्ठलवाडी स्टेशन, आरक्षण क्र. १९३ (२) कैलाश कॉलनी, शिवमंदीर जवळ, उल्हासनगर-५ मंजुर विकास आराखडयानुसार आरक्षण क्र. ५० (३) उल्हासनगर स्टेशन (पश्चिम) येथिल मंजुर विकास आराखडयानुसार हरीत पटटा राखीव अशा तीन ठिकाणची जागा तात्पुरत्या स्वरूपात मंजुर करण्यात आलेली असून सदर ठेकेदारास कैलाश कॉलनी, शिवमंदीर जवळ, उल्हासनगर- ५ (मंजुर विकास आराखडयानुसार आरक्षण क्र. ५०) तात्पुरर्त्या स्वरूपात भाडेतत्वावर वापरण्यास दिलेली होती.

५) **अनुक्रम ४ नुसार** ठेकेदार करारनाम्यातील अट क्र. ४३ व ४४ अन्वये तिकीटदरात वाढ करण्यास मान्यता दिली असून तसेच या मान्यतेस अनुक्रमे ५ नुसार मा. परिवहन समिती व मा. महासभेच्या मंजुरीने तिकीट दरात वाढ करण्यात आली होती.

६) **अनुक्रम ६ नुसार** संबंधीत ठेकेदार दरम्यानच्या कालावधित डिझेलचे दर वाढत असल्याने दरवाढीचे कारण सांगून वारंवार तिकीट दरात वाढ करण्याची मागणी करून परिवहन सेवा सुरळीत सुरू ठेवत नव्हता व माहे सप्टेंबर २०१२ पासून महापालिकेस देय असलेली रॉयल्टी रक्क्म व शासनास भरावयाचे बालपोषण अधिभार व प्रवासी कर भरलेला नसल्यामुळे सदर ठेकेदारास परिवहन सेवा सुरळीत करण्याकरीता मनापा मार्फत वारंवार नोटीस देऊन ही सेवा सुरू ठेवत नसल्याने मे. क्रेस्ट्रल इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. उल्हासनगर यांचे सोबत केलेला परिवहन सेवेचा करारनामा रद्द करून अटी व शर्तीनुसार त्यांची बॅक गॅरेटी तप्त् करून सदर ठेकेदारास काळया यादीत टाकणेकरीता सदरचा प्रस्ताव मा. महासभेच्या निर्णयास्त्व सादर करण्यात आला.

७) **अनुक्रमे ७ नुसार** मा. महासभाने मा. स्थायी समिती ठराव क्र. १० कायम करून मे. क्रेस्ट्राल इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. उल्हासनगर यांना काळया यादीत टाकून माहे जुलै २०१४ मध्ये परिवहन सेवा पुर्णत: बंद करण्यात आलेली आहे.

८) **अनुक्रमे ८ नुसार** कालांतराने शहरातील नागरीकांच्या मागणीनुसार महाराष्ट्र राज्य महामंडळाची परिवहन सेवा उल्हासनगर शहरात पुनश्च: सुरू करणेसाठी विनंती केली.

९) **अनुक्रमे ९ व १० नुसार** उल्हासनगर महानगरपालिकेची स्वत:ची परिवहन सेवा सुरू करणेसाठी नविन दहा बसेस खरेदी करणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता दिली.
परंतु दरम्यानच्या कालावधित महापालिकेची आर्थिक स्थिती बेताची नसल्याने सदरची परिवहन सेवा ठेकेदारामार्फत चालविण्यास तत्कालीन मा. आयुक्त सो, यांनी निर्देशित केल्यानुसार परिवहन सेवा पुनश्च: सुरू करणेसाठी ई- निविदा क्र. १५०६, दिनांक ०९/०३/२०१८ रोजी दैनिक मुंबई भारत, धनुष्यधारी, मिड डे या वृत्तपत्रा मध्ये प्रसिध्द् करण्यात आली असून सदर निविदेस योग्य् प्रतिसाद मिळाला नाही.

१०) **अनुक्रमे ११ नुसार** ई- निविदा क्र. १५०६ वारंवार मुदतवाढ देवूनही योग्य प्रतिसाद न मिळाल्यामुळे मा.परिवहन समितीच्या मान्येतेने ई निविदाच्या अटी शर्ती शिथिल करून पुन्हा ई- निविदा प्रसिध्द् करण्यात आली, परंतु सदर निविदेस प्रथम, द्वितीय व तृतीय अशी तीन वेळेस मुदतवाढ देऊन ही योग्य् प्रतीसाद मिळाला नाही. उक्त बाब पाहता वेळोवेळी प्रयत्न करून देखील योग्य प्रतिसाद मिळत नसल्यामुळे पुन्हा अंतिम निविदा प्रसिध्द् करणेबाबतचा प्रस्ताव प्रस्तावित आहे.

११) **अनुक्रमे १२ नुसार** मा. परिवहन समितीची पुर्नरचना करण्याबाबत मंजुरी घेण्यात आली.

१२) **अनुक्रमे १३ नुसार** विशेष सभान्वये १२ सदस्याची बिनविरोध निवडून आल्याचे घोषित करण्यात आले.

१३) **अनुक्रमे १४ नुसार** सन २०१९-२० चे मुळ अंदाजपत्रक रु. ३,५५,००,०००/- एवढी तरतुद करण्यात आली.

उल्हासनगर शहरात बी. ओ. ओ. टी तत्वावर पी.पी. पी अंतर्गत परिवहन सेवा सन २०१० ते २०१४ या कालावधीत चालु होती परंतु अनुक्रम ६ नुसार मे. क्रेस्ट्राल इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. उल्हासनगर यांचे सोबत केलेला परिवहन सेवेचा करारनामा रद्द करून मा. महासभा ठराव क्र. २२ दि. ४/७/२०१४ अन्वये सदर ठेकेदारास काळया यादीत टाकणेत आले व परिवहन सेवा बंद करण्यात आली. सदर परिवहन सेवा बंद पडल्याने वारंवार विविध स्तरावर परिवहन सेवा सुरु करण्यासाठी वाहन विभागामार्फत वेळोवेळी ई निविदा प्रसिध्द् करण्यात आली

परंतु सदर निविदेस वारंवार मुदतवाढ देवूनही योग्य प्रतिसाद न मिळाल्यामुळे मा.परिवहन समितीच्या मान्येतेने ई निविदाच्या अटी शर्ती शिथिल करून पुन्हा ई- निविदा प्रसिध्द् करण्यात आली, परंतु सदर निविदेस प्रथम, द्वितीय व तृतीय अशी तीन वेळेस मुदतवाढ देऊन ही योग्य् प्रतिसाद मिळाला नाही. उक्त बाब पाहता वेळोवेळी प्रयत्न करून देखील योग्य प्रतिसाद मिळत नसल्यामुळे पुन्हा अंतिम निविदा प्रसिध्द् करणेबाबतचा प्रस्ताव प्रस्तावित केले असता. सदर निविदा प्रसिध्द् करण्यापुर्वी मा. आयुक्त सो यांचेशी दि. ०८/०८/२०१९ रोजी झालेल्या चर्चानुसार उल्हासनगर महानगरपालिकेच्या वाहन विभागामार्फत उल्हासनगर शहरात बस सेवा ठेकेदारामार्फत सुरु करण्यासाठी निविदाधारकास महानगरपालिका जागा किंवा अन्य् सुविधा देण्यास बांधिल राहणार नाही. बस थाब्यांकरिता ज्या जागा उपलब्ध् करुन दिल्या जातील त्यास कलम ७९ नुसार जागा भाडे देय राहिल एक वेळी एकच जागा केवळ एक वर्षासाठी भाडयांने दिली जाईल व त्यानंतर प्रत्येक वर्षी भाडयात मध्ये ५ टक्के वाढ करुन आयुक्त् स्तरावर मुदतवाढ दिली जाईल बस सेवा बंद केल्यास/ असल्यास तात्काळ जागा रिक्त् करुन दयावी लगेल बस सेवा बंद झाल्यास जागा हस्तांतरीत करेपर्यत तिप्प्ट भाडे आकारले जाईल मुदत संपल्यानंतर जागा हस्तातरीत करावी लागेल. या अटीनुसार सदरचे ई निविदा

पुन्हा प्रसिध्द् करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार सदर निविदा क्र. २३९६ चा कालावधी दि.१५/११/२०१९ ते दि.०७/१२/२०१९ पर्यत प्रसिध्द् करण्यात आलीहोती.परंतु या ई निविदेस प्रतिसाद मिळाला नाही.

तरी ई निविदेस प्रतिसाध मिळत नसुन परिवहन समिती बरखास्त् करणेसाठी मा. महासभे पुढे निर्णयास्तव् प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र:१२** **दिनांक:—१७/०२/२०२१**

सुचकाचे नाव :— १)श्री. राजेंद्र चौधरी

२) श्री. प्रमोद टाले

अनुमोदकाचे नाव :— १) श्री. किशोर वनवारी

२) श्री. जमनादास पुरस्वानी

३) श्री. शंकर लुंड

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे परिवहन समिती बरखास्त करणेचा प्रस्ताव अमान्य करीत आहे.

**तसेच**

उल्हासनगर महानगरपालिकेने स्वत:ची ४ बस खरेदी करुन १ एप्रिलपर्यंत बससेवा सुरु करणेस प्रशासनास निर्देश देत आहे.

सुचकाची सही/— 1.

2.

अनुमोदकाची सही/— 1.

2.

3.

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी

सर्वसाधारण महासभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ४ वाचुन दाखवितात

———————————————————————————————————

⇨ **विषय क्र. ४ :—**मयत झालेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसाना अनुकंपातत्वाने नियुक्ती देण्याबाबत.

———————————————————————————————————

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>** मा. महापौरजी यामध्ये शिक्षण मंडळाच्या कर्मचा-यांचा सुध्दा समावेश केला जावा. उल्हासनगर महानगरपालिकेचा जो शिक्षण विभाग आहे त्याचा सुध्दा समावेश केला जावा.

**<u>सदस्य श्री. किशोर वनवारी –</u>** शिक्षण मंडळाच्या सर्व स्टाफला न्याय दिला जावा.

**<u>सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी</u>:-**मा. महापौर, मा. उपमहापौर, मा. आयुक्त साहेब, मयत कर्मचा-यांच्या वारसांना वर्ग ३, वर्ग ४ कर्मचा-यांना अनुकंपा तत्वावर नियुक्त करण्याचा जो ठराव आलेला आहे. तो सर्व संमतीने पास करण्यात यावा. कारण या अगोदर सुध्दा आपल्या महासभेमध्ये २०१६ साली आणि २०१८ साली अनुकंपा तत्वावरील लोकांना नियुक्ती देण्याबाबतचा ठराव आपण पारीत केला होता. त्याप्रमाणे २०१८ ला ८९ उमेदवारांना आपण अनुकंपा तत्वाद्वारे त्यांना नियुक्ती करुन दिले होते. सन २०२०-२०२१ या वर्षामध्ये अनुकंपा तत्वावरील कुटुंबीयांच्या वारसांना नियुक्ती देण्यात यावी. या मताशी संपुर्ण सभागृह एकमत असले पाहिजे. कारण की या अनुकंपातत्व् जेव्हा होतो,तेव्हा तो जो अनुकंप आहे त्याने या महापालिकेमध्ये सेवा केलेली असते आणि सेवा करताना त्याचा मृत्यु झालेला असतो आणि मृत्युच्यानंतर त्यांच्या वारसांनाया कर्मचारी म्हणून आपण सांभाळून घेतो. मला वाटतं संपुर्ण महानगरपालिका याबाबतीमध्ये एकमत असली पाहिजे. कारण शिपाई असो, वर्ग ३ असो वर्ग ४ असो ज्या लोकांनी या महानगरपालिकेमध्ये जमनूजी, जमनूजी, एक मिनिट मी आपल्यावर मुददयावर येतो.ज्या लोकांनी जी सेवा केली आहे त्या सेवेस अनुसरुन आज ती अनुकंपाच्याप्रतिक्षेत आहेत. आणि महानगरपालिकेमध्ये त्या कर्मचा-यांची याच्या अगोदरच कर्मचा-यांची वाणवा आहे. आणि त्या कर्मचा-यांची आज तेही लोक या प्रतिक्षेत आहेत की, आपल्याला नियुक्ती मिळेल. मला अस वाटत की, उल्हासनगर महानगरपालिकेने याअगोदर ठराव क्र. ३४ नुसार १९.१०.२०१८ ला आपण काही लोकांना यामध्ये सामावून घेण्यात आले होते. त्यामध्ये महाराष्ट्र शासनाचा एक निर्णय पण झाला होता.त्या महाराष्ट्र शासनाच्या निर्णयामध्ये त्यांनी सुदधा महानगरपालिका, नगरपालिका, महामंडळ प्राधिकरण यांना स्वतंत्रपणे आपणआपला निर्णय घ्या आणि अनुकंपा तत्वावर नियुक्ती करा. अस त्यांनी म्हटल आहे. महापालिका सेवेमध्ये मयत झालेल्या कर्मचा-यांच्या वारसांना.....हॅलो, मा. महापौरजी, ऐकायला येते का.सचिव मॅडम, ऐकायला येते का ?

**<u>महापालिका सचिव</u>:-**चौधरी साहेब, हो बोला ऐकायला येते.

**<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी –</u>**तुम्ही जे बोललात ते खुप चांगला बोललात. आम्ही हे सर्व मान्य करतो.

**<u>सदस्य श्री. अरुण आशान</u>-**श्री. प्रदिपजी आम्ही जे भाषण करतो त्याचा आपण आदर करावा, विरोधीपक्ष नेता सहमत आहेत, श्री. प्रदिपजी आपण अनुकंपाला न्याय दयावा, अनुकंपाला न्याय देण्याकरीता आपण हा प्रस्ताव मंजुर करावा, अशी मी प्रशासनाला आणि तुम्हांला सर्वांना विनंती करतो. मयत कर्मचा-यांच्या वारसापैकी एका वारसाला आपण ठोक पगारावर अस्थायी स्वरुपात नेमणूक करण्यात यावी याकरीता स्थायी समितीने सुध्दा मंजूरी दिली आहे. यापुर्वी मयत झालेले कर्मचारी त्या कर्मचा-यांच्या वारसांना आपण खर म्हटलं तर चर्चा न करता, त्यांची नियुक्ती केली पाहिजे. आज आपल्याकडे ज्या अनुकंपा आहेत. त्यांची संपुर्ण सभागृह एकमत असले पाहिजे. पालिकेमध्ये सेवा केलेली असते. चौकशी करुन त्यांच्या चौकशीद्वारे अहवालतयार करुन त्या अहवालाच्या अनुषंगाने ज्यांचे वय १८ वर्षापेक्षा जास्त आहेत व नाहीत त्याबाबत संपुर्ण शाहनिशा चौकशी करुन,अनुकंपा तत्वाला मान्यता दयावी, उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये याच्या अगोदर अनुकंपा हा कुटुंबामध्ये खर म्हणजे अनुकंप हा माझ्या घरातला विषय असल्याने अनुकंप म्हणजे काय हे माझ्या पाठीशी माझ्या गाठीशी आहे. म्हणून माझी विनंती आहे की, या सगळयांना, शासनाला विनंती आहे की, अनुकंपा तत्वाचा जो मुददा आलेला आहे. तो आपणमान्य करुन घ्यावा. हि नम्र विनंती आहे.

**<u>सदस्य, श्री.प्रदिप रामचंदानी</u>:-**आपण खुप सुंदर बोलला आहे. सर्व संमतीने पास करतो. तुमचे भाषण मला निवडणुकीचे भाषण वाटत आहे. तुम्ही खुप चांगले बोलले. आम्ही सगळे मान्य करतो. ....

**<u>सदस्य, श्री. अरुण आशान</u>:-**श्री.प्रदिपजी आम्ही कोणत्याही निवडणूकीचे भाषण करत नाही. आपण त्यांचा आदर करावा. सहमत आहे. अनुकंपांना न्याय दयावा अनुकंपांना न्याय देण्याकरीता अशी मी प्रशासनाला आणि तुम्हांला विनंती करतो.

**<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी</u>-**पास, पास, पास,इतिवृत्ताची वाट न पाहता. आणि त्यामध्ये स्कुल बोर्डाचा सुध्दा समावेश करा.

**<u>सदस्य, श्री. अरुण आशान</u>:-**सचिव मॅडम, मी ठराव वाचून दाखवतो.

**<u>महापालिका सचिव</u>:-** ठराव वाचून दाखवा.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी</u>:-** सचिव मॅडम.

**सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी:-** शिक्षण मंडळाचा समावेश करण्यात यावा.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** शिक्षण मंडळाचा समावेश करण्यात यावा. अशी जमनु पुरस्वानीचीमागणी केलेली आहे. ठराव करीत आहे की सर्व अनुकंपा तत्तवाचा समावेश करतांना शिक्षण मंडळाचे कर्मचारी यांचा सुध्दा समावेश करण्यात यावा.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** या संदर्भामध्ये मा. महापौरांनी आयुक्त साहेबांना मत मांडण्यास सांगितले आहे. आयुक्त साहेब आपले मत मांडतील.

**आयुक्त, डॉ. राजा दयानिधी** :- सन्मानीय अध्यक्ष महोदय, मा. सदस्यांनी शिक्षण मंडळाच्या बाबतीत अनुकंपा तत्वावर त्यांनी विनंती केलेली आहे. सांगू इच्छितो, सदर प्रकरणांचा जो काही नियम आहे. शिक्षण मंडळाच्या लोकांना अनुकंपा देण्याच्या बाबतीत त्या अनुषंगाने आपण पुढील सभेमध्ये आपण शिक्षण मंडळाचा प्रस्ताव सादर करु.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** नाही नाही शिक्षण मंडळ का याच्यात समावेश होउ शकत नाही प्रस्ताव कारण यात समावेश केला तर काय अडचण येईल. पुढच्या महासभेमध्ये कशाला, तो मी वाचून दाखवतो, मान्यता दिलेली आहे. सचिव मॅडम मतदान घ्या.

**सदस्य, श्री. अरुण आशान:-**मा. महापौर, मा. उपमहापौर मा. आयुक्त साहेब, या अनुकंपा तत्वाच्या बाबत आता जो ठराव आलेला आहे. तो मी वाचून दाखवतो. सगळयांनी याला संमती दिलेली आहे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरसवानी:-**संमती दिलेली नाही आहे.

**सदस्य, श्री.अरुण आशान:-**आयुक्त साहेबांनी शिक्षण मंडळा सुध्दा सांगितले आहे. जमनु जी. आयुक्त साहेबांनी आता सांगितले.

**सदस्य, श्री.प्रदिप रामचंदानी:-**मान्य नाही, मान्य नाही.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-**सचिव मॅडम मतदान. मतदान.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-** तुम्ही चुकीचे बोलू नका. माहिती नाही तर.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-**मतदान ज्याचे मत नाही त्यांनी गप्प बसाचे. ज्यांना माहित नाही ते. सर्वांना बोलु दयावे, मतदान करा. त्यांचा मतदान करा. जो पर्यंत शिक्षण मंडळाचा पण समावेश झाला पाहिजे ते पण महानगरपालिकेचे कर्मचारी आहेत. एका सोबत न्याय आणि एका सोबत अन्याय.

**सदस्य, श्री.अरुण आशान:-**जमनुजी आपण बोलता की आम्हांला मतदानाचा अधिकार नाही, बोलण्याचा अधिकार नाही. पण आम्हांला या सभागृहात बोलण्याचा अधिकार आहे. आम्ही माहिती घेवून बोलतो आणि आपण जे बोललात माझे म्हणणे ऐका. आपण शिक्षण मंडळाबाबत जे बोलले त्यासाठी आम्ही नाही म्हणतनाही. आम्ही तेच म्हणतो मा. आयुक्त सांगितले ते आपण ऐकले नाही. आणि मी प्रदिप रामचंदानी जे बोलले आहेत या सगळया गोष्टीमध्ये तर मी हेच सांगू इच्छितो ठराव आला आहे. तो ठराव शिक्षण मंडळाचा ऐका माझे म्हणणे...........

**सदस्य, श्री. जमनुदास पुरस्वानी** :-आम्ही विरोधात आहेत. त्या ठरावाच्या आम्ही विरोधात आहोत. मतदान करा. सचिव मॅडम मतदान करा. मतदान करा.

**सदस्य श्री. शंकर लुंड :-** हे तर असे झाले की कूणाला मिळाले कुणाला नाही मिळाले...सगळयांना अधिकार मिळाला पाहिजे. शिक्षण मंडळ जे लागू आहे. ते झाले पाहिजे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी** :-काम करु नका. ऐका माझे तुमचे मत आहे. एकासोबत न्याय आणि एकासोबत अन्याय एका सगळयांचा मत आहे.

**सदस्य श्री. अरुण आशान-**बोलू आता.हा बोला मला वाटतं अनुकंपा तत्वाच्या नियुक्ती करण्याकरीता प्रस्ताव कधी आला होता कि नाही.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया :-**मा. महापौरांजी मी एक गोष्ट स्पष्ट करु इच्छितो की सर्वांना, आता शिक्षण मंडळ नाही राहिले आहे.आता शिक्षण विभाग झाले आहे. आणि तो उल्हासनगर महानगरपालिकेचे विभाग झाले आहे. या विभागात

जेवढे वर्ग ३ व वर्ग ४ चे कर्मचारी कामावर असताना मृत्यृ झाला आहे. त्यांच्या मुलांना सुध्दा हा फायदा मिळाला पाहिजे.महापौर जी माझा आवाज येत आहे का.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव**:- येत आहे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया**:-माझे म्हणणे हे आहे. तो आता शिक्षण विभाग आहे. शिक्षण् विभाग आहे. जेवढे कर्मचारी वर्ग ३ व वर्ग ४ चे कर्मचारी कामावर असताना मृत्यृ झाला आहे. जो फायदा बाकीच्या विभागाच्या मुलांना मिळतो आहे, तो शिक्षणविभागाच्या कर्मचारी कामावर असताना मृत्यृ झाला आहे. त्यांच्या मुलांना सुध्दा याची सवलतमिळाली पाहिजे. महानगरपालिका एकाला विभागाला एक सवलत देणार नाही दुस-याला नाही देणार असे नाही करु शकत.

**सदस्य, श्री. शंकर लुंड**:-मी राजेश वधारीया यांच्या मताशी सहमत आहे.

**सदस्य श्री. मनोज सयानी-** जो पर्यंत शिक्षण मंडळाचा या ठरावात समावेश होत नाही तो पर्यंत हा विषय पारीत होणार नाही.

**सदस्य, श्री.राजेश वदारिया**:-मनोजजी, शिक्षण मंडळ बोलणे बंद करा. शिक्षण विभाग बोला.

**सदस्य, श्री. मनोज सयानी**:- सॉरी सॉरी, शिक्षण विभाग.

**सदस्य, श्री. शंकर लुंड**:- मी आयुक्त साहेबांना आग्रह करतो, शिक्षण विभागावर प्रकाश टाका. कृपा करुन राजेश वधारीया साहेबांनी सांगितले त्यावर थोडा प्रकाश टाका.

**सदस्य, श्री.अरुण आशान**:-मा.महापौरजी, उप-महापौरजी, आयुक्त् साहेब, सचिव मॅडम, या अनुकंपा तत्वाच्या नियुक्ती करण्या करीता सभागृहाच सगळ मत आहेच. परंतु त्यांच शिक्षण विभाग या शिक्षण विभागाची सुध्दा अनुकंपा तत्वावर नियुक्ती करायला पाहिजे असे काही लोकांच मत आहे.

**सदस्य, श्री.शंकर लुंड**:- सगळयांच मत आहे. तुमच नाही का ? तुमच नाही का ? अस दिसतं. काही लोकांच नाही. सगळयाचं सांगा.

**सदस्य, श्री. अरुण आशान**:-सगळयांच बोला .

**सदस्य, श्री.शंकर लुंड** :-होय, सगळयांच सांगा.

**सदस्य, श्री. अरुण आशान**:-बोलू आता मा. महापौरांजी, तर उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये आता श्री. राजेश वधारीया यांनी सांगितले की, शिक्षण मंडळ नव्हे, शिक्षण विभाग. तर शिक्षण विभागाच्या पण लोकांमध्ये सुध्दा जी प्रतिक्षा यादी असेल तिचे रीतसर चौकशी होवून त्यांची पण क्रमवारी लागणे आवश्यक आहे.प्रशासनाच्या माध्यमातून हा विषय अदयाप पर्यंत आमच्या पर्यंत कधी, महापौरांकडे कधी पोहचला होता नव्हता माहित नाही. परंतु हया २०१८ च्या वेळी जो ठराव झाला. त्या ठरावाच्या माध्यमातून आपण अनुकंपा तत्वारील कर्मचा-याच्या वारसांना नियुक्ती देण्याकरीता ठराव पारीत केला होता. मला वाटत आपण ठराव पारीत करताना. महानगरपालिका कर्मचारी म्हटल होत.महानगरपालिकेचे कर्मचारी असतील तर त्यांचा पण समावेश नक्कीच व्हायला पाहिजे. परंतु आता हा जो खुप कालावधी पासुन प्रलंबित असलेला जो प्रस्ताव आहे. आणि त्यांची नियुक्ती आपल्याला करायची आहे. मला वाटत आयुक्त साहेबांनी सांगितले की, तोपण प्रस्ताव आम्ही पुढच्या वेळेस घेवून येवू. मा. सन्मानीय वरिष्ठ नगरसेवक श्री. जमनु पुरस्वानी, गटनेते भाजप,आणि आमचे सहकारी मित्र श्री. मनोज लासी व श्री. प्रदिप रामचंदानी यांचे सुध्दा असे मत आहे या सगळया गोष्टीमध्ये, या प्रस्तावामध्ये शिक्षण मंडळाचा समावेश व्हावा. सन्मानीय मा. सभापती, राजेश वधारीया यांनी याबाबत सुध्दा आपलं स्पष्ट मत मांडले आहे. माझी या संपुर्ण सभागृहाला नम्र विनंती आहे की, त्यांचे म्हणणे आहे की,महानगरपालिकेच्या वतीने महानगरपालिकेच्या बाजूने असेल तर आपण कर्मचारी मतदान घेवून आपण त्यांना कुठतरी दुखविण्याचा प्रयत्न करत आहोत. मला अस वाटत की आपले जे म्हणणे आहे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी-** ठिक आहे, पुढील वेळेस शिक्षण विभागाचे सुध्दा करा.

**सदस्य श्री. अरुण आशान**-नक्की नक्की

**सदस्य श्री. शंकर लुंड**:- त्यांचे म्हणणे आहे की, सर्वांचे झाले पाहिजे,

**<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी-</u>** भावी आमदार साहेब, भावी आमदार अंबरनाथ विधान सभा.

**<u>सदस्य श्री. अरुण आशान-</u>** आपण जे सांगितले श्री. प्रदिपजी मी जो ठराव शिक्ष्ण विभाग

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी-</u>** पास पास पास फक्त ॲड करा. ही सुविधा सर्वांना मिळाली पाहिजे. सर्वांचा अधिकार आहे.

**<u>सदस्य श्री. अरुण आशान-</u>** एक मिनिट जमनुजी

**<u>सदस्य श्री. शंकर लुंड</u>**:- सचिव मॅडम, सचिव जी विधान सभा आमदार साहेब,

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>** असे वाटत आहे की, विधानसभेच्या आतमध्ये एक भव्य शक्तीशाली

**<u>सदस्य श्री. किशारे वनवारी-</u>** भारतीय जनता पार्टी बोलले पास म्हणजे पास. तर पास.

**<u>सदस्य श्री. अरुण आशान-</u>**सचिव मॅडम, मा. महापौर, मा. आयुक्त मी ठराव वाचुन दाखवितो.

**<u>सदस्य श्री. शंकुर लुंड-</u>**अरुणजी,आमचा जो शिक्षण विभाग आहे याला पण समावेश केला पाहिजे. ही सुविधा सर्वांना मिळाली पाहिजे. सर्वांचा अधिकार आहे.

**<u>सदस्य श्री. अरुण आशान-</u>**कुठल्याही कर्मचा-याच्या विरोधामध्ये किंवा कुठल्याही कर्मचा-याच्या वारसांना मिळू नये या विषयावर मी चर्चा करीत नाही. मला या महापालिकेतील सर्व कर्मचारी त्यामध्ये कितीही विभाग असो. सर्व कर्मचा-यांच्या वारसांना न्याय मिळाला पाहिजे. हाच माझा मानस आहे. आपण जे सांगता आहात ज्यांकडे.....

**<u>सदस्या, श्रीमतीकविता पंजाबी</u> :-** मला पण एक गोष्ट सांगायची आहे सर, सर्वांना मिळाला पाहिजे.

**<u>सदस्य, श्री. अरुण आशान</u> :-**सर्वांना मिळेल.

**<u>सदस्य श्री. अरुण आशान-</u>**महोदया आज यादी येथे उपलब्ध नाही. किती लोक तेथुन घ्यायचे आहे, जी यादी आहे त्यास आपण नंतरच्या महासभेमध्ये घेऊन येवू प्रस्तावित करण्यासाठी प्रलंबित ठेवु. आज जो यादी त्यांना घ्यायला पाहिजे.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी</u> :-** पास पास पास फक्त ॲड करा. ही सुविधा सर्वांना मिळाली पाहिजे. सर्वांचा अधिकार आहे. एक मिनिट जमनुजी

**<u>सदस्य श्री. किशोर वनवारी-</u>**पुढचा विषय घ्या.पास, पास......

**<u>उप-महापौर, श्री. भगवान भालेराव</u>:-**किशोर वनवारीजी जरा शांत बसा.पुढचा विषय नाही आहे. विषय असा आहे. का शिक्षण विभागाचा जो अनुकंपाचा विषय आहे तो प्रशासनाने आपणापुढे आणलेला नाही. पहिली गोष्ट, त्याला काही तांत्रिक अडचणी आहेत. पहिली अडचण अशी आहे, का शिक्षण विभाग राजेश भाईनी सांगितले आहे. शिक्षण विभाग आहे. शिक्षण मंडळ नाही पण मला राजेश भाईना विनंती करायची आहे. शिक्षण मंडळ किंवा शिक्षण विभाग अजूनही महानगरपालिकेच्या आस्थापनेत मर्च झालेला नाही, समाविष्ट झालेला नाही. हि गोष्ट लक्षात ठेवा. पहिले मर्ज होउ दया. मर्च झाल्यानंतर त्यांच्या अनुकंपाचा विषय पुढे पटलावर येईल.

**<u>सदस्य, श्री. किशोर वनवारी</u> :-** धन्यवाद, धन्यवाद, भगवान भालेराव,हे भगवान हे भगवान.

**<u>सदस्य, श्री. अरुण आशान</u> :-**धन्यवाद उपमहापौर साहेब आपण जे सांगितले ते ...

**<u>उप-महापौर, श्री. भगवान भालेराव:-</u>**वस्तुस्थिती आहे शिक्षण विभाग अजूनही आपल्याकडे मर्ज झालेल नाही. मर्ज झाल्यावर शिक्षण मंडळ किंवा शिक्षण विभाग अजूनही महानगरपालिकेच्या आस्थापनात समाविष्ट झालेला नाही. पहिले समाविष्ट होउ दया. समाविष्ट झाल्यानंतर त्यांच्या अनुकंपाचा विषय पुढे पटलावर येईल. त्यावेळी आपण त्याला मान्यता देवू. पण आपण शिक्षण विभाग जेव्हा महानगरपालिकेस हस्तांतरीत होईल. त्यानंतर अनुकंपाचा विषय त्यांचा घेण्यात येईल, आता नाही देता येणार.

**<u>सदस्य, श्री. किशोर वनवारी</u> :-**चालेल चालेल.

**<u>सदस्य, श्री. अरुण आशान :-</u>** महापौर साहेब, शिक्षण मंडळ, शिक्षण विभाग महापालिकेत समाविष्ट करण्यात यावे समाविष्ट केल्यानंतर त्याची प्रतिक्षा यादी तयार करण्यात यावी. राजेश वधारीया साहेबांनी जे सांगितले की, शिक्षण मंडळ आता शिक्षण विभाग झालेला आहे. आणि ते शिक्षण विभाग आता शिक्षण महानगरपालिकेत समाविष्ट करण्यात येत आहे. तरती प्रतिक्षा यादी तयार करण्यात यावी. तत्पुर्वी हि महासभा आता जी अनुकंपा यादी प्रसिध्द झालेली आहे. त्याच्यामध्ये आपण जो ठराव करतो आहोत, त्याला आपण सर्व सदस्यांनी मान्यता दयावी. हि विनंती.

**<u>सदस्या, श्रीमतीकविता पंजाबी</u> :-** महापौर जी, ........

**<u>सदस्य, श्री. मनोज सयानी</u> :-**लवकरात लवकर शिक्षण विभागातसमावेश करा. त्यांना महापालिकेच्या मुख्यालयात आणा.

**<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी</u>:-**आम्ही कौतूक करतो आहोत की, लोकतंत्राच्या मार्गानेपहिल्यांदा हे घडले आहे. याबददल आपले अभिनंदन.

**<u>सदस्य, श्री. मनोज सयानी</u> :-**धन्यवाद ! धन्यवाद! प्रदिपजी धन्यवाद !

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया</u> :-**मा. महापौरजी, हे २०१६ पासून ५ वर्षापेक्षा अधिक झाले आहे. शिक्षण मंडळाला रदद करुन, तर आयुक्त साहेबांकडून मी जाणून इच्छितो की, शिक्षण मंडळाचे जे लोक आहेत किंवा शिक्षण मंडळाचे जे कर्मचारी आहेत. ते महानगरपालिकेत वर्गका नाही झाले नाहीत. अजून पर्यंत ५ वर्ष झाले. त्यांना जो पगार दिला जातो तो कोणत्या अधारे दिला जातो. कोणत्या हिशोबाने दिले जात आहे, ते आम्हांला माहित असले पाहिजे. मी महापौरांना विनंती करतो की, आयुक्त सांगा की, माझ्या प्रश्नाचे उत्तर दया.

**<u>सदस्य, श्री.धनंजय बोडारे</u> :-** चर्चा काय आहे. अनुकंपावर आपल्याला पास करायचा आहे कि नाही करायचा. त्यावर बोला ना त्याला वेगळे का कुठे घेवून जात आहेत.

**<u>सदस्य, श्री. अरुण आशान</u> :-**राजेश जी बोडारे साहेब बरोबर बोलत आहे.जो अनुकंपा तत्व नियुक्तीचा जो विषय आहे. त्यावर बोला. आपण आता येथे जो विषय आणला आहे त्याला मान्यता दयायची आहे.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया</u> :-** मला वाटते जसे की, मी कुणाच्या दुख-या जागेवर हात ठेवला आहे. मी आपल्याला समजावून सांगतो.

**<u>सदस्य, श्री. अरुण आशान</u> :-**नाही. नाही.

**<u>सदस्य, श्री. मनोज सयानी</u> :-**व्हेरी गुड व्हेरी गुड

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे</u> :-**तुमची नस ही नस आहे. दुखती नस नाही. विषय काय आहे आणि विषय कुठे घेऊन जातात.

**<u>सदस्य, श्री.चंद्रशेखर यादव</u> :-**विषय काय आहे. बोलणे कुठच्या कुठे घेवून जातात. टाळया वाजवत आहेत.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया</u> :-**आपला जो प्रश्न आहे त्याचे मी उतर देत आहे.

**<u>सदस्य, श्री.चंद्रशेखर यादव</u> :-**कर्मचा-यांवर किती चर्चा करत आहेत. आजपर्यंत झाले आहे का असे.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया</u> :-**जे आपल्याला दाखवायचे आहे मी आपले आव्हान स्विकारतो. मी घाबरत नाही. तुम्ही मला दाखवा, मी पण तुम्हांला दाखवतो. मी आपल्या गिधड धमक्यांना. या गिधड धमक्या दुस-याला दया.

**<u>सदस्य, श्री. मनोज सयानी</u> :-**जबरदस्त.जर एखादया गोष्टीची माहिती विरोधी पक्षाचे आमचे नगरसेवक आयुक्त साहेबांकडे मागत आहेत.

**<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी</u> :-**त्यासाठी विषय आणा.

**<u>सदस्य, श्री. मनोज सयानी</u> :-**तर मा. महापौरजी , उपमहापौरजी, मला बोलू दया.

**<u>सदस्य, श्री. अरुण आशान</u>:-**विषयाला आपण फटकारत आहे. विषय अनुकंपा तत्वावरील नोकरीसाठी जे त्यांचे वारसदार आहे त्यांचा विषय चालू आहे. बोडारे साहेबांचा पण प्रश्न हाच आहे.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया</u> :-**नाही नाही अरुणजी, त्याचा अर्थ मला सांगू दया. ऐका.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी</u> :-**आयुक्त साहेबांनी राजेश वधारीया यांनी विचारले आहे तर दुस-या सदस्यांनी उत्तर दयायचे नाही.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:</u>**- आयुक्त साहेबांनी याचे उत्तर दयावे, दुस-या कोणत्याही सदस्यांनी उत्तर दयायचे नाही.

**<u>सदस्य, श्री. अरुण आशान</u> :-**मा. आयुक्त, मा. महापौरजी,

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया</u>:-**मा. महापौरजी, पहिले माझे ऐका, अरुणजी हा जी. बघा २०१६ मध्ये सरकारचे आदेश आले होते. सर्व महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळाचे४५-५५मनाचा निर्णय आहे की, डिसेंबर मध्ये जेवढया कर्मचा-यांची जागा खाली झाली आहे. त्यातील १०टक्के आम्ही त्यांना घेतो. १०टक्के पेक्षा जास्त नाही घेत एक वेळा ठराव झालानंतर त्यांचा नंबर कधी येणार. सन २०२२ डिसेंबरच्या नंतर एक वर्षानंतर म्हणजे यात फे-या मारत रहा. आणि एक वर्ष अजून त्यांच्यावर अत्याचार होत राहणार. नंतर जेव्हा त्यांचा नंबर येईल. पहिले माझे बोलून होउ दे. मग काय बोलणार, तुमची वय ३५ च्या वर झाले आहे.जो आज ३३ चा आहे उदया तो ३५ चा होणार. त्याला नोकरी नाही देणार. त्यांना बोलणार १०,००० रुपयावर काम करा. मग त्याच्यावर अत्याचार झाला की नाही. असे नाही जी गोष्ट आज मिळायला पाहिजे एक वर्षा नंतर त्याला नाही मिळणार.

**<u>सदस्य, श्री.चेंद्रशेखर यादव</u>:-**असे किती लोक आहेत. हा हे महत्त्वाचे आहे.मी यासाठी एक प्रश्न विचारला की,

**<u>उप महापौर, श्री. भगवान भालेराव</u>:-**शिक्षण विभागास अडचण झाली आहे. बरोबर आहे. परंतु शिक्षण विभाग अजूनपर्यंत महानगरपालिकेत समावेश नाही झाला. तर अनुकंपाचा विषय कधी येणार आहे.

**<u>सदस्य, श्री.अरुण आशान</u>:-**बरोबर,बरोबर.

**<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया</u> :-**बघा मी आयुक्तांना प्रश्न विचारला,शिक्षण विभागाचे जे कर्मचारी आहेत त्यांचा आमच्यामध्ये समावेश का नाही झाला. एवढी तर गोष्ट आहे करा. आम्ही कुठे काय विचारले अजून तुम्हांला.

**<u>उप महापौर, श्री. भगवान भालेराव</u>:-**राजेश भाई, एक गोष्ट शिक्षण विभाग अजुनपर्यंत महानगरपालिकेत समाविष्ट झालेला नाही. त्यामुळे त्यांना

**<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया</u> :-**का झालेला नाही, का झालेला नाही?

**<u>उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-तो</u>** विषय कसा घेवू शकता?

**<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया</u> :-**का झालेला नाही, का झालेला नाही?

**<u>उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-</u>**ठिक आहे, आयुक्तांकडे ती फाईल...

**<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया</u> :-**मा.आयुक्त साहेब, तुमच्या बाजूला बसले आहेत, त्यांना सांगा. उत्तर दया.

**<u>उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-</u>** प्रस्ताव वाचून दाखवा.

**<u>सदस्य, श्री. जमनदास पुरस्वानी</u>:-**मा. आयुक्त साहेब, राजेश वधारीयाचा प्रस्ताव आल्या नंतर महानगरपालिका

**<u>उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-</u>** प्रस्ताव येवू दया. पहीले मर्ज होऊ दया, नंतर प्रस्ताव येऊ शकतो.

**<u>उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-</u>** तो समावेश होऊ दया. त्यानंतर प्रस्ताव येईल. त्याच्या नंतर करु.

**<u>सदस्य, श्री. अरुण आशान</u> :-**बरोबर,बरोबर.मा महापौर, मा. उपमहापौर, मा. आयुक्त साहेब, या महासभेत जो प्रस्ताव आलेला आहे.त्या प्रस्तावावर चर्चा करायची होती, पण आपले दुदैव आहे, आपल्या महानगरपालिकेच्या कर्मचारी गेल्यावर आपण चर्चा करत आहोत. खरं म्हटल तर दिवंगत कर्मचा-यांना श्रध्दांजली म्हणून आपण त्यांच्या वारसांना नियुक्ती पत्रदेवून सन्मानीत केले पाहीजे. परंतु त्याच्यावर एवढी चर्चा होणे ही लाजीरवाणी गोष्ट आहे. माझी विनंती आहे.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:-</u>**समाविष्ट का केला नाही आणि कधी करणार आहेत.

**<u>सदस्य, श्री.मनोज सयानी:-</u>** नाही, नाही. शिक्षण मंडळाचे कर्मचारी व अधिकारी माणसे नाही आहेत का?

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-**मा. महापौरजी. माझा आवाज दाबून नाही ठेवू शकत. माझा माईक बंद करु नका. मला बोलू दया.

**सदस्य, श्री. अरुण आशान:-** आपला आवाज येत आहे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-**नाही. नाही. म्युट करत आहेत. मी  वारंवार चालू करत आहे.

**सदस्य, श्री.प्रदिप रामचंदानी:-** कधी समाविष्ट करणार आहे. शिक्षण मंडळ कधीपर्यंत समाविष्ट करणार आहेत, आता पर्यंत उशिर का झालेला आहे.

**सदस्य, श्री. अरुण आशान:-**मा. महापौरजी,मा. उपमहापौरजी मा. आयुक्त साहेब या ठरावाची  हा जो ठराव आहे. सचिव मॅडम ऐकायला येतेय का?

**सदस्य, श्री.प्रदिप रामचंदानी:-** समाविष्ट केलेले नाही.

**सदस्य, श्री. अरुण आशान:-**मा. महापौरजी....

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** एक मिनीट मी प्रस्ताव वाचून दाखवतो.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:-** वाचा, वाचा ना.

**सदस्य, श्री.प्रदिप रामचंदानी:-** शिक्षण मंडळ कधी पर्यंत समाविष्ट करणार आहेत?

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** शिक्षण मंडळ मर्ज झाल्यावर यात नाही.

**महापालिका सचिव:-** वाचा वाचा.

**सदस्य, श्री. अरुण आशान:-**ही महासभा उपरोक्त प्रस्तावाचा सखोल अभ्यास व शहानिशा करुन उल्हासनगर महानगरपालिकेचे कर्माचारी मयत झाल्यानंतर अनुकंपा तत्वाने नियुक्ती करण्यासाठी, नियुक्ती प्राधिकरण या नात्याने पुढील प्रमाणे निर्णय घेत आहे. उल्हासनगर महानगरपालिका....

**सदस्य, श्री.प्रदिप रामचंदानी:-** फक्त एक सांगा. कशासाठी म्युट करत राहणार. आपण म्युट करत राहणार. मी अन म्युट करत राहणार. जर का शिक्षण मंडळ समाविष्ट केला गेला नाही....

**सदस्य, श्री. अरुण आशान:-**मा. महापौरजी,ऐकायला येतेय,  मा. उपमहापौर साहेब , प्रदिपजी, जरा...

**सदस्य, श्री.प्रदिप रामचंदानी:-** आजपर्यंत केला नाही.कधीपर्यंत समाविष्ट करणार आहेत. मला सांगा.फक्त एक सांगा. कशासाठी म्युट करत राहणार. आपण म्युट करत राहणार. मी अन म्युट करत राहणार.

**सदस्य, श्री. अरुण आशान:-**उल्हासनगर महानगरपालिके या अगोदर ठराव क्र. ३४ दि.२१/१०/१८ अन्वये या संदर्भात निर्णय घेतलेला आहे. परंतु त्याची अंमलबजावणी अदयापपर्यंत केल्याचेदिसून येत नाही. तरी पुन्हा एकदा या अनुकंपा तत्वावरील नियुक्ती करण्यासाठी प्रशासनास आदेशित करण्यात येत आहे. शासन निर्णय क्र. १ , २ अधिक ८ दि. ३१, ऑक्टोबर, २०१७ परिशिष्ट अ व २ नुसार अनुकंपा नियुक्ती संदर्भात केवळ शासकीय कर्मचा-यांपुरता आहे. सदर तरतुदी या जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिका, महामंडळे ते प्राधिकरण, व्यापारी इ. तत्सम अधिका-यांना कर्मचा-यांना लागू होणार त्यासाठी संबंधीत प्रशासकीय विभागाने स्वतंत्रपणे निर्णय घेणे आवश्यक आहे असे नमूद आहे. महापालिका सेवेत असताना मयत झालेल्या कर्मचा-यांच्या वारसापैकी एक वारसास त्वरीत ठोक पगारावर अस्थायी स्वरुपात नेमणुक करण्यात यावी. व कागदपत्रांची पुर्तता झाल्यानंतर त्यांना स्थायी पदावर नेमणुक करण्यात यावी. यापुर्वी मयत झालेल्या कर्मचा-यांच्या वारसांनाठोक वेतनावर नियुक्ती करण्यात आलेली आहे. परंतु सदर कर्मचा-यांना अदयापपर्यंत कायम अथवा त्यांच्या वारसास अनुकंपा तत्वाने नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्या त्यांच्या कुटुंबातील एका उमेदवारास त्यांचा शिक्षणानुसार त्या पदावर अनुकंपा तत्वाने नियुक्ती करावी. नियुक्ती करण्यासाठी शासनास शैक्षणिक पात्रता व अर्हताशिथिल करण्याचा अधिकार आहे. व शासनाने काही प्रमाणात काही प्रकरणांत पात्रता व अट शिथिल केलेली आहे. त्याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिका नियुक्ती प्राधिकरण पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे. काही कारणास्तव कुटुंबातील सदस्यांची त्यांची नियुक्ती करणे शक्य नाही. त्यांची नियुक्ती ठोक पगारावर करण्यात यावी व कागद पत्रांची पुर्तता झाल्यावर त्यांना त्वरीत कायम पदावर नियुक्ती करण्यात यावी. सबब,पुढील सर्व कुटुंबातील सदस्यांची नेमणुक अदयापपर्यंत जेवढे आहेत

तेवढे,करण्याबाबत निर्देशित करण्यात येत आहे. सबब पुढील सर्व कुटुंबातील वारसांच्या सदस्यांची नेमणूक आता पर्यंत जेवढे आहेत, तेवढे करण्याबाबत निर्देशित करण्यात येत आहे. हा ठरावा अंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्ताची कायम वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.धन्यवाद साहेब.

**सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी:-** इतिवृत्ताची वाट न पाहता. इतिवृत्ताची वाट न पाहता.

**सदस्य, श्री. अरुण आशान:-** हा कर्मचा-यांचा मान-सन्मान आहे.मी सगळया सदस्यांना अभिवादन करतो.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:-**पास.. पास... पास...

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-** सचिव मॅडम दुसरा विषय घ्या, पुढचा.

**महापालिका सचिव:-** यांची नियुक्तीआयुक्त् साहेब करतात. हे फक्त तुम्हांला यापुढे असे पण या ठरावात आयुक्त घ्यावे लागेल.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया :-**अधिनियम १९ दि.१ जुलै, २०१३ ला अधिनियम आला होता. सर्व महानगरपालिकामध्ये शिक्षण मंडळ रदद करुन समाविष्ट केले होते व प्रत्येक महानगरपालिकेमध्ये त्या दिवसापासून जो पण कर्मचारी मृत्यु झाला असेल, त्या सर्वांना हा फायदा मिळाला पाहिजे. आणि जर आमच्या बोलण्याचा वेगळा अर्थ घेत असाल, तर आम्ही पण हे समजतो की ,आपण कुणातरी फायदा देण्यासाठी अन्याय करणार असाल तर या विचारास धरुन आपण घाई गडबडीमध्ये आम्हांला बोलण्याची परवानगी देत नाहीत.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-** एवढा वेळ तर बोलले राजेशजी आपण अजून आता काय बोलायचे.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया :-**मी इतक्या वेळापासून बोलण्याचा प्रयत्न करतो आहे. वारंवारं माझा माईक म्युट करतात.

**सदस्य, श्री. अरुण आशान:-** सचिव मॅडम दुसरा विषय घ्या.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:-**अरुणजी आपण महापौर नाही बनणार सरळ भावी आमदार बनणार.

**सदस्य, श्री. अरुण आशान:-**नाही नाही साहेब नाही, आपण ऐकले नाही.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-**तुम्ही बोलून देत नाही आम्हांला तर, हे बरोबर नाही.

**काही सदस्य :—**पास—पास……

**महापौर तथा पीठासीन अधिकारी:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ४:—**मयत झालेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसाना अनुकंपातत्वाने नियुक्ती देण्याबाबत.

**प्रस्तावना**

अनुकंपा तत्वाने नियुक्ती करण्याची भूमिका लक्षात घेवुन जो कर्मचारी मृत झाला आहे त्यांच्या कुटुंबायांना उदभवणा—या आर्थिक पेचप्रसंगावर मात करण्याच्या उद्देशाने महापालिका आस्थापनेवर कार्यरत असताना मयत झालेल्या कर्मचा—यांच्या वारसाना अनुकंपातत्वाने नियुक्ती करण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५४ व उल्हासनगर महानगरपालिका सेवा प्रवेश नियम २०१५ नुसार दिनांक १४/१२/२०२० रोजी दुपारी ४.०० वाजता मा. आयुक्त सो. यांच्या दालनात निवड समितीची बैठक बोलविण्यात आली होती. सदर बैठकीस खालील अधिकारी उपस्थित होते.

| अ.क्र. | सदस्यांचे पदनाम | पदनाम |
|---|---|---|
| १ | डॉ. राजा दयानिधी (भा.प्र.से.), मा. आयुक्त | अध्यक्ष |
| २ | डॉ. करूणा जुईकर, अतिरिक्त आयुक्त | सदस्य |
| ३ | श्री. मदन सोंडे, उप आयुक्त (मुख्यालय) | सदस्य |
| ४ | मुख्य लेखा परिक्षक यांचे प्रतिनिधी श्री. अशोक मोरे, | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| | सहा. मुख्य लेखा परिक्षक | |
| ५ | प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, शहापुर यांचे प्रतिनिधी श्रीम.तेजस्विनी गलांडे | सदस्य |
| ६ | श्रीम. नर्गिस खान, लिपीक, अल्पसंख्यांक प्रतिनिधी | सदस्य |
| ७ | श्री. अच्युत सासे, प्र. सहा. आयुक्त (साप्रवि) | सदस्य सचिव व नियंत्रक |

अनुकंपा तत्वावर शासन सेवेत नियुक्ती देण्यासंदर्भात निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णय क्र.अकंपा—१०९३/२३३५/प्र.क्र.९०/९३/आठ, दिनांक २६/१०/१९९४ पासुन ते शासन निर्णय क्र. अ.क्र. १०२/आठ, दिनांक २१ सप्टेंबर २०१७ नुसार अनुकंपा तत्वावर नियुक्तीबाबत १ ते २६ तरतुदीनुसार सामान्य प्रशासन विभागाने प्रस्ताव सदर निवड समितीपुढे खालील बाबींवर सादर करण्यात आला होता.

**(१) महापालिका आस्थापनेवरील विविध संवर्गातीलसरळसेवा/पदोन्नतींच्या एकूण रिक्त पदांचा आढावा घेतला असता सध्या महानगरपालिका आस्थापनेवर वर्ग—क व वर्ग—ड मध्ये खालीलप्रमाणे पदे रिक्त आहेत.**

| संवर्गाचे नाव/पदनाम | एकूण मंजुर | एकूण भरलेली पदे | एकूण रिक्त पदे | शेरा |
|---|---|---|---|---|
| वर्ग—३ | ७२२ | ३०२ | ४२० | |
| वर्ग—४ | २४५४ | १६८१ | ७७३ | |

**सध्या उल्हासनगर महानगरपालिका आस्थापनेवर वर्ग—क व वर्ग—ड मधील विविध संवर्गातील रिक्त पदांवर सरळसेवेमध्ये खालीलप्रमाणे आरक्षणाची पदे रिक्त आहेत.**

| वर्ग | एकूण मंजुर | एकूण भरलेली पदे | एकूण रिक्त पदे | आरक्षणाची रिक्त पदे | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अनु.जाती (१३:) | अनु.जमाती(७%) | वि.जा.(अ) (३%) | भज(ब) (२.५%) | भज (क) (३.५%) | भज(ड) (२%) | विमाप्र (२%) | इमाव (१९%) | एसईबीसी 13% | आर्थिकदृष्टयादुर्बलघटक १०: | अराखीव25% | एकूण |
| क | ४६३ | १७३ | २९० | ३८ | १२ | ११ | ७ | ९ | ३ | ४ | ५५ | ३३ | २४ | ९४ | २९० |
| ड | ७७१ | ४३२ | ३३९ | २६ | ३४ | १८ | १२ | २४ | १० | १३ | ४७ | ४७ | ३७ | ७१ | ३३९ |

**(२) शासन निर्णय क्र. अकंपा—१२१९/प्र.क्र.५६/आठ, दिनांक १० जून, २०१९ नुसार रिक्त होणा—या पदांच्या २० टक्के अनुकंपातत्वाने नियुक्ती करता येईल.**

| वर्ग | रिक्त झालेली पदे २०१८—२०१९ | | | रिक्त झालेली पदे २०१९—२०२० | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | मयत | सेवानिवृत्त/ अस्वेच्छा सेवा निवृत्त/ पदोन्नती रिक्त झालेली पदे | एकूण | मयत | सेवानिवृत्त/ स्वेच्छा सेवा निवृत्त/ पदोन्नती रिक्त झालेली पदे | एकूण |
| क | २ | २२ | **२४** | ५ | ४८ | **५३** |
| ड | ९ | ३६ | ४५ | ५ | २९ | ३४ |

**वर्ग— क :— २४+५३=७७ पदे रिक्त आहेत. शासनाच्या निर्देशप्रमाणे एकूण रिक्त पदाच्या २० टक्केप्रमाणे अनुकंपातत्वाने नियुक्त करण्यासाठी वर्ग—३ मध्ये १५ पदे उपलब्ध होतात.**

**वर्ग—ड :— ४५+३४=७९ पदे रिक्त आहेत. २० टक्केप्रमाणे अनुकंपातत्वाने नियुक्त करण्यासाठी वर्ग—४ मध्ये १६ पदे उपलब्ध होतात.**

(३) उल्हासनगर महानगरपालिका सेवा प्रवेश नियम २०१५ परिशिष्ट — २ मधील शैक्षणिक अर्हता :—

| **अ. क्र.** | **पदनाम** | **नेमणूकीची पध्दत व टक्केवारी १.नामनिर्देशन २.पदोन्नती** | **उल्हासनगर महानगरपालिका सेवा प्रवेश नियम २०१५ नुसार नेमणूकीकरीता अर्हता व नेमणूकीच्या पध्दती** |
|---|---|---|---|
| | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ३.प्रतिनियुक्ती | |
| १ | लिपीक/टंक लेखक/ मिटररीडर | नामनिर्देशन— ७५% | अ) माध्यमिक शालान्त परीक्षा उत्तीर्ण.<br>ब) राज्य शासनाची मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि. (जीसीसी)/इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र. मि. परिक्षा उत्तीर्ण.<br>क) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परिक्षा उत्तीर्ण किंवा D.O.E.A.C.C.सोसायटीच्या अधिकृत C.C.C.किंवा Oस्तर किंवा Aस्तर किंवा B किंवा Cस्तर पैंकी काणतीही एक परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.<br>ड) मराठी लिहीता, बोलता व वाचता येणे आवश्यक. |
| | | पदोन्नती २५% | अ) महानगरपालिका आस्थापनेवरील किमान माध्यमिक शालान्त परीक्षा उत्तीर्ण.<br>ब) मराठी/इंग्रजी टंकलेखनातील श.प्र.मि. ३० चे प्रमाणपत्र आवश्यक<br>क) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परिक्षा उत्तीर्ण किंवा D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O स्तर किंवा A स्तर किंवा B किंवा C स्तर पैंकी काणतीही एक परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.<br>ड) किमान ५ वर्षाची नियमित सेवा असलेल्या वर्ग — ४ संवर्गातून ज्येष्ठता व गणवत्ता या आधारे नेमणूक करता येईल. |

## वर्ग—४ उल्हासनगर महानगरपालिका सेवा प्रवेश नियम — १५

| अ.क्र. | प्दनाम | नेमणूकीची पध्दत व टक्केवारी<br>१.नामनिर्देशन<br>२.पदोन्नती<br>३.प्रतिनियुक्ती | उल्हासनगर महानगरपालिका सेवा प्रवेश नियम २०१५ नुसार नेमणूकीकरीता अर्हता व नेमणूकीच्या पध्दती |
|---|---|---|---|
| १ | शिपाई | नामनिर्देशन— १००% | अ) इयत्ता ७ वी ची परीक्षा उत्तीर्ण.<br>ब) मराठी लिहिता, वाचता व बोलता येणे आवश्यक |
| २ | मजुर/हेल्पर/ माळी/वॉलमन/ झारीवाला/विद्युत मदतनीस/वाहन मदतनीस | नामनिर्देशन— १००% | अ) इयत्ता ७ वी ची परीक्षा उत्तीर्ण.<br>ब) मजबुत श्रीरयष्टी |
| ३ | सफाई कामगार | नामनिर्देशन — १००% | अ) ४ थी पास<br>ब) मराठी लिहीता, वाचता व बोलता येणे आवश्यक. |

### (४) प्रतिक्षा यादीबाबत :—

मयत झालेल्या कर्मचा—यांच्या वारसाना अनुकंपा तत्वाने यिनयुक्ती करण्यासाठी दिनांक २७/१२/२०१८ रोजी प्रतिक्षा यादीवरील मयत झालेल्या वारसाना वर्ग—क मध्ये २८ उमेदवार व वर्ग—ड मध्ये ३१ उमेदवारांची अनुकंपातत्वाने एकूण—५९ उमेदवारांची नियुक्ती करण्यात आलेली असल्याने नियुक्ती करण्यात आलेल्या उमेदवारांची नावे वगळून उर्वरीत उमेदवारांची शासन निर्णय क्र. अ.क्र. १०२/आठ, दिनांक २१ सप्टेंबर २०१७ मधील १७ नुसारउल्हासनगर महानगरपालिकाआस्थापनेवर कार्यरत कर्मचारी मयत झाल्याने त्यांच्या वारसाना अनुकंपा नियुक्तीसाठी दिनांक २५/०८/२०२० रोजी महापालिकेच्या संकेतस्थळावर, नोटीसबोर्डावर व प्रभाग समिती क्र. १, २, ३, ४ कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर वर्ग—३ साठी २३ उमेदवार व वर्ग—४ साठी ३० उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्यात आली होती. त्यावर २०हरकती/सूचना प्राप्त झाल्या होत्या. प्राप्त हरकती/सूचनांवर दि. ३०/०९/२०२० रोजी

सुनावणी घेण्यात आली. सुनावणीनंतर दि. १९/११/२०२० रोजी खालीलप्रमाणे वर्ग—३ व वर्ग—४ ची अनुकंपा नियुक्ती अंतिम प्रतिक्षा यादी प्रसिध्द करण्यात आली आहे. वर्ग—३ साठी २२ व वर्ग—४ साठी २८ उमेदवारांची अनुकंपा तत्वाने नियुक्तीसाठी उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्यात आली आहे.

**(५) बिंदु नामावलीबाबतः—**

अनुकंपा तत्वावर शासन सेवेत नियुक्ती देण्यासंदर्भात निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णय क्र.अकंपा—१०९३/२३३५/प्र.क्र.९०/९३/आठ, दिनांक २६/१०/१९९४ पासुन ते आतापर्यंत निर्गमित झालेल्या शासन निर्णय/परिपत्रक पडताळणी केली असता अनुकंपा नियुक्तीबाबत बिंदु नामावली प्रमाणे नियुक्ती करण्याबाबतचे नमुद असल्याचे दिसुन येत नाही.

उल्हासनगर महानगरपालिका आस्थापनेवरील विविध संवर्गातील बिंदु नामावली माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये तपासली असुन बिंदुनामावली नोंद वहया तपासण्याची मुदत माहे ऑगस्ट २०१९ संपली आहे. मागासवर्ग कक्ष, कोणन भवन यांच्या कार्यालयामधुन सध्या मराठा आरक्षणामुळे सरळसेवा बिंदुनामावली नोंद वहया तपासणी केली जात नाही. त्यामुळे बिंदु नामावली तपासणीच्या अधिन राहुन प्रस्तावातिल उमेदवाराना नियुक्तीसाठी प्रस्तावित करण्यात आले आहे.

अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्यास बिंदुनावली तपासणी करणे संबंधीत सहा. आयुक्त मावक, विभागीय आयुक्त, नगरपुर विभाग, जुने सचिवालय, सिव्हिल लाईन्स, नागपूर यांनी शासनाकडून मागदर्शन मागविण्यात आले होते. त्या अनुषंगाने शासनाकडून दिनांक २१ सप्टेंबर, २०१९ रोजीच्या पत्रान्वये अनुकंपा तत्वाने नियुक्ती करण्यासाठी बिंदुनामावली लागू करण्याबाबत शासनाचे कोणतेही आदेश नाहीत असे नमुद केले आहे.

दिनांक १४/१२/२०२० रोजी दुपारी ४.०० वाजता झालेल्या निवड समितीच्या बैठकी मध्ये खालील मयत झालेल्या कर्मचा—यांच्या वारसाना लिपीक/ टंकलेखक/ मिटररीडर, शिपाई, मजूर/हेल्पर/वॉलमन/झारीवालाव सफाई कामगार या संवर्गामध्ये अनुकंपा तत्वाने नियुक्ती करण्यासाठी शिफारस केली आहे.

## वर्ग— ३

१) लिपीक/ टंकलेखक/ मिटररीडर

रू. ५२००—२०२००, ग्रेडपे १९००

प्रतिक्षा अनुषंगाने दिनांक २७/०९/२०१९ अन्वये १५ उमेदवारांची निवड समतीने शिफारस करण्यात आलेली आहे. सदर १५ पदांचा तपशील खालीलप्रमाणे.

वरील ''लिपीक/ टंकलेखक/ मिटररीडर'' या संवर्गात नियुक्तती करावयाचा जातीचा प्रवर्गामध्ये आरक्षणानुसार खालीलप्रमाणे अनुकंपा तत्वाने नियुक्ती करता येईल.

| अ.क्र. | आरक्षण | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | सध्या भरण्यात येत असलेली पदे | रिक्त |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | अनु.जाती (१३:) | २८ | १८ | १० | ६ | ४ |
| २ | अनु.जमाती(७%) | १६ | १६ | ० | ० | ० |
| ३ | वि.जा.(अ) (३%) | ६ | ३ | ३ | ० | ३ |
| ४ | भज(ब) (२.५%) | ५ | ४ | १ | ० | १ |
| ५ | भज (क) (३.५%) | ८ | ३ | ५ | ० | ५ |
| ६ | भज(ड) (२%) | ४ | ३ | १ | ० | १ |
| ७ | विमाप्र (२%) | ४ | ० | ४ | ० | ४ |
| ८ | इमाव (१९%) | ४१ | ११ | ३० | २ | २८ |
| ९ | एसईबीसी (१३%) | १३ | ० | १३ | ० | १३ |
| १० | आर्थिक दृष्टया दुर्बल घटक (१०%) | १० | ० | १० | ० | १० |
| ११ | अराखीव (२५%) | ८० | ५० | ३० | ०७ | २३ |
| एकुण | | २१५ | १०८ | १०७ | १५ | ९२ |

१) शासन निर्णय क्र. अनुकंपा. १२१७/प्र.क्र. १०२/८, दिनांक २१ सप्टेंबर, २०१७ मधील १३ (अ) नुसार अनुकंपा तत्वावर ''लिपीक/मिटर रिडर/टंकलेखन'' या पदावर नियुक्ती झालेल्या उमेदवारांना विहीत वेग मर्यादेचे टंकलेखन अर्हता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी २ वर्ष इतकी मुदत देण्याबाबत नमुद असल्याने अनु. क्रमांक १, २, ४, ५, ७, ८, ९, १०, ११, १२, १३, १४ व १५ वरील उमेदवारांसाठी टंकलेखन अर्हता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी २ वर्ष इतकी मुदत देण्याबाबत अट शिथील करण्यासाठी निवड समितीने शिफारस केली आहे.

२) वरील नियुक्ती बिंदुनामावली मंजूरीच्या अधिन राहुन देण्यात येईल.

वर्ग—४

**शासन निर्णय क्र. अकंपा—१२१९/प्र.क्र.५६/आठ, दिनांक १० जून, २०१९ नुसार २० टक्केप्रमाणे सन २०१८—२०१९ व २०१९—२०२० या भरती वर्षामध्ये वर्ग—३ ची एकूण : ४५+३४=७९ पदे रिक्त आहेत. २० टक्केप्रमाणे अनुकंपातत्वाने नियुक्त करण्यासाठी वर्ग—४ मध्ये १६ पदे उपलब्ध होतात.**

- **खालील मयत झालेल्या कर्मचा—यांच्या वारसाना अनुकंपातत्वाने नियुक्ती करण्यासाठी पुरूष उमेदवारास** ''मजूर/हेल्पर/वॉलमन/झारीवाला'' या संवर्गातील मोठयाप्रमाणात पदे रिक्त असल्यामुळे 'मजूर/हेल्पर/वॉलमन/झारीवाला' पदावर रू ४४४०—७४४०, ग्रेडपे १३०० या वेतनश्रेणी अनुकंपा तत्वावर नियुक्ती करण्याबाबत एकमताने निर्णय घेण्यात आला आहे.
- **खालील मयत झालेल्या कर्मचा—यांच्या वारसाना अनुकंपातत्वाने नियुक्ती करण्यासाठी महिला उमेदवाराना व अनु. ६ वरील उमेदवारास ''शिपाई''** या पदावर रू. ४४४०—७४४०, ग्रेडपे १३०० या वेतनश्रेणी अनुकंपा तत्वावर नियुक्ती करण्याबाबत एकमताने निर्णय घेण्यात आला आहे.
- **खालील मयत झालेल्या कर्मचा—यांच्या वारसाना अनुकंपातत्वाने नियुक्ती करण्यासाठी अनु. २ व ५ वरील उमेदवारास ''सफाई कामगार''** या पदावर रू. ४४४०—७४४०, ग्रेडपे १३०० या वेतनश्रेणी अनुकंपा तत्वावर नियुक्ती करण्याबाबत एकमताने निर्णय घेण्यात आला आहे.
- वरील १६ पदांपैकी १) शिपाई—०३ पदे, २) मजूर/हेल्पर/वॉलमन/झारीवाला — ११ पदे ३) सफाई कामगार — ०२ पदांवर नियुक्ती करण्यासाठी निवड समितीने खालीलप्रमाणे शिफारस केली आहे.

१) वर्ग—४ शिपाई
रू. ४४४०—७४४०, ग्रेडपे १३००

प्रतिक्षा अनुषंगाने दिनांक २७/०९/२०१९ अन्वये ०३ उमेदवारांची निवड समतीने शिफारस करण्यात आलेली आहे. सदर ०३ पदांचा तपशील खालीलप्रमाणे.

वरील ''शिपाई'' या संवर्गात नियुक्तती करावयाचा जातीचा प्रवर्गामध्ये आरक्षणानुसार खालीलप्रमाणे अनुकंपा तत्वाने नियुक्ती करता येईल.

| अ.क्र. | जातीचा प्रवर्ग | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | सदया भरण्यात येत असलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | अनु.जाती (१३%) | १९ | १४ | ५ | ०२ | ०३ |
| २ | अनु.जमाती(७%) | १० | ३ | ७ | ० | ७ |
| ३ | वि.जा.(अ) (३%) | ४ | ० | ४ | १ | ३ |
| ४ | भज(ब) (२.५%) | ४ | ० | ४ | ० | ४ |
| ५ | भज (क) (३.५%) | ५ | ० | ५ | ० | ५ |
| ६ | भज(ड) (२%) | ३ | १ | २ | ० | २ |
| ७ | विमाप्र (२%) | ३ | ० | ३ | ० | ३ |
| ८ | इमाव (१९%) | २७ | ७ | २० | ० | २० |
| ९ | एसईबीसी (१३%) | ९ | ० | ९ | ० | ९ |
| १० | आर्थिक दृष्टया दुर्बल घटक (१०%) | ७ | ० | ७ | ० | ७ |
| ११ | अराखीव (२५%) | ५३ | ४२ | ११ | ० | ११ |
| | एकुण | १४४ | ६७ | ७७ | ०३ | ७४ |

**२) ''मजूर/हेल्पर/वॉलमन/झारीवाला''**

**वेतनश्रेणी रू. ४४४०—७४४०, ग्रेडपे १३००**

प्रतिक्षा अनुषंगाने दिनांक २७/०९/२०१९ अन्वये ११ उमेदवारांची निवड समतीने शिफारस करण्यात आलेली आहे. सदर ११ पदांचा तपशील खालीलप्रमाणे.

वरील''मजूर/हेल्पर/वॉलमन/झारीवाला''या संवर्गात नियुक्तती करावयाचा जातीचा प्रवर्गामध्ये आरक्षणानुसार खालीलप्रमाणे अनुकंपा तत्वाने नियुक्ती करता येईल.

| अ.क्र. | जातीचा प्रवर्ग | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | सदया भरण्यात येत असलेले | रिक्त |
|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | अनु.जाती (१३:) | ५५ | ३८ | १७ | ०४ | १३ |
| २ | अनु.जमाती(७%) | २९ | ८ | २१ | ० | २१ |
| ३ | वि.जा.(अ) (३%) | १३ | २ | ११ | ० | ११ |
| ४ | भज(ब) (२.५%) | १० | ३ | ७ | ० | ७ |
| ५ | भज (क) (३.५%) | १५ | ० | १५ | ० | १५ |
| ६ | भज(ड) (२%) | ८ | ३ | ५ | ० | ५ |
| ७ | विमाप्र (२%) | ८ | ० | ८ | ० | ८ |
| ८ | इमाव (१९%) | ७९ | ७० | ९ | ० | ९ |
| ९ | एसईबीसी (१३%) | २६ | ० | २६ | ० | २६ |
| १० | आर्थिक दृष्टया दुर्बल घटक (१०%) | २० | ० | २० | ० | २० |
| ११ | अराखीव (२५%) | १५५ | १३८ | १७ | ७ | १० |
| | एकुण | ४१८ | २६२ | १५६ | ११ | १४५ |

**३) वर्ग— ४ सफाई कामगार (महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व सहाय्य )**

वेतनश्रेणी रू. ४४४०—७४४०, ग्रेडपे १३००

शासन निर्णय क्रमांक—सफाई—२०११/प्र.क्र.३२७/२०११/प्र.क्र.३२७/विघयो—२, दिनांक २१ ऑक्टोंबर, २०११ मधील (उ) आकृतीबंधामुळे तसेच, स्थायी/अस्थायी पदामुळे कोणत्याही सफाई कामगारांच्या वारसांहक्काच्या नियुक्तीबाबत अडचण निर्माण होणार नाही. तसेच, सफाई कामगारांच्या बाबतीत निवृत्त/मयत झाालेल्या कर्मचा—यांच्या जागी वारसाहक्काने कर्मचारी लागत असल्यामुळे एकूण कर्मचारी वाढत नाही. त्यामुळे आकृतीबंधाची अट वारसाहक्कापुरती लागणार नाही असे नमुद आहे. सफाई कामगार या संवर्गाला बिंदु नामावली लागू नाही. सध्या महापालिका आस्थापनेवर सफाई कामगार संवर्गातील १५५० पदे मंजूर असुन ११७८ तसेच ३७२ पेक्षा जास्त पदे रिक्त आहेत.

प्रतिक्षा अनुषंगाने दिनांक २७/०९/२०१९ अन्वये ०२ उमेदवारांची निवड समतीने शिफारस करण्यात आलेली आहे.

शासन निर्णय क्र.अ.क्र.१०२/आठ, दिनांक २१ सप्टेंबर २०१७ परिशिष्ट—अ मधील २ नुसार अनुकंपा नियुक्ती योजनेसंदर्भातील हया केवळ शासकीय कर्मचा—यांपुरत्याच सीमीत आहेत. सदर तरतुदी हया जिल्हा परिषद/नगरपालिका /महानगरपालिका /महामंडळे/प्रधिकरणे/ व्यापारी उपक्रम व इतर तत्सम आस्थापनावरील कर्मचा—यांना थेट लागू होणार नाहीत. त्यासाठी संबंधित प्रशासकीय विभागाने स्वतंत्रपणे निर्णय घेणे आवश्यक राहील. असे नमुद आहे.

तरी उल्हासनगर महानगरपालिकेने अनुकंपा तत्वावर नियुक्तीबाबत धोरणात्मक निर्णय घेतलेला नसल्यामुळे वरील शासन निर्णय २७/०९/२०१९ चा मागदर्शक सूचनान्वये उपरोक्त कारवाई करण्यास प्रस्तावित करत असुन मान्यतेसाठी सविनय सादर.

त्याच प्रमाणे, शासन निर्णय दिनांक २१/९/२०१७ प्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये या पुढे मा. आयुक्त यांचा स्तरावर पुढील अनुकंपा तत्वावर नियुक्ती नियमानुसार करण्यासाठी ठराव माडत आहे. वरील प्रस्ताव मा. महासभेच्या माहितीस्तव व मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

**महासभा ठराव क्र:१३** **दिनांक:— १७/०२/२०२१**

सुचकाचे नाव :— १) श्री. कलवंतसिंह सोहता
२) श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :— १) श्री. धनंजय बोडारे
२) श्री. राजु जग्यासी

हि महासभा उपरोक्त प्रस्तावाचा सखोल अभ्यास व शहनिशा करुन उल्हासनगर महानगरपालिकेच्या कर्मचारी मयत झाल्यानंतर अनुकंपा तत्वाने नियुक्ती करण्यासाठी नियुक्ती प्राधिकरण या नात्याने पुढील प्रमाणे निर्णय घेत आहेत.

१. उल्हासनगर महानगरपालिकेने या अगोदर ठराव क्रमांक३४ दि.१९/१०/२०१८ - ---- अन्वये या संदर्भात निर्णय घेतलेला आहे परंतू त्याची अंमलबजावणी अद्याप पर्यंत पुर्णपणे केल्याचे दिसुन येत नाही. तरी पुन्हा एकदा अनुकंपा तत्वावरील नियुक्ती करण्यासाठी प्रशासनास आदेशित करण्यात येत आहे.

२. शासननिर्णय क्रमांक — १०२/८ दिनांक- २१ सप्टेंबर २०१७ परीशिष्ट ---- (अ) मधील (२) नुसार अनुकंपा नियुक्ती संदर्भातील या केवळ शासकीय कर्मचा-यापुरताच समित आहेत. सदर तरतुदी या जिल्हा परीषद/ नगरपालिका/महानगरपालिका/महामंडळे/प्राधिकरणे/व्यापारी उपक्रम व इतर तत्सम आस्थापनावरील कर्मचा-यांना थेट लागू होणार नाही त्यासाठी सबंधित प्रशासकीय विभागाने स्वतंत्रपणे निर्णय घेणे आवश्यक राहील असे नमूद आहे.

३. महापालिका सेवेत असताना मयत झालेल्या कर्मचा-यांच्या वारसापैकी एका वारसास त्वरीत ठोक पगारावर अस्थायी स्वरुपात नेमणूक करण्यात यावे व कागदपत्राची पुर्तता झाल्यानंतर त्यांना स्थायी पदावर नेमणूक करण्यात यावे.

४. पुर्वी मयत झालेल्या कर्मचा-यांच्या वारसांना ठोक वेतनावर नियुक्ती करण्यात आलेली आहे परंतू सदर कर्मचा-यांना
अद्याप पर्यंत कायम अथवा त्यांच्या वारसास अनुकंपा तत्वाने नियुक्ती करण्यात आलेली आहे त्यांच्या कुटुंबातील एका उमेदवारास त्याच्या शैक्षणिक अर्हतेनुसार त्या पदावर अनुकंपा तत्वाने नियुक्ती करावी.

५.नियुक्ती करण्यासाठी शासनास शैक्षणिक पात्रता व अर्हता शिथिल करण्याचे अधिकारी आहेत व शासनाने काही प्रकरणात पात्रता व अर्हतेची अट शिथिल केली आहे. त्याचे प्रमाणे उल्हासनगर महानगरपालिका नियुक्ती प्राधिकरण पुढील प्रमाणे निर्णय घेत आहेत.

६. काही कारणास्तव कुटुंबातील सदस्यांची नियुक्ती करणे शक्य नाही त्यांची नियुक्ती ठोकपगारावर करण्यात यावी वकागदपत्राची पुर्तता झाल्यावर त्यानंतर त्यांना त्वरीत कायम पदावर नियुक्ती करण्यात यावी.

सबब पुढील सर्व कुटुंबातील वारसांच्या सदस्यांची नेमणूक करण्याबाबत निर्देशित करण्यात येत आहे.
तसेच

शासन निर्णय दिनांक २१/९/२०१७ प्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये या पुढे आयुक्त यांच्यास्तरावर पुढील अनुकंपा तत्वावर नियमानुसार नियुक्ती करण्यासाठी मान्यता देत आहे.
या ठरावाअतंर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अमंलात आणण्यात येईल.

सुचकाची सही १.

२.

अनुमोदकाची सही १.

२.

**<u>सर्वानुमते</u>**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**<u>महापालिका सचिवः—</u>** विषय क्र. ५ वाचुन दाखवितात.

———————————————————————————————————

⇨ **विषय क्र. ५ :—सन २०२१ मध्ये राष्ट्र पुरूष/थोर व्यक्तींची जयंती/पुण्यतिथी दिन व अन्य राष्ट्रीय कार्यक्रम महानगरपालिकेत साजरे करणेबाबत.**

———————————————————————————————————

**<u>काही सदस्य :—</u>**पास—पास......

**<u>महापौर तथा पीठासीन अधिकारीः—</u>**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ५:—** सन २०२१ मध्ये राष्ट्र पुरूष/थोर व्यक्तींची जयंती/पुण्यतिथी दिन व अन्य राष्ट्रीय कार्यक्रम महानगरपालिकेत साजरे करणेबाबत.

**प्रस्तावना**

शासन परिपत्रक क्र.जपूती २०२०/प्र.क्र.९५/२९,दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजीच्या परिपत्रकाअन्वये सन २०२१ मध्ये सर्व शासकीय/निमशासकीय कार्यालयात राष्ट्र पुरूष/थोर व्यक्ती यांची जयंती, राष्ट्रीय दिनाचे कार्यक्रम साजरे करणेकामी शासनाचे आदेश आहेत. त्यानुसार खाली दर्शविलेले कार्यक्रम महानगरपालिकेत साजरे करावयाचे आहेत.

| अ.क्र. | जयंती/पुण्यतिथी | दिनांक |
|---|---|---|
| १ | सावित्रीबाई फुले जयंती | ०३ जानेवारी, २०२१ |
| २ | जिजाऊ मॉसाहेब जयंती | १२ जानेवारी, २०२१ |
| ३ | स्वामी विवेकानंद जयंती | १२ जानेवारी, २०२१ |
| ४ | नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती | २३ जानेवारी, २०२१ |
| ५ | संत सेवालाल महाराज जयंती | १५ फेब्रुवारी, २०२१ |
| ६ | छत्रपती शिवाजी महाराज जयंती | १९ फेब्रुवारी, २०२१ |
| ७ | संत गाडगेबाबा महाराज जयंती | २३ फेब्रुवारी, २०२१ |
| ८ | संत रविदास महाराज जयंती (तिथीनुसार) | २७ फेब्रुवारी, २०२१ |
| ९ | यशवंतराव चव्हाण जयंती | १२ मार्च, २०२१ |
| १० | शहिद दिन | २३ मार्च, २०२१ |
| ११ | महात्मा ज्योतिबा फुले जयंती | ११ एप्रिल, २०२१ |
| १२ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती | १४ एप्रिल, २०२१ |
| १३ | राष्ट्रसंत संत तुकडोजी महाराज जयंती | ३० एप्रिल, २०२१ |
| १४ | महात्मा बसवेश्वर जयंती (तिथीनुसार) | १४ मे, २०२१ |
| १५ | दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवस | २१ मे, २०२१ |
| १६ | स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती | २८ मे, २०२१ |
| १७ | अहिल्यादेवी होळकर जयंती | ३१ मे, २०२१ |
| १८ | महाराणा प्रतापसिंह जयंती (तिथीनुसार) | १३ जून, २०२१ |
| १९ | राजर्षि शाहू महाराज जयंती | २६ जुन, २०२१ |
| २० | वसंतराव नाईक जयंती | ०१ जुलै, २०२१ |
| २१ | लोकमान्य बाळ गंगाधर टिळक जयंती | २३ जुलै, २०२१ |
| २२ | साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंती | ०१ ऑगस्ट, २०२१ |
| २३ | क्रांतिसिंह नाना पाटील जयंती | ०३ ऑगस्ट, २०२१ |
| २४ | सद्भावना दिवस | २० ऑगस्ट, २०२१ |
| २५ | राजे उमाजी नाईक जयंती | ०७ सप्टेंबर, २०२१ |
| २६ | पंडीत दिनदयाळ उपाध्याय जयंती अंत्योदय दिवस | २५ सप्टेंबर, २०२१ |
| २७ | महात्मा गांधी जयंती | ०२ ऑक्टोंबर,२०२१ |
| २८ | लाल बहादूर शास्त्री जयंती | ०२ ऑक्टोंबर,२०२१ |
| २९ | डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम जयंती | १५ ऑक्टोंबर,२०२१ |
| ३० | महर्षि वाल्मिकी जयंती (तिथीनुसार) | २० ऑक्टोंबर,२०२१ |
| ३१ | इंदिरा गांधी पुण्यतिथी व राष्ट्रीय संकल्प दिवस | ३१ ऑक्टोंबर,२०२१ |
| ३२ | वल्लभभाई पटेल जयंती व राष्ट्रीय एकता दिवस | ३१ ऑक्टोंबर,२०२१ |
| ३३ | पंडीत नेहरू जयंती | १४ नोव्हेंबर, २०२१ |
| ३४ | बीरसा मुंडा जयंती | १५ नोव्हेंबर, २०२१ |
| ३५ | इंदिरा गांधी जयंती व राष्ट्रीय एकात्मता दिन | १९ नोव्हेंबर, २०२१ |
| ३६ | संविधान दिवस | २६ नोव्हेंबर, २०२१ |
| ३७ | संत जगनाडे महाराज जयंती | ०८ डिसेंबर, २०२१ |

**इतर राष्ट्रीय कार्यक्रम :—**

| | | |
|---|---|---|
| १ | प्रजासत्ताक दिन | २६ जानेवारी, २०२१ |
| २ | स्वातंत्र्य दिन | १५ ऑगस्ट, २०२१ |
| ३ | महाराष्ट्र दिन | ०१ मे, २०२१ |

तसेच मा. महापालिका ठराव क्र.६९, दिनांक २०/०२/२०२० अन्वये दिनांक २३ जानेवारी हिंदुह्रदय सम्राट मा. श्री. बाळासाहेब ठाकरे जयंती व दिनांक २५ डिसेंबर माजी पंतप्रधान मा. श्री. अटलबिहारी वाजपेयी जन्मदिवस तारखे किंवा तिथी नुसार आणि मराठी

भाषा दिवस, सिंधी भाषा दिवस/साधु वासवानी जयंती (मिट लेस डे), शहिद हेमु कालानी जयंती, शहिद लेट प्रेम रामचंदानी जयंती असे एकूण ४६ कार्यक्रम महानगरपालिकेत साजरे करणे विषयीसन्माननिय महानगरपालिका पदाधिकारी व सदस्य/सदस्या यांना माहितीकरिता मा. महासभेपुढे सविनय सादर.

**महासभा ठराव क्र: १४** **दिनांक:—१७/०२/२०२१**

सुचकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :— श्री. शंकर लुंड

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणेसन २०२१ मध्ये राष्ट्र पुरूष/थोर व्यक्तींची जयंती/पुण्यतिथी दिन व अन्य राष्ट्रीय कार्यक्रम असे एकूण ४६ कार्यक्रम महानगरपालिकेत साजरे करणेबाबतची माहिति नोंद करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ६ :—** श्री. नितेश प्रकाश रंगारी, उप कर निर्धारक व संकलक यांना वैदयकीय प्रतिपुर्ती मिळणे.

---

**महापालिका सचिव:-** नियमानुसार पास पास पास.

**काही सदस्य :—**पास—पास......

**महापौर तथा पीठासीन अधिकारी:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑

**विषय क्र. ६:—** श्री . नितेश प्रकाश रंगारी, उप कर निर्धारक व संकलक यांना वैदयकीय प्रतिपुर्ती मिळणे.

**प्रस्तावना**

श्री. नितेश प्रकाश रंगारी, उप करनिर्धारक व संकलक यांना त्यांच्या पत्नी सौ.अर्चना नितेश रंगारी, यांच्या वैद्यकिय उपचारासाठी. फोर्टीज हॉस्पीटल, मुलुंड(प) येथे दिनांक ०८/०९/२०२० ते दिनांक १४/०९/२०२० रोजी पर्यंत दाखल करण्यात आले होते. त्यासाठी त्यांना रूपये ४,५०,६३७/-इतका खर्च झाला असून त्यांनी संचिकेत सर्व वैद्यकिय परतावा बिल जोडलेले आहते. त्यानुषंगाने त्यांनी दिनांक २१/९/२०२० रोजीच्या अर्जान्वये वैद्यकिय परतावा मिळणेबाबत विनंती केली आहे.

श्री. नितेश प्रकाश रंगारी, उप करनिर्धारक व संकलक यांच्या पत्नी सौ. अर्चना नितेश रंगारी, यांचा आजार- सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र एमएजी-२००५/९/प्र.क्र.१/ आरोग्य -३ दिनांक १९ मार्च, २००५ च्या परिशिष्ट “अ” भाग १ मधील अनुक्रमांक १९ वर मोडतो.

शासन निर्णय क्र एमएजी-२००५/९/प्र.क्र.१/ आरोग्य -३ दिनांक १९ मार्च,२००५ नुसार श्री. नितेश रंगारी, उप कर निर्धारक व संकलक यांना एकुण खर्चाच्या ९० टक्के रक्कम अनुज्ञेय असल्याने एकूण रक्कम रुपये ४,५०,६३७/- पैकी रुपये ३,९६,८३२./- इतकी अनुज्ञेय ठरते.

शासन निर्णय क्रमांक वैखप्र-२०१६/प्र.क्र.१६/२०१६/राकावि/-२ दिनांक १६ मार्च,२०१६ मध्ये वैद्यकीय खर्च रु,३,००,०००/-पर्यत वैद्यकीय खर्चाच्या प्रतीपुर्तीस मंजूरीचे अधिकार संबंधित विभागांच्या विभाग प्रमुख म्हणून मा. आयुक्त यांना असून रुपये ३,००,०००/- वरील वैद्यकीय खर्चाच्या प्रतीपुर्तीस संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभाग प्रमुखांना देण्यात आलेले असून मा. आयुक्त यांना वरिष्ठ प्रशासकीय प्राधिकरण मा. महासभा आहे.

सबब, श्री. नितेश प्रकाश रंगारी, उप कर निर्धारक व संकलक रुपये ३,९६,८३२/- इतकी वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीस मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव मा. महासभा पटलावर प्रस्तावित करण्यात येत आहे.

**महासभा ठराव क्र:१५** **दिनांक:— १७/०२/२०२१**

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्र चौधरी

अनुमोदकाचे नाव :— श्री. कलवंतसिंह सोहता

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणेश्री. नितेश प्रकाश रंगारी, उप कर निर्धारक व संकलक रुपये ३,९६,८३२/- इतकी नियमाप्रमाणे वैद्यकीय प्रतिपुर्ती करणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ७ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ७:—** श्री . महेश शितलानी उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांना वैद्यकिय प्रतिपुर्ती मिळणे.

---

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:-** पास ..पास.. पास..

**काही सदस्य :—**पास—पास……

**महापौर तथा पीठासीन अधिकारी:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ७:—** श्री . महेश शितलानी उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांना वैद्यकिय प्रतिपुर्ती मिळणे.

**<u>प्रस्तावना</u>**

श्री. महेश शितलानी उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांना स्वत:च्या वैद्यकिय उपचारासाठी, कोकीळाबेन धिरुभाई अंबानी हॉस्पीटल, मुंबई येथे दिनांक ११/०३/२०२० ते दिनांक २३/०३/२०२० रोजी पर्यंत दाखल करण्यात आले होते. त्यासाठी त्यांना रुपये **५,३७,३५५/-** इतका खर्च झाला असून त्यांनी संचिकेत सर्व वैद्यकिय परतावा बिल जोडलेले आहेत. त्याअनुषंगाने त्यांनी दिनांक ०२/१२/२०२० रोजीच्या अर्जान्वये वैद्यकिय परतावा मिळणेबाबत विनंती केली आहे.

श्री. महेश शितलानी उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचा आजार सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र.एमएजी-२००५/९/प्र.क्र.१/आरोग्य-३ दिनांक १९ मार्च, २००५ च्या परिशिष्ट 'अ' भाग-२ मधील अनुक्रमांक ५ वर मोडतो.

शासन निर्णय क्र.एमएजी-२००५/९/प्र.क्र.१/आरोग्य-३ दिनांक १९ मार्च, २००५ नुसार श्री. महेश शितलानी, उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांना एकुण खर्चाच्या ९० टक्के रक्कम अनुज्ञेय असल्याने एकुण रक्कम रुपये **५,३७,३५५/-** पैकी रुपये **४,६६,२९५/-** इतकी रक्कम अनुज्ञेय ठरते.

शासन निर्णय क्र.वैखप्र-२०१६/प्र.क्र.१६/२०१६/राकावि/-२ दिनांक १६ मार्च, २०१६६ मध्ये वैद्यकीय खर्च रु.३,००,०००/- पर्यंत वैद्यकीय खर्चाच्या प्रतीपुर्तीस मंजूरीचे अधिकार संबंधित विभागांच्या विभाग प्रमुख मा. आयुक्त, यांना असून रुपये ३,००,०००/- वरील वैद्यकीय खर्चाच्या प्रतीपुर्तीस संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभाग प्रमुखांना देण्यात आलेले असून मा. आयुक्तयांना वरिष्ठ प्रशासकीय प्राधिकरण मा. महासभा आहे.

सबब, श्री. महेश शितलानी, उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांना रुपये **४,६६,२९५/-** इतकी वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीस मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव मा. महासभा पटलावर प्रस्ताविक करण्यात येत आहे.

**<u>महासभा ठराव क्र:१६</u>** **<u>दिनांक:—१७/०२/२०२१</u>**

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्र चौधरी

अनुमोदकाचे नाव :— श्री. कलवंतसिंह सोहता

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणेश्री. महेश शितलानी, उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांना रुपये **४,६६,२९५/-** इतकी नियमाप्रमाणे वैद्यकीय प्रतिपुर्ती करणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाचीसही/—

**<u>सर्वानुमते</u>**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**<u>महापालिका सचिव :—</u>** विषय क्र. ८ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. ८ :—** उल्हासनगर महापालिका अधिकारी/कर्मचा-यांना वर्ष सन २०१९-२०२० साठी सानुग्रह अनुदान देणेस मंजुरी देणे.

---

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-</u>** नापास, नापास, नापास.

**<u>महापालिका सचिव:—</u>** विषय ८ व ९ थोडा फरक आहे त्यामध्ये.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी :-** पास पास पास.

**काही सदस्य :—**पास—पास……

**महापौर तथा पीठासीन अधिकारी:—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑**विषय क्र. ८:—** उल्हासनगर महापालिका अधिकारी/कर्मचा-यांना वर्ष २०१९-२०२० साठी सानुग्रह अनुदान देणेस मंजुरी देणे.

**प्रस्तावना**

सालाबादा प्रमाणे उल्हासनगर महापालिका अधिकारी वकर्मचारी यांना सन २०१९-२० या वर्षा करिता सानुग्रह अनुदान वाटप करणे बाबत दिनांक ०५/११/२०२० रोजी मा. महापौर, श्रीम. लिलाबाई लक्ष्मण आशान, यांच्या अध्यक्षतेखाली महापालिकेचे पदाधिकारी व कामगार संघटेनेचे पदाधिकारी यांच्याबरोबर झालेल्या चर्चेनुसार दिपावळीसणा निमित्त सानुग्रह अनुदानरू. १२,५००/- देण्याचे सर्वनुमते मान्यक रण्यात आलेले आहे.

खालील अटीव शर्तीस अधिन राहुन सानुग्रह अनुदान अदा करणेस प्रस्तावित करण्यात येत आहे.

१. वैद्यकिय आरोग्य विभागातील योजनेमध्ये (हिवताप/आरोग्यसेवक) (प्रकल्पामध्ये) कंत्राटी कर्मचारी, मानधनावरी लकर्मचारी, प्रतिनियुक्तीवरी लसर्व अधिकारी/कर्मचारी व प्रजननव बाल आरोग्यकेंद्रावरील राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान, सुधारीत क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम, शासकीय अधिकारी व कर्मचारी, दिनदयाल अंत्योदय योजना, राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान, कंत्राटी अभियंता, इत्यादी अधिकारी/कर्मचारी यांना रू. १०,०००/- इतका सानुग्रह अनुदान वाटप करण्या बाबत प्रस्तावित
   सदर सानुग्रह अनुदान ही प्रत्यक्ष हजर असलेल्या दिवसाच्या प्रमाणात खालील सुत्रानुसार देण्याचे प्रस्तावित आहे.
   रूपय १०,०००/-
   ……………………………. हजरदिवस
   ३६५ दिवस
२. सानुग्रह अनुदान हा आर्थिक वर्षासाठी (दिनांक ०१/०४/२०१९ ते ३१/०३/२०२०) देण्यात येत आहे प रंतु कोव्हीड मधीलक मचारी यांनी कोव्हीड प्रर्दुभाव रोखण्यासाठी जीवाची बाजी लावली असून त्यांना विशेष बाब म्हणून ठोक रू. ६,०००/- सानुग्रह अनुदान देण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी प्रस्ताववित करण्यात येत आहे.

तरी वर्ष २०१९ -२०२० चा सानुगृह अनुदानाचा प्रस्ताव मा. महासभेस धोरणात्मक निर्णयासाठी सादर.

**महासभा ठराव क्र:१७** **दिनांक:—१७/०२/२०२१**

सुचकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :— श्री. शंकर लुंड, श्री. प्रमोद टाले

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे वर्ष २०१९-२०२० साठी खालील अटी व शर्तीस अधिन राहुन सानुग्रह अनुदान अदाकरणेस मान्यता देत आहे.

१. वैद्यकिय आरोग्य विभागातील योजनेमध्ये (हिवताप/आरोग्यसेवक) (प्रकल्पामध्ये) कंत्राटी कर्मचारी, मान धनावरील कर्मचारी, प्रतिनियुक्ती वरील सर्व अधिकारी/कर्मचारी व प्रजननव बाल आरोग्य केंद्रावरील राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान, सुधारीत क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम, शासकीय अधिकारी व कर्मचारी, दिनदयाल अंत्योदय योजना, राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान, कंत्राटी अभियंता, इत्यादी अधिकारी/कर्मचारी यांना रू. १०,०००/- इतका सानुग्रह अनुदान वाटप करण्यास प्रशासनास निर्देश देत आहे.
२. सदर सानुग्रह अनुदान ही प्रत्यक्ष हजर असलेल्या दिवसाच्या प्रमाणात खालील सुत्रानुसार देण्यात यावे.
   रूपय १०,०००/-
   ……………………………. हजर दिवस
   ३६५ दिवस

३. सानुग्रह अनुदान हा आर्थिक वर्षासाठी (दिनांक ०१/०४/२०१९ ते ३१/०३/२०२०) देण्यात येत आहे परंतु कोव्हीड मधील कर्मचारी यांनी कोव्हीड प्रर्दुभाव रोखण्यासाठी जीवाची बाजी लावली असून त्यांना विशेष बाब म्हणून ठोक रू. ६,०००/- सानुग्रह अनुदान देण्यास प्रशासनास निर्देश देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव:—** विषय क्र. ९ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. ९ :—** उल्हासनगर महापालिका अधिकारी/कर्मचा-यांना वर्ष २०१९-२०२० साठी सानुग्रह अनुदान देणेस मंजुरी देणे.

---

**काही सदस्य :—**पास—पास......

**महापौर तथा पीठासीन अधिकारी:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑**विषय क्र. ९:—** उल्हासनगर महापालिका अधिकारी/कर्मचा-यांना वर्ष २०१९-२०२० साठी सानुग्रह अनुदान देणेस मंजुरी देणे.

**प्रस्तावना**

सालाबादा प्रमाणे उल्हासनगर महापालिका अधिकारी व कर्मचारी यांना सन २०१९-२० या वर्षा करिता सानुग्रह अनुदान वाटप करणे बाबत दिनांक ०५/११/२०२० रोजी मा. महापौर, श्रीम. लिलाबाई लक्ष्मण आशान, यांच्या अध्यक्षते खाली महापालिकेचे पदाधिकारी व कामगार संघटेनेचे पदाधिकारी यांच्या बरोबर झालेल्या चर्चेनुसार दिपावळी सणा निमित्त सानुग्रह अनुदानरू . १२,५००/- देण्याचे सर्वनुमते मान्य करण्यात आलेले आहे.

खालील अटी व शर्तीस अधिन राहुन सानुग्रह अनुदान अदा करणेस प्रस्तावित करण्यात येत आहे.

३. वैद्यकिय आरोग्य विभागातील योजनेमध्ये (हिवताप/आरोग्यसेवक) (प्रकल्पामध्ये) कंत्राटी कर्मचारी, मानधनावरी लकर्मचारी, प्रतिनियुक्ती वरील सर्व अधिकारी/कर्मचारी व प्रजननव बाल आरोग्य केंद्रावरील राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान, सुधारीत क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम, शासकीय अधिकारी व कर्मचारी, दिनदयाल अंत्योदय योजना, राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान, कंत्राटी अभियंता, इत्यादी अधिकारी/कर्मचारी यांना रू. १०,०००/- इतका सानुग्रह अनुदान वाटप करण्याबाबत प्रस्तावित.
   सदर सानुग्रह अनुदान ही प्रत्यक्ष हजर असलेल्या दिवसाच्या प्रमाणात खालील सुत्रानुसार देण्याचेप्र स्तावित आहे.
   रूपय १०,०००/-
   ................................ हजर दिवस
   ३६५ दिवस

४. सानुग्रह अनुदान हा आर्थिक वर्षासाठी (दिनांक ०१/०४/२०१९ ते ३१/०३/२०२०) देण्यात येत आहे परंतु कोव्हीड मधील कर्मचारी यांनी कोव्हीड प्रर्दुभाव रोखण्यासाठी जीवाची बाजी लावली असून त्यांना विशेष बाब म्हणून ठोक रू. ६,०००/- सानुग्रह अनुदान देण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्यासाठीप्र स्तावावित करण्यात येत आहे.

तरी वर्ष २०१९ -२०२० चा सानुगृह अनुदानाचा प्रस्ताव मा. महासभेस धोरणात्मक निर्णयासाठी सादर.

**महासभा ठराव क्र:१८** **दिनांक:—१७/०२/२०२१**

सुचकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :— श्री. शंकर लुंड, श्री. प्रमोद टाले

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे वर्ष २०१९-२०२० साठी खालील अटी व शर्तीस अधिन राहुन सानुग्रह अनुदान अदाकरणे समान्यता देत आहे.

४. वैद्यकिय आरोग्यवि भागातील योजनेमध्ये (हिवताप/आरोग्यसेवक) (प्रकल्पामध्ये) कंत्राटी कर्मचारी, मानधनावरी लकर्मचारी, प्रतिनियुक्तीवरील सर्व अधिकारी/कर्मचारी व प्रनन व बाल आरोग्य केंद्रावरील राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान, सुधारीत क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम, शासकीय अधिकारी व कर्मचारी, दिनदयाल अंत्योदय योजना, राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान, कंत्राटी अभियंता, इत्यादी अधिकारी/कर्मचारी यांना रू. १०,०००/- इतका सानुग्रह अनुदान वाटप करण्यास प्रशासनास निर्देश देत आहे.

५. सदर सानुग्रह अनुदान ही प्रत्यक्ष हजर असलेल्या दिवसाच्या प्रमाणात खालील सुत्रानुसार देण्यात यावे.
रूपय १०,०००/-

……………………………. हजर दिवस
३६५ दिवस

६. सानुग्रह अनुदान हा आर्थिक वर्षासाठी (दिनांक ०१/०४/२०१९ ते ३१/०३/२०२०) देण्यात येत आहे परंतु कोव्हीड मधील कर्मचारी यांनी कोव्हीड प्रर्दुभाव रोखण्यासाठी जीवाची बाजी लावली असून त्यांना विशेष बाब म्हणून ठोक रू. ६,०००/- सानुग्रह अनुदान देण्यास प्रशासनास निर्देश देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव:—** विषय क्र. १० वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १०:—** उल्हासनगर महानगरपालिका मुख्यालयातील पदाधिका—यांना दयावयाच्या दालनांच्या वाटपाचे धोरण निश्चित होणे बाबत.

---

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** मा. महापौरजी, उप महापौर, मा. आयुक्त,दालनचा विषयाला आपण बघणार. सर्वांच्या नावाच्या अगोदर मा. महापौरजी, उप महापौर, सभापती गटनेता, विरोधी पक्ष गटनेताकारण काय भारतीय जनता पार्टी लिहिले आहे. अन्याय का.भारतीय जनता पार्टी गटनेता का कार्यालय, महापौरांच्या कार्यालयासमोर आहे. आणि आज पर्यंत आपण कार्यालय दिले नाही. मी निवेदन करतो की, विरोधी गटनेत्याचे कार्यालय…

**सदस्य, श्री.किशोर वनवारी:-**मा. महापौरजी, उप महापौर, मा. आयुक्त, आज मी विरोधी पक्षाच्या खुर्चीत बसलो आहे. उदया कोणी दुसरे बसेल.आज आपण लोक सर्वांसाठीमेहरबानी करून ते कार्यालय मला कार्यालय रिकामी करून दया. ते कार्यालय चालू झाले पाहिजे. ते कार्यालय रिकामे केले पाहिजे. गटनेता शिवसेनेमध्ये होते. आमचे मा. शिवसेना नेता मा.आबा धनजंय बोराडे साहेब त्यांचे तीन कार्यालये उपमहापौरांच्या कार्यालयाजवळ आजपर्यंत सभागृह नेता बसले आहेत. रमेश चव्हाण त्यांचे कार्यालय वेगळे आहे. आणि सभागृह नेत्याचे कार्यालय वेगळे आहे. परंतु एक विरोधी पक्षनेता किशोर वनवारी तिथेच बसले आहे. आणि जमनादास पुरस्वानी तिथेच बसले आहेत. तरी मेहरबानी करुन आमच्यावर जो अन्याय झाला आहे. मेहरबानी करुन समोर दोन निविदा मंजूर केले आहे. ते बोलले होते की, चांगले कार्यालय बनले पाहिजे. मी आयुक्त साहेबांचे धन्यवाद मानतो. रिकामे नाही झाले ते रिकामी करुन त्यांचे काम चालू करण्यात यावे आणि त्यांना देण्यात यावेत.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-**मा. महापौरजी, पहिला मजला….

**<u>उप महापोर, श्री. भगवान भालेराव</u>** :-मा. महापौरजी, दालनाचा विषय आहे. हा महासभेपुढे लवकर सोडवण्यात येवू शकत नाही. हा प्रश्न इथे सोडवला जाणार नाही. तर आपली ऑनलाईन सभा आहे, हा विषय वगळू या कोण काय बोलतय हे समजत नाही. या संदर्भामध्ये सगळया गटनेत्यांना आणि सगळया पदाधिका-यांना आपल्या महापौरांच्या दालनात बोलवण्यात जाईल आणि त्या संदर्भात एक पॉलिसी निर्णय घेण्यात येईल. आठवी मिटिंग आहे. दहावी मिटिंग आहे.

**<u>सदस्य, श्री.अरुण आशान</u>**:-धन्यवाद, धन्यवाद साहेब. उप महापौरजी धन्यवाद.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी</u>**:-धन्यवाद.

**<u>सदस्य, श्री.प्रदिप रामचंदानी</u>** :-आजच्या विषया पत्रिकामध्ये ७ मुददयांवर चर्चा झाली आहे.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी</u>**:-सर्व गटनेत्यांची बैठक महापौर कार्यालयामध्ये बोलवण्यात यावी आणि...

**<u>सदस्य, श्री.अरुण आशान</u>**:-मा. महापौरजी, सगळया गटनेत्यांना महापौर कार्यालयात आमंत्रण दिले आहे.मा. उप महापौर साहेबांनी बोलले आहे. महापौरांनी आदेश दिला आहे. आपण सगळे आमंत्रीत आहेत, आपल्या सर्वांचा निर्णय महापौरांच्या दालनामध्ये घेण्यात येईल.

**<u>सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी</u>** :-महापौर कार्यालयात सर्व व्यवस्था केली जाईल. आपले सर्वांचे स्वागत केले जाईल.

**<u>सदस्य, श्री. अरुण आशान</u>**:-धन्यवाद साहेब धन्यवाद साहेब. चौधरी साहेब धन्यवाद, पुढे घ्या.

**<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी</u>:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

**☑विषय क्र. १०:—** उल्हासनगर महानगरपालिका मुख्यालयातील पदाधिका—यांना दयावयाच्या दालनांच्या वाटपाचे धोरण निश्चित होणेबाबत.

## <u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिका मुख्यालयातील जागा वाटपाबाबत संदर्भित ठराव क्र.३९, दिनांक १८/०८/२००७ अन्वये धोरण निश्चित करण्यात आले होते. सदर धोरणामध्ये महापालिका मुख्यालयाच्या इमारतीतील तळमजला, पहिलाव दुसरा मजल्यावर विविध विभाग, सन्मा. पदाधिकारी (मा. महापौर, उप—महापौर, सभापती, स्थायी समिति, सभागृहनेता व विरोधी पक्षनेता), सभापती, विषय समिति ( नऊ समित्या ), विविध पक्षाचे गटनेते, वरिष्ठ अधिकारी, कामगार संघटना कार्यालय, विदयुत जंक्शन बॉक्स, महापालिका कर्मचारी पतपेढी कार्यालय, पत्रकार कक्ष, निवडणूक कक्ष, प्रकल्प कक्ष, बॅटरी, इन्व्हेटर रूम अशाप्रकारे विविध जागांचे वाटप झालेले असुन त्यानुसार कामाची व्यवस्था करण्यात आलेली होती.

उक्त धोरण निश्चित केल्यानंतर १० ते १२ वर्षाचा कालावधी झालेला असुन दरम्यानच्या कालावधीत विविध विभाग व पदाधिका—यांची दालने व इतर यामध्ये गरजेनुसार व उपलब्धततेनुसार बदल करण्यात आले आहेत. माहे फेब्रुवारी—२०१७ मध्ये महापालिकेचे सार्वत्रिक निवडणूक पार पडल्यानंतर नव्याने पदाधिकारी यांची निवड झाल्यानंतर मा. महापौर यांचे दालनाव्यतिरिक्त मा. उपमहापौर व सभागृहनेता यांच्या दालनांचे आस्तित्वात असलेले आकारमान वाढविण्यासाठी मालमत्ता विभागाची पुर्वपरवानगी न घेता सार्व. बांधकाम विभागामार्फत परस्पर दोन ते तीन दालने एकत्रित करून एकच दालन तयार करण्यात आले. त्याचप्रमाणे गटनेता यांना पुर्वीच्या धोरणामध्ये एकच दालन उपलब्ध करून दिले होते. परंतु आता काही गटनेते यांना ॲन्टीचेंबर, कर्मचारी वर्ग व प्रसाधनगृह याकरीता एक दालन व कार्यालयासाठी एक दालन अशाप्रकारे दोन दालने देण्यात आलेली आहेत.

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १९—एक—अ (१)** मध्ये जो निर्वाचित पालिका सदस्य मोठे संख्याबळ असलेल्या पक्षाचा त्यावेळी नेता असेल आणि महापौरांकडून ज्याला तशी मान्यता मिळाली असेल, तो सभागृहाचा नेता असेल व(२) मध्ये सभागृहाच्या नेत्याला, मानधन, भत्ते व इतर सुविधा देण्याबाबत तरतुद केलेली आहे.

तसेच **कलम १९—एक—अअ (१)** मध्ये जो निर्वाचित पालिका सदस्य मोठे संख्याबळ असलेल्या विरोधी पक्षाचा त्यावेळी नेता असेल, आणि महापौरांकडून ज्याला तशी मान्यता मिळाली असेल तो विरोधी पक्ष नेता असेल व (२) विरोधी पक्ष नेत्याला, मानधन, भत्ते व इतर सुविधा देण्याबाबत तरतुद केलेली आहे.

उक्त नियमान्वये मोठे संख्याबळ असलेल्या पक्षाचा नेता म्हणुन त्या पक्षाचा गटनेता आणि महापौरांकडून ज्याला तशी मान्यता मिळाली तो सभागृहनेता असे होईल किंवा मोठया संख्याबळ असलेला पक्षाचा नेता हा सभागृहनेता व त्या पक्षाचा गटनेता असला पाहिजे.

त्याचप्रमाणे मोठे संख्याबळ असलेल्या पक्षाचा नेता म्हणुन त्या पक्षाचा गटनेता आणि महापौरांकडून ज्याला तशी मान्यता मिळाली तो विरोधी पक्षनेता असे होईल किंवा मोठया संख्याबळ असेलला पक्षाचा नेता हा विरोधी पक्षनेता व त्या पक्षाचा गटनेता असला पाहिजे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमान्वये त्यांनाच केवळ त्या पदभाराकरीता महापालिकेकडून देय असलेले मानधन, भत्ते व इतर सुविधा देणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामध्ये गटनेता यांचेसाठी कोणतीही तरतुद केलेली नाही. तथापि, इतर महानगरपालिकांमध्ये एकुण सदस्य संख्येच्या १० टक्के पेक्षा कमी सदस्य संख्या असलेल्या पक्षाला दालन उपलब्ध करून दिले जात नाही. परंतु सद्यस्थितीत या महापालिकेत एक सदस्य असलेल्या पक्षाच्या गटनेत्यासदेखील दालन उपलब्ध करून देण्यात आलेले आहे.

आस्तित्वात असलेल्या इमारतीच्या रचनेमध्ये कोणतीही वाढ न झाल्याने मा. महासभा ठराव क्र. ३९, दिनांक १८/०८/२००७ मधील वाटपानुसार दिलेल्या दालनांपेक्षा जास्तीची दालने घेतल्यामुळे आता सभागृहनेता व भाजपा गटनेता या पदाधिका—यांना दालन उपलब्धततेसाठी जागा अपुरी पडत आहे. तसेच सन्मा. महिला पालिका सदस्या यांनीदेखील महिला कक्षाची सुविधा मिळणेबाबत मागणी केली आहे. अपु—या जागेअभावी सदरची मागणीदेखील पुर्ण करता येत नाही.

महापालिकेच्या सार्व.बांधकाम विभागाकडून सद्यस्थितीत आस्तित्वात असलेल्या सन्मा. पदाधिकारी यांच्या दालनांचे मोजमाप घेतले असता त्यांचा तपशिल खालिलप्रमाणे आहे.

| **अ.क्र.** | **पदाधिका—यांचे पदनाम** | **महापालिका मुख्यालय इमारतीतील उपलब्ध असलेली जागा** | **जागेचे मोजमाप चौ.मी.** | **शेरा** |
|---|---|---|---|---|
| १ | मा. महापौर दालन | पहिला मजला | ७५.६८७ | मा. महापौर, स्विय सहा. व कर्मचारीवर्ग, ॲन्टी चेंबर प्रसाधनगृह सुविधे सहीत |
| २ | मा. उपमहापौर दालन | पहिला मजला | ५५.७२७ | मा. उपमहापौर, स्विय सहा. व कर्मचारीवर्ग, ॲन्टी चेंबर प्रसाधनगृह सुविधे सहीत |
| ३ | मा. सभापती, स्थायी समिती | पहिला मजला | ७६.१०८ | मा. सभापती, स्थायी समिती, स्विय सहा. व कर्मचारीवर्ग, ॲन्टी चेंबर प्रसाधनगृह सुविधे सहीत |
| ४ | स्थायी समिती सभागृह | पहिला मजला | ३९.६२ | — |
| ५ | सभागृह नेता कार्यालय | पहिला मजला | ५८.०४ | मा. सभागृहनेता, ॲन्टी चेंबर, प्रसाधनगृह सुविधे सहीत |
| ६ | विरोधी पक्षनेता कार्यालय | पहिला मजला | ५७.८९६ | मा. विरोधी पक्षनेता, स्विय सहा. व कर्मचारीवर्ग, ॲन्टी चेंबर प्रसाधनगृह सुविधे सहीत |
| ७ | सभापती, सार्व. बांधकाम समिती | पहिला मजला | ३७.३०३ | मा. सभापती, स्विय सहा. व कर्मचारीवर्ग, ॲन्टी चेंबर |
| ८ | सभापती, गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती | पहिला मजला | १५.०० | मा. सभापती दालन, |
| ९ | सभापती, महिला व बालकल्याण समिती | तळमजला | ३८.७६ | मा. सभापती दालन, ॲन्टी चेंबर |
| १० | सभापती, सार्व. आरोग्य समिती | तळमजला | १९.८१ | मा. सभापती दालन, |
| ११ | सभापती, पाणीपुरवठा समिती | तळमजला | १९.४५ | मा. सभापती दालन, |
| १२ | सभापती, क्रिडा समिती | तळमजला | १९.६८८ | मा. सभापती दालन, |
| १३ | सभापती, महसुल समिती | तळमजला | २०.२९ | मा. सभापती दालन, ॲन्टी चेंबर प्रसाधनगृह सुविधे सहीत |
| १४ | सभापती, नगररचना नियोजन समिती | पहिला मजला | १५.०० | मा. सभापती दालन, |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १५ | सभापती, शिक्षण समिती | दुसरा मजला | १५.०० | मा. सभापती दालन, |
| १६ | सभापती, परिवहन समिती | पहिला मजला | १८.३६५ | मा. सभापती दालन, |
| १७ | गटनेता, भारतीय जनता पक्ष | पहिला मजला | — | — |
| १८ | गटनेता, शिवसेना पक्ष | पहिला मजला | ४८.६९ | मा. गटनेता कार्यालय, स्विय सहा. व कर्मचारीवर्ग, ॲन्टी चेंबर प्रसाधनगृह सुविधे सहीत |
| १९ | गटनेता, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया | पहिला मजला | ३७.२९६ | मा. गटनेता कार्यालय, स्विय सहा. व कर्मचारीवर्ग, ॲन्टी चेंबर प्रसाधनगृह सुविधे सहीत |
| २० | गटनेता, भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस | पहिला मजला | १९.४२५ | मा. गटनेता दालन, |
| २१ | गटनेता, राष्ट्रवादी कॉग्रेस पक्ष | पहिला मजला | १८.४६ | मा. गटनेता दालन, |
| २२ | गटनेता, बहुजन समाज पक्ष | तळमजला | २०.११ | मा. गटनेता दालन, प्रसाधनगृह सुविधे सहीत |

वरीलप्रमाणे पदाधिका—यांना देण्यात आलेल्या दालनांचा तपशिल पाहता मा. महासभा ठराव क्र. ३९, दिनांक १८/०८/२००७ मधील दालनांच्या वाटपाच्या धोरणामध्ये बदल झालेला आहे. यात प्रामुख्याने सन्मा. पदाधिकारी व त्यांच्या अधिनस्त असलेला कर्मचारीवर्ग यांचेसाठी तीन ते चार दालने एकत्रित करण्यात आलेली आहेत. यामुळे आस्तित्वात असलेल्या इमारतीमध्ये दालन कमी पडत आहेत.
महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार गटनेता यांना सुविधा देणेची तरतुद नाही. तथापि, मा. महापौर, उप—महापौर, सभापती, स्थायी समिती, सभागृहनेता व विरोधी पक्षनेता या वैधानिक पदांसाठी सद्या दिलेली व्यवस्था कायम ठेवण्यात येईल.

तथापि, **महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १९—एक—अ (१)** व **कलम १९—एक—अअ (१)** नुसार सभागृहनेता हाच त्या पक्षाचा गटनेता व विरोधी पक्षनेता हाच त्या पक्षाचा गटनेता याप्रमाणे ज्या पक्षामधुन सभागृहनेता व विरोधी पक्षनेता यांची निवड केली जाईल त्याच पक्षाच्या गटनेत्यास वेगळे दालन दिले जाणार नाही. तसेच इतर सर्व विषय समिती सभापती, गटनेते (पुर्वीचा मा. महासभा ठराव क्र. ३९, दिनांक १८/०८/२००७ मध्ये ज्यांचेसाठी दालन व्यवस्था मंजूर केली होती.) यांना १५ ते २० चौ.मी. क्षेत्रफळाचे दालन देणे संयुक्तिक राहिल.
महिला सदस्यांना पुरेसे दालन असावे त्यासाठी सभापती, महिला व बालकल्याण समिती यांना ३० ते ४० चौ.मी. चे दालन असावे.
तसेच वरीलप्रमाणे प्रस्तावित केलेल्या पदाधिका—यांच्या दालनाच्या क्षेत्रातच त्यांच्यासाठी देण्यात आलेल्या कर्मचा—यांची बैठक व्यवस्था राहिल. याप्रमाणे महापालिका मुख्यालयातील इमारतींमध्ये विविध विभाग यांची आस्तित्वातील दालन व्यवस्था कायम ठेवून सन्मा.पदाधिका—यांना दयावयाच्या दालनांच्या वाटपाचे धोरण निश्चित होणेकरीता प्रस्ताव मा. महासभेपुढे प्रस्तावित करण्यात येत आहे

**महासभा ठराव क्र:१८अ** **दिनांक:—१७/०२/२०२१**

सुचकाचे नाव:— श्री. राजेंद्र चौधरी

अनुमोदकाचे नाव:— श्री. प्रमोद टाले

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर महापालिका मुख्यालयातील इमारतींमध्ये विविध विभाग यांची आस्तित्वातील दालन व्यवस्था कायम ठेवून सन्मा.पदाधिका—यांना दयावयाच्या दालनांच्या वाटपाचे धोरण निश्चित करणेचा प्रस्ताव या कार्यसूचीवरुन वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-** ११ वा विषय वाचला ना मॅडमने.

**सदस्य, श्री. अरुण आशान:-** सचिव मॅडम, ११ वा विषय वाचा.

**महापालिका सचिव:—** विषय क्र. ११ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. ११ :—** सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार महापालिका शाळा क्र. १, शहिद हेमु कलानी विद्यालय, भोलेनाथ टॉवर समोर, उल्हासनगर-१ येथे तात्पुरत्या स्वरूपात सुरू असलेल्या निवारा केंद्राच्या ठिकाणी कायमस्वरूपी बेघर निवारा केंद्र तयार करणेस मान्यता मिळणेबाबत.

---

**महापालिका सचिव:-** तुम्ही निर्णय घ्या, काय घ्यायचा आहे तो?

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-** त्यांचे काय म्हणणे आहे, सुरु ठेवले पाहीजे ना.निवारा केंद्र सुरु करण्यासाठी....

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** निवारा केंद्र सुरु करा.

**काही सदस्य:-** पास...पास...

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ११ :—**सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार महापालिका शाळा क्र. १, शहिद हेमु कलानी विद्यालय, भोलेनाथ टॉवर समोर, उल्हासनगर-१ येथे तात्पुरत्या स्वरूपात सुरू असलेल्या निवारा केंद्राच्या ठिकाणी कायमस्वरूपी बेघर निवारा केंद्र तयार करणेस मान्यता मिळणेबाबत.

**प्रस्तावना**

शासनाचे सहसंचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, नगरविकास विभाग यांनी दिनांक ८ ऑक्टोंबर, २०२० च्या पत्रान्वये असे कळविले आहे की, दीनदयाळ अंत्योदय योजना- राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान ( DAY- NULM) या केंद्र शासन पुरस्कृत अभियान अंतर्गत नागरी बेघरांना निवारा (Shelter for Urban Homeless) या घटकाचा नागरी भागातील बेघर व्यक्तींना सर्व पायाभुत सोयी सुविधांसह निवारा उपलब्ध करणे हा उददेश आहे. वार्षिक कृती आराखडयामध्ये नवीन निवारा बांधकाम अथवा निवारा नुतनीकरणाचे उददीष्टय देण्यात आलेले आहे. तथापि, सदर घटकाच्या उददीष्टय पुर्ततेकामी महानगरपालिका/नगरपरिषदस्तरावर कालबध्द नियोजन केले जात नसल्याचे दिसुन येत आहे. यासंदर्भातील उददीष्टाच्या तुलनेत बेघरांसाठी निवारे बांधण्याच्या कामाची प्रगती अत्यंत असमाधानकारक आहे.

सदर घटकाच्या अंमलबजावणीचे सनियंत्रण मा. सर्वोच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली होत आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार मा. उज्जवल उके (से.नि.भा.प्र.से.) यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय निवारा संनियंत्रण समिती गठीत करण्यात आलेली आहे. सदर समितीने नागरी बेघरांसाठी आवश्यकतेप्रमाणे पुरेशा प्रमाणात निवारा उपलब्ध होत नसल्याबाबत खंत व्यक्त केलेली आहे. त्यानुसार नागरी बेघरांना निवारा घटकाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार प्रती १ लक्ष लोकसंख्येमागे १ कायमस्वरूपी निवारा सुरू करणे अपेक्षित आहे. त्याचप्रमाणे लोकसंख्या व त्रयस्थ संस्थेच्या सर्वेक्षणातून आलेल्या बेघरांच्या संख्येनुसार कायमस्वरूपी

निवारा सुरू करण्यासाठी नविन निवारा बांधकाम अथवा निवारा नुतनीकरणाचे प्रस्ताव मान्यतेसाठी पाठविण्याबाबत यापूर्वीही कळविण्यात आले होते.

तथापि, उल्हासनगर महानगरपालिकेकडून अदयापही कायमस्वरूपी निवा-याबाबत प्रस्ताव अप्राप्त आहे. सदर बाब अतिशय गंभीर आहे. या विषयाचे सामाजिक महत्व व अंमलबजावणी संदर्भातील तातडीची गरज विचारात घेता, महापालिकेकडून या घटकाचे कालबध्द नियोजन व त्याची योग्य अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. नागरी बेघरांसाठी कायमस्वरूपी निवारा सुरू करण्यासाठी जागा/इमारतीचा शोध घेऊन तात्काळ प्रस्ताव मान्यतेसाठी पाठविण्यात यावा.

या घटकाच्या योग्य अंमलबजावणीसाठी शहर प्रकल्प अधिकारी जबाबदार आहेत. महापालिकेअंतर्गत नागरी बेघरांकरीता कायमस्वरूपी निवारा सुरू करण्यासाठी निवारा नवीन बांधकाम अथवा निवारा नुतनीकरणाचा प्रस्ताव पाठविण्याबाबतचा कृती आराखडा नगरपरिषद प्रशासन संचालनालयास दि. १५ ऑक्टोंबर, २०२० पुर्वी अहवालाद्वारे अवगत करावा.

सदर योजना मा. सर्वोच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली होत आहे. त्यामुळे उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात बेघरांसाठी कायमस्वरूपी निवारा केंद्रासाठी जागा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. उल्हासनगर महापालिकेमार्फत पुढील दोन जागांवर शहरी बेघरांना तात्पुरत्या स्वरूपात निवारा उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

१. महापालिका शाळा क्र.०१, भोलेनाथ टॉवरसमोर, उल्हासनगर-१
२. समाजमंदिर, फॉलवर लाईन, उल्हासनगर-३

नागरी बेघरांना कायमस्वरूपी निवारा सुरू करण्यासाठी जागा/इमारत उपलब्ध करून देण्याबाबत एनयुएलएम विभागाने दिनांक १३/१०/२०२० च्या पत्रान्वये विनंती केली आहे.

मालमत्ता विभागाकडे महापालिकेच्या विविध जागा उपलब्ध आहेत. परंतु त्यांचा मालकी हक्क महापालिकेकडे नाही. एनयुएल विभागास मालमत्ता विभागाकडे उपलब्ध असलेल्या जागा दाखविण्यात आल्या आहेत. तथापि, सदर जागा बेघर निवारा केंद्रासाठी निश्चित करून दिलेल्या निकषामध्ये बसत नसल्याचे एनयुएलएम यांनी कळविले आहे.

महापालिका शाळा क्र.०१, सिंधी माध्यम, भोलेनाथ टॉवरसमोर, उल्हासनगर-१ येथे सद्यस्थितीत तात्पुरत्या स्वरूपात बेघर निवारा सुरू आहे. सदर शाळा पुर्णतः बंद अवस्थेत आहे. सदर परिसरामध्ये मनपा शाळा क्र.२७ हिंदी माध्यमाची शाळा सुरू आहे. सदर शाळांची जागा महापालिकेच्या ताब्यात आहे.

त्यामुळे सद्यस्थितीत तात्पुरत्या स्वरूपात सुरू असलेल्या महापालिका शाळा क्र.०१ याठिकाणी कायमस्वरूपी बेघर निवारा केंद्र तयार करता येवु शकेल किंवा कसे? याबाबत प्रशासन अधिकारी, शिक्षण विभाग यांचेकडून अभिप्राय घेतले असता मनपा शाळा क्र. १ येथे सद्या सुरू असलेल्या निवारा केंद्राकरीता स्वतंत्र शौचालय/स्वच्छतागृह तसेच प्रवेशद्वार उपलब्ध आहे. तसेच मनपा शाळा क्र.२७ हिंदी माध्यमाच्या विद्यार्थ्यांकरीता स्वतंत्र प्रवेशद्वार उपलब्ध आहे परंतु शौचालय/स्वच्छतागृह स्वतंत्र असणे आवश्यक असल्याची बाब नमुद करून मनपा शाळा क्र.१ येथे सद्यस्थितीत सुरू असलेल्या तात्पुरत्या निवारा केंद्राच्याठिकाणी कायमस्वरूपी बेघर निवारा केंद्र तयार करण्यास हरकत नाही असे अभिप्राय दिले आहेत.

सद्यस्थितीत महापालिका शाळा क्र.१ येथे सुरू असलेल्या तात्पुरत्या निवारा केंद्रामध्ये शहरातील बेघर यामध्ये रस्त्यावर/फुटपाथवर राहणारे, मंदिराबाहेर बसणारे ज्यांच्याकडे घर/निवारा नाही असे ५० लोक राहतात. त्याठिकाणी त्यांना जेवण व राहण्यासाठी आवश्यक असलेल्या आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्या जातात त्यासाठी होणारा खर्च शासनाकडून मिळतो.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७९ मध्ये महानगरपालिकेच्या मालमत्तेचा विनियोग व वापर करण्यासंबंधी खालिलप्रमाणे तरतुदी दिलेल्या आहेत.**७९ (क)**:— अन्वये आयुक्तांस महानगरपालिकेच्या मंजुरीने महानगरपालिकेच्या मालकीची कोणतीही स्थावर किंवा जंगम मालमत्ता पटटयाने देता येईल, विकता येईल, भाडयाने देता येईल किंवा अन्यथा अभिहस्तांतरीत करता येईल.**७९ (ड)**:— जो मोबदला घेऊन, महानगरपालिकेच्या मालकीची कोणतीही स्थावर मालमत्ता किंवा कोणताही हक्क विकता येईल, पटटयाने देता येईल, किंवा अन्यथा हस्तांतर करता येईल तो मोबदला असे अधिमूल्य, भाडे किंवा अन्य मोबदला यांच्या चालू बाजार किंमतीपेक्षा कमी असता कामा नये.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७९ नुसार महानगरपालिकेची मालकी असलेली शाळा क्र.१ चा वापर कायमस्वरूपी बेघर निवारा केंद्र म्हणुन करावयाचा झाल्यास त्या शाळेच्या बांधकाम संरचनेत काही बदल करणे आवश्यक आहे. त्याबदलासाठी येणारा खर्च शासनातर्फे अदा करण्यात येणार आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार महापालिका शाळा क्र. १, शहिद हेमु कलानी विद्यालय, भोलेनाथ टॉवर समोर, उल्हासनगर-१ येथे तात्पुरत्या स्वरूपात सुरू असलेल्या निवारा केंद्राच्या ठिकाणी कायमस्वरूपी बेघर निवारा केंद्र तयार करणेस मान्यता मिळणेकरीता सदर प्रस्ताव मा. महासभेपुढे मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

**महासभा ठराव क्र:१९** **दिनांक:—१७/०२/२०२१**

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्र चौधरी

अनुमोदकाचे नाव :— श्री. कलवंतसिंह सोहता

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणेसर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार महापालिका शाळा क्र. १, शहिद हेमु कलानी विद्यालय, भोलेनाथ टॉवर समोर, उल्हासनगर-१ येथे तात्पुरत्या स्वरूपात सुरू असलेल्यानिवारा केंद्राच्याठिकाणी कायमस्वरूपी बेघर निवारा केंद्र तयार करणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. १२ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. १२ :—प्रस्तावाची सूचना**

कोव्हिड—१९ चा प्रादुर्भाव होता त्या वेळेचे हाउस टॅक्स मधील व्याज माफ करणेबाबत पालिका सदस्य सूचक श्री. शंकर गोविंदराम लुंड, श्री किशोर नारायणदास वनवारी व अनुमोदक श्री. मनोज सयानी, श्री. दिपक सिरवानी यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

---

**महापालिका सचिव:-** वाचला. तुमही निर्णय घ्या.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-** अभय योजना लागली. सर्वांचे धन्यवाद, अभय योजना सुरु झाली. याची बोलती बंद करा रे. सारखी बडबड करतय.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** अभय योजना झाल्यामुळे अभय योजनेचे सर्व विषय संपुष्टांत येत आहेत, विषय क्रमांक १२, १३, १४, १५.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:-** सचिव मॅडम पुढचे विषय घ्या.

**महापालिका सचिव :-** सदर विषय संपुष्टात आणून पुढचा विषय घेण्याचा असा मला आदेश देण्यात आले आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-** बरोबर आहे, घ्या पुढचा विषय घ्या.

**सदस्य, श्री. अरुण आशान:-** पुढचा विषय घ्या.

**महापालिका सचिव:—** विषय क्र. १६ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. १६:— प्रस्तावाची सूचना**

उल्हासनगर महानगरपालिकेतील कर्मचारी/अधिकारी यांना आगाउ वेतनवाढी देणेबाबत विरोधी पक्षनेते श्री. किशोर वनवारी यांची सूचना विचारात घेणे.

---

**महापालिका सचिव:-** उल्हासनगर महानगरपालिकेने सर्व कर्मचा-यांना आगाउ वेतन वाढ देणेबाबत विरोधी पक्ष नेते, श्री. किशोर वनवारी सारखाच यांचा देखील विषय श्री. राजेश चौधरी यांनी मांडला आहे. १६ आणि १७ त्यामुळे दोन्ही विषय ठराव होईल सारखेच आहेत.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** प्रस्ताव कोणाचा आहे?

**महापालिका सचिव:-** श्री. चौधरी साहेब आणि श्री. वनवारी साहेबांचा आहे.

**सदस्य, श्री. अरुण आशान:-**चौधरी साहेब बोला.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-** एकत्र घ्या.

**सदस्य, श्री. अरुण आशान:-** दोन्ही विषय सेम आहेत तर एकत्र घ्या.

**महापालिका सचिव:-** श्री. किशोर वनवारी यांनी पाहावे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-** संबंधीत विभागानी अभय योजना झाली.

**महापालिका सचिव:-** अभय योजनेचे विषय झाले, संपुष्टात आले.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** या बाबत सन्माननिय सदस्यांचा प्रस्ताव विचारात घेतलेला आहे, उप आयुक्त सोंडे साहेबांनी उत्तर दयावे.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:-** इतिवृत्ताची वाट न पहाता, पास...

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-**दया, दया, उत्तर दया.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी**:- इतिवृत्ताची वाट न पहाता, पास..

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-**मा. महापौरजी, मा. उपमहापौरजी, मा. आयुक्त साहेब, एक मिनिट उत्तर देण्या आधी यामध्ये एक चुकीची प्रस्तावना लिहिले आहे. माझा आवाज येत आहे का. बघा, मराठी भाषेचा अभ्यास करणा-यांना प्रोत्साहन, त्याच्या खाली आले आहे. सिंधी भाषेचा अभ्यास करणा-यास प्रोत्साहन इथे एक चुकीचे वाक्य लिहिले आहे. त्यात दुरुस्ती करा. उल्हासनगर शहर हे निर्वासितांचे शहर आहे. सिंधी समाज हा पाकिस्तानमधुन ते चुकीचे आहे. सिंधी समाज हे सिंध मधून सिंध त्यावेळी अखंड भारताचा हिस्सा होता. पाकिस्तान शब्द खोडून टाका. हि चुक कोणी केली आहे त्याच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात यावी. तिथे सिंध लिहा.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव :-**उपआयुक्त् आपल्यासोबत बोलत आहेत.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :-**पहिले दुरुस्ती करा.

**सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी:-**झाली दुरुस्ती करा.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** जमनादासच्या म्हणण्यानुसार दुरुस्ती.

**सदस्य, श्री. मनोज सयानी**:-पाकिस्तान नाव टाकले आहे. ते शब्द खोडून टाका. तिथे सिंध लिहा.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:-** चुक दुरुस्त करा.

**सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी:-** नियमात बसत नाही का. सोंडे साहेब नियमात नाही बसत. प्रस्ताव मागे घेतो.

**उपआयुक्त, श्री. मदन सोंडे :-** आयुक्त् साहेब जो मा. सदस्यांनी त्याबाबत त्यानुसार नियमानुसार तपास करुन पुढच्या महासभेत उत्तर देण्यात येईल.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** १६ नंबरचा विषय पुढच्या सभेत प्रशासनाने आणावे.

**महापालिका सचिव:-**सोंडे साहेबांनी उत्तर दिले आहे म्हणून सदर विषय संपुष्टात आला आहे. पुढच्या महासभेत आणला जाईल, असे पिठासिन अधिकारी यांनी सांगितले आहे. आता मला पुढचा विषय घ्यायला सांगितला आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी :-**पुढच्या महासभेला कोण आणेल मॅडम, प्रस्ताव रदद मागे घेतो.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** सोंडे साहेबांनी सांगितले आहे, पर्सनली पुढच्या महासभेत आणतील.

**सदस्य, श्री. अरुण आशान:-** पुढचा विषय घ्या.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-** नंतरच्या महासभेत आणा.

**महापालिका सचिव:—** विषय क्र. १८ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १८ :—प्रस्तावाची सूचना**

महासभा ठराव क्र. 18 दिनांक 30/5/2020 रोजीच्या ठरावामध्ये माझ्या पॅनलमधील सुचवलेली कामे समाविष्ट न झाल्याने ते करुन सुधारित ठराव करणे बाबत पालिका सदस्य सुचक म्हणुन श्री. राजेद्र चौधरी व अनुमोदक श्रीम. पुष्पा बागुल यांची सूचना विचारात घेणे.

---

**सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी:-** हा प्रस्ताव मागे घेतला आहे.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** हा प्रस्ताव मागे घेतल्यामुळे संपुष्टांत आला आहे.

**महापालिका सविव:-** प्रस्ताव संपुष्टांत येत आहे.

**महापालिका सचिव :—** विषय क्र. १९ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १९:— प्रस्तावाची सूचना**

विकास कामे झाल्यावर त्याबाबतची संपुर्ण माहीती उल्हासनगर महानगरपालिकेच्या बोर्डावर प्रसिध्द करणे तसेचUmc Site www.umc.gov .in या साईटवर टाकणे बाबत. पालिका सदस्य सुचक म्हणुन श्री. शंकर लुंड, श्री. किशोर वनवारी, श्री. राजेश वदारिया व अनुमोदक श्री. राजू जग्यासी, श्री.मनोज लासी, श्री. दिपक सिरवानी यांची सूचना विचारात घेणे.

---

**महापालिका सचिव:-** कृपया सदस्यांनी बोलायचे आहे ज्यांचे प्रस्ताव आहे विकासकामाशी त्यांच्या सुचना होती या बाबत कोणाला बोलायचे असेल तर बोला, ठराव दया.

**सदस्य, श्री.मनोज सयानी:-** मा. महापौरजी, उपमहापौरजी, सचिव मॅडम, हा जो प्रस्ताव आणला आहे. तुम्ही म्हणता की एकच आहे.उल्हासनगर शहरात असे बघीतले जाते की, जिथे पण बांधकाम सुरु केले जाते त्याची एवढी माहिती नसते कि, तो खासदार निधी आहे की आमदार निधी आहे किंवा सर्वसामान्य निधी आहे की राखीव निधी आहे किंवा नगरसेवक निधी आहे.बरेच ठिकाणी यामुळे मतभेद झाले आहेत. सदस्यांची आपआपसांत भांडणे पण झाली आहेत.अधिका-यापर्यंत गोष्ट जाते पण अधिका-यांना पण माहिती नसते आणि महानगरपालिका अधिनियम नियमानुसार जे पण कार्य ठेकेदारामार्फत होते त्याठिकाणी एका फलकाद्वारे माहिती लावली जाते. ज्यात ठेकेदाराचे नाव, निधी कशासाठी आहे, निधी किती आहे आणि त्याचा कालावधी किती आहे?किती कालावधी, किती कालावधीत हे काम होणार आहे, ते पुर्ण होणार त्याची शेवटची तारीख काय आहे? अशी एक नियमात याची तरतुद आहे. उल्हासनगर महानगरपालिकेत आज पर्यंत असा कोणताही फलक कोणत्या कार्य असू दया मग ते छोटे कार्य असेल किंवा मोठे कार्य असेल खासदार निधी असू दे, आमदार निधी असू दे, नगरसेवक असू दे खासदार,आमदार ते आपल्या तर्फे खाजगी फलक लावतात. महापालिका पी. डब्ल्यु. विभाग द्वारा फलक लावला पाहिजे. किंवा ठेकेदारद्वारा फलक लावला पाहिजे. विकास कामाचे जस की फक्त् दाखविण्यासाठी नाही नगरसेवकांनास्थानिक लोकांना पण माहिती झाले पाहिजे की हे कुठूनकार्य होत आहे आणि त्या कार्याचा किती निधी आहे आणि त्या कार्याचा कालावधी किती आहे?त्यामुळे सर्वांसाठी माहीतीसाठी हा अशासकीय प्रस्ताव आणला आहे. तरी

कृपयासार्वजनिक बांधकामविभागाचे काय म्हणणे आहे नियमाविषयी आणि त्याची अजूनपर्यंत अंमलबजावणी का होत नाही? जर नाही होत तर त्याचे कारण काय आहे? आणि भविष्यात त्याची माहिती देण्यात यावी.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** मनोज लासी आपल्याला काय हवे आहे?

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-** त्यांना पण त्याची माहिती मिळाली पाहिजे. सुशिक्षित लोक नाही आहेत जे वेबसाईट वर जावून माहिती घेतील. कायदयामध्ये जी तरतुद आहे. तो फलक लावण्यास काय हरकत आहे. येण्या-जाणा-या लोकांना त्याची पारदर्शकता राहील. माहिती राहील. ठेकेदारावर पण जबाबदारी राहील. त्याला हरकत काय आहे.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** मनोज लासी यांचा जो प्रस्ताव आला आहे. तो सार्वजनिक बांधकामविभाग लवकरात लवकर याची पुर्तता करण्यात यावी.दुसरी गोष्ट अशी आहे की, टेंडर संदर्भात आपल्या वेबसाईट वर सर्व माहिती उपलब्ध आहे,यात काही कमी जास्त असेल तर मला वाटत सार्वजनिक विभागानेश्री. मनोज लासी आणि या सर्वांचा प्रस्ताव विचारात घेतला पाहीजे. काही ठिकाणीच तो वाद उदभवला आहे. बाकी ठिकाणी तर मला वाटतते की व्यवस्थती आहे.तुमच्याच ९ नंबर पॅनलमध्ये हा वाद उदभवला होता. मला वाटत सार्वजनिक विभागाने याबाबत लवकरात लवकर मनोज लासी आणि तेथील नगरसेवकांची बैठक घेउरुन निर्णय दयावे. सार्वजनिक विभागाने त्याबाबत लवकरात लवकर निर्णय घेण्यात यावा.

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-** होय सर.

**सदस्य, श्री.अरुण आशान:-** धन्यवाद साहेब. धन्यवाद, पुढचा विषय घ्या.

**काही सदस्य :—**पास—पास……

**महापौर तथा पीठासीन अधिकारी:—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑

**विषय क्र. १९:—प्रस्तावाची सूचना**

विकास कामे झाल्यावर त्याबाबतची संपुर्ण माहीती उल्हासनगर महानगरपालिकेच्या बोर्डावर प्रसिध्द करणे तसेचUmc Site www.umc.gov .in या साईटवर टाकणे बाबत. पालिका सदस्य सुचक म्हणुन श्री. शंकर लुंड, श्री. किशोर वनवारी, श्री. राजेश वदारिया व अनुमोदक श्री. राजू जग्यासी, श्री.मनोज लासी, श्री. दिपक सिरवानी यांची सूचना विचारात घेणे.

**प्रस्तावना**

येत्या महासभेमध्ये खालील नमुद केलेल्या विषयावर लक्ष वेधू इच्छितो की, सदरील विषयावर चर्चा करणेत येवुन प्रभावि तोडगा काढण्यात यावा. सदरचे विषय खालीलप्रमाणे.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागा अंतर्गत शासकिय निधी/आमदार निधी/खासदार निधी देण्यात येतो त्याची कामे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात येत नाहीत परंतु त्यांची देयके बनवुन ठेकेदारास अदा करण्यात येतात. अशा प्रकारच्या ब—याच तक्रारी नगरसेवक यांचे कडुन करण्यात आलेल्या आहेत त्याकरीता महाराष्ट्र महापालिका ॲक्ट मधील सेक्शन ६० अे नुसार विकास कामांचे बाबत करण्यात आलेले सर्व इस्टीमेट, वर्कऑर्डर, देयके तसेच ठेकेदारांचे नाव, करण्यात आलेली कामे व त्यासाठी महानगरपालिकेने त्यांना दिलेले देयकाची रक्कम व कोणत्या तारखेस कामे पुर्ण झाली त्यांची तारीख इत्यादीबाबतची संपुर्ण माहिती महापालिका बोर्डवर लावणेत यावी तसेच युएमसी साईड Umc Site www.umc.gov.inया साईटवर टाकणेत येणेसाठी महासभेत चर्चा होणे अत्यंत आवश्यक तथा गरजेचे आहे.

तरी याबाबत महासभेमध्ये चर्चा होवून ठोस तोडगा काढण्यात यावा ही विनंती.

**महासभा ठराव क्र:२०** **दिनांक:—१७/२/२०२१**

सुचकाचे नाव :— १) श्री. किशोर वनवारी

२) श्री. शंकर लुंड

३) श्री. राजेश वदारिया

अनुमोदकाचे नाव :— १) श्री.दिपक सिरवानी

२) श्री. राजू जग्यासी

३)श्री. मनोज सयानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे महाराष्ट्र महापालिका अॅक्ट मधील सेक्शन ६० अे नुसार विकास कामे झाल्यावर त्याबाबतचीसर्व एस्टीमेट, वर्कऑर्डर, देयके तसेच ठेकेदारांचे नाव, करण्यात आलेली कामे व त्यासाठी महानगरपालिकेने त्यांना दिलेले देयकाची रक्कम व कोणत्या तारखेस कामे पुर्ण झाली त्यांची तारीख इत्यादीबाबतची संपुर्ण माहीती महापालिका बोर्डवर टाकण्यास तसेच युएमसी साईड Umc Site www.umc.gov.in या साईटवर टाकणेकामी प्रशासनास निर्देश देत आहे.

सुचकाचीसही/—१)

२)

३)

अनुमोदकाचीसही/—१)

२)

३)

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. २० वाचुन दाखवितात

————————————————————————————————————————

➪ **विषय क्र. २०:—प्रस्तावाची सूचना**

उल्हासनगर महानगरपालिकेचे कर्मचारी जिल्हाधिकारी कार्यालयात तसेच अंबरनाथ्, उल्हासनगर तहसिल कार्यालयात कार्य करत असलेबाबत. पालिका सदस्य सुचक म्हणुन श्री. राजेश वदारिया व अनुमोदक श्री.जमनादास पुरस्वानी, श्री. राजु जग्यासी, श्री. मनोज लासी यांची सूचना विचारात घेणे.

————————————————————————————————————————

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-**बोला. सगळयांच्या वतीने एकजण बोला आणि ठराव सांगा.

**महापालिका सचिव:-** कृपयाआपण सांगावे काय ते? विषय परत एकदा वाचू का?

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-**मा. महापौरजी, हा जो विषय आहे, राजेश वदारिया यांनी प्रस्तुत केला आहे, त्यांनी प्रस्तावाची सुचना आणली आहे की, उल्हासनगर महानगरपालिकेचे जे कर्मचारी आहेत, जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये, अंबरनाथ, उल्हासनगर तहसिल कार्यालयामध्ये काही वर्षापासून कार्यरत आहेत आणि त्यांचे पगार उल्हासनगर महानगरपालिका देत आहे. ते काही वेळेसाठी, निवडणूकीच्या वेळी तिथे जातात आणि काही वर्षापासून तिथे कार्यरत आहेत. तर इथे हा प्रस्ताव आणला आहे की, अजून किती वर्षे हे कर्मचारी तिथे कार्यकरणार? त्यांचे पगार उल्हासनगर महानगरपालिका भरत आहे. परंतु ४-४ वर्षापासून,५-५ वर्षापासून एक वेळा हे जातात. जिल्हाधिकारी कार्यालयमध्ये हे जातात, तहसिलदार कार्यालयात जातात किंवा कुठे पण जातात आणि ते तिथलेच होऊन जातात. याच्यावर मा. आयुक्तांनी खुलासा करायला पाहीजे. उल्हासनगर महानगरपालिकेचे किती कर्मचारी आहेत? जे उल्हासनगर महानगरपालिकेच्या बाहेर काही वेळेसाठी गेले आहेत.

परंतु आज पर्यंत त्यांचेच काम करीत आहेत. जिल्हाधिकारी कार्यालय असेल किंवा तहसिलदार कार्यालय असेल, निवडणूक कार्यालय असेल किंवा अन्य कार्यालय असेल. याची माहीती महासभेला मिळाली पाहीजे.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** सामान्य प्रशासनाचे उप आयुक्त यांनी या संदर्भामध्ये माहीती देण्यात यावे. जमनुजी.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** यस.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-**मी सांगतो की,ही महासभा प्रस्ताव देत आहे,ही महासभा प्रस्तावनेनुसार नमुद केल्या प्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेचे कर्मचारी जिल्हाधिकारी तसेच अंबरनाथ, तहसिलदार कार्यालयामध्ये कार्यरतअसल्यामुळे ते अन्य कार्यालयामध्ये असल्यामुळे महापालिकेला त्यांच्या पगाराचा आर्थिक बोजा उचलायला लागत असल्यामुळे सार्वजनिक आरोग्य विभाग, लेखा विभाग यांनी आपले ताळमेळ तपासून पहाण्यास प्रशासनास निर्देश देत आहे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-**ओके,ओके, धन्यवाद, धन्यवाद. भगवान भालेरावजी, खुप खुप धन्यवाद.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-**धन्यवाद सगळयाचे, सगळया नगरसेवकांचे धन्यवाद.

**काही सदस्य :—**पास—पास......

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. २०:—प्रस्तावाची सूचना**

उल्हासनगर महानगरपालिकेचे कर्मचारी जिल्हाधिकारी कार्यालयात तसेच अंबरनाथ्, उल्हासनगर तहसिल कार्यालयात कार्य करत असलेबाबत. पालिका सदस्य सुचक म्हणुन श्री. राजेश वदारिया व अनुमोदक श्री.जमनादास पुरस्वानी, श्री. राजु जग्यासी, श्री. मनोज लासी यांची सूचना विचारात घेणे.

**प्रस्तावना**

येत्या महासभेमध्ये खालील नमुद विषयांवर लक्ष वेधू इच्छितो की, सदरील विषयांवर चर्चा करण्यात येवुन प्रभावीत तोडगा काढण्यात यावा सदरचे विषय खालीलप्रमाणे.

उल्हासनगर महानगरपालिके अंतर्गत कार्यात रुजु झालेल्या कर्मचा—यांना आदेशाशिवाय महापालिका व्यतिरिक्त इतर ठिकाणी काम करता येत नाही असे असतांना देखिल उल्हासनगर महानगरपालिकेचे अनेक कर्मचारी अंबरनाथ तहसिलदार कार्यालय, उल्हासनगर तहसिलदार कार्यालय तसेच जिल्हाधिकारी कार्यालय इत्यादी ठिकाणी गेल्या अनेक वर्षापासून कोणत्याही प्रकारची लेखी मागणी नसतांना देखील कार्य करत आहेत. परंतु सदरील त्याच्या कामाच्या पगाराचा आर्थिक बोझा मात्र उल्हासनगर महानगरपालिकेला उचलावा लागत आहे.

तसेच उमपाचे अनेक सफाई कर्मचारी नियमित गैरहजर असून सुध्दा त्यांना पुर्ण पगार दिला जातो, त्यामुळे बरेचसे कर्मचारी जाणुनबूजुन मोठया कालावधीपर्यंत कामावर येत नाही परंतु पगार पुर्ण मिळतो याबाबत सार्वजनिक आरोग्य विभाग व लेखा विभाग यांचा आपसातील ताळमेळ दिसून येत नाही. म्हणुन येत्या दिनांक १७/१२/२०२० रोजीच्या महासभेमध्ये अशासकिय ठराव मांडत आहे.

तरी महासभेमध्ये चर्चा होवून ठोस तोडगा काढण्यात यावा ही विनंती.

**महासभा ठराव क्र: २१**

**दिनांक:—१७/२/२०२१**

सुचकाचे नाव:— १) श्री. राजेश वदारिया

अनुमोदकाचे नाव :— १) श्री. जमनादास पुरस्वानी

२) श्री. राजू जग्यासी

३) श्री. मनोज सयानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेचे कर्मचारी जिल्हाधिकारी कार्यालयात तसेच अंबरनाथ, उल्हासनगर तहसिल कार्यालयात कार्य करत असल्यामुळे महापालिकेस त्यांच्या पगाराचा आर्थिक बोझा उचलावा लागत असल्याने सार्वजनिक आरोग्य विभाग व लेखा विभाग यांनी आपसातील ताळमेळ तपासुन योग्य ती कार्यवाही करणेस प्रशासनास निर्देश देत आहे.

सुचकाची सही/—१)

अनुमोदकाची सही/—१)

२)

३)

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव:—** कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सायंकाळी ४.४२ वाजता महापौर श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:- १७-०९-२०२१

**उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. १७-०९-२०२१ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.**

०२

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शुक्रवार दिनांक १७/०९/२०२१ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली.सदर सभेत महापौर, श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या व खालील दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते/होत्या.मा. अवर सचिव, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग यांचेकडील शासनाचे क्रमांक कोरोना- २०२०/प्र.क्र. ७६ / नवि-१४, दिनांक २८ जुन २०२१ पत्रान्वये ऑनलाईन ॲपद्वारे सभा आयोजित केली होती.

१.श्रीमती. लिलाबाई लक्ष्मण आशान – महापौर

२. श्री. भगवान भालेराव- उप महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती अचर्ना गोकुळ करणकाळे | ३६ | श्री. जीवन चंद्रभान इदनानी |
| ४ | श्री. मंगल बालकृष्ण वाघे | ३७ | श्रीमती सविता प्रविण तोरणे (रगडे) |
| ५ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ३८ | श्री. गजानन प्रल्हाद शेळके |
| ६ | श्रीमती मिनाकौर अजितसिंग लबाना | ३९ | श्रीमती ज्योती प्रकाश बठिजा |
| ७ | श्रीमती पंचम उमेश कालानी | ४० | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी |
| ८ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | ४१ | श्री. सुमित सागर सोनकांबळे |
| ९ | श्रीमती आशा नाना बिराडे | ४२ | श्रीमती ज्योस्ना सुरेश जाधव |
| १० | श्री. रविंद्र दशरथ बागुल | ४३ | श्रीमती ज्योती शामराव माने |
| ११ | श्रीमती चरणजितकौर राजेंद्रसिंह भुल्लर | ४४ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| १२ | श्री. राजेंद्रसिंह विरसिंग भुल्लर | ४५ | श्री. चंद्रशेखर केशव यादव |
| १३ | श्री. स्वप्नील मिलींद बागुल | ४६ | श्रीमती संगिता नितीन सपकाळे |
| १४ | श्रीमती सुरेखा हनुमंत आव्हाड | ४७ | श्रीमती शीतल चंद्रकांत कदम |
| १५ | श्रीमती अंजना अंकुश म्हस्के | ४८ | श्रीमती वसुधा धनंजय बोडारे |
| १६ | श्री. कलवंतसिंग गुरुदेव सोहता | ४९ | श्री. धनंजय बाबुराव बोडारे |
| १७ | श्री. राजू किशनचंद जग्यासी | ५० | श्रीमती दिप्ती नविन दुधानी |
| १८ | श्रीमती गीता लालचंद साधनानी | ५१ | श्रीमती ज्योती रमेश चैनानी |
| १९ | डॉ. प्रकाश घनश्यामदास नाथानी | ५२ | श्रीमती कंचन अमर लुंड |
| २० | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | ५३ | श्री. शंकर गोविंदराम लुंड |

| | | | |
|---|---|---|---|
| २१ | श्रीमती सरोजिनी टेकचंदानी | ५४ | श्रीमती सुनिता बाबुराव बगाडे |
| २२ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | ५५ | श्री. भारत रामचंद राजवानी (गंगोत्री) |
| २३ | श्री. महेश पहिलराज सुखरामनी | ५६ | श्रीमती अंजली चंद्रकांत साळवे |
| २४ | श्रीमती शुभांगीनी निकम | ५७ | श्री. प्रमोद नामदेव टाले |
| २५ | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग | ५८ | श्रीमती कविता सुधिर बागुल |
| २६ | श्री. राजेश नानिकराम वदारिया | ५९ | श्री. राजेंश देवेंद्र वानखेडे |
| २७ | श्रीमती डिम्पल नरेंद्र ठाकुर (कुमारी) | ६० | श्री. किशोर नारायणदास वनवारी |
| २८ | श्रीमती दिपा नारायण पंजाबी | ६१ | श्रीमती मिना चंद्रगुप्त सोनेजी |
| २९ | श्री. अजित प्रभुनाथ गुप्ता | ६२ | श्री. विकास परशुराम पाटील |
| ३० | श्रीमती पुष्पा नाना बागुल | ६३ | श्री. मनोज दिलीप सयानी |
| ३१ | श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी | ६४ | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |
| ३२ | श्रीमती शुभांगी मनोहर बेहनवाल | ६५ | श्री. सुरेंद्र बाळकृष्ण सावंत |
| ३३ | श्री. राजेंद्र शांताराम चौधरी | ६६ | श्री. अरुण लक्ष्मण आशान |
| ३४ | श्री. रवि किशनचंद जग्यासी | ६७ | श्रीमती आशा जीवन इदनानी |
| ३५ | श्रीमती कविता लाल पंजाबी | | |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते / होत्या.

**१** .श्रीमती जयश्री ज्ञानेश्वर पाटील, २.श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड, ३.श्रीमती मिना कुमार आयलानी, ४.श्रीमती अपेक्षा भगवान भालेराव, ५.श्रीमती छाया सुजित चक्रवर्ती उर्फ अडसुळ, ६.श्रीमती ज्योती प्रशांत पाटील, ७.श्रीमती इंदिरा जमनादास उदासी, ८.श्रीमती मिताली राजेश चान्पुर, ९.श्रीमती सुमन राजेश सचदेव, १०.श्री.सतरामदास पुतनदास जेसवानी, ११.श्रीमती मिनाक्षी रवी पाटील, १२.श्री.विजय चाहू पाटील, १३.श्रीमती कविता सुरेश गायकवाड, १४.श्री.आकाश परशुराम पाटील.

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

१. डॉ. राजा दयानिधी, आयुक्त

२. श्रीमती करुणा जुईकर, अतिरिक्त आयुक्त

३. श्रीम. प्राजक्ता कुलकणी, महापालिका सचिव

४. श्री. मदन सोंडे, उप आयुक्त (अं.बा.नि.वि.)

५.श्री. अशोक नाईकवाडे, उप आयुक्त (मुख्यालय)

६. श्रीम. प्रियांका राजपूत, उप आयुक्त (कर विभाग)

७. डॉ. शुभाष जाधव, उप आयुक्त, (सा.आ.वि.)

८. श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखाधिकारी

९. श्री. मंगेश गावडे, मुख्य लेखा परिक्षक

१०. डॉ. दिपक पगारे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी

११. श्री. महेश सितलानी, शहर अभियंता

१२. श्री. के.जे.रहेजा, कार्यकारी अभियंता (पा.पु.वि.)

१३. श्री. तुषार सोनवणे, सहा. आयुक्त्

१४. श्री. अजित गवारी, सहा. आयुक्त

१५. श्री. हनुमंत खरात, उप अभियंता (विद्युत विभाग)

१६. श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी

१७. श्री. मनिष हिवरे, सार्वजनिक आरोग्य अधिकारी

१८. श्रीम. श्रध्दा सपकाळे, सिस्टम ॲनेलेसिस मॅनेजर

१९. श्री. संतोष लोणे, कनिष्ठ अभियंता

२०. श्री. जेठा ताराचंद, उप कर निर्धारक व संकलक

२१. श्री.विनोद केणे, बाजार निरीक्षक

२२. श्री. राजेश घनघाव, मालमत्ता व्यवस्थापक

२३. श्री. एकनाथ पवार, मुख्य स्वच्छता निरीक्षक

२४. श्री. अनिल खतुरानी, कर निरीक्षक

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्रीम. नर्गीस खान, लिपीक
२. श्री. बाळू भांगरे, लिपीक
३. श्रीम. विद्या आढळ, लिपीक

सायंकाळी ५.०४ वाजता वंदे मातरम म्हणून सभेची सुरुवात करण्यात आली.

**महापालिका सचिव :—**दुसरी सभा सुरु होत आहे, विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. १ :— प्रश्नोत्तरे**

**अ.क्र. ४३ पासून पुढचे प्रश्न घेण्यात येतील. (प्रलंबित प्रश्न क्र. ३४, ३८, ३९, ४०, ४२ प्रथम घेण्यातये ईल.)**

---

**सदस्य, श्री. अरुण आशान:-** मा. महापौर मॅडम प्रश्नोत्राचा तास वगळण्यात यावा.तदपुर्वी मी एक श्रध्दांजलीचा प्रस्ताव पारीत करीत आहे, श्रीम. ज्योती दिलीप गायकवाड, नगरसेविका, यांचे वडील वय वर्षे ९२ ते हरीभक्त, पारायणाचे एक पारीत होते.ह.भ.प. सखाराम लक्ष्मण वाघ, ते वारीकरी सांप्रदायाचे होते. त्यांचे

निधन ०८/०९/२०२१ रोजी झाले आहे तर त्यांना आपल्या महासभेतर्फे श्रध्दांजली अर्पित करण्यात यावी. श्रीम. ज्योती गायकवाड, नगरसेविका यांचे वडील, वय वर्षे ९२ हे हरिभक्त पारायण वारकरी सांप्रदायाचे होते,

**महापालिका सचिव:-** एक मिनीट मी प्रश्नोत्तरे वाचली आहेत, पहीले श्रध्दांजली दयायची आहे की, प्रश्नोत्तरा बाबत निर्णय घ्यायचा आहे.ते ठरवा.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** मा. महापौरजी, माझी लक्षवेधी आहे, त्याचे उत्तर दिले नाही.

**महापालिका सचिव:-**साहेब,पहीले प्रश्नोत्तराचा निर्णय होऊ दया, नंतर तुमच्या लक्षवेधीचा निर्णय होईल.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-** सचिव मॅडम आपण प्रश्नोत्तरे कॅन्सल करीत आहेत, प्रश्नोत्तराचा तास वगळण्यात यावा आणि मग नंतर श्रदांजली घेण्यात यावी.

**महापालिका सचिव:-**ठिक आहे, सर्वांना मान्य आहे ना, प्रश्नोत्तर वगळण्यात येत आहे.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:-** मान्य आहे.

---

**विषय :—**प्रश्नोत्तराचा तास वगळण्याबाबत

सूचकाचे नांव :— श्री. कलवंतसिंह सोहता

अनुमोदकाचे नांव :— श्री. जमनादास पुरस्वानी

**महासभा ठराव क्र.१२ अ** **दिनांक:— १७/०९/२०२१**

ही महासभा आज दिनांक १७/०९/२०२१ रोजीच्या महासभेतील प्रश्नोत्तराचा काळ वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर/पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव:-**ठिक आहे, आता एक शोक प्रस्ताव आला आहे, माझ्याकडे एक शोक प्रस्ताव आणि एक लक्षवेधी आली आहे, श्री. राजेश वदारिया यांची, सावंत साहेबांनी शोक प्रस्ताव वाचावा आणि दोन मिनीटे सर्वांनी श्रध्दांजलीसाठी उभे रहावे.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-** मा. महापौरजी, मागच्या महीन्यामध्ये महानगरपालिकेचे माजी नगरसेवक श्री.जसवंतसिंग आईलसिंघानी यांचे पण निधन झाले आहे.त्यांना पण श्रध्दांजली देण्यात यावी.

**सदस्य, श्री. अरुण आशान:-** सावंत साहेब, सावंत साहेब आहेत का? सचिव मॅडम मी श्रध्दांजलीचा प्रस्ताव वाचू शकतो का?

**महापालिका सचिव:-** वाचा सर, चालेल.

**<u>सदस्य, श्री. अरुण आशान:-</u>**मा. सुरेंद्र सावंत यांनी आपल्या महासभे समोर एक शोक प्रस्ताव दिलेला आहे, उल्हासनगर महानगरपालिकेतील माजी नगरसेविका श्रीम. माया दिपचंदानी यांचे दिनांक १४ /८/२०२१ रोजी वृध्दपकाळाने निधन झालेले आहे. माया दिपचंदानी या १९८६ ते १९९२ पर्यंत या कालावधी महानगरपालिकेच्या नगरसेविका होत्या आणि त्या एक शिक्षीका होत्या.त्यांनी लहान मुलांसाठी बालवाडी पण त्या चालवत होत्या.नगरसेवक असतांना त्या उप नगरअध्यक्ष पदही त्यांनी भुषविले होते. त्यांच्या चांगल्या मार्गदर्शनाला हे उल्हासनगर शहर मुकलेले आहे.तरी त्यांना आपल्या महानगरपालिकेतर्फे भावपुर्ण श्रध्दांजली देण्यात यावी.तसेच श्रीम. ज्योती दिलीप गायकवाड यांचे वडील, हरीभक्त. पारायण सखाराम लक्ष्मण वाघ ते वारकरी सांप्रदायाचे होते, त्यांचे ९२ व्या वर्षी निधन झाले आहे.त्यांना सुध्दा आपण श्रध्दांजली अर्पीत करावी.तसेच आता मनोज सयानी यांनी श्रध्दांजलीसाठी नाव प्रस्तावीत केले, त्यांना पण आपल्या महानगरपालिकेच्या वतीने श्रध्दांजली अर्पीत करण्यात येईल.सर्वांनी दोन मिनीट उभे राहून श्रध्दांजली देण्यात यावी.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>** मा. महापौरजी यांच्या पहीले माजी नगरध्यक्ष श्री.पहीलाज जागवानी ते डायरेक्ट निवडणूक लढून नगराध्यक्ष झाले होते, त्यांचे पण निधन झाले आहे, त्यांना पण श्रध्दांजली अर्पीत करण्यात यावी.

---

**सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी, श्री. अरुण आशान**

**अनुमोदकाचे नाव :—** श्री. मनोज सयानी

**<u>शोक प्रस्ताव</u>**

श्रीम. ज्योती दिलीप गायकवाड, नगरसेविका, यांचे वडील वय वर्षे ९२ तेह.भ.प. सखाराम लक्ष्मण वाघ, ते वारीकरी सांप्रदायाचे होते.त्यांचे दिनांक ०८/०९/२०२१ रोजी निधन झाले आहे, महानगरपालिकेचे माजी नगरसेवक, श्री. जसवंतसिंग आईलसिंघानी यांचे पण निधन झाले आहे,महानगरपालिकेतील माजी नगरसेविका श्रीम. माया दिपचंदानी यांचे सुध्दा दिनांक १४ /८/२०२१ रोजी वृध्दपकाळाने निधन झालेले आहे तसेच माजी नगरध्यक्ष श्री. पहीलाज जागवानी यांचे पण निधन झाले आहे.

वर उल्लेखलेल्या कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असुन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

**<u>महासभा ठराव क्र. १२ ब</u>** **<u>दिनांकः—१७/९/२०२१</u>**

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. सखाराम लक्ष्मण वाघ, श्री.जसवंतसिंग आईलसिंघानी, श्रीम. माया दिपचंदानी, श्री. पहीलाज जागवानी यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

**<u>सर्वानुमते</u>**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**<u>महापालिका सचिव:—</u>**लक्षवेधी सुचना क्र. १ जीचे सुचक आहेत, श्री. राजेश वदारिया व अनुमोदक आहे, श्री. शंकर लुंड.

लक्षवेधी सुचना याप्रकारची आहे.....................

**<u>विषय–:</u>** घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी उसाटने येथे महाराष्ट्र शासनाकडून देण्यात आलेल्या जमिनीवर अदयाप पर्यंत भिंत बांधण्यास सुरूवात न झाल्याने त्यावर चर्चा करणेबाबत, सदरचीलक्षवेधी मा.महापौरांनी अमान्य केली आहे.

**<u>सदस्य, श्री. अरुण आशान:-</u>**मला वाटते...

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-</u>**नाही, नाही, विषय गंभीर आहे, मा. महापौरजी, शासनाने जागा देवून बराच काळ झाला आहे. शासनाने जागा दिल्या नंतर तिथे काम चालू होणे अपेक्षीत होते. म्हणून या लक्षवेधीवर चर्चा केली पाहीजे. सर्वच सदस्यांची भावना आहे. सदस्यांच्या भावनांचा आदर करुन ही लक्षवेधी आपण स्विकारावी अशी मी विनंती करतो.

**<u>सदस्य, श्री. अरुण आशान:-</u>** मा. महापौरजी, मा.आयुक्त साहेब, खरे म्हणजे लक्षवेधी आणली श्री.राजेश वदारिया यांचे अभिनंदन करतो. आताच मा.चौधरी साहेबांनी सांगितले की, त्या पध्दतीने याच्यावर चर्चा होणे आवश्यक आहे. परंतु या बाबतीमध्ये उसाटणे येथील गावकरी मंडळी मागच्या आठवडयामध्ये आयुक्त साहेबांना भेटायला आले होते आणि त्यांनी त्या परिस्थिती बदल मा.आयुक्त साहेबांशी चर्चा केलेली आहे.सदया आयुक्त साहेबांनी उसाटणे येथे येत्या आठवडयामध्ये पाहणी दौरा ठेवलेला आहे.तर मला असे वाटते की, आयुक्त साहेबांचा पाहणी दौरा झाल्या नंतर या प्रस्तावर चर्चा करुन का आता पर्यंत काम चालू झाले नाही.त्याचा ऊहापोह करणे योग्य नाही.तरी मला असे वाटते की, चौधरी साहेबांना विनंती करतो की, आयुक्त साहेबांनी प्रत्येक्ष जागेवर जाऊन तळ पाहणी करुन याला का विलंब होत आहे, याची खात्री करावी.त्या नंतर संपुर्ण महासभेला त्यांनी येऊन सांगावे की, आता काम चालू होणार आहे की नाही. परंतु आता गावकरी मंडळी येऊन गेल्या नंतर त्यांच्याकडून झालेली युती आणि त्यांच्याकडे जाऊन झालेली युती यामध्ये मधल्या कालावधीमध्ये विलंब झाला आणि आता काही कंपनीचे लोक होती, त्या लोकांनी पण टाळाटाळ केली. तर मला वाटते १९ तारखेला बापाचे विसर्जन होणार आहे.त्या नंतर आयुक्त साहेबांनी या गावकरी मंडळाला भेटून तिकडच्या जागेची स्थळ पाहणी करावी आणि त्या नंतर हा विषय मार्गी लावावा.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-</u>** महापौर मॅडम आता अरुण साहेबांनी आम्हांला सुचना दिलेली आहे.माझी अशी इच्छा आहे की, ही लक्षवेधी घ्यायला पाहीजे.शेवटी हा शहराचा प्रश्न आहे आणि एकच लक्षवेधी आलेली आहे.जर दोन पेक्षा जास्त लक्षवेधी येतात तेव्हा मा.महापौरांना मान्य किंवा अमान्य करण्याचा अधिकार आहे.फक्त एकच लक्षवेधी असून ती अमान्य करणे योग्य नसावे.तरी माझी महापौरांना हात जोडून विनंती आहे की, या उसाटणेचा विषय जे काही प्रशासनाने केलेला आहे.कारण दोन महीन्या नंतर ही महासभा लावलेली आहे.तर आम्हांलाही कळायला पाहीजे की, त्याची काय प्रगती झालेली आहे?आणि आपण कुठल्या प्रगतीपथावर आहोत. याची आम्हांला जरा माहीती भेटली तर आम्हांला पण समजेल की, प्रशासन कुठल्या प्रगतीपथावर आहे. फक्त महापौर यांच्या दालनातच माहीती आहे आणि बाकीच्या सदस्यांना कशी माहीती मिळेल. तरी माझी हात जोडून विनंती आहे की, ही लक्षवेधी स्विकार करुन यावर चर्चा करण्यात यावी, अशी विनंती आहे.

**<u>सदस्य, श्री.अरुण आशान:-</u>** मा. महापौरजी, मा.आयुक्त साहेब माझे मित्र श्री. प्रदिप रामचंदानी यांनी सांगितले की, घनकचरा-या बाबत आणि या बाबत शिवसेनेने वेळोवेळी आंदोलन केलेले आहे आणि आम्ही या प्रश्नाचा मार्गी लावण्यास सातत्याने प्रयन्त करीत आहेत. महाराष्ट्र शासनाकडे ही जमीन मिळण्या करीता खुप प्रयत्न या महापालिकेच्या वतीने आणि मा. आमचे खासदार , श्रीकांत साहेब, याच्या वतीने आम्ही घनकचरा आणि ही जागा मिळवण्यासाठी भरपूर प्रयत्न केले आहे. परंतु गावाचा विषय असल्यामुळे गावाच्या लोकांनी त्या वेळेस येऊन आयुक्त साहेबांच्या दालनामध्ये चर्चा केली होती...

**<u>उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-</u>** सन्माननिय अरुण आशान ही लक्षवेधी नाकारायची असेल तर आपल्याला कारणे देणे बंधनकारक आहे.

**<u>सदस्य, श्री.अरुण आशान:-</u>**हेच कारण आहे ना.आयुक्त साहेबांनी स्थळ पाहणी केली होती.

**<u>उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-</u>**त्याची कारणे सांगा की, यामुळे नाकारण्यात येत आहे.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:-</u>** मा. महापौरजी, या विषयावर भारतीय जनता पार्टीने पण सर्वात पहीले आंदोलन केले होते. परंतु आज उसाटणेवर मी लक्षवेधी टाकली आहे आणि एकच लक्षवेधी आहे, महासभेच्या समोर, तर माझी महापौरांना विनंती आहे की, त्यांनी लक्षवेधी मंजुर करावी आणि मला बोलण्याची परवानगी देण्यात यावी.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-</u>** एकच लक्षवेधी असल्यामुळे स्विकार करायला पाहीजे आणि कशासाठी स्विकार करतात अजुनही कळत नाही.

**<u>सदस्य, श्री.अरुण आशान:-</u>**मा. महापौर,मा.उप महापौर, मा.आयुक्त साहेब, लक्षवेधी जरी एकच असली तरी त्या लक्षवेधीवर अंतिम चर्चा होऊन निर्णय होणे अपेक्षीत असते.त्याकरीता लक्षवेधण्यासाठी सदस्य सभागृहामध्ये बोलतात. परंतु सभागृहाच्या बाहेर झालेले हे बांधकाम या कामाबाबतची माहीती काही सदस्यांना आहे.असे मला वाटते आणि त्या सदस्यांना मा.आयुक्ता बरोबर चर्चा झाल्याची त्यांना माहीती आहे आणि असे असतांना जर त्या जागेची पाहणी करुन त्या कामास विलंब का लागत आहे?हे सध्या आयुक्त साहेब आता सांगू शकत नसतील, जर का पाहणी झाली नसेल तर मला वाटते या लक्षवेधीवर चर्चा एकतर्फी होईल.म्हणून माझी सभागृहाला विनंती आहे की, मा.आयुक्तांनी या जागेवर जावून पाहणी करुन, त्या ठिकाणची वस्तुस्थिती लक्षात घेऊन का विलंब होत आहे, ही संपुर्ण प्रक्रिया महासभेपुढे सादर करावी.असे माझे मत आहे, उप महापौर साहेब.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-</u>** मा. महापौर, मा.उप महापौर साहेब, या विषयावर वेळोवेळी सत्ता पक्षानीही आंदोलन केलेले आहे.मला असे वाटते की, तुम्ही कुठल्या कारणाने अस्विकार करतात?डंपिंग ग्राउंड उसाटणे येथे झाले पाहीजे.भारतीय जनता पार्टीनेही हे आंदोलन कलेले आहे. अशा विषयावर गांर्भीयाने लक्षवेधी येते आणि तीचा आपण थेट अस्विकार करतात. पण याच्यावर चर्चा होऊ दया...

**<u>सदस्य, श्री. अरुण आशान:-</u>** प्रदिप रामचंदानी, मला वाटते त्यांना माझा बोलण्याचा अर्थ समजला नाही.आम्हांलामहासभे समोर आलेली ही लक्षवेधी घेण्यामध्ये कुठलीच अडचण नाही.ऐका ज्या वेळेस गावातील लोकांशी, गावातल्या संधटनाशी चर्चा आयुक्त साहेबां बरोबर झाल्या नंतर तर आयुक्त साहेब स्थळ पाहणी करण्यासाठी तिथे जाणार होते.ही गोष्ट बरोबर आहे, म्हणून ही प्रक्रिया तरी त्याच्यावर चर्चा करायची असेल तर मी महापौरांना विनंती करतो की, मा.महापौरांनी लक्षवेधीवर चर्चा करण्यास परवानगी दयावी.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-</u>** धन्यवाद, धन्यवाद.

**<u>महापालिका सचिव:-</u>** मा. महापौरांनी लक्षवेधी मान्य केली आहे, ठिक आहे, लक्षवेधी सुरु करा.

---

## <u>लक्षवेधी सूचना क्रमांक १</u>

विषय:—मी या लक्षवेधी सूचनेद्वारे असे सुचवू इच्छितो की, उल्हासनगर महानगरपालिकेच्या डंम्पिंग ग्राउंड संदर्भात अनेक अडचणी लक्षात घेता महानगरपालिकेचा हा प्रश्न सोडविण्याकामी महाराष्ट्र शासनाकडून सन २०१९ मध्ये उसाटने या ठिकाणी ३० एकर जागा उपलब्ध करुन दिली आहे.

भविष्यात घनकचरा व डंम्पिंग ग्राउंडची समस्या लक्षात घेता, उसाटने येथिल घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाच्या जागेवर सभोवतालच्या भिंतीचे व इतर कामकाजाला सुरुवात होणे अपेक्षित होते. परंतु सदर ठिकाणची परिस्थिती पाहता अदयाप पर्यंत त्या ठिकाणी भिंतीच्या बांधकामास सुरुवात झालेली नाही.अश्या प्रकारच्या दिनंगाईमुळे सदर प्रकल्प मागे पडत चालला आहे.

म्हणून सदर प्रकल्प वेळीच मार्गी लागण्याकामी त्वरीत उपाय योजना करण्याच्या दृष्टीने सर्वांचे लक्ष वेधतआहे.

---

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:-</u>** सन २ ऑक्टोंबर, २०१८ ला जेव्हा एक गाडी पडली आणि तिथे अफवा पसरवली की, तिच्या खाली चार मुले दाबली गेली आहेत. तेव्हा तात्कालीन आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकरजीने

आदेश दिले की, ५ नंबरमध्ये खडी मशिनच्या इथे आपण डंपिंग ग्राउंड चालू करा.तेव्हा सार्वजनिक आरोग्य विभागाने तिथे कचरा टाकणे सुरु केले.त्यामुळे तिथे अजून समस्या वाढली पहीले आम्हांला सांगितले गेले की, अंबरनाथ, उल्हासनगर, बदलापूरचा एक संयुक्त प्रकल्प येत आहे.त्यासाठी नेदरलेंड कंपनीचे लोक आले, त्यांनी कच-याचे शॅम्पल घेतले आणि नंतर त्या प्रकल्पाचे काय झाले माहीत झाले नाही?नंतर माहीत पडले की, बदलापूर व अंबरनाथचे एकत्र काम दिले जात आहे.खुप प्रयत्न केल्या नंतर सन २०१९ मध्ये माझा आवाज येत आहे का?

**<u>उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-</u>** आवाज येत आहे, राजेशभाई.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:-</u>** तर सन २०१९ मध्ये उसाटणे येथील ३० एकरचा प्लॉट उल्हासनगर महानगरपालिकेला घनकचरा व्यवस्थापनासाठी देण्यात आले.सन २०१९ पासून ते आज सन २०२१ सप्टेंबर चालू आहे.आज पर्यंत त्या जमिनीवर कंपाउंड वॉल बनले नाही.उल्हासनगर महानगरपालिकेने कंम्पाउंड वॉलचे टेंडर काढून त्याची वर्क ऑर्डर पण दिली आहे.परंतु आज पर्यंत काम चालू झाले नाही. आम्ही ऐकले होते की, काही कालावधीमध्ये उल्हासनगर महापालिकेने आमच्या शहराचे तीन आमदारां बरोबर ग्रामीण लोकांबरोबर, पाच पदाधिका-यां बरोबर एक मिटीग झाली होती, त्या मिटींगमध्ये काय निर्णय झाला?तरी कृपया आम्हांला आयुक्त साहेबांनी सांगावे.

**<u>सदस्य, श्री. मनोज सयानी:-</u>** मा. आयुक्तजी, महापौरजी हा गंभीर विषय आहे, फक्त कॅम्प नंबर ५ चा नाही तर संपुर्ण उल्हासनगरचा विषय बनला आहे.या गंभीर विषयला आजच सत्तेमध्ये बसलेल्या पाटर्या असतील किंवा विरोधी पक्षामध्ये बसलेल्या पार्टी असतील, सर्वांनी आदोलन करुन हा विषय उचलला आहे. तर मला दु:खाने सांगावे लागत आहे की, श्री. प्रदिप रामचंदानी यांनी सांगितले की, हत्तीचे दात खाण्याचे वेगळे आणि दाखवायचे वेगळे तर हे बरोबर आहे की, उल्हासनगरच्या डंपिंग ग्राउंडच्या या विषयावर बसत आहे.भारतीय जनता पार्टीचे कल्याण पुर्वचे आमदार, श्री.गणपत गायकवाडजी, या मुदयावर जो आपला ५ नंबरचा डंपिंग ग्राउंड आहे.जो खडी मशिनमध्ये अनाधिकृतपणे चालवला जात आहे. उल्हासनगर-५ आणि अर्धा ४ नंबरचे अडीच लाख लोक त्यामुळे त्रस्त आहेत आणि संताची नगरी, संताची भुमी, यामुळे आज दुषीत होत आहे.त्यामुळे लोक त्रस्त आहेत. तर या विषयावर राजकारण आणून, हा मुददा भडकवण्यात येत आहे.फक्त राजकारण करण्यासाठी विरोध केले जात आहे. तिथल्या गाववाल्यांना त्रास देणे, शहराच्या जनतेला त्रास देणे

**<u>सदस्य, श्री. शंकर लुंड:-</u>** मी तुमच्या या गोष्टीचे खंडन करतो.

**<u>सदस्य, श्री. मनोज सयानी:-</u>**आपण माझ्या जवळ बोला...

**<u>सदस्य, श्री. शंकर लुंड:-</u>**तुम्ही चुकीचे बोलत आहेत.

या वेळी काही सदस्य एकत्रित बोलत असल्यामुळे कोण काय बोलत होते, ते समजून आले नाही.

**<u>महापालिका सचिव:-</u>** कृपया सदस्यांनी साउंडचा आवाज डबल येत असल्यामुळे एकेएकानी बोलावे.

**<u>सदस्य, श्री. मनोज सयानी:-</u>**या सदनच्या माध्यमातून श्री. गणपत गायकवाड यांना, कल्याण पुर्वचे आमदार यांना हात जोडून निवेदन करतो की, हा शहराचा खुप मोठा गंभीर मुददा आहे.यामधून अडीच लाख लोक शिप्टेड आहेत. संपुर्ण पाच नंबर, जरी त्यांचा मतदारक्षेत्र येत नसेल, माणूसकीच्या नात्याने डंपिंग ग्राउंडच्या या मुदयावर राजकारण करायला नाही पाहीजे. आमच्या भारतीय जनता पार्टीने खुप गंभीरतेने मुददा उचलला आहे. दादा सतरामदास यांनी यांनी पण गंभीरतेने मुददा उचलला आहे. या मुदयाला भडकवले जात आहे, विरोध करीत आहेत, दबाव टाकला जात आहे. उल्हासलनगरच्या कॅम्प ५ च्या लोकांना...

**<u>सदस्य, श्री. शंकर लुंड:-</u>** मा. महापौरजी मला बोलण्याची परवानगी दया, मी या मुदयाचे खंडन करीत आहे.आपण चुकीचे ऐकले आहे, आपण संपुर्ण ऐकले पाहीजे. या बाबतीत जी मिटींग झाली, त्यामध्ये गावचे

सरपंच, जे राष्ट्रवादीचे आहेत आणि शिवसेनेचे तिथले मेंबर होते. सर्व लोक बसले होते आणि तिथले सर्वच लोक विरोध करीत आहेत.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-** कोणीही विरोध करीत नाहीत.

**सदस्य, श्री. अरुण आशान:-** नाही, नाही विरोध कोणाचाच नाही.

या वेळी काही सदस्य एकत्रित बोलत असल्यामुळे कोण काय बोलत आहेत, ते समजून आले नाही.

**सदस्य, श्री. शंकर लुंड:-**मिटींगमध्ये कोण कोण होते? ते आयुक्तांना विचारा.चौधरीजी आता आमदार, श्री.गणपतजी गायकवाड मिटींगमध्ये आहेत का? आणि मनोजजी बोलत आहे की,....

**सदस्य, श्री. अरुण आशान:-**मा. महापौरजी, मा.आयुक्त साहेब, हा विषय प्रदिपजीने सांगितले की, चर्चा करा, भारतीय जनतापार्टीचे आमदार इथे आले होते. ते त्या दिवशी मिटींगमध्ये उपस्थित होते. तर त्यांनी या विषयावर का बोलले नाहीत? आयुक्तांनी त्या लोकांना वेळ दिलेली आहे. याच्यामध्ये कोणाचाही विरोध नाही.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-** मा. महापौरजी, ही जी लक्षवेधी आली आहे, त्या लक्षवेधीच्या माध्यमातून मी एवढेच सांगू इच्छितो की, पाच नंबरला असलेले डंपिंग ग्राउंड उसाटणे येथे असलेले डंपिंग ग्राउंड लवकरात लवकर शासनाने जागा दिली ती मोफत मिळाली पाहीजे, विनामुल्य मिळाली पाहीजे. यासाठी प्रयत्न केले पाहीजेत अशा सुचना आमच्या मित्रांनी आम्हांला केल्या होत्या. मोफत, विनामुल्य जमिन देण्याचे काम शिवसेनेने केलेले आहे.म्हणून ते डंपिंग स्टेशन लवकरात लवकर त्या ठिकाणी केले पाहीजे यासाठी प्रशासनाने प्रयत्न केले पाहीजेत, प्रशासनाने प्रयत्न करायला सुरुवात केली पाहीजे. ज्या कंपनीला कंपाउंड वॉल टाकण्याचे काम दिले आहे, त्या कंपनीने काम लवकर करायला पाहीजे. त्यासाठी ज्या काही यंत्रणा वापरायच्या असतील, त्या आपण वापरावीत परंतु या डंपिंग स्टेशनचा शहरवासियांना त्रास आहे. एवढी मोठी जागा शासनाने मोफत दिलेली आहे. त्या जागेचा उपयोग महापालिकेने करुन घेतला पाहीजे आणि लवकरात लवकर केला पाहीजे, ही मागणी आहे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** मा. महापौरजी, मी या विषयावर बोलू इच्छितो

**सदस्य, श्री. अरुण आशान:-** जमनुजी बोला बोला.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** हा विषय आला आहे, ह्या विषयाचे उशीर व्हायचे कारण शासन व प्रशासन आहे, जेव्हा मी आयुक्त साहेबांना सांगितले तेव्हा आयुक्त म्हणाले तिन्ही आमदारांची बैठक १ नोव्हेंबरला आयेजित करूया मी व्हिजीट करतो आणि आपण लोकही चला सर्व संविधानिक पदाधिकारी व गटनेता जावू या, परंतु आज १७ तारीख आली पण मा.आयुक्तजी वेळ नाही काढु शकत आहे की तिकडे भेट दिली पाहीजे दौरा केला पाहीजे की तुमची समस्य काय आहे, जे त्या लोकांना आश्वासन दिले आहे की तुमच्या समस्यांना ऐकले जाईल ते ऐकायला वेळ नाही आहे, मा. महापौरजींना तेथे जाण्याचा वेळ नाही आहे आणि आरोप लावतायेत कल्याण पूर्वच्या आमदारांवर.कल्याण पूर्वच्या आमदारांनी तक्रार केली.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-** महापौर मॅडमनी कधी मनाई केली आहे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** हे सर्व कामे सोडून बाकीचे कामे होत आहेत परंतू आज मोदीजींचा वाढदिवस आहे, स्व्छ भारत अभियानामध्ये आम्ही सर्वे केला होता पूर्ण शहरामध्ये कचऱ्याचे ढिग पडले होते. परंतु मा. आयुक्तांनी...

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:**- मोदीजींना वाढदिवसाच्या शुभेच्छा.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** आता जाऊन काय होणार? डंपिंग ग्राउंउ वर गाडी जाण्याची जागा नाही आहे,अपणांस विनंती करू इच्छितो आयुक्तजी ,महापौरजी की सर्व कामांना सोडून या कामाला प्राधान्य देण्यात यावे. आणि उसाटने येथे जाऊन तेथिल नागरिकांना भेटून तिन्ही आमदारांना बोलावून, मा.महापौरजी, उप महापौरजी, विरोधी पक्ष नेता, सभागृह नेता, स्थायी समिती सभापती आणि सर्व गटनेत्यांनी आमच्या सोबत चला आणि जो पण मार्ग निघेल तो काढा आणि लवकरात लवकर उसाटनेचे काम सूरू करा.

**<u>सदस्य, श्री. अरुण आशान:-</u>** मा.आयुक्तजी ,मा.महापौरजी मी आपणास सांगू इच्छितो की, या बाबतीत मा.आयुक्त साहेबांनी सभागृहाला संबोधित करायचे आहे,आणि आयुक्त साहेबांनी या बाबत आपल्याला सांगितले पाहीजे, मा. महापौरजी आपण आयुक्त साहेबांना सांगा की या लक्षवेधीवर आपण उत्तर दया म्हणून प्रशासन म्हाणून त्यांची जबाबदारी आहे, मा.महापौरजी, मा.उप महापौर साहेब, आयुक्त साहेबांनी या बाबत बोलेले पाहीजे.

**<u>आयुक्त, डॉ.राजा दयानिधी:-</u>** सन्माननीय अध्याक्ष महोदय, सन्माननीय सदस्य हा मुद्दा उपस्थ‍ित केला आहे त्यावर खालीलप्रमाणे विवरण करू इच्छितो हा जो उसाटनेचा प्रश्न आहे त्यामध्ये स्थानिक गावकऱ्यांचा जो विरोध होत आहे. त्याच्या बाबतीत आपण दोन तीन आठवडयाच्या पुर्वी संबंधित स्थानिक गावकऱ्यांशी माझ्या दालनामध्ये एक मिटींग घेतली होती. त्याच्या नंतर सन्माननिय लोकप्रतीनिधी यांची आपण दुसरी मिटींग घेतली होती. त्या मिटींगमध्ये असे केले होते की, आपण संबंधित गावकरी व संविधानीक पदाधिकारी यांची भेट घेणार होतो. परंतु त्यामध्ये काही लोकांचा वेळ न भेटल्यामुळे हे विजिट झाले नाही, आणि मधल्या काळात गणपतीमुळे विजिट मागे राहीले होते तर पुढच्या आठवड्यामध्ये शक्यतो २१,२२,२३ तारीखेला आपण संविधानिक पदाधिकारी, आणि त्या गावकऱ्यांशी समन्वय करून विसीट आयोजित करू, व्हिजीट केल नंतर त्यांचे जे बऱ्यापैकी आपल्याकडे जी भेट झाली होती,त्यांचा जो काही विरोध होता तो बऱ्यापैकी आपण दूर केला होता.त्यांच्या त्यांना समजविण्याची आवश्यकता वाटते तर पुढच्या आठवड्यामध्ये आपण सर्वांचा टाईम घेऊन आपण तिथे जाऊन ते काम मार्गी लावू.

**<u>सदस्या, श्रीम.अंजली साळवे:-</u>** मा.महापौर मॅडम, मा. आयुक्त साहेब.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:-</u>** मा. महापौरजी,

**<u>सदस्या, श्रीम.अंजली साळवे:-</u>** राजेशजी एक मिनीट मला बोलू दया.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:-</u>** मला कोणाचाच आवाज आला नाही,

**<u>सदस्या, श्रीम.अंजली साळवे:-</u>** मा.महापौरजी, मा. आयुक्त साहेब, या संदर्भात मी सांगू इच्छिते की आपण हा जो प्रकल्प करीत आहोत, आपण अजून या प्रकल्पाबाबत बराच वेळ आहे आणि पाच नंबरचा जो डंपिंग ग्राऊंड आहे तेथे आता अटीतटीचा प्रश्न झला आहे. या अशा पार्श्वभूमीवर आम्ही नगरसेवक जेव्हा पुढाकार घेऊन आमच्या वार्डात ओला कचरा सुका घनकचरा व्यवस्थापनाचा प्रकल्प करू इच्छितो त्याच्यासाठी पिच करून मागतो त्याला एवढा विलंब का होतो? एखादा घ्या तुम्ही प्रभाग, तिथे उदाहरण करा की कचरा संपेल, माझी मागणी माझ्या प्रभागात मी किती दिवसापासून मागे लागले आहे, पिच बनवण्यासाठी की ओला कचरा सुका कचरा गेले दोन वर्ष झाले, त्याच्या आधी सुध्दा ह्याला सहाय्य का नाही करीत आहे प्रशासन, आम्हाला करून का नाही देत आहे पटकन, कारण गेल्या दोन वर्षात आपल्या उल्हासनगरची अवस्था कशी होणार आहे. जर वार्डात कमी कचरा केला तर डंपींग ग्राऊंडला कमी कचरा जाईल ही साधी गोष्ट कोणाच्या लक्षात येत नाही आहे का? हे का नाही राबवत आहे तुम्ही? तरी माझी विनंती आहे की महापौर मॅडम,आयुक्त सर, सर्वांना निर्देश द्या की मी करत आहे त्या प्रकल्पाला मला करू द्या आणि एक तरी उदाहरण राहू दया, धन्यवाद.

**<u>सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी:-</u>**मा.महापौरजी साळवें मॅडमनी सांगितल्याप्रमाणे सर्वच वार्डामध्ये स्पिच बनलेले नाही पिच बनविण्याचे काम अर्धवट अवस्थेत आहेत, पिच बनलेले नाही, माझ्या वार्डातले सांगतो, पिच न बनल्यामुळे आणि काम पूर्ण न झाल्यामुळे आम्ही ओला कचरा वेगळा सुका कचरा वेगळा करू शकत नाही. त्यामुळे जी सूचना साळवे मॅडमनी केली आहे ती सूचना लवकरात लवकर आमलांत आणावी व ते पिच बनविण्याचे काम पूर्ण करावे. आपल्याला चुकीची माहीती अधिकारी देत आहेत, अद्याप कुठेही उल्हासनगरमध्ये ओला कचरा सुका कचरा वेगळा जमा होत नाही. परंतु आपल्याला काही माहिती दिली जाते आयुक्त साहेबांनी ओला कचरा, सुका कचरा वेगळा करणे याकडे लक्ष देऊन जर आपण तो प्रकल्प सूरू केला प्रत्येक वार्डामध्ये तर बराचसा कचरा आपला कमी हाईल आणि कचरा डंपींगला जाणार नाही.

डंपींग भरलेला आहे सध्या शहरामध्ये कचऱ्याचे कट्टे आहेत. लोक सनासुदीला जाताना कचऱ्याचे कट्टे भरलेले दिसतायेत. हा सगळा जो काही विषय आहे तो जर मार्गी लावायचा असेल तर आपल्याला छोटे छोटे प्रकल्प वार्डात राबवावे लागतील. ते राबविण्यासाठी आयुक्त साहेब आपण पुढाकार घ्यावा.अधिकाऱ्यांच्या भरवशावर इथे कुठलेही काम होत नाही. आरोग्य विभागाचे, तर अजिबात होत नाही सर्व सावळा गोंधळ आरोग्य विभागाचा चालु आहे. साहेब आपल्याला विनंती आहे की हे छोटे छोटे प्रकल्प आपण लवकरात लवकर राबवावे.

**<u>सदस्या, श्रीम.अंजली साळवे:-</u>** अगदी बरोबर चौधरी साहेब लोक पुढाकार घेऊन सहकार्य करतात प्रशासनाकडून सहकार्य मिळत नाही.

**<u>सदस्य, श्री. किशोर वनवारी:-</u>** या गोष्टीवर मी सांगतो उसाटनेला डंपिंग ग्राऊंड शिफ्ट झालेच पाहीजे. कारण ५ नंबर वाले जेवढे भोगतायेत, जेवढे धरणे दिले आहे,शिवसेना असो,भाजप असो कोणताही पक्ष असो सर्वांनी महासभेमध्ये नेहमी मदद केली आहे. साई पार्टी असेल,टि.ओ.के., कॉंग्रेस, राष्ट्रवादी सर्व पक्षांचे एकच मत होते की डंपिंग ग्राऊंड शिफ्ट झाले पाहीजे, या गोष्टीसाठी मी सर्वांना हात जोडून विनंती करू इच्छितो की राजकरण न करता लवकरात लवकर हे डंपिंग ग्राऊंड उसाटनेला शिफ्ट झाले पाहीजे, ही माझी सदनला, सर्व पद अधिकाऱ्यांना, सर्व नगर सेवकांना, शासन प्रशासनाला विनंती आहे, धन्यवाद.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>** आयुक्त साहेब आपण उसाटनेला कधी चलणार आहात? कारण जेव्हापण आपल्याला विचारले जाते तेव्हा आपण बोलतात आज नाही, सकाळी नाही, संध्याकाळी नाही, रात्री नाही दिवसा नाही, राहीला एक दिवस त्याचे काही नाव नाही. कोणताही फॉलोअप नाही.

**<u>सदस्य,श्री. मनोज सयानी:-</u>** आयुक्त साहेब आम्ही या सदनच्या माध्यमातून आपणांस सांगू इच्छितो की या मुद्याला गंभीरतेने घ्या. कोणत्याही आमदाराच्या दबावाला न येता, कोणत्याही राजनितीमध्ये न पडता,आपण कृपया या मुद्यावर मार्ग काढा. आम्ही पूर्णपणे, मग ते शिवसेना पक्ा असो,भाजप असो, टि.ओ.के. असो, कॉंग्रेस असो, साई पार्टी असो,एन.सी.पी. असो आम्ही पूर्णपणे आपल्या सोबत आहेत. आपल्यासोबत चालण्यास तयार आहे. आपण कोणत्याही आमदाराच्या दबावाला न पडता या मुद्यावर मार्ग काढा आणि आम्ही पूर्णपणे आपल्या सोबत आहोत, किशोर वनवारी पण आपल्या सोबत आहेत.

**<u>सदस्य,श्री.किशोर वनवारी:-</u>** किशोर वनवारी पण तुमच्या सोबत आहे.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>** मी विचारू इच्छितो मनोज जी, महाराष्ट्र मध्ये सत्ता आपली, महानगरपालिकेमध्ये सत्ता आपली, आपण आरोप करतायेत की आमदारचा दबाव, म्हणजे तुमचे महापौर, आपले आयुक्त आमदारच्या दबावामुळे तिकडे नाही येत आहे, रोजचा वेळ देत आहे उद्या जावू, जावू, आमदारचा इतका दबाव आहे की आमदारच्या दबावात आपण येत नाही. आपली सत्ता आपले मुख्यमंत्री, आपले पूर्ण शासन, हे एका आमदारच्या दबावात आले? आमदार साहेबांना बोलावून घेतले, तिन्ही आमदारांना सांगीतले की आम्ही येत आहेत. तीन्ही आमदारांना बोलवा की, आम्ही येणार आहेत. पण १ तारीख पासून आपल्याला वेळ नाही भेटला आणि नाव ठेवतायेत आमदारला, शरम आली पाहीजे तुम्हाला.

**<u>सदस्य, राजेश वदारिया:-</u>** मी विनंती करतो आयुक्त साहेबांना की आपण यावर स्टेटमेंट दयावे.

**<u>सदस्य, श्री. अरुण आशान:-</u>** शरम तर तुम्हाला यायला पाहीजे, तुमच्या आमदारांनी यायला पाहीजे, ही राजनिती तर आमदार करीत आहेत...

**<u>सदस्य, डॉ.प्रकाश नाथानी:-</u>** आयुक्त साहेब हा डंपिंग ग्राऊंडचा मुद्दा साडेचार वर्षांपासून चालला आहे, सर, ऐकून ऐकून कान बहिरे झाले आहेत. ,दोन-तीन वेळा लक्षवेधी लागली, दोन-चार वेळा मिटिंग लागल्या, शहराच्या मधोमध ना जुन्या आराखड्यामध्ये होता ना नव्या आराखड्यामध्ये त्या जागेवर ते डंपिंग ग्राऊंड आहे, शहराच्या मधोमध जे आजुबाजूला मंदिर, आजुबाजूला बॅरेक्स, एका बाजूला शाळा, उजवीकडे मंदिर, डावीकडे शाळा, आणि बाकी परिसरात वस्ती, आणि तिकडे धूर आणि धुरामुळे कारबोमोनाक्साईड नी धुरानी

ट्युबरकुल्योसीस, ट्युबरकुल्योसीस मुळे मोठे आजार, सर काही तर विचार करा, सर आपण उच्चशिक्षीत व्यक्ती आहात, आपण वैद्यकीय बाबी समजू शकतात, शहराच्या मधोमध असे डंपिंग ग्राऊंड कसे बनवू शकतात. सर आपण जेव्हा जॉईन झाले तेव्हा आपण तर तातडीने घेतले पाहीजे होते डंपिंग ग्राऊंड बंद झाले पाहीजे, शिफ्ट झाले पाहीजे. शहराच्या मधोमध, कोणाच्या घराच्या बाजूला ,उद्या तर असे होईल की गोलमैदानमध्ये सुद्धा लावून घेतील हे लोक डंपिंग ग्राऊंड, आज ५ नंबरची जनता आहे, तिकडचे लोक आहे, किती रूग्ण आहेत. मी डॉक्टर असोसिएशनचा अध्यक्ष आहे, तिकडे एवढे अस्थमाचे रूग्ण आहेत ?कोणी सर्व्हे केला आहे का ?महापालिकेचे डॉक्टर आहे,त्यांना सांगा जावून पाहणी करायला, की उल्हासनगर महानगरपालिकेच्या डॉक्टरांनी विजीत केली की ५ नंबरमध्ये अस्थमाचे रुग्ण किती आहे? एलर्जीचे रुग्ण किती आहे? हे सगळे धुरामुळे, शहरात धूर असतो का? आम्ही कोणत्या जंगलराज मध्ये राहत आहेत सर? १९४७ ला स्थलांतर करून आलो आहे पाकीस्तान मधून याचा अर्थ हा नाही की आम्ही अत्याचारावर अत्याचार सहन करत राहू, शेवटी कधीपर्यंत हे सहन करणार? आज मागच्या साडेचार वर्षापासून एकच मुद्दा डंपिंग,डंपिंग.काय गोष्ट समजत नाही आहे की एकच विषय. मिना सोंडेजी आले आहेत आता समोर ह्यांनी लक्षवेधी टाकली होती ,बोललो मी होतो, आमचे सतरामदास यांनी लक्षवेधी टाकली होती, तेव्हा बोललो मी होतो, किशोर वनवारी लक्षवेधी टाकली होती ,तेव्हा पण मीच बोललो होतो, तिथे माझे तर घर पण नाही आहे पण माझे शहर आहे. शहराच्या प्रती लढणे हा माझा धर्म आहे. आज शहरच्या प्रती नाही लढणार तर बाहेरचे लोक आपल्यावर राज्य करतील. आम्ही आमचे शहर नाही संभाळू शकत? इतिहास साक्षी आहे की आम्ही आलो आहे १९४७ मध्ये एका कचऱ्याशी नाही लढू शकत? सर विनंती आहे आपण या कामाला ७ दिवसात उडवू शकतात कोणती मोठी गोष्ट नाही आपल्यासाठी, आपण आय.ए.एस. अधिकारी आहात,सक्षम अधिकारी आहात,डायनॅमिक व्यक्तीमत्व आहात, आपण तातडीने हटवू शकतात.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-** ठिक आहे डॉक्टर.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** मा.महापौरजी ही जी चर्चा सुरू आहे त्यावर स्टेटमेंट देण्यासाठी आयुक्तांना आदेश द्या.खूप चर्चा झाली या विषयावर.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-** बरोबर आहे.

**सदस्य, श्री. अरुण आशान:-** पुढचा विषय घ्या पुढचा विषय, मा.महापौरजी पुढचा विषय घ्या.

**महापौर, तथा पिठासिन अधिकारी:-** पुढचा विषय घेत आहे ऐकून घ्या.

**महापालिका सचिव:-** माननीय पिठासीन अधिकारी यांनी पुढील विषय घ्यायला सांगितले आहे. माझ्याकडे वेगवेगळया नगरसेवकांची पत्र आली आहेत ५-६ विषयावर.भारत राजवानी, भुल्लर महाराज आणि कवीता पंजाबी, तो विषय आल्यावर मा.महापौर जसे निर्देश देतील त्याप्रमाणे कारवाई तसेच विरोधी पक्ष नेताबाबत पत्र आले आहे ते मी मा.महापौर यांच्याकडे सुपूर्द करत आहे, आदेश असल्यावर ते याबाबत निर्णय घेतील.

**महापालिका सचिव:—** विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. २ :—** मागील विशेष महासभा दिनांक ३०/०६/२०२१ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

---

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** पास.. पास..

**काही सदस्य:—** पास—पास……

**<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी:—</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. २ :—** मागील विशेष महासभा दिनांक ३०/०६/२०२१ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

सुचकाचे नाव:— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव:— श्री. किशोर वनवारी

**<u>महासभा ठराव क्र.१२ क</u>**

**<u>दिनांक :१७/०९/२०२१</u>**

ही महासभा महापालिका सचिवांनी प्रस्तुत केलेल्या दिनांक ३०/०६/२०२१ रोजीच्या विशेष महासभेचे पृष्ठ क्र. १ ते २६ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**<u>सर्वानुमते</u>**

महापौर/ पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**<u>महापालिका सचिव:—</u>** विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

————————————————————————————————————————

⇨ **विषय क्र. ३:— मुलभूत व प्राथमिक सोईसुविधांचा विकास या योजनेअंतर्गत प्रशासकीय मान्यता मिळालेल्या कामांना मा.महासभेची मान्यता मिळणे.**

————————————————————————————————————————

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:-</u>** पास..इतिवृत्ताची वाट न पहाता.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-</u>** इतिवृत्ताची वाट न पहाता, पास..

**<u>महापालिका सचिव:-</u>** इतिवृत्ताची वाट न पहाता, पास.. यामध्ये असे येईल हे विषय नमुद करुन जिल्हास्तरीय समितीकडे लवकरात लवकर पाठविण्यास प्रशासनास निर्देश देत आहे, इतिवृत्ताची वाट न पहाता.

**<u>सदस्य, श्री. अरुण आशान:-</u>** बरोबर आहे.

**<u>काही सदस्य :—</u>**पास—पास......

**<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी:—</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑ **विषय क्र. ३ :—उल्हासनगर महानगरपालिका उल्हासनगरमुलभूत व प्राथमिक सोईसुविधांचा विकास या योजनेअंतर्गत प्रशासकीय मान्यता मिळालेल्या कामांना मा.महासभेची मान्यता मिळणे....**

**प्रस्तावना**

संदर्भ पत्र क्र.२ मा.अवर सचिव, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र.मनपा-२०२०/प्र.क्र.७३(४०)/न.वि.-१६ दिनांक २४/०९/२०२० अन्वये सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरीता आ.क्र.३११ मनोरंजन (उद्यान) करीता आरक्षीत असून (अ) उद्यान विकसित करणे – रुपये ३.०० कोटी, (ब) २४ मी.रुंद, ७५० मी.लांब पोहोच रस्ता – रु.७.०० कोटी व (क) १८ मी.रुंद, २०० मी. लांब पोहोच रस्ता – रु.२.५० कोटी असे एकूण रुपये १२.५० कोटीच्या कामांकरीता मान्यता दिली असून सदर कामांकरीता रु.११.८६ कोटी वर्ग करण्यास मान्यता प्राप्त झाली आहे. व प्रस्ताव जिल्हास्तरीय समितीची मान्यता घेऊन, प्रशासकीय मान्यतेकरीता प्रस्ताव शासनास सादर करणेच्या सुचना दिल्या होत्या.

संदर्भ क्र.१ दिनांक १२/१२/२०१७ रोजीच्या शासन निर्णयात निश्चित केलेल्या मार्गदर्शक तत्वांतील अनु.क्र.६ नुसार सदर योजनेअंतर्गत तांत्रिक मान्यता दिलेल्या प्रस्तावांची जिल्हास्तरीय समितीमार्फत छाननी होणे आवश्यक आहे. तसेच प्रस्तावासोबत आवश्यक प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक असल्याने शासनाने मंजूरी दिलेल्या निधीच्या मर्यादेत खालील विकास कामांचा प्रस्ताव अंदाजपत्रक, तांत्रिक मान्यता व आवश्यक त्या प्रमाणपत्रांसह प्रस्ताव दिनांक १४/०१/२०२१ रोजी मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे छाननीकरीता प्रस्ताव पाठविण्यात आला.

| अ क्र. | कामाचे नाव | प्रस्तावित कामांची अंदाजित रक्कम रुपये | प्रस्तावित कामास तांत्रिक मान्यता दिल्याचा क्रमांक व दिनांक |
|---|---|---|---|
| १ | आरक्षण क्र.३११ मोकळ्या भुखंडाकडे जाणारा २४ मी.रुंद व ७५० मी.लांब पोहोच रस्ता बनविणे. | 69973100 | क्रमांक ४०९८<br>दिनांक १४/१२/२०२० |
| २ | आरक्षण क्र.३११ मोकळ्या भुखंडाकडे जाणारा १८ मी.रुंद व २०० मी.लांब पोहोच रस्ता बनविणे. | 25000000 | क्रमांक ४०९९<br>दिनांक १४/१२/२०२० |
| ३ | आरक्षण क्र.३११ मोकळ्या भुखंडावर उद्यान विकसित करणे. | 30000000 | भुखंड क्र.३११ ही जागा महाराष्ट्र शासनाच्या अखत्यारित आहे. नगरभुमापन विभागाकडून जागेची मोजणी, जागा हस्तांतरण इत्यादी कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर प्रस्ताव तयार करण्यात येईल. |
| | **एकूण (अ.क्र.१ + २)** | **94973100** | |

मा.जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडील पत्र क्र.सामान्य/नवि/टे-४/उमपा/प्र.मा./कावि/५९५/२०२१ दिनांक २३/०६/२०२१ अन्वये वरील तक्त्यातील अनु.क्र.३ चे काम हे आरक्षण क्र.३११ मोकळया भुखंडावर उद्यान विकसित करणे ही जागा महाराष्ट्र शासनाच्या अखत्यारित आहे. नगरभुमापन विभागाकडून जागेची मोजणी, जागा हस्तांतरण इत्यादी कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर समितीकडून प्रशासकीय मान्यता देण्यात येईल व अ.क्र. १ व २ च्या (रक्कम रुपये ९,४९,७३,१००/-) कामास खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

**अटी व शर्ती**

१) शासनाकडून मंजूर व प्राप्त होणाऱ्या निधीपेक्षा अतिरिक्त खर्च महानगरपालिकेने स्वत:च्या निधीतून करुन सर्व कामे पूर्ण करावयाची आहेत.

२) प्रशासकीय मान्यता देण्यात येणारी कामे वेळेत व गुणवत्तेनुसार पूर्ण करण्याची जबाबदारी महानगरपालिकेची राहील.

३) प्रशासकीय मंजूरी देण्यात आलेल्या कामांचे खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र विहित मुदतीत वेळोवेळी जिल्हाधिकारी कार्यालय व शासनाकडे पाठविणे महापालिकेस बंधनकारक राहील.
४) प्रस्तावित कामे शहराच्या विकास नियंत्रण नियमावलीनुसार व विकास आराखडयाशी सुसंगत व अनुज्ञेय असल्याबाबत काम सुरु करण्यापूर्वी महानगरपालिकेने नगररचना विभागाकडून दाखला घ्यावा. तसेच, विकासनाचे काम असल्यास रितसर बांधकाम परवानगी घ्यावी.
५) सदर कामांसाठी जागा महानगरपालिकेकडे सार्वजनिक वापरासाठी ताब्यात व महसुली अभिलेखानुसार मालकीची असल्याशिवाय कामांचे कार्यादेश देऊ नयेत.
६) नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.धोरण - २०१७ /प्र.क्र.९६/नवि-१६ दिनांक १२/१२/२०१७ व दिनांक ०२/०६/२०२१ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्तातील अटी व शर्तीचे पालन करणे महानगरपालिकेस बंधनकारक राहील.
७) काम सुरु करण्यापूर्वी व नंतर जागेची छायाचित्रे काढून अभिलेखात संग्रही ठेवण्यात यावी.
८) सदर प्रकल्पाअंतर्गत दुरुस्तीची तथा परिरक्षणाची कामे हाती घेण्यात येवू नयेत.
९) सदर कामांचे त्रयस्थ लेखा परिक्षण करण्यात यावे.
१०) प्रस्तावित कामे C.R.Z. ने तसेच प्रस्तावित मलनि:सारण व पाणीपुरवठा योजनेच्या कामांमुळे बाधित होणा-या जागेत नसावित.
११) सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामावर करण्यात येणाऱ्या खर्चामुळे आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.
१२) आरक्षण क्रमांक ३११ मधील जागा महाराष्ट्र शासनाची असल्यास उल्हासनगर महानगरपालिकेने जागा हस्तांतरणाबाबत शासनाचे प्रचलित नियमानुसार महसूल विभागाची परवानगी घेण्यात यावी. जागा हस्तांतरण प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर सदर जागेतील कामांचे कार्यादेश देण्यात यावेत.

तरी वरीलप्रमाणे मा.जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडून प्रशासकीय मान्यता मिळालेल्या १) आरक्षण क्र.३११ मोकळ्या भुखंडाकडे जाणारा २४ मी.रुंद व ७५० मी.लांब पोहोच रस्ता बनविणे रक्कम रु.६,९९,७३,१००/- व २) आरक्षण क्र.३११ मोकळ्या भुखंडाकडे जाणारा १८ मी.रुंद व २०० मी.लांब पोहोच रस्ता बनविणे रक्कम रु.२,५०,००,०००/- या कामांना मा.महासभेची मान्यता मिळणे आवश्यक असल्याने सदर कामांचा प्रस्ताव मा.महासभेची मान्यतेकरीता प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र: १३** **दिनांक : १७/०९/२०२१**

सुचकाचे नाव :— श्री.कलवंतसिंह सोहता

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

**ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुदअटी व शर्तीनुसारउल्हासनगर महानगरपालिका उल्हासनगरमुलभूत व प्राथमिक सोईसुविधांचा विकास या योजनेअंतर्गत** आरक्षण क्र.३११ मोकळ्या भुखंडाकडे जाणारा २४ मी.रुंद व ७५० मी.लांब पोहोच रस्ता बनविणे रक्कम रु.६,९९,७३,१००/- व आरक्षण क्र.३११ मोकळ्या भुखंडाकडे जाणारा १८ मी.रुंद व २०० मी.लांब पोहोच रस्ता बनविणे रक्कम रु.२,५०,००,०००/-**प्रशासकीय मान्यता मिळालेल्या या कामांना मान्यता देवून सदर प्रस्ताव जिल्हास्तरीय समितीकडे लवकरात लवकर पाठविण्यास प्रशासनास निर्देश देत आहे.**

**या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.**

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

**महापालिका सचिव:—** विषय क्र. ४ वाचुन दाखवितात

———————————————————————————————————————

⇨ **विषय क्र. ४:— उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील मुलभूत सोयी सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद योजनेअंतर्गत निधी वितरीत करणेबाबत..(सन २०२०-२१ साठी लेखाशिर्ष (४२१७ ०५४१) खाली रक्कम रु.०.५० कोटी.**

———————————————————————————————————————

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** पास...

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-** इतिवृत्ताची वाट न पहाता, पास..पास...

**काही सदस्य :—**पास—पास......

**महापौर तथा पीठासीन अधिकारी:—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ४ :— उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील मुलभूत सोयी सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद योजनेअंतर्गत निधी वितरीत करणेबाबत.(सन २०२०-२१ साठी लेखाशिर्ष (४२१७ ०५४१) खाली रक्कम रु.०.५० कोटी**

**प्रस्तावना**

महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयीसुविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद या योजनेअंतर्गत खालील कामांकरीता रक्कम रुपये ५०,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये पन्नास लक्ष मात्र) इतक्या निधीस दिनांक ०२ जून,२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता प्राप्त झाली आहे.

| अ क्र. | कामाचा तपशिल | रक्कम रुपये लक्ष |
|---|---|---|
| १ | उल्हासनगर म.न.पा. के.के.धर्मानी पावडर कंपनी येथे नवीन शौचालय बांधणे, प्रभाग क्र. १ | १०.०० |
| २ | उल्हासनगर म.न.पा. शहाड गावठाण येथे वकुमार पांचाळ येथून मढवी यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. प्रभाग क्र. १ | १०.०० |
| ३ | उल्हासनगर म.न.पा. गायकवाड पाडा येथे शौचालयाचे बांधकाम करणे. प्रभाग क्र.२० | १०.०० |
| ४ | उल्हासनगर म.न.पा. नंदू गायकवाड यांच्या घरापासून ते कुशवा यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. प्रभाग क्र. २० | १०.०० |
| ५ | उल्हासनगर म.न.पा. ज्योती कॉलनी येथे नाली भुयारी गटार करणे, प्रभाग क्र. २० | १०.००(**पाणी पुरवठा विभाग**) |

मा.अवर सचिव, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र.धोरण/२०१७ क्र.धोरण/२०१७/ प्र.क्र.९६/नवि-१६ दिनांक १२/१२/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयी सुविधांचा विकास योजनेअंतर्गत मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्यात आली आहेत .सदर मार्गदर्शक तत्वांतील अनु.क्र.६ नुसार योजनेअंतर्गत तांत्रिक मान्यता दिलेल्या प्रस्तावांची जिल्हास्तरीय समितीमार्फत छाननी होणे आवश्यक आहे. तसेच प्रस्तावासोबत आवश्यक प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

परंतू तत्पुर्वी सदर प्रस्तावांकरीता महापालिकेचा महासभा ठराव होणे आवश्यक आहे. तद्नंतर वरील कामांचे प्रस्ताव अंदाजपत्रक, तांत्रिक मान्यता व आवश्यक त्या प्रमाणपत्रांसहजिल्हास्तरीय समितीकडे छाननी करीता सादर करण्यात येईल.

तरी “महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयीसुविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद या योजनेअंतर्गत “ वरील तक्त्यातील रुपये ५०.०० लक्ष खर्चाच्या मर्यादेतील अनु क्र.१ ते ५ वरील कामे मा.महासभेच्या मान्यतेकरीता प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र:१४** **दिनांक : १७/०९/२०२१**

**सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्र चौधरी**

**अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया**

**ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद**उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील मुलभूत सोयी सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद योजनेअंतर्गत निधी वितरीत करणेबाबततक्त्यातील रुपये ५०.०० लक्ष खर्चाच्या मर्यादेतील अनु क्र.१ ते ५ वरील कामांना मान्यता देवून सदर प्रस्ताव जिल्हास्तरीय समितीकडे लवकरात लवकर पाठविण्यास प्रशासनास निर्देश देत आहे.

**या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.**

**सुचकाची** सही/—

**अनुमोदकाची** सही/—

सर्वानुमते

**महापौर / पीठासीन अधिकारी**

**सर्वसाधारण महासभा**

**उल्हासनगर महानगरपालिका**

---

**सदस्य, श्री. अरुण आशान:-** मला वाटते की, प्रश्न क्रमांक ५,६,७...

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-** नाही, नाही याच्यामध्ये आम्हांला फेर बदल करायचे आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-** फेर बदल करायचे आहे ५ मध्ये.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-** फेर बदल करायचे आहे, आम्हांला बोलायचे आहे.

**महापालिका सचिव:-** वरील प्रमाणे इतिवृत्ताची वाट न पहाता पास..

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-** बरोबर आहे.

**सदस्य, श्री. अरुण आशान:-** त्यामध्ये काही संख्या, रक्कम, मा. महापौरजी, मा. उप महापौरजी, सचिव मॅडम, काही ठिकाणी संख्या एकत्र आलेली आहे तर त्या बाबतीत. त्या विभागाच्या संबंधित सदस्यांनी पत्र दिले आहेत, त्या पत्राचा स्विकार होऊन, त्याच्यामध्ये करेक्शन करुन ती यादी संबंधित विभागाला पाठविण्यात यावी.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-** नाही, नाही मा.महापौरजी, पैशाच्या बाबतीमध्ये जो काही उल्लेख झाला, परंतु काही ठिकाणी जी कामे आम्ही सुचविली होती. ती कामे दुस-या निधीमध्ये प्रस्तावीत केलेली आहेत. काही ठिकाणी कामे झालेली आहेत. अशा कामांची पत्र आम्ही आयुक्त साहेबांना दिलेली आहेत. ते आयुक्त साहेबांना पत्र दिले होते की, लोकेशन चेंज करावे, ठिकाण चेंज करावे, त्याच प्रभागामध्ये ही कामे करावी. पहीले जी कामे सुचविलेली होती, ती कामे झाली आहेत. म्हणून आम्ही पत्र दिलेली आहेत, त्या पत्रामध्ये समाज मंदिर बांधण्यासाठी असे सुचविलेले होते. तिथे ५० लाख रुपये माध्यमातून ते काम होत आहे. म्हणून ते काम दुस-या ठिकाणी करण्यात यावे.प्रभागामध्ये असे आम्ही सुचविलेले आहे, तर तो बदल त्या ठरावामध्ये आला पाहीजे.

**महापालिका सचिव:-** एक मिनीट मी विषय वाचत आहे आणि त्या वेळी या विषयामध्ये बदल करायचा आहे तो तुम्ही सांगा, तसा ठरावामध्ये बदल करण्यात येईल.

**महापालिका सचिवः—** विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

———————————————————————————————————————

⇨ **विषय क्र. ५ः— उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील मुलभूत सोयी सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद योजनेअंतर्गत निधी वितरीत करणेबाबत..(सन २०२०-२१ साठी लेखाशिर्ष (४२१७ ०५४१) खाली रक्कम रु.०.५० कोटी.**

———————————————————————————————————————

**महापालिका सचिवः-** यामध्ये सदस्य, श्री. भुल्लर महाराज यांनी पत्र दिले आहे की, प्रभाग क्रमांक १० मधील कामाचा तपशिल तरतुद २० लाख निधी व सदर ठिकाणी दोन कामांचे प्रत्येकी १० लाखाचे दोन प्राकलन तयार करुन असे त्यांनी दुरुस्ती करायला सांगितले आहे.

**सदस्य, श्री. अरुण आशानः-** बरोबर.

**महापालिका सचिवः-** मान्य.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-** मान्य, मान्य.

**उप महापौर, श्री. भगवान भालेरावः-** प्रभाग क्रमांक ७ आणि ८...

**महापालिका सचिवः-** विष्य क्र.५ मध्ये सांगितलेले आहे.

**सदस्य, श्री. अरुण आशानः-** अजून मा. महापौरजी, सचिव मॅडम काही जनांच्या याच्यामध्ये जसे आता चौधरी साहेबांनी सांगितले, काही करेक्शन आहेत, त्यांनी पत्र दिलेले आहेत. आता तीन्ही विषयामध्ये मागेपुढे विषय आलेले आहेत. परंतु हे विषय पास करतांना ज्या ज्या ठिकाणी, ज्या ज्या नगरसेवकांनी सुचविलेले आहे, काही कामे झाली आहेत तर काही रक्कमेमध्ये फरक आहे. ते पत्र त्यांनी दिलेले आहे, ते स्विकार करण्यात यावा.

**उप महापौर, श्री. भगवान भालेरावः-** अरुणराव ५, ६, ७ तीन्ही एकच विषय आहेत. तर ते पास करण्यात यावेत.

**सदस्य, श्री. अरुण आशानः-** पास.. पास..

**महापालिका सचिवः-**विषय क्र. ६..

**सदस्य, श्री. राजेश वदारियाः-** नाही, नाही पास नाही, मला बोलायचे आहे, दोन्ही कामांमध्ये निधी एकच ३० लाख दिलेला आहे. तर यामध्ये माझी सुचना आहे की, सिरियल नं २४ ला १५ लाख, सिरियल नं २५ ला १५ लाख दिले जावे.

**महापालिका सचिवः-** सर आपण कृपया पत्र पण द्या, शहर अभियंता यांना तर चांगले होईल ठरावामध्ये आपल्याला टाकता येईल.

**सदस्य, श्री. राजेश वदारियाः-** ठरावामध्ये पण टाका दोघांना १५-१५ लाख दिले जावे म्हणजे कोणता वाद होणार नाही.

**महापालिका सचिवः-** होय, होय ठिक आहे. संबंधित विभागाला तसे पत्र दया की फक्त ठरावात नमुद सदस्यांनी सुचविले आहे.

**काही सदस्य :—**पास—पास……

**<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी:—</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषयक्र. ५ :<u>उल्हासनगर महानगरपालिका उल्हासनगर</u>**

**उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील मुलभूत सोयी सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद योजने अंतर्गत निधी वितरीत करणेबाबत... (सन २०२०-२१ साठी लेखाशिर्ष (२२१७ ०९१३) खाली रक्कम रु.५.०० कोटी**

महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयीसुविधांचा विकास योजनेअंतर्गत खालील कामांकरीता रक्कम रुपये ५.०० कोटी इतक्या निधीस शासन निर्णय क्र.संकीर्ण २०२१/प्र.क्र.७७ (४) / न.वि. १६ दिनांक ०६ जुलै,२०२१ अन्वये मान्यता प्राप्त झाली आहे.

| अ क्र. | कामाचा तपशिल | रक्कम रुपये लक्ष |
|---|---|---|
| १ | उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.१५ मधील शीवनगर परिसरामध्ये सि.सि.रस्ते व नाली इत्यादी विकास कामे करणे. | २०.०० |
| २ | उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.१५ मधील श्रीरामनगर परिसरामध्ये सि.सि.रस्ते व नाली इत्यादी विकास कामे करणे. | २०.०० |
| ३ | उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.५ मधील साई कुटीर व्हाया नालंदा ते राजलक्ष्मी अपार्टमेंट पर्यंत सि.सि.रस्ता करणे. | २५.०० |
| ४ | उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील उल्हासनगर-४ येथील भरत नगर ते नागसेन नगर या परिसरात मोठा नाला तयार करणे. | १५.०० |
| ५ | उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.१८ (ब) मधील परिसरात लाईट / छोटे हायमास्ट बसविणे. ( एलईडी दिवे वगळून) | १०.०० |
| ६ | उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.५ मधील आर.के.अपार्टमेंट ते धनुषधारी प्रेस रामचंद अपार्टमेंट मागे व परिसरात सि.सि.२५० रोड व पॅसेज तयार करणे. | २०.०० |
| ७ | उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.१८ कुर्ला कॅम्प परिसरातील आवश्यक विविध विकास कामे करणे. | २०.०० |
| ८ | उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील कुष्टरोगी वसाहतीच्या कोकणसाठी सिध्दार्थनगर उल्हासनगर-४ येथे समाजमंदीर तयार करणे. | ४०.०० |
| ९ | उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.३ मध्ये श्री.गणेश बिल्डींग ते श्री नंद जेठानी यांचे बंगला पर्यंत सि.सि.रस्ता तयार करणे. | १५.०० |
| १० | उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.३ मध्ये सह्याद्री कॉलनी ते देशमुख यांच्या घरापर्यंत सि.सि.रस्ता तयार करणे व बॅ.क्र.३९९ ते ४०५ पर्यंत सि.सि.रस्ता तयार करणे. | २०.०० |
| ११ | बॅरेक क्र.१५३२ च्या बाजूस असणारे समाजमंदीर नव्याने उभारणे. | २०.०० |
| १२ | बॅरेक क्र.१६१८, १६३२ या दरम्यान ड्रेनेज व रस्ता तयार करणे. | २५.०० |
| १३ | बॅरेक क्र.१५०१, १५०४, १५०६ या ठिकाणी ड्रेनेज व सि.सि.पायवाटा तयार करणे. | २०.०० |
| १४ | प्रभाग क्र.४ (ड) ममता नगर परिसरात सि.सि.रस्ता तयार करणे | १५.०० |
| १५ | विठ्ठलवाडी पोलीस स्थानकाच्या मागे पोलीसांकरीता व्यायामशाळा, व साहित्य कोठा, ओपन जिम तयार करणे. | ३०.०० |
| १६ | प्रभाग क्र.१४ जागृती कॉलनी येथे नवगिरे यांचे घराजवळ समाजमंदीर उभारणे. | २०.०० |
| १७ | प्रभाग क्र.४ (ड) वाहेगुरु ते पिंकू पॅलेस ट्रान्सफॉर्म पर्यंत ३५० सि.सि.नाली व गटार बनविणे. | ४०.०० |
| १८ | प्रभाग क्र.१० (ब) सातारा कॉलनी साळवे बाई यांचे घरापर्यंत सि.सि.पेव्हमेंट रस्ता बनविणे. | ३०.०० |
| १९ | पॅनल क्र.१३ अ येथे लेप्रसि कॉलनी येथे समाजमंदीर बांधणे. | २५.०० |
| २० | प्रभाग क्र.९ मधील बनारसी पान हाऊस ते यादव हाऊस, अमर हाऊस मध्ये एम-२५० ने रस्ता व नाला नव्याने बनविणे. | २०.०० |
| २१ | पॅनल क्र.१२ मध्ये प्रविण वाईन शॉप ते शीवमंदीर रोड फॉरवर लेन हा रस्ता एम.२५० सि.सि. ने बनविणे. | ४०.०० |

| | | |
|---|---|---|
| २२ | पॅनल क्र.१४ मध्ये राजनिकेतन सोसायटी ते सिंध नॅशनल शाळेपर्यंत रस्ता व बॅरेक नं.१२९८ चा नाला सि.सि. करणे. | १०.०० |
| | एकूण रक्कम रुपये | ५००.०० |

मा.अवर सचिव, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र.धोरण/२०१७ क्र.धोरण/२०१७/ प्र.क्र.९६/नवि-१६ दिनांक १२/१२/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयी सुविधांचा विकास योजनेअंतर्गत मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्यात आली आहेत .सदर मार्गदर्शक तत्वांतील अनु.क्र.६ नुसार योजनेअंतर्गत तांत्रिक मान्यता दिलेल्या प्रस्तावांची जिल्हास्तरीय समितीमार्फत छाननी होणे आवश्यक आहे. तसेच प्रस्तावासोबत आवश्यक प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

परंतू तत्पुर्वी सदर प्रस्तावांकरीता महापालिकेचा महासभा ठराव होणे आवश्यक आहे. तद्नंतर वरील कामांचे प्रस्ताव अंदाजपत्रक, तांत्रिक मान्यता व आवश्यक त्या प्रमाणपत्रांसह जिल्हास्तरीय समितीकडे छाननी करीता सादर करण्यात येईल.

तरी "महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयीसुविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद या योजनेअंतर्गत " वरील तक्त्यातील एकूण २२ कामांच्या रु.५.०० कोटी खर्चाच्या प्रस्तावास मा.महासभेच्या मान्यतेकरीता प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र:१५** **दिनांक : १७/०९/२०२१**

**सुचकाचे नाव :— श्री. कलवंतसिंह सोहता**

**अनुमोदकाचे नाव :— श्री. शंकर लुंड**

**ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणेतसेच सभेत सदस्यांनी सुचविलेप्रमाणे कामात अंशत: बदल करुन उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील मुलभूत सोयी सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद योजनेअंतर्गत सदरकामासाठी निधीवितरित करणेस मान्यता देऊन जिल्हास्तरीय समितीकडे त्वरीत पाठविण्यास प्रशासनास निर्देश देत आहे.**

**या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.**

**सुचकाची** सही/—

**अनुमोदकाची** सही/—

सर्वानुमते

**महापौर / पीठासीन अधिकारी**

**सर्वसाधारण महासभा**

**उल्हासनगर महानगरपालिका**

---

**महापालिका सचिव:—** विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

————————————————————————————————————————

⇨ **विषय क्र. ६ :— उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील मुलभूत सोयी सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद योजनेअंतर्गत निधी वितरीत करणेबाबत. ..(सन २०२०-२१ साठी लेखाशिर्ष (२२१७ ०९१३) खाली रक्कम रु.०.५ कोटी**

————————————————————————————————————————

**काही सदस्य :—**पास—पास......

**<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी:—</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषयक्र.६ : <u>उल्हासनगर महानगरपालिका उल्हासनगर</u>**

**उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील मुलभूत सोयी सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद योजनेअंतर्गत निधी वितरीत करणेबाबत... (सन २०२०-२१ साठी लेखाशिर्ष (२२१७ ०९१३) खाली रक्कम रु.५.०० कोटी.**

महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयीसुविधांचा विकास योजनेअंतर्गत खालील कामांकरीता रक्कम रुपये ५.०० कोटी इतक्या निधीस शासन निर्णय क्र.संकीर्ण २०२१/प्र.क्र.११८ (१२) / न.वि. १६ दिनांक ११ ऑगस्ट, २०२१ अन्वये मान्यता प्राप्त झाली आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | रक्कम रु. (लक्ष) |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.१ (क) येथील शिवनेरी नगर, वाल्मिकी नगर, तानाजी नगर परिसरातील नाली गटार सी.सी. करणे | २५.०० |
| २ | प्रभाग क्र.१० (ड) पवईचौक, मीराघाट येथे शाळा क्र.९ व २९ शाळमेसमोरील रस्ता एम २५० पध्दतीने तयार करणे | २५.०० |
| ३ | प्रभाग क्र.१० (ब) शांतीनगर शिवसेना शाखेसमोरील मोडकळीस आलेले समाज मंदिर नविन आस्सीस पध्दतीने तळ + २ मजले तयार करणे | २५.०० |
| ४ | प्रभाग क्र.१३(ड) मध्ये ब्राम्हणपाडा, नॅशनल शाळेच्या बाजूचा नाला, पाच पांडव येथील नाली नव्याने बनविणे | २०.०० |
| ५ | प्रभाग क्र.४ (ब) मध्ये मोहटा देवी मंदिरा समोर अर्धवट अवस्थेत असलेले स्व. गोपीनाथ मुंडे सभागृह पूर्ण करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देणे. | २५.०० |
| ६ | प्रभाग क्र.१३ (क) अश्वमेघ अपार्टमेंट ते पाणी पुरवठा कार्यालय पर्यंत सी.सी. रोड व दोन्ही बाजूस बंदिस्त गटार बनविणे | २५.०० |
| ७ | प्रभाग क्र.१४ मधील बॅरेक नं.१३६८, उल्हास विद्यालय शाळास ते बॅरेक नं.१३५६ परिसरातील नाली व गटार नव्याने सी.सी. करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देणे. | १०.०० |
| ८ | प्रभाग क्र.१४ मधील बॅरेक नं.१३७२ ते १३७३ परिसरातील नाली व गटार नव्याने सी.सी. करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देणे. | १०.०० |
| ९ | प्रभाग क्र.१३(क) मध्ये सार्वजनिक मित्रमंडळ कार्यालय ते मंदार अपार्टमेंट हा रस्ता एम-२६० ने सी.सी. करणे | २०.०० |
| १० | प्रभाग क्र.४ (ड) पॅनल क्र.४ मधील डॉ. आंबेडकर नगर, श्री गोपाळ भागवत यांच्या मागचा परिसर, गवळीपाडा समाज मंदिराच्या मागे, गौतमनग, करोतिया नगर, व आजूबाजूच्या परिसरात नव्याने सी.सी. पॅसेज व नाली बनवण्यासाठी निधी उपलब्ध करुन देणे. | २०.०० |
| ११ | प्रभाग क्र.४ (ड) मध्ये २ समाजमंदिर उभारण्यासाठी निधी उपलब्ध करुन देणे. | २५.०० |
| १२ | प्रभाग क्र.१४ (अ) मधील श्री. सांडविळकर दुकानापासुन ते उपाध्याय येवचे घरापर्यंत व कांदवळकर ते तलवळेकर यांच्या घरापर्यंतचा रस्ता सी.सी. करणे तसेच नाली व सी.सी. पॅसेज बनविणे. | २०.०० |

| | | |
|---|---|---|
| १३ | प्रभाग क्र.४ (ब) मध्ये केणी चाळ ते विठ्ठलमंदिर पासून श्री. प्रमोद वणवे यांच्या घरापर्यंत ४ इंच पाण्याची लाईन टाकणे सी.सी. रोड व नाली बनविणे संत भगवानबाबा कॉलनी परिसरातील नाली व गटार नव्यने सी.सी. तयार करणे | २५.०० |
| १४ | प्रभाग क्र.१३ (अ) मधील श्री. राजा नाईक यांच्या घरापासून श्री. राहुल सोनावणे यांच्या गल्लीपर्यंत नाली व गटार नव्यान सी.सी. करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देणे | २०.०० |
| १५ | प्रभाग क्र.१० (अ) मधील जे.पी. बिस्कीट कंपाउंड ते आनंद पवार यांच्या घरापासून विठ्ठलवाडी ते पवई उल्हासनगर-३ परिसरातील रस्ते व नाली, गटार नव्याने सी.सी. कलवर्ट (साकव) बनविणे | २०.०० |
| १६ | प्रभाग क्र.१० (क) मधील भैयासाहेब आंबेडकर सोसायटी, हिराघाट, पंचशिल नगर व भौजी परिसरातील नाली व गटार नव्याने सी.सी. नाली व कलवर्ट (साकव) बनविणे | २०.०० |
| १७ | प्रभाग क्र.०३ (ब) येथे पॅनपल क्र.०९ येथील महात्मा फुलेनगर येथे रस्ता व गटार तयार करणे | २५.०० |
| १८ | प्रभाग क्र.०५ (क) येथील पॅनल क्र.२० गायकवाडापाडा बॅरेक नं.२०७५, २०७२ रस्ता व गटार तयार करणे | २५.०० |
| १९ | उल्हासनगर-२ येथील आझाद नगर दिनेश रॉय यांच्याघरापासून समाजमंदिर बांधणे | १०.०० |
| २० | उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.१ (ड) टिळक नगर शिवसेना शाखेसमोर पाण्याची टाकीजवळ समाजमंदिरचे उर्वरित काम व उदयान विकसित करणे | २०.०० |
| २१ | उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील पॅपल क्र.२० मधील बॅरेक नं.२१००, २९०१, २१०२ व २१०३ येथे सी.सी रस्ता व नाली खन्ना कंपाउंड ते शिवाजी चाळ येथील मोठा नाला व सी.सी. रोड गायकवाड पाडयातील सी.सी. रस्ता व नाला तयार करणे | २०.०० |
| २२ | उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील पॅनल क्र.१४ (ब) मधील शितलदेवी भागा मंदिर, चारंगबाबा नगर येथे समाजमंदिर तयार करणे | २५.०० |
| २३ | उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील पॅनल क्र.१४ (क) मधील जागृती कॉलनी साईबाबा मंदिर जवळ सभा मंडप व या परिसरात सी.सी. पॅसेज व नाली नव्याने बनविणे | १०.०० |
| २४ | उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील पॅनल क्र. ८ मध्ये सतनाम कॉलनी येथे सी.सी. गटार व तील्लुमल सोसायटी येथे संरक्षण भिंत तयार करणे | ३०.०० |
| २५ | उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील पॅनल क्र.७ मध्ये हनुमान नगर शिवसेना शाखेसमोर समाजमंदिर बांधणे | |
| | **एकुण रक्कम रु. (लक्ष)** | **५००.००** |

मा.अवर सचिव, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र.धोरण/२०१७ क्र.धोरण/२०१७/ प्र.क्र.९६/नवि-१६ दिनांक १२/१२/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयी सुविधांचा विकास योजनेअंतर्गत मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्यात आली आहेत .सदर मार्गदर्शक तत्वांतील अनु.क्र.६ नुसार योजनेअंतर्गत तांत्रिक मान्यता दिलेल्या प्रस्तावांची जिल्हास्तरीय समितीमार्फत छाननी होणे आवश्यक आहे. तसेच प्रस्तावासोबत आवश्यक प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

परंतू तत्पुर्वी सदर प्रस्तावांकरीता महापालिकेचा महासभा ठराव होणे आवश्यक आहे. तद्नंतर वरील कामांचे प्रस्ताव अंदाजपत्रक, तांत्रिक मान्यता व आवश्यक त्या प्रमाणपत्रांसह जिल्हास्तरीय समितीकडे छाननी करीता सादर करण्यात येईल.

तरी "महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयीसुविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद या योजनेअंतर्गत " वरील तक्त्यातील एकूण २५ कामांच्या रु.५.०० कोटी खर्चाच्या प्रस्तावास मा.महासभेच्या मान्यतेकरीता प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र: १६** **दिनांक : १७/०९/२०२१**

**सुचकाचे नाव :— श्री. कलवंतसिंह सोहता**

**अनुमोदकाचे नाव :— श्री. शंकर लुंड**

**ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणेतसेच सभेत सदस्यांनी सुचविलेप्रमाणे कामात अंशत: बदल करुन उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील मुलभूत सोयी सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद योजनेअंतर्गत सदर कामासाठी निधीवितरित करणेस मान्यता देऊन जिल्हास्तरीय समितीकडे त्वरीत पाठविण्यास प्रशासनास निर्देश देत आहे.**

**या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.** **सुचकाची** सही/—

**अनुमोदकाची** सही/—

**सर्वानुमते**

**महापौर / पीठासीन अधिकारी**
**सर्वसाधारण महासभा**
**उल्हासनगर महानगरपालिका**

---

**सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी:-** सचिव मॅडम मी पण पत्र दिले आहे.

**महापालिका सचिव:-** बर सर मी त्याच्या समावेश करेल ज्यांची ज्यांची पत्र आले आहेत आणि या रेकॉर्डीगमध्ये एकूण सुद्धा समोवश करेल मी. तुम्ही विभागाला पत्र गेल्यावर बदल करता येणार नाही तसे नाव नमुद करणे. संबंधित विभागाने याची नोंद घ्यावी व तसे कळवावे.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी:-** सचिव मॅडम विषय क्रम. ७ मध्ये..

**महापालिका सचिव:—** विषय क्र. ७ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ७:— उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील मुलभूत सोयी सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद योजनेअंतर्गत निधी वितरीत करणेबाबत. ..(सन २०२०-२१ साठी लेखाशिर्ष (२२१७ ०९१३) खाली रक्कम रु.०.५ कोटी.**

---

**<u>महापालिका सचिव:-</u>** हा पण सेम विषय आहे या मध्ये मा. सदस्या कविता पंजाबी  मॅडम यांनी पण पत्र दिले आहे. पॅनल क्र. ११,  ६६९ ऐवजी ९६९, ९६७ एकता कॉलनी परिसरात नाली व सी सी पॅसेज व ड्रेन बनविणे व त्यावर कवर बसविण्या करीता १० लाख निधी स्वतंत्र पणे मंजूर करणे बाबत हे पत्र आहे.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>** सचिव मॅडम आपले नगरसेविका कविता पंजाबीजींचे एक पत्र आहे अ,क्र,९ मध्ये ज्याचा निधी २० लाख आहे ज्यामध्ये त्यांनी सोनारा टॉकीज लिहीले आहे, सोनारा टॉकीज नाही सोनारा हॉल आहे. सोनारा हॉल महान अपार्टमेंटच्या पाठीमागे सीसी पॅसेज १० लाख व एकता कॉलनी १० लाख, दोन पॅनलचे जोडून दिले आहे, हा माझ पॅनल नं. आहे २, आणि पॅनल नं कविता लाल पंजाबी मॅडमचा आहे.दोघांचे दहा दहा लाखचे आहे. एक तर सोनारा टॉकीज नाही सोनारा हॉल आहे.महान अपार्टमेंटच्या पाठीमागे या दोघांना वेगळे करण्यात यावे.

**<u>सदस्य, श्री. शंकर लुंड:-</u>** ओके.

**<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-</u>** सचिव मॅडम माझा कोणताही फंड नाही आहे, मी लेटर देतो ते कोणचे फिरवून माझ्या प्रभागमध्ये  टाकण्यात यावा.

**<u>उप महापौर, श्री.भगवान भालेराव:-</u>** अरूणराव परिस्थिती अशी आहे की, काही ठिकाणी पत्रे अशी आलेली आहेत की जागाच बदली करा,जागा कशी काय बदली करता येईल कामांची ? वरुन आलेली प्रशासकिय मान्यता आहे त्याला.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>** जागा बदली नाही करू शकत, जास्त बदल करु शकत नाही,  करेक्शन करू शकतात. माझ्या पॅनल ला चुकीचा पॅनल नं. टाकला आहे. सोनारा हॉल पाहीजे, करेक्शन करा.

**<u>सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी:-</u>** ज्या ठिकाणी कामे मंजूर झाली असतील दुसऱ्या निधीतून तिकडे तर बदल करावेच लागतील ना

**<u>महापालिका सचिव:-</u>** प्रशासनाचे म्हणने आहे की शासनाकडून नावे आली तेवढीच होतील बदल करता येणार नाही. बाकी मंजूर करता येणार नाही.फक्त ॲड्रेस चुकीचा झाला असेल किंवा पॅनल चुकून झाले असेल तेवढेच बदल करता येतील. पण त्यासाठी तुम्ही शहर अभियंता यांना पत्र द्या.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-</u>** जे काम मंजूर झालेले आहे ते ॲडजस्ट करायचे आहे, त्याच वार्डात दुसऱ्या ठिकाणी करायचे आहेत. फक्त ठिकाण चेंज करायचा आहे, वार्ड तोच राहील.

**<u>सदस्य, श्री. शंकर लुंड:-</u>** चला पास..

**<u>महापालिका सचिव:-</u>** प्रशासनाला सांगा, ना स्टेटमेंट दयायला लोकेशन....

**<u>सदस्य, श्री. अरुण आशान:-</u>** मा.महापौरजी, मा. आयुक्त साहेब, मा.उप महापौर साहेब, सचिव मॅडम, याच्यामध्ये काही तांत्रिक दृष्टया काही चुका आहेत आणि काही ठिकाणी कामे जी झाली ती सांगतायेत ती त्या प्रभागातील आहेत, मागे पुढे आहेत त्यामध्ये थोडा तत्वत: ,अंशत: बदल करायचा आहे. अंशत: बदल करून ते आपल्याला त्यामध्ये टाकायचे आहे त्याला काही हरकत नाही असे मला वाटते.

**<u>आयुक्त,डॉ. राजा दयानिधी:-</u>** सन्मानीय अध्यक्ष, सर्व सन्माननिय सदस्य सद्या सर्व कामे वरून प्रमाणसोबत आलेले कामे आहेत त्या कामामध्ये आपण मोठा काही बदल करता येणार नाही,

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-</u>** आयुक्त साहेब आवाज येत नाही, मोठयाने बोला.

**<u>आयुक्त,डॉ. राजा दयानिधी:-</u>** सन्माननिय अध्यक्ष महोदय, सर्व सन्माननिय सदस्य सर्व कामे जी आहेत, ते वरुन पास होऊन आलेली आहेत, तर त्या कामांमध्ये आपण जास्तीचा बदल करता येणार नाही. मात्र त्यामध्ये काही लहान करेकशन असतील तर आपण करू शकतो परंतू मोठ्या प्रमाणात काम व कामाचे बदल करणे,

एका पॅनलचे काम दुसऱ्या पॅनलमध्ये घेणे असे नाही करता येणार परंतू समजा ते जर फारच आवश्यकता वाटेत असेल तर आपण एक काम करू शकतो तसा आपण करून एक आपल्याकडे फेरविचारसाठी पाठवाव लागेल, हा एक मार्ग आहे.

**सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी:-** मा. आयुक्त साहेब, ही कामे आम्ही सुचविताना ४,५,6 महिने आधीपासून सुचवलेली होती त्यामुळे ही कामे येण्या अगोदर दुसऱ्या निधीमधून आमच्याकडे कामे झाली आहेत, म्हणून ही कामे आमच्याच प्रभागामध्ये बाजूला करायची आहे. असे लोकेशन बदली करायचे आहे त्यामध्ये काय अडचण आहे. मा.महापौरजी, अंशत: बदल असतील ते झाले पाहीजेत. आवाज येत आहे का?

**सदस्य, श्री. अरुण आशान:-** मा.महापौरजी, मा.उप महापौर साहेब,आयुक्त साहेब, सचिव मॅडम

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:-** जी लोकेशन आहेत त्यामध्ये दुसरी दोन तीन सुद्धा अॅड करा, ती पण राहू द्या, तो वार्ड नं तोच राहील, पहिले वाले लोकेशन लिहलेले राहू द्या दुसरे दोन तीन लोकेशन पण जोडून द्या मग तूम्ही काम इकडे करा की तिकडे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-** असे नाही आहे, असे नाही आहे जिथे काम झाले आहे ते पूर्ण करावे लागतील ना?

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:-** भाऊ तूमचे जिथे काम झाले आहे ते राहू द्या लोकेशन, दुसरी दोन तीन पण टाका, मग जिथे पहिले वाले लोकेशन आहे त्या सोबत दुसरे पण टाका.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-** फक्त लोकेशन बदली करा.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:-** त्याच्यामध्ये ३ लोकेशन असतील तर ६ करा, दोन असतील तर ४ करा, प्रभाग तोच राहू द्या.

**महापालिका सचिव:-** सितलानी सर आपण बोला सर यामध्ये काय होऊ शकते हे ते जे बोलत आहेत.

**शहर अभियंता, श्री.महेश सितलानी:-** मा. महापौर, उप महापौर, मा. आयुक्त साहेब, आपण या मध्ये मोठे बदल नाही करू शकत फकत छोटे बदल करू शकतो, जसे पॅनल नं. झाला, छोटे मोठे लोकेशन झाले, जसे समाज मंदिर आहे, समाज मंदिर आम्ही गलिच्छ वस्तील मध्ये टाकले आहे तर रिपीट होत आहे, रिपीट झाल्यामुळे लोकेशन बदलत आहे, एक दोन कामच असे आहे बाकी बरोबर आहे सर.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-** बरोबर ,बरोबर

**सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी:-** बरोबर तसेच करतो आहे

**सदस्य, श्री. शंकर लुंड:-** पास.. पास...

**सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी:-** पास..

**महापालिका सचिव:-** सदर ठराव मंजूर करत आहे, शहर अभियंतांनी स्टेटमेंट दिले आहे ते टाकण्यात येईल आणि त्यानुसार सदर ठराव मंजूर करण्यात येत आहे पास? आपण तसे त्या बदल पत्र शहर अभियंता यांच्याकडे द्या.

**सदस्य, श्री. राजेंद्रिसिंह भुल्लर:-** पास.. पास..

**सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी:-** इतिवृत्ताची वाट न पाहता.

**महापालिका सचिव,:-** इतिवृत्ताची वाट न पाहता, पास..

**काही सदस्य :—**पास—पास……

**<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी:—</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ७ :<u>उल्हासनगर महानगरपालिका उल्हासनगर</u>**

**उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील मुलभूत सोयी सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतूदयोजने अंतर्गत निधी वितरीत करणेबाबत... (सन २०२०-२१ साठी लेखाशिर्ष (२२१७ ०९१३) खाली रक्कम रु.५.०० कोटी-**

## प्रस्तावना

महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयीसुविधांचा विकास योजनेअंतर्गत खालील कामांकरीता रक्कम रुपये ५.०० कोटी इतक्या निधीस शासन निर्णय क्र.संकीर्ण २०२१/प्र.क्र.११८ / न.वि. १६ दिनांक ११ ऑगस्ट, २०२१ अन्वये मान्यता प्राप्त झाली आहे.

| अ.क्र | कामाचेनाव | रक्कमरु.(लक्ष) |
|---|---|---|
| १ | उल्हासनगरमहानगरपालिकाक्षेत्रातीलपॅनलक्र. १४बॅ. क्र.१३०८जवळसमाजमंदिरबांधणे. | २०.०० |
| २ | उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील पॅनलक्र.१४ (ब) सार्वजनिक गणेश उत्सव मैदान ते भोईर यांचे घरापासून खरे यांच्या घरापर्यंत सी.सी. नाली व सार्वजनिक गणेश उत्सव मैदान ते पार्किंग सार्वजनिक शौचालय परिसरात सी.सी. नाली तयार करणे. | २०.०० |
| ३ | उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील पॅनल क्र.६ (क) मधीलबॅ. क्र233, 244, 446, 326, 327 येथेसी.सी रोड व नाली तयार करणे. | १०.०० |
| ४ | उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील मधील6 (क) बॅ. क्र. 298,299,307,308येथेसी.सी. नाली तयार करणे. | १०.०० |
| ५ | उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील पॅनल क्र. 8 (ब) शिवगंगा रोड हॉस्पिटल परिसरात सी.सी. रोड तयार करणे. | १०.०० |
| ६ | उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील पॅनल क्र. 18 (अ) किशोर किराणा दुकानापासून आकाश जिभपर्यत व करपानगर येथील शौचालयापासून ते शाळेपर्यंत बुद्धविहारापर्यंत सी.सी. रोड तयार करणे. | २५.०० |
| ७ | उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील पॅनल क्र. दरामजपो आश्रम ते पशुधारीपर्यंत 250 सी सी रोड तयार करणे. | २०.०० |
| ८ | उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील बॅ.क्र.64,65,66, 62, 63,73, 74 या परिसरात सी.सी. पॅसेज तयार करणे. | १०.०० |
| ९ | सोनारा टॉकीस 3व1पाठीमागे नाली व महान अपार्टमेंट पाठीमागे नाली सी. सी. करणे तसेच बॅ. क्र669, 967, एकता कॉलनी व परिसरात नाली वसी.सी. पॅसेज, ड्रेन, नाली त्यावर कवर्स बसविणे. | २०.०० |
| १० | उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील शिवाजीनगर आणि गणेशनगर, टिळकनगर खेती सेक्शन, स्यामसुंदर आणि मातासागर जवळील विविध परिसरात तसेच बॅ. क्र943, 957मधील नारायणदास हॉस्पिटल व बॅ. क्र950 विविध परिसरात सीसीपॅसेज, ड्रेन, नाली आणि चेंबर कव्हर बसविणे. | १५.०० |
| ११ | उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील पॅनल क्र18 मधीलसमतानगर गडलिंग हाउस ते वरठीहाउस पर्यंत 250 ेसी.सी. रोड तयार करणे. | १५.०० |
| १२ | उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील गोल मैदान गार्डन सुशोभीकरण करणे. | २०.०० |
| १३ | उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील पॅनल क्र. 12 (ब) रेणुका सोसायटी गल्ली नं. 1 येथे समाज मंदिर, बांधणे. | १५.०० |

| | | |
|---|---|---|
| १४ | सहाराजा चाळ ते बावडीपर्यंत सी.सी. नाला तयार करणे. | १०.०० |
| १५ | जयस्वाल पाडा समोर सी.सी. नाली तयार करणे. | १०.०० |
| १६ | उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील पॅनल क्र.6 हेमराज डेअरी महान अपार्टमेंट ते मीरा अपार्टमेंट रोड 290 सी.सी. करणे. | २०.०० |
| १७ | उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.2मधील हनुमान नगर मस्जिद जवळ सी.सी. पॅसेज/चेकर्स लादी व नाली बनविणे. | १५.०० |
| १८ | ऊल्हासनगरमहानगरपालिकाक्षेत्रातीलप्रभागक्र. 2मधीलदुर्गानगरयेथेसी.सी. पॅसेज/चेकर्सलादीव नाली बनविणे. | १०.०० |
| १९ | उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र. 1 (ब) मधील बॅ. क्र. 151 व बॅ. क्र. 152 येथे सी.सी. व नाली व बौद्धवाड़ा या ठिकाणी सी.सी. व नाली बनविणे. | १५.०० |
| २० | उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र. 1 (ब) मधील तानाजीनगर, ओमसाई नगर, शहाड गावठाण, बौद्धवाडा व कातकर वाडी या परिसरात एल ई डी लाईट पोलसह बसविणे. | १०.०० |
| २१ | उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.7 (अ) मधील रमाबाई आंबेडकरनगर, येथेसी.सी. पॅसेज/चेकर्स लादी व नाली बनविणे. | १५.०० |
| २२ | उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.7 (अ) मधील खिचन पाडा येथे सी.सी. पॅसेज/चेकर्म लादी व नाली बनविणे. | १०.०० |
| २३ | उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील पॅनल क्र. 10मीनाताई ठाकरे प्रवेशद्वारपासून ते गणपती मंदिरपर्यंत मुख्य रस्त्याच्या बाजूला असलेला नाला बनविणे. | २०.०० |
| २४ | उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र. 19उल्हासनगर क्र.5 येथे वीर तानाजीनगर येथील अण्णाभाऊ साठे समाजमंदिरच्या उर्वरित काम करणे. | २०.०० |
| २५ | उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र. 19उल्हासनगर क्र.6 येथे शिव कॉलनी येथे सी.सी. पायवाट व गटार बनविणे. | १०.०० |
| २६ | उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र. 19उल्हासनगर क्र.6 येथे क्रांतीनगर येथे सी.सी. गटार व पायवाट बनविणे. | १०.०० |
| २७ | उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र. 19उल्हासनगर क्र.5 येथे इंदिरानगर येथील समाज मंदिराचे सुशोभीकरण व वाचनालय तसेच सी.सी. पायवाट तयार करणे. | १०.०० |
| २८ | करणे. उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र. 19 उल्हासनगर क्र.5 येथे वीर तानाजीनगर येथील अण्णाभाऊ साठे समाजमंदिर मधील सामग्री पुरविणे. | १०.०० |
| २९ | उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र. 19उल्हासनगर क्र. 5 येथे विठ्ठलनगर येथे सी.सी. पायवाट व नाले तयार करणे. | १०.०० |
| ३० | उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र. 19उल्हासनगर क्र.5 येथे नेहरूगार्डन येथे ओपन जिम बनविणे. | १०.०० |
| ३१ | उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र. 9उल्हासनगर क्र.6 येथे कैलाश कॉलनी येथील धर्मवीर आनंद [illegible] | २०.०० |
| ३२ | उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र. 15 (अ) मधील सी.सी. रस्ते व नाली व इत्यादी विकास कामे करणे. | २०.०० |
| ३३ | उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र. 15 (ब) मधील सी.सी. रस्ते व नाली व इत्यादी विकास कामे करणे. | २०.०० |
| ३४ | उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्रमांक15, क मधील सी सी रस्ते व नाली व इत्यादी विकास कामे करणे. | १५.०० |
| | **एकुण रक्कम रु. (लक्ष)** | **५००.००** |

मा.अवर सचिव, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र.धोरण/२०१७ क्र.धोरण/२०१७/ प्र.क्र.९६/नवि-१६ दिनांक १२/१२/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयी सुविधांचा विकास योजनेअंतर्गत मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्यात आली आहत .सदर मार्गदर्शक तत्वांतील अनु.क्र.६ नुसार योजनेअंतर्गत तांत्रिक मान्यता दिलेल्या प्रस्तावांची जिल्हास्तरीय समितीमार्फत छाननी होणे आवश्यक आहे. तसेच प्रस्तावासोबत आवश्यक प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

परंतू तत्पुर्वी सदर प्रस्तावांकरीता महापालिकेचा महासभा ठराव होणे आवश्यक आहे. तद्नंतर वरील कामांचे प्रस्ताव अंदाजपत्रक, तांत्रिक मान्यता व आवश्यक त्या प्रमाणपत्रांसह जिल्हास्तरीय समितीकडे छाननी करीता सादर करण्यात येईल.

तरी "महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयीसुविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद या योजनेअंतर्गत " वरील तक्त्यातील एकूण ३४ कामांच्या रु.५.०० कोटी खर्चाच्या प्रस्तावास मा.महासभेच्या मान्यतेकरीता प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र: १७** **दिनांक : १७/०९/२०२१**

**सुचकाचे नाव :— श्री. कलवंतसिंह सोहता**

**अनुमोदकाचे नाव :— श्री. शंकर लुंड**

**ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणेतसेच सभेत सदस्यांनी सुचविलेप्रमाणे कामात अंशत: बदल करुन उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील मुलभूत सोयी सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद योजनेअंतर्गत सदर कामासाठी निधीवितरित करणेस मान्यता देऊन जिल्हास्तरीय समितीकडे त्वरीत पाठविण्यास प्रशासनास निर्देश देत आहे.**

**या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.**

**सुचकाची** सही/—

**अनुमोदकाची** सही/—

**सर्वानुमते**

**महापौर / पीठासीन अधिकारी**

**सर्वसाधारण महासभा**

**उल्हासनगर महानगरपालिका**

---

**महापालिका सचिव:—** विषय क्र. ८ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ८:— निरुपयोगी साहित्याची विल्हेवाट/विक्री लावण्या करिता मागविलेल्या निविदेस मंजुरी मिळणे बाबत.**

---

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-** पास.. पास.. इतिवृत्ताची वाट न पहात.

**महापालिका सचिव,:-** हा पण विषय पास इतिवृत्ताची वाट न पाहता

**काही सदस्य :—**पास—पास……

**महापौर तथा पीठासीन अधिकारी:—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ८:– निरुपयोगी साहित्याची विल्हेवाट/विक्री लावण्याकरिता मागविलेल्या निविदेस मंजुरी मिळणेबाबत.**

**प्रस्तावना**

सादर करण्यात येते की, उल्हासनगर महानगरपालिका विद्युत अभियांत्रिकी विभागातील निरुपयोगी साहित्याची विल्हेवाट/विक्री करण्याकरिता सिलबंद निविदा अटी व शर्तीच्या अधीन राहुन निविदा मागविण्यात आल्या होत्या, सदर कामाच्या साहित्याची यादी व तपशिल बाबत मा. आयुक्त सा.,यांच्या दिनांक २४/०६/२०२१ रोजीच्या मान्यतेने जनसंपर्क अधिकारी यांना निविदा वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द करण्यासाठी देण्यात आल्या होत्या तसेच सिस्टिम ॲनॅलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभागाला महानगरपालिकेच्या अधिकृत संकेत स्थळावर दर्शविण्यासाठी प्रत देण्यात आली त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**तक्ता क्र. १**

| | | |
|---|---|---|
| १ | प्राकलनीय खर्च | रुपये २,७२,६३६/- |
| २ | निविदा प्रसिध्द केलेली वर्तमानपत्र | १) जागरुक टाईम्स २) सामना ३) टाऊन दर्शन |
| ३ | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक ०६/०७/२०२१ |
| ४ | निविदा विक्री कालावधी | दिनांक ०६/०७/२०२१ ते १५/०७/२०२१ |
| ५ | भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम दिनांक | दिनांक १५/०७/२०२१ रोजी सायंकाळी ०५:०० वाजता |
| ६ | निविदेचा तांत्रिकी/आर्थिक भाग उघडण्याची दिनांक | दिनांक १६/०७/२०२१ रोजी सकाळी ११:३० वाजता |
| ७ | विक्री केलेल्या निविदांची संख्या | ०६ |
| ८ | प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | ०५ |

दिनांक १६/०७/२०२१ रोजी सकाळी ११:३० वाजता लेखा अधिकारी, सहा. मुख्य लेखा परिक्षक, कार्यकारी अभियंता (विद्युत) व कनिष्ठ अभियंता (विद्युत) यांच्या उपस्थितीत विद्युत विभागामध्ये निविदेचा तांत्रिक लिफाफा भाग-१ मध्ये नमुद केलेल्या निविदाकारांच्या कागदपत्रांची निविदा छाननी समितीने छाननी केली असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

**तक्ता क्र .२**

| अ.क्र | निविदाकाराच्या निविदेमधील बाबी | मे. अब्दुल्लाह खान स्क्रॅप ट्रेडर्स | मे. दिपक ट्रेडर्स | मे. गोल्डन स्क्रॅप एंटरपा्रयजेस | मे. शाहीद रझा खान | मे.लियाकत गुलाब पिंजारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | EMD (अनामत रक्कम) भरणा | होय | होय | होय | होय | होय |
| २ | जी.एस.टी. स्वाक्षरीचे प्रमाणपत्र | होय | होय | होय | होय | होय |
| ३ | पॅन कार्डचे स्वाक्षरीचे प्रमाणपत्र | होय | होय | होय | होय | होय |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | संस्था/ संस्थेच्या मालकाचे अधिकृत स्वाक्षरीचे प्रमाणपत्र | होय | होय | होय | होय | होय |
| ५ | Self Declaration on Affidavit of Rs ५००/- Stamp Annexure -१ | होय | होय | होय | होय | होय |
| ६ | पात्र/ अपात्र | पात्र | पात्र | पात्र | पात्र | पात्र |

सदर निरुपयोगी साहित्याची विल्हेवाट/ विक्री करण्याकरिता प्राप्त निविदांची ई निविदा कमिटी यांचे दि.१६/०७/२०२१ च्या आदेशान्वये निविदेचा दुसरा भाग आर्थिक बाबीचा मा.अति.आयुक्त (निविदा अध्यक्ष) निवड समिती सदस्य मुख्य लेखा अधिकारी, मुख्य लेखा परिक्षक, सहा. मुख्य लेखा परिक्षक,कार्यकारी अभियंता (विद्युत) व कनिष्ठ अभियंता (विद्युत) यांचे उपस्थितीत उघडण्यात आला. तांत्रिक बाबींमध्ये पात्र झालेले निविदाधारक१) मे.अब्दुल्लाह खान स्क्रॅप ट्रेडर्स २) मे.दिपक ट्रेडर्स ३) मे.गोल्डन स्क्रॅप एटंरप्रायजेस ४) मे.शाहीद रझा खान ५) मे.लियाकत गुलाब पिंजारी यांनी भरणा केलेल्या निविदेतील दर/रक्कम याबाबतचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| Sr.No. | Descr. of Un-serviceable Articles | Unit | Appx Qty. | Expected cost Per Unit in Rs | M/s. Abdullah khan Scrap Traders. Per Unit in Rs | M/s. Deepak Traders Per Unit in Rs | M/s. Golden Scrap Enterprises Per Unit in Rs | M/s. Shahid Raza Khan Per Unit in Rs | M/s. Lyakat Gulab Pinjari Traders Per Unit in Rs | Amount of Highest Rate Qty. in Rs. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | All Types of 40 Watt Tube Lights (Scrap) | Nos | 100 | 6.30 | 6.40 | 6.35 | _ | **7.00** | 6.50 | **700** |
| 2 | All Types of Sodium Bulb of Various Wattages (Scrap) | Nos | 1255 | 7.40 | 7.50 | 7.50 | _ | **8.10** | 7.80 | **10165.50** |
| 3 | All Types of Igniters (Scrap) | Nos | 305 | 5.00 | 5.10 | 5.50 | _ | **6.50** | 5.50 | **1982.50** |
| 4 | All Types Of Copper Chokes (Scrap) | Kgs. | 1200 | 78.00 | 121.00 | **151.00** | 80.00 | 82.00 | 84.00 | **181200** |
| 5 | All Types Of HG/M.S/ G.I /Matalic /Pole etc. (Scrap) | Kgs. | 500 | 24.20 | **30.10** | 29.00 | 24.50 | 26.00 | 25.00 | **15050** |
| 6 | All Types of Kit-Kat Base (Scrap) | Nos | 60 | 42.50 | 43.50 | **50.00** | _ | 43.00 | 44.00 | **3000** |
| 7 | All Types of Flou.Tube Fitting/M.V.Fittings /S.V.Fittings. (Scrap) | Nos | 800 | 168.00 | 201.00 | **268.00** | _ | 172.00 | 175.00 | **214400** |
| 8 | All Types of PVC arm/unarm cable & wire (Aluminums.) (Scrap) | Kgs. | 90 | 37.50 | **48.00** | 40.00 | _ | 39.50 | 38.00 | **4320** |
| 9 | All Types of Telephone Instrument (Scrap) | Nos | 15 | 83.00 | 84.00 | 85.00 | _ | **87.00** | 84.00 | **1305** |
| 10 | All Types of Ceiling Fans & Stand fans (Scrap) | Nos | 12 | 163.00 | 175.00 | **263.00** | _ | 168.00 | 165.00 | **3156** |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **11** | **All Types of Tube starter / Bell / Holder / Ceiling Rose / MCB etc. (Scrap)** | **Kgs.** | **6** | 103.00 | 104.00 | **180.00** | _ | 105.00 | 104.00 | **1080** |
| **12** | **All Types of A/C Out door Units Split (Scrap)** | **Nos** | **1** | 5570.00 | 5580.00 | 5670.00 | _ | **5750.00** | 5600.00 | **5750** |
| **13** | **All Types of Indoor Unit of Split A/C (Scrap)** | **Nos** | **1** | 2200.00 | 2210.00 | **2500.00** | _ | 2350.00 | 2300.00 | **2500** |
| **14** | **All Types of Window A/C (Scrap) 1.5 Tons** | **Nos** | **1** | 3580.00 | **4000.00** | 3800.00 | _ | 3850.00 | 3700.00 | **4000** |
| | **Total Amount (Rs.)** | | | | | | | | | **448609** |

सदर दराच्या तुलनात्मक तक्त्यानुसार मे. अब्दुल्लाह खान स्क्रॅप ट्रेडर्स यांचे आयटम क्र. ५,८, व १४ चे प्राप्त झालेले दर हे ( मा. महासभा ठराव क्रमांक ०९ दिनांक १७/०२/२०२१ च्या मान्यतेनुसार) अपेक्षित दरापेक्षा जास्त आहे. मे. दिपक ट्रेडर्सयांचे आयटम क्र. ४,६,७, १०,११ व १३ चे प्राप्त झालेले दर हे ( मा. महासभा ठराव क्रमांक ०९ दिनांक १७/०२/२०२१ च्या मान्यतेनुसार) अपेक्षित दरापेक्षा जास्त आहे.मे. शाहीद रझा खान यांचे आयटम क्र. १,२,३,९ व १२ चे दर हे प्राप्त झालेले दर हे ( मा. महासभा ठराव क्रमांक ०९ दिनांक १७/०२/२०२१ च्या मान्यतेनुसार) अपेक्षित दरापेक्षा जास्त असुन प्राप्त झालेले दर हे अपेक्षित दरपोक्षा ही जास्त आहे. म्हणून निरुपयोगी साहित्याची .विल्हेवाट/ विक्री करण्याची मान्यता मिळावी.

वरील बाबी लक्षात घेता (१) ज्या आयटममध्ये ज्या मक्तेदाराचे दर जास्त आहे ते आयटम त्यांना उपलब्ध परिणाम दिनांक ३१ मार्च २०२२ पर्यंत जमा होणा-या निरुपयोगी विद्युत साहित्याची विल्हेवाट/विक्री करणेस मान्यता मिळावी. (२) ज्या सर्वाधिक दराच्या निविदाधारकाने साहित्य घेण्यास नकार दिला तर त्याची EMD फोरफिट करुन दुस-या जास्त दर प्राप्त असणा-या एजन्सीला अपेक्षित दरानुसार निरुपयोगी विद्युत साहित्याची विल्हेवाट/विक्री करण्यासाठी आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे.

सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ७९ (क) अन्वये मा.महासभेपुढे मंजुरीसाठी सविनय सादर.

**महासभा ठराव क्र: १८** **दिनांक : १७/०९/२०२१**

सुचकाचे नाव :— श्री. कलवंतसिंह सोहता

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे निरुपयोगी साहित्याची विल्हेवाट/विक्री लावण्याकरिता मागविलेल्या निविदेस खालीलप्रमाणे मान्यता देत आहे.

**तसेच**

(१) ज्या आयटममध्ये ज्या मक्तेदाराचे दर जास्त आहे ते आयटम त्यांना उपलब्ध परिणाम दिनांक ३१ मार्च २०२२ पर्यंत जमा होणा-या निरुपयोगी विद्युत साहित्याची विल्हेवाट/विक्री करणेस मान्यता मिळावी.

(२) ज्या सर्वाधिक दराच्या निविदाधारकाने साहित्य घेण्यास नकार दिला तर त्याची EMD फोरफिट करुन दुस-या जास्त दर प्राप्त असणा-या एजन्सीला अपेक्षित दरानुसार निरुपयोगी विद्युत साहित्याची विल्हेवाट/विक्री करण्यासाठी आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे.

या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव:—** विषय क्र. ९ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ९:— जी.आय.एस. आधारित मालमत्ता सर्व्हेक्षणव मॅपिंगकरणे व इतरकामे करणेबाबत मा.महासभा ठराव क्र. ३३, दि.०५ जुलै, २०१९ व मा. महासभा ठराव क्र.५९, दिनांक २४/०१/२०२० अन्वये घेण्यात आलेल्या निर्णयानुसार संभ्रम निर्माण झाल्यामुळे`सुस्पष्ट निर्णय देणेबाबत.**

---

**महापालिका सचिव:-** या बाबतीत राष्ट्रवादीचे गट नेता यांनी या बाबत पत्र दिले आहे ते मी मा.महापौरांना दिले आहे.यात त्यांनी काही मुद्दे टाकले आहेत.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-** काय पत्र आहे मॅडम?

**महापालिका सचिव:-** सर त्यांनी बरेच मोठे पत्र दिले आहे सर इंग्रजी मध्ये त्यात त्यांनी काय काय असावे लिहीले आहे, या विषयावर चर्चा सूरू करावी.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-** प्रशासनातर्फे कोण उत्तर देणार आहे? प्रशासनाने आपले मत मांडावे त्याच्यामध्ये काय आहे ते?

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-** विरोध, विरोध, विरोध.

**उपायुक्त कर,श्रीम.प्रियंका राजपूत:-** माझा आवाज येत आहे सर्वांना, सन्माननीय सभागृह आणि सन्माननीय सर्व सदस्यांना माझा नमस्कार प्रथम मी एक प्रेजेंटेशन देऊ इच्छिते आणि माझी विनंती आहे सर्व सदस्यांना कृपया हे प्रेजेंटेशन ऐकूण घ्यावे त्यानंतर तुम्हाला काही प्रश्न असतील तर आपण त्याची उत्तरे देऊ. सर्व प्रथम जी.आय.एस. आधारीत सर्वेक्षणाची आपल्याला का आवश्यकता आहे त्या विषयी मी थोडे बोलनार आहे. आपल्या महापालिकेने २९ मार्च, २०१६ रोजी एक महासभा ठराव केलेला आहे, ठराव क्र.८९ त्यानुसार महानगरपालिका क्षेत्रातील मिळकतींचे जी.आय.एस. प्रणालीद्वारे सर्वेक्षण करण्यासाठी आपण मंजूरी अगोदरच दिलेली आहे. त्यानंतर १५ व्या वित्त आयोगाच्या शिफारसीनुसार सुद्धा त्यात त्यांनी दिलेले आहे इट लिड्स टू बेटर अकाउंटीबिलीटी इंतरनॅशनली, प्रॉपर्टी टॅक्स इज वन ऑफ द मोस्ट इफिशिएंट इंन्स्ट्रुमेंट, म्हणजेच इंतरनॅशनली सुद्धा प्रॉपर्टी टॅक्स हे आपल्या उत्पन्नाचे, महापालिकेच्या, नगरपालिकेच्या उत्पन्नाचे सर्वात महत्तवाचे साधन आहे. आणि त्याच्यामूळे त्यांचे रिकमेंडेशन आहे की टू क्वालीफाईड फॉर द ग्रॅन्ट , कुठलीही ग्रॅन्ट जर आपल्याला हवी असेल स्टारटिंग फ्रॉम २१-२२ म्हणजे या वर्षापासून तर आपल्याला काही गोष्टींचा विचार करावा लागेल,त्यानुसार आपल्याला जी.आय.एस. सर्वे करणे आवश्यक आहे. त्यानंतर १२ जून २०१७ रोजीचा एक पण शासन निर्णय आहे त्यानुसार सर्व महापालिकांना, नगरपालिकांना जी.आय.एस. बेस्ड प्रॉपर्टी सर्वेक्षण करणे आवश्यक आहे. त्यानंतर नगरपालिका प्रशासन संचालनालय, वरळी. डायरक्टरेट ऑफ म्युन्सीपल ॲडमिनीस्ट्रेशन सर्वीसेस, वरळी यांचे पण आपल्याकडे ०९ ऑक्टोबर २०२० रोजीचे एक पत्र आहे त्यात सुद्धा त्यांनी दिलेले आहे की मालमत्ता कर आकारणी व वसूली व्यवस्थापन या अंतर्गत मालमत्ता कर आकारणीसाठी सुसुत्रता आणण्यासाठी आपल्याला आणि चांगली वसूली होण्यासाठी जेणेकरून आपण जी काही कामे करणार आहोत त्यासाठी आपल्याला फंड पाहिजे त्यासाठी आपल्याला हे बंधनकारक आहे

जी.आय.एस. सर्वे.त्याच्यानंतर अजून एक जी.आर.आहे सर, १० डिसेंबर २०२० चा आहे त्यामध्ये ७ व्या वेतन आयोगाच्या शिफारसीनुसार आपल्याला सर्वांनाच माहिती आहे की ७व्या वेतन आयोग आपल्याकडे लागू झालेला आहे. अधिकाऱ्यांना, कर्मचाऱ्यांना, महापालिकेच्या कर्मचाऱ्यांसाठी पण आता नगरविकास विभागाने तो डिसीजन घेतलेला आहे की आपल्याला त्यांनाही तो लागू करणे आवश्यक आहे. म्हणजेच आपल्यावर भार वाढणार आहे आस्थापनेत पगाराचा आणि त्यासाठी सुद्धा जी.आय.एस.मॅपिंग द्वारे मालमत्तांचे सर्वेक्षण करणे आवश्यक आहे.त्याच्यामूळे एकंदरीत मालमत्ता कर हे महानगरपालिकेच्या उत्पन्नाचे मुख्य स्त्रोत आहे त्यावरून जेव्हा आपण जी.आय.एस. करतो तेव्हा प्रत्येक प्रॉपर्टी नी प्रॉपर्टी आपल्या त्या मालमत्ता कराच्या जाळयात येऊ शकते आणि त्यानंतर ९० ते १०० टक्के वसूली, वसूली बेसीकली माझे असे म्हनने आहे की १०० टक्के टॅक्स लागू शकतो आणि ती आपण वसूली करू शकतो, जी.ओ.टॅगींग पण आपण करणार आहोत जी.आय.एस. प्रणाली वर त्याच्यामूळे आपल्याला कुठल्याही ठिकाणी कुठलीही प्रॉपर्टी आपल्याला नकाशावर पटकन मिळू शकते. त्याच्यानंतर या नोंदी झाल्यानंतर अर्थातच आपल्या मागणीत वाढ होईल, मागणी वाढ झाल्यामूळे म्हणजे डिमांड आपली वाढेल, डिमांड वाढल्यानंतर अर्थातच वसूली , जी रिकवरी आहे ती आपली वाढेल त्याच्यानंतर अजून आपल्याकडे काही इश्यूज आहेत म्हणजे दुभार नोंदणी, हा पण प्रकार आपल्याकडे उल्हासनगरमध्ये बऱ्याच आहे म्हणजे डबल टॅक्स लागलेल्या प्रॉपर्टी जागेवर आहेत किंवा नाही तसेच काही आपल्याकडे निट इनफोरमेशन नाही आहे पण या नंतर जी.आय.एस. मुळे, टॅगींग मुळे आपल्याला ती इनफोरमेशन मिळेल.आता हे जे टेंडर झालेले आहे हे जो विषय आपल्याकडे आलेला आहे त्यासाठी आपल्याला २९ मार्च २०१६ रोजी ,मी परत एकदा सांगते हे काम करण्यात यावे जी.आय.एस.चे म्हणून ठराव झालेला आहे,८९ आहे जो. त्यानंतर स्थायी समितीचा ठराव झालेला आहे १६/१०/२०१७ रोजी, ठराव क्र.४९ त्यानुसार आपले हे जे मॅपींग वगैरे करायचे आहे, जी.आय.एस. सर्व्हे करायचे आहे आणि तसेच दुसरा एक पॉईंट आहे त्यातला हे दोन भागात आहे सर आपल्याकडे, एक तर आपल्याला सर्व्हे करायचा आहे, सर्वेक्षण करायचे आहे, जी.आय.एस. मॅपिंग वगेरे आणि सेकंड आहे देखभाल जी आहे, म्हणजे मेनटेनेंस ५ वर्षासाठी त्यासाठी हा ठराव झालेला आहे. त्यानंतर १२ जून २०१७ रोजीचा पण शासन निर्णय जो मी मगाशी मेंशन केला त्यानुसार आपल्याला जी.आय.एस करणे कंपलसरी करण्यात आले आहे.आता जी.आय.एस आधारित सर्व्हेक्षनासाठी कामाच्यासाठी जी निविदा प्रक्रिया केली ती पण मी आपल्यापुढे मांडलेली आहे. दिनांक ०९/०८/२०१८ रोजी निविदा सुरू झाली प्रक्रिया त्यानंतर ११ जानेवारी २०१९ ला आपल्या स्टँडीग कमीटीचा ठराव आहे, ठराव क्र.७९ आणि मान्यता झालेली आहे. त्यानंतर दिनांक ०५/०२/२०१९ रोजी आपण करारनामा पण केलेला आहे आणि वर्क ऑर्डर पण दिलेली आहे. बेसिकली मी तूम्हाला मगाशी सांगीतले त्याप्रमाणे दोन पार्ट आहे ह्या कामाचे.पहिला जो पार्ट होता सर्वेक्षणाचा तो बारा अधिक दोन म्हणजे टोटल १४ महिन्यात पूर्ण करायचा होता म्हणजेच टेकनिकली ५ फेब्रूवरी २०१९ ते ५ एप्रील पर्यंत हा करायचा होता, आणि जो मेनटेनेंस आहे तो पुढील ५ वर्षा त्याचे ऑलरेडी दोन वर्ष झाले आणि हे जे आहे आपले करंट ईयर हे तिसरे वर्ष चालू आहे. त्याच्यानंतर अडचण कुठे आली, ५ एप्रील च्या आधीच म्हणजेच त्यांनी हे काम कंपलीट करायच्या आधीच ईश्यू आपल्याकडे झाला आणि महासभेचा जो ३३ नंबरचा जो एक ठराव आहे दिनांक ०५/०७/२०१९ त्या अन्वये सदर कामाचा ठेका पूर्णपणे रद्द करणे बाबतचा निर्णय घेण्यात आला आणि तेव्हापासून हे मालमत्ता सर्व्हेक्षणाचे काम बंद झालेले आहे आपल्याकडे. कोलब्रो ग्रृपला जे काम दिले आहे ते ए आणि बी या दोन पार्ट मध्ये डिवाईड केलेले आहे. पहिल्या पार्ट मध्ये जसे मी म्हटले तसे मालमत्तांचे नंबरींग करणे, सर्वेक्षण करून तक्ता करणे,मोजमाप घेणे,फोटो काढणे, सॉफ्टवेअर प्रमाणे डाटा एंटरी आहे,जी.ओ. ट्रेकींग आहे, लेयर्स पण आपण बनवतो आहे. हे जरा वेगळी कल्पना आहे,त्या लेयर्समध्ये आपण एकाच स्पॉटला आपण हॉस्पीटल जर आपल्याला माहिती हवी असेल, उल्हासनगरमध्ये किती हॉस्पीटल आहेत, हॉस्पीटल हे नाव टाकले तर की लगेच सर्व हॉस्पीटलचा डेटा आपल्याला मिळेल अशाप्रकारे काही ठराविक लेयर्सचा मी पुढे डिसकस करेल. जशी बी मध्ये जे आहे ते आपल्याकडे मेंटेनस आहे जे आपल्याकडे काम चालू आहे. पहिले काम म्हणजे जे काही काम केलेले आहे ते नेष्क्ट स्लाईड वर आहे.त्यांनी जे काही काम केलेले आहे त्याची आकडेवारी आपल्यासमोर आहे, हे एवढे काम त्यांनी आतापर्यंत केलेले आहे.त्यानंतर एक उदाहरण तुमच्या समोर ठेवते उदाहरणार्थ, एक सँपल स्टडी मी आपल्यासमोर ठेवते. आपल्या समोर जे चित्रात दिसते आहे त्या प्रॉपर्टीला जो

आधीचा टॅक्स होता आपल्याकडे तो २८३१०/- आहे पण जी.आय.एस. बेस्ड सर्वेक्षण केल्यानंतर त्यामध्ये रिवाईज टॅक्स येतो आहे ४७४०७/-, म्हणजे जवळ जवळ ६४ टक्के वाढ झालेली आहे. त्यानंतर हे अजून एक एक्सांपल आहे. हे कर्मशियल एक्सांपल आहे यामध्ये ४९००/- टॅक्स आहे आपल्याकडे,पण जी.आय.एस. बेस्ड सर्वेक्षण केल्यानंतर १६३५८/- टॅक्स आहे. जवळ जवळ २३३ टक्के वाढ आहे त्याच्यात. एक रेसिडेंशियल प्रॉपर्टी उदाहरणासाठी घेतली आपण या प्रॉपर्टीला ८८८६/- हा टॅक्स आहे पण जी.आय.एस. नंतर ३२२६१/- असा टॅक्स लागतो म्हणजे जवळ जवळ परत २६३ टक्के वाढ आहे. आपण जर कंपेयर केले तर उल्हासनगर महानगरपालिकेने दिलेले कॉन्ट्रॅक्ट ,दोन महानगरपालिका आपण कंपेरिजनसाठी घेतल्या आहेत, मिरा-भाईंदर महानगरपालिका आणि कल्याण-डोंबीवली महानगरपालिका, जर आपण पाहीले तर आपल्याकडे जे काम दिलेले आहे ते बहुतांशी सिमिलर आहे पण आपण पाहीले तर यामध्ये भांडवलीमूल्य आधारित सर्वेक्षण, विद्युत कामाचे सर्वेक्षण, भांडवलीमूल्य आधारित इतर काम हे मिरा-भाईंदर कडे पण नाही दिलेले आहे. आणि कल्याण-डोंबीवलीला ही दिलेले नाही.याच्यानंतर दुबार नोंद जी आपल्याकडे महत्वाचा इशू आहे जो आम्हीपण डेली काम करताना फेस करतो, रोज माझ्याकडे लोकांच्या तक्रारी येतात डबल टॅक्स लगा हे, डबल टॅक्स लगा हे, वापरात बदल हा पण एक प्रकार आहे, बांधकामात बदल असलेल्या मिळकतींचे भांडवलीमूल्य आधारित नोटीस तयार करणे हे पण एक काम यांच्याकडे हे पण काम मिरा-भाईंदर कडे कल्याण-डोंबीवली कडे नाही आहे. लेयर्स जे मी मगाशी म्हटले जे १४ नंबरचा पॉईंट आहे, लेयर्स हे अशाप्रकारच्यापण लेयर्स केल्या आहेत रेसिडेंशियल,नॉन रेसिडेंशियल याच्यामध्ये आर.सी.सी., टी.जी., एसी शिट, मड, ओपन लँड, हे आपण नुसत्या क्लिकद्वारे आपल्याला हे सर्व डिटेल समोर येणार. कमर्शिअल मध्ये शॉप्स, शो-रूम्स, गोडाउन्स, हॉटेल्स, रेस्टॉरंट हे सेपेरेटली येतील. त्यानंतर हॉस्पीटल जे मी मगाशी म्हटले तसे एक इंपोरटंट उदाहरण दिले.लेस दॅन ५० बेड्स, मोअर दॅन ५० बेड्स असे आपण केलेले, ऐजुकेशन इंस्टीट्युशन, रिलीजियस इंस्टीट्युशन, गर्व्हनमेंट इंस्टीट्युशन, मॅरेज हॉल्स याचे पण एक सेपेरेट लेयर्स आपण केलेले आहे. त्याच्यानंतर विद्युत खांबांचे मॅपींग जे मी म्हटले. जी.ओ.टॅगींग करणे हे बाकीच्या दोन कॉर्पोरेशन कडे नाही आहे पण आपल्याकडे दिलेले आहे आणि त्यामुळे त्यांच्या माणाने आपल्याकडे आपले रेट्स फारच कमी आहेत. तर कोलब्रो ग्रुपनी आतापर्यंत काम केलेले आहे त्याचे मुल्यांकन आम्हीही केलेले आहे अँज अ डिपार्टमेंट आणि आपल्याला जे काही क्लेम केलेले आहे तो तूम्हाला फर्स्ट कॉलम मध्ये दिसेल. त्यानंतर त्याचे वेरिफिकेशन जे माझ्या डिपार्टमेंटने केले आहे, ते दिलेले आहे आणि त्याच्यानंतर त्याला आपण जे आतापर्यंत पेमेंट केलेले आहे आणि जे पेंडींग आहे त्याच्या बिलाप्रमाणे, वॅटएवर बिल जे त्यांनी रेज केले प्रमाणे ते ही दिलेले आहे. तूमच्या लक्षात येईल आतापर्यंत आपण त्यांना फक्त त्यांनी जे बिल दिले ते इवॅल्युएट करून त्यात पण कपाती करून जवळजवळ ८ कोटींचेच बिल येते आणि ते पण अर्धे दिलेले आहे, ओन्ली ५० %, ५० टक्के त्यांचे पेमेंट जे त्यांनी ऑलरेडी काम केलेले आहे, अजून आपल्याकडे पेंडींग आहे त्यांना दिलेले नाही आहे. त्यानंतर हा विषय आपण महासभेमध्ये आणण्याची आवश्यकता अशी झाली की महासभेचा जो ३३ नंबरचा ठराव झाला दि. ०५ जूलै २०१९, त्यानुसार हे जे काम आहे ते पूर्णपणे बंद करण्याचा रद्द करण्याचा निर्णय झाला. त्यानंतर लगेच त्याच महिन्यामध्ये २२ जूलै २०१९ रोजी त्या ठरावावर पुर्नविचार करावा म्हणून प्रशासनामार्फत, टॅक्स डिपार्टमेंटमार्फत वस्तूस्थितीदर्शक गोषवारा पण महासभेपुढे पाठविण्यात आला होता.पण त्यावर सुद्धा विचार झाला नाही, नंतर मग २४ जानेवारी २०२० ला जो ठराव क्र.५९ आहे. त्या अन्वये एक असा ठराव करण्यात आला की हा जो ठराव आहे अशा आशयाचा ठराव जो आधी झालेला आहे, अंमलबजावणी व्हावी असा वरील प्रस्ताव अमान्य करण्यात आला आहे. आता प्रश्न असा झाला की यामुळे थोडीसी अस्पष्टता निर्माण होते, कंफ्युजन निमार्ण होते की नेमका हा जो रद्द करण्याचा जो ठराव झाला आहे तो रद्द झाला आहे किंवा कसे, त्यामुळे आम्ही काय केले डिपार्टमेंटने वकीलाचा सल्ला घेण्यासाठी आपल्या लॉयर कडे हे पत्र पाठविले. त्यांनी आपल्याला असा सल्ला दिला होता की जनरल बॉडीचे जो ठराव ३३ झालेले आहे, डॅट ईज, दिनांक ०५/०७/२०१९ नुसार ते १९ चे निगेटीव झालेले आहे,बिकॉज ऑफ २४ जानेवारी २०२० चा ठराव परंतु ते क्लियर नाही आहे.स्पष्ट लिहिले आहे नॉट इन वेरी क्लियर अॅन्ड देअरफोर आऊट ऑफ आबेनडन्ट प्रिकॉशन म्हणजे जस्त टू टेक एक्स्ट्रा प्रिकॉशन हॅज सबजेक्टेड अगेन बिफोर दि जनरल बॉडी. म्हणजे महासभेपुढे आपण प्रशासनाने ठेवावा जेणेकरून क्लेरीफिकेशन आपल्याला होईल की नक्की रद्द समजायचे की

नाही समजायचे.आता त्याच्यासाठी आपण हे आता ठेवले आहे. मला असे सांगायचे आहे की जर जी.आय.एस. मॅपींग झाले, सर्वेक्षण त्यानुसार कमीतकमी ६५ ते ७५ कोटींचा फरक दरवर्षी पडणार आहे आपल्या टॅक्स मध्ये म्हणजे एवढे इनकम दरवर्षाचे आपले वाढणार आहे. सर मला पुर्ण करु दया, त्यां नंतर तुम्ही मला प्रश्न विचारा प्लिज, त्याच्यामुळे शासनाचे पण धोरण आहे की जी.आय.एस. आधारित जे मालमत्ता सर्वेक्षण आहे ते आपल्याला बंधनकारक आहे. एक गोष्ट समजा आपण हा ठराव आता रद्द केला तर काय होणार आहे? आपण ऑलरेडी त्यांना एवढे पेमेंट केलेले आहे, बरोबर आहे, त्याचे त्यांनी कामपण केलेले आहे.

त्याच्यानंतर जर आपण नविन कॉन्ट्रक्ट काढायचे झाले कारण आपल्याला जी.आय.एस. बेस्ड तर करावेच लागेल. जर नविन कॉन्ट्रक्ट केले तर ते आपल्याला महाग पडेल फोर एक्झामपल वाशिम जिल्हा जो आपल्या महाराष्ट्रात आहे, विदर्भात. वाशिम जिल्हयातील कारंजालाड म्हणून एक बी क्लास नगरपालिका आहे. त्यांनी सिमीलर कॉन्ट्रक्ट केलेले आहे त्या कॉन्ट्रक्टमध्ये सद्यस्थितीतील त्यांचा रेट ८९६ आणि २७० आहे जो आपल्या रेटपेक्षा जास्त आहे. त्यामुळे आता जर आपण हे टेंडर रद्द केले नविन करायला गेलो तर आपल्यालाच ते महाग पडेल. त्याच्यामुळे प्रशासनाचे असे स्पष्ट मत आहे की स्थायी समितीचा हा जो ठराव आहे ७९ चा ,ज्याने हे टेंडर पास झालेले आहे ११ जानेवारी २०१९, तो ठराव कायम ठेवून महासभेचे जे दोन ठराव नंतर झाले ३३ नंबरचा ५ जूलै २०१९ चा आणि महासभा ठराव ५९, २४ जानेवारी २०२०, हे दोन्ही रद्द करावे, धन्यवाद.

**सदस्य,श्री.भारत राजवानी:-**मॅडम,मा.महापौर, मा.उपमहापौर,मा.आयुक्त. मला जरा २०१७ मध्ये जो जी.आर. आला आहे प्रशासन कडून तो जरा वाचून दाखवा महासभेला. ०३ नोव्हेंबर, २०१७ शासनाकडून जी.आर. आला होता, तो महासभेला वाचून दाखवा.

**उप आयुक्त कर, श्रीम.प्रियंका राजपूत:-** तो जो जी.आर. आला होता त्यावर आपले काही आक्षेप होते त्यावर सुनावणी पण झाली आहे सर आणि आपले पत्र आहे माझ्यासमोर...

**सदस्य, श्री. भारत राजवानी:-** महासभेमध्ये सुनावणी झाली आहे, दुसऱ्यांदा सुनावणी नाही झाली आहे. आपण तो जी.आर.फक्त वाचून दाखवा.

**उप आयुक्त कर, श्रीम.प्रियंका राजपूत:-** सर ऐकाना आपले पत्र आहे माझ्याकडे सर दिनांक ०८/०२/२०२१ चे जे आपण आयुक्त सरांना लिहीले आहे.त्यात शेवटचा जो परिच्छेद आहे, त्यात आपण लिहीले आहे इन परस्युएंस ऑफ हिअरिंग हेल्ड १९ जानेवारी २०२१ ऑल दि कलअराफिकेशन ॲन्ड डॉक्युमेंटेशन वेअर फरनिश्ड बिफोर युअर गुडसेल्फ.वेअर इन आय एम कनव्हींस ऑन इनफोरमेशन ॲन्ड देअरफोर यु मे टेक फरदर नेसेसरी ॲक्शन इन दिस रिगार्ड.आपण स्वत: लिहून दिले आहे की आपण समाधानी आहात आणि मला यामध्ये काही प्रॉब्लेम नाही आहे.

**सदस्य, श्री.भारत राजवानी:-** आपण आपल्याकडून सांगा की यामध्ये बरोबर झाले आहे का?

**सदस्य, श्री. अरुण आशान:-** मा.महापौर, मा.उप महापौर, मा.आयुक्त साहेब जर का याच्यामध्ये जर पत्र दिलेले असेल. आणि त्यांनी जस्टीफाय, क्लअरीफिकेशन दिले असेल तर परत खुलासा मांगायची गरज काय?

**सदस्य, श्री.भारत राजवानी:-** होय.

**सदस्य, श्री. अरुण आशान:-** नाही मी तूम्हाला विचारत आहे. तुम्ही पत्र देतात आणि खुलासा मागवता नक्की काय आहे?

**सदस्य,श्री .भारत राजवानी:-** नाही. शासनाला दिले आहे की तूम्ही योग्य पद्धतीने याला जस्टीफाय करून हे काम करा. नाही की मी त्यांना म्हटलो आहे की याला ओके करा.जस्टीफाय झाल आहे का? पण आपल्याकडून

**सदस्या, श्रीम.अंजली साळवे:-** मा.राजपूत मॅडम, नोव्हेंबर २०१७ जो ठराव आहे जी.आर. नुसार स्थानिक स्वराज्य संस्थामार्फत प्रशासनाद्वारे चालविला जाईल असे अपेक्षित आहे.त्यांनी पुढे असे स्पष्ट म्हटले आहे की

काही स्थानिक स्वराज्य संस्था स्वतंत्र निविदा काढत आहे, त्या निविदा रद्द करण्यात यावा असा सुद्धा जी.आर. त्याच्यात आहे. क व ड वर्गातील महानगरपालिकेने स्वतंत्र निविदा प्रक्रिया राबविण्यात येवू नये. ज्या स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये निविदा प्रक्रिया राबविण्यात आल्या, कार्यादेश दिले आहेत, त्या रद्द करण्यात याव्या असे पण दिले आहे मॅडम.माझी एक क्वेरी आहे की जर प्रशासनाचे जी.आर. आपण हे करू शकतो का? त्याच्यानी मग आपण शासनच पालन नाही करणार तर आम्ही नगरसेवक सुद्धा शासनाच्या विरोधात जातो किंवा आपली महानगरपालिका शासना विरोधात जात आहे असा प्रश्न उपस्थित होऊ शकतो का?

**उप आयुक्त कर, श्रीम.प्रियंका राजपूत:-** नाही मॅडम त्यानंतर पुढे शासन स्तरावरच मिटिंग झालेली आहे,आणि त्या मिटिंगमध्ये खास उल्हासनगरसाठी, विविध विषयांसंदर्भात मिटिंग झाली आणि त्या मिटिंग दरम्यान सांगण्यात आले की उल्हासनगरने आपल्या स्तरावर हे जी.आय.एस. बेस्ड सर्वेक्षण करावे आणि त्यानुसारच आपण पुढे गेलेलो आहे.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-** मा.महापौरजी...

**सदस्य, श्री. भारत राजवानी:-** मा.महापौर जी मला या विषयावर अजून उत्तर नाही मिळाले आहे.

**सदस्य, श्री. जीवन इदनानी:-** मा.महापौर जी या विषयावर आम्हाला बोलायचे आहे. आम्हाला बोलून दिले जावे.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:-** मा. महापौरजी मला माहीती देण्यात यावी.

**सदस्य, श्री. जीवन इदनानी:-** मा. महापौरजी मला बोलायचे आहे. मला बोलून दिले जावे.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:-** बोला जीवनभाई बोला.

**सदस्य, श्री. जीवन इदनानी:-** बिट्टू भाई आम्ही पण लाईन मध्ये आहे आम्हाला पण दोन मिनिटे बोलून दिले जावे.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:-** बोला ना.

**सदस्य, श्री. जीवन इदनानी:-** आई धन्यवाद, आई मला बोलायचे आहे. कोलब्रो ग्रुपला महासभेचे ठराव क्र.७९, दि.११/०१/२०१९ च्या आधारावर आयुक्तांनी दि.०५/०२/२०१९ ला वर्कआर्डर दिले. कॉन्ट्रॅक्टला दोन भागात विभागले गेले जसे राजपूत मॅडमनी सांगीतले.पहिल्या भागात प्रॉपर्टीचा सर्व्हे ज्याची किंमत दिली गेली ६९५रू. ,७०० रू. पर ९ प्रॉपर्टी सर्वे करण्याचा, दुसरा ॲन्युअल मेनटेनेंस,ज्याच्या बिलिंगसाठी पाच वर्षापर्यंत १५५ रू. म्हणजे त्याच्या दुसऱ्या भागाची किंमत होते १५.५० करोड. जर त्यामध्ये असे आहे की टॅक्स डिपार्टमेंट ला वाटले की असे ए.बी.एम. कंपनी हे काम नही करू शकणार आणि १५ करोड खर्च करणे खूप आवश्यक आहे तर त्यांना प्रस्ताव बनवून सर्व त्यात कॅफो, एफ.ओ.,डिप्युटी कमीशनर, कमीशनर/मा. आयुक्त यांची मंजुरी घेऊन महासभेमध्ये आणणे जरुरी आहे. टोटल ठेका त्याची किमत आहे, ८०.५० रुपये पर प्रॉपर्टी ६९५ व १५५ रुपये टोटल ठेका होतो ३० कोटीचा ही माहीती आहे. मागच्या तीन वर्षामध्ये टॅक्सचे जे बिल आहेत, ते कोल्बो कंपनी काढत आहे. जो बिल पार्ट दोनचा हिस्सा आहे. याचा अर्थ पार्ट एकचा झाला आहे आणि जर असे असेल तर कृपया सांगण्यात यावे की, डिमांडमध्ये किती वाढले आहेत? डिमांडमध्ये किती वाढले आहेत, ही माहीती अपेक्षित आहे. माझा आरोप आहे की, यामध्ये स्पष्ट दिसते की, कोल्बो कंपनीने अजून पहीला पार्टच पुर्ण केला नाही. परंतु बिलिंगचा डाटा ए.बी.एम. कंपनीचा युज केला आहे आणि १५५ रुपये प्रती बिलाच्या हिशोबाने ३ करोड, १० लाख रुपयाचे बिल पेड केले आहे. हे बिल काही वर्षापुर्वी महानगरपालिकेद्वारा कमीत कमी ९ रुपयामध्ये बनत होते. तेव्हा ए.बी.एम. कंपनीच्या सॉफटवेअरमध्ये होत होते. टॅक्स बिल, डिमांड रजिस्टर सर्व याच सॉफटवेअरमध्ये बनत होते. ए.बी.एम. कंपनीचा सॉप्टवेअर हा आपला सॉप्टवेअर आहे. या वेळी ॲन्युअल मेंन्टेनस शिवाय कोणताही खर्च नाही. कोल्बोने हा डेटा कसा घेतला आणि महानगरपालिकेला कसा चुना लावला? या विषयावर संपुर्ण चौकशी करण्यासाठी कोल्बोला शे शोकॉझ नोटीस दिली जावी आणि त्या रिपोर्टच्या आधारावर जर गरज असेल तर त्याच्यावर कारवाई करण्यात यावी. हा खुप मोठा घोटाळा आहे. माझे असे म्हणणे आहे की, पार्ट दोन महानगरपालिकेने आपल्या हिशोबाने

पुर्ण केले पाहीजे. कारण आपले १५.५० करोड रुपये वाचतील. कारण की महानगरपालिकेची अवस्था खराब झाली आहे आणि असे पण याची आवश्यकता नाही. माझी सुचना आहे की, अतिरिक्त आयुक्त, जुईकर मॅडम, राजपुत मॅडम, लेखा अधिकारी आणि मुख्य लेखा परिक्षक यांची कमिटी बनवून त्यांचयावर ही जबाबदारी टाकण्यात यावी आणि ०५/०२ चा ठेका कोल्बोला देणे गरजेचे आहे किंवा नाही. याची शहानिशा केली जावी. टॅक्स डिपार्टमेंटतर्फे राजपुत मॅडमचे म्हणणे आहे की, यामुळे आपली डिमांड ७५ करोड रुपयाची वाढ होईल, यामध्ये तीन वेळा पेनाल्टी आहे का? लोकांना तीन वेळा पेनाल्टी लावली आहे. ते यामध्ये इनपुट आहे का? आणि जर असेल तर कृपया सांगण्यात यावे की, किती प्रॉपर्टीला तीन वेळा पेनाल्टी लावण्यात आली आहे? आणि किती लावले आहेत? याची माहीती सभागृहाला देण्यात यावी. त्याच्या नंतर आपण निर्णय घ्यायला पाहीजे. कोल्बो कंपनीला किती करोड रुपयामध्ये पार्ट एक व पार्ट दोन दिले आहे. यामध्ये किती पार्ट एक व पार्ट दोन मध्ये केले आहे, कृपया सभागृहाला माहीती देण्यात यावी. मला माहीती झाले आहे की, आयुक्त साहेबांची स्पष्ट परवानगी नसतांना कोल्बोला पार्ट पेमेंट केले आहे. याची पण माहीती सभागृहा समोर ठेवण्यात यावी आणि मग या विषयावर चर्चा करण्यात यावी. आम्हांला माहीती मिळाली आहे की, महाराष्ट्र सरकारने ४०० नगरपालिका आणि महानगरपालिकामध्ये काम करण्यासाठी एका एजेंन्सीने काम करण्यासाठी नेमले आहे. या एजेंन्सीने महानगरपालिकेला संपर्क केला होता आणि काम सुरु करण्यासाठी संपर्क करायला सांगितले होते. आणि शासनने संपर्क करुन तपास करण्यात यावा. त्याच्या नंतर या विषयावर चर्चा करण्यात यावी. माझे म्हणणे आहे की, मा. आयुक्त साहेब माझे बोलणे ऐकत आहेत, मध्येच जे लोक बोलत आहेत, त्यांचा यामध्ये काही इन्ट्रेस आहे का? यामुळे आपला खर्च वाया जात आहे आणि काही लोक...

**<u>सदस्य, श्री. शंकर लुंड:-</u>** त्या वेळी पास कोणी केले?

**<u>सदस्य, श्री. जीवन इदनानी:-</u>** शहराच्या जनतेची परिस्थिती समजू शकतो, टॅक्स जबरदस्ती वसुल करण्यात येत आहे. तरी कृपय आयुक्त साहेब यावर लक्ष देण्यात यावे आणि हे जे मध्येच बोलत आहेत मला वाटते की, काही तरी “डाळीत काळा” आहे, त्यामुळे मध्येच बोलत आहेत. मी आपल्याला हात जोडून विनंती करतो की, आपण कृपया करुन या गोष्टीवर लक्ष देण्यात यावा आणि शहराचा पैसा वाचवण्यात यावा. श्री. मनोज लासीजी आपण तर सहमत असतात की, शहराचा पैसा वाचायला पाहीजे.

**<u>सदस्य, श्री. मनोज सयानी:-</u>** मा. महापौरजी, मला बोलण्याची परवानगी देण्यात यावी. सन २०१७ मध्ये हा मुददा महासभेमध्ये आणला होता. तेव्हा सर्व पक्षाच्या पार्टीने याचे स्वागत केले होते. आम्हांला माहीती दिली होती की, नविन टेक्नालॉजीने या शहराचे सर्वेक्षण होईल. जी.आय.एस. मॅपिंगच्या माध्यमातून आपल्या शहरामध्ये जेवढया पण प्रॉपर्टी ॲसेसमेंट बाकी आहेत आणि ज्या प्रॉपर्टीमध्ये २० वर्षामध्ये बदल झाला आहे. नविन टेक्नालॉजीच्या माध्यमातून तो बदल समोर आणला जाईल आणि शहरवासियांवर, खास करुन व्यापा-यांवर जे टॅक्स विभागाचे अधिकारी आहेत, ते मनमानी करतात, त्रास करतात, भ्रष्टाचार करतात त्यांना आळा बसेल आणि शहरावर जो मनमानी टॅक्सचा बोजा टाकला जाता आहे, व्यापा-यांवर आणि टी.जी. च्या वर जे लोक राहतात. त्यांच्यावर तीन पट टॅक्स लावला जातो. इनलिगलच्या नावाने ते बंद होईल. तर आम्हांला वाटले की, नविन टेक्नालॉजीमुळे आम्ही शहराला न्याय देवू शकतो. परंतु मला दुदैवाने सांगावे लागते, दु:खाने सांगावे लागते की, नविन टेक्नालॉजीमध्ये अजेंडा आहेच नाही. मी इथे आरोप लावत आहे की, हे संपुर्ण ए.सी. ऑफिसमध्ये बसून जी.आय.एस. मॅपिंगचा जो डेटा दिला आहे, तो संपुर्ण बोगस आहे. आपले पुर्वी जे सर्वे केले होते, टाटा कंपनीने तो टाटाचाच घेतला आहे. तर आपले महानगरपालिकेचे जे अधिकारी बसले आहेत, टॅक्स विभागामध्ये ते वर्षानुवर्षे बसले आहेत, ज्यांनी घोटाळे उघड केले आहेत. हे संपुर्ण दाबून टाकण्यासाठी अधिकारी आणि कोल्बो कंपनी यांचा हात आहे. या सर्वांनी मिळून कोल्बो कंपनीचा भ्रष्टाचारचा जाळा बनवला आहे. आज जी.आय.अस. मॅपिगमुळे जे फोटो दाखवले जात होते की, ही पॉपर्टी पहीले कमर्शिअल आहे. हे फोटो मोबाईद्वारे बनवून एक खोटा डाटा बनवला आहे. आज तो डेटा लोकांना लुटण्यासाठी आहे. मी आजच्या सदनच्या माध्यमातून सांगू इच्छितो की, सर्वांना हात जोडून निवेदन करतो की, कृपया शहराची जनता पहीलेच परिशान आहे. लोकडाऊनमुळे, कोरानामुळे आणि आज त्यांच्यावर एअर कंडीशन ऑफिसमध्ये बसून अधिका-यां बरोबर मिळून एक टॅक्स माफिया आहेत, त्यांच्या बरोबर मिळून जो हा जी.आय.एस. मॅपिंग कोल्बो कंपनीने एक नविन तंत्र रचला आहे, तो थांबवण्यात यावे, त्यावर अंकुश लावण्यात यावा. मी सरळ सरळ आरोप लावत आहे की, कोल्बो कंपनीने जे ७५ हजारांची वाढ सांगितली आहे. आपले उत्पन्न वाढेल. परंतु अशी वाढ आम्हांला नाही पाहीजे. कारण आपल्याला लुटून दिला जाईल. व्यापारी, जे टी.जी. मध्ये,टीअर गटरमध्ये राहणारे गरीब लोक आहेत. महानगरपालिका प्लॅन तर पास करुन देते...

या वेळी काही सदस्य एकत्रित बोलत असल्यामुळे कोण काय बोलत होते, ते स्पष्ट समजून आले नाही.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** मनोजजी सगळयांना बोलायचे आहे.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-** मला बोलू दया, तुमचे कोल्बो बरोबर संगणमत आहे का? समाजाला त्रास देत आहेत.

**सदस्य, श्री. जीवन इदनानी:-** डाटा चोरीचा घेतला आहे. गुन्हा दाखल करा.

**सदस्य, श्री. राजू जग्यासी:-** जीवनभाई एक मीनिट, मा. महापौरजी, आयुक्त साहेब,....

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** सर्वच लोक बोलत आहेत, त्यामुळे काहीच समजायला येत नाही. असे बोला की, हा मुददा आम्हांला समजायला येईल. सर्वांना बोलण्याची संधी मिळाली पाहीजे, एक एकानेच बोलायला पाहीजे.

**सदस्य, श्री. राजू जग्यासी:-** मा. महापौरजी केवळ दोन मिनिट घेणार आहे, मला राजपूत मॅडमकडून माहीती पाहीजे,

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** मा. महापौरजी मी आपल्या परवानगीने बोलू शकतो का?

**सदस्य, श्री. राजू जग्यासी:-** राजेशजी एक मिनीट मा. महापौरजी मला एक माहीती पाहीजे, हा जो जी.आय.एस. मॅपिंगचा कोल्बोतर्फे करणार आहेत, शासनाकडून तसे बंधनकारक आहे. तर हे फक्त मॅपिंग करणे बंधनकारक आहे किंवा ५ वर्षा पर्यंत मेनटेनस देण पण बंधनकारक आहे आणि पार्ट एकसाठी किती रक्कम आहे आणि पार्ट दोनसाठी किती रक्कम आहे, ही संपुर्ण माहीती सभागृहाला पाहीजे. आम्हांला वाटते जी.आय.एस. मॅपिंग झाली पाहीजे. व्यवस्थित झाली पाहीजे, शहराचे इनकम वाढले पाहीजे. कोल्वोला पाच वर्षाचा ठेका देणे पण बंधनकारक आहे का? असा शासन निर्णय आहे का ही माहीती आम्हांला दया आणि पार्ट एकची रक्कम किती आहे व पार्ट दोनची रक्कम किती आहे, धन्यवाद.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-** मा. महापौरजी, मी काही बोलू इच्छितो.

**सदस्या, श्रीम. मिना सोनेजी:-** महीलांचा आवाज दाबला जात आहे, बोलून दिले जात नाही.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-** मा. महापौरजी, मला बोलण्याची परवानगी दया.

**सदस्या, श्रीम. मिना सोनेजी:-** महापौरजी महीलांना बोलू दया.

या वेळी काही सदस्य एकत्रित बोलत असल्यामुळे कोणकाय बोलत होते, ते स्पष्ट समजून आले नाही.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** मा. महापौरजी, ५० करोड, ६५ करोड रुपये फायदा उल्हासनगर महानगरपालिकेला होईल. मा. महापौरजी मला बोलण्याची परवानगी दया.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:-** मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब...

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-** मा. महापौरजी माझा नंबर कधी येणार?

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:-** एक एकाने बोला.

**सदस्य, श्री. अरुण आशान:-** जमनुजी बोला.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-** मा. महापौरजी माझा नंबर कधी येणार?

**सदस्या, श्रीम. अंजली साळवे:-** असे कधीच झाले नाही की, उल्हासनगर महानगरपालिकेला स्पेशली शासन निर्णय रदद करुन येथे हा देण्यात आला आहे.

**सदस्य, श्री. जीवन इदनानी:-** कोल्बोवर गुन्हा दाखल करा.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:-** शासन निर्णयामध्ये काहीच क्लीयर नाही, अंजेली मॅडम.

**सदस्या, श्रीम. अंजली साळवे:-** शासन निर्णय कधी झाला आहे, मॅडमने आता सांगितले आहे की, शासन निर्णय तिकडे मिटींग करुन दिले आहे, कधी झाला आहे....

**सदस्य, श्री. जीवन इदनानी:-** आयुक्तांनी परवानगी दिली आहे, त्यांना पैसे पण देवून टाकले आहेत.

**सदस्या, श्रीम. अंजली साळवे:-** राजपुत मॅडम हा निर्णय कधी झाला आहे. तुम्ही म्हणाले मिटींग झाली तेव्हा झाला मग हा निर्णय कधी झाला.

**उप आयुक्त (कर), श्रीम. प्रियंका राजपूत:-** मॅडम हा सन २०१९ मध्ये झाला आहे.

**सदस्या, श्रीम. अंजली साळवे:-** म्हणजे फक्त उल्हासनगरला परवानगी देण्यात आली आहे.

**उप आयुक्त (कर), श्रीम. प्रियंका राजपूत:-** साळवे मॅडम सन २०१९ ला ठेका दिलेला आहे.

**सदस्या, श्रीम. अंजली साळवे:-** नाही, नाही ठेकेचा मी विचारत नाही, शासन निर्णय विरोधात जावून हा निर्णय घेतला आहे, तुम्ही म्हणाले की...

**उप आयुक्त (कर), श्रीम. प्रियंका राजपूत:-** नाही, नाही, आपण शासन निर्णयाच्या विरोधात गेलेलो नाही. जरा सदस्यांनी ऐकावे मी सांगते,

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** मा. आयुक्तजी मी ठराव वाचत आहे. अरुणभाई मी ठराव वाचत आहे. ठराव सर्व संमतीने मान्य करण्यात यावा. महासभेत नमुद केल्यानुसार मा. महासभा ठराव क्र.३४...

या वेळी काही सदस्य एकत्रित बोलत असल्यामुळे कोण काय बोलत होते, ते स्पष्ट समजून आले नाही.

**सदस्य, श्री. जीवन इदनानी:-** रदद करा, रदद करा.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:-** सर्व संमतीने पास नाही होणार मतदान घ्या.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** मालमत्ता कराचे मुल्यांकन करणे आवश्यक आहे. त्या करिता मालमत्तेचे सर्वेक्षण होणे आवश्यक आहे. महानगरपालिकेच्या उत्पनाशी निगडीत असल्यामुळे दोन्ही ठरावमुळे उपस्थित झालेले संभ्रम दुर करणेसाठी सभेत झालेल्या चर्चेअंती ही महासभा महासभा ठराव क्र.३३...

**सदस्य, श्री. जीवन इदनानी:-** रदद करा, रदद करा. कोल्बोचा ठेका रदद करा.

**सदस्या, श्रीम. अंजली साळवे:-** क्लियर करा.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:-** मतदान करा, मतदान.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** तसेच जी.आय.एस. मॅपिंग करणे आणि इतर कामे ५ वर्षाकरिता देखभाल व दुरुस्ती वैगेरे करणेकामी या पुर्वी स्थायी समिती ठराव पास करण्यात येत आहे, एक वर्षाचा कालावधी वाया गेल्यामुळे ....

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-** जीवन इदनानी बोलत आहेत, चौकशी करा, तर चौकशी करणेस काय हरकत आहे.

या वेळी काही सदस्य एकत्रित बोलत असल्यामुळे कोण काय बोलत होते, ते स्पष्ट समजून आले नाही.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-** पास..पास..

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** पास..पास..इतिवृत्ताची वाट न पहाता.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:-**मतदान झाले पाहीजे.

**सदस्य, श्री. जीवन इदनानी:-** मतदान घ्या, मतदान घ्या.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:-** पास..पास..

**सदस्य, श्री. जीवन इदनानी:-** मतदान करा, मतदान करा.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** पास..इतिवृत्ताची वाट न पहाता पास..

**सदस्य, श्री. भारत राजवानी:-** नाही, नाही.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** ठराव पास झाला आहे. यांनी मोठमोठया प्रॉपर्टी लपवून ठेवल्या आहेत,

**सदस्य, श्री. जीवन इदनानी:-** मतदान घ्या, मतदान घ्या.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:-** पास..पास..

**सदस्य, श्री. भारत राजवानी:-** मा. महापौरजी, जो पर्यंत खुलासा होत नाही तो पर्यंत पास नाही.

**महापालिका सचिव:-** कृपया ठराव आधी ऐकन घ्या, आणि वोटींगसाठी चार सदस्यांनी मागणी केल्याशिवाय मतदान घेता येत नाही. मी ठराव वाचत आहे, त्या नंतर निर्णय घ्या, काय तो?

**ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे** उल्हासनगर महानगरपालिका अनेक स्त्रोतापैंकी मालमत्ता कर हा प्रमुख स्त्रोत आहे. वाढत्या नागरीकरणाच्या पार्श्वभुमीवर मालमत्ता करातून मिळणाऱ्या उत्पन्नात सातत्याने वाढ होणे अभिप्रेत असुन महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सर्व मिळकती/मालमत्ता, मालमत्ता कराच्या व्याप्तीत आणणे, त्यांचे मुल्यांकन करणे आवश्यक आहे.त्याकरीता मालमत्तांचे जी.आय.एस. आधारितसर्वेक्षण, मेपिंग करणे, तदअनुषंगिक इतर कामे व ५ वर्षाकरिता देखभाल करणेच्या कामहोणे आवश्यक असुन सदर कामे करता यावी म्हणुन स्थायी समिती ठराव क्र.७९, दि.११जानेवारी २०१९ अन्वयेसदर ठराव करण्यात आला.तदनंतर महासभेने केलेलामहासभा ठराव क्र. ३३, दिनांक ०५ जुर्ले, २०१९ व महासभा ठराव क्र.५९, दिनांक २४ जानेवारी २०२० मुळेसदर कामांबाबत स्पष्टता दिसून येत नसल्याने संभ्रम निर्माण होत असून दोन्ही ठराव निरस्त करीत आहे. तसेच यापूर्वी स्थायी समितीठराव क्र ७९, दिनांक ११ जानेवारी २०१९ अन्वये घेतलेला निर्णय/ठराव कायम समजण्यात येईल.तसेच दरम्यानच्या कालावधीत कोव्हिड-१९ च्या अनुषंगाने १ वर्षाचा कालावधी वाया गेल्यामुळे सदरील कामासाठी मंजुर दरानुसार पुढील एक वर्षाचा कार्यकाल वाढविण्यास मान्यता देत आहे.

या ठरावा अंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल. असा हा ठराव आहे.

**सदस्य, श्री. अरुण आशान:-** पास..पास..

**सदस्या, श्रीम. अंजली साळवे:-** नाही, नाही आमचा विरोध आहे.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:-** मतदान करा, मतदान.

**सदस्या, श्रीम. अंजली साळवे:-** मतदान करा, मतदान. शासन निर्णया विरोधात आपण केलेले आहे.

**महापालिका सचिव:-** चार सदस्यांनी वोटींगची मागणी केल्याशिवाय वोटींग घेता येत नाही.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:-** मतदान घ्या, मतदान करा.

**सदस्या, श्रीम. अंजली साळवे:-** मतदान घ्या, मतदान घ्या.

**सदस्य, श्री. जीवन इदनानी:-** मतदान घ्या, मतदान घ्या.

**महापालिका सचिव:-** ठिक आहे मा. पिठासिन अधिकारी यांनी मतदान घ्यायला सांगितले आहे.

**सदस्य, श्री. जीवन इदनानी:-** आवाज दाबू नका सचिव मॅडम.

**<u>सदस्य, श्री. अरुण आशान:-</u>** पास करा पास.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-</u>** पास करा, पास करा.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>** पास..पास..

**<u>सदस्य, श्री. जीवन इदनानी:-</u>** मतदान घ्या, मतदान घ्या, रिजेक्ट करा.

**<u>सदस्य, श्री. भारत राजवानी:-</u>** मतदान घ्या, मतदान.

**<u>उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-</u>** तुम्ही म्हणतात वोटींग घ्या, पण अजून चौथा माणूस वोटींगसाठी बोलत नाही. त्यामुळे वोटींग होणार नाही. तीनच लोक बोलत आहेत.

**<u>सदस्य, श्री. मनोज सयानी:-</u>** शुभांगी निकम व दिपा पंजाबी यांनी पण वोटींगची मागणी केली आहे.

**<u>महापालिका सचिव:-</u>** कृपया मतदान घेण्यात येत आहे. सर्व प्रथम या ठरावाच्या बाजूने जे सदस्य आहेत त्यांनी मतदानासाठी हात वर करावे.

**<u>प्रस्तावाच्या बाजूने एकुण मते:- २९</u>**

१) श्रीम. लिलाबाई लक्ष्मण आशान
२) श्री. भगवान भालेराव
३) श्री. जमनादास पुरस्वानी
४) श्री. राजेश वदारिया
५) श्रीम. कविता लाल पंजाबी
६) श्री. कलवंतसिंह सोहता
७) श्रीम. चरणजितकौर भुल्लर
८) श्री. मंगल वाघे
९) श्री. राजेंद्रसिंह भुल्लर
१०) श्री. राजेंद्र चौधरी
११) श्रीम. जया प्रकाश माखिजा
१२) श्री. स्वप्नील बागूल
१३) श्री. किशोर वनवारी
१४) श्रीम. लक्ष्मी सुरेंद्र सिंग
१५) श्री. शंकर लुंड
१६) श्रीम. गिता साधनानी
१७) श्रीम. शुभांगी बेहनवाल
१८) श्री. प्रमोद टाले
१९) श्री. राजू जग्यासी
२०) श्रीम. ज्योती भटीजा
२१) श्री. अजित गुप्ता
२२) श्रीम. कविता बागुल
२३) श्रीम. ज्योती माने
२४) श्रीम. राजश्री चौधरी
२५) श्री. सुमित सोनकांबळे
२६) श्री. रवि जग्यासी
२७) श्रीम. रेखा ठाकुर
२८) श्रीम.कंचन लुंड
२९) श्रीम. संगिता सपकाळे

**प्रस्तावाच्या विरोधात एकुण मते:- ०८**

१) श्री. भारत राजवानी
२) श्री. जीवन इदनानी
३) श्रीम. पंचम कलानी
४) श्रीम. अंजली साळवे
५) श्रीम. दिपा पंजाबी
६) श्रीम. सविता तोरणे
७) श्रीम. सुनिता बगाडे
८) श्रीम. शुभांगिनी निकम

**महापालिका सचिव:-** हा ठराव बहुमताने पास होत आहे.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-** सचिव मॅडम ७.०० वाजले आहेत.

**सदस्य, श्री.राजेंद्रसिंह भुल्लर:-** पास..पास..

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** पास..पास..२९ विरुध्द ०८.

**सदस्या, श्रीम. अंजली साळवे:-** माझा विरोध नोंदवला आहे का?

**महापालिका सचिव:-** ठिक आहे, हा प्रस्ताव सर्वांचा विरोध घेतला आहे, पण विरोधातील नावे वाचली आहेत. अंजली मॅडम तुमचा विरोध घेतला आहे.

**सदस्या, श्रीम. सविता तोरण:-** सचिव मॅडम माझा पण विरोध आहे.

**काही सदस्य:—**पास—पास……

**महापौर तथा पीठासीन अधिकारी:—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ९ :— जी.आय.एस. आधारित मालमत्ता सर्व्हेक्षण वमॅपिंग करणे व इतर कामे करणेबाबत मा. महासभाठराव क्र. ३३, दि.०५जुलै,२०१९ व मा. महासभा ठराव क्र.५९, दिनांक २४/०१/२०२०अन्वये घेण्यात आलेल्या निर्णयानुसार संभ्रम निर्माण झाल्यामुळे सुस्पष्ट निर्णय देणेबाबत.**

**प्रस्तावना**

**१)**उपरोक्त संदर्भ क्र. १ नुसार दिलेल्या मंजुरीच्या अनुषंगाने संदर्भ क्र.२ अन्वये मे. कोल्ब्रो ग्रुप, नागपूर यांना उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्तांचे [A] जीआयएस आधारीत सर्वेक्षण व मॅपिंग करणे, [B] ५ वर्षाकरीता देखभाल करणे, वार्षिक कराची बिले तयार करुन त्याचे वितरण करणे, कर भरणा केल्याच्या नोंदी घेणे, कर निर्धारण नोंदवही व मागणी नोंदवही छपाई करणे इ. कामाबाबत आदेश देण्यात आला आहे.तसेच संदर्भ क्र.३ नुसार सदर कामाबाबत करारनामा करण्यात आला आहे.त्यानुसार मे.कोल्ब्रो ग्रुप, नागपूर याचेमार्फत मालमत्तांचे सर्वेक्षण व मॅपिंग करणे तसेच इतर कामे सुरु करण्यात आली.

२) मे. कोल्ब्रो ग्रुप, नागपुर त्यांचेमार्फत करारनामानुसार आतापर्यंत मालमत्ता नंबरींग/सर्वेक्षण/डाटा एंटी/जीआयएस मॅपिंग केलेल्या कामाचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कामाचा तपशिल | मालमत्तांची संख्या |
|---|---|---|
| १ | मालमत्तांना विशिष्ट (Unique) क्रमांक देणे. | १,७९,५९५ |
| २ | मालमत्ता सर्वेक्षण करणे | १,४४,४५० |
| ३ | मालमत्तांचे मोजमाप करणे व सदर मालमत्तांचे चटई क्षेत्रफळाचे नकाशे तयार करणे. | १,४४,४५० |
| ४ | सर्व्हेक्षण झालेल्या मालमत्तांचे फोटो काढणे. | १,३३,९५६ |

| | | |
|---|---|---|
| ५ | मालमत्तांची डाटा एंट्री करणे. | १,१७,०५५ |
| ६ | मालमत्तांचे जीओ टॅगिंग करणे. | १,१७,०५५ |
| ७ | जी.आय.एस बेस मॅप तयार करणे. | काम पुर्ण झाले आहे. |
| ८ | जी.आय.एस लेअर( Vector Layer) तयार करणे. | काम पुर्ण झाले आहे. |
| ९ | मालमत्तांची माहिती जी.आय.एस मॅपवर लिंक करणे. | १,१७,०५५ |
| १० | मनपा कर आकारणी नोंदवहीतील अभिलेख सोबत मे. कोल्ब्रो ग्रुप, यांनी ज्या मालमत्तांचे सर्व्हेक्षण केले आहे. त्यांचे ताळमेळ (Analysis) करणे. | १,१७,०५५ |
| ११ | जी.आय.एस. सर्व्हेक्षण अंतर्गत ज्या मालमत्तांच्या बांधकाम प्रकार, वापर, क्षेत्रफळ यामध्ये बदल झाला आहे. अशा मालमत्तांना नोटीस बजावणे. | ३५,४७१ |
| १२ | जी.आय.एस. सर्व्हेक्षण अंतर्गत ज्या मालमत्तांच्या बांधकाम प्रकार, वापर, क्षेत्रफळ यामध्ये बदल झाला आहे अशा मालमत्तांनामुळे होणारी वाढ. | अंदाजित ३५ ते ४० कोटी वाढ अपेक्षित आहे. |
| १३ | मालमत्तांचे जी.आय.एस सर्व्हेक्षण कामास मुदतवाढ मिळाल्यावर उर्वरित मालमत्तांचे सर्व्हेक्षण झाल्यास जी.आय.एस सर्व्हेक्षणामुळे होणारी अंदाजित वाढ. | अंदाजित ३० ते ३५ कोटी वाढ अपेक्षित आहे.<br><br>म्हणजेच एकूण जी.आय.एस सर्व्हेक्षण कामपुर्ण झाल्यावर अंदाजित ६५ते७५ कोटी वाढ अपेक्षित आहे. |

३) परंतु दरम्यानच्या कालावधीत उल्हासनगर महानगरपालिका मा. महासभा ठराव क्र.३३, दि.०५ जुर्ले, २०१९ अन्वये जीआयएस आधारित मालमत्ता सर्वेक्षण व मॅपिंग करणे तसेच ५ वर्षासाठी देखभाल दुरुस्ती करणेकामी मे.कोल्ब्रो ग्रुप, नागपूर यांना देण्यात आलेला ठेका/करार रद्य करणे व सदरील कामे महानगरपालिकेच्या कर्मचारी वर्गाकडुन करुन घेणेकामी निर्णय घेण्यात आला.

४) तदनंतर मा. महासभा ठराव क्र. ५९, दिनांक २४/१/२०२० अन्वये महानगरपालिका हददीतील जी.आय.एस. मॅपिंग सर्व्हेक्षण करणेबाबत तसेच ५ वर्षासाठी देखभाल करणेचा मे.कोल्ब्रो ग्रुप यांना देण्यात देण्यात आलेला ठेका पुर्णपणे रदद करण्यात आलेला आहे.सदरील कामे महानगरपालिकेच्या कर्मचारी वर्गाकडुन करुन घेण्यात यावी अशा आशयाचा ठरावावर अंमलबजावणी व्हावी असा वरील प्रस्ताव अमान्य करीत आहे.असा ठराव झाला आहे.

५) उल्हासनगर महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचारी यांना ७ वा वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार वेतन लागू करणेबाबत दिनांक १० डिसेंबर, २०२० रोजी मंजुरी दिलेली आहे. सदर मंजुरीच्या अनुषंगाने, महानगरपालिकेच्या उत्पन्न स्त्रोतात वाढ करुन, जीआयएस मॅंपिंगद्वारे मालमत्तांचे अद्ययावत सर्व्हे करुन मालमत्तांच्या बाबतीत मालमत्ता कराची पुर्ननिधारणा करणे बंधनकारक केले आहे.

६) मालमत्ता कर आकारणी व वसुली व्यवस्थापन अंतर्गत मालमत्ता कर आकारणी मध्ये सुसूत्रता आणणेसाठी मालमत्तांचे सर्वेक्षण करणे, भांडवली मुल्याधारित कर प्रणाली लागु करणे व मालमत्ता कर वसुली होण्याच्या दृष्टीने मालमत्ता विषयक सुधारणांची अंमलबजावणी करणे बंधनकारक आहे. या सुधारणांची पूर्तता न केल्यास पायाभूत सुविधांसाठी केंद्र व राज्य शासनाकडून आर्थिक सहाय्य अथवा प्रोत्साहनात्मक निधी मिळण्यात अडचणी निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.पंधराव्या वित्त आयोगाने मालमत्ता कराच्या आकारणीमध्ये सुसूत्रता आणण्यासाठी खालीलप्रमाणे शिफारस केलेली आहे.

“The importance of mobilization of own revenues by self-governing local bodies cannot be overemphasized. It leads to better ownership and accountability. Internationally property tax is one of the most efficient instrument for revenue mobilization by local bodies. We (Fifteenth Finance Commission) recommend that, to qualify for any grant for urban local body in 2021-2022, state will have to appropriately notify floor rate and thereafter show consistent improvement in collection in tandem with the growth rate of States own GSDP. ”

सदर बाब नगर परिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई यांचेकडील दिनांक ९ ऑक्टोंबर २०२० रोजीचे पत्रात नमुद आहे

७) मा. महासभा ठराव क्र.३३, दिनांक ०५ जुर्ले, २०१९ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार मे.कोल्ब्रो ग्रुप, नागपूर यांचेशी केलेला करार/ठेका रदद केल्यास, अभिकर्त्यास दि. ०५/०७/२०१९ पर्यत केलेल्या कामाचे बिल अदा करणे क्रमप्राप्त आहे.अन्यथा संबंधित अभिकर्ता महानगरपालिकेविरुध्द न्यायालयात नुकसान भरपाई मिळणेसाठी दावा दाखल करण्याची शक्यता नाकारता येत नाही.याबाबत मे.कोल्ब्रो ग्रुप, नागपूर यांचेकडील पत्र क्र.५१/युएमसी/केजी/२०१९, दिनांक १५ जुर्ले, २०१९ अन्वये महानगरपालिकेत कळविले आहे.

**८)** मा. महासभा ठराव क्र.३३, दि.०५ जुर्ले, २०१९ व मा.महासभा ठराव क्र. ५९, दिनांक २४/१/२०२० या दोन्ही ठरावानुसार जीआयएस आधारित मालमत्ता सर्वेक्षण व मॅपिंग करणे इ. कामे अभिकर्त्यामार्फत सुरु ठेवावे किंवा कसे? याबाबत संभ्रम निर्माण झाला आहे.याकामी विधी सल्लागाराचे मत विचारणा केले असता त्यांनी खालीलप्रमाणे अभिप्राय/मत दिले आहे.

"General Body Resolution No. 33 of meeting dt 5/7/2019 is negated. However Resolution dated 24/1/2020 is not in very clear and therefore out of abundant precaution the subject may be placed again before the General Body for a more clear decision."

९) मा. महासभेने घेतलेला निर्णयाची अंमलबजावणी करण्यापुर्वी अभिकर्ता यांनी केलेले काम व त्यानुसार देणे असलेली मोठी रक्कम, भविष्यात अभिकर्ता व प्रशासन यांचेदरम्यान निर्माण होणारा वाद, करार रदद केल्यास जीआयएस सर्वेक्षण व मॅपिंग न झाल्यास प्रतिवर्षी अंदाजित ६५ ते ७५ कोटी इतके महानगरपालिकेचे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच शासन धोरणानुसार पायाभूत सुविधांसाठी केंद्र व राज्य शासनाकडून आर्थिक सहाय्य अथवा प्रोत्साहनात्मक निधी मिळण्यात अडचणी निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तरी जी.आय.एस. आधारित मालमत्ता सर्व्हेक्षण व मॅपिंग करणे व इतर कामे करणेबाबत मा.महासभा ठराव क्र. ३३, दि. ०५ जुलै,२०१९ व मा. महासभा ठराव क्र.५९, दिनांक २४ /०१/२०२० अन्वये घेण्यात आलेल्या निर्णयानुसार संभ्रम निर्माण झाल्यामुळे खालील पर्याय उपलब्ध आहेत.

१) मा. महासभा ठराव क्र. ३३, दि. ०५ जुर्ले, २०१९ कायम करणे व अभिकर्ता यांनी जीआयएस आधारीत सर्वेक्षण व मॅपिंग करणे इ दिनांक ५/७/२०१९ पर्यत केलेले काम तसेच सद्यास्थितीपर्यत वार्षिक कराची बिले तयार करुन त्याचे वितरण करणे, कर भरणा केल्याच्या नोंदी घेणे, कर निर्धारण नोंदवही व मागणी नोंदवही छपाई करणे इ. कामाबाबतचे त्याचे देयक अदा करणे.

२) मा. महासभा ठराव क्र. ३३, दि. ०५ जुर्ले, २०१९ हा रद्द करुन अभिकर्त्यामार्फत सदर काम कार्यादेश व करारनामानुसार पुर्ण करुन घेणे.

मा.महासभेने वरील पर्यायापैकी निर्णय घेणेकामी शिफारस करण्यात येत आहे.

**महासभा ठराव क्र: १९** **दिनांक : १७/०९/२०२१**

**सुचकाचे नाव :— श्री. कलवंतसिंह सोहता**

अनुमोदकाचे नाव :— श्री. शंकर लुंड

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिका अनेक स्त्रोतापैकी मालमत्ता कर हा प्रमुख स्त्रोत आहे. वाढत्या नागरीकरणाच्या पार्श्वभुमीवर मालमत्ता करातून मिळणाऱ्या उत्पन्नात सातत्याने वाढ होणे अभिप्रेत असुन महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सर्व मिळकती/मालमत्ता, मालमत्ता कराच्या व्याप्तीत आणणे, त्यांचे मुल्यांकन करणे आवश्यक आहे.त्याकरीता मालमत्तांचे जी.आय.एस. आधारितसर्वेक्षण, मेपिंग करणे, तदअनुषंगिक इतर कामे व ५ वर्षाकरिता देखभाल करणेच्या कामहोणे आवश्यक असुन सदर कामे करता यावी म्हणुन स्थायी समिती ठराव क्र.७९, दि.११जानेवारी २०१९ अन्वयेसदर ठराव करण्यात आला.तदनंतर महासभेने केलेलामहासभा ठराव क्र. ३३, दिनांक ०५ जुर्ले, २०१९ व महासभा ठराव क्र.५९, दिनांक २४ जानेवारी २०२०मुळेसदर कामांबाबत स्पष्टता दिसून येत नसल्याने संभ्रम निर्माण होत असून दोन्ही ठराव निरस्त करीत आहे. तसेच यापूर्वी स्थायी समितीठराव क्र ७९, दिनांक ११ जानेवारी २०१९ अन्वये घेतलेला निर्णय/ठराव कायम समजण्यात येईल.तसेच दरम्यानच्या कालावधीत कोव्हिड-१९ च्या अनुषंगाने १ वर्षाचा कालावधी वाया गेल्यामुळे सदरील कामासाठी मंजुर दरानुसार पुढील एक वर्षाचा कार्यकाल वाढविण्यास मान्यता देत आहे.

या ठरावा अंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

बहुमताने

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

महापालिका सचिव:- विषय क्र. १० वाचून दाखवतात.

---

⇨ **विषय क्र. १०:—** शहरातील साफसफाई व स्वच्छतेसाठी एक प्रभाग समितीमध्ये २७० सफाई कर्मचारी/कामगार कंत्राटदारामार्फत पुरवठा करण्यास धोरणात्मक निर्णयास्तव महासभेस सादर.

---

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:-** सफाई वाला पास करा.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** पास..पास.. सदरचा ठराव ८ वर्षासाठी देण्यात यावा.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:-** पास..पास..

**सदस्या, श्रीम. शुभांगी बेहनवाल:-** मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, हा जो आपण १० वा विषय घेतला आहे ना, त्यामध्ये आपण जी भरती करतो, परंतु हे मागून पेडींग आहेत, वारसा हक्काचे आहेत. हे पुर्ण केल्या नंतर आपण भरती करु या.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:-** वेळ झाली आहे.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** असा काही नियम आहे का,सभा ७.०० वाजताच संपली पाहीजे.

**महापालिका सचिव:-** होय सर नियम आहे.

**सदस्य, श्री. शंकर लुंड:-** प्रभाग समिती तीन पास करा.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** शेरीजी शांत रहा.

**सदस्या, श्रीम. शुभांगी बेहनवाल:-** मा. आयुक्त साहेब, चार पाच आपली जी भरतीची कामे आहेत, वारसा हक्काने आणि अनुकंपाने जे आहेत, फाईल दाबून ठेवली आहेत, आधी त्या पुर्ण करुन नंतर आपण भरती घेऊ या. कारण महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती बघून निर्णय घेतला तर बरा होईल.

**सदस्य, श्री. जीवन इदनानी:-** मा. महापौर मॅडम मला बोलू दया,

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-** पास..पास..

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:-** पास..पास.. सफाईवाला प्रस्ताव पास..

**सदस्य, श्री. जीवन इदनानी:-** मतदान घ्या, मतदान घ्या.

**सदस्य, श्री. अरुण आशान:-** विषय क्र. १० मध्ये..

**सदस्य, श्री. जीवन इदनानी:-** ३०५ चे काय झाले?

**सदस्य, श्री. शंकर लुंड:-** प्रभाग समिती तीन मध्ये लागू करा.

**सदस्य, श्री. जीवन इदनानी:-** महापौर मतदान घ्या, आम्हांला बोलू दया.

**सदस्य, श्री. शंकर लुंड:-** प्रभाग समिती तीनमध्ये हे लागू करा.

**सदस्य, श्री. जीवन इदनानी:-** आम्हांला बोलू दया.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:-** याची लॉटरी काढा कशामध्ये झाले पाहीजे.

**सदस्य, श्री. शंकर लुंड:-** प्रभाग समिती तीनसाठी पास करा.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** शेरीजी शांत रहा.

**सदस्य, श्री. जीवन इदनानी:-** आम्हांला बोलू दया.

**सदस्य, श्री. अरुण आशान:-** सचिव मॅडम विषय क्र. १० मध्ये ...

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-** ७.०० वाजले आहेत.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:-** याला नंतरच्या मिटींगमध्ये घ्या, वेळ झाली आहे.

**सदस्या, श्रीम. शुभांगी बेहनवाल:-** बरोबर आहे, हा विषय पुढच्या मिटींगमध्ये घ्या.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:-** आज चर्चा करुन नंतरच्या मिटींगमध्ये घ्या.

**सदस्य, श्री. जीवन इदनानी:-** होय ७.०० वाजले आहेत आता काम करु नका.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-** भारतीय जनता पार्टी व शिवसेना युतीचा..

**सदस्य, श्री. जीवन इदनानी:-** मतदान घ्या, मतदान घ्या. सचिव मॅडम,मतदान घ्या, ७.०० वाजले आहेत, बंद करा.

**महापालिका सचिव:-** चर्चा झाली पाहीजे, दुस-या मिटींगमध्ये घ्या.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:-** पुढच्या मिटींगमध्ये घ्या, पुढची मिटींग.

**सदस्य, श्री. जीवन इदनानी:-** ७.०० वाजले आहेत, बंद करा, नियम तोडू नका.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-** ठराव पास झाला आहे.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:-** पास..पास..

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-** मॅडम ७.०० वाजल्याच्या पहीलेच ठराव पास झाला आहे.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:-** मा. महापौरजी, पास..पास..

**सदस्या, श्रीम. अंजली साळवे:-** पुढच्या मिटींगमध्ये घेण्यात यावा.

**सदस्या, श्रीम.शुभांगी बेहनवाल:-** पुढच्या मिटींगमध्ये घेण्यात यावा.

**सदस्य, श्री. जीवन इदनानी:-** बंद करा, बंद करा, ७.०० वाजले आहेत, बंद करा.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** पास..पास.. ठराव कोणाकडे आहे.

**महापालिका सचिव:-** मा. पिठासिन अधिकारी यांच्या निदर्शनास आणून दिले आहे, त्यांनी आदेश दिल्यावरच मी मिटींग स्थगीत करु शकते.

**सदस्य, श्री. जीवन इदनानी:-** बंद करा, बंद करा. आमचा आवाज दाबू नका. सचिव मॅडम नियम सांगा.

**महापालिका सचिव:-** सर नियम आपल्याला माहीती आहे, हा महापौरांचा अधिकार आहे,

**सदस्य, श्री. अरुण आशान:-** सचिव मॅडम याच्यामध्ये आपण वेळ वाढवू शकतो, कारण ऑनलाईन महासभा आहे.

**महापालिका सचिव:-** मा. पिठासिन अधिकारी यांना निर्णय घेऊ दया.

**सदस्य, श्री. अरुण आशान:-** मा. महापौरजी ही ऑनलाईन महासभा असल्यामुळे आपण थोडा वेळ वाढवू शकतो. कारण अजून काही शहराचे महत्वाचे विषय, नामकरणाचा विषय या महासभेमध्ये आहेत.

**सदस्य, श्री. जीवन इदनानी:-** बंद करा, बंद करा.

**सदस्य, श्री. अरुण आशान:-** नामकरणाचा विषय महत्वाचा आहे.

**सदस्य, श्री. जीवन इदनानी:-** आवाज दाबू नका. आम्हांला बोलू दया. ७.०० वाजले आहेत, बंद करा, बंद करा. सचिव मॅडम दादागिरी बंद करा.

**महापालिका सचिव:-** मा. महापौर मॅडम जेव्हा सांगतील तेव्हा सभा स्थगीत करण्यात येईल.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** सन्माननिय सदस्य, जरा शांत बसा.

**सदस्य, श्री. जीवन इदनानी:-** उप महापौर घोटाळा बंद करा, टाईम झाला आहे.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्यानुसार २७० मनुष्य संख्या...

**महापालिका सविच:-** जसे गोषवा-यामध्ये दिले आहे, सफाई कामगार व मजुर...

**सदस्य, श्री. जीवन इदनानी:-** आम्हांला बोलू दया.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** यास मान्यता देत आहे. तसेच एक प्रभाग फक्त खात्री करण्यासाठी खाजगीकरण नाही आहे. फक्त स्वच्छतेसाठी खात्री करायची आहे, त्यासाठी ही सभा मान्यता देत आहे.

**सदस्य, श्री. जीवन इदनानी:-** भगवान भालेराव सफाई कामगारांच्या विरोधात आहेत.

**सदस्या, श्रीम. अंजली साळवे:-** चर्चा करा, चर्चा करा.

**सदस्य, श्री. जीवन इदनानी:-** आम्हांला बोलू दया.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** १० कोटीचे अंदाजपत्रकात तरतुद करण्याची मान्यता देत आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-** कसली तरतुद?

**सदस्य, श्री. जीवन इदनानी:-** मतदान घ्या, मतदान घ्या.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** ही महासभा ८ वर्षासाठी प्रशासनाने एक वर्षासाठी दिले आहे, ही महासभा ८ वर्षासाठी प्रस्ताव पारित करीत आहे. असा ठराव करीत आहे...

**सदस्य, श्री. जीवन इदनानी:-** मतदान घ्या, मतदान घ्या. आम्हांला बोलू दया.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** हा ठराव पास झाला आहे, मतदान घ्यायची गरज नाही.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:-** इतिवृत्ताची वाट न पहाता.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** जनगण मन घ्यायासाठी सगळयांनी उभे रहा.

**महापालिका सचिव:-** हा ठराव पास झाला आहे, जसे उप महापौर साहेबांनी वाचला आहे, तसे मुदे ठरावात येतील.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** मॅडम कंडीशन टाकून

**सदस्य, श्री. जीवन इदनानी:-** हा मोठा घोटाळा आहे.

---

☑ **विषयक्र.१०** :-शहरातील साफसफाई व स्वच्छतेसाठी एक प्रभाग समिती मध्ये २७० सफाई कर्मचारी/कामगार कंत्राटदारामार्फत पुरवठा करण्यास धोरणात्मक निर्णयास्तव महासभेस सादर.

प्रस्तावना

१ उल्हासनगर शहराचे क्षेत्रफळ हे १३ चौ. किलो मीटर असुन भौगोलीक दृष्टया पाहता लोकसंख्या टोलेजंग इमारतीमुळे वाढलेली आहे. शहराची लोकसंख्या सर्व साधारणपणे अंदाजे ५ लाख ५० हजार इतकी आहे. तसेच उल्हासनगर शहर औद्योगिक शहर असून दैनंदिन हजारो इतर शहरांतील नागरीक व व्यापारी शहरात येत असतात. त्याचाही शहरातील सफाई व स्वच्छतेवर परिणाम होत असतो. त्यामुळे महापालिकेच्या आस्थापनावर असलेल्या १५५० सफाई कर्मचा-यापैकी रीक्त पदे व दैनंदिन गैरहजर कर्मचारी वगळता उपलब्ध केवळ ९०० सफाई कर्मचा-याकडून संपुर्ण शहराची प्रभावीपणे सफाई व स्वच्छता करुन घेणे जीकरीचे होते. महापालिका आरोग्य आस्थापनेत १५५० पैकी अंदाजे ३६० सफाई कर्मचा-याची पदे रिक्त असून अंदाजे एकुण ११९० सफाई कामगार सफाई व स्वच्छतेच्या कामासाठी प्रभारी मुकादमसह उपलब्ध

आहेत. पैकी काही सफाई कामगार शिपाई व काही कामगार लिपीक, स्वच्छता निरीक्षक म्हणून काम पाहत आहेत. हि सर्व संख्या वगळता अंदाजे ११२० सफाई कामगार आरोग्य विभागात आहेत. पैकी २५० ते २८० कामगार नियमीत वैद्यकीय व इतर कारणास्तव गैरहजर असतात त्यामुळे दैनंदिन सफाई व स्वच्छतेची कामे करण्यासाठी अंदाजीत एकूण ८५० ते ९०० कामगार उपलब्ध असतात. तसेच प्रत्येक वर्षाच्या एप्रिल व मे च्या दरम्यान बरेचसे कामगार गावी जाण्यासाठी सुट्टीवर जात असल्या कारणाने सदर कालावधीत साधारणत: फक्त ७०० सफाई कामगार कामावर हजर असतात. त्यामुळे त्याचा शहरातील सफाई व स्वच्छतेवर विपरीत परिणाम दिसुन येतो. उक्त कामगारांमार्फत शहरातील दैनंदिन रस्ते सफाई, नाले सफाई व तसेच शौचालय सफाईची कामे तसेच जंतुनाशक फवारणी, धुरळीकरणाची व इतर स्वच्छतेची कामे करुन घेतली जातात.

२ महापालिका आस्थापनेवर रिक्त असलेली सफाई कर्मचा-यांची पदे भरण्याकरीता मागील काही वर्षापासुन कामगारांच्या भरतीचे प्रकरण मा. उच्च न्यायालयात प्रलंबित असल्याने ३०५ कामगारांची भरती होवू शकली नाही. ती पदे रिक्त आहे. महापालिकेच्या एकुण उत्पन्नापैकी प्रशासकीय खर्च ४०% च्या पुढे गेला असल्याने महापालिका आस्थापनेवर नविन सफाई कर्मचा-यांची भरती करुन घेण्यास शासनही मान्यता देत नाही. त्यामुळे नोकर भरती करणे शक्य होत नाही.

३ उपरोक्त परिस्थिती पाहाता सफाई व स्वच्छतेच्या कामासाठी महापालिका क्षेत्रातील कोणत्याही एका प्रभाग समिती मध्ये पुढील १ वर्षाकरीता दैनंदिन सफाई करुन घेण्याकरीता २५० सफाई कामगारांचा कंत्राटदाराकडून पुरवठा करुन घेण्यासंबधी निविदा काढण्याबाबत व त्या प्रभागसमिती मध्ये असलेले महापालिकेची सफाई कामगार यांची इतर प्रभाग समिती मध्ये नियुक्ती करावी असे केल्यास शहरातील सफाईचा प्रश्न सुटु शकतो व उर्वरीत सफाई कामगारांवर ही अतिरीक्त कामाचा बोजा पडणार नाही. तरी यानुसार कार्यवाही करुन घेण्याकरीता मा. महापौर, मा. स्थायी समिती सभापती, मा. सभापती आरोग्य व परिक्षण व वैद्यकिय सहाय्य समिती व मा. स्थायी समिती सदस्य यांनी लेखी पत्र दिले आहे.

४ याबाबत यापुर्वीही वेळोवेळी मा. महापौर यांच्या सफाई व स्वच्छतेच्या कामाच्या आढावा बैठकीत व वेळोवेळी मा. स्थायी समिती व मा. महासभेत चर्चेअंती सफाई कर्मचारी कमी पडत असल्याने महापालिका कार्यक्षेत्रात भरती प्रक्रिया राबवुन सफाई कामगार/मजुंरामार्फत साफसफाईची कामे करुन घेण्याबाबत सुचना/निर्देश देण्यात आले आहेत.

५ संदर्भिय पत्रानुसार मा. महापौर, मा. स्थायी समिती सभापती, मा. आरोग्य सभापती व मा. स्थायी समिती सदस्य यांनी दिनांक ०३/०७/२०२१, दिनांक ११/०८/२०२१ व दिनांक १२/०८/२०२१ रोजीच्या पत्रान्वये केलेल्या मागणीनुसार सफाई व स्वच्छतेच्या कामासाठी २७० सफाई कामगार कंत्राटदाराकडून पुरवठा करुन घ्यावयाचा असल्यास त्या प्रभाग समिती मधील महापालिका आस्थापनेवरील सफाई कामगारांची इतर प्रभागात बदली करता येईल. असे केल्यास एका प्रभाग समिती मधील सफाई कर्मचारी अन्य प्रभाग समिती मध्ये वर्ग करुन सद्या असलेल्या अल्प सफाई कामगार संख्या वाढवीता येईल व त्यांच्या कडून त्या त्या प्रभाग समिती मधील स्वच्छते विषयक कामे विहीत मुदतीत करुन घेता येतील व कर्मचारी कमी असल्याबाबत महापालिका सदस्यांकडून वेळोवेळी येणा-या तक्रारीवरही आळा बसेल. सदर कर्मचा-यामार्फत स्वच्छता निरीक्षक यांच्या देखरेखी खाली पुढील प्रमाणे दैनंदिन कामे करुन घेण्यात येतिल. दैनंदिन रस्ते, सार्वजनिक स्थळे सफाई करणे, दैनंदिन नाले सफाई करणे, दैनंदिन सार्वजनिक शौचालये स्वच्छ करणे, जंतूनाशक औषध फवारणी, धुरळीकरण करणे, कचरा वेगवेगळा स्विकारणे (Segrigation) इत्यादी असे नमुद आहे.

६ सफाई कर्मचा-यांची संख्या अपूरी असल्याने साफसफाई व स्वच्छतेचे काम पूर्ण होत नाही. त्यामुळे नविन संकल्पने नुसार त्रयस्थ संस्थेमार्फत (अभिकर्त्यामार्फत) कोणत्याही एक प्रभाग समिती मध्ये २७० सफाई कामगार/मजूर, लेबर कॉन्ट्रक्टर मार्फत एका वर्षाच्या कालावधीसाठी (३६५ दिवस) (कर्मचा-यांची संख्या आवश्यकतेनूसार कमी/जास्त होवू शकते.) नेमणुक केल्यास त्यासाठी अंदाजीत रुपये ८,५०,०००,००/- (आठ कोटी पन्नास लाख मात्र.) (सन २०२०-२१ किमान वेतन कायदयानुार प्रति मनुष्यबळ प्रति महिना रुपये २४२५७/- X २७० कामगार X १२ महिने व इतर सेवा खर्च) खर्च अपेक्षित आहे. महापालिका अर्थसंकल्प २०२१-२२ मध्ये या खर्चासाठी आर्थिक तरतूद उपलब्ध नाही. महापालिकेमध्ये कर्मचारी वर्ग अपुरा असल्याने सफाई कामगार कंत्राटी तत्वावर घ्यावयाची असल्यास लेबर कॉन्ट्रक्टरची नेमणुक करणे आवश्यक आहे.

७ निविदाकारास ठेकेदारास/अभिकर्त्यास कामगारांना किमान वेतन कायद्यान्वये (जे अनुज्ञेय आहे तो लाभ) देणे बंधनकारक असेल. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | तपशिल | टक्केवारी | २०२१ रोजी वेतन व भत्ता |
|---|---|---|---|
| १. | किमान वेतन कायद्या अंतर्गत Basic दर | | रू. ११,५००/- |
| २. | कामगार आयुक्त यांचे कार्यालय अधिनियम १९४८ अंतर्गत दर D.A. | | रू. ५,७०५/- |
| ३. | H.R.A. | | रू. ८६०/- |
| ४. | Gross Salary | | रू. १८,०६५/- |
| | | | |
| ५. | भविष्य निर्वाह निधी | १३.०० | रू. १,९५०/- |
| ६. | इ.एस.आय.सी. | ३.२५ | रू. ५७८/- |
| ७. | बोनस | ८.३३ | रू. १,४३३/- |
| ८. | प्रशासकीय खर्च | ५.२५ | रू.९०३/- |
| ९. | Leave with Wages | ६.०० | रू. १,०३२/- |
| १०. | Workman compensation with Insurance and other exp. १.६७% | १.६७ | रू. २८७/- |
| | **एकुण प्रति मनुष्यबळा करीता किमान वेतन प्रति महिना** | ३७.५० | **रू. २४, २५७/-** |

२७० मनुष्यबळ X मासिक वेतन रु. २४,२५७ X १२ महिने = रुपये ७,८५,९२,६८० तसेच एका प्रभाग समिती मधील मनुष्यबळ व सफाई व स्वच्छतेच्या अनुषंगिक सर्व बाबींची (सफाई साहित्ये, साधने, गणवेश व संरक्षणार्थ साहित्ये तसेच जंतुनाशके, किटकनाशके व नाला सफाईसाठी मशनरी व वाहेन इत्यादी) पुर्तता अभिकर्त्यास करावयाची असल्याने त्याबाबत वार्षिक अंदाजीत रुपये १,५०,००,०००/- (एक कोटी पन्नास लाख मात्र.) खर्च अपेक्षित आहे.

एका प्रभाग समिती मधील मनुष्यबळ व सफाई व स्वच्छतेच्या अनुषंगिक सर्व बाबींची (सफाई साहित्ये, साधने, गणवेश व संरक्षणार्थ साहित्ये इत्यादी) सफाई साहित्य उदा:- झाडू, फावडे, घमेले, बादली,लोखंडी हातगाडी, टु व्हील बिन्स, इत्यादी तसेच जंतुनाशक किटकनाशके उदा:- ब्लिचींग पावडर, विविध किटकनाशके, जंतुनाशके, मलेरीया ऑईल शौचालयांसाठी फिनाइल, सुगंधीत पावडर, कच-यासाठी दुर्गंधीनाशके व कंपोस्टींग पावडर इत्यादी तसेच अंतर्गत छोटे/मोठे नाले, गटारे, कल्व्हर्ट वर्षातून तिन वेळा मान्सुनपुर्व/पावसाळयापुर्वी व विशेष मोहिमे अंतर्गत सफाई व स्वच्छतेसाठी आवश्यक अतिरीक्त मुनष्यबळ व मशनरी पोक्लेन, जेसेबी व गाळ वाहतुकीसाठी डंपर इत्यादी वाहने पुरविणे, इत्यादीची पुर्तता अभिकर्त्यास करावयाची असल्याने त्याबाबत वार्षिक येणा-या खर्चाचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ. क्र. | लेखा शिर्षकातील वार्षिक तरतुद/खर्च | ४ प्रभाग समितीसाठी अंदाजीत खर्च रुपये | १ प्रभाग समितीसाठी अंदाजीत खर्च रुपये | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | जंतुनाश्क खरेदी | २ कोटी | ५० लाख | |
| २. | साफसफाई साहित्य खरेदी | ५० लाख | १२.५ लाख | |
| ३. | नाला, गटार नदयांची सफाई खर्च | २.५० कोटी | ६२.५ लाख | ठेकेदारास वर्षातुन तिन वेळा अतिरीक्त मनुष्य बळ व जेसिबी, पोक्लेन मिशीनदवारे मोठे नाले सफाई करणे बंधनकारक असेल. |
| ४. | कर्मचा-यांना गणवेश, रेनकोट, चप्प्ल, छत्री या इत्यादी | ३५ लाख | ८.७५ लाख | |
| ५. | मुल जेट मशिन वाहन फुटपाथ सफाईसाठी व जंतुनाशक फवारणीसाठी | खरेदी खर्च ६ लाख | २ लाख | सदरचे वाहन एकदाच तिन वर्षासाठी खरेदी करणे व ठेका संपल्यानंतर महापालिकेस हस्तांतरीत करणे. |
| | | **५.४१ कोटी** | **१.३५७५ कोटी** | |

साहित्य, साधने, गणवेष, संरक्षणार्थ साहित्ये, जंतुनाशके, किटकनाशके व तसेच पावसाठयापुर्वी नाले सफाई इत्यादी साठी अदांजीत खर्च = रुपये १,३५,७५,०००/- अपेक्षित आहे.

सबब एका प्रभाग समितीत सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत दैनंदिन करावयाची सफाई व स्वच्छतेची सर्व कामे (रस्ते, फुटपाथ, शौचालये सफाई तसेच जंतूनाशक फवारणी, छिडकावणी, धुरळीकरण इत्यादी तसेच अंतर्गत छोटे/मोठे नाले, गटारे, कल्व्हर्ट वर्षातून तिन वेळा मान्सुनपुर्व/पावसाळयापुर्वी व विशेष मोहिमे अंतर्गत सफाई व स्वच्छतेसाठी आवश्यक अतिरीक्त मुनष्यबळ व मशनरी पोक्लेन, जेसेबी व गाळ वाहतुकीसाठी डंपर इत्यादी वाहने) अभिकर्त्यादवारे करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. त्यानुसार खालील बाबींवर धोरणात्मक निर्णय होणे आवश्यक असून याबाबत महासभेसमोर धोरणात्मक निर्णयाकरीता सदरचा प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

अ) मनपा अंदाजपत्रकात तरतुद नसल्याने अंदाजे रुपये १०,००,०००,००/- (रुपये दहा कोटी मात्र ) एवढी आर्थिक तरतुद करणे.

ब) २७० सफाई कामगार कंत्राटदारामार्फत घेणे.

क) कोणत्या प्रभाग समिती क्षेत्रामध्ये सदरची योजना प्रायोगीक तत्वावर सुरुवात करायची याबाबत निर्णय घेणे.

**महासभा ठराव क्र: २०** **दिनांक : १७/०९/२०२१**

सुचकाचे नाव :—१) श्री. भगवान भालेराव
२) श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :—१) श्री. शंकर लुंड
२) कलवंतसिंह सोहता

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमा**णेव सभेत** झालेल्या चर्चेअंती, प्रभाग समिती ३ क्षेत्रामध्ये मनुष्यबळ व सफाई व स्वच्छतेच्या अनुषंगिक सर्व बाबींची (सफाई साहित्ये, साधने, गणवेश व संरक्षणार्थ साहित्ये इत्यादी) सफाई साहित्य उदा:- झाडू, फावडे, घमेले, बादली,लोखंडी हातगाडी, टु व्हील बिन्स, इत्यादी तसेच जंतुनाशक किटकनाशके उदा:- ब्लिचींग पावडर, विविध किटकनाशके, जंतुनाशके, मलेरीया ऑईल शौचालयांसाठी फिनाइल, सुगंधीत पावडर, कच-यासाठी दुर्गंधीनाशके व कंपोस्टींग पावडर इत्यादी तसेच अंतर्गत छोटे/मोठे नाले, गटारे, कल्व्हर्ट वर्षातून तिन वेळा मान्सुनपुर्व/पावसाळयापुर्वी व विशेष मोहिमे अंतर्गत सफाई व स्वच्छतेसाठी आवश्यक अतिरीक्त मुनष्यबळ व मशनरी पोक्लेन, जेसेबी व गाळ वाहतुकीसाठी डंपर इत्यादी वाहने पुरविणे, इत्यादीची पुर्तता करणेसाठी २५० सफाई कर्मचारी व २० पर्यावेक्षकशहरातील साफसफाई व स्वच्छतेसाठी प्रभाग समितीमध्ये खालील नमुद अटी व शर्तीवर कंत्राटदारामार्फत पुरवठा करणेसवसदर कामासाठी १० कोटीचे अंदाजपत्रकात तरतुद करण्यास प्रशासनास निर्देश देत आहे.

१) शासकीय निमशासकीय/स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये घनकचरा व्यवस्थापनामध्ये मागील ३ वर्षात २०१८-१९, २०१९-२०,२०२०-२१ एकूण निविदा रकमेच्या ५० टक्के रक्कमेचा एक काम असल्यास कच-याचे संकलन व वाहतूक किंवा रस्ते साफसफाई व प्रायमरी/सेकंडरी स्वच्छतेचे काम केल्याचा अनुभव प्रमाणप्रत्र आवश्यक आहे. सदरचे प्रमाणपत्र कार्यकारी अभियंता, उप आयुक्त यांचे असणे आवश्यक आहे.

२) सदर संस्थेकडे सनदी लेखपाल यांचे प्रमाणित केलेले मागील ३ वर्षात सन २०१८-१९, २०१९-२०,२०२०-२१ रुपये १० कोटी नेटवर्थ असणे आवश्यक आहे.

३) सदर संस्थेकडे मागील ३ वर्षात सरासरी १५ कोटी रुपयांची उलाढाल झालेली असणे आवश्यक आहे. सदर उलाढाल हि MSW, प्रायमरी/सेकंडरी कचरा कलेक्शन व वाहतूक किंवा रस्ते साफसफाई क्षेत्रात झालेली असलेली पाहिजे.

४) सदर संस्थेकडे कमीत कमी २०० लोकांचे मनुष्यबळ पुरवठा केल्याचे अनुभव प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. सदरचे प्रमाणपत्र कार्यकारी अभियंता, उप आयुक्त यांचे असणे आवश्यक आहे.

५) जॉईंट व्हेंचर नॉट अलाउड (संयुक्त उपक्रमास परवानगी नाही)

६) निविदा कालावधी ८ वर्षासाठी असावा.

या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पट [illegible]
आणण्यात येईल.

सुचकाची <u>सही/–</u>

अनुमोदकाची <u>सही/–</u>

<u>मंजुर</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>**महापौर तथा पिठासिन अधिकारी:-**</u> ही महासभा अनिश्चित कालावधीसाठी स्थगीत करण्यात येत आहे.

<u>काही सदस्य:–</u>पास–पास......

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी:–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ <u>स्थगीत प्रस्ताव:–</u>

दिनांक १७/०९/२०२१, रोजी सायंकाळी ४.०० वाजता सुरू केलेली सभा काही कारणास्तव स्थगीत करण्यास प्रस्तावीत.

<u>महासभा ठराव क्र. २० अ</u>

दिनांक: १७/०९/२०२१

सुचकाचे नाव:– श्री. कलवंतसिंह सोहता
अनुमोदकाचे नाव:– श्री. जमनादास पुरस्वानी

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता दिनांक १७/०९/२०२१ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित केलेल्या सभेचे कामकाज अनिश्चित कालावधीपर्यंत स्थगित करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

महापौर/पीठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>**महापालिका सचिव:-**</u> मा. पिठासिन अधिकारी यांनी ही महासभा स्थगीत करायला सांगितली आहे. कृपया जनगण मनसाठी सर्वांनी उभे राहावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सांयकाळी **7.00** वाजता महापौर, श्रीम. लिलाबाई आशान यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:- १८-११-२०२१

**उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. १८-११-२०२१ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.**

२-अ

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शुक्रवार दिनांक १७/०९/२०२१ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेचे कामकाज स्थिगत केल्याने सदरची सभा गुरुवार दिनांक १८/११/२०२१ रोजी दुपारी २.३० वाजता आयोजित करण्यात आली. सदर सभेत महापौर, श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या व खालील दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते/होत्या.मा. अवर सचिव, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग यांचेकडील शासनाचे क्रमांक कोरोना- २०२०/प्र.क्र. ७६ / नवि-१४, दिनांक २२ ऑक्टोंबर २०२१ पत्रान्वये विहित कार्यपध्दती पालन करुन प्रत्यक्ष सहभागाने/उपस्थितीने खालील विषयावर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित केली होती.

१. श्रीमती. लिलाबाई लक्ष्मण आशान — महापौर

२. श्री. भगवान भालेराव- उप महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती अचर्ना गोकुळ करणकाळे | २३ | श्रीमती ज्योती शामराव माने |
| ४ | श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड | २४ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| ५ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | २५ | श्रीमती शीतल चंद्रकांत कदम |
| ६ | श्री. राजेंद्रसिंह विरसिंग भुल्लर | २६ | श्रीमती वसुधा धनंजय बोडारे |
| ७ | श्री. स्वप्नील मिलींद बागुल | २७ | श्री. धनंजय बाबुराव बोडारे |
| ८ | श्रीमती सुरेखा हनुमंत आव्हाड | २८ | श्री. शंकर गोविंदराम लुंड |
| ९ | श्रीमती अंजना अंकुश म्हस्के | २९ | श्रीमती सुनिता बाबुराव बगाडे |
| १० | श्री. कलवंतसिंग गुरुदेव सोहता | ३० | श्रीमती सुमन राजेश सचदेव |
| ११ | श्रीमती मिना कुमार आयलानी | ३१ | श्रीमती अंजली चंद्रकांत साळवे |
| १२ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | ३२ | श्री. प्रमोद नामदेव टाले |
| १३ | श्री. महेश पहिलराज सुखरामनी | ३३ | श्रीमती कविता सुधिर बागुल |
| १४ | श्री. राजेश नानिकराम वदारिया | ३४ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| १५ | श्रीमती दिपा नारायण पंजाबी | ३५ | श्री. किशोर नारायणदास वनवारी |
| १६ | श्रीमती पुष्पा नाना बागुल | ३६ | श्रीमती मिना चंद्रगुप्त सोनेजी |
| १७ | श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी | ३७ | श्रीमती कविता सुरेश गायकवाड |
| १८ | श्रीमती शुभांगी मनोहर बेहनवाल | ३८ | श्री. मनोज दिलीपकुमार सयानी |

| | | | |
|---|---|---|---|
| १९ | श्री. राजेंद्र शांताराम चौधरी | ३९ | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |
| २० | श्रीमती इंदिरा जमनादास उदासी | ४० | श्री. सुरेंद्र बाळकृष्ण सावंत |
| २१ | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी | ४१ | श्री. अरुण लक्ष्मण आशान |
| २२ | श्रीमती ज्योत्स्ना सुरेश जाधव | | |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते / होत्या.

१. श्री. मंगल बालकृष्ण वाघे, २. श्रीमती जयश्री ज्ञानेश्वर पाटील, ३. श्री. हरेश परमानंद जग्यासी, ४.श्रीमती मिनाकौर अजितसिंग लबाना, ५.श्रीमती आशा नाना बिराडे, ६. श्री. रविंद्र दशरथ बागुल, ७.श्रीमती चरणजितकौर राजेंद्रसिंह भुल्लर, ८.श्री. राजू किसनचंद जग्यासी, ९.श्रीमती गीता लालचंद साधनानी, १०.डॉ. प्रकाश घनश्यामदास नाथानी, ११.श्रीमती सरोजिनी टेकचंदानी, १२.श्रीमती जया प्रकाश माखिजा, १३.श्रीमती अपेक्षा भगवान भालेराव, १४.श्रीमती शुभांगीनी निकम, १५. श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग, १६. श्रीमती छाया सुजित चक्रवर्ती ऊर्फ अडसुळ, १७. श्रीमती ज्योती प्रशांत पाटील, १८. श्रीमती डिम्पल नरेंद्र ठाकुर (कुमारी), १९. श्री. रवि किशनचंद जग्यासी, २०. श्रीमती कविता लाल पंजाबी, २१. श्री. जीवन चंद्रभान इदनानी, २२. श्रीमती सविता प्रविण तोरणे (रगडे),२३. श्री. गजानन प्रल्हाद शेळके, २४. श्रीमती ज्योती प्रकाश बठिजा, २५. श्री. सुमित सागर सोनकांबळे, २६. श्री. चंद्रशेखर केशव यादव, २७. श्रीमती मिताली राजेश चान्पूर, २८. श्रीमती संगिता नितीन सपकाळे, २९. श्रीमती दिप्ती नविन दुधानी, ३०. श्रीमती ज्योती रमेश चैनानी, ३१. श्रीमती कांचन अमर लुंड, ३२. श्री. भारत रामचंद राजवानी (गंगोत्री), ३३. श्री. सतरामदास पुतनदास जेसवानी, ३४. श्रीमती मिनाक्षी रवी पाटील, ३५. श्री. विजय चाहू पाटील, ३६. श्री. आकाश परशुराम पाटील, ३७. श्री. विकास परशुराम पाटील, ३८. श्रीमती आशा जीवन इदनानी.

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

१. डॉ. राजा दयानिधी, आयुक्त

२. श्रीम. प्राजक्ता कुलकणी, महापालिका सचिव

३. श्री. अशोक नाईकवाडे, उप आयुक्त (मुख्यालय

४. श्रीम. प्रियंका राजपूत, उप आयुक्त (कर)

५. डॉ. सुभाष जाधव, उप आयुक्त (आरोग्य)

६. डॉ. दिपक पगारे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी

७. श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखाधिकारी

८. श्री. विजय खेडकर, मुख्य लेखा परिक्षक

९. श्री. प्रकाश मुळे, नगररचनाकार

१०.श्री. महेश सितलानी, शहर अभियंता

११. श्री. के.जे.रहेजा, कार्यकारी अभियंता (पा.पु.वि.)

१२. श्री श्री. सुर्यकांत खटके, लेखाधिकारी
१३. श्री. अशोक मोरे, सहा लेखा परिक्षक

१४. श्री. तुषार सोनवणे, सहा. आयुक्त

१५. महेंद्र पंजाबी, सहा. आयुक्त

१६. श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी

१७. श्री. मनिष हिवरे, सार्वजनिक आरोग्य अधिकारी

१८. श्री. बाळू नेटके, मुख्य अग्निशमन अधिकारी

१९. श्री. हनुमंत खरात, उप अभियंता (विद्युत विभाग)

२०. श्रीम. श्रध्दा सपकाळे, सिस्टम ॲनेलेसिस मॅनेजर

१७. श्री. विनोद केणे, मुख्य स्वच्छता निरीक्षक

१८. श्री. एकनाथ पवार, मुख्य स्वच्छता निरीक्षक

१९. श्री. दत्तात्रय जाधव, भांडार विभाग प्रमुख

२०. श्रीम. विशाखा सावंत, पर्यावरण व्यवस्थापक

२१. श्री. यशवंत सगळे, वाहन व्यवस्थापक

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्रीम. नर्गीस खान, लिपीक
२. श्री. बाळू भांगरे, लिपीक

दुपारी २.४० वाजता वंदे मातरम म्हणून सभेची सुरुवात करण्यात आली.

**<u>महापालिका सचिव:-</u>** एक मिनिट काही शोक प्रस्ताव प्रस्ताव आलेले आहेत. मा. महापौरांनी आधी मला वाचायला सांगितले आहे. मग त्यानंतर सगळे जण श्रध्दांजली दया. इथे श्री. कलवंतसिंह सोहता व श्री. शंकर गोविंदराम लुंड आणि इतर सर्वांनी प्रस्ताव दिला आहे. स्वर्गीय नगरसेवक श्री. अजित प्रभुनाथ गुप्ता यांचे आकस्मिक निधन झालेले असल्यामुळे दि.१८/११/२०२१ रोजी सभेत त्यांना श्रध्दांजली वाहून सभा तहकुब करणे आणि दुसरे त्यांनी दिले आहे की, कलवंतसिंह सोहता साहेबांनी की, सर्व पक्ष नगरसेवकांचे एक महिन्याचे मानधन स्वर्गीय अजित पप्पु गुप्ता यांच्या पत्नीस देणेबाबत जर सर्वांना मंजूर असेल तर त्यांनी सांगावे. आणि दुसरा इथे शोक प्रस्ताव आलेला आहे.

श्री. राजेंद्र चौधरी यांनी शोक प्रस्ताव दिलेला आहे. शिवशाहीर पुरंदरे यांना भावपुर्ण श्रध्दांजली अर्पित करणे ओजस्वी वानीतील महाराष्ट्रातील प्रत्येक घरात शिवचरित्र पोहचवणे प्रत्येक मराठी मनात शिवविचारांचे फुलिंग चेतवणारे मराठी जणांवर शिवकार्याचे गारुड निर्माण केलेले सदा प्रफुलित आणि चैतन्यदायी असे पदमभुषण व महाराष्ट्र भुषण शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांचे वयाच्या ९९ व्या वर्षी दिनांक १५/११/२०२१ रोजी पहाटे पुण्यात निधन झाल्याने, अवघा महाराष्ट्र शोकाकुल झाला आहे. तरी या महासभेत शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांना भावपुर्ण श्रध्दांजली अर्पित करण्याचा प्रस्ताव आहे आणि हाच प्रस्ताव आणि दुसरा प्रस्ताव श्री. राजेंद्र महाराज भुल्लर यांनी लिहिलेला आहे. उल्हासनगर शहरातील जयराम अपार्टमेंट, गोल मैदान, उल्हासनगर-१ येथील जुने रहिवासी समाजसेवक उतुंग व्यक्तीमत्व व मनमिळावू स्वभावाचे माजी नगरसेवक श्री. देवनदास चुग यांचे नुकतेच निधन झाले आहे. स्वर्गीय देवनदास चुग यांचे कुटुंबाचे दु:खात सर्व सभागृह सहभागी असून हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. आणि त्यांनी देखील श्रध्दांजली वाहण्याचा प्रस्ताव दिलेला आहे. असे एकुण ४ स्विकृत श्रध्दांजलीचे प्रस्ताव आहेत.

**<u>सदस्य, श्री. किशोर वनवारी:-</u>** मा. महापौर एक दुसरी श्रध्दांजली आहे सांगतो, आमची नगरसेविका श्रीमती आशा जीवन इदनानी यांची आई स्वर्गीय श्रीमती पुष्पा ब्रीजलाल लालवानी त्यांचे पण निधन झाले आहे. त्यांना पण श्रध्दांजली दयावी.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी</u>**:- मा. महापौरजी, सचिव मॅडम खुप दु:खाची गोष्ट आहे की, एक तरुण मुलगा अजित प्रभुनाथ गुप्ता त्याचे वय ३५ वर्षे होते. त्यांच्या जीवनात राजकीय क्षेत्रात त्यांनी पाउल ठेवले होते. आणि त्यांचे पुढील भविष्य चांगले होते पुढे जण्यासाठी. परंतु काळाच्या कोपाने आमच्यापासुन त्यांना हिरावून घेतले. अजित प्रभुनाथ गुप्ता त्यांचा परिवार या उल्हासनगर मध्ये मागच्या सन १९९५ मध्ये महापौर दु:खी होत आहेत कारण त्यांना माहित आहे की त्यांच्या सोबत पण अशी घटना झालेली आहे. जेव्हा आई समोर तरुण मुलगा निघून जातो. तर मी आईला निवेदन करतो की, आपल्या भावनांवर आपण ताबा ठेवा. परंतु काळासमोर मग तो जन्म असो, मृत्यू असो, यश असो, अपयश असो, लाभ असो, देवाने आपल्याजवळ ताकद ठेवली आहे. परंतु गुप्ता कुटुंब १९९५ मध्ये पहिल्या वेळेस ही महानगरपालिका जेव्हा नगरपालिका होती तेव्हा त्यांचे कुटुंब पहिल्यावेळेस उल्हासनगरमध्ये नगरसेवक निर्वाचित झाले. त्यानंतर लागोपाठ त्यांच्या कुटुंबातून कोणी ना कोणी या सदनात सदस्य राहीले आहेत. काही वेळ अशी आलेली आहे की, त्यांच्या कुटुंबातील दोन सदस्य या सदनातील सदस्य राहीले आहेत. देव त्या दिवगंत आत्म्यास शांती देवो. कुटुंबासमोर एक मुलगा जातो तेव्हा त्या कुटुंबाला देव एवढी शक्ती देवो त्यांचे जे नुकसान झाले आहे. ते नुकसान कधीच भरले जावू शकत नाही. परंतु देव त्यांना या दु:खातून उभे राहण्यास ताकद देवो आणि अजित गुप्ता जेव्हा आमच्यासोबत काम करत होते आणि जेव्हा निर्वाचित झाले होते नंतर त्यांनी साई पक्षातून निर्वाचित झाले होते नंतर त्यांनी साई पक्षातून भारतीय जनता पार्टीत सर्व सदस्यांनी विलीन केले आणि ते निष्ठेने भारतीय जनता पार्टीचे काम करत होते आणि येत्या दिवसात वार्डाच्या प्रती की लागोपाठ त्या वार्डातून निर्वाचित होणे हे त्याची पोहचपावती आहे. की मुलगा जो पहिल्यावेळेस ३० वर्षात ते सदनात पोहचले आणि त्यांच्यासाठी जीवनात खुप मोठे मालावधी होता राजकारण करण्यासाठी. परंतु काळासमोर मी आणि माझे भारतीय जनता पार्टी कुटुंबाकडून आणि या सदनात जेवढे पण लोक उपस्थित नगरसेवक असो, अधिकारी गण असो, पत्रकार गण असो त्यांच्या माध्यमातून मी अजित प्रभुनाथ गुप्ता यांना श्रध्दांजलीचे फुल अर्पित करतो आणि मी जो दुसरा प्रस्ताव दिला आहे जर सर्वांना तो प्रस्ताव मान्य असेल की, एक महिन्याचे मानधन त्यांच्या धर्मपत्नीला दिले जावे त्यास आमची भारतीय जनता पार्टीची सहमती आहे. बाकी पुढे आपले विचार सांगतील आणि हा पण प्रस्ताव पास करतील. आणि मी एकदा पुन्हा त्या गुप्ता कुटुंबाला संवेदना व्यक्त करतो आणि देव त्याच्यांवर जो मोठा कठिण प्रसंग आलेला आहे तो सहन करण्याची शक्ती देवो. ओम, हरी ओम, धन्यवाद .....

**<u>सदस्य, श्री. मनोज लासी:-</u>** मा. महापौरजी, आयुक्त साहेब, आणि सन्माननीय सदस्य, आजची ही कोरोना काळातील २१ महिन्यानंतरची प्रत्यक्षरुपाने या महासभा मिटिंगला सुरुवात झालेली आहे. जेव्हा या महासभेचा अजेंडा गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्राचा जी.आर. आमच्यासमोर आला तेव्हा, कोरोनाचा प्रभाव कमी झाल्यामुळे आता ऑनलाईन सभा नाही, ऑफलाईन सभा होईल. प्रत्यक्ष सभा होईल. तर एक आशा मनात आली की, पुन्हा प्रत्यक्ष महासभा होत आहे पुन्हा शहरातील अडचणीवर खुल्याने चर्चा होणार काम तर होत होते परंतु ते काही तांत्रिक कारणामुळे होत नव्हते. परंतु काय माहित होते की हे आदेश येतील आणि पहिली ना फक्त शहरासाठी तर पुर्ण देशासाठी २ वर्षाचा एक बंदचे वातावरण होते. त्यामुळे आम्ही जी दुनिया कोव्हिडची सभा काम होईल आणि माझे सहयोगी माझे आणि त्यांचे नाते पुर्ण सदनाला माहित आहे. मी त्यांच्या समोर निवडणुक पण लढवली होती. पॅनल क्र. ९ मध्ये २०१७ ची निवडणुक झाली होती. तर म्हणतो की, निवडणुकीच्या वेळी माझे विरोधी व निवडणुकीच्या दिवशी सायंकाळचे ५.३० वा. निवडणुकीसाठी मला ९ दिवस मात्र मिळाले होते. त्यावेळेस निवडणुकीसाठी आमच्या जे पण हातखंडे होते ते आम्ही सर्वांनी मग ते गुप्ता परिवार असो, किंवा मी सुध्दा मला लोकतंत्राची खुप मोठी स्फुर्ती मला दिसली होती त्याचा अनुभव मी अजून पर्यंत केला नाही. आमचे मित्र श्री. प्रभुनाथ गुप्ता तर तो लोकतंत्राचा खुप चांगला दिवस होता. जसे ५.३० वाजले मला ५.३५ ला त्यांचे वडिल प्रभुनाथ गुप्ता यांचा फोन येतो. की मनोज कसा आहेस. मी तर पहिले अचंबित झालो की, चुकुन त्यांचा फोन लागला आहे. आता ५.२५वा. आम्ही बसून भांडत होतो. सेवा सदन स्कूलच्याबाहेर मतदानासाठी आणि ५.३५ ला मला फोन आला आहे. ११.३० वा. मी बोललो गुप्ताजी आपला चुकीचा फोन लावला आहे मी मनोज लासी बोलत आहे तर ते म्हणाले हा मनोज मी तुम्हांलाच फोन केला आहे. कसे आहात, ठिक आहेत, मी बोललो हो गुप्ताजी. कुठे आहात तर मी बोललो की, जवाहर टॉकिजच्या समोर माझे कार्यालय आहे तेथे आहे. तर ते बोलले मी माझ्या कार्यालयात आहे भेटू शकतो का. तर मी बोललो गुप्ताजी काही खास, निवडणुक संपली नाते चालू हे शब्द प्रभुनाथ गुप्ता यांचे होते की, निवडणुक संपली नाते चालू, तर मला खुप आनंद झाला. आणि प्रभुनाथ गुप्ता आणि आम्ही खुप वर्षे काम केले आहे. आमच्या पार्टीचे ते बरेच वर्षे नगरसेवक राहीले आहेत. त्यांची धर्मपत्नी असु दया, त्यांची सुन अनिता गुप्ता असू दया, त्यांचे मार्गदर्शनात ते आमचे उत्तर भारतीय नेता आहेत. तर त्यांच्या मार्गदर्शनात आम्ही काम केले आहे तर गुप्ताजी

आपण जेथे बोलवाल तेथे मी येतो. ते बोलले जवाहर टॉकिजमध्येच मी येतो तर आठवत आहे की, स्वत: पप्पु गुप्ता त्यांचे मोठे भाउ धर्मेंद्र गुप्ता, त्यांची माताजी आणि प्रभुनाथ गुप्ता चार ही जण आले होते माझी धर्मपत्नी मी माझे काही कार्यकर्ते माझ्या सोबत होते. मी त्यांच्या पाया पडलो. आणि बोललो गुप्ताजी जे झाले ते झाले सर्व संपले. ते लोकतंत्राचे एक कार्य आहे. जे आपण केले आहे जर यामुळे किंवा काही कारणाने आपल्या ठेच पोहचली असेल किंवा दु:ख झाले असेल तर मला माफ करा. तर ते बोलले नाही, तुम्ही माझे छोटे भाउ पप्पुशी गळाभेट करा. निवडणुकीचा काय निकाल येणार आहे मला माहित नाही. ते तर मतदान पेटीत बंद आहे. बोलले पप्पु तुझा छोटा भाउ आहे, त्याला गळाभेट घ्या आणि आजपासुन त्याला छोटया भावाप्रमाणे समजा आणि निवडणुकीचा परिणाम काहीही येवू दया. मला आज आठवण येतय जवाहर हॉटेलचे क्षण पप्पु गुप्ता माझे पाया पडला, माझ्या व त्याच्या वयात जास्त अंतर नव्हते. मी ३८ वर्षाचा होतो तो ३१ वर्षाचा होता. मी गुप्ताजी यांच्या पाया पडलो. आणि पप्पुला भेटलो आणि पप्पुचे शब्द मला आठवतात की, मनोज भाउ आपल्या मार्गदर्शनात मला चालायचे आहे. निकाल काही पण येवू दया. मी जिंको किंवा आपण जिंका. मी हारलो तरी आपल्या मार्गदर्शनात चालेल आणि जर जिंकलो तरीही आपल्याच मार्गदर्शनात चालेल. मला कार्य करायचे आहे आणि मला माहित आहे आपल्या कामाची पध्दत. तर आई महापौर आज मी माझा मित्र, सखा माझ्या पुर्व निवडुणकीचा प्रतिद्वंद्वी आणि माझ्या छोटया भावाला श्रध्दांजली देत आहे. भगवान गुप्ता परिवाराला शक्ती देवो, त्यांच्यासाठी खुप मोठी हानी आहे. घरातील छोटा मुलगा आणि त्यांची आई असु दया, गुप्ता हो किंवा प्रभुनाथ गुप्ता असु दया, दोघे सारखेच असतात परंतु या मुलावर मी त्यांचे प्रेम व्यक्तीश: बघीतले आहे. धर्मेंद्र पेक्षा जास्त होते. तर भगवान त्यांना सहनशक्ती देवो. प्रभुनाथ गुप्ता यांना त्यांच्या परिवाराला त्यांची आई असु दया, पत्नी असु दया, त्यांच्या मुलांना आणि आमचे कर्तव्य आहे की, एक असा परिवार ज्याने राजकारणात एवढे मोठे योगदान दिले आहे. जे की आमचे शहर हे सिंधी बहुक्षेत्र मानले जात आहे. आणि गुप्ताजी यांची राजनीती इतकी वर्षे उत्तर भारतातून येवून आमच्या भुमीला कर्मभुमी समजले आहे. प्रत्येक कार्य केले आहे. त्यासाठी आमचा पण अधिकार बनत आहे. की येत्या काळात सर्व पक्ष कशाप्रकारे या परिवारासोबत उभे राहतात. आता त्यांचा राजकीय काय भवितव्य आहे. परंतु गुप्ता परिवाराचा जो वारसा आहे, अजित प्रभुनाथ गुप्ताची जी यांना तिला पुढे घेवून जायचे आहे. पुढे जायचे आहे आमचे पाणी पुरवठयाचे सभापती आमच्या सोबतच होते. समस्त उल्हासनगर व सदनातर्फे राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या वतीने, कालानी परिवारातर्फे त्यांना श्रध्दांजली देतो, धन्यवाद.

**<u>सदस्य, श्री. प्रमोद टाले:-</u>** मा. महापौरजी मा. आयुक्त साहेब, उपस्थित असलेले सर्व सन्माननीय नगरसेवक, अधिकारी वर्ग, अजित गुप्ता याच्या शोक संदर्भात आपण बोलत आहेत. गुप्ता परिवाराचे उल्हासनगर शहरामध्ये उल्हासनगर शहर घडवण्यामध्ये जे योगदान होते. मला वाटते हे न विसरता येण्यासारखे आहे. वडिलांपासुन ते अजितपर्यंत जर त्यांची कारकिर्द आपण पाहिली तर या शहरामध्ये सिंधी परिसरामध्ये काम करीत असतांना सर्व उत्तर भारतीयांचे नेतृत्व करीत असताना एक अजित गुप्ता सारखा माणुस जेव्हा नगरसेवक होतो. तेव्हा समाजाची नाळ त्यांच्यामध्ये जी भिनलेली आहे. एक मनाला चटका लावून जाणारे हे जे व्यक्तीमत्व आहे, ते आज आपल्यात नाही आहे. असे वाटते की, परवा परवा आम्ही सोबतच होतो. पाणी पुरवठा सभापती असताना त्यादिवशी पण आम्ही सोबतच होतो. आणि दुस-या दिवशी अचानक माहिती पडले की, गुप्ता आज राहीलेले नाहीत. माणुस असाच असतो, आज आपण आहोत, उदया आहोत की नाही याची काही कल्पना नाही. परंतु जोपर्यंत आहोत आपण तोपर्यंत समाजाशी नाळ आपण बांधलेली आहे आणि हा अजित गुप्ता यांना धीरगंभीर तर होताच, गोरा गोमटा, राजबिंडा असा हा नगरसेवक आज आपल्यातून निघुन गेलेला आहे. मी माझ्या पीपल रिपब्लीकन पक्षातर्फे जाहीर आदरांजली व्यक्त करतो आणि इथेच थांबतो. धन्यवाद!

**<u>सदस्य, श्री. किशोर वनवारी:-</u>** मा. महापौरजी, आयुक्त साहेब, सचिव मॅडम, सन्माननीय सर्व सदस्य, अधिकारी वर्ग आपण ज्या दोन महासभा आयोजित केल्या होत्या, पहिल्यांदा २ वर्षानंतर ऑफलाईन महासभा होणार होती. आम्ही खुप सारे विषय एक छोटे भाई तरुण आणि नगरसेवकांच्या सोबत ते पाणी पुरवठयाचे सभापती पण होते. आणि खास करुन माझा ३० वर्ष त्यांच्या सोबत चांगला भाई-चारा होता. तर ५ ला १० मिनिटे कमी ३० दिवस कामकाजाचे दिवसात माझ्या दालनात यायचे आणि चहा आम्ही ५.०० वा चहा सोबतच पित होतो. कुठे ही जात नव्हते. कुठे पण असु दया, ५.०० वा. माझ्या दालनात यायचे एवढे आमचे आपसांत नातेसंबंध होते. त्यांच्यासारखा व्यक्ती मी बघीतला नाही. किती वर्ष माझ्यासोबत बसला, पण कधीच कोणाबददल ते बोलत नव्हते. तसे खुप लोक आहेत जे पुर्ण दिवस दुसऱ्यांच्याबददल बोलत असतात. उलटसुलट बोलतात. पण ते असे होते की, शांत स्वभावाचे बसून रहायचे. कोणी त्यांना बोलले तरीपण उत्तर देत नसत, हसत रहायचे. असे आमचे मित्र, साथी, भाऊ जवानाचे निधन नाही व्हायला पाहिजे होते. दुर्भाग्य आहे की, हे आमच्या हातात नाही. गुरु परमात्माच्या हातात आहे. आम्ही त्यांच्या दु:खात सामील आहोत. आम्हांला अस वाटतय देव त्यांना आपल्या चरणी ठेवेल आणि आपल्या महासभेने जो असा सदस्य गमावला आहे, तर आज आमचे भाऊ श्री. प्रदिप रामचंदानी यांनी सांगितले की, त्यांच्याशी मी सहमत आहे, सर्व सदस्य एक महीन्याचे मानधन त्यांना देवू जो बिटूभाई यांना प्रस्ताव आणला आहे. त्याचे मी अनुमोदक करतो आणि जो आपल्यामध्ये आता नगरसेवक नाहीत

आमच्या जीवन इदनानी आणि आशा इदनानी आज महासभेत नाही आहेत. तर जीवन भाईची सासु व आशा इदनानी यांची आई श्रीमती पुष्पा ब्रिजलाल लालवानी यांचे पण निधन आहे. दुसरे पण दोन तीन लोक आहेत. त्यांचेही निधन झाले आहे, त्या सर्वांना श्रध्दांजली दिली जावी.आणि हया दोन ज्या महासभा आहेत जसे आमचे अजित गुप्ता नगरसेवक यांचे निधन झाले आहे हा तिसरा आहे. या आधी आमचे श्री. सुनिल सुर्वे साहेब यांचे निधन झाले होते तेव्हा पण आम्ही मिटिंग अनिश्चित कालावधीसाठी स्थगित केली होती. आणि आमची इंद्रावती राव सिंग जे आमचे काका सुरेश सिंग यांची आई आहे. त्यांचे पण जेव्हा निधन झाले होते तेव्हा पण आम्ही मिटिंग अनिश्चित कालावधीसाठी स्थगित केली होती. तर आज पण १०-१५ लोकांनी पत्र दिले आहे. आणि सर्वांचा सहयोग आहे. सर्व बोलत आहेत परंतु तरीपण मी पुन्हा बोलतोय की आज या दोन्ही मिटिंग स्थगित करुन जो टाउन हॉल आहे, तिथे आम्ही लोकांना ५ वाजलेपासुन ६ वाजेपर्यंत पप्पु भाई अजित प्रभुनाथ गुप्ता यांचा श्रध्दांजलीचा कार्यक्रम आयोजित केला आहे. श्रध्दांजलीचा कार्यक्रमात पण श्रध्दांजली दया. आणि आज जे आईच्या डोळया अश्रु आले तर ते सर्वांनाच दु:ख आहे. बाहेर पण आज पाउस पडत आहे. कारण की एक चांगला आत्मा, खुप चांगला माणुस होता. देवा त्याला आपल्या चरणात निवास देवो. आणि त्याच्या कुटुंब परिवाराला आणि आमच्या सर्व मित्रांना, भावांना, बहिणींना सहन करण्याची शक्ती देवो. हरी ओम..

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** मा. महापौरजी, सभागृहातील सर्व सदस्य मी येथे भारतीय जनता पार्टीच्या पुर्ण परिवारातर्फे देशाचे महान संत ज्यांनी ९९ वर्षी आपला जन्मउत्सव पण केला, असे महान संत ज्यांनी शिवशाहीला घराघरात पोहचवले. ज्यांचे दर्शन एकदा उल्हासनगरमध्ये पण आम्हांला झाले होते. असे महान संत आदरणीय बाबासाहेब पुरंदरे यांना शत शत नमन करुन त्यांना श्रध्दांजली अर्पित करतो. आणि त्याचबरोबर एक खुप दु:खत घटना जे उल्हासनगर महानगरपालिकेत आज दोन वर्षांनी जी महासभा होत आहे. ती आम्हांला श्रध्दांजली देवून स्थगित करणे भाग पडत आहे. अजित प्रभुनाथ गुप्ताजी रात्री १२.०० वाजता त्या दिवशी ही बातमी येवू लागली तर कोणालाच विश्वास बसत नव्हता की ही घटना कशी झाली. संध्याकाळी ५.०० वाजल्यापासुन ५.३० वाजेपर्यंत किशोर वनवारी यांच्या दालनात अजित जी उपस्थित होते. आणि अशी दु:खत घटना झाली आहे. अजितजींच्या सोबत एक त्यांचे मित्र होते त्यांचे पण निधन झाले मी त्यांचा पण समावेश करावे त्यांना पण श्रध्दांजली येथे अर्पित दिली जावी. मी भारतीय जनता पार्टीच्या पुर्ण परिवाराकडून त्यांना शत शत नमन करतो आणि श्रध्दांजली अर्पित करतो आणि ईश्वराकडे हेच निवेदनला प्रार्थना करतो की, त्यांच्या परिवाराला अशा दु:खाच्या घटनेत सहनशक्ती प्रदान करो व त्यांना मिळावी. जेव्हा मी पहिल्यावेळेस ९७-९८ ला नगरसेवक झालो होतो. त्यावेळेस गुप्ताजी नगरसेवक होते. २५ वर्षेपर्यंत आम्ही एकत्र काम केले. त्यासोबतच आज जे पण प्रस्ताव आले आहेत. जी आपली पुर्व महापौर आशा इदनानी यांची आई त्यांना पण आम्ही श्रध्दांजली अर्पित करतो. जे पण प्रस्ताव आले आहेत ते आम्ही मान्य करतो. आमचे नगरसेवक भारतीय जनता पार्टीचे महेश सुखरामनीजी त्यांचे मोठे भावाचे पण अकस्मात मृत्यु झाला आहे. मी त्यांना पण श्रध्दांजली अर्पित करतो. आणि या महासभेस अनिश्चित काळासाठी २.३० वाजताची व ३.०० वाजताची स्थगित करण्यासाठी सर्व सदस्यांना आग्रह करतो. आणि त्याचबरोबर सर्व सदस्यांना व अधिकारी हे निवेदन करतो की, ५ ते ६ वाजेपर्यंत टाउन हॉलमध्ये श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी सभेचे आयोजित केली आहे आपण सर्व तेथे येवून अजित गुप्ताजींना श्रध्दांजली अर्पित करा.

**सदस्या, श्रीमती अंजली साळवे:-** मा. महापौर मॅडम, आज आपल्या महानगरपालिकेतील स्वर्गीय नगरसेवक अजित गुप्ता यांचे अत्यंत तरुण वयात दु:खद निधन झाले आहे. त्यांना मी माझ्यातर्फे व माझ्या काँग्रेस पक्षातर्फे भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करते. तसेच शिवशाहीर स्वर्गीय बाबासाहेब पुरंदरे यांना सुध्दा श्रध्दांजली अर्पण करते व आपल्या पुर्व महापौर आशा इदनानी यांची स्वर्गीय माताजी यांना सुध्दा श्रध्दांजली अर्पण करते. धन्यवाद.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी :-** मा. महापौरजी मा. आयुक्त साहेब, महाराष्ट्र भुषण शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांचे १५ तारखेला त्यांच्या राहत्या घरी पुणे याठिकाणी निधन झाले आहे. शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास जीवंत ठेवण्याचे काम बरेच काळ केलेले आहे. बाबासाहेब पुरंदरे हे व्याख्याते होते, ते नाटककार होते, बाबासाहेब पुरंदरे यांना मला वैयक्तिक जवळ-जवळ ४ ते ५ वेळा भेटण्याचे व त्यांचा आशिर्वाद घ्यायचा योग आला. बाबासाहेब पुरंदरे यांचे व्याख्यान उल्हासनगरमध्ये शिवसेनेच्यावतीने आम्ही ठेवले होते. त्या व्याख्यानाच्या वेळेला त्यांचा आशिर्वाद मिळाला. बाबासाहेब पुरंदरे यांचे आपण नाटक बघितले असेल जाणता राजा खरोखर हुबेहुब शिवाजी महाराज यांचा इतिहास डोळयासमोर ठेवण्याचे काम त्यांनी या महाराष्ट्रातच नव्हे तर महाराष्ट्राच्याबाहेर केलेले आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे काय होते हे या पिढीला माहित व्हावे ते दाखविण्याचे काम स्वर्गीय बाबासाहेब पुरंदरे यांनी केलेले आहे. अशी महान व्यक्ती आपल्यातून जाते अशा महान व्यक्तीला भावपुर्ण श्रध्दांजली अर्पित करताना मला एक छोटीशी गोष्ट सांगावीशी वाटते, उल्हासनगरमध्ये जिजामाता उदयान आहे, त्या जिजामाता उदयानमध्ये बाळ शिवाजी आणि जिजामाता यांचा पुतळा आहे आता ही आहे पण त्याकाळी १९९५ साली तो छोटा होता, रमेश चव्हाण येथे आहेत,

आम्ही नगरसेवक असताना तो पुतळा छोटा आहे तो बदलला पाहिजे त्यावेळेच्या तत्कालीन नगरअध्यक्षा स्वर्गीय ज्योती कलानी यांच्यामाध्यमातून प्रस्ताव आणून पुतळा नवीन बनविण्याचे काम ठराव मंजूर झाला. तर तो पुतळा कसा असला पाहिजे, त्याची संकल्पना ही शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांची होती. पुण्याचे शिल्पकार परदेशी त्यांच्याकडे त्यांनी ते काम दिले होते. व त्यांच्यादेखरेखी खाली आता जो पुतळा बनलेला आहे तो त्यांच्या देखरेखी खाली तयार होवून तिथे बसवलेला आहे. बाबासाहेबांचे उल्हासनगर शहरासाठी ही छोटेशे योगदान आहे. शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांना या सभागृहाच्या व शिवसेना उल्हासनगर शहर शाखेच्या माध्यमातून श्रध्दांजली अर्पित करतो. त्याचबरोबर अजित ऊर्फ पप्पु गुप्ता यांचे अपघाती निधन झाले. त्यांच्या राजकीय कारकिर्दीला सुरुवात होत असताना त्या राजकीय कारकिर्दीमध्ये नगरसेवक या पदावर काम करत असताना लोकांची सेवा करण्याची त्यांची इच्छा असताना परमेश्वराला ते आवडले नाही, एक म्हण आहे मराठीमध्ये "जो आवडे सर्वांना, तोचि आवडे देवाला! काळाने घाला घातला आणि त्यांचे निधन झाले. गुप्ता परिवार मला आठवतय गुप्ता १९९५ पासुन या सभागृहाचे सदस्य आहेत. गुप्ताजी त्यावेळेला युपीपी पक्षाच्या माध्यमातून निवडुन आले होते. व आम्ही सर्व शिवसेनेच्या माध्यमातून या सभागृत निवडून आलो होतो. तेव्हा पासुन गुप्ता परिवाराचे आणि आमचे संबंध चांगले राहिले आहेत. गुप्ता परिवाराने या उल्हासनगर शहरासाठी योगदान दिलेले आहे. अजित गुप्ता यांचे निधन झाल्यामुळे गुप्ता कुटुंबावर फार मोठे दु:खाचा डोंगर कोसळला आहे. मी आई जगदंबे चरणी प्रार्थना करतो. गुप्ता परिवाराला दु:ख सहन करण्याची शक्ती देवो. आणि शिवसेना शाखेच्यावतीने भावपुर्ण श्रध्दांजली अर्पित करतो. ओम शांती...

**<u>सदस्य, श्री. अरुण आशान:-</u>** मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, सर्व सन्माननिय सदस्य, खुप दु:खाची गोष्ट म्हणजे लहान भाऊ किंवा मुलगा आपल्या मोठया भावाच्या किंवा वडीलांच्या खांदयावर जाणे यापेक्षा मोठे दु:ख या जगात नाही. खरे म्हटले तर गुप्ता परिवाराशी संबंध २००७ साली माझी आई या महानगरपालिकेची निवडणुक लढवून जेव्हा महापौर झाली, त्या दिवसापासुन व अगोदरपासून प्रभुनाथ गुप्ताजी आम्हांला भेटायला नेहमी यायचे. कुठल्याही पक्षात असो कुठल्याही ठिकाणी असो परंतु आईची आठवण नेहमीच त्यांना असायची. त्याचप्रमाणे त्यांचा मुलगा आमचा मित्र पप्पू गुप्ता, खर म्हटलं तर टोनी सिरवानी, पप्पु गुप्ता, शेरी आम्ही ३-४ जण नेहमी अस भेटायचो. आणि नेहमी आमचा विषय राजकारणाच्या पलिकडे कधी कधी असायचा. परंतु महानगरपालिकेत कधी असे दाखवले नव्हते हे कुठल्या पक्षाचे आहेत आणि आपण येथे का बसतो आणि यांचेकडे आपण एवढा वेळ का बसतो? महापालिकेमध्ये गुप्ताजी कधीपण आले तरी दालनात येवून जाणारच. मुलाला पाठवणार काही काम असेल तर त्यांना भेटायला सांगणार परंतु अत्यंत मनमिळाऊ कधीही उलट शब्द न बोललेला आणि असा चांगला हा मुलगा एवढया लवकर त्याला काळ हरपून नेईल असे वाटले नव्हते. खुप वेदना होतात मनाला, जेव्हा अस आपल्या जवळच माणुस जातं खर म्हटलं तर चौधरी साहेबांनी सांगितले "जो आवडे सर्वांना, तोचि आवडे देवाला ! खरंच सगळयांना आवडीचा या सभागृहामध्ये असा एकही व्यक्ती नाही की किंवा सभागृहाच्या बाहेर बोलणारा कोणीतरी व्यक्ती असेल, असा हा आमचा मित्र अजित गुप्ता या मी माझ्या परिवारातर्फे आणि पक्षातर्फे भावपुर्ण श्रध्दांजली अर्पित करतो. श्रध्दांजली अर्पित करत असताना या महाराष्ट्राचे भुषण आदरणीय व्यक्तीमत्व ज्यांनी या महाराष्ट्राचा इतिहास घराघरांमध्ये देशात नव्हेतर परदेशात पोहचविण्याचे काम आणि शिवशाही ज्यांनी लोकांच्या मनामध्ये अगदी देखाव्यांसकट आणि कार्यक्रमांसकट उभा करुन लोकांपर्यत शिवशाही आणि शिवाजी महाराज यांचे चरित्र जिवंत ठेवल असे शिवशाहिर पदमभुषण बाबासाहेब पुरंदरे यांना सुध्दा मी माझ्या परिवारातर्फे माझ्या पक्षातर्फे आदरांजली वाहतो. या सभागृहाच्या मा. महापौर आदरणीय आशा इदनानीजी यांच्या आईचे निधन झालेले आहे. त्याचप्रमाणे आमचे मित्र या सभागृहातील सदस्य महेश सुखरामानीजी यांचे भाऊ यांचे सुध्दा दु:खत निधन झाले आहे. त्याचबरोबर या उल्हासनगर महानगरपालिकेचे माजी नगरसेवक देवनदास चुग यांचेही निधन झाले आहे. या सर्व व्यक्तींना व महामानवांना जेष्ठ, श्रेष्ठ, थोर अशा सगळयांना मी माझ्यावतीने माझ्या परिवाराच्यावतीने, शिवसेनेच्यावतीने त्यांना जाहिर आदरांजली वाहतो. अजित गुप्ता यांना जो मानधन देण्याचा प्रस्ताव आहे. तो सर्वसंमतीने या सभागृहाने मंजूर करावा अशी अपेक्षा ठेवतो व हिच भावपूर्ण श्रध्दांजली वाहतो. धन्यवाद!

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:-</u>** फेब्रुवारी २०२० नंतर तब्बल २१ महिन्यानंतर महापालिकेची महासभा होत आहे. आमचे सर्वांचे दुदैव बसे की या २१ महिन्यानंतर श्रध्दांजली सभा घ्यावी लागते. सर्वांना माहित आहे की, जो आलेला तो जाणारच आहे. तो जाण्यासाठीच आलेला आहे. येणे आणि जाणे यामध्ये जो तो त्याच्या कर्तृत्वाचा किंवा आठवणींचा ठेवा ठेवून जातो. तशा प्रकारचा ठेवा या दोघांनी आमचे पप्पू गुप्ता असतील किंवा शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे असतील यांच्या आवठवणी भरपूर आहेत. तरी या २१ महिन्याच्या कालखंडामध्ये जवळपास तीन नगरसेवक या सभागृहाने गमावले आहेत. सुनिल सुर्वे ते पण सातत्याने निवडुन यायचे. सुनिल सुर्वे किंवा त्यांचा परिवार. आमच्या संजयसिंगच्या मातोश्री नगरसेविका चंद्रावती सिंग आणि आता अजित गुप्ता यांच्याविषयी भरपुर सांगितले. पण एक आम्ही सर्वांनी पाहिले की ते हसतमुख असायचे कधी कोणाशी वाद नाही, कोणाशी वाद-विवाद नाही. फार कमी नगरसेवक आहेत ज्यांच्याबददल

वाद-विवाद नाहीत. सभागृहात असेल किंवा सभागृहाबाहेर असेल किंवा वार्डमध्ये असेल आणि मग जेव्हा अशी लोक अचानक अकाली जातात तेव्हा एक चुटका लावून जातात, चटका लावून जाता आणि मग ग.दि.मांचे गीत आठवते, इथे फुलांना मरण जन्मता, दगडांना ही चिरंजीवीता, बरीच लोक अशी आहेत. “ बोरी बाभळी उगाच जगती ! म्हणजे लोकांना आवडतात लोकांमध्ये मिसळून लोकांसाठी झटत असतात, त्या लोकांना परमेश्वर असे अकाली घेवून जातात. ३०-३५ व्या वर्षी. आणि असा हा पप्पु आमच्यातून गेलेला आहे. गुप्ता परिवाराचे आणि आमचे वैयक्तिक संबंध १९९७ पासून आहेत. ९५ पासुन त्यांचा नगरसेवक आणि ९७ पासुन सातत्याने प्रभुनाथ गुप्ता असतील, त्यांच्या पत्नी असतील, त्यांच्या सुन असेल आणि आता अजित. म्हणजे या परिवारावर अगदी त्याठिकाणी दक्षिण भारतीय वस्ती असताना तामीळ लोक आहेत असे असताना सुध्दा त्या तामिळ बहुभाषिक विभागातून ते ४-५ वेळा सातत्याने निवडुन येतात नक्कीच त्या परिवाराचे त्यासाठी योगदान आहे. आणि पप्पु पहिल्यांदा निवडुन येत होता, त्याला भविष्य उज्वल होत, पण आज तो गेलेला आहे. त्यामुळे गुप्ता परिवारास त्या दिवशी भेटायला गेल्यानंतर साहेब मी तुटुन गेलो आहे. खऱ्या अर्थाने आई आणि वडील तुटले आहेत. म्हणजे आता पप्पु गुप्ता त्या परिवाराचा आधारस्तंभ होत होता. कारण वडील वयस्कर झाले आहेत त्यांच्या कारकिर्दीत त्यांनी भरपुर काम केले आहे. शेवटी आता गुप्ता परिवारीची मदार पुर्णपणे याच्यावर होती. तरी ते कोणाच्याच हातात नाही. त्यामुळे नशीबाच्यापुढे काही चालत नाही. जे आहे ते पत्कारावे लागते. या धक्क्यातून सावरण्याची शक्ती गुप्ता परिवाराला मिळो. अशी प्रार्थना मी ईश्वर चरणी करतो. अजितला मी माझ्याकडून बोडारे परिवाराकडून, शिवसेना सभागृहाकडून मी त्यांना श्रध्दांजली अर्पित करतो. महाराष्ट्र भुषण शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे खरोखर भुषणावह होते. त्यांचे माझे वैयक्तिक संबंध होते. व्ही.टी.सी. मैदानावर शिवसेनेच्या माध्यमातून आणि माझ्याच प्रभागातून दोन वेळा त्यांचे ३-३ दिवसाचे व्याख्यान ठेवले होते. छत्रपती शिवाजी महाराज किंवा डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे सर्वांना माहित आहे. पण माहीती आहेत, आम्ही त्यांना समजून घेतले आहे. ही समजून घेण्याची किंवा सांगण्याची कला बाबासाहेब पुरंदरेची अगळीवेगळीच होती. आणि त्या व्यासपिठावर आल्यानंतर ७५ व्या वर्षी नंतर दोन वर्षांनी अमृत महोत्सव या व्ही.टी.सी. मैदानावर उल्हासनगरवासियांनी त्यांचा सत्कार केला होता. या दरम्यान अस सांगितले की त्यावेळेस बालशिवाजी उदयानाचे नंतरच्या काळामध्ये १९९९ ला आम्ही २००० मध्ये घेवून आलो जेव्हा जिजामाता उदयानामध्ये आपण तेरवनच्या धर्तीवर सुशोभिकरण करण्याचा प्रस्ताव आला. याठिकाणी भित्ती चित्र कुठले असले पाहिजे ते त्यांनी निवडले. जेव्हा चौधरींनी सांगितले की, परदेशी यांच्याकडे बालशिवाजी आणि जिजाऊचा पुतळा बघायचे आहे तेव्हा इंदिरानगर बिबवेवाडीला राहतात त्याठिकाणी ते ३ वेळा आले कशाप्रकारे अंतिम स्पर्श असला पाहिजे एवढया बारीक गोष्टी शिवाजी महारांचेबददल त्यांना प्रेम होते. फक्त महाराष्ट्रात नाही, फक्त पुण्यामध्ये नाही, संपुर्ण अगदी मॉरीशिएसपर्यंत आणि इंग्लंडपर्यंत त्यांनी “जाणता राजा” च्या माध्यमातून संपुर्ण जगाला शिवाजी महाराज कसे होते, कठोर कसे होते, मातेविषयी त्यांच्या भावना काय होत्या, परस्त्रीविषयी त्यांच्या भावना काय होत्या आणि हिंदुत्वाविषयी काय होत्या. वयाच्या ८० व्या वर्षी जेव्हा “जाणता राजा” च्या घोडयावरुन जसे शिवाजी महाराज जसे पात्र आहे त्या आवेशामध्येच ते यायचे. प्रत्यक्ष शिवाजी महाराज त्यांच्यामध्ये संचारायचे. माता भवानीचा जरी जागर करायचा असेल त्या आवेशामध्येच ते करायचे. आज असे बाबासाहेब यांनी छत्रपती शिवाजी महाराज आम्हांला सर्वांना समजून सांगितले. ते असेच नाही त्यांनी फार तपश्चर्या केली. प्रत्येक गड किल्ले त्यांनी भ्रमण केले अगदी पाया खाली शर्य पडायचे. अभ्यास कित्येक वर्ष केलेला आहे. पुस्तके चाळलेले आहेत, कथा, कांदब-या जे जे साहित्य आहे अगदी इंग्लंडमध्ये जावून भवानी तलवार कुठे आहे ती इकडे कशी आणता येईल. इतके त्यांचे प्रयोजन होते. त्यांचे राहते घर घर नव्हते, ऑफिस ऑफिस नव्हते फक्त शिवाजी महाराज. म्हणजे जागीपणी झोपेमध्ये सुध्दा छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती शिवाजी महाराज त्यासाठी यांनी संन्यास पत्कारला. त्यासाठी आयुष्य मोजले होते. आज असे शिवचरित्र व्याख्याते होणे दुर्मिळ आहे. होतील बाबासाहेबांनी कधी अर्थाजन करण्यासाठी, पोट भरण्यासाठी कधीच नाही. जिथे जाणता राजा केला तिथलेच कलाकर असायचे. त्यांच्याकडे कायम स्वरुपी कलाकार नव्हते. आवाज स्वत: दयायचे अगदी ८०-८५ व्या वर्षी ठाण्याला आले ठाण्याचे कलाकार, पुण्याला गेले पुण्याचे कलाकार, कोल्हापुरला गेले कोल्हापुरचे कलाकार अगदी मॉरिशिएसमध्ये सुध्दा त्यांनी शिवप्रेमी नागरीक घडवले आहेत. आणि त्यामुळे तेथील मॉरिशिएसमध्ये कलाकार असायचे. जिवंत शिवचरित्र त्यांनी जाणता राज्याच्या माध्यमातून या संपुर्ण जगाला दाखवून दिले आहे. असे शिवचरित्र लिहिणारा, लोकांना सांगणारा होणार नाही, होणे नाही. मी शिवप्रेमी आहेच त्याचबरोबर बाबासाहेब पुरंदरे प्रेमीही आहे. त्यांनी प्रत्येक नाटकामध्ये जाणता राजा चे या ठिकाणी जेव्हा जेव्हा प्रयोग व्हायचे तेव्हा माझा मुलगा, माझी मुलगी माझे भाचे वगैरे त्या प्रयोगाला जायचे. आमचे सुरेश केणे, सुभाष खडकबाण, नंदु दलाले ही लोक तो प्रयोग करण्यामध्ये पुढे असायचे त्याबरोबर आमची ही लोक असायची. त्यामुळे शिवसेनेचे व शिवप्रेमी नागरीकांचे प्रचंड नुकसान झालेले आहे. ठिक आहे वयोमानानुसार होणारच होत. परंतु भावना असतात. काही लोक अशी असतात की, ती आपल्यातच राहावी. त्यांनी जाऊच नये. सतत मार्गदर्शन त्यापैकी बाबासाहेब पुरंदरे होते. मी शिवसेनेच्यावतीने, बोडारे परिवाराच्यावतीने, या सभागृहाच्यावतीने

शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांना आदाराजंली, श्रध्दांजली अर्पित करतो. त्यांचे स्थान जिथे त्यांनी निर्माण केलेले आहे. शिवचरित्र सांगून नक्कीच चांगल्या ठिकाणीच बसतील अशी कल्पना करतो आणि या ठिकाणी थांबतो धन्यवाद !

**सदस्य, श्री. राजेश वधारिया:-** मा. महापौरजी, बाबासाहेब पुरंदरे यांचे साठी मी दोन शब्द बोलू मला असे वाटते की नाही सुर्याला दिवा म्हणण्यासारखे आहे. त्यांचा जो शिवाजी "जाणता राजा" जो त्यांनी एक नाटक प्रस्तुत केले होते. तो संपुर्ण जगात १००० पेक्षा जास्त प्रयोग झाले होते. त्यांना पदमभुषण भारत सरकारद्वारे आणि महाराष्ट्र सरकारच्यावतीने महाराष्ट्र भुषण आणि कालीदास हनुमान मध्यप्रदेश सरकारच्यावतीने दिले होते. त्याचबरोबर आमचे महेश सुखरामणीजींच्या भावाचे श्री. नानीकराम यांचे निधन झाले आहे. त्यांना पण श्रध्दांजली अर्पित करतो. आमची नगरसेविका आशा इदनानी यांची माता पुष्पा ब्रिजलाल लालवानी यांना पण आणि त्याचबरोबर आपले माजी नगरसेवक देवनदास चुग त्यांना पण श्रध्दांजली अर्पित करतो. आज आमच्यामध्ये अजित प्रभुनाथ गुप्ता ज्याला प्रेमाने आम्ही पप्पु म्हणून संबोधत होतो. त्यांच्या परिवाराशी तर जुने नातेसंबंध होते. परंतु त्यांच्यासोबत जास्त संबंध नाही राहीला. परंतु जेव्हा पण ते स्थायी समितीमध्ये येवून सभागृहामध्ये किंवा एन्टीचेंबरमध्ये बसायचे तर खुप शांत स्वभावाचे राहत होते आणि कधीही बोलताना संयमी असायचे. जेव्हा आम्हांला रात्री माहित झाले की, त्यांचा अपघात झाला आहे असा जमनुजींचा फोन आला. तेव्हा मी, जमनुजी, आमदार, श्री. कुमार आयलानी सेंट्रल हॉस्पिटलमध्ये गेलो होतो. त्यांना बघून असे नाही वाटले की, त्यांच्या शरीरात प्राण नाही आहे. असे वाटले की ते फक्त झोपले आहेत. आणि कधीपण उठून बसतील. माझ्या सारखेच त्यांच्या धर्मपत्नीला ही असेच वाटत होते तर त्यांनी ॲम्ब्युलंस बोलविली. दुस-या दवाखान्यात हलवले की तेथे काही इलाज होईल. आणि त्यांचे प्राण वाचतील. परंतु जे घडायचे असते तेच घडतेच त्याला कोणी टाळू शकत नाही. जे व्हायचे होते तेच झाले. दुस-या दिवशी जेव्हा त्यांच्या अंत्ययात्रेत सहभागी होण्यासाठी आम्ही सर्व त्यांच्या घराजवळ पोहचलो. तर त्यांच्या शेवटच्या दर्शनात मी तेथे जो जनसमुदाय बघितला ते ९ नंबरच्या पॅनलमधून निवडुन आले होते. परंतु माझ्या ८ नंबर पॅनलचे पण खुप लोक आले होते. तेथे एक वृध्द महिला जी मराठी वाटत होती ती खुप जोरजोराने ओरडत व रडत होती. की जसे त्यांचा स्वत:चा मुलगा गेला आहे. त्याच्यासाठी हे जनतेचे प्रेम दिसत होते. आणि जेवढी तिथे जनता उपस्थित होती. दोन्ही पॅनलची तर हे पण समजत होते की, दोन्ही पॅनलमध्ये त्यांचे चाहते आहेत. तर माझ्या मनात आज एक गोष्ट आली की, समाज माध्यमांवर कधी कधी नगरसेवकांना बददल बरेवाईट बोलले जाते. प्रत्येक छोटया-

मोठया गोष्टींसाठी नगरसेवकांना जबाबदार धरले जाते. आजकाल जे खुप शांतपणे (so cold) समाज कार्य करणारे लोक आहेत जे समाज माध्यमांमध्ये पुर्ण दिवस व्यस्त असतात. ते नगरसेवकांना लोकांसमोर असे दाखवण्याचा प्रयत्न करतात की, शहरात जेवढया पण समस्या आहेत त्या फक्त नगरसेवकांच्यामुळेच आहेत. जर त्यादिवशी त्यातील कुणी आले असतील तर त्यांनी बघितले असेल कि एका नगरसेवकासाठी जनतेचे प्रेम काय आहे. ते प्रेम असेच मिळत नाही. त्यासाठी वेळ दयावा लागतो. आपले खाजगी आयुष्य बाजूला सारुन जनतेचे काम करावे लागते. किती वेळा जिथे महानगरपालिकेचे कर्मचारी पोहचू शकत नाही किंवा काही कायदयाच्या अडचणीमुळे ते काम नाही करत. तर आपल्या पैशाने ते काम करावे लागते त्या सर्व गोष्टी दाखवतात. नगरसेवकांची काय परिस्थिती आहे. ३-४ वार्डाचा पॅनल असताना त्यांचा ३ वार्डाचा पॅनल होता, माझा ४ पॅनल ही तर आज १८ ते २५ हजार लोकांमध्ये निवडुन येणे काय असते? त्यांना काय काय गोष्टींचा त्याग करावा लागतो. ते तेथे दिसत होते. त्यांच्या परिवाराने आपल्या राजनिती जिवनात समाजसेवा केली. हा त्याचा परिणाम होता. जेव्हा तुम्ही या जगात आले तेव्हा तुम्ही रडत होते. आणि जग हसत होते. असे काम करावे की जग रडेल व तुम्ही हसा. तर ते काम करुन पप्पुजी आज आपल्यामध्ये नाही आहेत. या दोन शब्दासोबत मी माझी श्रध्दांजली संपवतो.

**सदस्या, श्रीमती मिना सोंडे:-** आठवण मनापासुन आवडणा-या व्यक्तीच्या जाण्याने होते. गुप्ता परिवार पुर्ण परिवार एक मिळून मिसळून राहणारा, स्नेह परिवार. मग ते प्रभुनाथजीं गुप्ता असू दया, त्यांची पत्नी असु दया, जी आमच्या २००२ मध्ये सोबत होती. त्यानंतर त्याची सुन अनिता होती, त्यांचे पती धर्मेंद्रजी आणि आता न बोलणारी व्यक्ती अजित गुप्ता ज्यांचे डोळे बोलत असत आणि ते शांत राहत होते. मग प्रशिक्षण कार्यक्रमात आम्ही सोबत जाउ दया, किंवा कोणत्याही पार्टीत जाउ दया, सोबत जात होतो. एक चेहरा नेहमी हसरा दिसायचा तो पप्पु गुप्ताचा होता. सोंडे परिवारातर्फे १९ नंबर पॅनलच्यातर्फे आम्ही त्यांना श्रध्दांजली अर्पित करतो. आणि ईश्वरचरणी हीच प्रार्थना करतो की, त्यांच्या आत्म्यास शांती मिळो. ओम शांती...

**सदस्य, श्री. राजू जग्यासी:-** शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे, माझ्या वार्डाचे देवनदास चुगजी, आमच्या महेश सुखरामणीचे भाऊ चे पप्पु गुप्ताजी ला माझ्या परिवाराकडून व पार्टीतर्फे श्रध्दांजली अर्पित करतो.

**<u>आयुक्त, डॉ. राजा दयानिधी:-</u>** सन्माननीय महापौर महोदया, उपस्थित असलेले सर्व सन्माननीय सदस्य, महानगरपालिकेचे अधिकारी आणि कर्मचारी आज आपल्यामधील एक युवा नगरसेवक यांचे दु:खात निधन झालेले आहे. यांचेबाबतीत श्री. अजित प्रभुनाथ गुप्ता यांच्या आत्म्याला शांती मिळो अशी ईश्वराला प्रार्थना करतो. त्याच्या बाबतीत मला एक आठवण आहे, मला असे वाटते की, ती सांगितली पाहिजे गुप्ताजी खुप चांगले होते, काही दिवसापुर्वी ३-४ आठवडयापुर्वी ते माझ्याकडे आले होते. त्यांच्या प्रभागामध्ये एक रोड होत आहे. तो रोड मंजुर करण्याबाबत त्यांनी विनंती केली होती आणि आम्ही तो रोड मंजूर केला होता. परंतु मला असे कधी वाटले नाही. त्यांच्या कामात हे पहिले आणि शेवटचे काम होणार आहे, मला कधी वाटले नाही. परंतु ही दु:खाची गोष्ट आहे. मी त्यांच्या कुटुंबाला आणि त्यांच्या सर्व सदस्यांना ईश्वर त्यांच्या परिवाराला संपुर्ण मदत करेल आणि त्यांच्या परिवाराला सर्व अधिकारी, कर्मचारी यांच्यातर्फे मी भावपुर्ण श्रध्दांजली अर्पित करतो. त्याचबरोबर इतर जे सन्माननीय व्यक्तीं महोदयाचा उल्लेख येथे करण्यात आलेला आहे. त्या सर्व व्यक्ती महोदयांना मी मनापासून सुध्दा मी जे जे आत्मा आपल्याला सोडून गेलेली आहे ते सर्व आत्म्यांकरीता श्रध्दांजली अर्पित करण्यात येत आहे.

**<u>उप महापौर, श्री. भगवान भालेराव</u>**:- सन्माननीय बाबासाहेब पुरंदरे यांचे निधन झाले आहे. आणि पुर्ण महाराष्ट्रात शोकाचे वातावरण निर्माण झाले. बाबासाहेब पुरंदरे यांनी शिवचरित्र शहरी भागापासुन अगदी सोप्या भाषेमध्ये ग्रामीण भागालाही कळेल अशा पध्दतीने त्यांनी चरित्राची मांडणी केली. पुर्ण महाराष्ट्रातच नाही तर संपुर्ण जगात शिवाजी महाराजांचे असलेले व्यक्तीमत्व पोहचवण्याचे काम बाबासाहेब पुरंदरे यांनी केले. महाराष्ट् एक समाज प्रबोधन करणाऱ्या व्यक्तीला पुर्ण्पणे मुकलेला आहे. आणि त्याची उणीव कोणी कधीही भरुन काढू शकत नाही. म्हणून शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांना मी रिपब्लीकन पक्षाचा अध्यक्ष आणि उप महापौर या नात्याने त्यांना भावपुर्ण श्रध्दांजली अर्पित करतो. तसेच आपल्यातून एकदम जवळचे असे वाटतच नाही की पप्पु गुप्ता हे आपल्याला सोडून गेले असतील. कारण पप्पु गुप्ता नेहमीच महानगरपालिकेमध्ये आपल्याला कुठे ना कुठे उभे असलेले दिसायचे. मग ते भारतीय जनता पार्टीचे कार्यालय असो, शिवसेनेचे किंवा महापौरांच्याकडे असो, माझ्याकडे असो नेहमी तो हसतमुखाने दिसणारे व्यक्तीमत्व पप्पु गुप्ता आहेत. कारण त्यांच्या वडीलांचे माझे गेले अनेक वर्षाचे सातत्याने संबंध होते. परंतु पप्पु गुप्ता जेव्हा महानगरपालिकेत २०१७ ला आले आणि ते कधीही प्रेमानेच बोलणारे व्यक्ती असे त्यांच्याकडे बघितले आणि मला वाटते कधीही त्यांचा राग बघितलेला नाही. कि दिसलेलाही नाही. मला वाटते पप्पु गुप्ता २०१२ च्या निवडणुकी नंतर मला २०१२ मध्ये आपला एकही नगरसेवक दगावला नव्हता. पण या मधल्या काळामध्ये आपल्या २०१७ च्या महासभेमध्ये जवळ-जवळ ३ लोक आपल्यातून निघून गेले आहेत. ही दु:खाची बाब आहे. कारण चांगल्या गोष्टी त्यांनी ज्या समाजामध्ये दिलेल्या आहेत. मग सुर्वे असतील, सिंग मॅडम असतील, आपले पप्पु गुप्ता असतील समाजाला एक आदर्श देण्याचे काम नेहमीच केले आहे. पप्पु गुप्ताजी खरोखरच एकदम लहान वयामध्ये आपल्या सोडून गेलेला आहे. त्यांच्या अंत्यसंस्कारासाठी आम्ही उपस्थित होतोच परंतु परिस्थिती अशी होती की तिथे जे वातावरण होते ते वातावरण अत्यंत दु:खदमय होते. आणि गुप्ता परिवाराने

अनेक वर्ष या उल्हासनगरच्या राजकीय जीवनामध्ये एक स्थान निर्माण केले आहे. खरोखरच पप्पु गुप्ताला अजूनही राजकीय जीवन फार मोठे होते पण ते आपल्यातून निघून गेलेले आहे. तसेच आमचे महेश सुखरामाणी यांचे वडील असतील, त्या सर्वांना मी रिपब्लीकन पक्षाचा अध्यक्ष आणि उप महापौर या नात्याने त्यांना भावपुर्ण श्रध्दांजली अर्पित करतो आणि इथेच थांबतो. ओम शांती....

**महापालिका सचिव:-** ही पहिली सभा होती स्थगित सभा सर्वांच्या सांगण्याने पुढे ढकलण्यात येत आहे. आता दुसरी सभा सुरु होत आहे. त्यापुर्वी आपण दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पित करु या. ओम शांती.

---

**सुचकाचे नाव :– श्री. कलवंतसिंग सोहता, श्री.किशोर वनवारी, श्री. शंकर लुंड**

**अनुमोदकाचे नाव :– श्री. राजेंद्र चौधरी, श्री. राजेश वदारिया, श्रीम. मिना सोनेजी**

**शोक प्रस्ताव**

**उल्हासनगर महानगरपालिकेचे नगरसेवक, श्री. अजीत प्रभूनाथ गुप्ता यांचे नुकतेच दिनांक १२/११/२०२१ रोजी आकस्मीक निधन झाले आहे.**

**श्री. अजीत प्रभूनाथ गुप्ता हे एक चांगले नगरसेवक होते. तसेच प्रभागातील लोकांना ते हवे हवेसे होते. लोकांसाठी ते झटत होते, मनाला चटका लावून जाणारे त्यांचे व्यक्तीमहत्व होते. अगदी तामीळ वस्ती असतांना त्या विभागातून चार पाच वेळा निवडून येतात. त्यामुळे त्या परिवाराचे नक्कीच योगदान आहे. पप्पू हा पहिल्यांदा निवडून आले होते, त्यांचे आयुष्य उज्जवल होते. त्या लोकांना प्रभागासाठी सुध्दा ते एक समाजसेवक म्हणुन चांगले काम करत होते. कोरोनाच्या संकट प्रसंगी सुध्दा ते धावपळ करत काम करत होते. प्रत्येक ठिकाणी ते हजर असायचे यांचे निधन झाल्याने दुःखाचा डोंगरच कोसळला आहे.**

**त्यांच्या कुटूंबियांचे दुःखात हे सभागृह सहभागी असुन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.**

महासभा ठराव क्र. २०ब दिनांकः– १८/११/२०२१

**ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार नगरसेवक, श्री. अजीत प्रभूनाथ गुप्ता यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे आणि त्यांच्या कुटूंबियांच्या दुःखात सहभागी होऊन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.**

**तसेच उल्हासनगर महानगरपालिकेच्या नगरसेवकांच्या मागणीनुसार त्यांच्या पुढील भविष्यासाठी त्यांचे १ महिन्याचे मानधन श्री. अजीत प्रभूनाथ गुप्ता यांच्या पत्नी व मुलांना सुपुर्द करण्यास प्रशाासनास निर्देश देत आहे.**

**या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.**

सर्वानुमते

**पीठासीन अधिकारी**
**सर्वसाधारण महासभा**
**उल्हासनगर महानगरपालिका**

---

**सुचकाचे नाव :– श्री. राजेंद्र चौधरी, श्री. जमनादास पुरस्वानी, श्री. धनंजय बोडारे**

**अनुमोदकाचे नाव :– श्री. किशोर वनवारी, श्री. राजेश वदारिया, श्रीम. अंजली साळवे**

## शोक प्रस्ताव

महाराष्ट्रातील प्रत्येक घरात ओजस्वी वाणीने शिवचरित्र पोहचवणे मराठी मनात शिवलिंग चेतवणारे शिवकार्याचे गारुड निर्माण केलेले सदा प्रफुलित व चैतन्यदायी राहणारे असे पदमभुषण व महाराष्ट्र भुषण शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांचे वयाच्य ९९ व्या वर्षी दिनांक १५/११/२०२१ रोजी पहाटे त्यांच्या राहत्या घरी पुणे या ठिकाणी निधन झाले आहे. शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास जीवंत ठेवण्याचे काम बरेच काळ केलेले आहे. बाबासाहेब पुरंदरे हे एक व्याख्याते होते, नाटककार होते. छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास समजून घेण्याची आणि सांगण्याची कला बाबासाहेब पुरंदरेची आगळीवेगळीच होती. शिवाजी महाराजांबददल त्यांना अपार प्रेम होते. त्यांनी फक्त महाराष्ट्रात नाही, पुण्यामध्ये नाही, संपुर्ण अगदी मॉरीशिएस पर्यंत आणि इंग्लंड पर्यंत "जानता राजा" च्या माध्यमातून संपुर्ण जगाला शिवाजी महाराज कसे होते? कठोर कसे होते? मातेविषयी त्यांच्या भावना काय होत्या? परस्त्रीविषयी त्यांच्या भावना काय होत्या? आणि हिंदुत्वाविषयी काय होत्या. बाबासाहेब पुरंदरे यांनी शिवाजी महाराजांचा इतिहास समजून सांगितले असेच नाही, त्यासाठी त्यांनी फार तपश्चर्या केली, प्रत्येक गड, किल्ले त्यांनी भ्रमण केले. छत्रपती शिवाजी महाराजांसाठी त्यांनी सन्यास पत्कारला. बाबासाहेब पुरंदरे यांचे निधन झाल्याने दुःखाचा डोंगरच कोसळला आहे. त्यांच्या कुटूंबियांचे दुःखात हे सभागृह सहभागी असून हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्मास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र.२०क** **दिनांक:— १८/११/२०२१**

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे आणि त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**सुचकाचे नाव :— श्री. अरूण आशान**

**अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी**

**शोक प्रस्ताव**

उल्हासनगर शहरातील जयराम अपार्टमेंट गोल मैदान येथे जुने रहिवासी, समाजसेवक, उतुंग व्यक्तीमहत्व, मनमिळावू स्वभावाचे माजी नगरसेवक श्री. देवनदास चुघ यांचे नुकतेच निधन झाले आहे व आपल्या नगरसेविका आशा जीवन इदनानी यांच्या माता श्रीम. पुष्पा ब्रिजलाल लालवानी यांचे पण निधन झाले आहे.

वर उल्लेखलेल्या कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असून हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र.२०ड** **दिनांक:— १८/११/२०२१**

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार, उल्हासनगर शहरातील समाजसेवक, उतुंग व्यक्तीमत्व, मनमिळावू स्वभावाचे माजी नगरसेवक श्री. देवनदास चुघ, नगरसेविका आशा जीवन इदनानी यांच्या माता श्रीम. पुष्पा ब्रिजलाल लालवानी यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

**सर्वानुमते**

महापौर / पिठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी**:- एक मिनिट ते दोन प्रस्ताव पास करण्यात यावे. एक श्रध्दांजलीचा आणि एक मानधन जे सगळयांनी दिलेले आहे.

**महापालिका सचिव:-** जो श्रध्दांजलीचा प्रस्ताव आहे त्यामध्येच आम्ही मानधन समावेश करु.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी**:- इतिवत्ताची वाट न पाहता

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी**- सचिव मॅडम सर्व नगरसेवकांचे एक महिनाचे मानधन अजित गुप्ता यांचे कुटुंबियाने देण्यात यावे.

**महापालिका सचिव:-** काहीना हरकत असेल की आमचे मानधन देण्यात येवू नये. त्यांनी मला या सोमवार पर्यंत पत्र दयावे. नाहीतर सगळयांचे मानधन देण्यात येतील. कृपया राष्ट्रगीताकडे लक्ष दयावे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी**- नाही कोणाची हरकत नाही देण्यात यावे.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी**:- ही सभा स्थगीत करण्यात येत आहे.

**महापालिका सचिव:-** पहिली सभा ही मा. महापौरांनी सांगितले आहे ती स्थगित करीत आहोत.

---

☑ स्थगीत प्रस्ताव:—

दिनांक १७/०९/२०२१ रोजी स्थगीत केलेली सभा दिनांक १८/११/२०२१ दुपारी २.३० वाजता सुरू केलेली सभा नगरसेवक श्री. अजित प्रभुनाथ गुप्ता यांचे दिनांक १२/११/२०२१ रोजी आकस्मित मृत्युं झाल्यामुळे स्थगीत करण्यास प्रस्तावित.

महासभा ठराव क्र.२०इ दिनांक: १८/११/२०२१

सुचकाचे नाव:— श्री. कलवंतसिंह सोहता
अनुमोदकाचे नाव:— श्री. जमनादास पुरस्वानी

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता दिनांक १८/११/२०२१ रोजी दुपारी २.३० वाजता आयोजित केलेल्या सभेचे कामकाज अनिश्चित कालावधीपर्यंत स्थगित करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर/पीठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

दुपारी 3.11 **वाजता महापौर, श्रीम. लिलाबाई आशान यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.**

**(प्राजक्ता मि. कुलकर्णी)**
**महापालिका सचिव**
**उल्हासनगर महानगरपालिका**

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:- २५-११-२०२१

**उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २५-११-२०२१ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.**

२-ब

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शुक्रवार दिनांक १७/०९/२०२१ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेचे कामकाज स्थगित केल्याने सदरची सभा गुरुवार दिनांक १८/११/२०२१ रोजी दुपारी २.३० वाजता आयोजित सभेचे कामकाज पुन्हा स्थगित केल्याने सदरची सभा गुरुवार, दिनांक २५/११/२०२१ रोजी दुपारी २.३० वाजता आयोजित करण्यात आली. सदर सभेत महापौर, श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या व खालील दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते/होत्या.मा. अवर सचिव, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग यांचेकडील शासनाचे क्रमांक कोरोना- २०२०/प्र.क्र. ७६ / नवि-१४, दिनांक २२ ऑक्टोंबर २०२१ पत्रान्वये विहित कार्यपध्दती पालन करुन प्रत्यक्ष सहभागाने/उपस्थितीने खालील विषयावर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित केली होती.

१. श्रीमती. लिलाबाई लक्ष्मण आशान – महापौर

२. श्री. भगवान भालेराव- उप महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती अर्चना गोकुळ करणकाळे | २६ | श्री. गजानन प्रल्हाद शेळके |
| ४ | श्रीमती जयश्री ज्ञानेश्वर पाटील | २७ | श्रीमती ज्योती प्रकाश बठिजा |
| ५ | श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड | २८ | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी (साई) |
| ६ | श्रीमती मिनाकौर अजितसिंग लबाना | २९ | श्रीमती ज्योत्स्ना सुरेश जाधव |
| ७ | श्रीमती जमनादास पुरस्वानी | ३० | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| ८ | श्रीमती चरणजितकौर राजेंद्रसिंह भुल्लर | ३१ | श्रीमती मिताली राजेश चान्पूर |
| ९ | श्री. राजेंद्रसिंह विरसिंग भुल्लर | ३२ | श्रीमती दिप्ती नविन दुधानी |
| १० | श्री. स्वप्नील मिलींद बागुल | ३३ | श्रीमती ज्योती रमेश चैनानी |
| ११ | श्री. कलवंतसिंग गरुदेव सोहता | ३४ | श्री. शंकर गोविंदराम लुंड |
| १२ | श्री. राजू किसनचंद जग्यासी | ३५ | श्रीमती सुनिता बाबुराव बगाडे |
| १३ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | ३६ | श्रीमती सुमन राजेश सचदेव |
| १४ | श्री. महेश पहीलराज सुखरामनी | ३७ | श्री. सतरामदास पुतनदास जेसवानी |
| १५ | श्रीमती अपेक्षा भगवान भालेराव | ३८ | श्रीमती अंजली चंद्रकांत साळवे |
| १६ | श्रीमती शुभांगीनी निकम | ३९ | श्री. प्रमोद नमदेव टाले |
| १७ | श्रीमती छाया सुजित चक्रवर्ती उफर् अडसुळ | ४० | श्रीमती कविता सुधिर बागुल |

| | | | |
|---|---|---|---|
| १८ | श्रीमती ज्योती प्रशांत पाटील | ४१ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| १९ | श्री. राजेश नानिकराम वदारिया | ४२ | श्री. किशोर नारायणदास वनवारी |
| २० | श्रीमती डिम्पल नरेंद्र ठाकुर | ४३ | श्री. आकाश परशुराम पाटील |
| २१ | श्रीमती दिपा नारायण पंजाबी | ४४ | श्री. विकास परशुराम पाटील |
| २२ | श्रीमती शुभांगी मनोहर बेहनवाल | ४५ | श्री. मनोज दिलीपकुमार सयानी |
| २३ | श्रीमती इंदिरा जमनादास उदासी | ४६ | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |
| २४ | श्रीमती कविता लाल पंजाबी | ४७ | श्री. सुरेंद्र बाळकृष्ण सावंत |
| २५ | श्री. जीवन चंद्रभान इदनानी | | |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते / होत्या.

१. श्री. मंगल बालकृष्ण वाघे, २. श्री. हरेश परमानंद जग्यासी, ३. श्रीमती आशा नाना बिराडे, ४.श्री. रविंद्र दशरथ बागुल, ५.श्रीमती सुरेखा हनुमंत आव्हाड, ६. श्रीमती अजंना अंकुश म्हस्के, ७.श्रीमती मिना कुमार आयलानी, ८.श्रीमती गीता लालचंद साधनानी, ९.डॉ. प्रकाश घनश्यामदास नाथानी, १०. श्रीमती सरोजिनी टेकचंदानी, ११. श्रीमती जया प्रकाश माखिजा, १२. श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग, १३.श्रीमती पुष्पा नाना बागुल, १४. श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी, १५. श्री. राजेंद्र शांताराम चौधरी, १६.रवि किशनचंद जग्यासी, १७. श्रीमती सविता प्रविण तोरणे (रगडे), १८. श्री. सुमित सागर सोनकांबळे, १९.श्रीमती ज्योती शामराव माने, २०. श्री. सुमित सागर सोनकांबळे, २१. श्रीमती ज्योती शामराव माने, २२. श्री. चंद्रशेखर यादव, २३. श्रीमती संगिता नितीन सपकाळे, २४. श्रीमती शीतल चंद्रकांत कदम, २५. श्रीमती वसुधा धनंजय बोडारे, २६. श्री. धनंजय बाबुराव बोडारे, २७. श्रीमती कांचन अमर लुंड, २८. श्री. भारत रामचंद राजवानी (गंगोत्री), २९. श्रीमती मिना चंद्रगुप्त सोनजी, ३०. श्रीमती मिनाक्षी रवी पाटील, ३१. श्री. विजय चाहू पाटील, ३२. श्रीमती कविता सुरेश गायकवाड, ३३. श्री. अरुण लक्ष्मण आशान, ३४. श्रीमती आशा जीवन इदनानी.

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

१. डॉ. राजा दयानिधी, आयुक्त
२. श्रीम. करुणा जुईकर, अतिरिक्त आयुक्त
३. श्रीम. प्राजक्ता कुलकर्णी, महापालिका सचिव
४. श्री. अशोक नाईकवाडे, उप आयुक्त (मुख्यालय
५. डॉ. सुभाष जाधव, उप आ. युक्त (आरोग्य)
६. श्रीम. प्रियंका राजपूत, उप आयुक्त (कर)
७. डॉ. दिपक पगारे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी
८. श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखाधिकारी
९. श्री. विजय खेडकर, मुख्य लेखा परिक्षक
१०. श्री. प्रकाश मुळे, नगररचनाकार
११. श्री. के.जे.रहेजा, कार्यकारी अभियंता (पा.पु.वि.)

१२. श्री. सुर्यकांत खटके, लेखाधिकारी
१३. श्री. अशोक मोरे, सहा लेखा परिक्षक

१४. श्री. तुषार सोनवणे, सहा. आयुक्त

१५. श्री. गणेश शिंपी, सहा. आयुक्त
१६. श्री. अजित गवारी, सहा. आयुक्त
१७. महेंद्र पंजाबी, सहा. आयुक्त

१८. श्री. बाळू नेटके, मुख्य अग्निशमन अधिकारी

१९. श्री. मनिष हिवरे, सार्वजनिक आरोग्य अधिकारी

२०. श्रीम. श्रध्दा सपकाळे, सिस्टम ॲनेलेसिस मॅनेजर

२१. श्री. महेंद्र धिंडे, कनिष्ठ अभियंता

२२. श्री. संतोष लोणे, कनिष्ठ अभियंता

२३. श्री. राजा बुलानी, विधी अधिकारी

२४. श्री. जेठा ताराचंद, उप करनिर्धारक व संकलन

२५. श्री. अशोक सासे, सहा. आयुक्त
२६. श्री. अनिल खतुरानी, कर निरीक्षक

२७. श्री. यशवंत सगळे, वाहन व्यवस्थापक

२८. श्री. सचिन जाधव, लिपीक (कर)

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

३. श्रीम. नर्गीस खान, लिपीक
४. श्री. बाळू भांगरे, लिपीक
५. श्रीम. विद्या आढळ, लिपीक

दुपारी २.४० वाजता वंदे मातरम म्हणून सभेची सुरुवात करण्यात आली.

**महापालिका सचिव:-** हि जी सभा आहे ती आधी दि.१७/०९/२०२१ त्यानंतर दि. १८/११/२०२१ व आता दि.२५/११/२०२१ रोजी आयोजित करण्यात आलेली आहे. विषय क्र. ११ पासुन सुरुवात होणार आहे.

**महापालिका सचिव** :- विषय क्र. ११ वाचून दाखवितात.

**सदस्य, श्री. प्रमोद टाले:-** मॅडम आवाज इको सिस्टीम सारखा येत आहे, आवाज जरा क्लियर येवू दया.

---

⇨ **विषय क्र. ११ :— उल्हासनगर शहरातील विविध रस्त्यांना व चौकांना नामकरण करणेकरीता तदर्थ समितीने मंजुर केलेल्या ३४ प्रस्तावांची यादी** मा. स्थायी समितीची मान्यतेस्तव सादर करणे.

---

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:-** आता मा. महापौरजी माझे बोलणे आहे की, हे सर्व रोड व चौक पास झाले पाहिजेत ते आजपर्यंत ५ वर्ष होत आले आजपण महानगरपालिकेमध्ये जेव्हा पण तदर्थ समितीची बैठक होते त्यात जितके पण यादी आहेत कधी शेवट झाली नाही. वाचणे चालू करतात २०- २१ येवून परत आक्षेप घेतात परत ॲडजॉईंट म्हणजे ५ वर्षा पर्यत हे निवडक सदस्य आहेत ज्यात केव्हा पण एका पण नामकरणाला नाव दिले गेले नाही. आता त्यात पण समजा २००-३०० एकूण नाव आहेत गोष्टीवर माझ्यासोबतचे सर्व सदस्य जे

ऑनलाईन आणि ऑफलाईन आहेत ते सहमत असतील. प्रत्येक सदस्याने ५ वर्षात नामकरणासाठी नावे दिले आहेत त्यात हे नाव घेणार, हे नाव नाही घेणार, येथे टिक करा आणि निवडा हे चालत आहे. हे नाही लावू शकत, हे नाही लागू शकत. तर कृपया करुन ही यादी जी आली आहे. त्यासोबत जोपर्यंत पुर्ण यादी येत नाही, जो पर्यंत तदर्थ समिती बैठक घेवून सर्व नामकरण अंतिम करत नाहीत जोपर्यंत आमच्या महासभेत यादी येत नाही, तोपर्यंत मला वाटते ही जी आमची महासभा बैठक आहे ती अनिश्चित काळापर्यंत ॲडजॉईंट केले जावे. माझे अशी विनंती आहे की, नामकरण आमच्या जेवढया पण प्रभागात दिले आहे एक पण नामकरण पास नाही झाले. जोपर्यंत ५ वर्षात एक पण नामकरण मेहरबानी कृपया करुन मा. महापौरजी, उप महापौरजी, आयुक्त, ॲडजॉईंट केली जावी बाकी कामांचा समावेश येऊ शकत नाही. परंतु तदर्थ समिती पास होवून पुढच्या महासभेत आमच्या समोर जी समिती आहे जोपर्यंत त्यात पास होत नाही तोपर्यंत कृपया करुन ही बैठक अनिश्चित काळापर्यंत ॲडजॉन करावी.

**सदस्य, श्री. महेश सुखरामानी**:- मा. महापौर, उप महापौर आणि आयुक्त साहेब किशोर वनवारी यांनी जो विषय मांडला आहे, तो माझ्या प्रभागातील पण काही नावे आहेत प्रलंबित आहेत. ती सर्व नावे मी समजतो की, बाकी पण सन्माननीय सदस्यांचे पत्र असतील तर आता आमचा हा शेवटचे वर्ष आहे येता काळात निवडणुक आहे. ५ वर्षात ही सभा होणार नाही काम प्रलंबित आहेत तर सर्वांनी मिळून एकसाथ आले पाहिजे सर्वांचे विषयांना ही माझी सभागृहाला विनंती आहे धन्यवाद.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव**:- सन्माननीय, एक मिनिट टाले साहेब चर्चा करण्यापुर्वी सन्माननीय सदस्यआपण ब-याच वर्षापासून या सभागृहाचे सदस्य आहात. पहिला प्रस्ताव ठेवला आहे त्याला मान्यता दया. त्यानंतर ही चर्चा होवू दया. परिस्थिती अशी आहे की, प्रस्ताव घ्यायचा की नाही तो विचार करा ना. मान्य कुठे केला आहे. कोणीच काही बोलले नाही तुम्ही लगेच सुरु झाले.

**सदस्य, श्री. किशोर:-** मा. महापौर या महासभेमध्ये हेच प्रस्ताव...

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव**:- आहो त्यांनी जे प्रस्ताव आणले आहेत ते त्यांना वाचू दया. दुसरा पण प्रस्ताव आहे, दोन्ही प्रस्ताव वाचू दया मग नंतर बोला.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:-** नाही नाही, आता ते एक नामकरण...

**महापालिका सचिव:-** सभेचे तीन विषय आहेत त्यापैकी पहिला हा होता. आणि अजून दोन विषय आहेत. तुम्ही प्रस्ताव सभा स्थगित करा म्हणता, एक तर तुम्ही प्रस्ताव पास करुन नंतर सभा स्थगित करा किंवा सभा स्थगित करा आणि हा विषय प्रलंबित राहू दे.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:-** मला वाटले एकच आहे जर तीन आहेत तर वाचा.

**महापालिका सचिव:-** नाही नाही असे नाही.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:-** मला वाटले आयत्यावेळीचा विषय आहे मला वाटल हेच आहे.

**महापालिका सचिव:-** आयत्यावेळेचा विषय नाही.

**सदस्य, श्री. मनोज लासी:-** मा. महापौरजी, आयुक्त साहेब, सचिव मॅडम आता उप महापौर साहेबांनी जे सांगितले सचिवांनी पण एक विषय सांगितले, ते आता पर्यंत झाले नाहीत, ते बरोबर आहे. त्यावर त्यांनी बोलले आहे की, एक जो विषय त्यांनी वाचला नामकरणाचा त्यातच पुर्णपणे झाले नाही आहे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** नाही नाही समावेश करण्यासाठी थोडेच आहे. हा विषय समावेश करण्यासाठी नाही आला.

**सदस्य, श्री. मनोज लासी:-** विषयावर चर्चा तर होईन ना.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** विष्य मान्य केला नाही, प्रस्ताव आला आहे. विषय ऑलरेडी अजेंडावर आहे.

**<u>महापालिका सचिव</u>:-** हा विषय यापुर्वीच मिटिंगमध्ये आलेला आहे. माझे कृपया ऐकून घ्या. आता तुम्हांला जर बैठक स्थगित करायची असेल तर सर्व विषय घेवून पास करायला लागेल. जर आताच स्थगीत करायची असेल तर हा विषय तुम्हांला प्रलंबित ठेवून पुढच्या महासभेत इतर जे म्हणतात त्यांचा...

**<u>सदस्य, श्री. मनोज सयानी:-</u>** तेच बोलत आहेत ते, याला प्रलंबित करा. कारण त्यात समावेश करणे अजून बाकी आहे. तदर्थ समितीपुढे विषय अजूनपर्यंत प्रलंबित आहेत. याचे खुप सा-या मिटिंग झाल्या आहेत. यात मोठमोठया संत महात्म्यांची नावे आहेत. शहरात सर्व नगरसेवकांची खिल्ली उडविली जात आहे. ५ वर्षापर्यंत आपण कोणतेही नामकरण झाले नाही तर विरोधी नेत्याचे हेच म्हणणे आहे की, ही पुर्णपणे अपुर्ण आहे. उप महापौरसाहेब आपल्या मुददा समजला नाही. नामकरणाचा मुददा अपुर्ण आहे. तोच पुर्ण करा. त्यांचा कसा स्विकार करणार, मान्यता दयाल.

**<u>सदस्य, श्री. प्रमोद टाले:-</u>** महापौरजी हा जो नामकरणाचा विषय आलेला आहे. त्याच्यामध्ये जेवढी नावे घेतली आहेत, याच्यामध्ये बरीच नावे ही बोगस नावे आहेत. एक पहिला मुददा, बोगस नावे यासाठी आहेत की, नामकरण आधीच झाले होते. महापुरुषांच्या नावानी झाले होते. त्याच्या नंतर ती नावे बदलून कुठल्यातरी आय-या गै-याची नावे टाकली जातात. तो चालणार नाही. महापुरुषांच्या नाव सुरुवातीला तर तो प्रस्ताव पास करावा.

**<u>सदस्य, श्री. राजेश वानखेडे:-</u>** ऐरागैराची नावे आहेत, ती दाखवा सभागृहाला आम्हांला पण कळले पाहीजे की, ऐरागैरे कोण आहेत?

**<u>सदस्य, श्री. प्रमोद टाले:-</u>** नामकरणाची जी नावे आहेत, जे करीत आहेत, तो संपुर्ण शहराचा विषय असला पाहीजे.येणा-या महासभेमध्ये तरच तो प्रस्ताव पास करण्यात यावा.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-</u>** विषय नामकरणाचा आहे, नामकरण झाले पाहीजे, आमचे सन्माननीय सदस्य म्हणतात की, ऐरागैरेचे नाव टाकले गेलेले आहे. याचा अर्थ असा की, ज्या सदस्यांनी नाव सुचवले असेल त्याच्या भावनांना दु:ख देणारे हे वक्तव्य आहे, माझी सन्माननीय टाले साहेबांना अशी विनंती राहील की, त्यांचे ते शब्द मागे घ्यावे. कदाचित आपण चुकून तसे बोलले असतील.

**<u>सदस्य, श्री. प्रमोद टाले</u>**:- मा. प्रदिप जी, माझे म्हणणे एकच आणि स्पष्ट आहे याआधी त्या चौकाला किंवा कोणत्या तरी भागाला नाव दिले आहे काही महापुरुषांचे नाव दिले आहे. तेथे आजच्या तारखेला ते नाव काढून दुसरे नाव देण्याचे प्रयत्न करत आहेत असे नाही झाले पाहिजे.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-</u>** तसा तुमचा मुददा आम्हांला मान्य आहे. पण तुमचे जे शब्द आहेत आयरे-गयरे जे शब्द आहेत ते संसदीय वक्तव्य नाही आहे. तुम्ही २-३ वेळा निवडून आलेले जेष्ठ सदस्य आहेत आणि माझी तुम्हांला कळकळीची विनंती आहे की, तुम्ही शब्द परत घ्यावे.

**<u>सदस्य, श्री. प्रमोद टाले</u>**:- ठिक आहे. मी जे काही बोललो असेल, त्यात काही असंसदीय शब्द असेल तर तो डिलिट करण्यात यावा.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-</u>** महापौर मॅडम याचा काहीच फरक पडत नाही. हे माझे भाउ आहेत. ते चुकीने बोलले तर मी त्यांचे पेक्षा मोठा पण आहे. मी त्यांना सलाम करतो आणि नमस्कार करतो. विषय कसा आहे की, आज आपले सभागृहामध्ये बसलेले जेवढे काही सदस्य आहेत त्यांची मानसिकता आज ही सभा तहकूब करण्याची आहे. याच्या मागे काहीही कारण असू शकते पण काही वरिष्ठ सदस्य काही कारणामुळे अनुपस्थित आहेत. आणि दुसरे काही कारण असेल. मी याला पाठिंबा देतो. कदाचित आज जर तहकुब केली तर याला काही माझा विरोध नाही आहे. पण आपल्याला हे ही आठवण करायला पाहिजे. मागच्या २१ महिन्यापासुन आपण प्रत्यक्ष मिटिंग झालेली नाही. नंतर मागील एक मिटिंग आपला एक सदस्य वारला म्हणून स्थगीत केली, आज परत स्थगीत करीत आहेत हे मला दु:ख वाटते. की सत्ता पक्षाचे सदस्य या लोकांनी आज २१ महिन्यानंतर जर प्रत्यक्ष सभा होत आहे तर लक्ष दयायला पाहिजे. कारण मागे जेव्हा तहकुब केली होती तर २५ तारीख ठरविली होती. आणि आई तु सप्टेंबरमध्ये मिटिंग घेतलेली नाही. आपण बोलायला पाहिजे आणि तु माझी आई आहे. सप्टेंबर महिन्यामध्ये आपण मिटिंग घेतलेली नाही. याच्यापुढे २१ महिने आम्ही फक्त टि.व्ही. वर बघतो काय मिटिंग झाली, नाही झाली, त्याचा काहीच फायदा झालेला नाही. अहो कसे आहे की, त्याचा मागे

उददेश काय होता की, इलेक्ट्रॉनिक माध्यमात तुम्हांला बटन जे होते त्याचे बंद करायचे तुमच्याकडे होते. इथे तसे नाही आहे. आज जे मी बोलतो एकदम शांतपणे बोलतो आहे.

**<u>सदस्य, श्री. कलवंत सिंह सोहता:-</u>** शंका आहे ना, साहेब.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-</u>** जाऊ दया विषय कसा आहे की याच्यात ६ महिन्यापासुन आईकडे विरोधी पक्ष नेता बदलण्याचे पत्र

**<u>सदस्य, श्री. कलवंत सिंह सोहता:-</u>** प्रदिपजी, खोटे आरोप करु नका. जर तुम्ही ६ महिने बोलतात सिध्द करुन दाखवा.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-</u>** आज जे बोललो आहे ते विरोधी पक्ष नेता आहे. विरोधी पक्ष नेत्याने महापौरांना सांगितले आहे आणि आमच्या वाक्यावर मागणी आलेली नाही. त्यांच्या वाक्यावर मागणी आलेली आहे.

**<u>सदस्य, श्री. किशोर वनवारी:-</u>** मा. महापौर आणि आईबाबत खोटे आरोप करणे बिलकुल चुकीचे आहे. यासाठी सन्माननीय सदस्यांनी माफी मागितली पाहिजे. ६ महिन्यापासुन नाही. आणि आज प्रभुनाथ गुप्ता साहेब वारले त्या मिटिंगमध्ये सुध्दा श्रध्दांजली करत होते तेव्हा पण हे बोलतात आज पण मिटिंग तहकुब करण्याबाबत हे बोलत आहेत. सप्टेंबरमध्ये ऑनलाईन मिटिंग झाली त्यावेळेस ७ वाजेपर्यंत मिटिंग चालू होती. तेव्हा एक वेळा पण का बोलले नाही. आणि जे पत्र दिले आहे ते दि.९/०९/२०२१ रोजी २ महिने झाले आहे. सप्टेंबरमध्ये मिटिंग झाली त्यावेळेस लक्षात आले नाही. आणि आईने ते पत्र वाचले नसेल किंवा लिफाफयामध्ये कोणाला दिले ते पण बघून मग करणार  ना. परंतु हे चुकीचे आहे की, ६ महिने झाले. ९/०९/२०२१ तारीख लिहिलेली आहे. हा चुकीचा भाग आहे. आई आमची महापौर आहे. त्याच्याबददल खोटे बोलायचे नाही.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-</u>** राजेश भाउ मला पुर्ण करु दया.

**<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया:-</u>** नाही नाही, जर मिटिंग स्थगती करायची आहे तर इतकी चर्चा करुन फायदा नाही. मिटिंग ॲडजॉन करा.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी :-</u>** जर ॲडजॉन करायचा नियम आहे, करायची असेल तर माझी बोलणे संपू दया. माझे मित्र किशोर वनवारी विरोधी पक्ष नेता आहेत. आणि ते विरोधी पक्ष नेता राहू दया.

**<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया:-</u>** पक्ष विरोधी नेता नाही. विरोधी पक्ष नेता आहेत. जरा बोलताना सांभाळून बोला.

**<u>सदस्य, श्री. मनोज सयानी:-</u>** आता ते पक्ष विरोधी नेता दिसत आहेत.

**<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया:-</u>** बोलण्यासाठी शब्दांचा सांभाळून प्रयोग करा. विरोधी पक्ष नेता आहेत. पक्ष विरोधी नेता नाही आहेत.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-</u>** मी विरोधी पक्ष नेताच बोललो आहे जरा लक्ष देवून ऐका. माझ्या पक्षाचे उल्हासनगर महानगरपालिकेचे विरोधी पक्ष नेता आहेत आणि ते आपल्यासोबत जरुर बोलतील. अस होवू शकते की, ६ महिने झाले नसतील, ४ महिने झाले असतील ३ महिने झाले असतील. परंतु लाभार्थी होण्याकारणाने त्यांना दु:ख होत आहे परंतु  पार्टी लाईन जी आहे ती स्पष्ट आहे. ९ सप्टेंबरला आपल्याला पत्र दिले गेले आहे. आणि आज आम्ही नोव्हेंबरमध्ये आहोत आणि त्याची घोषणा झाली नाही. कोणत्याही प्रकारे लोकतंत्र मुल्याचे जर महापौर पालन करतात आणि अपेक्षा करतात की, विरोधी पक्षाने रचनात्मक सहयोग करावे तर आपल्याला पण लोकतंत्र प्रणालीचा जेवढे पण निर्वाह आहेत ते केले पाहिजे कारण की, परंतु निर्वाह होत नाही, मला दु:ख होत आहे. मी आपल्याला विनंती करतो की, माझ्या भावाने माझ्यावर आरोप केले आहेत कारण की, लाभार्थी जो असतो त्याचे थोडेसे दु:ख होते, माझ्या भावना माझ्या संवेदना त्यांच्यासोबत आहेत. ते माझे मित्र आहेत आणि नेहमी राहतील. परंतु नियमात जे आहे लोकतंत्राची जी प्रणाली आहे त्यात जेव्हा गटनेत्याने आणि आमच्या अध्यक्षानी आपल्याला पत्र दिले आहे. त्याची घोषणा आपल्याला तात्काळ करणे गरजेचे आहे.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>** मा. महापौरजी, मा. उपमहापौरजी, सभागृहातील सर्व सदस्य, मी प्रदिप रामचंदानी यांचे जे म्हणण्याशी सहमत आहे. आम्ही २ महिन्यापुर्वी पत्र दिले आहे २ महिन्यापेक्षाही जास्त वेळ

झालेला आहे. २ ते अडीच महिने झाले असतील. तर मी आपल्याला विनंती करतो की, जर आपण याप्रकारची घोषणा आज करत आहेत. तर खुप चांगले आहे. अन्यथा आपण सभागृहाला हे आश्वासन दया. जेव्हा पण ही सभा चालू करणार तर पहिले पहिले या पत्राला वाचून त्याची घोषणा करावी.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:-** मा. महापौरजी आमचे दुसरे एक पत्र पण दिले आहे. जे आमच्या मॅडम पंचम ओती कालानीजी यांनी दिले आहे. विरोधी पक्ष नेता आमच्या शुभांगीनी निकमजींना केले जावे, ती प्रत मला पण दिली होती. आणि यासाठी मेहरबानी करुन कायदा कानुन पण विधी विभागास आपण विचारणा करा की, हे कसे त्यात बरोबर बसणार. आणि आमचे सदस्य आहेत त्यांची पण मिटिंग घेवून सर्वांचे मत घेतले जावे. कारण की पंचम ओमी कालानी यांनी ज्यांचे पत्र दिले होते ती पण भारतीय जनता पार्टीची नगरसेविका आहे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** पंचम कालानी या सभागृहाची सदस्य नाही आहेत कृपया त्यांचे बददल बोलू नये.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-** सन्माननीय सदस्यजी, जेव्हा त्यांनी पत्र दिले होते तेव्हा त्या सदस्या होत्या. विधी विभागाचे अभिप्राय घ्यावे नंतरच

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:-** करु नका नाही, जेव्हा दिले होते तेव्हा होत्या.विधी अभिप्राय विधी विभागाकडून घ्यावे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** महापौरजी एक तर मिटिंग सुरु करा. नाही तर मिटिंग तहकुब करा. पहिले त्याचा निर्णय करा.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-** जमनुजी आपले सदस्यच मागणी करत आहेत ना. तर मिटींग चालवा.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** मिटिंग पण सुरु होणार नाही आणि चर्चा पण होणार.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-** चर्चा करायची गरज नाही, मा. महापौरजी मिटींग स्थगीत करा.

**महापालिका सचिव:-** मा. पिठासीन अधिकारी यांनी विचारले आहे, मिटिंग तहकुब करण्यास सांगितली आहे जे विरोधात आहे त्यांनी सांगा नाहीतर मिटिंग तहकुब करण्याचे मॅडमने सांगितले आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-** कोणाचा ही विरोध नाही, स्थगीत करणत यावी.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** मला सांगा कोणत्या कारणाने स्थगीत करीत आहेत.

**महापालिका सचिव:-** कारण देणे गरजेचे नाही साहेब.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** नियम काय सांगत आहे. मला सांगा काय कारणाने मिटिंग तहकुब करत आहेत.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-** मा. महापौरजी जो विषय आहे तो पुर्णत: नामकरणाचा विषय आहे तो पुर्णत: पुर्ण नाही आहे. त्यात खुप सा-या त्रुटी आहेत. तदर्थ समितीला अजून त्यात विचार विनिमय करणे आवश्यक आहे. आणि त्यानंतरही ४-५ वर्षापासून जे नामकरणाचे पत्र येत आहेत. त्या सर्वांचा समावेश करावा. याला मिटिंगमध्ये आणले पाहिजे तोपर्यंत ही सभा तहकुब करण्यात यावी.

**सदस्य, श्री. सुरेंद्र सावंत:-** मा. महापौर आणि आयुक्त साहेब आता ज्या सदस्यांनी आपल्याला सांगितले. राजेश वधारीया साहेबांनी सांगितले त्यानंतर मनोज लासी यांनी सांगितले. सभागृह आपल्याला स्थगीतच करायची आहे कारण जे नामकरणाचे विषय आहेत ३४-३५ नावे आहेत त्याची यादी दिलेली आहे. त्यात चर्चा झाल्याशिवाय आपण ती नावे देता येणार नाही

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:-** ही सभा स्थगीत करण्यात येत आहे.

**सदस्य, श्री. सुरेंद्र सावंत:-** धन्यवाद, धन्यवाद..

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** कुठपर्यंत तारीख सांगा.

**सदस्य, श्री. मनोज लासी:-** अनिश्चित काळासाठी.

**सदस्य, श्री. स्वप्नील बागुल:-** अनिश्चित काळासाठी स्थगीत करा.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-** दोन्ही सभा स्थगीत करा.

**महापालिका सचिव:-** सर्वजण कृपया बसा, सभा दुसरी सुरु होऊ दे. मला विषय वाचू दया. नंतर तुमचा प्रस्ताव...

**महापालिका सचिव:-** आता ही पहिली सभा अनिश्चित काळासाठी स्थगित करण्यात आली आहे. मा. पिठासीन अधिकारी यांनी जाहिर केली आहे.

**काही सदस्य** :—पास—पास......

**महापौर तथा पीठासीन अधिकारी:—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ स्थगीत प्रस्ताव:—

दिनांक १७/०९/२०२१, व १८/११/२०२१ रोजीची स्थगीत सभा दिनांक २५/११/२०२१ रोजी दुपारी २.३० वाजता सुरू केलेली सभा काही कारणास्तव स्थगीत करण्यास प्रस्तावीत.

**महासभा ठराव क्र.२० आय** दिनांक: २५/११/२०२१

सुचकाचे नाव:—श्री. कलवंतसिंह सोहता

अनुमोदकाचे नाव:— श्री. जमनादास पुरस्वानी

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता दिनांक २५/११/२०२१ रोजी सायंकाळी २.३० वाजता आयोजित केलेल्या सभेचे कामकाज अनिश्चित कालावधीपर्यंत स्थगित करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर/पीठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

दुपारी ३.११ वाजता महापौर, श्रीम. लिलाबाई आशान यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

दिनांक:- ०२-१२-२०२१

**उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. ०२-१२-२०२१ रोजीच्या सर्व साधारण महासभेचे इतिवृत्त.**

२-क

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्व साधारण महासभा शुक्रवार, दिनांक १७/०९/२०२१ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेचे कामकाज स्थगीत केल्याने सदरची सभा गुरुवार दिनांक १८/११/२०२१ रोजी दुपारी २.३० वाजता आयोजित सभेचे कामकाज पुन्हा स्थगीत केल्याने सदरची सभा गुरुवार दिनांक २५/११/२०२१ रोजी दुपारी २.३० वाजता आयोजित सभेचे कामकाज पुन्हा स्थगित केल्याने सदरची सभा गुरुवार दिनांक ०२/१२/२०२१ रोजी दुपारी २.३० वाजता आयोजित करण्यात आली. सदर सभेत महापौर, श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या व खालील दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते/होत्या.मा. अवर सचिव, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग यांचेकडील शासनाचे क्रमांक कोरोना- २०२०/प्र.क्र. ७६ / नवि-१४, दिनांक २२ ऑक्टोंबर २०२१ पत्रान्वये विहित कार्यपध्दती पालन करुन प्रत्यक्ष सहभागाने/उपस्थितीने खालील विषयावर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित केली होती.

१. श्रीमती. लिलाबाई लक्ष्मण आशान – महापौर

२. श्री. भगवान भालेराव- उप महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्री. मंगल बालकृष्ण वाघे | ३३ | श्रीमती कविता लाल पंजाबी |
| ४ | श्रीमती जयश्री ज्ञानेश्वर पाटील | ३४ | श्री. जीवन चंद्रभान इदनानी |
| ५ | श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड | ३५ | श्रीमती सविता प्रविण तोरणे (रगडे) |
| ६ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ३६ | श्री. गजानन प्रल्हाद शेळके |
| ७ | श्रीमती मिनाकौर अजितसिंग लबाना | ३७ | श्री. सुमित सागर सोनकांबळे |
| ८ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | ३८ | श्रीमती ज्योत्स्ना सुरेश जाधव |
| ९ | श्रीमती आशा नाना बिराडे | ३९ | श्रीमती ज्योती शामराव माने |
| १० | श्रीमती चरणजितकौर राजेंद्रसिंह भुल्लर | ४० | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| ११ | श्री. राजेंद्रसिंह विरसिंग भुल्लर | ४१ | श्रीमती शीतल चंद्रकांत कदम |
| १२ | श्री. स्वप्नील मिलींद बागुल | ४२ | श्रीमती वसुधा धनंजय बोडारे |
| १३ | श्रीमती सुरेखा हनुमंत आव्हाड | ४३ | श्री. धनंजय बाबुराव बोडारे |
| १४ | श्रीमती अंजना अंकुश म्हस्के | ४४ | श्रीमती दिप्ती नविन दुधानी |
| १५ | श्री. कलवंतसिंग गुरुदेव सोहता | ४५ | श्रीमती ज्योती रमेश चैनानी |
| १६ | श्री. राजू किशनचंद जग्यासी | ४६ | श्रीमती कांचन अमर लुंड |
| १७ | डॉ. प्रकाश घनश्यामदास नाथानी | ४७ | श्री. शंकर गोविंदराम लुंड |
| १८ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | ४८ | श्रीमती सुनिता बाबुराव बगाडे |

| | | | |
|---|---|---|---|
| १९ | श्रीमती सरोजिनी टेकचंदानी | ४९ | श्री. भारत रामचंद राजवानी (गंगोत्री) |
| २० | श्रीमती जया प्रकाश माखिजा | ५० | श्री. सतरामदास पुतनदास जेसवानी |
| २१ | श्री. महेश पहिलराज सुखरामनी | ५१ | श्रीमती अंजली चंद्रकांत साळवे |
| २२ | श्रीमतह अपेक्षा भगवान भालेराव | ५२ | श्री. प्रमोद नामदेव टाले |
| २३ | श्रीमती शुभांगीनी निकम | ५३ | श्रीमती कविता सुधिर बागुल |
| २४ | श्रीमती छाया सुजित चक्रवर्ती उर्फ अडसुळ | ५४ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २५ | श्रीमती ज्योती प्रशांत पाटील | ५५ | श्री. किशोर नारायणदास वनवारी |
| २६ | श्री. राजेश नानिकराम वदारिया | ५६ | श्रीमती मिना चंद्रगुप्त सोनेजी |
| २७ | श्रीमती दिपा नारायण पंजाबी | ५७ | श्रीमती कविता सुरेश गायकवाड |
| २८ | श्रीमती पुष्पा नाना बागुल | ५८ | श्री. मनोज दिलीपकुमार सयानी |
| २९ | श्रीमती शुभांगी मनोहर बेहनवाल | ५९ | श्री. सुरेंद्र बाळकृष्ण सावंत |
| ३० | श्री. राजेंद्र शांताराम चौधरी | ६० | श्री. अरुण लक्ष्मण आशान |
| ३१ | श्री. रवी किशनचंद जग्यासी | ६१ | श्रीमती आशा जीवन इदनानी |
| ३२ | श्रीमती इंदिरा जमनादास उदासी | | |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते / होत्या.

१. श्रीमती. अर्चना गाकुळ करणकाळे, २. श्री. रविंद्र दशरथ बागुल, ३. श्रीमती गीता लालचंद साधनानी,

४. श्रीमती डिम्पल नरेंद्र ठाकुर (कुमारी), ५. श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी, ६. श्रीमती ज्योती प्रकाश बठिजा, ७. श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी, ८. श्री. चंद्रशेखर केशव यादव, ९. श्रीमती मिताली राजेश चान्पूर, १०. श्रीमती संगिता नितीन सपकाळे, ११. श्रीमती सुमन राजेश सचदेव, १२. श्रीमती मिनाक्षी रवी पाटील, १३. श्री. विजय चाहू पाटील, १४. आकाश परशुराम पाटील, १५. श्री. विकास परशुराम पाटील, १६. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी.

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

१. डॉ. राजा दयानिधी, आयुक्त
२. श्रीम. करुणा जुईकर, अतिरिक्त आयुक्त

३. श्रीम. प्राजक्ता कुलकर्णी, महापालिका सचिव

४. श्री. अशोक नाईकवाडे, उप आयुक्त (मुख्यालय

५. श्री. सुभाष जाधव, उप आयुक्त (सार्वजनिक आरोग्य)

६. श्रीम. प्रियंका राजपुत, उप आयुक्त (कर)

७. श्री. प्रकाश मुळे, नगररचनाकार

८. श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखा अधिकारी

९. श्री. महेश सितलानी, शहर अभियंता

१०. श्री. सुर्यकांत खटके, उप लेखाधिकारी

११. श्री. बाळू नेटके, मुख्य अग्निशमन अधिकारी

१२. श्री. तुषार सोनवणे, सहा. आयुक्त

१३. श्री. गणेश शिंपी, सहा. आयुक्त

१४. श्री. अजित गवारी, सहा. आयुक्त

१५. श्री. महेंद्र पंजाबी, सहा. आयुक्त

१६. श्री. मोहीते, शिणाधिकारी

१७. श्री. मनिष हिवरे, आरोग्य अधिकारी

१८.श्री. के.जे. रहेजा, कार्यकारी अभियंता

१९. श्रीम. श्रध्दा सपकाळे, सिस्टम ॲनेलेसिस मॅनेजर

२०. श्री. संतोष लोणे, कनिष्ठ अभियंता

२१. श्री. महेंद्र धिंडे, कनिष्ठ अभियंता

२२. श्री. जेठा ताराचंद, उप करनिर्धारक व संकलक

२३. श्री. अनिल खतुरानी, कर निरीक्षक

२४. श्री. दत्तात्रय जाधव, भांडार विभाग प्रमुख

२५. श्री. यशवंत सगळे, वाहन व्यवस्थापक

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

६. श्रीम. नर्गीस खान, लिपीक
७. श्री. बाळू भांगरे, लिपीक
८. श्रीम. विद्या आढळ, लिपीक
९. श्री. अंकुश कदम, महापौरांचे स्विय्य सहाय्यक

दुपारी २.४७ वाजता वंदे मातरम म्हणून सभेची सुरुवात करण्यात आली.

**महापालिका सचिव:-** हि जी सभा आहे ती आधी दि.१७/०९/२०२१ त्यानंतर दि. १८/११/२०२१ व आता दि.२५/११/२०२१ रोजी आयोजित करण्यात आलेली आहे. विषय क्र. ११ पासुन सुरुवात होणार आहे.

**महापालिका सचिव :-** विषय क्र. ११ वाचून दाखवितात.

---

⇨विषय क्र. ११ :- उल्हासनगर शहरातील विविध रस्त्यांना व चौकांना नामकरण करणेकरीता तदर्थ समितीने मंजुर केलेल्या ३४ प्रस्तावांची यादी मा. स्थायी समितीची मान्यतेस्तव सादर करणे.

---

**महापालिका सचिव:-** यादी त्याच वेळी वाटली होती. पहिला जेव्हा एजेंडा पाठविला होता.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** मागील कित्येक दिवसापासुन गटनेत्याचे एक अर्ज आपल्याकडे प्रलंबित आहे. त्याची जर आज घोषणा झाली तर आम्ही आपले आभारी राहू.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** सन्माननीय भारतीय जनता पार्टीचे गटनेता जमनादास पुरस्वानी यांनी पत्र दिलेले आहे महापौरांना. काही कारणास्तव अदयापपर्यंत ते पत्र वाचण्यात आले नाही. पण आजच्या मिटिंगमध्ये पत्र वाचून दाखवतो सन्माननीय गटनेता, श्री. जमनादास पुरस्वानी यांनी पत्र दिलेले आहे त्यामध्ये श्री. राजेश वानखेडे यांना विरोधी पक्ष नेता म्हणून आजपासून नियुक्ती करण्यात आलेली आहे, मा. महापौरांच्या आदेशाने तर आजपासून श्री. राजेश वानखेडे हे विरोधी पक्ष नेता म्हणून राहतील.

**महापालिका सचिव:-** मा.सदस्यांना विनंती आहे की, खुर्च्या खुप रिकाम्या आहेत आपण एक एक करुन बसले तर तेवढेच कोरोनाचा प्रादुर्भाव टळेल. जर अजून कोणी आले तर त्यांना पण लांब लांब बसवा. एक एक जण बसा चांगले राहील. खुप जागा रिकामी आहे. जर जागा रिकामी नसती तर बसावेच लागले असते. आता रिकामी आहे तर एका खुर्चीवर एकाने बसावे.

या वेळी सदस्य, श्री. शंकर लुंड व सदस्य, श्री. रवि जग्यासी यांनी सभागृहामध्ये प्रवेश केला.

**महापालिका सचिव:-** तुमची इच्छा, मला जे वाटले ते मी सांगितले. ३४ ची दिलेली होती.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव** :- तदर्थ समितीने जे ३४ आणि २८ जे आहेत ती यादी तुम्हांला दिली का मला वाटते यादी वाचावे लागेल, वाचावी लागेल ना यादी, ३४ ची दिलेली होती २८ ची यादी राहीलेली आहे.

**महापालिका सचिव:-** ३४ ची दिलेली होती. २८ ची यादी आता आली आहे.

या वेळी सदस्या, श्रीम. जयश्री पाटील यांनी सभागृहामध्ये प्रवेश केला.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव** :- ३४ ची दिलेली होती २८ ची यादी राहीलेली आहे.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी:-** उप महापौर साहेब जे तदर्थ समितीने जो ठराव घेतलेली आहेत तेच १४० नावे वाचणार का?

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** १४० नाही २८ नावे आहेत.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी:-** ओके

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** मीच वाचतो आता काय करणार. तो प्रलंबित ठेवू.

**महापालिका सचिव:-** आपल्या ३४ प्रस्तावांची यादी आधीच दिली होती त्याला बरेच महीने झाले आहेत. तुमच्या लक्षात नसेल आता नव्याने २८ तदर्थ समितीने मंजूर केलेले प्रस्ताव पण समाविष्ट करायला सांगितले आहे. ते प्रस्ताव मी वाचते आहे. प्रस्तावाची सुचना, श्रीमती दिप्ती दुधानी त्यांनी प्रस्तावीत नामकरण केले आहे, जमनादास वाधवा चौक सदर ठिकाणी कुठल्याही प्रकारचे प्रवेशद्वार आढळून आलेले नाही. कपिल अमित पवार मंजूर श्रीमती दिप्ती नविन दुधानी "प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरी" मार्ग मंजूर, श्री. राजु इदनानी साई वसनशहा उदयान मंजूर, श्री. किशोर वनवारी, श्रीमती मिरा नारायणदास वनवारी चौक मंजूर, श्री. राजु इदनानी १) स्वर्गीय अशोक उकाराम बोधाजी" २) "वरिष्ठ पत्रकार स्व.अशोक उकाराम बोधा स्व.श्री.अशोक बोधा नानी पार्क" ४)"वरिष्ठ पत्रकार स्व.अशोक उकाराम बोधा पार्क" ५)"स्वर्गीय पत्रकार श्री.दादा अशोक उकाराम बोधा उद्यान" ६) "दादा अशोक बोधा" मंजूर केलेला आहे. यात श्रीम. मिना आयलानी, श्री. जमनु पुरस्वानी श्री. भरत राजवानी, श्री. महेश सुखरामनी यांचा सगळयांचा समावेश आहे. त्यानंतर आहे श्रीमती कविता बागुल "सुभेदार रामजी आंबेडकर मार्ग मंजूर" श्रीमती कविता बागुल, दादासाहेब गायकवाड मार्ग मंजूर श्रीम. कविता बागुल, भयासाहेब आंबेडकर मार्ग मंजुर, श्री. शंकर गोविंदराम लुंड- संत साई आशाराम उदयान मंजुर, श्री. राजू

इदनानी- जय जुलेलाल उदयान मंजूर, श्रीम. दिप्ती दुधानी- बच्चाराम रुपचंदानी मार्ग मंजूर, यामध्ये श्री. राजू इदनानी व शंकर लुंड या दोघांचे पत्र होते. नंतर आता श्रीम. ज्योती पाटील- श्री. मिरचीसिंग लबाना मार्ग मंजूर, श्री. जमनु पुरस्वानी स्वातंत्र वीर सावरकर उदयान मंजुर, श्री संत भगवानबाबा सेवा मंडळ श्री. स्वप्नील बागुल, श्रीम.पुष्पाताई नाना बागुल, श्री. कलवंतसिंह सोहटा, श्रीम. शुभांगी बेहनवाल, श्रीमती अंजना अंकुश म्हस्के यांनी )"श्री संत भगवान बाबा चौक" मंजूर श्रीम.शुभांगी बेहनवाल डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक मंजूर श्री. मनोज लासी, दादा जे.पी. वासवाणी चौक मंजूर, श्री. अरुण आशान, कै. गंगुबाई संभाजी शिंदे समाज मंदिर व स्व.श्री. आसाराम लक्ष्मण सावंत मंजूर, श्री. मनोज लास्सी, सिंधू नरेश महाराजा दाहेर सेन चौक मंजूर, श्री. किशोर वनवारी, जय झुलेलाल मार्ग मंजूर श्री.भारत रामचंद राजवानी (गंगोत्री), महाराज किशनचद भगवानदास शर्मा (नगर)" मंजूर, श्री. मनोज लासी, भाई साहेब मेहेरबान सिंगजी चौक मंजूर, श्री. रवि जग्यासी, भाईसाहेब महरवानसिंग उद्यान मंजूर, श्री. गजानन प्रल्हाद शेळके, दत्तु नागों म्हात्रे चौक मंजूर, १ ) श्री. कांचन लुंड, नगरसेविका २)श्री. सचिन इ. साठे, संघटक सचिव ३) श्री. प्रकाश सुभाष खंडागळे, विभाग अध्यक्ष आद्य क्रांती गुरू लहुजी वस्ताद साळवे चौक मंजूर, श्री. रमेश म. चव्हाण, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक मंजूर, श्रीम. लिलाबाई आशान, महापौर, श्री. चंद्रशेखर यादव, सौ. मिताली राजेश चान्पुर, सौ. जयश्री सुनिल सुर्वे, श्री. अरुण आशान, स्वर्गीय जेष्ठ नगरसेवक कै.सुनिल मुकुंद सुर्वे चौक मंजूर, सौ. राजश्री राजेंद्र चौधरी, कै.ॲड. संभाजी मारुती पाटील सभागृह मंजूर असे २८ प्रस्ताव पास आणि ३४ मान्य.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी**:- मा. महापौरजी यामध्ये झुलेलाल चौकचे आपण वाचले नाही.

**महापालिका सचिव**:- वाचले आहे ना.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी**:- **महाराजा हॉलच्या समोर**

**सदस्य, श्री. मनोज सयानी**:- हा वाचले.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी**:- आणि एक विषय होता जेव्हा आम्ही बसलो होतो गणेश नगर, ४४० गार्डन जवळ तेथे कोणतेही नाव नाही. तेव्हा भालेरावजी बोलले होते की, कोणी नाही तर करणार. आज केले पाहिजे.

**सदस्य, श्री. मनोज सयानी**:- तिथे कोणतेही नाव नाही, गणेश भगवानचे नाव आहे करुन घ्या.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी**:- गणेशनगर करुन टाका काहीच नाही, यामध्ये कोणाचीच हरकत नाही आहे. तिथे चर्चा झाली होती आम्ही हो बोललो होतो.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी**:- जर समितीमध्ये पण हेच लोक बसणार तर मा. महापौर मला प्रस्ताव ठेवू तर दया.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी**:- चौकशी केली आहे, तिथे दुसरे कोणतेही नाव नाही, सार्वजनिक बांधकाम विभागाचे पण काही हरकत नाही.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-** श्रीगणेशा करुन टाका.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी**:- गणेशनगर करुन टाका.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-** मला विषय तर ठेवू दया ना मंजूर ना मंजूर सदन व आपण करणार. ४ ऑक्टोबरला पुर्व आमदार स्वर्गीय श्रीमती ज्योती कलानी मार्ग चौक खेमानी चौक मी पत्र दिले आहे ते यादीमध्ये आले नाही. तो अंतिम यादीमध्ये आले आहे तदर्थ समितीच्या समोर तर माझी सदनाला विनंती आहे की, महापौरजी, उप महापौरजी विनंती आहे, पुर्व आमदार स्वर्गीय श्रीमती ज्योती कलानी नावाचा आजच्या सभेत अनुमती दिली जावी.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** मार्ग कोणता सांगा.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-** खेमानी, सीमा अपार्टमेंट ते जे.के. कंपाऊंड चौक, २ नंबर ओ.टी. चौकापर्यंत काय नाव नाही. बघितले आहे.

**सदस्य, श्री. महेश सुखरामनी:-** मा. महापौरजी, उप महापौरजी, मा. आयुक्त साहेब मनोज सयानी जे नाव दिले आहे मला वाटते तिथे नाव होते. तो वार्ड माझ्या प्रभागात येतो. त्याची खात्री करा. दुसरी गोष्ट माझ्या प्रभागात पण समाजमंदिरचे दोन नावे आहेत. जे मी प्रस्ताव केले होते. त्या रोडचे काम पुर्ण झालेला आहे. महापौरजी, उप महापौरजी, माझे निवेदन आहे की, यानंतर जे महासभेत जेवढे पण प्रलंबित नावे आहेत. त्या सर्वाचा समावेश सोबतच करावा. जसे जमनुजीनी यांनी प्रस्ताव दिला आहे. मनोजजीने पण दिले आहे. यादी आता झाली आहे.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-** तदर्थ समितीमध्ये चर्चा झाली आहे. त्याविषयीच आम्ही बोलत आहोत.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** सन्माननीय दोन्ही सदस्य, आपण दिलेल्या श्रीमती ज्योती कलानी यांचे नाव दयायला पाहिजे होते. महापौर होत्या या शहराच्या आमदार होत्या. परंतु विषय असा आहे की कायदेशीर प्रस्ताव तदर्थ समितीपुढे आला नाही. तर मला वाटते तदर्थ समितीपुढे तो प्रस्ताव ठेवावा आणि नंतर त्या नावाचा विचार केला जाईल. त्या नावाबददल कोणाचेही दुमत नाही. मला वाटत तदर्थ समितीपुढे तो प्रस्ताव आला पाहिजे. दुसरी गोष्ट अशी आहे की, गणेशनगरच्या संदर्भामध्ये जी आता तदर्थ समितीने २८ नावे दिलेली आहेत. ती २८ मंजूर होतील आणि ती येणाऱ्या मिटिंगमध्ये उर्वरीत नावे आहेत त्यांचा समावेश करण्यात येईल. निर्णयाचा इश्यु नाही आहे. जे आता अंतिम करुन पाठविले आहेत ते २८ नावे पाठविले आहेत. ते आता वाचले आणि त्यानंतर जे १०४ प्रस्ताव प्रलंबित आहेत १०४ नावे आहेत.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-** महापौरजी, उप महापौरजी येत्या ८ दिवसात ती सभा आयोजित करण्याची जबाबदारी घ्या. तदर्थ समिती आणि येणारी महासभा होईल त्यामध्ये हे विषय आले पाहीजेत. असे आदेश देण्यात यावेत.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** ठिक आहे महापौरांच्या दालनात तदर्थ समितीची बैठक ८ दिवसात होईल आणि या नावांचा विचार केला जाईल.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** कोणाला आदेश दिले आहेत. प्रशासनास आदेश दिले किंवा कोणाला आदेश दिले.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** सार्वजनिक बांधकाम विभागाला आम्ही आदेश दिले आहेत. ते येतील महापौरांच्या समोर.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-** कोणाला आदेश दिले. आम्हांला पाठपुरावा करावा लागेल. पी. डब्ल्यु.डी. ला.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** दादा गोविंदराम लुंड यांचे नाव पास केले होते. ज्यावर खुप चर्चा झाली. ते वाचले नाही आपण. वाचले आहे ना आपण. ठिक आहे. माझे आपल्याला निवेदन आहे, याची एक एक प्रत सर्व नगरसेवकांना दिली जावी.

या वेळी सदस्य, श्री. राजेश वदारिया हे सभागृहाच्या बाहेर गेले

**महापालिका सचिव:-** साहेब संबंधीत विभागाला, पी. डब्ल्यु.डी. ला सांगावे लागेल.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** मा. महापौरजी माझे नाव यादीमध्ये नाही. यादीमध्ये गोविंदराम लुंडचे नाव नाही. आपल्यासमोर चर्चा झाली होती. सहयाद्री गार्डनला दादा गोविंदराम लुंड गार्डन असे नाव देणे. मला वाटते प्रलंबित ठेवावे. कारण यादी बरोबर नाही आहे. यासाठी नामकरणाला प्रलंबित ठेवावे. गणेशनगर पण येणार

आणि दुसरे नाव पण येतील. कारण तदर्थ समितीमध्ये जी बैठक झाली होती निणर्रय झाला होता, ते बरोबर आले नाही.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** पी. डब्ल्यु.डी., महापौर यांनी तदर्थ समितीच्या ५ सदस्यांनी स्वत: त्या दिवशी सांगितले होते. कोण उत्तर देईल, दादा गोविंदराम लुंडचे नाव टाकण्याबाबत पी. डब्ल्यु.डी. मधील कोण याचे उत्तर देईल.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** शहर अभियंता आपण सांगा यात काय दुरुस्ती होणार आहे. दादा गोविंदराम लुंड यांचे नाव लवकर देण्यात यावे.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:-** महापौर साहेबाजी कृपया लक्ष दयावे. आम्ही उल्हासनगर शहरात बसलो आहोत. उल्हासनगर शहरात खुप वेळाने झुलेलाल साईचे एक-दोन पत्र दिले आहेत. झुलेलाल चौक कल्याणमध्ये बनू शकतो. आमच्या उल्हासनगरमध्ये जेथे चालीया साहबांचे मंदिर आहे. त्यासाठी मी एक पत्र दिले आहे चिठठी दिली आहे. नरेश आमचे समाजसेवक आहे. श्री. नरेश टेहलरामानी सर्व नगरसेवकांना भेटला आहे. सर्व पार्टीना भेटले आहे. तरी पण आज झुलेलाल प्रवेशद्वाराला नाव देवू शकत नाहीत. हे काय आहे. होत काय आहे. आम्ही झुलेलाल नाव देवू शकत नाही. हे का थांबवले आहे, कोणी थांबविले आहे, कारण काय आहे.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** याठिकाणी एक नाव चुकून राहून गेलेले आहे. संत भगवानबाबा चौकासाठी त्या प्रभागातील सगळे नगरसेवक स्वप्नील बागुल असतील, अंजनाताई बागुल असतील,

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:-** मी महासभेत बोलतो माझ्या प्रश्नाचे उत्तर पहिले मिळू दया. नंतर आपण बोला ५ वर्ष होवून गेले आहेत. आपण झुलेलाल साईचे नाव देवू शकत नाही. उल्हासनगरमध्ये आपण कुठे देणार. हाजीमलंगला, तसे करु नका. माझ्या एकाही प्रस्तावाला मान्यता मिळाली नाही. हे काय आहे. एक वर्षानंतर मिटिंग होते आणि त्या मिटिंगमध्ये माझा प्रस्ताव का राहून गेला आहे? कोणी प्रलंबित ठेवलेला आहे?

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** दादा आपला प्रस्ताव आहे का?

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:-** पत्र दिले आहे आणखी काय. नवीन नगरसेवक नाही आहे. आम्हांला सर्व नियम माहित आहे. मी दिलेले आहे त्याची माझ्याजवळ पोहचपावती आहे. खुप वेळेपासुन मागणी केली आहे. ज्यादिवशी मान्यता दिली तेव्हा आम्हांला का बोलावले गेले नाही. आता मला बोलू दया. मला माहित आहे.

या वेळी सदस्य, श्री. राजेश वदारिया यांनी पुन्हा सभागृहामध्ये प्रवेश केला.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** दादा आपण प्रस्ताव कधी दिला होता, प्रस्ताव नाही आहे.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:-** मी नवीन नगरसेवक नाही आहे. कोणाला समजवण्याची गरज पडेल.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** दादा आपण नाव दिले आहे दादा आपण प्रस्ताव दि.१०/०५/२०१८ ला प्रस्ताव दिला आहे. प्रस्तावाच्या समोर जागेची पाहणी केली असता कोणत्याही नावाचा फलक लावल्याचे आढळून आले नाही. परंतु कार्यालयीन दस्तऐवजाप्रमाणे महासभा ठराव क्र.४ दि.१/०७/१९८४ अन्वये सदर पंडित दिनदयाळ उपाध्याय साहेब मार्ग असे नामकरण मंजूर करण्यात आलेले आहे.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:-** कोणत्या ठिकाणी आपण बोलत आहे.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** आपण नाव दिले आहे पॅनल क्र. १७, लोकमान्य टिळक पुतळयापासुन गुरुनानक अपार्टमेंट पर्यंतच्या रस्त्याचे नामकरण करणे.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी**:- ते आपण मंजूर केले आहे. आपण यादी काय वाचत आहेत.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** हे नामंजूर आहे.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी**:- किशोरलाल जी त्यांना दाखवा.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी :-** मा. महापौरजी मी सांगु इच्छितो, जे लोकमान्य टिळक पुतळया पासुन पर्यंत जो झुलेलाल मार्ग होता तो आता मॅडमने वाचला तो पास झाला आहे.

**सदस्य, श्री.सतरामदास जेसवानी**:- मी कोणत्या ठिकाणाबाबत बोलतो ते ऐका तरी. तहसिलदार ऑफिसजवळ झुलेलाल प्रवेशद्वार चे नाव दिले आहे.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:-** तो पास झाला आहे, आपल्या दोघांचा एकच आहे, पास झाला आहे.

**सदस्य, श्री.सतरामदास जेसवानी**:- मला बालून देत नाहीत, मी किती वर्षापासुन नेहमी मागणी करत आहे. सुनावणी होत नाही. हे होत काय आहे. नगरसेवकाचे वजन बघुन आपण मंजूरी देणार का.मी पण माझे स्वत:चे वजन वाढवू का?

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** दादाजी पी.डब्ल्यु.डी.च्या प्रस्तावात आपले नाव नाही आहे. प्रस्ताव आपण दिले असेल.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी**:- आपण कागद हरवणार तर मी काय करु.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** आपल्याजवळ कागदपत्र असतील तर महापौरांना दाखवा. मग आपला प्रस्ताव पुढच्या तदर्थ समितीमध्ये घेतला जाईल.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी**:- उप महापौर साहेब आता आपण जे वाचून दाखवले ते ना मंजू केला आहे तो तर मंजूर केला आहे.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** अरे ते तर संपवू दे ना. दिले आहे तर

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी**:- कारभार कसा चालू आहे, आपण बोलतात ना मंजूर केला आहे, किशोर वनवारी साहेबांचा बाजार पेठेतील मंजूर केला आहे.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव**:- त्याची प्रत त्यांच्या जवळ पाहीजे ना, आपल्या जवळ असलेले कागदपत्र घेवून या.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी**:- घेवून येणार ना.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी**:- मा. महापौरजी ज्यांचे प्रस्ताव तदर्थ समितीमध्ये आले नाहीत ते लोक आपली कागदपत्र दया. त्यांचे दोन विषय एक गणेशनगर आणि दादा गोविंदराम लुंड यांचा समावेश करुन ते पास केले जावे. दोन आहेत ते राहीले आहेत. दादांचे सर्व संमतीने केले होते.

**सदस्य, श्री. शंकर लुंड**:- जमनुजी समावेश नाही.

**सदस्य, श्री. अरुण आशान:-** मा. महापौरजी मा. उप महापौर साहेब, एक मिनिट हा संभ्रम जो झालेला आहे. त्या संभ्रमाबाबत मी तुम्हांला होतो. दादा सतरामदास यांनी जो अर्ज दिलेला होता. त्या अर्जामध्ये पॅनल क्र. १७ लोकमान्य टिळक यांच्या पुतळयापासून दुधनाका बस स्टॉप पर्यंत ज्या ज्या नामकरणाचे प्रस्ताव तदर्थ समितीकडे ठेवण्यात आले ज्यांचा प्रस्ताव मंजूरीला गेल्यावेळी ३४ आणि आता २८ नावे मंजूर झाली. त्यामध्ये प्रशासनानी त्या ठिकाणी जावून जागेची स्थळपाहणी करावी आणि तसा अहवाल सादर करावा म्हणून मागच्या महासभेमध्ये हे दोन वेळा गोंधळ झाला होता. ते प्रस्ताव प्रशासनाकडून अगदी बरोबर आलेले आहेत. तिथे

कुठलेही दोन नावे प्रस्तावित नाहीत. असे दोन नावे आलेले आपण आज घेतलेले आहेत. आणि बाकीचे जे प्रस्ताव आहेत. त्यामध्ये काही ठिकाणी बोर्ड आहेत काही ठिकाणी बोर्ड आढळून आलेले नाही. किंवा काही ठिकाणी त्याबाजूने बोर्डला नाव दिले आहे.या बाजूने नाव दिसत नाही. म्हणून याची शहानिशा करण्याकरीता हे बाकीचे जे प्रस्ताव आहेत ते मा. पी.डब्ल्यु.डी. विभागाला आम्ही तदर्थ समितीने परत पाठविले आहेत. त्यादिवशी महापौरांच्या बैठकीमध्ये जमनुजी आपण होतात आपण सगळे होतो. ज्यामध्ये वाद होऊ नये. भविष्यात वाद होऊ नये. म्हणुन काही प्रस्तावित नावांमध्ये सतरामदास यांचे पण नाव आहे. त्याच्यामध्ये पुढच्या महासभेत प्रशासनास विनंती करण्यात येत आहे की, पुढच्या महासभेत याच्या अगोदर तदर्थ समितीकडे आतापर्यंत आलेल्या सर्व नावे जी आतापर्यंत नगरसेवकांनी प्रस्तावित केलेली आहेत. संपुर्ण नावांच्या यादीसह प्रशासनाने तदर्थ समितीसमोर आणावी. धन्यवाद !

**<u>सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:-</u>** मला एक खुलासा करु दया, महापौर मॅडम आपले खुप आभार आपण टिळक पुतळयापासुन ते बस स्टण्ड पर्यंत जे नाव दिले आहे आमच्या किशोरलाल छोटया भावाच्या पत्रामुळे धन्यवाद परंतु तेच पत्र मी व किशोरलाल यांनी दिले आहे. त्यावर आपण लिहिले आहे की, हे नाही होऊ शकत. हे काय होत आहे आणि हे पत्र कोण वाचत आहे. किशोरलालजी बरोबर आहे का नाही. आपण दोघेच होतो ना.

**<u>सदस्य, श्री. किशोर वनवारी:-</u>** मा. महापौरजी मी निवेदन करतो की, सितलानी साहेब ही विचार करण्यासारखी गोष्ट आहे की, दादा सतरामदास व माझे म्हणणे ऐकुण घ्या, दादा सतरामदास आम्ही दोघांनी दिले होते मेन बाजारचा मी अध्यक्ष होतो आणि ते ५ नंबरचे सभापती आहेत. टिळक पुतळयापासुन ते झुलेलाल मार्ग तो झाला. हे मी स्पष्ट करतो की, पुढे जरा सुधारणा करायची आहे. आणि दादा व मी एकच आहे. मी सुचक व दादा अनुमोदक दादा आणि मी एकच आहे. परंतु एका रोडसाठी दोन रिमार्कस येत आहे. एक वनवारीकडून आहे, लोकमान्य टिळक पुतळया पासुन दुध नाक्यापर्यंत आणि दादांचा लोकमान्य टिळक पुतळया पासुन दुध नाक्यापर्यंत पण तुमचा नाही होऊ शकत.

**<u>सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी</u>** :- किशोरलाल व मी भाऊ आहेत. पुढे रिमार्कवर लक्ष दया. परंतु एकावर बोलतात देऊ शकत नाही. आणि दुसऱ्याला बोलतात दिला.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी</u>** :- आपण दादाला राग येण्यासारखे करत आहात. दादा खाली बसतील. प्रत्येक वेळेस हे ठिक नाही. जेष्ठ नागरीकाला त्रास देत आहात.

**<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:-</u>** आपण एक-एक करुन बोला ना, म्हणजे मला ऐकू येईल.

**<u>सदस्य, श्री. शंकर लुंड :-</u>** महापौरजी दादांच्या समाधानासाठी एकच गोष्ट आहे. जे किशोर यांचेवर लिहिले आहे पास आणि तीच वस्तु दादा मागत आहेत तर लिहिले आहे की नाही देऊ शकत. कृपया दोघांचे नाव लिहा.

**<u>सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी</u>** :- दोघांनी सही केली होती. मी पण केली होती आणि किशोरलाल यांनी पण केली होती. एका पत्रावर लिहितात एका पत्रावर लिहितात नाही होउ शकत.

**<u>सदस्य, श्री. शंकर लुंड:-</u>** कृपया यात सुधारणा करा. आणि दोघांना त्या कामाचे श्रेय जायला पाहिजे. किशोर यांना पण आणि दादांना पण.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>** सर्वात जे्ष्ठ नगरसेवक सतरामदास दादा यांच्यासोबत महासभेत असा अन्याय का होत आहे.

**<u>सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:-</u>** दुसऱ्या वेळेस लक्ष दया. झुलेलाल साई.

**<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:-</u>** एक एक बोला म्हणजे ऐकायला येईल, सर्व एकसाथ बोलले तर ऐकू कसे.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:-** महपौर महोदया, आयुक्त साहेब खर पाहिल तर यात प्रशासनाची भुमिका तेवढीच महत्वाची आहे. या ठिकाणी मंजूर करताना अगोदर एक शेरा मारला आहे. सदर ठिकाणी कुठल्याही प्रकारचे आढळून आले नाही किंवा कुठल्याही प्रकारचे नामफलक आढळून आलेले नाहीत. आता मी उलटा प्रश्न करतो, महापालिकेने नगरपालिका किंवा महापालिका अस्तित्वात आल्यापासुन आजपर्यंत २८ आणि ३४ यांना मंजूरी दिली याच्याव्यतीरिक्त किती मंजूरी दिली आहे. किती ठिकाणी नामफलक लावले आहेत. किती ठिकाणी नाव मंजूर आहेत. त्याची यादी हवी आहे. ती यादी पहिली सप्ष्ट करा. मग हा असा वाद होतो. साई आत्माराम कि साई परसराम काही गोविंदराम लुंड कि अजून कोणी आयुक्त साहेब आतापर्यंत नावे मंजूर झाली आहेत. हे फक्त नामफलक आढळून आलेले नाही. अनेक ठिकाणी नावे दिलेली आहेत परंतु तिथे नामफलक नाहीत. नामफलक लावण्याचे काम कोणाचे आणि प्रत्येक ठिकाणी वाद परत होणार आहेत. इथे फक्त नामफलक आढळून आले नाही. म्हणून तुम्ही नामकरण्यास मंजुरी दिली तर ते चुकीचे होतय. बऱ्याच ठिकाणी अगदी यापुर्वी गानसम्राज्ञी लता मंगेशकर रेडी होते मोर्या नगरीपर्यंत नामफलक होते तिथे आहे का. ३० सेक्शनच्या रोडला कोणते नाव दिले आहे. आहे का तुमच्याकडे रेकॉर्ड काढा. आयुक्त साहेब आतापर्यंतचे हे मोघम चाललेले आहे. नगरपालिकेपासुन आतापर्यंत नावाचा रेकॉर्ड आपल्याकडे आहे का, की ते ही चोरी झालेले आहे. फक्त नामफलक आढळून आले नाही. याच्याआधारे तुम्ही नामकरण शिफारस करताय. तर यापुढे तदर्थ समितीकडे नाव दयायच्या अगोदर तुमच्या रेकॉर्डवर किती नावे दिलेली आहेत. हजार आहेत, दोन हजार आहेत, चार हजार आहेत, पाच हजार आहेत कि लाख नावे आहेत प्रत्येक १० फुटाच्या रस्त्याला सुध्दा नाव दिले आहे. आतापर्यंतचा रेकॉर्ड पुढच्या महासभेत दया. तरच ती नावे तदर्थ समितीपुढे येतील नाहीतर नामफलक लावले नाही तुम्हांला प्रशासनाला सोपे आहे. आज तुम्ही आहात नंतर अधिकारी निवृत्त झाले आहेत. परंतु हे कायम स्वरुपी राहणार आहे. आहे सुध्दा नाही सुध्दा. याला भावना जोडलेल्या आहेत. ओ उप महापौरजी आतापर्यंत रेकॉर्ड घ्या. नाहीतर रेकॉर्ड काहीच नाही फक्त नामफलक नाही. किती लावलेले आहेत. हे काम महापालिकेचे आहे बर हे नामकरण मंजूर केल्यानंतर किती दिवसात तुम्ही नामफलक लावणार. नाहीतर पुढची महासभा येईल नामफलक नाही म्हणून शहर अभियंता बदली झालेली असेल. याठिकाणी नामफलक लावलेले नाही म्हणजे नामकरण झालेले नाही का. आयुक्त साहेब याकडे गांभिर्याने लक्ष दया. हा भावनांचा प्रश्न आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर नाव असेल आणि त्याला जर दुसर नाव दिले. तर दोन समाजामध्ये तिथे वाद होईल, दंगे होतील. त्याला जबाबदार प्रशासन असेल.केवळ नामफलक आढळून आले नाही म्हणुन नामकरण करा. ही भुमिका बरोबर नाही, बऱ्याच ठिकाणी आम्ही नामकरण केलेले होते पण तिथे नामफलक प्रशासनाने ते लावलेले नाही. गेल्या १० वर्षात किती नामफलक तयार केलेले आहेत.

**या** वेळी सदस्य, श्री. भारत रामचंदानी यांनी सभागृहामध्ये प्रवेश केला.

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-** सर नामफलक लावले नाहीत. आता लवकरच लावले जाईल.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:-** जेवढया वेळा नामकरणाचे सभा झालेल्या आहेत. तदर्थ समितीच्या असतील महासभेच्या असतील, रेकॉर्ड काढा. नामफलक तुम्ही किती वेळा लावलेले आहेत.

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-** सर नामफलक लावले नाही.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:-** मग याचा अर्थ आपण नामकरण केलेलेच नाही का?

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-** लवकरात लवकर लावले जाईल.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:-** स्पष्ट रिमार्क आहे, नामफलक आढळून आलेले नाही म्हणुन तुम्ही शिफारस करत आहेत.

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-** आता नामफलक लवकरात लवकर लावले जातील.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:-</u>** त्यामध्ये बरीचशी नावे दिली गेली असतील. पण तुमच्या रेकॉर्डमध्ये नाहीत, रेकॉर्ड सगळे काढा आहेत की, नाही ते तरी स्पष्ट सांगा. नसेल तर नवीन करु.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी</u>**:- सितलानीजी यादीमध्ये मला जे सहयाद्री ग्रार्डनचे नाव

**<u>शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-</u>** अनुक्रमांक १३ मध्ये सहयाद्रीनगर दादा गोविंदराम नाम लिहिले आहे. तो पास आहे सर.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी</u>** :- धन्यवाद!

**<u>उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-</u>** प्रशासनाला महापौरांच्यावतीने आदेश देण्यात येत आहे. एक मापाचा बोर्ड ...

**<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी</u>**:- संबंधीत अधिकारी जर उभा राहतो तर त्याला बोलायला दिले पाहिजे. नंतर तो निघुन जाईल परत येणार नाही. या गळा दाबा आमचा दिड वर्षातून मिटींग लागली आहे. मारुन टाका आम्हांला

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:-</u>** आपण आमच्या महासभेत एकच डॉक्टर आहे. त्यांना पण बोलायचा अधिकार देत नाही. हा अन्याय आहे.

**<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-</u>** आता तो अधिकारी उतरला. गप्पा मारत आहे. महासभा चालू आहे. शहराचा विकास होत आहे. तो अधिकारी काय करत आहे. ते महानगरपालिकेला फुटपाथ बोलत आहेत असे वाटते. ते शहर अभियंता आहेत.

**<u>सदस्य, श्री. कलवंतसिंग सोहता:-</u>** डॉक्टर शांतता ठेवा.

**<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-</u>** नाही सर, महानगरपालिका नगरपरिषदपेक्षा खाली गेली आहे. असे वाटते.

**<u>सदस्य, श्री. श्री. कलवंतसिंग सोहता:-</u>** डॉक्टर परत राजीनामा देवून टाक.

**<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-</u>** आपण लक्ष दया. आपण हसु नका. भावना समजुन घ्या.

**<u>सदस्य, श्री. राजेश वधारिया:-</u>** आमच्यासाठी ही सौभाग्याची गोष्ट आहे की, आमच्याजवळ एकच सदस्य डॉक्टर आहे. तर त्यांना पण आपण बोलण्यास देत नाहीत. त्यांचेपण ऐकत नाही. हे डॉक्टरच्या वर अन्याय आहे.

**<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:-</u>** जरा शांत बसा. उत्तर देत आहेत.

**<u>सदस्य, श्री. कलवंतसिंग सोहता</u>**:- डॉक्टर आहेत पण डॉक्टरसारखे वागत नाहीत.

**<u>शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-</u>** बोला सर.

**<u>सदस्य,डॉ. प्रकाश नाथानी:-</u>** आता राम कहानी पुर्ण झाली सिता सांगा कोण होती?

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी</u>**:- गणेश नगरचा विषय आहे, डॉक्टर साहेबांचा त्यांचा वार्ड आहे त्यांचा पॅनल आहे. तिथे कोणतेही ऑब्जेक्शन नाही तदर्थ समितीमध्ये पास झाला आहे.

**<u>शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-</u>** तदर्थ समितीमध्ये जे २८ नावे पास झाले होते आम्ही महासभेत तेच आणले आहेत. आणि महापौर मॅडम यांच्या म्हणण्यानुसार ८ दिवसांत आम्ही बाकी नामकरण तपासुन पुढच्या मिटिंगमध्ये सादर करु.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी**:- सितलानीजी जेव्हा महापौरांजवळ मिटिंग झाली होती. त्यावेळेस हे नाव होते. पेपरमध्ये पण नाव होते, ऑन रेकॉर्डवर पण नाव होते ऑल रेडी ऑन पेपर हाऊ इट वाज डिलीटेड या मिटिंगमध्ये का नाही आले.

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-** सरजी काही काही रेकॉर्ड आमच्या उपलब्ध नाहीत खुप जुने रेकॉर्ड आहे. ७०-७५ नाव आहेत, पहीले पण एक वाद झाला होता

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी**:- त्या वार्डमधून मी चार वेळा निवडुन आलो आहे. आपल्याजवळ रेकॉर्ड नाही. ९७ पासुन त्या वॉर्डमधुन जिंकून येत आहे. इतिहास साक्ष आहे. भारत साक्षी आहे. मी जिवंत आहे. जर तुम्हांला माहीती नाही तर आपण अधिकारी कधीपासून आहेत?

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-** सर पुढच्या मिटिंगमध्ये आम्ही तपासुन आणू.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी**:- यु नॉट ऐवरी थिंग इंजिनियर जर आपण बोलत आहेत मला माहीती नाही, मी आताच राजीनामा देतो. आपण मनापासून सांगा की, तुम्हांला माहीती नाही, मी आता राजीनामा देतो, आयुक्त साहेब मी आताच तुम्हांला राजीनामा देतो. यांनी मनापासून सांगावे, सत्याने बोलावे फक्त्

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी**:- सितलानी साहेब आपण आपला अहवाल पाठवला आहे. आपल्या अहवालात लिहिले आहे. तिथे कोणतेच नाव आहे. वाचा ना. सितलानी साहेब.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी**:- चौकशी झाली पाहीजे. कोणतेही काम करणार नाहीत तर चौकशी करु. इतिहास साक्षी आहे, भारत साक्षी आहे, जेव्हा जेव्हा होत नाही तेव्हा चौकशी होते काय होते, फक्त वेळ वाया जाते अजून काहीच करायचे नाही.

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-** नंतरच्या मिटींगमध्ये येईल सर.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी**:- धन्यवाद.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी**:- सितलानी साहेब गणेशनगरचा जो विषय आहे, त्यावर तुमचे रिमार्क आहेत की तेथे आम्ही गेलो तपासून पाहिले. तेथे कोणतेच नाव नाही हे आपण नाव देवू शकतो आणि तदर्थ समितीमध्ये पण निर्णय झाला होता. जेव्हा भालेरावजींनी सांगितले दुसरे नाव आहे ते मागच्या बाजूला आहे. त्यासाठी या छोटया विषयाला का ठेवत आहेत.

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-** सरजी मी विंनती करतो की, पुढच्या मिटिंगमध्ये नक्की येईल.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-** मा. महापौरजी, जी गोष्ट जमनुजी यांनी सांगितली जर तसे झाले तर गणेश भगवानच्या नावाने देणे काही अडचण असेल असे मला वाटत नाही. त्या नावाचा पण समावेश करा.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी**:- सर मी सांगतो. त्यामध्ये साईबाबा नगर पण आहे. त्याच्या बाजुचा भाग आहे तो.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी**:- तुम्हांला सगळयांना मंजूर असेल तर हात वरती करा.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-** मंजुर आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-** मंजूर आहे.

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-** ओके सर.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी</u>**:- महापौरजी, आपले खुप खुप धन्यवाद! आपण गणेशनगरचे नाव ठेवून श्रीगणेशा केला आहे खुप चांगले काम केले आहे.

**<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी</u>**:- महापौरजी, खुप धन्यवाद! गणपती बाप्पा मोरया, धन्यवाद आपले, आपण खुप दिवसापासुनचे काम केले.

**<u>उप महापौर, श्री. भगवान भालेराव</u>**:- सन्माननीय सदस्य आता २८ आणि आधीची यादी असे एकुण ६३ नावे झालेली आहेत. यांना मान्यता देण्यात येत आहे. तसेच महापौरांच्या आदेशाने प्रशासनाने एका साईजचे बोर्ड त्या नामकरणाच्या ठिकाणी लावावे. कुठलाही मोठा किंवा कमी जास्त करु नये. याची प्रशासनाने दखल घ्यावी.

**<u>सदस्य, श्री. किशोर वनवारी</u>**:- ८ दिवसांच्या आंत सर्व आले पाहिजेत.

**<u>उप महापौर, श्री. भगवान भालेराव</u>**:- ८ दिवस नाही, टेंडर होईल प्रोसेस आहे, असे कसे बोलता आपण ८ दिवसाच्या आत.

**<u>सदस्य, श्री. किशोर वनवारी</u>**:- आठ दिवसाच्या आतमध्ये सर्व नावे आले पाहीजेत.

**<u>उप महापौर, श्री. भगवान भालेराव</u>**:- टेंडर होणार मग टेंडरच्या नंतर होणार.

**<u>सदस्य, श्री. मनोज सयानी:-</u>** नाही नाही, जी यादी बाकी आहे

**<u>उप महापौर, श्री. भगवान भालेराव</u>**:- इतिवृत्ताची वाट न पहाता. पास..

**<u>सदस्य, श्री. किशोर वनवारी</u>** :- इतिवृत्ताची वाट न पाहता.

**<u>महापालिका सचिव:-</u>** एक मिनिट ठराव आधी नावे दिलेली आहेत ती सर्व प्रशासनाने तपासून नंतरच नावे दयावी, हे ठरावामध्ये येईल. पास इतिवृत्ताची वाट न पाहता. पास.

**<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषयक्र.११**:- उल्हासनगरशहरातीलविविधरस्त्यांवचौकांनानामकरणकरणेकरीतातदर्थसमितीने मंजुर केलेल्या ३४ प्रस्तावांची यादी मा. स्थायी समितीची मान्यतेस्तव सादर करणे.

प्रस्तावना

उल्हासनगर शहरातील विविध उल्हासनगर शहरातील रस्ते, चौक, प्रवेशद्वार इ. चे नामकरण करणे करीता महासभेच्या ठरावानुसार तदर्थ नामकरण समिती गठित करण्यात आलेली आहे.दि.०४/०३/२०२१ रोजीच्या मा.महापौर, उ.म.पा.यांचे पत्राच्या अनुषंगाने दि.२३ मार्च, २०२१ रोजी दुपारी१.०० वा.मा. महापौर यांचे दालनात तदर्थनामकरण समितीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.सदर बैठकीत तदर्थ समितीने प्राथमिक मंजुरी दिलेल्या एकुण ३४ प्रस्तावांची यादी सोबत जोडली आहे.सदर बैठकीमध्ये एकुण ३४ प्रस्तावांना प्राथमिक मंजुरी देण्यात आलेले एकुण ३४ प्रस्ताव मा.महासभेची मान्यता मिळणेस प्रस्तावित करण्यात येत आहे.

**वर्ष २०१९-२०२० मध्ये उल्हासनगर शहरातील विविध रस्त्यांना व चौकांना नामकरण करणेकरीता तदर्भ समितीच्या मंजुरीनुसार ३४ एकुण प्रस्तावांची यादी**

| अ. क्र. | प्रस्ताव प्राप्त झाल्याचा दिनांक | प्रभाग क्र. | प्रस्तावितांचे नावे | नामकरण करावयाचे ठिकाण रस्ता/ चौक | प्रस्तावित नाव | पत्र प्राप्त दिनांक | शेरा | निर्णय | प्रस्ताव मंजुरी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| १ | ९/५/२०१८ | ९ क | श्री. अजीत (पप्पू) प्रभुनाथ गुप्ता नगरसेवक प्रभाग क्र.९ क | उल्हासनगर-३ येथील पॅनल क्र.९ मध्ये सुभाष नगर काली माता मंदिर ते पेट ऑक्सफोर्ड स्कुल पर्यंतच्या रस्त्यास नामकरण करणेबाबत. | "जय महाकाली माता मार्ग" | ९/५/२०१८ | सदर जागेची स्थळ पाहणी केली असता कोणत्याही नावाचा नामफलक जागेवर आढळून आलेला नाही. तसेच कार्यालयीन दस्ताऐवजांमध्ये सदर रस्त्यास नामकरण झाल्याचे आढळून आले नाही. | सदर परीसरात जय महाकाली मंदिर असल्याने सदर प्रस्ताव मंजूर करण्यात आला | प्रस्ताव मंजुर |
| २ | | | श्रीम. सविता प्र.तोरणे (रगडे) (नगरसेविका ) उमपा | उल्हासनगर-३ मधील सम्राट अशोकनगर येथील चौकास नामकरण करणेबाबत. | "भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक" | १५/०५/२०१८ | जागेची पाहणी केली असता जागेवर कोणत्याही नावाचा फलक लावल्याचे आढळून आले नाही. | सदर परीसरात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक बसविण्यास हरकत नसल्याने त्यास मंजूरी देण्यात आली. | प्रस्ताव मंजुर |
| ३ | २२/५/२०१८ | १२ | श्री.गजानन प्रल्हाद शेळके नगरसेवक प्रभाग क्र-१२ (ब) (साई पार्टी-गंगाजल फ्रंट) | प्रभाग क्रमांक.१२ मधील सम्राट अशोक नगर येथील रमाबाई आंबेडकर विद्यालयाजवळील चौकास नामकरण करणेबाबत. | "माता रमाबाई आंबेडकर चौक" | २२/०५/२०१८ | जागेची पाहणी केली असता सम्राट अशोक नगर कडून रमाबाई आंबेडकर विद्यालयाकडे जाणारा हा रस्ता आहे. या ठिकाणी चौक नाही. हा एक सलग रस्ता आहे.प्रस्तावितांनी केलेली मागणी रमाबाईआंबेडकर विद्यालयाजवळील वळणाला चौक संबोधून त्यास नामकरण करणेची आहे. | सदर परीसरात माता रमाबाई आंबेडकर चौक असे नामकरण करण्यास हरकत नसल्याने त्यास मंजूरी देण्यात आली. | प्रस्ताव मंजुर |
| ४ | ३०/५/२०१८ | | १) श्री. जमनु पुरस्वानी, नगरसेवक, उमपा २) जय | कल्याण अंबरनाथ रोड वरील महाराज हॉल समोर चौकास | "झूलेलाल चौक" | ३०/०५/२०१८ | जागेची पाहणी केली असता जागेवर कोणत्याही नावाचा फलक लावल्याचे आढळून आले नाही. | सदर परीसरात झुलेलाल चौक असे नामकरण | प्रस्ताव मंजुर |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | झुलेलाल संघर्ष सेवा समिती | नामकरण करणेबाबत. | | | | करण्यास हरकत नसल्याने त्यास मंजूरी देण्यातआली |
| ५ | | ५ | डॉ. प्रकाश नाथानी (नगरसेवक) उमपा | अमन टॉकीज रोड, रमेश नगर को ऑप सोसायटी व स्नो व्हाईट सोसायटी येथील रस्त्यास नामकरण करणेबाबत. | "सिंधुनगर " | १/९/२०१८ | जागेची पाहणी केली असता जागेवर कोणत्याही नावाचा फलक लावल्याचे आढळून आले नाही. | सदर परीसरास सिंधूनगर चौक असे नामकरण करण्यास हरकत नसल्याने त्यास मंजूरी देण्यात आली. | प्रस्ताव मंजुर |
| ६ | | ५ | श्रीमती.गीताला.साधनानी (नगरसेविका) प्रभाग क्र.५ | उल्हासनगर-१ प्रभाग क्र.५ मधील गोलमैदान जवळील हिरा पन्ना अपार्टमेंट व निरकांरी भवन जवळील चौकाचे नामकरण करणे. | "बाबा हरदेव सिंग जी. निरंकारी चौक" | ८/६/२०१८ | जागेची पाहणी केली असता परिसरास कोणत्याही प्रकारचे नामकरण झाल्याचे आढळून आले नाही. | सदर परीसराला नमुद केलेप्रमाणे नामकरण करण्यास मंजूरी देण्यात आली | प्रस्ताव मंजुर |
| ७ | | १८ | (अंजली चंद्रकांत साळवे) गटनेता, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस उल्हासनगर महानगरपालिका | प्रभाग क्र.१८ ब्लॉक नं.१४३ जवळील चौकास नामकरण करणेबाबत. | "रमाबाई आंबेडकर चौक" | ४/९/२०१८ | सदर चौकास रमाबाई आंबेडकर चौक या नावाने ओळखले जाते परंतू जागेवर फलक लावलेला नाही. | सदर परीसराला नमुद केलेप्रमाणे नामकरण करण्यास मंजूरी देण्यात आली | प्रस्ताव मंजुर |
| ८ | | १८ | (अंजली चंद्रकांत साळवे) गटनेता, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस उमपा | प्रभाग क्र.१८ ब्लॉक नं.३९७ समोरील चौकास नामकरण करणेबाबत. | "सावित्री बाई फुले चौक" | ४/९/२०१८ | सदर चौकास सावित्रीबाई फुले चौक या नावाने ओळखले जाते . तसा फलक चौकात लावलेला आहे. परंतू कार्यालयातील दस्ताऐवजांत तशी नोंद असल्याचे आढळून आले नाही. | सदर परीसराला नमुद केलेप्रमाणे नामकरण करण्यास मंजूरी देण्यात आली | प्रस्ताव मंजुर |
| ९ | | १८ | (अंजली चंद्रकांत साळवे) गटनेता, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस उमपा | प्रभाग क्र.१८ मधील दलित पँथर चौकास नामकरण करणेबाबत. | "पद्मश्री नामदेव ढसाळ चौक" | ४/९/२०१८ | सदर चौकास दलित पँथर चौक या नावाने ओळखले जाते . | सदर परीसराला नमुद केलेप्रमाणे नामकरण करण्यास मंजूरी | प्रस्ताव मंजुर |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | देण्यात आली | |
| १० | | १९ | श्री.मनोज दी.सयानी | कल्याण अंबरनाथ रोड, टिलसन हॉटेल जवळ, अहुजा साउंड समोरील चौक नामकरण करणे. | "महाराजा डाहिडसिंग चौक" | | १) सदर ठिकाण हे चौक नाही. २) सदर ठिकाणी कुठल्याही प्रकारचे नामफलक आढळून आलेले नाही. | सदर परीसराला नमुद केलेप्रमाणे नामकरण करण्यास मंजूरी देण्यात आली | प्रस्ताव मंजुर |
| ११ | | १६ | श्री.शंकर (शेरी) गोविंदराम लुंड नगरसेवक | हिरापुरी चौक पासून न्यु इंग्लीश स्कुल या मागाचे नामकरण | बच्चाराम रुपचंदानी मार्ग | १५/०३/२०२१ | या यादीमधी अनु क्र. ६४ श्री.राजु इदनानी, नगरसेवक व श्रीम दिप्ती दुधानी, नगरसेविका यांनी देखील नामकरणाची मागणी केली आहे. | मान्य करण्यात आले | प्रस्ताव मंजुर |
| १२ | | १ | जॉईंट प्रेसिडेंट सेंच्युरी रेयॉन कंपनी<br>श्रीमती ज्योती गायकवाड सभापती, पाणी पुरवठा | राष्टीय महामार्ग क्र.२२२ पासून ऑक्ट्राय नाका ते म्हारळ नाका या रस्त्यास नामरकण करणे. | स्व. बसंतकुमार बिर्ला मार्ग | १९/११/२०१९<br>२६/०२/२०२० | सदर रस्ता हा राष्ट्रीय महामार्ग क्र.२२२ आहे. या रस्त्याचे काम एमएमआरडीए यांचेमार्फत सुरु आहे. राष्ट्रीय महामार्गांच्या नामकरणाकरीता राज्य शासन सार्वजनिक बांधकाम विभाग यांची परवानगी घेणे आवश्यक आहे. परंतू सेंच्युरी रेयॉन कंपनी समोरील निळकंठ मंदीर येथील चौकाचे प्रस्तावितांनी केलेल्या मागणीप्रमाणे नामकरण करता येईल. | मान्य करण्यात आले | प्रस्ताव मंजुर |
| १३ | | ३ | १) श्री. प्रमोद नामदेवराव टाले, गटनेता, उमपा २)श्री.पंचम कालानी, माजी महापौर ३) श्री.ज्योती दिलिप गायकवाड, नगरसेविका | १) सेंच्युरी रेऑन कंपनी समोरील मुख्य रस्त्याचे नामकरण करणे २) सौ. पंचम कलानी यांचे दि.०३/०३/२०२१ रोजीचे पत्र - राष्ट्रीय महामार्ग क्रमांक २२२ चा जो भाग उल्हासनगर महापालिका हद्दीत येतो त्यास "बी.के. | "बी.के. बिर्ला मार्ग" | १)२८/११/२०१९ २)२५/०२/२०२१ ३)२४/०२/२०२० | १)"दिनांक १३/०३/२०२० रोजी या कार्यालयास प्राप्त झाले आहे. (नविन) २) दिनांक ०३/०३/२०२१ रोजी या कार्यालयास प्राप्त झाले आहे. (नविन) | मान्य करण्यात आले | प्रस्ताव मंजुर |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | बिर्ला मार्ग" असे नामकरण करणे. | | | | | |
| १४ | | ४ | श्रीम. ज्योती श्याम माने, नगरसेविका, उमपा | पॅनेल नं.१३ मध्ये ब्लॉक नं.४७१ लालचक्की चौकाचे नामकरण करणे | 'उत्कर्ष नगर' | १२/३/२०२० | दिनांक १२/०३/२०२० रोजी या कार्यालयास प्राप्त झाले आहे. (नविन) सदर ठिकाण पुर्वीपासून लालचक्की या नावाने ओळखले जाते. | सदर परीसराला नमुद केलेप्रमाणे नामकरण करण्यास मंजूरी देण्यात आली | **प्रस्ताव मंजुर** |
| १५ | | १४ | श्री. चंद्रशेखर केशव यादव नगरसेक प्रभाग क्र.१४ उमपा | उल्हासनगर-४ मराठा सेक्शन, जंगल हॉटेल ते स्टेशन रोड रस्त्यावरील मुक्ती अपार्टमेंटसमोर दत्तकृपा बिल्डींग समोरील चौकाचे नामकरण करणे | शहीद भगत सिंग चौक | २६/२/२०२० | दिनांक २६/०२/२०२० रोजी या कार्यालयास नवे पत्र प्राप्त झाले आहे. (नविन) सदर रस्त्यावर कोणत्याही प्रकारचा नामफलक आढळून आला नाही. | सदर परीसराला नमुद केलेप्रमाणे नामकरण करण्यास मंजूरी देण्यात आली | **प्रस्ताव मंजुर** |
| १६ | | ४ ड | श्री. कलवंत सिंह सहोता (बिट्टु भाई) नगरसेवक प्रभाग क्र.४ (ड) उमपा | शहाड रेल्वे स्टेशन रोड, संत रोहिदास नगर समोर, क्रांतीनगरच्या बाजूच्या नविन चौकाचे नामकरण करणे | " शहीद भगतसिंग चौक" | १३/०३/२०२० | दिनांक १३/०३/२०२० रोजी या कार्यालयास प्राप्त झाले आहे. (नविन) सदर चौकात नावाचे कोणतेही फलक आढळून आले नाही . | सदर परीसराला नमुद केलेप्रमाणे नामकरण करण्यास मंजूरी देण्यात आली | **प्रस्ताव मंजुर** |
| १७ | | १० | सौ. शुभांगी बेहनवाल नगरसेविका प्रभाग क्र.१० उमपा | प्रभाग क्र.१० उल्हासनगर-३ मधील कालानी कंपाउंड, रवी ट्रान्सपोर्ट, बोटक्लब व पमाचक्की, हिराघाट पंचशिलनगर येथील चौकाचे नामकरण करणे | " भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक" | | सदर चौकास कोणत्याही प्रकारचे नामकरण झालेले नाही. | सदर परीसराला नमुद केलेप्रमाणे नामकरण करण्यास मंजूरी देण्यात आली | **प्रस्ताव मंजुर** |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १८ | | | श्री. मनोज लास्सी, नगरसेवक | १) उल्हासनगर १ मधील शहाड सी.ब्लॉक रोड संतरोहिदास नगर समारील नविन चौकास शहिद भगत सिंग चौक असे नामकरण करणे | शहिद भगत सिंग चौक | १६/०३/२०२० | पत्र दि. १६/०३/२०२० रोजी प्राप्त झाले आहे. | सदर परीसराला नमुद केलेप्रमाणे नामकरण करण्यास मंजूरी देण्यात आली | प्रस्ताव मंजुर |
| १९ | | | श्री. मनोज लास्सी, नगरसेवक | २) उल्हासनगर २ मधील नेहरु चौक, अमन टॉकीज रोड, शाम सुंदर मिठाईवाल्याचे समोरील नविन चौकरस दादा जे.पी. वासवाणी चौक असे नामकरण करणे | दादा जे.पी. वासवाणी चौक | १६/०३/२०२० | पत्र दि. १६/०३/२०२० रोजी प्राप्त झाले आहे. | सदर परीसराला नमुद केलेप्रमाणे नामकरण करण्यास मंजूरी देण्यात आली | प्रस्ताव मंजुर |
| २० | | ९ | श्री. मनोज लास्सी, नगरसेवक | उल्हासनगर ३ पॅनल क्र. ९ मधील माबाईल बाजार, सेक्श्‍ान १७ टेकडी येथे भाई साहेब मेहेरबान सिंगजी चौक हे नाव देणे | भाई साहेब मेहेरबान सिंगजी चौक | १०/३/२०२१ | पत्र दि. १०/०३/२०२१ रोजी प्राप्त झाले आहे. | सदर परीसराला नमुद केलेप्रमाणे नामकरण करण्यास मंजूरी देण्यात आली | प्रस्ताव मंजुर |
| २१ | | १७ | श्री.भारत रामचंद राजवानी (गंगोत्री), नगरसेवक | १) प्रभाग क्र.17 मधील साईकृपा सोसायटी ते शिवसाई सदन इमारती पर्यत असलेल्या मंजुर विकास योजनेतील रस्त्याचे “ बाबा अमरदास मार्ग " आणि चौक असे नामकरण करणे बाबत. | “ बाबा अमरदास मार्ग " | १७/०३/२०२१ | पत्र दि. १७/०३/२०२१ रोजी ८ नावांच्या प्रस्तावांकरीता प्राप्त झाले आहे. सदर ठिकाणी बाबा अमरदास मार्ग असा नामफलक आहे. | सदर परीसराला नमुद केलेप्रमाणे नामकरण करण्यास मंजूरी देण्यात आली | प्रस्ताव मंजुर |
| २२ | | १७ | श्री.भारत रामचंद राजवानी (गंगोत्री), नगरसेवक | २) प्रभाग क्र.17 मधून जाणारा स्वामी शांती प्रकाश पुतळा ते दुधनाका चौक पर्यंत जाणा-या मंजुर विकास योजनेतील रस्त्याचे “ साई आत्माराम चेतनराम जग्यासी मार्ग " असे नामकरण | “ साई आत्माराम चेतनराम जग्यासी मार्ग " | १७/०३/२०२१ | सदर ठिकाणी कोणताही नामफलक आढळून आला नाही. सदर ठिकाणी कोणताही नामफलक आढळून आला नाही. | सदर परीसराला नमुद केलेप्रमाणे नामकरण करण्यास मंजूरी देण्यात आली | प्रस्ताव मंजुर |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | करण्या बाबत. | | | | | |
| २३ | | १७ | श्री.भारत रामचंद राजवानी (गंगोत्री), नगरसेवक | ३) उल्हासनगर 4, प्रभाग क.17 मधील स्वामी शांती प्रकाश चौक पासून कुर्ला कॅम्प शिवमंदीर रोड कडे जाणा-या रस्ता शारदा सागर सोसायटी समोरीलचौकाच्या बाबा किमतराय चौक " असे नामकरण करणे बाबत. | बाबा किमतराय चौक | १७/०३/२०२१ | सदर ठिकाणी कोणताही नामफलक आढळून आला नाही. | सदर परीसराला नमुद केलेप्रमाणे नामकरण करण्यास मंजूरी देण्यात आली | **प्रस्ताव मंजुर** |
| २४ | | १७ | श्री.भारत रामचंद राजवानी (गंगोत्री), नगरसेवक | ४) उल्हासनगर 4,प्रभाग क्र.17 मधील सिंधू समाज पंचायत हॉल ते टिप्सी टॉप्सी अर्पा.ते हरेश ग्यांनचांदानी यांचे घरा पर्यंत “ बाबा मेहरदास मार्ग आणि चौक " असे नामकरण करण्या बाबत. | “ बाबा मेहरदास मार्ग आणि चौक " | १७/०३/२०२१ | सदर ठिकाणी बाबा मेहरदास मार्ग असा नामफलक लावण्यात आलेला आहे. | सदर परीसराला नमुद केलेप्रमाणे नामकरण करण्यास मंजूरी देण्यात आली | **प्रस्ताव मंजुर** |
| २५ | | १७ | श्री.भारत रामचंद राजवानी (गंगोत्री), नगरसेवक | ५) प्रभाग क.17 मधील साई आर्केड पासून स्वामी शांती प्रकाश उदयाना जवळील रस्त्यास शेहनशाह साई पांडूशाह " असे नामकरण करण्या बाबत. | शेहनशाह साई पारुशाह | १७/०३/२०२१ | सदर ठिकाणी कोणताही नामफलक आढळून आला नाही. | सदर परीसराला नमुद केलेप्रमाणे नामकरण करण्यास मंजूरी देण्यात आली | **प्रस्ताव मंजुर** |
| २६ | | १७ | श्री.भारत रामचंद राजवानी (गंगोत्री), नगरसेवक | ६) उल्हासनगर 5, प्रभाग क्र.17 मधील ब्लॉक नं.बी39, रूम नं.234 पासून | "साई गुरूमुखदास आत्माराम जग्यासी " | १७/०३/२०२१ | सदर ठिकाणी कोणताही नामफलक आढळून आला नाही. | सदर परीसराला नमुद केलेप्रमाणे नामकरण | **प्रस्ताव मंजुर** |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ब्लॉक नं. 40,रूम नं.235 जवळील रस्त्यास "साई गुरूमुखदास आत्माराम जग्यासी " असे नामकरण करण्या बाबत. | | | | करण्यास मंजूरी देण्यात आली | |
| २७ | | | श्री. किशोर वनवारी, विरोधी पक्ष नेता | १) बॅरेक क्र. २०२८ जवळ, सेक्शन ३७, उल्हासनगर ५ येथील लोकांनी बनविलेल्या समाजमंदिर | मिरा का नारायण ट्रस्ट | १५/०३/२०२१ | पत्र दि. १५/०३/२०२१ रोजी एकुण ७ प्रस्तावासह प्राप्त झाले आहेत. त्यापैकी ५ प्रस्ताव श्री. सचिन साठे यांचे पत्रान्वये होते. | सदर परीसराला नमुद केलेप्रमाणे नामकरण करण्यास मंजूरी देण्यात | प्रस्ताव मंजुर |
| २८ | | | श्री. किशोर वनवारी, विरोधी पक्ष नेता | २) विर तानाजी नगर, शिवसेना शाखे समोर, राजु प्लंबर यांच्या घराजवळ, उल्हासनगर ५ येथील चौक | आण्णाभाऊ साठे चौक | १५/०३/२०२१ | सदर ठिकाणी कोणताही नामफलक आढळून आला नाही. | सदर परीसराला नमुद केलेप्रमाणे नामकरण करण्यास मंजूरी देण्यात आली | प्रस्ताव मंजुर |
| २९ | | | १) श्री. किशोर वनवारी, विरोधी पक्ष नेता २) श्री. सचिन इ. साठे, संघटक सचिव | ३) फॉलोअर लाईन, गांधी रोड, उल्हासनगर ५ येथील वस्तीचे नामकरण | महर्षी वाल्मिकी नगर | १) श्री वनवारी यांचे पत्र दि. १५/०३/२०२१ २) श्री. साठे यांचे पत्र दि.१४/०३/२०२१ | सदर ठिकाणी कोणताही नामफलक आढळून आला नाही. | सदर परीसराला नमुद केलेप्रमाणे नामकरण करण्यास मंजूरी देण्यात आली | प्रस्ताव मंजुर |
| ३० | | १३ | श्री. सुमित सागर सोनकांबळे, नगरसेवक | पॅनल क्रमांक १३ मधील सिध्दार्थ नगर येथील समाजमंदिराचे नामकरण | सिध्दार्थ बुध्द विहार | १०/३/२०२१ | सदर समाज मंदिरास कोणतेही नामफलक नाही. | सदर परीसराला नमुद केलेप्रमाणे नामकरण करण्यास मंजूरी देण्यात आली | प्रस्ताव मंजुर |
| ३१ | | १३ | श्री. सुमित सागर सोनकांबळे, नगरसेवक | पॅनल क्रं. १३ मधील महापालिकेच्या उद्यानाच नामकरण | नाना-नानी पार्क | १६/०३/२०२१ | सदर उद्यानास कोणतेही नामकरण करण्यात आलेले नाही | सदर परीसराला नमुद केलेप्रमाणे नामकरण करण्यास मंजूरी देण्यात आली | प्रस्ताव मंजुर |
| ३२ | | १८ | श्रीम. अंजली चंद्रकांत साळवे, सभापती | १) सर्टीफाईड शाळेच्या बाजुला पाण्याच्या टाकीखाली | डॉ. साहित्य रत्न आण्णाभाऊ साठे | १८/०३/२०२१ | सदर उद्यानास कोणतेही नामकरण करण्यात आलेले नाही | सदर परीसराला नमुद केलेप्रमाणे नामकरण करण्यास | प्रस्ताव मंजुर |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | उ.नगर ४ येथे नव्याने विकसीत होणा-या उद्यानाचे नामकरण | | | | मंजूरी देण्यात आली | |
| ३३ | | १२ | श्री. गजानन प्रल्हाद शेळके, नगरसेवक | २), ओटी सेक्श‍ान, उल्हासनगर ३ येथील वडोल गाव पुलाचे नामकरण | धर्मविर आनंद दिघे साहेब पुल | १५/०३/२०२१ | सदर पुल नविन बनविण्यात आला असून सदर पुलाचे नामकरण करण्यात आलेले नाही. | सदर परीसराला नमुद केलेप्रमाणे नामकरण करण्यास मंजूरी देण्यात आली | प्रस्ताव मंजुर |
| ३४ | | १२ | श्री. दिपक (टोनी) सिरवानी, नगरसेवक | पॅनल १२ मधील शिव दर्शन सोसायटी जवळ, ओटी चौक या चौकाचे नामकरण करणे | संत बलराम साहेब चौक | १५/०३/२०२१ | सदर ठिकाणी कोणाही नामफलक आढळून आला नाही. | सदर परीसराला नमुद केलेप्रमाणे नामकरण करण्यास मंजूरी देण्यात आली | प्रस्ताव मंजुर |
| ३५ | | ५ | श्रीम. गीता लालचंद साधनानी, नगरसेविका | उल्हासनगर-१, प्रभाग क्र.५मधील ४४४ गार्डनमहेश्वरी निवास जवळील नगरास नामकरण. | श्री. गणेशनगर | ८/६/२०१८ | जागेची पाहणी केली असता परिसरास कोणत्याही प्रकारचे नामकरण झाल्याचे आढळून आले नाही. | सदर परीसराला नमुद केलेप्रमाणे नामकरण करण्यास मंजूरी देण्यात आली | प्रस्ताव मंजुर |

तदर्थ नामकरण समिती ने दि.२९/११/२०२१ रोजी पारीत केलेले नामकरणाचे एकुण २८ प्रस्ताव

| **अ.क्र.** | **प्रभाग क्र.** | **प्रस्तावितांचे नावे** | **नामकरण करावयाचे ठिकाण रस्ता/ चौक** | **प्रस्तावित नाव** | **पत्र प्राप्त दिनांक** | **प्रस्ताव (मंजुर / नामंजुर)** |
|---|---|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** | **७** |
| 1 | १६ | श्रीम.दिप्ती नवीन दुधाणी (सभापती) महसूल समिती उमपा | प्र.क्र.३३ मध्ये ब्लॉक क्र. ७५० लक्ष्मी व्हिला जवळील चौकाचे नामकरण | **"दादा जंगलदास वाधवा" चौक** | २४/१०/२०१६ | **मंजुर** |
| 2 | १६ | श्रीम.दिप्ती नवीन दुधाणी (सभापती) महसूल समिती उमपा | ब्लॉक नं.७५० पासून ते देवी मॉ अपार्टमेंट पर्यंतच्या रस्त्यास नामकरण करणे. | **"प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरी" मार्ग** | २०/०५/२०१७ | **मंजुर** |
| 3 | ११ | श्री.राजू (जीवन) इदनानी नगरसेवक | उल्हासनगर-२ मधील साईबाबा सोसायटी समोरील प्लॉट नं.७०५ वरील उद्यानस नामकरण करणे. | **"साई बसनशहा उद्यान"** | १६/०५/२०१७ | **मंजुर** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 4 | २० | श्री. किशोर नारायणदास वनवारी नगरसेवक उमपा | उल्हासनगर-५ मधील सेक्शन ३५ मध्ये बॅरेक क्रमांक २०९६, रुम नं.१० जवळील चौकास नामकरण करणेबाबत. | **"श्रीमती मिरा नारायणदास वनवारी चौक"** | २१/०२/२०१८ | मंजुर |
| 5 | | श्री.राजू (जीवन)इदनानी नगरसेवक | १) शहरातील नाना-नानी पार्क ला नाव देणे २) उल्हासनगर-२ केंब्रिज शोरुम समोरील रस्त्यापासून बालाजी चौकापर्यंतच्या रस्त्यास ३) उल्हासनगर-१ येथील इंदीरा गांधी गार्डनचे नाव बदलून त्यास नाव देणे ४) रोटरी क्लब मिडटाऊन ला नाव देणे. ५)उल्हासनगर २ येथील नाना नानी पार्क ला वरिष्ठ पत्रकार स्व.अशोक उकाराम बोधा यांचे नाव देणेबाबत विविध लोकप्रतिनिधींचे पत्र...६)उल्हासनगर-२ मधील नाना नानी उद्यानाचे नामकरण करणे. ७)वरीष्ठ पत्रकार स्व.श्री. अशोक उकाराम बोधा की याद मे नाना नानी पार्क चे नाव पत्रकार दादा श्री.अशोक बोधा नाना नानी पार्क करणेबाबत.. | **१) "स्वर्गीय अशोक उकाराम बोधाजी" २) "वरिष्ठ पत्रकार स्व.अशोक उकाराम बोधा" ३) "स्व.श्री.अशोक बोधा नानी पार्क" ४)"वरिष्ठ पत्रकार स्व.अशोक उकाराम बोधा पार्क" ५)"स्वर्गीय पत्रकार श्री.दादा अशोक उकाराम बोधा उद्यान" ६)"दादा अशोक बोधा" ६)पत्रकार दादा श्री.अशोक बोधा नाना नानी पार्क** | १३/४/२०१८ | मंजुर |
| | | श्री. धनंजय बाबुराव बोडारे विरोधी पक्षनेता, उमपा | | | २९/१/२०१९ | |
| | | श्री.हरेश अशोक बोधा भारतीय जनता पाटी उपाध्यक्ष | | | ११/४/२०१८ | |
| | | १)श्री. किशोर वनवारी, वि.पक्ष नेता | | | ६/१/२०२१ | |
| | | २) श्री. हरेश अ. बोधा | | | ६/१/२०२१ | |
| | | ३) श्री.कुमार आयलानी, आमदार | | | ७/१/२०२१ | |
| | | ४)श्री.भारत राजवानी, नगरसेवक | | | २/१२/२०२० | |
| | | ५) श्री.जमनु पुरस्वानी, नगरसेवक | | | ६/१/२०२१ | |
| | | ६) श्री.सरोजनी टेकचंदानी नगरसेविका | | | ३/४/२०१९ | |
| | | ७) श्री. महेश पी. सुखरामानी, नगरसेवक | | | २३/११/२०२१ | |
| 6 | १८ | सौ.कविता सुधीर बागुल नगरसेविका, प्रभाग क्र. १८ उल्हासनगर महानगरपालिका | पॅनल क्र.१८ मधील नायडु यांच्या घरापासुन ते सेंटर पार्क हॉटेल समोरील रस्त्यास नामकरण करणेबाबत. | **१) "सुभेदार रामजी आंबेडकर मार्ग"** | १४/०५/२०१८ | मंजुर |
| 7 | १८ | सौ.कविता सुधीर बागुल नगरसेविका, प्रभाग क्र. १८ उमपा | डॉ.बाबासाहेब आंबडेकर चौकापासुन ते भरत नगर पुलापर्यंत नामकरण करणे. | **दादासाहेब गायकवाड मार्ग** | १४/०५/२०१८ | मंजुर |
| 8 | १८ | सौ.कविता सुधीर बागुल नगरसेविका, प्रभाग क्र. १८ उमपा | डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक ते ए.ब्लॉक ३०२ पर्यतंच्या रस्त्यास नामकरण करणे. | **"यशवंत (भैय्यासाहेब) आंबेडकर मार्ग"** | १४/०५/२०१८ | मंजुर |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 9 | १६ (सी) | श्रीम. कांचन अमर लुंड नगरसेविका | पॅनल क्र.१६ मध्ये सहयाद्री उद्यानास नामकरण करणेबाबत. | **"दादा गोंविदराम लुंड"** | १६/०१/२०१९ | मंजुर |
| 10 | १६ | मा.श्री.राजु (जीवन) चं. इदनानी<br>उप-महापौर | मधुबन हॉटेल चौकजवळ ते गोल मैदान या ठिकाणी चौकास नामकरण करणे. | **"जय झुलेलाल चौक"** | १/११/२०१८ | मंजुर |
| 11 | १६ | श्री. शंकर गो. लुंड, नगरसेवक<br>राजू (जीवन) चं.इदनानी उप-महापौर, उमपा<br>श्रीम.दिप्ती नवीन दुधाणी (सभापती) महसूल समिती उमपा | हिरापुरी चौक पासून मंजू अपार्टमेंटपर्यंतचा रस्त्यास नामकरण करणे. | **बच्चाराम रुपचंदानी मार्ग** | | मंजुर |
| 12 | ८ | श्रीम. ज्योती प्रशांत पाटील नगरसेविका | उल्हासनगर-३ मधील श्री. फकिरा यांचे घरापासून गौतम बुध्दनगर रोड नामकरण करणे | **श्री. मिरचुसिंग लबाना मार्ग** | १/६/२०१९ | मंजुर |
| 13 | | श्री.जमनु पुरस्वानी सभागृह नेता, उमपा | उल्हासनगर-१ येथील पॅनेल क्रमांक २ मधील क्राईम ऑफिसचे जवळ, बस स्टॉप उल्हासनगर-१ जवळअसलेल्या उदयानास नामकरण करणे. | **स्वातंत्र वीर सावरकर उदयान** | ५/२/२०२० | मंजुर |
| 14 | | १) श्रीम. अंजना अंकुश म्हस्के, नगरसेविका | १)कल्याण-अंबरनाथ रोड, शांतीनगर, रेमंड शोरुमच्या समोरील चौकाचे नामकरण करणे २)कल्याण-अंबरनाथ रोड, शांतीनगर, रेमंड शोरुमच्या समोरील चौकाचे नामकरण करणे३)कल्याण बदलापूर रोड शांतीनगर, उल्हासनगर-३ येथील रेमंड शोरुम समोरील चौकाचे नामकरण करणे ४)कल्याण बदलापूर रोड शांतीनगर, उल्हासनगर-३ येथील रेमंड शोरुम समोरील चौकाचे नामकरण करणे ५)कल्याण बदलापूर रोड शांतीनगर, उल्हासनगर-३ येथील रेमंड शोरुम समोरील चौकाचे नामकरण करणे ६)कल्याण बदलापूर रोड शांतीनगर, उल्हासनगर-३ येथील रेमंड शोरुम समोरील चौकाचे नामकरण करणे ७)कल्याण बदलापूर रोड शांतीनगर, उल्हासनगर-३ येथील रेमंड शोरुम समोरील चौकाचे नामकरण करणे ८)प्रभाग क्र.४ मधील शांतीनगर | **१)"श्री संत भगवान बाबा चौक"** | २६/०२/२०२०<br>१२/३/२०२० | मंजुर |
| | ४ अ | २) श्री. स्वप्निल नानासाहेब बागुल, नगरसेवक प्रभाग क्र.४ (अ) उमपा | | | १२/३/२०२० | |
| | ४ | ३) श्रीम. सुरेखा हनुमंत आव्हाड, नगरसेविका प्रभाग क्र.४ उमपा | | | | |
| | १० | ४) सौ. पुष्पाताई नानासाहेब बागुल नगरसेविका स्थायी समिती | | | १२/३/२०२० | |
| | ४ ड | ५) श्री. कलवंत सिंह सहोता (बिट्टु भाई) नगरसेवक प्रभाग क्र.४ (ड) उमपा | | | १२/३/२०२० | |
| | १० | ६) सौ. शुभांगी बेहनवाल नगरसेविका प्रभाग क्र.१० उमपा | | | १२/३/२०२० | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | ४ | श्री संत भगवान बाबा सेवा मंडळ | रेमन्ड शो रुम जवळ प्रवेशद्वार बांधण्यात येवून प्रवेशद्वाराचे नामकरण करणे | | १२/३/२०२० | |
| 15 | १० | श्रीम.शुभांगी बेहनवाल नगरसेविका | उल्हासनगर-३ मधील हिराघाट पंचशिलनगर येथील चौक | **डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक** | ५/३/२०२० | मंजुर |
| 16 | ९ | श्री. मनोज लासी, नगरसेवक | उल्हासनगर- २ मधील नेहरु चौक ते अमन चौक रोड वरील शामसुंदर मिठाईवाल्याचे समोरील चौक | **दादा जे.पी. वासवाणी चौक** | १६/०३/२०२० | मंजुर |
| 17 | १४ | श्री. अरुण आशान , नगरसेवक | पॅ.क्र. १४, मधील बॅ.नं. १२९० समोरील समाज मंदिरास कै. गंगुबाई संभाजी शिंदे असे नामकरण करणे. | **कै. गंगुबाई संभाजी शिंदे समाज मंदिर** | १८-०१-२०२१ | मंजुर |
| 18 | | १) श्री. अरुण आशान , नगरसेवक | रुख्मणी सोसायटी जवळ वाचनालय व फाऊंटन ला स्व.श्री. आसाराम लक्ष्मण सावंत यांचे नाम देणेबाबत. | **स्व.श्री. आसाराम लक्ष्मण सावंत** | २१/०१/२०२१ | मंजुर |
| 19 | ९ | श्री. मनोज लास्सी, नगरसेवक | उल्हासनगर ३ पॅनल क्र. ९ मधील कल्याण अंबरनाथ रोड, तिलसन हॉटेल समोर, सेक्शन १७ च्या जवळील चौकास सिंधू नरेश महाराजा दाहेर सेन चौक हे नाव देणेबाबत | **सिंधू नरेश महाराजा दाहेर सेन चौक** | १०/३/२०२१ | मंजुर |
| 20 | १९ | श्री. किशोर वनवारी, विरोधी पक्ष नेता | पॅनल क्र. १९ मधील चालिया मंदिर, लोकमान्य पुतळा ते जुना बस स्टॉप पर्यंत, उल्हासनगर ५ या मार्गाला जय झुलेलाल मार्ग असे नामकरण होण्याबाबत | **जय झुलेलाल मार्ग** | १०/३/२०२१ | मंजुर |
| 21 | १७ | श्री.भारत रामचंद राजवानी (गंगोत्री), नगरसेवक | ७) प्रभाग क.17 मधील ब्लॉक नं.सी.11, रूम नं.62 ते सी.15, रूम नं.92 "महाराज किशनचद भगवानदास शर्मा (नगर)" असे नामकरण करण्या बाबत. | **"महाराज किशनचद भगवानदास शर्मा (नगर)"** | १७/०३/२०२१ | मंजुर |
| 22 | ९ | श्री. मनोज लासी, नगरसेवक | उल्हासनगर- ३ मधील मोबाईल बाजार सेक्शन- | **भाई साहेब मेहेरबान सिंगजी** | १०/३/२०२१ | मंजुर |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | १४ टेकडी येथील चौकास नामकरण करणे | **चौक** | | |
| 23 | ११ | श्री. रवि जग्यासी, नगरसेवक | पॅनल ११ मधील हिराघाटचे बाजुला रोटरी गार्डन सेक्श◌ान १७ या गार्डन चे नामकरण | **भाईसाहेब महरवानसिंग उद्यान** | १७/०३/२०२१ | **मंजुर** |
| 24 | १२ | श्री. गजानन प्रल्हाद शेळके, नगरसेवक | ३) सेंट जोसेफ शाळेसमोर ओटी सेक्शन, उल्हासनगर ३ येथील चौकास नामकरण | **दत्तु नागों म्हात्रे चौक** | १५/०३/२०२१ | **मंजुर** |
| 25 | | १ ) श्री. कांचन लुंड, नगरसेविका २)श्री. सचिन इ. साठे, संघटक सचिव ३) श्री. प्रकाश सुभाष खंडागळे, विभाग अध्यक्ष | उल्हासनगर-५ येथील सह्याद्रीनगर पोलिस स्टेशनच्या समोर व चॉकलेट कारखान्याच्या बाजूला असलेल्या चौकाचे नामकरण | **आद्य क्रांती गुरू लहुजी वस्ताद साळवे चौक** | १५/०३/२०२१ व १५/०३/२०२१ | **मंजुर** |
| 26 | १३ | श्री. रमेश म. चव्हाण, नगरसेवक | उल्हासनगर ४ मधील पॅनल १३ येथील संभाजी चौक ते दहाचाळ व्हाया जयभिम चौक येथिल डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे नाव देणेबाबत | **डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक** | | **मंजुर** |
| 27 | १४ | श्रीम. लिलाबाई आशान, महापौर | प्रभाग क्र.१४ मधील गणपती मंदिराजवळ, बॅ.न. १३२२, च्या समोरील चौकाला स्वर्गीय जेष्ठ नगरसेवक कै.सुनिल मुकुंद सुर्वे यांचे नाव देणेबाबत | **स्वर्गीय जेष्ठ नगरसेवक कै.सुनिल मुकुंद सुर्वे चौक** | | **मंजुर** |
| | | श्री. चंद्रशेखर यादव, नगरसेवक | | | २२/१०/२०२१ | |
| | | सौ. मिताली राजेश चान्पुर, नगरसेविका | | | २२/१०/२०२१ | |
| | | सौ. जयश्री सुनिल सुर्वे | | | १८/१०/२०२१ | |
| | | श्री. अरुण आशान , नगरसेवक | | | | |
| 28 | | सौ. राजश्री राजेंद्र चौधरी, नगरसेविका | शांतीनगर शिवसेना शाखेसमोरील समाजमंदिरातील सभागृहास कै.ॲड. संभाजी मारुती पाटील असे नामकरणे करणेबाबत. | **कै.ॲड. संभाजी मारुती पाटील सभागृह** | १८/१०/२०२१ | **मंजुर** |

**महासभा ठराव क्र: २१** **दिनांक : ०२/१२/२०२१**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. दिपक सिरवानी, श्री. कलवंतसिंह सोहता

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्या प्रमाणे उल्हासनगर शहरातील विविध रस्त्यांना व चौकांना नामकरण करणे करीता तदर्थ समितीने मंजुर केलेल्या ६२ प्रस्तावांची यादीना मान्यता देत आहे.

**तसेच**

प्रशासनाने एका साईजचेच बोर्ड नामकरणाच्या ठिकाणी फलक लावावेत आणि कुठलाही मोठा किंवा कमी जास्त होणार नाही याची प्रशासनाने दखल घ्यावी व आधी रस्त्यांना जी नावे दिली आहेत, ते सर्व तपासून प्रशासनाने नंतरच नावे दयावीत.

या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :-** विषय क्र. १२ वाचून दाखवितात.

———————————————————————————————————————

⇨विषय क्र. १२ :- **प्रस्तावाचीसूचना**

**उल्हासनगर महानगरपालिका मार्फत किंवा शासनामार्फत प्राप्त झालेले निधी वाटपाद्वारे देण्यात येणा-या ठेका अंतर्गत ज्या ठिकाणी विकास कामे सुरु करण्यात येतील. त्या ठिकाणी प्रथमदर्शनी ठेकेदाराने नाव, कंपनीचे नाव, मुळ रक्कम, कामाचे स्वरुप, कालावधी व महापालिका तक्रार निर्वारण क्रमांक इ. तपशिल असलेले फलक लावणे करिता महासभेत ठराव मंजुर करणेकामी पालिका सदस्या सुचक श्रीम. अंजली साळवे आणि अनुमोदक श्री.शेरी लुड यांचा प्रस्ताव विचारात घेणे.**

———————————————————————————————————————

**महापालिका सचिव:-** विषय वाचला आहे फलक लावयाला सांगितला आहे. ठेकेदारांचे नाव त्यात जे पण विकास काम होतात याविषयी बोला.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** मा. महापौरजी, पहिले पी.डब्यु.डी. विभाग सांगतील. या आधी किती नियमांचा त्यांनी पाठपुरावा केला आहे. कुठे रोड पास झाले कुठे बोर्ड लावतात. किती प्रावधान आहे.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी:-** २०१७ मध्ये जमनुजी

**महापालिका सचिव:-** मॅडम आधी आपण सुचक आहात, आपण बोलायला पाहीजे. नंतर सदस्यांनी बोलावे.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:-** ज्यांचे सुचना आहेत ज्यांचे ठराव आहेत त्यांना तर बोलू दया ना.

**महापालिका सचिव:-** तेच सांगत आहे.

**सदस्या, श्रीमती अंजली साळवे:-** मा. महापौर मॅडम मा. उपमहापौरजी, मा. आयुक्त साहेब, आपण जे काम उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत किंवा शासनामार्फत प्राप्त झालेले निधी

**महापालिका सचिव:-** आवाज येत नाही मॅडम जरा माईक वर करा.

**सदस्या, श्रीमती अंजली साळवे:-** या अंतर्गत जी विकासकाम सुरु करतो त्या ठिकाणी प्रथमदर्शनी ठेकेदाराचे नाव कायम, कंपनीचे नाव,...

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:-** ऐकायला येत नाही. जरा शांततेने घ्या ना. तुम्ही आवाज करीत आहेत, त्यामुळे ऐकायला येत नाही.

**सदस्या, श्रीमती अंजली साळवे:-** महापालिकेत तक्रार निवारण कक्ष फलक लावण्यात यावे कारण अनेकदा निदर्शनास आले आहे की, ठेकेदार काम सुरु करतो आणि काम थांबवून निघुन जातो. आणि लोकांमध्ये त्याबददल खुप गैरसमज पसरतात. दलित वस्तीच्या कामाचे सुध्दा अनेकदा असेच झालेले आहे. म्हणुन या प्रस्तावाचा विचार करण्यात यावा. कोणत्याही कामाला हे फलक लावणे गरजेचे आहे हि विनंती आहे.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:-** मा. महापौरजी, साळवे मॅडमने जो विषय आणलेला आहे. तर त्यामध्ये माझे एक म्हणणे आहे. कमीत कमी १ करोडच्या कामाचे फलक लावले पाहिजेत. आमच्याकडे ३ लाखाचे, ५ लाखाचे, ७ लाखाचे काम पास होतात. यात कोणताही फलक लावणे ठिक नाही. कमीत कमी १ करोडचा निधी असेल किंवा विशेष निधी असेल जसे गलिच्छ वस्तीचा निधी किंवा आमदार निधी किंवा खासदार निधी येतो. त्यासाठी फलक लावणे जरुरीचे आहे. लोकांना माहित पडेल की आमदारने निधी दिलेला आहे, खासदारने निधी दिलेला आहे. जर महानगरपालिकेचा निधी आहे. तर १ करोडच्या वरती लागला पाहिजे.

**सदस्या, श्रीमती अंजली साळवे:-** मा. महापौर मॅडम कमीत कमी १० लाखाचे कामांना फलक लावण्यात यावे अशी माझी मागणी आहे.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** मा. महापौरजी आमची बहिण अंजली साळवे यांनी जो प्रस्ताव आणलेला आहे. चांगला प्रस्ताव आहे. फलक लावले पाहिजे. परंतु केवळ एकच नियम नाही आहे. पी.डब्ल्यु.डी.चे असे खुप नियम आहेत. ज्याचे वेळोवेळी आम्हांला पालन करणे जरुरीचे आहे. याकामाची राशी किती आहे. कोणत्या नगरसेवक निधीतुन होत आहे. याची कालावधी किती आहे. कधी कधी कालावधीत काम पुर्ण होत नाही कारण की त्या ठेकेदाराला रक्कम नाही मिळत. तर फलकावर हे पण लिहिले पाहिजे की, लेखा अधिकारी यांनी हे काम झाल्यावर ३० दिवसाच्या आत रक्कम पण दिली पाहिजे. केवळ एकतर्फी अशी कारवाई करणार तर पी.डब्ल्यु.डी.चे असे खुप नियम आहेत. ट्रॉफिकचे नियम लावले जातात. जर याप्रकारे महासभेत नियम लावले गेले तर कोणत्याही ठेकेदाराला काम करणे मुश्कील होईल. तसे पण आज आम्ही जे बघत आहोत. महानगरपालिकेच्या आता एका रोडचे निर्माण होत आहे. शांतीप्रकाश आश्रमपासून दुर्गानगर पर्यंत मी पी.डब्ल्यु.डी.चे लक्षात आणून देवु इच्छितो की, तेथे दुय्यम दर्जाचे नागरीकांचे सोबत व्यवहार होत आहे. केवळ शांतीप्रकाश आश्रमपासून शांतीप्रकाश स्कुलपर्यंतच तोडण्याची मार्किंग दिलेली आहे. आणि ते तोडण्याचे काम चालू आहे. परंतु काम पास झाले आहे शांतीप्रकाश आश्रमपासून दुर्गानगर पर्यंत. दुर्गानगर येथे १७ रोड आहेत. आणि खुप रहिवाशांचे नुकसान होणार आहे. म्हणुन तिथे निशाण नाही लावले आहेत. जर आपण हे नियम पाहिजे असतील तर सर्वांसाठी समान असले पाहीजेत. आणि मी शहर अभियंता आहेत कि नाही मला दिसत नाही. शहर अभियंता यांना मी निवेदन करतो की, जर लोक सुचवत आहेत तर आपण दुर्गानगर पर्यंत जितके पण घर जातील सर्वांचे एकसाथ तोडणे सुरु करा. विकासासाठी आम्ही कधीच विरोध करणार नाहीत. विकास झाला पाहिजे. शहरात मोठे रोड झाले पाहिजे. आणि त्यात १०० टक्के दुकाने जात आहेत त्यांना विकल्प जागा पण दिली पाहिजे. भारतीय जनता पार्टी त्या नियमाची आहे. आपण दुर्गानगरपर्यंत जे पण निशाण दिले आहे. त्याचे कारण सांगा.

**<u>शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-</u>** मा. सदस्यजी आम्ही नगररचना विभागाला पत्र पाठविले आहे. मार्किंग करण्याचे नगररचना विभागाचे आहे.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी</u>** :- नगररचना साहेब जर येथे असतील तर कृपया आपण सांगा. आपण त्या तुकडयालाच का दिले पुर्ण रोडला का नाही दिले. रोडची जी लांबी आहे त्याला का मार्किंग दिले नाही. कारण सांगा.

**<u>सदस्या, श्रीमती अंजली साळवे:-</u>** मा. आयुक्त साहेब तुम्हांला माहित आहे की दलित वस्तीच्या कामात किती गोंधळ झालेला आहे. दोन ठिकाणाचे काम सुरु करुन निधी पास करुन सगळ पास करुन पण रस्त्याची कामे झालेली नाहीत. त्याच्याबददल वादविवाद चालू आहेत. तरी आपण या कामाकडे लक्ष दयावे व त्यावर निर्णय घ्यावा.

या वेळी सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी हे सभागृहाच्या बाहेर गेले. 

**<u>सदस्य, श्री. सुरेंद्र सावंत:-</u>** मा. अध्यक्ष, मा. महापौर आणि आयुक्त साहेब आपल्याकडून विषयांतर होत आहे. आपला विषय रस्त्याचे नामकरणाचा आहे आणि तुम्ही कोणता विषय लावला आहे.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-</u>** विषयांतर होत नाही आहे.

**<u>सदस्य, श्री. अरुण आशान</u>** :- आपण जो म्हणताय तो रस्ता आजच्या विषयात पण नाही.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-</u>** जर तिथे कोणत्या समाजावर अत्याचार होत असेल तर आम्ही येथे उभे कशाला आहोत.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>** मा. महापौरजी, मा.आयुक्त साहेब, जेव्हा कोणता रोड बनतो. तेव्हा कुठे ६० फुट कुठे ४० कुठे ३० अस तर बनणार नाही. पुर्ण रोड डिपी.च्या जेवढी पण आपण कटींग देणार आहेत त्या हिशोबाने बनला पाहिजे. कोणाबरोबर न्याय आणि कोणाबरोबर अन्याय नाही झाला पाहिजे. तर मी आयुक्तांना निवेदन करतो की, आयुक्त साहेब जेव्हा कोणत्या रोडची मान्यता मिळते व वर्क ऑर्डन मिळते. तो रोड डीपी. प्लॅनप्रमाणे बनला पाहिजे. आणि जर सर्व सदस्यांची मागणी आहे की, १० फुट किंवा २० फुट कमी करावे तर सर्वांचे कमी करावे असे नाही की, एका ठिकाणी १० बाकी ठिकाणी ४० आणि बाकी जागेवर ३० याचा पण खुलासा करा. ती प्रदिप रामचंदानी यांची मागणी आहे एका विषयासाठी किंवा एका व्यक्तीसाठी नाही आहे. शहरातील सर्व रोडसाठी आहे.

**<u>नगररचनाकार, श्री. प्रकाश मुळे:-</u>** मा. सदस्यांनी ज्या भावना व्यक्त केल्या त्याच्याशी मी सहमत आहे.

**<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:-</u>** एक एक करुन बोलले तर बर होईल.

**<u>नगररचनाकार, श्री. प्रकाश मुळे:-</u>** मा. सदस्यांनी जे सांगितले आहे ते मी लिहून घेतले आहे. माझ्या सर्व कनिष्ठ अभियंते यांनी तेथे जावून मार्किंग दिले आहे. जर तिथे काही अडचण असेल तर मी स्वत: प्रत्यक्ष भेट देवून आपल्या अडचणी सोडविण्याचा प्रयत्न करेन.

**<u>सदस्य, श्री. मनोज सयानी:-</u>** अडचणी असतील म्हणजे काय तेथे नोटीस दिलेली आहे. आज परत एक अंतिम नोटीस दिलेली आहे. ७ दिवसाच्या आंत ते जे २६ दुकाने आहेत ती तोडायची आहेत म्हणजे महानगरपालिका तोडणार आणि आपल्याकडून पैसे घेतील. तिकडे दुर्गानगरमध्ये कोणालाच मार्किंग दिलेली नाही आहे. पहिली नोटीस नाही. कोणतीही अंतिम नोटीस नाही. तर हे र्दुव्यवहार होत आहे. व्यापाऱ्यांना त्रास दिला जात आहे. २६ दुकानांना आपण अंतिम नोटीस देत आहेत. आणि दुर्गानगरमध्ये कमीतकमी १४० घरे आहेत त्यांना कोणतीच नोटीस नाही. कोणतेच मार्किंग नाही.

**<u>सदस्य, श्री. प्रदीप रामचंदानी:-</u>** आहे तिथे समाज समाजामध्ये भेद होउ शकत नाही.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-** विकासाच्या बाबतीत आमचा कोणताच हस्तक्षेप नाही. परंतु आयुक्त साहेब त्यामध्ये कोणताही पक्षपात नसला पाहिजे. एकीकडे २६ दुकानांना आज अंतिम नोटीस दिलेली आहे. आणि दुर्गानगरला १४० घरांना अजुनपर्यंत कोणतीच नोटीस नाही. कोणतेच मार्किंग नाही. ५ नंबरमध्ये.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** माझी तर हरकत आहे, ५ नंबरमध्ये शांतीप्रकाश आश्रमपासुन दुर्गानगर पर्यंत आहे आणि दुसरी चुक अशी आहे जसे मॅडमने सांगितले कोणता निधी आहे महानगरपालिकेचा आहे परंतु समाचारमध्ये सांगितले जाते की, श्रीकांत शिंदे जे खासदार आहेत त्यांचा निधी आहे. याची पण स्पष्टता झाली पाहिजे. मॅडमने जो आज त्यांनी जो प्रस्ताव आणला मी त्याचा स्वागत करतो. आणि अशा रोडवर फलक लावले पाहिजेत. धन्यवाद.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-** जोपर्यंत रोड तोडणे जेथे पुर्ण कापणे एकसाथ चालू होत नाही. कृपया कोणाला दबाव देवुन, त्यांना नोटीस देवून, त्यांना धमकी देवून त्यांच्यावरील अन्याय सहन करणे त्याला थांबवले पाहिजे.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** जोपर्यंत थांबवता येईल तोपर्यंत थांबवा. सर्वांचे एकसाथ तुटणार. कोणाचा आता तुटणार कोणाचा उदया तुटणार असे झाले नाही पाहिजे.

या वेळी सदस्य, श्री. धनंजय बोडारे हे सभागृहाच्या बाहेर गेले.

**नगररचनाकार, श्री. प्रकाश मुळे:-** आपण बोलत आहात तो अंमलबजावणीचा विषय आहे. ते माझे काम नाही, मी मार्किंग बरोबर देणार आहे आणि अंमलबजावणीचे काम माझे नाही.

**सदस्य, श्री. शंकर लुंड:-** मार्किंग करा आणि ऐका.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:-** टीपी साहेबजी ऐका, शेरी ऐका, आपल्या आदेशाशिवाय तेथे कोणी गेले असेल का? मेहरबानी करुन याचे उत्तर दया.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी** :- दादा प्रभागातर्फे होत आहे.

**नगररचनाकार, श्री. प्रकाश मुळे:-** प्रभागातर्फे झाले आहे. माझ्या विभागाचा अधिकार जर गेला असेल तर मी जबाबदार असेल. दुसऱ्या विभागाची जबाबदारी मी नाही घेवू शकत.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:-** ऐका साहेब जायला तर पाहिजे अशा रोडवर टिपी यांनी जायला पाहिजे.

**नगररचनाकार, श्री. प्रकाश मुळे:-** माझ्या विभागाचा अधिकारी जर गेला असेल तर मी जबाबदार असेल. बाकी विभागाची जबाबदारी मी नाही घेवू शकत. माझ्या विभागाचा अधिकारी गेला असल्यास मी त्याची चौकशी करेन. आपण मला सांगा.

**सदस्य, श्री. शंकर लुंड:-** चौकशी करा. सर्वांना समान नोटीस मिळाली पाहिजे. आणि माझे असे म्हणणे आहे की कोणाचे पण दुकान पुर्ण जात असेल तर त्याच्या आधी आपले एक एक दिवस सोडून असले पाहिजे. रोड नंबर १९ पर्यंत रोडचा कब्जा आहे.

**नगररचनाकार, श्री. प्रकाश मुळे:-** आपल्या सुचनांची अंमलबजावणी मी करेन.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:-** रोडवर कब्जा आहे. वारंवार तक्रार करुन मट मंदिरपासून ते स्कुल नंबर १९ पर्यंत पुर्ण रोडवर कब्जा आहे. कोणत्याही अधिकाऱ्याला दिसत नाही. प्रभाग अधिकाऱ्याला दिसत नाही. तेथे जे काम करणारे आहेत त्यांना दिसत नाही. महानगरपालिकेचे अधिकारी काय करत आहेत. त्यांना पगार का दिला जातो. याचे उत्तर दया.

**सदस्य, श्री. शंकर लुंड:-** आयुक्त साहेब आपण प्रभाग अधिकारी कारणे दाखवा नोटीस दिली पाहिजे.

**सदस्य, श्री. सुरेंद्र सावंत:-** मा. महापौर मुख्य विषय आपला रस्त्याच्या नामकरणाचा आहे.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया**:- नामकरण पुर्ण झाले.

या वेळी सदस्य, श्री. धनंजय बोडारे व सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी यांनी पुन्हा सभागृहामध्ये प्रवेश केला.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी:-** सावंतजी हा विषय शहराचा आहे घरचा नाही.

**सदस्य, श्री. सुरेंद्र सावंत**:-महापौर आपला आपण बोर्डचा विषय ठेवला आहे ना कसा पुर्ण झाला.

या वेळी काही सदस्य एकत्रित बोलत असल्यामुळे कोण काय बोलत होते, ते स्पष्ट समजून आले नाही.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:-** महासभा चालवायची आहे का बंद करायची आहे तुम्हांला.

**सदस्य, श्री. सुरेंद्र सावंत**:- कुठलाही बोर्ड लावताना मराठी भाषेचा पुर्ण मान राखला गेला पाहिजे वरती मराठी आणि खाली दुसरी भाषा असेल ती लिहा. हिंदी, मराठी आणि खाली दुसरी भाषा असेल ती लिहा. परंतु मराठी भाषेचा पुर्ण मान बोर्डावरती मराठी भाषा लिहिली गेली पाहिजे. या शहराची प्रथा वेगळी आहे. वरती हिंदी लिहायची मग कुठलीतरी भाषा लिहायची आणि मग खाली मराठी लिहायची, ही प्रथा बंद करा आणि त्या मराठी भाषेचा मान राखला पाहिजे. असे मला वाटते.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव**:- रस्त्याच्या संदर्भात काही लोकांना नोटीस दिलेल्या आहेत काही लोकांना नोटीस दिलेल्या नाहीत असे म्हणणे आहे. मला वाटतय, प्रशासनाचे आयुक्त साहेब एक लक्षात ठेवा माझ्या प्रभागामध्ये एक रस्ता ४० फुटाचा आहे. मंजूर करण्यापुर्वी मी आयुक्तांना पत्र दिले हा रस्ता ४० फुटाचा आहे अशा प्रमाणे एस्टिमेट तयार करावे. प्रत्यक्षात रस्ता तयार झाला पण तो रस्ता ४० फुटाचा नाही आता तो रस्ता २० फुटाचाच करुन दिला आहे. २० फुट जागा अजून तोडलीच नाही. ज्यादिवशी एस्टिमेट मंजूर झाले त्याचदिवशी मी निदर्शनास आणून दिले होते. आणि मी आयुक्तांच्या पण निदर्शनास आणून दिले, शहर अभियंता यांच्या निदर्शनास आणून दिले आता तो रस्ता पुर्ण होण्याच्या पातळीवर आहे. मला वाटते तो रस्ता ४० फुटाचा झाल्याशिवाय त्या ठेकेदाराला बील अदा करण्यात येवू नये. अशी परिस्थिती जर असेल तर मला वाटतय प्रशासन कशापध्दतीने चालते ते समजत नाही.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया**:- मा. महापौरजी, ज्या वेळी आयुक्तजी जरा ऐका, ज्यावेळी कोणत्याही रोडची एस्टिमेट बनते आता हे एस्टिमेट बनले आहे शांतीप्रकाश दरबारपासून शांतीप्रकाश वृध्दाश्रम पर्यंत आता यात पुढचा जो रोड आहे जसे मेन रोड आहे. उल्हासनगर ५ चा त्याला जोडला गेला नाही. फक्त एकच तुकडयाला घेतले गेले आहे. ज्याचा काहीच फायदा होणार नाही. दुसरी गोष्ट यात सांगितले गेले आहे हा मलंग गडपर्यंत रोड जाईल. आणि मलंगगडावर लोकांना यायला जायला सुविधा होईल. किती लोक मलंग गड जातात. याच्यामागे काय हेतू आहे. ते सर्व समजत आहे. आता तिथे काय चालले आहे आयुक्त साहेब लक्ष दया मी आपल्यासाठी बोलत आहे. तेथे जी तोडफोड होणार आहे आतापासुनच एका नगरसेवकाने जाहिर केले आहे की, २४०० रुपयांत दोन मजले करण्याचे काम जर मला दिले तर काम होईल. नाहीतर मी आपले दुकान तोडणार. ही परिसिथती चालली आहे. हे महानगरपालिकेचे रोड आपण तोडण्यास जात आहेत. आपण रोड मोठे करण्यास जात आहेत. आणि न्यायालयीन प्रमाणे लोकांना ग्राउंड अधिक दोन बनवण्याचा अधिकार आहे त्यानंतरही

**सदस्य, श्री. सुरेंद्र सावंत:-** नगरसेवकाचे नाव घ्या.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर**:- राजेशजी आम्ही सर्व नगरसेवक आहोत. आपण नगरसेवकाचे नाव जाहीर करा.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया**:- विजू पाटील नगरसेवकाने तेथे जाहीर केले आहे. जर माझ्या लोकांना काम देणार तर आपले दुकान बनतील. नाहीतर ग्राउंड अधिक दोन आपल्याला दुकाने बनवून देणार नाही. हे दुकान

तोडणार. ही पॉलीसी या महानगरपालिकेने बनविली आहे. ज्यापण रोडमध्ये दुकान तुटेल ते ग्राउंड अधिक दोनचे बनेल. मग त्यासाठी २४०० दर कुठुन आला.

**सदस्या, श्रीम. मिना सोनेजी:-** आपण चुकीचे आरोप करीत आहेत.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:-** ही गोष्ट खरी आहे. मा. महापौर मा. उपमहापौर, मा. आयुक्त साहेब जे राजेश वधारीया बोलत आहेत ते खरे आहे. तिथे प्रत्येक व्यापारी त्यांना त्रासलेला आहे. आणि तेथे खुप मोठी दहशत पसरवली आहे. ती दहशत संपली पाहिजे.

**सदस्या, श्रीमती मीना सोनेजी:-** व्यापाऱ्यांनी इथपर्यंत आले पाहिजे ना.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:-** अरे दहशत आहे त्यांना. व्यापा-यांना पण दहशत आहे.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:-** एक एक करुन बोला. मला ऐकायला येत नाही.

**सदस्या, श्रीमती मीना सोनेजी:-** जर आम्ही नगरसेवकाचे नाव घेवून स्टेटमेंट घेत आहोत त्याचा आम्हांला आधार बनवा लागेल मग घ्यावे लागेल. ना कोणत्या न्युजमध्ये ही गोष्ट आहे. नाही कुठले लिखित स्वरुपात कोणत्या नगरसेवकाकडे आलेले आहे. आम्ही येथेच राहतो. फक्त बोलण्याच्या आधारे नाही होणार.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** मा. महापौरजी, एक सारखी कटींग झाली पाहीजे.

या वेळी काही सदस्य एकत्रित बोलत असल्यामुळे कोण काय बोलत होते, ते स्पष्ट समजून आले नाही.

**सदस्य, श्री. अरुण आशान:-** जमनुजी एक मिनीट मा. महापौर, मा. आयुक्त साहेब या सभागृहामध्ये कुठल्याही नगरसेवकाचे नाव घेवून जर का दहशतीचा विषय होत असेल तर ते पुरावे या सभागृहाला दयावे लागतील. पहिली गोष्ट तुम्ही कुठल्याही नगरसेवकाचा अपमान या सभागृहात करु शकत नाही. दुसरी गोष्ट ज्या ज्या व्यापाऱ्यांना त्रास आहे. सन्माननीय महापौरांनी सदर रस्त्याचे कामाचा मुहर्त केलेला आहे. आणि हे काम विधीवत पध्दतीने शासनाकडून निधी आल्यानंतर मा. आयुक्त साहेबांनी त्याच्यावर प्रक्रिया करुन हे टेंडर केलेले आहे. त्याचे उदघाटन महापौरांनी केलेले आहे. प्रश्न व्यापाऱ्यांचे असेल तर व्यापाऱ्यांचे शिष्टमंडळ महापालिकेमध्ये महापौरांच्यासमोर येईल. कुठल्याही नगरसेवकाचा अपमान या महासभेमध्ये कोणीच सहन करणार नाही.

**सदस्य, श्री. कलवंतसिंह सोहटा:-** राजेशजी आपण याचे पुरावा दया. आपण ज्या सदस्याचे नाव घेता त्याची माफी मागितली पाहिजे.

**सदस्य, श्री. अरुण आशान:-** त्याचा पुरावा या महापालिकेमध्ये सादर करावा.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** महापौरजी ही महासभा ओरडयावर चालते. आम्हांला पण ओरडायला येते.

**सदस्य, श्री. कलवंतसिंह सोहटा:-** जमनुजी ओरडण्याची गोष्ट करु नका. पुरावा दया, पुरावा.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** विषय काय आहे आणि चर्चा कुठे करीत आहेत, मी आयुक्तांना निवेदन करतो की, या विषयास इथेच थांबवा. रोडची कटींग होईल एकसारखी होईल किंवा वेगवेगळी होईल हे सांगा.

**सदस्य, श्री. कलवंतसिंह सोहटा:-** १५ दुकानदार आणि १४० घरांची

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:-** मा. महापौर, उप महापौर, आयुक्त साहेब सचिव मॅडम, सन्माननीय सर्व सदस्य जे आमचे अरुण आशान बोलत आहेत की जो आम्ही आरोप लावला तो....

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>** रोड तोडणे एकदाच होणार का वेगवेगळी होणार बस विषय एवढाच आहे. रोड जो तोडणार आहेत तो पुर्ण एकसारखा तुटला पाहिजे. याचा खुलासा आहे आणि आणखी कोणतीच गोष्ट नाही.

**<u>सदस्य, श्री. किशोर वनवारी:-</u>** तर आपल्या आरोप करण्यापुर्वी त्याचे पुरावे दयायला पाहीजे.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>** ओरडण्याने सभागृह चालत नाही.

**<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:-</u>** विषय बंद करा आयुक्त साहेब निवेदन देतील.

**<u>सदस्या, श्रीमती अंजली साळवे:-</u>** मा. महापौर मॅड…

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-</u>** सत्तापक्षाच्या लोकांनी सभा चालवण्यासाठी हळू बोलले पाहिजे. विरोधी पक्षाचे आवाज आपण का करत आहेत. सत्तापक्ष आपल्या महासभेत आणायचे आहे. आमचे काम आहे

**<u>सदस्या, श्रीमती मीना सोनेजी:-</u>** मा. महापौर मॅडम एक मिनीट बोलू दया. जर

**<u>सदस्य, श्री. कलवंतसिंह सोहता:-</u>** आपली नगरसेविका बोलत आहे प्रदिपजी आपण पण लक्ष दया आम्हांला शिकवू नका.

**<u>सदस्या, श्रीमती मीना सोनजी:-</u>** आमच्या पॅनलची जी अडचण आली आहे. कुणासोबतही हा अन्याय झालेली नाही. मा. जमनुजी आपण अपमान करत आहात मध्येच बोलू नका. महिलांचा आवाज दाबला जातो. एक मिनिट बोलू तर दया. जर हा रोड प्लॅनच्या हिशोबाने केला आहे तर तो सर्वासाठी झाला पाहिजे. जर ४० फुट आहे, ६० फुट आहे तर तो सर्वांसाठी झाला पाहिजे. तर ट्राफिक होणार नाही. विषय हाच आहे आणि मी सर्व सदस्यांना विनंती करते की, कोणावर ही राजकीय नावे घेवू नका. राजकीय नावे बदनाम करु नका, येथे सर्व एकसाथ आहेत. तर एकदुसऱ्यावर लांच्छन न लावता शहराचा विकास आणि कारण आता खुप कमी वेळ आहे आचार संहिता लागण्यास आणि जे बाकी काम थांबले आहेत त्यावर ही काम झाले पाहिजे. कोणत्याही नगरसेवकाचे नाव आपण घेतले तर त्यासाठी पहिले आधार बनवा. त्याला पुरावा जोडा. मौखिक कोणीच करु नका. धन्यवाद!

**<u>सदस्या, श्रीमती अंजली साळवे:-</u>** मा. महापौर मॅडम,पहीले मला बोलू दया.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>** मा. महापौर मॅडम

**<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:-</u>** जमनुजी, आयुक्त साहेब उत्तर देत आहेत बसा खाली.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>** उत्तर दया आयुक्त साहेब.

**<u>उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-</u>** बोलायला दयाल तर ते बोलतील, मॅडम, आयुक्त साहेब उत्तर देतात. जरा शांत बसा.

**<u>आयुक्त, डॉ. राजा दयानिधी:-</u>** मा. महापौर, सन्माननिय सदस्य…

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :-</u>** आयुक्त साहेब येथे निलंबित करा सर्व नगरसेवकांना. आवाज दाबायचा असेल तर बाहेर काढा सर्वांना. सर्व बाहेर निघून जातील. जेव्हा एस्टीमेट बनवतात तेव्हा त्याची लांबी व रुंदी लिहायला पाहीजे. ४० फुटाचा रस्ता आहे, ३० फुटाचा आहे. एका जागेवर कटींग होते, दुस-या जागेवर होत नाही. विरोधी पक्षाचे आवाज दाबायचे असेल तर आपण आदेश करा. सर्व बाहेर निघून जातील.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-</u>** सभागृहामध्ये दम देण्याची भाषा करु नका.

**<u>महापौर तथा पिठासिन अधिाकरी:-</u>** जमनु भैया, ऐका…

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:-</u>** आपण सभा चालवण्याच्या मनस्थितीत नाहीत, एक वर्षानंतर सभा चालू आहे.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>** ओरडले कोण?

या वेळी काही सदस्य एकत्रीत बोलत असल्यामुळे कोण काय बोलत होते ते स्पष्ट समजून आले नाही.

**<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:-</u>** जमनुजी आयुक्त साहेब उत्तर देत आहेत ना.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:-</u>** आपण प्रतिनिधी आहेत, प्रत्येकाने शिस्त पाळली पाहिजे प्रत्येकाने एकदा बोला. इथे काय जनसामान्य नागरीक तुमच्याकडे दोन दोन मिनीटांनी येत नाहीत. एकदाच काय ते बोला आज मी बघत आहे, महापौर महोदया, उप महापौरजी ऐका, एक महासभा संपली दुसरी महासभा चालू आहे. प्रशासनाकडून कोणाचेही उत्तर नाही फक्त आपसातच भांडत आहेत. तुम्हांला उत्तरे घ्यायची नाहीत फक्त प्रश्न मांडायचे आहेत आणि भांडायचे मी काहीतरी करतोय हे शहराला दाखवायचे. तुम्हांला जर खरोखच प्रामाणिकपणे उत्तरे पाहिजे आहेत तर तुम्ही शांतपणे मुददे मांडाल, आपण जे बोलले विजय पाटील ते चुकीचे आहे त्याला आधार काहीच नाही. हा विषय कधी आला. इथे फक्त अंजली साळवे मॅउमने मांडलेला विषय त्याठिकाणी रस्त्याची कामे चालू असतांना फलक लावले पाहीजेत. ४० फुट, ६० फुट हे सगळे प्रशासनाचे काम आहे. मंजूरी दिलेली आहे. स्थायी समितीने मंजूरी दिलेली आहे. तोडायचे की नाही तो त्यांचा प्रशन दोन माळे करायचे तीन माळे करायचे ती पध्दतच आहे कल्याण-अंबरनाथ रोड प्रत्येक ठिकाणी रोड तोडणे चालू आहे. कुठल्या नगरसेवकाचा प्रश्न याच ठिकाणी का? असे नको ते मुददे काढायचे आणि जे मुददे आहेत ते बाजुला ठेवायचे महासभा चार चार वेळा स्थगीत करायची त्यामधे तुम्हांला मजा वाटते.

**<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:-</u>** प्रत्येक सदस्याने एकाच वेळेस बोलायचे नाहीतर नाही. आणि मला विचारुनच बोलाचे.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:-</u>** महापौर महोदया एकदाच बोला आणि तुमची परवानगी घेऊन, किशोरजी आपण विरोधी पक्ष नेता होते आता राजेश आहेत हे सगळे बदलणार आहेत सभा तर तीच आहे शहरासाठी काम करा दाखवण्यासाठी नाही कृपया एकेकाला बोलू दया. परवानगी घ्या नंतर माईक बंद करा. आमचे असेल तर इथे सत्तापक्ष व्यवस्थित आहे. प्रदिपजी सत्तापक्ष विरोधी पक्ष करण्यासाठी आम्ही बसलो नाहीत. इथे सभागृहाचे कामकाज करण्यासाठी बसले आहेत. जे चुकीचे आहे त्याला थांबवायचे आहे.

**<u>सदस्य, श्री. शंकर लुंड:-</u>** हा विषय सुचक अंजली साळवेचा आहे आणि अनुमोदक मी आहे. पहिले अंजलीजी ला बोलू दया. तो विषय पुर्ण झालेला नाही.

**<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:-</u>** सर्व विषय झाले आहेत आता आयुक्त साहेब उत्तर देत आहेत.

**<u>उप महापौर, श्री. भगवान भालेराव :-</u>** आयुक्त साहेबांनी उत्तर दिल्यानंतर विषय संपेल.

**<u>आयुक्त, डॉ. राजा दयानिधी:-</u>** सन्माननीय पीठासीन अधिकारी महोदया, सर्व सदस्य महोदय, सर्व सन्माननिय सदस्य, मा. सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुददयांच्या आधारे मी सांगतो यामध्ये जेव्हा रोड रंदीकरणाचा विषय असतो. बाकीचा रोडचा एस्टिमेंट तयार करण्याचा असतो नगररचना विभाग आणि शहर अभियंता या दोघांनी त्याच्यामध्ये नियमानुसार त्यावरती कारवाई करावी आणि नियमाप्रमाणे करावे.

**<u>महापालिका सचिव:-</u>** आता एक मिनिट हा ठराव पास किंवा कसे.

**<u>सदस्य, श्री. शंकर लुंड:-</u>** आयुक्त साहेब आज इथे प्रभाग अधिकाऱ्यांला सुध्दा ...

**<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-</u>** डिफर, डिफर

**<u>महापालिका सचिव:-</u>** डिफर तर अमान्य बोला.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-</u>** मॅडम अमान्य अमान्य.

**<u>सदस्या, श्रीमती अंजली साळवे:-</u>** मा. महापौर मॅडम, २५ लाखाच्या वरची जी कामे आहेत त्याच्यासाठी बोर्ड लावण्यात यावा.

**<u>सदस्य, श्री. शंकर लुंड:-</u>** साळवी मॅडमला माझी पण सहमती आहे.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-</u>** अमान्य अमान्य.

**<u>सदस्या, श्रीमती अंजली साळवे:-</u>** २५ लाखाच्या वरची जी कामे आहेत त्याच्यासाठी बोर्ड लावण्यात यावा. अशी माझी मागणी आहे.

**<u>महापालिका सचिव:-</u>** अमान्य असे म्हटले जातय. सदरचा विषय अमान्य करण्यात येत आहे.

**<u>सदस्या, श्रीम. अंजली साळवे:-</u>** वोटींग घ्या.

**<u>महापालिका सचिव:-</u>** वोटींगसाठी चार लोकांनी मागणी केली पाहीजे मॅडम आपला विरोध म्हणून या विषयावर आणि मंजूर म्हणून ठरावावर लिहीले जाईल.

**<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>** सदरचा विषयाबाबत पुढीलप्रमाणे ठराव अमान्य करण्यात येत आहे 

---

☑ **विषय क्र. १२** -<u>प्रस्तावाची सुचना</u>-

उल्हासनगर महानगरपालिका मार्फत किंवा शासनामार्फत प्राप्त झालेले निधि वाटपाद्वारे देण्यात येणा-या ठेका अंतर्गत ज्या ठिकाणी विकास कामे सुरु करण्यात येतील त्या ठिकाणी प्रथमदर्शनी ठेकेदाराचे नाव, कंपनीचे नाव, मुळ रक्कम, कामाचे स्वरुप, कालावधी व महापालिका तक्रार निवारण क्रमांक इ. तपशिल असलेले फलक लावणेकरीता महासभेत ठराव मंजूर करणेकामी प्रस्तावाची सुचना.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिकेला हददीत विकास कामे करण्याकरीता कोटयावधी रुपयांचा विविध निधी केंद्रशासन, राज्यशासन, एमएमआरडी व महानगरपालिकेमार्फत हाती घेण्यात येतात. परंतु मागील काही वर्षात उल्हासनगर शहरात योग्य पध्दतीने विकास कामे होत नसुन त्यामध्ये भ्रष्टाचार झाल्याचे दिसून येते. त्यामुळे वारंवार नगरसेवक, स्थानिक स्वयंसेवक संघटना, नागरीकांकडून तक्रार करण्यात येते.याची दखल विविध वृत्तपत्रात देखील घेण्यात आल्यामुळे महानगरपालिकेची, आयुक्तांची व अधिकारी यांची प्रतिमेला काळबोट लागले जाते.तसेच यामुळे राज्यस्तरावर देखील त्याचा परिणाम दिसून येतो. असे होउ नये म्हणून यापुढे महापालिका मार्फत कोणतेही विकास कामे सुरु करावयाची असल्यास त्याअगोदर ज्या ठिकाणी विकास काम सुरु असेल त्याठिकाणी प्रथमदर्शनी ठेकेदाराचे नाव, कंपनीचे नाव, मुळ रक्कम, कामाचे स्वरुप, कालावधी व महानगरपालिका तक्रार निर्वारण क्रमांक इ. तपशिल असलेले फलक लावण्यात यावे. जेणेकरुन महानगरपालिकेची प्रतिमा सुधारावी व महानगरपालिका कारभार मध्ये पारदर्शकता येउन शहरातील नागरीकांचा विश्वास संपादन करता येईल यासंदर्भात तातडीने महासभेत ठराव मंजूर करण्यात येणेकामी हि प्रस्तावाची सुचना.

**महासभा ठराव क्र:२२** **दिनांक : ०२/१२/२०२१**

सुचकाचे नाव :— श्री.कलवंतसिंह सोहता

अनुमोदकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणेउल्हासनगर महानगरपालिका मार्फत किंवा शासनामार्फत प्राप्त झालेले निधि वाटपाद्वारे देण्यात येणा-या ठेका अंतर्गत ज्या ठिकाणी विकास कामे सुरु करण्यात येतील त्या ठिकाणी प्रथमदर्शनी ठेकेदाराचे नाव, कंपनीचे नाव, मुळ रक्कम, कामाचे स्वरुप, कालावधी व महापालिका तक्रार निवारण क्रमांक इ. तपशिल असलेले फलक लावणेचा प्रस्ताव अमान्य करण्यातदेत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

मंजूर

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :-** विषय क्र. १३ वाचून दाखवितात.

---

⇨ विषय क्र. १३ :- **प्रस्तावाचीसूचना**

**उल्हासनगर मधुन वाहनारी उल्हास व वालधुनी नदी यांच्यासाठी स्वच्छता अभियानाला सुरुवात करुन सदर अभियानाला "महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर" नदीस्वच्छता अभियान अस नाव देण्यात यावे आणि नदी किना- यावर बनविण्यात आलेल्या दोन्ही ट्रीटमेंट प्लॉटंस संयत्राला "महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर" जलस्वच्छता संयत्रक नामकरण करणे बाबत.**

---

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** कोणी आणला आहे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** हा कोणाचा विषय आहे?

**सदस्या, श्रीम. शुभांगी बेहनवाल:-** मा. महापौर, आयुक्त साहेब, उप महापौर, सचिव मॅडम आणि सन्मानिनय सभागृह, ज्या प्रमाणे....

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** आपले ठरले ना मागे घ्यायचा, अरुणराव त्या दिवशी आपले ठरले होते, विषय मागे घ्यायचा.

**<u>सदस्या, श्रीम. शुभांगी बेहनवाल:-</u>** मागे का घ्यायचा, आपण बाबासाहेबांनी जे कार्य केले आहे, ते त्यांच्या कार्यामध्ये ज्यांनी त्यांनी त्या वेळेस पिढयां पिढयाचा नाश करुन त्यांनी नविन पिढी तयार केली आहे. त्यांच्या नावाला आपण विरोध करु शकत नाही. महामानव म्हणून बाबासाहेबांना ओळखले जाते. त्यांना पुरस्कार देण्यात आलेला होता. तर मग आपण नदीच्या ट्रीटमेंट प्लॉटंला बाबासाहेबांचे नाव देण्यात यावे. त्याच प्रमाणे बाजूचा जो परिसर आहे, तो स्लम एरिया आहे. दलित वस्ती आहे आणि हे बाबासाहेबांचे अनुयावी आहेत. तर त्यांच्या नावाला त्यांचाही विरोध नसेल. आपण त्यांच्यामध्ये एक स्वच्छता अभियानही राबवू शकतो. त्यांचाही या नदीसाठी आपण सहभाग घेऊ शकतो. तर या ट्रीटमेंट प्लॉनला बाबासाहेबांचे नाव देण्यात यावे, ही विनंती.

**<u>उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-</u>** सन्माननिय महापौर आणि सभागृह, सन्माननिय सदस्य, शांतीनगरच्या नाल्यावर आपण जे बनवले आहे, बाबासाहेबांचे....

**<u>सदस्या, श्रीम. शुभांगी बेहनवाल:-</u>** उप महापौर साहेब, तो नाला नाही, ती नदी ओह. नाला आपण बनवलेला आहे तो. तर हे चुकीचे आहे.

**<u>उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-</u>** ठिक आहे, ती वालधूनी नदी आहे. त्या नदीमध्ये दुर्गंधी पसरलेली आहे. तिथे बनवलेले पंप स्टेशन बाबासाहेबांचे नाव, बाबासाहेबांची उंची हे बघता बाबासाहेबांचे नाव तिथे लावणे योग्य नाही. सभागृहाला माझी विनंती आहे की, दुसरी गोष्ट हा प्रोजेक्ट आपल्या महानगरपालिकेचा नाही आहे. हा प्रोजेक्ट केंद्रशासनाचा आहे, केंद्रशासनाचे काही नियम असतील, ते सगळे बघून मला वाटते बाबासाहेबांचे नाव देणे योग्य नाही. नाही तर समाजामध्ये उद्रेक होण्याची शक्यता आहे.मी रिपब्लिकन पक्षाचा अध्यक्ष व उप महापौर या नात्योने सभागृहाला विनंती करतो की, बाबासाहेबांचे इथे नाव देण्याचे अमान्य करण्यात यावे.

**<u>सदस्या, श्रीम. शुभांगी बेहनवाल:-</u>** आपण त्यांच्या शिक्षणामुळे या खुर्चीवर बसलो आहे, आपण त्यांच्या नावाला विरोध करीत आहेत, हे आपण समजून घ्यायला हवे. नदीचे प्रकल्प हे बाबासाहेबांनी केलेले होते. विविध प्रकल्प हे बाबासाहेबांनी राबवलेले होते. त्यांनी जुन्या परंपरा, रुढी नष्ट करुन नविन परंपरा, रुढी आणल्या आहेत. म्हणून त्यांच्या नावाला आपण विरोध करु शकत नाहीत आणि नदी स्वच्छता अभियान आहे. ट्रीटमेंटला आपण बाबासाहेबांचे नाव देत आहेत. नाल्याला नाही आणि तो नाला नसून ती नदी आहे. आपण समजून घ्यायला हवे.

**<u>सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:-</u>** महापौर साहेबा, उप महापौर साहेब आपण जो अमान्य करण्यात येत आहे, त्या पेक्षा आपण जे समजवत आहेत, ते चांगल्या प्रकारे समजावा. आपल्या एक सदस्या आहेत, त्या बाबासाहेबांच्या नावाचे नामकरण करायचे आहे आणि खरे तर ती नदी आहे. आज आपण नाही मानत पण मला वाटते बाबासाहेबांचे नाव दया, बाबासाहेबांचा अपमान होणार नाही, मी पण या प्रस्तावाशी सहमत आहे. आपली बहीण जर बोलत आहे, तर ते करुन टाका, त्यांना सांगा नंतर बघू जर नियमात बसत असेल तर आपण करु. परंतु आपण अमान्य करु नका त्यांनी विनंती केली आहे, त्यांना समजावा.

**<u>सदस्य, श्री. प्रमोद टाले:-</u>** मा. महापौरजी, हा जो विषय आला आहे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जगामध्ये एक सर्वात मोठे स्थान त्यांना आहे. अशाचे नाव कुठे दयावे आणि कुठे नाही दयावे, याचे तारतम्य असले पाहीजे आणि त्या कामाचे आपण बाबासाहेबांचे नाव वाढवत नसून आपण त्यांचे नाव कमी करीत आहे, असे मला वाटते आणि त्या दृष्टीकोनातून हा जो विषय आलेला आहे, हा विषय डा. बाबासाहेबांच्या कर्तुत्वाला शोभणारे नाही. त्यामुळे डॉ. बाबासाहेबांचे नाव न दिले तर चांगले होईल, धन्यवाद.

**<u>उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-</u>** मला वाटते असाच विषय परत दुस-या महासभेमध्ये आहे, विठठलवाडी स्टेशनला आणि उल्हासनग स्टेशनला मला वाटते वानखेडे साहेब तो विषय आपण मागे घ्यावे. कारण यामुळे आपण बाबासाहेबांची उंची मोजू शकत नाही. दयायची जर इच्छा असेल तर केंद्रशासनाने

दादरला बाबासाहेबांचे नाव देण्याचे मागितले आहे, मुंबई सेंटरला ते देण्यात यावे. पण इथल्या लेवलला देण्यात येऊ नये अशी माझी विनंती आहे.

**सदस्य, श्री. राजेश वानखेडे:-** तुम्हांला काय वाटते कुठल्या स्टेशनला नाव देण्यात येऊ नये जर संपुर्ण जिल्हायला नाव दिले तर काय हरकत आहे. तसे उत्तर प्रदेशात संपुर्ण जिल्हयाला नाव दिलेले आहे. मग तुम्ही ठाण्या जिल्याला नाव देवून टाका.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** आपण देणारे कोण?

**सदस्य, श्री. राजेश वानखेडे:-** तुम्ही सुचना करीत आहेत ना. आपण मागणी करणार तर होणार ना.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** ठिक आहे, आपण मागणी करा, पस्ताव नगररचना विभागाला पाठवा नगररचा विभाग करेल.

**सदस्य, श्री. राजेश वानखेडे:-** आपण मागणी करु.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** नाही, नाही, तो विषय येईल तेव्हा चर्चा करा, आता याच विषयावर बोला.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-** वालधूनी नदीला परमपुज्य डॉ. बाबासाहेबांचे नामकरण करण्यास जो विषय आला आहे, लोकांनी आपल्याला लोक प्रतीनिधी बनवल्या नंतर आपण संपुण शहराचे किंवा या महापालिकेचे मालक झालो असे नाही. आपण सर्वांनी अगोदरच्या वक्त्यांनी सांगितल्या प्रमाणे मा. परमपुज्य डॉ. बाबासहेब आंबेडकर यांची उंची फार मोठी आहे. कुठल्या वस्तुला, कुठल्या व्यक्तीच्या, कुठल्या चौकाला, कुठल्या रस्त्याला  नामकरण करण्या अगोदर इतर सदस्यांचा सला घेतला बरा असतो आणि सल्ला घेऊन दिले असते तर यामधून काही तरी आउट पुट निघाले असते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव वालधूनी नदीला नाला नाही नदी...

**सदस्या, श्रीम. शुभांगी बेहनवाल:-** नाला नाही, ट्रीटमेंट प्लॉनला नाव देण्यासाठी आहे. ते पाणी आपण शुध्द करणार आहोत, त्या घाणीला नाही देणार आहेत.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-** एवढया वर्षामध्ये कोणीच सुचविले नाही.

**सदस्या, श्रीम. शुभांगी बेहनवाल:-** आम्ही ट्रीटमेंट प्लॉनला नाव देत आहेत, आम्ही हा प्रस्ताव मागे घेणार नाही.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-** वालधूनी नदीची परिस्थिती बघितली तर...

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** महापौर मॅडम दोन दोन सदस्य बोलत आहेत,

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-** वालधूनी नदीची परिस्थिती फार खराब आहे, मेलेली जनावरे तिथे टाकले जातात, मेलेली माणसे तिथे टाकले जातात.

**सदस्या, श्रीम. शुभांगी बेहनवाल:-** मग तेच आपल्याला शुध्दीकरण करायचे आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-** आमच्या जन्मापासून बघत आलो आहे, आज पर्यंत शुध्दीकरण झालेले नाही.

**सदस्या, श्रीम. शुभांगी बेहनवाल:-** तेव्हा नाही झाले पण आता करु या. कारण तिथे राहणारे लोक हे दलित अनुयावी आहेत.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-** फक्त सांगतात, तीन वर्षात करतो, पण कोणीही शुध्द करु शकत नाही. परिस्थी खराब आहे, आलेल्या परिस्थितीला समोर जात असतांना माझी स्वत:ची एक वैयक्तीक इच्छा आहे की अशा

या दुर्गंध असलेल्या नदीला नाव देवू नये आणि जर दयायचाच असेल तर जर चांगली कुठली वास्तु असेल, त्याला नाव दया,आम्ही तुमच्या बरोबर आहेत, सर्व सभागृह बरोबर राहील,धन्यवाद.

**सदस्य, श्री. अरुण आशान:-** मा. महापौर, मा. उप महापौर, सर्व सदस्य, परमपुज्य आदरणीय डॉ. बाबासाहेब आंबेडकर डॉ. बाबासाहेबांच्या नावाच्या प्रती, छत्रपती शिवाजी महाराज असु दया किंवा या देशाच्या प्रती महामानव ज्यांनी या देशासा बलिदान दिले, ते कोणीही असू दया, आपली भावना व्यक्त करतांना एखादा सदस्य व्यक्त करीत असेल, तर ती भावना चुकीची नाही. परंतु महापालिकेचे काही नियम, महापालिकेची काही रचना, महापालिकेच्या बाबतीत झालेले काही कायदे, सन्माननिय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण पहीला विषय घेतला होता नामकरणाचा आणि जर का कुठल्याही ट्रीटमेंट प्लॉटला, कुठल्याही वास्तुला, कुठल्याही चौकाला, रस्त्याला, नाल्याला नावदयायचे असेल तर त्या करीता तदर्थ समिती आपण नेमलेली आहे. हा प्रस्ताव ज्या वेळेस आला तो प्रस्ताव खेरे म्हणटले तर प्रशासनाकडून तदर्थ समितीपुढे गेला पाहीजे. तिकडे त्याची चर्चा झाली पाहीजे होती. कारण तुम्ही नामकरण करा, कारण नामकरणासाटी प्रस्ताव आहे.सर्व सन्माननिय सदस्यांनी आता दादा सतरामदास यांनी पण काही नामकरण दिले आहेत, तर काही सदस्यांचे प्रलंबित आहेत. तर हा नामकरणाचा विषय तदर्थ समितीच्या माध्यमातून या पटलावर आणायला पाहीजे होता. चौधरी साहेबांनी सांगितले की बाबासाहेबांची उंची मोजता येणार नाही. उप महापौर साहेब आपण पण म्हणटलात तर एखादया चांगल्या वास्तुला नामकरण करायला पाहीजे. परंतु भावने अंतर्गत जर चांगली वास्तु होणारआहे, म्हणून त्या सदस्यांनी दिले आहे. ही प्रक्रिया या सभागृहामध्येच चुकीच्या पध्दतीने आलेली आहे. मला वाटते, जेव्हा प्रशासन हे विषय जेव्हा महासभेच्या पटलावर घेत असतात, त्या वेळेस त्यांनी कुठला विषय महासभेच्या पटलावर कुठल्या बाजूने महासभेत जायला पाहीजे. हा विषय त्या त्या पदाधिका-यांनी बघायला पाहीजे होता. कारण त्यांनी अशासकीय प्रस्तावाची सुचना जरी मांडली असेल, त्या सुचनेला तदर्थ समितीकडे पाठवणे आवश्यक होते असे माझे मत होते. कारण हा नामकरणाचा विषय आहे, बाकी आदरणीय महामानवाचा असेल त्यासाठी हे सभागृह सक्षम आहे. मला असे वाटते की, या प्रस्तावाबाबत सभागृहाने योग्य तो विचार करावा.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** सन्माननिय अरुणराव हा प्रस्ताव अशासकीय प्रस्ताव आलेला आहे, मा. महापौरांनी घ्यायचा का नाही हा त्यांनी पहीले ठरवायला पाहीजे होते. आणि तुम्ही आता तदर्थ समितीच्या माध्यमातून बोलत आहेत,हा चुकीचा विषय आहे. हा प्रस्ताव आपल्या महासभेपुढे जर अशासकीय प्रस्ताव येत असतील तर मला वाटते ते महापौरांनी भविष्य काळामध्ये घेऊ नये अशी माझी विनंती आहे.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** महापौर महोदया आमचे मित्रांनी असे मी काही बोलत नाही की, त्या ट्रीटमेंट प्लांटला बाबासाहेबांचे नाव दयायला पाहीजे. पण मला याची खंत वाटते की, एक महीला नगरसेविका आणि ती पण शिवसेनेची नगरसेविका आणि ती पण दलित नगरसेविका जे काही मुददा आणतात आणि त्याच पक्षाच्या महापौर असलेल्या असे या पटलावर जेव्हा चर्चेसाठी येत असतो, मला खंत वाटते शेवटी आपण प्रशासन व शासन चालवतो तरी कसे? जेव्हा आपले अरुण साहेब बोलतात की, सदस्यांनी असा प्रस्ताव तदर्थ समितीच्या माध्यमातून आणायला पहीजे हे मान्य आहे आणि तुम्ही महापौरांचे सुपुत्र आहेत, तुम्ही जेव्हा विषय पटलावर आणता तेव्हा आपण् लक्ष का देत नाहीत? असा विषय येणार आणि बाबासाहेबांचे नाव ट्रीटमेंट प्लॉटला देण्यात येणार तर समाजात उद्रेक होऊ शकतो याचा विचार तुम्हांला का आला नाही आणि आता सध्या दलित महीला ज्या शिवसेनेच्या नगरसेविका आहेत, त्यांच्या मनात किती दु:ख होतो की मी जो प्रस्ताव सगळयांच्या समोर आणला त्याचा नकार होतो आणि ही भावना जर बंद खोलीत तुम्ही लोकांनी जर समजून काढली असती, की हे असे होऊ शकत नाही. कारण हे नाव बाबासाहेबांचे देण्यात असे बरोबर नाही. आता त्यांचे मनही दुखवले आणि सत्तेतील लोक कसे शासन चालवतात हेही बघितले गेले. अरुणराव तुम्ही खुप चांगले बोलतता आणि बोलत रहावे आणि शेवटी तुम्ही जेव्हा असे बोलतात तेव्हा तुम्हांला असे पण वाटायला पाहीजे. जे तुम्ही केलेले आहे, त्याची चुक कदाचित आपली आहे का? याचे आपण आत्मपरिक्षण केले पाहीजे, धन्यवाद.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:-** आयुक्त महोदया नामकरणाचा विषय आणि अशासकीय प्रस्तावाच्या बाबतीत आला, महापौरांनी जाणूनबुजून या ठिकाणी ठेवला आहे. जर आपला प्रस्ताव असता तर विरोधीपक्षावाले बोलेले असते.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** जमनुजी आता यांना बोलू दया तुम्ही शांत रहा.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:-** आता अजिबात बालायचे नाही. शांत बसा.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** हे मला प्रदिप नावानी बोलले म्हणून बोलतो, साहेब माझे असे म्हणणे होते की, जेव्हा प्रस्ताव आला तेव्हा तुमचीच नगरसेविकाआहे त्यांची समजूत काढायची होती. हा विषय होता.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:-** त्याच वेळेस ठरले होते की, त्यांना हा अशासकीय प्रस्ताव होत म्हणून कळवा. परंतु या सभागृहामध्ये कळले पाहीजे की, असे अशासकीय प्रस्ताव येतात हे लोकांना कळले पाहीजे की, अशासकीय प्रस्ताव कोणते प्रकारचे असले पाहीजेत. आमच्या नगरसेविका नाराज होतील की काय ते नंतर त्यांना समजावून सांगू. पहीली गोष्ट आमची आणि तुमची ही झाली नाही पाहीजे आणि तुम्ही वारंवार करतात. ठिक आहे, तुम्ही ते करीत आहेत. परंतु हा अशासकीय प्रस्ताव होत नाही, कारण ते तदर्थ समितीपुढे आले पाहीजेत नामकरणाचे. अरुणजीने जसे सांगितले तशी चर्चाही झाली होती. परतु तो अशासकीय प्रस्ताव इथे आला आणि कळले पाहीजेत की, कोणते अशासकीय प्रस्ताव इथे यायला पाहीजे. चर्चा व्हावी. या उददेशाने ही चुक झाली आहे. इथून पुढे प्रत्येकाची चुक होणार नाही. आमच्याकडून चुक झालेली आहे आणि ती आम्ही सुधारलेली आहे. परत तुम्हांला त्रास होणार नाही. सचिव मॅडम जे अशा प्रकारचे अशासकीय प्रस्ताव होत नाही, त्यांना आपण डायरेक्ट उत्तर देवू शकतो. प्रत्येक आलेला अशासकीय प्रस्ताव घेतलाच पाहीजे. तो चुकीचा आहे, ही प्रथा बरोबर नाही. परस्पर आपण कळवले पाहीजे. अशासकीय आहे की नाही, याचे मार्गदर्शक प्रशासना मार्फत महापौरांना मला वाटते तुम्ही दयावे.

**महापालिका सचिव:-** मा. महापौर, उप महापौर, आयुक्त साहेब, सर्व सन्माननिय सदस्य, सर माझ्याकडे प्रस्ताव येतात पण मला थेट कोणालाही नकार देण्याचा अधिकार नाही. पण मी मा. महापौरांच्या निदर्शनात सर्व बाबी आणून देते. कोणते प्रस्ताव कोणते आहेत. पण घ्यायचा का नाही घ्यायचा हा त्यांचा अधिकार आहे आणि त्यानुसार सभा सुचनेवर आणतात कारण देऊन ते पटलावर निर्णय देऊ शकतात.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** हा विषय अमान्य करुन टाका.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** मी पहीला एक प्रश्न विचारतो, त्यांच्या नंतर मी बोलेल सचिव मॅडम अशासकीय प्रस्ताव जर कोणी दिले तर ते महासभेमध्ये यायला पाहीजे किंवा नाही आले पाहीजे. किती दिवसात यायला पाहीजेत.

**महापालिका सचिव:-** सर आपल्या नियमामध्ये लिहीले आहे की, प्रस्तावाची सुचना सदस्य देवू शकतात, ते घ्यायला पाहीजे किंवा नाही घ्यायला पाहीजेत ते महापौरांचे अधिकार आहेत आणि पुरक अजेंडा काढायचा असेल तर मिटींगच्या पहीले तीन दिवस आधी दयायला पाहीजे. मी अशासकीय प्रस्तावा विषयी बोलत आहे. प्रशासनाचे पस्ताव येतात ते मी मॅडमलला देत असते. आपण जे प्रस्ताव देतात ते पण मी मॅडमकडे ठेवत असते.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** परंतु जर अशासकीय प्रस्ताव कोणी दिला, तेव्हा महापौरांचा निर्णय व्हायला पाहीजे की, घ्यायचा आहे किंवा नाही घ्यायचा? तुमचे म्हणणे असे आहे की, कम्प्लसरी घ्यायचे आहेत का?

**महापालिका सचिव:-** नाही, नाही, नियम असा आहे की, जे पण सदस्य प्रस्तावाची सुचना दयायची असेल तर मॅडमला घ्यायचे आहेत.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>** कम्प्लसरी घ्यायचे आहेत का?

**<u>महापालिका सचिव:-</u>** कम्प्लसरी नाहीत, मॅडम विचार करतील घ्यायचा की नाही. दोन महीन्यामध्ये जर घेतला नाही तर तिस-या महीन्यामध्ये ¼ सदस्य देवू शकतात. परंतु आपल्या नियमामध्ये काहीच क्लीयर नाही की, कशा प्रकारचे प्रस्ताव घ्यायला पाहीजेत, कोणते नाही आले पाहीजेत, तर कोणते प्रस्ताव यायला पाहीजेत याबाबत मी भाष्य किंवा मत देऊ शकत नाही.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>** मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, उप महापौरजी, खुप चांगले क्लीयर केले आहे सचिव मॅडमने जे प्रस्ताव येत असतात ते मा. महापौरांनी निर्णय घ्यायचा आहे, ठेवायचा की नाही. परंतु कोणी पण सदस्य महापौरांच्या खुर्चीत आसनस्थ होतात, ते कोणत्याही पक्षाचा राहत नाही. उप महापौर असतील, स्थायी समिती सभापती असतील, सभागृह नेता असतील, विरोधी पक्ष नेता असतील, तर मी मा. महापौरांना निवेदन करतो की, जेव्हा कोणताही अशासकीय प्रस्ताव सत्ता पक्षाकडून, विरोधी पक्षाकडून येत असतो, तुम्हांला एक महीन्यामध्ये, दोन महीन्यामध्ये ठेवायला पाहीजे आणि जर तो घ्यायच्या लायकीचा नाही तर त्या सदस्यांना बोलावून त्यावर चर्चा करून परत घ्यायला सांगितले पाहीजे. माझे असे म्हणणे आहे की, जेव्हा एखादा सदस्य स्थायी समितीच्या पदावरुन डॉ. नाथानी यांनी राजीनामा दिला होता. तेव्हा आम्ही एक अशासकीय प्रस्ताव आणला होता की, एक सदस्याची नियुक्ती करण्यासाठी आपण महासभेमध्ये घेऊ या. एका सदस्याची नियुक्ती झाली पाहीजे. परंतु मला दु:खाने सांगावेसे वाटते की, आम्ही विरोधी पक्षामध्ये बसले आहेत आणि सहा महीन्यामध्ये प्रस्ताव आणला नाही आणि सहा महीन्या पर्यंत कोणताही सदस्य स्थायी समितीचा सदस्य बनला नाही आणि १५ सदस्यामध्ये स्थायी समिती सुरु राहीली. माझे हेच म्हणणे आहे आणि जसे प्रदिपजीने सांगितले की, आमच्या बहीणीने हा प्रस्ताव आणला आहे, डॉ. बाबासाहेब नामकरणाचा तर असे भरपुर सदस्य असतील, जे आपल्या मनामध्ये अशी भावना ठेवतात. त्यांचे प्रती त्यांचा आदर्श आहे, आदर आहे, त्यांचे नामकरण करण्यात यावे. त्यांना हे माहीती नसते की, छोटी गोष्ट असेल, मोठी गोष्ट असेल, त्यांना फक्त असे वाटते की, छोटासा एक समाज मंदिर त्याचे नाव पंतप्रधान, अटलजींचे नाव ठेवण्यासाठी प्रस्ताव आपल्या कार्यकर्त्याने आणला आहे. तर त्यामध्ये त्याची मनाची भावना आहे. माझ्या घराजवळ एक वास्तु आहे, त्याचे नामकरण झाले पाहीजे. श्री. राजेंद्र चौधरी यांनी प्रस्ताव आणला बोट क्लबला अटलबिहारी बोट क्लब नाव देणे, ही त्यांची भावना आहे. तर कोणालाही असे सांगू शकत नाही की, हा चुकीचा आणला आहे. परंतु जेव्हा यांनी आणला आहे आणि महापौरांच्या कार्यालयामध्ये बैठक होते, विषय घेण्यासाठी, अजेंडा काढण्यासाठी त्यावेळी त्यांना समजावून सांगितले पाहीजे की, हे नाव यायला नाही पाहीजे आणि तो काढून टाकला पाहीजे. कारण या सभागृहाध्ये जसे की, अरुणजीने सांगितले की, तो तदर्थ समितीचा पण आहे. त्यावेळी आणायलाच नव्हता पाहीजे. तर कोणाच्याही भावनेला ठेच न पोहचता, मी सर्व सदस्यांना सभागृहातर्फे मी त्यांना आश्वाशीत करतो की, त्यांनी कोणतेही चुकीचे काम केले नाही. आपल्या मनातील भावना प्रकट केली आहे. आपल्या वरिष्ठांनी यावर विचार विनिमय करुन काढून टाकायला पाहीजे होता. हा विषय अमान्य करीत आहे.

**<u>उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-</u>** सदरचा विषय अमान्य करण्यात येत आहे.

**<u>महापालिका सचिव:-</u>** विषय अमान्य आता ही पहीली सभा संपली आहे.

**<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>** सदरचा विषयाबाबत पुढीलप्रमाणे ठराव अमान्य करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. १३** -<u>प्रस्तावाची सुचना-</u>

उल्हासनगर मधुन वाहनारी उल्हास व वालधुनी नदी यांच्यासाठी स्वच्छता अभियानाला सुरुवात करुन सदर अभियानाला "महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर " नदी स्वच्छता अभियान अस नाव देण्यात यावे आणि नदी किना-यावरबनविण्यात आलेल्या दोन्ही ट्रीटमेंट प्लॉटंस संयत्राला "महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर " जलस्वच्छता संयत्रकनामकरण करणे बाबत.

**प्रस्तावना**

भारताच्या नदी व तळयांच्या बाबतीत स्वतंत्र भारतामध्ये सर्व प्रथम जर कोणी महामानवानी विचार करुन जर बांध आणि सरोवर बनविले असेल तर ते होते भारताचे पहिले जलदुत महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहेब यांनी केला

आहे. केंद्रीय नदी स्वच्छता नदी स्वच्छता मंत्रालयानी महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर साहेब यांचा आदर्श कायम डोळयासमोर ठेऊन देशातील सर्व नदया व तळे यांची स्वच्छता करुन त्यांना सुरक्षित केले पाहिजे.

महोदया, याच बरोबर माझे तर्क आहे की, स्वतंत्र काळापासून आपण बघत आलो आहोत की, नदीची सुरक्षा, नदी किणा-यावर राहणा-यांनी केली आहे.आज वालधुनी आणि उल्हास नदीच्या किणा-यावर राहणा-या रहिवाशी अधिक ते अधिक महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे अनुयायी आहे.त्यामुळे माझी ही मागणी आहे की, वालधुनी आणि उल्हास नदी यांची स्वच्छता अभियान सुरुवात करुन या अभियानाला महामानवडॉ.बाबासाहेब आंबेडकर नदी स्वच्छता अभियान नाव देऊन सर्व अनुयायी यांना कृतज्ञ करावे.

त्याबरोबरच उल्हासनगर शांतीनगरमध्ये वालधुनी नदी किणारे बनणा-या २ सीवेज ट्रीटमेंट प्लॉट वडोलगावमध्ये वालधुनी नदीवर बनणारे १ सीवेज ट्रीटमेंट प्लॉट आणि सेंचुरी रॅयान स्थित उल्हास नदीवर बनणारे इंडस्ट्रीयल ट्रीटमेंट प्लाट संयत्राला पण महामानव " डॉ. बाबासाहेब आंबेडकर जल स्वच्छता संयंत्र "असे नामकरण करुन स्वत:ला आणि आंबेडकर अनुयायींना कृतज्ञ करावे. येणा-या महासभेत निर्णय घेऊन ठराव करण्यात यावा, हि विनंती.

<u>महासभा ठराव क: २३</u> <u>दिनांक : ०२/१२/२०२१</u>

सुचकाचे नाव :– श्री. कलवंतसिंह सोहता

अनुमोदकाचे नाव :– श्री. किशोर वनवारी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणेउल्हासनगर मधुन वाहणारी उल्हास व वालधुनी नदी यांच्यासाठी स्वच्छता अभियानालासुरुवात करुन सदर अभियानाला " महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर " नदी स्वच्छता अभियान अस नाव देण्यात यावे आणि नदी किना-यावर बनविण्यात आलेल्या दोन्ही ट्रीटमेंट प्लॉटंस संयत्राला " महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर " जल स्वच्छता संयत्रक नामकरण अमान्य करण्यात येत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>आमान्य</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

सायंकाळी ४ .१४ वाजता महापौर श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# <u>उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर</u>

दिनांक:- १८-०२-२०२२

**<u>उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. १८-०२-२०२२ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.</u>**

**५**

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा गुरुवार, दिनांक २०/०१/२०२२ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेचे कामकाज स्थगीत केल्याने सदरची सभा शुक्रवार दिनांक १८/०२/२०२२ रोजी दुपारी ३.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील सभागृहात येथे मा. अवर सचिव, महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांचेकडील दिनांक ३ जानेवारी, २०२२ रोजीचे पत्रान्वये ऑनलाईन ॲपद्वारे सभा आयोजित केली आहे. सदर सभेत मा. श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होते व खालील दर्शविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान - महापौर
२. श्री. भगवान शंकर भालेराव - उप-महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती अर्चना गोकुळ करणकाळे | ३४ | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी |
| ४ | श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड | ३५ | श्री. सुमित सागर सोनकांबळे |
| ५ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ३६ | श्रीमती ज्योती शामराव माने |
| ६ | श्रीम. मिनाकौर अजितसिंग लबाना | ३७ | श्री. चंद्रशेखर केशव यादव |
| ७ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | ३८ | श्रीमती संगिता नितीन सपकाळे |
| ८ | श्रीमती आशा नाना बिराडे | ३९ | श्रीमती शीतल चंद्रकांत कदम |
| ९ | श्रीमती चरणजितकौर राजेंद्रसिंह भुल्लर | ४० | श्रीमती वसुधा धनंजय बोडारे |
| १० | श्री. राजेंद्रसिंह विरसिंग भुल्लर | ४१ | श्री. धनंजय बाबुराव बोडारे |
| ११ | श्री. स्वप्नील मिलींद बागुल | ४२ | श्रीमती दिप्ती नविन दुधानी |
| १२ | श्रीमती सुरेखा हनुमंत आव्हाड | ४३ | श्रीमती ज्योती रमेश चैनानी |
| १३ | श्रीमती अंजना अंकुश म्हस्के | ४४ | श्रीमती कांचन अमर लुंड |
| १४ | श्री.कलवंतसिंग गरुदेव सोहता | ४५ | श्री. शंकर गोविंदराम लुंड |
| १५ | श्री. राजू किशनचंद जग्यासी | ४६ | श्रीमती सुनिता बाबुराव बगाडे |
| १६ | श्रीमती मिना कुमार आयलानी | ४७ | श्री. भारत रामचंद राजवानी (गंगोत्री) |
| १७ | श्रीमती गीता लालचंद साधनानी | ४८ | श्री. सतरामदास पुतनदास जेसवानी |
| १८ | डॉ. प्रकाश घनश्यामदास नाथानी | ४९ | श्रीमती अंजली चंद्रकांत साळवे |
| १९ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | ५० | श्री. प्रमोद नामदेव टाले |
| २० | श्रीमती जया प्रकाश माखिजा | ५१ | श्रीमती कविता सुधिर बागुल |
| २१ | श्री. महेश पहिलराज सुखरामनी | ५२ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २२ | श्रीमती अपेक्षा भगवान भालेराव | ५३ | श्री. किशोर नारायणदास वनवारी |
| २३ | श्रीमती शुभांगीनी निकम | ५४ | श्रीमती मिना चंद्रगुप्त सोनेजी |
| २४ | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग | ५५ | श्री. विजय चाहू पाटील |
| २५ | श्री. राजेश नानिकराम वदारिया | ५६ | श्रीमती कविता सुरेश गायकवाड |
| २६ | श्रीमती दिपा नारायण पंजाबी | ५७ | श्री. आकाश परशुराम पाटील |
| २७ | श्री. राजेंद्र शांताराम चौधरी | ५८ | श्री. विकास परशुराम पाटील |
| २८ | श्री. रवी किशनचंद जग्यासी | ५९ | श्री. मनोज दिलीपकुमार सयानी |
| २९ | श्रीमती इंदिरा जमनादास उदासी | ६० | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |

| | | | |
|---|---|---|---|
| ३० | श्रीमती कविता लाल पंजाबी | ६१ | श्री. सुरेंद्र बाळकृष्ण सावंत |
| ३१ | श्री. जीवन चंद्रभान इदनानी | ६२ | श्री. अरुण लक्ष्मण आशान |
| ३२ | श्रीमती सविता प्रविण तोरणे (रगडे) | ६३ | श्रीमती आशा जीवन इदनानी |
| ३३ | श्री. गजानन प्रल्हाद शेळके | | |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते / होत्या.

१. श्री. मंगल बालकृष्ण वाघे, २. श्रीमती जयश्री ज्ञानेश्वर पाटील, ३. श्री. रविंद्र दशरथ बागुल, ४. श्रीमती सरोजिनी टेकचंदानी, ५. श्रीमती छाया सुजित चक्रवर्ती उर्फ अडसुळ, ६. श्रीमती ज्योती प्रशांत पाटील, ७. श्रीमती डिम्पल नरेंद्र ठाकुर (कुमारी), ८. श्रीमती पुष्पा नाना बागुल, ९. श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी, १०. श्रीमती शुभांगी मनोहर बेहनवाल, ११. श्रीमती ज्योती प्रकाश बठिजा, १२. श्रीमती ज्योत्स्ना सुरेश जाधव, १३. श्री. रमेश महादेव चव्हाण, १४. श्रीमती मिताली राजेश चान्पूर, १५. श्रीमती सुमन राजेश सचदेव, १६. श्रीमती मिनाक्षी रवी पाटील.

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.
१. आयुक्त, डॉ. राजा दयानिधी
२. डॉ. करुणा जुईकर, अतिरिक्त आयुक्त (सेवा), आयुक्तांच्या स्थानी आसनस्थ
३. श्री. जमिर लेंगरेकर, अतिरिक्त आयुक्त (शहर)
४. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, महापालिका सचिव
५. श्री. अशोक नाईकवाडे, उप आयुक्त (मुख्यालय)
६. डॉ. सुभाष जाधव, उप आयुक्त, सार्वजनिक आरोग्य विभाग
७. श्रीम. प्रियंका राजपूत, उप आयुक्त (कर)
८. श्री. प्रकाश मुळे, नगररचनाकार
९. श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखा अधिकारी
१०. डॉ. विजय खेडकर, मुख्य लेखा परिक्षक
११. श्री. सुर्यकांत खटके, लेखाधिकारी
१२. डॉ. दिपक पगारे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी
१३. श्री. के.जे. रहेजा, कार्यकारी अभियंता (पा.पु.वि.)
१४. श्री. मोहीते, शिक्षणाधिकारी, शिक्षण विभाग
१५. श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
१६. श्री. अजय एडके, सहा. आयुक्त
१७. श्री. महेंद्र पंजाबी, सहा.आयुक्त
१८. श्री. तुषार सोनवणे, सहा. आयुक्त
१९. श्री. हनुमंत खरात, उप अभियंता
२०. श्री. मनीष हिवरे, सहा. अरोग्य विभाग
२१. श्री. महेंद्र धिंडे, कनिष्ठ अभियंता
२२. श्री. अच्युत सासे, सहा. आयुक्त
२३. श्री. राजा बुलानी, विधी अधिकारी
२४. श्री. जेठाताराचंद, उप करनिर्धारक व संकलक
२५. श्री. विजय मंगलानी, विशेष कार्यकारी अधिकारी
२६. श्री. विशाल कदम, अधिक्षक
२७. श्री. विनोद केणे, मुख्य स्वच्छता निरीक्षक

२८. श्री. राजेश घनघाव, मालमत्ता व्यवस्थापक
२९. श्री. सोहम बोंबे, उप अग्निशमन अधिकारी
३०. श्री. दत्तात्रय जाधव, भांडार विभाग प्रमुख
३१. श्री. सचिन जाधव, वरिष्ठ लिपीक

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्रीमती नर्गीस खान, लिपीक
२. श्री. बाळू भांगरे, लिपीक
३. श्रीम विद्या आढळ, लिपीक
४. श्री. अंकुश कदम, महापौरांचे स्विय्य सहाय्यक

सायंकाळी ४. ३० वाजता सभेची सुरुवात करण्यात आली.

या वेळी अतिरिक्त आयुक्त, श्रीम. करुणा जुईकर आयुक्तांच्या स्थानी आसनस्थ होत्या.

महापालिका सचिव:— विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

———————————————————————————————————————

⇨ विषय क्र. १ :— प्रश्नोत्तरे

अ.क्र. ४३ पासून पुढचे प्रश्न घेण्यात येतील. (प्रलंबित प्रश्न क्र. ३४,३८,३९,४०,४२ प्रथम घेण्यात येईल.)

———————————————————————————————————————

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** रदद करा.

**महापालिका सचिव:-** रदद करता येणार नाही.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-** प्रश्नोत्तराचा तास वगळण्यात यावा.

**महापालिका सचिव:-** प्रश्नोत्तराचा तास वगळण्यात येत आहे.

---

**विषय क्र. १ :- प्रश्नोत्तराचा तास वगळण्याबाबत.**

**सुचकाचे नाव:- श्री. कलवंतसिंह सोहता**

**अनुमोदकाचे नाव :- श्री. शंकर लुंड**

**महासभा ठराव क्र. ५७ अ** **दिनांक १८/०२/२०२२**

**ही महासभा आज दिनांक १८/०२/२०२२ रोजीच्या महासभेतील प्रश्नोत्तराचा काळ वगळण्यास मान्यता देत आहे.**

**सुचकाची सही/-**

**अनुमोदकाची सही /-**

**सर्वानुमते**

**महापौर/पीठासीन अधिकारी**
**सर्वसाधारण महासभा**
**उल्हासनगर महानगरपालिका**

---

**महापालिका सचिव:-** सभेपुढे दोन लक्षवेधी आलेल्या आहेत आणि प्रशासनाकडून दोन आयत्या वेळेचे विषय आले आहेत. सर्व प्रथम आयत्या वेळेचे विषय वाचत आहे.

**विषय क्र. १** कल्याण डोबिंवली महानगरपालिका हद्दीमध्ये प्रस्तावित क्लस्टर बेस्ड (Cluster Based) वेस्ट टू एनर्जी प्रकल्पामध्ये सहभागी होणेबाबत धोरणात्मक निर्णय घेणेबाबत...

**महापालिका सचिव:-** हा विषय पटलावर घ्यायचे की नाही सर्वांनी सांगावे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-** विषय सामावून घ्या.

**विषय क्र. २** उल्हासनगर शहरातील विविध रस्त्यांना व चौकांना नामकरण करणेकरीता तदर्थ समितीने मंजुर केलेल्या २६ प्रस्तावांची यादी मा. महासभा, उ.म.पा. चे मान्यतेस्तव सादर करणे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-** हा पण विषय सामावून घ्या.

---

विषय:— आयत्यावेळचे विषय सभेच्या कामकाजात सामावून घेणेबाबत.

सूचकाचे नांव :— श्री. कलवंतसिंह सोहता

अनुमोदकाचे नांव :— श्री. शंकर लुंड

महासभा ठराव क्र.५७ब दिनांक:— १८/०२/२०२२

ही महासभा प्रशासनाच्यावतीने प्राप्त झालेल्या आयत्यावेळच्या खालील दोन विषयास या सभेच्या कामकाजात सामावून घेण्यास मान्यता देत आहे.

**विषय क्र. १** कल्याण डोबिंवली महानगरपालिका हद्दीमध्ये प्रस्तावित क्लस्टर बेस्ड (Cluster Based) वेस्ट टू एनर्जी प्रकल्पामध्ये सहभागी होणेबाबत धोरणात्मक निर्णय घेणेबाबत...

**विषय क्र. २** उल्हासनगर शहरातील विविध रस्त्यांना व चौकांना नामकरण करणेकरीता तदर्थ समितीने मंजुर केलेल्या २६ प्रस्तावांची यादी मा. महासभा, उ.म.पा. चे मान्यतेस्तव सादर करणे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर/पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव:-** आता हे दोन विषय स्विकारण्यात येत आहेत, सदस्यांना याची प्रिंट व्हॉटस अॅपवर पाठवत आहे. आता स्थगन प्रस्ताव आला आहे. दोन लक्षवेधी मा. महापौरांनी स्विकारल्या आहेत आणि स्थगन प्रस्ताव....

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-** मॅडम स्थगन प्रस्ताव पुर्ण वाचून दाखवा. सगळयांना माहीती होईल.

**महापालिका सचिव:-** आम्ही अगोदरच वाटला आहे व नगरसेवक ग्रुपवर पण टाकले आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-** मॅडम कृपया, वाटला असेल तरी परत एकदा वाचून दाखवा.

**महापालिका सचिव:-** स्थगन प्रस्ताव वाचून दाखवितात.

**विषय:-** शासन आदेश क्र.कअनि-११२०/प्र.क्र.२३४/१४-ब, दि.१९ ऑगस्ट, २०२० अन्वये श्री. अशोक शिवाजी नाईकवाडे, मुळ कक्ष अधिकारी, मंत्रालय, महाराष्ट्र शासन यांची उपायुक्त उल्हासनगर महानगरपालिका यांची नियुक्ती कालावधी संपुष्टात आल्याकारणाने त्यांना मुदतवाढ देवू नयेत व तात्काळ कार्यमुक्त करणेबाबत. तसेच नाविन्यपुर्ण प्रतापाबाबत सदर स्थगन प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा करणेबाबत.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** समाविष्ट करण्यात येवू नये.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** समाविष्ट करु नका मॅडम.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** हा विषय सार्वजनिक हिताचा नाही. त्यामुळे सामाविष्ट करण्यात येवू नये.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-** सार्वजनिक हिताचाच आहे, संपुर्ण शहराची वाट लावत आहे अधिकारी.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** सार्वजनिक हिताचा नाही, त्यामुळे हा पटलावर घेवू नये.

**महापालिका सचिव:-** कारण दिले आहे की सार्वजनिक हिताचा नाही. लोक हिताच्या दुष्टीने असल्याने घेण्यात येईल.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** मतदान करा, मतदान करा.

**महापालिका सचिव:-** जर आपल्याला मतदान पाहीजे तर चार जणांनी मागणी केली पहीजे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** चौकशी करा.

लक्षवेधी सुचना याप्रकारची आहे......................

**महापालिका सचिव :-** लक्षवेधी सुचना क्र.१ जी चे सुचक आहेत, श्रीमती अंजली साळवे.

---

## लक्षवेधी सूचना क्रमांक १

विषय :— आशा आरोग्य सेविकांना ९००० रु. सानुग्रह अनुदान देणेबाबत.

महोदय,

लक्षवेधी सुचनेनुसार सभागृहाचे विनंती पुर्वक लक्षवेधु इच्छिते की, उल्हासनगर महानगरपालिकेत १ ) आशा वर्कसांनी मागणी केल्यानुसार त्यांना ९००० रु. अनुदान मंजूर करणेबाबत. २) मालमत्ता कर पावतीचे वाटप केलेल्या बचत गटातील महिलांना तात्काळ त्यांचे हक्कांचे पैसे देण्यात यावे.

सदर आशा वर्कस यांनी करोना काळात खुप मोलाची कामगिरी बजावली आहे. त्यामानाने त्यांना मोबदला देण्यात आला नाही, तरी त्यांनी केलेल्या निवेदनावर विचार विनिमय करुन त्यांना अनुदान स्वरुपात रु.९००० देण्यात यावे, ही लक्षवेधी.

उपरोक्त लक्षवेधी सुचनेनुसार सभागृहाचे विनंती पुर्वक लक्षवेधू इच्छिते की, उल्हासनगर महानगरपालिकेत जवळ जवळ १०० आशा वर्कर कार्यरत असून त्यांनी संप पुकारला होता. परंतु राज्य सरकारच्या आदेशानुसार त्यांच्या मागण्या महापालिकेच्या

---

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब...

**सदस्या, श्रीम. अंजली साळवे :-** मा. महापौर मॅडम, मा. उपमहापौर मा. आयुक्त साहेब मा. सचिव मॅडम आणि इतर. महापौर मॅडमचे मी आभार मानते की, त्यांनी माझी लक्षवेधी स्विकारली. आज आपल्या उल्हासनगरमध्ये २४ आशा वर्कर कार्यरत आहेत. ही लक्षवेधी सुचना यासाठी घेतली की दिवाळीच्या अगोदर ऑक्टोबर २०२१ मध्ये पुर्ण महाराष्ट्रभर आशा वर्कसनी संप पुकारलेला होता. सरकारने आदेश दिले होते आपल्या ठरावात त्यांच्या मागण्या ऐकून तो संप मिटवण्यात यावा. त्यानुसार आपल्या महानगरपालिकेला त्यांनी पत्र दिले होते की, आणि त्यांच्या ज्या मागण्या होत्या. त्यामध्ये ९००० हजार रुपयांचे सानुग्रह अनुदान देण्यात यावे अशी मागणी त्यांनी केली होती. तर चार महिने झाले मॅडम दिवाळीच्या अगोदर दयायचे होते अतिशय तळागाळात राहणारे या महिला तळागाळात जावून कामे करत आहेत. कोरोना काळात राष्ट्रीय अभियान अंतर्गत त्यांनी घरोघरी जावून कामे केलेली आहेत. आणि स्वत:च्या जीवाची कुटुंबांची पर्वा न

करता जेव्हा लॉकडाउनमध्ये सर्व लोक घरात होते, अशावेळी या वर्कसनी कामे केलेली आहेत. आणि प्रत्येक शासकीय योजना त्या राबवत असतात. आज परिस्थिती अशी आहे की, शाळा सुरु झाल्यामुळे मुलांना फी भरण्यासाठी पैसे नाहीत. तरीही ९००० हजार रुपयाचे अनुदान आपण तात्काळ मंजूर करुन त्यांना देण्यात यावे. आणि आज आपण इथे महापौर मॅडम आहेत, सचिव मॅडम आहेत, दोन उपायुक्त आहेत आणि आम्ही ६० टक्केच्या वर महिला नगरसेविका असताना, अशी वेळ येते, हे अतिशय मला अपमानास्पद वाटते. तरी ही मागणी तात्काळ पुर्ण करण्यात यावी. तसेच मागच्या महासभेत पण आम्ही मागणी केली होती. बचतगटातील ज्या महिला मालमत्ता कराच्या पावत्या वाटप करत होत्या. जुलै महिन्यात त्यांना पावत्या दिल्या होत्या आणि ऑक्टोबर महिन्यात त्यांनी वापस केल्या होत्या. पुर्ण वाटप झालेला अहवाल दिला. चार महिने झाले तरी अजुन त्यांना पैसे का मिळत नाही. यासाठी वारंवार मागणी केली होती. एक तर आपल्या महानगरपालिकेत महिलांना जास्त कामे देण्यात येत नाही. जी कामे दिली जातात त्यातही हा गोंधळ असतो. कोल्बो ग्रुपवाले त्यांना नाहक त्रास देतात. त्यांना आता चार महिने झाले हक्काचे पैसे मिळाले नाहीत. हया दोन्ही मागण्या तात्काळ मान्य कराव्यात.

**सदस्या, श्रीमती वसुधा बोडारे :-** मा. महापौर मा. आयुक्त, मा. सचिव मॅडम मला बोलायचे आहे. साळवी मॅडमने जो प्रस्ताव आणलेला आहे तो अत्यंत योग्य आहे. आणि ज्या आशा वर्कस लोकांच्या घरोघरी वारंवार फिरतात ते खरचं आहे. कोरोनाच्या काळात कोरोना असो-नसो त्यांना यादया दिलेल्या आहेत फक्त् ६०० रुपये त्यांना पगार असतो. त्यांना जे आपण ९००० हजार रुपये अनुदान केले आहे ते लवकरात लवकर देण्यात यावे. त्याचप्रमाणे मॅडमने सांगितले टॅक्स पावती वाटप करण्यासाठी पावसाळयात घरोघरी महिला जातात. त्याचे पण जे काही थोडेफार पैसे असतात ते दिले जात नाहीत. तर ते लवकरात लवकर देण्यात यावे. आणि साळवी मॅडमनी छान लक्षवेधी आणली त्याबददल त्यांचे धन्यवाद.

**सदस्या, श्रीमती सविता तोरणे :-** मा.महापौरजी, साळवी मॅडमनी जो आशा वर्करबददल प्रस्ताव मांडला आहे. खुपच कमी पैशात ते काम करत आहेत तर त्यांचे मानधन त्यांना देण्यात यावे आमची पण इच्छा आहे. आणि साळवी मॅडमने जो प्रस्ताव आणला त्याबददल त्यांचे खुप खुप धन्यवाद.

**सदस्य, श्री. अरुण आशान :-**मा.महापौर, मा. आयुक्त् साहेब खर म्हटल तर यासंदर्भात मागे पण चर्चा झाली होती. कोरोना कालावधीमध्ये खरोखर अनुदान देण्याचा हा जो विषय होता. पण कोरोना काळामध्ये ब-याच लोकांना ब-याच गोष्टी आपण केल्या. खरोखर घरोघरी जावून त्यांनी काम केले आहे. सानुग्रह अनुदान दयायला पाहिजे होते. दिवाळीला देवु म्हणून सांगितले होते. दिवाळी देणार म्हणून सांगितले होते. परंतु टॅक्सची वसूली झाली नाही. टॅक्स आला नाही. आता सध्या अडचण आहे. पैसे आल्यानंतर देवू. अस प्रशासनाने त्यांना कळविले होते. खर म्हटल तर आता त्यांना देण्याची वेळ आहे. मला वाटत प्रशासनाने हा विषय गंभीरतेने घेतला पाहिजे. मा. महापौरांनी हे आदेश दयावेत, प्रशासनाला हा काही जास्त खर्च येणार नाही १०-१५ लाख रुपयांचा खर्च आहे. आपण सर्व आशा वर्कसना पैसे दिल्याने महापालिकेची कोणीही हानी होणार नाही. उलट महानगरपालिकेला शासनाकडे संप असताना सुध्दा शासनाच्या स्तरावर आशा वर्कसने काम केले आहे, अशा वेळेस काम करण्याचे पैसे त्यांना न देता, उडवाउडवी भाषा करणे महला वाटते अयोग्य आहे. कोरोना काळामध्ये दोन्ही महिला गटांनी आशा वर्कर असू दे जसे बोडारे मॅडमने सांगितले महिला बचत गट असू दे. हा जो टॅक्स आपल्याकडे येतो आहे तो बील वाटप केल्यामुळे येतो आहे. त्यामुळे बील दिली नसती तर टॅक्स आला नसता आणि आपण इथे पेपरमध्ये आकडेवारी दाखवतो आहोत. तर मला वाटते महापौर मॅडम आपण प्रशासनाला आदेश दयावेत की आशा वर्कर यांना लवकरात लवकर त्यांचे पैसे देण्यात यावे.

**उपमहापौर, श्री. भगवान भालेराव :-** अरुणराव प्रत्येक महिन्याला दयायचे का. साळवी मॅडम बोलतात. तुम्ही शांत बसा.

**सदस्या, श्रीमती अंजली साळवे :-** माझी अशी विनंती आहे की, पुढे जावुन प्रत्येक वर्षीच्या बजेटमध्ये या आशा वर्कसाठी २० लाखा निधी ठेवला जावा. जस आपण आपल्या कर्मचाऱ्यांना दिवाळीच्या पुर्वी बोनस देतो तसा त्यांना सुध्दा देण्यात यावा. महिला बाल कल्याण निधीमधून हे काम आपल्याला सहज करता येईल. हे बजेटमध्ये नमुद करुन घ्यावे अशी माझी मागणी आहे. धन्यवाद.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी :-** मा. महापौरजी, मा. आयुक्त् साहेब, आजच्या या महासभेत लक्षवेधी साळवे मॅडमनी या महासभेत आणलेली आहे. त्या लक्षवेधीबाबत सगळयांनी चर्चा केली त्या चर्चेमधून एक गोष्ट लक्षात येते की, ही प्रशासनाची जबाबदारी आहे. प्रशासन ही जबाबदारी का पार पाडत नाही. बचत गटांच्या महिलांना अनुदान कधी मिळणार यासाठी प्रशासनाने उत्तर दयावे.

**<u>महापालिका सचिव :-</u>** आयुक्त् साहेब उत्तर देत आहेत. कृपया ऐकून घ्यावे. नंतर आपण परत प्रश्न विचारा.

**<u>उपमहापौर, श्री. भगवान भालेराव :-</u>** साळवे मॅडम २०२० पासुन त्यांना लगातार ९००० दयायचे का, त्या महिला काही महिन्यापुरते मर्यादीत आहेत.

**<u>सदस्या, श्रीमती अंजली साळवे :-</u>** वर्षातून एकदा दिवाळी पुर्वी माझी मागणी आहे आणि पुढच्या वेळेस तुम्ही दर दिवाळी देण्याचे प्रयोजन करा. प्रत्येक बजेटसाठी मर्यादीत निधी ठेवला जावा. कमीत कमी २० लाखाचा निधी ठेवण्यात यावा.

**<u>सदस्य, श्री. अरुण आशान :-</u>** मा. महापौर जी.

**<u>उपमहापौर, श्री. भगवान भालेराव :-</u>** साळवे मॅडम बोलतात तु शांत बस. बोला साळवी मॅडम.

**<u>सदस्या, श्रीमती अंजली साळवे :-</u>** ते फार चांगले होईल साहेब, तसे दिले तर त्या इतक्या आनंदाने काम करतील. आता त्यांनी जी मागणी केली ते देण्यात यावे आणि पुढच्या वर्षी ही तरतुद करण्यात यावी अशी मागणी आहे. बजेटमध्ये तरतुद करण्यात यावी.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी :-</u>** प्रशासनाने कार्यवाही करावी.

**<u>आयुक्त्, डॉ. राजा दयानिधी :-</u>** सन्माननीय पिठासीन अधिकारी व सर्व सन्माननीय सदसय मा. सदस्या मॅडमने उपस्थित केलेल्या मुददयाबाबत मी सांगू इच्छितो की, आशा वर्कनी जेवढी मागणी केली आहे. त्यात दोन प्रकारच्या बाबी आहेत, पहिली ही बाब धोरणात्मक स्वरुपाची आहे. आणि दुसर त्यात आर्थिक तरतुदीची पण मागणी करण्यात आलेली आहे. ही धोरणात्मक व आर्थिक स्वरुपाची असल्यामुळे त्यावर प्रशासन काय करेल. त्यावर काम करुन, आपल्या शिफारसीनुसार काय करणे योग्य राहील, मागणीच्या बाबतीत सर्व तयार करुन, नियम तपासून पुढच्या सभेला आपण सादर करु. याद्वारे मी मा. पिठासीन अधिकारी यांना पण कळवू इच्छितो, आरोग्य विभागास असे निर्देश देतो की, मॅडमनी जो मुददा उपस्थित केलेला आहे त्याबाबतीत नियम वगैरे तपासून त्याचा आर्थिक तरतुद आणि धोरणात्मक बाबतीत तुम्ही योग्य ती नियम तपासून त्या अनुषंगाने प्रस्ताव तयार करुन पुढच्या सभेला तयार करावे. आणि दुसरे मॅडमने महिला बचत गटांना मालमत्ता कराच्या बाबतीत मॅडमनी जो मुददा उपस्थित केलेला होते समजा जर कोल्बो ग्रुपशी संबंधीत असेल तर आपण कोल्बो ग्रुपला त्यांच्या कामाप्रमाणे जेवढे देयके देतो. त्यांच्याकडून ते महिला बचत गटांना देणे योग्य राहील. आम्ही ताबडतोब महिला बचत गटांना देत नाहीत. त्या प्रमाणे आम्ही कोल्बो ला सांगितले आहे. परंतु आता मॅडमच्या सांगण्यानुसार काही राहिले असतील तर आम्ही कोल्बो ग्रुपचे जे आहेत त्यांना आदेश देतो की, प्रलंबित असलेल्या बचत गटांना बील दयावे. आणि त्यावर आपल्याकडे काही इश्यु असेल तर मी यावतीने लेखा विभागाला आदेश देतो. तर बचत गटाच्या बीला संबंधीत बील प्रलंबित असेल तर फक्त तेवढी पुर्तता तुम्ही आपल्या आर्थिक तरतुदी बघून तुम्ही पुढील कार्यवाही करावी. आणि त्याचबरोबर टॅक्स विभागाला निर्देश देतो की, या प्रकरणांचा पाठपुरावा करा. धन्यवाद.

**<u>सदस्या, श्रीमती अंजली साळवे :-</u>** आशा वर्कसचे अनुदान किती दिवसात देणार. महापौर मॅडम कृपया यावर आपण सांगावे. आशा वर्कसंना अनुदान किती दिवसात दिले जाईल याबाबत काहीतरी सांगावे.

**<u>महापालिका सचिव :-</u>** साहेबांनी उत्तर दिले आहे. पिठासीन अधिकारी यांनी पुढचा विषय घ्यायला सांगितला आहे. लक्षवेधी आहे, महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामावर कर शास्ती ३ पट आकारली जात असून सदरची लक्षवेधी सुचना येणाऱ्या दि.१८/०२/२०२२ च्या महासभेत घेणेबाबत. चौधरी साहेब आपली ही लक्षवेधी सुचना आहे.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी :-</u>** मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामावर कर शास्ती ३ पट आकारणी आपण करतो. परंतु मी आपल्या लक्षात आणुन देतो ३ पट आकारणी करण्याबाबत शासनाचा नवीन जीआर आलेला आहे. त्या जीआरची अंमल बजावणी प्रशासन करत नाही. ती अंमलबजावणी प्रशासनाने करावी.

लक्षवेधी सुचना याप्रकारची आहे......................

**<u>महापालिका सचिव :-</u>** लक्षवेधी सुचना क्र.२ जी चे सुचक आहेत, श्री. राजेंद्र चौधरी.

## लक्षवेधी सूचना क्रमांक २

विषय :- महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामावर कर शास्ती ३ पट आकारली जात असून सदरची लक्षवेधी सुचना येणाऱ्या दि.१८/०२/२०२२ च्या महासभेत घेणेबाबत.

उपरोक्त् विषयान्वये अनधिकृत शास्तीची आकारणी करण्यात आल्यानंतर ती संबंधीत खरेदीदाराकडून वसूल केली जाते या खरेदी दाराची कोणतीही चुक नसताना त्यांना शास्तीची रक्कम भरावी लागते. या पार्श्वभुमीवर तरतुदीमध्ये सुधारणा करण्याच्या अनुषंगाने मुंबई महापालिका आणि महाराष्ट्र महापालिका (सुधारणा) अध्यादेश, २०१७ (अध्यादेश क्र.३) दिनांक ०८/०१/२०१७ अन्व्ये मुंबई महापालिका अधिनियम आणि महाराष्ट्र महापालिका अधिनियमामध्ये सुधारणा करण्यात आली असून हे शास्तीचे अधिकार महापालिकांना देण्यात आले आहे म्हणून लक्षवेधी सुचनेद्वारे लक्षवेधु इच्छितो हि विनंती.

---

**महापालिका सचिव:-** चौधरी साहेब तुमचा आवाज येत नाही.

**सदस्या, श्रीमती अंजली साळवे:-** आशा वर्कसंना अनुदान किती दिवसात दिले जाईल याबाबत काहीतरी सांगावे.

**उपम हापौर, श्री. भगवान भालेराव:-** आयुक्त् साहेबांनी निर्णय दिलेला आहे. आता चौधरी साहेबांची लक्षवेधी आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-** ३ पट आकारणी करण्याबाबत शासनाचे नवीन जीआर आलेला आहे. त्या जीआरची अंमल बजावणी प्रशासन करत नाही. ती प्रशासनाने अंमलबजावणी करावी. म्हणून ही लक्षवेधी आणलेली आहे. अनधिकृत बांधकाम झाल्यानंतर......... ती खरेदीदारांकडून वसूली केली जाते. मुंबई महापालिका आणि महाराष्ट्र महापालिका (सुधारणा) अध्यादेश, २०१७ (अध्यादेश क्र.३) दिनांक ०८/०१/२०१७ अन्वये मुंबई महापालिका अधिनियम आणि महाराष्ट्र महापालिका अधिनियमामध्ये सुधारणा करण्यात आली असून हे शास्तीचे अधिकार महापालिकांना देण्यात आले आहे. त्या जीआरची कॉपी आम्ही प्रशासनाला देतो. आणि या लक्षवेधी वर एवढीच अपेक्षा करतो की ताबडतोब अंमल बजावणी होईल. जर प्रशासनाने या जीआरची अंमल बजावणी केली नाही तर आम्हांला शासकीय प्रस्ताव आणावा लागेल आणि त्या जीआरची अंमल बजावणी करण्यास प्रशासनाला भाग पाडावे लागेल. मी प्रशासनाला आजच्या या लक्षवेधीनुसार विनंती करतो की, शासनाच्या जीआरची आपण ताबडतोब अंमल बजावणी करावी. शास्ती ३ पट आकारणी जाते, आणि नागरीकांना नाहक त्रास होतो. शहरातील नागरिकांना त्रास होउु नये त्यासाठीची ही लक्षवेधी आहे.

**महापालिका सचिव:-** साहेब तुम्ही जरा मोबाईल जवळ घ्या. आणि दोन-चार मोबाईल जवळ असल्यामुळे आवाज कट होतोय, ऐकायला येत नाही. तुम्ही एकाच मोबाईलवर बोला म्हणजे आवाज चांगला येईल. व जे बोलायचे आहे ते ऐकायला येईल.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-** मॅडम आता सगळे बोलून झाले. शासनाचा जीआर वाचून झाला. आता मी तो जीआर प्रशासनाला देतो. एवढीच मागणी आहे की, आपण या लक्षवेधीच्या माध्यमातून जो काही शासनाचा जीआर आहे. त्या जीआरची अंमल बजावणी प्रशासनाने करावी. हा जीआर मी प्रशासनाला देतो. हा २०१७ चा जीआर आहे. अजूनपर्यंत याची अंमल बजावणी झाली नाही. आणि आम्हांला प्रशासकीय प्रस्ताव आणि लक्षवेधी सुचना आणावी लागते. अशी वेळ आमच्यावर आणू नये.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:-** मा. महापौर, मा. आयुक्त् हा जो जीआर शासनाच्या वतीने आलेला आहे. तर प्रशासनाकडे हा जीआर अजून आलेला नाही का.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-** मॅडम सचिव मॅडम येथे जे काही सदस्य बोलत आहेत ते ऐकू येत नाही. तरी कृपया या सभेत काय घडत आहे ते आम्हांला माहित होत नाही.

**सदस्य, श्री. प्रकाश नाथानी:-** कोणी काय बोलत आहे ते समजत नाही.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:-** हा जीआर जरा वाचून दाखवा. सचिव मॅडम जीआर जरा वाचून दाखवा.

**<u>आयुक्त, डॉ. राजा दयानिधी:-</u>** सर्व सन्माननीय पिठासीन अधिकारी महोदय आणि सर्व सन्माननीय सदस्य मा. सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुददयावरती मी सांगू इच्छितो, त्यांनी ज्या अध्यादेशाबददल सांगितले आहे. दिनांक ०८/०१/२०१७ तर ते आपण थोडे तपासून पाहू आणि त्या जीआर मध्ये दिलेल्या निर्देशाप्रमाणे कार्यवाही करण्यासाठी मी पुढील निर्देश देत आहे. अनधिकृत बांधकाम विभाग व मालमत्ता कर विभाग या दोघांना आदेश देण्यात येते की, सन्माननीय सदस्यांनी जे उल्लेख केलेले जे जीआर आहेत अध्यादेश क्र.६ दिनांक ०८/०१/२०१७ त्याच्याबाबतीत जरा कंटेन अभ्यास करुन जसे त्या अध्यादेशात जे नियम आहेत त्या हिशोबाने पुढील कार्यवाही करण्यासाठी आदेश देण्यात येत आहे.

**<u>उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-</u>** मॅडम दुसरा विषय घ्या.

<u>महापालिका सचिव:—</u> विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

———————————————————————————————————————

⇨ विषय क्र. २:—**कै. नारायण देवचंद रिसवाल, सुरक्षारक्षक यांना वैद्यकिय प्रतिपुर्ती मिळण्याबाबत.**

———————————————————————————————————————

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र सिंह भुलूलर</u>**:- पास पास

**<u>सदस्य, श्री. किशोर वनवारी</u>**:- पास पास

<u>काही सदस्य:—</u>पास—पास......

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑ **<u>विषय क्र. २:-</u>** कै. नारायण देवचंद रिसवाल, सुरक्षारक्षक यांना वैद्यकिय प्रतिपुर्ती मिळण्याबाबत.

**<u>प्रस्तावना</u>**

कै. नारायण देवचंद रिसवाल, सुरक्षारक्षक यांना त्यांच्या स्वत:च्या वैद्यकिय उपचारासाठी पुणे महानगरपालिका नहरू हॉस्पीटल, येथे दिनांक १६/०७/२०१९ ते दिनांक १९/०७/२०१९ रोजी दाखल करण्यात आले होते. त्यासाठी त्यांना रूपये ३,४०,६०३./-इतका खर्च झाला असून त्यांनी संचिकेत सर्व वैद्यकिय परतावा बिल जोडलेले आहते. त्यानुषंगाने त्यांनी दिनांक ०६/९/२०१९ रोजीच्या अर्जान्वये वैद्यकिय परतावा मिळणेबाबत विनंती अर्ज केला आहे.

कै.नारायण देवचंद रिसवाल, सुरक्षारक्षक त्यांचा आजार- सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र एमएजी-२००५/९/प्र.क्र.१/ आरोग्य -३ दिनांक १९ मार्च,२००५च्या सहपत्रातील परिशिष्ट अ मध्ये गंभीर आजार- भाग २ मध्ये नमुद केल्याप्रमाणे गंभीर आजारापैकी अनुक्रमांक ५ वर मोडतो. तसेच,आकस्मिक परिस्थितीत वेद हॉस्पीटल, कल्याण या खाजगी रूग्णालयात औषधोपचार केला आहे.

तसेच श्रीम. तारा नारायण रिसवाल यांनी दिनांक १८/०६/२०२१ रोजीच्या अर्जान्वये कै. नारायण देवचंद रिसवाल, सुरक्ष-रक्षक यांचे दि. १९/०४/२०२१ रोजी निधन झाल्याचे कळविलेले आहे.

तरी कै. नारायण देवचंद रिसवाल सुरक्षा -रक्षक विभाग, यांच्या पश्चात वारसदार या हक्काने श्रीम. तारा नारायण रिसवाल यांना रूपये. ३०७१५५/-इतकी वैद्यकिय खर्चाची प्रतिपूर्तीची रक्कम मंजूर करण्यास हरकत नसावी.

शासन निर्णयानुसार कै.नारायण देवचंद रिसवाल, सुरक्षारक्षक यांना एकुण खर्चाच्या ९० टक्के इतकी वैद्यकिय खर्चाची प्रतिपुर्ती अनुज्ञेय आहे. त्यानुषंगाने त्यांना झालेल्या वैद्यकिय खर्चाच्या प्रतिपुर्तीची रक्कम रुपये ३,०७,१५५/- इतकीअसून शासन निर्णयानुसार त्यांना रुपये ३,०७,१५५/- इतकी अनुज्ञेय ठरते.

दिनांक १६/३/२०१६ रोजीच्या टिपणीनुसार रुपये १०००००/- पर्यतची वैद्यकिय प्रतिपुर्तीचे प्रस्ताव मा आयुक्त सो. यांचे स्तरावर व शासन निर्णय क्र. २०१२/प्र/क्र.३३३/११/राकावि-२,दिनांक १६/११/२०११ अन्वये १,००,०००/-पुढील प्रस्ताव मा.महासभेच्या मंजूरीने पाठविणेचे आदेश देण्यात आलेले आहेत.

कै.नारायण देवचंद रिसवाल, सुरक्षारक्षक यांचे वारसदार श्रीमती. तारा नारायण रिसवाल (पत्नी) यांना वैद्यकिय खर्चाची प्रतिपूर्तीची रक्कम मंजूर करण्यास हरकत नसावी.

तरी शासन निर्णयानुसार रुपये ३,०७,१५५./- इतकी वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्तीची रक्कम अदा करनेसाठी मा. महासभेच्या मंजुरीसाठी व मान्यातेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

**महासभा ठराव क्र.५८** **दिनांक १८/०२/२०२२**

**सुचकाचे नाव :- श्री. कलवंतसिंह सोहता**

**अनुमोदकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी**

**ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे कै. नारायण देवचंद रिसवाल, सुरक्षारक्षक यांचे वारसदार श्रीमती. तारा नारायण रिसवाल (पत्नी) यांना रुपये ३,०७,१५५/- इतकी वैद्यकिय प्रतिपुर्ती देणेस मान्यता देत आहे.**

**या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.**

**सुचकाची सही /-**

**अनुमोदकाची सही /-**

**सर्वानुमते**

**महपौर/पीठासीन अधिकारी**
**सर्वसाधारण महासभा**
**उल्हासनगर महानगरपालिका**

---

महापालिका सचिवः— विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

—————————————————————————————————————

⇨ विषय क्र.३:— **कल्याण- अंबरनाथ रस्ता रुंदीकरणात बाधित बांधकामधारक श्री. भोजराज एम.धनसिंगानी यांना त्याच्या बाधीत जागेच्या बदल्यात महापालिकाकडुन पर्यायी जागा देणेबाबत.**

—————————————————————————————————————

**सदस्य, श्री. किशोर वनवारी** :- यांना दिल्यानंतर सर्वांना दिली जावी. ज्यांची दुकाने गेली आहेत. त्यांना पण दिला जावा.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे** :- नाही नाही हा विषय डिफर करण्यात यावा. कारण हा विषय प्रशासनाने हा एकच विषय का आणला.

**उपमहापौर, श्री. भगवान भालेराव** :- सदरचा विषय डिफर करावा असे सर्व सदस्यांची मागणी आहे. हा विषय डिफर केलेला आहे. पुढचा विषय घ्या.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी** :- भालेरावजी कोणी डिफर करायला सांगितले आहे.

**सदस्य, श्री. सुमित सोनकांबळे** :- मी बोललो आहे. सर्व बोलले आहेत.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी :-** आयुक्त साहेबांना बोलू दया.

**<u>महापालिका सचिव</u>** :- हा विषय वगळण्याची मागणी आलेली आहे. सर्वांनी सांगावे सर्व सदस्यांना मान्य.

**<u>काही सदस्य</u>** :- हो वगळण्यात यावा.

**<u>सदस्य, श्री.गजानन शेळके</u>** :- हो वगळण्यात यावा मॅडम.

**<u>महापालिका सचिव</u>** :- आता पास समजण्यात येईल. डिफर करण्यात येईल. कल्याण- अंबरनाथ रस्ता रुंदीकरणात बाधित बांधकामधारक श्री. भोजराज एम.धनसिंगानी यांना त्याच्या बाधीत जागेबाबत हा विषय कार्यसुचीवरुन वगळण्यात येत आहे. हा ठराव मी वाचला आहे. पास...

**<u>सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी :-</u>** हा नाही नाही पास नाही आमचे हरकत आहे.

**<u>महापालिका सचिव</u>** :- सदस्यांचा आवाज येत नाही. सदस्यांनी फोन जवळ घेवून बोलावे.

**<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी :-</u>** मॅडम आवाज येत नाही. सिस्टम बरोबर नाही. मिटिंग स्थगित करा. काहीच ऐकायला येत नाही. काहीच समजत नाही. कोणता विषय आहे काहीच समजत नाही. कृपया मिटिंग स्थगित करण्यात यावी.

**<u>सदस्य, श्री. भारत गंगोत्री :-</u>** मा. उच्च न्यायालयाचा आदेश आहे की, त्यांना पर्यायी जागा दिली जावी. कृपा करुन यात जेवढे पण बाधीत लोक आहेत त्यांचा पण बंदोबस्त केला पाहिजे.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे :-</u>** सचिव मॅडम,

**<u>महापालिका सचिव</u>** :- ऐकू येतोय सर आवाज, बोला आपण.

**<u>सदस्य, श्री. अरुण आशान :-</u>** मा. महापौर, मा. उपमहापौर, मा. आयुक्त साहेब शहरामध्ये बाधीत झालेली बरीचशी दुकाने आणि घरे आहेत. आतापर्यंत एकाच माणसाने असा प्रस्ताव टाकल्यानंतर मग प्रशासनाने ते घेवून हा ठराव इथे आणतो. ही शोकांतिका आहे. अगोदरच आपल्याकडे कल्याण्-अंबरनाथ रोडचे जे बाधीत आहेत. उल्हासनगर-५ येथे रस्ता चालु आहे. तिथे पण व्यापा-यांचे काही नुकसान झाले आहे. काही व्यापाऱ्यांचे संपुर्ण नुकसान झालेले आहे. सचिव मॅडम ऐकायला येते काय.

**<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी :-</u>** कोणाचाच आवाज येत नाही.

**<u>सदस्य, श्री. अरुण आशान :-</u>** सचिव मॅडम ऐकायला येते काय.

**<u>सदस्य, श्री. गजानन शेळके :-</u>** आवाज येत नाही. आता कोरोना काळ संपलेला आहे आता ऑफलाईन मिटिंग घ्या.

**<u>महापालिका सचिव</u>** :- शासनाचे आदेश आले की ऑफलाईन मिटिंग घेण्यात येईल. अजून शासनाचा आदेश अप्राप्त आहे.

**<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया :-</u>** मा. महापौरजी कृपया मला बोलण्याची परवानगी दयावी.

**<u>सदस्य, श्री. अरुण आशान :-</u>** एक मिनिट मला अस म्हणायच आहे, प्रशासनाने एकच प्रस्ताव कसा आणला? त्यावेळी रस्ता रुंदीकरणात

**<u>उप महापौर, श्री. भगवान भालेराव :-</u>** याबाबत उपआयुक्त बोलतील. या संदर्भात् उपआयुक्त उत्तर देतील.

**<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया :-</u>** त्याआधी मला बोलू दया. मा. महापौरजी. उपमहापौरजी.

**<u>उप महापौर, श्री. भगवान भालेराव :-</u>** तेच देण्यासंदर्भात उपआयुक्त् बोलतील. राजेश भाई जरा शांत रहा.

**<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया :-</u>** अरे त्याआधी मला पहिले बोलू दया. मा. महापौरजी. उपमहापौरजी.

**<u>उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे :-</u>** मा. महापौर, मा.उपमहापौर, मा.आयुक्त् सर, सन्माननीय सदस्य विषय क्र.३ जो आहे तो केबी रोडमध्ये बाधीत झालेल्या दुकानदारांचा आहे. १०० टक्के दुकान बाधीत झालेले आहे. यांना आपल्या महासभेने यापूर्वीच जागा देण्याचा १८/१०/२०२१ रोजी ठराव केलेला आहे. त्या ठरावामध्ये आपल्या जकात नाक्याची मोजणी झालेली नव्हती. आणि अंदाजे १०० चौ. फुट इतकीच जागा आहे असे सांगितले गेल्यामुळे त्याचे मोजमाप १०० फुट इतकेच टाकण्यात आलेले होते. आणि हे जे अर्जदार आहेत ज्यांचे दुकान बाधीत झालेले आहेत. त्यांनी

याचिका दाखल केलेली होती. आणि या याचिकेमध्ये आपण प्रशासनाने त्यांना आश्वासन दिले होते की, त्यांची जी जागा आहे त्याबदल्यात आम्ही जागा देणार आहोत. आणि त्या जागेचे मोजमाप करुन लवकर त्यांना जागा देणार असे आपण मा. उच्च न्यायालयामध्ये संमती दिलेली आहे. आणि त्यासंमतीनुसार याचिकादार आहेत त्यांनी आश्वासनानुसार माघारी घेण्यात आलेली आहे. आणि आपले जे लेखी आश्वासन आहे ते जर आपण ठरावास जर विलंब झाला तर गुन्हा दाखल होऊ शकतो. फक्त अडचण अशी झालेली आहे की, आम्ही मोजणी प्रत्यक्ष केल्यानंतर दुकानदाराचे मोजमाप जे आहे ते कोणाचे १८० चौ.फुट होते. आणि आपल्या जकात नाक्याची प्रत्यक्ष मोजणी केली असता, ती १०० फुटापेक्षा जास्त झाली तर त्यामुळे देताना त्या जागेचा थोडा भाग शिल्लक अस झाले तर जागेचा काही उपयोग होणार नव्हता. आणि दुकानदार यांची जी जागा बाधीत झालेली आहे. ती जागा आपल्या जकात नाक्याऐवढीच आहे. अस हे एकंदरीत प्रकरण असल्यामुळे त्याचे आपण मुल्यांकन केले असता दुकानदारांच्या जागेचे मुल्यांकन जास्त आले आहे. आपल्या जागेचे कमी आलेले आहे. त्यामुळे थोडीशी जागा शिल्लक राहते मग आपल्याला उपयोग दुकानदाराची जी जागा बाधीत झालेली आहे. ती जागा तेवढयाच मोजमापाची असल्यामुळे मा. उच्च न्यायालयात ही पुर्ण जागा देण्यासाठी क्षेत्रफळामध्ये मी पुन्हा विनंती करतो की, प्रशासनाची ही वस्तुस्थिती आपण जाणून घेऊन मा. महासभेची मान्यता दिल्यास बाधीत झालेले आहेत त्यांना आपल्याला न्याय देणे सोयीस्कर होईल.

**सदस्य, श्री. अरुण आशान :-** उपआयुक्त साहेब जे सांगतात, महापौर साहेब मला हे म्हणायचे आहे की,

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव :-** अरुण राव बोला अरुण राव बोला.

**सदस्य, श्री. अरुण आशान** :- मला हे म्हणायचे आहे की, उल्हासनगर ५ या ठिकाणी जागा दयायची महानगरपालिकेकडे तेवढीच जागा आहे का ? ही प्रशासनाची चाल आहे. या अगोदरचे काम केले नाही म्हणजे प्रत्येकाने कोर्टात जायचे का ? असं होणार नाही. की तुम्ही एकाला अशी ठराविक जागा शोधून देणार का? आणि महानगरपालिकेची मोक्याची जागा जर देणार असाल तर उदया भविष्यामध्ये ती जागा महानगरपालिकेला मिळणार आहे का? वेगळया ठिकाणी सगळीकडे जागा उपलब्ध असताना ठराविकच एक जागा त्याला मोजून दयायची याला माझा आक्षेप आहे. आणि आपण प्रशासनाला पत्र दिले आहे की, ज्या ज्या लोकांची घरे आणि दुकाने रस्त्यामध्ये बाधीत झाली आहेत त्यांना पर्यायी जागा दया. प्रशासनाने काय केले त्याच्यावर त्यामुळे उपआयुक्त साहेब सांगतात त्याला माझी मान्यता नाही. मा. महापौर, उपमहापौर साहेब, आयुक्त् साहेब एखादया माणसाने हायकोर्टात दावा केला तर हायकोर्टाला कोणी सांगितले ही जागा आहे म्हणून.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी** :- हे सगळे जातीवाद चालले आहे हे बरोबर नाही आहे. आपण हायकोर्टाचे आदेश मान्य करत नाही. आपण त्यांना जागा दिली नाही. आपण हायकोर्टाचे आदेश मानत नाहीत. आपण मतदान करावे. बघु या कोण मतदान करतो कोण करत नाही. एक ७ वर्षापासुन सतत महानगरपालिकेशी भांडतो. आणि हायकोर्टात जातो. हायकोर्ट त्याला आदेश देते तुम्ही म्हणता सगळयांना सामावून घ्या. तुम्ही एकाला देवू शकत नाही तर सगळयांना काय देणार. उपआयुक्तांनी सांगितले ती जागा जर दिली नाही. ज्यांनी विरोधात मतदान केले तर त्याच्या विरोध याचिका दाखल केली पाहिजे.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव :-** प्रदिपजी शांत रहा. अरुण आशान राव हायकोर्टाने लिहिले आहे. आपण तिकडे सहमती दर्शविली आहे. आणि त्यांनी दावा मागे घेतलेला आहे. आपण संमती करुन देण्याचे मान्य केलेले आहे. यात मतदानाचे काहीच प्रश्न येत नाही. आणि नाही दयायचा पण प्रश्न येत नाही. हायकोर्टाने सांगितल्याप्रमाणे आपल्याला वागावे लागेल. आणि ती जागा त्यांना दयावी लागेल.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी** :- राजकारण करण्याची गरज नाही.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव :-** महासभेने पुर्वी मान्यता दिलेली आहे. त्यामुळे आता मतदानाचा विषय नाही. फक्त त्यांनी आता विषय असा टाकला आहे की जागा जास्त असल्यामुळे किती दयायची. सर्व संमतीने पास.

**सदस्य, श्री. मनोज सयानी** :- देवून टाका. देवून टाका.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव :-** ठराव पास.

**काही सदस्य** :- पास पास..

**<u>सदस्य, श्री. गजानन शेळके</u> :-** काही ७-८ लोकांची घरे गेली होती त्यांनाही देण्यात यावी. त्याबदल्यात दुसरी जागा त्यांना देण्यात यावी.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी</u>**:- पास पास...आयुक्त् साहेब तुम्ही एक निर्णय घेतला आहे. छान निर्णय घेतला आहे. सर्वांनी एकमताने निर्णय घेतला त्याबददल धन्यवाद.

**<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया :-</u>** मा. महापौरजी, मला बोलण्याची संधी दया.

**<u>उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे :-</u>** मा. सदस्य मी परत एकदा आपल्याला विनंती करतो की, हा विषय दिनांक १८/१०/२०२१ रोजीच्या महासभेमध्ये १०० चौ.फुटाची जकात नाक्याची जागा आहे. ती जागा देण्यास अगोदरच मान्यता दिलेली आहे. या विषयाच्या अनुषंगाने आपण फेरमोजणी केली असता, त्या जागेचे एकूण क्षेत्रफळ १७५.४५ चौ.फुट इतके निघाले आहे. त्या व्यक्तीची जी बाधीत झालेली जागा आहे. ती जागा १८० चौ.फुटाची होती. आणि त्याचे मुल्यांकन आपण केले.

**<u>सदस्य, श्री. अरुण आशान</u> :-** तुम्ही आमचे ऐकून घेत नाहीत. उप आयुक्त् साहेब आपले काय आहे यामध्ये. आपला फार इंट्रेस आहे.

**<u>उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे :-</u>** परत मी आपल्याला निदर्शनास आणु इच्छितो की, जकात नाक्याची जागा देण्यात मा. महासभेने मान्यता दिलेली आहे. आपण् हायकोर्टात सुध्दा त्याला संमती दिलेली आहे.

**<u>सदस्य, श्री. गजानन शेळके</u> :-** न्याय दयायचा असेल तर शहरातील सर्वांना दया. एकालाच नाही.

**<u>उप महापौर, श्री. भगवान भालेराव :-</u>** चार सदस्यांनी मतदान करण्यास सांगितले तर मतदान घेता येईल.

**<u>महापालिका सचिव :-</u>** मा. पिठासिन अधिकारी सांगितले आहे की, मतदान चार सदस्यांनी मागणी केली तर मतदान मतदान होईल. नाही तर प्रशासनाने सांगितले आहे की, ही जागा देण्याचे महासभेने पुर्वी सर्वसंमतीने आधीच मंजूर केलेली आहे. आणि आता महासभेनेच हा ठराव केला आहे.

**<u>महापालिका सचिव :-</u>** चार सदस्य मतदानाची मागणी करा. आणि हा विषय संपवा.

**<u>सदस्य, श्री. अरुण आशान</u> :-** सचिव मॅडम ऐका.

**<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया :-</u>** मा. उपमहापौरजी, कृपया मला बोलण्याची संधी दया.

**<u>सदस्य, श्री. राजू जग्यासी :-</u>** हायकोर्टाने सांगितले नंतर ही यांना मतदान करावे लागणार का.

**<u>सदस्य, श्री. अरुण आशान</u> :-** त्याचे उत्तर दया.

**<u>उप महापौर, श्री. भगवान भालेराव :</u>** चर्चा करु नका. तुम्हांला मतदान घ्यायचे आहे ना. गोषवारा वाटला सगळयांना.

**<u>सदस्या, श्रीम. अंजली साळवे</u> :-** सर्वांना सारखा न्याय दया.

**<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया :-</u>** मा. पिठासीन अधिकारी, कृपया मला बोलण्याची संधी दया.

**<u>उप महापौर, श्री. भगवान भालेराव :</u>** कोणाचा विरोध असेल तर सांगा. आपण मतदान घेऊ.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे :</u>** बाधीत लोकांची यादी. ज्या लोकांनी या शहरासाठी त्याग केलेला आहे. आणि त्यासाठी त्यांना पुर्नवसन करणे हे बंधनकारक आहे. नाहीतर प्रत्येक उठेल आणि हायकोर्टात जाईल. गरीब लोक असे हायकोर्टात पैसे अभावी जावू शकणार नाही. ज्यांच्याकडे पैसे आहेत फी भरायला तेच फक्त हायकोर्टात जातील. गरीब लोकांनी हायकोर्टात जायचे का. त्यासाठी महापालिकेची एक पॉलिसी असली पाहिजे. प्रत्येक वेळेस प्रत्येकाने हायकोर्टात जायचे का जर तसे असेल प्रशासनाने आणलेला प्रस्ताव बरोबर असेल हायकोर्टाचा अवमान होणार नसेल तर सध्या मंजूरी करुन ते तसे महापौरांच्या दालनात ते दाखवा. की अशा प्रकारची सुचना किंवा अशा प्रकारचा महापौरांना सुध्दा माहित नाही. फक्त् गोषवारा आणताय. अशा प्रकारची बैठक आपण वेळीच गटनेता आणि महापौरांच्या लक्षात आणायला

पाहिजे. आपण जर हे केले तर हायकोर्टाचा अवमान होईल. यापुढे महापौरांच्या दालनात आपण उपआयुक्त् साहेब आणले पाहिजे. प्रशासनाने शाश्वती दिली आहे. त्याचे कागदपत्र पण नाही तसा पेपर पण पॉलिसी निर्णय पण महापौरांनी रस्ता रुंदीकरणामध्ये गेलेल्या लोकांसाठी पर्यायी जागा कुठे दयायची नाहीतर प्रत्येक जण एखादया रेल्वे फलाट मागितला तर तुम्ही दयाल का. आज जकात नाका मागितला आहे. विना परवानगी असलेली जागा पर्यायी जागा देण्यात यावी. म्हणजे विठठलवाडी आणि रेल्वे स्टेशन बाहेरील जकात नाक्याची रिकामी विना परवानगी असलेली पर्यायी जागा. एखादी व्यक्ती ही सुसंस्कृत ती आपण देतोय. हे बरोबर नाही. महापालिकेची पॉलिसी असली पाहिजे. पॉलिसी निवडा. जो कोणी व्यापारी आहे त्याची जागा गेलेली आहे. त्याला पर्यायी जागा देण्यासाठी आम्ही मान्यता देतो. त्यापुर्वी आयुक्तांनी तशा प्रकारचे पत्र किंवा आदेश दिले पाहिजे.

**<u>सदस्य, श्री. महेश सुखरामानी:-</u>** मा. उप महापौर, मा. आयुक्त् साहेब यापुर्वी सर्व संमतीने मा. महासभेमध्ये सर्व लोकांनी मान्य केले होते. कि सर्वांना न्याय मिळाला पाहिजे. जे कल्याण-अंबरनाथ रोड मध्ये बाधीत झाले आहेत. त्यांना पण अनुक्रमे दिले पाहिजे हे महासभेत पास झाले होते. पण किती वर्ष झाले परंतु महानगरपालिकेने त्याबाबत कोणताही निर्णय का घेतला नाही. म्हणजे नेहमी महासभेत या गोष्टी होतात पण अधिकारी त्याचा अवलंब करत नाही. पिठासीन अधिकारी आहेत त्यांनी अजून कोणताही निर्णय घेतला नाही. त्याचा निर्णय झाला पाहिजे.

**<u>उप. महापौर, श्री. भगवान भालेराव:-</u>** सन्माननीय सदस्य महापौरांच्या आदेशाने जिथे जागा उपलब्ध असेल तसा प्रस्ताव प्रशासनाने आणावा. असे महापौरांच्या आदेशाने आहे. आणि या संदर्भात जी जागा देण्याचे हायकोर्टात मान्य केले आहे. तो पास इतिवृत्ताची वाट न पाहता

**<u>सदस्य, श्री. किशोर वनवारी</u>** :- पास पास.

**<u>महापालिका सचिव :-</u>** प्रशासनास निर्देश देत आहे. इतिवृत्ताची वाट न पाहता.

**<u>काही सदस्य :-</u>** पास पास..

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑ **<u>विषय क्र. ३:-</u>** कल्याण-अंबरनाथ रस्ता रुंदीकरणात बाधित बांधकामधारक श्री.भोजराज एम.धनसिंगानी यांना त्यांच्या बाधीत जागेच्या बदल्यात महापालिकेकडुन पर्यायी जागा देणेबाबत.

**<u>प्रस्तावना</u>**

मा.महासभा ठराव क्र.८९,दिनांक १७/०८/२०२०अन्वये कल्याण-अंबरनाथ रस्ता रुंदीकरणात बाधित बांधकामधारक श्री.भोजराज़ एम.धनसिंगानी यांना त्यांच्या बाधीत जागेच्या बदल्यात महापालिकेच्या ताब्यातील विठठलवाडी रेल्वे स्टेशन (पश्चिम) बाहेरील जकात नाक्याची रिकामी / विनापरवानगी असलेली जागा पर्यायी जागा म्हणून देण्यास मान्यता दिलेली आहे.

मात्र सदर ठराव करतेवेळी जकात नाक्याची जागा फक्त १०० चौ.फूट इतकी नमुद करण्यात आली होती. परंतु, महापालिकेचे मोजणी सल्लागार मे.क्रिएटीव असोसिएट यांचेमार्फत दिनांक १८/१०/२०२१ रोजी सदर जागेची मोजणी केली असता, जागेचे क्षेत्रफळ १७५.४५ चौ.फुट दर्शविण्यात आलेले आहे.

अद्यापपर्यंत श्री. भोजराज एम.धनसिंगानी यांना सदर जागेचा ताबा दिलेला नसुन दिनांक २७/१०/२०२१ रोजीच्या संदर्भिय पत्रान्वये त्यांनी जकात नाक्याची १०० चौ.फुट एवढी ठरावान्वये उपलब्ध करून दिलेली जागा आपल्या व्यवसायासाठी अपूरी असल्याचे कळविले आहे. तसेच, जकात नाक्याची संपुर्ण जागा उपलब्ध करून देण्याची विनंती केली आहे. तसेच, पर्यायी जागेचे (जकात नाक्याची संपुर्ण जागा १७५.४५ चौ.मी.) मुल्यांकन बाधित झालेल्या जागेच्या मुल्यांकनापेक्षा जेवढे जास्त असेल तेवढी रक्कम भरणा करण्याची तयारी दर्शविली आहे.

त्या अनुषंगाने शहर अभियंता यांचेकडील जा.क्र.उमपा/साबावि/का.अ./२४१/२०२ दिनांक ०६/१२/२०२१ रोजीच्या पत्रान्वये श्री.भोजराज धनसिंगानी यांच्या दुकानाची जागा व विठठलवाडी जकात नाका, उल्हासनगर येथील जकात नाक्याच्या जागेचे मुल्यांकन प्राप्त करून घेतले असता ते खालीलप्रमाणे.

| **अ. क्र.** | **कल्याण-अंबरनाथ रस्ता रूंदीकरणामध्ये बाधित दुकानदारांचे नाव व बाधित जागेचा पत्ता** | **एकुण क्षेत्रफळ**<br>**मुल्यांकन** | **महापालिकेकडे उपलब्ध् असलेल्या व बाधितांस दयावयाच्या पर्यायी जागेचे ठिकाण व पत्ता** | **एकुण क्षेत्रफळ**<br>**मुल्यांकन** | **तफावत रक्कम** |
|---|---|---|---|---|---|
| १. | श्री.भोजराज घनसिंगानी एफ.एम.जनरलॲन्ड किराणा स्टोअर्स. | १६.९७ चौ.मी.<br>……………..<br>रू.३०,५३,००४/- | विठठलवाडी रेल्वे स्टेशन (पश्चिम) बाहेरील जकात नाक्याची जागा. | १६.३० चौ.मी.<br>………………<br>रू.२९,३२,५३८/- | रू.१,२०,४६६ |

श्री.भोजराज धनसिंघानी यांच्या मागणीनुसार उक्त पर्यायी जागा दयावयाच्या जागेच्या मुल्यांकनापेक्षा बाधित झालेल्या जागेचे मुल्य जास्त आहे. त्यामुळे त्यांच्या बाधित जागेच्या बदल्यात मागणी केलेली व महापालिकेच्या ताब्यात असलेली विठठलवाडी जकात नाक्याची जागा देणेस हरकत नाही.

तसेच, उपरोक्त बाधित बांधकामधारक यांनी मा.उच्च न्यायालयात दाखल केलेली रिट याचिका नं.४६१/२०२० देखील मागे घेतलेली आहे. मा.महासभा ठराव क्र.८९,दिनांक १७/०८/२०२० मध्ये बदल करून श्री.भोजराज धनसिंगानी यांना पर्यायी जागा म्हणुन महानगरपालिकेच्या ताब्यातील विठ्ठलवाडी रेल्वे स्टेशन (पश्चिम) बाहेरील जकात नाक्याची संपुर्ण जागा (१६.३० चौ.मी ) देण्यासाठी सदर प्रस्ताव मा.महासभेपुढे पुन्हा मान्यतेस्तव प्रस्तावित करण्यात येत आहे.

**<u>महासभा ठराव क्र.</u> ५९** **दिनांक १८/०२/२०२२**

**सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी**

**अनुमोदकाचे नाव :- श्री. राजेश वदारिया**

**ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे कल्याण-अंबरनाथ रस्ता रुंदीकरणात बाधित बांधकामधारक श्री.भोजराज एम.धनसिंगानी यांना त्यांच्या बाधीत जागेच्या बदल्यात महानगरपालिकेच्या ताब्यातील विठठलवाडी रेल्वे स्टेशन (पश्चिम) बाहेरील जकात नाक्याची संपुर्ण जागा (१६.३० चौ.मी) देण्यासाठी मान्यता देत आहे.**

**तसेच,**

**कल्याण-अंबरनाथ रस्ता रुंदीकरणात बाधीत झालेल्या नागरीकांचे पर्यायी जागा देण्याबाबतचे प्रस्ताव लवकरात लवकर महासभेपुढे आणण्यास महासभेस निर्देश देत आहे.**

**या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.**

**सुचकाची सही /-**

**अनुमोदकाची सही /-**

**सर्वानुमते**

**महपौर/पीठासीन अधिकारी**
**सर्वसाधारण महासभा**
**उल्हासनगर महानगरपालिका**

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. ४ वाचुन दाखवितात

————————————————————————————————————————

⇨ विषय क्र. ४ :– **उल्हासनगर महानगरपालिका हद्दीतील एकत्रिकृत विकास नियंत्रण नियमावलीतील २०२० मधील नियम क्र. १४.८ नुसार, अनुज्ञेय करण्यास आयोजन समुह विकास योजना (क्लस्टर) चे अंमलबजावणी करणे शक्य व्हावे यासाठी तांत्रिक सल्लागाराची नेमणुक करणे बाबत...**

————————————————————————————————————————

**<u>सदस्य, श्री. सुमित सुरजीत सांळुके :-</u>** पास पास.. इतिवृत्ताची वाट न पाहता पास.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :-</u>** पास पास..

**<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया :-</u>** मा. महापौरजी मला काही बोलायचे आहे.

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

**<u>महापालिका सचिव :-</u>** इतिवृत्ताची वाट न पाहता पास.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **<u>विषय क्र.४ :-</u>** उल्हासनगर महानगरपालिका हद्दीतील एकत्रिकृत विकास नियंत्रण नियमावलीतील २०२० मधील नियम क्र. १४.८ नुसार, अनुज्ञेय करण्यास आयोजन समुह विकास योजना (क्लस्टर) चे अंमलबजावणी करणे शक्य व्हावे यासाठी तांत्रिक सल्लागाराची नेमणुक करणे बाबत...

**प्रस्तावना**

उल्हासनगर शहराची विकास योजना सह शासनाच्या नगर विकास विभागाचे Resolution No. TPS-1818/CR-236/18/Sec-20(3)/UD-13, Date. 02/12/2020 द्वारे शहराच्या विकासाकरिता सुधारित नियमावली पारीत केलेली आहे. त्या नियमावलीतील नियम क्र. १४.८ अनुसार उल्हासनगर महानगरपालिका हद्दीत समुह विकास योजना (क्लस्टर) अंतर्गत विकास Urban Renewal Scheme प्रमाणे अनुज्ञेय करण्यात आलेली आहे.

सदर क्लस्टर योजना ही उल्हासनगर शहरातील अनधिकृत बांधकामांचे वाढते प्रमाणे व शहराचे सुमारे १३.५० चौ.किमी म्हणजेच १३५० हेक्टर इतके अल्प क्षेत्र विचारात घेता व शहरातील लोकसंख्यांची अंदाजित घनता ४८.०० प्रती चौरस किलोमीटर इतकी लहान (Dens) असल्याने शहराचा नियोजनबध्द विकास व्हावा यासाठी प्रभावी ठराव टाकणारे एक महत्वाचे साधन आहे.

सदर योजना अंमलात आणण्याची जबाबदारी नियोजन प्राधिकरण या नात्याने महापालिकेकडे आहे. सदर क्लस्टर योजनेमधील नियमांचा अभ्यास करून त्या द्वारे शहरामध्ये क्लस्टर च्या आवश्यक क्षेत्राची निश्‍चिती करणे इत्यादी तांत्रिक कार्य करण्यासाठी आवश्यक ते मनुष्यबळ महापालिकेकडे नाही.

महाराष्ट्रातील ठाणे, नवी मुंबई इत्यादी मोठ्या महानगरपालिका स्वत:करिता क्लस्टर योजना राबविण्यासाठी तांत्रिक सल्लागाराची नेमणुक केल्याचे समजते. त्या धर्तीवर उल्हानगर शहरात समुह विकास योजना (क्लस्टर) राबविण्यासाठी महापालिकेला तांत्रिक सल्ला देवून सदर योजना पुर्णत्वास आणण्यासाठी तांत्रिक सल्लागाराची नेमणुक करण्याची आवश्यकता आहे.

**ठरावाचा मसुदा**

उल्हासनगर महानगरपालिकेस लागु असलेल्या एकत्रित विकास नियंत्रण नियमावलीतील नियम क्र. १४.८ समुह विकास योजना करणे आवश्यक आहे.

सबब, विहीत कार्यपध्दत अनुसरून समुह विकास योजनेकरिता तांत्रिक सल्लागाराची नेमणुक करण्यास ही महासभा मान्यता देत आहे.

उपरोक्त गोषवारा मा. महासभेच्या नियोजित सभेत विषय पत्रिकेमध्ये समाविष्ट करण्याची कार्यवाही नियमानुसार करणेकरिता सविनय सादर.

महासभा ठराव **क्र.** ६० दिनांक १८/०२/२०२२

सुचकाचे नाव :-श्री. कलवंतसिंह सोहता

अनुमोदकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेस लागु असलेल्या एकत्रित विकास नियंत्रण नियमावलीतील नियम क्र. १४.८ समुह विकास योजना करणे आवश्यक आहे. सबब, विहीत कार्यपध्दत अनुसरून समुह विकास योजनेकरिता तांत्रिक सल्लागाराची नेमणुक करण्यास मान्यता देत आहे.

या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही /-

अनुमोदकाची सही /-

सर्वानुमते

महपौर/पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिवः— विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

---

⇨ विषय क्र. ५ :— **वित्तीय वर्ष सन २०२२-२०२३ साठी पाणी पटटीचे दर निश्चित करणेच्या स्थायी समिती ठराव क्र. १२१ दिनांक ०४/०२/२०२२ बाबत महासभेपुढे निर्णय घेणे.**

---

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** स्थायी समितीने कोणताही कर आणि दर प्रस्ताव मंजूर केला नाही. जसे स्थायी समितीने केले आहे तसे.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:-** ना मंजूर.

**काही सदस्य:-** ना मंजूर.. ना मंजूर...

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव :-** जसे स्थायी समितीने पास केले तसे पास.

**महापालिका सदस्य:-** बजेटमध्ये टाकायचे आहे हे सर.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-** हो जसे स्थायी समितीने पास केले तसे.

**महापालिका सचिव:-** ठिक आहे. इतिवृत्ताची वाट न पाहता पास.

महापौर तथा पीठासीन अधिकारी:— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑ **विषय क्र. ५:-** वित्तीय वर्ष सन २०२२-२३ साठी पाणीपट्टीचे दर निश्चित करणेच्या स्थायी समिती ठराव क्र. १२४, दिनांक ०४/०२/२०२२ बाबत महासभेपुढे निर्णय घेणे.

**प्रस्तावना**

१) नळजोडणी धारकांच्या मिळकतीचे कर योग्य मुल्य लक्षात घेवुन कर योग्य मुल्याच्या टक्केवारीने पाणीपट्टी व पाणी पुरवठा

लाभ कर या नावाने अतिरिक्त पाणी पट्टी आकारणी करणे.

२) नळ जोडणीचा आकार व ज्या प्रयोजनासाठी पाणी वापरण्यात येते त्यावरुन दर निर्धारीत करणे.

३) पाणी मोजणी करुन ज्या प्रयोजनासाठी पाणी वापरण्यात येते त्यासाठी वेगवेगळे दर निर्धारित करुन आकरणी करणे.

४) ठराविक काळासाठी नळ जोडणीधारकाबरोबर दराबाबत तडतोड करणे.

१) सद्या महानगरपालिका शहरातील ग्राहकांना मालमत्तेच्या बांधकामाच्या प्रकारानुसार पाणी दर आकारणी करीत असुन हे दर खालीलप्रमाणे आहेत'

| **अक्र** | **बांधकामाचा प्रकार** | **दर** |
|---|---|---|
| अ | आर.सी.सी. व टिअर गर्डर बांधकाम इमारती | रु. ३०० प्रतिमहा |
| ब | पत्र्याचे छत व विट बांधकाम | रु. १५० प्रतिमहा |
| क | झोपडपट्टी धारक, लफाटा किंवा पत्र्यांचे छत असलेले झोपडे, मातीचे झोपडे | रु. १०० प्रतिमहा |

महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण, २००९/प्र.क्र.२०७/०९/न.वि.२० दि. ०२/०८/२०१० मध्ये नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पाणी पुरवठा व मलनि:सारण योजनांचे संचलन, व्यवस्थापन, देखभाल व दुरुस्ती कार्यक्षम व स्वयंपुर्ण होण्याच्या दृष्टीने पिण्याच्या पाण्याचे व मलनि:सारणाचे संयुक्तिक दर आकारणे व अनुषंगिक उपाय योजना करण्याबाबत मार्गदर्शक तत्वे दिली आहेत. त्याप्रमाणे पाणी पुरवठा सेवांवरील वाढत जाणारा खर्च लक्षात घेता, पाणीपट्टी दरात वाढ करणे क्रमप्राप्त आहे. अधिनियमाचे कलम १३४ (१)(ब) मधील तरतुदी लक्षात घेऊन सन २०२२-२३ या आर्थिक वर्षासाठी निवासी मिळकतीवर आकारावयाच्या पाणीपट्टी कराचे दर खालीलप्रमाणे प्रस्तावित करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | बांधकामाचे स्वरुप | प्रचलीत दर | उत्पन्न | | | सन २०२२-२३ चे प्रस्तावित दर | उत्पन्न | | | वाढ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | सदनीका | दर | रक्कम | सदनीका | सदनीका | दर | रक्कम | |
| १ | आर.सी.सी. व टिअर गर्डर बांधकाम इमारती | रु. ३०० पर्यत महा रु. ३६०० प्रतिवर्ष | ५१३२२ | ३६०० | १८४७,५९,२०० | रु. ६०० पर्यत महा रु. ७२०० प्रतिवर्ष | ५१३२२ | ७२०० | ३६,९५,१८,४०० | १८,४७,५९,२०० |
| २ | पत्रयाचे छत व विट बांधकाम | रु. १५० पर्यत महा रु. १८०० | ६७५९८ | १८०० | १२,१६,७६,४०० | रु. ५०० पर्यत महा रु. ६००० | ६७५९८ | ६००० | ४०,५५,८८,००० | २८,३९,११,६०० |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रतिवर्ष | | | | प्रतिवर्ष | | | | |
| ३ | झोपडपट्टी धारक, लफाटा किंवा पत्र्यांचे छत असलेले झोपडे, मातीचे झोपडे | रु. १०० पर्यत महा रु. १२०० प्रतिवर्ष | १६५८८ | १२०० | १,९९,०५,६०० | रु. ४०० पर्यत महा रु. ४८०० प्रतिवर्ष | १६५८८ | ४८०० | ७,९६,२२,४०० | ५,९७,१६,८०० |
| | एकुण उत्पन्न :- | | | | ३२,६३,४१,२०० | एकुण उत्पन्न :- | | | ८५,४७,२८,८०० | ५२,८३,८७,६०० |

सदर वाढ मान्य केल्यास महापालिकेस रु. ५२ कोटी अतिरिक्त उत्पन्न मिळेल. व हळुहळु पाणी पुरवठा योजना स्वयंपुर्ण होवुन शकेल.

व्यापारी मिळकतींवर करयोग्य मुल्याच्या टक्केवारीने पाणीपट्टी व पाणी पुरवठा लाभकर आकारणे प्रस्तावित असुन त्याचा समावेश मालमत्ता कर प्रस्तावात करण्यात आला आहे.

२) जे नळ जोडणी धारक मिटरद्वारे मोजणी करुन पाणी पुरविण्याची मागणी करतील, अशा निवासी / अनिवासी नळजोडणीसाठी पुढील प्रमाणे दर प्रस्तावीत करण्यात येत आहेत.

| | | दर प्रति १००० लिटर | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | व्यापराचा प्रकार | प्रचलित दर (रुपये) | प्रस्तावित दर (रुपये) |
| १ | निवासी | १४/- | १६/- |
| २ | अनिवासी अ) वाणिज्य | ३९/- | ४३/- |
| | ब) औद्योगिक | ३९/- | ४३/- |
| | क) सार्वजनिक संस्था | २२/- | २५/- |

अ) मिटर चालु स्थितीत प्रति महा किमान आकारणी

| | | वाणिज्य | | घरगुती | | विशेष | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | व्यास (मी.मी.) | प्रचलित.दर | प्रस्तावित दर. | प्रचलित.दर | प्रस्तावित दर. | प्रचलित.दर | प्रस्तावित दर. |
| १ | १५ | ७०२ | ७७३ | १९० | २१० | २९८ | ३३० |
| २ | २० | १२९२ | १४२२ | ३५१ | ४२० | ५५१ | ६६१ |
| ३ | २५ | १८७२ | २०६० | ५०५ | ६३५ | ७९४ | ९९२ |
| ४ | ३२ | २८०८ | ३०९० | ७५८ | ९८५ | ११९१ | १५४८ |
| ५ | ४० | ४९१४ | ५४१० | १३३४ | १९०० | २०९५ | २७३० |
| ६ | ५० | ६२६० | ६८९० | १६८५ | २३६० | २६४६ | ३५७० |
| ७ | ६५ | ७६१० | ८३७० | २१०६ | ३०५० | ३२१९ | ४५०० |
| ८ | ८० | ६६६० | १०६५६ | १५०० | ३१५० | ६६६० | ९९९० |
| ९ | १०० | ६६६० | ११३२२ | १५०० | ३३०० | ६६६० | १०६५६ |
| १० | १५० | ६६६० | ११९८८ | १५०० | ३४५० | ६६६० | ११३२२ |

ब) मिटर नादुरुस्त स्थितीत किमान आकारणी :

| | | वाणिज्य | | घरगुती | | विशेष | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | व्यास (मी.मी.) | प्रचलित.दर | प्रस्तावित दर. | प्रचलित.दर | प्रस्तावित दर. | प्रचलित.दर | प्रस्तावित दर. |
| १ | १५ | १०५३ | ११५८ | २५३ | २८० | ४६३ | ५०९ |
| २ | २० | १९५० | २१४५ | ४२१ | ५१० | ८५० | १०२० |
| ३ | २५ | २८०८ | ३०९० | ६७४ | ८५० | १२३५ | १५५० |
| ४ | ३२ | ५०७० | ५५७० | १२२१ | १५९० | २२४३ | २९२० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | ४० | ७४१० | ८१०० | १७६९ | २३९० | ३२९३ | ४४४५ |
| ६ | ५० | ९०७८ | ९९०० | २५२७ | ३५३० | ३६३८ | ५०९३ |
| ७ | ६५ | १०१४७ | ११६०० | २७३८ | ३९७० | ४४७६ | ६४९० |
| ८ | ८० | ६६६० | १०६५६ | १५०० | ४१२५ | ६६६० | ९९९० |
| ९ | १०० | ६६६० | ११३२२ | १५०० | ४५०० | ६६६० | १०६५६ |
| १० | १५० | ६६६० | ११९८८ | १५०० | ४८७५ | ६६६० | ११३२२ |

**स्पष्टीकरण :**

**अ) <u>वाणिज्य वापर</u>** :- यामध्ये सर्व प्रकारची दुकाने, गोडाऊन, वेअर हाऊस, पेट्रोल पंप, सॉ मिल, ट्रान्सपोर्ट ऑफिस, रुग्णालये, दवाखाने, उपहारगृहे, विश्रामगृहे, परमिट रुम, बिअर बार, सिनेमागृहे, मंगल कार्यालये, तबेले, जलतरण तलाव, केस कर्तनालये, गॅरेजेस ( धुण्याची सुविधा नसलेले), यंत्रमाग (पॉवर लुम्स) व ज्या उद्योगांमध्ये प्रक्रिया करण्यासाठी प्रत्यक्षात पाण्याचा वापर करण्यात येत नाही असे उद्योग व धंदे, इमारतीचे बांधकामासाठी वापरण्यात येणारे पाणी इत्यादींचा समावेश असेल.

**ब) <u>ओद्योगिक वापर</u>** :- ज्या उद्योगामध्ये प्रक्रिया करण्यासाठी प्रामुख्याने पाण्याचा वापर होतो असे सर्व उद्योग, केमिकल कंपन्या, सर्विस स्टेशन्स, सर्विस स्टेशनसह वाहन दुरुस्ती केंद्र (गॅरेज), बर्फ कारखाने, टाईल्स व मार्बल कारखाने, लॉड्रीज, धोबीघाट (कपडे धुण्याचे ठिकाण), विट-भट्टया, नर्सरी, इत्यादींचा समावेश असेल.

**क) <u>सार्वजनिक संस्था</u>** :- यामध्ये नोंदणीकृत शाळा महाविद्यालये, धर्मशाळा, धर्मादाय संस्था चालवित असलेले रुग्णालये इत्यादींचा समावेश असेल. नळजोडणीचे मीटर नादुरुस्त असल्यास किंवा बंद असल्यास मिटर असलेल्या लगतच्या तीन महिन्यातील पाण्याचा सरासरी वापर लक्षात घेवुन वरीलप्रमाणे आकारणी करण्यात येईल. सध्यास्थितीत अनिवासी वापर होत असलेल्या जागांसाठी ज्यामध्ये नळ जोडणी आहे अशा मिळकत धारकंाना वरीलप्रमाणे आकारणी करण्यात येते. अशा मिळकत धारकांना अंदाजित ४.०० एम.एल.डी.प्रति दिवस पाणी पुरवठा होत आहे. त्यामुळे उपरोक्त दर मान्य केल्यास रु. ३.०० कोटी उत्पन्नात वाढ होण्याची शक्यता आहे व मीटरद्वारे होणाऱ्या पाणी पुरवठा सेवापासुन अंदाजे एकुण रु. ७.०० कोटी एवढे उत्पन्न मिळेल.

तरी उपरोक्त १ व ३ प्रमाणे पाणी पुरवठा दरवाढ मान्य केल्यास पाणी पुरवठा सेवेपासुन वार्षिक मागणी अंदाजे रु. ५५.०० कोटी अतिरिक्त उत्पन्न मिळेल. पाणीपट्टी दराबरोबरच नळजोडणी अनामत, नळजोडणी फी, खोदलेला खड्डा व रस्ता पुर्ववत करण्यासाठी येणाऱ्या खर्चाची वसुली करण्यासाठी दर निश्चित करणे आवश्यक आहे.

नवीन नळ जोडणी करणे किंवा खंडीत करण्यात आलेल्या नळ जोडणींची पुर्नजोडणी करणे यासाठी खालील प्रमाणे शुल्क आकारण्यात यावे असे प्रस्तावित आहे.

| अ.क्र. | आकार (मि.मी.) | नवीन नळ जोडणी | | नळसंयोजकांची जोडणी व तोडणी | | खड्डा खांदणे | | रस्ता खोदाई खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रचलीत | प्रस्तावित | प्रचलीत | प्रस्तावित | प्रचलीत | प्रस्तावित | |
| १ | १५ | १०० | २०० | १०० | २०० | १००० | १००० | अ) प्रति मिटर रु. ३५०/ कच्च्या रस्त्यासाठी<br>ब) प्रति मिटर रु. ७००/डांबरी रस्त्यासाठी<br>क) प्रतिमिटर रु. १५००/कॉंक्रिट रस्त्यांसाठी |
| २ | २० | १५० | ३०० | १५० | ३०० | १००० | १००० | |
| ३ | २५ | २०० | ४०० | २०० | ४०० | १००० | १००० | |
| ४ | ४० | ३०० | ६०० | ३०० | ६०० | १००० | १००० | |
| ५ | ५० | ५० मी.मी. किंवा त्यापेक्षा जास्त प्रत्येक संयोजकाच्या स्थितीनुसार अंदाजित केल्या प्रमाणे १००० . | | | | १००० | १००० | |

नळ जोडणी अनामत रक्कम

| अ.क्र. | आकार | घरगुती वापरासाठी दर | | बिगर घरगुती वापरासाठी दर | | सार्वजनिक संस्था व सरकारी संस्था दर | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रचलित.दर | प्रस्तावित दर. | प्रचलित.दर | प्रस्तावित दर. | प्रचलित.दर | प्रस्तावित दर. |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १५ मि.मी. | १००० | २००० | ४००० | ८००० | २००० | ४००० |
| २ | २० मि.मी. | १८०० | ३६०० | ६००० | १२००० | ३६०० | ७२०० |
| ३ | २५ मि.मी. | ३००० | ६००० | १०००० | २०००० | ५२०० | १०४०० |
| ४ | ३२ मि.मी. | ७५०० | १५००० | २०००० | ४०००० | १२००० | २४००० |
| ५ | ४० मि.मी. | ९००० | १८००० | ३०००० | ६०००० | १६००० | ३२००० |
| | | प्रत्येक जलवाहिन्या वाहनधारक क्षमतेच्या तीन किंवा त्यापेक्षा जास्त महिनयाच्या देयकारवर आधारित | | | | | |

मीटर तपासणी फी :

| अ.क्र. | नळ जोडणीचा आकार | तपासणी फी | | संयोजकावरुन मीटर काढण्याचे शुल्क | |
|---|---|---|---|---|---|
| | | प्रचलित (रुपये) | प्रस्तावित (रुपये) | प्रचलित (रुपये) | प्रस्तावित (रुपये) |
| १ | १५ मि.मी. | १०० | २०० | १०० | २०० |
| २ | २० मि.मी. | १५० | ३०० | १५० | ३०० |
| ३ | २५ मि.मी. | २०० | ४०० | २०० | ४०० |
| ४ | ४० मि.मी. | ३०० | ६०० | ३०० | ६०० |
| ५ | ५० मि.मी. | ५०० | १००० | ५०० | १००० |
| ६ | ८० मि.मी. | ५०० | १००० | ५०० | १००० |
| ७ | १०० मि.मी. ते ३०० मि.मी. पर्यंत | | १५०० | | १५०० |

इतर फी :

| अ.क्र. | नळ जोडणीचा आकार | तपासणी फी | |
|---|---|---|---|
| | | प्रचलित (रुपये) | प्रस्तावित (रुपये) |
| १ | Noc No Dues Certificate | २० | १०० |
| २ | Duplicate Water Bills | १० | २५ |
| ३ | Plumbing License I) New Plumbing License | ५००० | १०००० |
| | II) Annual Renewal Fee | १००० | ५००० |
| | III) Delayed Annual Renewal Penalty | ..... | ५०० प्रति महा |
| | Permission for drainage connection fee (excluding road cutting permission and charges) | ५०० | १००० |
| | Regularisation of illegal water connection<br>I) For Domestic Water Connection<br>II) For Non Domestic Water Connection | | Equivalent to sanctioned legal connection amount of relevant dia + penalty as Equal to Security deposit.<br>=do =<br>water bill for the period from which water is consumed |

१) मा. महासभेचा ठराव क्र. ३४ दि. १३/०७/२००७ अन्वये, जवाहरलाल नेहरु नागरी पुर्ननिमार्ण अभियाना अंतर्गत सक्तीच्या सुधारणामधील उपभोक्ता शुल्क व सेवांचे दर प्रत्यक्ष खर्चावर आधारीत ठरविणे आवश्यक असल्याने सध्या पाणी पुरवठ्याचे दर त्या मधुन मिळणारे उत्पन्न पहाता पाण्याच्या दरात वाढ करणे अंत्यत गरजेचे आहे. सबब, वित्तीय वर्ष २०२२-२०२३ साठी प्रस्तावित पाणीपट्टीचे दरास मा. स्थायी समितीचे मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

**<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> १२४** **दिनांक ०४/०२/२०२२**

**सुचकाचे नाव :-श्री. चंद्रशेखर यादव**

**अनुमोदकाचे नाव :-श्री. जमनादास परस्वानी**

**ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत वित्तीय वर्ष सन २०२२-२३ साठी पाणीपट्टीचे दर निश्चित करणेबाबत दरात वाढ न करता प्रस्ताव अमान्य करुन मागील वर्षाचे जसे आहे तसे दर ठेवण्यास मान्यता देवून महासभेपुढे तशी शिफारस करीत आहे.**

**सुचकाची सही /-**

**अनुमोदकाची सही /-**

**सर्वानुमते**

**सभापती/पीठासीन अधिकारी**
**स्थायी समिती सभा**
**उल्हासनगर महानगरपालिका**

-----------------------------------------------------------------------------------------------------

**महासभा ठराव क्र. ६१** **दिनांक १८/०२/२०२२**

**सुचकाचे नाव :-श्री. कलवंतसिंह सोहता**

**अनुमोदकाचे नाव :-श्री. किशार वनवारी**

**ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे वित्तीय वर्ष सन २०२२-२३ साठी पाणीपट्टीचे दर निश्चित करणे दरात वाढ न करता स्थायी समिती ठराव क्र. १२१, दिनांक ०४/०२/२०२२ कायम करीत आहे.**

**या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.**

**सुचकाची सही /-**

**अनुमोदकाची सही /-**

**सर्वानुमते**

**महपौर/पीठासीन अधिकारी**
**सर्वसाधारण महासभा**
**उल्हासनगर महानगरपालिका**

---

महापालिका सचिव:— विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

———————————————————————————————————————

⇨ विषय क्र. ६ :— **o"kZ 2022&2023 ;k vkfFkZd o"kkZdfjrk ekydh@okjl gDdkaps gLrkarj.k izdj.kkr uko gLrkarj.k 'kqYdkr ok<** करणेच्या स्थायी समिती ठराव क्र. १२१ दिनांक ०४/०२/२०२२

बाबत महासभेपुढे निर्णय घेणे.

———————————————————————————————————————

**महापालिका सचिव:-** आता पिठासीन अधिकारी यांनी पास सांगितले आहे. जर कोणाला बोलायचे असेल तर बोला नाही तर हा विषय पास समजण्यात येईल. जसे स्थायी समितीने पास केले तसे इतिवृत्ताची वाट न पाहता.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-** पास आहे.. पास आहे.

**महापालिका सचिव :-** ठिक आहे. हो जसे स्थायी समितीने पास केले तसे. इतिवृत्ताची वाट न पाहता पास.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी:—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑ <u>विषय क्र.६ :-</u> **o"kZ 2022&2023 ;k vkfFkZd o"kkZdfjrk ekydh@okjl gDdkaps gLrkarj.k izdj.kkr uko gLrkrj.k 'kqYdkr ok<** करणेच्या स्थायी समिती ठराव क्र.१२१, दिनांक ०४/०२/२०२२ बाबत महासभेपुढे निर्णय घेणे.

**<u>प्रस्तावना</u>**

**1**½egkjk"Vª egkuxjikfydk vf/kfu;ekps dye 127 o 129 rlsp vuqlwfprhy izdj.k 8 ¼djk/kku fu;e½ e/khy rjrqnhuqlkj egkuxjikfydk {ks=kr vfLrRokr vlysY;k bekjrh o tfeuhaoj **^^ekyeRrk dj**** vkdkj.kh dj.;kr ;srs- ekyeRrk dj olqyhP;k iz;kstukFkZ **^^ekyeRRkk dj ns.;kl izFker% ik= O;Drhps ukokph uksan**** vko';d vkgs- R;kvuq"kaxkus djk/kku fu;ekrhy rjrqnha iq<hyizek.ks vkgsr-

**fu;e 1- ekyeRRkk dj ns.;kl izFker% ik= vlysY;k O;DrhP;k ekydh gDdkP;k loZ gLrkarj.kklaca/kh vk;qDrkl uksVhl ns.ks &&**¼1½dks.kR;kgh tkxsP;k laca/kkr ekyeRrk dj ns.;kl izFker% ik= vlysY;k dks.kR;kgh O;DrhP;k v'kk tkxslaca/khP;k fdaok v'kk tkxsojhy ekydh gDdkps gLrkarj.k dj.;kr ;sbZy rsOgk rsOgk T;k O;DrhP;k ekydh gDdkps vls gLrkarj.k dj.;kr ;sbZy R;k O;Drhus vkf.k T;k O;DrhdMs mDr ekydh gDdkps gLrkarj.k dj.;kr ;sbZy R;k O;Drhus] gLrkarj.k lays[k d:u ns.;kr vkY;kuarj fdaok R;kph uksan.kh dj.;kr vkyh vlsy rj R;kP;k uksan.khuarj fdaok dks.krkgh ys[k d:u ns.;kr vkyk ulsy rj v'kk jhrhus gLrkarj.k dj.;kr vkY;kuarj] rhu efgU;kaP;k vkr gLrkarj.kklaca/kh vk;qDrkl ys[kh uksVhl fnyh ikfgts-

¼2½ oj lkafxrY;kizek.ks izFker% dj ns.;kl ik= vlysyh dks.krhgh O;Drh ej.k ikoY;kl e;r O;DrhP;k ekydh gDdkps] okjl Eg.kqu fdaok vU;Fkk T;k O;DrhdMs gLrkarj.k dj.;kr ;sbZy R;k O;Drhus e;r O;DrhP;k e`R;qiklqu ,d o"kkZP;k vkr v'kk gLrkarj.kklaca/kh vk;qDrkl uksVhl fnyh ikfgts-

**2**½mYgkluxj egkuxjikfydk vkfFkZd mRiUukpk eq[; L=ksr vlY;kus dj vkdkj.kh iqLrdkr QDr **^^ekyeRrk dj olqyhP;k iz;kstukFkZ**** ekyeRRkk dj ns.;kl izFker% ik= O;Drhps ukokph uksan dj.;kr ;srs-

**3**½mYgkluxj egkuxjikfydk {ks=kr vankftr 1-77 yk[k feGdrh vfLrRokr vlqu ekyeRrk dj vkdkj.kh o olqyh O;oLFkkiu rlsp R;klaca/kh brj ckchaph iqrZrk dj.kslkBh feGdrhaph foHkkx.kh 1 rs 58 izHkkxkr dj.;kr vkysyh vkgs- rlsp izHkkxkps O;oLFkkiuklkBh izHkkxkaps ,dq.k 8 ;qfuV e/;s foHkktu dj.;kr vkyss vlqu izR;sd ;qfuV e/;s 10 izHkkx vkgsr- izR;sd izHkkxkr vankftr feGdrhaph la[;k 3500 fdaok R;kis{kk vf/kd vkgs- izfro"khZ vankftr 4000 vtZ ekyeRrk dj ns.;kl izFke ik= O;Drhaps ukokr cny dj.kslkBh nk[ky dsys tkrkr-

**4**½o"kZ 2012&2013 e/;s uko gLrkarj.k 'kqYdkr ok< dj.;kr vkyh gksrh- rnuarj uko gLrkarj.k 'kqYd ok<hckcr izLrko osGksosGh LFkk;h lferhiq<s lknj dj.;kr vkyk gksrk- ijarq lnjpk izLrko vekU; dj.;kr vkyk vkgs- R;kpk rif'ky iq<hyizek.ks vkgs-

| v-Ø | Rkif'ky | o"kZ 2012&2013 | o"kZ 2020&2021 | o"kZ 2021&2022 | o"kZ 2022&2023 djhrk izLrkfor 'kqYd | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | fuoklh | vfuoklh |
| 1 | okjlk gDdkus feGdrh gLrkarj.k dj.ks | fdeku :- 500@& deky dj;ksX; eqY;kP;k 2 VDds ;kiSdh ts tkLr vlsy rs | fdeku :- 500@& deky dj;ksX; eqY;kP;k 2 VDds ;kiSdh ts tkLr vlsy rs | fdeku :- 500@& deky dj;ksX; eqY;kP;k 2 VDds ;kiSdh ts tkLr vlsy rs | :- 1]000@& | :- 2]500@& |
| 2 | okjlk gDdkO;frfjDr feGdrh gLrkarj.k dj.;kl ijokuxh feG.ksckcr | **fdeku** :- 500@& **deky** dj;ksX; eqY;kP;k 2 VDds **;kiSdh ts tkLr vlsy rs** | **fdeku** :- 500@& **deky** dj;ksX; eqY;kP;k 2 VDds **;kiSdh ts tkLr vlsy rs** | **fdeku** :- 500@& **deky** dj;ksX; eqY;kP;k 2 VDds **;kiSdh ts tkLr vlsy rs** | **fdeku** :- 1]500@& **deky** dj;ksX; eqY;kP;k 2 VDds **;kiSdh ts tkLr vlsy rs** | **fdeku** :- 3]500@& **deky** dj;ksX; eqY;kP;k 2 VDds **;kiSdh ts tkLr vlsy rs** |

**5½** o"kZ 2012&2013 rs 2021&2022 ;k dkyko/khr uko gLrkarj.k 'kqYdk}kjs egkuxjikfydsl izkIr >kysY;k mRiUukpk rif'ky iq<hyizek.ks vkgs-

| v-Ø | o"kZ | izkIr mRiUu :- ¼vkdMs gtkjkr½ |
|---|---|---|
| 1 | 2012&2013 | 2816 |
| 2 | 2013&2014 | 2508 |
| 3 | 2014&2015 | 1079 |
| 4 | 2015&2016 | 3058 |

| | | |
|---|---|---|
| 5 | 2016&2017 | 2161 |
| 6 | 2017&2018 | 2856 |
| 7 | 2018&2019 | 2956 |
| 8 | 2019&2020 | 2199 |
| 9 | 2020&2021 | 1607 |
| 10 | 2021&2022 | 9141 |

**6½** o"kZ 2022&2023 djhrk izLrkfor njkizek.ks uko gLrkarj.k 'kqYdk}kjs egkuxjikfydsl vankftr izklr gks.kk&;k mRiUukpk rif'ky iq<hyizek.ks vkgs-

| **v-Ø** | **Rkif'ky** | **fuoklh** | **vfuoklh** | **vankftr izklr mRiUu** |
|---|---|---|---|---|
| 1 | okjlk gDdkus feGdrh gLrkarj.k dj.ks | :- 2]60]000@& | :- 3]50]000@& | **:- 6]10]000@&** |
| 2 | okjlk gDdkO;frfjDr feGdrh gLrkarj.k dj.;kl ijokuxh feG.ksckcr | :- 35]10]000@& | :- 44]10]000@& | **:- 79]20]000@&** |
| **,dq.k vankftr izklr mRiUu** | | **:- 37]70]000@&** | **:- 47]60]000@&** | **:- 85]30]000@&** |

rjh **o"kZ 2022&2023 iklqu** ekyeRrk dj olqyhP;k iz;kstukFkZ ^^ekyeRRkk dj ns.;kl izFker% ik= O;Drhps ukokph uksan**dj.kslkBh ojhyizek.ks izLrkfor dsysizek.ks **^^uko gLrkarj.k 'kqYd ok<**** dj.ksckcrpk izLrko LFkk;h lferhiq<s eatqjhdjhrk lknj dj.;kr ;sr vkgs-

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> १२१ दिनांक ०४/०२/२०२२

सुचकाचे नाव :- श्री. चंद्रशेखर यादव

अनुमोदकाचे नाव :- श्री. जमनादास परस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत प्रशासनाने प्रस्तावित केलेल्या वर्ष् २०२२-२०२३ या आर्थिक वर्षाकरीता मालकी/वारस हक्कांचे हस्तांतरण प्रकरणात नाव हस्तांतरण शुल्क दरात वाढ न करता प्रस्ताव अमान्य करुन मागील वर्षाचे जसे आहे तसे दर ठेवण्यास मान्यता देवून महासभेपुढे तशी शिफारस करीत आहे.

सुचकाची सही /-

अनुमोदकाची सही /-

**सर्वानुमते**

**सभापती/पीठासीन अधिकारी**
**स्थायी समिती सभा**
**उल्हासनगर महानगरपालिका**

---

**महासभा ठराव क्र. ६२** **दिनांक १८/०२/२०२२**

**सुचकाचे नाव :-श्री. कलवंतसिंह सोहता**

**अनुमोदकाचे नाव :-श्री. किशार वनवारी**

**ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे वर्ष् २०२२-२०२३ या आर्थिक वर्षाकरीता मालकी/वारस हक्कांचे हस्तांतरण प्रकरणात नाव हस्तांतरण शुल्क दरात वाढ न करता स्थायी समिती ठराव क्र. १२१, दिनांक ०४/०२/२०२२ कायम करीत आहे.**

**या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.**

**सुचकाची सही /-**

**अनुमोदकाची सही /-**

**सर्वानुमते**

**महपौर/पीठासीन अधिकारी**
**सर्वसाधारण महासभा**
**उल्हासनगर महानगरपालिका**

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ७ वाचुन दाखवितात

---

⇨ विषय क्र. ७ :— **श्री. युवराज धोंडू भदाणे, जनसंपर्क अधिकारी यांच्या जन्मतारखेबाबत. चौकशी अहवालाच्या अनुषंगाने कारवाई करण्याबाबत.**

---

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-** नाही नाही चर्चा करायची आहे. आधी अधिकारींना बोलवा.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव :-** आपण आधी बोला मग अधिकारी येतील.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-** नाही नाही आधी अधिकारींना बोलवा अधिकारी आल्यावर चर्चा करेल.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-** अधिकारी खुलासा तर करतील.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** उपआयुक्त् (मुख्यालय)

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** भुल्लर महाराज आपण बोला उप आयुक्त् आले आहेत.

**सदस्य, श्री. स्वप्नील बागूल:-** इतिवृत्ताची वाट न पाहता.

**उप आयुक्त् (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे** :- मा. महापौर मॅडम, मा. उप महापौर, मा. आयुक्त् साहेब, मा. सदस्य विषय क्र. ७ हा आज आपल्या मान्यतेकरीता सादर करण्यात आलेला आहे. या विषयाच्या अनुषंगाने सर्व कार्यवाही जी आहे मी या महानगरपालिकेत कार्यरत होण्यापुर्वी पुर्ण झालेली होती. मी महापालिकेत नियुक्त् झाल्यानंतर मा. आयुक्त् साहेबांनी या विषयी समिती गठित करण्यात आली. ती समिती माझ्या अध्यक्षतेखाली नेमली. आणि आमच्या या चार सदस्य समितीने जे अगोदरच अभिलेख उपलब्ध झालेले

होते. त्या अभिलेखाची आम्ही तपासणी केली. उपलब्ध अभिलेखाच्या अनुषंगाने आम्ही जवळपास ११५-११७ पानांचा अहवाल तयार केला. व तो मा. आयुक्त् साहेबांना सादर केला. जे कर्मचारी आहेत त्यांना तो अहवाल बजावण्यात आलेला आहे. अहवाल तयार करताना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात आलेली आहे. अहवालाच्या अनुषंगाने जे म्हणणे सादर करण्यात आले आहे. त्यांचे म्हणणे आम्ही पुर्णत: अहवालात विचारात घेतलेले आहे. जे पुरावे प्रशासनाकडे उपलब्ध झालेले आहेत. त्या पुराव्याच्या अनुषंगाने जे कर्मचारी होते त्यांनी कोणत्याजी प्रकारे पुरावे अवैध आहेत. चुकीचे आहेत याबाबत कुठलाही उल्लेख केलेला नाही. कुठलेही पुरावे अमान्य आहेत किंवा स्विकृत आहेत. असे कुठेही आजपर्यंत त्यांच्या म्हण्ण्यानुसार सांगितलेले त्यानंतर या अहवालाच्या अनुषंगाने आयुक्त् साहेबांनी

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-** सचिव मॅडम सारखे-सारखे म्युट करु नका.

**महापालिका सचिव :-** यात माझा काहीही संबंध नाही. हे टेक्नीकल स्टाफचे काम आहे माझे नाही. आपला आवाज ऐकू येत आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-** उपआयुक्त् साहेब उत्तर दया.

**उप आयुक्त् (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे** :- यानंतर मी अहवाल संबंधीतांना बजावण्यात आला. संपुर्ण अहवाल प्रशासनाने बजावला आहे. संपुर्ण अहवालाचे वाचन करुन त्यांनी त्यांचे म्हणणे सादर केलेले आहे. अहवालातील कोणतेही म्हणणे त्यांनी कायदेशीर वैध असा पुरावा सादर करुन त्या अहवालातील म्हणणे खोडून काढलेले नाही. अमान्य केलेले नाही आहे. ते वैधरित्या सिध्द झालेले आहे. त्या वैधतेच्या आधारे आम्ही हा गोषवारा संपुर्ण स्थिती मांडून आपल्यासमोर आणलेला आहे. परत आणखी जास्तीचे या गोषवाऱ्यामध्ये नसलेली बाब आपल्या निदर्शनास मी आणू इच्छितो, जळगाव महापालिकेकडून त्यांनी जळगाव जिल्हा परिषदेकडून त्यांनी जो जन्माचा दाखला दिलेला आहे. जन्माच्या दाखल्याच्या अनुषंगाने जळगाव परिषदेत सुध्दा चौकशी करण्यात आलेली आहे. चौकशीमध्ये त्यांनी जो जन्माचा दाखला दिलेला आहे. तो खाडाखोड करुन चुकीचा असल्याचे सिध्द झालेले आहे. तो सुध्दा अहवाल आमच्याकडे प्राप्त झालेला आहे. या सर्वबाबी उपलब्ध विहित योग्य पुराव्याच्या आधारे आम्ही तयार केलेला आहे. यामध्ये कोणाचेही वैयक्तिक दोषारोप किंवा वैयक्तिक कुठलीही आमची दुश्मनी आहे असे गैरसमज करण्याचा प्रयत्न केला जात आहे. अशाप्रकारचे कोणाचेही वाद किंवा दुश्मनी नाही, कुणाशी वैयक्तिक भांडण आहे असे कुठेही नाही आहे. हे प्रशासनाचे अधिकारी आहेत. आस्थापनाविषयी बाब मी सांभाळत आहे. आयुक्त् साहेब जे मला निर्देश देतात त्या निर्देशानुसार मला काम करणे आवश्यक असते. आणि त्या विहित नियमानुसार ही बाब आम्ही तयार करुन आपल्यासमोर आणलेली आहे. या अनुषंगाने गट ब चे अधिकारी असल्यामुळे त्यास मान्यता देण्यास सक्षम अधिकारी महासभा असल्यामुळे आयुक्त् साहेबांना या अनुषंगाने ५९ अ नुसार पोलीस स्टेशनने आम्हांला गुन्हे दाखल करावे असे निर्देश दिलेले आहेत. ५९ अ नुसार आम्ही गुन्हे दाखल करु शकत होतो. आपल्या महासभेच्या मान्यतेशिवाय परंतु आम्ही तसे न करता प्रथमत: हा संपुर्ण विषय आपल्या सक्षम प्राधिकारी म्हणून मा. महासभेसमोर आम्ही सविस्तर विस्ताराने मांडलेला आहे. आणि तो मान्य करावा, अशी आमची प्रशासनाच्या वतीने विनंती आहे. हे सक्षम प्राधिकारी म्हणुन निर्णय घेणे ही विनंती करीत आहे.

**सदस्य, श्री. विजय पाटील:-** महापौर मॅडम, आयुक्त् साहेब प्रशासनाचा प्रश्न आहे पण प्रशासनाने आपल्यापरीने सोडवावे. तुमचा प्रश्न तुम्ही सोडवा. प्रशासनाचा प्रश्न प्रशासनाने सोडवावा.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव :-** ओके पाटील साहेब ओके.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-** उप आयुक्त् साहेब माझ्या प्रश्नाची उत्तरे दया. आपण चौकशी केली आहे. भरतीचे वेळी वय काय होते. कृपया सांगा.

**उप आयुक्त् (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे** :- हे भरतीचा प्रश्न नाही आहे. आपल्याकडे चुकीचे अभिलेख दाखल केलेले आहेत.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-** नाही नाही आपण सांगितले की भरती होण्याच्या वेळेस वय कमी दाखवले आहे. भरती होण्याच्या वेळेस त्यांचे वय बाद/जास्त होते का ? ते मला सांगा.

**सदस्य, श्री. भारत राजवानी** :- वयाबाबत विचारण्याची गरज काय होती.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-</u>** १९७० पण् रदद झालेला नाही. आणि १९९३ चा महाराष्ट्र शासनाचा जी आर आहे. १९९३ च्या जी आर नुसार वयामध्ये बदल करु शकतो.

**<u>सदस्य, श्री. भारत राजवानी</u>**:- मुळ कागदपत्रे सादर करायला पाहिजेत ना. दुसरे कागदपत्रे का सादर करीत आहेत.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-</u>** दुसऱ्याचा नाही सादर केलेला त्याचे स्वत:चे आहे. मी आपल्याकडून उत्तर मागत नाही. उप आयुक्तांकडून मागत आहे. उप आयुक्त् येथे चर्चा करा.

**<u>सदस्य, श्री. भारत राजवानी</u>** :- आणि कमिटीने ज्या चुका काढल्या आहेत. आणि जे सत्य समोर आणले आहे.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-</u>** ते ऐकत नाहीत. म्हणजे कमिटीला आणि हे अधिकारी पैश्याची मागणी करीत आहे. २००३ मध्ये कक्ष अधिकारी असताना १० हजार घेतले आहेत. माझे झाले नाही. अजून मला बोलायचे आहे.

**<u>उप आयुक्त् (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे</u>**:- माझ्या विरुध्द जे आरोप केले आहेत. ते चुकीचे आहेत. अशाप्रकारे कुठलेही गैर कारभार करत नाही. तुम्हांला या प्रकरणात बाधा होईल. तुम्ही आरोप करुन या प्रकरणाला वेगळी कलाटणी देण्यासाठी तुम्ही हे आरोप करीत आहात. हे मी अमान्य करीत आहे. आणि

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-</u>** महाराजांनी थेट आरोप लावला आहे अशोक नाईकवाडे यांनी पैसे घेतले आहेत. पुरावे दया.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-</u>** आम्ही पुरावे देऊ.

**<u>उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-</u>** भुल्लर महाराजजी हा विषय प्रशासनाने आणलेला आहे चौकशी करुन आणलेला आहे. हा नोकरीचा विषय नाही आहे. हा फक्त जन्म दाखल्यातील फेरफार आहे. जो दाखला बनविण्यात आलेला आहे तो दाखला पुर्ण चुकीचा आहे.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:-</u>** आयुक्त साहेब, महापौर महोदया आपण आपल्याला

**<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-</u>** मला बोलू दया.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:-</u>** आपले पुर्ण झाले आहे आता आम्हांला बोलू दया.

**<u>उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-</u>** विषय असा आहे की, संपुर्ण चौकशी झालेली आहे त्याची बाजू दाखल्यामध्ये १९७० आणि १९७२ असा बदल आहे. हा सध्या नोकरीचा विषय नाही. नोकरीला कोणता दाखला वापरला. जो वापरला आहे तो चुकीचा वापरला आहे असे प्रशासनाने चौकशी करुन आणलेला आहे. म्हणून माझी सगळया सदस्यांना विनंती आहे की, प्रशासनाने आणलेल्या चौकशीला आपण मान्यता दिली पाहिजे. आता नोकरीचा विषय नाही. वारंवार माहिती आपल्या सभेपुढे ठेवली जाते. हा प्रशासनाचा अधिकार प्रशासनाला देण्यास काही हरकत नाही.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी :-</u>** उपमहापौर साहेब तुम्ही अगदी बरोबर बोलत आहेत. पण एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे कोणी जरी एखादया अधिकाऱ्यावर आरोप लावत असेल तर त्याचे पुरावे पण देण्याची ही त्याची जबाबदारी आहे.

**<u>उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-</u>** श्री. विजय पाटील व श्री. प्रदीप रामचदांनी यांनी अर्वाच्च भाषा वापरली. त्यांचा आवाज म्युट करुन टाका. महापौरांनी आदेश दिले आहेत त्या दोघांना काढून टाका. महासभेतून त्यांना काढून टाका. बोडारे साहेब बोला.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-</u>** १९९३ चा जी आर काय बोलत आहे.

**<u>उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-</u>** हा जन्म तारखेचा इश्शु नाही आहे.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-</u>** हा जन्म तारखेचा इश्शु आहे.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव :-** आपण चुकीचे बोलत आहेत. सदस्यांना माझी विनंती आहे हा प्रशासनाने आणलेला जो प्रस्ताव आहे तो मान्य का अमान्य आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-** अमान्य.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** इतिवृत्ताची वाट न पाहता. सांगतात. मान्य करण्यात आला आहे.

**सदस्य, श्री. प्रमोद टाले:-**प्रशासनाने आणलेला हा जो विषय आहे प्रशासनाने मंजूर करावा.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** बोडारे साहेब ठराव वाचा.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:-** अशा प्रकारे कुठलेही जो बेकायदेशीर लावेल त्याला दंड झाला पाहिजे. एक कोण आहे म्हणून नाही पण यापुढे सुध्दा ही कोणी चुकीचे करत असेल आणि प्रशासनाचे ठाम मत झाले असेल. ग्रामपंचायत आणि जळगाव महापालिकेने जो अहवाल दिलेला आहे. महापालिकेने प्रशासनाने आणलेला प्रस्ताव आम्ही कायदेशीर तरतुदीची पुर्तता करुन सदर कर्मचारी यांच्यावर कार्यवाही करण्यासाठी ही महासभा आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-** इतिवृत्ताची कायम झाल्यानंतर.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:-** इतिवृत्ताची वाट न पाहता.

**उपमहापौर, श्री. भगवान भालेराव:-** एफ आय आर दाखल करण्याचे आदेश देत आहे. आणि शिस्त भंगाची कारवाई वेळोवेळी महासभेला सादर करावी. इतिवृत्ताची वाट न पाहता.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-** नाही मॅडम, इतिवृत्तासाठी मतदान घ्या.

**महापालिका सचिव**:- प्रशासनाच्या प्रस्तावास मान्यता देत आहे. तसेच यापुढेही श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी यांच्या सेवाविषयक सर्व बाबींच्या अनुषंगाने नियमानुसार कायदेशीर कार्यवाही करण्याचे अधिकार मा. आयुक्त् यांना देत आहेत. तसेच एफ आय आर दाखल करण्याचे अधिकार देत आहेत. व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल लगतच्या महासभेत कळविणे आवश्यक असेल. या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून इतिवृत्ताची वाट न पाहता थेट अंमलात येईल. हा प्रस्ताव पास सर्व संमतीने.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-** नाही. नाही.

**महापालिका सचिव**:- चार सदस्य मतदानाची मागणी करा.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-**कोणी मतदान म्हणत नाही. महाराजजी आपण एकटेच आहात.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-** चार लोक आहेत.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** दोनच झाले. चार लोकांनी मागणी करा.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:-** पास पास..

**उपमहापौर, श्री. भगवान भालेराव:-** चला. पास. पास. विषय संपला. पुढचा विषय घ्या.

**सदस्य, श्री. मनोज सयानी**:- पुढचा विषय घ्या.

**महापालिका सचिव**:- विषय सर्व संमतीने पास. आता पुढचा विषय घेत आहे.

महापौर तथा पीठासीन अधिकारी:— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र.७ :- श्री. युवराज धोंडू भदाणे, जनसंपर्क अधिकारी यांच्या जन्मतारखे बाबत चौकशी अहवालाच्या अनुषंगाने कारवाई करण्याबाबत.**

<u>प्रस्तावना</u>

श्री. दिलीप मालवणकर, यांनी श्री. युवराज भदाणे, यांची जन्म तारीख दिनांक ०१/०६/१९७२ ऐवजी दि. ०१/०६/१९७० अशी आहे, म्हणून केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने मा. आयुक्त यांच्या दालनात दि. २२/०१/२०२१ रोजी सुनावणी ठेवण्यात आली होती. श्री. युवराज भदाणे यांच्या पत्रामध्ये त्यांची जन्म तारीख दि. ०१/०६/१९७२ म्हणून नोंद आहे. सदर बैठकीतील सुनावणीच्या इतिवृत्तात मा. आयुक्त यांनी खालीलप्रमाणे निर्देशीत केलेल्या महात्वाच्या दोन बाबी आहेत.

(१) सेवा पुस्तकामध्ये जन्म तारीख कशावरुन नोंद करण्यात आली आहे त्याची पडताळणी करण्यात यावी.
(२) श्री. युवराज भदाणे यांचा जन्म तारखेबाबत सत्यता पडताळावी.

२. श्री. मालवणकर यांची तक्रार आणि दिनांक २२/०१/२०२१ रोजी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तास अनुसरुन श्री. युवराज धोंडू भदाणे, जनसंपर्क अधिकारी, उल्हासनगर महानगरपालिका यांच्या जन्मतारखेची चौकशी करण्यासाठी आदेश जा.क्र.उमपा/साप्रवि/आस्था/मुली/९६८/२०२१, दिनांक ०१/०९/२०२१ नुसार खालीलप्रमाणे चौकशी समिती गठीत करण्यात आली होती. सदर चौकशी समितीस जन्मतारखेबाबत चौकशी करुन अहवाल सादर करण्यासाठी निर्देश देण्यात आले होते.

| अ.क्र. | पदनाम | समिती सदस्य पद |
|---|---|---|
| १ | उप आयुक्त (मुख्यालय) | अध्यक्ष |
| २ | मुख्य लेखा परिक्षक | सदस्य |
| ३ | विधी अधिकारी | सदस्य |
| ४ | सहा. आयुक्त (साप्रवि) | सदस्य सचिव |

३. त्यानुसार चौकशी समितीने श्री. युवराज धोंडू भदाणे, जनसंपर्क अधिकारी, यांच्या जन्मतारखेबाबत चौकशी करुन चौकशी अहवाल जा.क्र.उमपा /साप्रवि/आस्था/मुली/११८४/२०२१, दिनांक २७/१०/२०२१ अन्वये मा. आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांच्याकडे सादर केलेला आहे.

४. सदर चौकशी अहवालातील निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत :-

(१)महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्व साधारण शर्ती) नियम १९८१ च्या नियम ३८ (२) मधील तरतुदी विचारात घेता श्री. युवराज भदाणे यांची प्राथमिक, माध्यमिक व महाविद्यालयीन शैक्षणिक संस्थांच्या अभिलेखामध्ये नमुद असलेली जन्म तारीख दिनांक ०१/०६/१९७० जन्म दिनांक म्हणून ही ग्राहय धरणे आवश्यक आहे.

(२)श्री. युवराज भदाणे यांनी त्यांच्या जन्म दिनांक ०१/०६/१९७२ च्या अनुषंगाने विश्वासार्ह वैध पुरावे सादर केलेले नसल्यामुळे ती सेवा अभिलेखासाठी ग्राहय धरण्यात येऊ नये.

(३) श्री. युवराज भदाणे यांनी शाळा सोडल्याचा दाखला महात्मा गांधी शाळेचा दर्शवून आर. के. तलरेजा कॉलेज मार्फत फेरफार करून चूकीची दि. ०१/०६/१९७२ अशी जन्मतारीख नमुद करुन सादर केलेला आहे. तसेच अन्य पुरावे सुध्दा प्रथमदर्शनी संशयास्पद आहेत. अभिलेखामध्ये फेरफार करुन फसवणुक करणे ही बाब फौजदारी स्वरुपाचा गुन्हा आहे.

(४) उक्त सादर केलेल्या सर्व पुराव्यांची तपासणी आणि दिनांक ०१/०६/१९७२ हा जन्म दिनांक कशा प्रकारे धारण केला याबाबतची चौकशी पोलिस विभागामार्फत करुन घेणे आवश्यक आहे.

५. चौकशी समितीने सादर केलेल्या अहवालावर कार्यवाही करण्यापुर्वी श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी, उल्हासनगर महानगरपालिका यांना नैसर्गिक न्यायाची संधी म्हणून चौकशी अहवालावर त्यांचा खुलासा / म्हणणे सादर करण्यासाठी चौकशी अहवाल जा.क्र.उमपा/साप्रवि/आस्था/मुली/१२२४/२०२१, दिनांक

११/११/२०२१ रोजीच्या पत्रान्वये पाठविण्यात येऊन त्या अनुषंगाने सात दिवसांत खुलासा सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. श्री. युवराज भदाणे यांनी प्रस्तुत अहवाल दि. १६/११/२०२१ रोजी प्राप्त झाल्याचे दि. २२/११/२०२१ रोजीच्या पत्रान्वये मान्य केलेले आहे. श्री. भदाणे यांनी चौकशी अहवालावर म्हणने सादर करण्यास दिनांक २२/११/२०२१ रोजीच्या पत्रान्वये मुदतवाढ मिळण्याबाबत विनंती केली. तदनंतर श्री. भदाणे यांनी दिनांक २५/११/२०२१ रोजी त्यांचा खुलासा/म्हणणे सादर केलेले आहे.

६. श्री. युवराज भदाणे यांना देण्यात आलेल्या अंतिम संधीमध्येही त्यांनी दिनांक २५/११/२०२१ रोजीच्या पत्रान्वये चौकशी अहवालातील निष्कर्ष अमान्य केले. परंतु त्या अनुषंगाने अहवालातील शिफारशी व अहवालात विचारात घेण्यात आलेले नियम, अभिलेख, पुरावे या अनुषंगाने ते विहीत पध्दतीने कशा प्रकारे चुकीचे आहेत किंवा त्यांना लागू होत नाहीत याबाबत वैध पुराव्यासह अहवालातील कोणताही भाग किंवा शिफारशी वैध कारणासह अमान्य केलेचे त्यांच्या खुलाशामध्ये नमुद केलेले नाही.

श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी यांनी सादर केलेले दिनांक २५/११/२०२१ रोजीचे म्हणणे व चौकशी समितीने दिनांक २७/१०/२०२१ रोजी सादर केलेला चौकशी अहवाल विचारात घेऊनमा. आयुक्त यांनी श्री. युवराज भदाणे यांचा दिनांक २५/११/२०२१ रोजीचा खुलासा अमान्य करुन, चौकशी अहवाल जा.क्र.उमपा/साप्रवि/आस्था/मुली/१४०२/२०२१ दिनांक १७/१२/२०२१ रोजीच्या आदेशान्वये सर्व शिफारशीसह स्विकृत केला आहे. दि. १७/१२/२०२१ रोजीच्या पत्राची प्रत श्री. युवराज भदाणे यांना देण्यात आलेली आहे. तसेच या अनुषंगाने विहीत नियमान्वये कार्यवाही करणेबाबत उप-आयुक्त (मुख्यालय) यांना निर्देश दिलेले आहेत.

७. श्री. राजेंद्र कोते, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मध्यवर्ती पोलीस ठाणे, यांनी दिनांक २७/०८/२०२१ व ३०/८/२०२१ रोजीच्या पत्रान्वये श्री. मुकेश माखिजा व श्री. दिलीप मालवणकर यांच्या तक्रारी अर्जाच्या अनुषंगाने श्री. युवराज भदाणे, हे उल्हासनगर महानगरपालिकेच्या आस्थानेवर कार्यरत असुन सदर प्रकरणी आपले स्तरावर चौकशी करुन योग्य ती कार्यवाही करावी. तसेच सदर प्रकरणी फौजदारी स्वरुपाचा प्रकार आढळून असल्यास आपले आस्थापनेचे सक्षम अधिकारी यांना तक्रार करणेकामी पोलीस ठाण्यात पाठविणेस विनंती केलेली आहे.

८. सन २००७ मध्ये श्री. युवराज भदाणे यांची नियुक्ती कायम करण्यासाठी प्रशासनाने प्रस्ताव मा. महासभेसमोर सादर केला होता. परंतू, मा. महासभा ठराव क्र. २४, दिनांक २०/६/२००७ अन्वये त्यांना सेवामुक्त करण्याबाबत ठराव पारीत करण्यात आला. सदर ठरावास त्यांनी मा. उच्च न्यायालयात याचिका क्रमांक ४६८५/२००७ अन्वये आव्हानित केले होते. सदर याचिकेत मा. न्यायालयानेदिनांक ४ जुलै, २००७ रोजी स्थगिती आदेश पारीत केलेले आहेत.श्री. दिलीप मालवणकर हे चौकशी अहवालाच्या अनुषगाने तातडीने कार्यवाही करण्यासाठी महाराष्ट्र शासन, महानगरपालिका प्रशासन व पोलिस प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा करत असल्याने उप आयुक्त (विधी), उल्हासनगर महानगरपालिका यांच्याकडून जा.क्र. उमपा/साप्रवि/आस्था/मुली/१४३७/२०२१, दिनांक २३/१२/२०२१ रोजीच्या पत्रान्वये, श्री. युवराज धोंडू भदाणे, जनसंपर्क अधिकारी यांच्या जन्मतारखेबाबत पारित करण्यात आलेल्या जा.क्र.उमपा/साप्रवि/आस्था/मुली/१४०२/२०२१, दिनांक १७/१२/२०२१ रोजीच्या आदेशानुसार चौकशी अहवालात चौकशी समितीने नोंदविलेल्या निष्कर्षच्या अनुषंगाने शिफारशीची अंमलबजावणी करण्यास मा. उच्च न्यायालयाचे दिनांक ०४/०७/२००७ रोजीचा आदेश विचारात घेता काही बाधा येईल किंवा कसे याबाबत अभिप्राय देण्याबाबत विधी विभागास विनंती करण्यात आली होती.

९. मा. उप-आयुक्त (विधी) यांनी जा.क्र.UMC/LD/३४२/२०२१, दिनांक २९/१२/२०२१ रोजीच्या पत्रान्वये ॲड. विजय पाटील विधी सल्लागार यांचे खालीलप्रमाणे अभिप्राय सादर केलेले आहेत.

**"By above mentioned letter you have sought my opinion,whether there is any impediment in taking action against Public Relations Officer, Shri Bhadane on account of order dated 4/7/2007 passed by the Hon'ble High Court in Writ petition No. 4685 of 2007 filed by Shri Bhadane.**

**I have perused the relevant papers. The Writ petition No. 4685 of 2007 filed by Shri Bhadane challenges the order dated 10/5/2007 passed by the Commissioner, UMC staying the order dated 17/4/2007 confirming Shri Bhadane in post of Public Relation Officer, General Body Resolution No.20/6/2007 was passed for relieving Shri Bhadane from service and not confirming his service Both these orders were stayed by the Hon'ble High Court.**

**The present enquiry proceeding is however different and the interim order of Hon'ble High Court does not come in the way of the Corporation in taking action against Shri Bhadane in regard to submission of false birth certificate."**

**१०. श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी यांचा नियुक्ती दिनांक २२/१२/२००३ असून दिनांक १७/१०/२०२१रोजी सादर केलेल्या चौकशी समितीच्या अहवालामध्ये त्यांचा जन्म दिनांक ०१/०६/१९७२ ऐवजी दि. ०१/०६/१९७० असा निश्चित करण्या बाबत शिफारस करण्यात आलेली आहे. श्री. युवराज भदाणे यांनी दिनांक ३०/९/२०२१ रोजीच्या पत्रासमवेत आर. के. तलरेजा महाविद्यालयाचे दिनांक १६/११/१९९५, दिनांक १८/०७/९५ व दिनांक २५/०५/१९९५ रोजीची प्रमाणपत्रे सादर केली असून त्यौपकी दिनांक १६/११/१९९५ आणि दिनांक २५/०५/९५ रोजीच्या प्रमाणत्रामध्ये जन्म दिनांक ०१/०६/१९७२ असा नमुद आहे.**

**तथापि, आर.के.तलरेजा यांच्या दिनांक १८/०२/२०२१ रोजीच्या पत्रानुसार त्यांच्या अभिलेखामध्ये श्री. युवराज भदाणे यांचे नाव जनरल रजिस्टर क्रमांक २२५४ वर असून, त्यांची जन्म तारीख ०१/०६/१९७० अशी असल्याचे कळविले आहे. तसेच प्राथमिक शिक्षण प्रा. म. विद्या मंदिर पळासखेडेसीम, ता. पारोळा, जि. जळगाव या संस्थेत घेतले असून शाळेच्या अभिलेखात जन्म दि. ०१/०६/१९७० असा नमुद आहे. तर माध्यमिक शिक्षण महात्मा गांधी माध्यमिक विद्यालय मंगळूर, ता. पारोळा, जि. जळगाव येथे घेतले असुन या शळेच्या अभिलेखातही जन्म दि.०१/०६/१९७० असा नमुद आहे. श्री. युवराज भदाणे यांनी नियुक्तीच्या वेळी महानगरपालिकेस महात्मा गांधी माध्यमिक विद्यालयाचा शाळा सोडल्याचा दाखला सादर केलेला आहे. श्री. भदाणे यांनी सादर केलेला दाखला आणि महात्मा गांधी माध्यमिक विद्यालयाचा मुळ दाखला विसंगत आहे. श्री. भदाणे यांनी सादर केलेल्या शैक्षणिक संस्थामधील शाळा सोडल्याचा दाखला फेरफार करुन त्यामध्ये चुकीची जन्म तारीख नमुद करुन सादर केल्याचे चौकशी समितीच्या अहवालात स्पष्ट झालेले आहे. त्यांची सदरची कृती फौजदारी कार्यवाहीस पात्र ठरते. सबब, श्री. युवराज भदाणे हे महानगरपालिकेची फसवणूक करुन सेवेत दाखल झालेले असल्याने त्यांच्याविरुध्द फौजदारी कार्यवाही करणे आवश्यक आहे.**

**११. श्री. युवराज भदाणे यांनी राज्यात नोंदणीकृत नसलेल्या विद्यापीठाची PhD (Doctorate) पदवी धारण केली असल्याने त्याबाबत शासनाचे अभिप्राय घेण्यात आले आहेत. महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक संकीर्ण-२०२१/प्र.क्र.४७/विशि-४, दिनांक २० जुलै, २०२१ रोजीच्या पत्रान्वये श्री. युवराज भदाणे यांची पी.एच.डी.पदवी अवैध असल्याबाबत कळविण्यात आल्यामुळे दिनांक २५/९/२०१७ रोजीच्या आदेशान्वये श्री. भदाणे यांच्या नावापूर्वी डॉ. लावण्याबाबतचे आदेश व महानगरपालिकेच्या सेवा अभिलेखामध्ये घेण्यात आलेल्या नोंदी दिनांक ०४/०८/२०२१ रोजीच्या आदेशान्वये रद्द करण्यात आलेल्या आहेत. तसेच, श्री. युवराज भदाणे यांना त्यांच्या नावासमोर Dr. / Doctorate वापरण्यास प्रतिबंध करण्यात आलेला आहे. श्री. युवराज भदाणे हे उल्हासनगर महानगरपालिकेत "गट – ब" संवर्गातील जनसंपर्क अधिकारी या जबाबदारीच्या पदावर कार्यरत असतांना शासन मान्य नसलेल्या विद्यापीठाची पदवी धारण करुन त्यांनी महानगपालिकेची फसवणूक केली असल्याचे स्पष्ट झालेले आहे. श्री. भदाणे यांची कृती समर्थनीय नसल्याने तसेच श्री. राजेंद्र कोते, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मध्यवर्ती पोलीस ठाणे, यांच्या दिनांक २७/०८/२०२१ व ३०/०८/२०२१ रोजीच्या पत्रास अनुसरुन मध्यवर्ती पालिस ठाणे, उल्हासनगर-३ येथेत्यांच्या विरुध्द कारवाई करण्याबाबत सुचित करण्यात आलेले आहे. सबब, श्री. युवराज भदाणे यांची ही कृती नियम बाहय असल्याने पोलिसात गुन्हा नोंद करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे या अनुषंगानेही शिस्तभंग विषयक कारवाई विहित नियमानुसार करण्याचेही प्रस्तावित आहे.**

**<u>सबब, उपरोक्त सर्व वस्तुस्थिती विचारात घेता खालील प्रमाणे मान्यता मिळण्यासाठी प्रस्ताव मा. महासभा पटलावर प्रस्तावित करण्यात येत आहे.</u>**

१) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५३ नुसार गट-ब संवर्गातील अधिका-यांसाठी नियुक्तीसाठीचे सक्षम प्राधिकरण मा. महासभा आहे. श्री. युवराज भदाणे यांनी शासनाने निश्चित केलेली विहीत वयोमर्यादा पार केल्यांनतर प्राथमिक, माध्यमिक व महाविद्यालयीन शैक्षणीक संस्थांच्या अभिलेखामध्ये जन्म तारीख दिनांक ०१/०६/१९७० नोंद असतांना शाळा सोडल्याचा दाखला महात्मा गांधी शाळेचा दर्शवून आर. के. तलरेजा कॉलेज मार्फत त्यांच्या स्तरावर फेरफार करून चूकीची दि. ०१/०६/१९७२ अशी जन्मतारीख नमुद करुन वयोमर्यादेत बसत असल्याचे दर्शवून महानगरपालिकेची फसवणूक केल्याने तसेच गट — ब संवर्गामधील जनसंपर्क अधिकारी या जबाबदारीच्या पदावर कार्यरत असतांना शासन मान्य नसलेल्या विद्यापीठाची पदवी धारण करुन महानगपालिकेची फसवणूक केली असल्याने कलम ५३ नुसार श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी(गट-ब) यांच्या विरूध्द विहित कलमान्वये पोलिसात गुन्हा दाखल करण्यास मान्यता मिळावी.

२) गुन्हे दाखल करण्यास सहा. आयुक्त (साप्रवि) यांना प्राधिकृत करण्यास मान्यता असावी.

महासभा ठराव क्र. ६३ दिनांक १८/०२/२०२२

सुचकाचे नाव :- श्री .धनंजय बोडारे

अनुमोदकाचे नाव :- श्री. दिपक सिरवानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे एफ. आय. आर दाखल करण्याच्या प्रशासनाच्या प्रस्तावास मान्यता देत आहे.

## तसेच

यापुढे श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी यांच्या सेवाविषयक सर्व बाबीच्या अनुषंगाने नियमानुसार कायदेशीर कार्यवाही करण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना देत आहे. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल लगतच्या महासभेस कळविणे आवश्यक असेल.

या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही /-

अनुमोदकाची सही /-

मंजुर

महपौर/पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ८ वाचुन दाखवितात

---

⇨ विषय क्र. ८ :— **सन २०२१-२२ या आर्थीक वर्षासाठी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेअंतर्गत मंजूरी मिळालेली कामे मा.महासभेची मान्यतेकरीता सादर करणेबाबत.**

---

**<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया</u>**:- नाही. नाही. मॅडम, मला बोलू दया.

**<u>महापालिका सचिव</u>**:- बोलण्यास सांगितले आहे.

**<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया</u>:-** यात प्रभाग क्र.१३,१७, १६ व २० असे पाच प्रभागांची इस्टिमेट बनतात. तर पहिले १२ प्रभागात जेवढे पण एस सी व एस टीचे आरक्षित प्लॉट आहेत. आणि जी ५० टक्के पेक्षा जास्त जनसंख्या असलेली आमची दलित वस्ती आहे तिचा यात समोवश केलेला नाही. माझ्या प्रभागात सतनाम कॉलनी आणि हरीजन कॉलनी आपण याचा यात समावेश नाही आहे. त्यामुळे सतनाम कॉलनी कॉलनीमध्ये १० लाख रुपये नाली पायवाटा बनविण्यासाठी आणि हरीजन कॉलनीमध्ये १० लाख रुपये नाली पायवाटा बनविण्यासाठी तरतुद केली जावी.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी</u>:-** महानगरपालिकेची आर्थिक स्थिती खराब आहे. अशा वेळेला शासनाकडून आलेल्या निधीला लवकरात लवकर मंजूरी देऊन ती कामे उल्हासनगर शहरामध्ये महापालिका हददीमध्ये केली पाहिजेत. हा विषय पास करा. इतिवृत्ताची वाट न पाहता.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर</u>:-** पास

**<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया</u>:-** मी मतदानाची मागणी करतो.

**<u>उपमहापौर, श्री. भगवान भालेराव:-</u>**राजेशजी मतदानाची मागणी करण्यासाठी चार लोक पाहिजेत.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी</u>**:- छोटा विषय आहे.

**<u>महापालिका सचिव</u>**:- चार लोकांनी मतदानाची मागणी करा. मतदानाची मागणी मान्य करण्यात आलेली आहे. जे ठरावाच्या बाजूने आहेत त्यांनी हात वर करा.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी</u>:-** मा. महापौरजी हा विषय सर्व संमतीने पास करा.

**<u>उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-</u>** सर्व संमतीने विषय पास.

**<u>काही सदस्य:-</u>** सर्व संमतीने विषय पास.

**<u>महापालिका सचिव</u>**:- ही महासभा वरील नमुद केल्याप्रमाणे सन २०२१-२२ या आर्थीक वर्षासाठी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेअंतर्गत मंजूरी मिळालेली एकूण ०.५ कामांचे एकूण रु.१,००,००,०००/- करोड रुपये एवढया खर्चाच्या टक्के प्राकलनास मान्यता देत आहे तसेच इतर प्राकलनदेखील महासभेपुढे आणण्याचे प्रशासनास निर्देश देत आहे. सदर ठराव इतिवृत्ताची वाट न पाहता अंमलात येत आहे. मंजूर.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर</u>:-** मंजूर. मंजूर. पुढचा विषय घ्या.

**<u>महापालिका सचिव</u>**:- आता एक शेवटचा विषय आहे. प्रस्तावाची सूचना शेवटचा नाही, अजून दोन आयत्या वेळेचे विषय आहेत.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी:—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **<u>विषय क्र.८ :-</u> सन २०२१-२२ या आर्थीक वर्षासाठी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेअंतर्गत मंजूरी मिळालेली कामे मा.महासभेची मान्यतेकरीता सादर करणेबाबत.**

**प्रस्तावना**

राज्यातील नागरी व ग्रामीण क्षेत्रातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्ती / गावांचा विकास करण्यासाठी या घटकांना मुलभूत सुविधा पुरविण्यासाठी मा. लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या कामांना शासन स्तरावरुन मान्यता देऊन या योजनेअंतर्गत घ्यावयाची कामे, अंमलबजावणी यंत्रणा व इतर निकष निशचित करण्यासाठी "भारतरत्न

डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना" अशी राज्यस्तर योजना सन २०१८-१९ पासून शासनामार्फत राबविण्यात येत आहे.

सदर योजनेअंतर्गत सन २०२१-२२ या वर्षासाठी उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट "अ" येथील नमुद केलेल्या खालील कामांच्या अंदाजित रक्कमेस प्रशासकीय मंजूरी प्राप्त झाली आहे.

| अ.क्र. | प्रभाग क्र. | कामाचे ठिकाण | प्राकलनिय किंमत |
|---|---|---|---|
| १ | १३ | उल्हासनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.१३ लेप्रसि कॉलनी येथे नाल्याचे बांधकाम करणे व रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे. | १०००००० |
| २ | १७ | उल्हासनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.१७ कैलाश नगर परिसरातील नाल्याचे बांधकाम करणे व रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे. | २५००००० |
| ३ | २० | उल्हासनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.२० सदाफुले शाळा परिसरातील नाल्याचे बांधकाम करणे. | २०००००० |
| ४ | १६ | उल्हासनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.१६ महात्मा फुले नगर परिसरातील रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे. | २५००००० |
| ५ | २० | उल्हासनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.२० डॉ.आंबेडकर नगर खदाण परिसरातील नाल्याचे बांधकाम करणे व रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे. | २०००००० |
| | | **एकूण** | **१००००००००** |

वरील मंजूरी कामांचे सविस्तर नकाशे / आराखडे व अंदाजपत्रके तयार करुन मा.जिल्हाधीकारी, ठाणे यांचेकडे प्रशासकीय मान्यतेकरीता सादर करण्याचे निर्देश शासनाने दिले आहे.

उक्त कामांचे सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे प्राकलने तयार करण्यात आले आहेत. शासन निर्णयात नमुद केल्याप्रमाणे १) प्रस्तावित काम अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीमधील असल्याचे प्रमाणपत्र २) जागा उपलब्धतेचे प्रमाणपत्र व ३) इतर योजनेत काम घेण्यात न आल्याचे प्रमाणपत्र ४) देखभाल /दुरुस्ती प्रमाणपत्र सोबत जोडले आहे.

वरील नमुद केल्याप्रमाणे वर्ष २०२१-२२ करीता एकूण ०५ कामांचे रुपये १,००,००,०००/- (अक्षरी रुपये एक कोटी फक्त) एवढया खर्चाचे प्राकलने तयार करण्यात आले आहे.

सदर प्रस्ताव शासनाकडे प्रशासकीय मान्यतेकरीता सादर करावयाचा आहे. तत्पुर्वी मा.महासभेची मान्यता आवश्यक असल्याने मा. महासभेच्या मान्यतेकरीता प्रस्तावित करण्यात येत आहे.

**<u>महासभा ठराव कृर.</u> ६४** **दिनांक १८/०२/२०२२**

**सुचकाचे नाव :- श्री. राजेश वदारिया**

**अनुमोदकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी**

**ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे सन २०२१-२२ या आर्थिक वर्षासाठी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेअंतर्गत मंजूरी मिळालेली एकूण ०५ कामांचे रुपये १,००,००,०००/- एवढया खर्चाचे प्राकलनास मान्यता देत आहे.**

**तसेच,**

**इतरांचेही प्रस्ताव लवकरात लवकर आणण्याचे महासभेस निर्देश देत आहे.**

**या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.**

**सुचकाची सही /-**

**अनुमोदकाची सही /-**

**सर्वानुमते**

**महपौर/पीठासीन अधिकारी**
**सर्वसाधारण महासभा**
**उल्हासनगर महानगरपालिका**

---

महापालिका सचिवः— विषय क्र. ९ वाचुन दाखवितात

—————————————————————————————————————————————

⇨ विषय क्र. ९ :— **प्रस्तावाची सुचना**

विशेष महसुल अधिकारी श्री. विजय मंगलानी यांना पदावरुन हटविणेबाबत.
पालिका सदस्य सूचक श्री. दिपक सिरवानी व श्री. मनोज सयानी आणि
अनुमोदक श्री. शंकर लुंड यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

—————————————————————————————————————————————

**महापालिका सचिव**:- संबंधीत सुचक आणि अनुमोदक यांनी आपली सुचना मांडावी.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-** परत पाठवायचा आहे की पदावरुन हटवायचा आहे. एक एक अधिकाऱ्याला हटवा आणि नंतर महापालिका आम्ही चालवतो.

**सदस्य, श्री. महेश सुखरामनी:-** माझे म्हणणे आहे की, श्री. विजय मंगलानी या जागेवर महसूल चांगले वसूली करतात. जर आपले काही गैरसमज झाला असेल तर या विषयावर चर्चा करुन त्यांना कायम ठेवावे व त्यांना हटवू नये.

**सदस्य, श्री. मनोज सयानी**:- मा. महापौरजी आम्ही हा प्रस्ताव मा. महासभेत आणला आहे. आम्हांला बोलू दया.

**सदस्य, श्री. शंकर लुंड**:- मा. महापौरजी आम्ही हा प्रस्ताव मा. महासभेत आणला आहे. आपली मत नंतर दया.

**सदस्य, श्री. भारत राजवानी**:- अशा अधिकाऱ्याला कायम केले पाहिजे. आणि चांगले प्रशस्ती पत्र दिले पाहिजे जेणेकरुन त्यांना काम करण्यास प्रोत्साहन मिळेल.

**सदस्य, श्री. मनोज सयानी**:- मा. महापौरजी आम्ही हा प्रस्ताव मा. महासभेत आणला आहे. आम्हांला बोलू दया. सचिव मॅडम.

**महापालिका सचिव**:- हा बोला सर, आपला आवाज येतोय.

**सदस्य, श्री. मनोज सयानी**:- मा. महापौरजी हा जो अशासकीय प्रस्ताव आणलेला आहे. त्यात माझे सुध्दा हस्ताक्षर आहे. मी खुलासा करु इच्छितो, विजय मंगलानी यांना पाणी पुरवठा विभागाचा वसूली पथकाचा अधिकारी बनवला आहे. मी अधिकाऱ्याकडून जाणू इच्छितो की, संबंधीत अधिकाऱ्याला जे पद दिले आहे किंवा जी पोस्टींग दिली आहे, त्या पदाची बी पी एम सी ॲक्ट मध्ये याची तरतुद आहे का? मा. महापौरजी संबंधीत अधिकारी कृपया या गोष्टीचा खुलासा करावा. जो श्री. विजय मंगलानी यांना पाणी पुरवठा विभागात वसूली पथकाचा अधिकारी बनवला गेला आहे. बी पी एम सी ॲक्ट मध्ये याची तरतुद आहे का? मी मा. महापौर मॅडम यांना विचारले आहे. आपण आयुक्त आहेत का. आ बैल मुझे मार असे काम करु नका. शहरातील सर्व व्यापाऱ्यांना या व्यक्तीने त्रास दिलेला आहे. तुमची त्यांच्या सोबत काही साठंगाठ आहे का. तुमचे त्यांच्यासोबत काही देणेघेणे आहे तुम्ही त्यांची बाजू घेतात. लॉकडाउनमध्ये याने सर्व व्यापाऱ्यांना त्रास दिलेला आहे. मंदिर, मजिस्द, गुरुद्वारा येथे जावून पाण्याची जोडणी कापली आहे. आपण् त्यांच्या बाजूने आहेत का. आपल्याला वाटते का की, मंदिर, मजिस्द, गुरुद्वारा येथील पाण्याची जोडणी कापली पाहिजे. लॉकडाउनमध्ये कारखाने, व्यापारी यांची पाण्याची जोडणी कापली. हफता पाहिजे का. खास करुन कारखानदारांना, व्यापाऱ्यांना, गुरुद्वारा, मंदिर यांना जाणुनबुजून त्रास दिला आहे. आपण त्यांच्या सोबत आहेत का भारत गंगोत्री जी.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:-** आम्हांला पण त्रास होईल.आमचा एकच मुददा आहे दिड वर्ष जो कोरोना काळात केंद्र व राज्य सरकारचे जी आर होते. जीआरचा उल्लंघन केले आहे. त्यांनी पाण्याची जोडणी कापली आहे. लोकांना त्रास दिला आहे. यांनी मंदिराची पाण्याची जोडणी कापली आहे. यांनी मधुसुदन आश्रमचे पाणी जोडणी कापली. गुरुद्वाराचे पाण्याची जोडणी कापली आहे.सुभाष टेकडीमध्ये बुध्द विहारची पाण्याची जोडणी कापली आहे.

**विशेष महसूल अधिकारी, श्री. विजय मंगलानी:-** यांचे झाल्यावर मी बोलू इच्छितो की, हे जे मनोज लासी आरोपांवर आरोप लावत आहेत.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-** विजय मंगलानी तुम्हांला महापौरांनी बोलायला सांगितले नाही. मला बोलायला सांगितले आहे. मा. महापौरजी यांना गप्प बसवा.

**विशेष महसूल अधिकारी, श्री. विजय मंगलानी:-** मा. महापौर साहेबा मला अनुमती दया. मी यांच्या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर देईन.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-** महापौर मॅडम मंदिर, मजिस्द, गुरुद्वाराच्या या दुश्मनाला गप्प बसवा. आम्हांला बोलू दया. ही आमची सुचना आहे. हायकोर्टाचे आदेशाचा अवमान केला आहे. मंदिर, मजिस्द, गुरुद्वारा येथे जावून पाण्याची जोडणी कापली आहे. ते पण कोरोना काळात. ज्यांच्याजवळ १ मडके भरण्याची लाईन नाही त्यांना ९ लाख रुपयाचे बील देत आहेत. त्यांच्याकडून पैसे मागतात. पहिले पण यांच्यावर चार्जेस आहेत. याची चौकशी केली जावी. यांना वसूली पथकावर कोणी नियुक्त् केले. या प्रश्नाचे पहिले उत्तर दयावे. त्या पदाची बी पी एम सी अॅक्ट मध्ये याची तरतुद आहे का ? भारत गंगोत्री आपण गुरुद्वारा, मंदिर, मजिस्द, आश्रमाच्या विरोधात आहात का.

**सदस्य, श्री. शंकर लुंड:-** भ्रष्टाचारी अधिकारी ज्याच्यावर आधी पण आरोप आहेत.

**उप आयुक्त् (पाणी पुरवठा), श्री. सुभाष जाधव:-**सन्माननीय महापौरजी, सचिव मॅडम, आयुक्त् साहेब व सर्व सन्माननीय सभागृह. पाणी पुरवठा विभागाचा उपआयुक्त् या नात्याने मी सांगू इच्छितो की, आता आपण जो प्रश्न उपस्थित केला आहे. तो बी पी एम सी अॅक्ट मध्ये याची तरतुद आहे किंवा नाही यानुसार त्यांची नियुक्ती केली आहे किंवा याबाबत प्रश्न केलेला आहे. या पदाचा अभ्यास करुन त्याचे सादरीकरण करुन ते आपल्याला परंतु उपलब्ध मनुष्य बळाच्या आधारावर आपल्याला प्रशासन चालवायचे असते.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-** नाही नाही. उदया तुम्ही एका शिपायाला आयुक्त् करु शकता का. उत्तर दया तुम्ही तरतुद आहे का.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी:-** हे उत्तर चुकीचे आहे.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-** नाही नाही जाधव साहेब तुम्ही चुकीचे बोलत आहात. उदया तुम्ही मनुष्यबळ नाही आहे म्हणून एका शिपायाला आयुक्त् बनवू शकता का. एका सफाई कर्मचाऱ्याला तुम्ही उपआयुक्त् बनवू शकता का. तरतुद आहे का नाही या प्रश्नाचे मला उत्तर दया.

**उप आयुक्त् (पाणी पुरवठा), श्री. सुभाष जाधव:-** मा. अध्यक्ष महोदय, कुठल्याही अनधिकृत वस्तुवर वसूली करावी लागते. २०२० मध्येच त्यांना कार्यभार देण्यात आला. त्यांना कार्यभार देण्यात आल्यापासुन पाणी पटटीत वाढ झालेली आहे. कोरोना काळ असून सुध्दा त्यांनी चांगले काम केले आहे.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-** नाही नाही. लोकांना लुटून, लोकांना त्रास देऊन, मंदिर, मस्जिद, गुरुद्वारा हे लुटून कोणाला पण नियुक्त करु शकतो का.

**सदस्या, श्रीम. मिना सोनेजी:-** अधिकाऱ्यांना बोलू दया. एक मिनिट.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-** नाही नाही. चुकीचे बोलतील तर त्यांना सोडणार का मॅडम. उदया त्यांना परवानगी दिली कि कोणालाही लुटुन आणा तर ते करणार का.

**सदस्य, श्री. कलवंतसिंह सोहता:-** अरे उत्तर तर ऐकू दया. आपण काहीही बोलत रहाल. त्यांचे उत्तर ऐकायचे नाही का.

**सदस्या, श्रीम. मिना सोंडे**:- अधिकाऱ्यांना त्यांचे बोलणे पुर्ण तर करू दया.

**सदस्य, श्री. मनोज सयानी**:- त्यांना काही माहित नाही. ते काय माहिती देणार. त्यांच्याकडून आपण काय माहितीची अपेक्षा ठेवाल.

**सदस्य, श्री. कलवंतसिंह सोहता**:- मनोजजी पहिले ऐका तर खरे, आपण एवढे का अग्रेषित होत आहात. कोणी व्यापाऱ्यांना लुटून महानगरपालिकेचा महसूल वाढवेल.

**विशेष महसूल अधिकारी, श्री. विजय मंगलानी**:- महापालिकेची व्हिजलेन्स व्हॅन फिरत होती. आपण १८ कोटीचा महानगरपालिकेला चुना लावत होते.

**सदस्य, श्री. मनोज सयानी**:- आम्ही लोकप्रतिनिधी आहेत आम्ही करोडाचा चुना लावू शकतो. तुम्ही कोण आहेत बोलणार.

**सदस्य, श्री. भारत राजवानी**:- आवाज बंद झाला आहे. सचिव मॅडम आपला स्पिकर बंद आहे.

**महापालिका सचिव**:- माझा स्पिकर चालू करा. पिठासीन अधिकारी यांनी मला सांगितले आहे की, या विषयावर ज्या सदस्यांना अजून बोलायचे असेल तर बोला आणि या प्रस्तावाचे काय करायचे त्याचा निर्णय दया. म्हणजे पुढचा विषय घेता येईल.

**सदस्य, श्री. मनोज सयानी**:- मा. महापौर मॅडम माझी विनंती आहे की, त्यांना जे अवैध पद दिले आहे त्या पदावरुन त्यांना हटवा. आणि ज्या लोकांना त्यांनी त्रास दिला आणि अवैध वसूली केली आहे. ज्यांची पाणीच्या जोडणी कापली आहे त्यांना न्याय दया.

**सदस्य, श्री. गजानन शेळके**:- जाधव साहेबांना मी एक गोष्ट सांगू इच्छितो की, मनोज सयानी जे बोलले ते बरोबर आहे.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी**:- धन्यवाद शेळके भाई

**सदस्य, श्री. मनोज सयानी**:- त्यांना या पदावरुन हटवा. आणि महानगरपालिकेतील दुसरे पद दया.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया**:- मा. महापौरजी, उपमहापौरजी,

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी**:- मा. महापौरजी, उपमहापौर सर

**सदस्य, श्री. राजेश वधारीया**:- प्रदिपजी कृपया मला बोलू दया.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी**:- राजेशजी मला कृपया दोन मिनिट बोलू दया.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया**:- हो ठिक आहे. बोला.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी**:- माझे असे म्हणणे आहे की, हा जो विजय मंगलानीचा विषय आहे. हा विषय जर महासभा पास करत असेल तर आम्ही बघतिले की, आम्ही जसे अभय योजनेचा प्रस्ताव पास केला त्यानंतर पण आमची टॅक्सची उपआयुक्त् मॅडम आहे आणि आयुक्त् आहेत त्यांनी विखंडित करण्यासाठी पाठविला आहे. तर माझ्या हिशोबाने असे जे त्रासदायक प्रकरणे आहेत यासाठी अशा अधिकाऱ्यांचे प्रस्ताव आले नाही पाहिजेत. हे प्रशासनाला समजले पाहिजे. आणि महापौर, उपमहापौर या सर्वांनी मिळून जर खरच अशा काही अडचणी असतील तर त्याला प्रशासकीय बाब करुन हटविणे किंवा नाही हटविणे जर जनप्रतिनिधी त्याची तक्रार करत असेल तर त्याची चौकशी करुन नंतर त्यांना घेतले पाहिजे. आमच्या पार्टीचे हे म्हणणे आहे की, प्रशासनाने याची चौकशी करुन मग निर्णय घेतला पाहिजे.

**सदस्य, श्री. मनोज सयानी**:- प्रदिपजी आपल्या पार्टीचा आपण निर्णय सांगितला.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया**:- मा. महापौरजी मी आपल्याला एक विनंती करतो की, पहिले आम्हांला हे सांगा की, आपण विजय मंगलानी यांना कोणत्या पदावर आणि कोणत्या अधिकाराने नियुक्त् केले आहे. कृपया आम्हांला ती माहिती दया.

**<u>सदस्य, श्री. मनोज सयानी</u>**:- राजेशजी हे तर जाधवजीनी सांगितले की आम्हांला बघावे लागेल. त्यांना कोणी नियुक्त केले.

**<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया</u>:-** माझ्याकडे एक उपाय आहे तो असा विजय मंगलानी जागेवर जातात. स्थळ पाहणी करतात आणि तेच बीले काढतात. आम्ही पाणी पुरवठा अभियंता यांच्याशी बोलणे झाले की, त्यांनी सांगितले की याबाबत आमच्याकडे कोणतीही माहिती नाही आहे. हा जो अधिकारी आहे तो बिल काढण्याचा अधिकार आहे हा अधिकार शहर अभियंता, पाणी पुरवठा विभाग यांचे जवळ किंवा उप आयुक्त् (पाणी पुरवठा) यांचेकडे असला पाहिजे. जी पण फाईल त्यांच्याकडे येते त्यावर चांगल्याप्रकारे शहानिशा करुन त्यावर चौकशी करुन हे बरोबर आहे किंवा नाही याचा विचार करुन ५ हजाराच्या जागी ५० हजार प्रत्येक महिन्याला किंवा कोणताही ज्यामागे कोणतेही कारण नसताना ते काढले जातात. आणि असे दाखवले जाते की, एवढया करोडचे बील काढले. परंतु ते करोडचे बील वसूल केले जात नाही. आणि वेगवेगळया आमच्यावर केसेस होतात. आणि आमचा कोर्टाचा खर्च वाढतो. कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा किंवा उपआयुक्त् (पाणी पुरवठा) यांना हे अधिकार दिले जावेत. कि जे पण विजय मंगलानी अहवाल सादर करतात ते तपासुन, पडताळणी करुन त्यानंतर ते बीले काढावीत.

**<u>सदस्य, श्री. अरुण आशान</u>**:- मा. महापौरजी १० वर्षापुर्वी परिस्थिती वेगळी होती. त्यावेळी आपल्याकडे अधिकारी व कर्मचारी नव्हते. त्यामुळे प्रशासनाने विजय मंगलानीला विशेष महसूल अधिकारी नियुक्त केले होते. परंतु आता आपल्याकडे अधिकारी व कर्मचारी आलेले आहेत. प्रशासनाने योग्य तो निर्णय घ्यावा. परंतु केलेली कार्यवाही तसे त्यांना अधिकार दिले असतील आता फेरबदल करण्याचा अधिकार प्रशासनाला आहे. मला वाटत आयुक्त् साहेबांनी हा निर्णय घेऊन या विशेष महसूल अधिकारी कोणाला नियुक्त करावयाचे आहे किंवा याबाबत काय निर्णय घ्यायचा असेल तर तो प्रशासनाने घ्यावा.

**<u>सदस्य, श्री. मनोज सयानी</u>**:- यांना पाणी पुरवठा विभागात जे अवैध पद दिले आहे. त्यांना वसुली पथक अधिकारी या पदावरुन हटवून आणि महानगरपालिकेत इतर कोणत्याही विभागात अशा अधिकाऱ्याची गरज असेल तिथे त्यांची नियुक्ती केली जावी. सर्व सदनाला आणि सर्व पक्षांना माझी हि विनंती आहे की, अवैध पदावरुन हटविण्यात यावे.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे</u>**:- आयुक्त् साहेब तत्कालीन परिस्थिती वेगळी होती. त्यावेळेस अधिकारी नव्हते. जे कनिष्ठ दर्जाचे अधिकारी होते त्यांना दिले होते. आता प्रशासनाने निर्णय घेउुन दयावे.

**<u>सदस्य, श्री. मनोज सयानी</u>**:- त्यांना अवैध पदावरुन हटविण्यात यावे.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे</u>**:- अरे काय हटवा. काय बरोबर आहे ना, त्यावेळेस अधिकारी नव्हते. प्रत्येक अधिकाऱ्याचा अपमान करायचा.

**<u>सदस्य, श्री. अरुण आशान</u>**:- त्यावेळी परिस्थिती वेगळी होती. त्यावेळी आपल्याकडे अधिकारी व कर्मचारी नव्हते. आता प्रशासनाने योग्य तो निर्णय घ्यावा.

**<u>सदस्य, श्री. शंकर लुंड</u>**:- मा. महापौर मला गोष्ट सांगायची आहे,

**<u>सदस्य, श्री. मनोज सयानी</u>**:- यावर ठराव करा. त्यांना जे पद दिले आहे त्या पदावरुन हटवावे. व त्याजागी सक्षम अधिकाऱ्याला ते पद दया.

**<u>महापालिका सचिव</u>**:- ठराव दया लवकर.

**<u>सदस्य, श्री. मनोज सयानी</u>:-** या अवैध पदावरुन श्री. विजय मंगलानी यांना हटवून योग्य अधिकाऱ्यांना ते पद दयावे.

**विशेष महसूल अधिकारी, श्री. विजय मंगलानी:-** तुमच्या विरुध्द माझ्याकडे पुरावा आहे. तो समोर आला पाहिजे. तुम्ही १८ लाख रुपये बुडवण्याचा प्रयत्न केला होता.

**सदस्य, श्री. मनोज सयानी**:- महापौरजी त्यांना मध्ये बोलण्याचा कोणी अधिकार दिला. आपण दिला का महापौरजी. तो सर्वांचा अपमान करतो.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** आपण मध्ये बोलू नये. मध्ये बोलण्याचा अधिकार नाही आहे. विजय मंगलानी आपण सदस्यांचा अपमान करीत आहात.

**महापालिका सचिव**:- पिठासीन अधिकारी यांनी मला ठराव वाचा सांगितले आहे. या अवैध पदाबाबत चौकशी करण्यास प्रशासनाला योग्य ते निर्णय घेण्याचे निर्देश देत आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी**:- पास पास..

**सदस्य, श्री. मनोज सयानी**:- पास पास यांना पदा वरुन हटवा.

**विशेष महसूल अधिकारी, श्री. विजय मंगलानी:-** विषयाची चौकशी करुन योग्य तो निर्णय दयावेत.

**महापालिका सचिव**:- पिठासीन अधिकारी यांनी दोघांना शांत बसायला सांगितले आहे व मला ठराव वाचण्यास सांगितले आहे. मी ठराव वाचत आहे. पिठासनाने या पदाबाबत शहानिशा करुन प्रशासनास निर्देश देत आहे.

**सदस्य, श्री. मनोज सयानी**:- प्रशासन नाही करणार. त्या अधिकाऱ्याला हटवा.

**उप आयुक्त् (पाणी पुरवठा), श्री. सुभाष जाधव**:- मा. महापौरजी, सर्व बाबींची शहानिशा करुन योग्य निर्णय सादर करु.

**सदस्य, श्री. मनोज सयानी** :- नाही नाही. विजय मंगलानी यांना त्या पदावरुन हटवा. आणि चौकशी करुन नंतर दुसऱ्या अधिकारी नियुक्त करा.

**विशेष महसूल अधिकारी, श्री. विजय मंगलानी :-** आपण जे आरोप लावतात त्याची पण चौकशी झाली पाहिजे.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी** :- महासभेचा अपमान आहे. कुठलाही अधिकारी, सदस्य महापौरांना न विचारता मध्ये बोलतो. हे नियमांचे उल्लंघन आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी** :- मा. महापौरजी या विषयावर निर्णय झालेला आहे.

**महापालिका सचिव** :- साहेब तुमचा आवाज आला नाही. चौधरी साहेब तुमचा आवाज येत नाही. आवाज म्युट झाला आहे.

**सदस्य, श्री. अरुण आशान** :- सचिव मॅडम पुढचा विषय घ्या आता.

**महापालिका सचिव** :- सर यावर ठराव दया. नंतर यात वाद होतात.

**सदस्य, श्री. मनोज सयानी** :- ही महासभा हा अशासकीय प्रस्ताव जो आणला आहे विजय मंगलानी यांना पाणी पुरवठा विभागाचे वसूल पथक पद दिले आहे त्यावरुन हकालपटटी करुन आणि सक्षम अधिकारी यांची नियुक्ती करावी.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी** :- मी मनोजजी यांच्याशी सहमती आहे.

**सदस्य, श्री. अरुण आशान** :- प्रशासन कार्यवाही करत आहे.

**सदस्य, श्री. मनोज सयानी** :- ओ अरुण राव प्रशासनाच्या हिताचा विषय आहे.

**सदस्य, श्री. कुलवंतसिंग सोहता** :- मनोज, तु खुप मोठा हितचिंतक झाला आहे.

**महापालिका सचिव** :-पिठासीन अधकिारी यांनी मला आदेश दिले आहेत दोन सुचना आल्या आहेत. मनोज लासी यांनी जो ठराव वाचला आणि दुसरा चौधरी आणि आशान सरांनी वाचला प्रशासनाने चौकशी करुन निर्णय घ्यावा. या दोन्ही ठरावापैकी मनोज लासी यांनी वाचलेल्या ठरावाला सर्वांची संमती असेल तर सांगा. नाहीतर दोन्ही ठरावावर मतदान घेण्यात येईल, असे पिठासीन अधिकारी यांनी सांगितले आहे.

**सदस्य, श्री. मनोज सयानी** :- चौधरी साहेब, अरुण राव तुम्ही पास करा.

**सदस्या, श्रीमती अंजली साळवे** :- पास करा.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी** :- महापौरजी सदस्यांना बोलू तर दया.

**सदस्या, श्रीमती अंजली साळवे** :- सदस्यांनी निर्णय घ्यावा.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी** :- नोकरीची पर्वा न करता, महापौरांची अनुमती न घेता तो बोलत आहे किती डेरिंगवाला अधिकारी आहे. अनुमती न घेता सेल्युट केले पाहिजे अशा व्यक्तीला. विषय समजत नाही. अधिकाऱ्याला बोलू तर दया. नाहीतर नियम कंट्रोल करण्यासाठी त्याच्यावर दुसरा अधिकारी ठेवा. बेईमानी नाही केली पाहिजे तर त्याच्यावर दुसरा अधिकारी नियुक्त करा. सर्वांना काढायचे आहे. सर्वांना काढा. आणि स्वत: काम करा. एका अधिकाऱ्याला काढा, दुसऱ्या मग तिसऱ्याला काढा. सर्वांना काढा.

**सदस्य, श्री. मनोज सयानी** :- नाथानी साहेब आम्ही त्यांना हटवत नाही. त्यांनी लोकांना त्रास दिलेला आहे. मंदिर, मस्जिद, गुरुद्वारा यांना त्रास दिलेला आहे. कोरोना काळात त्यांना पदावरुन काढून दुसऱ्या ठिकाणी दया.

**सदस्या, श्रीमती मिना सोनेजी**:- हटट का करत आहेत मनोज.

**सदस्य, श्री. मनोज सयानी** :- माझे त्याच्याबरोबर वैयक्तिक काहीच नाही आहे.

**महापालिका सचिव:-** पिठासीन अधिकारी यांनी मला सांगितले आहे की, ज्यांना मतदानासाठी मागणी करायची आहे. त्या चार सदस्यांनी मागणी करा. एक ठराव असा येईल की मनोज लासी यांना वाचलेला ठराव. आणि दुसरा असा येईल की प्रशासनाने चौकशी करुन त्याबाबत योग्य तो निर्णय घ्यावा. ज्यांना मतदान करायचे असेल त्या चार सदस्यांनी मतदानाची मागणी करा. दोन्ही सदस्यांपैकी कोणीही चार सदस्यांनी मतदान करा.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी** :- मॅडम, प्रत्येक अधिकाऱ्यावर का घेता मतदान.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी** :- मतदानाची मागणी कोणी केली.

**सदस्य, श्री. मनोज सयानी** :- सचिव मॅडम, कोणीही मतदानाची मागणी केली नाही. चौधरी साहेब, आशान साहेब, नाथानी साहेब, किशोर वनवारी साहेब कृपया ज्यांना गैरपद दिले आहे त्यांना हटवून वेगळी जबाबदारी दया.

**महापालिका सचिव** :- आशान सर तुमचा आवाज अजिबात येत नाही. फोन जवळ घेऊन बोला.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी** :- मोबाईल चालत नाही.

**महापालिका सचिव** :- नाही नाही अशी अडचण आहे की, दोघे दोघे बाजूला बसल्यावर मोबाईलमध्ये स्पष्ट आवाज येत नाही. तुम्ही थोडे लांब लांब बसून बोलला तर आवाज स्पष्ट येईल.

**<u>सदस्य, श्री. मनोज सयानी</u> :-** महापौरजी मी जो ठराव वाचला आहे. कृपया त्याला पास करा. सर्व सदस्यांना मी विनंती करतो. पास पास.

**<u>सदस्य, श्री. गजानन शेळके</u>:-** पास पास.

**<u>सदस्य, श्री. दिपक सिरवानी:-</u>** पास..पास..

**<u>सदस्य, श्री. मनोज सयानी</u>:-** सचिव मॅडम, माझा ठराव पास झाला पुढचा विषय घ्या.

**<u>महापालिका सचिव</u>**:- मला सर्व सदस्यांना विचारायचे आहे. मनोज लासी सरांनी वाचलेला ठराव याबाबत आपला निर्णय दया. ठराव पास.. वधारीया साहेब,

**<u>सदस्य, श्री.किशोर वनवारी</u>:-** पास पास.

**<u>महापालिका सचिव</u>** :- ठिक आहे.

**<u>सदस्य, श्री. मनोज सयानी</u> :-** सचिव मॅडम, माझा ठराव पास झाला पुढचा विषय घ्या.

**<u>सदस्य, श्री. दिपक सिरवानी</u> :-** इतिवृत्ताची वाट न पाहता.

**<u>महापालिका सचिव</u>** :- पिठासीन अधिकारी यांनी मला पुढचा विषय वाचायला अजून सांगितले नाही. दोन मिनिट थांबा.

**<u>आयुक्त, डॉ.राजा दयानिधी:-</u>** सन्माननीय पिठासीन अधिकारी महोदय, सन्माननीय सदस्य हा जो उपस्थित केलेला मुददा आहे. ते महानगरपालिका कर्मचारी आणि अधिकारी त्यांना काम वाटप करण्याचे अधिकार आहे. आमचे प्रशासनाचे मत खालीलप्रमाणे आहे. कामकाजाचे वाटप हे प्रशासकीय काम असते. म्हणून ते प्रशासकीयमध्ये कोणाला कुठला कार्यभार दयायचा आहे हे प्रशासनाचे काम असते. परंतु ते समजा कायदयात बसतो किंवा नाही त्याप्रमाणे आहे किंवा नाही ते कायदाच्या अधीन आहे किंवा त्यांचा काही कायदा आहे. त्याची थोडी पाहणी करावी लागेल. म्हणून आमचा प्रशासनाचे मत असे आहे की, सदस्यांनी जे प्रस्ताव मांडले आहे त्यात नियमाप्रमाणे शहानिशा करुन त्या अनुषंगाने पुढचे महासभेत कळविण्यात येईल असे आमचे मत आहे.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी</u>:-** ओके ओके. पास पास..

**<u>महापालिका सचिव</u>**:- ठिक आहे आता मा. आयुक्तांनी ज्याप्रमाणे ठराव वाचला आहे त्याप्रमाणे प्रशासन शहानिशा करुन पुढचे महासभेत कळविण्यात येईल. पास..

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी</u>:-** भारतीय जनता पार्टीचे सर्व सदस्य मा. आयुक्तांनी जे सांगितले आहे त्याच्याशी सहमत आहेत.

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **<u>विषय क्र. ९ :-</u>** <u>अशासकीय प्रस्ताव.</u>

विशेष महसुल अधिकारी श्री. विजय मंगलानी यांना पदावरुन हटविणेबाबत. पालिका सदस्य सूचक श्री. दिपक सिरवानी व श्री. मनोज सयानी आणि अनुमोदक श्री. शंकर लुंड यांचा प्रस्ताव विचारात घेणे

**<u>प्रस्तावना</u>**

सदर अशासकीय प्रस्तावानुसार सभागृहाचे विनंतीपुर्वक लक्ष वेधू इच्छितो की, उल्हासनगर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागांतर्गत विशेष महसुल वसुली अधिकारी या पदावर २ ते ३ वर्षापुर्वी नियुक्ती करण्यात आली आहे. सदयस्थितीत मागील दोन तीन वर्षाच्या काळात भारत देशासह संपुर्ण जगाला कोरोनाच्या आजाराने व्यापले असून अनेक लोकांचे उदयोगधंदे, कारखाने, दुकाने रोजगार बंद झालेले आहेत. यामुळे या शहरातील बहुतांश नागरीकांचे आर्थिक परिस्थिती कमकुवत व हलाखीची झाली आहे. परंतु पाणी पुरवठा विभागांतर्गत अवैधरित्या नियुक्त करण्यात आलेले महसुल अधिकारी हे नागरीकांना जाणीवपुर्वक त्रास देण्याच्या उददेशाने जबरदस्ती बील वसुली करीत आहेत. यामुळे नागरीकांना मानसिक त्रास व पिडा होत आहे. अशा बऱ्याचशा नागरीकांच्या तक्रारी ऐकीवात आलेल्या आहेत.

सदयस्थितीत कोरोनाची परिस्थितीत केंद्र सरकार, राज्य सरकार, महापालिकामार्फत नागरीकांना मदत सहकार्य म्हणून निवारा, आरोग्य सेवा, औषधोपचार, लसीकरण इत्यादी मोफत पुरविले जात आहे. अशा भयावह परिस्थितीत नागरीकांना त्रास देण्याच्या उददेशाने ४ ते ५ पट दंड आकारुन व बीलांची वसुली करणे. हे माणुसकीला धरुन नसल्याने सदर प्रकरणी येणाऱ्या महासभेमध्ये चर्चा घडवून आणून अवैधरित्या नियुक्त करण्यात आलेले विशेष महसुल अधिकारी श्री. विजय मंगलानी यांना अन्य ठिकाणी हलविण्यात यावे, ही विनंती.

**<u>महासभा ठराव क्र. ६५</u>** **दिनांक १८/०२/२०२२**

**सुचकाचे नाव :- श्री. दिपक सिरवानी**

**अनुमोदकाचे नाव :- श्री. मनोज सयानी, श्री. शंकर लुंड**

**ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे विशेष महसुल अधिकारी श्री. विजय मंगलानी यांना पदावरुन हटविणेबाबत चौकशी व शहानिशा करुन निर्णय घेण्याचे प्रशासनास निर्देश देत आहे.**

**सुचकाची सही /-**

**अनुमोदकाची सही /-**

**सर्वानुमते**

**महपौर/पीठासीन अधिकारी**
**सर्वसाधारण महासभा**
**उल्हासनगर महानगरपालिका**

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. १० वाचुन दाखवितात

---

⇨ विषय क्र. १० :— **<u>आयत्या वेळेचा विषय</u>**

**कल्याण डोबिंवली महानगरपालिका हद्दीमध्ये प्रस्तावित क्लस्टर बेस्ड (Cluster Based) वेस्ट टू एनर्जी प्रकल्पामध्ये सहभागी होणेबाबत धोरणात्मक निर्णय घेणेबाबत...**

---

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी</u>:-** हा विषय आयत्यावेळेचा विषय आहे तर मी मा. आयुक्तांना किंवा उपआयुक्तांना विनंती करतो की, या विषयाबाबत थोडी माहिती सभागृहाला दयावी.

**<u>सदस्य, श्री. अरुण आशान</u> :-** आयुक्त् साहेब माहिती दया.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे</u>**:- आयुक्त् साहेब बोला

**<u>महापालिका सचिव</u>**:- आधी संबंधीत विभागाचे उपआयुक्त् जाधव साहेब बोलत आहेत.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी</u>**:- हो बोला बोला.

**<u>उप आयुक्त् (पाणी पुरवठा), श्री. सुभाष जाधव</u>**:- सन्माननीय महापौरजी, उपमहापौरजी, सचिव मॅडम, अतिरिक्त आयुक्त् आणि सन्माननीय सभागृह वेस्ट टू एनर्जी हा एक क्लस्टर बेस्ड प्रकल्प आहे. म्हणजे कल्याण डोंबिवली महानगरपालिका आणि नजिकच्या महापालिका यामध्ये समाविष्ट होणार आहेत. ज्यामध्ये आपली उल्हासनगर महानगरपालिका आहे. एक भिवंडी महानगरपालिका आहे आणि ठाणे जिल्हा परिषदेचा काही भाग आहे. हा वेस्ट टू एनर्जी म्हणजे मी एक असा प्रकल्प राबविण्यात येत आहे. कमीतकमी १००० ते १२०० मे.ट. इथे घनकचरा गोळा होणे आवश्यक आहे. परंतु एकटया कल्याण डोंबिवली महानगरपालिकेकडे तेवढा कचरा नाही. आपलाही तितका कचरा नाही आहे. त्यामुळे हे ३-४ महापालिका आणि जिल्हा परिषदेचा भाग मिळून प्रकल्प राबविण्याचा ठरविले आहे. याची सर्व प्रक्रिया शासन स्तरावर होणार आहे. या अनुषंगाने जेव्हा आपल्याला क्लस्टर बेस्डमध्ये समावेश करायचा आहे त्यावेळी आपली एक तत्वत: मान्यता सर्व महानगरपालिका जे समाविष्ट होण्यास इच्छूक आहेत त्याची आपल्या महानगरपालिकेने तत्वत: मान्यता घेणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने आज आपण महानगरपालिकेचा येथे ठराव करुन त्यांना आम्ही सहभागी होण्यास तयार आहोत असा एक ठराव आपण त्यांना दयायचा आहे. म्हणून हा आयत्या वेळेचा विषय आपण येथे महासभेसमोर आणलेला आहे. या ठरावास आपण तत्वत: मान्यता देउुन आपण ही जी समस्या आपली घनकचरा व्यवस्थापनाची चालू आहे. आपण त्यामुळे सभागृहाने याला मान्यता दयावी.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:-</u>** आयुक्त महोदय, आयुक्त साहेब धन्यवाद एक चांगला प्रस्ताव तुम्ही आणलेला आहे. उल्हासनगर शहरामध्ये किती दिवस कचरा कुठे टाकायचा. अगदी कचऱ्याचे पीटस आहेत त्यामुळे सर्व सभागृहाला विनंती करतो की, तो तातडीने इतिवृत्ताची वाट न पाहता पेट्रोल, डिझेलवर नसणार आहे. कल्याण डोंबिवली, भिवंडी आणि इतर महानगरपालिका, नगरपालिका यांनी प्रकल्प तयार करतात त्यामुळे त्यात आपण समाविष्ट होणे आवश्यक आहे. मी सर्वांना विनंती करतो की, ताबडतोब मंजूरी देऊन इतिवृत्ताची वाट न पाहता प्रशासनाने यावर कार्यवाही करावी.

**<u>सदस्या, श्रीम. अंजली साळवे:-</u>** सगळयांनी मान्यता दयावी.

**<u>उप आयुक्त् (पाणी पुरवठा), श्री. सुभाष जाधव</u>**:- धन्यवाद.

**<u>सदस्य, श्री. अरुण आशान</u>** :- हा निर्णय आयुक्तांनी घेतलेला आहे. महानगरपालिकेला फायदा होणार आहे. त्यामुळे इतिवृत्ताची वाट न पाहता

**<u>सदस्य, श्री. कलवंतसिंह सोहता</u>** :- पास पास..

**<u>महापालिका सचिव</u>**:- मी जरा ठराव वाचते, कल्याण डोबिवली महापालिकेमध्ये वेस्ट टू एनर्जी क्लस्टर प्रकल्पामध्ये उल्हासनगर महानगरपालिकेला सहभागी होण्यास तत्वत: मंजुरी (In Principal Approval) देत आहे. तसेच प्रकल्पात सहभागी होतांना वेळोवळी निर्णय , दर करार करावयाचे इतर अन्य अनुषंगीक बाबींवर निर्णय असल्याने मा. आयुक्तांना सर्व प्रकारच्या पुढील कार्यवाहीसाठी प्राधीकृत करीत आहे. व सदर प्रकल्पाच्या कामाबाबत वेळोवळी प्रगती अहवाल महासभेस सादर करणेस प्रशासनास निर्देश देत आहे. तसेच सदर ठराव इतिवृत्ताची वाट न पाहता मंजूर.

**<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया</u>**:-पास पास.

**<u>सदस्या, श्रीम. अजंली साळवे</u>**:-पास पास.

**<u>सदस्य, श्री. प्रकाश नाथानी</u>**:- मला या विषयावर मुददयावर बोलायचे आहे.

**<u>सदस्य, श्री. अरुण आशान</u>** :- मॅडम पुढचा विषय घ्या.

**<u>सदस्य, श्री. प्रकाश नाथानी</u>** :- गार्डनमधुन सुरक्षा रक्षक निघून गेले आहेत. प्रभात गार्डन कोण उघडणार. नेताजी गार्डन कोण उघडणार. गोल मैदान कोण उघणार. सुरक्षा रक्षक हा गंभीर विषय आहे.

**<u>सदस्य, श्री. अरुण आशान</u>** :- मॅडम पुढचा विषय घ्या.

**<u>सदस्य, श्री. प्रकाश नाथानी</u> :-** पुर्ण शहराचे सुरक्षा रक्षक निघून गेले आहेत.

<u>काही सदस्य :—</u>पास—पास……

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **<u>आयत्यावेळी विषय</u>**

**<u>विषय क्र.१० :-</u> कल्याण डोबिंवली महानगरपालिका हद्दीमध्ये प्रस्तावित क्लस्टर बेस्ड (Cluster Based) वेस्ट टू एनर्जी प्रकल्पामध्ये सहभागी होणेबाबत धोरणात्मक निर्णय घेणेबाबत...**

**<u>प्रस्तावना</u>**

**कल्याण डोबिंवली महानगरपालिका येथे क्लस्टर बेस्ड (Cluster Based) वेस्ट टू एनर्जी प्रकल्पामध्ये सहभागी होणेबाबत मा. आयुक्त कं.डो.म.पा. यांचे दिनांक ११/०२/२०२२ रोजीचे पत्र प्राप्त झालेले आहे. त्यापुर्वी दि. १०/२/२०२२ रोजी कल्याण डोबिंवली महानगरपालिका येथे उल्हासनगर महानगरपालिका, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका व जिल्हापरिषद ठाणे यांचेसोबत झालेल्या बैठकीत झालेल्या चर्चेनुसार सारांश खालिलप्रमाणे आहे.**

**१) 'एकात्मिक घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प' व सुका कचरा वर्गीकरण केंद्र या ठिकाणांतुन निर्माण होणारे आरडीएफ मटेरियल (Refuse Derive Fuel) साधारणत: २० ते ३०% या प्रमाणात निघत असून ते पुनर्चक्रीकरणासाठी वापरण्यास अयोग्य असते त्यामुळे आरडीएफ मटेरीअल १००० $^{0}$C च्या पुढील तापमानावर चालणा-या बॉयलरमध्ये पुरक इंधन म्हणुन वापरण्यात येते. आरडीएफ मटेरिअलची विल्हेवाट लावण्यासाठी नजीकच्या म.औ.वि. मंडळाच्या कारखान्याबरोबर तसेच सेन्चुरी रेऑन इ. मोठ्या कारखान्यांशी संपर्क साधून त्यांच्या बॉयलरमध्ये सदरचे मटेरिअल घेण्याची विनंती करण्यात आली होती. मात्र उपरोक्त कारखान्यांमध्ये बॉयलरची ज्वलनक्षमता १००० $^{0}$C च्या आत असल्याने त्यांनी सदरचे आरडीएफ मटेरीअल घेण्यास नकार दिला आहे. त्यामुळे सीपीसीबी व एमपीसीबीच्या मार्गदर्शक सुचनांनुसार सदरचे आरडीएफ मटेरीअल बेळगाव येथिल सिंमेट फॅक्टरीमध्ये पाठविण्यात येते. कमीत कमी अंतरावर महाराष्ट्रामध्ये 'चंद्रपुर' येथे सिमेंट फॅक्टरी असून दुसरी कर्नाटक येथे बेळगावला आहे. जेथे सिंमेटचे उत्पादन होते. ही ठिकाणे कल्याण पासुन ५५० ते ६०० किलोमीटर अंतरावर असल्यामुळे आरडीएफच्या वाहतुकीसाठी मोठया प्रमाणावर खर्च येतो. घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ अन्वये आरडीएफ मटेरीअल शास्त्रोक्त भरावभुमीमध्ये टाकता येत नाही. शास्त्रोक्त भरावभुमीमध्ये फक्त निष्क्रीय (Inert) पदार्थ टाकले जातात.**

**२) उपरोक्त प्रमाणे वस्तुस्थिती असल्यामुळे घनकच-यामधुन निघणा-या आरडीएफ मटेरिअलची शास्त्रोक्त रित्या विल्हेवाट लावण्यासाठी वेस्ट टू एनर्जी हा एक चांगला पर्याय आहे. यामध्ये असणा-या रिॲक्टरमध्ये उच्च तापमानाला सदरचे आरडीएफ मटेरीअल इंधन म्हणुन वापरले जाते. वेस्ट टू एनर्जी प्रकल्पामधुन वेस्ट मटेरीअल वापरुन वीजेची निर्मिती केली जाते. याबाबत दिल्ली शहरांमध्ये जिंदाल कंपनीमार्फत चालू असलेल्या प्रकल्पाची कं.डो.म.पा.च्या अधिका-यांमवेत समक्ष पाहणी केली असता, सदर प्रकल्पामधुन कमीत कमी प्रदुषण होत असून निगेटीव्ह प्रेशर मुळे कच-याचा वास आजुबाजुच्या परिसराला होत नसल्याचे आढळून आले. तसेच या प्रकियेअंती निर्माण होणाज्या राखेचाही वापर करता येणार आहे. त्यामुळे फेकण्यायोग्य मटेरिअल चे प्रमाण फारच कमी होवू शकते. मुंबई महानगर क्षेत्राविकास प्राधीकरणाच्या प्रदेशामध्ये 'वेस्ट टू एनर्जी' प्रकल्प कार्यान्वित नाही. त्यामुळे सर्वच महानगरपालिकांना आरडीएफ मटेरिअलच्या विल्हेवाटची समस्या भेडसावत आहे.**

**३) याबाबत कल्याण डोबिंवली महानगरपालिकेने पुढाकार घेतला असून महापालिकेच्या घनकचरा प्रकल्पासाठी आरक्षित व ताब्यात असलेल्या जागेमध्ये बांधा वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर अशा प्रकारचा प्रकल्प प्रस्तावित आहे. तथापी अशा प्रकारचा प्रकल्प किमान १००० ते १२०० मे.ट असल्यास सुसाध्य उभारणीचा कालावधी दोन वर्षे असणार असून त्यामध्ये पर्यावरण विभागामार्फत जनसुनावणी, हरकती, पर्यावरणीय आघात अहवाल व विविध पर्यावरणीय चाचण्या व पर्यावरण ना हरकत दाखला इत्यादीचा समावेश असणार आहे. सदर प्रकल्पामध्ये कलयाण डोंबिवली महानगरपालिकेचा ६५० मे.ट कचरा असणार आहे व उर्वरीत कचरा उल्हासनगर महानगरपालिका,**

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका व जिल्हापरिषद ठाणे यांचे क्षेत्रातील घेणार असुन १००० ते १२०० मे. ट क्षमतेचा प्रकल्प तयार करता येण्यासारखा आहे..

४) उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये घनकच-यावर प्रक्रिया करण्यासाठी पुरेशी जागा उपलब्ध नसल्यास तसेच त्याची विल्हेवाट लावण्यासाठी शास्त्रोक्त भरावभुमी व निर्माण होणा-या दैनंदिन कच-याच्या तुलनेत, प्रकिया प्रकल्प पुरेशा प्रमाणात नसल्यास आपण या प्रकल्पामध्ये सहभागी होवू शकता. त्यामुळे सदर प्रकल्पाला पुरेशा प्रमाणामध्ये कचरा मिळू शकतो व प्रकल्प सुयोग्यरित्या चालू शकतो. या प्रकल्पाचे वैशिष्टे म्हणजे प्रकल्पामध्ये मिश्र कच-याचे वर्गीकरण करण्याठी अत्याधुनिक यंत्र सामुग्री वापरली जाणार आहे. सुका कचरा व ओला कचरा त्याव्दारे वेगवेगळा केला जाणार आहे. सुका कचरा वीज निर्मिती प्रकल्पासाठी इंधन म्हणुन वापरला जाणार असून ओल्या कच-यापासुन खत निर्मिती केली जाणार आहे. त्यामुळे आपल्या महानगरपालिकेचा घनकच-या प्रश्न कायमस्वरुपी सुटण्यास मदत होणार आहे. महापालिकेस फक्त कच-याची वाहतुक प्रकल्पाच्या ठिकाणी करावयाची आहे व त्यासाठी येणारा प्रशासकीय खर्च महापालिकेस अदा करावा लागणार आहे. तरी उल्हासनगर महानगरपालिका सदर प्रकल्पासाठी सहभाग नोंदविण्यास तयार असेल तर किती प्रमाणात घनकचरा सदर प्रकल्पासाठी पुरवु शकते याच्या विवरणासह लेखी संमती पत्र कल्याण डोबिंवली महापालिकेस पाठविण्याची विनंती करण्यात आलेली आहे.

५) सद्यस्थितीत उपलब्ध असलेल्या विविध तंत्रज्ञान व पद्धतींपैकी कमी खर्चाचे व सिद्ध झालेले सर्वांसाठी उपयुक्त तंत्रज्ञान वापरुन घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प राबविण्याबाबत तीनही महापालिकांचे व लगतच्या ग्रामिण भागाचे घनकचरयाच्या प्रकल्पाबाबत कल्याण डोबिंवली महानगरपालिका सोबत क्लस्टर तयार करुन त्याव्दारे प्रकल्प रावविणेबाबत त्या-त्या महानगरपालिकेने मा. सर्वसाधारण सभेची मंजुरी घेण्याचे ठरविण्यात आलेले आहे.

अ) घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प राबवितांना स्थानिक स्वराज्य संस्थांना येणा-या अडचणी व समस्या

१. महानगरपालिकेच्या मंजुर विकास आराखड्यामध्ये घनकचरा व्यवस्थापनासाठी केंद्रीय प्रदुषण मंडळाच्या नियमानुसार पुरेशा प्रमाणात जागा आरक्षित नसणे.
२. जागा आरक्षित असल्यास त्याचे हस्तांतरण महापालिकेकडे झालेले नसणे व जागेवर अतिक्रमित बांधकाम असणे. सदर जागा दुर असणे.
३. शहरांचे झपाट्याने नागरीकरण झालेले असल्याने आरक्षित जागेभोवती पुरेशा उप्रमाणात बफर झोन नसणे.
४. घरगुती स्तरावर कचरयाचे वर्गीकरण करण्याची नागरिकांची मानसिकता नसणे. त्यामुळे मिश्र कचरयाचे वर्गीकरण करतांना मोठया प्रमाणावर येणा-या अडचणी.
५. प्रकल्प राबवितांना स्थानिक नागरीकांव्दारे दुर्गधी बाबत केल्याजाणा-या तक्रारीनां सातत्याने सामोरे जावे लागणे.
६. शास्त्रोक्त भरावभुमी साठी आरक्षीत असलेल्या अथवा मा. जिल्हाअधिकारी यांच्याकडून लगतच्या क्षेत्रामध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या जमीनीवर कच-यापासुन खतनिर्मिती प्रकल्प राबविण्यासाठी लगतच्या नागरीकांकडून होत असलेला विरोध.
७. प्रकल्पातुन निर्माण होणा-या खताला नजीकच्या क्षेत्रात बाजारपेठ उपलब्ध नसणे.
८. प्रकल्पातुन निर्माण होणा-या सुक्या कच-याचे सुमारे २५ ते ३० % आ.डी.एफ मटेरीअल चंद्रपुर किंवा बेळगाव याठीकाणी असलेल्या सिंमेट कारखान्यांत पाठविण्यासाठी येणारा वाहतुकीचा मोठया प्रमाणावरील खर्च.
९. प्रकियेअंती घनकच-यामधुन निघणा-या कमीत कमी २५ ते ३० % निष्क्रिय पदार्थांची शास्त्रोक्त रित्या विल्हेवाट लावण्यासाठी मोठया प्रमाणावर शास्त्रोक्त भरावभुमी उभारणीची गरज व त्यासाठी लागणारी जागा व येणारा खर्च.
१०. आधुनिक तंत्रज्ञानावर आधारीत वेस्ट टू एनर्जी प्रकल्पा राबविण्यासाठी महापालिकेकडे पुरेसा निधी नसणे.
११. वेस्ट टू एनर्जी प्रकल्प राबविण्यासाठी व सुसाध्य होण्यासाठी किमान ६०० मॅट्रीक टन प्रति दिन कच-याची आवश्यकता आहे. तथापी एकाच महापालिकेकडे एवढा कचरा उपलब्ध होत नसणे.

ब) सदर वेस्ट टू एनर्जी क्लस्टर प्रकल्पामध्ये सहभाग झाल्यास उल्हासनगर महानगरपालिकेस होणारे

फायदे.

१. आधुनिक तंत्रज्ञानामुळे महापालिकेस शुन्य (००) भांडवली खर्च येणार आहे.
२. मिश्र कच-याचे वर्गीकरणाची आवश्यकता नसणे.

३. प्रकल्प Negative Pressure या तत्वावर डिझाईन केलेला व सर्व बाजुने बंदिस्त असल्याने घनकच-यापासुन निर्माण होणारी दुर्गंधी बाहेरील बाजुस पसरत नाही.
४. प्रकल्पामधुन निघणारी राख, सिमेंट बनविण्यासाठी व कॉक्रींट पेवर ब्लॉक/ वीटा बनविण्यासाठी उपयुक्त.
५. जल, वायु व जमिनीच्या प्रदुषणात लक्षणीय घट.
६. कच-यापासुन वीज निर्मिती व्दारे अर्थार्जन होवुन प्रकल्प सुसाध्य.
७. पर्यावरण पुरक प्रकल्प .
८. प्रकल्पासाठी तुलनात्मक दृष्टया कमी जागेची आवश्यकता.

**क) क्लस्टर केल्यामुळे होणारे फायदे**.

१. एकत्रित प्रकल्प राबविल्यास भांडवली खर्चामध्ये तसेच परिचालनावरील खर्चामध्ये मोठया प्रमाणाव कपात.
२. जागेची बचत.
३. कमीत कमी प्रक्रिया शुल्क.
४. दीर्घ कालावधीसाठी (किमान २५ वर्ष) कच-याच्या विल्हेवाटीसाठी शास्त्रोक्त पध्दतीची उपाययोजना.
५. सदरचा प्रकल्प हा पीपीपी तत्वानुसार राबविण्यात येणार असल्याने महापालिकाचा भांडवली खर्च ० आहे.
६. कल्याण डोंबिवली महानगरपालिकाने त्यांच्या क्षेत्रामध्ये घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी आरक्षीत असलेली व महापालिकेच्या ताब्यात असलेली १० एकर जागा प्रकल्पासाठी नाममात्र भाडेतत्वावर उपलब्ध करुन दिल्यास त्यासाठी लागणारे सर्व संबंधित शासकिय परवानग्या (Statutory approvals/ clearances) कल्याण डोंबिवली महानगरपालिका देण्यास तयार आहे.

कल्याण डोबिंवली महानगरपालिकेकडे 'वेस्ट टू एनर्जी' प्रकल्प क्लस्टर पध्दतीने राबविण्यासाठी जागा उपलब्ध असून भिवंडी व उल्हासनगर शहरापासुन कल्याण हे मध्यवर्ती ठिकाण असून दोनही शहरापासुन ८ ते १० किमी अंतरावर आहे. तसेच प्रकल्पाच्या आरक्षीत जागेपर्यंत मुलभुत सोयीसुविधा व प्रशस्त रस्ते उपलब्ध आहेत.

या प्रकल्पामध्ये सहभागी होणा-या महापालिकांना आपआपल्या क्षेत्रातील कचरा, प्रस्तावित प्रकल्पा पर्यंत पोहचविणे आवश्यक राहील तसेच किमान व कमाल कच-याचे परिमाण ठरवून दयावे लागेल (सदर कच-यामध्ये माती, वाळू, गाळ, डेब्रिज अशा प्रकारचे घटक नसावेत). तसेच प्रक्रिया शुल्क म्हणुन वजनानुसार प्रतिमाह ठराविक रक्कम कल्याण डोबिवली महापालिकेकडे जमा करणे आवश्यक राहील. असे दिनांक ११/०२/२०२२ रोजीचे पत्रात नमुद केलेले आहे.

सद्यस्थितीत उल्हासनगर महानगरपालिका मार्फत देण्यात आलेला कच-याचा ठेका ०३ मार्च २०२२ रोजी संपत असुन त्याबाबतची निविदा प्रक्रिया प्रगतीपथावर आहे. त्या निविदेमध्ये कचरा वाहतुकीच्या ठिकाणाचे अंतर अंदाजे ८ कि.मी. नमुद केलेले आहे. उल्हासनगर महानगरपालिका सदर प्रकल्पात सहभागी झाल्यास निविदेनुसार नियुक्त ठेकेदार याला कल्याण डोबिंवली महानगरपालिका हद्दीत महापालिका अंतर्गत कचरा तेवढ्याच अंतरावर वहन करता येईल व घरा घरातुन प्रक्रिया केंद्र पर्यंत कचरा वाहतुकीसाठी महापालिकेवर अतिरिक्त आर्थिक बोजा पडणार नाही.

तरी कल्याण डोबिंवली महानगरपालिका हद्दीमध्ये प्रस्तावित वेस्ट टू एनर्जी क्लस्टर प्रकल्पामध्ये सहभाग नोंदविणे उचित वाटते त्यानुसार खालील प्रमाणे धोरणात्मक निर्णय होणे आवश्यक आहे.

१. कल्याण डोबिवली महापालिकेमध्ये वेस्ट टू एनर्जी क्लस्टर प्रकल्पामध्ये उल्हासनगर महानगरपालिका सहभागी होण्यास तत्वत: मंजुरी (In Principal Approval) देणे.
२. प्रकल्पात सहभागी होतांना वेळोवळी निर्णय , दर करार करावयाचे इतर अन्य अनुषंगीक बाबींवर निर्णय असल्याने मा. आयुक्तांना सर्व प्रकारच्या पुढील कार्यवाहीसाठी प्राधीकृत करणेस मान्यता देणे व सदर प्रकल्पाच्या कामाबाबत वेळोवळी प्रगती अहवाल महासभेस सादर करणे.

वरील प्रमाणे महासभेसमारे धोरणात्मक निर्णयाकरीता सदरचा प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र.</u> ६६ दिनांक १८/०२/२०२२

सुचकाचे नाव :- श्री. राजेश वदारिया

अनुमोदकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे १) कल्याण डोबिवली महापालिकेमध्ये वेस्ट टू एनर्जी क्लस्टर प्रकल्पामध्ये उल्हासनगर महानगरपालिका सहभागी होण्यास तत्वत: मंजुरी (In Principal Approval) देत आहे.

२) प्रकल्पात सहभागी होतांना वेळोवळी निर्णय , दर करार करावयाचे इतर अन्य अनुषंगिक बाबींवर निर्णय असल्याने मा. आयुक्तांना सर्व प्रकारच्या पुढील कार्यवाहीसाठी प्राधिकृत करीत आहे. व सदर प्रकल्पाच्या कामाबाबत वेळोवळी प्रगती अहवाल महासभेस सादर करणेस प्रशासनास निर्देश देत आहे.

या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही /-

अनुमोदकाची सही /-

सर्वानुमते

महपौर/पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :- विषय क्र. ११ वाचुन दाखवितात.**

---

⇨ विषय क्र. ११ :— **आयत्या वेळेचा विषय**
उल्हासनगर शहरातील विविध रस्त्यांना व चौकांना नामकरण करणेकरीता तदर्थ समितीने मंजुर केलेल्या २६ प्रस्तावांची यादी मा. महासभा, उ.म.पा. चे मान्यतेस्तव सादर करणे.

---

**सदस्य, श्री. अरुण आशान** :- पास पास..

**सदस्य, श्री. राजेश वधारीया** :- पास पास..

**सदस्य, श्री. प्रकाश नाथानी** :- महापौरजी, उपमहापौरजी कृपया करुन सुरक्षा रक्षकाचा मुददा गंभीरतेने घ्या. पुढे जावून काही अत्याचार, गैरप्रकार होणार नाही. एवढे मोठमोठे गार्डन आहेत शहरात त्याची जबाबदारी कोण घेणार. ज्यांनी पण सुरक्षा रक्षकाचा पगार थांबवला आहे. त्यांना देण्यात यावा. जर गार्डनमध्ये काही गैरप्रकार झाले तर त्यास महानगरपालिका जबाबदार असेल. गार्डनमध्ये गर्दुले येतात, भिकारी येतात. आपण यास गंभीरतेने घ्या. आणि प्रत्यक्ष गार्डनची पाहणी करुन मागच्या तीन दिवसात कोण गार्डन उघडत आहेत. आणि कोण गार्डन बंद करत आहेत. या विषयावर चर्चा करा. बाकी सर्व गोष्टींवर चर्चा करतात. शहराला लावारीस करणार असे मला वाटत आहे.

**सदस्या, श्रीम. अजंली साळवे** :-त्यांना काढून काय होणार. जे आहेत त्यांना सातत्या दया.

**महापालिका सचिव** :- मा. पिठासीन अधिकारी यांनी सांगितले आहे की, तदर्थ समितीचा प्रस्ताव पास करुन नंतर या विषयावर बोलावे. हा विषय पास.

**सदस्य, श्री. अरुण आशान** :- पास इतिवृत्ताची वाट न पाहता.

**महापालिका सचिव** :- पास. पुढचे विषय संपले आहेत परंतु आपल्याकडे नविन अतिरिक्त आयुक्त म्हणून जमीर लेंगरेकर साहेब आले आहेत. मा. पिठासीन अधिकारी यांनी त्यांना ओळख करुन देण्यास सांगितले आहे. बहुतेक सदस्य त्यांना ओळखतात. पण ही महासभेची प्रथा आहे. म्हणून त्यांना दोन मिनिट

**अतिरिक्त आयुक्त, श्री. जमीर लेंगरेकर**:- मा. महापौर, उपमहापौर इतर सदस्यांना नमस्कार. मी साडे चार वर्षानंतर पुन्हा उल्हासनगर महानगरपालिकेत अतिरिक्त् आयुक्त या पदावर नियुक्त् झालो. मला आनंद आहे की, पुन्हा एकदा

उल्हासनगर महानगरपालिकेची सेवा करण्याची संधी मला मिळाली. आपले सहकार्य आणि मदत मला नेहमी लागणार. ... धन्यवाद.

**महापालिका सचिव :-** आता मिटिंगचे विषय संपलेले आहेत.

**महापौर तथा पिठासीन अधिकारी:-** नाथानी सर.

**महापालिका सचिव:-** मा.महापौरांनी नाथानी सरांचे नाव घेतले आहे. परंतु नाथानी सर दिसत नाहीत. कृपया सर्वांनी जन गण मन साठी उभे रहावे.

काही सदस्य:—पास—पास……

महापौर तथा पीठासीन अधिकारी:— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **आयत्यावेळी विषय**

**विषय क्र.११:-** उल्हासनगर शहरातील विविध रस्त्यांना व चौकांना नामकरण करणेकरीता तदर्थ समितीने मंजुर केलेल्या २६ प्रस्तावांची यादी मा. महासभा, उ.म.पा. चे मान्यतेस्तव सादर करणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर शहरातील विविध उल्हासनगर शहरातील रस्ते, चौक, प्रवेशद्वार इ. चे नामकरण करणेकरीता महासभेच्या ठरावानुसार तदर्थ नामकरण समिती गठित करण्यात आलेली आहे. दि. १५/०२/२०२२ रोजीच्या मा. महापौर, उ.म.पा. यांचे पत्राच्या अनुषंगाने दि.०१ फेब्रुवारी, २०२२ रोजी सायं. ४.०० वा. मा. महापौर यांचे दालनात तदर्थ नामकरण समितीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. सदर बैठकीत तदर्थ समितीने प्राथमिक मंजुरी दिलेल्या एकुण २६ प्रस्तावांची यादी सोबत जोडली आहे. सदर बैठकीमध्ये एकुण २६ प्रस्तावांना प्राथमिक मंजुरी देण्यात आलेली असून २६ *एकुण प्रस्ताव* मा.महासभेची मान्यता मिळणेस प्रस्तावित करण्यात येत आहे.

| अ. क्र. | प्रभाग क्र. | प्रस्तावितांचे नावे | नामकरण करावयाचे ठिकाण रस्ता/ चौक | प्रस्तावित नाव | पत्र प्राप्त दिनांक | (मंजुर / नामंजुर) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | १० |
| 1 | १९ | मा. श्री. महेंद्र सदाशीव थोरवे, आमदार | स्वर्गीय मनिष कृष्णानी यांचे नाव चौकास देणेबाबत.. | **स्वर्गीय मनिष कृष्णानी चौक** | 22/01/2022 | मंजुर |
| | | मा. पंचम ओमी कालानी महापौर | उल्हासनगर-३ मधील महाराजा हॉल समोरील चौकास नामकरण करणे. | **"स्व.मनीष गोधुमल कृष्णानी"** | १०/१०/२०१८ | |
| | | सौ. शुभांगीनी निकम नगरसेविका प्रभाग क्र. ७ उमपा | उल्हासनगर-३ कल्याण अंबरनाथ रोड रिलायन्स फ्रेश जवळील चौकाचे नामकरण करणे | **"मनिष गोदुमल क्रिशनानी "** | १३/०३/२०२० | |
| 2 | १६ | श्री शंकर गोविंदराम. लुंड नगरसेवक | उल्हासनगर ५ येथील पॅनेल १६ हिरापुरी चौक ते दत्त मंदिर परिसराचे साई गुरुदासनगर किंवा साई गुरुदास मार्ग नामकरण करणे | **साई गुरुमुखदास मार्ग** | २६-१०-२०२१ | मंजुर |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | श्रीम. ज्योती रमेश चैनानी, नगरसेविका | उल्हासनगर ५ येथील पॅनेल १६ हिरापुरी चौक ते दत्त मंदिर परिसराचे साई गुरुदासनगर किंवा साई गुरुदास मार्ग नामकरण करणे | | २७-१०-२०२१ | |
| 3 | ६ ड | श्री. महेश पी. सुखरमनी नगरसेवक | बॅरेक नं.२७८ आणि २७९, विधादा अपार्टमेंट जवळील समाज मंदिरास नामकरण करणे. (दोन अर्ज प्राप्त) | **"माता मंजू देवी समाज हॉल"** | ३०/०१/२०१९ व ०८/११/२०२१ | मंजुर |
| 4 | ६ ड | श्री.महेश पी.सुखरमनी नगरसेवक | उल्हासनगर-२ येथील बॅ.नं.६०४, ओ.टी.सेक्शन, अमरधाम चौक येथील समाज मंदीरास नामकरण करणे. | **जयसाई कि समाजमंदीर हॉल** | २९/१/२०१९ | मंजुर |
| 5 | २० | श्री.आकाश परशुराम पाटील नगरसेवक<br>श्री.विकास परशुराम पाटील नगरसेवक | उल्हासनगर-५ येथील स्वामी शांतीप्रकाश आश्रमच्या पाठीमागील परिसरास नामकरण करणे. | **"हनुमान नगर"** | १) ०९/०१/२०१९<br>२) ०९/०१/२०१९ | मंजुर |
| 6 | १७ | श्री.भारत रामचंद राजवानी (गंगोत्री), नगरसेवक | ८) प्रभाग क.17 मधील ब्लॉक नं.बी 26,रूम नं.156 ते ब्लॉक नं.बी 32,रूम नं.192 जवळील रस्त्यास "साई वसनशाह (नगर)" असे नामकरण करण्या बाबत. | **"साई वसनशाह (नगर)"** | १७/०३/२०२१ | मंजुर |
| 7 | ६ | श्रीम. रेखा ए. ठाकुर, नगरसेविका | बाबा मंगाराम चौक ते प्रायमरी स्कुल नं. २४, ओ.टी. सेक्शन, उल्हासनगर २ या रस्त्यास स्व. श्री. प्रेम कारीया रोड असे नामकरण करणेबाबत.. | **स्व. प्रेम कारीया मार्ग** | ८/९/२०२१ | मंजुर |
| 8 | १४ | श्री. चंद्रशेखर केशव यादव, नगरसेवक | प्रभाग क्र. १४ मधील उल्हास स्टेशन ते जिजामाता उद्यान या रस्त्याला स्व.रघूनाथ राणे (कॅम्प कमांडर) असे नामकरण करणेबाबत. | **स्व.रघूनाथ राणे (कॅम्प कमांडर)** | २३-०३-२०२१ | मंजुर |
| 9 | | श्रीम. कविता लाल पंजाबी, नगरसेविका | उल्हासनगर ३ मधील बॅरेक नं ८९२ ते गोलचक्करा, सेक्शन २० या रस्त्यास "उल्हासनगरचे युवराज मार्ग" हे नामकरण करणेबाबत | **उल्हासनगरका युवराज मार्ग** | २३-०३-२०२१ | मंजुर |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 10 | | श्रीम. कविता लाल पंजाबी, नगरसेविका | उल्हासनगर ३ मधील मेन रोड ते बॅ.नं. ९६९ चे समोर "एम.एम. मार्ग" असे नामकरण करणेबाबत (सदर नाव मंगल मुती मार्ग असे आहे.) | **"मंगल मुर्ती मार्ग"** | २३-०३-२०२१ | मंजुर |
| 11 | ३ | श्री. भुल्लर राजेंद्रसिंह वी. नगरसेवक | उल्हासनगर १ मधील प्रभाग ३ येथील शिवाजीनगर बिर्लागेट , इंटक आफीस मागील समाजमंदिरास "छत्रपती शिवाजी महाराज समाजमंदिर" असे नामकरण करणे. | **छत्रपती शिवाजी महाराज समाजमंदिर** | १६-०३-२०२१ | मंजुर |
| 12 | ३ | श्री. भुल्लर चरणजितकौर रा. नगरसेवीका | मोरया सुपारीवाला मार्ग बॅ.नं.३९९ ते बॅ.नं. ४०५ नेहलानी यांचे घरापर्यंतच्या रस्त्याला राजावीर दरबार रोड असे नामकरण करणेबाबत. | **राजावीर दरबार रोड** | १६-०३-२०२१ | मंजुर |
| 13 | | श्री. कलवंत सिंह साहोता, नगरसेवक | शहाड फाटक, सी. ब्लॉक, मटका चौक परीसर, उल्हासनगर १ येथील प्रवेशद्वारास "गुरुद्वारा सचखंड दरबार" असे नामकरण करणे | **गुरुद्वारा सचखंड दरबार** | ८/१०/२०२१ | मंजुर |
| 14 | १८ | श्रीम. अंजली चंद्रकांत साळवे, नगरसेविका | प्रभाग क्र. १८ मध्ये कालिमाता मंदिर ते दलित पॅन्थर चौक या रस्त्यास माननिय वसंत मून यांचे नाव देणेबाबत. | **माननिय वसंत मून** | २६-१०-२०२१ | मंजुर |
| 15 | ९ | श्री. मनोज डी. लास्सी, नगरसेवक | उल्हासनगर ३ येथील पॅनेल ९ मधील काछोमल पुतळा ते सचो सतराम चौक या रस्त्याला जेष्ठ समाजसेवक श्री. अमरलाल छाबडीया यांचे नामकरण करणे | **श्री. अमरलाल छाबडीया मार्ग** | २६-१०-२०२१ | मंजुर |
| 16 | | श्री. महेश सुखरामानी, नगरसेवक | उल्हासनगर २ मधील ओटी सेक्शन खेमानी च्या रस्त्याचे नाव संत श्री आशारामजी रोड करणे. | **संत श्री आशारामजी रोड** | ८/११/२०२१ | मंजुर |
| 17 | | श्री. मनोज डी. लास्सी, नगरसेवक | १) सिमा अपार्टमेंट ते अमरधाम चौक या रस्त्याला माजी आमदार स्वर्गीय श्रीम. ज्योती सुरेश (पप्पू) कालानी यांचे नाव देणेबाबत | **१) माजी आमदार स्वर्गीय श्रीम. ज्योती सुरेश (पप्पू) कालानी मार्ग** | २४/११/२०२१ | मंजुर |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 18 | १० | श्रीम. शुभांगी मनोहर बेहनवाल, शिक्षण सभापती, उ.म.पा. | **१)** उल्हासनगर २ येथील पॅनल १० मधील सिंधी शाळेजवळ, पंचशिल नगर मधील चौकाला पंचशिलनगर संविधान चौक असे नामकरण करणेबाबत | **१) पंचशिलनगर संविधान चौक** | ९/११/२०२१ | मंजुर |
| 19 | | श्रीम. रेखा ए. ठाकुर, नगरसेविका | उल्हासनगर २ येथील बॅरेक नं. ५७७ व ५७८, ओ.टी. सेक्शन, येथील कॉलनीला जय साई झुलेलाल कॉलनी असे नामकरण करणेबाबत. | **जय साई झुलेलाल कॉलनी** | १८/११/२०२१ | मंजुर |
| 20 | | श्री. मनोज डी. लास्सी, नगरसेवक | सिमा अपार्टमेंट समोरील कालानी महल जवळील चौकाला माजी आमदार स्वर्गीय श्रीम. ज्योती सुरेश (पप्पू) कालानी चौक | **माजी आमदार स्वर्गीय श्रीम. ज्योती सुरेश (पप्पू) कालानी चौक** | | मंजुर |
| 21 | १९ | श्री. विजय चाहु पाटील , नगरसेवक | स्वामी शांतीप्रकाश आश्रम ते स्वामी शांतीप्रकाश हायस्कुल पर्यंत मुख्य रस्त्याला स्वामी शांतीप्रकाशजी महाराज यांचे नाव देणेबाबत | **स्वामी शांतीप्रकाशजी महाराज मार्ग** | २९/११/२०२१ | मंजुर |
| 22 | १७ | श्री. भारत रामचंद राजवानी (गंगोत्री), नगरसेवक | प्रभाग क्र. १७ मधील साई आर्केड इमारती पासून स्वामी शांती प्रकाश उद्यानाच्या दोन्ही बाजुच्या दोन्ही मुख्य दरवाजाच्या लगतच्या रस्त्याला स्वर्गीय पुष्पा रामचंद राजवानी (गंगोत्री) माजी नगरसेविका मार्ग असे नामकरण करणेबाबत.. | **स्वर्गीय पुष्पा रामचंद राजवानी (गंगोत्री) माजी नगरसेविका मार्ग** | ६/१२/२०२१ | मंजुर |
| 23 | २० | श्री. राजेश दे. वानखेडे, विरोधी पक्ष नेता | पॅनल क्र. २० उल्हासनगर ५ येथील एस.टी. कॉलनी, नेहरु नगर शेजारील पाण्याच्या टाकीखाली असलेल्या जागेला माजी नगरसेवक कै. जयेंद्र चंद्रकांत मोरे आजी-आजोबा उद्यान हे नाव देण्याचा प्रस्ताव मंजुर करणेबाबत | **माजी नगरसेवक कै. जयेंद्र चंद्रकांत मोरे आजी-आजोबा उद्यान** | १२/१/२०२२ | मंजुर |
| 24 | १३ | श्री. सुमित सोनकांबळे, नगरसेवक | पॅनल क्र. १३, उल्हासनगर ४ येथील सिध्दार्थ नगर येथील प्रवेशद्वारास सिध्दार्थनगर बुध्दविहार प्रवेशद्वार हे नाव देणेबाबत. | **सिध्दार्थनगर बुध्दविहार प्रवेशद्वार** | १२/१/२०२२ | मंजुर |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 25 | | श्री. कलवंत सिंह साहोता, नगरसेवक | फस्ट गेट, सुभाष नगर, मरीअम्मा मंदिर, शंकर गुप्ता यांचे घराजवळ, उल्हासनगर येथील चौकास स्व. अजित प्रभुनाथ गुप्ता चौक असे नामकरण करणेबाबत | **स्व. अजित प्रभुनाथ गुप्ता चौक** | 2/12/2021 | **मंजुर** |
| 26 | 10 | श्रीम. शुभांगी मनोहर बेहनवाल, शिक्षण सभापती, उ.म.पा. | उल्हासनगर-३ येथील काजल पेट्रोलपंपास लागून असलेल्या रस्त्याचे भाऊजी आंबेडकर मार्ग असे नामकरण करणे. | **भाऊजी आंबेडकर मार्ग** | 17/01/2021 | **मंजुर** |

महासभा ठराव क्र. ६७ दिनांक १८/०२/२०२२

सुचकाचे नाव :- श्री. राजेश वदारिया

अनुमोदकाचे नाव :- श्री. दिपक सिरवानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर शहरातील विविध रस्त्यांना व चौकांना नामकरण करणेकरीता तदर्थ समितीने मंजुर केलेल्या २६ प्रस्तावाची यादीना मान्यता देत आहे.

**तसेच**

प्रशासनाने एका साईजचेच बोर्ड नामकरणाच्या ठिकाणी फलक लावावेत आणि कुठलाही मोठा किंवा कमी जास्त होणार नाही याची प्रशासनाने दखल घ्यावी व आधी रस्त्यांना जी नावे दिली आहेत, ते सर्व तपासून प्रशासनाने नंतरच नावे दयावीत.

या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही /-

अनुमोदकाची सही /-

सर्वानुमते

महपौर/पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव:-** कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सायंकाळी ६.४० वाजता महापौर श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# <u>उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर</u>

दिनांक:- १८-०६-२०२१

**<u>उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. १८-०६-२०२१ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.</u>**

१.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शुक्रवार दिनांक १८/०६/२०२१ रोजी सायंकाळी४.०० वाजता आयोजित करण्यात आली. सदर सभेत महापौर, श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ् होत्या व खालील दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते/होत्या. मा. उप सचिव, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग यांचेकडील दिनांक ३ जुलै, २०२० रोजीचे पत्रान्वये ऑनलाईन ॲपद्वारे सभा आयोजित केली होती.

१.श्रीमती. लिलाबाई लक्ष्मण आशान – महापौर

२. श्री. भगवान भालेराव- उप महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती अचर्ना गोकुळ करणकाळे | २९ | श्रीमती कविता लाल पंजाबी |
| ४ | श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड | ३० | श्री. जीवन चंद्रभान इदनानी |
| ५ | श्रीमती पंचम उमेश कालानी | ३१ | श्रीमती सविता प्रविण तोरणे (रगडे) |
| ६ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | ३२ | श्री. सुमित सागर सोनकांबळे |
| ७ | श्रीमती आशा नाना बिराडे | ३३ | श्रीमती ज्योत्स्ना सुरेश जाधव |
| ८ | श्री. राजेंद्रसिंह विरसिंग भुल्लर | ३४ | श्री. चंद्रशेखर केशव यादव |
| ९ | श्री. स्वप्नील मिलींद बागुल | ३५ | श्रीमती शीतल चंद्रकांत कदम |
| १० | श्री. कलवंतसिंग गुरुदेव सोहता | ३६ | श्रीमती वसुधा धनंजय बोडारे |
| ११ | श्री. राजू किशनचंद जग्यासी | ३७ | श्री. धनंजय बाबुराव बोडारे |
| १२ | श्रीमती मिना कुमार आयलानी | ३८ | श्रीमती दिप्ती नविन दुधानी |
| १३ | श्रीमती गीता लालचंद साधनानी | ३९ | श्रीमती ज्योती रमेश चैनानी |
| १४ | डॉ. प्रकाश घनश्यामदास नाथानी | ४० | श्रीमती कांचन अमर लुंड |
| १५ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | ४१ | श्री. शंकर गोविंदराम लुंड |
| १६ | श्रीमती सरोजिनी टेकचंदानी | ४२ | श्रीमती सुनिता बाबुराव बगाडे |
| १७ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | ४३ | श्री. भारत रामचंद राजवानी (गंगोत्री) |
| १८ | श्री. महेश पहिलराज सुखरामनी | ४४ | श्री. सतरामदास पुतनदास जेसवानी |
| १९ | श्रीमती अपेक्षा भगवान भालेराव | ४५ | श्रीमती अंजली चंद्रकांत साळवे |
| २० | श्रीमती शुभांगीनी निकम | ४६ | श्रीमती कविता सुधिर बागुल |

| | | | |
|---|---|---|---|
| २१ | श्रीमती छाया सुजित चक्रवर्ती उर्फ अडसुळ | ४७ | श्री. किशोर नारायणदास वनवारी |
| २२ | श्रीमती ज्योती प्रशांत पाटील | ४८ | श्रीमती मिना चंद्रगुप्त सोनेजी |
| २३ | श्री. राजेश नानिकराम वदारिया | ४९ | श्री. विजय चाहु पाटील |
| २४ | श्रीमती दिपा नारायण पंजाबी | ५० | श्रीमती कविता सुरेश गायकवाड |
| २५ | श्री. अजित प्रभुनाथ गुप्ता | ५१ | श्री. मनोज दिलीप सयानी |
| २६ | श्रीमती शुभांगी मनोहर बेहनवाल | ५२ | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |
| २७ | श्री. राजेंद्र शांताराम चौधरी | ५३ | श्री. अरुण लक्ष्मणदास आशान |
| २८ | श्री. रवि किसन जग्यासी | ५४ | श्रीमती आशा जीवन इदनानी |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते / होत्या.

१.श्री. मंगल बालकृष्ण वाघे, २. श्रीमती जयश्री ज्ञानेश्वर पाटील, ३. श्री. हरेश परमानंद जग्यासी, ४. श्रीमती मिनाकौर अजितसिंग लबाना, ५. श्री. रविंद्र दशरथ बागुल, ६. श्रीमती चरणजितकौर राजेंद्रसिंह भुल्लर, ७. श्रीमती सुरेखा हनुमंत आव्हाड, ८. श्रीमती अंजना अंकुश म्हस्के, ९. श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग, १०. श्रीमती डिम्पल नरेंद्र ठाकुर (कुमारी), ११. श्रीमती पुष्पा नाना बागुल, १२. श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी, १३. श्रीमती इंदिरा जमनादास उदासी,१४. श्री. गजानन प्रल्हाद शेळके, १५. श्रीमती ज्योती प्रकाश बठिजा, १६.श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी (साई), १७. श्रीमती ज्योती शामराव माने, १८. श्री.रमेश महादेव चव्हाण, १९. श्रीमती मिताली राजेश चान्पूर, २०.श्रीमती संगिता नितीन सपकाळे, २१. श्रीमती सुमन राजेश सचदेव, २२. श्री. प्रमोद नामदेव टाले, २३. श्री. राजेश देवेंद्र वानखेडे, २४. श्रीमती मिनाक्षी रवी पाटील, २५. श्री. आकाश परशुराम पाटील, २६. श्री. विकास परशुराम पाटील, २७. श्री. सुरेंद्र बाळकृष्ण सावंत.

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

१. डॉ. राजा दयानिधी, आयुक्त

२. श्रीमती करुणा जुईकर, अतिरिक्त आयुक्त

३. श्री. अशोक नाईकवाडे, उप आयुक्त् (मुख्यालय)/ महापालिका सचिव

४. श्री. मदन सोंडे, उप आयुक्त (अं.बा.नि.वि.)

५. श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखाधिकारी

६. श्री. सुर्यकांत खटके, लेखाधिकारी

७. श्री. महेश सितलानी, शहर अभियंता

८. डॉ. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी

९. श्री. भाऊराव मोहिते, शिक्षणाधिकारी

१०. श्री.अजयकुमार एडके, सहाय्यक आयुक्त

११. श्री. तुषार सोनवणे,सहाय्यक आयुक्त

१२. श्री. अच्युत सासे, सहाय्यक आयुक्त

१३. श्री. हनुमंत खरात, उप अभियंता (विद्युत)

१४. श्रीम. श्रध्दा सपकाळे, सिस्टम ॲनेलेसिस मॅनेजर

१५. श्री . संतोष लोणे, कनिष्ठ अभियंता

१६. श्री. मनिष हिवरे, सहाय्यक आरोग्यअधिकारी

१७. श्री. खियानी, शाखा अभियंता (पा.पु.वि.)

१८. श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक

१९. श्री. यशवंत सगळे, प्र.वाहन व्यवस्थापक

२०. श्रीम. विशाखा सावंत, प्र. पर्यावरण व्यवस्थापक

२१. श्री. दत्तात्रय जाधव, प्र. भांडार विभाग प्रमुख

२२. श्री. राजेश घनघाव, प्र. मालमत्ता व्यवस्थापक

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्रीम. नर्गीस खान, लिपीक
२. श्री. बाळू भांगरे, लिपीक

सायंकाळी ४. २० वाजता वंदे मातरम म्हणून सभेची सुरुवात करण्यात आली.

**उप आयुक्त (मुख्यालय) तथा महापालिका सचिव, श्री. अशोक नाईकवाडे:-**मा. ज्योती कालानी यांच्या संदर्भात जर कोणाला बोलायचे असेल तर त्यांना अनुमती देण्यात येत आहे.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-** मा. महापौरजी, ही सभा सुरु होण्याच्या पहिले, मी इथे श्रध्दांजली प्रस्ताव घेऊन आलो आहे, आपल्या शहराच्या आमदार, मा. ज्योती कालानी यांचे निधन झाले आहे, त्यांनी शहराच्या प्रथम नागरीक म्हणून महापौर पद पण भुषविले आहे, उल्हासनगर शहरासाठी खुप काही कार्य केले आहेत, महाराष्ट्र विधानसभेमध्ये पण त्यांनी आपला आवाज उचलला होता. त्याच बरोबर महानगरपालिकेमध्ये त्यांनी महापौर विविध पदांचा रोल निभावला आहे. सभागृहाच्या माध्यमातून श्रीमती ज्योती पप्पू कालानी यांना दोन मिनीइट श्रध्दांजली देण्यात यावी, त्यांच्या आत्माला शांती लाभेल. त्याच बरोबर आपल्या शहराचे प्रसिध्द संत, वसंतशहा दरबारचे श्री. परमानंद जग्यासीजींचा काल निधन झाले आहे, त्यांच्यासाठी ही मी सभागृहाला विनंती करतो की, त्यांच्यासाठीही श्रध्दांजली देण्यात यावी.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** एक खुपच दु:खद घटना शहरामध्ये घडली आहे, मागच्या वेळेस आठ लोकांची दु:खद निधन झाले आहे आणि मागच्या तीन महिन्यामध्ये जेवढे शहरातील नागरीक कोरोनामुळे मृत्यु झाले आहेत आणि या शहराच्या मा. आमदार श्रीम. ज्योती कालानी यांचे सुध्दा निधन झाले आहे, तरी या सर्वांना या सभागृहामध्ये दोन मिनीट मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

**सदस्य,श्री. प्रदिप रामचंदानी:-** मा. महापौरजी माझे आपल्याला निवेदन आहे की, प्रोपेसर पी.एस. आहुजा आणि आपल्या नगरसेविका गीता साधनानीचे पती, लालचंद साधनानी, कोरोनाकाळामध्ये ज्यांनी आपले जीव गमावले आहेत, उल्हासनगर शहराचे जेवढया नागरीकांनी आपले जीव गमावले आहेत, त्यांना पण श्रध्दांजली देण्यात यावी.

**<u>सदस्य, श्री. अरुण आशान:-</u>** मा. महापौरजी, आपल्या शहराचे सन्माननिय व्यक्ती मा. माजी आमदार, श्रीम. ज्योती पप्पू कालानी तसेच साई परशुराम, साई जग्यासीजी, रोहीनी पॅलेस, साई पॅलेस इथे मृत्युमुखी पडलेल्या व्यक्ती आणि श्रध्दांजली अर्पीत करण्याच्या वेळी आपल्या महानगरपालिकेचे कर्मचारी जसे की, परशुराम गायकवाड, गणेश बोराडे, कैलास अहीरे, केशव हंभीरराव, राजेश कुलकर्णी, हरेश होटवानी यांना सुध्दा श्रध्दांजली अर्पीत करण्यात यावी.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-</u>** मा. महापौरजी, भारतीय जनता पार्टीच्यातर्फे पुर्व आमदार, ज्योती पप्पू कालानी यांना श्रध्दांजली अर्पित करीत आहेत, कारण की, मा. ज्योती कालानी फक्त् इथल्या आमदार नाहीत तर महापालिकेच्या महापौर पण राहील्या आहेत, स्थायी समितीच्या सदस्या पण राहील्या आहेत आणि सभापती पण राहील्या आहेत. त्या आज आपल्यातून निघून गेल्यामुळे आपल्याला प्रत्येक वेळी त्यांची कामे आठवणीत राहतील आणि भारतीय जनता पार्टी आणि संपुर्ण परिवार त्यांना श्रध्दांजली अर्पित करीत आहे. मा. पुज्य साई, परमानंद साई, जे आपल्या उल्हासनगरचे संत आहेत, त्यांचे पण निधन याच वेळी झाले आहे, आपण संपुर्ण श्रध्दा ठेवून स्वामींनजींना श्रध्दांजली अर्पित करती आहे, आणि भारतीय जनता पार्टी जे संत समाजाचे योध्दा आपल्यातून निघून गेले, त्यांना शक्ती सहन करण्याची इश्वर शक्ती प्रधान करेल, भारतीय जनता पार्टी परमानंदजीना श्रध्दाजली अर्पित करीत आहे.

**<u>सदस्य, श्री. किशोर वनवारी:-</u>** मा. महापौरजी, आमच्या वहीनी ज्योती कालानी आणि लालचंद साधनानी आणि आमच्या सचिव मॅडम यांचे भाऊ राजेश कुलकर्णी यांना पण श्रध्दांजली देण्यात यावी.

**<u>सदस्या, श्रीम. अंजली साळवे:-</u>** मा. महापौर मॅडम, दिवंगत माजी आमदार, ज्योती कालानी मॅडम, यांचे नुकतेच निधन झालेले आहे. त्यांना आपण उल्हासनगरमध्ये आर्यन लेडी म्हणून आपण सगळे ओळखतात. अतिशय संवेदनशिल आणि आदर्श त्यांचे व्यक्तीमत्व होते. उल्हासनगरसाठी त्यांनी खुप कामे केलेली आहेत. विशेषत: महिलांसाठी त्यांचा मोलाचा वाटा आहे, महिलांसाठी त्यांनी खुप कामे केलेली आहेत. मी त्यांना माझ्यातर्फे आणि माझ्या भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस पक्षातर्फे श्रध्दांजली अर्पित करीत आहे. तसेच इतर जे आपल्या महानगरपालिकेतले आणि कोरोनामुळे मृत्यु पावलेल्यांना सर्वाना मन:पुर्वक श्रध्दांजली अर्पण करीत आहे, धन्यवाद.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-</u>** मा. माजी आमदार, ज्योती कालानी यांचे नुकतेच निधन झालेले आहे, तसेच लालचंद साधनानी यांचे पण निधन झालेले आहे. मा. ज्योती कालानी यांनी या शहरासाठी खुप काही केले आहे. तरी मी त्यांना भावपुर्ण श्रध्दांजली देत आहे आणि इश्वराला प्रार्थना करीत आहे की, त्यांच्या आत्म्यास चिर शांती लाभो.त्यांनी या शहरासाठी महापालिकेच्या माध्यमातून असेल किंवा शासनाच्या माध्यमातून असेल त्यांनी या शहराला योजना देण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचबरोबर उल्हासनगर शहरामध्ये कोरोनामुळे ज्यांचे निधन झाले आहे, त्यांनाही मी श्रध्दांजली अर्पित करीत आहे तसेच महापालिकेचे कर्मचारी यांनी महापालिकेचे काम करतांना कोरोनामुळे निधन झाले आहे, त्यांना ही मी श्रध्दांजली अर्पण करीत आहे.

**<u>सदस्य, श्री. मनोज सयानी:-</u>** मा. महापौरजी, आमच्या माजी नगरसेविका वनीता भटीजा यांचे कोरोनामुळे निधन झाले आहे, त्यामुळे संपुर्ण सभागृह वनीताजींना श्रध्दांजली देण्यात यावी.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>** मा. महापौरजी, आयुक्त साहेब, सभागृहाचे सर्व सदस्य, मी भारतीय जनता पार्टीतर्फे आणि माझ्या परिवारातर्फे शहराच्या आमदार, ज्योती कालानी यांना श्रध्दांजली अर्पित करीत आहे. त्याच बरोबर आपल्या शहराचे साई वसंतशहा दरबारचे परम आदरनीय संत साई परमानंद जग्यासी यांना श्रध्दांजली अर्पित करतो आणि बाकीच्या जेवढया बिल्डींग पडल्या मुळे दु:खद निधन झाले आहे, त्यांनाही मी श्रध्दांजली अर्पित करतो, त्याच बरोबर आमच्या नगरसेविका साधनानी मॅडम, यांचे पती लालचंद साधनानी यांचे दु:खद निधन झाले आहे, त्यांनाही श्रध्दांजली अर्पित करतो तसेच माजी नगरसेविका वनीता बठीजा यांचे पण दु:खद निधन झाले आहे, त्यांनाही श्रध्दांजली अर्पित करतो. त्याच बरोबर मिडीया स्कुलचे प्रोपेसर, पी.एस. आहुजा यांना श्रध्दांजली अर्पित करतो.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-** कृपया दोन मिनीट आपल्या जागेवर उभे राहून श्रध्दांजली देण्यात यावी.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-**सन्माननिय महापौर, आयुक्त साहेब, उल्हासनगरच्या महापौर, स्थायी समिती सभापती आणि आमदार ही पद भुषविणा-या सन्माननिय ज्योती कालानी, त्या नंतर साई परमानंद जग्यासी आणि उल्हासनगरमधील आता मधल्या काळामध्ये ज्या बिल्डींगी पडल्या त्यामध्ये मृत्यु झालेले सर्व नागरीक आणि कोरोना काळामध्ये या मधल्या काळामध्ये तीन महिन्यामध्ये मृत्यु पावलेल्या नागरीकांना माझ्या वतीने आणि माझ्या पक्षाच्या वतीने मी भावपुर्ण श्रध्दांजली अर्पित करतो आणि दोन मिनीट सगळयांनी उभे रहावे.

---

सुचकाचे नाव :—१) श्री.भगवान भालेराव
२) श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— १) श्री. किशोर वनवारी
२) श्री. राजेंद्र चौधरी

## शोक प्रस्ताव

उल्हासनगर महानगरपालिकेच्या मा.माजी आमदार, श्रीम. ज्योती पप्पू कालानी, आपल्या शहराचे साई वसंतशहा दरबारचे परम आदरनिय संत साई परमानंद जग्यासी, तसेच शहरातील जेवढया रोहीनी पॅलेस, साई पॅलेस इथे मृत्युमुखी पडलेल्या व्यक्ती, नगरसेविका साधनानी मॅडम, यांचे पती लालचंद साधनानी,माजी नगरसेविका श्रीमती वनीता बठीजा मिडीया स्कुलचे प्रोफेसर, पी.एस. आहुजा, तसेच महानगरपालिकेचे कर्मचारी जसे की, श्री.परशुराम गायकवाड, श्री.गणेश बोराडे, श्री.कैलास अहीरे, श्री.केशव हंबीरराव, श्री.राजेश कुलकर्णी, श्री.हरेश होटवानी यांचे नुकतेच काही दिवसांपुर्वी निधन झाले आहे.

वर उल्लेखलेल्या कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागीअसूनहे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

महासभा ठराव क्र.०१ दिनांक:—१८/०६/२०२१

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार मा.माजी आमदार श्रीम. ज्योती पप्पू कालानी,संत साई परमानंद जग्यासी,रोहीनी पॅलेस, साई पॅलेस इथे मृत्युमुखी पडलेल्या व्यक्ती,श्री.लालचंद साधनानी,श्रीमती वनीता बठीजा,प्रोफेसर, पी.एस. आहुजा,महापालिका कर्मचारी, श्री.परशुराम गायकवाड, श्री.गणेश बोराडे, श्री.कैलास अहीरे, श्री.केशव हंभीरराव, श्री.राजेश कुलकर्णी, श्री.हरेश होटवानी यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**<u>सदस्य, श्री. मनोज सयानी:-</u>** मा. महापौरजी, आजच्या श्रध्दांजली प्रस्तावाबरोबर मी आज महासभेमध्ये एक मागणी करीत आहे की,स्वर्गीय पुर्व आमदार, पुर्व महापौर, पुर्व स्थायी समिती सभापती, अध्यक्ष श्रीम. ज्योती पुप्पू कालानीजीच्या नावाने उल्हासनगर ओळखतात, जो कालीनी महल आहे तिथे एक चौक आहे, तीथे श्रीम. ज्योती पप्पू कालानी चौक आणि त्याच बरोबर अमरधाम चौक् आणि दोन नंबरमध्ये मच्छिमार्केट आहे, त्या रस्तयाला श्रीम. ज्योती पप्पू कालानी मार्ग घोषित करण्यात यावे. त्याच बरोबर स्वर्गीय संत परमानंद जग्यासी वसंतशहा दरबारच्या बाहेर जो सिमेंट कॉक्रिटचा रोड बनला आहे. त्या मार्गला परमानंद जग्यासी मार्ग आणि चौक असे देण्यात यावे, अशी मी आजच्या सभेमध्ये मागणी करीत आहे.

**<u>सदस्य, श्री जमनादास पुरस्वानी:-</u>** मा महापौरजी, मा आयुक्त साहेब, श्री मनोज सयानी यांनी जी मागणी केली आहे, ती मागणी बरोबर आहे, परंतु माझे विचार हे आहे की, हा विषय तदर्थसमितीमध्ये आला पाहीजेआणि सार्वजनिक बांधकाम विभागाने तपासले पाहीजे की, पहीले नाव दिले तर नाही परमानंद जग्यासींचा जो रोड सांगितला आहे जर तिथे कोणाचेही नाव नाही तसे सार्वजनिक बांधकम विभाग शहानिशा करेल श्रीम. ज्योती कालानी यांनी काही वर्षे काम केले आहे, तर हे काम झाले पाहीजे. यामध्ये कोणत्याही प्रकारची शंका राहीली नाही पाहीजे. प्रश्नली जग्यासीजींचा नाव दयायला पाहीजे. परंतु चेक करुन जा कोणाचे पहीले नाव असेल तर विरोध होइल, त्यामुळे मी आपल्याला निवेदन करतो की, चेक करुनच करण्यात यावे.

**<u>सदस्य, श्री. मनोज सयानी:-</u>** मा. महापौरजी, जमनादास यांनी जे सांगितले, ते बरोबर आहे, जर पहीले कोणाचे नाव दिले नाही, हे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून चेक करुन देण्यात यावे.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-</u>** मला आनंद आहे की, कालानीच्या नावाने रस्ते, चौकांना नाव दिले पाहीजे परंतु पहीले संपुर्णपणे पाहणी करुन, चेक करुन सार्वजनिक बांधकाम विभाग चेक करुन सांगितले तर त्या चौकाला नाव दिले जाऊ शकते.खात्री करण्यात यावी, या गोष्टीचे समर्थन करण्यात यावे. या प्रस्तावाला भारतीय जनता पार्टी समर्थन देण्यास तयार आहे.

या वेळी काही सदस्य एकत्रित बोलत असल्यामुळे कोण काय बोलत होते, ते समजून आले नाही.

**<u>सदस्य, श्री. महेश सुखरामनी:-</u>** मा. महापौर, उप महापौर, आयुक्त साहेब, स्वर्गीय ज्योती कालानी यांच्या नावाचे समर्थन होत आहे, हे खुप चांगले आहे. श्री. मनोज सयानी, प्रदिप रामचंदानी यांच्या प्रस्तावाचे अनुमोदन करतो की, लवकरात लवकर हे झाले पाहीजे. मी उदया महानगरपालिकेमध्ये स्वत: यासाठी पत्र देतो.

**<u>सदस्या, श्री. पंचम कालानी:-</u>**माझ्या सासूने जो भवन बनत आहे, त्याला ऑलरेडी प्रस्ताव दिला आहे, ते होइल किंवा नाही सिंधू भवन असे नाव दिले आहे, ते नाव चेंज करुन ज्योती कालानी भवन असे दिले पाहीजे, प्लीज लक्ष देण्यात यावे, धन्यवाद.

**<u>सदस्य, श्री. किशोर वनवारी:-</u>**मा. महापौरजी, जो प्रस्ताव आला आहे की, रोडला साईपरमानंद जग्यासी असे नाव दिले पाहीजे, परंतु त्या रोडला पहीलेच नाव दिलेले आहे. तर मेहरबानी करुन ...

**<u>महापालिका सचिव, श्री. अशोक नाईकवाडे:-</u>** सन्माननिय सदस्यांना विनंती करण्यात येत आहे की, विषय सुचीमधील विषय क्र. १ वाचण्यात आला आहे, त्या विषयाच्या अनुषंगानेच कृपया बोलावे.

**<u>सदस्य, श्री. अरुण आशान:-</u>** मा. महापौर, मा.उप महापौर, मा. आयुक्त साहेब, प्रश्नोत्तराचा तास वगळण्यात येत आहे आणि दोन नंबरचा विषय इतिवृत्त कायम करण्यात येत आहे आणि तीन नंबरचा जो विषय आहे, मयत झालेल्या कर्मचा-यांच्या वारसाना अनुकंपातत्वाने नियुक्तीबाबत पास करण्यात येत आहे.

**महापालिका सचिव, श्री. अशोक नाईकवाडे:-**मा. पिठासिन अधिकारी यांच्या सुचनेनुसार आता प्रश्नोत्तराचा तास वगळण्यात दिली आहे, ती मान्य करण्यात येत आहे.

---

**विषय** :—प्रश्नोत्तराचा तास वगळण्याबाबत

सूचकाचे नांव :— श्री. कलवंतसिंग सोहता

अनुमोदकाचे नांव :— श्री. राजेंद्र चौधरी

महासभा ठराव क्र.०१ अ दिनांक:— १८/०६/२०२१

ही महासभा आज दिनांक १८/०६/२०२१ रोजीच्या महासभेतील प्रश्नोत्तराचा काळ वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर/पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** पहीले लक्षवेधीचा स्विकार करा.

**महापालिका सचिव, श्री. अशोक नाईकवाडे:-**लक्षवेधी सुचना पास झालेल्या आहेत, दोन्ही लक्षवेधी सुचना मा. महापौरांनी स्विकारल्या आहेत, लक्षवेधी सुचना क्र.१ सुचकाचे नाव आहे, श्री. राजेश वदारिया , अनुमोदकाचे नाव आहे, श्री. भगवान भालेराव.

**विषय:-** उल्हासनगर मधील पडणा-या धोकादायक इमारतींना दिलेल्या नोटीसा बाबत.

लक्षवेधी सुचना क्रमांक २, सुचकाचे नाव आहे, श्रीम. अंजली चंद्रकांत साळवे.

**विषय:-** कोईड-१९ च्या तिस-या लाटेच्या पार्श्वभुमीवर.लहान मुलांचे शाळेतल्या मुलांवर लसीकरण करणे. या दोन्ही लक्षवेधी स्विकारव्यात किंवा कसे मी मा. महापौरांकडे सुपूर्द करीत आहे.या दोन्ही लक्षवेधी सुचना मा. महापौरांनी स्विकारल्या आहेत, लक्षवेधी सुचना क्र.१ आपल्याला वाचून दाखवत आहे...

महापालिका सचिव, श्री.अशोक नाईकवाडे:—लक्षवेधी सुचना क्र. १ जीचे सुचक आहेत, श्री. राजेश वदारिया व अनुमोदक आहे, श्री. भगवान भालेराव.

लक्षवेधी सुचना याप्रकारची आहे......................

---

## लक्षवेधी सूचना क्रमांक १

विषय:—उल्हासनगरमधिल पडणा—या/धोकादायक इमारतींना दिलेल्या नोटीस बाबत.

मी या लक्षवेधी सुचनेद्वारा महासभेमध्ये सर्व मान्यवरांचे खालील नमुद विषयांवर लक्ष वेधू इच्छितो की, सदरील विषयावर चर्चा करण्यात येऊन प्रभावीत तोडगा काढण्यात यावा.
जसे की, आपण सर्वांना माहीत आहेच महानगरपालिका प्रशासनाकडून जवळपास १५०० इमारती हया धोकादायक इमारती म्हणून घोषीत करण्यात आल्या आहेत. ज्यामध्ये तळमजला अधिक एक मजली इमारती, तळमजल्याच्या इमारती आहेत. ज्यामध्ये अनेक दुकाने, घरे असून अशा सर्व इमारतींना धोकादायक इमारतीं घोषीत केलेले आहे व या सर्व इमारतींना नोटीस देण्यात आलेल्या आहेत.

सदरील नोटीस हया कोणत्याही प्रकारच्या चौकशी अहवाला शिवाय देण्यात आलेल्या असून, यापैकी कोणत्याही इमारतींचे महापालिका प्रशासनाकडून स्ट्रक्चरल ऑडीट करण्यात आलेले नाही.

परंतु याबाबतीत ब—याच इमारतींनी आपले स्ट्रक्चरल ऑडीट अहवाल मा. आयुक्त महोदयांकडे जमा केलेले आहेत. तरी देखिल त्या सर्व इमारतींना पाणी व लाईट पुरवठा बंद करण्याची नोटीस देण्यात आलेली आहे. ही बाब पुर्णपणे चुकीची व अन्याय करणारी आहे.
तरी महासभेमध्ये चर्चा होऊन ठोस तोडगा काढण्यात यावा, ही विनंती.

---

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब...

**महापालिका सचिव, श्री. अशोक नाईकवाडे:-**मी मा. सभेमध्ये सर्व मान्यवरांचे लक्षवेधू इच्छितो की, सदर विषयावर चर्चा करुन प्रभावी तोडगा काढण्यात यावा. जसे की आपणा सर्वांना माहीती आहे की, महानगरपालिकेकडून जवळपास १५०० इमारती या धोकादायक म्हणून घोषित करण्यात आलेल्या आहेत, यामध्ये तळमजल्याच्या इमारती आहेत. यामध्ये घरे, दुकाने आहेत,अशा सर्व इमारती धोकादायक इमारती म्हणून घोषीत केलेल्या आहेत व या सर्व इमारतींना नोटीस देण्यात आल्या आहेत. सदरील नोटीस ही कोणत्याही प्रकारची चौकशी अहवालाशिवाय देण्यात आलेल्या असून या पैकी कोणत्याही इमारतीचे महानगरपालिका प्रशासनाकडून स्ट्रक्चरल ऑडीट करण्यात आलेले नाही. परंतु या ब-याच इमारतीनी आपले स्ट्रक्चरल ऑडीट मा. आयुक्त यांचेकडे जमा केलेले आहेत. तरी देखील या इमारतींची लाईट व पाणी बंद करण्याची नोटीस देण्यात आली आहे. ही बाब पुर्णपणे चुकीची व अन्याय करणारी आहे. तरी महासभेमध्ये चर्चा होऊन ठोस तोडगा काढण्यात यावा, ही विनंती.सर्व संबधित सदस्यांना विनंती करण्यात यावी की, त्यांनी चर्चा करावी.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** मा. महापौरजी, लक्षवेधी सुचनेच्या पहीले माझी एक सुचना आहे की, सदस्यांनी आपल्याला एक पत्र दिले होते की, कोरोना काळामध्ये जो प्रादुर्भाव वाढत आहे. त्या विषया संदर्भामध्ये आम्ही काय काय कार्य केले पाहीजे?त्यासाठी आपण एक विशेष महासभा बोलवण्यात यावी. याचे कारण काय आहे, जरा खुलासा करा.चार स्थायी समितीच्या सदस्यांनी पत्र दिले आहे आणि २० नगरसेवकांनी पत्र दिले आहे की, कोरोनाच्या विषयासाठी एक विशेष सभा बोलवण्यात यावी. आपण बैठक का बोलवली नाही, याचा खुलासा महासभेमध्ये करण्यात यावा.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** महापौर मॅडमज्या प्रकारे शासन चालवत आहेत. इथे नगरसेकांच्या मागणी मान्य करता येत नाही. कारण की, आमचा संविधानिक अधिकार आहे. एक महीना पहीले तुम्हांला २० नगरसेवकांनी पत्र दिले आहे की, कोरोनाची तिसरी लाट येणार आहे, लोकांचा जीव जात आहे.

या वेळी काही सदस्य एकत्रित बोलत असल्यामुळे कोण काय बोलत होते, ते स्पष्ट समजून आले नाही.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:-**एक एक बोला विषय समजून येत नाही.

**सदस्य, श्री. अरुण आशान:-**मा. महापौरजी, उप महापौर, आयुक्त् साहेब, प्रदिप रामचंदानी विषय आहे, त्यावर मी उत्तर देवू इच्छितो की...

**<u>सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:-</u>** शहराच्या लोकांचा जीवन मरणाचा प्रश्न आहे. पहीले लक्षवेधीवर बोला.

**<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:-</u>** पहीले लक्षवेधीवरच बोला. अजेंडावर जो विषय आहे ना, तुम्ही त्याच्यावरच चर्चा करा.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-</u>**आम्हांला पहीले कारण सांगा, पहीले स्पष्टीकरण दया, आपण कशासाठी आम्हांला वा-यावर धरले. आमच्या २० लोकांनी आपल्याला पत्र दिले. चार स्थायी समिती सदस्यांनी पत्र दिले तरी मिटींग बोलावली नाही.

**<u>सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:-</u>** पहीले लक्षवेधीवरच बोला.

**<u>सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:-</u>**तुमच्या विषयावर महापौर विचार करतील, पहीले लक्षवेधीवर बोला.

**<u>सदस्य, श्री. अरुण आशान:-</u>** मा. महापौरजी, श्री. जमनादास पुरस्वानी आणि इतर सदस्यांचे पत्र मिळाले आहेत आणि शासनाचे परिपत्रक आले होते की, त्यानुसार सदरची सभा घेऊ नये असे कळविले आहे, त्यामुळे महासभा आपण घेऊ शकलो नाही. त्याबाबतचे पत्र मा. महापौरांनी गटनेता यांना दिलेले आहे.

**<u>सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:-</u>**महापौर साहेबा, अशानजी माझे पण ऐकुन घ्या, पहीले श्री. राजेश वदारिया यांनी लक्षवेधी दिलेली आहे, महापौरांनी मान्यता दिलेली आहे, त्या लक्षवेधीवर बोलण्यासाठी सांगितले आहे. शहराच्या लोकांचे जीवन मरनाचा प्रश्न आहे. कृपया पहीले लक्षवेधीवर बोला, धन्यवाद.

या वेळी काही सदस्य एकत्रित बोलत होते, त्यामुळे कोण काय बोलत होते ते स्पष्ट समजून आले नाही.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:-</u>** मी श्री. राजेश वदारिया यांचे अभिनंदन करतो, त्यांना धन्यवाद देतो की, आपल्या उल्हासनगरमध्ये अनेक बिल्डींगी पडल्या आहेत, तेथील लोकांचे पुनर्वसन झाले पाहीजे. ज्या बिल्डींगी धोकादायक घोषित केल्या आहेत, त्यांना सरसकट नोटीसी दिल्या आहेत. राजेश वदारिया यांनी महत्वाचा विषय आणला आहे, प्रदिपजी तुम्हांला उत्तर मिळेल. श्री. जमनादास पुरस्वानी यांना विचारले की महापौरांच्या वतीने दिलेले आहे....

**<u>महापालिका सचिव, श्री. अशोक नाईकवाडे:-</u>** कृपया सदस्यांनी विषयावर बोलावे आणि एक एकांनी बोलावे तुमची जी मागणी आहे ती आमच्या पर्यंत पोहचली पाहीजे. लक्षवेधी सुचनेवरच बोलावे.

**<u>सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:-</u>** जनतेचा प्रश्न आहे, पहीले लक्षवेधीवर बोला.मा. महापौरांनी मान्यता दिली आहे.

**<u>सदस्य, श्री. अरुण आशान:-</u>** पहीले लक्षवेधी घ्या.

**<u>सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:-</u>** बोडारे साहेब, आपण जाणकार नगरसेवक आहेत, जनतेचा प्रश्न आहे, कृपया आपण....

**<u>महापालिका सचिव, श्री. अशोक नाईकवाडे:-</u>** कृपया सर्व सदस्यांना विनंती करण्यात येते की, मा.महापौरांच्या निर्देशानुसार लक्षवेधी सुचनेनुसार आपले मत व्यक्त करावे.

**<u>सदस्य, श्री. अरुण आशान:-</u>** राजेशभाई बोला.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:-</u>** मी श्री. राजेश वदारिया यांना विनंती करतो की, हा शहराचा विषय आहे, राजेशभाई बोलणार आहत का?

**<u>सदस्य, श्री. मनोज सयानी:-</u>** सन २०१५ मध्ये महानगरपालिकेमध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाने ज्या इमारतींची क्वालिटी बरोबर नाही, त्यांना पण नोटीसी दिल्या आहेत.

**सदस्य, श्री. अरुण आशान:-** धोकादायक इमारतींचा विषय अतिशय गंभीर आहे,

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** मी लक्षवेधीवर बोलत आहे, तो पर्यंत राजेशजी जॉईंड होत नाहीत.

**सदस्य, श्री. अरुण आशान:-**जमनादासजी दोन मिनीट मी पण लक्षवेधीवर बोलत आहे, एक मिनीटांमध्ये बोलतो. स्ट्रक्चरल ऑडीट झालेल्या बिल्डीगीचे लाईट आणि पाण्याचे कनेक्शन कापले आहेत.

**सदस्य, श्री.प्रदिप रामचंदानी:-** अरुणभाई राजेशची ऑनलाईन आले आहेत.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** मी ऑनलाईन जोडलो आहे, आपण माझे ऐकुन तर घ्या.

**सदस्य, श्री. अरुण आशान:-**राजेशजी बोला.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-**पहीले म्हणजे माझा माईक परत परत म्युट केले जात आहे. आज आयुक्तांनी संपुर्ण उल्हासनगरमध्ये १५०० इमारतींना धोकादायकच्या नोटीशी दिल्या आहेत. त्यामध्ये ग्राउंड प्लस १, ग्राउंड प्लस २ या सर्व बिल्डींगी आहेत. परंतु काही बिल्डींगी अशा आहेत की, ज्यांनी स्ट्रक्चरल ऑडीट केले आहे आणि त्यांनी आपले प्रमाणपत्र जमा केले आहे, त्याच्या नंतर सुध्दा आपले शहर अभियंता म्हणतात की, मी वाचून समजू शकत नाही. कारण की मी डिप्लोमा होल्डर आहे आणि जे प्रमाणपत्र दिले आहे, ते एका स्ट्रक्चरल इंजिनियरने दिले आहे. ते बी.ई.७ मध्ये दिले आहे. मला ही गोष्ट समजण्यात येत नाही. जेव्हा एखादया बिल्डींगला आर.सी.सी. डिझाईन करु शकतो. त्या बिलडींगला बनवू शकतो, ती कंम्पलीशन करु शकतो. रिपेअर करु नाही शकत. तर आपल्याकडे कोणता नियम आहे? कोणता अॅक्ट आहे? शासनाचे रुल्स असतील. याचा अर्थ हा आहे की, महापालिकेच्या अधिकारी यांचा एक रिपोर्ट बनवण्याचा प्लॅन आहे याच्या पहीले पण नाखवाकडून असा एक रिपोर्ट तयार केला होता आणि आज परत दोन चार लोकांना उभे करुन एक पॅनल बनवतात हे कोणाला तरी लुटण्यासाठी प्लॅनिंग बनवले आहे, हे माझे आरोप आहेत. शहर अभियंता स्वत: डिप्लोमा होल्डर आहेत. डिप्लोमा आणि सिव्हील इंजिनियर यांना रिपोर्ट समजायला येत नाही. तर शहर अभियंता बनण्याचा पण त्यांना अधिकार नाही. मी आयुक्तांकडे मागणी करतो की, पहीले तर शहर अभियंता एक लायक व्यक्तीला बसवण्यात यावे की, कमीत कमी त्याचा रिपोर्ट समजला पाहीजे, त्या रिपोर्टची आपण मागणी करीत आहेत, इनटेक रिपोर्ट असायला पाहीजे, तर आपण पण इनटेक शिकलेले पाहीजेत. जो पर्यंत आपण चांगले इनटेक शिकलेले नाहीत तर आपण रिपोर्ट कसे समजणार? जो दुसरा पॅनल बनवत आहे, नाखवाचे बनवले आणि अजून दोन तीन लोक आहेत. तर मला माहीती दया की, यांचे क्वॉलिफिकेशन काय आहे? हा एक षढयंत्र आहे. संपुर्ण उल्हासनगरला धोकादायक घोषित करणे आणि बिल्डरांना प्लॅटचा एक हजार भाव आणि दुकानाचे चार हजार भावामध्ये देणे आणि या गरीब लोकांना बेघर करना हा एक षडयंत्र आहे. कसे गरीबांना दिले जाते, नोटीसमध्ये लिहीले आहे की, आम्ही बिल्डींगच्या जवळ गेलो आणि बघितले की बिल्डींग बघायला धोकादायक आहे. बघण्याने बिल्डींग धोकादायक होते का कधी?कोणत्या आधारावर नोटीस दिली आहे? आपण त्याची स्ट्रक्चरल अॅबिलिटी चेक केले आहे का? जर आपण स्ट्रक्चरल अॅबिलिटी चेक केली नाही, तर आपली नोटीस चुकीची आहे. आपण किती प्रमाणपत्र दिले आहेत? यामध्ये तुमचे काही ना काही संबंध आहेत, असा माझा आरोप आहे. शहर अभियंता स्वत: काहीच करु शकत नाही. वार्ड ऑफिसरची क्वालिफिकेशन काय आहे? जो वार्ड ऑफिसर बिल्डींगला धोकादायक बोलतात, त्याची क्वालिफिकेशन काय आहे?तो किती शिकलेला आहे? चिफ ऑफिसर आहे, पाच वर्षाचा अनुभव असेल, दोन वर्षाचा अनुभव असेल, अशा प्रकारे शहराला तोडण्याचा जो षढयंत्र केला जात आहे, त्याचा आम्ही संपुर्णपणे ताकतीने विरोध करणार. हे समजू नका की, आपण लोकांचे पाणी कट करणार, लाईट कट करणार तर लोक रस्त्यावर पण येतील, लॉ ऑर्डरचा सुध्दा प्राब्लेम होऊ शकतो. लोकांच्या जीवनाचा प्रश्न आहे. आज बिल्डर लोक बसले आहेत. ज्यांच्या नावावर जमिन आहे, त्यांना पाच, दहा लाख रुपये देतो आणि जमिन रजिस्टर करुन मला दया.असे काही प्रकार झाले आहेत. गोलमैदान येथे सात मजल्याची बिल्डींग तोडून टाकली वेरीफिकेशन न करता, आणि या बिल्डरने बनवले होते की, त्यांनी अजून कोणाला तरी रजिस्ट्रेशन करुन दिले आणि तेथील जे दुकानदार होते, ते कोर्टामध्ये गेले आणि स्टे घेऊन आले. हा जो विषय हायकोर्टाचे नाव घेऊन आपण लोक

करीत आहेत, तर तो कुठे कुठे आपल्या मनावर हात ठेवून विचार केला पाहीजे. आपण बिल्डींग बघितली आणि नोटीस देवून टाकली. सांगितले की सात दिवसामध्ये तोडून टाका. यासाठी स्ट्रक्चरल इंजिनियर लागतील आणि १५ दिवसाच्या आतमध्ये रोज १०० बिल्डींगी करु शकतात. आपल्याकडे स्ट्रक्चरल इंजिनियर नाहीत, जास्त माणसे नाहीत आणि जास्त मशनरी पण नाहीत. हे सगळे माहीती असून आणि समजत असून सुध्दा प्रशासन स्वत: बिल्डरांच्या हातामध्ये देत आहे. जसे की इश्वर बिल्डींग पडली आणि एका बिल्डरांने एक, एक लाख रुपये त्यांना दिले. साई शक्ती बिल्डींग पडली एक एक लाख रुपये दिले. त्या बिल्डींगीला नोटीस देण्यात आली. हा अत्याचार आहे, महापौरजी हे आपल्या राज्यामध्ये होत आहे. आपले काम आहे थांबवणे की, हे कशा प्रकारे अत्याचार होत आहे. एक, एक लाख रुपये दिले एक हजार भावाने प्लॅट दया, पाच हजार रुपये दुकानाचे दया.दोन करोडची दुकानाची किंमत आहे आणि दहा, वीस लाख रुपये देणार. आपण किती पैसे देणार? आपल्याकडे लोकांनी बीई, सिव्हील आपले रिपोर्ट जमा केले आहेत, ते रिपोर्ट आपण मान्य करायला तयार नाहीत. कोणाचे रिपोर्ट मागणार, आपले शहर अभियंता यांचे? ते तर डिप्लोमा होल्डर आहेत.मी या बाबतीत लक्ष आकर्षित करीत आहे. प्रशासनाकडून, आयुक्ताकडून याचा खुलासा झाला पाहीजे, धन्यवाद.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:-</u>** मा. महापौर महोदया, मी आयुक्त साहेबांना विनंती करतो की,राजेश वदारिया यांनी मांडलेले मुददे अगदी तंतोतंत बरोबर आहेत. प्रत्येक नगरसेवक हे अनुभवत आहे. उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये एखादी इमारत कोसळल्या नंतर प्रशासन लोकांमध्ये भिती तयार करते. ज्या धोकादायक इमारती आहेत, त्यांचा नक्कीच विचार केला गेला पाहीजे. वर्षानुवर्षे गेल्या दहा वर्षापासून त्यांना नोटीस देत आहेत, त्या बाबतीत काय धोरण केले पाहीजे. त्या लोकांनी स्ट्रक्चरल ऑडीट केलेले आहे. त्यांचे रिपोर्ट तयार आहेत, त्यानुसार चेकींग चालू आहे. त्या बिल्डींगीना सुध्दा नोटीसा दिलेल्या आहेत आणि बिल्डरांकडून रिपेरींग चालू आहे. त्यांचे पाणी लाईट करणे चालू आहे, अशा प्रकारचे त्याचेमध्ये कारण नसतांना लोकांना नोटीस दिल्या आहेत, त्यासाठी काही तरी धोरण निश्चित केले पाहीजे.काहीच धोरण निश्चित नाही, असे श्री. राजेश वदारिया यांनी सांगितले की प्लॅटचे भाव एक हजार आणि दुकानाचे भाव पाच हजार रुपये बिल्डर लोक लोकांना घाबरवून त्याचा फायदा घेत आहेत. काही बिल्डींगी रिपेरींग करुन फायनल झाल्या आहेत, त्यांना सुध्दा नोटीस दिल्या आहेत, मंगलमुर्ती अपार्टमेंटला पण अशाच प्रकारची नोटीस दिलेली आहे. ज्या प्लॅटची किंमत ३० लाख, ४० लाख रुपये आहे, त्याची किंमत आज प्रशासनाच्या नोटीशीमुळे ९ ते १० लाख झाली आहे. ही वस्तुथिती आहे. म्हणजे या प्रकारामुळे चुकीच्या निर्णयामुळे नको ते लोक गैर फायदा घेत आहेत आणि लोकांना घाबरवत आहेत. तुम्ही बिल्डींग लवकरात लवकर खाली करा, अशा प्रकारचे वातावरण उल्हासनगरमध्ये आहे. मी म्हणतो ज्या बिल्डींगी धोकादायक आहेत. अशा बिल्डीगीवर तातडीने कारवाई करुन खाली केल्या पाहीजेत. परतु ज्या बिल्डींगीना आपण नोटीस दिल्या आहेत, त्या कुठल्या धोरणामध्ये बसतात. चुकीच्या धोरणामुळे लोकांचे नुकसान होते आणि दुस-याचे फायदा होत आहे. कारण लोकांना माहीती आहे, त्यांची बिल्डींग चांगली आहे, रिपेरींग केली आहे. असे असतांना सुध्दा प्रशासन लक्ष देत नाही. फक्त नोटीस दिली आणि बिल्डींग खाली करा. स्ट्रक्चरल ऑडीट म्हणजे......

या वेळी काही सदस्य एकत्रित बोलत असल्यामुळे कोण काय बोलत होते, ते स्पष्ट ऐकुन आले नाही.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>** मा. महापौरजी हे काय चालले आहे?

**<u>सदस्य, श्री. अरुण आशान:-</u>** मा. महापौरजी ज्या बिल्डीगीला बोर्ड लावले आहेत आणि लाई व पाणी कट करायला सांगितले आहे. अशा स्ट्रक्चरल ऑडीट झालेल्या बिल्डींगना त्यांची नावे पहील्यांदा यादीतून वगळायला पाहीजे. कारण लोक अशी त्रस्त झालेले आहेत की, स्ट्रक्चरल ऑडीट असले तरी सुध्दा महानगरपालिका प्रशासनाने तिथे बोर्ड लावल्या नंतर तिथले लाईट आणि पाणी कट करीत आहेत, त्यामुळे लोकांनी ऑडीट केल्या नंतरही त्यांच्या ऑडीटला उत्तर न देता, आयुक्तांनी जो बोर्ड लावला आहे, लोकांना बिल्डींग रिकामी करायला सांगितले आहे. तर मला असे वाटते की, ज्या बिलडींगचे, ज्या इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडीट दिले आहे, त्यांचे पाणी आणि लाईट कट करण्याची कारवाई प्रशासनाकडून होत आहे, मा. महापौरजी मी आपल्याला परत सांगतो की, माझ्या वार्डमध्ये पण एक बिल्डींग आहे, तीचे स्ट्रक्चरल ऑडीट करायला

सांगितले होते आणि स्ट्रक्चरल ऑडीट केल्या नंतरही या इमारतीच्या खाली लाईट आणि पाणी कट करण्याचा बोर्ड लावला आहे. लोक भयभित झाले आहेत, स्ट्रक्चरल ऑडीट केल्या नंतरही बिल्डींगीला अतिधोकादायक नोटीस देण्यात आली आहे. तर मी महापौरजी, आयुक्त साहेब, आपल्याला विनंती करतो की, बिल्डींगीना सरसकट नोटीस दिल्यामुळे लोक भयभित आहेत, कोरानाच्या साथीमुळे लोक पहीलेच त्रस्त आहेत आणि या नोटीसीमुळे लोक भयभित आहेत. तरी मा. आयुक्त साहेब मी आपल्याला विनंती करतो की,ज्या बिल्डींगचे स्ट्रक्चरल ऑडीट झाले आहे, अशा बिल्डींगीची नावे धोकादायक यादीमधून वगळण्यात यावेत आणि त्यांचे पाणी आणि लाईट कट करण्यात येऊ नये आणि स्ट्रक्चरल ऑडीटच्या बाबतीमध्ये श्री. राजेश वदारिया आणि आबानी जे सांगितले की, तज्ञ समितीचा जो पर्यंत निर्णय होत नाही, त्याकरता महानगरपालिकेमध्ये पण तज्ञ समिती आपल्यातर्फे नेमण्यात यावी. फक्त नाखावा यांनी सांगितल्या नंतर एवढया १५०० बिलडींगींचा रेकॉर्ड मिळायला त्यासाठी समिती पाहीजे, इंजिनियर पाहीजे. त्यांची नियुक्ती आपण करण्यात यावी. त्या नंतर धोकादायक इमार्तींना दिलासा देण्यात यावा असे मी आपणास विनंती करतो.

**<u>सदस्य, श्री. मनोज सयानी:-</u>** मा. महापौरजी, मी लक्षवेधीवर बोलू इच्छितो की, श्री. राजेश वदारिया यांनी लक्षवेधी आणली आहे आणि आरोप लावले आहेत, राजेश वदारिया यांनी आरोप लावले आहेत की सार्वजनिक बांधकाम विभागाने एकाच जागेवर बसून नोटीस काढली आहे. या उदाहरणावरुन मी आपल्याला सांगू इच्छितो की, जे प्रभारी आहेत त्यांनी या नोटीशी आपल्या कार्यालयामध्ये बसून काढल्या आहेत, हे सन २००४ पासून चालत आले आहे. सात वर्षापुर्वी शिशमहल इमारतीचा स्लॅब पडल्यामुळे दोन तीन लोकांचे मृत्यु झाले होते आणि महानगरपालिकेने संपुर्ण बिल्डींगला रिकामी केले होते, त्या शिशमहल बिल्डींगीला पण नोटीस दिली होती, तिथे इमारत आहेच नाही तर आपण त्यांना नोटीस दिली की, त्यांना नोटीस दिली की आपण इमारत रिकामी करा. धोकादायक इमारत तोडायची आहे, पण जी इमारत आपल्या जागेवर नाही आहे, तिथे कोणी राहतच नाही, ते एक प्लॉट आहे. यासाठी नोटीस काढणे हे कॉपी पेस्ट करण्याचे एक उदाहरण आहे. दुसरे उदाहरण उल्हासनगर-३ येथील संपना गार्डन येथे रामेश्वर कॉम्पलेश, पॅनेसुला पार्कसन २०१७ पासून मा. उच्च न्यायालयाने कोर्टमॅटर चालला आहे, कोर्टामध्ये स्टे आहे कोर्टाने सांगितले आहे की, महानगरपालिका यांच्यासाठी काय करणार आहे? महानगरपालिका याच्यापुढे कसे मार्गदर्शन करणार आहे. याचे उत्तर देण्यात यावे. सन २०१७ पासून महानगरपालिकातर्फे हायकोर्टामध्ये कोणीच गेले नाही. एक्स पार्टी करुन पॅनेसुलाने सांगितले आहे की, जो पर्यंत महानगरपालिका प्रॉपर रिप्लाय देत नाही, तो पर्यंत ही बिल्डींग इथेच राहील, तीला कोणीच हटवू शकत नाही, आता ज्या नोटीसी डीपार्टमेंटकडून दिल्याआहेत, त्या या इमारतीला पण नोटीस दिली आहे की, आपली इमारत रिकामी करा, आम्ही ही तोडणार आहेत. ज्या बिल्डींगला मा. उच्च न्यायालयाची स्थगीती आदेश आहे, आपण या इमारतीला पण नोटीस दिली आहे, हे कॉपीपेस्टचे दुसरे उदाहरण आहे. तीसरे आपण आपल्या नोटीसीमध्ये दिले आहे की, या इमारती १९९४ पासून ते १९९८ पर्यंत बनल्या आहेत, त्यामध्ये उडवा रेतीचा वापर केला आहे, त्यामुळे त्या धोकादायक आहेत, त्या वेळेस रेती बरोबर येत नव्हती, क्वालिटी बरोबर नव्हती, त्यामुळे या इमारती पडत आहेत, त्यामुळे हया इमारती रिकाम्या करा. मी तुम्हांला अजून एक उदाहरण देतो की, एक इमारत माझ्या बाजुला आहे, महाराजा अपार्टमेंट ती १९९४ ते १९९८ च्या आसपासची नाही आहे. ती सन १९८८ मध्ये इमारत बनली आहे. ही इमारत तशी काहीच नाही. तीथे एक खिळा ठोकायला गेले तर तो ठोकला जात नाही. त्यासाठी मेहनत करायला लागते, ड्रील मशिनचा वापर करायला लागते. आपण त्या बिल्डींगला पण नोटीस दिली आहे की, तुमची इमारत धोकादायक आहे, ती रिकामी करा. तुमच्या इमारतीसाठी उडवाची रेतीचा वापर झाला आहे आणि ही इमारत सन १९९४ ते १९८८ मध्ये बनली आहे. या इमारतीचा जो प्लॅन आहे, तो सन १९८८ मध्ये पास झाला आहे. एक पाचवा उदाहरण तुम्हांला कॉपीपेस्टचा देतो की, उल्हासनगर-५ मध्ये सतनाम साखी इमारत ५ नंबर गो शाळेसमोर आपण त्यांना पण नोटीस दिली आहे. संपुर्ण शहराला माहीती आहे. कोर्टामध्ये प्रलंबित आहे, तीचा कोणताच निर्णय आला नाही. दोन्ही पार्टीचे आपसात लढाई आहे आणि महापालिकेला पण पार्टी बनवले आहे. आपण त्या बिल्डींगला पण नोटीस दिली आहे की, आपण बिल्डींग रिकामी करा, ती धोकादायक आहे. परंतु ती इमारत त्या जागेवर आहेच नाही. आता फक्त् प्लॅट आहे, हे पण एक कॉपीपेस्टचे उदाहरण आहे.सार्वजनिक बांधकाम विभागाने फक्त् प्रोसेस पुर्ण

करण्यासाठी ए.सी. रुममध्ये बसून सन २००४ पासून कॉपीपेस्ट करुन सन २०२१ मध्ये १७ वर्षा नंतर या लोकांना नोटीस दिली आहे आणि आज लोकांची हालत खराब आहे. पहीले कोरोनाची साथ, धंदे चौपट झाले आहेत त्या नंतर आपण संपुर्ण उल्हासनगरला धोकादायक केले आहे. आपण प्रत्येक इमारतीला नोटीस दिली आहे. आपल्याकडे असा कोणताच उपाय नाही की, मापदंड देवू शकतो,तुमच्याकडे कोणतीच मशनरी नाही की, आपण घोषीत करु शकतात. आपण नोटीस देवून अर्धे उल्हासनगरला भयभित केले आहे. तरी कृपया माझे सदनच्या माध्यमातून निवेदन आहे की, सार्वजनिक बांधकाम विभागाकडून ज्या नोटीस दिल्या आहेत आणि प्रभाग अधिकारी बिल्डींगी रिकाम्या करीत आहेत, आपल्या नविन उप आयुक्त, राजपुत मॅडम आल्या आहेत, त्या इमारती रिकाम्या करण्यासाठी दबाव टाकत आहेत. तरी कृपया ही दादागिरी आणि घाबरवण्याचे हे काम बंद झाले पाहीजे. एक आजचा उदाहरण मी आपल्याला सांगतो की, उल्हासनगर नेहरु चौकामध्ये श्री हरी कॉप्लेक्स आहे, ही इमारत सन २०१३ पासून रिकामी आहे. तिथे कोणीच राहत नाही, त्या बिल्डींगच्या वर रिपेरींगचे काम चालू आहे. लक्ष्मण कटारीयाद्वारा रिपेरींगचे काम चालू आहे आणि त्यासाठी लोकांनी ५० लाख खर्च केले आहेत आणि ते बनवत आहेत. आज मागच्या बाजुला श्रीकृष्ण मार्केट आहे, तिथे दोन दिवस पहीले स्लॅब पडला आहे. ती तोडायची आहे, पण मशनरी तिथे जाऊ शकत नाही तर ती तुम्हांलाच तोडायला लागेल. तर हा जो प्रकार महानगरपालिकेकडून चालू आहे, हे खुप निंदनिय आहे, शरमेचीे गोष्ट आहे. एक भितीचे वातावरण तयार केले आहे. तरी कृपया या गोष्टीवर पुर्ण विचार केला पाहीजे आणि शहरामध्ये कोरोनाच्या काळामध्ये आणि पावसाळयामध्ये लोकांना त्रास देवू नका, लोकांना बेघर करु नका, लोकांच्या जीवाशी खेळू नका, धन्यवाद.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>** मा. महापौरजी, मा. आयुक्तजी मी बोलू इच्छितो की, या ज्या ११६ बिल्डींगचे पाणी, लाईट कट केले गेले आहे, ते आज इकडे तिकडे फिरत आहेत. त्यांना लाईट नाही आणि लाईटमुळे पाण्याची व्यवस्था नाही. तर आपण त्यांच्यासाठी दुसरीकडे व्यवस्था केली आहे का? आणि आज लोक बिगर लाईटचे तिथे राहत आहेत. पाणीच नाही, कोणी नातेवाईक यांच्याकडे जात आहे, कोणी समाज मंदिरामध्ये राहयला जात आहेत. अशा प्रकारे अचानक यामध्ये पण श्री. राजेश वदारिया यांनी सांगितले की, शहर अभियंता यांनी ऑफिसमध्ये बसून ११६इमारतींना अतिधोकादायक नोटीस देवून सांगितले की, लाईट कट करा. त्यामध्ये ग्राउंड प्लस वन पण आहेत. मा. आयुक्त साहेब, मी काल पण तुम्हांला निवेदन केले होते की, ११६ ज्या इमारती आहेत, अतिधोकादायक ज्यांचे लाईट आणि पाणी कट केले आहे. त्यासाठी इंजिनियर किंवा एक कमिटीने जाऊन चेक केले पाहीजे. ११६ इमारतीमधून कमीत कमी ८० ते ९० इमारतींनी आपले काम करुन घेतले आहे.बरोबर रिपोर्ट असून आणि आज शिवसेनेची सत्ता असून देखील, महाराष्ट्र शासनामध्ये शिवसेनेचे सरकार, उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये शिवसेनेची सत्ता असून तरी दोन हजार लोक इकडे तिकडे भटकत आहेत. पाणी नाही, लाईट नाही, त्यांच्यासाठी कोणतीच व्यवस्था केली नाही.मला दु:खाने सांगावे लागत आहे की, मा. महापौरजी याची माहीती पण नाही दोन हजार लोक भटकत आहेत. लाईट आणि पाणी कट केले आहे आणि तीन दिवस लोक इकडे तिकडे भटकत आहेत. हा विषय गंभीरपणे घेऊनत्याची परत चौकशी झाली पाहीजे किंवा स्ट्रक्चरल ऑडीट करुन ज्या अतिधोकादायक आहेत, त्यांचे पाणी आणि लाईट बंद केली पाहीजे. अन्यथा आपल्या ऑफिसमध्ये बसून लोकांचे लाईट आणि पाणी कट करणे हे लोकांवर खुप मोठा अन्याय आहे. जनता आवश्यक उत्तर देईल.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-</u>** मा. महापौरजी, हा विषय असा आहे की, जेव्हा मोनापॅलेस इमारत पडली, त्या वेळी ही इमारत धोकादायक सुचीमध्ये नव्हती. धोकादायक सुचीमध्ये नसल्या कारणाने शहर अभियंता यांना वाटले की, धोकादायक घोषित केली नाही. उद्या माझ्यावर येईल आणि मी जर धोकादायक म्हणून घोषित नाही केली आणि ती पडली तर माझ्यावर केस होऊ शकते, जेलमध्ये जाऊ शकतो. या भितीमुळे मला वाटते की, शहर अभियंता यांनी चांगली बिल्डींग किंवा खराब बिल्डींग असेल त्यांना कोणतेही देणेघेणे नाही, असा त्यांचा विचार आहे.माझी जबाबदारी आहे की, मी सगळया बिल्डींगीना धोकादायक म्हणून घोषित करुन देवू. जर एखादी बिल्डींग पडली तर ते माझ्यावर येणार नाही.पालकमंत्री यांनी जेव्हा १२ लोकांचे मृत्यु झाले होते, तेव्हा सगळयांना पाच पाच लाख रुपये दिले होते. परंतु आता जे सांगितले की, जे अधिकारी दोषी असतील त्यांच्यावर

कारवाई होईल. तर मला सांगा की, मोनी पॅलेस धोकादायक इमारतीच्या सुचीमध्ये नव्हती. इथले अधिकारी इमारती रिकाम्या करुन लोकांना त्रास देत आहेत. अधिका-यांनी त्यांचे कातडे वाचवण्यासाठी हे केले आहे. ज्या इमारती चार वर्षापुर्वीच्या जुन्या आहेत, त्यांना पण नोटीस दिल्या आहेत. जर लोकांना रस्त्यावर आणणार नाहीत तर भारतीय जनता पार्टी सहन करणार नाही......

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-**आवाज येत नाही.

**सदस्या, श्रीम.अंजली साळवे:-** महापौर मॅडम, आवाज स्पष्ट येत नाही.

**सदस्य, श्री. अरुण आशान:-**मा. महापौरजी, धोकादायक इमारतीचा जो विषय आला आहे......

**सदस्यस, श्री. सतरामदास जेसवानी:-** मा. महापौरजी राजनिती सोडून लोकांसाठी विचार करा लोक बेघर होत आहेत....

या वेळी काही सदस्य एकत्रित बोलत असल्यामुळे कोण काय बोलत होते, ते स्पष्ट समजून आले नाही.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:-** वेळेचे भान ठेवा आणि एका वेळेस एकानेच बोलावे.

**महापालिका सचिव, श्री. अशोक नाईकवाडे:-** मा. पिठासिन अधिकारी यांनी सांगितले आहे की, सदस्यांनी विषयावरच बोलावे, एक एकानेच बोलावे नाही तर आपल्याला खुप वेळ लागेल. आपल्याकडे वेळ कमी आहे आणि विषय खुप आहेत. सन्माननिये सदस्यांना मा. महापौरांच्या वतीने विनंती आहे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-**मुर्दाबाद, मुर्दाबाद आमच्या सदस्यांचे आवाज दाबला जात आहे.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:-** मा. महापौरजी, त्यांना बोलू दया, समजून घ्यायला पाहीजे. त्यांना एक संधी दया.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-**विरोधी पक्ष नेता यांना बोलू दया.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:-** मी सचिवांना सांगणार तेव्हाच सचिव बोलणार ना, एक एक बोला समजायला येत नाही.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-**विरोधी पक्ष नेता यांना बोलू दया.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:-** मा. महापौरजी, मी पाच मिनीटे बोलू इच्छितो की, पावसाळयामध्ये गव्हर्नमेंटकडून चार महीने पहीले ऑर्डर येते की, जे बांधकाम झाले असेल त्यांना तोडू नका पावसाळयामध्ये.....

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:-** एक एक करुन बोला ऐकायला येत नाही.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:-**आज तीन माळयाच्या पाच माळयाच्या, सात माळयाच्या बिल्डींगीना नोटीस देत आहेत, या नोटीस सन १९९४, १९९५ सालच्या बिल्डींगीना दयायला पाहीजे. जया प्राव्हेट बिल्डींगी आहेत, त्यांना पण नोटीस देतात......

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** महेश सितलानी हत्यारा आहे,

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:-** महापौर साहेबाजी, सदस्यांना बोलू दया, चौधरी साहेब, आपण पण बोला.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:-** सगळया सदस्यांनी शांत बसावे उत्तर देत आहेत.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:-**शहराच्या जनतेचा जगण्या मरण्याचा प्रश्न आहे, चौधरी साहेब आपण पण बोला.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:-**सचिव साहेब उत्तर देत आहेत, सगळयांनी शांत बसा.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-** मा. महापौरजी मला पॉईट ऑफ ऑर्डरवर बोलायचे आहे.

**महापालिका सचिव, श्री. अशोक नाईकवाडे:-** उल्हासनगर महानगरपालिकेत क्वालिफाईड इंजिनियर होते, ३ जुन, १३ जुन पर्यंत होते, धन्यवाद.

या वेळी सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी यांनी सभागृहामध्ये प्रवेश केला.

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-** मा. महापौर, उप महापौर, आयुक्त साहेब, उल्हासनगर महानगरपालिकेने १५ दिवसाच्या आतमध्ये आपल्या बिल्डींगचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्यासाठी १५ क्वालिफाईड इंजिनियर नेमले आहेत आणि बिल्डींगीचे ऑडीट करुन प्रमाणपत्र सबमिट करण्यासाठी सांगितले होते, ऑडीट करण्याच्या पहीले.....

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** सितलानी यांना अटक करा.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:-** पाणी आणि लाईट बंद करु नका.

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-**यामध्ये आम्ही १५ लोकांना पात्र केले आहे. संबंधित डिपार्टमेंटला पाठवले जाईल आणि नंतर त्याचे प्लॅन बनले जाईल. ते झाल्या नंतर आमच्याकडे रिपोर्ट येईल, तपासून नंतर पुढची कारवाई करण्यात येईल, धन्यवाद.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:-**लाईट आणि पाणी बंद करु नका.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-** इंजिनियर नेमण्यासाठी १२ दिवस लागले आहेत, तर हे काम १५ दिवसामध्ये कसे होणार?

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** आवाज बंद केले जात आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-** यांना बाहेर काढा, बाहेर.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:-** बाहेरुनच बोला.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** आमच्या लोकांचा आवाज बंद केला जात आहे, आमचा आवाज बंद केला जात आहे.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:-**महापौरजी, श्री.जमनादास यांना सांगा, मान्यता देवून या विषयावर चर्चा करा.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:-** प्रदिपभाऊ ऑन लाईन मिटींग आहे, तिकडूनच बोला.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** परत परत आवाज म्युट केला जात आहे.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:-**प्रदिपजी असा जनतेला चुकीचा मॅसेज जाईल .

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-**आवाज बंद केला जात आहे, शहरामध्ये हे काय होत आहे? मा. महापौरजी दोन हजार घरांना पर्यायी व्यवस्था दया. लोक पावसामध्ये कुठे जाणार?महाराष्ट्रामध्ये शिवसेनेचे सरकार आहे आणि उल्हासनगरमध्ये दोन हजार लोक इकडे तिकडे भटकत आहेत. कोणतीही पर्यायी व्यवस्था नाही.

या वेळी काही सदस्य, एकत्रित बोलत असल्यामुळे कोण काय बोलत होते, स्पष्ट समजून आले नाही.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:-** सर्वांनी ज्याच्या त्याच्या जागेवरुन बोला, एक एकाने बोला, समजेल असे बोला.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** लाईट, पाणी बंद करु नका, सर्वांची लाइट चालू असायला पाहीजे.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:-**सर्व सदस्यांनी ऐकावे सभेचा अपमान होत आहे, खुप गोंधळ चालला आहे, तुम्ही जागेवर जाऊन बसावे.

**सदस्य, श्री.सतरामदास जेसवानी:-** मा. महापौरजी, बाकीच्या पार्टीवाले बोलेले आहेत, राष्ट्रवादी पार्टीला पण बोलू दया.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-** महापौरजी, माझा नंबर कधी येईल? मी कधी बोलणार माझ्या पॅनलची समस्या कधी सोडवणार?

**सदस्य, श्री.सतरामदास जेसवानी:-**पावसाळयाच्या सुरुवातीला शासनाचे आदेश असतात की, कोणीही बेघर झाले नाही पाहीजे.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-**महापौरजी, तुमचा आवाज येत नाही. मुदतवाढ करा, पावसाळयाचे तीन महीने माफ करा.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:-**तुम्ही महासभेमध्ये गोंधळ घालत आहेत.

**सदस्य, श्री. अरुण आशान:-** मला वाटते सर्व सदस्यांनी आपआपला खुलासा केला आहे.

**सदस्य, श्री.सतरामदास जेसवानी:-**मा. महापौरांनी मुदत दयायला पाहीजे.

**सदस्य, श्री. अरुण आशान:-** मा. महापौरजी, विरोधी पक्ष नेता यांना बोलण्याची परवानगी दया.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:-** मा.महापौरजी, मी या विषयामध्ये पाच मिनीट बोलतो.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:-** पाच नाही तर १० मिनीटे बोला पण एक एक जण बोला.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:-**आपल्याला विनंती करतो, कृपया या बिल्डींगचे पाणी आणि लाईट कट करायला नाही पाहीजे आणि पावसाळयात चार महीने गव्हर्नमेंट ऑडर दिली जाते. मी आपल्याला विनंती करतो महापौरजी, सर्व संमतीने लाईट आणि पाणी कट नाही केली पाहीजे आणि पावसाळयामध्ये गव्हर्नमेंट ऑर्डर देतात की, अनाधिकृत बांधकामे तोडली नाही पाहीजे. हया ज्या १५०० बिल्डींगीना नोटीस दिल्या आहेत, हे खुप चुकीचे आहे पावसाळयाची वेळ आहे आणि लोक कोरोनामुळे घाबरले आहेत. जर पावसाळयाच्या वेळेमध्ये घरे रिकामी केली तर लोक कुठे जाणार?...

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:-** राजू जग्यासी, किशोरभाई आपण एकच विषयावर बोला आणि एक एकजण बोला एकाच विषयावर तीन तास चर्चा चालू आहे, दुस-या विषयावर पण बोलायचे आहे.

या वेळी काही सदस्य एकत्रित बोलत असल्यामुळे कोण काय बोलत होते, ते स्पष्ट समजून आले नाही.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:-** ही प्रशासनाची चुकी आहे आणि संपुर्ण उल्हासनगरला उध्दवस्त करायला पहात आहेत. तरी भारतीय जनतापार्टी जनतेच्या बरोबर आहे. आज अरुणभाऊ यांनी पण आपल्या वार्डची समस्या सांगितली. तर हे उल्हासनगरमध्ये प्रत्येक नगरसेवकासाठी डोकेदुखी बनणार आहे. प्रत्येकाला प्रॉब्लेम होणार आहे, कोणत्याही पार्टीचा असो. तर यासाठी उल्हासनगरचे जेवढे पण ८३ नगरसेवक आहेत, आणि उल्हासनगर रिकामे करण्याचा जो प्लॅन आहे, ठाण्यामध्ये एकच इंजिनियर आहे, त्यांच्याकडे जावून प्रमाणपत्र घेऊन यावे. हा काय प्रकार आहे? व्हीजीट करणार हे काय चालले आहे. तर कृपया करुन जनतेला वेळ दया, धन्यवाद.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** मा. महापौरजी, पर्यायी व्यवस्था जो पर्यंत होत नाही, २००० घरांची लाईट कापून आपण काय दाखवणार आहेत? लोक इकडे तिकडे भटकत आहेत, बिगर लाईट आणि पाणी नसून सुध्दा राहत आहेत. स्ट्रक्चरल ऑडीट आपण केले नाही, ही अतिधोकादायक आहे, ही बिल्डींग पडू शकते असा तुमचा अंदाज आहे आणि शहर अभियंता यांनी बंद खोलीमध्ये बसून नोटीसी दिल्या आहेत.मा. महापौरजी मी आपल्याला निवेदन करतो की, आजच्या आज लोकांना बेघर करणे ठिक नाही.

**सदस्या, श्रीम. अंजली साळवे:-**मा. महापौरजी पहीलेच एवढया लोकांचे लाईट आणि पाणी कट केले आहे.

या वेळी काही सदस्य एकत्रित बोलत असल्यामुळे कोण काय बोलत होते, ते स्पष्ट समजून आले नाही.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** ज्या बिल्डींगचे, घराचे लाईट आणि पाणी कट केले आहे, जर त्यांना खरच बेघर करायचे असल्यास त्यांच्यासाठी आपण पर्यायी व्यवस्था करा. महानगरपालिकेच्या तिजोरीतून खर्च करुन त्या लोकांना भाडयाने घर देण्यात यावेत आणि जो पण दोषी असेल त्याच्यावर कारवाई होईल आणि त्याच्यावर गुन्हा दाखल होईल...

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:-** या विषयावर भरपूर चर्चा झाली आहे, संबधित अधिकारी तुम्हांला उत्तर देत आहेत.

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-** मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब,

**महापालिका सचिव:-** आता भरपुर चर्चा झाली असल्याने मा. महापौरांनी अतिक्रमण विभागाला उत्तर दयायला सांगितले आहे. उप आयुक्त अतिक्रमण आपल्याला उत्तर देतील.

**सदस्य, श्री. राजू जग्यासी:-** उल्हासनगर महानगरपालिकेने या लोकांची पर्यायी व्यवस्था केली पाहीजे...

**सदस्या, श्रीम. अंजली साळवे:-** मॅडम आवाज कुणाचाच येत नाही.

**सदस्य, श्री. महेश सुखरामनी:-** मा. महापौर, उप महापौर जसे की, विरोधी पक्षनेता आणि श्री. जमनादास पुरस्वानी यांनी.....

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-** आयुक्तांना उत्तर देवू दया, आयुक्त साहेब उत्तर देतील.

**सदस्य, श्री. अरुण आशान:-** आयुक्त साहेब, याबाबतीत उत्तर दया.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:-** कृपया आयुक्त साहेबांनी बोलावे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** महापौरजी, मी काही बोलू इच्छितो की, कृपया मला अनुमती देण्यात यावी.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** तुम्हांला अनुमती आहे.

**सदस्य, श्री. अरुण आशान:-**सर्वांनी शांत बसा आणि आयुक्त् साहेबांनी उत्तर दयावे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-**मा. महापौरजी मी बोलू इच्छितो.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:-** आयुक्त साहेब उत्तर देत आहेत, सर्वांनी शांत बसा. सर्वांनी शांत बसा आणि उत्तर ऐका.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-**मा. महापौरजी, मी एक मिनीट बोलतो, कृपया मला परवानगी देण्यात यावी.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-** मा. महापौरजी, शासनाच्या गाईड लाईन्स आहेत, की, पावसाळयामध्ये घरे रिकामी करु नये. लोकांना हॉस्पीटल मिळत नाहीत आणि आपण त्यांना घरातून बाहेर काढीत आहेत, बेघर करीत आहेत. पावसाळयामध्ये कोणताही रुल नाही, गव्हर्नमेंटचा रुल काय आहे? गव्हर्नमेंट काय बोलते?

आपले सरकार आहे, आपले सरकार काय सांगते? लोकांना पावसाळयामध्ये बेघर नाही करायला पाहीजे, पावसाळयामध्ये लोकांना बेघर का करीत आहेत?कोरोनाचा महाकाळ चालला आहे आणि लोकांना बेघर करीत आहेत. महापौरजी थोडेफार दया दाखवा. दया की तुमच्याकडून भिक मागत आहे.

या वेळी उप महापौर, श्री. भगवान भालेराव हे सभागृहाच्या बाहेर गेले.

**आयुक्त, डॉ. राजा दयानिधी:**-मा. महापौरजी, सन्माननिय सदस्य, उपस्थित अधिकारी वर्ग सन्माननिय सदस्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांबाबत मा. पिठासिन अधिकारी यांच्या परवानगीने मी खालील प्रमाणे सांगू इच्छितो की, सध्या आपल्याकडे नगरविकास विभाग यांचे परिपत्रक दिनांक ०५/११/२०१५ अन्वये आपल्याकडे इमारतींचे वर्गीकरण अ- १, अ-२, अ-३ असे केले जाते. आपण परिपत्रकाच्या हिशोबाने ज्या अतिशय धोकादायक इमारती आहेत आणि सदर परिपत्रकाच्या हिशोबाने त्या इमारतीला रिकामी करुन त्या इमारतीला निष्कासित करणे.त्या कनेक्शनमध्ये तेवढयाच इमारती होत्या. दोन केसेसमध्ये कोर्ट मॅटर होते आणि आपण कोर्टाला सादर केले आहे. त्यांना स्वत: तोडायला सांगितले आहे, आता राहीला प्रश्न् दुस-या इमारतीचे वर्गीकरण अ मध्ये येते, अमध्ये सुध्दा या परिपत्रकाच्या हिशोबाने जवळपास आपल्याकडे ११६ बिल्डींग होत्या. या ११६ बिल्डींगीना आपण मागील सहा, सात महीन्यापासून रेग्युलाईजेशन करण्यासाठी आपण त्यांना नोटीस दिल्या होत्या. परतु १७ जुन २०२१ ला मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाच्या आणि बाकीच्या झालेल्या मिटींगमध्ये झालेल्या निर्देशा प्रमाणे आपण् ११६ बिल्डींगीना ९ ते १० दिवसापुर्वी शेवटच्या नोटीस दिल्या होत्या. त्याच्यामध्ये नमुद होते की, १० दिवसाच्या आत बिल्डींग रिकामी करुन घर रिकामी करावे नाही तर लाईट आणि पाणी कट करण्यात येईल. असे आपण नोटीस दिल्या होत्या. त्याच्यामध्ये काही बिल्डींगीच्या रहिवाशानी स्ट्रक्चरल ऑडीट करुन त्यांचे रिपोर्ट आपल्याला सबमिट करण्यात आलेले आहेत. सदर रिपोर्टचा अभ्यास वार्ड ऑफिसच्या स्तरावरुन, आपल्या स्तरावरुन सुरु आहे. मी सर्वांना हे कळू इच्छितो की, हे स्ट्रक्चरल ऑडीट करतांना आपल्याला पॅनलच्या मागच्या वेळेस जेव्हा मिटींग होती, तेव्हा सर्वांनी महानगरपालिकेला सजेशन केले होते. त्याच्या अनुषंगाने आपण जुनच्या १३ तारखेपर्यंत आपल्याकडे जाहिराती मागवल्या होत्या. आता पर्यंत ३० इंजिनियरने माहीती सांगितल्या प्रमाणे सध्या आपल्याकडे १७ अर्ज आले असून त्याच्यामध्ये १५ मान्य करण्यात आलेले आहेत. १५ अर्जाचा पुन्हा नगररचनाकार विभागामार्फत छाननी करुन त्याच्या मार्फत आपण पॅनल तयार करणार आहोत त्या लोकांकडून आपल्याकडे दोन ऑपशन आहेत एक पॅनलवर नेमलेले आपल्याकडे इंजिनियर आहेत,त्यांच्यामार्फत ते त्या इमारतीची तपासणी करु शकतात किंवा इतर कुठलाही क्वालिफाईड स्ट्रक्चरल इंजिनियर त्यांचे डेफिनेशन आपल्याकडे युडीसी रुलमध्ये आहे, त्या बिल्डींगीचे कोणताही इंजिनियर स्ट्रक्चरल ऑडीट करुन देवू शकतो. आता दुसरा मुददा जो मांडला होता, मागील ज्या दोन इमारती पडल्या होत्या त्या दोन इमारतीचे आपण माहीती घेतली होती. हया दोन इमारती सन १९९४ ते १९९८ च्या दरम्यान च्या आहेत. त्या यापुर्वी पण रिकाम्या केल्या होत्या. सध्या जेवढया सन १९९४ ते १९९८ पर्यंत त्या बिल्डींगचे सर्वेक्षण करुन त्यांना नोटीसी बजावल्या आहेत. आता याच्यामध्ये नोटीसा दिल्या नंतर मी सगळयांना नम्रमणे सांगू इच्छितो की नोटीस दिल्या नंतर आपल्याकडे नोटीसधारकांना स्ट्रक्चरल ऑडीट करुन घेण्यास त्यांना सुचना देण्यात आली होती त्याच्या बाबतीत पण आपण सांगू शकतो. परंतु त्याच्यामध्ये एक अडचण अशी आहे की, काहीनी स्ट्रक्चरल ऑडीट केले आहे, त्यांनी स्ट्रक्चरल ऑडीटचा रिपोर्ट आम्हांला सबमिट केला आहे. परंतु त्या रिपोर्टमध्ये काही रिपोर्ट रिपेअर करणे आवश्यक आहे, असे नमुद होते. तर आता येणा-या पावसाळयाची परिस्थिती बघून मागच्या दोन तीन घटना बघून त्यांना आपण स्पष्ट सांगतो की, एखादया इमारतीच्या स्ट्रक्चरल ऑडीटमध्ये रिपेअर करणे सांगितले आहे, तर त्या रिपेअर केले पाहीजे. कारण स्ट्रक्चरल ऑडीट करुन ते होणार नाही. कारण ती इमारत सुरक्षित असल्याबाबतचा पुन्हा आपण रिपेअर करुन रिपेअर असल्याबाबतचा सेप्टीसाठी प्रमाणपत्र आपण दिले. तर आपण धोकादायक इमारतींच्या यादीमधून काढू शकतो. माझ्या माहीती प्रमाणे मागील १५ दिवसामध्ये काही इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडीट करुन रिपोर्ट दिलेला आहे. तर महानगरपालिकेकडून ही जी काही कारवाई केली जात आहे, मागील सहा सात महीन्यापासून अतिधोकादाय व धोकादायक इमारतीना सार्वजनिक बांधकाम विभागाकडून जेवढया पण नोटीसी दिल्या गेल्या आहेत, त्या

स्ट्रक्चरल ऑडीट बाबतच्या आहेत. त्या इमारतींना रिकामी करण्याची नोटीस दिली नाही. माझ्या माहीती प्रमाणेतरी सुध्दा एखादया इमारतींला नोटीस गेली असेल तर मी सभागृहाला विनंती करु इच्छितो की, असे काही आढळून आल्यास माझ्या निदर्शनास आणून देतो आणि मी संबंधीत लोकांना कारवाई करण्यास सांगतो. तीसरा मुददा म्हणजे धोकादायक इमारतींच्या बाबतीत तेथील लोकांनी त्यांच्या स्वत:च्या खर्चातून, तुमच्या जबाबदारीवरुन बिल्डीग पाडणार आहेत, असे कळविले आहे. त्यांच्याकडून आपण एक अंडरटेकींग घेतले आहे. तुमच्या खर्चातून तुमच्या जबाबदारी बिल्डींग पाडण्यास तयार आहेत.त्याच्या अनुषंगाने आपण त्या लोकांना पण सांगितले आहे. अन्यथा ज्या अतिधोकादायक बिल्डींगी झाल्या आहेत, ज्याच्यामुळे त्या आजूबाजूच्या इमारतींना पण धोका निर्माण होणार आहे. त्या इमारतींना पाडण्याचे काम महानगरपालिकेकडून सुरु आहे. याच्यामध्ये सर्वांना नम्रपणे सांगू इच्छितो की, जेवढया नोटीस अतिधोकादाय व धोकादायक इमारतींना दिल्या गेल्या आहेत. मागील जवळपास ६ महीने, १० महीन्यापासून त्यांना सतत नोटीसा देत आहोत आणि फक्त् आपण इमारत रिकामी करण्याची कारवाई फक्त याच इमारतींना करीत आहे. जिथे ११६ मध्ये सी टू अ मध्ये जशा आतापर्यंत ११६ इमारती सी टू अ मध्ये आहेत आणि मी तुम्हांला सर्वांना नम्रपणे सांगू इच्छितो की, अर्बन डेव्हलेपमेंट डिपार्टमेंटच्या परिपत्रकामध्ये सी वन च्या आत दिले आहे, अतिधोकादायक इमारत रहेना आयोगइमारत निष्कासित करायची आहे. २३ इमारती होत्या, २३ पैकी २१ रिकाम्या आहेत. दुसरे सी टू अ च्या परिपत्रकामध्ये असे आहे की, इमारत रिकामी करुन दुरुस्ती करणे ब वर्गामध्ये मोडणार आहे. या परिपत्रकाच्या हिशोबाने जेवढया धोकादायक इमारती आहेत, या लोकांना आपण संधी दिल्या नंतरच शेवटचे ९ दिवसाच्या नोटीस दिल्या गेल्या आहेत. त्याच्या नंतर आपण त्यांच्यावर निष्कासित करण्याची कारवाई करतो. त्याच्या नंतर प्रभाग समिती निहाय आपण या लोकांना पर्यायी जागेसाठी आपल्याला लागतील म्हणजे शाळा असतील, समाज मंदिर असतील पब्लिकच्या सेप्टीसाठी आपण हे धोरण हाती घेतले आहे. कारण येणा-या मागील १४ दिवसापासून सगळयांना माहीती आहे की, ठाण्यामध्ये भरपुर पाउस पडत आहे, त्यामुळे अशा इमारती कधी पडू शकतात. त्यामुळे अशा घटना घडू नयेत हे थांबण्यासाठी आपण अशी व्यवस्था करण्यात आलेली आहे. तिसरा मुददा मागच्या वेळी निवारासाठी, ट्रांजिस्ट कॅम्पसाठी एक मुददा आला होता. आता आपण नगररचनाकार विभागाकडून जेवढे आपले रिर्झव्ह प्लॉट आहेत, हे प्लॉट पण आयडेटींफाय करण्यात आलेले आहेत. तिकडच्या फाईल मंजुर करुन आपण सार्वजनिक बांधकाम विभागाला इमारतीच्या जिथे जिथे जागा आहेत, आपल्या निवारा केंद्रासाठी आहे, निवाराकेंद्रासाठी बांधकाम करण्यासाठी प्लॅन वैगेरे, मार्जीन वैगेरे नगररचनाकार विभागाकडून तयार करुन ते सार्वजनिक विभागाला देण्यात येणार आहेत, सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत तेथे आपल्याकडे असलेल्या अर्टीकेटमार्फत प्लॅन वैगेरे करुन पुढचे जे निवाराकेंद्र तयार करायचे आहेत, त्याची कारवाई पण महानगरपालिकेकडून सुरु करण्यात आलेली आहे. याच्यासाठी मागील एक दोन महीन्यामध्ये येणा-या बजेटमध्ये निवाराकेंद्रासाठी स्पेशल बजेटची तरतुदसाठी सुध्दा प्रपोज करण्यात येत आहे. संपुर्ण सभागृहाकडून विनंती राहील की, याच्यामध्ये काही कमतरता जर असेल ते पण करण्यात आलेले आहे. जेवढया डेजेरस, अतिधोकादाय व धोकादायक आहेत २३ आणि ११६ इमारतीची आपल्याकडे जी यादी आहे, प्रभाग समिती निहाय ती आपल्या सर्वांकडे आलेली आहे. सगळया नगरसेकांना एक एकाला एक एक कॉपी आपण देणार आहोत. जनेकरुन त्यांना कुठलेही शंका येणार नाही आणि आपण सडंनली महानगरपालिकेमार्फत पाणी आणि लाईट कट केले नाही, त्यांना १० दिवसापुर्वी अंतीम नोटीस देण्यात आलेली आहे. या शहराची भौगोलिक रचना पाहता, शहरातील इतिहासिक असलेल्या बांधकामाचा नगररचनाकडून आपण हे हाती घेण्याचे कारण म्हणजे दुसरी कुठलीही अशी घटना घडू नये. म्हणून आपण हे अत्यंत काळजीपुर्वक, खात्रीपुर्वक कारवाइर् करीत आहे. याच्यामध्ये या लक्षवेधीमध्ये नगरसेवकांनी ब-याच सुचना करण्यात आलेल्या आहेत. तर आपण पुढील कारवाई करणार आहोत, धन्यवाद.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-** मा. महापौरजी मी पॉईड ऑफ ऑर्डरवर बोलायचे आहे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-**मा. महापौरजी, मी खुलासा करु इच्दितो की, स्ट्रक्चरल ऑडीट इंजिनियरची शैक्षणिक पात्रता काय असली पाहीजे. आपला ऑर्डीनस बी सेक्शन ४ बी मध्ये एक तरतुद आहे, त्याच्यावर आपले लक्ष वेधू इच्छितो की,....

**महापालिका सचिव, श्री. अशोक नाईकवाडे:-** कोईड-१९ च्या तिस-या लाटेमध्ये लहान मुलांना धोका असल्यामुळे ते पाळण्यासाठी पुर्वयोजना म्हणून पावसाळयापुर्वी राज्यातील सर्व मुलांना डोस देण्यात येईल. त्यांची किमंत दिड ते दोन हजाराच्या घरात असल्याने सर्वसामान्य, गरीब कुटूंबातील मुलांच्या पालकांना हे शक्य होणार नाही. याबाबत लक्षवेधी बाबत महासभेमध्ये चर्चा होऊन विषय मंजुर करण्यात यावा, ही विनंती.

महापालिका सचिव, श्री.अशोक नाईकवाडे:—लक्षवेधी सुचना क्र. २ जीचे सुचक आहेत,सौ. अंजली चंद्रकांत साळवे.

लक्षवेधी सुचना याप्रकारची आहे.......................

---

## लक्षवेधी सूचना क्रमांक २

विषय :—कोव्हिड- १९ च्या तिस-या लाटेच्या पार्श्वभुमीवर महानगरपालिकेतील शाळेच्या मुलांचे लसीकरण करणे.

मा. महोदय/महोदया,

येत्या महासभेमध्ये खालील नमुद केलेल्या विषयावर लक्ष वेधू इच्छितो की, सदरील विषयावर चर्चा करणेत येवून प्रभावी तोडगा काढण्यात यावा, सदरचे विषय खालील प्रमाणे.

कोव्हिड-१९ च्या तिस-या लाटेत लहान मुलांना धोका असल्याने ते टाळण्यासाठी पुर्वयोजना म्हणून पावसाळयापुर्वी राज्यातील सर्व मुलांना इनफलुएन्झा (Influanza) नामक लस देण्यात यावी ही सुचना टास्क फोर्सने केलेली आहे.

तथापी सदरच्या लसीची किंमत दीड ते दोन हजारांच्या घरात असल्याने सर्वसामान्य व गरीब कुटूंबातील मुलांच्या पालकांना हे शक्य होणार नाही.

तरी याबाबत महासभेमध्ये चर्चा होवून लक्षवेधीबाबतचा विषय मंजुर करण्यात यावे, ही विनंती.

---

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** माझा पहीले वाला विषय अर्धा राहीलेला आहे, तर आपण दुसरा विषय कसा घेतात? त्याच्यावर चर्चा झाली पाहीजे.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:-** वदरियाजी एकच विषय तुम्ही परत परत बोलत राहणार दुसरे विषय पण आहेत.

**सदस्य, श्री. शंकर लुंड:-** आदेश तर होऊ दया.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** मी पहील्या वेळेस विषय उचलला आहे आणि दुस-या वेळेस बोलत आहे.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** आपल्याला दोन तास तर काय किती पण लागू दया.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** पर्यायी व्यवस्था काय आहे? लोक रस्त्यावर भटकत आहेत.

या वेळी काही सदस्य, एकत्रित बोलत असल्यामुळे कोण काय बोलत होते ते स्पष्ट समजून आले नाही.

**आयुक्त, डॉ. राजा दयानिधी:-** मा. पिठासिन अधिकारी साहेब, पर्यायी व्यवस्थेसाठी आपल्याकडे उल्हासनगर महानगरपालिकाक्षेत्रात शाळा त्याच बरोबर कॉलेज वैगेरे अशी पर्यायी व्यवस्था आहे. ज्यांना ज्यांना आवश्यकता आहे, तिथे त्यांना पर्यायी व्यवस्था देण्यात येइल आणि रिजेक्शन डिपार्टमेंटसाठी पण तशा सुचना करण्यात आलेल्या आहेत, आपल्याला कायम स्वरुपाचा ट्राझिस्ट कॅम्प बनवण्यासाठी भिवंडी बायपास येथे टाटा आमंत्रण येथे पण तातपुरत्या स्वरुपात देण्यासाठी तिथे पण पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे.सध्या तरी आपण शाळा, समाज मंदिर आणि कॉलेज येथे आपले झालेले आहे. त्याच बरोबर आपल्या जेवढया मालमत्ता

आपल्याकडे हॅन्डवर्क करण्यात आलेल्या आहेत, तिथे प्रभाग समितीवारीस नीट बेसिकवरुन पर्यायी व्यवस्था करण्यात आलेली आहे.

या वेळी उप महापौर, श्री. भगवान भालेराव यांनी पुन्हा सभागृहामध्ये प्रवेश केला.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** या सर्व प्रोसेसला किती दिवस जाणार आहेत, आयुक्त् साहेब हे सर्व आपण सांगावेत.आपण शाळेमध्ये देणार आहेत, समाज मंदिरामध्ये देणार आहेत आणि आपल्या जिथे मोकळया जागा आहेत, तिथे देणार आहेत. तर हे सर्व प्रस्ताव आपण किती दिवसात करणार आहेत? कारण काही बिल्डींगीचे नळ आणि लाईट आपण कापून टाकलेले आहेत.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:-** सगळयांचे आता सांगून झालेले आहे, आयुक्त साहेबांनी उत्तर दिलेले आहे.
या वेळी काही सदस्य, एकत्रित बोलत असल्यामुळे कोण काय बोलत होते ते स्पष्ट समजून आले नाही.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:-** या चर्चे बददल सगळया पक्षांच्या गटनेत्यांना महापौर कार्यालयात बोलवण्यात येईल. सगळयांची मी मिटींग घेणार आहे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** महापौरजी, खुप खुप धन्यवाद. दोन हजार लोकांना नोटीसा दिल्या आहेत आणि ज्या अतिधोकादायक बिल्डींग आहेत, त्यांची लाईट कट करण्यात यावी. हजारो लोक इकडे तिकडे भटकत आहेत. मा. महापौरजी आपण आदेश करा की..

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:-** साळवे मॅडमला बोलू दया. साळवे मॅडम बोलत आहेत, सर्वांनी शांत बसावे.

**सदस्या, श्रीम. अंजली साळवे:-** मा. महापौर मॅडम, उप महापौर, आयुक्त साहेब, सर्व सन्माननिय सदस्य, विष्य अंत्यत महत्वाचा आहे, पहीली आणि दुसरी लाट गेली आहे आणि आता तिस-या लाटेची शक्यता आहे. तिस-या लाटेमुळे लहान मुलांना धोका असल्यामुळे तो टाळण्यासाठी पावसाळयापुर्वी उपाययोजना म्हणून लहान मुलांना इनफलुएन्झा (Influanza) लस देण्यात यावी.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:-** साळवे मॅडमला बोलू दया, सर्वांनी ऐकुन घ्यावे.

**सदस्या, श्रीम. अंजली साळवे:-**कृपया सर्वांनी शांत रहा, मा. महापौर मॅडम, मा. उप महापौर, मा. आयुक्त साहेब आणि सर्व सन्माननिय सदस्य, मी परत सांगू इच्छिते की, हा विषय खुपच महत्वाचा आहे, तरी कृपया सर्वांनी ऐकावा. आपण आता गेल्या मार्चपासून अनुभवत आहोत, आपण दुस-या लाटेतुन गेला आहोत आणि आता तिसरी लाट येणार आहे. तिसरी लाट लहान मुलांना धोकादायक आहे असे तज्ञांचे मत आहे. या लाटेत लहान मुलांना धोका असल्यामुळे तो टाळण्यासाठी मुलांना इनफलुएन्झा (Influanza) लस देण्यात यावी, अशी सुचना टास्क फोर्सने केलेली आहे.इनफलुएन्झा (Influanza) लस दिल्यास लहान मुलांना धोका कमी होईल तसेच रुग्णालयातील भार कमी होईल. आताच सदस्यांची मुददा उपस्थित केला आहे की, नुक्त्याच झालेल्या मा. मुख्यमंत्री, उध्दवजी ठाकरे यांच्या उपस्थित राज्यातील सहा हजार तज्ञांनी कोव्हिड विषयी मार्गदर्शन केले होते. त्यामध्ये टास्क फोर्स आणि तज्ञांनी अशा सुचना केलेल्या आहेत की, लहान मुलांनाइनफलुएन्झा (Influanza) लस देण्यात यावी. पावसामुळे लहान मुलांना गोवर, अतिसार, ताप येतात या वेळेस तीसरी लाट येणार आहे, असे मत तज्ञ करीत आहेत. त्यामुळे लहान मुलांना विविध आजारांमुळे ताप येणे ही साधी बाब मानली जाते. मात्र तो ताप तपासण्यासाठी मुलांच्या विविध चाचण्या कराव्या लागतात. तर लहान मुले सामान्य तापला बळी तर पडणारच नाही, त्यांना कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यास मदत होईल. तसेच विविध चाचण्यातून रुग्यालयावरील आणि डॉक्टरांवरील ताण कमी होईल. अशी भुमिका टासक् फोर्सने आणि बालरोगतज्ञांनी वर्तवली आहे....

**सदस्य, श्री. अरुण आशान:-** बोला साळवे मॅडम, तुमचा आवाज येत आहे.

**<u>सदस्या, श्रीम. अंजली साळवे:-</u>**मध्यम वर्गाला व श्रीमंताना परवडू शकते, प्राव्हेटमध्ये सध्या ही लस देणे सुरु आहे. पण आपल्या महानगरपालिकेतील सर्व शाळेतील मुलांना जे सर्वसामान्य आणि गरीब कुटूंबातील असतात, त्यांना ही लस देणे परवडू शक्य नाही आणि ही लस देणेस अत्यंत आवश्यक आहे. तरी माझी आपणास विनंती आहे की, ही लस महानगरपालिकेतर्फे महापालिकेतील शाळेतील लहान मुलांना देण्यात यावी, धन्यवाद. सर्वांना आग्रहाची विनंती आहे की, हा ठराव मान्य करण्यात यावा, धन्यवाद.

**<u>सदस्य, श्री. अरुण आशान:-</u>** धन्यवाद साळवे मॅडम.

**<u>सदस्य, श्री. राजू जग्यासी:-</u>** अरुणजी मी पाच मिनीट बोलतो केवल ....

**<u>महापौर तथा पिरठासिन अधिकारी:-</u>** कोणाला या विषयावर बोलायचे आहे का?

**<u>सदस्य, श्री. राजू जग्यासी:-</u>**केवल दोन मिनीट बोलतो की, ही माहीती लोकांना नाही आहे, तरी माझी आपल्याला विनंती आहे की, एक वेळा आपण कोव्हिडसाठी वार रुम बनवले होते. तर अशाच प्रकारे वार रुम बनले पाहीजेत. लोकांना माहीती मिळाली पाहीजे. लोकांना कुठे जायचे आहे, कुठे ॲडमिट करायचे आहे, या बाबतीत पण लोक खुप धक्के खात आहेत. तर माझी विनंती आहे की, एक टीम बनवली पाहीजे.तिथे लोक जातील आणि माहीती घेतील.

या वेळी काही सदस्य एकत्रित बोलत असल्यामुळे कोण काय बोलत होते, ते स्पष्ट समजून आले नाही.

**<u>सदस्यर, श्री. अरुण आशान:-</u>**मा. महापौर फक्त दोन मिनीटात बोलतो, त्या झोपडपटटीमध्ये....

**<u>उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-</u>** अरुणराव जरा शांत मी काय बोलतो श्रीम. अंजली साळवे मॅडमने हा जो प्रस्ताव आणलेला आहे, मी तुम्हांला विनंती करतो की, लहान मुलांच्या शाळेचा प्रस्ताव आणलेला आहे, लहान मुलांच्या संदर्भामध्ये १ ते १८ अजुनही कुठल्या प्रकारची लस नाही, फक्त चाचण्या चालू आहेत. कुठल्याही १२ ते १८ वर्षाच्या वयामध्ये कुठल्याही प्रकारची लस देण्यात येत नाही. कुठल्याही देशात देण्यात येत नाही. आपल्याकडे फक्त् प्राक्टीकली चाचण्या घेण्यात येत आहेत. त्या पुर्ण झाल्यावर याच्यावर विचार केला जाईल. आता हा विषय आपण ...

**<u>सदस्या, श्रीम. अंजली साळवे:-</u>**मा. महापौर मॅडम, इनफलुएन्झा (Influanza) लस देणे गरजेचे आहे, ती सगळीकडे दिली जात आहे.

**<u>उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-</u>**जेव्हा हा विषय येईल, त्या वेळी त्याचा विचार महानगरपालिका नक्कीच करेल.

**<u>सदस्या, श्रीम. अंजली साळवे:-</u>**परंतु कोरोनाची तीसरी लाट, ६ हजार तंज्ञ सांगत आहेत, अजून का विचार करीत नाहीत.

**<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:-</u>** पुढचा विषय घ्या.

**<u>सदस्या, श्रीम. शुभांगी बेहनवाल:-</u>** मा. महापौर, आयुक्त् साहेब, साळवे मॅडमने दिलेली लक्षवेधी फार महत्वाची आहे, लस देणे फार गरजेचे आहे.

महापालिका सचिव विषय क्र. १ वाचून दाखवतात

---

⇨ <u>विषय क्र. १ :</u>—मागील विशेष महासभा दिनांक १८/१२/२०२० (त्यात १७/०२/२०२०), १७/०२/२०२१, आणि विशेष महासभा २२/०३/२०२१ व पहिली विशेष महासभा दिनांक ३१/०३/२०२१, व दुसरी विशेष महासभा ३१/०३/२०२१ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

---

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** कायम करीत आहे.

**महापौर तथा पीठासीन अधिकारीः—** मागील सभेचे दिनांक दिनांक १८/१२/२०२० (त्यात १७/२/२०२०), दिनांक १७/०२/२०२१, आणि विशेष महासभा२२/०३/२०२१ व पहिली विशेष महासभा दि.३१/०३/२०२१, व दुसरी विशेष महासभा दि.३१/०३/२०२१ रोजीचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे.

---

☑ विषय क्र. २ :—मागील महासभेचे दिनांक १८/१२/२०२० (त्यात १७/२/२०२०), दिनांक १७/०२/२०२१, आणि विशेष महासभा२२/०३/२०२१ व पहिली विशेष महासभा दि.३१/०३/२०२१, व दुसरी विशेष महासभा दि.३१/०३/२०२१ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

सुचकाचे नाव :—श्री. राजेंद्र चौधरी

अनुमोदकाचे नाव :—श्री. कलवंतसिंह सोहता

महासभा ठराव क्र.०२ दिनांक : १८/०६/२०२१

ही महासभा महापालिका सचिवांनी प्रस्तुत केलेल्या दिनांक १८/१२/२०२० (त्यात १७/०२/२०२१) रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे पृष्ठ क्र. १ ते ५८ व दिनांक १७/०२/२०२१ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे पृष्ठ क्र. १ ते ४३ तसेच दिनांक ३१/०३/२०२१ रोजीच्या विशेष महासभेचे पृष्ठ क्र. १ ते २४ व दुसरी विशेष महासभा दिनांक ३१/०३/२०२१ रोजीच्या पृष्ठ क्र. १ ते ३८ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते
महापौर/ पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

या वेळी काही सदस्य एकत्रित बोलत असल्यामुळे कोण काय बोलत होते, ते स्पष्ट समजून आले नाही.

**सदस्या, श्रीम. अंजली साळवे:-** मा. आयुक्त साहेब, आपण डॉक्टर आहात, आपण तरी माहीती दया.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:-** जनरल बॉडीने ठराव करण्यात यावा.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** आता लक्षवेधी संपलेल्या आहेत.

**सदस्य, श्री. अरुण आशान:-** मा. आयुक्तजी आपण या लक्षवेधीवर उत्तर दयावे, सचिव साहेब घाई करु नका.

**सदस्या, श्रीम. अंजली साळवे:-**सचिव साहेब,घाई करु नका, आपण या विषयावर बोलणे अत्यंत गरजेचे आहे, आपण कोव्हिडसाठी एवढी तयारी करीत आहोत, लहान मुलांचे हॉस्पिटल उभारत आहोत. हे तुम्हांला चांगले वाटत नाही का? काही पण असे बोलू नका, लहान मुलांसाठी हॉस्पिटल उभारणे त्यांच्यासाठी तुम्हांला गरज वाटत नाही का?

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:-** आयुक्त साहेब, उत्तर देत आहेत, तेवढे तुम्ही ऐका

**आयुक्त, डॉ. राजा दयानिधी:-** मा. पिठासिन अधिकारी,

**सदस्य, श्री. अरुण आशान:-** आयुक्त साहेब, बोला.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-** नाही, नाही पहीले पगारे साहेबांनी उत्तर दयावे.

**आयुक्त, डॉ. राजा दयानिधी:-**मा. पिठासिन अधिकारी, सदस्यांनी जे मुददे मांडले आहेत, सध्या तरी आपल्याकडे जे लसीकरण सुरु आहे, ते १८ ते ४० वयोगटासाठी सुरु आहे. सध्या गव्हर्नमेंटच्या पॉलिसीच्या हिशोबाने केंद्र व राज्या शासनाच्या हिशोबान वय १ ते १८ पर्यंतच्या मुलांच्या वॅक्सीनच्या बाबतीत कुठलाही आपल्याकडे गॅझेट झालेला नाही. सध्या आपल्या देशामध्ये आणि बाकींच्या देशांमध्ये फक्त् टेस्टींग वैगेरे चालू आहेत. जेव्हा आपल्याला तसे शासनाकडून आदेश येईल, जसे आपल्याकडे गाईडन्स येतील तसे आपण त्यांच्या आदेशाने पालन केले जाईल. सध्या तरी आपल्याकडे राज्य शासनाकडून किंवा केंद्रशासनाकडून लहान मुलांना लसीकरण करणे असे आदेश आपल्याला नाहीत.

महापालिका सचिव विषय क्र. ३ वाचून दाखवतात

---

⇨ विषय क्र. ३ :—मयत झालेल्या कर्मचा-यांच्या वारसाना अनुकंपातत्वाने नियुक्तीबाबत.

---

**महापालिका सचिव, श्री. अशोक नाईकवाडे:-** मा. पिठासिन अधिकारी यांच्या निर्देशानुसार सदस्यांना विनंती करण्यात येते की, विषय क्रमांक ३ चालू झाला आहे. याच विषयावर चर्चा करण्यात यावी.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** विषय क्र.३ चालू आहे, लक्षवेधी संपल्या आहेत.

या वेळी काही सदस्य एकत्रित बोलत असल्यामुळे कोण काय बोलत होते, ते स्पष्ट समजून आले नाही.

**सदस्य, श्री. अरुण आशान:-** मा. महापौरजी, पुढचा विषय घ्या.

**महापालिका सचिव, श्री. अशोक नाईकवाडे:-**या विषयावर सन्माननिय सदस्यांना मत मांडायचे असेल तर कृपया मत मांडावे विषय क्र.३ सुरु आहे.

**सदस्य, श्री. अरुण आशान:-** सन्माननिय महापौर, सन्माननिय आयुक्त साहेब अनुकंपा बाबतीमध्ये सन २००७ पासून ते सन २०२१ पर्यंत काही विषय प्रलंबित आहेत. काही लोकांना ठोक वेतनावर घेतलेले आहेत, त्यांना अनुकंपा वेतन मिळालेला नाही. हा लाभ प्रशासनाकडून सर्वांना मिळाला पाहीजे. मागच्या लोकांना घेतलेला नाही, त्यांना पण घेण्यात यावे हा उददेश आहे. पालिका प्रशासनाला विनंती करतो की, महासभेमध्ये ठराव करुन अनुकंपाचा लाभ दयावा, ही विनंती.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:-</u>**आयुक्त साहेब, आपण जो ठराव आणलेला आहे, यामध्ये शेवटचे वाक्य असे आहे की, महासभा ठराव क्रमांक १३ दिनांक २७/०२/२०२१ शासन निर्णय क्रमांक १०२/८ दिनांक २१ सप्टेंबर २०१७ परिशिष्ट अ मधील २ नुसार अनुकंपा नियुक्ती करणे याच्यात फरक आहे. सगळयांचे म्हणणे आहे की, महासभेचे म्हणणे आहे त्यांलोकांना अटी आणि शर्ती शिथील करण्यासाठी आम्ही प्रस्तावीत केले आणि तो प्रस्ताव शासनाकडे पाठवून तो मंजुर करुन घ्यावा. कारण त्यांच्यावर अन्याय होत होता. आयुक्त साहेब ऐकत आहेत का? येथे नमुद केले आहे की, तफावत आहे आणि जो प्रस्ताव आला आहे तो सन२०२१ ला आहे मान्यता दया आम्ही मान्यता काय दयायची आणि माहीती काय घ्यायची येथे फक्त् नमुद केले आहे, फरक काय आहे? तो सांगितलेला नाही.वरील मा. महासभ ठराव १३, दिनांक १७/२/२०२१ मुद्या १ ते ६ मध्ये व शासन निर्णय क्र.अ.क्र. १२०/आठ,२१ सप्टेंबर २०१७ नुसार शासनाने दिलेल्या निर्देशामध्ये फरक आहे. त्यामुळे ठोकवेतनावर कार्यरत असलेल्या मयत झालेल्या कर्मचा-यांच्या पत्नीच्या जागी वारसांना घेणसाठी प्रकरणाचा विहित नियमानुसार आढावा घेवुन व कागदपत्रांची पडताळणी करुन पुढील कार्यवाही प्रचलित नियमानुसार करण्यासाठी, फेरबदल करण्यासाठी मा. महासभेच्या माहितीस्तव व मान्यतेस्तव प्रस्तावित करण्यात येत आहे. म्हणजे आम्ही जो प्रस्ताव केलेला आहे, तो मान्य केला आहे का? तो जर केला असेल तर असे सांगा तर मग घेऊन या. त्यांच्या वारसांना आणि त्यांची नियुक्ती करा.

**<u>सदस्य, श्री. किशोर वनवारी:-</u>** मा. महापौरजी, याच विषयावर मी पण बोलू इच्छितो की, हा जो तीन नंबरचा विषय आहे, अनुकंपाबाबत, याबाबतीत वर्षा नु वर्षे मिसगाईड करीत आहेत.जे अनुकंपावाले लोक आहेत, त्या सर्वांबरोबर अन्याय होत आहे. आज पण हे लोक १० ते १५ वर्षापासून काम करीत आहेत. तरी कृपया आज हा विषय आला आहे, जेवढा आपला लोकल स्टाफ आहे, तसे ते काम करीत आहेत तर त्यांना महाराष्ट्र गव्हर्नमेंटकडे प्रस्ताव न पाठवता महासभेमध्ये सर्व पस्ताव पास करुन सर्व कर्मचा-यांना घेतले पाहीजे आणि सर्व पार्टीच्या लोकांना माझी विनंती आहे, धन्यवाद. पास..पास..

**<u>सदस्य, श्री. अरुण आशान:-</u>** पास..पास.. मा. महापौर मॅडम आणि आयुक्त साहेब, आता श्री. किशोर वनवारी साहेब आणि श्री. धनंजय बोडारे साहेबांनी सांगितले की, अनुकंपा लोकांना घेण्यासाठी..१)उल्हासनगर महानगरपालिकेने या आगोदर ठराव क्रमाक ३४ दिनांक १९/१०/२०१८ अन्वये या संदर्भात निर्णय घेतलेला आहे. परंतू त्यांची अंमलबजावणी अद्यापपर्यंत पुर्णपणे केल्याचे दिसून येत नाही. तरी पुन्हा एकदा अनुकंपा तत्वावरील नियुक्ती करण्यासाठी प्रशासनास आदेशीत करण्यात येत आहे.२)शासन निर्णय क्रमांक १०२/८ दिनांक २१ सप्टेंबर २०१७ परिशिष्ट अ मधील २ नुसार अनुकंपा नियुक्ती संदर्भातील या केवळ शासकीय कर्मचा-यापुरताच सिमित आहेत. सदर तरतुदी या जिल्हा परिषद/ नगरपालिका/ महानगरपालिका/महामंडळे/प्राधिकरणे/व्यापारी उपक्रम व इतर तत्सम आस्थापनावरील कर्मचा-यांना थेट लागू होणार नाही त्यासाठी सबंधित प्रशासकीय विभागाने स्वतंत्रपणे निर्णय घेणे आवश्यक राहील असे नमुद आहे.

३)महापालिका सेवेत असतांना मयत झालेल्या कर्मचा-यांच्या वारसापैकी एका वरसास त्वरीत ठोक पगारावर अस्थायी स्वरुपात नेमणूक करण्यात यावे व कागदपत्राची पुर्तता झाल्यानंतर त्यांना स्थायी पदावर नेमणूक करण्यात यावे.

४)पुर्वी मयत झालेल्या कर्मचा-यांच्या वारसांना ठोक वेतनावर नियुक्ती करण्यात आलेली आहे. परंतू, सदर कर्मचा-यांना अद्याप पर्यंत कायम अथवा त्यांच्या वरसास अनुकंपा तत्वाने नियुक्ती करण्यात आलेली आहे त्यांच्या कुटूंबातील एका उमेदवारास त्याच्या शेक्षणिक अर्हतेनुसार त्या पदावर अनुकंपा तत्वाने नियुक्ती करावी.

५)नियुक्ती करण्यासाठी शासनास शैक्षणिक पात्रता व अर्हता शिथिल करण्याचे अधिकारी आहेत व शासनाने काही प्रकरणात पात्रता व अर्हतेची अट शिथिल केली आहे. त्याचे प्रमाणे उल्हासनगर महानगरपालिका नियुक्ती प्राधिकरण पुढील प्रमाणे निर्णय घेत आहे.

६)काही करणास्तव कुटूंबातील सदस्यांची नियुक्ती करणे शक्य् नाही त्यांची नियुक्ती ठोकपगारावर करण्यात यावी व कागदपत्राची पुर्तता झल्यांवर व त्यानंतर त्यांना त्वरीत कायम पदावर नियुक्ती करण्यात यावी.

सबब,पुढील सर्व कुटूंबातील वारसांच्या सदस्यांची नेमणूक करण्याबाबत निर्देशित करण्यात येत आहे.

तसेच, शासन निर्णय दिनंक २१/९/२०१७ प्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये या पुढे आयुक्त यांच्या स्तरावर पुढील अनुकंपा तत्वावर नियमानुसार नियुक्ती करण्यासाठी मान्यता देत आहे.

या ठरावा तंर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल."

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:-** इतिवृत्ताची वाट न पहाता, पास..पास..

**महापालिका सचिव, श्री. अशोक नाईकवाडे:-** विषय क्र. ३ पास..

काही सदस्य :—पास—पास……

महापौर तथा पीठासीन अधिकारी :—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑विषय क्र. ३ :—**मयत झलेल्या कर्मचा-यांच्या वारसाना अनुकंपातत्वाने नियुक्तीबाबत.**

प्रस्तावना

महापालिका आस्थापनेवर कार्यरत असताना मयत झालेल्या कर्मचा-यांच्या वारसांना अनुकंपा तत्वाने नियुक्ती करण्यासाठी खालीलप्रमाणे मा.महासभेच्या माहिती व मान्येतेसाठी गोषवारा दिनांक १७/१२/२०२० रोजी पाठविण्यात आलेला होता. त्यानुसार खालील प्रमाणे मा. महासभेने ठराव पारित केलेला आहे.

२.महासभा ठाराम क्र.१३ दिनांक १७/०२/२०२१ नुसार खालील मुद्यांवर मान्यता दिलेली आहे.

"हि महासभा उपरोक्त प्रस्तावाचा सखोल अभ्यास व शहानिशा करुन उल्हासनगर महानगरपालिकेच्या कर्मचारी मयत झाल्या नंतर अनुकंपा तत्वाने नियुक्ती करण्यासाठी नियुक्ती प्राधिकरण या नात्याने पुढील प्रमाणे निर्णय घेत आहे.

१)उल्हासनगर महानगरपालिकेने या आगोदर ठराव क्रमाक ३४ दिनांक १९/१०/२०१८ अन्वये या संदर्भात निर्णय घेतलेला आहे. परंतू त्यांची अंमलबजावणी अद्यापपर्यंत पुर्णपणे केल्याचे दिसून येत नाही. तरी पुन्हा एकदा अनुकंपा तत्वावरील नियुक्ती करण्यासाठी प्रशासनास आदेशीत करण्यात येत आहे.

२)शासन निर्णय क्रमांक १०२/८ दिनांक २१ सप्टेंबर २०१७ परिशिष्ट अ मधील २ नुसार अनुकंपा नियुक्ती संदर्भातील या केवळ शासकीय कर्मचा-यापुरताच सिमित आहेत. सदर तरतुदी या जिल्हा परिषद/ नगरपालिका/ महानगरपालिका/महामंडळे/प्राधिकरणे/व्यापारी उपक्रम व इतर तत्सम आस्थापनावरील कर्मचा-यांना थेट लागू होणार नाही त्यासाठी सबंधित प्रशासकीय विभागाने स्वतंत्रपणे निर्णय घेणे आवश्यक राहील असे नमुद आहे.

३)महापालिका सेवेत असतांना मयत झालेल्या कर्मचा-यांच्या वारसापैकी एका वरसास त्वरीत ठोक पगारावर अस्थायी स्वरुपात नेमणूक करण्यात यावे व कागदपत्राची पुर्तता झाल्यानंतर त्यांना स्थायी पदावर नेमणूक करण्यात यावे.

४)पुर्वी मयत झालेल्या कर्मचा-यांच्या वारसांना ठोक वेतनावर नियुक्ती करण्यात आलेली आहे. परंतू, सदर कर्मचा-यांना अद्याप पर्यंत कायम अथवा त्यांच्या वरसास अनुकंपा तत्वाने नियुक्ती करण्यात आलेली आहे त्यांच्या कुटूंबातील एका उमेदवारास त्याच्या शेक्षणिक अर्हतेनुसार त्या पदावर अनुकंपा तत्वाने नियुक्ती करावी.

५)नियुक्ती करण्यासाठी शासनास शैक्षणिक पात्रता व अर्हता शिथिल करण्याचे अधिकारी आहेत व शासनाने काही प्रकरणात पात्रता व अर्हतेची अट शिथिल केली आहे. त्याचे प्रमाणे उल्हासनगर महानगरपालिका नियुक्ती प्राधिकरण पुढील प्रमाणे निर्णय घेत आहे.

६)काही करणास्तव कुटूंबातील सदस्यांची नियुक्ती करणे शक्य् नाही त्यांची नियुक्ती ठोकपगारावर करण्यात यावी व कागदपत्राची पुर्तता झल्यांवर व त्यानंतर त्यांना त्वरीत कायम पदावर नियुक्ती करण्यात यावी.

सबब,पुढील सर्व कुटूंबातील वारसांच्या सदस्यांची नेमणूक करण्याबाबत निर्देशित करण्यात येत आहे.

तसेच, शासन निर्णय दिनंक २१/९/२०१७ प्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये या पुढे आयुक्त यांच्या स्तरावर पुढील अनुकंपा तत्वावर नियमानुसार नियुक्ती करण्यासाठी मान्यता देत आहे.

या ठरावा तंर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल."

३.शासन निर्णय क्र.अ.क्र. १०२/आठ, दिनांक २१ सप्टेंबर,२०१७ परिशिष्ट-अ मधील २ नुसार अनुकंपा नियुक्ती योजनेसंर्भातील हया केवळ शासकीय कर्मचा-यापुरत्याच सीमीत अहेत.सदर तरतुदी हया जिल्हा परिषद/ नगरपालिका/ महानगरपालिका/ महामंडळे/ प्रधिकरणे/ व्यापारी उपक्रम व इतर तत्सम आस्थापनावरील कर्मचा-यांना थेट लागू होणार नाहीत. त्यासाठी संबंधित प्रशासकीय विभागाने स्वतंत्रपणे निर्णय घेणे आवश्यक राहील. असे नमुद आहे.

४.शासन निर्णय क्र.अ.क्र.१०२/आठ,दिनांक २१ सप्टेंबर २०१७ मधील ५/अ नुसार अनुकंपा तत्वावर नियुक्ती देताना असे प्रस्ताव शासन सेवेतील रोजगारावर असलेली मर्यादा, या योजनेच्या मागील भूमिका लक्षात घेवुन जो कर्मचारी मृत झाला आहे त्याच्या कुटुंबीयांना तात्काळ उदभवणा-या आर्थिक प्रेचप्रसंगावर मात करण्याच्या उददेशाने विचारात घ्यावेत. असे निर्देश आहेत.

५.शासन निर्णय क्र.अ.क्र. १२०/आठ,२१ सप्टेंबर २०१७ मधील ५/अ नुसार अनुकंपा नियुक्तीसाठी पात्र कुटुंबिय:-

अ) अनुकंपा तत्वावरील नियुक्तीसाठी खालील नमुद केलेले नातेवाईक पात्र राहतील व त्यापैकी एका पात्र नातेवाईकास नियुक्ती अनुज्ञेय राहील.

१. पती/पत्नी,

२ मुलगा/मुलगी(अविवाहीत/विवाहीत),मृत्यूपूर्वी कायदेशीररित्या दत्तक घेतलेला मुलगा/मुलगी(अविवाही/विवाहीत)

३.दिवंगत शासकिय कर्मचा-याचा मुलगा हयात नसेल किंवा तो नियुक्तीसाठी पात्र नसेल तर त्याची सून

४. घटस्फोटित मुलगी किंवा बहीण, परित्यक्ता मुलगी किंवा बहीण,विधवा मुलगी किंवा बहीण,

५. केवळ दिवंगत अविवाहीत शासकीय कर्मचा-यांचा शासन निर्णय क्र.अ.क्र. १२०/आठ,२१ सप्टेंबर २०१७ मधील ११/आ नुसार वय ४५ वर्षापेक्षा जास्त नसावे.

६.शासनाच्या धोरणानुसार मयत झलेल्या कर्मचा-यांच्या एकपात्र वारसास अनुकंपा नियुक्ती देण्याचे निर्देश आहेत.

वरील मा. महासभ ठराव १३, दिनांक १७/२/२०२१ मुद्या १ ते ६ मध्ये व शासन निर्णय क्र.अ.क्र. १२०/आठ,२१ सप्टेंबर २०१७ नुसार शासनाने दिलेल्या निर्देशामध्ये फरक आहे. त्यामुळे ठोकवेतनावर कार्यरत असलेल्या मयत झालेल्या कर्मचा-यांच्या पत्नीच्या जागी वारसांना घेणसाठी प्रकरणाचा विहित नियमानुसार आढावा घेवुन व कागदपत्रांची पडताळणी करुन पुढील कार्यवाही प्रचलित नियमानुसार करण्यासाठी, फेरबदल करण्यासाठी मा. महासभेच्या माहितीस्तव व मान्यतेस्तव प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>महासभाठराव क्र.:-०३</u> दिनांक:- १८/०६/२०२१

सुचकाचेनाव:- १) श्री. राजेंद्र चौधरी

२) श्री. अरुण आशान

३) श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव:- १) श्री. जमनादास पुरस्वानी

२) श्री. कलवंतसिंह सोहता

३) श्री. स्वप्नील बागुल

हीमहासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे अनुकंपा तत्वावर नोकरी देण्यामागे मृत कुटूंबाच्या वारसांना आधार देणे हा प्रमुख उददेश आहे. त्या अनुषंगाने ठाणे म.न.पाच्या धरतीवर अनुकंपा तत्वावरील कर्मचा-यांना जेष्ठता सुचितील वारसांना ठोकवेतनावर घेण्यात आले होते. ठाणे म.न.पा. ने अशा वारसांना अनुकंपा धोरणानुसार विहित कालमर्यादे मध्ये सेवेत सामावून घेतले तथापी उल्हासनगर महानगरपालिकेने अशी कार्यवाही केलेली नाही त्या उलट जेष्ठ वारसांना डावलून कनिष्ठ वारसांना अनुकंपा तत्वावर सेवेत सामावून घेतलेले असल्याने नियमित सेवा विषयक लाभा पासून सदर वारसांना वंचित रहावे लागलेले आहे.आता प्रशासनिक चुकीमुळे या वारसांना विहित वयोमर्यादा पार केली असल्याने नियमित सेवेत घेणे शक्य होत नसल्याचे निर्देशनास आलेले आहे.

महापिलका प्रशासनिक चुकीमुळे सदर वारसांचा हक्क डावलला आहे. सदर ठोकवेतनावरील कार्यरत मयत कुटूंबियांचे वारस हे गेल्या अनेक वर्षापासून ठोक वेतनावर कार्यरत असल्याने त्यांना कंत्राटी कामगार (निमन व निर्मुलन) अधिनियम १९४८ व सुधारित कायदा अधिनियम १९७० अन्वये नियमानुसार एका कॅलेंडर वर्षामध्ये २४० दिवसापेक्षा जास्त दिवस भरलेले असल्याने नियमाप्रमाणे व कायद्यानुसार त्यांना अनुकंपा लाभ देवून कायम पदावर सामावून घेणे बंधनकारक आहे. तरी सबब या पात्र वारसांना अनुकंपाचा लाभ मिळणेकामी विशेष बाब म्हणून अट शिथील करुन त्यांना कायम पदावर समावून घेणे बंधनकारक आहे. तरी सबब या पात्र वारसांना अनुकंपाचा लाभ मिळणेकामी विशेष बाब म्हणून अट शिथील करुन त्यांना कायम पदावर सामावून घेण्याकरीता अनुकंपा तत्वावर नियुक्त होणा-या कर्मचारी किंवा सदर लाभार्थी कर्मचारी ज्या दिनांकास ठोक वेतनावर महापालिकेच्या सेवेत रुजू करुन घेण्यात आले त्यांना दिनकापासून अनुकंपा नुसार नेमणूकी तारीख ग्राहय धरुन त्यांची सेवा धरण्यात यावी, तथापि त्या दिनांकापासून आज रोजी पर्यंत (ठराव पारीत) मधील वेतन फरकाची रक्कम किंवा इतर अनुषंगिक लाभ देण्यात येवू नये परंतु सदरची सेवा हि निवृत्ती वेतनासाठी किंवा निवृत्ती नंतरच्या लाभासाठी ग्राहय धरण्यात यावा.

या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाचीसही/—१)
२)
३)

अनुमोदकाचीसही/—१)
२)
३)

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ४ वाचुन दाखवितात.

————————————————————————————————————————

⇨ विषय क्र.४:—**COVID-१९)**

**महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान योजनेअंतर्गत उल्हासनगर शहरातील कॅम्प क्र. १ ते ५ मधील स्मशानभुमींमध्ये डिझेल शवदाहिनी बसविणेचा प्रस्ताव शासनास सादर करणेकरीता मा.महासभेची मंजूरी मिळणेबाबत...**

————————————————————————————————————————

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:-**पास..पास..

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-** पास.. पास..

**महापालिका सचिव, श्री. अशोक नाईकवाडे:-** पास. .

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑विषय क्र. ४:—**<u>(COVID-१९)</u>**

**महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान योजनेअंतर्गत उल्हासनगर शहरातील कॅम्प क्र. १ ते ५ मधील स्मशानभुमींमध्ये डिझेल शवदाहिनी बसविणेचा प्रस्ताव सादर करणेकरीता मा.महासभेची मंजूरी मिळणेबाबत...**

<u>प्रस्तावना</u>

कोरोना प्रादुर्भावामुळे देशभरातील स्मशानभूमीबाहेर मृतांच्या रांगा लागल्या असताना अंत्यसंस्कारासाठी डिझेल शवदाहिनीचा मोठा उपयोग होत आहे मात्र अशा संकटकाळात .उल्हासनगर शहरात एकही शवदाहिनी नाही. त्यामुळे शवदाहिनीअभावी अंत्यसंस्कारासाठी अधिकचा वेळ खर्च होत आहे. कोरोना संसर्ग आणि नैसर्गिक मृत्यु झालेल्या दोन्ही शवांचे एकाच ठिकाणी अंत्यसंस्कार होत असल्याने संसर्गाची भिती आहे, तर दुसरीकडे आधीच दु:खात असलेल्या कुटूंबियांना पारंपारिक अंत्यसंस्कारासाठी खर्चाचा भार पेलावा लागत आहे. त्यामुळे प्रशासनाने शहरातील कॅम्प क्र.१ ते ५ मधील स्मशानभुमींमध्ये डिझेल शवदाहिनी बसविण्याचे ठरविले आहे.

या शववाहिनीचा उपयोग फक्त कोरोना काळातच नव्हे तर शहरातील स्मशानभूमीत लाकडाऐवजी शव दाहिनीचा वापर झाल्यास पर्यावरण संवर्धन सुदृढ होण्यास मदत मिळणार आहे.माणूस जुन्या रुढी आणि परंपरेला चिकटला आहे. सर्वच जुन्या रुढी आणि परंपरा चुकीच्या आहेत, असे नाही. परंतु, काही परंपरेत काळानुरूप बदल करणे गरजेचे आहे. माणूस स्वार्थासाठी केवळ जंगलातील वृक्ष तोडत आला. त्या तुलनेने वृक्षलागवड आणि संवर्धन दुर्देवाने प्रसिद्धीपुरते ठरते. त्यामुळेच ओझोनचा थर फाटत आहे. त्यामुळे निसर्गातही बदल होत आहेत. याचा परिणाम मानवीय जीवनावर पडतो आहे. त्यामुळेच पर्यावरणाच्या संवर्धनासाठी सर्वच स्तरावर प्रयत्न होणे गरजेचे आहे.

हिंदू धर्मासह काही धर्मात मृत्यूनंतर जाळण्याची प्रथा आहे. यासाठी मोठ्या प्रमाणात लाकडांची गरज लागते. यासाठी दोन ते अडीच हजार रुपये खर्च येतो. खर्चापेक्षा शेकडो किलो लाकूड जळून भस्म होते. शेकडो वर्षांपासून ही परंपरा सुरू आहे. यासाठी अब्जावधी झाडांची कत्तल करावी लागली आहे. त्यामुळे वन क्षेत्रातही घट होऊन वृक्षांची संख्याही घटली आहे, तर दुर्देवाने वृक्षसंवर्धन त्या तुलनेने होत नसल्याने भविष्यात मृत्यूनंतर देह जाळण्यासाठी लाकूड आणायचे कोठून? या समस्येचा सामना करावा लागणार आहे. भविष्यातील या सर्व बाबी लक्षात घेऊन शहरामधील स्मशानभूमीत शव दाहिनी उपलब्ध झाल्यास पर्यावरण संवर्धनास महत्त्वाचा हातभार लागणार आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करता,शहरातील कॅम्प क्र.१ ते ५ मधील खालील स्मशानभुमींमध्ये डिझेल शवदाहिनी बसविणे आवश्यक आहे. या कामाकरीता खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| **अ.क्र.** | **स्मशानभुमीचे ठिकाण** | **स्मशानभुमीमध्ये हॉल बांधणे (स्थापत्य काम) अपेक्षित खर्च** | **डिझेल शवदाहिनी बसविणे (यांत्रिकी काम) अपेक्षित खर्च** |
|---|---|---|---|
| १ | धोबीघाट, उल्हासनगर-१ | १९,१८,२०७/- | ७२,६१,१४०/- |
| २ | शांतीनगर, उल्हासनगर-३ | १९,१८,२०७/- | ७२,६१,१४०/- |
| ३ | मुक्तीबोध स्मशान भुमी, व्हिनस चौकाजवळ, उल्हासनगर-४ | १९,१८,२०७/- | ७२,६१,१४०/- |
| ४ | कैलाश कॉलनी, समता नगर, उल्हासनगर-५. | १९,१८,२०७/- | ७२,६१,१४०/- |
| | | **७६७२८२८/-** | **२९०४४५६०/-** |
| | | **७६७२८२८/- + २९०४४५६०/- = ३६७१७३८८/-** | |

| | | |
|---|---|---|

वरील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे शहरातील कॅम्प क्र.१ ते ५ मधील स्मशानभुमींमध्ये डिझेल शवदाहिनी बसविणेकरीता एकूण रु.३,६७,१७,३८८/- (अक्षरी रुपये तीन कोटी सदुसष्ट लाख सतरा हजार तिनशे अठ्ठयाऐंशी फक्त) एवढा खर्च अपेक्षितआहे.

उल्हासनगर शहराची स्थापना, सर्वाधिक लोकसंख्येची घनता, जमीन मालकी समस्या, विकास योजना आराखडा, अंमलबजावणीवर पडणाऱ्या मर्यादा यामुळे महानगरपालिकेची उत्पन्नाची स्त्रोतं मर्यादित झालेली आहेत. महानगरपालिकेच्या महसुली उत्पन्नातून महसुली व भांडवली कामांवर खर्च करण्यात येतो. उल्हासनगर शहरात विकास कामाच्या विविध योजना राबविण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, हुडको व एम.एम.आर.डी.ए. अशा विविध वित्त संस्थांकडून निधी उभारावा लागतो. उल्हासनगर महानगरपालिकेस मालमत्ता कर हे एकच उत्पन्न स्त्रोत आहे. आवश्यकतेप्रमाणे कर आकारणी होत नसल्याने महापालिकेची आर्थिक परिस्थिती अत्यंत खराब आहे. त्यामुळे सदर कामाकरीता महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान योजनेअंतर्गत निधी उपलब्धतेकरीता शासनास प्रस्ताव पाठविणे योग्य होईल.

महाराष्ट्र शासनाचे शासन निर्णय क्र.नगरो-२०१४/प्र.क्र.११९/नवि-३३ दिनांक २१ ऑगस्ट,२०१४ अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान अंतर्गत राज्यातील लहान व मध्यम शहरात आवश्यक त्या पायाभूत सुविधांची निर्मिती करणे, उपलब्ध पायाभूत सुविधांची श्रेणीवाढ करणे व त्या अनुषंगाने नागरीकांना पायाभूत सोयी सुविधा उपलब्ध करुन देणे हे योजनेचे मुळ उद्दीष्ट आहे. यामध्ये राज्यातील असतित्वात असलेल्या सर्व नगरपरिषदा, नगरपंचायती व ड वर्ग महानगरपालिका यांचा समावेश आहे.

तरी शहरातील कॅम्प क्र.१ ते ५ मधील स्मशानभुमींमध्ये डिझेल शवदाहिनी बसविणे करीता आवश्यक असलेला रु. ३,६७,१७,३८८/- एवढा निधी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान अंतर्गत शासनाकडून उपलब्ध होणेकरीता कामांचे प्राकलने व परिपूर्ण प्रस्ताव शासनास पाठविणेकरीता मा.महासभेच्या मान्यतेकरीता प्रस्तावित.

महासभा ठराव क्र:०४ दिनांक:—१८/०६/२०२१

सुचकाचे नाव :—श्री. कलवंतसिंह सोहता

अनुमोदकाचे नाव :—श्री. अर्चना करणकाळे, श्री. अरुण आशान

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे शासन निर्णयातील अटीस अनुसरून**(COVID-१९)महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान योजनेअंतर्गत उल्हासनगर शहरातील कॅम्प क्र. १ ते ५ मधील स्मशानभुमींमध्ये डिझेल शवदाहिनी बसविणेस मान्यता देत आहे.**

सुचकाचीसही/—

अनुमोदकाचीसही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ५ वाचुन दाखवितात.

————————————————————————————————————————

⇨ विषय क्र. ५:— **उल्हासनगर-३ सम्राट अशोक नगर येथील प्रवेशद्वार येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा उभारणेस मा.महासभेची मान्यता मिळणे.**

---

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** विषय क्र.५ आणि ६ हे विषय डॉ. बाबसाहेबांचा आणि छत्रपती शिवाजी महारांजाचा पुतळा उभारणे बाबत आहेत, तेव्हा एकत्रच घ्या.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:-** मेहरबानी करुन ऐकुन घ्या...

**महापालिका सचिव, श्री. अशोक नाईकवाडे:-** विषय क्र. ५ आणि ६ एकत्रित घ्यावेत अशी मा. महापौरांनी सांगितले आहे.विषय क्र. ५ आणि ६ च्या अनुषंगाने सदस्यांनी एकत्रित चर्चा करावी.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-**मा. महापौरजी, मी या विषयावर एक मिनीट बोलू इच्छितो की, **सम्राट अशोक नगर येथील प्रवेशद्वारावर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुर्णाकृती पुतळा उभारणे व उल्हासनगर-३ येथील शांतीनगर प्रवेशद्वार येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचाअश्वारुढ पुतळा उभारणेस प्रस्ताव आला आहे....**

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:-**सगळे एकत्र बोलत आहेत, ऐकायला येत नाही, एकत्रितक बोलत असल्यामुळे सगळा गोंधळ होत आहे. एकानेच बोला दुस-याला बोलण्यासाठी वेळ देण्यात येईल. दहा, दहा मिनिटांनी वेळ देण्यात येईल.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-**सिंधी समाजाचे...

**महापालिका सचिव, श्री. अशोक नाईकवाडे:-** आपले मोबाईल म्युट करण्यात यावेत, जे या विषयावर बोलत असतील त्यांनी आपले साउंड सुरु ठेवावे. माईक विषयावर चर्चा करण्यासाठी आहेत, बाकीच्यांनी आपले मोबाईल म्युट करण्यात यावेत, आम्हांला इतिवृत्त लिहीण्यासाठी बरे पडेल. इतिवृत्तासाठी आडचण येत आहे.

या वेळी काही सदस्य एकत्रित बोलत असल्यामुळे कोण काय बोलत होते, ते समजून आले नाही.

**सदस्य, श्री. अरुण आशान:-** मा. महापौरजी....

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-** अरुणजी एक मिनीट...

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** सन्माननिय सदस्य फक्त् एक एक बोला. बाकींच्याचा आवाज फोनवरुन येत आहे. त्यामुळे बाकीच्यांनी आवाज बंद करा.

**सदस्य, श्री. अरुण आशान:-**धन्यवाद, मा. महापौरजी या दोन्ही पुतळयांसाठी स्थळ पाहणी झाली होती, ती स्थळ पाहणी झाल्यानंतर हे दोन विषय प्रशासनाने वेगवेगळे आणले आहेत आणि त्या नंतरचे दैवत झुलैलाल यांच्या पुतळयाच्या उभारणी करीता सुध्दा हा प्रस्ताव आलेला आहे. मला असे वाटते की, उल्हासनगरचे नाव उल्हासनगर म्हणटले तर साई, साईम्हणटले तर झुलैलाल हे समिकरण आहे. परंतु परमपुज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि छत्रपती शिवाजी महाराज या पुतळयांचे अनवरण करतांना श्री. मनोज लासी यांनी सांगितले की, तीन्ही पुतळयांचे एकत्रित अनवरण करुन आपण हा ठराव केला पाहीजे. ठरावामध्ये हे तीन्ही पुतळे असल्यामुळे तीन्ही पुतळयांचे ठराव करुन, एकत्रितपणे ठराव करुन परंतु हे ठराव ई-निविदेत वेगळे असल्यामुळे तीन्ही ठराव एकत्रित करुन ते शासनाकडे पाठवले पाहीजे. कारण की, शासनाकडून याची अनुमती मिळणे आणि शासनाकडून याची अनुमती घेतल्यामुळे पुतळे त्या ठिकाणी उभारणेत येतील.मला वाटते महानगरपालिकेने बजेटमध्ये प्रस्तावीत रक्कम सुध्दा ठेवलेली आहे. मी संपुणर् सभागृहाला विनंती करतो की, इतिवृत्ताची वाट न पहाता तीन्ही प्रस्ताव हे मंजूर झाले पाहीजेत आणि हे तिन्ही पुतळे उभारले गेले पाहीजेत, धन्यवाद.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:-** अभिनंदन, अभिनंदन.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:-** पास..पास..

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-** जय झुलैलाल.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** जय शिवाजी, जय झुलेलाल.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:-**भारतरत्न बाबासाहेब आंबेडकर की जय.

**सदस्य, श्री. राजू जग्यासी:-** मा. महापौरजी, संत कवाराम यांचा पण प्रस्ताव पास केला आहे, तरी महानगरपालिकेकडून लवकर कारवाई करण्यात यावी.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** इतिवृत्ताची वाट न पहाता पास…

**महापालिका सचिव, श्री. अशोक नाईकवाडे:-** आदरणीय महापौर यांच्या वतीने विषय क्र.५, विषय क्र.६ व विषय क्रमांक १६ पास…

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-**भारतीय जनता पार्टीतर्फे मा. महापौरांचे अभिनंदन करीत आहे.

काही सदस्य :—पास—पास……

महापौर तथा पीठासीन अधिकारी:—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑विषय क्र. ५:—**उल्हासनगर-३ सम्राट अशोक नगर येथील प्रवेशद्वार येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा उभारणेस मा.महासभेची मान्यता मिळणे.**

प्रस्तावना

उल्हासनगर-३ सम्राट अशोक नगर येथील प्रवेशद्वार येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा उभारणेकरीता विविध स्तरांवरुन लोकप्रतिनिधी यांची मागणी होत आहे.

समाजोपयोगी कामांचाआदर्श समाजाच्या किंबहुना शालेय विद्यार्थी, महाविद्यालयीन युवक-युवतींच्या समोर राहावा, यासाठी महापुरुषांचे पुतळे उभे केले जातात. योग्य मार्गदर्शन मिळत नसल्याने आजचा युवक भरकटत चालला आहे. त्यामुळे अशा युवकांना आंबेडकर – शाहु – फुले, छत्रपती शिवाजी महाराज यांच्यासारख्या महापुरुषांच्या विचारांची गरज आहे. परंतू , हल्ली त्याकडे कुणालाच लक्ष देण्यास वेळ नसल्याने त्याचे परिणाम देशासह समाजालाही भोगावे लागत आहेत म्हणूनएखाद्या समाजाची मने जिंकण्यासाठी जयंती पुण्यतीथी साजरे करण्यापुरते पुतळे नको, तर सोबतच त्यांच्या विचारांचाही जागर होणे आवश्यक आहे. महापुरुषांच्या समाजपयोगी कामांचा आदर्श समोर रहावा यासाठी महापुरुषांचे पुतळे उभारले जातात. त्यांनी दाखविलेल्या मार्गावरुन जिवनाची वाट चोखाळावी अशी प्रेरणा यातुन युवकांना मिळते. तसेच शहराच्या सौंदर्यीकरणात व दर्जात भर पडते.

डॉबाबासाहेब आंबेडकर यांनी समता ., न्याय व बंधुता यासाठी लढा उभारला होताहाच वारसा आजही जपला . बाबासाहेब आंबेडकरांचे विचार आणि .अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा डॉ .जात आहेशहरात त्यांच्या उभारण्यात आलेल्या पुतळयामुळे मिळते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे न्यायासाठी लढलेत्यामुळे त्यांच्या पुतळयास .मोर नतमस्तक झाल्यानंतर न्यायासाठी लढण्याची प्रेरणा मिळते. डॉ.बाबासाहेबत आंबेडकरांनी उपेक्षित, वंचितांच्या न्यायहक्कासाठी लढा उभारला आहे पुतळ्यामुळे .युवकांना नैतिक पाठबळ मिळते. त्यांच्या विचारांचे अनुकरण आपण केले पाहिजे हा विचार . युवकांच्या मनात येणे, हा बाबासाहेबांच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव आहे .

त्यामुळे उल्हासनगर-३ सम्राट अशोक नगर येथील प्रवेशद्वार येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्याचा प्रस्ताव प्रशासनामार्फत तयार करण्यात येत आहे. राष्ट्रपुरुष आणि थोर व्यक्तींचा पुतळा उभारण्यासाठी शासन मान्यता मिळवण्याकरिता शासनाकडे प्रस्ताव सादर करावा लागतो परंतू तत्पुर्वी पुतळा उभारणेकरीता शासन निर्णय क्र.पुतळा-३११६/प्र.क्र.३०८/२९ दिनांक २ मे,२०१७ अन्वये विद्यमान मार्गदर्शक तत्वे विहित

केली आहेत. या २१ मार्गदर्शक तत्वांनुसार प्रस्तावासोबत शासनाच्या विविध विभागाचे मान्यता पत्रे, ठराव, ना-हरकत प्रमाणपत्रे इ.सोबत परिपूर्ण प्रस्ताव छाननीकरीता मा.जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या पुतळा समितीपुढे पाठविणे आवश्यक आहेत. यासंदर्भात खालील २१ मार्गदर्शक तत्वे विहित करण्यात आली आहेत.

## पुतळा उभारण्यासंबंधीची मार्गदर्शक तत्वे

१) कोणतीही व्यक्ती, संघटना, संस्था, शासकीय, निमशासकीय संस्थेच्या तसेच खाजगी मालकीच्या जागेवर जिल्हाधिकारी यांच्या परवानगीशिवाय पुतळा उभा करु शकणार नाही.

२) पुतळा उभारण्याच्या जागेच्या मालकी हक्काबाबत वाद नसावा. ती जागा अनधिकृत किंवा अधिक्रमित केलेली नसावी. जागेच्या मालकी हक्काबाबत संबिंत पुतळा बसविणाऱ्या व्यक्ती/ संस्था/ कार्यालयाने कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे. पुतळा उभारलेल्या जागेचा वापर अन्य प्रयोजनासाठी करण्यास पुतळा उभारणाऱ्या व्यक्ती/संस्था/ कार्यालयास हक्क राहणार नाही.

३) पुतळा बसविणाऱ्या व्यक्ती/ संस्था/ कार्यालय / समितीने पुतळयाच्या चबुतऱ्याचे मोजमापे, आराखडा, पुतळयाचा साईट प्लान, पुतळा ज्या धातु/ साहित्यापासून तयार करण्यात येणार आहे, त्या धातू/ साहित्याचे प्रमाण, पुतळयाचे वजन, उंची व रंग याचा तपशिल पुतळयाच्या रेखाचित्रासोबत मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, महाराष्ट्र राज्य यांना किंवा त्यांनी अधिकार प्रदान केलेल्या विभागीय कार्यालयास सादर करुन मान्यता घेतलेले पत्र प्रस्तावासोबत सादर करावे.

४) पुतळा उभारणाऱ्या संस्थेने पुतळयाच्या क्ले मॉडेलला कला संचालनालयाची मान्यता घेऊन ब्रांझ वा अन्य धातू, फायबर वा इतर साहित्यापासून पुतळा तयार करावा आणि मान्यता घेतलेल्या मॉडेल प्रमाणेच पुतळा उभारण्याची दक्षता घ्यावी.

५) पुतळा उभारण्यामुळे गाव / शहर सौंदर्यात बाधा येणार नसल्याबाबत संबंधित संस्था / कार्यालय तसेच स्थानिक स्वराज्य संस्था यांनी दक्षता घेण्यात यावी.

६) पुतळा उभारल्यामुळे भविष्यात कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही, स्थानिक वाद किंवा जातीय तणाव वाढणार नाही याबाबत सविस्तर चौकशी करून संबंधित पोलीस कार्यालय प्रमुखाने ना-हरकत प्रमाणपत्र प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे. तसेच पुतळा उभारण्यासाठी अल्पसंख्यांक व स्थानिक लोकांचा विरोध नसल्याबाबत स्पष्टपणे उल्लेख असलेले ना-हरकत प्रमाणपत्र घेण्यात यावे.

७) शासकीय, निमशासकीय आणि स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्यालय परिसरात पुतळा उभारण्यासाठी संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र प्रस्तावासोबत असावे.

८) स्थानिक स्वराज्य संस्था यांनी पुतळा उभारण्याबाबत आवश्यक तो ठराव करुन प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे. पुतळा उभारण्याची जागा स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मालकीची नाही अशा प्रकरणी संबंधित व्यक्ती/ संस्था/ कार्यालय यांनी पारित केलेला ठराव तसेच स्थानिक स्वराज्य संस्थेचे ना हरकत प्रमाणपत्र घेण्यात यावे.

९) पुतळा उभारण्यामुळे वाहतूकीस व रहदारीस अडथळा निर्माण होणार नसल्याबाबत स्थानिक पोलीस विभागाचे व संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेचे ना हरकत प्रमाणपत्र घेऊन प्रस्तावासोबत जोडावे.

१०) भविष्यात रस्ता रुंदीकरण अथवा अन्य विकास कामांमुळे पुतळा हलविण्याचा प्रसंग उद्भवल्यास त्याला विरोध न करता आवश्यक ती कार्यवाही स्व-खर्चाने करण्याबाबत पुतळा उभारणाऱ्या संस्थेचे शपथपत्र घेण्यात यावे.

११)पुतळयाची देखभाल, मांगल्य, पावित्र्य राखण्याची जबाबदारी स्वीकारत असल्याचे करारपत्र पुतळा उभारणाऱ्या संस्थेकडून घेण्यात यावे.

१२) पुतळा उभारण्याबाबत संबंधित पुतळा उभारणारी संस्था सर्व दृष्टीकोनातून सक्षम आहे काय याची छाननी जिल्हाधिकारी यांनी करुन घ्यावी.

१३) पुतळयासंबंधीचा खर्च पुतळा उभारणारी संस्था करील व शासनाकडे निधीची मागणी करणार नाही असे संस्थेचे वचनपत्र प्रस्तावासोबत घ्यावे.

१४) पूर्व परवानगीशिवाय पुतळा उभारल्यास संबंधित व्यक्ती / संस्था / समितीवर दंडात्मक कारवाई बरोबर कायदेशीर कारवाई करावी तसेच पुतळा हटविण्याची कारवाईही करण्यात यावी.

१५) पुतळयाला मान्यता देताना जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील समितीने महसूल व वन विभाग, गृह विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, ग्राम विकास व जलसंधारण विभाग यांनी निर्गमित केलेल्या शासन आदेश / परिपत्रक यातील सूचना लक्षात घ्याव्यात व त्यासंदर्भात आपले अभिप्राय स्पष्टपणे व्यक्त करावेत. जागेची मालकी ज्या संस्थेची / कार्यालयाची आहे त्या संस्थेची / कार्यालयाची सहमती प्राप्त करुन घ्यावी.

१६) पुतळा उभारण्यास अनुमती द्यावी किंवा कसे याबाबत स्पष्ट शिफारस कारण मिमांसेसह जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीने दिल्यानंतर जिल्हाधिकारी यांनी प्रस्तावास मान्यता द्यावी.

१७) मा.सर्वोच्या न्यायालयामध्ये I A No. १० of २०१२ in S.L.P. (C) No.८५१६ of २००६ व W.P. (C) नसल्याबाबत जिल्हाधिकारी तसेच त्यांच्या अध्यक्षतेखालील समितीने प्रमाणित करावे.

१८) पुतळा उभारण्यास मान्यता द्यावयाच्या आदेशामध्ये पुतळयाचे निश्चीत ठिकाण, जागेची मालकी, सर्वे नंबर, नियोजित ठिकाणी सर्व बाजूंच्या रस्त्याच्या मध्यापासूनचे अंतर , पुतळयाची देखभाल व दुरुस्ती, मांगल्य व पावित्रय राखण्याची जबाबदारी कोणाकडे सोपविली आहे याचा संपूर्ण तपशिल समाविष्ट करण्यात यावा.

१९) पुतळा उभारण्यास ना-हरकत प्रमाणपत्र देणाऱ्या प्राधिकाऱ्यांनी घालून दिलेल्या अटी व शर्तीचे पालन / पूर्तता केल्याबाबत जिल्हाधिकारी यांनी खात्री करावी.

२०) पुतळा उभारण्यासाठी पारित केलेले ठराव, ना हरकत प्रमाणपत्रे १ वर्षापेक्षा अधिक जूनी असू नयेत अशी तरतूद समाविष्ट करण्यात यावी. ना हरकत प्रमाणपत्र देणाऱ्या प्राधिकाऱ्याने त्यांच्याकडे प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर आवश्यक त्रृटींची पूर्तता करुन ६ महिन्याच्या आत ना हरकत प्रमाणपत्र द्यावे किंवा नाकारावे.

२१) राष्टपुरुष / थोर व्यक्ती यांचा पुतळा उभारण्यास मान्यता देताना त्याच राष्ट्रपुरुष / थोर व्यक्तीचा पुतळा त्या गावात वा शहरामध्ये २ कि.मी.त्रिज्येच्या परिसरात तत्पूर्वी उभारलेला नाही याची दक्षता घेण्यात यावी.

उल्हासनगर-३ येथील सम्राट अशोक येथील प्रवेशद्वार येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा उभारणेकरीता पुतळा उभारण्यासंबंधीच्या वरील मार्गदर्शक तत्वांची पूर्तता करणेस मा.महासभेची मान्यता मिळणे आवश्यक आहे.

तरी सदर प्रस्तावास मा.महासभेच्या मान्यते करीता प्रस्तावित.

महासभा ठराव क्र:०५ दिनांकः—१८/०६/२०२१

सुचकाचे नाव :—१) श्री. राजेंद्र चौधरी

२) श्री. भगवान भालेराव

३) श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— १) श्री. कलवंतसिंह सोहता

२) श्री. दिपक सिरवानी

३) श्री. अरुण आशान

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणेशासनाची आवश्यक मान्यता घेऊन**उल्हासनगर-३ सम्राट अशोक नगर येथील प्रवेशद्वार येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा उभारणेस मान्यता देत आहे.**

या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाचीसही / —

अनुमोदकाचीसही / —

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी

सर्वसाधारण महासभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ६ वाचुन दाखवितात.

——————————————————————————————————————

⇨ विषय क्र. ६ :— **उल्हासनगर-३ येथील शांतीनगर प्रवेशद्वार येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारुढ पुतळा उभारणेस .महासभेची मान्यता मिळणे.**

——————————————————————————————————————

काही सदस्य :—पास—पास......

महापौर तथा पीठासीन अधिकारी :—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑विषय क्र. ६ :—**उल्हासनगर-३ येथील शांतीनगर प्रवेशद्वार येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचाअश्वारुढ पुतळा उभारणेस .महासभेची मान्यता मिळणे.**

प्रस्तावना

उल्हासनगर-३ शांतीनगर प्रवेशद्वार येथे छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारुढ पुतळा उभारणेकरीता विविध स्तरांवरुन लोकप्रतिनिधी यांची मागणी होत आहे.

समाजोपयोगी कामांचाआदर्श समाजाच्या किंबहुना शालेय विद्यार्थी, महाविद्यालयीन युवक-युवतींच्या समोर राहावा, यासाठी महापुरुषांचे पुतळे उभे केले जातात. योग्य मार्गदर्शन मिळत नसल्याने आजचा युवक भरकटत चालला आहे. त्यामुळे अशा युवकांना आंबेडकर – शाहु – फुले, छत्रपती शिवाजी महाराज यांच्यासारख्या महापुरुषांच्या विचारांची गरज आहे. परंतू , हल्ली त्याकडे कुणालाच लक्ष देण्यास वेळ नसल्याने त्याचे परिणाम देशासह समाजालाही भोगावे लागत आहेत म्हणूनएखाद्या समाजाची मने जिंकण्यासाठी जयंती पुण्यतीथी साजरे करण्यापुरते पुतळे नको, तर सोबतच त्यांच्या विचारांचाही जागर होणे आवश्यक आहे. महापुरुषांच्या समाजपयोगी कामांचा आदर्श समोर रहावा यासाठी महापुरुषांचे पुतळे उभारले जातात. त्यांनी दाखविलेल्या मार्गावरुन जिवनाची वाट चोखाळावी अशी प्रेरणा यातुन युवकांना मिळते. तसेच शहराच्या सौंदर्यीकरणात व दर्जात भर पडते.

छत्रपती शिवाजी महाराज म्हणजे महाराष्ट्राचे भूषण. केवळ महाराष्ट्रच नव्हे तर जगभरातील शिवप्रेमींच्या मनामनात ते आहेत. त्यामुळे जगभरात अनेक ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांचे अश्वारूढ पुतळे उभारलेले दिसतात. ते समाजाला ऊर्जा आणि प्रेरणा देण्याचे कार्य करतात.

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात छत्रपती शिवाजी महाराजांचा एकही अश्वारुढ पुतळा नाही. राष्ट्रपुरुष आणि थोर व्यक्तींचा पुतळा उभारण्यासाठी शासन मान्यता मिळवण्याकरिता शासनाकडे प्रस्ताव सादर करावा लागतो परंतू तत्पुर्वी पुतळा उभारणेकरीता शासन निर्णय क्र.पुतळा-३११६/प्र.क्र.३०८/२९ दिनांक २ मे,२०१७ अन्वये विद्यमान

मार्गदर्शक तत्वे विहित केली आहेत. या २१ मार्गदर्शक तत्वांनुसार प्रस्तावासोबत शासनाच्या विविध विभागाचे मान्यता पत्रे, ठराव, ना-हरकत प्रमाणपत्रे इ.सोबत परिपूर्ण प्रस्ताव छाननीकरीता मा.जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या पुतळा समितीपुढे पाठविणे आवश्यक आहेत. यासंदर्भात खालील २१ मार्गदर्शक तत्वे विहित करण्यात आली आहेत.

## पुतळा उभारण्यासंबंधीची मार्गदर्शक तत्वे

१) कोणतीही व्यक्ती, संघटना, संस्था, शासकीय, निमशासकीय संस्थेच्या तसेच खाजगी मालकीच्या जागेवर जिल्हाधिकारी यांच्या परवानगीशिवाय पुतळा उभा करु शकणार नाही.

२) पुतळा उभारण्याच्या जागेच्या मालकी हक्काबाबत वाद नसावा. ती जागा अनधिकृत किंवा अधिक्रमित केलेली नसावी. जागेच्या मालकी हक्काबाबत संबिंत पुतळा बसविणाऱ्या व्यक्ती/ संस्था/ कार्यालयाने कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे. पुतळा उभारलेल्या जागेचा वापर अन्य प्रयोजनासाठी करण्यास पुतळा उभारणाऱ्या व्यक्ती/संस्था/ कार्यालयास हक्क राहणार नाही.

३) पुतळा बसविणाऱ्या व्यक्ती/ संस्था/ कार्यालय / समितीने पुतळयाच्या चबुतऱ्याचे मोजमापे, आराखडा, पुतळयाचा साईट प्लान, पुतळा ज्या धातु/ साहित्यापासून तयार करण्यात येणार आहे, त्या धातू/ साहित्याचे प्रमाण, पुतळयाचे वजन, उंची व रंग याचा तपशिल पुतळयाच्या रेखाचित्रासोबत मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, महाराष्ट्र राज्य यांना किंवा त्यांनी अधिकार प्रदान केलेल्या विभागीय कार्यालयास सादर करुन मान्यता घेतलेले पत्र प्रस्तावासोबत सादर करावे.

४) पुतळा उभारणाऱ्या संस्थेने पुतळ्याच्या क्ले मॉडेलला कला संचालनालयाची मान्यता घेऊन ब्रांझ वा अन्य धातू, फायबर वा इतर साहित्यापासून पुतळा तयार करावा आणि मान्यता घेतलेल्या मॉडेल प्रमाणेच पुतळा उभारण्याची दक्षता घ्यावी.

५) पुतळा उभारण्यामुळे गाव / शहर सौंदर्यात बाधा येणार नसल्याबाबत संबंधित संस्था / कार्यालय तसेच स्थानिक स्वराज्य संस्था यांनी दक्षता घेण्यात यावी.

६) पुतळा उभारल्यामुळे भविष्यात कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही, स्थानिक वाद किंवा जातीय तणाव वाढणार नाही याबाबत सविस्तर चौकशी करून संबंधित पोलीस कार्यालय प्रमुखाने ना-हरकत प्रमाणपत्र प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे. तसेच पुतळा उभारण्यासाठी अल्पसंख्यांक व स्थानिक लोकांचा विरोध नसल्याबाबत स्पष्टपणे उल्लेख असलेले ना-हरकत प्रमाणपत्र घेण्यात यावे.

७) शासकीय, निमशासकीय आणि स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्यालय परिसरात पुतळा उभारण्यासाठी संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र प्रस्तावासोबत असावे.

८) स्थानिक स्वराज्य संस्था यांनी पुतळा उभारण्याबाबत आवश्यक तो ठराव करुन प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे. पुतळा उभारण्याची जागा स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मालकीची नाही अशा प्रकरणी संबंधित व्यक्ती/ संस्था/ कार्यालय यांनी पारित केलेला ठराव तसेच स्थानिक स्वराज्य संस्थेचे ना हरकत प्रमाणपत्र घेण्यात यावे.

९) पुतळा उभारण्यामुळे वाहतूकीस व रहदारीस अडथळा निर्माण होणार नसल्याबाबत स्थानिक पोलीस विभागाचे व संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेचे ना हरकत प्रमाणपत्र घेऊन प्रस्तावासोबत जोडावे.

१०) भविष्यात रस्ता रुंदीकरण अथवा अन्य विकास कामांमुळे पुतळा हलविण्याचा प्रसंग उद्भवल्यास त्याला विरोध न करता आवश्यक ती कार्यवाही स्व-खर्चाने करण्याबाबत पुतळा उभारणाऱ्या संस्थेचे शपथपत्र घेण्यात यावे.

११)पुतळ्याची देखभाल, मांगल्य, पावित्र्य राखण्याची जबाबदारी स्वीकारत असल्याचे करारपत्र पुतळा उभारणाऱ्या संस्थेकडून घेण्यात यावे.

१२) पुतळा उभारण्याबाबत संबंधित पुतळा उभारणारी संस्था सर्व दृष्टीकोनातून सक्षम आहे काय याची छाननी जिल्हाधिकारी यांनी करुन घ्यावी.

१३) पुतळयासंबंधीचा खर्च पुतळा उभारणारी संस्था करील व शासनाकडे निधीची मागणी करणार नाही असे संस्थेचे वचनपत्र प्रस्तावासोबत घ्यावे.

१४) पूर्व परवानगीशिवाय पुतळा उभारल्यास संबंधित व्यक्ती / संस्था / समितीवर दंडात्मक कारवाई बरोबर कायदेशीर कारवाई करावी तसेच पुतळा हटविण्याची कारवाईही करण्यात यावी.

१५) पुतळयाला मान्यता देताना जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील समितीने महसूल व वन विभाग, गृह विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, ग्राम विकास व जलसंधारण विभाग यांनी निर्गमित केलेल्या शासन आदेश / परिपत्रक यातील सूचना लक्षात घ्याव्यात व त्यासंदर्भात आपले अभिप्राय स्पष्टपणे व्यक्त करावेत. जागेची मालकी ज्या संस्थेची / कार्यालयाची आहे त्या संस्थेची / कार्यालयाची सहमती प्राप्त करुन घ्यावी.

१६) पुतळा उभारण्यास अनुमती द्यावी किंवा कसे याबाबत स्पष्ट शिफारस कारण मिमांसेसह जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीने दिल्यानंतर जिल्हाधिकारी यांनी प्रस्तावास मान्यता द्यावी.

१७) मा.सर्वोच्या न्यायालयामध्ये I A No. १० of २०१२ in S.L.P. (C) No.८५१६ of २००६ व W.P. (C) नसल्याबाबत जिल्हाधिकारी तसेच त्यांच्या अध्यक्षतेखालील समितीने प्रमाणित करावे.

१८) पुतळा उभारण्यास मान्यता द्यावयाच्या आदेशामध्ये पुतळयाचे निश्चीत ठिकाण, जागेची मालकी, सर्वे नंबर, नियोजित ठिकाणी सर्व बाजूंच्या रस्त्याच्या मध्यापासूनचे अंतर , पुतळ्याची देखभाल व दुरुस्ती, मांगल्य व पावित्रय राखण्याची जबाबदारी कोणाकडे सोपविली आहे याचा संपूर्ण तपशिल समाविष्ट करण्यात यावा.

१९) पुतळा उभारण्यास ना-हरकत प्रमाणपत्र देणाऱ्या प्राधिकाऱ्यांनी घालून दिलेल्या अटी व शर्तीचे पालन / पूर्तता केल्याबाबत जिल्हाधिकारी यांनी खात्री करावी.

२०) पुतळा उभारण्यासाठी पारित केलेले ठराव, ना हरकत प्रमाणपत्रे १ वर्षापेक्षा अधिक जूनी असू नयेत अशी तरतूद समाविष्ट करण्यात यावी. ना हरकत प्रमाणपत्र देणाऱ्या प्राधिकाऱ्याने त्यांच्याकडे प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर आवश्यक त्रूटींची पूर्तता करुन ६ महिन्याच्या आत ना हरकत प्रमाणपत्र द्यावे किंवा नाकारावे.

२१) राष्ट्रपुरुष / थोर व्यक्ती यांचा पुतळा उभारण्यास मान्यता देताना त्याच राष्ट्रपुरुष / थोर व्यक्तीचा पुतळा त्या गावात वा शहरामध्ये २ कि.मी.त्रिज्येच्या परिसरात तत्पूर्वी उभारलेला नाही याची दक्षता घेण्यात यावी.

उल्हासनगर-३ येथील शांतीनगर प्रवेशद्वार येथेछत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारुढ पुतळा उभारणेकरीता पुतळा उभारण्यासंबंधीच्या वरील मार्गदर्शक तत्वांची पूर्तता करणेस मा.महासभेची मान्यता मिळणे आवश्यक आहे. तरी सदर प्रस्तावास मा.महासभेच्या मान्यतेकरीता प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र:०६</u> <u>दिनांक:—१८/०६/२०२१</u>

सुचकाचे नाव :—१) श्री. जमनादास पुरस्वानी
२) श्री. राजेंद्र चौधरी
३) श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :—१) श्री. दिपक सिरवानी
२) श्री. कलवंतसिंह सोहता
३) श्री. शंकर लुंड
४) श्री. अरुण आशान

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणेशासनाची आवश्यक मान्यता घेऊन**उल्हासनगर-३ येथील शांतीनगर प्रवेशद्वार येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचाअश्वारुढ पुतळा उभारणेस मान्यता देत आहे.**

**<u>तसेच</u>**

**उल्हासनगर -५ येथील कैलाश कॉलनी चौकात सिंधी समाजाचे महापुरुष झुलेलाल साईचा पुर्णाकृती पुतळा उभारणेस मान्यता देत आहे.**

**या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.**

सुचकाचीसही/—

अनुमोदकाचीसही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ७ वाचुन दाखवितात.

————————————————————————————————————————

⇨ विषय क्र. ७:— उल्हासनगर महानगरपालिका मुख्यालयातील पदाधिका—यांना दयावयाच्या दालनांच्या वाटपाचे धोरण निश्चित होणेबाबत.

————————————————————————————————————————

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>**मा. महापौरजी, मला या विषयावर बोलायचे आहे. दालनाच्या विषयाबाबत मी बोलू इच्छितो की, मा. महापौरजी, मा. उप महापौरजी, मा. आयुक्त साहेब, हा जो दालनाचा विषय आहे. आपण बघणार की, भारतीय जनता पार्टीचे गटनेता यांचे जे दालन आहे, तिथे माप लिहील नाही आणि विरोधीपक्ष नेता यांचे जे दालन आहे. तो यादीमध्ये आहेच नाही. मा. पुर्व आयुक्त यांनी विरोधी पक्ष नेत्याचे दालन निश्चित केले होते. परंतु आज पर्यंत ते दालन उपल्ब्ध केले नाही. मा. महापौरजी मी आपल्याला निवेदन करतो की, विरोधी पक्ष नेता यांना एक दालन उपलब्ध करण्यात यावे.

**<u>सदस्य, श्री. किशोर वनवारी:-</u>** आयुक्त साहेबांना सांगितले होत की, विरोधी पक्ष नेत्याचे दालन बनवा, होय होय म्हणतात आणि करीत नाहीत.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-</u>** जमनुजी...

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>**चौधरी साहेबपुर्व आयुक्तांनी विरोधी पक्ष नेत्याचे दालन येथे डिक्कलेर केले आहे, परंतु अजून पर्यंत काम चालू झाले नाही. सभागृह नेत्याचे दालन वेगळा आहे आणि विरोधी पक्ष नेत्याचे दालन वेगळे आहे. शिवसेनेच्या गट नेत्याचे दालन आहे, भारतीय जनता पार्टीच्या गट नेत्याचे दालन आहे. विरोधी पक्ष नेत्याचे दालन नाही. तर विरोधी पक्ष नेत्यांना दालन मिळाले पाहीजे.

**<u>सदस्य, श्री. अरुण आशान:-</u>** मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, आवाज येत आहे का? मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, उल्हासनगर महानगपालिकेत ब-याच दिवसापासून दालन नाही, किंवा दालन आहेत पण एकत्रित केलेले आहेत. या दालनाच्या वाटपा बददल या महापालिकेत विरोध झालेला आहे. महापौर, उप महापौर, स्थायी समिती सभापती आणि सभागृह नेता, विरोधी पक्ष नेता असे असले पाहीजेत आणि त्या दालनांना क्रमांक पाहीजे. ऐकायला येते का? महापौर मॅडम...

**<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:-</u>** ऐकायला बरोबर येत नाही.

**<u>सदस्य, श्री. अरुण आशान:-</u>** ऐकायला येते का?

**<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:-</u>** ऐकायला बरोबर येत नाही.

**<u>सदस्य, श्री. अरुण आशान:-</u>**महापालिकेने...

**<u>सदस्या, श्रीम. मिना सोनेजी:-</u>** ऐकायल बिलकुल येत नाही.

**<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:-</u>** मिना मॅडम बोला.

**<u>सदस्य, श्री. अरुण आशान:-</u>**मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, दालनाच्या बाबतीमध्ये नेहमी तक्रारी येतात. पाच महत्वाचे दालन सोडल्या नंतर बाकींच्या सदस्यांच्या दालनाला क्रमांक असला पाहीजे अशी माझी विनंती आहे. मुळात या उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये छोटे छोटे पक्ष आहेत आणि प्रत्येक पक्षाच्या गट नेत्यांला दालन असणे आवश्यक आहे. परंतु दालन एक असेल आणि सदस्य जास्त असतील हे आपण पाच समजू शकतो. परंतु एक पदाला एक पदाधिकारी, दोन पद धारण करणार असेल आणि ते दोन दोन दालन वापरत असेल, तर ही बाब चुकीची आहे. खरे म्हणटले तर जे पद उच्च् पद आहे, त्या पदाचे दालन हे नेहमी तो पदाधिकारी धारण करीत असतो. उदा. एक छोटे पद असेल, एक मोठे पद असेल, छोटया पदाचे दालन गट नेता वरिष्ठ पदाचा सभापती असेल किंवा वरिष्ठ पद त्यांनी धारण केले असेल तर ते दालन त्यांनी दोन्ही पदासाठी दालन वापरु नये. कारण एक सदस्य, काही सदस्यांनी दोन दोन दालने आपल्या ताब्यांत ठेवलेली आहेत. तरी मला असे वाटते की, शासनाच्या धोरणा प्रमाणे, महानगरपालिकेने या अगोदर केलेल्या धोरणा प्रमाणे सगळयांना दालनाचे वाटप हे नियमानुसार आणि त्या त्या चौ.फुटावर झाले पाहीजे. तर असे न होता दालनाची नेहमी आदला बदल होते. त्यामुळे दालनाला क्रमांक असले पाहीजे. जेनेकरुन दालनांची ओळख क्रमांकानुसार त्या क्रमाने असले पाहीजे. दालनाचे धोरण निश्चित करतांना आपण बघितले की, श्री. जमनादास पुरस्वानी म्हणाले आम्हांला दालन नाही. गट नेत्यांचे दालन नाही, परंतु काही काही दालने महापालिकेला न सांगता, काही दालने एकत्र करण्यात आलेली आहेत. तर काही दालनांमध्ये फेर बददल करण्यात आलेला आहे. तर तो फेर बददल केला जाऊ नये. मला असे वाटते की, दालनामध्ये फेर बददल करण्याचा अधिकार जो आहे, हा महानगरपालिकेला दिलेला आहे की, कुठले दालल, कुठे असले पाहीजे?

परंतु दालनाचे वाटप झाल्यानंतर सुध्दा इच्छेनुसार आणि मर्जीनुसार दालन घेण्याचे चालू असते. त्यामुळे एखादे दालन प्रशासनाकडून दिल्या नंतर सुध्दा ते दालन पुन्हा पुन्हा घेण्या मागे त्या दालनाच्या मागे काही तरी राजकीय असते. परंतु ज्या पक्षाचासदस्य निवडून आला आहे किंवा जो पक्ष या महानगरपालिकेत आहे, पक्षाच्यासाठी दालन असणे आवश्यक आहे. तरी मला असे वाटते की, दालनाबाबत आता पर्यंत ब-याच बैठका झाल्या, परंतु हा विषय पुन्हा महासभेला चर्चेला आणला आहे. त्यामुळे या महासभेने मागील दालनाच्या धोरणा प्रमाणे धोरण निश्चित करुन, हे दालनाचे वाटप केले पाहीजे, असे माझे प्रमाणीक मत आहे.

**सदस्या, श्रीम. मिना सोनेजी:-** महापौर मॅडम मला पण बोलायचे आहे.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** महापौर मॅडम...

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:-** मिना मॅडमला बोलू दया, त्या केव्हापासून बोलण्याच्या तयारीत आहेत.

**सदस्या, श्रीम. मिना सोनेजी:-** आम्हांला बसण्यासाठी कोणतेही दालन नाही.आम्ही नगरसेविका आम्हांला बसण्यासाठी कोणतेही दालन नाही. सर्व पार्टीसाठी आहेत, परंतु लेडीजला बसण्यासाठी खुप गरजेचे आहे. कृपया हे लक्षात असावे.

**सदस्या, श्रीम. शुभांगी बेहनवाल:-** मा. महापौर, आयुक्त साहेब, मी शुभांगी बेहनवाल बोलत आहे, मा. महापौर मागे मार्चमध्ये माझी शिक्षण समिती सभापती म्हणून निवड झाली होती. मला कॅबिन मिळाली पण नंतर अचानक त्याला कुलुप लावण्यात आले. याचे कारण आपण सांगू शकता का? कारण असे झाले आहे की एका लेडीजला कॅबिन मिळून सुध्दा नंतर त्या कॅबिन मधून नावाची पाटी काढून तिथे कुलुप लावण्यात येते. हे अयोग्य आहे, तसे मिना मॅडमने सांगितले की, महानगरपालित लेडीजला कॅबिन पाहीजे आणि छोटेसे टॉलेट मिळाले तर योग्य होईल आणि त्यांना पद म्हणून कॅबिन मिळाली पाहीजे. एक व्यक्ती दोन दोन कॅबिन घेऊ शकतो, हे चुकीचे आहे. तरी नियमानुसार कारवाई करावी, ही विनंती.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** मा. महापौर मॅडम,....

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:-** यांचे बोलणे झाल्यावर त्याच्या नंतर बोला.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-**आपली बहीण जे बोलत आहे, तेव्हा त्यांना दालन मिळाले पाहीजे. दालनाच्या बाबतीत आपले जे राजकारण चालू आहे, ते आपण थांबवले पाहीजे. मला असे वाटते की, जेव्हा गट नेता म्हणून भगवान भालेराव गटनेता आहेत आणि उप महापौर पण आहेत, त्यांची मिसेस महापालिकेच्या सदस्या आहेत, त्यांना त्यांनी गटनेता म्हणून नियुक्त केलेले आहे. त्या अनुषंगाने रिपब्लिकण पार्टी हे पक्षाचे कार्यकारी आहेत, त्यांचे दालन आहे, तिथे सर्व पक्षाचे लोक येत असतात आणि पक्षाचे लोक येण्यासाठी एक दालन प्रत्येक पक्षाला असतो. शिवसेना पक्षाला गटनेत्याचा वेगळे दालन आहे. प्रमोद टालेंना वेगळे दालन आहे. त्यांना पक्षाचे दालन असूनही वेगळे दालन आहे. तरी राजकीय हेतुने काम करणे योग्य नसावे ही माझी विनंती आहे आणि माझे मित्र श्री. अरुण आशान यांनी म्हणटले की, लोक आपआपल्या दालनाची दुरुस्ती करुन घेतात आणि फेर बददल करुन घेतात. ते सर्वच करुन घेतात. श्री. अरुण आशान त्यांची आई महापौर झाल्या तर त्यांनी त्यांच्या ऑफिसचे सौदर्यकरण करण्यासाठी १५ लाखाचे काम केले आहे. तर त्याला विरोध नाही. सगळे लोक करतात, बददल करतात. वास्तुच्या प्रमाणे करतात. त्यावर भाष्य करणे मला असे वाटते की, हे योग्य नाही. प्रत्येकाला जेव्हा तो उच्च पदावर निवडून येतो. त्यांना असे वाटते की. माझे जे दालन आहे, त्याचे शुशोभीकरण झाले पाहीजे. त्याच्यात काही गैर नाही. तरी हा विषय महासभेमध्ये आणणे म्हणजे आपले संबंध खराब झालेले आहेत. त्यावरुन आणला असेल तर याला दुदैव म्हणावे कारण याच्या पेक्षा मोठे दुदैव असूच शकत नाही.

**सदस्य, श्री. अरुण आशान:-** मा. महापौरजी...

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** माझे बोलणे अजून पुर्ण झालेले नाहीत. अरुण आशान साहेब बोलत होते त्यावेळी मी एक शब्द देखील बोललो नाही. माझे बोलणे पुर्ण झाल्यावर बोला माझी अशी विनंती आहे. भारतीय जनता पार्टीला एक दालन उपलब्ध करुन दयायचे ते दिले नाही. ही पध्दत चुकीची आहे. आमचा पुर्णपणे विरोध आहे. अरुणभाई आपला विषय आणलेला आहे, तो राजकीय म्हणून आणलेला आहे. त्यावेळी भालेराव हे तुमच्या सोबत होते, त्या वेळी हा विषय तुम्हांला कळला नाही. आता पर्यंत माझी बहीण श्रीम. शुभांगी बेहनवालला टॉलेटवाला शौचालयाची सोय असलेले दालन मिळाले पाहीजे. या मताचे आम्ही आहोत, त्यांना कधी पण दालन ट्रान्फर करुन दया. त्याचा आम्हांला विरोध नाही, पण आपण दुस-याची दालने हिसकावून जर दुस-याला देणार असतील, तर हे कदाचित बरोबर नाही.

या वेळी काही सदस्य एकत्रित बोलत असल्यामुळे कोण काय बोलत होते ते समजून आले नाही.

**सदस्य, श्री. शंकर लुंड:-** जिथे स्कुल बोर्ड आहे, तिथे दालन बनवून दया.

**सदस्य, श्री. अरुण आशान:-** दालन वाटपा बाबतचे धोरण निश्चित करणे हा विषय आहे, तुम्ही हा विषय वाचा.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** दालनाचा विषय नाही आपल्याकडे खुप, दालन आपण मॅडमला देवू शकतो. परंतु दालनाच्या राजकारणाचा आम्हांला विरोध आहे.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:-** प्रदिपजी आता राजकारण नाही, आपल्याला धोरण ठरवायचे आहे.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-**प्रदिपजी जेव्हा भालेराव साहेब तुमच्या बरोबर होते, तेव्हा धोरण आले नाही.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-**धोरण ठरवा.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-**भालेराव साहेब, एक दिड वर्षापासून उप महापौर आहेत, त्यांच्याकडे दालन आहे. तेव्हा का धोरण आले नाही आणि जेव्हा ते भारतीय जनता पक्षामध्ये आपल्याला सोडून येतात तेव्हा तुम्हांला धोरणाची आठवण येते.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-** प्रदिपजी तुम्ही विषय समजत नाहीत आणि राजकारण करीत आहेत. धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी प्रशासनाने आणलेला आहे. हा विषय त्यावेळचे आयुक्त, देशमुख साहेब, यांनी अजेंडावर आणलेला आहे. याच्यावर निर्णय काय घ्यायचा....

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-**जेव्हा तुमच्या सोयीचे होते तेव्हा आणायचे आणि तो पर्यंत दाबून ठेवायचे

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-** कोणी दाबून ठेवला, मागच्या वेळेलाच हा विषय सभेमध्ये आला होता.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-**दाबून ठेवला होता.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-** आता निर्णय घ्या. काय निर्णय घ्यायचा तो घ्या.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-**तुम्ही वेळवर आणत आहेत, आम्ही असे मान्य करणार नाहीत...

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** सात वाजले आहेत, सात.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** सदरची महासभा महापौरांच्या आदेशाने स्थगीत करण्यात येत आहे.

---

स्थगीत प्रस्ताव:—

सुचकाचे नाव:— श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव:— श्री. कलवंतसिंह सोहता

दिनांक १८/०६/२०२१ रोजी सायंकाळी ४.०० वाजता सुरू केलेली सभा काही कारणास्तव स्थगीत करण्यास प्रस्तावित.

महासभा क्र. ६अ                                        दिनांक: १८/०६/२०२१

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता दिनांक १८/०६/२०२१ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित केलेल्या सभेचे कामकाज अनिश्चित कालावधीपर्यंत स्थगित करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर/पीठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव:—कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सायंकाळी ७.००वाजता महापौर श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(अशोक नाईकवाडे)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:- १७-०९-२०२१

**उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. १७-०९-२०२१ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.**

१ब

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शुक्रवार दिनांक १८/०६/२०२१ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेचे कामकाज स्थगीत केल्याने सदरची सभा शुक्रवार दिनांक १७/०९/२०२१ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित करण्यात आली. सदर सभेत महापौर, श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ् होत्या व खालील दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते/होत्या. मा. अवर सचिव, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग यांचेकडील शासनाचे क्रमांक कोरोना- २०२०/प्र.क्र. ७६ / नवि-१४, दिनांक २८ जुन २०२१ पत्रान्वये ऑनलाईन ॲपद्वारे सभा आयोजित केली होती.

१.श्रीमती. लिलाबाई लक्ष्मण आशान – महापौर

२. श्री. भगवान भालेराव- उप महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती अचर्ना गोकुळ करणकाळे | ३६ | श्री. जीवन चंद्रभान इदनानी |
| ४ | श्री. मंगल बालकृष्ण वाघे | ३७ | श्रीमती सविता प्रविण तोरणे (रगडे) |
| ५ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ३८ | श्री. गजानन प्रल्हाद शेळके |
| ६ | श्रीमती मिनाकौर अजितसिंग लबाना | ३९ | श्रीमती ज्योती प्रकाश बठिजा |
| ७ | श्रीमती पंचम उमेश कालानी | ४० | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी |
| ८ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | ४१ | श्री. सुमित सागर सोनकांबळे |
| ९ | श्रीमती आशा नाना बिराडे | ४२ | श्रीमती ज्योस्ना सुरेश जाधव |
| १० | श्री. रविंद्र दशरथ बागुल | ४३ | श्रीमती ज्योती शामराव माने |
| ११ | श्रीमती चरणजितकौर राजेंद्रसिंह भुल्लर | ४४ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| १२ | श्री. राजेंद्रसिंह विरसिंग भुल्लर | ४५ | श्री. चंद्रशेखर केशव यादव |
| १३ | श्री. स्वप्नील मिलींद बागुल | ४६ | श्रीमती संगिता नितीन सपकाळे |
| १४ | श्रीमती सुरेखा हनुमंत आव्हाड | ४७ | श्रीमती शीतल चंद्रकांत कदम |
| १५ | श्रीमती अंजना अंकुश म्हस्के | ४८ | श्रीमती वसुधा धनंजय बोडारे |
| १६ | श्री. कलवंतसिंग गुरुदेव सोहता | ४९ | श्री. धनंजय बाबुराव बोडारे |
| १७ | श्री. राजू किशनचंद जग्यासी | ५० | श्रीमती दिप्ती नविन दुधानी |
| १८ | श्रीमती गीता लालचंद साधनानी | ५१ | श्रीमती ज्योती रमेश चैनानी |

| | | | |
|---|---|---|---|
| १९ | डॉ. प्रकाश घनश्यामदास नाथानी | ५२ | श्रीमती कंचन अमर लुंड |
| २० | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | ५३ | श्री. शंकर गोविंदराम लुंड |
| २१ | श्रीमती सरोजिनी टेकचंदानी | ५४ | श्रीमती सुनिता बाबुराव बगाडे |
| २२ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | ५५ | श्री. भारत रामचंद राजवानी (गंगोत्री) |
| २३ | श्री. महेश पहिलराज सुखरामनी | ५६ | श्रीमती अंजली चंद्रकांत साळवे |
| २४ | श्रीमती शुभांगीनी निकम | ५७ | श्री. प्रमोद नामदेव टाले |
| २५ | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग | ५८ | श्रीमती कविता सुधिर बागुल |
| २६ | श्री. राजेश नानिकराम वदारिया | ५९ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २७ | श्रीमती डिम्पल नरेंद्र ठाकुर (कुमारी) | ६० | श्री. किशोर नारायणदास वनवारी |
| २८ | श्रीमती दिपा नारायण पंजाबी | ६१ | श्रीमती मिना चंद्रगुप्त सोनेजी |
| २९ | श्री. अजित प्रभुनाथ गुप्ता | ६२ | श्री. विकास परशुराम पाटील |
| ३० | श्रीमती पुष्पा नाना बागुल | ६३ | श्री. मनोज दिलीप सयानी |
| ३१ | श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी | ६४ | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |
| ३२ | श्रीमती शुभांगी मनोहर बेहनवाल | ६५ | श्री. सुरेंद्र बाळकृष्ण सावंत |
| ३३ | श्री. राजेंद्र शांताराम चौधरी | ६६ | श्री. अरुण लक्ष्मण आशान |
| ३४ | श्री. रवि किशनचंद जग्यासी | ६७ | श्रीमती आशा जीवन इदनानी |
| ३५ | श्रीमती कविता लाल पंजाबी | | |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते / होत्या.

१ .श्रीमती जयश्री ज्ञानेश्वर पाटील, २. श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड, ३. श्रीमती मिना कुमार आयलानी, ४. श्रीमती अपेक्षा भगवान भालेराव, ५. श्रीमती छाया सुजित चक्रवर्ती उर्फ अडसुळ, ६. श्रीमती ज्योती प्रशांत पाटील, ७. श्रीमती इंदिरा जमनादास उदासी, ८. श्रीमती मिताली राजेश चान्पुर, ९. श्रीमती सुमन राजेश सचदेव, १०. श्री. सतरामदास पुतनदास जेसवानी, ११. श्रीमती मिनाक्षी रवी पाटील, १२. श्री. विजय चाहू पाटील, १३. श्रीमती कविता सुरेश गायकवाड, १४. श्री. आकाश परशुराम पाटील.

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

१. डॉ. राजा दयानिधी, आयुक्त

२. श्रीमती करुणा जुईकर, अतिरिक्त आयुक्त

३. श्रीम. प्राजक्ता कुलकणी, महापालिका सचिव

४. श्री. मदन सोंडे, उप आयुक्त (अं.बा.नि.वि.)

५.श्री. अशोक नाईकवाडे, उप आयुक्त (मुख्यालय)

६. श्रीम. प्रियांका राजपूत, उप आयुक्त (कर विभाग)

७. डॉ. शुभाष जाधव, उप आयुक्त, (सा.आ.वि.)

८. श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखाधिकारी

९. श्री. मंगेश गावडे, मुख्य लेखा परिक्षक

१०. डॉ. दिपक पगारे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी

११. श्री. महेश सितलानी, शहर अभियंता

१२. श्री. के.जे. रहेजा, कार्यकारी अभियंता (पा.पु.वि.)

१३. श्री. तुषार सोनवणे, सहा. आयुक्त्

१४. श्री. अजित गवारी, सहा. आयुक्त

१५. श्री. हनुमंत खरात, उप अभियंता (विद्युत विभाग)

१६. श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी

१७. श्री. मनिष हिवरे, सार्वजनिक आरोग्य अधिकारी

१८. श्रीम. श्रध्दा सपकाळे, सिस्टम ॲनेलेसिस मॅनेजर

१९. श्री. संतोष लोणे, कनिष्ठ अभियंता

२०. श्री. जेठा ताराचंद, उप कर निर्धारक व संकलक

२१. श्री.विनोद केणे, बाजार निरीक्षक

२२. श्री. राजेश घनघाव, मालमत्ता व्यवस्थापक

२३. श्री. एकनाथ पवार, मुख्य स्वच्छता निरीक्षक

२४. श्री. अनिल खतुरानी, कर निरीक्षक

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्रीम. नर्गीस खान, लिपीक
२. श्री. बाळू भांगरे, लिपीक
३. श्रीम. विद्या आढळ, लिपीक

दुपारी३. १५ वाजता वंदे मातरम म्हणून सभेची सुरुवात करण्यात आली.

**महापालिका सचिव**:-ही स्थगीत सभा आहे, दिनांक १८/६/२०२१ रोजीची सभा आहे, विषय क्र. ७ पासून सुरुवात होणार आहे.

महापालिका सचिवः— विषय क्र. ७ वाचुन दाखवितात

———————————————————————————————————————

⇨ विषय क्र. ७ :—उल्हासनगर महानगरपालिका मुख्यालयातील पदाधिका—यांना दयावयाच्या दालनांच्या वाटपाचे धोरण निश्चित होणेबाबत.

———————————————————————————————————————

**सदस्य, श्री. अरुण आशान:-**मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब या संदर्भात मा. महापौरांच्या दालनात बैठक झाली होती आणि त्या बैठकीच्या अनुषंगाने दालनाचे वाटप करण्याचे धोरण निश्चित करुन दालन देण्यात आलेले होते त्यामुळे आता हा विषय राहिलेलाच नाही. त्यामुळे मला असे वाटते आता हा विषय न घेता, पुढचा विषय घ्यावा, सचिव मॅडम. दालनाचे वाटप करण्या संदर्भात मा. महापौरांच्या दालनामध्ये बैठक झाली होती त्या बैठकीच्या अनुषंगाने दालनाचे वाटप करण्याचे धोरण निश्चित करुन दालन देण्यात आले होते, त्यामुळे हा विषय आता राहिलेलाच नाही. मा. महापौरजी, उप महापौरजी दुसरा विषय घेण्यात यावा. हा विषय संपुष्टात येत आहे.

महापौर तथा पिठासिन अधिकारी:- सदरचा विषय संपुष्टात येत आहे.

महापालिका सचिव:—ठिक आहे हा विषय संपुष्टात येत आहे.

महापालिका सचिव:— विषय क्र. ८ वाचुन दाखवितात

———————————————————————————————————————————

⇨ विषय क्र. ८:—मा. महासभा ठराव क्र.७९, दिनांक २०/०३/२०१५ अन्वये उल्हासनगर महानगरपालिकाहददीत महापालिकेने निश्चित करून दिलेल्या ठिकाणीहोर्डीग्ज व पथदिवे याद्वारे जाहिरात फलकप्रसिध्द करणेकामी अभिकर्ता नियुक्तकरण्यासाठी निविदा कार्यवाहीकरीता दिलेल्या मान्यतेनुसार निविदेस प्रतिसाद मिळत नसल्याची बाब मा. महासभेच्या निदर्शनास आणुन देवून सदरबाबत धोरणात्मक निर्णय होणेबाबत.

———————————————————————————————————————————

**सदस्य, श्री. अरुण आशान:-**मा. महापौरजी,

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-**याविषयावर सविस्तर माहिती कोण देणार आहे अधिकारी? कुणाचा विभाग आहे. मालमत्ता विभाग आहे ना.

**सदस्य, श्री.मनोज सयानी:-** नगरसेवक राजेश वानखेडेजी यांना ॲड करा. सचिव मॅडम

महापालिका सचिव:—सर आपण मा. महापौरांना कोणी पण कृपया विनंती करा. येथे मा. पिठासीन अधिकारी हे जे म्हणणार तेच होणार.

**सदस्य, श्री.मनोज सयानी:-**हि जबाबदारी आपली आहे सचिव मॅडम

महापालिका सचिव:—ॲड केले आहे ना सर.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-**नाही होत आहेत राजेशजी का?

महापालिका सचिव:—वानखेडे सर ॲड झाले का?

**उपआयुक्त् (मालमत्ता), श्री. अशोक नाईकवाडे:-** मा. महापौर, उपमहापौर , मा. आयुक्त साहेब व सन्माननीय सदस्यगण महासभेचा ठराव क्र.७९, दिनांक २०/०३/२०१५ नुसार जाहिरात दर मंजूर करण्यात आले होते आणि त्या जाहिरात दरानुसार आपण ब-याचवेळा निविदाप्रकिया करण्यात आली. परंतु त्या निविदा प्रक्रियेला प्रतिसाद न मिळाल्यामुळे अदयापपर्यंत आपल्यालाजाहिरात धोरणानुसार कार्यवाही करणे शक्य झाले नाही. आपण अन्य महापालिका यांचे जाहिरात दरसुध्दा आपण तुलनात्मकरित्या घेतलेले आहेत. त्या तुलरात्मक दरानुसार आपण आपले दर निश्चित केले होते. परंतु आपल्याला प्रतिसाद मिळाला नसल्यामुळे आपले जाहिरातीचे दर प्रदान करता आलेले नाहीत. त्यामुळे मनपाचे महसूली उत्पन्न अपेक्षित करता आलेले नाही. त्यामुळे यामध्ये थोडीशी सुधारणा करण्यात आलेली आहे. जाहिरातीला प्रतिसाद मिळू शकेल असे आम्हांला लक्षात आल्यामुळे आम्ही हा प्रस्ताव आपल्यासमोर मांडण्यात आलेला आहे. यामध्ये आम्हांला जे अपेक्षित गोष्टी हवी आहेत ते असे आहे की, जे जाहिरात आपण प्रसिध्द केल्यानंतर त्यांना हे हक्क दिले जातील त्यांना आपण जी ग्रोथ १० टक्के दिलेली आहे. ती दर वर्षी दिलेली आहे. ती दरवर्षी दिलेली वाढ जी आहे १० टक्के ती १ वर्षाऐवजी २ वर्षानी केल्यास यास आपल्याला प्रतिसाद मिळू शकेलआणि आपले निविदाप्रक्रिया

पुर्ण होवून जाहिरातीचे हक्क देण्यास शक्य होईल अशी आमची अपेक्षा असल्यामुळे हा ठराव आपल्या मान्यतेसाठी देत आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-**नाईकवाडे साहेब या जाहिरातीच्या मानाने आपण इतर महापालिकेचे धोरण काय आहेत? याची आपण महिती घेतली आहे का?मा. महापौरजी, उपआयुक्त साहेबांनी सांगितले की आपण सर एक वर्षाच्या ऐवजी १० टक्के दर दोन वर्षानी वाढ करु या. परंतु इतर महानगरपालिकेंच्या जाहिरातीबाबतचे काय धोरण आहे? कशाप्रकारे वाढ करण्याचे ठरवले आहे? त्याची काय माहिती आपण घेतलेली आहे का?

**उपआयुक्त् (मालमत्ता), श्री. अशोक नाईकवाडे:-**सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुदयानुसार मी सांगू इच्छितो की, नमूद केलेल्या मुददयांबाबत मी सांगू इच्छितो की, आपण इतर महापालिकेतील माहिती देखील घेतलेली आहे. तिच्या अधारेच आपण हे केले आहे. परंतु त्या महापालिकेंच्या जाहिरातीला प्रतिसाद मिळत आहे. जाहिरात निविदेला आपल्याकडे प्रतिसाद मिळत नसल्यामुळे आपण तसा बदल करुन तरी प्रयत्न करु या. यासाठी आपण हा ठराव आणलेला आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-**प्रयत्न करतोय आपणनाफक्त.

**उपआयुक्त् (मालमत्ता), श्री. अशोक नाईकवाडे:-** होय त्या अनुषंगाने नंतर....

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-**हे केल्यानंतरकोणते निविदाधारक निविदा भरेल अशी काही शाश्वती नाही फक्त प्रयत्न करतोय.ते केल्यानंतर प्रतिसाद येईल, तर ठिक आहे.

**सदस्य, श्री. राजेश वधारिया:-**मा. महापौरजी आज २०१५ मध्ये टेंडर काढायचे होते. २०२१ ची वेळ आली आहे. ५ वर्षाचा महानगरपालिकेच्या जाहिरातीचे नुकसान झाले आहे. याची जबाबदारी प्रशासनाला स्विकारावी लागेल. ज्यावेळे सुधाकर देशमुखजी आयुक्त् होते त्यावेळी फाईल बनवुन गोषवारा पाठविली होता. परंतु एका अधिका-याने काही कारणास्तव तो गोषवारा महानगरपालिकेच्या सचिव कार्यालयात न पाठवता ती फाईल राखून ठेवली होती. पहिले त्या फाईलची चौकशी व्हायला पाहिजे. ती फाईल आयुक्तांनी कधी सही केली. कोणत्याही दिवशी सही झाली व सचिवांकडे गोषवारा कधी पाठवला आणि ती फाईल कोणी थांबविली आणि का थांबविली? पहीले तर मी याची चौकशीची मागणी करीत आहे. दुसरी गोष्ट अशी आहे की, जे दर आपण ठेवले आहेत ते आजुबाजूच्या महानगरपालिकेचे किंवा नगरपालिकेचे पाहून ठेवले आहेत. परंतु यात हा नाही विचार केला की, जे अंबरनाथमध्ये निविदा चालू आहे त्या टेंडरमध्ये होर्ल्डींगस, साईन बोर्ड, पोल्स या सर्व गोष्टी एकासोबत आहेत आमच्या महानगरपालिकेत जो दिशा फलक आहे. त्याचा बीओटी वर ३० वर्षाचा वेगळे टेंडर दिले गेले आहे. खाजगी होर्ल्डींगस वेगळे चालू आहे. उल्हासनगर महानगरपालिकेला दुस-यांसोबत तुलना करते वेळी या गोष्टी पण लक्षात ठेवल्या पाहिजेत की, आपले शहर संकुचित आहे आणि मर्यादीत होर्ल्डींगस व मर्यादीत पोल्स आहेत. तरी पण आपण दर ठेवत आहेत ते खुप जास्तीचे दर आहेत. यात आपण एक अट टाकू शकता की या निविदेपेक्षा कमी दर आम्ही मंजूर करु शकतो. परंतु खालच्या दरामधील जो दर जास्त आहे त्याला निविदा दिली जाईल. दुसरे ही निविदा ५ वर्षासाठी मागविली पाहिजे. त्यांच्याकडूनच दर घ्या आणि पाच वर्षासाठी टेंडर झाला पाहीजे आणि ज्याचे जास्त दर असतील त्यांना टेंडर दिला पाहीजे. ही निविदा लवकरात लवकर मागविली पाहिजे दर महिन्याला महानगरपालिकेचे नुकसान होत आहे. त्यांच्याकडून दर घ्या ५ वर्षाचा दर पाहिजे.

**उपआयुक्त् (मालमत्ता), श्री. अशोक नाईकवाडे:-** हे अतिशय चांगले मुददे उपस्थित केलेले आहेत. त्यानुसार या निविदा तयार करताना होर्डीग्स, साईन बोर्ड, पोल्स यांचा समावेश केला जाईल. त्याशिवाय ज्या अटी आपण सांगितलेल्या आहेत त्या अटींचा समावेश करुन टेंडर प्रक्रिया करण्यात येईल कारण महसूली उत्पन्नाचे घटक महानगरपालिकेला अत्यंत अल्प आहेत आणि ते उत्पन्नाचे घटक परत लवकरात लवकर सुरु व्हावेत यासाठी ही निविदा प्रक्रिया तातडीने राबविण्यात येवून जाहिरात देण्याची कार्यवाही जास्तीत जास्त लवकर कसे करता येईल. यासाठी प्रयत्न केला जाईल. तरी या प्रस्तावास मान्यता देण्यात यावी, मी पुन्हा विनंती करतो.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** साहेब मला एक बोलायचे आहे.

**उपआयुक्त् (मालमत्ता), श्री. अशोक नाईकवाडे:-**हा बोला.

**सदस्य, श्री. शंकर लुंड:-** थोडे फार टेंडर इझी करा, ज्या अटी शर्ती टाकल्या आहेत, त्या जरा शिथील करा. त्यामुळे सर्व लोक ज्यांना भरायचे असेल ते भरु शकतात.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-**टेंडर ला सोपे करा. असे करा की खुप लोक येणार सर्व लोक भरतील अटी शर्ती टाकणार तर काहीच लोक भरतील. सगळेच लोक भरतील असे करा.

**उपआयुक्त् (मालमत्ता), श्री. अशोक नाईकवाडे:-** आता जे वधारीया साहेबांनी सांगितले लवचिक निविदा बनवू.......

**सदस्य, श्री. शंकर लुंड:-** म्हणजे नवीन लोकानी पण भरले पाहिजेत. असा माझी सुचना आहे.

**उपआयुक्त् (मालमत्ता), श्री. अशोक नाईकवाडे:-**सर त्यासाठी १ वर्ष तरी कमीत कमी लागतात ना.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-**मा महापौरजी या विषयावर विभागाने लक्ष दिले पाहिजे मागील दोन वर्षात कोविड काळात संपुर्णविश्वावर याचा परिणाम आहे आणि आम्ही जो टेंडर काढला आहे तो मागील २०१७-२०१८ चे जे दर होते त्या हिशोबाने टेंडर काढला आहे. आज प्रतिसाद मिळत नाही, त्यासाठी खुप मोठे कारण हे आहे की, त्यावेळी आपल्याकडे कोव्हीड आले नव्हते. हे दर त्या वेळचे आहेत. येणा-या दिवसामध्ये एक वर्षे किंवा तीन वर्षासाठी आपण याच्यामध्ये कमी करुन कोव्हीडचे उदाहरण देवून यामध्ये काही कमी करु. तर याला प्रतीसाद मिळेल अशी माझी इच्छा आहे. येणा-या तीन वर्षामध्ये याला ७५ टक्के किंवा ६० टक्के जे पण दर निश्चित करणार आहेत, त्यांना प्रतीसाद मिळेल. आपल्याला मार्केटच्या हिशोबाने चालावे लागेल आणि बाजारामध्ये जर मंदी असेल तर आज व्यापारी असतील, बिल्डर असतील या सगळया ठिकाणी मंदी आहे. जर आपल्याला या टेंडरला एक्सटेशन दयायचे आहे आणि पहीलेच ५ वर्षाचा महसुल बुडाला आहे. शहरामध्ये लोक बेकायदेशिर होर्डीग्स लावत आहेत.मा.महापौरजी,

**सदस्य, श्री. राजू जग्यासी:-** मा. महापौरजी, मला विभागाकडून एका गोष्टीची माहीती पाहीजे. एक मिनीट चौधरी साहेब एक मिनीट...

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-** हा टेंडरचा विषय अजेंडावर आणण्यासाठी एवढा उशिर का लागला?कुठल्या अधिका-यांनी फाईल लपवून ठेवली होती याचा पण खुलासा झाला पाहीजे. खुलासा उपायुक्तांनी केला नाही, उप आयुक्त साहेब तो पण खुलासा झाला पाहीजे. हा विषय अजेंडावर येण्यासाठी ५ वर्षे का लागली? कुठल्या अधिका-यांनी फाईल लपवून ठेवली होती, असा आरोप केलाआहे, त्या आरोपाचा पण खुलासा झाला पाहीजे, खंडन झाले पाहीजे.

**सदस्य, श्री. राजू जग्यासी:-**मा. महापौरजी, मी विचारु इच्छितो की, अजून पर्यंत टेंडर निघाला नाही, तर आपल्या शहरामध्ये होर्डीग्स लागत होते, त्याचे महसुल आपल्याला मिळत नव्हते. मा. महापौरजी माझा आवाज येत आहे. मी डिपार्टमेंटकडून माहीती घेऊ इच्छितो की, आपल्या शहरामध्ये होर्डीग लावण्याचे काम कोणीही ठेकेदार करीत होते, ते फ्री ऑफ चार्ज वापरत होते का? कोणी याची माहीती देवू शकतो का? संबंधित विभाग मा. आयुक्त साहेब.

**उपआयुक्त् (मालमत्ता), श्री. अशोक नाईकवाडे:-**सन २०१५ पासून चार वेळा निविदा प्रक्रिया करण्यात आली होती. त्यांन..

**सदस्य, श्री. राजू जग्यासी:-**सर मी आपल्याला मध्येच थांबवत आहे, आपण किती वेळा निविदा प्रक्रिया केली? आज महानगरपालिकेची प्रॉपर्टी कोणी व्यक्ती युज करीत असेल आणि आपल्याला माहीती नाही आहे आणि फ्री ऑफ चार्ज युज करीत आहे. युज करणार नाही असे आपण निर्बंध लावलेत का? एखादया एक व्यक्तीला फायदा देण्यासाठी टेंडर केला नाही, पाच वर्षा पर्यंत? तो फ्री ऑफ चार्ज काम करीत आहे. या गोष्टीचा खुलासा करा.

**उपआयुक्त् (मालमत्ता), श्री. अशोक नाईकवाडे:-**आपण कोणत्याही व्यक्तीला हे काम फायदा देण्यासाठी हे काम केलेले नाही. आपण वारंवार अनाधिकृत होर्डीग्स लावले असतील तर त्यांना नोटीस देत आहोत, त्यांना दंड पण ठोठवत आहोत आता माझ्याकडे आकडेवारी नाही पण मी सात महीन्यापासून जॉईंड झाल्या पासून या धोरणाच्या अनुषंगाने सातत्याने पाठपुरावा करीत आहे आणि आपण ब-याच होर्डीग काढण्यासाठी त्यांना नोटीसा देवून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई पण केलेली आहे. या अनुषंगाने चार वेळा या पुर्वीच निविदा केलेल्या आहेत. विशेष म्हणजे जानेवारीमध्ये आपण प्रस्ताव सादर केलेला आहे. महासभेची मान्याता मिळाल्या

नंतर आम्ही त्याच्यात कमी किंवा जास्त करण्याचे प्रक्रिया करु शकतन नाही. ही प्रशासनाची अडचण आहे. आता आपण मान्यता दयावी, या पुढे असे तरी घडू नयेअशी आम्ही काळजी घेऊ शकतो, आताची गोष्ट आपल्या हातामध्ये आहे. तर मी परत आपल्याला विनंती करतो की, महापालिकेचे महसुली उत्पन्न तातडीने सुरु होण्याच्या दृष्टीने आणि आनखी त्यामध्ये नुकसान होऊ नये, त्यासाठी काळजी घेण्याच्या दृष्टीनेआपण आज मान्यता दयावी. आम्ही तातडीने प्रक्रिया करुन यामध्ये आपल्या महापालिकेला उत्पन्नाचे साधन कसे निर्माण होईल? यामध्ये अशी पुरपुर काळजी घेऊ.

**सदस्य, श्री. राजू जग्यासी:-**सर आम्ही मजुरी देण्यासाठी तयार आहे, परंतु येणा-या काळामध्ये जर कोणत्याही ठेकेदाराला वर्क ऑर्डर मिळत नाही. तो पर्यंत होर्डीग्स कोणी पण ठेकेदार फ्रीमध्ये युज करु शकत नाही. हे तुम्हांला लक्षात ठेवायचे आहे.

**उपआयुक्त् (मालमत्ता), श्री. अशोक नाईकवाडे:-**होय सर तशी आम्ही काळजी घेऊ.

**सदस्य, श्री. राजू जग्यासी:-**धन्यवाद.

**महापालिका सचिव:-** मी एकदा ठराव वाचत आहे, ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे मा. महासभा ठराव क्रमांक ७९ दिनांक २०/०३/२०१५ अन्वये उल्हासनगर महानगरपालिके हद्दीत महापालिकेने निश्चित करुन दिलेल्या ठिकाणी होर्डीग्स, साईन बोर्ड आणि पोल्स व पथदिवे याद्वारे जाहिरात प्रसिध्द करण्या करीता अभिकर्ता नियुक्ती करण्यासाठी दिलेल्या निविदा कारवाई करीता प्रशासनास निर्देश देत आहे. परंतु तो दर सादर करणा-या जो हायस्ट दर सादर करेल त्याला ही निविदा दयायची ५ वर्षा पर्यंतचा कालावधी असावा. अजून तुम्हांला यात काही ॲड करायचे आहे का? लवकरात लवकर निविदा मागवावी असे प्रशासनास निर्देश देत आहे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** मॅडम शब्द काय बोलले समजले नाही.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-** मा. महापौरजी, आयुक्त साहेब, सचिव मॅडम मला पण बोलायचे आहे. शहरामध्ये खुप अनाधिकृत होर्डीग्स लावले जात आहेत. मा. महापौरजी जे अनाधिकृत होर्डीग्स लावले आहेत त्याचे काय करणार? आणि जे लिगल होर्डीग्स महापालिकेच्या हितासाठी साईन बोर्ड युज करा. जो पर्यंत प्राव्हेट एजेन्सी नियुक्ती होत नाही तो पर्यंत महानगरपालिकेतर्फे साईन बोर्ड लावले पाहीजेत. सेव वॉटर, लॅप्रेसिस क्रियबल, टी.बी. इज क्रियबल, या बाबतीत लावले पाहीजेत. ताबोडतोब आदेश दया. वॅक्सीवेशन आज महामारी आहे. वॅक्सीवेशनच्या विषयी महानगरपालिकेने होर्डीग्स लावले पाहीजेत. मास, सोशल डिस्टनचे पण टाका. या सर्व गोष्टींसाठी होर्डीग्स युज करा. फक्त पैसे कमावणे उददेश झाला नाही पाहीजे. शहराच्या हितासाठी जागृतीचे हे काम केले पाहीजे. मा. महापौरजी...

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** मा. महापौरजी, जी गोष्ट मी अधिका-यांना विचारली होती की, आयुक्त, श्री. सुधाकर देशमुख यांनी फाईल सही करुन दिली होती आणि तो गोषवारा महासभेमध्ये आला नाही. तर कोणत्या तारखेला सुधाकर देशमुख यांनी सही केली? आणि कोणत्या तारखेला गोषवारा बनून सचिव यांच्याकडे आला. या दोन तारीख सांगा म्हणजे समजेल आणि फाईल कोणाकडे होती, ते सांगा. याचा खुलासा अधिकारी यांनी का करु नये? त्या वेळेस टेंडर निघाला नाही, तर तो झालेला नुकसान त्या अधिका-याची जबाबदारी आहे आणि महानगरपालिकेने नुकसानचे पैसे भरुन घेतले पाहीजेत.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-** मा. महापौरजी माझ्या प्रशनाचे उत्तर दिले नाही, महापौरजी, उप महापौरजी, आयुक्त साहेब

**उपआयुक्त् (मालमत्ता), श्री. अशोक नाईकवाडे:-**सर देशमुख साहेबांची मान्यता प्राप्त झाल्या नंतर आपण परत निविदा प्रक्रिया राबवण्यात आली. तरी सुध्दा प्रतिसाद मिळालेला नाही. त्या नंतरच आपण हा प्रस्ताव महासभेसाठी जानेवारीमध्ये २०२१ मध्ये टाकलेला आहे आणि म्हणून आपण परत परत मान्यता देण्यासाठी विनंती करीत आहे. जाणीपुर्वक कोणीच हा प्रस्ताव पेडींग ठेवलेला असे आढळून आले नाही. तरी सुध्दा तुम्ही आता म्हणत आहेत तर आम्ही चौकशी करुन घेऊ की, कुठे काय बाब आढळून आलेली आहे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-**ठिक आहे, आपण एक महीन्याच्या आतमध्ये चौकशी करुन महानगरपालिके समोर तुमचे रिपोर्ट ठेवण्यात यावे. आपण चौकशी करा आणि रिपोर्ट महानगरपालिकेच्या महासभेपुढे ठेवण्यात यावे.

**उपआयुक्त् (मालमत्ता), श्री. अशोक नाईकवाडे:-**ठिक आहे,आम्ही चौकशी करुन आपल्या निर्देशाप्रमाणे अहवाल आपल्याला देवू.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** मॅडम ठराव परत वाचा.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-**एक मिनीट नाही, माझ्या प्रश्नाचे उत्तर दिले नाही.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** मला बोलायचे आहे, राजेशभाई.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-**उप महापौरजी, माझा विषय पुर्ण ऐकुन घ्या, चांगल्या प्रकारे.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-**डॉक्टरला उत्तर दया पहीले.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** मा. महापौरजी, आपण महापौरांना विचारुन बोलू शकतात.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-**आपण मास, सोसल डिसटन्स होर्डीग्स लावा, फक्त् पैसे कमावण्याचे लावतात का? माझ्या प्रश्नाचे उत्तर का देत नाहीत? फक्त चर्चाच करतात.

**उपआयुक्त् (मालमत्ता), श्री. अशोक नाईकवाडे:-**होर्डीग्स आपले जे आहेत, डॉ. साहेब आपण सांगितल्या प्रमाणे....

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-**माझे म्हणणे शांततापुर्वक ऐकून घ्या.प्लीज जे अनाधिकृत होर्डीग्स आहेत, ते काढून फेकावेत, त्याच्यावर एम.आर.पी. ऍक्ट लावा, जे पण ॲक्ट आहेत, त्यांच्यावर कायदयानुसार कारवाई करावी. नंबर दोन आमच्याकडे जे साईन बोर्ड आहेत, त्यांचा उपयोग करावे. महानगरपालिका लॅप्रेसिस क्रियबल, टी.बी. इज क्रियबल, वॅक्सीन, सोशन डिस्टनस, मास जे पण आहेत, सर्व काही सेव वॉटर, कंडम युज, ऑपरेशन युज, हम दो हमारे दो, हे सर्व काही आपण करु शकतो. सर प्लिज हे सर्व काही करा आणि जे कमावायचे आहे ते पण करा मी असे म्हणत नाही की, उत्पन्न झाले नाही पाहीजे. आयुक्त साहेब आपण हे करा, धन्यवाद, आपण आता बोला.

**उपआयुक्त् (मालमत्ता), श्री. अशोक नाईकवाडे:-**आपल्या सुचनेनुसार आम्ही जे उपलब्ध साईन बोर्ड आहेत, जेवढा वापर करता येईल, तेवढे महापालिकेच्या योजनेच्या प्रसिध्दीसाठी केले जाईल. अनाधिकृत जे काही होर्डीग् असतील ते काढण्यासाठी आपण सातत्याने प्रभाग अधिकारी यांना सुचना दिलेल्या असतात.त्यांच्या मार्फत आपण होर्डीग काढण्यासाठी कारवाई करीत असतो, दंडात्मक कारवारई सुध्दा करीत आहोत आणि जे पण असतील त्यांच्यावर पण कारवाई केली जाईल आणि आपल्या सुचनेनुसार बोर्डचे पण वापर केले जाईल.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** मा. महापौर, विषय असा आहे की, होर्डीगच्या संदर्भामध्ये दोन वषापासून निविदा काढत असतो पण निविदेला प्रतिसाद मिळत नाही आणि आपले रेट, अंबरनाथचे रेट आणि कल्याणचे रेट त्यांच्या पेक्षा मला वाटते की, आपले रेट जास्त आहेत. त्यामुळे आपल्याकडे कोणताही निविदाकार येत नाही आणि आपण दर वर्षी १० टक्के, १० टक्के असे वाढत वाढत करुन तो रेट हाय होत जातो. त्यामुळे आपयल्याकडे कुठलाही ठेकेदार होर्डीगच्या संदर्भामध्ये येत नाही. माझी विनंती आहे की, आता आपण नविन टेंडर काढावे. मेन टेंडरच्या संदर्भामध्ये याची मर्यादा ही आपण दिलेली आहे. ती न करता थोडे सहील त्या पध्दतीने आले पाहीजे आणि मला वाटते रेट ठरवण्याचे नंतरचे अधिकार बाजुच्या महानगरपालिका आणि आपल्या महानगरपालिकेने सर्व नगरपालिकेंचे अधिकार मला वाटते महासभेने ते १० टक्के भविष्यात वाढीव वाटते. ते सगळे अधिकार मा. आयुक्तांना प्राधिकृत केले पाहीजेत. अशी माझी सुचना आहे आणि अशा पध्दतीचा जर ठराव झाला तर मला वाटते कोणतेही ठेकेदार तिथे येतील आणि वाटाघाटीद्वारे ते काम सुरु होईल आणि महानगरपालिकेला उत्पन्न वाढेल.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:-** पास..पास..

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** ठराव एकदा परत वाचून दाखवा.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:-**मा. महापौरजी, मिना सोनेजींना जॉईन्ड करा.

**<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-</u>**गोलमैदान परिसरामध्ये अनाधिकृत होर्डींगस जास्त आहेत. निरंकारी भवन येथे भरपूर होर्डींग्स लावले आहेत. प्लिज प्रभाग समितीला आताच आदेश दया की,....

**<u>महापालिका सचिव:-</u>** आता मी ठराव वाचत आहे. आधी सांगितल्या प्रमाणे हायस्ट दर असेल त्याला दयायचा आहे. ५ वर्षासाठी दयायचा आहे, लवकरात लवकर निविदा मागवायची आहे आणि कमी जास्त करण्याचे अधिकार आयुक्त साहेबांना आसतील आणि आजूबाजूच्या नगरपालिकेंचे दर तपासून त्यानुसार करण्यात यावे. अजून कोणाला अटी घालायच्या असतीलतर सांगा आणि अजून माझ्याकडून चुकून राहीला असेल तर मी याच्यामध्ये अॅड करील. पाच वर्षापुर्वी पण पहीले जो ठराव झाला होता. त्यामध्ये पण हीच अट टाकली होती की, आजूबाजूच्या महानगरपालिकेचे रेट बघून टेंडर कढण्यात यावा. परंतु आजूबाजूच्या नगरपालिकेची, महानगरपालिकेची स्थिती वेगळी आहे, त्यामुळे कप्रेव्हीजन झाले पाहीजे.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:-</u>**मा. महापौरजी, पाच वर्षापुर्वी पण पहीले जो ठराव झाला होता. त्यामध्ये पण हीच अट टाकली होती की, आजूबाजूच्या महानगरपालिकेचे रेट बघून टेंडर कढण्यात यावा. परंतु आजूबाजूच्या नगरपालिकेची, महानगरपालिकेची स्थिती वेगळी आहे, त्यामुळे कप्रेव्हीजन झाले पाहीजे.अंबरनाथमध्ये होर्डीग्स, वैगेरे सर्व बरोबरच आहेत, पोल्स, दिशादर्शक यांचे तिथे कोणताच टेंडर नाही. आपल्याकडे दिशा फलकाचे टेंडर पहीलेच वेगळा दिला गेला आहे आणि ते पहीलेच लावले आहेत. तिसरी गोष्ट म्हणजे मुंबईमध्ये प्रमाणापेक्षा जास्त होर्डींग्स लावले जातात. त्याच्या नंतर रेट ठाण्याला मिळाला आहे, त्याच्या नंतर रेट कल्याणला मिळतेआणि सर्वात कमी रेट इतर महानगरपालिकेपेक्षा उल्हासनगरला मिळते. जर आपण कल्याणशी कप्रेझन करणार आहेत, किंवा ठाण्या बरोबर करणार असतील तर आपले होर्डीग्स महाग होतील.महाग होर्डीग्स आपल्याकडून कोणीच घेणार नाही आणि त्यामुळे अनाधिकृत होर्डीग्स चालत राहणार.

**<u>उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-</u>** राजेशभाई तेच रेट कमी करण्याचा विचार करीत आहोत ना.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:-</u>**दोन मिनीट मला बोलू दया ना मा. उप महापौरजी, रेट आपण जे पण ठेवा टेंडरमध्ये कंडीशन लिहा की बिलोमध्ये जो पण हायस्ट होईल त्याचा स्विकार करु. आपल्याला माहीती तर होईल की, स्पर्धा झाल्या नंतर रेट काय येईल. जर पहीलेच रेट हायस्ट ठेवणार आहेत तर आपल्याला रेसपाँन्स मिळणार नाही. आपल्याला १५, १० हजार रुपये देवून पण ब्लँक टेंडर फार्म भरणेसाठी, टेंडर घ्यायला पण येणार नाही.

**<u>सदस्य, श्री. राजू जग्यासी:-</u>** सन्माननिय महापौरजी, मा. आयुक्त साहेब, मी सांगू इच्छितो की, गोल मैदान परिसरमध्ये, निरंकारी भवन जे सामाजिक कार्यकर्ते आहेत, त्यांच्या अनाधिकृत होर्डीग्स लावल्या जातात. जर ज्या होर्डीग्स तिथून तुरंत हटवण्यात यावेत आणि दुसरे कोणालाच तिथे होर्डीग्स लावून देवू नका, कृपया या गोष्टीवर लक्ष दयावे.

**<u>उपआयुक्त (मालमत्ता), श्री. अशोक नाईकवाडे:-</u>**आजच गोल मैदानमध्ये जे होर्डीग्स लावले आहेत,

**<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-</u>** सर एक अॅड करायचे आहे, माझा असा सुझाव आहे की, शंभर टक्के, ७५ टक्के होर्डीग्स एजेन्सीला दया, या कामासाठी......

**<u>उपआयुक्त (मालमत्ता), श्री. अशोक नाईकवाडे:-</u>**मा. महापौरांनी याबाबतच्या सुचना केलेल्या आहेत.या बाबतचे जाहिरात दर कमी जास्त पाहण्यासाठी अधिकार मा. आयुक्त साहेबांना देण्यात यावेत. त्यानुसार मा. आयुक्त साहेबांच्या स्तरावर या जाहिरातीला प्रतिसाद कसा मिळत आहे, ते पाहून या दरामध्ये काही कमी जास्त करायचे आवश्यकता असेल तर असा निर्णय घेऊन त्याची निविदा करण्याची कारवाई जास्तीत जास्त लोक भाग घेतील अशा कारवाई करण्यात येईल. तरी मी परत एकदा विनंती करण्यात येते की, या ठरावाला आपण मान्यता देण्यात यावी.

**<u>उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-</u>** पास इतिवृत्ताची वाट न पहाता.

**<u>महापालिका सचिव:-</u>** हा ठराव पास झाला आहे. इतिवृत्ताची वाट न पहाता आणि अटी शर्तीच्या आधीन राहून.

**<u>सदस्य, श्री. राजू जग्यासी:-</u>** पास..पास...

<u>काही सदस्य :—</u>पास—पास……

महापौर तथा पीठासीन अधिकारी :—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ विषय क्र. ८:—मा. महासभा ठराव क्र.७९, दिनांक २०/०३/२०१५ अन्वये उल्हासनगर महानगरपालिकाहददीत महापालिकेने निश्चित करून दिलेल्या ठिकाणीहोर्डींग्ज व पथदिवे याद्वारे जाहिरात फलक प्रसिध्द करणेकामी अभिकर्ता नियुक्तकरण्यासाठी निविदा कार्यवाहीकरीता दिलेल्या मान्यतेनुसार निविदेस प्रतिसाद मिळत नसल्याची बाब मा. महासभेच्या निदर्शनास आणुन देवून सदरबाबत धोरणात्मक निर्णय होणेबाबत.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिका हददीत महापालिकेने निश्चित करून दिलेल्या ठिकाणी होर्डींग्ज व पथदिवे याद्वारे जाहिरात फलक प्रसिध्द करणेकामी अभिकर्ता नियुक्त करण्यासाठी मा. महासभा ठराव क्र.७९, दिनांक २०/०३/२०१५ अन्वये वर्ष २०१५ पासून विभागाकडून निविदा कार्यवाही करण्यात येत आहे. त्याचा तपशिल खालिलप्रमाणे देण्यात येत आहे.

| **अ.क्र.** | **जाहिरातीचे नांव** | **जाहिरातीचे अंदाजे क्षेत्रफळ** | **महापालिकेने निश्चित केलेले जाहिरातीचे दर रु.** | **अपेक्षित उत्पन्न रू.** |
|---|---|---|---|---|
| १ | होर्डींग्ज | १७,००० चौ.फुट सोबत जोडलेल्या परिशिष्ट अ मधील सविस्तर यादीनुसार | रु.३५०/- प्रति चौ.फुट प्रति वर्ष (दरवर्षी १० टक्के वाढ) | रू.५९,५०,०००/- |
| २ | महापालिका पथदिवे | ३ X ४ विदयुत खांबाच्या मागेपुढे = १२ X २ = २४ X ३७० अंदाजे पोल = ८८८० चौ.फुट सोबत जोडलेल्या परिशिष्ट ब मधील सविस्तर यादीनुसार | रु.३५०/- प्रति चौ.फुट प्रति वर्ष (दरवर्षी १० टक्के वाढ) | रू.३१,०८,०००/- |
| | | | एकुण | रू.९०,५८,०००/- |

महापालिकेच्या वरीलप्रमाणे प्रस्तावित दरानुसार वेळोवेळी केलेल्या निविदा प्रक्रीयेचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | निविदेचा तपशिल | कालावधी | प्राप्त निविदा | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | पहिली निविदा | दि.१७/०७/२०१५ ते १९/०८/२०१५ | निरंक | |
| | प्रथम मुदतवाढ | दि.१७/०७/२०१५ ते १४/०९/२०१५ | **एकच निविदा प्राप्त** | |
| | दुसरी मुदतवाढ | दि.१७/०७/२०१५ ते २४/०९/२०१५ | निरंक | |
| | तिसरी मुदतवाढ | दि.१७/०७/२०१५ ते १५/१०/२०१५ | | एकच निविदा प्राप्त, तथापि निविदाकाराने निविदेप्रमाणे दर सादर न करता वार्षिक एकुण रक्कम नमुद केल्याने निविदा रदद् |
| २ | दुसरी निविदा | दि.१७/०३/२०१७ ते ०६/०४/२०१७ | निरंक | |
| | प्रथम मुदतवाढ | दि.१७/०३/२०१७ ते ०९/०५/२०१७ | निरंक | |
| | दुसरी मुदतवाढ | दि.१७/०३/२०१७ ते २५/०५/२०१७ | निरंक | तांत्रिक कारणास्तव कार्यवाही होवू शकली नाही. |
| | दुसरी मुदतवाढ | दि.१७/०३/२०१७ ते २३/०६/२०१७ | निरंक | |
| | तिसरी मुदतवाढ | दि.१७/०३/२०१७ ते ०१/०७/२०१७ | निरंक | |
| ३ | तिसरी निविदा | दि.१९/०३/२०१८ ते १२/०४/२०१८ | निरंक | सदर निविदेच्या कालावधीत दिनांक ४/४/२०१८ रोजीच्या निविदापुर्व बैठकीत निविदेतील काही अटी व शर्तींमध्ये बदल करण्याची मागणी झाल्यानंतर निविदा रदद् केली. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | सुधारीत तिसरी निविदा | दि.१०/०७/२०१८ ते २४/०७/२०१८ | निरंक | सुधारीत करुन देखील प्रतिसाद मिळाला नसल्याने सदरहु बाब मा. स्थायी समितीपुढे निर्णयार्थ प्रस्ताव पाठविण्यात आला त्यामुळे पुढे मुदतवाढ देण्यात आली नाही. |
| निविदेतील अटी व शर्तीमध्ये सुधारणा करुनदेखील प्रतिसाद मिळत नसल्याने दर कमी करावेत किंवा कसे याबाबत निर्णय होणेसाठी प्रस्ताव मा. स्थायी समितीपुढे ठेवला असता जे आहेत तेच दर कायम ठेवून नव्याने फेरनिवीदा काढण्याचा ठराव पारीत केला त्यानुसार खालिलप्रमाणे फेरनिविदा काढण्यात आली. | | | | |
| ४ | चौथी निविदा | दि.१८/११/२०१९ ते ०८/१२/२०१९ | निरंक | |
| | प्रथम मुदतवाढ | दि.१८/११/२०१९ ते २३/१२/२०१९ | निरंक | |
| | दुसरी मुदतवाढ | दि.१८/११/२०१९ ते १५/०१/२०२० | निरंक | |
| | तिसरी मुदतवाढ | दि.१८/११/२०१९ ते २४/०१/२०२० | **एकच निविदा प्राप्त** | |

अशाप्रकारे सदर जाहिरात प्रसिध्दीच्या निविदा कार्यवाहीसाठी ०३ वेळेस निविदा मागवुन व प्रत्येक वेळी तीन वेळा मुदतवाढ देवुनही प्रतिसाद मिळालेला नाही. त्यामुळे स्थायी समितीच्या ठरावान्वये चौथ्या वेळेस मागविण्यात आलेल्या निविदेच्या तिस-या मुदतवाढीमध्ये एकच निविदा प्राप्त झाली आहे.

याकारणास्तव प्राप्त एक निविदा वरिष्ठांच्या निर्देशानुसार उघडण्यात आली असता त्यामध्ये निविदाकाराने महापालिकेने निश्चित केलेल्या दरापेक्षा कमी दर दिले असल्याने सदरचे दर खुप कमी आहेत असे विभागाने अभिप्राय सादर केले असता मुख्य लेखा अधिकारी यांनी फेरनिविदा मागविणे योग्य वाटते असे आदेशित केले असुन तत्कालीन मा. आयुक्त सो. यांनी आसपासच्या महानगरपालिका/नगरपालिका यांचेकडून दर मागवून फेरसादर करणेबाबत आदेशित केले आहे.

त्यानुसार यापुर्वी प्राप्त झालेले अंबरनाथ, कुळगांव बदलापुर नगरपालिका तसेच ठाणे, कल्याण- डोंबिवली, पनवेल व भिवंडी-निजामपूर महानगरपालिका यांचेकडून प्रस्तावित दरसुची मागविण्यात आली आहे. सदर दरसुचीनुसार सदयस्थितीतील होर्डीग्जचे दर व इतर बाबी खालिलप्रमाणे आहेत.

| अ. क्र. | महानगरपालिका / नगरपालिकेचे नांव | प्रकाशित जाहिरातीसाठी | | अप्रकाशित जाहिरातीसाठी | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | निविदेतील मासिक दर रू. प्रति चौ.फुट | निविदेतील वार्षिक दर रू. प्रति चौ.फुट | निविदेतील मासिक दर रू. प्रति चौ.फुट | निविदेतील वार्षिक दर रू. प्रति चौ.फुट | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | ठाणे महानगरपालिका | १३३.८६ | १६०६ | — | — | ठाणे महानगरपालिका 'ब'वर्ग महानगरपालिका असुन महापालिकेचे क्षेत्रफळ जास्त आहे. मोठया प्रमाणात औद्योगिक क्षेत्र (MIDC) आहे.तसेच जाहिरात फलक प्रसिध्दीची ठिकाणे मुख्य रस्ते व मोक्याची ठिकाणे यानुसार वर्गवारी करून निश्चित केली आहेत व त्यासाठी वेगवेगळे दर अपेक्षिले आहेत. |
| २ | कल्याण डोंबिवली महानगरपालिका (कल्याण विभागासाठी ) | ३१ | ३७२ | — | — | कल्याण डोंबिवली महानगरपालिका 'क' वर्ग महानगरपालिका असुन महापालिकेचे क्षेत्रफळ जास्त आहे. औद्योगिक क्षेत्र (MIDC)आहे.तसेच सदरमहानगरपालिकेने कल्याण शहर व डोंबिवली शहर अशा दोन विभागांसाठी निविदेमध्ये स्वतंत्र दर निश्चित केलेले आहेत. तथापि, चौथ्यांदा निविदा कार्यवाही केल्यानंतरही योग्य प्रतिसाद मिळत नसल्यामुळे निविदा कार्यवाही पुर्ण झालेली नाही. |
| | डोंबिवली विभागासाठी | २५.६० | ३०७ | — | — | |
| ३ | अंबरनाथ | ५५.७५ | ६६९ | ६९ | ८२६ | अंबरनाथ नगरपालिका असुन |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | नगरपालिका | | | | | नगरपालिकेचे क्षेत्रफळ जास्त आहे. औद्योगिक क्षेत्र (MIDC) आहे.तसेच जाहिरात फलक प्रसिध्दीची ठिकाणे मुख्य रस्ते व मोक्याची ठिकाणे यानुसार वर्गवारी करून निश्चित केली आहेत व त्यासाठी वेगवेगळे दर अपेक्षिले आहेत. तसेच सर्व प्रकारच्या जाहिरात फलक प्रसिध्दीचे काम एकाच अभिकर्त्याकडे आहे. |
| ४ | कुळगांव—बदलापूर नगरपालिका | ३५ | ४२३ | — | — | |
| ५ | पनवेल महानगरपालिका | ०४ | ४३ | ०५ | ६१ | पनवेल महापालिकेचे क्षेत्रफळ जास्त आहे. औद्योगिक क्षेत्र (MIDC) आहे.तसेच जाहिरात फलक प्रसिध्दीची ठिकाणे मुख्य रस्ते व मोक्याची ठिकाणे यानुसार वर्गवारी करून निश्चित केली आहेत व त्यासाठी वेगवेगळे दर अपेक्षिले आहेत. |
| ६ | भिवंडी—निजामपुर महानगरपालिका | ०६ | ७२ | — | — | भिवंडी निजामपुर महापालिकेचे क्षेत्रफळ जास्त आहे. तसेच जाहिरात फलक प्रसिध्दीची ठिकाणे मुख्य रस्ते व मोक्याची ठिकाणे यानुसार वर्गवारी करून निश्चित केली आहेत व त्यासाठी वेगवेगळे दर अपेक्षिले आहेत. |

लगतच्या महापालिका क्षेत्रात रस्त्यांवर उभारण्यात आलेले पथदिवे/किऑस्क यावर जाहिरात फलक उभारण्यासाठी आकारण्यात येणारे दराचा तपशिल खालिलप्रमाणे आहे.

| **अ.क्र.** | **महानगरपालिका/नगरपालिकेचे नांव** | **निविदेतील वार्षिक दर रू.प्रति चौ.फुट, प्रति पोल** |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | अंबरनाथ नगरपालिका | २००/- |
| २ | पनवेल महानगरपालिका | १२००/- |
| ३ | भिवंडी महानगरपालिका | ४२०/- |

वरीलप्रमाणे कल्याण डोंबिवली महानगरपालिकेकडे अदयाप जाहिरात निविदा प्रक्रीया पुर्ण होवून अभिकर्ता नियुक्ती झालेली नाही. तथापि, पनवेल महानगरपालिका, अंबरनाथ नगरपालिका यांचेप्रमाणे कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने नव्याने निविदा प्रस्ताव तयार केला असून त्यामध्ये शहरातील रस्ते व मोक्याच्या जागा यांची वर्गवारी तसेच प्रकाशित व अप्रकाशित जाहिरात फलकांसाठी वेगवेगळे दर प्रस्तावित केले आहेत. त्याचप्रमाणे सण, उत्सव, जयंती, वाढदिवस याकरीता जास्तीत जास्त ०३ दिवस बॅनर्स प्रदर्शित करण्यास मान्यता देताना त्याकरीता विशिष्ट दर आकारले जात आहेत.

मा. सभापती, स्थायी समिती, उल्हासनगर महानगरपालिका यांचेवतीने सर्व विभागप्रमुखांची दिनांक १८/०१/२०२० रोजी बैठक आयोजित केली होती. सदर बैठकीमध्ये

उक्त जाहिरात फलकाद्वारे महापालिकेस मिळणारे उत्पन्न बंद झाले असल्याने याबाबत ठोस कार्यवाही करणेबाबत कळविण्यात आले आहे.

मा. महासभा ठरावान्वये महापालिकेने प्रस्तावित केलेल्या दरापेक्षा जास्त दर प्राप्त होणे आवश्यक आहे. यानुसार वर्ष २०१५ पासून आजपर्यंत ०५ ते ०६ वेळा निविदा प्रक्रीया करण्यात आली आहे. परंतु एकही निविदाकार यांनी निविदा भरली नसल्याने उक्त दराने प्रसिध्द केलेल्या निविदेस प्रतिसाद मिळालेला नाही.

उपरोक्त अन्य महापालिकांचे जाहिरात फलक व पथदिवे यांचे दर परिशिष्ट अ व परिशिष्ट ब मध्ये नमुद केलेले आहेत. सदर परिशिष्ट पाहता ठाणे महानगरपालिका ब वर्ग, कल्याण डोंबिवली व पनवेल महानगरपालिका क वर्ग महानगरपालिका तसेच अंबरनाथ व कुळगांव बदलापुर या नगरपालिका असल्यातरी त्यांचे कार्यक्षेत्र जास्त असुन त्यामध्ये औद्योगिक क्षेत्र (MIDC)आहे.

वरील महानगरपालिकांशी उल्हासनगर महानगरपालिकेची तुलना केली असता उल्हासनगर महानगरपालिका ड वर्ग महानगरपालिका असुन महापालिकेचे क्षेत्रफळ १३ चौ.कि. मी. असे सिमीत क्षेत्रफळ आहे. तथापि, संपुर्ण शहर औद्योगिक शहर म्हणुन ओळखले जात असले तरी शहरात सर्व लघुउद्योग असुन औद्योगिक क्षेत्र (MIDC) नाही.मालमत्ता विभागाकडून यापुर्वी मा. महासभेपुढे पाठविलेल्या प्रस्तावामध्ये कंपनीने सादर केलेल्या वर्ष २०१५ चे दर पाहता रू.१२०/— प्रति चौ.मी.प्रतिमहा असे होर्डींग्जसाठी व रू.१५०/— प्रति खांब प्रतिमहा असे विदयुत खाबांकरीता दर प्रस्तावित केले होते. परंतु सदरचे दरास मान्यता न देता आसपासच्या महानगरपालिकांपेक्षा जास्त दर असावेत असा मा. महासभा ठराव क्र.७९ दिनांक २०/०३/२०१५ पारीत करण्यात आला होता.

मा. महासभा ठराव क्र. ७९ दिनांक २०/०३/२०१५ अन्वये मान्यता दिल्यानुसार आसपासच्या कल्याण डोंबिवली व अंबरनाथ नगरपालिकेचे वर्ष २०१५ चे दर विचारात घेवुन त्यांचेपेक्षा जास्त यासाठी होर्डींग्ज व विदयुत खांब याकरीता रू.३५०/— प्रति चौ.फुट प्रतिवर्ष याप्रमाणे निविदेसाठी दर प्रस्तावित केले होते.तथापि, सदर दरास प्रतिसाद मिळत नसल्यामुळे व उल्हासनगर शहरातील भौतिक व औद्योगिक परिस्थितीचा विचार करता प्रस्तावित केलेले दर कमी करावेत अशी या कार्यालयाची धारणा आहे.

वर्ष २००७ मध्ये महानगरपालिकेने निविदा कार्यवाही करून मे.लक्ष्मी ॲडव्हर्टायजिंग व मे. किंग्ज एंटरप्रायजेस, उल्हासनगर यांना जाहिरात फलक व विदयुत खांबाचे कार्यादेश दिले होते. सदर कंपनीचा निविदा कालावधी संपुष्टात आल्यानंतर स्थायी समितीच्या मान्यतेने निविदा कार्यवाही होईपर्यंत दरवर्षी १० टक्के दरवाढ याप्रमाणे दर निश्चित करून भाडेशुल्क वसुल करण्यात येत होते. पुर्वीच्या कंपनीने वर्ष २०१६ मध्ये होर्डींग्जकरीता रू.१४६/— प्रति चौ.मी. प्रतिमहा व विदयूत खांबाकरीता रू.२१५/— प्रतिखांब प्रतिमहा याप्रमाणे भाडेशुल्क भरणा केलेला आहे. त्यावेळेस कंपनीस उपलब्ध होणारे क्षेत्रफळ याद्वारे महापालिकेस रू. २५,००,०००/—इतके वार्षिक उत्पन्न प्राप्त होत होते.

तथापि, आतापर्यंत प्रस्तावित केलेल्या निविदा कार्यवाहीमध्ये शहराचे दोन विभाग न पाडता कॅम्प नं. १ ते ५ करीता एकच दर प्रस्तावित केले असल्यामुळे वर्ष २०२० मध्ये चौथ्या निविदेस दिलेल्या मुदतवाढीमध्ये प्राप्त झालेल्या एकच निविदेमध्ये जाहिरात फलक व विदयूत खांबाकरीतारू.१६०/— प्रति चौ.फुट,प्रतिवर्ष असे दरप्राप्त झाले आहेत. सदरचेदर महापालिकेने प्रस्तावित केलेल्या दरापेक्षा कमी असल्यामुळे निविदा स्विकृत करण्यात आली नाही.

उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता खालिलप्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

१. मा. महासभा ठराव क्र.७९ दिनांक २०/०३/२०१५ अन्वये महापालिकेने प्रस्तावित केलेल्या दराने निविदा कार्यवाही करून प्रतिसाद मिळत नसल्याने यापुर्वी वर्ष २००७ मध्ये निविदा कार्यवाहीने नियुक्त केलेल्या अभिकर्ता यांनी वर्ष २००७ मध्ये होर्डीग्जकरीता प्रतिमहा प्रति चौ.मी.रू.७५/— (रू.८४/— प्रति चौ.फुट प्रतिवर्ष ) व विदयुत खांबाकरीता प्रतिमहा प्रतिखांब रू.११०/— याप्रमाणे दरनिश्चित करण्यात आले होते. त्यानंतर त्याच कंपनीस दरवर्षी १० टक्के वाढ यानुसार मुदतवाढ देण्यात आली होती. कंपनीने वर्ष २०१६ पर्यंत दरवर्षी १० टक्के दरवाढीने रू.१४६/— प्रति चौ.मी. प्रतिमहा ( रू.१६२/—प्रति चौ.फुट प्रतिवर्ष ) महापालिकेस भाडे अदा केले आहे. सदर भाडेवाढ गृहीत धरता दरवर्षी १० टक्के वाढ यानुसार वर्ष २०२०—२१ करीता निश्चित होणारे होर्डीग्जकरीता रू.२१५/— प्रति चौ.मी. प्रतिमहा ( रू.२४०/—प्रति चौ.फुट प्रतिवर्ष ) तसेच विदयुत खांबाकरीता रू.३१६/— प्रति खांब प्रतिमहा अपेक्षित दर ( वार्षिक अपेक्षित उत्पन्न रू.५४,८३,०४०/—प्राप्त होवू शकेल ) प्रस्तावित करून नव्याने निविदा कार्यवाही करणे.

२. उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेवुन दर निश्चितीबाबत धोरणात्मक निर्णय घेणे.

तरी वरीलप्रमाणे प्रस्ताव मा. महासभेपुढे प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:०८</u> <u>दिनांक:—१७/०९/२०२१</u>

सुचकाचे नाव :—श्री. राजेश वदारिया

अनुमोदकाचे नाव :— श्री. कलवंतसिंह सोहता

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे व सभेत झालेल्या चर्चेअंती, मा. महासभा ठराव क्र.७९, दिनांक २०/०३/२०१५ अन्वये उल्हासनगरमहानगरपालिकाहददीत महापालिकेने निश्चित करून दिलेल्या ठिकाणीहोर्डीग्ज वपथदिवे याद्वारे जाहिरात फलक प्रसिध्द करणेकामी अभिकर्ता नियुक्तकरण्यासाठी आजुबाजूचे महापालिकेत दर तपासून निविदा लवकरात लवकर मागविण्यास मान्यता देत आहे.

तसेच,

१) मुळ प्राकलनीय रक्कमेपेक्षा कमी दर आल्यास आलेल्या जास्त दर असलेल्या निविदेमधील निविदाधारकासप्राधान्यदयावे.

२) सदर निविदा ५ वर्षाच्या कालावधीसाठी देयात यावी.

३) दर कमी जास्त करणेसाठी आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे.

४) तसेच तोपर्यंत सदर होर्डिंग्जवर महापालिकेच्या योजनांचे व जनतेसाठी जनजागृतीचे घोषवाक्य असणारे फलक लावण्यात यावे.

या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाचीसही/—

अनुमोदकाचीसही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**<u>महापालिका सचिव :- विषय क्र. ९ वाचुन दाखवितात.</u>**

---

⇨ विषय क्र. ९ :—कंत्राटी अभियंतायांची 6 महिन्यासाठी मुदतवाढ देणेबाबत.

---

**महापालिका सचिव:-** हा विषय प्रशासनाने मागे घेतला आहे.

**महापालिका सचिव :- विषय क्र. १० वाचुन दाखवितात.**

---

⇨ विषय क्र. १० :—**खाजगी कंपनीकडून प्रशिक्षित ५८ फायरमन कंत्राटी पध्दतीने पुरवठा करणेकरीता न्युनतम निविदा धारकाशी करार करणेस व लागणा-या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत.**

---

**महापालिका सचिव:-** हा विषय देखील प्रशासनाने मागे घेतला आहे.

**महापालिका सचिव :- विषय क्र. ११ वाचुन दाखवितात.**

---

⇨ विषय क्र. ११ :—**प्रस्तावाची सूचना**

**वर्ग १ व २ चे उल्हासनगर महानगरपालिकेचे अधिकारी या हेडक्वार्टर (निवासस्थान) उल्हासनगर महानगरपालिका हद्दीत करण्यात येणेबाबतची भाजपा गटनेता सुचक श्री. प्रदिप रामचंदानी व अनुमोदक श्री. मनोज सयानी यांची सूचना विचारात घेणे.**

---

**महापालिका सचिव:-**प्रदिप रामचंदानी सर, पुरस्वानी सर यांना काही बोलायचे आहे का प्रस्तावावर? सुचक प्रदिप रामचंदानी सर आणि अनुमोदक मनाज सयानी सर आहेत.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-**मी उपस्थित आहे, माझा आवाज ऐकू येतो का.

**महापालिका सचिव:-**बोला ना रामचंदानी सर आपण बोला.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-**माझा आवाज ऐकू येतो का.

**महापालिका सचिव:-**होय, होय.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** विषय कसा आहे की मी एक आपल्याला प्रस्ताव दिला होता की आपले जेवढे वर्ग १ चे अधिकारी आहेत त्यांचे हेडक्वार्टर हे उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये नसल्यामूळे येथे आपल्या प्रशासन कामामध्ये खूप दिरंगाई होते आणि सरकारचे जे निकष आहेत त्यानिकषानुसार वर्ग १ आणि वर्ग २ चे अधिकारी जे प्रतिनियुक्तीवर येतातत्यांचे हेडक्वार्टर उल्हासनगरमध्ये असने गरजेचे आहे.विषय कसा आहे की, आपण बघितले की आपल्या आयुक्तांना सोडून कुठल्याही अधिकाऱ्याचे हेडक्वार्टर उल्हासनगरमध्ये नाही मग ते अतिरिक्त आयुक्त असो, ४ उपायुक्त असो आणि त्याच्या नंतर मुख्य लेखा अधिकारी असोमुख्य लेखा परिक्षक असो उपलेखा परिक्षक आणि आपले अकाऊंटंट, आपले शहर अभियंता, आपले सगळे इंजिनियर, आपला नगररचनाकार, जेवढे काही लोक आपल्या उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये शासनाकडून नेमलेले आपले अधिकारी आहेत त्यांचे सर्व हेडक्वार्टर उल्हासनगरमध्ये असायला पाहिजे असा राज्य सरकारचा निकष आहे. त्या निकषानुसार मला इतरचे अधिकारी किंवा आपले सामान्य प्रशासन विभागामध्ये असणारे लोक यांचे या बाबीवर आजपर्यंत का लक्ष गेले नाही? लक्ष गेले पाहिजे आणि हे सगळ्या

अधिकाऱ्यांना कशासाठी आपण सूट देतो कारण हे जे अधिकारी आहेत ते अधिकारी आपण बघितले तर काही मुंबई मध्ये राहतात, काही ठाणे मध्ये राहतात,काही पनवेलमध्ये राहतात आणि ते येताना कारने येतात आणि कारने आले की ते चार तास लागतातआणि कुठलेही अधिकारी वेळेवर महानगरपालिकेमध्ये हजर राहत नाही आणि वेळेवर हजर राहत नसल्यामुळे आपली प्रशासकीय जी गती आहे ती खूप हळू होते आणि गतिमान प्रशासन मिळत नाही याचा हेतू माझे असे म्हणणे आहे की, जे शासनाने नेमलेले अधिकारी आहेत आणि ज्यांच्याकडे हेड ऑफ डिपार्टमेंट आहेत त्या सगळया लोकांनी स्वत:चे हेडक्वार्टर हे उल्हासनगरमध्ये केले पाहिजे आणि जे करत नाही त्याचे कारण मला सुचवावे, कुठल्यातरी अधिकाऱ्याने मला सुचवावे की काय कारण आहे की हे लोक उल्हासनगरमध्ये राहत नाही ? त्यांचे हेडक्वार्टर उल्हासनगरमध्ये नाही त्याचेउत्तर मला मिळणे अतिआवश्यक आहे आणि गरजेचे आहे. हॅलो... हॅलो... माझा आवाज ऐकू येत आहे का?

**उप महापौर, श्री.भगवान भालेराव:-** हो येत आहे.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** माझी अशी विनंती आहे, उपमहापौर साहेब की कुठल्यातरी अधिकाऱ्याने मला उत्तर द्यायला पाहिजे की कशासाठी आपलेजेवढे अधिकारी आहेत ते राज्य सरकाराने दिलेल्या निकषाप्रमाणे येथे हेडक्वार्टर घेऊन...

**उपमहापौर, श्री.भगवान भालेराव:-**तेवढे क्वार्टर तयार करा.

**सदस्या, श्रीम. मिना सोंडे:-** मा. उपमहापौरजी ही खरच खूप गंभीर बाब आहे जोगंभीरपणे घेतली पाहिजे, हेडक्वार्टर नसेल तर आपण त्यांना भाडे तत्वावर फ्लॅट उपलब्ध करून दिले पाहिजे, आणि येण्या- जाण्याचे जेवढे भाडे होते तेवढ्यात इकडे उल्हासनगरमध्ये भाडे तत्वावर फ्लॅट उपलब्ध होतील आणि त्यांची सेवा आपल्याला वेळेचे वेळी मिळेल. कारण कधी आणिबाणीच्यावेळी कोणतेही अधिकारी उपलब्ध नसतात. माझी आणखी एक सूचना आहे.....

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** याचा खुलासा दयायला पाहीजे, उप महापौर साहेब माझा आवाज आपल्याला ऐकू येते का?

**उप महापौर, श्री.भगवान भालेराव:-** प्रदिपजी तुमचा आवाज येत आहे. जोरात आवाज येत आहे.

**सदस्य, श्री. महेश सुखरामानी:-** मा. उपमहापौरजी, प्रदिप रामचंदानी यांनी जो विषय मांडला आहे आणि मिना मॅडमने आता जे सांगितले त्याच विषयाला पुढे नेवून मला सांगायचे आहे की, मा. महापौर जी उल्हासनगरमध्ये जे महानगरपालिकेची जी मालमत्ता बिल्डरांकडे पडलेली आहे, एवढे फ्लॅट उपलब्ध आहे त्यांचा उपयोग का केला जात नाही? भाडे भरायचा सुद्धा काय गरज आहे? मा. महापौरजी, उपमहापौरजी,

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** सचिव महोदय, काही तरी तांत्रीक बिघाड झालेली आहे, माझा आवाज ऐकायला येत आहे का?

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:-** तुमचा आवाज येत आहे.

**सदस्य, श्री. अरुण आशान:-** प्रदिपजी तुमचा आवाज येत आहे.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** उप महापौर साहेब, कमीत कमी हात वर करा, माझा आवाज येत आहे का? मला तुमचा कुठलाही आवाज ऐकू येत नाही.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** महेश सुखरामनी बोला.

**सदस्य, श्री. महेश सुखरामानी:-** मा. महापौरजी, आयुक्त साहेब उल्हासनगरध्ये जी महानगरपालिकेची मालमत्ता बिल्डरांकडे पडलेली आहे, अनेक फ्लॅट व कॉमर्शियल मालमत्ता उपलब्ध आहेत ती अधिकाऱ्यांना

राहण्यासाठी उपयुक्त जागा आहे त्यामुळे हे कोणेतेही भाडे देण्याची आवश्यकता नाही या गोष्टीकडे लक्ष दिले गेले पाहीजे.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** माझी अशी विनंती आहे की साहेब, मला कुठल्या अधिकाऱ्याने हे सांगितले पाहीजे की कशासाठी आपण उल्हासनगरमध्ये हेड क्वार्टर नाही ठेवतात याचे कोणीतरी अधिकाऱ्याने उत्तर दिले पाहीजे ना.

**सदस्यश् श्री. राजेश वदारिया:-** मा. महापौरजी माझ्यामते, आपल्या महानगरपालिकेच्या ज्या मालमत्ता उपलब्ध आहेत त्यांना बनविण्यासाठी सुद्धा खर्च येणार. त्यापेक्षा काही फ्लॅट भाडे तत्वावर घेवून त्यांना दिले पाहिजे आता आपली प्रापर्टी आहे, तिला बनवण्यासाठी खर्च येणार आहे. तर चांगले असे होईल की, उल्हासनगर महानगरपालिका प्लॅट भाडयाने घेऊ त्यांना देण्यात यावेत. त्याने आपला एच.आर.ए. वाचेल, खर्च आपला जास्त होणार नाही आणि दुसरी बाब अशी की, हे अधिकारी उल्हासनगरमध्ये असतील तर कोणेतेही आणिबाणीच्यावेळी ते शहराच्या कोणत्याही कामी येतील.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** महापौर मॅडम माझ्या प्रश्नाचे आणखी उत्तर मिळाले नाही. केवळ परत परत ऑडीओ ऑफ केला जात आहे. माझी विनंती आहे की, मी जो अशाकीय प्रस्ताव दिला आहे, पण तांत्रिक दृष्टया माझा आवाज म्युट होत आहे.

**सदस्य, श्री. अरुण आशान:-**मा. सचिव मॅडम महापौरांचा आवाज म्युट आहे, अरे नाही, प्रदिप भाई, आपला आवाज येत आहे, बोला, बोला

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** माझी विनंती आहे की, मी जो अशासकीय प्रस्ताव ठेवला आहे तो या तांत्रिक दृष्टीकोनाने ऑनलाईन.....

**सदस्य, श्री. अरुण आशान:-**मा. सचिव मॅडम, महापौरांचा ऑडीओ म्यूट आहे, तो जरा सुरू करा.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** आणि मला असे वाटते की, हे तांत्रिक जे आहे आपली गडबडी, त्याच्यात आमचे महत्वाचे मुद्दे, आपण त्याचे उत्तर देवू शकत नाही ही खुप दु:खाची बाब आहे. तरी मी महापौर मॅडम, आईंना सांगेल मी आपल्या समोर एक प्रस्ताव दिला आहे, अशासकिय प्रस्ताव त्याचे उत्तर मला मिळणे अपेक्षित आहे पण दुर्दैवाने कुठल्याही अधिकारीने कोणतेही उत्तर अद्याप दिलेले नाही.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:-** हॅलो, ऐकू येत नाही आहे, ५ मिनिटे थांबा. नंतर बोला

**महापालिका सचिव:-** कनेक्शन करीत आहेत, थोडे सैल झाले आहे कनेक्शन,५ मिनिटे वाट बघा सर्वजण.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:-**५ मिनिटे थांबा.

**सदस्य, श्री. अरुण आशान:-** महापौर मॅडमचा आवाज येतआहे आता.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:-** माझा येतआहे, पण तुमचा नाही येत आहे मला.

**उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-** जो ठराव आपण मांडलेला आहे , त्या ठरावाच्या अनुषंगाने आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की मुख्यालयाच्या ठिकाणी अधिकारी वर्ग १ आणि २ चे यांनी राहणे आवश्यक आहे,एम. एम. आर. रिजनच्या बाहेरील जिल्ह्यांसाठी अट लागू आहे,एम. एम. आर. डी.ए. रिजनमध्ये अद्याप ही अटअजून लागू नाही, याबाबत शासनाचे धोरण काय आहे, ते धोरण तपासले जाईल, त्या धोरणानुसार जर आवश्यकता असेल तर सर्व अधिकारी, कर्मचारी यांना मुख्यालयाच्या ठिकाणी राहणे बाबत मग सांगण्यात येईल.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-</u>**नाईकवाडे साहेब आपण जे बोलत आहेत ते चुकीचे बोलत आहेत,नाईकवाडे साहेब मी तुम्हाला शासनाचा निकष असा नाही की, एम.एम.आ.रडी.ए. च्या रिजनमध्ये आपण कुठेही राहू शकतात, जर असा कोणता निकष असेल तर त्याचे मला उत्तर दया.

**<u>उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-</u>** ते शासनाचे धोरण आम्ही तपासून घेतो. साहेब

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-</u>** माझे असे म्हणणे आहे की,नाईकवाडे साहेब मी या निकषांचा अभ्यास केलेला आहे म्हणून मी तुम्हाला सांगतो आहे की मी आज नाही दिलेला आहे प्रस्ताव मी हे ३ महीने अगोदर दिलेले आहे जर आपण हे तीन महिन्यात आपल्याला हे ८ दिवस अगोदर हे एजेंडा मिळालेला आहे आणि आयुक्तांनाही याची कॉपी दिलेली आहे की, कशासाठी आपले अधिकारी येत नाही, तर तुम्ही ३ महिन्यात याची एम.एम.आर.डी.ए. ची कुठली तर प्रत आमच्या सदस्यांना दिली पाहिजे होती अशी आम्हाला अपेक्षा होती कारण आपण चांगले प्रशासक आहे. याचा आम्ही तुम्हाला याचे कौतूकही केलेले आहे. वेळोवळी पण तर तुम्ही सांगेल की म्हणजे असे काहीही तुम्ही उत्तर देणार आणि म्हणणार की एमएमआरडीए मध्ये असा निकष नाही आहे पण हे बरोबर नाही आहे, मान्य केले असेल तर आपण त्याचा आम्हाला पुरावा द्या.

**<u>उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-</u>** एक आपल्या आदरपूर्वक निदर्शनास आणतो की, साहेब मी स्वत: मंत्रालयात असताना मी डोंबिवलीतून येवून करत होतो पण आम्हाला असे प्रशानाकडून इथे जेएम.एम.आर.डी.ए. रिजनमधील जी जागेची अडचण आहे ह्या जागेच्या अडचणीमूळे आपल्या एम.एम.आर. रिजनमध्ये अधिकाऱ्यांना राहण्यासाठी अलाऊड केले जाते आणि मुख्यालयात राहण्याची बंधनकारक केले जात नाही अशी माझी माहिती आहे त्या माहितीच्या अनुषंगाने शासनाचे जे धोरण आहे साहेब ते आम्ही तपासत आहोत शासनाला आम्ही पत्र व्यवहार करतोय आणि त्यानुसार जी माहिती असेलत्यानुसार आपण कारवाई करू असे मी म्हणत नाही की आपण चुकीचे आहात किंवा आपण माहिती चुकाची दिली.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-</u>** नाही, नाही, नाही, नाईकवाडे साहेब मी कुठलाही तुम्हाला आरोप करत नाही आहे माझी व्यथा आहे ती व्यथा मी सांगता आहे की जर आपले अधिकारी उल्हासनगरमध्ये राहत असते तर आपले प्रशासन आणखी गतीमान झाले असते आणि कदाचित तुम्ही असे मी बोलत नाही तुम्ही ते काय तुमचे काम करीत असाल पण जेव्हा आपण कोणत्या लोकल बॉडी मध्ये काम करत असतो तर अहोदिवसरात्र आपल्याला काम करावे लागते कधी कधी आणि त्यानुसार सर्व मुख्य अधिकारी, आयुक्तांना सोडून उल्हासनगर मध्ये राहत नाही आणि ते जर एक ४०-५० कि.मी. लांब राहत असेल तर उल्हासनगरच्या नागरिकांना नाहक त्रास घ्यावा लागेल जर अशी कुठली परिस्थिती आली तर माझी अशी आपल्याला हात जोडून विनंती आहे की, जे तुम्ही मला सांगतायेत निकष आहे एम.एम.आर.डी.ए. चे म्हाणणे आहे त्या निकषाचा मला पूरावा द्यावा जर तुम्ही पूरावा देत नाही तर हे असे इकडचे तिकडचे उत्तर देणे चुकाचे नक्की ठरणार आहे, असे माझे स्पष्ट मत आहे.

**<u>उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-</u>** साहेब, आपल्या निदर्शनास आणतो की आमचे आयुक्त साहेब, आमचे उपायुक्त, कर विभाग हे त्याच मुख्यालयाच्या ठिकाणी राहतात, आमचे अतिरिक्त आयुक्त मॅडम, मी स्वत: मुख्यालय ८ किलोमिटरच्या परिघात राहत आहोत, एक दोन-तीन अधिकारी फक्त आपले लांब राहत आहेत या विषयी आपण....

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-</u>** हा विषय मी प्रलंबित ठेवू येत्या महासभेपर्यंत जर तुम्ही उत्तर देत असेल तर मी प्रलंबित पण ठेवू शकतो.

**<u>उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:- आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-</u>** साहेब ऐकून तरी घ्या आपल्या महानगरपालिकेची निवास स्थानाची अधिकाऱ्यांसाठी व्यवस्था नाही आहे, आपण आता प्रयत्न करीत आहोत की अधिकाऱ्यांसाठी निवासस्थान इथे निर्माण केले जावे आणि त्यासाठी

आपण २५% जी मालमत्ता आपल्याकडे आहेत त्या मालमत्ते मधील काही भाग फ्लॅट मध्ये कनवर्ट करणे, त्या मालमत्ता आयडल पडून आहेत तसे महापालिकेला सुद्धा त्यातून काही उत्पन्न...

उपमहापौर, श्री. भगवान भालेराव:- प्रदिप जी , या संदर्भात नाईकवाडे साहेब तुम्हाला स्वत:वैयक्तिक लेखी उत्तर देतील आणि.....

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** आपण जर मनावर घेतले की उल्हासनगर मध्ये राहायचे तर तुम्हांला घर देण्याची आमची जबाबदारी आम्ही तुम्हाला सेंचूरी क्लब मध्ये कोठेही भाडेनी घर घेवून देउ पण तुम्ही तुमची मानसिकता ठेवा, हे घर नाही हे नाही अशी मानसिकता बोलायला काहीच अर्थ नाही जर तुम्हची मानसिकता असेल तर तूम्हाला सर्व अधिकाऱ्यांना एका आठवड्यात घर देता येतात. उलहासनगर मध्ये......

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** प्रदिपराव शासनाचे धोरण तपासून याबाबत निर्णय घेण्यात येईल. आपण तसा ठराव करु म्हणजे संपेल.

**महापालिका सचिव:-**ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार वर्ग १ व २ चे उल्हासनगर महानगरपालिकेचे अधिकारी या हेडक्वार्टर (निवासस्थान) उल्हासनगर महानगरपालिका हद्दीत करणेसाठी प्रशासनास नियमानुसार कार्यवाही करण्याचे निर्देश देत आहे.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** पण ठराव ऐकला नाही ना राव.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** राहू द्या,राहू द्या प्रदिपराव कृपया शांत बसा.

काही सदस्य :—पास—पास......

महापौर तथा पीठासीन अधिकारी:—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ विषय क्र. ११:—**प्रस्तावाची सूचना**

**वर्ग १ व २ चे उल्हासनगर महानगरपालिकेचे अधिकारी या हेडक्वार्टर (निवासस्थान) उल्हासनगर महानगरपालिका हद्रदीत करण्यात येणेबाबतची सुचक म्हणून श्री. प्रदिप रामचंदानी व अनुमोदक श्री. मनोज सयानी यांची सूचना विचारात घेणे.**

प्रस्तावना

वर्ग १ व २ चे उल्हासनगर महानगरपालिकेचे अधिकारी यांनाHead quarter (निवासस्थान) उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये नसल्यामुळे विकास कामांना अवरोध येत असल्यामुळे सर्व अधिकारी यांना येत्या १५ दिवसात Head quarter (निवासस्थान) उल्हासनगर महानगरपालिकेचे हदित करण्यात यावे अशा प्रस्तावाची सुचना १ जे मध्ये समाविष्ट करुन चर्चेसाठी ठेवण्यात यावे.

महासभा ठराव क्र:०९ दिनांक:—१७/०९/२०२१

सुचकाचे नाव :— श्री. प्रदिप रामचंदानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. शंकर लुंड

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणेवर्ग १ व २ चे उल्हासनगर महानगरपालिकेचे अधिकारी यांचे हेडक्वार्टर (निवासस्थान) उल्हासनगर महानगरपालिका हददीत करण्यासाठी शासनाचे धोरण पाहून याबाबतीत कार्यवाही करण्याचे प्रशासनास निर्देश देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव:-** विषय क्र. १२ वाचुन दाखवितात.

———————————————————————————————————————————

⇨ विषय क्र. १२ :—**प्रस्तावाची सूचना**

सिंधुभवनचे निर्माण मागच्या पाच वर्षापासून पूर्ण करण्यात येत नसल्यामूळे ठेकेदाराला काळ्या यादीत टाकून नविन ठेकेदार नियूक्त करणे बाबतभाजपा नगरसेवक सुचक श्री. मनोज सयानी व अनुमोदक श्री.शंकर शेरी लुंड यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

———————————————————————————————————————————

**सदस्य, श्री.मनोज सयानी:-**मा. महापौर जी आजचा हा विषय आणण्यामागचे फक्त एकच कारण आहे की सिंधी समाजाची आस्था आणि या शहरात सिंधी समाजाच्या रंगमंचाशी निगडीत व्यक्ती, सांस्कृतिक कार्यक्रम करणारे व्यक्ती, तसेच समाजातील थोर व्यक्ती झालेल्या आहेत त्या व्यक्तीसाठी स्मृतीसाठी आणि त्यांचे जे पण वार्षिक कार्यक्रम होतात, हे सर्व एका ठिकाणी साजरे करण्यासाठी एक संकल्पना होती, सन २०१५ मधील महासभेमध्ये पहिल्यांदा हा प्रस्ताव आला की सपना गार्डन परिसर ( स्वर्गिय राजीव गांधी उद्यान) सपना गार्डन परिसरात सिंधुभवनचे निर्माण करण्यात यावे, सन २०१५ च्या त्या महासभेची आठवण मी तुम्हाला करून देऊ की त्यावेळी स्वर्गिय आपल्या देशातील महान व्यक्ती होऊन गेले जसे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरजी, छत्रपती शिवाजी महाराजजी, या प्रकारचे बरेच प्रस्ताव त्या महासभेत जे विशेष बजेटची महासभा होती त्यात आले होते तेव्हा माझा विचार असा होता की, सिंधुभवन नावाचे सुद्धा एक भवन निर्माण करण्यात यावे ज्यात आपले सिंधी समाजाचे लोक सांस्कृतिक कार्यक्रम करू शकतील आणि एक यादगार भवनबनेल,त्या वेळी, त्या वेळेचे आमदार श्रीमती ज्योती कालानीजीने, त्यावेळी आपल्या महानगरपालिकेचे सदस्या देखील होत्या,स्वर्गिय ज्योती कालानी यांनी देखील त्यावेळी पूर्ण,एक पाउल उठवले होते. हा मुद्दा मांडला होता आणि सर्व पक्षांनी त्यावेळी सहमती दिली आणि सिंधुभवनचे निमार्ण कार्य सूरू झाले. अजा दुर्दैवाने मला बोलावे लागत आहे की आज ७ वर्षे होत आली आहे, जे कार्य एक ते दिडवर्षाच्या कालावधीत पूर्ण झाले पाहीजे होते त्या कामाला आज ७ वर्षे होत आली आहे तरीही आजपर्यंत मात्र ६०-६५ टक्केच काम झाले आहे. मी तुम्हाला लक्षात आणून देऊ इच्छितो की त्याच बजेटमध्ये डॉ. भिमराव बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिकेचा सुद्धा ठराव करण्यात आला होता आणि आज जव्हार हॉटेलच्या जवळ डॉ.बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिका बनून तयार आहे, आम्ही मागच्या वर्षी सन २०१९ मध्ये त्याचे लोकार्पण केले आज लोक त्याचा फायदा पण घेत आहेत व अभ्यासिका सुरू आहे. आजच्या प्रस्तावातून माझा प्रश्न असा आहे की या कार्याला ७ वर्षे का लागली आहे ? याकार्यासाठी त्यावेळी १ कोटींची तरतुद करण्यात आली होती आणि दर वर्षीच्या बजेट मध्ये १ ते दिड कोटी त्यामध्ये वाढ करत करत आज ४.५ -५ कोटीचे तर बिल झाले आहे, आणखी १ कोटींची नविन तरतुद ह्या २०२०-२१ च्या बजेट मध्ये करण्यात आली आहे. जे कार्य २०१५-१६ मध्ये १ ते दीड कोटीमध्ये पूर्ण झाले पाहीजे

होते, माझा सरळ आरोप आहे की ते मुद्दामहून उशीर करण्यात आला आहे, जेणेकरून त्याचा काँट्रेक्टर ला फायदा होईल व दुसरे असे की त्याचे बजेट आज वाढत जावो, त्याचा कालावधी वाढत जावो आणि २ कोटींचे काम आज ४ ते साडे चार कोटीं पर्यंतचे बिल झाले आहे व तिसरे की आज समाजासोबत खूप मोठा धोका केला जात आहे, भावनांना ठेच पोहोचवली जात आहे कारण समाजामध्ये त्यावेळी याचे खूप मोठ्या जल्लोषात याचे शुभारंभ, याचे भुमिपूजन केले होते, खुप मोठे मोठे संत महात्मा येथे आले होते आणि असे झाले होते की १ ते दीड वर्षांमध्ये याचे कार्य पूर्ण होईल,पण यामध्ये का उशीर होत आहे ? काय कारण आहे? मी तर माझे आरोप केले, एक तर काँट्रेक्टर ला फायदा होण्यासाठी, दुसरा बजेट वाढविण्यासाठी आणि तिसरा समाजाला धोका देण्यासाठी केले गेले आहे. तर माझा आजच्या या प्रस्तावाच्या माध्यमातून ही मागणी आहे की, पहिले प्रशासनाने उत्तर द्यावे की उशीर का झाला? दुसरा यामध्ये किती बजेटची तरतूद होती आणि आज किती बिल बनले आहेआणि किती प्रलंबित काम आहे व शेवटचे ह्या सिंधु भवनचे निर्माण करणेसाठी सिमा कधीपर्यंत आहे व कधीपर्यंत याचे निर्माण केले जाईल? पहिले ह्यावर मला उत्तर पाहिजे.

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-**मा.महापौरजी, मा. उपमहापौरजी, मा. आयुक्तजी, या विषयाबद्दल मी आपणांस मार्गदर्शन करू इच्छितो, पहिले १ कोटीचे काम होते व ते काम वाढून त्याला ४ कोटींचे करण्यात आले आणि त्यामध्ये काही तांत्रिक कारणास्तवत्यामुळे थोडा उशीर झाला, थोडा कोवीड मुळे उशीर झाला आणि आम्ही काँट्रेकटरला दंड लावला आहे, डिसेंबर २०२१ पर्यंत पूर्ण करणेसाठी आम्ही त्याला १ लाख ४५ हजार रूपयांची पेनल्टी वसूल केली आहे व आम्ही कोणतेही बजेट वाढवत नाही आहोत, या हिशोबाने डिसेंबर २०२१ पर्यंतहे काम पूर्ण होईल सर.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** ऐजंसीचे नाव काय आहे?

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-**सतीश कन्स्ट्रक्शन, सर.

**सदस्य, श्री. शंकर लुंड:-** ठीक आहे, सितलानी जी धन्यवाद. लवकरात लवकर काम पूर्ण झाला पाहीजे.

**सदस्य, श्री.मनोज सयानी:-** शेरी जी माझा प्रश्न पूर्ण झालेला नाही, मी यांच्या माहीतीशी सहमत नाही आहे, यांनी सांगीतले आम्ही दंड लावला आहे, १ लाख काहीतरी सांगीतले, मग करोड रूपयांचा भ्रष्टाचार करून बिलची रक्कम वाढवून, टेंडर प्रकियेत पैशे वाढवून, वेळ वाया घालवून,समाजाच्या भावनेशी खेळून मात्र १ लाख ४० हजाराने संतुष्टी आहे का?

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-**सरजी आम्ही त्यांचे बिल नाही बनविले आहे, बिल आतापर्येंत अडीच कोटींचे बनले आहे दिड कोटींचे बाकी आहे, सरल काम झाले आहे, त्यामध्ये काहीही वाढ केलेली नाही, एक्सटेंशन क्लॉज त्यामध्ये नाही आहे,काँट्रेकटरला याचा काहीही फायदा होणार नाही आहे सरजी.

**सदस्य, श्री.मनोज सयानी:-** आपण मला सांगाल का याची शेवटची समय सिमा आपण काय ठेवली आहे आपण? कधीपर्यंत पूर्ण होईल हे काम? काय डेडलाईन आहे?

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-**डिसेंबर २०२१ पर्यंतहे कामपूर्ण होईलसर.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** मा.महापौरजी, मी शहर अभियंतांना एक प्रश्न विचारू इच्छितो, त्यांनी सांगितले की या कामाची सुरवातीचा अंदाजित खर्च १ कोटी होती, त्या नंतर ४ कोटी केली गेली, तर जी बाकीचे ३ कोटींचे काम त्याच एजंसीला ५ (२) (२) मध्ये दिले गेले की त्याची निविदा केली गेली का?

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-**सर एक सेकंद मी फाईल काढून सांगतो तुम्हाला.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** नाही नाही, फाईल काढून सांगतो, म्हणजे एवढा मोठा विषय आहे, या प्रकारचे उत्तर आम्हाला त्वरीत हवी असतात.तुम्ही त्याला लांबवू नाही शकत, माझ्या हिशेबाने, जेवढी मला माहीती आहे, की एक करोडचे काम ५ करोडचे करून त्याच ठेकेदाराला दिले गेले, एवढे मोठे काम

दिल्यानंतरही प्रशासन संपुर्णपणे विफल राहीले, त्या ठेकेदाराला मागच्या ५ वर्षापासून, येथे एक विधायक होते आमचे ज्योती भाभी कालानी,त्या बोलून बोलून ठकल्या, त्यांची मनाची इच्छा होती की त्यांच्या हयातीत हे कार्य पूर्ण झाले पाहीजे, पण मला दु:ख होत आहे सांगताना की पूर्ण समाजाच्या भावनांशी आपण खेळत आहे, मी केवळ विचारत आहे फक्त की त्याच ठेकेदाराला काम कसे मिळाले, १ करोडचे काम ५ करोडचे झाले, ठेकेदार १ करोडच्या वेळी तोच होता, ५ करोडच्या वेळी सुद्धा तोच होता,एक तर तुम्ही त्याला ५ (२) (२) मध्ये दिले असनार, जर ५ (२) (२) मध्ये दिले तरी माझा त्याला काही विरोध नाही आहे, दिले चांगली गोष्ट आहे. जेव्हा कोणाला ५ (२) (२) मध्ये काम दिले जाते आणि त्यानंतरही काम पूर्ण होत नाही, त्याला दंड लावायची वेळ येते, यावर शहर अभियंताजी तुम्हाला वाटत नाही आहे का की कुठेना कुठे प्रशासन यामध्ये विफल होत आहे.

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-**सरजी काही कोव्हीडमुळे व काही तांत्रिक कारणांमुळे उशीर झाला आहे, यामुळे आम्ही खूप प्रयत्न करीत आहोत.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-**कोव्हीडमुळे आणखी काही बिल्डींग जसे लास्सीजींनी सांगितले की आपली अभ्यासिका त्याच वेळी होती, शाळा क्रमांक ८,११ त्याच वेळी होते,शाळा क्रमांक १४ त्याच वेळी होते, मोठे मोठे रोड हे इनफ्रास्ट्रक्चरचे रोड त्यावेळी होते, ते सर्व पूर्ण झाले, करोडो रूपयांचे कामे या दरम्यान पूर्ण झाली, याच कामाचे, ज्याच्याशी आमच्या समाजाची भावना आहे त्याला कोवीडचे कारण देण्यात आले, मी सागतो त्यावेळी जेव्हा निंबाळकरजी च्या वेळचे हे टेंडर आहे, त्यावेळचे एकही कार्य अपूर्ण नाही आहे, तुम्ही याला कसे सांगू शकतात की कोवीडमुळे ठांबले, सितलानीजी, तुम्ही जे सांगतायेत त्याच्याशी मी सहमत नाही आहे, माझी तुम्हाला विनंती आहे कारण आपण शहर अभियंता आहात शहराच्या हिताचेच सांगणर, तुम्ही हे सांगा की तुम्हाला ठेस नाही का पोहचत की सिंधू भवन जे सिंधी समाजाचे एक अशी भावनात्मक वास्तू आहे, ज्यामध्ये पूर्ण सिंधचे प्रदर्शन होईल ते लवकर बनून तयार झाले पाहीजे.

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-**मा.सदस्यजी मला धक्का तर बसत आहे पण आता यामध्ये उशीर झाला आहे तर आपण याला डिसेंबरमध्ये पूर्ण करुया, माझी विनंती आहे आपणांस की आम्ही त्याला पेनल्टी लावली आहे तर डिसेंबर २०२१ मध्ये पूर्ण करणार सर.

**सदस्य, श्री.मनोज सयानी:-**ही जबाबदारी आता प्रशासनाची असेल पूर्णपणे, ही वेळेची सिमा आपण दिली आहे डिसेंबर २०२१ पर्यंत, ही प्रशासनाचीजबाबदारी असेल हे मिनिट्स मध्ये आले पाहीजे.

**सदस्या, श्रीम. मिना सोनेजी:-**मनोज जी...

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-**लासीजी मि विनंती करतो की डिसेंबर २०२१ पर्यंत त्याने जर नाही बनविले तर काय त्याचा कॉंट्राक्ट रदद करणार, शहर अभियंता यांनी आजच सांगावे डिसेंबर २०२१ काही दूर नाही आहे, एवढा वेळ वाट बघितली आहे ३-४ महीने आणखी वाट बघू या.

**सदस्य, श्री.मनोज सयानी:-**हीपूर्णपणे जबाबदारी आता प्रशासनाची असेल,शहर अभियंता यांची असेल......

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-**प्रदिपजी,तुम्ही आराम करावा थोडा, एक डॉक्टर म्हणून सल्ला देत आहे तुम्हाला. पुढचा विषय घ्या.....

**सदस्य, श्री. अरुण आशान:-**पुढचा विषय घ्या प्लीजडिसेंबर २०२१ पर्यंत झाले पाहीजे प्रशासनाने काळजी घ्यावी.........

**सदस्या, श्रीम. मिना सोनेजी:-**मा. महापौरजी, माझा एक प्रश्न आहे ठेकेदाराला, सितलानीजींशी एक प्रश्न आहे, सर आपण ही जी काय पेनल्टी लावली त्याबद्दल थोडे विस्तारात सांगाल का? काय हिशोबाने लावली आहे, टाईम पिरीयड काय आहे?

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-**मा.सदस्यजी ३ कोटी ६१ लाखचे जे काम होते, त्याचा टेंडर कॉल केला गेला होता जर २०२१ पर्यंत कॉन्ट्रक्टरने काम पूर्ण केले नाही तेव्हा त्याला ब्लॅकलिस्ट करणार.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** ठिक आहे धन्यवाद धन्यवाद.

**सदस्या, श्रीम. अंजली साळवे:-**मा. महापौर मॅडम,मा.आयुक्तजी, मा.सितलानीजी मी सांगू इच्छिते की आमचा कुर्ला कॅम्प शिवमंदिरचा जो रोड आहे त्याचे कलवर्टचे काम कधी पूर्ण होणार आहे? वन साईड रोड पूर्ण बॅरिकेट लावले आहे आणि दुस-या साईडला अर्ध्या रोडवर स्टाईल्स लावल्या आहेत. तिकडे कधीही दुर्घटला होऊ शकते, झाली सुद्धा आहे, एक वर्षापासून ते काम प्रलंबित आहे ह्या पक्षा काय उदाहरण आहे काम प्रलंबित राहायचे, तिकडे जाउन बघा रोज आम्हाला नागरिकांच्या आलोचनांना सहन करावी लागते व तो मेन रोड आहे, त्यात एवढा उशीर का होतोय? आणि कधी होणार ह्याचे उत्तर मला आज पाहीजे.

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-मॅडमजी प्रक्रिया चालू आहे. आता टेंडर प्रक्रियेची फायईल प्रोसेसमध्ये आहे. माझ्या हिशोबाने १५ दिवसाच्या आतमध्ये स्थायी समितीची मान्यता घेऊ काम चालू करु.**

**सदस्या, श्रीम. अंजली साळवे:-मला एक तारीख सांगा की, या तारखेपासून काम चालू होईल नाही तर दुस-या दिवसापासून मी तिथे उपोषण चालू करेल.**

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-स्थायी समितीची मान्यता घेतल्या नंतर त्वरीत चालू होईल.**

**सदस्या, श्री. अंजली साळवे:-** किती दिवसामध्ये होईल?

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-** या महीन्यामध्ये होईल मॅडम

**सदस्या, श्रीम. अंजली साळवे:-** या महीन्यामध्ये नक्की होईल ना? एक महीन्यामध्ये कसेही करुन चालू करा, नाही तर आम्ही तिथे उपोषणाला बसणार आहेत.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:-**महापौर महोदया, सितलानीजी..

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-**यस सर.

**सदस्या, श्रीम. अंजली साळवे:-** मा. महापौर मॅडम, आपण यांना आदेश दया.

**सदस्य, श्री. अरुण आशान:-** आबा बोला.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:-** हे एकच असे काम नाही तर सगळयाच कामांच्या बाबतीत अशा तक्रारी आहेत की, दिलेली कामे विहीत वेळेवर होत नाहीत, वर्क ऑर्डर दिल्या नंतर सुध्दा चालू होत नाही आणि चालू झाल्या नंतर ब-याच महीन्या पर्यंत रखडले जाते. उप आयुक्त साहेब लक्ष ठेवा तुमच्या देखभाली खाली उदया आम्हांला तक्रार करण्याची आवश्यकता पडणार नाही. आयुक्त महोदय एकदा वर्क् ऑर्डर दिल्या नंतर काम चालू झाले किंवा नाही हे सिस्टमने केले पाहीजे.

**सदस्य, श्री. राजेश वानखेडे:-** या लोकांना खुप वेळा सांगितले होते, पत्र पण दिले आहेत आणि ते टेंडर आपण सगळे करुन पण घेतलेले आहेत. ते लवकरात लवकर काम चालू होणार आहे.

**सदस्या, श्रीम. अंजली साळवे:-** मा. आयुक्त साहेब, हे काम लवकरात लवकर सुरु करा, नाही तर उपोषणाला बसण्याची शक्यता आहे.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:-**हे नाही प्रत्येक बाबतीत,प्रत्येक कामाला टाईम लिमिट असले पाहीजे. जी मुदत आहे, टेंडर देताना, टेंडर प्रक्रिया करतांना ते मुदतमध्ये जर झाले नाही तर त्याला पेणाल्टी ठेवा, ठेकेदाराने काम

चालू केले नाही. विहीत मुदतीत काम केले नाही तर पेनाल्टी ठेवा, पेणाल्टी ठेवल्याशिवाय हे ठेकेदार सुधारणार नाहीत.

**सदस्य, श्री. राजेश वानखेडे:-**ठेकेदार मुददामहून लेट करतात.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:-**टेंडर दिल्या नंतर काम विहीत मुदतीत झाले पाहीजे, जर काम विहीत मुदतीत झाले नाही. तर त्याला दंड करायचे. दंड आकारणी चालू करा.

**सदस्या, श्रीम. अंजली साळवे:-**दुसरी गोष्ट म्हणजे कुर्ला कॅम्प ते कैलास कॉलनी पर्यंत पुर्ण खडडयानी भरलेला रस्ता आहे. तिथे फक्त् खडी टाकली जाते आणि त्याची अवस्था तर बघा खडीवरुन अपघात होत राहीले आहेत.

**सदस्य, श्री. राजेश वानखेडे:-**तिथे पुर्ण माती चिखल आहे.

**सदस्य, श्री. शंकर लुंड:-** पुर्ण रोड खराब आहे, डांबराचे काय झाले?

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** महापौर मॅडम बघा सर्व नगरसेवकांची व्यथा आहे.

**महापालिका सचिव:-** मा. पिठासिन अधिकारी काही बोलू इच्छितात, तुम्ही दोन मिनीटे शांत रहा.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:-** सितलानीजी, सदस्य काय बोलत आहेत, त्याचे उत्तर दया.

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-** होय मॅडम मी डांबराचे काम करण्यासाठी ठेकेदाराला सांगितले आहे. एक दोन दिवसामध्ये डांबराचे काम चालू होणार आहे.

**महापालिका सचिव:-**मी ठराव वाचत आहे, काही करेक्शन असेल तर सांगा.ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्या प्रमाणे सिंधू भवनाचे काम डिसेंबर २०२१ पर्यंत पुर्ण करण्याचे प्रशासनास निर्देश देत आहे. सदर काम पुर्ण न झाल्यास कारवाई करण्यास प्रशासनास निर्देश देत आहे.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:-** कारवाई म्हणजे काय?

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-** ब्लॅक लिस्ट करा.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-** ठेकेदाराला ब्लॅक लिस्ट करणे हे ठरावामध्ये टाका.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** काळया यादीत.

**महापालिका सचिव:-** काळया यादीत टाकण्याचे आदेश देण्यात येत आहे. ठिक आहे पास..

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-**पास...पास..

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-** ओके, ओके, पास...

काही सदस्य :—पास—पास……

महापौर तथा पीठासीन अधिकारी:—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑विषय क्र.१२:–सिंधु भवनचे निर्माण मागच्या ५ वर्षा पासुन पुर्ण करण्यात येत नसल्यामुळे ठेकेदाराला काळया यादीत टाकुन नविन ठेकेदारास नियुक्ती करणे बाबत
भाजपा नगरसेवक सुचक श्री. मनोज सयानी व अनुमोदक श्री. शंकर शेरी लुंड यांची सुचना विचाारात घेणे.

प्रस्तावना

सिंधु भवनचे निर्माण मागच्या ५ वर्षा पासुन पुर्ण करण्यात येत नसल्यामुळे ठेकेदाराला काळया यादीत टाकुन नविन ठेकेदारास नियुक्ती करणे बाबत अशा प्रस्तावाची सुचना १ जे मध्ये समाविष्ट करुन चर्चे साठी ठेवण्यात यावे.

महासभा ठराव क्र:१२ दिनांक:–१७/०९/२०२१

सुचकाचे नाव :– श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :– श्री. कलवंतसिंह सोहता, श्री. शंकर लुंड

ही महासभासभेत झालेल्या चर्चेअंती, सिंधु भवनाचेकाम ५ वर्षापासून पुर्ण करण्यात येत नसल्यामुळे सदरचे काम डिसेंबर २०२१ अखेर पर्यंत ठेकेदाराकडून पुर्ण करुन घेण्याचे प्रशासनासनिर्देशदेत आहे.

तसेच,

१)सदर काम विहीत वेळेत पुर्ण करुन घेण्याची जबाबदारी प्रशासनाची राहील.

२)विहीतवेळेतठेकेदाराने काम न केल्यास ठेका रदद करण्याचे प्रशासनास निर्देश देत आहे.

या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाचीसही/–

अनुमोदकाचीसही/–

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी

सर्वसाधारण महासभा

उल्हासनगर महानगरपालिका

**महापालिका सचिव :- विषय क्र. १३ वाचुन दाखवितात.**

---

⇨ विषय क्र. १३ :—**प्रस्तावाची सूचना**

**OFC केबल टाकण्यासाठी जियो इंफोटेक, दिनेश इंजिनियरींग प्रा.लि. कंपनीने केलेल्या रोडच्या अवैद्य खोदकामावर कारवाई करणेबाबत. पालिका सदस्य सुचक म्हणुन श्री. राजेश वदारिया व अनुमोदक श्री.जमनादास पुरस्वानी, श्री. राजु जग्यासी, श्री. मनोज लासी यांची सूचना विचारात घेणे.**

---

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-**मा. महापौरजी, जेव्हापासुन स्थायी समितीने एक पॉलीसी बनविली आहे. सिमेंट कॉंक्रिट खोदण्याचे १० हजार मिटरचे, डांबरच्या रोडचे ९००० मीटरचे आणि इंटर ब्लॉकचे साधारण ८५०० मीटरच्या खोदण्याचे पैसे OFC केबल टाकणा-यांकडून घेतले जाईल. तेव्हापासुन या पॉलिसीमुळे भरपूर पैसे उल्हासनगर महानगरपालिकेला मिळाले आहेत. प्राधिकृत केले होते त्यानंतर आजपर्यंत कोणते ही FIR नाही झाले त्यांनतर काही अभियंता आणि ठेकेदारांच्या संगनमताने काही चुकीची कामे झाली आहेत. ज्यावेळी मी स्थायी समितीचा सभापती होतो.त्या वेळी मी आयुक्तांच्या लक्षात ही गोष्ट आणली होती. ज्यामध्ये मी त्यांना खुप सारे पत्र दिले होते आणि त्या पत्रांवर लक्ष देवून त्यांनी दोन वेळा कल्याण बदलापूर रोडवर OFC केबल दोन वेळा टाकली होती आणि त्याच्यावर कारवाई केली होती आणि ती जप्त केली होती. त्या नंतर १५ सप्टेंबर, २०२० ला एक परिपत्रक काढून उप अभियंता सार्वजनिक बांधकाम विभागाला FIR करण्यासाठी प्राधिकृत केले होते. त्यानंतर आजपर्यंत कोणतीही FIR नाही झाली. कल्याण बदलापूर रोड आणि कल्याण मुरबाड रोड जो रस्ता आमच्या उल्हासनगर महानगरपालिकेपासुन जात आहे. त्याच्यावर त्यांनी बेकायदेशीर OFC केबल टाकली आहे. जी अतिरिक्त आयुक्त जुईकर मॅडमने स्वत: रंगेहाथ त्यांना पकडले होते त्यानंतरही कोणतीही कारवाई झाली नाही. पुर्व आयुक्त श्री. सुधाकर देशमुखने जानेवारी २०२० ला एक नोटीस दिली होती ज्यात त्यांनी म्हटले होते की, आपण आतापर्यंत किती OFC केबल टाकली आहेत. आणि किती OFC केबलची परवानगी घेतली आहे त्याची पुर्ण माहिती ७ दिवसांत माझ्याकडे जमा करा. त्यांच्या कार्यालयामध्ये ती माहिती जमा केली गेली. आणि ती माहिती तपासणीसाठी दि.२८/०४/२०२० रोजी चे जावक क्र. आयुक्त कार्यालयाचे ३०८ आणि सा.बां.वि. चे आवक क्र. २१८ सार्वजनिक बांधकाम विभागाला प्राप्त झाले त्यानंतर त्या माहितीची पुर्ण फाईल हरवून टाकली. त्यानंतर कोणतीही चौकशी झाली नाही. त्यानंतर मी दि.२८/०४/२०२० रोजी आयुक्त यांना पत्र दिले होते की, ही फाईल येथून हरवली आहे. त्याची चौकशी केली जावी. त्याची चौकशी आजपर्यंत कुठपर्यंत पोहचली आहे त्याची माहीती दया आणि कल्याण मुरबाड रोडवर जी अनाधिकृत केबल टाकली आहे. त्यामध्ये महानगरपालिकेचा जवळ जवळ ३० ते ४० करोड रुपयांचे नुकसान झाले आहे. त्या जबाबदार अधिका-यांवरही कारवाई झाली पाहिजे. आणि ज्या कंपनीने परवानगी न घेता केबल टाकली आहे त्यांच्यावरही FIR झाला पाहिजे. या सर्व गोष्टींचा पहिला प्रशासनाने खुलासा करावा.

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-**मा. महापौरजी, मा. उप महापौरजी, आमच्याकडे स्टाफ कमी असल्यामुळे जियो इंफोटेक, मे. दिनेश इंजिनियरींग प्रा.लि. आमचा स्टाफ कमी असल्यामुळे एक मिटींग झाली होती यांना कॉल केले होतेबंद केले होते तर आम्ही १० टक्के सुट देतो आमचा कर्मचारी कमी असल्यामुळे बीएसएनएल च्या विषयी चर्चा झाली होती. मिटिंगमध्ये निर्णय घेतला होता की, मे. दिनेश इंजिनियरींग प्रा.लि. तक्रार केली पाहिजे आम्ही अहवाल पाठवतो. मा. महापौर मॅडम मी विनंती करतो जियो इंफोटेक आपल्या समोर बसले आहेत, आपले आदेश असतील तर ते खुलासा करतील आपण संमती दया ते खुलासा करतील.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:-** मा. महापौरजी, हे तर असे झाले की, शहर अभियंता आणि सार्वजनिक बांधकाम विभाग आपण केलेला गुन्हा किंवा साक्ष त्यांचा आरोप दुस-यावर लावत आहेत आणि आपल्याकडे मागणी करीत आहेत की त्यांना माहीती देण्यासाठी येथे बोलवले जावे. आजपर्यंत असे कधी झाले नाही की कोणत्याही संबंधीत ठेकेदाराला महासभेत बोलवून घेवून त्यांच्याकडून माहीती घेतली जाईल. त्यांनी काय कार्य केले आहे त्याचे उत्तर तुम्ही दया. तपासण्याचे अधिकार आपल्याला आहेत. वर्क ऑर्डर आपण दिली असेल त्यामुळे त्यांनी केलेली कामांची संपुर्ण जबाबदारी आपली आहे.प्रस्ताव ठेवला आहे. त्यात त्यांची मागणी हीच

आहे की, स्लीपर टाकण्याचे काम जे कंपनीने केले. केले आहे किंवा नाही. आपली परवानगी न घेता केले, चुकीचे काम केले  केले आहे किंवा नाही.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-</u>** सितलानी साहेब श्री. राजेश वदारिया यांनी जो प्रशासकीय प्रस्ताव ठेवला आहे, त्यामध्ये त्यांची मागणी ही आहे की, केबल टाकण्याचे काम ज्या कंपनीने केले आहे, त्यांनी केले आहे किंवा नाही, आपली परवानगी न घेता त्यांनी काम केले आहे, हे चुकीचे केले आहे, केले आहे किंवा नाही.

**<u>शहर अभियंता, श्री. महेश सितलानी</u>**:-सरजी, मी थोडासा खुलासा करतो की,  जो कल्याण मुरबाड रोड आहे तो  जवळ होता. २००० मध्ये तो राज्य महामार्ग परवानगी आमच्याजवळ आहे. त्याचा अहवालानुसार त्यांनी कोणतेही  चुकीचे काम केले नाही किंवा  त्यानुसार तपास करुन आम्ही FIR करु. जरुर करु. स्टाफची कमी असल्यामुळे.....

**<u>सदस्य, डॉ.प्रकाश नाथानी</u>**:-महापौरजी, राजेशजी मी मध्येच बोलू इच्छितो की, राजेशजीने जे सांगितले आहे, आपण आरोप लावत आहेत तर ते स्पष्ट आहे.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:-</u>** डॉक्टर आपण मध्येच बोलू नका.

**<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-</u>** मी मध्येच बोलत नाही राजेशजी आपण आरोप करीत आहेत ते एकदम बरोबर आहे, सुधाकर देशमुख आता आपल्या महापालिकेत राहीले नाहीत, परंतु आता अधिकारी मॅडम आहेत मॅडमन ऑफीस बघितला आहे, त्यांना माहीती आहे तर त्यांनी एफ. आय. आर. दाखल का केला नाही? त्या वेळी का झाले नाही.आता पण अतिरिक्त आयुक्त सेम आहेत. यामध्ये किंतू परंतु  का? त्यांच्या कोणत्याही गोष्टील परंतु का करीत आहेत. अधिकारी मॅडमने बघितले आहे, आपण चुकीचे आहेत. मॅडम चुकीच्या आहेत. मी हेच सांगायचा प्रयत्न करत होतो आता आता तुम्ही कंटीन्यु करा.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:-</u>** मा. महापौरजी, जो कल्याण मुरबाड रोडचे शहर अभियंता बोलत आहेत, आणि ज्या परवानगीबाबत ते बोलत आहेत ती आजपासुन १० वर्षापुर्वीची आहे. आता जी केबल टाकली आहे. ती आता रोड बनवल्यानंतर टाकली आहे. तर महानगरपालिकेच्या जागेत जेव्हा पण आपण कोणतेही कार्य करतात. तर महानगरपालिकेच्या पॉलीसीनुसार त्यांच्या परवानगीनुसार काम करायचे आहे आणि मा. स्थायी समिती सभापती दिड महिन्यापुर्वी स्थायी समिती सभागृहात मिटिंग ठेवली होती त्यामध्ये त्यांना आदेश दिला होता की, सुमन इंफ्राने जो अहवाल दिला आहे तो बरोबर आहे किंवा चुकीचा आहे त्याची शहानिशा करुन आपण अहवाल दया. तर तो अहवाल यांनी अजूनपर्यंत दिलेला नाही. याचा अर्थ असा आहे की, या सर्व घोटाळयामध्ये शहर अभियंताच आहे असा माझा आरोप आहे. बाकी गोष्ट कल्याण बदलापुर रोडची यामध्ये पण त्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाची २०१३ ची पावती दाखवतात. परंतु ज्या वेळेस मा. श्री. पप्पु कलानी अध्यक्ष होते, त्यांनी सिमेंट रोड बनवला होता. त्यावेळे पासुन हा रोड उल्हासनगर महानगरपालिकेचा आहे. यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाची कोणतीही परवानगी ग्राहय धरणे योग्य नाही. दुसरी गोष्ट जेव्हा रोडला आम्ही वाढवले निष्कासित केले त्यानंतर त्यांनी दुसरी एक केबल परत टाकली आहे. दुसरी केबल टाकण्याची कोणतीच परवानगी त्यांच्याजवळ नाही आहे. जर परवानगी असेल तर श्री. सितलानी ते महासभे पुढे ठेवतील.

**<u>सदस्या, श्रीमती अंजली साळवे</u>**:- मा. महापौर मॅडम, मा. आयुक्त साहेब आमच्या इथे सुध्दा कैलास कॉलनी ते नेताजी पर्यंत सुमन कंपनीने केबल टाकलेले आहेत पावसाळया आधी त्यांनी हे काम केले आहे. अगोदरच रस्त्याची अवस्था इतकी वाईट आणि पुर्ण वायरी केबल करुन अगदी चौकामध्ये सुध्दा पुर्ण खडडे खोदून ठेवले आणि त्याच्यावर तक्रार पण केली होती सध्या इतकी वाईट परिस्थिती आहे. त्यांच्यावर काय कारवाई होणार आहे ते मला विचारायचे होते आणि दुसरे गोष्ट मला विचारायचे होते सिमेंट कॉक्रिंट जे रोड होते तेव्हा सगळयांचे समन्वय का नसतो सार्वजनिक बांधकाम विभागाचे. रस्ते बनले नाही का लगेच खोदकाम चालू होते. कधी ड्रेनेजचे काम आहे, कधी पाणी पुरवठयाचे काम आहे. तर कुठले ही काम रस्ता बनवायचा आहे तिथे समन्वय साधून तिथे काम करणे आवश्यक आहे. तिथे पाणी पुरवठयाची वाहीनी आहे का हे बघितले का जात

नाही. आपल्याकडे का असे आहे की जिथे रोड बनले की लगेच रोड खोदले जातात या प्रश्नाचे उत्तर दया मला. आणि याच्यापुढे लक्षात ठेवा कृपया.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी</u>**<u>:-</u> महापौर मॅडम, मला एक शहर अभियंता त्यांच्यासाठी एक शेर म्हणायचे आहे. तु इधर उधर की बात न कर, ये बता की काफला कहा लुटा, मुझे भरोसे गिला नही, नही तेरी रहबरी का सवाल है शहर अभियंता आपण का असे काम केले जे इतिहासात कधीच असे झाले नाही. आपण सरळ ठेकेदाराला महासभेच्या समोर उभे राहण्यास महापौरांचे आदेश मागितले. सेल्युट आहे आपल्याला सर.

**<u>सदस्या, श्रीम. कविता पंजाबी</u>**<u>:-</u> अंजली मॅडम आपण बरोबर बोलत आहात.

**<u>सदस्य, श्री.प्रदिप रामचंदानी</u>**<u>:-</u> एकदा पुन्हा आपले धन्यवाद.

**<u>सदस्या, श्रीम. कविता पंजाबी</u>**<u>:-</u> अंजली मॅडम आपण बिलकुल बरोबर बोलत आहात मी आपल्याशी सहमत आहे. हेच होत असते.

**<u>सदस्या, श्रीमती अंजली साळवे</u>** :- सर्व रोडचे असे हाल आहेत.

**<u>सदस्या, श्रीमती कविता पंजाबी</u>**<u>:-</u> हो बिलकुल बिलकुल. सर्व रोड खराब झाले आहेत. काही बनतात तर हे तोडण्यासाठी पोहचतात.

**<u>सदस्या, श्रीमती अंजली साळवे</u>** :- आणि आता ड्रेनेजची हालत खुपच खराब आहे. माझी विनंती आहे की, पहिले ड्रेनेज चे काम करा कृपया.

**<u>सदस्य, श्री. दिपक सिरवानी</u>**<u>:-</u>मा. महापौरजी, २८ जून ला स्थायी समिती सभागृहात एक मिटिंग ठेवली होती त्यामध्ये आमचा हाच विषय होता सुमन इंफ्रास्ट्रकरचर आता सितलानी सांगितले होते की, मी पुर्ण तपासणी करून पुर्ण अहवाल देवू. आता जवळ जवळ अडीच महिने झाले कोणताच अहवाल आमच्याजवळ आला नाही. याचा पण मिनिटस मध्ये दिले नाही. स्थायी समितीमध्ये ते मिनिटस पण आहेत. सितलानीजी ते अहवाल अजूनपर्यंत आम्हांला दिले नाहीत.

**<u>शहर अभियंता, श्री. महेश सितलानी</u>**:- अंजली साळवे मॅडमने जो मुददा उचलला आहे त्याबाबत थोडे स्पष्टीकरण देत आहे एस.एस.टी. कॉलेज पासून कैलास कॉलनी पर्यंत आमच्याकडून परवानगी घेतली आहे. त्या परमिशनचे १ कोटी ७३ लाखाचे पेमेंट केले आहे. त्यांना आम्ही मनाई केली आहेआणि त्यांचे २०-२१ चे टेंडर आम्ही त्यांना कॉल करणार आहोत मॅडम. त्यांनी १ कोटी ७३ लाखाचे पेमेंट दिले आहे.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:-</u>**सितलानी जी आवाज येत आहे का? त्यासाठी महापालिकेचे प्लॅनिंग झाले पाहीजे. जसे की, वदारिया यांनी सांगितले की, कल्याण अंबरनाथ रोड असे भरपूर वेळा झाले आहे की, रोड बनल्या नंतर खोदकाम चालू होते. आता माझ्याकडे फ्रेंडस मेडीकलचा एक उदाहरण आहे. त्या लोकांनी संपुर्ण रोडचे ५२ लाख रुपये दिले पण रोडचा सत्यानाश केला. यामध्ये दोन गोष्टी की, आमला लॉग टाईम प्लॅनिंग झाले पाहीजे. ओ.एफ. सी. केंबल लाईन आहे, गॅस लाईन आहे किंवा काही पण असेलरोड बनवायच्या आधी आपण ते केले पाहिजे जास्त पेनाल्टी ठेवा आपण फ्रेंडस मेडीकलचा परवानगी दिली आहे. त्यांनी पैसे भरले आहेत पण पुर्ण रोडचा सत्यानाश झाला आहे. मध्ये जे गॅप भरायचे आहेत, ते काम पण मागच्या आठ महीन्यापासून पडून आहे, तर जसे त्यांनी पैसे भरले नंतर महापालिकेची जबाबदारी असते. जर कोणी ठेकेदार नाटक करीत असेल तर त्याला सरळ कसे करायचे पण लोकांना सुविधा कशा देता येतील हे महापलिकेचे काम आहे. तुमचे चालेते की, ठेकेदार करीत नाहीत, आम्ही तर टेंडर मागवला आहे. त्याच्या नंतर पुढे काय आहे? तुम्ही परवानगी दिली गेली की, २०० मिटर, ३०० मिटर काढून टाका. परंतु याच्यामुळे संपुर्ण रोडचा सत्यानाश झाला आहे. आता तिथे एवढे खडडे आहेत की, लोक पडत आहेत. महापालिकेला, नगरसेवकांना लोक शिव्या देत आहेत. असे प्रत्येक ठिकाणी होत असेल. लाँग टाईम प्लॅनिंग केबल टाकण्याच्या पहीले, खोदण्याच्या पहीले लेगेच टेंडर काढला पाहीजे.पैसेपहीले भरतातकाम चालू त्यांनी जसे केबल टाकूली किंवा पाईप लाईन टाकली

तर वरतून काम चालू झाले पाहीजे. अशा प्रकारे प्लॅनिंग झाली पाहीजे ते नाही आहे. त्यामुळे हे लोक केबल टाकून जातात, रोडचा सत्यानाश होतो आणि आठ आठ महीने लोक त्याच्यावरुनच चालत आहेत.

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-** सर लवकरात लवकर करण्यात येईल.मी सांगू इच्छिते की, राजेश वदारिया यांनी ज्या प्रमाणे सांगितले की,

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-** मा. महापौरजी, आजच्या प्रस्तावर ज्या प्रकारे राजेश वदारिया यांनी सांगितले की, महापालिकेचा, आपल्या शहराचा सिमेंट रोड तोडले जाऊन मोठ मोठी कंपन्या आज गॅस पाईप लाईनची आपल्याला गरज आहे. हे येणा-या भविष्यामध्ये चांगला विचार आहे. आजचा वर्तमान खराब केले जात आहे, तर आपल्या येथे सिमेंट कॉक्रिट रस्ते तोडले जात आहेत, जसे की, श्री. राजेश वदारिया यांनी सांगितले आहे. तर माझे असे म्हणणे आहे की, यामुळे सदस्यांना त्रास होत आहे आणि हेही महानगरपालिकेचा दुसरा भाग आहे. जे करोडो रुपयाची चोरी केली जाते त्याच्यावर कोणतीही कारवाई केली जात नाही आणि अंबानीला फायदा दिला जात आहे. उल्हासनगरमध्ये पण अंबानीला फायदा देण्यासाठी प्रयत्न केला जात आहे. याच्यावर त्वरीत कारीवाई झाली पाहीजे. महानगरपालिकेच्या सदस्यावर फाईलची कारवाई होते, उल्हासनरमध्ये एवढी मोठी चोरी होत आहे तर अंबानीवर कारवाई का होत नाही.

**सदस्य, श्रीम. अंजली साळवे:-** आवाज कट होत आहे. ऐकायला येत नाही.

**महापालिका सचिव:-** ठराव कसा करायचा?

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** मा. महापौरजी, आम्ही शहर अभियंता यांच्या स्पष्टीकरणाने संतुष्ट झालो नाहीत, तर कृपया आयुक्तांना सांगा की, त्यांनी खुलासा करावा.

**सदस्या, श्रीम. अंजली साळवे:-** आमच्या रोडवर जे काम केले आहे, रिलायन्सवाल्यांवर पण कारवाई झाली पाहीजे आणि त्यांनी काम केले आहे.

**महापालिका सचिव:-** पिठासिन अधिकारी यांनी मला ठराव वाचायला सांगितला आहे. आपण कृपया या ठरावामध्ये आपली काय मागणी आहे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-**आम्हांला पहीले आयुक्तांचे म्हणणे ऐकुन घ्यायचे आहे की, आयुक्तांचे काय म्हणणे आहे. याच्यावर काय करणार जरा आम्हांला सांगा.

**आयुक्त, डॉ. राजा दयानिधी:-** सन्माननिय महापौर, सन्माननिय सदस्य, जो मुददा उपस्थित केला होता, ओ.एफ.सी. केबलच्या बाबतीत या पुर्वी पण सुचना देण्यात आल्या होत्या. मला वाटते की, त्यांना अजून तीन चार दिवस काम करण्यासाठी मुदत दयावी....

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** सचिवजी आयुक्त साहेबांनी काय बोलले ते आम्हांला समजले नाही, आपण स्पष्ट सांगणार का?

**सदस्या, श्रीम. अंजली साळवे:-** आवाज बरोबर नाही येत मॅडम.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-**आवाज क्लियर नव्हता तर सचिवजी आपण सांगा. नाही तर सर आपण क्लियर करा.

**आयुक्त, डॉ. राजा दयानिधी:-**हा जो मुददा आहे, सन्माननिय अध्यक्ष मोहदय, सन्माननिय सदस्य, हा जो मुददा उपस्थित केला होता, या पुर्वी सुध्दा शहर अभियंता, उप अभियंता यांना सुचना दिल्या होत्या. जी काही कायदेशिर आहे त्यानुसार कायदेशिर कारवाई करण्यात यावी. त्यांना सुचना देवून सुध्दा अजून काम झालेले अहवाल माझ्याकडे आलेले नाहीत. मी पुन्हा चार पाच दिवस देत आहे, या कालावधीमध्ये ते जर करीत असतील किंवा दिलेल्या वेळेमध्ये काम झाले नाही तर नक्की आम्ही त्यांच्यावर कारवाई करु.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-**तुम्हांला धन्यवाद देतो आयुक्त साहेब.

**महापालिका सचिव:-** मी ठराव वाचत आहे, ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्या प्रमाणे ओ.एफ.सी. केबल टाकण्यासाठी जियो इंफोटेक, दिनेश इंजिनियरींग प्रा.लि. कंपनीने केलेल्या रोडच्या अवैदय खोद कामावर प्रशासनास कायदेशिर कारवाई करण्यास आदेश देत आहे. ठिक आहे.

**सदस्या, श्रीम. अंजली साळवे:-** माझ्या इकडचा पण रोड झाला पाहीजे.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:-** ठिक आहे.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:-** पास..का

**महापालिका सचिव:-** पास... का पुढचा विषय घेत आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-** पास..पास..

या वेळी सदस्य, श्री.राजेश वदारिया यांनी सभागृहामध्ये प्रवेश केला.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** मा. माझा प्रस्ताव होता की, त्यांच्यावर एफ.आय.आर. झाली पाहिजे आणि आपण सचिवांनी शबद वाचले की, कायदेशीर कारवाई करणार. प्रस्ताव माझा आहे मी प्रस्तावात जे लिहायचे आहे ते लिहिन. जर कोणत्या सदस्याला हरकत असेल तर तो बोलेल, सचिवला तो अधिकार नाही आहे की मी दिलेल्या प्रस्तावात बदल करुन तो वाचण्याचा. मी एफ.आय.आर. ची मागणी केली आहे.

**सदस्य, श्री. कलवंतसिंह सोहता:-**राजेशजी यासाठी हाउस मध्ये जाण्याचे काहीच कारण नाही.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** आपण एफ.आय.आर. शब्द त्यात लिहा. कायदेशीर कारवाई शब्द लिहू नका.

**सदस्य, श्री. कलवंतसिंग सोहता:-**राजेशजी यासाठी हाउस मध्ये जाण्याचे काहीच गरज नाही.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** नाही नाही. कायदेशीर कारवाई वेगळी असते. कायदेशीर कारवाईमध्ये आपण सिव्हिल केस टाकू शकता.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-** हाउस मध्ये जाण्याचे काहीच गरज नाही.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** मी एफ.आय.आर. शब्दाची मागणी केली आहे. की त्यांच्यावर एफ.आय.आर. करा. पहिले पण सुधाकर देशमुखांनी त्यांच्यावर एफ.आय.आर. टाकले होते. वर्षांपासून मी घोटाळयांचा मागे लागलो आहे.

**सदस्य, श्री. कलवंतसिंग सोहता:-**कायदेशीर कारवाईचा अर्थ काय होतो.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-** कायदेशिर कारवाइचा अर्थ काय होतो, कायदेशिर कारवाईचा अर्थ तोच होतो.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** सिव्हिल केस टाकून बसणार.

**सदस्य, श्री. कलवंतसिंग सोहता:-**कायदेशीर कारवाईचा अर्थ काय होतो.

**महापालिका सचिव:-** मी स्टेटमेंट दिले आहे ना की, बोलले आहे ना एफ.आय.आर. करायला बोलले आहे ना इतिवृतात.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** नाही नाही. आयुक्तांचे स्टेटमेंट आहे तो रेकॉर्डमध्ये जाणार

**सदस्य, श्री. कलवंतसिंग सोहता:-**हाउसमध्ये आणण्याची गरज काय आहे?

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** जे आयुक्त बोलले आहेत एफआयआर करणार.

**<u>सदस्य, श्री. कलवंतसिंग सोहता:-</u>**हाउसमध्ये काय करणार सारखेसारखे

**<u>महापालिका सचिव:-</u>** फायदा वायदा काही नाही आम्ही आवाज नाही आला मॅडम विचारुन मी विषय सुरु केला आहे.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:-</u>** मी तुम्हांला तिथेच थांबविले मॅडम. माझा ठराव लिहिलेला आहे तो वाचा.

**<u>महापालिका सचिव:-</u>** ठिक आहे एफ.आय.आर. लिहिते.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:-</u>** हा लिहा.

**<u>सदस्य, श्री. कलवंतसिंग सोहता:-</u>**एफ.आय.आर. चा काही अर्थ नाही ज्याने चुकी केली आहे तो कुणाचा नातेवाईक नाही आहे. एफ.आय.आर. त्यामध्ये हाउसमध्ये जायची काय गरज आहे.

**<u>महापालिका सचिव:-</u>** ॲक्च्युली, कायदेशीर कारवाई म्हणजेच तेच झाले पण त्यांचे म्हणणे आहे एफ.आय आर. टाका तर टाकते.

**<u>सदस्य, श्री. कलवंतसिंग सोहता:-</u>**हाउसमध्ये का जात आहेत आपण. हाउसमध्ये जाण्याचा अर्थ काय आहे. हाउसमध्ये जावून आपण काय दाखवायचा प्रयत्न करत आहात.

<u>काही सदस्य :—</u>पास—पास……

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑विषय क्र. १३ :—<u>प्रस्तावाची सूचना</u>

OFC केबल टाकण्यासाठी जियो इंफोटेक, दिनेश इंजिनियरींग प्रा.लि. कंपनीने केलेल्या रोडच्या अवैद्य खोदकामावर कारवाई करणेबाबत. पालिका सदस्य सुचक म्हणुन श्री. राजेश वदारिया व अनुमोदक श्री.जमनादास पुरस्वानी, श्री. राजुजग्यासी, श्री. मनोज लासी यांची सूचना विचारात घेणे.

<u>प्रस्तावना</u>

OFC केबल टाकण्यासाठी जियो इंफोटेक, दिनेश इंजिनियरींग प्रा. लि. कंपनी व अजून काही कंपन्यानी मिळून शहरातील विविध ठिकाणी जये की, कल्याण बदलापूर रोड, कल्याण मुरबाड रोड व शहरातील अनेक ठिकाणी अवैधरित्या रोडचे खोदकाम केले असून OFC केबल टाकली आहे. असे खोदकाम करीत असतांना ब-याच ठिकाणी मोठ मोठे खडडे तयार झाले आहेत. सदर बाब अनेकदा प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिली आहे व संबंधितांवर त्वरीत कारवाई करुन fir दाखल करण्यात यावेयासाठी वेळोवेळी पाठपुरावा देखिल केला. परंतु अदयापर्यंत कोणतीही कारवाई होतांना दिसून येत नाही. म्हणून येत्या दिनांक १७/१२/२०२० रोजीच्या महासभेमध्ये अशासकीय ठराव मांडत आहे की, प्रशासनास निर्देश देण्यात यावे की, उपरोक्त् संबंधित कंपन्यावर fir दाखल करुन गैररित्या केलेल्या खोदकामाची दंडात्मक वसुलीसह कारवाई करण्यात यावी. तरी महासभेमध्ये चर्चा होऊन ठोस तोडगा काढण्यात यावा ही विनंती.

<u>महासभा ठराव क्र:११</u> <u>दिनांक:—१७/०९/२०२१</u>

सुचकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :— श्री. मनोज सयानी, श्री. शंकर लुंड

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार व सभेत झालेल्या चर्चेअंती,OFCकेबल टाकण्यासाठी जियो इंफोटेक, दिनेश इंजिनियरींगप्रा.लि. कंपनीने कल्याण बदलापुर रोड, कल्याण मुरबाड रोड,व इत्यादी रोड अनेक ठिकाणी अवैध खोदकाम केले असून त्यामुळे रस्त्यावर मोठ मोठे खडडे तयार झाले असल्याने सर्व संबंधित कंपनीवर संबंधित

पोलिस स्टेशनमध्ये एफ आय आर दाखल करणेस व दंडात्मक वसूली करुन कायदेशीर कारवाई करणेस प्रशासनास निर्देश देत आहे.

या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी

सर्वसाधारण महासभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव:-** ठिक आहे महापौर मॅडमने आदेश दिला आहे की, एफ.आय.आर. टाका म्हणून असा ठराव करण्यात येत आहे. विषय क्र.१४ सुरु झाला आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-**सचिव मॅडम, दुसरा विषय कोणाचा आहे. चालू कोणता होता. त्या विषयावर बोला.

**महापालिका सचिव:-** आता चर्चा सुरु करा

**महापालिका सचिव :- विषय क्र. १४ वाचुन दाखवितात.**

———————————————————————————————————

⇨विषय क्र. १४ :—**प्रस्तावाची सूचना**

अनाधिकृत बांधकामे नियमित करणेकरीता बनविण्यात आलेले सॉप्टवेअर परत चालु करणेबाबतची पालिका सदस्य सूचक श्री. किशोर वनवारी व अनुमोदक श्री. शंकर लुंड यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

———————————————————————————————————

**महापालिका सचिव :-** वनवारी सर हाआपला प्रस्ताव आहे

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-**सॉप्टवेअरआता आता चालू झाला आहे का नाही?

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-** हो येत आहे बोला बोला.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:-**आज दिड वर्ष झाले की हे सॉफटवेअर बंद झाले होते. कारण की जो महाराष्ट्र शासनाने शहरवासीयांना एक भेट दिली होती की, आपण अनधिकृत बांधकाम अधिकृत करु शकता. त्यासाठी एक सॉफटवेअर कॉन्ट्रक्टरला ठेका पण दिला होता. त्याचा पेमेंट राहिला होता कॉन्ट्रक्टरचा तर आज आम्ही वारंवार राजा दयानिधी साहेबांनी पण सांगितले आहे की, मेहरबानी करुन त्या कॉन्ट्रक्टरने जे काम बंद केले आहे. आपण आपला चालू करा. महानगरपालिकेच्यातर्फे की, कोणताही शहरवासी रेग्युलाईजेशनचा प्रस्ताव तर टाकू शकेल. परंतु हे बोलल्या नंतरही आज दिड वर्षे २ वर्षे झाले कोणताही तो सॉफटवेअर चालू झाला नाही. कॉन्ट्रक्टरला कॉन्ट्रक्ट नाही दिला त्यामुळे रेग्युलाईज करण्यासाठी सर्व शहरवासी वंचित आहेत. आणि महानगरपालिकेचे जे उत्पन्न आहे ते पण होईल. जे रेग्युलाईजेशनसाठी प्रस्ताव टाकतील तर महानगरपालिकेला उत्पन्न मिळेल. आणि शहर रेग्युलाईजेश होईल. त्यासाठी कोणीच लक्ष घालण्यास तयार नाही. यासाठी आम्ही परेशान होउन ८ महिने पहिले हे प्रस्ताव टाकले आहे.

.**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-** विरोधी पक्ष नेता चर्चा सुरु करा.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:-**अनधिकृत बांधकाम रेग्युलाईज करणे बंद झाले आहे.

**सदस्य, श्री. कलवंतसिंग सोहता:-**पहिले आपल्या सदस्यांना सांभाळा. की हाउसमध्ये जावून काय एफ.आर. आय. करतात.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:-**तर मेहरबानी करुन महानगरपालिकेमध्येरेग्युलाईजेन दोन वर्षापासुन बंद आहे तो तर चालू करायला पाहिजे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-**चला जो विषय चालू होता त्या विषयावर या.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:-**भाउ मी तेच तर बोलत आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-**हा बोला बोला.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:-**महानगरपालिकेने स्वत:चा सॉफटवेअर ठेवा. कॉन्ट्रक्टरची नेमणुक नाही करायची तर महानगरपालिका स्वत:चे संगणक व सॉफटवेअर ठेवा. परंतु रेग्युलाईजेशन तर दिड वर्षापासून बंद आहे. सर्व शहरवासी वंचित आहेत. तो कोणी पण रेग्युलाईजेशनसाठी अर्ज नाही करु शकत. ते चालू करायला पाहिजे. सर्व नगरसेवक या गोष्टीशी सहमत असतील. शहरात रेग्युलाईजेशन बंद नाही झाले पाहिजे. महानगरपालिकेचा महसुल वाढेल. आणि शहर रेग्युलाईज होईल. ही संधी सर्वांना मिळाली पाहिजे. माझी सर्वांना मा. महापौर, उपमहापौर, आयुक्त साहेब आणि सर्व सदस्यांना विनंती आहे की, ते सॉफटवेअर लवकरात लवकर चालू झाले पाहिजे. मेहरबानी करुन मा. महापौरजी ठराव असा झाला पाहिजे की, १ आठवडयाच्या आत तो सॉफटवेअर चालू होईल.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-** सचिव मॅडम आवाज येतो का. संबंधीत अधिका-यांना त्याबाबत उत्तर दयायला सांगा.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:-** माझा पण आवाज आला का जी मी विनंती केली आहे. ती सर्वांना ऐकली का. मा. महापौर, उपमहापौर, आयुक्त साहेब, सचिव मॅडम जे मी पण सांगितले होते, ते सर्वांनी माझे ऐकले का, जो माझा विषय होता.

**नगररचनाकार, श्री. प्रकाश मुळे:-**सन्माननिय सदस्यांनी विचारल्यानुसार आपली जी वेबसाईट तयार केली होती. त्यांचा पेमेंटचा काही इश्शु होता. शार्ट आउुट होत आहे व लवकरात लवकर चालू होईल. त्यात काही बदल करावे लागतील. एक आठवडयाच्या आत शक्य नाही.

**महापालिका सचिव:-**१ आठवडयाच्या आत चालू करावे.

**नगररचनाकार, श्री. प्रकाश मुळे:-**नाही, १ आठवडयाच्या आत शक्य नाही.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-**लवकरात लवकर चालू करण्यात यावा.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:-** दिड वर्षापासुन बंद आहे. तो कालावधी योग्य नव्हता का? दिड वर्षापासून का बंद आहे रेग्युलाईजेशन. ती वेळ समाधानकारक नव्हती का. जर तुम्ही ठेकेदाराला पेमेंट नाही देवू शकत तर नागरी सुविधा केंद्रामध्ये आपला सॉफटवेअर ठेवा.रेग्युलाईजेशन शहरवासियांना वंचित का  करत आहेत. ७ दिवसांत नाही करु शकत तर सॉफटवेअर ठेवा.

**नगररचनाकार, श्री. प्रकाश मुळे:-**त्यांचा पेमेंट चा इश्शु होता तो आतापर्यंत प्रलंबित होता.तो सोडविण्याचा प्रयत्न करत आहोत पेमेंट करत आहे त्यांचा ७ दिवसांत तर नाही होणार. पण लवकरात लवकर करण्याचा प्रयत्न करु शकतो.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-**पुढचा विषय काय तो घ्या. गणपती आहेत गणपती बाप्पा

**महापालिका सचिव:-** आता आपणच ठराव दया, आता मी माझा ठराव वाचून दाखवणार नाही.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-**किशोरभाई आता ठराव वाचा. वकीलला बोलवा.

**<u>सदस्य, श्री. किशोर वनवारी:-</u>**ही महासभा उल्हासनगर महानगरपालिका ही महासभा असा ठराव झाला पाहिजे की, एक आठवडयामध्ये नगररचनाकार काही पण बोलत नाहीत. त्यांना आम्ही दिड वर्ष बघितले आम्ही आयुक्त साहेबही काही पण बोलत असतात आम्ही बघितले आहे. परंतु त्यांनी कधीच लक्ष दिले नाही. जर दिड वर्षात नाही झाले तर आता बोलतात की, १ आठवडा महानगरपालिकेचा महसुल वाढेल. १ आठवडयात ... शहरवासियांना रेग्युलाईजेशनचा फायदा झाला पाहिजे.

**<u>महापालिका सचिव:-</u>**ठिक आहे ही महासभा वरील नमुद केल्याप्रमाणे अनधिकृत बांधकामे नियमित करणेकरीता बनविण्यात आलेले सॉफटवेअर १ आठवडयात सुरु करण्यास प्रशासनास निर्देश देत आहे.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-</u>**बरोबर आहे का किशोरभाई

**<u>सदस्य,, श्री. किशोर वनवारी:-</u>**धन्यवाद महापौर आणि उपमहापौर, आयुक्त साहेब पास.. पास..

**<u>उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-</u>**इतिवृत्ताची वाट न पाहता हा ठराव मंजूर.

<u>काही सदस्य:—</u>पास—पास......

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी:—</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑विषय क्र. १४ :—<u>प्रस्तावाची सूचना</u>

अनाधिकृत बांधकामे नियमित करणेकरीता बनविण्यात आलेले
सॉप्टवेअर परत चालु करणेबाबतची पालिका सदस्य सूचक श्री.किशोर वनवारी
व अनुमोदक श्री. शंकर लुंड यांचा प्रस्ताव
विचारात घेणे.

<u>प्रस्तावना</u>

उपरोक्त विषयान्वये अनाधिकृत बांधकामे नियमित करणे करीता जे ऑन लाईनवर अर्ज स्विकारण्यात येत होते ते सॉप्टवेअर ८ महिन्यापासून बंद झालेली आहे. तरी सदरील सॉप्टवेअर लवकरात लवकर चालु करण्यात यावे याबाबत तीन वेळा मा. आयुक्त सो. व नगररचनाकार या पत्र देण्यात आले आहे. परंतू अदयाप काहीह कार्यवाही त्या पत्रावर करण्यात आलेली नाही. तसेच उल्हासनगर शहरातील अनाधिकृत बांधकामे नियमित करण्यासाठी नागरिकांनाही सदरील सॉप्टवेअर मुळे फायदा होईल व त्यांची कामे जलदगतीने पुर्ण होतील. जर तुम्ही अनाधिकृत बांधकामे नियमित करणे करीता सॉप्टवेअर चालू करण्याचा ठेका कोणाला देवू शकत नाही तर अनाधिकृत बांधकामे नियमित करणे साठी बनविण्यात आलेले सॉप्टवेअर त्वरीत उल्हासनगर महानगर पालिका मार्फत नागरीक सुविधा केंद्र येथे चालु करण्यात येवे त्यामुळे महापालिकेच्या उत्पन्नात करोडो रुपयाने वाढ होईल

<u>महासभा ठराव क्र:१२</u>　　　　　　<u>दिनांक:—१७/०९/२०२१</u>

सुचकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :— श्री. कलवंतसिंह सोहता, श्री. शंकर लुंड

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणेअनाधिकृत बांधकामे नियमित करणेकरीता बनविण्यात आलेले सॉफ्टवेअर एका आठवडयात सुरु करण्याचे प्रशासनास निर्देश देत आहे.

या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाचीसही/—

अनुमोदकाचीसही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :- विषय क्र. १५ वाचुन दाखवितात.**

———————————————————————————————————————

⇨ विषय क्र. १५ :—**प्रस्तावाची सूचना**
रस्ता, चौक, प्रवेशद्वार, बोर्ड नामकरण करणे या शासकिय प्रस्तावाबाबत पालिका सदस्यसूचक श्री. किशोर वनवारी व श्री. जमनादास पुरस्वानी आणि अनुमोदक श्री. शंकर लुंड व श्री. मनोज सयानी यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

———————————————————————————————————————

**सदस्य, श्री. अरुण आशान:-**मा. महापौर, मा. उप महापौर, मा. आयुक्त साहेब हा जो प्रस्ताव आहे, तदर्थ समितीने हे सर्व विषय घेवून पीडब्ल्युडी कडून संपुर्ण चौकशी करुन त्या चौकाला, रस्त्याला कोणाचे नाव दिले आहे की नाही याची शहानिशा करुन त्याचा प्रस्ताव मा. महापौर या सदस्य समितीच्या अध्यक्ष आहेत त्यांच्याकडे हा विषय घेवून यायचा आहे आणि त्यानंतर हा विषय महासभेला आणायचा आहे. मला असे वाटतय की, पुढच्या महासभेमध्ये चौकांचा आणि रस्त्यांच्या नामकरणाचा विषय या महासभेतून तो विषय पुढच्या महासभेमध्ये येणारच आहे. मला असे वाटते की, तदर्थ समितीने ठराव केलेला जे त्यांचे विषय आहेत. मॅडम ऐका सचिव मॅडम. तदर्थ समितीने त्या दिलेल्या ठरावानंतर जे काही विषय मंजूर केलेले आहेत. ते विषय नवीन येणा-या महासभेच्या त्यामुळे हा विषय त्या महासभेच्या वेळेस घेण्यात यावा.

**उपमहापौर, श्री. भगवान भालेराव:-** बरोबर आहे बरोबर आहे. किशोरजी हा प्रस्ताव पुढच्या महासभेमध्ये एकत्र येईल.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-**चला पुढचा विषय घ्या. सचिव मॅडम पुढचा विषय

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-**किशोर वनवारी यांना बोलू दया.

**सदस्य, श्री.प्रदिप रामचंदानी:-**बघा मा. महापौरजी, उपमहापौर, आयुक्त साहेब, सचिव मॅडम, सन्माननीय सर्व सदस्य मी अरुण भाउनी जे बोलले त्याचा बिलकूल सन्मान करतो. परंतु साडे चार वर्षाच्या आत कधीही सर्व तदर्थ समितीमध्ये पीडब्ल्यूडी विभागातर्फे एक प्रस्ताव पण आजपर्यंत मंजूर नाही झाला. कोणत्याच महापौरांनी नाही केले. मी मा. महापौर आईंना धन्यवाद देतो. यानंतर दुसरी मिटिंग आहे त्यात ३४ विषय आहेत. साडे ४ वर्षाच्या नंतर तो आता मेहरबानी करुन आमचा ठराव आम्हांला आपल्यावर आईवर विश्वास आहे. परंतु आता जो ठराव आहे त्यात हे झाले पाहिजे की जेवढे पण आम्ही प्रस्ताव आणले आहेत. ते पुढच्या

महासभेत येतील असा ठराव बनवा. आता जो प्रस्ताव आला आहे, तो पुढच्या महासभेमध्ये येईल असा ठराव करा.

**सदस्य, श्री. अरुण आशान:-**सचिव मॅडम, पुढच्या महासभेत असलेले जे ३४ विषय आहेत जे तदर्थ समितीकडून मंजूर केलेले आहेत. त्यामध्ये हा घेवून

**महापालिका सचिव:-**सर असे होत नाही या प्रस्तावाची सुचना वेगळी, तुम्ही हा विषय ॲड करु शकतात ज्यावेळी हा विषय येईल त्यावेळी तुम्ही सांगावे. हे ॲड करा. कारण तुम्ही म्हटले आहे तदर्थ समितीकडे जावून मग महासभेपुढे आणि ते नियमानुसार योग्य पण आहे. तुम्हांला जर ॲडजेस्ट करायचा असेल तर हा प्रस्ताव मागे घ्या. आणि मग पुढच्या वेळी तो विषय ॲड करा.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-किशोरभाई** विषय मागे घ्या.

**सदस्य, श्री.किशोर वनवारी:-**ओके बाबा ओके मागे घेतो.पुढच्या महिन्यात घेवू या.

**महापालिका सचिव:-** हा विषय संपुष्टात आला आहे. पुढचा विषय आहे शेवटचा.

**महापालिका सचिव :- विषय क्र. १६ वाचुन दाखवितात.**

---

⇨ विषय क्र. १६ :—**प्रस्तावाची सूचना**

जय झुलेलाल प्रवेशद्वार उल्हासनगर-५ येथील कैलाश कॉलनी चौकात सिंधी
समाजाचे महापुरुष ईस्टदेवता असलेल्या झुलेलाल साईच्या पुर्णकृती मुर्तीची स्थापना
करणेबाबत. पालिका सदस्य, सुचक म्हणून श्री. किशोर वनवारी, श्री. जमनादास
पुरस्वानी व अनुमोदक, श्री. दिपक सिरवानी, श्री. राजू जग्यासी, श्री. मनोज सयानी ,
यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

---

**महापालिका सचिव:-** हा विषय तुम्ही मागच्या मिटींगमध्ये घेतलेला आहे. त्यामुळे हा विषय देखील त्याचवेळी झालेला आहे मग हा देखील मागे घ्यावा लागेल.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-**हा पण मागे घ्यावा लागेल मॅडम.

**महापालिका सचिव:-**चर्चा झाली नाही त्यामुळे विषय संपुष्टात येत आहे.

**सायंकाळी५.०४** वाजता महापौर श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:- १८-११-२०२१

**उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. १८-११-२०२१ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.**

३

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा गुरुवार दिनांक १८/११/२०२१ रोजी दुपरी ३.०० वाजता आयोजित करण्यात आली होती.सदर सभेत महापौर, श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या व खालील दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते/होत्या.मा. अवर सचिव, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग यांचेकडील शासनाचे क्रमांक कोरोना- २०२०/प्र.क्र. ७६ / नवि-१४, दिनांक २२ ऑक्टोंबर २०२१ पत्रान्वये विहित कार्यपध्दती पालन करुन प्रत्यक्ष सहभागाने/उपस्थितीने खालील विषयावर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित केली होती.

१. श्रीमती. लिलाबाई लक्ष्मण आशान – महापौर

२. श्री. भगवान भालेराव- उप महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती अचर्ना गोकुळ करणकाळे | २३ | श्रीमती ज्योती शामराव माने |
| ४ | श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड | २४ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| ५ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | २५ | श्रीमती शीतल चंद्रकांत कदम |
| ६ | श्री. राजेंद्रसिंह विरसिंग भुल्लर | २६ | श्रीमती वसुधा धनंजय बोडारे |
| ७ | श्री. स्वप्नील मिलींद बागुल | २७ | श्री. धनंजय बाबुराव बोडारे |
| ८ | श्रीमती सुरेखा हनुमंत आव्हाड | २८ | श्री. शंकर गोविंदराम लुंड |
| ९ | श्रीमती अंजना अंकुश म्हस्के | २९ | श्रीमती सुनिता बाबुराव बगाडे |
| १० | श्री. कलवंतसिंग गुरुदेव सोहता | ३० | श्रीमती सुमन राजेश सचदेव |
| ११ | श्रीमती मिना कुमार आयलानी | ३१ | श्रीमती अंजली चंद्रकांत साळवे |
| १२ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | ३२ | श्री. प्रमोद नामदेव टाले |
| १३ | श्री. महेश पहिलराज सुखरामनी | ३३ | श्रीमती कविता सुधिर बागुल |
| १४ | श्री. राजेश नानिकराम वदारिया | ३४ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| १५ | श्रीमती दिपा नारायण पंजाबी | ३५ | श्री. किशोर नारायणदास वनवारी |
| १६ | श्रीमती पुष्पा नाना बागुल | ३६ | श्रीमती मिना चंद्रगुप्त सोनेजी |
| १७ | श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी | ३७ | श्रीमती कविता सुरेश गायकवाड |
| १८ | श्रीमती शुभांगी मनोहर बेहनवाल | ३८ | श्री. मनोज दिलीपकुमार सयानी |
| १९ | श्री. राजेंद्र शांताराम चौधरी | ३९ | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |

| | | | |
|---|---|---|---|
| २० | श्रीमती इंदिरा जमनादास उदासी | ४० | श्री. सुरेंद्र बाळकृष्ण सावंत |
| २१ | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी | ४१ | श्री. अरुण लक्ष्मण आशान |
| २२ | श्रीमती ज्योत्स्ना सुरेश जाधव | | |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते / होत्या.

१. श्री. मंगल बालकृष्ण वाघे, २. श्रीमती जयश्री ज्ञानेश्वर पाटील, ३. श्री. हरेश परमानंद जग्यासी, ४.श्रीमती मिनाकौर अजितसिंग लबाना, ५.श्रीमती आशा नाना बिराडे, ६. श्री. रविंद्र दशरथ बागुल, ७.श्रीमती चरणजितकौर राजेंद्रसिंह भुल्लर, ८.श्री. राजू किसनचंद जग्यासी, ९.श्रीमती गीता लालचंद साधनानी, १०.डॉ. प्रकाश घनश्यामदास नाथानी, ११.श्रीमती सरोजिनी टेकचंदानी, १२.श्रीमती जया प्रकाश माखिजा, १३.श्रीमती अपेक्षा भगवान भालेराव, १४.श्रीमती शुभांगीनी निकम, १५. श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग, १६. श्रीमती छाया सुजित चक्रवर्ती ऊर्फ अडसुळ, १७. श्रीमती ज्योती प्रशांत पाटील, १८. श्रीमती डिम्पल नरेंद्र ठाकुर (कुमारी), १९. श्री. रवि किशनचंद जग्यासी, २०. श्रीमती कविता लाल पंजाबी, २१. श्री. जीवन चंद्रभान इदनानी, २२. श्रीमती सविता प्रविण तोरणे (रगडे),२३. श्री. गजानन प्रल्हाद शेळके, २४. श्रीमती ज्योती प्रकाश बठिजा, २५. श्री. सुमित सागर सोनकांबळे, २६. श्री. चंद्रशेखर केशव यादव, २७. श्रीमती मिताली राजेश चान्पूर, २८. श्रीमती संगिता नितीन सपकाळे, २९. श्रीमती दिप्ती नविन दुधानी, ३०. श्रीमती ज्योती रमेश चैनानी, ३१. श्रीमती कांचन अमर लुंड, ३२. श्री. भारत रामचंद राजवानी (गंगोत्री), ३३. श्री. सतरामदास पुतनदास जेसवानी, ३४. श्रीमती मिनाक्षी रवी पाटील, ३५. श्री. विजय चाहू पाटील, ३६. श्री. आकाश परशुराम पाटील, ३७. श्री. विकास परशुराम पाटील, ३८. श्रीमती आशा जीवन इदनानी.

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

१. डॉ. राजा दयानिधी, आयुक्त

२. श्रीम. प्राजक्ता कुलकणी, महापालिका सचिव

३. श्री. अशोक नाईकवाडे, उप आयुक्त (मुख्यालय

४. श्रीम. प्रियंका राजपूत, उप आयुक्त (कर)

५. डॉ. सुभाष जाधव, उप आयुक्त (आरोग्य)

६. डॉ. दिपक पगारे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी

७. श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखाधिकारी

८. श्री. विजय खेडकर, मुख्य लेखा परिक्षक

९. श्री. प्रकाश मुळे, नगररचनाकार

१०.श्री. महेश सितलानी, शहर अभियंता

११. श्री. के.जे.रहेजा, कार्यकारी अभियंता (पा.पु.वि.)

१२. श्री. सुर्यकांत खटके, लेखाधिकारी

१३. श्री. अशोक मोरे, सहा लेखा परिक्षक

१४. श्री. तुषार सोनवणे, सहा. आयुक्त

१५. श्री. महेंद्र पंजाबी, सहा. आयुक्त

१६. श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी

१७. श्री. मनिष हिवरे, सार्वजनिक आरोग्य अधिकारी

१८. श्री. बाळू नेटके, मुख्य अग्निशमन अधिकारी

१९. श्री. हनुमंत खरात, उप अभियंता (विद्युत विभाग)

२०. श्रीम. श्रध्दा सपकाळे, सिस्टम ॲनेलेसिस मॅनेजर

१७. श्री. विनोद केणे, मुख्य स्वच्छता निरीक्षक

१८. श्री. एकनाथ पवार, मुख्य स्वच्छता निरीक्षक

१९. श्री. दत्तात्रय जाधव, भांडार विभाग प्रमुख

२०. श्रीम. विशाखा सावंत, पर्यावरण व्यवस्थापक

२१. श्री. यशवंत सगळे, वाहन व्यवस्थापक

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्रीम. नर्गीस खान, लिपीक
२. श्री. बाळू भांगरे, लिपीक

दुपारी ३.०० वाजता वंदे मातरम म्हणून सभेची सुरुवात करण्यात आली.

**महापालिका सिचिव:-** विषय क्र. १ प्रश्नोत्तरे वाचुन दाखवितात

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-** सचिव मॅडम प्रश्नोत्तराचा तास वगळण्यात यावा आणि मग नंतर लक्षवेधी व आयत्या वेळेचा विषय सामवून घ्या.

सदस्य, पास..पास..

**महापालिका सचिव:-** ठिक आहे, सर्वांना मान्य आहे, प्रश्नोत्तराचा तास वगळण्यात येत आहे.

**विषय:—**प्रश्नोत्तराचा तास वगळण्याबाबत

सूचकाचे नांव :— श्री. कलवंतसिंग सोहता

अनुमोदकाचे नांव :— श्री. जमानादास पुरस्वानी

**महासभा ठराव क्र.२०फ** **दिनांकः—१८/११/२०२१**

हीं महासभा आज दिनांक **१८/११/२०२१**रोजीच्या महासभेतील प्रश्नोत्तराचा काळ वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर/पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

**महापालिका सचिवः-** पण दुसरी सभा सुरु होउन त्याविषयी काही जर सभा स्थगित करावयाची असेल तर त्यापुर्वी काही लक्षवेधी आल्या आहेत. काही प्रशासनातर्फे म्हणजे सचिव कार्यालयाकडून दोन आयत्या वेळेचे विषय घेण्यात येणार आहेत. तर ते मी वाचते त्यानंतर ही सभा स्थगित करायचा जो प्रस्ताव आहे पहीले प्रश्नोत्तराचा निर्णय होऊ दया नंतर अलक्षवेधी व आयत्या वेळेचा विषयाचा निर्णय घ्या.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानीः-** माझी विनंती आहे आपण लक्षवेधी समाविष्ट करता आहेत आणि आयत्यावेळी समावेश करताय. ६ महिन्यापासुन एक पत्र भारतीय जनता पार्टीचे गटनेत्यानी विरोधी पक्षाबददल दिलेले आहे. त्याचीही जर महापौरांनी घोषणा केली तर बरे होईल.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः-**सन्माननीय महापौरजी, विरोधी पक्षाचे भारतीय गटनेत्याचे पत्र आलेले आहे महापौरांकडे असे आता  कळाले. ही शोक सभा आहे आणि आजची सभा आपण स्थगित करत आहोत. ही शोक असल्यामुळे पुढची जी काही सभा होईल.त्यावेळेला महापौरांच्या अखत्यारीतला विषय असल्यामुळे तो निर्णय त्या वेळेला ते केले जाईल.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी :-** ठिक आहे जे निर्णय महापौरांनी घेतलेले आहे. ते मान्य आहे पण आमची अशी विनंती आहे की, अस काही नाही आहे की, आपण जे करायचे ते महासभेत करायचे.असा कुठला नियम नाही आहे आपण आपल्या दालनातच करायचे कुठलाही विषय ६-६ महिने ठेवणे हे लोकतंत्राला चांगले नाही आहे, असे मला वाटते.

**महापालिका सचिवः-**लक्षवेधी आहे माझ्या समोर मी मांडत आहे. पहिली लक्षवेधी सुचना मी मांडत आहे, सुचकाचे नाव श्रीमती मिना कुमार आयलानी, अनुमोदकाचे नाव श्री.शंकर लुंड मा.महासभा ठराव क्र. ५६, दिनांक २०/०२/२०१३ अन्वये मा.महासभेने महापालिका क्षेत्रातील मृत पावलेल्या गरीब गरजू व्यक्तींच्या अंत्यस्ंस्कारासाठी आवश्यक खर्च करणेबाबत.

**महापालिका सचिव :-** दुसरी लक्षवेधी सुचना आहे, सुचकाचे नाव श्री. मनोज सयानी, अनुमोदकाचे नाव श्रीमती दिपा नारायण पंजाबी, विषय आहे उल्हासनगर महानगरपालिका हददीत शहाड स्टेशन येत असून सदर शहाड स्टेशनचे नाव बदली करुन शहीद भगत कवांराम साहेब करणेबाबत.

तिसरी लक्षवेधी सुचना आहे, सुचकाचे नाव श्रीमती शुभांगिनी बेहनवाल, दिव्यांग कल्याणकारी योजना अंतर्गत दरमहा रु.१०००/- पैकी रु.२०००/- मानधन वाढवून देणेबाबत.

चौथी लक्षवेधी सुचना आहे, सुचकाचे नाव श्रीमती अंजली साळवे, आशा आरोग्य सेविकांना रु.९०००/- सानुग्रह अनुदान देणेबाबत.यापैकी मा.महापौरांनी दोन लक्षवेधी स्विकारली आहे.पहिली लक्षवेधी आहे, श्रीमती शुभांगिनी बहेनवाल यांची व दुसरी लक्षवेधी श्री मनोज लासी या स्विकारलेल्या लक्षवेधींवर पुढच्या मिटिंगमध्ये चर्चा करता येईल.

एक विषय आहे दोन विषय आहेत सचिव कार्यालयामार्फत आहे.आयत्यावेळेचा विषय सामावून घ्यायचा का नाही ते सांगावे.

---

⇨विषय क्र. १:- पाणी पुरवठा व जल नि:सारण समितीमध्ये एका सदस्याची जागा रिक्त झाल्याने नविन सदस्यांची नियुक्ती करणे.

---

**महापालिका सचिव:-**आताच मा. स्व. श्री.अजित गुप्ता साहेबांचे निधन झाले आहे.त्यामुळे ते सभापती पद रिक्त झाले आहे.आणि जास्त वेळ पद रिक्त ठेवता येत नाही.पण सभापती निवडणुक होण्यापुर्वी तिथे एक सदस्य नेमण्याची आवश्यकता आहे.जर आपण विषय सामावून घेतला तर गोषवारा आपल्याला पाठविण्यात येईल. आणि दुसरा विषय असा आहे, पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण समिती व गलिच्छ वस्ती निर्मुलन समितीमध्ये एका सदस्याची जागा रिक्त झाल्याने नविन सदस्यांची नियुक्ती करणे. यामध्ये असे झाले आहे की, माझी सदस्य श्रीमती पंचम कालानी यांनी देखील राजीनामा दिल्याने ही पद रिक्त आहेत. त्यांच्या जागी नविन सदस्य येणे आवश्यक आहे.जर आता दोन्ही प्रस्ताव मंजूर असतील सामावून घेते.तसे मला सभेने सांगावे.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव :-**पण मॅडम एक पंचम मॅडमने राजीनामा दिल्यामुळे वृक्ष प्राधिकरणाची पण जागा रिक्त होते.

**महापालिका सचिव:-**तीनही आहेत. जे दोन आहेत ते पक्षीय बलाबलानुसार आहेत वृक्ष प्राधिकरणावर आपण कोणत्याही सदस्याला जो शिक्षित असेल त्याला दयावे लागेल.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव :-**मॅडम ती आरपीआयच्या कोटयातून जागा भरली आहे.

**महापालिका सचिव :-**नाही ते पक्षीय बलाबलाचे नव्हते साहेब ते तसे नाही आमचा गोषवारा आहे.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव :-**बघा, तुम्ही खात्री करा आणि सांगा.

**महापालिका सचिव:-**खात्री आहे. मी सांगते आहे.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** ती आरपीआयच्या कोटयातून भरलेली आहे.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया**:- पहिले विषय काय आहे. चर्चा जेव्हा महासभा होईल तेव्हा चर्चा करा.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-** दोन्ही विषयाचा समावेश करुन घ्या.

**महापालिका सचिव:-**जे आहे ते तुम्हांला जर हरकत असेल तर त्या दिवशी मी खुलासा करेल त्या विषयाचा. दोन्ही विषय सामावुन घेण्यात येत आहे. सभा स्थगित कधी करायची तारीख ठरवा. नाहीतर मग. अनिश्चित कालावधीसाठी.

**विषय:—**आयत्यावेळचे विषय सभेच्या कामकाजात सामावून घेणेबाबत.

सूचकाचे नांव :— श्री. कलवंतसिंग सोहता

अनुमोदकाचे नांव :— श्री. जमनादास पुरस्वानी

**महासभा ठराव क्र. २० जी** **दिनांक:— १८/११/२०२१**

ही महासभा प्रशासनाच्यावतीने प्राप्त झालेल्या आयत्यावेळच्या खालील दोन विषयास या सभेच्या कामकाजात सामावून घेण्यास मान्यता देत आहे.

**विषय क्रं. १** पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण समिती व गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती व वृक्ष पाधिकरण समिती मधील एका सदस्याची जागा रिक्त झाल्याने त्या जागी नवीन सदस्याची नियुक्ती करणे. पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण समिती व गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती व वृक्ष प्राधिकरण समिती मधील एका सदस्याची जागा रिक्त झाल्याने त्या जागी नवीन सदस्याची नियुक्ती करणे

**विषय क्रं. २** पाणी पुरवठा व जलनि:सारण समितीमधील एका सदस्याची जागा झाल्याने त्याजागी रिक्त नवीन सदस्याची नियुक्ती करणे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर/पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-**मा. महापौर जी या दोन्ही महासभा दिनांक २५/११/२०२१ रोजी २.३० वा.आणि दुसरी सभा दुपारी ३.०० वा.या दोन्ही २५ तारखेला ठेवाव्यात अशी मी विनंती करतो.

**महापालिका सचिव:-**ठिक आहे. गुरुवारी पहिली ॲडजॉईंड मिटिंग ही २.३० वा.आणि दुसरी जी परत ॲडजॉईंड झालेली ती ३.०० वा.मान्य ठिक आहे. नाही २.३० आणि ३.०० हा ते आम्ही लिहू विषय संपल्यावर.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:-** ही सभा स्थगीत करण्यात येत आहे.

**महापालिका सचिव:-** कृपया जन गण मन साठी उभे राहावे.

7

☑ **स्थगीत प्रस्ताव:—**

दिनांक १८/११/२०२१ रोजीची सभा दुपारी ३.०० वाजता सुरू केलेली सभा काही कारणास्तव स्थगीत करण्यास प्रस्तावीत.

**महासभा ठराव क्र.२०ह** दिनांक: १८/११/२०२१

सुचकाचे नाव:— श्री. कलंवतसिंह सोहता

अनुमोदकाचे नाव:— श्री. राजेश वधारिया

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता दिनांक १८/११/२०२१ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित केलेल्या सभेचे कामकाज अनिश्चित कालावधीपर्यंत स्थगित करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर/पीठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

**दुपारी ३.११ वाजता महापौर, श्रीम. लिलाबाई आशान यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.**

**(प्राजक्ता मि. कुलकर्णी)**

**महापालिका सचिव**
**उल्हासनगर महानगरपालिका**

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:- २५-११-२०२१

**उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २५-११-२०२१ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.**

३-अ

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा गुरुवार दिनांक १८/११/२०२१ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेचे कामकाज स्थगित केल्याने सदरची सभा गुरुवार दिनांक २५/११/२०२१ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित करण्यात आली. सदर सभेत महापौर, श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या व खालील दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते/होत्या. मा. अवर सचिव, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग यांचेकडील शासनाचे क्रमांक कोरोना- २०२०/प्र.क्र. ७६ / नवि-१४, दिनांक २२ ऑक्टोंबर २०२१ पत्रान्वये विहित कार्यपध्दती पालन करुन प्रत्यक्ष सहभागाने/उपस्थितीने खालील विषयावर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित केली होती.

१. श्रीमती. लिलाबाई लक्ष्मण आशान – महापौर

२. श्री. भगवान भालेराव- उप महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती अर्चना गोकुळ करणकाळे | २६ | श्री. गजानन प्रल्हाद शेळके |
| ४ | श्रीमती जयश्री ज्ञानेश्वर पाटील | २७ | श्रीमती ज्योती प्रकाश बठिजा |
| ५ | श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड | २८ | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी (साई) |
| ६ | श्रीमती मिनाकौर अजितसिंग लबाना | २९ | श्रीमती ज्योत्स्ना सुरेश जाधव |
| ७ | श्रीमती जमनादास पुरस्वानी | ३० | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| ८ | श्रीमती चरणजितकौर राजेंद्रसिंह भुल्लर | ३१ | श्रीमती मिताली राजेश चान्पूर |
| ९ | श्री. राजेंद्रसिंह विरसिंग भुल्लर | ३२ | श्रीमती दिप्ती नविन दुधानी |
| १० | श्री. स्वप्नील मिलींद बागुल | ३३ | श्रीमती ज्योती रमेश चैनानी |
| ११ | श्री. कलवंतसिंग गरुदेव सोहता | ३४ | श्री. शंकर गोविंदराम लुंड |
| १२ | श्री. राजू किसनचंद जग्यासी | ३५ | श्रीमती सुनिता बाबुराव बगाडे |
| १३ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | ३६ | श्रीमती सुमन राजेश सचदेव |
| १४ | श्री. महेश पहीलराज सुखरामनी | ३७ | श्री. सतरामदास पुतनदास जेसवानी |
| १५ | श्रीमती अपेक्षा भगवान भालेराव | ३८ | श्रीमती अंजली चंद्रकांत साळवे |

| | | | |
|---|---|---|---|
| १६ | श्रीमती शुभांगीनी निकम | ३९ | श्री. प्रमोद नमदेव टाले |
| १७ | श्रीमती छाया सुजित चक्रवर्ती उफर् अडसुळ | ४० | श्रीमती कविता सुधिर बागुल |
| १८ | श्रीमती ज्योती प्रशांत पाटील | ४१ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| १९ | श्री. राजेश नानिकराम वदारिया | ४२ | श्री. किशोर नारायणदास वनवारी |
| २० | श्रीमती डिम्पल नरेंद्र ठाकुर | ४३ | श्री. आकाश परशुराम पाटील |
| २१ | श्रीमती दिपा नारायण पंजाबी | ४४ | श्री. विकास परशुराम पाटील |
| २२ | श्रीमती शुभांगी मनोहर बेहनवाल | ४५ | श्री. मनोज दिलीपकुमार सयानी |
| २३ | श्रीमती इंदिरा जमनादास उदासी | ४६ | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |
| २४ | श्रीमती कविता लाल पंजाबी | ४७ | श्री. सुरेंद्र बाळकृष्ण सावंत |
| २५ | श्री. जीवन चंद्रभान इदनानी | | |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते / होत्या.

१. श्री. मंगल बालकृष्ण वाघे, २. श्री. हरेश परमानंद जग्यासी, ३. श्रीमती आशा नाना बिराडे, ४.श्री. रविंद्र दशरथ बागुल, ५.श्रीमती सुरेखा हनुमंत आव्हाड, ६. श्रीमती अजंना अंकुश म्हस्के, ७.श्रीमती मिना कुमार आयलानी, ८.श्रीमती गीता लालचंद साधनानी, ९.डॉ. प्रकाश घनश्यामदास नाथानी, १०. श्रीमती सरोजिनी टेकचंदानी, ११. श्रीमती जया प्रकाश माखिजा, १२. श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग, १३.श्रीमती पुष्पा नाना बागुल, १४. श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी, १५. श्री. राजेंद्र शांताराम चौधरी, १६.रवि किशनचंद जग्यासी, १७. श्रीमती सविता प्रविण तोरणे (रगडे), १८. श्री. सुमित सागर सोनकांबळे, १९.श्रीमती ज्योती शामराव माने, २०. श्री. सुमित सागर सोनकांबळे, २१. श्रीमती ज्योती शामराव माने, २२. श्री. चंद्रशेखर यादव, २३. श्रीमती संगिता नितीन सपकाळे, २४. श्रीमती शीतल चंद्रकांत कदम, २५. श्रीमती वसुधा धनंजय बोडारे, २६. श्री. धनंजय बाबुराव बोडारे, २७. श्रीमती कांचन अमर लुंड, २८. श्री. भारत रामचंद राजवानी (गंगोत्री), २९. श्रीमती मिना चंद्रगुप्त सोनजी, ३०. श्रीमती मिनाक्षी रवी पाटील, ३१. श्री. विजय चाहू पाटील, ३२. श्रीमती कविता सुरेश गायकवाड, ३३. श्री. अरुण लक्ष्मण आशान, ३४. श्रीमती आशा जीवन इदनानी.

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

१. डॉ. राजा दयानिधी, आयुक्त
२. श्रीम. करुणा जुईकर, अतिरिक्त आयुक्त

३. श्रीम. प्राजक्ता कुलकर्णी, महापालिका सचिव

४. श्री. अशोक नाईकवाडे, उप आयुक्त (मुख्यालय

५. डॉ. सुभाष जाधव, उप आ. युक्त (आरोग्य)

६. श्रीम. प्रियंका राजपूत, उप आयुक्त (कर)

७. डॉ. दिपक पगारे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी

८. श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखाधिकारी

९. श्री. विजय खेडकर, मुख्य लेखा परिक्षक

१०. श्री. प्रकाश मुळे, नगररचनाकार

११. श्री. के.जे.रहेजा, कार्यकारी अभियंता (पा.पु.वि.)

१२. श्री. सुर्यकांत खटके, लेखाधिकारी

१३. श्री. अशोक मोरे, सहा लेखा परिक्षक

१४. श्री. तुषार सोनवणे, सहा. आयुक्त

१५. श्री. गणेश शिंपी, सहा. आयुक्त

१६. श्री. अजित गवारी, सहा. आयुक्त

१७. श्री. महेंद्र पंजाबी, सहा. आयुक्त

१८. श्री. बाळू नेटके, मुख्य अग्निशमन अधिकारी

१९. श्री. मनिष हिवरे, सार्वजनिक आरोग्य अधिकारी

२०. श्रीम. श्रध्दा सपकाळे, सिस्टम ॲनेलेसिस मॅनेजर

२१. श्री. महेंद्र धिंडे, कनिष्ठ अभियंता

२२. श्री. संतोष लोणे, कनिष्ठ अभियंता

२३. श्री. राजा बुलानी, विद्युत अधिकारी

२४. श्री. जेठा ताराचंद, उप करनिर्धारक व संकलन

२५. श्री. अशोक सासे, सहा. आयुक्त

२६. श्री. अनिल खतुरानी, कर निरीक्षक

२७. श्री. यशवंत सगळे, वाहन व्यवस्थापक

२८. श्री. सचिन जाधव, लिपीक (कर)

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१ श्रीम. नर्गीस खान, लिपीक

२. श्री. बाळू भांगरे, लिपीक

३. श्रीम. विद्या आढळ, लिपीक

दुपारी ३.११ वाजता सभेची सुरुवात करण्यात आली.

आता ही दुसरी सभा सुरु होत आहे. दि. २५/११/२०२१ ही दि.१८/११/२०२१ ला झाली होती. याच्यामध्ये आपण प्रश्नउत्तरे वगळून लक्षवेधी स्विकारण्यास सांगितले होते. त्याप्रमाणे पहिली लक्षवेधी आहे. श्रीमती शुभांगिनी बहेनवाल आधी लक्षवेधी वर चर्चा होईल. मग विषयावर.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:-** हि पण तहकुब करा ना.चला आता चालवण्याची गरज नाही आहे.

**सदस्य, श्री. मनोज लासी:-** अनिश्चित काळासाठी तहकुब.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:-** अनिश्चित काळासाठी तहकुब करा.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** सचिव महोदया नियम काय अनिश्चित काळासाठी नाही समय निर्धारीत करुन सभा तहकुब करु शकतात. नियमात हे सांगितले आहे. तारीख सांगा.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** महापौरजी यांना निवेदन आहे, अनिश्चित काळासाठी तहकुब करा. नंतर ७ दिवसांची नोटीस काढा. २ तारखेपर्यंत आम्ही आणि आमचे जेवढे पण सदस्य

**विरोधी पक्ष नेता, श्री. किशोर वनवारी:-** मा.महापौरजी अस कसे झाले, एक मिटिंग अनिश्चित काळासाठी आणि

**महापौर, श्रीमती लिला आशान** :- आपण एक एक करुन बोलले तर मला समजेल.

**महापालिका सचिव:-** मी नियम वाचते सभा तहकुबचा ठराव मांडला आहे. पीठासीन अधिका-याने कार्यसुचीवर कामकाज चालवण्यासाठी केल्यानंतर कोणत्याही वेळी पालिका सदस्य नियम २ मध्ये निर्देशिलेल्या इतर कोणत्याही कारणावरुन नंतरच्या वेळेवरुन किंवा इतर कोणत्याही दिवसांपर्यंत सभा तहकुब करण्याबाबतचा ठराव मांडत आहे. आणि असा ठराव

**महापालिका सचिव:-** सर पुर्ण वाचू दया. आता आणि इथे अस लिहिल आहे. उपस्थित राहणा-या बाकीचे सदस्य बाजूने मतदान करतील. उपस्थित बहुसंख्य पालिका सदस्याने ठरवल्याप्रमाणे त्याच दिवशी किंवा नंतरच्या वेळेस किंवा इतर कोणत्याही दिवशी सभा तहकुब

**उपमहापौर, श्री. भगवान भालेराव**:- प्रदिप भाई ही सभा मंगळवारी दि.  रोजी

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** मी मंगळवारी नाही आहे. २ तारखेला सभा होईल दोन्ही सभा एकत्रच होतील. २.३० वा. आणि ३.०० वा. होईल.

**महापौर, श्रीमती लिला आशान**:-२ तारखेला सभा घेणार.

---

☑ **स्थगीत प्रस्ताव:—**

दिनांक १८/११/२०२१ रोजीची स्थगीत सभा दिनांक २५/११/२०२१ रोजी दुपारी ३.००वाजता सुरू केलेली सभा काही कारणास्तव स्थगीत करण्यास प्रस्तावीत.

**महासभा ठराव क्र.२० जे** दिनांक: २५/११/२०२१

सुचकाचे नाव:— श्री. कलवंतसिंह सोहता

अनुमोदकाचे नाव:— श्री. जमनादास पुरस्वानी

ही महासभा वरील प्रस्ताग विचारात घेता दिनांक २५/११/२०२१ रोजी सायंकाळी ३.०० वाजता आयोजित केलेल्या सभेचे कामकाज अनिश्चित कालावधीपर्यंत स्थगित करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर/पीठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

**महापालिका सचिव :-** माझे एक म्हणणे आहे की, आधीची सभा पण २ तारखेला ठेवावी लागेल. ओके. कृपया जनगणमन साठी उभे राहावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सांयकाळी ४.३७ वाजता महापौर, श्रीम. लिलाबाई आशान यांनी सभा संपल्याचे जाहीर केले

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)

महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:- ०२-१२-२०२१

**उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.०२-१२-२०२१ रोजीच्या सर्व साधारण महासभेचे इतिवृत्त.**

३-ब

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्व साधारण महासभा गुरुवार, दिनांक १८/११/२०२१ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेचे कामकाज स्थगीत केल्याने सदरची सभा गुरुवार दिनांक २५/११/२०२१ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित सभेचे कामकाज पुन्हा स्थगीत केल्याने सदरची सभा गुरुवार दिनांक ०२/१२/२०२१ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित करण्यात आली. सदर सभेत महापौर, श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या व खालील दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते/होत्या.मा. अवर सचिव, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग यांचेकडील शासनाचे क्रमांक कोरोना- २०२०/प्र.क्र. ७६ / नवि-१४, दिनांक २२ ऑक्टोंबर २०२१ पत्रान्वये विहित कार्यपध्दती पालन करुन प्रत्यक्ष सहभागाने/उपस्थितीने खालील विषयावर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित केली होती.

१. श्रीमती. लिलाबाई लक्ष्मण आशान – महापौर

२. श्री. भगवान भालेराव- उप महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्री. मंगल बालकृष्ण वाघे | ३३ | श्रीमती कविता लाल पंजाबी |
| ४ | श्रीमती जयश्री ज्ञानेश्वर पाटील | ३४ | श्री. जीवन चंद्रभान इदनानी |
| ५ | श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड | ३५ | श्रीमती सविता प्रविण तोरणे (रगडे) |
| ६ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ३६ | श्री. गजानन प्रल्हाद शेळके |
| ७ | श्रीमती मिनाकोर अजितसिंग लबाना | ३७ | श्री. सुमित सागर सोनकांबळे |
| ८ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | ३८ | श्रीमती ज्योत्स्ना सुरेश जाधव |
| ९ | श्रीमती आशा नाना बिराडे | ३९ | श्रीमती ज्योती शामराव माने |
| १० | श्रीमती चरणजितकौर राजेंद्रसिंह भुल्लर | ४० | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| ११ | श्री. राजेंद्रसिंह विरसिंग भुल्लर | ४१ | श्रीमती शीतल चंद्रकांत कदम |
| १२ | श्री. स्वप्नील मिलींद बागुल | ४२ | श्रीमती वसुधा धनंजय बोडारे |
| १३ | श्रीमती सुरेखा हनुमंत आव्हाड | ४३ | श्री. धनंजय बाबुराव बोडारे |
| १४ | श्रीमती अंजना अंकुश म्हस्के | ४४ | श्रीमती दिप्ती नविन दुधानी |
| १५ | श्री. कलवंतसिंग गुरुदेव सोहता | ४५ | श्रीमती ज्योती रमेश चैनानी |
| १६ | श्री. राजू किशनचंद जग्यासी | ४६ | श्रीमती कांचन अमर लुंड |
| १७ | डॉ. प्रकाश घनश्यामदास नाथानी | ४७ | श्री. शंकर गोविंदराम लुंड |

| | | | |
|---|---|---|---|
| १८ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | ४८ | श्रीमती सुनिता बाबुराव बगाडे |
| १९ | श्रीमती सरोजिनी टेकचंदानी | ४९ | श्री. भारत रामचंद राजवानी (गंगोत्री) |
| २० | श्रीमती जया प्रकाश माखिजा | ५० | श्री. सतरामदास पुतनदास जेसवानी |
| २१ | श्री. महेश पहिलराज सुखरामनी | ५१ | श्रीमती अंजली चंद्रकांत साळवे |
| २२ | श्रीमतह अपेक्षा भगवान भालेराव | ५२ | श्री. प्रमोद नामदेव टाले |
| २३ | श्रीमती शुभांगीनी निकम | ५३ | श्रीमती कविता सुधिर बागुल |
| २४ | श्रीमती छाया सुजित चक्रवर्ती उर्फ अडसुळ | ५४ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २५ | श्रीमती ज्योती प्रशांत पाटील | ५५ | श्री. किशोर नारायणदास वनवारी |
| २६ | श्री. राजेश नानिकराम वदारिया | ५६ | श्रीमती मिना चंद्रगुप्त सोनेजी |
| २७ | श्रीमती दिपा नारायण पंजाबी | ५७ | श्रीमती कविता सुरेश गायकवाड |
| २८ | श्रीमती पुष्पा नाना बागुल | ५८ | श्री. मनोज दिलीपकुमार सयानी |
| २९ | श्रीमती शुभांगी मनोहर बेहनवाल | ५९ | श्री. सुरेंद्र बाळकृष्ण सावंत |
| ३० | श्री. राजेंद्र शांताराम चौधरी | ६० | श्री. अरुण लक्ष्मण आशान |
| ३१ | श्री. रवी किशनचंद जग्यासी | ६१ | श्रीमती आशा जीवन इदनानी |
| ३२ | श्रीमती इंदिरा जमनादास उदासी | | |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते / होत्या.

१. श्रीमती. अर्चना गोकुळ करणकाळे, २. श्री. रविंद्र दशरथ बागुल, ३. श्रीमती गीता लालचंद साधनानी,

४. श्रीमती डिम्पल नरेंद्र ठाकुर (कुमारी), ५. श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी, ६.श्रीमती ज्योती प्रकाश बठिजा, ७.श्री.दिपक लक्ष्मणदास सिरवानी, ८.श्री.चंद्रशेखर केशव यादव, ९.श्रीमती मिताली राजेश चान्पूर, १०.श्रीमती संगिता नितीन सपकाळे, ११.श्रीमती सुमन राजेश सचदेव, १२.श्रीमती मिनाक्षी रवी पाटील, १३.श्री.विजय चाहू पाटील, १४.आकाश परशुराम पाटील, १५.श्री.विकास परशुराम पाटील, १६.प्रदिप अर्जुनदास रामचंदानी.

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

३. डॉ. राजा दयानिधी, आयुक्त
४. श्रीम. करुणा जुईकर, अतिरिक्त आयुक्त

३. श्रीम. प्राजक्ता कुलकर्णी, महापालिका सचिव

४. श्री. अशोक नाईकवाडे, उप आयुक्त (मुख्यालय

५. श्री. सुभाष जाधव, उप आयुक्त (सार्वजनिक आरोग्य)

६. श्रीम. प्रियंका राजपुत, उप आयुक्त (कर)

७. श्री. प्रकाश मुळे, नगररचनाकार

८. श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखा अधिकारी

९. श्री. महेश सितलानी, शहर अभियंता

१०. श्री. सुर्यकांत खटके, उप लेखाधिकारी

११. श्री. बाळू नेटके, मुख्य अग्निशमन अधिकारी

१२. श्री. तुषार सोनवणे, सहा. आयुक्त

१३. श्री. गणेश शिंपी, सहा. आयुक्त

१४. श्री. अजित गवारी,सहा. आयुक्त

१५. श्री. महेंद्र पंजाबी, सहा. आयुक्त

१६. श्री. मोहीते, शिक्षणाधिकारी

१७. श्री. मनिष हिवरे, आरोग्य अधिकारी

१८.श्री. के.जे. रहेजा, कार्यकारी अभियंता

१९. श्रीम. श्रध्दा सपकाळे, सिस्टम ॲनेलेसिस मॅनेजर

२०. श्री. संतोष लोणे, कनिष्ठ अभियंता

२१. श्री. महेंद्र धिंडे, कनिष्ठ अभियंता

२२. श्री. जेठा ताराचंद, उप करनिर्धारक व संकलक

२३. श्री. अनिल खतुरानी, कर निरीक्षक

२४. श्री. दत्तात्रय जाधव, भांडार विभाग प्रमुख

२५. श्री. यशवंत सगळे, वाहन व्यवस्थापक

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

४. श्रीम. नर्गीस खान, लिपीक
५. श्री. बाळू भांगरे, लिपीक
६. श्रीम. विद्या आढळ, लिपीक
७. श्री. अंकुश कदम, महापौरांचे स्विय् सहाय्यक

सायंकाळी४.१५वाजता सभेचे कामकाज सुरु करण्यात आले.

**महापालिका सचिव:-** दुसरी सभा सुरु होत आहे, त्यामध्ये लक्षवेधी सुचना आहे.सुचक आहेत, श्रीम. शुभांगी बेहनवाल.

**विषय:-** दिव्यांगत कल्याणकारी योजनेअंतर्गत दरमहा १०००/- रुपये पैकी रुपये २०००/- मानधन वाढवून देणे बाबत.

**लक्षवेधी सुचना याप्रकारची आहे.....................**

---

## लक्षवेधी सूचना क्रमांक १

विषय:- उपरोक्त विषयानुसार आपले लक्ष वेधू इच्छिते की, यापुर्वी माझे पत्र क्र.१५७/२१ दिनांक ११/११/२०२१ अन्वये महापालिकेमार्फत दिव्यांग कल्याणकारी योजना अंतर्गत महाराष्ट्र शासन निर्णय क्र. संकिर्ण २०१५/प्र.क्र.११८/नवी-२०, दिनांक २८ ऑक्टोंबर, २०१५ प्रमाणे शहरातील लाभार्थी दिव्यांग बांधवांना मदत म्हणून महापालिकेचे उत्पनापैकी एकुण ५ टक्के इतका खर्च अपेक्षित आहे.

आजवर सदर शासन निर्णयाचे योग्य पध्दतीने पालन करण्यात आले नसून सदर दिव्यांग लाभार्थींना प्रतिमहा रुपय १०००/- एकुण वार्षिक रुपये १२००० असे मानधन महापालिका दिव्यांग कल्याणकारी योजना विभागामार्फत ६-६ महीने विभागून २ ते ३ टप्यात कधी-कधी तरी ४ टप्पे भागात विभागून दिले जाते. म्हणजे १ वर्षात रु.१२००० मिळणे अपेक्षित असतांना तीच रक्कम लाभार्थी दिव्यांग बांधवांच्या खात्यात जमा होण्यास दोन ते अडीच वर्ष लागतात. दिव्यांग कल्याणकारणाने रोजगार व उत्पन्नाचे साधन उपलब्ध नसून आर्थीक अडचणीमुळे दिव्यांग लाभार्थी बांधवांचे अतोनात हाल होतात. सदर दिव्यांग लाभार्थी बांधवांना दैनंदिन जीवनातील औषधोउपचार व उदरनिर्वाह करण्यास अनेक अडचणीचा सामना करावा लागतो.

**सदस्या, श्रीम. शुभांगी बेहनवाल:-** मा. महापौर, उपमहापौर, आयुक्त साहेब ३ डिसेंबर म्हणजे उदया दिव्यांग दिन म्हणून साजरा केला जातो. आणि आतापर्यंत आपण त्यांना जे दरवर्षी जे काही पैसे दिले जातात ते काही काही दिव्यांग लोकांपर्यंत पोहचलेले नाहीत. तर मी लक्षवेधी सुचनेमध्ये असे नमुद केलेले आहे. २००० रुपये वाढवून त्यांना देण्यात यावे. कारण महागाईच्या स्वरुपामध्ये कोरोना काळाच्यानंतर जी महागाई वाढलेली आहे. त्याचा काहीतरी बोध म्हणून घेण्यात यावा कारण त्यांचा खर्च जो आहे तो त्यांच्याकडून भागवला जात नाही. औषधाचा खर्च असो किंवा जेवणाचा खर्च असो तर माझी अशी मागणी आहे की, २००० रुपये वाढवून त्यांना देण्यात यावे.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** दिव्यांगाचा विषय कोणाकडे आहे.

**उप लेखा अधिकारी, श्री. सुर्यकांत खटके:-** सन्माननीय महापौरजी, सन्माननीय उप महापौर साहेब, सन्माननीय आयुक्त साहेब, सन्माननीय सर्व सदस्य, सन्माननीय व्यासपीठ दिव्यांगांना दिली जाणारी पेन्शन बील तयार झालेले आहे आज चव्हाण सरांनी सांगितले आहे की, आज चेक काढू. कमीत कमी चार महिन्याचा चेक काढू, उदया अपंगाच्या दिनानिमित्त आम्ही त्यांच्या खात्यामध्ये टाकणार आहोत. ते आपल्या सभागृहाला सांगू इच्छितो.

**सदस्या, श्रीम. शुभांगी बेहनवाल:-** माझी अशी मागणी आहे आपण वर्षाला देण्यापेक्षा दर महिन्याला दिले तर खुप चांगले होईल. कारण वर्षाला न खर्च करता ते दर महिन्याला खर्च करतील आणि त्या पैशामधून त्यांना भागविता येईल.

**उप लेखा अधिकारी, श्री. सुर्यकांत खटके:-** हो त्या संदर्भातच आम्ही चव्हाण सरांशी चर्चा केलेली आहे. सर म्हणाले पहिल्या ३ महिन्याचे उदया टाकू. नंतरचे जे महिने येतील ते महिन्याला खात्यावर जमा करु.

**सदस्या, श्रीमती अंजली साळवे** - मा. महापौर मॅडम दिव्यांगाचे मानधन महिन्याच्या महिन्याला मिळावे कारण त्यांना त्याची अत्यंत गरज असते. आपण ३ महिन्यानी ६ महिन्यानी देतो तर हे बरोबर नाही आहे. आणि ते सुध्दा आपण व्यवस्थित देत नाही. तर ते वाढीव पेन्शन देण्यात यावे आणि ते अपंगाचे/दिव्यांगाचे पेन्शन अजून झालेले नाहीत. ते सुध्दा करुन देण्यात यावे.

**सदस्या, श्रीमती वसुधा बोडारे:-** मा. महापौर, उपमहापौर, आयुक्त साहेब दिव्यांग आपल्या ज्यावेळी लॉकडाउन झाले त्यावेळेला बरेच दिव्यांग गावी गेले, कुठे बाहेर गेले, पण गेले म्हणजे आहेत ना या लोकांनी सर्वे करायलाच पुर्ण वर्ष-वर्ष घालवल आणि अख्ख वर्ष २ वर्ष त्यांना पगार नाही. वर्षानंतर ज्यावेळेस आम्ही येथे यायला लागलो त्यावेळेस पाठपुरावा करुन पहिली ६ हजार कसे तरी टाकले आणि नंतरच्या ६ ला कशा खेटा घालायचे आहेत. ते खरोखच बरोबर नाही. दिव्यांग हयात आहेत ते वर्षाच्या शेवटी तुम्हांला फॉर्म देतील. जर लॉकडाउन झाला तर त्यांच्याकडे उदर निर्वाहला काही साधन नाही गावी गेले, कोण कुठे गेले, आपण सगळेच गेलो होतो. ती लोक नाहीत म्हणून पैसे देणार नाही. ती लोक नाहीत सर्वे तर करत नाहीत स्वत:च्याच मनाने गेलेत मग त्यांचे पैसे देणार नाही. मग परत ती नावे गोळा करायची अरे सर्वे करायला जा. प्रभाग अधिकारी यांच्या मागे लागायचे नंतर सर्वे करायचा नंतर पैशासाठी मागे लागायचे नगरसेवकांनी काय काय कामे करायची. रस्ते, वीज, पंखे, दिव्यांगासाठी प्रत्येकाचे फॉर्म भरा. तर हे बरोबर नाही आहे. जी तुमची कामे आहेत, ती व्यवस्थित करा. ते ६००० हजार रुपये त्यांनी ते वाढवून मागीतले खरंच चांगले, बेहनवाल यांनी प्रस्ताव आणला आहे तो खरंच छान आहे. जे त्यांचे हक्काचे आहेत ते पण तुम्ही वेळेवर देत नाहीत. ६००० दिले पुढचे ६००० बघु नंतर. असं नाही, जे काही तुमचे प्रभाग अधिकारी कोणी तुमचे असेल तो सर्वे का करत नाही, तुमची जबाबदारी आहे आम्ही जावून बघायचे प्रभाग अधिकारी का गेला नाही सर्वे करायला, ते खरंच चुकीचे आहे. बेहनवाल म्हणतात २०००

हजार पण मी तर म्हणते त्यांचे हक्काचे १००० तर मिळू दे. त्यासाठी खरंच आयुक्तांनी वगैरे लवकरात लवकर त्यांचे जे काही असतील ते हक्काचे पैसे ते देण्याची कृपा करावी.

**सदस्या, श्रीमती सुनिता बगाडे** :- मा. महापौर, उपमहापौर, आयुक्त साहेब दिव्यांगासोबतच विधवा पेन्शन आणि घटस्फोट पेन्शन ती पण वेळेवर आणि महिन्याला देण्यात यावी.

**उप लेखा अधिकारी, श्री. सुर्यकांत खटके:-** हा विषय आपला नाही हा दिव्यांगाला नाही आहे.

**सदस्या, श्रीमती सुनिता बगाडे**:-पण विधवा पेन्शन आणि हे पण महत्वाचे आहे ना. अपंगासोबत ते पण आहे.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव**:- सांगतो तुम्हांला हा विषय आपला नाही त्या दोन योजना तहसिलमार्फत राबविल्या जातात. फक्त दिव्यांगाच्या योजना आपण राबवितो. त्या तहसिलमार्फत राबविल्या जातात.

**सदस्य, श्री. भारत राजवानी**:- मा. महापौर, उप महापौर, आयुक्त साहेब हा दिव्यांगाचा नेहमी मानधनाचा विषय होतो. पाठपुरावा करायला पाहिजे. आपल्याकडे वारंवार यावे लागते तर जी त्यांची रक्कम आहे ती दर महिन्याला त्यांच्या खात्यात गेली पाहिजे. तर त्यांना पण मदत होईल. आणि त्यांचा पण घर परिवार आहे.

**उप लेखा अधिकारी, श्री. सुर्यकांत खटके:-** आता या वेळेस दर महिन्याला देण्यात येणार आहे.

**उप लेखा अधिकारी, श्री. सुर्यकांत खटके:-** हो ५५

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:-** दर वर्षी आपण किती दिव्यांगांना या योजनेचा लाभ देतो.

**उप लेखा अधिकारी, श्री. सुर्यकांत खटके:-** आतापर्यंत २०२१ पर्यंत १२२०, दिव्यांग २७४, मतिमंदचे पालक आणि ५६ त्यामधील एक वारला थायलासेमिया. असे ५५ थायलासेमिया असे १५४९ लोकांना त्यांच्या खात्यात २०२१ दिवाळी पुर्वी टाकलेले आहेत. आता जी मागणी होत आहे ती २०२१-२०२२ ची आहे सर. जे २२ वे वर्ष अजून संपायचे आहे. मार्चला संपणार आहे. त्यासाठी सगळी ही मागणी आहे. आणि आपण आज चेक काढणार आहेत. २०२१-२०२२ च्या साठी ३ महिन्यासाठी उदया त्यांच्या खात्यात जमा होतील.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:-** दिवाळी २०२०१ मध्ये त्यांना सगळयांना पैसे मिळाले.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:-** नविन सर्वे केला आहे का. बाकी आहे.

**उप लेखा अधिकारी, श्री. सुर्यकांत खटके:-** नवीन सर्वे ५०० झालेले आहेत. त्याचे २०२१ पर्यंतचा सर्वे झालेला आहे. प्रभाग अधिकाऱ्याकडून पडताळणी करुन आलेला आहे.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:-** माझ्या माहितीनुसार मागील कमी होते बरोबर सर्वांना तुम्ही सरसकट दिले परत फॉर्म भरण्यासाठी, मग आपण योजना का चालू केल्या. त्यांना त्यांच्या घरापर्यंत पोहचली पाहिजे. माझ्या माहितीप्रमाणे ४-४,५-५ वेळा महापालिकेमध्ये, प्रभाग कार्यालयात वारंवार नगरसेवकांकडे आल्या तरी त्यांची नावे त्यामध्ये समाविष्ट जवळपास ४०० ते ५०० लोक खटके साहेब ४०० ते ५०० लोक मागच्या वर्षीपेक्षा कमी झाले आहेत अशी माझी माहिती आहे.

**उप लेखा अधिकारी, श्री. सुर्यकांत खटके:-** नाही सर, सर्व आहेत.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:-** बरेचशे दिव्यांग येतात आमची नावे नाहीत. प्रभाग अधिकारी यांना विचारले की आमचा सर्वे करुन दिलेला आहे. ते देत नाहीत. हे असे झालेले आहे का.

**सदस्य, श्री. राजू जग्यासी:-** एक मिनिट दर वर्षी आपल्याकडे आहे. यांना दर वर्षी हयातीचा फॉर्म भरावा लागतो.

**उप लेखा अधिकारी, श्री. सुर्यकांत खटके:-** सर, दर वर्षी हयातीचा फॉर्म भरावा लागतो.

**सदस्य, श्री. राजू जग्यासी:-** जर ते कारण असेल तर ते पण आपण चेक करा. नाहीतर हे सर्व नगरसेवकांकडे येतात दिव्यांग असतील, अपंग असतील त्यांना वारंवार धक्के खावे लागतात. पुर्ण सभागृहाला माहिती दया. किती टक्के लोकांना आम्ही हे रक्कम देवू शकतो. किती टक्के जी आर काय सांगतो.

**उप लेखा अधिकारी, श्री. सुर्यकांत खटके:-** जी आर बजेटच्या ५ टक्के सांगतो.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-** अंदाजे किती रक्कम असेल.

**उप लेखा अधिकारी, श्री. सुर्यकांत खटके :-** आताच्या बजेटच्या हिशोबाने ७ करोड आहे

**सदस्य, श्री. राजू जग्यासी:-** आम्ही किती देतो.

**उप लेखा अधिकारी, श्री. सुर्यकांत खटके :-** सर पेन्शनच्या साठी आम्ही १ करोड ८५ लाख रुपये देतो. २००० हजाराची मागणी आहे तर त्यासाठी ४ करोड ८५ लाख लागतील.

**सदस्य, श्री. राजू जग्यासी:-** जी आर मध्ये जे असेल आम्हांला अपंगासाठी व त्यांच्या सवलतीसाठी ७ करोड लागतील. बरोबर जी आर हे सांगतो. आणि आम्ही किती देतो सव्वा करोड त्यानंतर ही धक्के खावे लागतात. त्याचे कारण काय.

**उप लेखा अधिकारी, श्री. सुर्यकांत खटके:-** सव्वा करोड नाही सर सव्वा दो करोड आहे.

**सदस्य, श्री. राजू जग्यासी:-** कुठे ७ करोड, कुठे सव्वा २ करोड, एवढे सगळे होऊन पण वारंवार ते बाहेर येऊन बसतात. धरणा देतात. त्यांना काही सुविधा नाहीत. त्यांच्या बील व पगाराला बिलकुल दुर्लक्ष केले जात आहे.

**उप लेखा अधिकारी, श्री. सुर्यकांत खटके :-**आजपर्यंत २०२०-२०२१ पर्यंत पुर्ण दिले आहे सर, आता जे मागणी करत आहेत ते २०२१-२०२२ साठी आहे.

**सदस्य, श्री. राजू जग्यासी:-** खटके साहेब तुम्हांला पण माहित आहे किती वेळा त्यांनी धरणा दिला आहे. तुम्हांला पण माहित आहे आम्हांला पण माहित आहे. अशी परिस्थिती का येते. ७ करोडच्या जागी आम्ही देतो सव्वा २ करोड, आपल्याला ७ करोड खर्च केले पाहिजे ना.

**उप लेखा अधिकारी, श्री. सुर्यकांत खटके :-** आता सर्व योजना मिळून करणार आहेत सर,

**सदस्य, श्री. राजू जग्यासी:-** ठिक आहे.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:-** मा. महापौरजी, या विषयात मी बोलू इच्छितो की, जे आपण ३ महिन्यात, ६ महिन्यात त्यांना पगार देतात. दिव्यागांना किंवा थॅलेसिमिया मुलांना त्यात दर महिन्याला त्यांना पगार मिळाला पाहिजे. जसे ते आपल्या औषधांसाठी किंवा दुसऱ्या गरजांसाठी वारंवार आमच्याजवळ नाही आले पाहिजे. आणि आर.टी.जी. द्वारा दर महिन्याला त्यांना पगार मिळाला पाहिजे.

**उप आयुक्त (वैदयकिय आरोग्य), डॉ. सुभाष जाधव:-** सन्माननीय महापौर महोदया, सन्माननीय सभागृह मी आपल्या निदर्शनास हे आणून देवू इच्छितो, यापुर्वीच्या महासभा ठरावानुसार १२००० रुपये मंजूर केले होते. आणि ही जी वाढीव रक्कम आहे ती फक्त रक्कम वर्ग करण्यापुरतेच बजेट नाही आहे. ज्याकाही दिव्यांग कल्याणकारी योजना आपल्याला राबवायाच्या आहेत. हया ५ टक्क्यातूनच राबवायच्या आहेत. आपण फक्त रक्कम जर टाकली आपण बाकीच्या योजनेला साहित्य वाटप, किंवा कोणत्याही योजनेचा लाभ देणार असू, ते आपल्या बजेटच्या तरतुदीत बसणार नाही. त्यामुळे केवळ १००० हजार आणि २००० हजार रुपये आपण जर केले. तर आता खटके विभाग प्रमुखांनी सांगितल्याप्रमाणे जवळपास ५ सव्वा ५ कोटी त्याच्यावर जातील. आणि आपल्याकडे ७ कोटी रुपये आहेत. आपल्याला कोणतीच योजना यात राबविता येणार नाही. केवळ रक्कमच टाकावी लागेल. आणि तसे शासनाच्या जी आर मध्ये तसेच काही नाही की त्यांना २००० रुपये दया. त्यांना या ५ टक्क्यामधुनच या योजना राबवावयाच्या आहेत. मग आपण त्यांना अनुदान स्वरुपात किती रक्कम दयावी, हे आपण पहावे त्यामुळे २००० हजार रुपये रक्कम करता येणार नाही असे मला वाटते.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:-** बघा बजेटमध्ये ५ टक्के तरतुद करणे एक गोष्ट आहे. आणि खरी वसुली जी महानगरपालिकेच्या जवळ येते त्याच्या ५ टक्के देणे वेगळी गोष्ट आहे. ती अनिवार्य आहे. आता होत अस की १ वर्षात त्यांचे फॉर्म भरले त्यांना प्रमाणपत्र, ओळख पत्र, बँक खात्यातील सविस्तर माहिती, ते देण्यासाठी लावले. १ वर्ष पुर्ण झाल्यानंतर त्यांना सांगितले जाते की, आपण सर्व कागदपत्रे परत घेऊन या. हयातचा दाखला वेगळी गोष्ट आहे. डॉक्टर किंवा नगरसेवक, अधिकृत असेल तो देईल. परंतु यात त्यांना जे पैसे मिळतात, ते ३ महिने किंवा ६ महिने मिळतात, जसे आता खटके साहेबांनी सांगितले. की २०२०-२०२१ चे दिले. आता २०२१-२०२२ चालू आहे, २०२१- आर्थिक वर्ष २०२२

चालू होऊन एप्रिल, मे, जून, जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर, ऑक्टोबर, नोव्हेंबर, डिसेंबर ९ वा महिना चालू आहे. आपण जसे आपला पगार दर महिन्याला घेतात, नगरसेवकांना त्यांचा भत्ता दर महिन्याला मिळतो, तसे या दिव्यागांना पण दर महिन्याला पैसे मिळाले पाहिजेत, की जसे ते आपल्या गरजा, जसे औषधे आहेत, आणि त्यांचे काही इतर गरजा असतील तर त्यात त्यांना मदत मिळेल. ते आपल्या विभागातून अशी पध्दत बनविली पाहिजे की, कि १ तारीख झाली त्यांचे बील बनले पाहिजे आणि बीलाची प्रक्रिया त्या विभागातून सही होऊन लेखा विभागात गेली पाहिजे. जसे आपण सर्वांना आरटीजीएस करतात, पगारात किंवा भत्त्यात यांना पण त्याचवेळेस त्यांना दर महिन्याला आरटीजीएस गेले पाहिजे.

**उपआयुक्त (वैदयकिय आरोग्य), डॉ. सुभाष जाधव**:- ठिक आहे. महिन्याला आपल्याला कसे करता येईल ते वर्क आऊट करुन आणि तशी अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न करु. पण १ हजार रुपये अनुसरुनच.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:-** कोणती पण नवीन पध्दत बनविण्या आधी सुरुवातीला थोडे कठीण होते. आता विभागाला काय वाटते ३-६ महिन्याला एक संचिका बनवू. आता दर महिन्याला संचिका बनवावी लागेल. सुरुवातीला त्रास होईल आम्ही पण समजू शकतो. परंतु जशी पैशांची गरज प्रत्येक कर्मचा-याला प्रत्येक अधिका-याला होते. तर ते कमवू शकत नाही किंवा त्यांना कुठे रोजगार मिळू शकत नाही किंवा कुठे नोकरी करु शकत नाही. त्यांना स्वावलंबी बनविण्यासाठी एक योजना सुरु केली पाहिजे की जसे, ते आपला रोजगार पण करु शकतील. त्यांना ते प्रशिक्षण दिले पाहिजे. त्या योजनेअंतर्गत जो आपला बजेट आहे. तसेच जीआरमध्ये तरतुद आहे. त्यांना आपण प्रशिक्षण दिले पाहिजे. प्रशिक्षण दिल्यानंतर ते आपले काम करतील. ज्याची जी पात्रता आहे काम करण्याची त्यांना त्या हिशोबाने प्रशिक्षण देऊन त्यांना स्वावलंबी बनवले पाहिजे. त्यांना त्यांच्या पायावर उभे राहता आले पाहिजे असा मदतीचा हात दिला पाहिजे. याप्रकारे विभागाने काम केले पाहिजे. मी आयुक्तांना निवेदन करतो की, ज्यावेळी मी स्थायी समिती सभापती होतो. मी त्यावेळेचे आयुक्त श्री. सुधाकर देशमुख यांना एक विनंती केली, दिव्यांग कल्याणकारी विभाग, शिक्षण विभाग आणि महिला बाल कल्याण विभाग आणि हे ४ विभाग एकाच उपआयुक्तांच्या अधिकारात असले पाहिजे. त्यांच्या ज्या योजना आहेत त्या कुठे ना कुठे एकमेकांना आतून जोडलेल्या आहेत. एकाच उप आयुक्तांच्या अधिकारात जर ते ४ विभाग असतील त्यामुळे प्रशासनाला सहकार्यात सवलत होईल. आणि त्याचा फायदा दिव्यांग, महिलांना बचत गटांना आणि शिक्षण मंडळाची जी मुले आहेत त्यांना मिळेल, धन्यवाद.

**सदस्या, श्रीम. वसुधा बोडारे:-** मा. महापौर, आयुक्त साहेब मला एवढेच म्हणायचे आहे की, अडीच करोड करता आणि उरलेले ५ करोड बाकीचे देतात. २-३ वर्षात आपण काय काय योजना केल्या दिव्यांगांना आतापर्यंत काय दिले. नुसते चष्मा, काठी तेच देतो. तर ज्यांचा हात गेला आहे तर त्यांना हात आणि पाय लावणे किती महाग आहेत तुम्हांला माहित आहे. या दिड हजार लोकांमध्ये ५० जणांना जरी तुम्ही हात आणि पाय दिले वधारीया साहेबांनी सांगितले की काहीतरी स्वत:चे रोजगार करु शकतील. पाय दिले तर त्यांना ट्राय सायकलची गरज नाही. आणि हात दिले तर ते काम करु शकतात. सर्वांनाच दिड हजार लोकांना आपण देऊ शकत नाही. पण तुमच्या उरलेल्या साडे पाच करोडमध्ये थोडया लोकांना तर आपण करु शकतो. दोन वर्षात काय काय देतो काठी आणि ट्राय सायकल झाले आपले काम वरचे ५ करोडबददल कोण विचारायलाच येत नाही. आणि खरच करतो का. त्यांनी सांगितले २ हजार नाही देऊ शकत पण जे देऊ शकतो ते तरी दया ना. जयपुरला हात लावणे, पाय लावणे किती महाग आहे. गरीब असेल घ्या सगळे कागदपत्रे १० जणांना या वर्षी १० जणांना पुढच्या वर्षी करु शकता ना. हे तुमचे काम आहे कधी या योजना राबवणार आहेत.

**उप आयुक्त (वैदयकिय आरोग्य), डॉ. सुभाष जाधव**:- चालु आर्थिक वर्षात आपण विविध प्रकारच्या योजना चालू दिव्यांगांना जे अस्थिव्यंग असतील यांना व्हील चेअरस, चालण्याची काठी जे उपयोगी साहित्य असते आपण त्या या वर्षी देऊ या. मागील २ वर्षात आणि तस काही नावीन्यपुर्ण आपल्याकडे असतील तर आपण निश्‍चितपणे आम्हांला सुचवावे मॅडम त्या पध्दतीने आम्ही दिव्यांगांना देण्याचा प्रयत्न करु आर्थिक तरतुदीच्या अधीन राहून.

**सदस्या, श्रीम. मीना सोंडे:-** मा. महापौर मॅडम, पहिले आपण दिव्यागांना एसटीडी बुथ च्या कॅबिन पुरवत होतो. आता ज्याप्रमाणे मोबाईल आले आहेत आणि एसटीडी कोणी वापरत नाही. तर ज्यांचे डोळे आणि हात चांगले आहेत त्यांना मोबाईल दुरुस्तीचे प्रशिक्षण पण देऊ आणि त्यांना केंद्र उपलब्ध करुन दया. ज्याप्रकारे ७८ प्रभाग आहेत, वॉर्ड आहेत ज्याप्रकारे तर ७८ लोकांना आपण जर मोबाईल दुरुस्तीचे प्रशिक्षण दिले तर घरोघरी काम करणा-या महिलांजवळ पण मोबाईल असतो. जर आपण त्यांना मोबाईल दुरुस्तीचे प्रशिक्षण दिले आणि त्यांना कॅबिन पण दिल्या, तर स्वत:च्या पायावर उभे राहू शकतात व घर बसून करु शकतात. धन्यवाद!

**<u>सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:-</u>** महापौर साहेबा जे आमच्या मिनाताई यांनी सांगितले आहे ते बरोबर आहे. माझा या गोष्टीला पाठिंबा आहे.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे :-</u>** महासभा कुठलाही निर्णय घेतला तरी अंमलबजावणी, पहिली गोष्ट महासभेने घेतलेला निर्णय प्रशासनास मान्य आहे की नाही नसेल तर त्यांनी इथे स्पष्ट सांगावे.

**<u>उप आयुक्त (वैदयकिय आरोग्य), डॉ. सुभाष जाधव</u>** :- २ हजार रुपयाचा म्हणता.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:-</u>** त्याविषयाचा कुठलाही निर्णय २ हजार नाही. बजेट किती आहे ते सांगितले, टक्केवारी किती होते, खरोखर बजेट किती आहे. टक्केवारी किती होते आणि बाकीचे उरलेले आपण कल्याणकारी योजना, नगरसेवकांनी तुम्हांला विचारले की, मागच्या २ वर्षापासुन आपण दिव्यांगासाठी कल्याणकारी योजना कोणत्या राबविल्या आहेत. त्याच्यावर किती खर्च झाला, याची माहिती असली पाहिजे. पुढचा विषय याबाबतीत महापौरांनी त्यांच्या दालनामध्ये बैठक बोलविली होती. दिव्यांग कल्याणकारी योजना राबविण्यासाठी काय काय ......खटके साहेब बरोबर का. आपले प्रशासन एवढे परिपुर्ण आहे की, जीआर कुठला लावला पाहिजे, प्रशासनास ते माहित नाही. नगरपालिका, महानगरपालिका या अबर्न डेव्हलपमेंटकडे येतात. आणि प्रशासन खटके साहेबांनी जीआर आणला होता ग्राम विकासचा आम्ही २ तास चर्चा केली. महानगरपालिका चालवितो आपण मुळ जीआर आणला पाहिजे, अबर्न डेव्हलपमेंटचा ना. २ तास आमची चर्चा झालेली आहे. संपुर्ण प्रस्ताव तुम्ही बघितला असेल तर संपुर्ण चर्चा केल्यानंतर लक्षात येते की ग्रामविकास मंत्रालयाचा जीआर आणून त्याच्यावर त्यांनी प्रस्ताव तयार केला चर्चा करुन यावरुन प्रशासन किती गांभिर्याने दिव्यांगांकडे बघते ते दिसून येते. यात तळमळ असली पाहिजे तळमळ असेल तर अभ्यास होईल, नाहीतर काय आणायचे बस. अभ्यास करायचा नाही आणायचे आणि ठेवायचे. त्याच्यावर महापौर, लोकप्रतिनिधी बोलले तर त्यांना हे खटकत. एक उपआयुक्त, सहायक आयुक्त, त्या सर्वांकडून प्रस्ताव फिरुन येतो आणि शेवटी खोदा पहाड, निकला चुहा, शेवटी जीआर कुठला येतोय, काय तो पण मेलेला जवळ म्हणजे एवढी सगळी यंत्रणा तो प्रस्ताव तयार करण्यासाठी लागते, आणि शेवटी महापौरांकडे विषय येतो ग्रामविकासाचा मंत्रालयाच्या माध्यमातुन जीआर येतो काय उपयोग आहे का त्याचा. आणि ते पैसे आम्ही मागणार होतो राज्य सरकारकडे बरोबर. राज्य सरकारकडे मागण्यासाठी आणि त्याला पण आयुक्तांची मंजूरी होती. महापौर महोदया बरोबर का. तुमच्या दालनामध्ये मिटिंग बोलविली होती. दिव्यांग कल्याणकारी योजना निधी मागविण्यासाठी महापालिका निधी देतच नाही. २०२१ डिसेंबर म्हणजे २०२१-२०२२ चा पत्ता नाही. ९ महिने झालेले आहेत. आणि देतो किती १ हजार रुपये. राजेश वधारीया यांनी सांगितले तुमचा एक महिन्याचा पगार राहिला तर चालेल का. मग दिव्यांगासाठी १ हजार रुपये पण आम्ही देऊ शकत नाही. ... दुर्लक्षित घटकांकडे आम्ही लक्ष दिले पाहिजे. तेच आम्ही दुर्लक्षित करतो. आणि काय विकासाचे दिव्यांग कल्याणकारी योजनेसाठी जीआर वापरला पाहिजे तो नगरपालिकेचा कि ग्रामविकासचा हे अजून आमच्या अधिका-यांना माहित नाही. ग्रामविकासचा जीआर आणता, आणि आम्ही शंका आणल्या तर त्यांना ते खटकते. मग तिळपापड होतो. ग्रामविकासचा जीआर आणताय त्याच्यावर आम्ही असे अधिकारी आमच्या महानगरपालिकेचे काय कल्याण करणार. त्याच्यावर महापौरांनी २-२ तास चर्चा करायची आणि निष्पन्न काहीच नाही. श्री. राजेश वधारीया यांनी सांगितले खोदा पहाड निकला चुहा, वो भी मरा हुआ, त्याचा फक्त वासच येतोय. लोकांना काय त्याच. त्यासाठी अभ्यास करण्याची तळमळ पाहिजे खटके साहेब. ९ महिने झाले दिव्यांगांना १ रुपाया मिळाला नाही. काय अवस्था असणार आहे देतोय किती १ हजार रुपये. ९०० रुपये सिलेंडर झालेले आहे. महानगरपालिकेत यायचे म्हटले तर त्यांना एका दिवसाचे १०० रुपये भाडे लागते. हे १००० रुपये मिळण्यासाठी त्यांनी १० चकरा मारल्या आहेत. तुमच्या सर्वेमध्ये नाहीत. नाहीतर हयातीचा दाखला, हयातीचा दाखला दिल्यानंतर सुध्दा ४-४ वेळा फिरायला लावतात. महापालिकेचे बजेट ९०० कोटीचे आणि दिव्यांगासाठी १ हजार रुपये नाही लाज वाटायला पाहिजे. कसल्या तुम्ही योजना राबविणार आहेत. हयातीचे ५ कोटी ७ कोटी योजना राबविल्या जातात कुठल्या योजना राबविल्यात २ वर्षात. एक महिला बालकल्याणच्या माध्यमातून काय चालायची ती चालेल, महापालिकेचे प्रशासन म्हणून काय नगरसेवक करतात म्हणून तुम्ही काय करतात. तुम्ही आणता ग्रामीणचा जीआर. त्याचे काय दु:ख पण नाही, आणि जाणीव पण नाही, दिव्यांग कल्याणकारी योजना तुम्ही २ वर्षात काय काय राबविल्या आहेत ते सांगा.

**<u>सदस्या, श्रीमती मीना सोंडे:-</u>** महापौर मॅडम एक अजून सुचना दयायची आहे. वंदना चव्हाण मॅडम जेव्हा पुण्याची महापौर होती. त्यांनी स्माईल केंद्र म्हणून एक केंद्र बनविले होते. त्या आता मंत्री आहेत. तर तेथे आम्ही बघितले की, तिथे दिव्यांग आहेत आणि खास करुन महिला त्यांचे प्रशिक्षण केंद्र असतात सर, आम्ही राज्याच्या महिला बालकल्याणकडून

आमच्या इथे मुकबधिर शाळा आहे, तक्षशिला येथे आम्ही कायम स्वरुपाचे प्रशिक्षण केंद्र सुरु करु शकतो कृपया यावर लक्ष दया. आणि यात आमची नगरसेवक म्हणून काही मदत हवी कुठे पण असेल तर आम्ही तयार आहोत. धन्यवाद! सर.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** मा. महापौरजी मा. आयुक्त साहेब, दिव्यांग कल्याणकारी योजनेला किंवा कोणतीही कल्याणकारी योजना असु दया. हे कार्य तेव्हा सफल होतात जेव्हा एक अधिकारी मनात सेवेचा भाव ठेवतो. की मी ही कल्याणकारी योजना दिव्यांगासाठी देईल. किंवा कुणाही मुलांसाठी, महिलांसाठी ही जेव्हा मी लावेल लागू करेल, त्यावर काम करेन, त्याच्या मनात सेवेचा भाव असला पाहिजे. खुप सा-या अशा संस्था आहेत ज्यांना निधी दिला जात नाही. परंतु त्या दिव्यांग कल्याणकारी योजना राबवितात. आम्ही लोकांनी जेव्हापासुन ही महानगरपालिका तयार झाली २४ वर्षात जर एक दिव्यांग कल्याणकारी योजनेवर नजर टाकली तर आम्ही कोणाचेच भले नाही केले. हजार दयायचे, १२ हजार दयायचे चांगल्या कामासाठी लावले. त्यांचे पुढील भविष्य चांगले जावो. अस आपण काहीच नाही केले. जसे मॅडमने सांगितले की, कुणाचे हात कापले आहेत, कुणाचे पाय कापले आहेत, आम्ही कधी अशी योजना बनविलीच नाही, की आम्ही त्यांचे भले करु शकू. आम्हांला सरकारतर्फे ५ करोड ७ करोड एवढे पैसे असूनही आम्ही कोणतीच कल्याणकारी योजना चांगल्यारितीने लावली नाही याचे मुख्य कारण आहे आमच्याजवळ सेवा करण्याचा भाव नाही. आम्ही फक्त एक पदाधिकारी आहोत, आम्ही एक कर्मचखरी आहोत, आम्ही इथे बसलो आहोत, आम्हांला पगार मिळतो, काम करायचे आहे. परंतु आम्ही कर्मचा-यांचे एक मानवतेच्या नात्याने कार्य करणे सुरु केले. तर १० करोडची पण आवश्यकता असणार नाही. किती कल्याणकारी योजना लागतील. आता इथे बोडारे यांनी जो विषय ठेवला ग्रामविकासचा जीआर काढला आहे. तर नक्कीच शहर विकासचा पण निघाला असेल. असे नाही की, एकच जीआर निघाला. परंतु आम्ही शोधण्याचा प्रयत्न केला नाही. शहराचा अंपग आहे तिथे जो दिव्यांग आहेत त्यांच्यासाठी योजना बनविली नाही. कोणता जीआर नाही निघाला. कारण आम्ही विचारच केला नाही. फक्त ग्रामविकासवर लक्ष ठेवले. ग्रामविकासचा निघाला आहे तर शहरविकासचा पण निघाला असेल, बघितला पाहिजे. मी सर्व अधिका-यांना निवेदन करतो की, जेव्हा अशी कल्याणकारी योजना शासनातर्फे टक्केवारीने लागू होते. तर आम्हांला सर्व गोष्टींना विसरुन एक सेवाभावाने काही दिव्यांगांचे भले करायचे आहे. आम्ही कशाप्रकारे करु शकतो. त्यावरच लक्ष ठेवू. जरुर सगळयांचा फायदा होईल.

**सदस्य, श्री. राजू जग्यासी:-** मा. महापौरजी, जसे की प्रशासन कोणते काम कमी करतो किंवा चुकीचे करतो तर आम्ही सर्व सभागृह जोरात बोलतो. अधिकार पण आहे. परंतु कोणी जर चांगले काम केले असेल तर आमचे कर्तव्य बनते की आम्ही सभेत सर्वांना समोर बोलले पाहिजे. मला बोलायची संधी मिळाली नाही मागच्या वर्षी कोरोना काळ असल्यामुळे मी विशेषत: मा. आयुक्त साहेबांचा आभारी आहे की, ज्या थॅलेसेमियाच्या मुलांचा या पेन्शनमध्ये समावेश केला आणि मोठया गर्वाने मी आपल्याला बोलू इच्छितो की, शासनाचा जीआर आहे की, या १८ ते २० वर्गवारीचे लोक आहेत जे पेन्शन घेण्यासाठी त्यात थॅलेसेमियाची मुले पण आहेत. आणि पुर्ण महाराष्ट्रात मी गर्वाने सांगतो केवळ उल्हासनगर अस शहर आहे ज्यामध्ये थॅलेसेमियाच्या मुलांना पेन्शन मिळते. आणि त्याचे कारण आहे आयुक्त साहेब. मी खुप खुप धन्यवाद देतो. त्यांनी एका वेळेतच मान्य केले आहे. त्यासाठी मी खुप खुप धन्यवाद देतो.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:-** महापौर धन्यवाद धन्यवाद परंतु साहेबजी जसे राजू साहेब जी आपल्या लक्षात आले आपण आयुक्त साहेबांच्या लक्षात आणून दिले जसे आपण माहिती दिली आणि किती अपंग लोकांना आपण मदत देवू शकतो. कारण की ५-५ करोड रुपये बाकी आहेत. आम्ही कोणावर उपकार नाही करत जो नियम बनवला आहे त्या नियमाचा चांगल्याप्रकारे पालन करावे. आपण सर्व व बोडारे साहेब पण प्रत्येक गोष्टीवर प्रकाश टाकतात. खुप कमी बोलतात पण परिणामकारक बोलतात. अधिकारी वर्गाने लक्ष दिले पाहिजे. आणि कुणा कुणाला बोलतात की, लोकांची किडनी खराब होते. किडनी खराब होतात किडनीचा खर्च भरु शकत नाही. जर ते पण नियमात येत असेल तर ज्यांची किडन्या खराब आहेत काही वेळ ते जगू शकतात. तर हे पण या नियमात येते तर त्यांना पण दया. धन्यवाद!

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** मा. महापौरजी, मा. उप महापौर, मा. आयुक्त साहेब, सचिव मॅडम दिव्यांगाची सेवा करतात तर त्याचा अर्थ असा होतो की आम्ही इश्वरची सेवा करतो. काय होत आहे आज परिस्थिती अशी होत आहे. की जेव्हा कोणी विकलांग आम्हांला दिसतो आणि त्याची आर्थिक स्थिती चांगली नसते तर एक सामान्य ते सामान्य माणुसाचे मन विरघळते. आणि आपण तर अधिकारी आहेत आम्ही बोलतो खुप चांगले पण बाहेर गेल्यावर तुम्ही खुप चांगले बोलले ती शाबासकी नाही पाहिजे. आम्ही येथे प्रतिज्ञा करतो की, बोडारे साहेबांनी सांगितले की काही ग्रामविकासचा जीआर घेऊन येत आहेत. परंतु मला समजत नाही येथे पुर्ण समाज जो आहे तो दिव्यांगांना मदत करण्यास शहरात पुढे येतो. येथे दिव्यांगाचे काम करण्यास अनेक संस्था आहेत आपल्याला तर केवळ शासनाच्या माध्यमातून जो निधी मिळाला आहे तो आवर्तीत करायचा आहे. बघा राजू जग्यासी जी ने आयुक्त जींची प्रशंसा केली कारण की ते प्रशंसेला पात्र आहेत.

तर ही तुलना आपल्यात पण झाली पाहिजे. जेव्हा तुम्ही अधिकारी असता, आणि जेव्हा तुम्ही कोणत्याही दिव्यांगांचा खरोखच फायदा करत असाल तर १०० वाईट काम करा पण एक चांगले काम करा ज्यामुळे आपल्या आत्म्याला संतुष्टी मिळेल. तर चला या महासभेत कमीत कमी विपक्ष कोणती आज अधिकारी प्रतिज्ञा करु या. आता जे मागे झाले ते झाले परंतु येणा-या भविष्यात दिव्यांगांना या समाजाच्या अंग समजून आपल्या परिवाराचे लोक आहेत त्यांची आम्ही सेवा करु. जेव्हा अशी प्रतिज्ञा होईल. तेव्हा ते काम होईल. मनात भाव असेल तर काम होईल. आज अधिका-यांची कमी नाही आहे. ३-३ उपआयुक्त आपल्याजवळ आहेत. जेव्हा आयुक्त आले होते तेव्हा एक उपआयुक्त होते. ते पुर्ण प्रशासन चालवत होते. आज हातांची कमी नाही. आज कमी आहे ती भावनांची. भावनांना जागे करा. आपण आपल्यातील माणुसकीला जागे करा. बोला की, नाही दिव्यांगांसाठी करायचे आहे. मी आपल्याला विनंती करतो आणि मला खुशी होईल, जेव्हा पुढे जावून आपण योजना घेऊन येतील. आणि त्या दिव्यांगांच्या लाभासाठी असतील. तर आम्ही आपली प्रशंसा करु. जाधव साहेब आपण प्रशंसा योग्य आहात. त्या शब्दांसाठी आपले कान आतुर झाले पाहिजेत. सर्वांना निवेदन करुन मी विनंती करतो की, बोडारे साहेब, जमनु साहेब ज्यांनी पण दिव्यांगांसाठी केले आहे. त्याला आपल्या मनाला आणि कामावर चला. धन्यवाद!

**<u>सदस्या, श्रीमती अंजली साळवे</u>:-** मा. महापौर मॅडम, दरवर्षी ७ करोडचा  निधी असतो. आपण १-१ हजार देऊन एवढया निधीचा वाटप त्यांना वाढवून देण्यात काहीच हरकत नाही मला असे वाटते. मागच्या महासभेच्या आधी त्यांनी आपल्याला धरणे धरण्यासाठी पत्र दिले होते. तर दिव्यांगांनी आपल्याकडे धरणे धरण हे आपल्यासाठी अत्यंत लाजीरवाणी गोष्ट ठरेल. पुन्हा अशी वेळ त्यांच्यावर येऊ नये. यासाठी आपण त्यांचे मानधन वाढवून देण्यात यावे. आणि या अनुषंगाने मला एक सांगायचे आहे आज माझी पण लक्षवेधी आशा वर्कच्याबाबत मी घेतली नाही पण मॅडमला मी विनंती करते की आयुक्त साहेब आशा वर्क ज्या कोरोनाच्या काळात तळागाळात जावून काम करत आहेत. जेव्हा २ महिन्यापुर्वी त्यांनी संप पुकारला तेव्हा राज्य सरकारने सांगितले होते की, तुमच्या महानगरपालिकेच्या पातळीवर निर्णय घेऊन त्या माध्यमातून तर त्यांनी ९ हजार अनुदान मागितले आहे. तर आशा वर्क आहेत त्यांना ते अनुदान देण्यात यावे. सभागृहाला ही विनंती करते की, मान्य करावी.

**<u>सदस्य, श्री. अरुण आशान</u>:-** दिव्यांगांच्या बाबतीत ज्या ज्या मुददयाबाबत सदस्यांनी सांगितले तर प्रामुख्यांनी आयुक्त साहेबांचे मी लक्ष वेधु इच्छितो की, दिव्यांगांना फक्त हात नाही, पाय नाही अशाच व्याधी नसून दिव्यांगांच्या अशा पण काही व्याधी आहेत ते जसे बाहेरुन विकलांग आहेत तसे आतूनही विकलांग आहेत. म्हणजे काही काही विकलांग ज्यांना डायलासीसची आवश्यकता आहे. मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब लसीकरण करण्यात आले परंतु त्यानंतरही वारंवार इकडे तिकडे जायला लागते. जर का या सुविधा सुध्दा आपण आपल्या माध्यमातून उपलब्ध करुन दिल्या ज्या दिव्यांगांकरीता खरोखर तर मला वाटत एक कृत्रिम हात पाय तस या अंतर्गत या सगळया त्रासाला कंटाळून व मात करुन ते लोक आपले आयुष्य जगत असतात त्या आयुष्यामध्ये जगण्याची संधी मिळण्याकरीता आपण त्यांच्या या व्याधीवर आयुक्त साहेब जर का आपण दिव्यांगांचा डायलासीसवर कमी लोकांचे आहे अस काही परंतु त्यांना ते वेळोवेळी सरकारी रुग्णालयामध्ये जाऊन त्या पुरवठा असतो नसतो तर याबाबतीमध्ये सुध्दा आपण त्यांना हा विषय सुध्दा त्यामध्ये समावेश करुन आपण त्या दिव्यांगांना अंतर्गत विषयावर सुध्दा डायलासीस वर आपण प्रयत्न करावे आणि त्यांना कशी या कामाला मदत मिळेल.

**<u>उप आयुक्त (वैदयकिय आरोग्य), डॉ. सुभाष जाधव</u>** :- सन्माननीय सभागृह नगर विकास विभागाचा १० मे २०१८ चा जी आर आहे. त्यात अनुषंगाने आपल्याला महापालिकेच्या उपलब्ध निधी तरतुदीनुसार ५ टक्के राखीव निधी त्यांच्यासाठी ठेवलेला आहे. महानगरपालिका क्षेत्रातील दिव्यांग व्यक्तींना दारिद्रय निर्मुलन योजनेअंतर्गत ५ टक्के निधी राखीव ठेवण्यात येत आहे. याच्यामध्ये असा कुठे ही उल्लेख नाही आहे की आपण त्यांना किती दयावे. सगळया योजना आपल्याला या ५ टक्केच्या अधीन राहून महापालिकेची आर्थिक परिस्थिती पाहून आपल्याला करायच्या आहेत. त्यामुळे २ हजार रुपयाचा निर्णय जरी केला या सगळया व्हिल खुच्यार् किंवा आता सन्माननीय सदस्यांनी सांगितले आहे की, त्यांना हात आणि पाय जयपुर फुड वेअर त्याच्या मागे ही ३-४ महिन्यापुर्वी आरोग्य तपासणी सुध्दा त्यांची करण्यात आलेली होती. काही तज्ञ डॉक्टर असतील ते आलेले होते त्यांना ते सुचवले होते. पण भविष्यामध्ये सुध्दा अशा व्यक्तींना जयपुर फुड वेअर जे काही आपल्याला येऊ शकते या तरतुदीच्या अधीन राहून ते देता येईल का, याच्यावर सुध्दा आपण वर्क आऊट करुन या ५ टक्क्यामध्ये कसे बसेल हे बघून आपण पुढील योजना राबवु. आपला विभाग महापालिका. आणि नगर विकासचा जी. आर. आहे. ते स्पष्ट करतो. धन्यवाद!

**महापालिका सचिव:-** विषय लक्षवेधी सुचना क्र.२ आहे. सुचकाचे नाव श्री. मनोज सयानी आणि अनुमोदकाचे नाव श्री. दिपा नारायण पंजाबी उल्हासनगर महानगरपालिका येथे शहाड स्टेशन येत असून सदर शहाड स्टेशनचे नाव बदली करुन शहीद भगत कवाराम करणेबाबत.

लक्षवेधी सुचना याप्रकारची आहे......................

## लक्षवेधी सूचना क्रमांक २

विषय :— उल्हासनगर महानगरपालिका येथे शहाड स्टेशन येत असून सदर शहाड स्टेशनचे नाव बदली करुन शहीद भगत कवाराम करणेबाबत.

महोदय,

आपणास नम्रपणे नमुद करु इच्छितो की उल्हासनगर महापालिका हददीत शहाड स्टेशन येत असून सदर शहाड स्टेशनचे नाव बदली करुन "शहीद भगत कवरराम साहेब' करणे या बाबत येणा-या महासभेत विषय मांडून चर्चा करण्यात यावी व योग्य निर्णय घेऊन सदरचा विषय राज्य शासनाकडे पाठवणे हा विषय सदर महासभेत समाविष्ट करणेस विनंती आहे.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-** मा. महापौरजी, उपमहापौर, आयुक्त साहेब, सचिव मॅडम, सन्माननीय सदन खुप वेळापासुन मनात ही तीव्र इच्छा होती की, अखंड भारताचे पहिले शहीद भगत कवाराम यांच्या नावावर या शहरात अशी वास्तु असु दे की, जी येणा-या हजार वर्षांपर्यंत हे दाखवू ज्या शहीदांनी आमच्या देशासाठी त्यावेळेच्या हिंदुस्तान व आजच्या पाकिस्तान जवानांनी आपला जीव गमावला समाजात एकता, समता, बंधुभाव निर्माण करण्यासाठी, परंतु समजत नाही याची सुरुवात कुठुन करावी, जेव्हा माझा मित्र राजेश वानखेडे याचा ठराव मी अजेंडावर बघीतला उल्हासनगर स्टेशनचे नाव हिंदु हदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि विठठलवाडी स्टेशनचे नाव परमपुज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाचे नामकरण केले जावे तर त्यांच्या इच्छेला बळ मिळाले. माझ्या सारख्या नवीन कार्य कर्त्याच्या मनात इच्छा आली की, माझे भाऊ राजेश वानखेडे यांनी असा विचार आणला आहे की, त्यांनी माझ्या विचाराला बळ दिले आहे, राजेश वानखेडे माझ्यापेक्षा मोठे आहेत ते विधानसभा निवडणुक लढले आहेत. तर त्यांना माझ्यापेक्षा जास्त ज्ञान असेल. माझ्यासारख्या नवीन कार्यकर्त्याने ती हिंमत आली वेळ असता अशासकीय प्रस्ताव तर नाही आणु शकलो परंतु लक्षवेधीच्या माध्यमातून आपली सगळी इच्छा सदनासमोर ठेवत आहे. अखंड भारताचे पहिले शहिद भगत कवाराम जी समाजात बंधुभाव, समानता, एकता, हिंदु-मुस्लिम एकता चे आणि त्याचे असे झाले की, काही समाज कंटक जे या बंधुभावाच्या विरोधात होते त्यांनी आताचे पाकिस्तान सिंध प्रांत रुख स्टेशन आणि आजचे पाकिस्तानचे रुख स्टेशनवर त्यांची गोळी मारुन हत्या केली. तेव्हा पासून त्यांना ब्रिटिश शासनाने शहिदचा दर्जा दिला होता. तर देश ना फक्त उल्हासनगर, ना फक्त महाराष्ट, ना फक्त भारत, पुर्ण जगात भगत कवाराम यांचे लाखो अनुयायी आहेत. बोलतात की वर्षात दिवस येतात ३६५ परंतु एक असा संत आहे एक असा भगत आहे की, ज्याचे जन्मदिवस सातशे पेक्षा जास्त साजरे करतात. तर अशा व्यक्तीची कल्पना व अशा व्यक्तीचा विचार पुढे पण प्रेरणा देत राहतील.यासाठी लक्ष वेधीच्या माध्यमातून मी हे दिले आहे की, शहाड स्टेशनचे नाव बदली करुन शहिद भगत कवाराम ठेवले जावे. सदनात सांगितले गेले की, हे आमचे काम नाही. आम्ही नाही करु शकत. उल्हासनगर महानगरपालिकेच्या सदनाला हे अधिकार नाहीत. परंतु एका छोटयाशा विचाराने मोठा विचार निर्माण होतो. आम्ही जर भविष्यात जाऊ तर दशत माजी या व्यक्तिने एका छोटयाशाच्या विचाराने एका मोठया डोंगराला रोज थोडे तोडून तेथे रस्ता बनवला होता. तर मी पण छोटीशी सुरुवात केली आहे. आज या सदनाच्या माध्यमातून आम्ही जर थोडेसा विचार करु लागलो तर पुढे जाऊ तो मोठा होईल. तर आज लक्षवेधीच्या माध्यमातून मी ही सुचना इथे आणली आहे. मला वाटते की, राजेश वानखेडे चा जो अशासकीय ठराव आहे. त्यात माझा पण केले जावे. व त्यावर सकारात्मक चर्चा केली जावी. धन्यवाद!

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:-** श्री. लासी साहेबांनी जो प्रस्ताव दिलेला आहे, जी लक्षवेधी टाकली आहे त्याला माझा पाठिंबा आहे. धन्यवाद!

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:-** मा. पिठासीन अधिकारी माफी मागतो, आम्हां सर्वांना या नियमाची माहिती आहे, की लक्षवेधीच्या माध्यमातून कोणताही ठराव पास होऊ शकत नाही. तर याचा काय अर्थ आहे किंवा याचा काय अर्थ

समजायचा की, लक्षवेधी नावासाठी सांगितली आहे. संत कवाराम अखंड भारतात पुर्ण जगात सन्मानाने घेतले जाते. ते खुप पुजनीय आहे. सिंधी धर्मातच नाही इतर जाती-धर्मातही, तर मला ही गोष्ट समजत नाही की, जर आपण नामकरणासाठी एवढे गंभीर आहात तर आपल्याला खाजगी ठरावाच्या माध्यमातून नाहीतर जी खरी नामकरणाची प्रक्रिया आहे, त्या माध्यमातून आपल्याला आणले पाहिजे होते. महापौरांना पत्र देऊन, आणि जी समिती बनली आहे, त्यांच्यासमोर गेले पाहिजे होते. याचे काय कारण आहे. ते जरा मला वाटत की मनोज लासी या गोष्टीचा खुलासा करावा.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-** मी महासभेत सांगितले आहे. माझ्या मनात ही इच्छा खुप दिवसापासुन होती. आणि जेव्हा मी राजेश वानखेडे यांचा अशासकीय प्रस्ताव बघितला. दोन स्टेशनच्या नामकरणाला बघून शहरातील कोणत्याही स्टेशनला का नाही भगत कवाराम यांचे नाव दयायचे. परंतु वेळे अभावी मी अशासकीय प्रस्ताव नाही टाकू शकलो. यासाठी लक्षवेधी आणली आहे. सभेचे लक्ष केंद्रित करण्यासाठी मी विनंती केली आहे की, राजेश वानखेडे जींचा जो अशासकीय प्रस्ताव आहे. करावे मग त्यावर चर्चा करावी.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:-** महापौर साहेबा त्यांनी पहिलेच स्पष्ट केले आहे. मनोजजींनी पहिलेच स्पष्ट केले आहे. पहिले वानखेडे साहेबांना धन्यवाद दिले. ज्यांनी हा प्रस्ताव आणला. आणि मला माहिती मिळाली त्यांना असे सांगितले. जर ही गोष्ट येते तर माझी नम्र विनंती आहे, त्यांनी महापौर साहेबांना विनंती केली आहे. आम्ही पण भगत कवारामजींचा आदर करतो. आपण सर्वांनी सांगितले की, सर्व समाज करतो. आम्ही पण सर्व नगरसेवक आहोत. तर आपण पण मोठे मन करा जेव्हा हा प्रस्ताव येईल तर धन्यवाद!

**उपमहापौर, श्री. भगवान भालेराव**:- दुसरा विषय घ्या.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** फक्त ३० सेंकदासाठी केवळ माझ्या भावना

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव**:- प्रस्ताव येईल तेव्हा बोला.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** हात जोडतो. महापौरजी, फक्त ३ सेंकदासाठी माझ्या भावना मनात पण इच्छा उत्पन्न झाली आहे. की औरंगाबाद चे नाव संभाजी नगर आणि मंदिराचे नाव वीर सावरकर नगर आणि माझ्या मनात फटाफट इच्छा येत आहेत. माझे हे म्हणणे आहे की येणा-या प्रस्तावात हे पण जोडावे.

**उपमहापौर, श्री. भगवान भालेराव** :- हो ठिक आहे. धन्यवाद.

**महापालिका सचिव :—** विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

---

**विषय क्र. २** :— मागील सर्वसाधारण महासभा दिनांक १८/०६/२०२१ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

---

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव** :- पास..पास..

**काही सदस्य :—**पास—पास……

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. २ :—** मागील महासभेचे दिनांक १८/०६/२०२१ व त्यात दिनांक १७/०९/२०२१

रोजीचे सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नाव:– **श्री. कलवंतसिंह सोहता**

अनुमोदकाचे नाव:– **श्री. शंकर लुंड**

**महासभा ठराव क्र. २३अ** **दिनांक :** २/१२/२०२१

ही महासभा महापालिका सचिवांनी प्रस्तुत केलेल्या दिनांक १८/०६/२०२१ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे पृष्ठ क्र. ०१ ते ७६ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

महापौर/ पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :–** विषय क्र. ३ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. ३ :– उल्हासनगर महानगरपालिकेत सफाई कामगारांच्या भरतीबाबत शैक्षणिक पात्रतेची अट शिथील करणेबाबत.**

---

**महापालिका सचिव:-**विषय क्र.३ व ४ हा सफाई कामगारांच्या भरतीबाबत आहे. शैक्षणिक पात्रतेची अट शिथिल करण्याबाबत आहे. त्यांनी पत्र दिले आहे की, हे विषय मागे घेण्यात येत आहे.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:-** यात सफाई कामगारांना नोकरी मिळत आहे आपण परत का घेत आहेत.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:-** मी खुलासा करतो मी बोल इच्छितो ते पुढच्या विषयी माझे तोंड बंद करा.

**उपमहापौर, श्री. भगवान भालेराव:-** आपण फक्त बोला खुलासा करु नका.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:-** हे जे वर्ग ३ नाही वर्ग ४ कर्मचा-यांची सफाई कामगारांच्या बाबतीत आहे महापौरांच्या ...जे ४थी पर्यंत शिकलेले आहेत किंवा ज्यांचे वय जास्त आहे. असा इश्यु महासभेत येतो. ५० कामगारांचा आता आला आहे, ४८ प्रकरण पुर्ण झालेली आहेत. त्यांचे ४ महिने निघुन गेले, ४ महिने अगोदर ४८ लोकांना नियुक्त केले पाहिजे होते. मी आयुक्त साहेबांना वारंवार पत्र पाठविले. आणि मी त्यांना विनंती पण केली. वर्ग ३ नाही वर्ग ४ चे नियुक्ती अधिकारी आपण आहात. आणि वर्ग १ नाही वर्ग २ महासभा. तर मला मेहरबानी करुन यानंतर आमचे जे सफाई कामगार

३ व ४वर्ग आहेत ते लागलीच आयुक्तांनी नियुक्त करावी. त्यानंतर त्यांना लगेच नियुक्ती देण्यात यावी. ४ महिने जे गेले वॉर्डात ते नाही गेले पाहिजे. यानंतर असे होऊ नये अशी मी सदनाला आणि आयुक्तांना विनंती करतो.

**उपमहापौर, श्री. भगवान भालेराव**:- ठिक आहे. हा प्रशासनाने मागे घेतला आहे.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:-** पहिली ही गोष्ट समजून घ्या, आम्हांला हे समजायचे आहे की, प्रशासन परत मागे का घेत आहे, फक्त ते सांगा.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** आपल्या माहितीसाठी सदन परत घेऊ शकतो, प्रशासन नाही. सदनाला वाटले तर मागे घेईल परंतु प्रशासन मागे घेऊ शकत नाही.

**उप आयुक्त् (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे**:- आदरणीय महापौर, मा. आयुक्त साहेब सर्व सन्माननीय सदस्य गण, हे दोन प्रस्ताव जे आहेत त्यामध्ये काही अहर्ता त्यांच्या कमी असतील तर त्या अहर्ता माफ करण्यासाठी आपल्या सभागृहासमोर आणाव्या लागतात. परंतु त्या तपासताना काही त्रुटी राहिल्याचे लक्षात आलेले आहे, म्हणून आमची बैठक झालेली आहे आणि आयुक्त साहेबांनी निर्देश दिले की, हे आपण पुन्हा एकदा तपासू या. आणि शासनाच्या मार्गदर्शनानुसार तो प्रस्ताव पुन्हा आपल्या समोर मान्यतेसाठी सादर करु या, म्हणून आम्ही ते दोन जे प्रस्ताव आहेत ते तपासण्यासाठी मागे घेत आहोत. पुढील प्रस्ताव आहे आमचा ३ नंबरचा तो मान्यतेसाठी आम्ही ठेवलेला आहे.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:-** जर आपल्याला कोणती चुक लक्षात आली आहे, तर आपण अधिकचा गोषवारा घेऊन त्याला बरोबर करु शकत होतात. आता बघा आपण मागे घेत आहेत. डिसेंबरच्या सभेत येणार नाही येणार या गोष्टीची मला खात्री नाही. तर जे कर्मचारी ज्यापण वार्डाचे निवृत्त झाले असतील. जसे किशोरजी यांनी सांगितले की, असे ५० आहेत माझ्या वार्डाचे ०२ कर्मचारी एक सेवानिवृत्त झाले, एकाचे निधन झाले. आणि एकाची बदली केली आहे. त्यानंतर माझ्या वार्डात फक्त एकच कर्मचारी नियुक्त झाला आहे. तर ज्या कर्मचा-यांची कमी आहे ती कशी पुर्ण होणार. जर आपल्याला कोणतीही चुक लक्षात आली असेल तर आपण ताबडतोब गोषवारा दुसरा दिला पाहिजे. इथे हे चुक आहे याप्रकारे हे वाचले जावे.

**उप आयुक्त् (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे**:- नाही या ०२ प्रस्तावापुरता हा बाकीच्या प्रस्तावाला काही अडचण नाही. ०२ चे विशेष बाब म्हणुन आपल्याला करावे लागेल. आणि शासनाच्या मार्गदर्शनाखाली आपल्याला त्यांच्या शैक्षणिक अहर्ता आर आर नुसार..

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:-** बघा, शैक्षणिक अहर्ततेत काही अडचण आहे म्हणून तर आपण महासभेपुढे आणले आहे. वयाची अडचण असेल किंवा आणखी काही, कोणतीही पात्रता मी बोलतो. तर आता परत मागे घेण्यासाठी आपल्या काय चुक आढळली आहे. ते तर सांगा.

**उप आयुक्त् (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे**:- ज्या शासनाच्या मार्गदर्शना त्याच्यात शैक्षणिक अहर्ता आर. आर. नुसार आम्ही म्हणतो कमी आहेत. परंतु शासनाच्या मार्गदर्शनात शैक्षणिक अहर्ता काय आहे या दोन्ही पडताळून आम्ही पुन्हा प्रस्ताव आणत आहोत.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:-** नाही बघा, या तर शासनाचे मार्गदर्शन वाचा. किंवा आमचा आर आर वाचा. आर आर पण तर शासनाने मंजूर करुन दिलेला आहे.

**उप आयुक्त् (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे**:- दोन्ही ही तपासणे गरजेचे आहे.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:-** दोन्ही ही कशासाठी सर, खुलासा करा. मा. आयुक्त साहेब बघा मा. आयुक्त साहेब माझी गोष्ट लक्ष देऊन ऐका, ज्या कर्मचा-यांना नियुक्त केले जाते, ते भरती नियमानुसार त्यांची नियुक्ती व बढती होत असते. जर त्यानंतर शासनाचा कोणता जी आर आहे, किंवा शासनाचे काही मार्गदर्शन असेल, आणि त्या दोन्हीमध्ये काही विरोधाभास असेल तर जी आर वॉज नॉट प्रिव्हेल नाही रुल विल प्रिव्हेल.

**उप आयुक्त् (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे** :- त्याचसाठी आम्ही कॉपी तपासुन परत हा ठराव

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:-** का तपासणार साहेब.

**उप आयुक्त् (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे**:- लाड-पागे हे जे शासनाचे धोरण आहे. या धोरणानुसार आपण.

**<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया:-</u>** आमची विनंती आहे सफाई कर्मचारी यांची सर्वांना खुप त्रास आहे. सर्व नगरसेवक माझ्या म्हणण्यास सहमत असतील. तर ही सभा आपल्याला निर्देश देते की, असा ठराव करत आहे की, आपण १० दिवसाच्या आंत दुसरी जी महासभा होणार आहे, त्यात हे फेरसादर करा.

**<u>उप आयुक्त् (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे</u>**:- हो, पुढील महासभेस फेरसादर करण्याची आम्ही कार्यवाही करु.

**<u>सदस्य, श्री. किशोर वनवारी:-</u>** महासभा आपल्याला दोन्ही कामगारांचे पास करु देत आहे. जर त्यात काही कायदेशीर अडचण असेल तर नियुक्त करु नका. नाहीतर आम्ही लोक ठराव करतो.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर</u>:-** नियुक्ती करण्याची काहीच गोष्ट नाही आहे. दुस-या सभेत आणा आम्ही नियुक्त करु.

**<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया</u>:-** दुस-या सभेत आणा. हा ठराव आम्ही करतो. पुढच्या महासभेत आणा.

**<u>उप आयुक्त् (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे</u>**:- पुढील महासभेत आणण्याची आम्ही दक्षता घेऊ.

**<u>महापालिका सचिव:-</u>** पुढील महासभेत म्हणजे इतिवृत्ताची वाट न पाहता लिहावे लागेल.

**<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया</u>:-** हो हो मी बोललो आहे इतिवृत्ताची वाट न पाहता.

**<u>महापालिका सचिव:-</u>** प्रशासनाने १० दिवसाच्या आंत त्रुटी पुर्ण करुन परत फेरसादर करावे. ठिक आहे पास सर्वसंमतीने.

**<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ३ :—** उल्हासनगर महानगरपालिकेत सफाई कामगारांच्या भरतीबाबत शैक्षणिक पात्रतेची अट शिथील करणेबाबत.

**<u>प्रस्तावना</u>**

उल्हासनगर महानगरपालिकेत श्री. राजु महादेव लोखंडे, हे दिनांक २/११/१९९६ पासुन आरोग्य विभागामध्ये सफाई कामगार म्हणुन कार्यरत होते. त्यांच्या विनंती अर्जान्वये त्यांना दिनांक ०१/१०/२०१९ रोजी मध्यान्हपुर्व महापालिकेच्या सेवेतुन स्वेच्छा सेवा निवृत्ती देण्यात आलेली आहे.

त्यांच्या रिक्त जागी लाडपागे कमिटीच्या शिफारशीनुसार नियुक्ती मिळण्यासाठी त्यांचा मुलगा श्री. लक्ष्मण राजु लोखंडे, यांनी विनंती अर्ज केला आहे त्यांचे दस्तऐवजाची तपासणी केली असता त्यांचे शिक्षण ३ री पास असे आहे. उल्हासनगर महानरपालिका सेवा प्रवेश नियम २०१५ नुसार सफाई कामगार या पदासाठी लागणारी अर्हता खालील प्रमाणे आहे.

अ) इयत्ता ४ थीपास

ब) मराठी लिहिता, वाचता व बोलता येणे आवश्यक

शासन परिपत्रक क्र. बीसीसी-२००२/१९५२/प्र.क्र.६५/२००२/१६ — ब, दिनांक १/१०/२००३ मध्ये पुढील प्रमाणे नमुद आहे.

लाडवपागे समितीने शिफारस केल्यानुसार शासकीय/निमशासकीय मंडळे/महामंडळे/स्वायत्तसंस्था/ महानगरपालिका/ नगरपरिषद/ नगरपालिका/खाजगी संस्था तसेच कारखाने इत्यादीच्या आस्थापनेवर मेहतर, वाल्मिकी समाजाच्या उमेदवारांची नोकर भरती करताना त्यांच्या वारसास/जवळच्या नातेवाईकास प्राधान्य देण्यात येते ते चाजू ठेवावे, याबाबत आवश्यकता भसल्यास त्यांचे सेवाभरतीचे नियम शिथील करून त्याची अंमलबजावणी करण्यात यावी.

लाड कमिटीचा मुळ उद्देश कुटुंबावर आलेले संकट उपासमार टाळणे असा आहे.

तरी, श्री. लक्ष्मण राजु लोखंडे, यांची शैक्षणिक अर्हता सेवा शर्ती नियमावलीनुसार नसल्याने उपरोक्त शासन निर्णयानुसार शैक्षणिक अर्हतेची अट शिथील करणेसाठी मा. महासभेच्या मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

**महासभा ठराव क्र:२४** **दिनांक:– २/१२/२०२१**

सुचकाचे नाव :– **श्री. कलवंतसिंह सोहता**

अनुमोदकाचे नाव :– **श्री. शंकर लुंड**

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे व झालेल्या चर्चेअंती उल्हासनगर महानगरपालिकेत सफाई कामगारांच्या भरतीबाबत शैक्षणिक पात्रतेची अट शिथील करणेबाबत असलेल्या त्रुटींची पुर्तता करुन दुरुस्ती करुन फेर सादर करणेस प्रशासनास निर्देश देत आहे.

या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :–** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ४:–** उल्हासनगर महानगरपालिकेत सफाई कामगारांच्या भरतीबाबत शैक्षणिक पात्रतेची अट शिथील करणेबाबत.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिकेत श्रीम. लक्ष्मी हरचंद चंडालिया, हे दिनांक०२/०६/१९९२पासुन आरोग्य विभागामध्ये सफाई कामगार म्हणुन कार्यरत होते. त्यांना दिनांक २९/०२/२०२० रोजी मध्यान्ह पुर्व महापालिकेच्या सेवेतुन वयोमानानुसार सेवा निवृत्ती देण्यात आलेली आहे.

त्यांच्या रिक्त जागी लाडपागे कमिटीच्या शिफारशीनुसार नियुक्ती मिळण्यासाठी त्यांचा विवाहित मुलगी श्रीम. निर्मला दिनेश गोडाले, यांनी विनंती अर्ज केलाआहे त्यांच दस्तऐवजाची तपासणी केली असता त्यांचे शिक्षण १ ली पास असे आहे. उल्हासनगर महानरपालिका सेवा प्रवेश नियम २०१५ नुसार सफाई कामगार या पदासाठी लागणारी अर्हता खालीलप्रमाणे आहे.

अ) इयत्ता ४ थीपास
ब) मराठी लिहिता, वाचता व बोलता येणेआवश्यक

शासन परिपत्रक क्र. बीसीसी-२००२/१९५२/प्र.क्र.६५/२००२/१६ — ब, दिनांक १/१०/२००३ मध्ये पुढील प्रमाणे नमुद आहे.

लाडवपागे समितीने शिफारस केल्यानुसार शासकीय/निम शासकीय मंडळे/महामंडळे/स्वायत्तसंस्था/ महानगरपालिका/ नगरपरिषद/ नगरपालिका/खाजगी संस्था तसेच कारखाने इत्यादीच्या आस्थापनेवर मेहतर, वाल्मिकी समाजाच्या उमेदवारांची नोकरभरती करताना त्यांच्या वारसास/जवळच्या नातेवाईकास प्राधान्य देण्यात येते ते चाजू ठेवावे, याबाबत आवश्यकता भसल्यास त्यांचे सेवा भरतीचे नियम शिथील करून त्याची अंमलबजावणी करण्यात यावी.

लाड कमिटीचा मुळ उद्देश कुटुंबावर आलेले संकट उपासमार टाळणे असा आहे.

तरी, श्रीम. निर्मला दिनेश गोडाले, यांची शैक्षणिक अर्हता सेवा शर्ती नियमावलीनुसार नसल्याने उपरोक्त शासन निर्णयानुसार शैक्षणिक अर्हतेची अट शिथील करणेसाठी मा. महासभेच्या मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

**महासभा ठराव क्र:२५** **दिनांक:— २/१२/२०२१**

सुचकाचे नाव :— **श्री. कलवंतसिंह सोहता**

अनुमोदकाचे नाव :— **श्री. शंकर लुंड**

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे व झालेल्या चर्चे अंती उल्हासनगर महानगरपालिकेत सफाई कामगारांच्या भरतीबाबत शैक्षणिक पात्रतेची अट शिथील करणेबाबत असलेल्या त्रुटींची पुर्तता करुन दुरुस्ती करुन फेर सादर करणेस प्रशासनास निर्देश देत आहे.

या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ५ :— वारसा पध्दतीने सेवा निवृत्त/दिवंगत सफाई कामगार यांच्या रिक्त जागेवर त्यांचे वारसास नियुक्ती देणेबाबत.**

---

**सदस्य, श्री. प्रमोद टाले**:- मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब हा जो विषय वारसाहक्काचा आलेला आहे. माझे म्हणणे असे आहे की, वारसा हक्काची अशी किती प्रकरणे आहेत. आणि किती प्रकरणे तुम्ही या महासभेपुढे आणलेले आहेत हा

पहिला भाग आहे. दुसरा भाग असा आहे की, आयुक्त हे प्राधिकारी व्यक्ती आहेत. त्यांनी जर त्यांना थेट नियुक्ती दिली असते तर बर झाले असते. महासभेपुढे आणण्याची याची गरज होती का? हा एक मुददा आहे. जर महासभेपुढे आणण्याची गरज नव्हती नसेल तर ४-४ महिने आपण महासभेची वाट बघतो या वारसाहक्काची सगळी लोक वाट बघतात. उरलेल्या सर्व प्रकरणे माझ्या माहितीप्रमाणे ४५, तर ती प्रकरणे, आज जेवढी प्रकरणे आणलेली आहेत त्याच्यानंतर उरलेली जी प्रकरणे आहेत. त्यांच्यासाठी महासभेची ४-४ महिने वाट बघावी लागणार आहे का. आज जर ही प्रकरणे करत असाल तर उरलेल्या बाकीचे सर्व प्रकरणे ही महासभेच्या अधीन राहून तुम्ही त्यांना थेट भरती केले तर बर होईल. धन्यवाद!

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:-** मा. महापौरजी एक शब्द मी अजून प्रमोदजी यांच्या सोबत जोडू इच्छितो, आतापर्यंत जेवढे पण लोक अनुकंपात मयत झाले आहेत. खुप प्रलंबित आहेत. ती प्रकरणे पण प्रलंबित न ठेवता, लवकरात लवकर महासभेपुढे आणा. नाहीतर त्यांना आतापर्यंत ठोक वेतनावर घ्या. परंतु आपल्या महानगरपालिकेत कर्मचारी खुप कमी आहेत. आणि अनुकंपाचे लोक पण भटकत आहेत. कोणाच्या घरात अपघात झाला, कोणाचे निधन झाले कामावर असताना असे जे कर्मचारी आहेत. मेहेरबानी करुन ही आचारसंहिता आज लागेल उदया लागेल काही सांगू शकत नाही, तर कमीत कमी हे निवडलेले सदस्य, किती लोक अपघातात मयत झालेले आहेत. कोणी कामावर असताना, त्यांचे जे घरातली जी व्यक्ती आहे त्यांना अनुकंपावर घ्या किंवा तुम्हांला अजून चौकशी करायची असेल तोपर्यंत त्यांना ठोक वेतनावर घ्या.

**सदस्य, श्री. प्रमोद टाले:-** मला वाटत त्यांना थेट भरती केले तर बरं होईल.

**उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-** जे आता वनवारी साहेबांनी जे सांगितलेले आहे. अनुकंपा धोरण आणि लाड-पागे धोरण, दोन्ही बाबी वेगवेगळया आहेत. अनुकंपा धोरणासाठी रिक्त होणाऱ्या पदाच्या ठराविक टक्केवारीमध्ये जे पद उपलब्ध होतात तेवढीच भरता येतात. अनुकंपासाठी जेवढी पदे आपल्याला उपलब्ध होतील तेवढी ३१ लोकांना आपण नियुक्ती देऊन ते पुर्ण केली आहेत. अनुकंपाची नियुक्ती दिली व पद रिक्त आता आपल्याकडे नाहीत. लाड-पागेच्या बाबतीत तसे काही त्याला निकष नाहीत. जे सफाई कामगार सेवानिवृत्त होतात, मृत पावतात,

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:-** मा. महापौरजी मी या विषयावर बोलू इच्छितो की, आपल्याला माहित असेल उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये अनुकंपावर जे अपघात होतात त्यावर १० टक्के आपण करत होतो आता ते २० टक्के अनुकंपाचे घेऊ शकतो. इथे वाट बघता बघता ज्या आमच्या मावश्या आहेत सभागृह नेत्या कार्यालयात, विरोधी पक्ष कार्यालयात, महापौर कार्यालयात ज्यांचे वय झाले आहे त्यांना सांगितले आता तुम्ही होऊ शकत नाही. जा तुमच्या मुलांना घेऊन या. नंतर त्यांच्या मुलांचे अर्ज दिले नंतर अर्ज दिल्यावर त्यांना पण नाही घेतले. नंतर सांगितले जसे नविन अधिकारी येतात, तसे नविन कायदे येतात. आता बोलतात त्यांच्या मुलांना पण घेऊ शकत नाही. तुम्हांला पण घेऊ शकत नाही. आता त्यांचे नियुक्ती झाली इथे महासभेत ठराव केला त्यांना बोलतात तुम्ही वय जास्त आहे, तुमच्या मुलांना पण घेऊ शकत नाही. असे करता करता किती वर्ष वाट बघणार. जोपर्यंत अनुकंपा लोकांची जागा रिक्त असेल तोपर्यंत मी बोलतो त्यांना ठोक वेतनावर घ्या. कारण की ६० टक्के, ५० टक्के कर्मचारी जे निवृत्त होत आहेत त्यांच्या जागी आम्ही कधीच नियुक्ती करत नाही. असे २७० लोक आहेत. आपण लोक ठोक वेतनावर एक प्रभाग समिती २७० लोकांना कशी घेते. ते कायदयात बसत आहेत ना. आणि या मावश्यांना ठोक वेतनावर ज्यांचा कोणी मयत झाले आहे त्यांना ठोक वेतनावर घेऊ शकत नाही. जागा नाही. २७० लोकांना घेऊ शकतो.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:-** आयुक्त साहेब किशोरजी दोन विषय प्रशासनाने मागे घेतले आहेत. किशोर वनवारीजींनी आयुक्तांना सांगितले की, तुम्ही प्राधिकारी आहात. वर्ग ३ आणि वर्ग ४ कर्मचारी यांचे आपण भरती प्राधिकारी आयुक्त आहेत आणि आयुक्तांनी नियुक्त केले आणि त्याला महासभेने मान्यता दिली की विषय संपला. आता आम्ही चर्चा करतोय, मला वाटते तुम्ही विषय मागे घेतला आहे प्रश्नच येत नाही. तर आम्ही जी चर्चा करतोय तुम्ही आणलेल्या विषयावर त्यानंतर आम्ही मंजूरी दिल्यानंतर तिच्यावर तरी आपला विश्वास आहे का? नाहीतर एखादा उपआयुक्त यायचा नाही नाही अगोदर च्या उपआयुक्तांनी काय केले आम्हांला माहित नाही. तुम्ही आणलेले विषय आहेत त्यांना आम्ही मंजूरी दिल्यानंतर ते तरी तुम्हांला मान्य आहेत का. तुम्ही मागे घेतला विषय संपला. तुम्ही आणलेले विषय छाननी करुन आता चुक तुमच्या लक्षात आली. म्हणून तुम्ही मागे घेत आहात. आता हे जे पुढचे विषय आहेत. ते बरोबर आहेत का तर आम्ही चर्चा करु. नाहीतर परत दुसरे कोणीतरी आयुक्त यायचे, उपआयुक्त यायचे नाही नाही हे बरोबर नाही. हे तरी तुम्हांला मान्य आहे का. आम्ही चर्चा करायची आणि निर्णय घ्यायचे शेवटी तुम्ही म्हणायचे नाही नाही हे बरोबर नाही. जे मंजूरीसाठी आणले आहेत त्याच्यावर तुमचा विश्वास आहे का. तर आम्ही चर्चा करु नाहीतर आम्ही चर्चा करायची ७

वाजेपर्यंत बसायचे आम्ही एकमेकांशी भांडायचे. आता प्रत्येक वेळेस आम्हांला विचारावे लागेल हा विषय बरोबर आहे का. आयुक्त आज आहेत उदया दुसरा कोणीतरी येईल. हा बरोबर नाही आता तुम्ही सांगा वाटले तर छाननी करा अजूनही पाहिजे तर आम्ही मिटिंग स्थगित करु. तुम्ही आणलेले विषय आम्ही बरोबर ठरतोय. २-३ नंबर तुम्ही मनात आले म्हणून स्थगित केले. बरोबर होते म्हणून आणले, म्हणजे आम्ही संपुर्ण विश्वास प्रशासनावर ठेवायचा आणि प्रशासनाने हे असे करायचे. तुम्ही आणलेले विषय बरोबर आहेत का याची चाचपणी करा. एकदा नाही १० वेळा करा. नगर विकासचा जी आर पाहिजे ग्रामविकासचा जी आर आणताय. त्यामुळे तुम्ही आणलेले विषय हे खात्रीशीर असतील तर आम्ही मंजूरी देतो पण मंजुरी दिल्यानंतर महासभेचा तुम्ही अपमान करु नका. आम्ही चर्चा करतो दिवस दिवस त्याच्यामध्ये घालवतो. भांडताय आता मस्त हाउस चाललेले आहे. तुम्ही ऐकताय. व्यवस्थित मुददे चाललेत. एवढया गंभीरपणे घेतल्यानंतर जर त्या प्रशासनाने या महासभेची दखल घेतली नाही. काहीतरी केले आहे म्हणून दाखवतोय. तर होणार नाही, तुम्ही आणलेले मुददे बरोबर असतील आम्ही मान्य करु.

**<u>सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:-</u>** वधारीया साहेब मी पहिलेच उभा आहे मला पहिले बोलू दया. मेहरबानी, मेहरबानी, महापौर साहेब पहिले तर मी धन्यवाद देतो दिड वर्षानंतर आज मिटिंग होत आहे. दिड वर्ष आमच्या मनात जो त्रास होता प्रत्येकासाठी जी समस्या होती त्याबाबत बोलायची वेळ आलेली आहे. मी आपल्याला हात जोडतो महापौर साहेबा आयुक्त साहेबांना हात जोडून विनंती करतो की, प्रत्येक जागी सफाई नंतर खुप अंदाजमध्ये सफाई कामगार अंधारात राहत असतात. आज पण माझ्या वार्डात साफसफाई कामगार आले नाहीत. काल पण सर्व साफसफाई कामगार गैरहजर होते. काही साफसफाई कामगार यांचे निधन झाले आहे. काही साफसफाई कामगार यांना बदली करुन पाठविले आहे त्याला दिड वर्ष झाले आहे त्यानंतर कोणी पण परत आले नाहीत. तर कृपया साफसफाई कामगारांच्या भरतीत कोणतीच दिरंगाई करु नका. शासनाने आयुक्त साहेबांना अधिकार दिला आहे, साफसफाई कामगारांचा जो हक्क आहे, वशिला पध्दतीत पण ज्यांचा जो हक्क आहे, त्याची लवकरात लवकर भरती करण्यात यावी. नाहीतर नगरसेवकांना अशी माहिती दया, असे शिकवा कि फावडा कसे उचलतात, झाडू कसे मारतात, कारण की आम्ही नगरसेवक ते काम पुर्ण करु शकतो. कारण की विना साफसफाई कोणी पण वार्डात राहणारा एक सेकंद त्रास सहन करण्यास तयार नाही आहे. तर खुप काळापासुन वर्षापासून अशी प्रकरणे का ठेवतात. काय अधिकार आहे अशी प्रकरणे प्रलंबित ठेवण्याचा, भरती प्रकरणांचा १५ वर्षापुर्वी न्यायालयाने आदेश दिलेला आहे. की ३०५ साफसफाई कामगारांची भरती केली जावी. आमचे किती नगरसेवक ओरडून ओरडुन थकले, काही या सदनात नाहीत, काही आयुक्तांची बदली झाली, की निर्णय होत नाही, किती सफाई कामगार ज्यांचा हक्क होता, ते भरती होऊ शकले नाही, त्यांचे निधन झाले, आता त्यांच्या जागी कुणाला भरती करणार त्यांच्या मुलांना भरती करा ना. बिचारे भुकेने मरत आहेत, बेरोजगार बसले आहेत, त्यांचा जो १५ वर्षापुर्वी हक्क होता, तो १५ वर्ष वाट पाहून पण होत नसेल तर त्यांना आपण मागे ठेवणार तर ते खाणार काय. आणि आम्ही आमच्या वार्डात सफाई कशी करणार. कृपया या गोष्टी लक्षात ठेवा, वार्डात सफाई झाली पाहिजे, जो सफाई कामगार प्रत्येक वेळेस कोणत्या तरी कारणाने सुटटी घेतात त्यांच्या खाडा बदली माणुस दया. तसे पण आमच्या वार्डात जे गैरहजर लोक आहेत. त्यांचे जागेवर काम करण्यासाठी माणुस दया. कृपया मी हात जोडत आहे लोकांसाठी माझा असा काहीच मतलब नाही. जर अशी १५-१५ वर्ष सुनावणी नाही झाली तर लोकशाही दिन बसावे लागेल. तर ती वेळ माझ्यावर येऊ देऊ नका. कारण आम्ही लोकांसाठी बोलत आहोत. आम्ही सर्व लोकांसाठी आहोत तर मला हात जोडून विनंती आहे योग्य निर्णय योग्य वेळी घ्या. धन्यवाद!

**<u>सदस्य, श्री.राजेंद्रसिंह भुल्लर:-</u>** एक मिनिट साहेब हे जे १६ लोकांचे घेऊन आलेले आहेत याची पुर्ण चौकशी केली.

**<u>उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे</u>**:- आता जो आपला १६ लोकांचा प्रस्ताव आलेला आहे. पुर्ण तपासणी करण्यात आलेली आहे. तपासल्यानंतर जे आपल्या धोरणानुसार जे पात्र होतील त्या १६ लोकांचा प्रस्ताव आपण आणलेला आहे. बाकीचे यानंतरचा पण आणखी एक टप्पा आहे. काही फाईल आमच्या तपासुन पुर्ण झालेल्या आहेत. त्यासुध्दा पुढील महासभा होईल या दोन लोकांसोबत ते ही राहिलेले प्रस्ताव आपण पुढील महासभेत आणत आहोत. त्यामुळे आपल्याकडे आतापर्यंत ४२ लोकांचे लाड-पागेचे प्रस्ताव प्रलंबित होते. ते ४२ प्रस्ताव आपल्याला छाननी पुर्ण झालेली आहे. आणि या टप्प्यावर आता १६ मंजूर झालेली आहे. ते उर्वरीत पुढील महासभेत आणत आहोत. आता सर्व प्रस्ताव तपासलेले आहेत. आता आमची प्रशासनाची, बघा आता जो काम करतो तो चुकतो, जो काम करत नाही तो चुकणारच नाही ना. आमच्याकडून काम करताना जर एखादी चुक झाली तर ती सरळ मनाने तुम्ही सुध्दा समजून घेतली पाहिजे, अशी माझी विनंती राहील. मी इथे महापालिकेत आल्यापासुन खुप अनुकंपाच्या नियुक्त्या दिलेल्या आहेत. ३१ लोकांना आम्ही नियुक्ती दिलेली आहे. एक पुर्ण कोटा संपलेला आहे. मनुष्यबळाची कमतरता आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-** मी अनुकंपाची बाबत बोलतच नाही. मी १६ लोकांबाबत बोलत आहे. माझ्या वार्डाचे २ लोक निवृत्त झाले. त्यांच्या मुलांना तिथे लावायचे होते. आता त्यांना बोलत आहेत की तुमचे जातीचे प्रमाणपत्र घेऊन या. जेव्हा तुम्ही नोकरी होतात तेव्हा तुमची जात लिहिली नव्हती. तर या १६ लोकांचे जात प्रमाणपत्र, जातपडताळणी प्रमाणपत्र लावलेले आहे का.

**उप आयुक्त् (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे**:- त्यांचे जे लाड-पागे धोरण आहे. जी त्यांची SC जात आहे त्याची पडताळणी करावी लागते. आतापर्यंत कोणीच त्यांना सांगितले नव्हते. आता आम्ही त्यांना सांगितले, नाहीतर हीच पध्दत चालू राहीली असती. कोणी पण जे अनुकंपाचे लाड-पागेचे धोरण आहे, त्यात जे अटी आहेत, त्या कोणीच त्यांना सांगत नव्हते, मी स्वत: वार्डात जाऊन त्यांना सांगितले की, जेथे पण शासनाचे रेकॉर्ड आहेत तेथे जर याची नोंद मिळाली तर ते पडताळणी करुन आम्ही लोक जात प्रमाणपत्र, जातपडताळणी प्रमाणपत्र आणा अशी सक्ती केली नाही. कोणता तरी असा पुरावा असला पाहिजे जो

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-** पडताळणी प्रमाणपत्र कुठून आणणार. जेव्हा ते कामावर लागले होते, तेव्हा जात पडताळणीचे हे नव्हते, आपण बोलतात की, याचे जात लिहून आणा. गावाचे येईल. गावचे प्रमाणपत्र आपल्याला चालेल.

**उपआयुक्त् (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे** :- हो चालेल.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-** गावचे प्रमाणपत्र आपल्याला चालेल.

**उप आयुक्त् (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे**:- कुठले पण चालेल. सरकारी पुरावा कुठलाही चालेल. आता त्यांच्या परिवारातील कोणत्याही व्यक्तीचे मुलगा आहे, मुलगी आहे, आई आहे, वडील आहे, वडीलांच्या भावाचा मुलगा असो,

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-** मुलीचे गावाचे असले तरी चालेल ना. आता या लोकांचे जात प्रमाणपत्र ते समजतात. नक्की ना.

**(मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे**:- नक्की ना.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-** तर हे पास करु या. आयुक्त साहेब आपण ऐकत आहात गावाचे जात प्रमाणपत्र युपी, हरयाणा, एमपी, राय सर्व जागेचे जात प्रमाणपत्र चालेल. असे हे बोलले आहेत. आणि ते मी आणुन देणार. माझ्या वार्डाचे जेवढे पण लोक असतील.

**उप आयुक्त् (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे** :- सरकारी ऑफिसचा असला पाहिजे.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर (महाराज) :-** सरकारी ऑफिसचा जिल्हाधिकारी कार्यालयाचा.

**उपआयुक्त् (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे** :- चालेल काहीच हरकत नाही.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर (महाराज) :-** आयुक्त साहेब चालेल ना. आयुक्त साहेबांना बोलू दया.

**सदस्य, श्री. प्रमोद टाले :-** हे पास करताना इतिवृत्ताची वाट न बघता.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर**:- यांना घ्यायला आम्हांला काहीच विरोध नाही आहे. बाकीच्या लोकांना तुम्ही गावाचे प्रमाणपत्रावर पण घेणार ना. अस जर आपण केले नाही ना, तर १५ वर्षानंतर एक पण सफाईकामगार राहणार नाही. कारण की सर्वांची परिस्थिती अशी आहे की सगळयांकडे गावचे प्रमाणपत्र आहे. इकडचा कोणाकडेच नाही. आयुक्त साहेबांना बोलू दया गावचा प्रमाणपत्र चालेल, उदया हेड क्वॉर्टर बोलतील आयुक्त साहेब मानणार नाही. आयुक्त साहेब बोला. आता तिकडे बघत आहेत. चालत होते, पहिले भरती होत होती. आजच्या तारखेला बोलतात की, जात प्रमाणपत्र घेऊन या. नियम असेल तर बोला ना महाराष्ट्राचा प्रमाणपत्र चालेल, आता बोलत होते की, गावचा प्रमाणपत्र चालेल, बोला साहेब,

**उप आयुक्त् (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे**:- आम्ही तुमची जी मागणी आहे. त्याअनुषंगाने शासनाचे मार्गदर्शक तत्वे तपासुन घेतो आणि त्याप्रमाणे आपण कार्यवाही करु या. जर काही चुक झाली तर परत तुम्ही म्हणाल की, तुम्ही सांगितले होते ते चुकीचे स्टेटमेंट झाले.

**<u>सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी:-</u>** मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब प्रशासनाने कुठलेही उत्तर देताना महासभेची सगळी चौकशी करुन कायदयाचे ज्ञान असलेले प्रमुख आहेत किंवा उपआयुक्त आहेत उत्तर देताना माहिती घेऊन दयायचे. आमची माहिती अशी आहे की, महाराष्ट्र कुठल्याही जातीचे होणार नाही निवडणुक लढविताना आम्हांलाच महाराष्ट्राच्याच जातीचा दाखला लागतो. ही आमची माहिती आहे ती प्रशासनाला नसावी असे कसे होऊ शकते. प्रशासनाने जी उत्तरे दयायची ती विचार करुन ही आमची महासभेच्यावतीने सर्वांना विनंती आहे. विषय राहीला कामगारांचा भुल्लर महाराजांनी सांगितल्याप्रमाणे सफाई कर्मचारी भारत सरकारने घेत असताना जर कायदयाचा किस काढत बसलो तर इथून पुढे सफाई कामगार मिळणार नाहीत. म्हणण आहे म्हणूनच कायदयाचा किस न काढता शासनाच्या नियमात राहून कामगारांना तर प्रशासनाने

**<u>सदस्य, श्री. प्रमोद टाले :-</u>** चौधरी साहेब मला माझ्या माहितीप्रमाणे महाराष्ट्रात जेवढया जाती आहेत.

**<u>सदस्य, श्री. राजेश वानखेडे :-</u>** बोलवा त्यांना आणि विचारा.

**<u>सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी :-</u>** सभागृहाला कुठलीच हरकत नाही.

**<u>महापालिका सचिव :-</u>** सर, नियम तपासावे लागतील.

**<u>सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी :-</u>** हा विषय मंजूर करायला आम्हांला कुठलीच हरकत नाही. उदयापासून आमच्याच वार्डामध्ये कामाला येणार आहेत. काम चांगले आमचे काम सोपे होणार आहे. म्हणून आमचा विरोध नाही. प्रशासनाने आणि इथून पुढे जी काही उत्तरे दयायची आहेत ती चौकशी करुन दयावीत. इतिवृत्ताची वाट न पाहता पास.

**<u>सदस्य, श्री. प्रमोद टाले :-</u>** चौधरी साहेब, नाही नाही, माझे म्हणणे असे आहे की, भारतामध्ये जेवढया जाती आहेत त्या शेडयुल कास्टमध्ये आहेत की ओबीसीमध्ये आहेत. किंवा अजून कशामध्ये आहेत प्रत्येक ... वेगवेगळे आहे. काही काही भारताच्या इतर राज्यामध्ये ओबीसी असेल तर काही जाती इथे जनरलमध्ये येतात. काही जाती इथे एसी असतील तर भारतात इतर राज्यात जनरलमध्ये येतात. ही त्यांची गावामधील जी जात आहे. ती इथे महाराष्ट्रात कुठल्या जातीत लागू आहे हे जर पडताळून पाहिले तर मला वाटते हा प्रश्न सुटेल.

**<u>उप-महापौर, श्री. भगवान भालेराव</u>**:- आता म्हणणे मांडू नका.

**<u>सदस्य, श्री. प्रमोद टाले:-</u>** भारतामध्ये जेवढया जाती आहेत त्या शेडयुल कास्टमध्ये आहेत की ओबीसीमध्ये आहेत. किंवा अजून कशामध्ये आहेत प्रत्येक वेगवेगळे आहे. काही काही भारताच्या इतर राज्यामध्ये ओबीसी असेल तर काही जाती इथे जनरलमध्ये येतात. काही जाती इथे एसी असतील तर भारतात इतर राज्यात जनरलमध्ये येतात. ही त्यांची गावामधील जी जात आहे. ती इथे महाराष्ट्रात कुठल्या जातीत लागू आहे हे जर पडताळून पाहिले तर मला वाटते हा प्रश्न सुटेल.

**<u>महापालिका सचिव :-</u>** विषय क्र. ५ पास इतिवृत्ताची वाट न पाहता.

**<u>काही सदस्य :—</u>**पास—पास......

**<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ५:—** वारसा पध्दतीने सेवानिवृत्त/दिवंगत सफाई कामगार यांच्या रिक्त जागेवर

त्याचे वारसास नियुक्ती देणे बाबत.

**<u>प्रस्तावना</u>**

उल्हासनगर महानगरपालिकेत लाड-पागे कमिटीच्या शिफारशीनुसार वारसापध्दतीच्या अंमलबजावणी बाबत, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, परिपत्रक क्रमांक — सफाई २०११/प्र.क्र. ३२७/विघयो — २, मुंबई - ३२, दिनांक २१ ऑक्टोंबर २०११ नुसार, महानगरपालिकेतील सफाई कामगार/मुकादम यांच्या निवृत्ती, मृत्यु, तसेच स्वेच्छा किंवा वैद्यकिय सेवा निवृत्तीनंतर त्यांचे जागी वारसाहक्काने नियुक्ती करण्यात येते.

उल्हासनगर महानगरपालिकेतील खालील सेवानिवृत्त/ दिवंगत सफाई कामगार/मुकादम यांचे जागी वारसा हक्काने नियुक्ती मिळणेबाबत खालीलप्रमाणे त्यांचे वारसाचे विनंती अर्ज सादर केलेले आहेत.

| अ.क्र | मुळनोकरदाराचेनांव- | सेवा निवृत्तीचाप्रकार | सेवानिवृत्ती चादिनांक | अर्जदाराचे नांव | अर्जदाराचेकर्म चा-याशी नाते व जात |
|---|---|---|---|---|---|
| १ | कै. राजुएकनाथ शेलार | मयत | २६-१०-१८ | श्री. अनिकेत राजु शेलार | मुलगा |
| २ | श्री. अमरमंगल मरोठीया | स्वेच्छा सेवा | २०-१२-१८ | श्रीम. रीना अमर मरोठीया | पत्नी |
| ३ | श्री. राजु बाबुलाल कालोस | स्वेच्छा सेवा | १३-०३-१९ | श्री.विवेक राजु कालोस | मुलगा |
| ४ | श्रीम.शशिकला वाघमारे | वयोमानानुसार | ३०-११-१९ | श्री. गंगाभिषण वाघमारे | मुलगा |
| ५ | श्री.माणिक राजाराम देडे | स्वेच्छा सेवा | ३०-११-१९ | श्री. राम माणिक देडे | मुलगा |
| ६ | श्री. गौतम भाऊराव घोडेराव | स्वेच्छा सेवा | ०९-१२-१९ | श्री. मिलींद गौतम घोडेराव | मुलगा |
| ७ | श्रीम.शकुंतला दिपक घोडके | स्वेच्छा सेवा | ३०-०१-२० | श्री. चंद्रमणी दिपक घोडके | मुलगा |
| ८ | श्रीम.वच्छला लखा निकम | स्वेच्छा सेवा | ०१-०२-२० | कु. शकुंतला लखा निकम | मुलगी |
| ९ | श्रीम.शोभा जयकिशन आल्हाट | स्वेच्छा सेवा | १३-०२-२० | श्री. आकाश जयकिशनआल्हाट | मुलगा |
| १० | श्रीम.अनुसया नवसा सोनवणे | वयोमानानुसार | २९-०२-२० | श्री. मुकेश नवसासोनवणे | मुलगा |
| ११ | श्री.भास्कर शिवराम भिसे | वयोमानानुसार | २९-०२-२० | श्री. संदिप भास्करभिसे | मुलगा |
| १२ | श्रीम. उषादादु गायकवाड | स्वेच्छा सेवा | ०२-०४-२० | श्री. राम दादुगायकवाड | मुलगा |
| १३ | श्रीम.यशोदा मदन उबाळे | स्वेच्छा सेवा | ०७-०४-२० | श्री. सागर मदन उबाळे | मुलगा |
| १४ | श्री.अमरपाल सौदान मेंडवाल | स्वेच्छा सेवा | १३-०५-२० | श्री. राहुल अमरपालमेंडवाल | मुलगा |
| १५ | श्रीम.संजु भगवान वाघेला | स्वेच्छा सेवा | १३-०६-२० | श्री. अमर भगवानवाघेला | मुलगा |
| १६ | कै. बाळु लहू आल्हाट | मयत | ०४-०९-२० | श्री. रविंद्र बाळुआल्हाट | मुलगा |

लाड-कमिटीचा मुळ उद्देश कुटुंबावर आलेले संकट उपासमार टाळणे असा आहे.

तरी, शासन निर्णयाच्या अधिन राहुन वरील वारसांना उल्हासनगर महानगरपालिकेतील सेवानिवृत्त/दिवंगत, सफाई कामगार यांचे रिक्त जागेवर वारसाहक्कांने नियुक्ती देणेकामी मा. महासभेपुढे मंजुरीकरीता प्रस्तावित करण्यात येत आहे.

**महासभा ठराव क्र:२६** **दिनांक:—२/१२/२०२१**

सुचकाचे नाव:— श्री. प्रमोद टाले

अनुमोदकाचे नाव :— श्री. शंकर लुंड

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेतील वारसा पध्दतीने सेवानिवृत्त/दिवंगत सफाई कामगार यांच्या रिक्त जागेवर त्यांचे वारसास नियुक्ती देणेस मान्यता देत आहे.

**तसेच**

अनुकंपा तत्वावर प्रतिक्षा यादीवर असलेल्या उमेदवारांना ठोक वेतनावर घेण्यात यावे.

या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

———————————————————————————————————————

⇨ **विषय क्र. ६ :— मा. उच्च न्यायालयात याचीका क्र. १०२२५/१७ बाबत.**

———————————————————————————————————————

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-** ३०५ कर्मचारी होते. आपण फक्त ४ कर्मचाऱ्यांचे घेऊन आले आहेत. बाकीचे ३०१ मेले का.

**महापालिका सचिव:-** नाही, नाही, यामध्ये तर ५ दिसत आहेत.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव**:- बाकी यादीमध्ये...

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-** सर्व येण्यास तयार आहेत त्यांच्या जागेवर त्यांच्या मुलांना घ्या.

**सदस्य, श्री. स्वप्नील बागुल:-** प्रशासनाने याबाबत खुलासा करावा.

**उपआयुक्त् (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे**:- नाही, हे कोर्ट प्रकरण होते. औदयोगिक न्यायालयामध्ये यापुर्वी प्रशासनाने केले होते. ३०५ तपासून विहित नियमानुसार त्यांना आपण नियुक्ती देतो. त्यानुसार परत उच्च न्यायालयात प्रकरण गेले शेवट झालेला होता. त्याअनुषंगाने आपण एकुण ६२० लोकांचे आपल्याकडे अर्ज आले होते. ६२० लोकांची आपण छाननी केली. त्यापैकी काही लोक आपल्या हजेरी मस्टरवर नव्हते. काही लोकांनी २४० दिवस भरलेले नव्हते.

त्यानंतर जे २४० दिवस भरलेले होते, त्या लोकांचे आपण पेपरमध्ये सुप्रिम कोर्टाचे मार्गदर्शक तत्वे आहेत की, भरती प्रक्रिया कशी करावी. त्या नियुक्ती दयायची असेल तर आपण थेट नियुक्ती देऊ शकत नाही. सुप्रिम कोर्टाचे मार्गदर्शक तत्वे आहेत त्या मार्गदर्शक तत्वे त्यानुसार आपण विहित कार्यपध्दती अवलंबली, त्यानंतर आपण पेपरमध्ये जाहिरात दिली, या सर्व लोकांची नावे सुध्दा प्रसिध्द केली होती. त्यानंतर त्यांना आपण मुलाखतीसाठी बोलावले, मुलाखतीला बोलावल्यानंतर फक्त ०८ लोक उपस्थित झाले. त्यांची सर्व तपासणी

**सदस्य, श्री. स्वप्नील बागूल:-** साहेब तुम्ही जाहिरात कुठल्या पेपरमध्ये दिली.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :-** साहेब आपण जे बोलत आहेत ना ते ८ लोक आहेत. ५०-५० लोक येऊन जातात.

**सदस्य, श्री. स्वप्नील बागूल:-** आमच्याकडे २० लोकांची माहिती आली आहे. महापालिकेने त्यांना कळविलेच नाही.

**उप आयुक्त् (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे**:- ३ वृत्तपत्रामध्ये आपण जाहिरात दिली होती.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-** हा मागे घ्या. हा डिफर करा. पुढच्या महासभेत दुसरे बनवून आणा. सोशेल मिडियावर दया. घराघरामध्ये पेपर पोहचले पाहिजेत.

**सदस्य, श्री. स्वप्नील बागूल:-** ३०५ लोकांची आपल्याकडे यादी आहे ना.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :-** महापौर घेणार आहेत.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** उपमहापौरजी हा विषय जास्त वेळ प्रलंबित करणे बरोबर नाही होणार. कारण की १५ वर्षापासुन प्रलंबित चालला आहे. मी याचा पुर्ण अभ्यास केला आहे. फक्त ४ लोकांना आम्ही नोकरी देऊन या १५ वर्षापासुन ते या त्रासाशी झगडत आहेत. तर याला जास्त लांब खेचणे चांगले नाही. आणि ४ लोकांचा समावेश करुन या ३०५ लोक मजूरांचा मुददा १५ वर्षापासून चालत आला आहे. तो समाप्त होईल. तर मी सदनास निवेदन करतो की, ४ लोकांचा फक्त समावेश करावयाचे आहे. आणि ४ लोकांचा समावेश करुन २० वर्षापासून ६२० कामगारांचा मुददा चालला आहे. ३२० छाननी करुन महानगरपालिकेचा जो खर्च आहे. त्याप्रमाणे त्यांनी पुर्णपणे त्यांचेवर लक्ष ठेवले आहे. खुप कोर्टाची लढाई लढली आहे. कायदयाची लढाई लढली आहे. कारण की आज आम्ही हे करणार नाही तर पुढे जाऊन महानगरपालिके विषय येऊ शकतो. यासाठी ही महानगरपालिका आमची आहे. आणि आमच्या अधिकाऱ्यांवर अपमान होईल हे ठिक नाही आहे. मी भारतीय जनता पार्टीच्यातर्फे या पदाचा आहे आणि मी शिवसेनेच्या सर्व वरिष्ठ सदस्यांना बोडारे साहेब या सर्वांना निवेदन करतो की, खुप दिवसांपासुन हा मुददा चालू आहे. फक्त ४ लोकांचा समावेश करायचे आहे. आणि हा मुददा संपत असेल. आणि या हिशोबाने न्यायालयाची अवमान न आमच्या महानगरपालिकेवर नाही होणार. यासाठी माझी विनंती आहे, ४ लोकांना नियुक्ती देऊन याला कायमचे संपवा.

**सदस्य, श्री. स्वप्नील बागूल:-** या संपवणे नाही. नगरसेवक साहेब इथे महापालिकेने सांगितले की, ७० लोकांचे अर्ज दाखल झाले आहे. ६०० लोकांनी अर्ज केले होते. त्यातून फक्त ७० लोक कसे तुम्हांला प्राप्त झाले.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:-** महापौर महोदया, उप महापौर साहेब, सफाई कामगारांची मंजूर पदे किती आहेत. आज किती आहेत.

**उप आयुक्त् (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे**:- १५०० मंजूर आहेत, ११०० कार्यरत आहेत.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:-** किती आहेत.

**उप आयुक्त् (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे**:- १५०० मंजूर आहेत, ११०० कार्यरत आहेत.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:-** कोर्टाचा निर्णय घेण्यासाठी मला वाटते १० वर्ष लागली. किती लागली

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:-** म्हणजे १५०० आहेत आणि अजून ३०५ कोर्टाच्या आदेशानुसार घ्यायचे होते. हे महापालिकेने मान्य केले होते. हे महापालिकेने मान्य केले होते. तुम्हांला सांगतो १५०० कामे कमी पडत होते. म्हणून तेव्हा खाडा बदली घेत होते. त्या कामगारांनी दावा दाख्ल केला, आणि म्हणून कोर्टाने आदेश दिला की, ३०५ कामगारांना ज्यांचे २४० दिवस भरलेले आहेत म्हणजे १५०० अधिक ३०५ एकूण १८०५ बरोबर ना या महापालिकेची आवश्यकता १८०५ कर्मचाऱ्यांची आहे हे प्रशासनाने मान्य केलेले आहे. सध्या कर्मचारी फक्त ११०० आहेत. ११०० पैकी सुध्दा ८००-९००

साधारणपणे १२-१३ कर्मचारी आहेत. त्यातील २-३ कायम गैरहजर आणि २ रजेवर असतात. म्हणजे कधी कधी तर अगदी मोसममध्ये म्हणजे ऐन जून महिना किंवा पावसाळा सुरु होतो, दिवाळीच्या सणामध्ये ५-६ कर्मचारी असतात त्या मुकादमाला प्रश्न पडतो की, नाल्यावर कोणाला पाठवायचे रोडवर कोणाला पाठवायचे अशी अवस्था आहे. भरती करायला सांगितले.

**सदस्या, श्रीम.सुरेखा आव्हाड :-** माझ्या वार्डात एकच कर्मचारी तो १० दिवसांपासून एकच आहे.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:-** आता ही चर्चा आहे. आता हा ठराव कसा आला पाहिजे. प्रशासनाचे काम यासाठी संपुर्ण यंत्रणा आहे. त्यासाठी एजन्सी नेमलेली पाहिजे. काम करुन घेणे प्रशासनाचे काम आहे. कर्मचारी नेमायचे आहे. याबाबत आता १८०० चे ११०० मध्ये कसे भागतील. यातून मार्ग काय काढायचा. तुम्ही सांगितले आहे ते बरोबर आहे. १६ वर्षापासुन प्रलंबित आहे. १६ वर्षात काय काय झाले मग ते age bar झाले. त्यामुळे घेऊ शकत नाही. त्याला पर्याय सुध्दा आपण काढला पाहिजे. शेवटी त्याचा एकत्रित परिणाम शहराच्या सफाईवर होतो. नाले सफाई होत नाही मग तो … जसे केंद्र सरकारने केले आहे आडानी आणि अंबानी तसे आमचे चालले आहे. आता लाड कमिटी सुध्दा खाजगी करायचे तुमचा कचरा महानगरपालिका नंतर कचऱ्याचा ठेकेदार आला. तर मला वाटत महाराज याचे काम का होत नाही याचे स्पष्टीकरण

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-** अडचण संपणार नाही. आपण पुढच्या महासभेत पुर्ण प्रस्ताव आणा. लोकल पेपरमध्ये टाका. अस आपण मोठया पेपरमध्ये टाकून लपवण्याचा प्रयत्न करु नका.

**उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे**:- अडचण समजून घ्या. ही उच्च न्यायालयात आपल्या प्रशासनाच्या विरुध्द दावा दाखल आहे. आपण हे सर्व प्रकरण तपासले आहे. आपल्याकडे २०९ अर्ज आले होते. आपण राज्यस्तरावच्या ३ वृत्तपत्रात जाहिरात दिली होती.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-** साहेब राज्यस्तरावच्या वृत्तपत्रात जाहिरात देवून फायदा नाही. यांना लोकल पेपरमध्ये दयावी लागेल. ते शहरात राहणारे लोक आहेत.

**उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे**:- माझे ऐकूण तर घ्या. आपण जी माध्यमे वापरावयाची आहेत ती वापरली आहेत. ज्या आपल्या कामगार संघटना न्यायालयात दिल्या आहेत. कामगार संघटनांनी यादी प्रदान केली होती. त्या यादया आपण पुर्ण तपासल्या आहेत. या कामगार संघटनेच्या यादीमधील २४० दिवस भरलेले फक्त ७० च लोक आपल्याला मिळाली होती. आणि २४० दिवस ज्यांचे भरले त्यांनाच आपल्याला विचार करता येत होता आणि जे विचाराधिन २४० लोक होते. त्यांच्यासाठी आपण त्यांचे पत्ते शोधण्याचे प्रयत्न केले. ते कुठे उपलब्ध होतात का ते सुध्दा ट्रेस करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर आपण वृत्तपत्रात जाहिराती दिलेल्या आहेत. वृत्तपत्रातील जाहिरातीनुसार ही सर्व प्रक्रिया पुर्ण केली.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-** हे ४ ला मंजूरी दिली आहे. परंतु बाकींच्यासाठी आपण लोकल पेपरमध्ये सोशल मिडियामध्ये टाकण्यास सांगा. त्यासाठी १ महिन्याची वेळ दया.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:-** मा.महापौर जी मी याबाबत दोन शब्द बोलू इच्छितो.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर (महाराज) :-** एक मिनिट वनवारी जी आधी माझे बोलणे होऊ दया. माझे पुर्ण होऊ दया.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी :-** मी परवानगी मागत आहे. आपण पुर्ण करा.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर (महाराज) :-** सोशल मिडियामध्ये टाका. लोकल पेपरमध्ये दया. आता पेपरमध्ये जाहिरात कधी जाईल.

**उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे** :- दि.११/०३/२०१९ मध्ये जाहिरात दिली होती.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर (महाराज) :-** ती नाही, जी पहिली दिली ती नाही. आता आपण कधी जाहिरात दिली. नवीन जाहिरात कधी टाकणार. नवीन लोकांना जे घेणार आहात. ४ लोकांना मंजूरी देतो. त्यानंतरही जे बाकी लोक आहेत. असे आमचे मानने आहे.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:-** त्यांचे म्हणणे तुमच्याकडे फक्त ८ मुलाखतीसाठी आले. आमच्याकडे ५०-५० येतात तर त्यांना कळलेले नाही. त्यांना तुम्ही सोशल मिडियावर व येथील लोकल पेपरमध्ये जाहिरात दया. याच्यामध्ये कोण पात्र असेल त्यांनी या. जे या ४ ला तर आम्ही मंजूरी देतोय.

**उपमहापौर, श्री. भगवान भालेराव:-** या ४ लोकांना मान्यता दया. आणि पुढे जाहिराती देऊन.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:-** मी दोन शब्द बोलतो

**उप आयुक्त् (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे**:- सभागृहाला माझी विनंती आहे. हि प्रक्रिया पुर्ण झाली आहे. आपण न्यायालयात हे आव्हान केले आहे. कन्टेम्ट पिटिशनमध्ये परत आपल्याला गैरसोयीचे होईल, आणि परत ते प्रशासनाला

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** नाही, नाही, महाराजांचे काय म्हणणे आहे कि आम्ही मान्यता देतो. पण पुढे जेव्हा आपण नविन लोकांना संधी देणार ते लोकल पेपरमध्ये दया. किंवा सोशल मिडियामध्ये दया.

**उपआयुक्त् (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे**:- पुढे भरती प्रक्रिया करायची असेल तर आपण हि प्रक्रिया अवलंबणार.

**सदस्य, श्री. सतरामदास:-** बोडारे साहेब प्रशासनाकडून उत्तर तर घ्या. ७०० सफाई कामगार भरती करणार आहेत ते कधी करणार.

**उपमहापौर, श्री. भगवान भालेराव:-** पुढे घ्या. पुढचा विषय घ्या. इतिवृत्ताची वाट न पाहता.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:-** आयुक्त साहेब, महापौर साहेबा आपल्या पण वार्डात सफाई कामगारांची कमी असेल, ती कमी कशी दुर होणार, कधी दुर होणार. १५ वर्ष वाट पहावी लागली. हाऊससमोर आणू इच्छितो.

**महापौर, श्रीमती लिला आशान:-** खुप झाले आता. दुसरे पण ऐका.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:-** खुप नाही झाले.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:-** मी पण बोलणार.

**सदस्या, श्रीम. सुरेखा आव्हाड:-** आई माझ्या वार्डात सफाई होतच नाही. सर सांगाल का किती कर्मचारी आहेत, आयुक्त साहेब,

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:-** महापौरजी मी या विषयावर बोलू इच्छितो. हे ३०५

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** इतिवृत्ताची वाट न पाहता पास चला पुढे घ्या.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:-** नाही, नाही, हे चुकीचे आहे.

**सदस्या, श्रीम. मिना सोंडे:-** कोणाचा आवाज दाबू नये.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:-** हे चुकीचे आहे. आम्ही जबाबदार नाही, आपण चुकीचे काम करत आहेत आणि आम्ही पास करु का.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-** ठराव असा करा की, या ४ लोकांना आम्ही घेत आहोत. बाकीचे जे ३०१ लोक आहेत जे लेबर कोर्ट त्यांची पेपरमध्ये जाहिरात देऊन

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:-** सर्व आपणच करा. ३०५ मधील फक्त ४ लोक घेणार असे कसे होईल.

**महापालिका सचिव:-** कृपया शांत रहा ठराव बोलत आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-** ठराव असा होईल की, ४ लोकांना मंजूरी देत आहेत. बाकीचे जे ३०१ लोक आहेत.

**<u>सदस्या, श्रीम. सुरेखा आव्हाड:-</u>** महत्वाचे विषय या महानगरपालिकेत होत नाही असा गलथान कारभार या महानगरपालिकेत चालू आहे. जेव्हा महत्वाचे विषय येतात तेव्हा गोंधळ चालू असतो. साफसफाई होत नाही, पाणी पुरवठा विभागाचा गलथान कारभार.

**<u>महापालिका सचिव:-</u>** ४ ही कामगारांना सामावुन इतर ३०१ कामगारांना लेबर कोर्ट च्या निर्णयानुसार जाहिरात देणे आवश्यक असेल पास इतिवृत्ताची वाट न पाहता.

**<u>काही सदस्य :—</u>**पास—पास……

**<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी:—</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ६:—<u>मा. उच्च न्यायालयात याचीका क्र. १०२२५/१७ बाबत.</u>**

**<u>प्रस्तावना</u>**

मा. औद्योगिक न्यायालयाने सन १९८७ ते १९९९ या कालावधीत रोजंदारी/हंगामी स्वरूपी सेवेचे काम केलेल्या सफाई कर्मचा-यांची पगारपत्रके तपासून कामगारांची अदयावत सेवाजेष्ठता यादी सादर करणेबाबत महानगरपालिकेस आदेश देण्यात आले होते. त्यानुसार सदर कालावधीमध्ये काम केलेल्या रोजंदारी/हंगामी सफाई कर्मचा-यांची पगार पत्रके तपासून अदयावत सेवा जेष्ठता यादी मा. न्यायालयास सादर करण्यात आली होती. तदनंतर अखिल भारतीय सफाई मजदुर कॉग्रेस व लेबर फ्रंट कर्मचारी या कर्मचारी/कामगार संघटनांनीमा. औद्योगिक न्यायालय, ठाणे येथे याचिका क्र.१३४/२००७ नुसार तक्रार दाखल करून सदरची भरती प्रक्रियेस स्थगिती आणली होती मा. औद्योगिकन्यायालय यांनी दिनांक २५/१/२०१० रोजी महानगरपालिकेतील रिक्त पदांची जसजशी आवश्यकता भासेल तसतशी पदे महापालिकेने मा. न्यायालयास सादर केलेल्या जेष्ठता यादीनुसार भरण्यात यावी असे आदेश दिलेले होते.

२. मा. औद्योगिक न्यायालयाच्या उपरोक्त निर्णयाचे विरोधात उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत दिनांक ४/९/२०१० रोजी उच्च न्यायालयात फेरयाचीका क्र. ७०६०/१० दाखल केली होती.त्यामध्ये सर्व संघटनेच्या संमतीने मेडीयेटर म्हणुन श्री. टोपकर यांची नियुक्ती करण्यात आली होती. यावेळी सर्व कामगार संघटना तसेच प्रशासन यांच्यात झालेल्या एकमतानुसार दिनांक ४/३/२०१६ रोजी Consent Draft मा. उच्च न्यायालयात दाखल केली त्यानुसार ३०५ रिक्त सफाई पदांची भरती प्रक्रिया नियमानुसार त्वरीत करण्यात येईल असे नमुद आहे.

३. उपरोक्त Consent नुसार श्री. रमेश टोपकर यांनी दिनांक १४/२/२०१४ चे पत्रानुसार खालील प्रमाणे अहवाल मा. उच्च न्यायालयास सादर केलेला आहे.

By order dated 03.09.2013 passed by this Hon'ble court (Coram: A. A. Sayed) the above referred Civil Application and Writ Petition was referred to me as mediator.

According I have convened the meeting of all the parties on 08.10.2013, 23.10.2013, 10.12.2013, 08.01.2014,22.01.2014 and lastly on 29.01.2014 the dates were fixed as per the convenience of all the concerned parties. The parties were represented by their respective Advocates. Tam enclosing herewith the letters/attendance sheets and documents tendered by the parties during mediation proceedings.

The Corporation officials and Union representative had discussions over the issue. The Corporation Officials stated that the list of daily wages employees is already prepared and finalized and all of them are back door entrants and cannot be regularized as of right. They further contended that the employees from said list do not fulfill the eligibility criterion and hence cannot be considered, without the said conditions being relaxed by the State Government. The Corporation officials stated

that the Corporation would commence recruitment process by giving public advertisement and the eligible enlisted daily wages employees may apply in response thereto.

The Union offices bearers and Adv: Avinash Belge and Adv. Kirankumar Phakade representative them, apposed and stated that there 305 vacant posts and about 620 daily rated employees from the list of 5170 employees are eligible for permanency and regularization. The Unions wanted this employees to be given preference since they were working for more than 15-20 years with the Corporation on daily wages. The Union also want the Corporation to undertake the process of filing up the posts at the earliest since more employees would become age barred if the process is delayed.

As and by way of interim measure during the pendency of the Writ Petition it was agreed between the parties that the Corporation would issue public advertisement and follow the recruitment procedure laid down by law at the earliest, for filling the vacant posts in Class IV category. The daily wages employees from the list who are working and who satisfied the eligibility criterion i.e. age, education, qualification etc., would apply in response to the said advertisement. The Corporation shall give preference to the said employees as per their seniority while giving appointments it was also agreed that the Corporation shall send requisite proposal to the state government for creation of class IV posts after gating there approval from the General Body.

On this agreement, the mediation ended. The parties insisted that they would address the Hon'ble Court on other issues. Thus this report.

४. सदरConsent नुसार सफाई कर्मचारी यांचे रिक्त ३०५ पदांची भरती प्रक्रीया सुरू करणे आवश्यक आहे. तथापी सदयस्थितीत उल्हासनगर महारगरपालिकेचा आस्थापना खर्च ५० टक्के पेक्षा अधिक आहे. सातवा वेतन आयोग लागू केल्यास सदर खर्च आणखी वाढलेला आहे तसेच कचरा वाहतूकचे काम बाहय संस्थेमार्फत करणेत येत आहे. सदर संस्थेमार्फत ३६८ कर्मचारी कार्यरत आहेत. अशा स्थितीत रिक्त सफाई कर्मचारी पदे भरणेची आवश्यकता नाही. सबब मोठया प्रमाणात असलेला आस्थापना खर्च व त्यामुळे शहरातील विकास कामासाठी कमी उपलब्ध होणारा निधी विचारात घेउन आज पर्यंत सदर रिक्त सफाई कर्मचारी पदांची भरतीप्रक्रिया राबविणेत आलेली नाही. दरम्यानच्या कालावधीत सन २०१७ मध्ये श्री. रमेश रणदिवे यांच्या वतीने श्रीम. छाया एस. सरोदे व इतर यांनी याचीका क्र. १०२२५/१७ मा.उच्च न्यायालयात दाखल केली आहे. सदर याचिकेत मा. उच्च न्यायालयात सादर केलेल्या Consent Term प्रमाणे भरती प्रक्रिया केलेली नसल्याने मा. न्यायालयाचा अवमान केला आहे असा मुदा उपस्थित झाला आहे. तदनंतर मा. उच्च ल्यायालयात महापालिकेमार्फत Consent Terms रद्द करण्यासाठी Civil Application दाखल केले होते. मात्र मा. उच्च न्यायालयाने सदर Civil Application नामंजुर केले आहे. सबब मोठया प्रमाणात असलेल्या आस्थापना खर्च, महानगरपालिकेची बेताचीआर्थिकस्थिती तसेच सफाई कामगार रिक्त पद भरणे आवश्यकता नसल्याने, मा. उच्च न्यायालयाचे निर्देश लक्षात घेउन, सर्व रिक्त पदांची खुली (open to all) भरती प्रक्रिया न करता मा. औद्यिगिक न्यायालयास सादर केलेल्या व उल्हासनगर महानगरपालिका व महापालिका संघटना यांनी तयार केलेली व साक्षांकित केलेली ६२० हंगामी सफाई कामगारांची यादी मधील पात्र रोजंदारी/हंगामी सफाई कामगारामधून भरती प्रक्रिया करणेबाबतचा निर्णय घेणेत आला. त्याप्रमाणे सदर ६२० हंगामी/रोजंदारी कर्मचारी यांची यादी वृतपत्रात प्रसिध्द करून त्यांचे अर्ज मागवण्यात आले.

५ उल्हासनगर महानगरपालिकेने दै. वृतपत्रात दिलेल्या जाहिरातीनुसार दि ११ मार्च, २०१९ ते दिनांक १९ मार्च, २०१९ पर्यंत संबंधीत ६२० कर्मचारी यांनी त्यांचे वय, शैक्षणिक पात्रता, जात तसेच इतर माहितीसाठी आवश्यक ते कागदपत्रासह अर्ज करणे बंधनकारक करण्यात आले होते. या जाहिरातीस अनुसरून विहीत कालावधीत एकूण २०९ अर्ज प्राप्त झाले होते.

६ प्राप्त २०९ अर्जाची छाननी करणेसाठी मा.आयुक्त यांनी दिनांक २६ मार्च, २०१९ रोजी आदेश निर्गमित करून उप—आयुक्त मुख्यालय, उल्हासनगर महानगरपालिका व इतर

आस्थापना कर्मचारी यांची नियुक्ती करणेत आली होती. त्यांनी खालीलप्रमाणे छाननी अहवाल सादर केलेला होता.

७. उल्हासनगर महानगरपालिकेचा आस्थापना खर्च ३५ टक्के पेक्षा अधिक असल्याने, त्याच प्रमाणे सातवा वेतन आयोग लागू केल्यानंतर आस्थापना खर्चात होणारी वाढ तसेच वर्ग १ ते ३ मधील अनेक रिक्त असलेली महत्वाची प्रशासकीय व तांत्रिक पदे, ३०५ सफाई कामगारांची पदे भरल्यास,त्यामुळे त्यांचे वेतनामुळे वाढणा—या आस्थापना खर्चामुळे शहरातील नागरी विकास काम करणेस निधी उपलब्ध होणार नसल्याने, मा. उच्च न्यायालयात दाखल केलेल्या कन्सेंट टर्मची अंमलबजावणी करणेच्या दृष्टीने केवळ मान्यता प्राप्त यादीतील ६२० हंगामी कर्मचारी यांचे कडून अर्ज मागवण्यात आले होते.

८. दिनांक ११ मार्च, २०१९ रोजी प्रसिध्द केलेल्या जाहिरातीस अनुसरून प्राप्त २०९ अर्जांची छाननी तक्त्यानुसार, सर्व कर्मचारी संघटनेनी (एकूण चार संघटना) मान्यता दिलेल्या ६२० हंगामी सफाई कर्मचारी पैकी प्राप्त ९४ हंगामी सफाई कर्मचारी (प्राप्त अर्ज ९५, व्यक्ति ९४)यानी अर्ज सादर केलेले आहेत. निवड समितीस यातील खालील ८ हंगामी सफाई कर्मचारी हे उल्हासनगर सेवा प्रवेश नियम तसेच शासन निर्णय क्र.एस आर व्ही २०१५/ प्र.क्र. ४०४/कार्या.१२, दि. २५/४/२०१६ अन्वये पात्र असलेचे दिसून आले आहे.

१०- त्यानुसार दिनांक १९/३/२०१९ रोजी पर्यंत एकुण २०९ अर्ज प्राप्त झाले त्याचा तपशील खालील प्रमाणे

| | |
|---|---|
| मुळ यादीतनांव असलेले व २४० दिवसापेक्षा जास्त काम केलेल्या कामगारांची प्राप्त अर्जाची संख्या | ७० |
| मुळ यादीत नांव असुन २४० दिवापेक्षा कमी दिवस काम केलेल्या कामगारांची प्राप्त अर्जाची संख्या | २५ |
| मुळ यादीत नांव नसुन प्राप्त अर्जाची संख्या | ११४ |
| एकुण प्राप्त अर्ज | २०९ |

११.मुळ यादीत नांव असलेले व २४० दिवसापेक्षा जास्त काम केलेल्या कामगारांची प्राप्त आर्जाच्या छाननी अहवालानासर खालील प्रमाणे एकुण ८ हंगामी कामगार यानुसार पात्र असल्याचे निदर्शनास आले.

सदर उमेदवारांनाजा.क्र. उमपा/साप्रवि/आस्था/ मुली/४४९/२०१९, दिनांक ३/७/२०१९ रोजीच्या पत्रान्वये दिनांक ८/७/२०१९ रोजी मुळ कागदपत्रांसह उपस्थित रहाणेबाबत कळविले होते.

| अ.क्र | हंगामी कर्मचारीचे नांव | मा. न्यायालयात सर्व कर्मचारी संघटनानी मान्यता दिलेल्या यादीतील क्रमांक |
|---|---|---|
| १ | श्री. सिध्दार्थ माणिक बनकर | १०६ |
| २ | श्री. हरिचंद रामचंद | ११२ |
| ३ | श्री. गणेश खंडु | ११७ |
| ४ | श्री. किशोर गणेश नवगिरे | १३१ |
| ५ | श्री. गोरख दामु उल्हारे | १४६ |
| ६ | श्री. दिलिप चंद्रकांत मनोहर | १७२ |
| ७ | श्री. कमल जगदिश डागर | १९६ |
| ८ | श्री. बाळकृष्णा विठ्ठल | ३२९ |

१२. सदर वेळीखालील ४ कामगार महापालिकेत उपस्थित रहिले व एका उमेदवारास लकवा आलेला असल्याने तो उपस्थित राहु शकला नाही म्हणजेच तो सदरचे काम करण्यास सक्षम नाही.

| अ.क्र | हंगामी कर्मचारीचे नांव | मा. न्यायालयात सर्व कर्मचारी संघटनानी मान्यता दिलेल्या यादीतील क्रमांक | शेरा |
|---|---|---|---|
| १ | श्री. सिध्दार्थ माणिक बनकर | १०६ | हजर |
| २ | श्री. किशोर गणेश नवगिरे | १३१ | सदर उमेदवारास लकवा असल्याने त्यांच्या ऐवजी |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | त्यांचे वडील श्री. गणेश विष्णु नवगिरे उपस्थित होते. |
| ३ | श्री. गोरख दामु उल्हारे | १४६ | हजर |
| ४ | श्री. दिलिप चंद्रकांत मनोहर | १७२ | हजर |
| ५ | श्री. कमल जगदिश डागर | १९६ | हजर |

१३- उपरोक्त परिस्थितिविचारत घेता पडताळणी अन्वये पात्र झालेल्या ४ उमेदवारासफाई कामगार पदावर नियुक्ती देणे उचित होईल, जेणेकरून Consent Terms ची अमंलबजावणी होईल व मा. उच्च न्यायालयाचा अवमान होणार नाही तसेच महानगरपालिकेवर सर्व रिक्त पदे भरून आस्थापना खर्चअतिशय मोठया प्रमाणात वाढवावा लागण्याची वेळ येणार नाही.

१४. उल्हासनगर महानगरपालिकाने मा. उच्च न्यायालयात दाखल केलेल्या कंसेन्ट टर्म नुसार, सेवा प्रवेश नियमानुसार पात्र हंगामी सफाई कर्मचारी याना विहीत पध्दतीने करण्यात येणा—या भरती प्रक्रियेत प्राधान्य देण्यात येईल असे नमूद आहे.

१५. त्यावेळेस सार्वत्रिक लोकसभा निवडणूक — २०१९ ची आचारसंहिता सुरू असलेने, नियुक्तीबाबत प्रक्रिया पूर्ण झालेली नाही.

**मा. उच्च न्यालयाच्या आदेशानुसार प्रक्रिया राबविण्यात आली असून वरील ०४ पात्र उमेदवाराना सफाई कामगार या पदावर नियूक्ती करण्यासाठी मा. महासभेच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.**

**महासभा ठराव क्र: २७** दिनांक:— २/१२/२०२१

**सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर**

**अनुमोदकाचे नाव :—श्री. स्वप्नील बागुल**

**ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणेमा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार वरील ०४पात्र उमेदवाराना सफाईकामगार या पदावर नियूक्ती करण्यास मान्यता देत आहे** व लेबर कोर्टाच्या निर्णयानुसार इतर कामगारांसाठी जाहिरात देणे आवश्यक असेल.

**तसेच**

कामगार न्यायालयाच्या निर्णययानुसार उर्वरीत कामगारांसाठी जाहीरातदेऊन भरती करणेचे प्रशासनास निर्देश देत आहे. तसेच भरतीची वायोमयार्दा ४५ वर्षाची असावी.

**या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.**

**सुचकाची सही/—**

**अनुमोदकाची सही/—**

सर्वानुमते

**महापौर / पीठासीन अधिकारी**
**सर्वसाधारण महासभा**
**उल्हासनगर महानगरपालिका**

**<u>महापालिका सचिव :—</u>** विषय क्र. ७ वाचुन दाखवितात

———————————————————————————————————————————

⇨ **विषय क्र. ७ :— श्री. रमेशचंद्र लालसिंग ठाकरे , शाखा अभियंता प्रतिनियुक्तीवर कार्यरत पा.पु. वि. यांच्या स्वत:च्या उपचारासाठी झालेल्या वैदयकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीची रक्कम मंजुर करणेबाबत.**

———————————————————————————————————————————

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-</u>** पास..पास..

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:-</u>** पास..पास..

**<u>उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-</u>** पास पास.

**<u>काही सदस्य :—</u>**पास—पास……

**<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑

**विषय क्र. ७:—** श्री. रमेशचंद्र लालसिंग ठाकरे ,शाखा अभियंता प्रतिनियुक्तीवर कार्यरत पा.पु.वि यांच्या स्वत:च्या उपचारासाठी झालेल्या वैद्यकिय खर्चाच्या प्रतिपुर्तीची रक्कम मंजुर करणेबाबत.

**<u>प्रस्तावना</u>**

श्री. रमेशचंद्र लालसिंग ठाकरे ,शाखा अभियंता,पाणी पुरवठा विभागात प्रतिनियुक्तीवर कार्यरत असुन त्यांना स्वत:च्या तातडीच्या वैद्यकिय उपचारासाठी ज्युपीटर हॉस्पीटल, ठाणे (प.) या खाजगी रुग्णालयात दिनांक १७/१२/२०१९ ते दिनांक ०२/०१/२०२० या कालावधीत दाखल करण्यात आले होते.

श्री. रमेशचंद्र लालसिंग ठाकरे, शाखा अभियंता यांनी दिनांक २/३/२०२० रोजीच्या पत्रान्वये उक्त रुग्णालयातील उपचाराच्या खर्चाच्या प्रतिपुर्तीची रक्कम रु ८,८९,८०८/- मिळण्यासाठी विनंती केली आहे. त्यानुसार महाराष्ट्र शासन निर्णय क्र. एमएजी -२००५/९/प्र.क्र.१/ आरोग्य -३ दिनांक १९ मार्च,२००५ मध्ये अंतर्भुत असलेल्या आकस्तिकता आजार यादीतील अंतभुत आजारापैकी सदर आजार कोणत्या अनुक्रमांक मध्ये मोडतो यासाठी सल्ला घेण्यासाठी मा. जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा मध्यवर्ती रुगणालय, ठाणे यांना दिनांक १९/३/२०२० रोजी पत्र देण्यात आले होते. त्यानुसार त्यांचे दिनांक ०१/३/२०२१ रोजी पत्र प्राप्त झाले असुन सदर अजार आंतररुग्ण उपचाराच्या आजारापैकी परिशिष्ट अ मधील गंभीर आजारापैकी भाग एक - अ.क्र.१ व २ या वर्गवारीत मोडतो असे कळविले आहे.

श्री. रमेशचंद्र लालसिंग ठाकरे, शाखा अभियंता यांचे वैद्यकिय खचार्च्या प्रतिपुर्तीची रक्कम रुपये ८,८९,८०८/- या खर्चाच्या बिलाबाबत व देयकातील औषधाबाबत मा. वैद्यकिय आरोग्य अधिकारी यांच्याकडुन अभिप्राय घेण्यात आले असुन त्यांच्या अभिप्रायानुसार एकुण रक्कमेतुन ३०२०४.१२/-इतकी रक्कम वगळण्यात आली आहे. त्यानुसार त्यांना वैद्यकिय खर्चाच्या प्रतिपुर्तीची रक्कम रुपये ७,५८,८६८/-(सात लाख अठठावण हजार आठशे अडुसष्ट मात्र) शासन निर्णयानुसार अनुज्ञेय ठरते.

शासन निर्णय क्रमांक:वैखप्र-२०१६/प्र.क्र.१६/२०१६/राकवि-२ मंत्रालय,मुंबई-०१दिनांक १६ मार्च २०१६ अन्वये रु. ३,००,०००/- पर्यतच्या खर्चाच्या प्रर्तीपुर्तीस मंजुरीचे अधिकार संबंधित विभागाच्या विभाग प्रमुख म्हणुन मा. आयुक्त सो यांना असुन रुपये ३,००,०००/- वरील वैद्यकिय खर्चाच्या प्रतिपुर्तीच्या मंजुरी देण्याचे अथवा उचित निर्णय घेण्याचे पुर्ण अधिकार संबंधित विभाग प्रमुखांना देण्यात येत आहेत. तसेच मा. आयुक्त यांना वरिष्ठ प्राधिकरण मा. महासभा आहे.

सबब, श्री. रमेशचंद्र लालसिंग ठाकरे, शाखा अभियंता यांना वैद्यकिय प्रतिपुर्तीची रक्कम रुपये ७,५८,८६८/- अदा करण्यासाठी मा. महासभा पटलावर प्रस्ताव मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

**महासभा ठराव क्र: २८** **दिनांक:—** २/१२/२०२१

सुचकाचे नाव :— श्री. कलवंतसिंह सोहता

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्री. रमेशचंद्र लालसिंग ठाकरे,शाखा अभियंता यांना शासन नियमानुसार वैद्यकिय प्रतिपुर्तीची रक्कम रुपये ७,५८,८६८/- अदा करण्यास मान्यता देत आहे.

या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ८ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ८ :— उल्हासनगर महानगरपालिके करीता पात्र् निविदाधारक कंपनीकडून विहीत पध्द्तीद्वारे इलेक्टीक बस सेवा सुरु करणेबाबत.**

---

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** पास पास.

**सदस्य, श्री. जीवन इदनानी:-** उप महापौर साहेब कोण समजावणार आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-** पास..पास..

**सदस्य, श्री. शंकर लुंड:-** विषय पास झाला आहे.

**सदस्य, श्री. जीवन इदनानी:-** असे कसा पास झाला आहे, कोण समजवणार.

**महापालिका सचिव:-** हा विषय पास

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** पास पास. इतिवृत्ताची वाट न पाहता.

**महापालिका सचिव:-** कृपया शांतता राखा. हा विषय पास झाला. इतिवृत्ताची वाट न पाहता.

**महा काही सदस्य :—**पास—पास……

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ८:—**उल्हासनगर महानगरपालिके करीता पात्र् निविदाधारक कंपनीकडून विहीत पध्द्तीद्वारे इलेक्टीक बस सेवा सुरु करणेबाबत.

**प्रस्तावना**

मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम ६६ (२०) अन्वये नमुद आहे की, “शहरात किंवा शहराबाहेरील लोकांची किंवा मालकांची किंवा मालाची ने — आण करण्यासाठी छोटे लोहमार्ग, मोटर परिवहनाच्या सोयी संघटीत करणे व वरील सर्व गोष्टी सुस्थितीत राखणे किंवा त्यांची व्यवस्था पाहणे."याकरिता उल्हासनगर महानगरपालिकेच्या महासभेचा ठराव क्र ३५ दिनांक १३/७/२००७ नुसार व परिवहन ठराव क्र ६ दिनांक २७/२/२००९ च्या निर्णयानुसार मनपाच्या हद्दीत माहे जानेवारी २०१० मध्ये बी.ओ.ओ.टी तत्वावर पी.पी.पी. अंतर्गत ठेकेदार मे.केस्ट्रल इन्फ्रा.प्रा.लि, उल्हासनगर यांचे मार्फत रॉयल्टी बेसीसवर परिवहन सेवा सुरू करण्यात आली होती.

या अनुषंगाने मा. महासभेने ठराव क्र. ७४ दिनांक ११/७/२०१० अन्वये तीन जागा तात्पुरत्या स्वरूपात परिवहनच्या डेपोसाठी १)आरक्षण क्र ५० कैलाश कॉलनी, शिवमंदिर, २) आरक्षण क्र १९३ हॉटेल ॲम्ब्रोसीयाच्या बाजुला, विठ्ठलवाडी स्टेशन, ३) उल्हासनगर (प) उल्हासनगर रेल्वे स्टेशनजवळ या तीन्ही जागा ठेकेदाराला परिवहन सेवेसाठी तात्पुरत्या स्वरूपात वापरण्यास देण्यात आल्या होत्या.सदर परिवहन सेवा एकुण १४ मंजुर मार्गावर सुरू होती. त्यापैकी १० मार्गावर नवीन बस सेवा सुरु करण्याकरीता प्रस्तावित करण्यात येत आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेचे परिवहन सेवेचे मंजूर मार्ग

| अ.क्र | एमएमआरडी समिती ने मंजुर केलेले मार्ग | अंतर कि.मी |
|---|---|---|
| १ | कल्याण रेल्वे स्टेशन ते अंबरनाथ रेल्वे स्टेशश्न व्हाया कॅम्प नं. १,२,३,४,५ आणि परत | १३.७ |
| २ | बदलापुर रेल्वे स्टेशन ते कल्याण रेल्वे स्टेशन आणि परत | १४.४ |
| ३ | शिव मंदिर ते कल्याण रेल्वे स्टेशन व्हाया व्ही.टी.सी, श्रीराम, विठलवाडी, तीसगाव आणि परत | २०.१ |
| ४ | कॅम्प नं. १ ते शिव मंदीर उल्हासनगर ५ | ७.९ |
| ५ | कॅम्प नं. १ ते शिव मंदीर व्हाया कुर्ला कॅम्प | ९.६ |
| ६ | शिव मंदीर ते उल्हासनगर स्टेशन व्हाया गाउन बाजार | २.८ |
| ७ | कल्याण रेल्वे स्टेशन ते अंबरनाथ रेल्वे स्टेशन व्हाया शांतीनगर | ७.५ |
| ८ | शिव मंदीर ते कल्याण रेल्वे स्टेशन व्हाया चोपडा कोर्ट | १०.९ |
| ९ | शिव मंदीर ते उल्हासनगर रेल्वे स्टेशन व्हाया नेताजी चौक | ४.१ |
| १० | शिव मंदीर ते आवतराम चौक व्हाया उल्हासनगर रेल्वे ब्रिज | ६.६ |
| ११ | शिव मंदिर ते शिळफाटा | २२ |
| १२ | कॅम्प् न.१ टिटवाळा | २० |

| | | |
|---|---|---|
| १३ | **कॅम्प् नं. १ भिवंडी** | २० |
| १४ | **शिव मंदिर ते हाजिमलंग रोड** | २१.७ |

प्रस्तुत परिवहन सेवेचा ठेकामे.केस्ट्रल इन्फ्रा.प्रा.लि, उल्हासनगर यांना १० वर्षासाठी प्रति किलो मीटर मागे रु.५५ पैसे दराने रॉयल्टी आकारण्यात येत होती. परंतू ठेकेदारानेसन २०१२ पासून महानगरपालिकेस देय असलेली रॉयल्टी रक्कम तसेच शासनास देय असलेले कर भरलेले नाहीत.तसेच ठेकेदार तिकीट दर वाढीचे कारण दाखवून वारंवार परिवहन सेवा बंद ठेवत असल्यामुळे सदर परिवहन सेवा सन २०१४ मध्ये बंद करुन ठेकेदारास काळया यादीत टाकण्यात आले आहे.

आजमितीला शहराचा विस्तार व नागरीकांची आवक जावकखूप मोठया प्रमाणात वाढलेली आहे. या अनुषंगाने उल्हासनगर महानगरपालिकेने स्वःताच्या मालकीच्या १० बस घेण्याचा प्रस्ताव मा. परिवहन समिती ठराव क्र. ८ दि.१४/१२/२०१५ व मा.महासभा ठराव क्र ७२ दि.१९/३/२०१६ मान्य करण्यात आली आहे. महानगरपालिका परिवहन उपक्रम पुन्हा सुरू करण्याकरिता सातत्यान ई निविदा मागविण्यात आल्या होत्या तथापी निविदेस योग्य प्रतिसाद न मिळाल्यामुळे सदर ई निविदा प्रक्रिया रद्द करण्यात आलेली आहे.

या अनुषंगाने सद्या महाराष्ट्र शासन निर्णय क्र मइवाधो-२०२१/प्र.क्रं.२५/तां.क्रं. ४ अन्वये "महाराष्ट्र इलेक्ट्रीकल वाहन धोरण २०२१" शासन निर्णयाच्या दिनांकापासून ते दिनांक ३१ मार्च, २०२५ पर्यंत राज्यामध्ये राबविण्यास शासन मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र इलेक्ट्रीक वाहन धोरण, २०२१ हे राज्यात विक्री व नोंदणी झालेल्या फक्त बॅटरी द्वारे संचलित इलेक्ट्रिक वाहनांना लागू असुन पर्यावरणाच्या दृष्टीकोनातून शासनानेइलेक्ट्रीक बस खरेदी करण्या करीता काही टक्केवारी मध्ये अनुदान घोषित केलेले आहे.इलेक्ट्रीक बस खरेदीसाठीचे अनुदान थेट बस पुरवठादार यांना प्राप्त् होणार आहे.

सबब उल्हासनगर महानगरपालिकेने पर्यावरणाच्या संवर्धनाच्या दृष्टीकोनातुन पर्यावरण विभागामार्फत इलेक्ट्रीकल / सी.एन.जी. बस खरेदी करणेच्या प्रयोजनार्थ ५ कोटींची तरतुद मा. आयुक्त सो यांनी सुचविलेली आहे.यास्तव उल्हासनगर शहराकरीता इलेक्ट्रीक व सी.एन.जी बस खरेदी करणेकरीता में अशोक लेलॅड, मे.टाटा मोटर्स व में इसुझु कंपनी यांचेकडून इलेक्ट्रीकल व सी.एन.जी.बस खरेदी करणेकरीता सादरीकरण मा. आयुक्त् यांच्या समोर केले होते.प्रस्तुत सादरीकरणाचा तुलनात्मक तपशिल प्रपत्र अ मध्ये स्वतत्र् रित्या दर्शविण्यात आला आहे.सादरीकरणानुसार बसेसच्या किमंतीचा अंदाजित तपशिल पुढील प्रमाणे आहे.

| | **Seating Capacity** | **इलेक्ट्रीकल बस** | **सी.एन.जी. बस** |
|---|---|---|---|
| ८६TATA MOTORS BUS | **31+ D** | १.२६ Crore (Ex Showroom) | ३२-३५ Lakh (Ex Showroom) |
| ASHOK LEYLAND BUS | **31+ D** | १.७० Crore | AC- Rs. ४३,२५,००० & Non AC Rs. ३५,७५,००० |
| SML ISUZU CNG BUS | **33+1** | NO | AC Rs २९,८४,२२८, & Non AC Rs. २६,६४,८७६ |

उपरोक्त् तक्त्यातील अंदाजित दर पहाता मनपाला स्वतःची बस खरेदी करायची झाल्यास सी.एन.जी. चा पर्याय उचित वाटतो.मनपाने स्वताच्या मालकीच्या ASHOK LEYLAND कंपनीच्या १६ सी.एन.जी. (नॉन एसी) बस खरेदी केल्यास अंदाजे रु ५,७२,००,०००/- एवढा खर्च अपेक्षीत आहे.

सदरच्या बस हया महापालिकेच्या परिवहन सेवा मान्यता प्राप्त खालील मंजुर १० मार्गावर चालविण्याचे अपेक्षित आहे.अन्य् मनपा परिवहनचे सध्याचे दर विचारात घेता अंदाजित उत्पन्न् खालील प्रमाणे प्राप्त् होऊ शकेल.

| अ. क्र. | मार्गाचे नाव | १ फेरी अंतर किमी | बस संख्या | एका बस ची फेऱ्या | ०२ बसच्या एकुण फेऱ्या | एका बसचे कि.मी | ०२ बसचे एकुण कि.मी | प्रवासी भाडे दर रु | अपेक्षीत प्रति किंमी उत्पन्न | मार्गवाईज दैनंदिन एकुण प्राप्त उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | 9 | 10 | (8x 10)=11 |
| 1 | कल्याण रेल्वे स्टेशन ते अंबरनाथ रेल्वे स्टेशन व्हाया कॅम्प नं. १,२,३,४,५ आणि परत | 13.7 | 2 | 12 | 24 | 164.4 | 328.8 | 20.0 | 47 | 15453.60 |
| 2 | बदलापुर रेल्वे स्टेशन ते कल्याण रेल्वे स्टेशन आणि परत | 14.4 | 2 | 12 | 24 | 172.8 | 345.6 | 20.0 | 44 | 15206.40 |
| 3 | शिव मंदिर ते कल्याण रेल्वे स्टेशन व्हाया व्ही.टी.सी,श्रीराम,विठलवाडी तीसगाव आणि परत | 20.1 | 2 | 12 | 24 | 241.2 | 482.4 | 25.0 | 40 | 19296.00 |
| 4 | कॅम्प नं. १ ते शिव मंदीर उल्हासनगर ५ | 7.9 | 2 | 16 | 32 | 126.4 | 252.8 | 15.0 | 60 | 15168.00 |
| 5 | कॅम्प नं. १ ते शिव मंदीर व्हाया कुर्ला कॅम्प | 9.6 | 1 | 14 | 14 | 134.4 | 134.4 | 15.0 | 50 | 6720.00 |
| 6 | शिव मंदीर ते उल्हासनगर स्टेशन व्हाया गाउन बाजार | 2.8 | 1 | 40 | 40 | 112 | 112 | 10.0 | 114 | 12768.00 |
| 7 | कल्याण रेल्वे स्टेशन ते अंबरनाथ रेल्वे स्टेशन व्हाया शांतीनगर | 7.5 | 2 | 30 | 60 | 225 | 450 | 10.0 | 42 | 18900.00 |
| 8 | शिव मंदीर ते कल्याण रेल्वे स्टेशन व्हाया चोपडा कोर्ट | 10.9 | 1 | 12 | 12 | 130.8 | 130.8 | 15.0 | 44 | 5755.20 |
| 9 | शिव मंदीर ते उल्हासनगर रेल्वे स्टेशन व्हाया नेताजी चौक | 4.1 | 1 | 40 | 40 | 164 | 164 | 10.0 | 78 | 12792.00 |
| 10 | शिव मंदीर ते आवतराम चौक व्हाया उल्हासनगर रेल्वे ब्रिज | 6.6 | 2 | 30 | 60 | 198 | 396 | 10.0 | 48 | 19008.00 |
| | | **Total** | **16** | **218** | **330** | **1669** | **2797** | | | 141067.20 |

उपरोक्त् दर हे कल्याण डोंबिवली परिवहन यांचे सन २०१६ चे दर घेतले आहेत.सोबत प्रप्त्र् ब जोडले आहे. यामध्ये फक्त् बैठक व्यवस्था प्रवाशी तिकीट उत्पन्न् अपेक्षित धरलेले आहे. प्रवसी क्षमतेच्या २०% प्रवासी उभे राहुन प्रवास करु शकतात त्यापासुन प्राप्त् होणारे उत्पन्न् अपेक्षित उत्पन्नात गृहीत धरल्यास मनपावर अतिरिक्त् भार येण्याची शक्यता वाटत नाही.अंदाजे रु.१,४१,०६७ प्रति दिन उत्पन्न् गृहीत धरल्यास) रु.१,४१,०६७ X३० = रु.४२,३२,०१०/- प्रति महा उत्पन्न्आणि रु. ३७,११,०००X १२ =रु.५,०७,८४,१२०/- वार्षिक उत्पन्न् मनपाला मिळणे अपेक्षित आहे.

सदर उपक्रमास बस सेवासुरु असताना मनपाचा लोगो, वाहनाचा आरटीओ नंबर. इत्यादि बाबीचा काही भाग वगळून पुर्णबसचे आतील व बाहेरील जाहिरातीचे उत्पन्न् प्रति चौरस फुटाला रु.१५/- इतकी आकारणी केल्यास जाहिरातीचे अंदाजित उत्पन्न् प्रति बस प्रति महिना रु. ५,०००/- तसेच १६ बसचे १६X५०००X १२ महिने = रु.९,६०,०००/- इतके वार्षीक उत्पन्न् मनपाला मिळणे अपेक्षित आहे.

उक्त सर्व् वस्तुस्थिती पाहता मनपाला १६ बसमध्ये प्रवासी व जाहिराती द्वारे मनपाला अंदाजे एकुण रु.५,०७,८४,१२० + ९,६०,००० = रु.५,१७,४४,१२०/- इतके अंदाजित उत्पन्न् मिळणेची अपेक्षित आहे.

बस उपक्रमात सदरच्या १६बससाठीकंडक्टर व तिकीट तपासणीस (टी.सी) सदर कंडक्टर व तिकीट चेकर यांना २४ फेब्रुवारी २०१५ नुसार मुळ वेतन मंजुर करण्यात आलेले आहे.तसेच कामगार आयुक्त् यांचे कार्यालयाकडून पत्र् क्र. ग्रा.वि/कि.वे.अ/वि.भ/२०२०-१/कार्या -१०/९२० किमान वेतन अधिनियम १९४८ अंतर्गत विशेष भत्त्याची रक्कम् रु.५,७०५/- मात्र दि. ०५/२/२०२१ नुसार जाहिर केल्यानुसार

Minimum wages Act च्या दरानुसार पगार प्रति महिना अंदाजे रु. २६,०००/- देय आहे. सदर १६ बस वर कमीत कमी ३८कंडक्टर व ७ टिकीट तपासणीस (टी.सी) यांच्या खर्च अंदाजे ४५ X २६०००= रु.११,७०,०००/-एवढा प्रति महिना खर्च,रु.११,७०,०००X १२ = १,४०,४०,०००/- एवढा प्रति वर्ष् खर्च तसेच इंधन,सुरक्षा,लाईट व पाणी बीलवरील वार्षिक भार मनपाला अपेक्षित आहे.

सबब या अनुषंगाने ई निविदा प्रक्रिया करत असतानाNirvana LTD या कंपनीचे संचालक श्री. मनोज मोटवानी यांचेशी संपर्क झाला असता,त्यांनी इलेक्ट्रीकल बसेस पुरविण्यास सहमती दर्श् विली या अनुषंगाने Nirvana( FINVEST SERVICES PVT) या कंपनीमार्फत बस सेवा शहरात सुरु करणे करीता मा. उप आयुक्त (वाहन) व वाहन व्यवस्थापक यांनी श्री मनोज मोटवानी यांचे समवेत प्रत्यक्ष भेट घेवून माहिती घेतली तद्‌नंतर मा.आयुक्त यांचे समवेत व्हिडीओ कॉन्फ्रान्सद्वारे बस सेवा संदर्भात त्यांचेशी बैठक आयोजित केली.बैठकीत मा. आयुक्त यांनी त्यांचा प्रस्ताव् मनपास देण्याबाबत सुचित केले होते.त्याचे स्पेसिफीकेशनई मेल द्वारे वाहन विभागात प्राप्त् झाले आहे.कंपनीच्या प्राप्त् प्रस्तावातील ठळकबाबी खालीलप्रमाणे आहेत.

**Gross Cost Contracts (GCC) Business ModelScope of Ashok Leyland**

- **Deployment of buses and charger**
- **१० to १२ years contract**
- **Charger with installation & Maintenance**
- **Driver training and Technical training**
- **Charging Infrastructure**
- **Battery Replacement**
- **Operations & Maintenance**
- **Cost of Driver**
- **Registration, Road tax & Insurance**
- **Cost of Charging of eBuses (Tender specific)**

**Scope of Authority**

- **Upstream infrastructure including ११KVA bulk power lines and sub-stations till transformer**
- **Developed Depot facilities for use by EV Operator**
- **Ticketing & Revenue collection**

**Scope of Ashok Leyland**

- **Deployment of buses & Chargers with OEM warranty**
- **Maintenance throughout the contract period**
- **Technical support on Charging infrastructure**
- **Driver training and Technical training**
- **Charging Infrastructure (Optional to be included in quote)**
- **Battery Replacement (Optional to be included in quote)**

**Scope of Authority**

- **Upstream infrastructure including ११KVA bulk power lines and sub-stations till transformer**
- **Developed Depot facilities for use by EV Operator**
- **Ticketing & Revenue collection**
- **Cost of Charging of eBuses**
- **Operations & Charging Infrastructure**
- **Cost of Driver**
- **Registration, Road tax & Insurance**

उपरोक्त् तपशिलानुसार ९.४ मिटरच्या १० बस व १२ मिटरच्या १० बस विद्युत चार्जिंग पॉईंट, वाहनचालक, आणि देखभाल दुरूस्तीच्या खर्चासह Nirvana( FINVEST SERVICES PVT) या कंपनीमार्फत उपलब्ध करून देणेस तयार आहेत.परंतु सदर कंपनीने बसेसवर मनपाने स्वतःचे कन्डक्टर उपलब्ध करून दयावे तसेच तिकीट दर वसुली मनपाने करावी असे प्रस्तावात नमुद केलेले आहे. बस थाब्यांसाठी चार्जीग स्टेशनसाठी आणि बस डेपोसाठी जागा ही महापालिकेने निशुल्क उपलब्ध करुनदेण्याची मागणी केलेली आहे.

या अनुषंगाने करारनाम्याच्या मुदती विचारात घेता Nirvana LTD या कंपनीने प्रति दिवस प्रति किमी रू.४९ ते रु.८० या दरामध्येजे अनुज्ञेय ठरेल ते महापालिकेने Nirvana LTD यांना दयायचे आहे.उक्त दर सेवेचा कालावधी विचारात घेऊन निश्चित होणार आहे. सदर बस ही प्रति दिवस कमीत कमी १५० किमी चालणे आवश्यक आहे.भाडे प्रति दिन प्रति बस १५० किमी अथवा प्रत्यक्ष झालेले किमी या पैकी जे जास्त् असेल ते अनुज्ञेय रहाणार आहे.

सदरच्या बस हया महापालिकेच्या परिवहन सेवा मान्यता प्राप्त खालील मंजुर १० मार्गावर चालविण्याचे प्रस्तावित आहे.

अ ) ४० सीटर बस करीता दैनदिन उत्पन्नाचा तपशील

| अ. क्र. | मार्गाचे नाव | १ फेरी अंतर किमी | बस संख्या | एका बसची फेऱ्या | एकूण प्रवासी संख्या | २०% वाढीव प्रवासी संख्या | ०१ बसचे एकुण कि.मी | प्रवासी भाडे दर रु | अपेक्षीत प्रति किंमी उत्तपन्न | मार्गवाईज दैनंदिन एकुण प्राप्त उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | 9 | 10 | (8x 10)=11 |
| 1 | **कल्याण रेल्वे स्टेशन ते अंबरनाथ रेल्वे स्टेशश्न व्हाया कॅम्प नं. १,२,३,४,५ आणि परत** | १३.७ | १ | १२ | ४० | ८ | १६४.४ | २०.० | ७० | ११५०८ |
| 2 | **बदलापुर रेल्वे स्टेशन ते कल्याण रेल्वे स्टेशन आणि परत** | १४.४ | १ | १२ | ४० | ८ | १७२.८ | २०.० | ६७ | ११५७७.६ |
| 3 | **शिव मंदिर ते कल्याण रेल्वे स्टेशन व्हाया व्ही.टी.सी,श्रीराम,विठलवाडी तीसगाव आणि परत** | २०.१ | १ | १२ | ४० | ८ | २४१.२ | २५.० | ६० | १४४७२ |
| 4 | **कॅम्प नं. १ ते शिव मंदीर उल्हासनगर ५** | ७.९ | १ | १६ | ४० | ८ | १२६.४ | १५.० | ९१ | ११५०२.४ |
| 5 | **कॅम्प नं. १ ते शिव मंदीर व्हाया कुर्ला कॅम्प** | ९.६ | १ | १४ | ४० | ८ | १३४.४ | १५.० | ७५ | १००८० |
| 6 | **शिव मंदीर ते उल्हासनगर स्टेशन व्हाया गाउन बाजार** | २.८ | १ | ४० | ४० | ८ | ११२ | १०.० | १७१ | १९१५२ |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | कल्याण रेल्वे स्टेशन ते अंबरनाथ रेल्वे स्टेशन व्हाया शांतीनगर | ७.५ | १ | ३० | ४० | ८ | २२५ | १०.० | ६४ | १४४०० |
| 8 | शिव मंदीर ते कल्याण रेल्वे स्टेशन व्हाया चोपडा कोर्ट | १०.९ | १ | १२ | ४० | ८ | १३०.८ | १५.० | ६६ | ८६३२.८ |
| 9 | शिव मंदीर ते उल्हासनगर रेल्वे स्टेशन व्हाया नेताजी चौक | ४.१ | १ | ४० | ४० | ८ | १६४ | १०.० | ११७ | १९१८८ |
| 10 | शिव मंदीर ते आवतराम चौक व्हाया उल्हासनगर रेल्वे ब्रिज | ६.६ | १ | ३० | ४० | ८ | १९८ | १०.० | ७३ | १४४५४ |
| | | Total | १० | २१८ | ४०० | | १६६९.० | | ८५४ | १३४९६६.८० |

## ब) ३० सीटर बस करीता दैनदिन उत्पन्नाचा तपशील

| अ. क्र. | मार्गाचे नाव | १ फेरी अंतर किमी | बस संख्या | एका बसची फेऱ्या | एकूण प्रवासी संख्या | २०% वाढीव प्रवासी | ०१ बसचे एकुण | प्रवासी भाडे | अपेक्षीत प्रति किंमी उत्तपन्न | मार्गवाईज दैनंदिन एकुण प्राप्त उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | (8x 10)=11 |
| १ | कल्याण रेल्वे स्टेशन ते अंबरनाथ रेल्वे स्टेश्शन व्हाया कॅम्प नं. १,२,३,४,५ आणि परत | १३.७ | १ | १२ | ३० | ६ | १६४.४ | २०.० | ५२ | ८५४८.८ |
| २ | बदलापुर रेल्वे स्टेशन ते कल्याण रेल्वे स्टेशन आणि परत | १४.४ | १ | १२ | ३० | ६ | १७२.८ | २०.० | ५० | ८६४० |
| ३ | शिव मंदिर ते कल्याण रेल्वे स्टेशन व्हाया व्ही.टी.सी,श्रीराम,विठलवाडी तीसगाव आणि परत | २०.१ | १ | १२ | ३० | ६ | २४१.२ | २५.० | ४५ | १०८५४ |
| ४ | कॅम्प नं. १ ते शिव मंदीर उल्हासनगर ५ | ७.९ | १ | १६ | ३० | ६ | १२६.४ | १५.० | ६८ | ८५९५.२ |
| ५ | कॅम्प नं. १ ते शिव मंदीर व्हाया कुर्ला कॅम्प | ९.६ | १ | १४ | ३० | ६ | १३४.४ | १५.० | ५६ | ७५२६.४ |
| ६ | शिव मंदीर ते उल्हासनगर स्टेशन व्हाया गाउन बाजार | २.८ | १ | ४० | ३० | ६ | ११२ | १०.० | १२८ | १४३३६ |
| ७ | कल्याण रेल्वे स्टेशन ते अंबरनाथ रेल्वे स्टेशन व्हाया शांतीनगर | ७.५ | १ | ३० | ३० | ६ | २२५ | १०.० | ४८ | १०८०० |
| ८ | शिव मंदीर ते कल्याण रेल्वे स्टेशन व्हाया चोपडा कोर्ट | १०.९ | १ | १२ | ३० | ६ | १३०.८ | १५.० | ५० | ६५४० |
| ९ | शिव मंदीर ते उल्हासनगर रेल्वे स्टेशन व्हाया नेताजी चौक | ४.१ | १ | ४० | ३० | ६ | १६४ | १०.० | ८८ | १४४३२ |
| १० | शिव मंदीर ते आवतराम चौक व्हाया उल्हासनगर रेल्वे ब्रिज | ६.६ | १ | ३० | ३० | ६ | १९८ | १०.० | ५४ | १०६९२ |
| | | Total | १० | २१८ | ३०० | ६० | १६६९.० | | ६३९ | १००९६४.४० |

**बसची प्रवासी आसन क्षमता X बस मार्गचे पुर्ण भाडे**

**अपेक्षित प्रति किमी उत्पन्न्** = ----------------------------------------------------------

**मार्गाचे एकुण फेरी अंतर**

उपरोक्त् सुत्रानुसार वरील तक्तावरुन प्रतिदिन अपेक्षित प्रति किमी उत्पन्न् काढण्यात आले आहे.सदरचे दर कल्याण डोबिंवली परिवहन यांचे सन २०१६ या वर्षासाठीचे घेतले आहे. यात सिटींग व्यवस्था प्रवासी तिकीट उत्पन्न् तसेच सिटींग प्रवासी क्षमतेच्या २०% प्रवासी उभे राहुन प्रवास करु शकतात त्यापासुन प्राप्त् होणारे उत्पन्न् अपेक्षित उत्पन्नात गृहीत धरुन वरील तक्ता (अ व ब ) तयार करण्यात आला आहे

'अ' तक्ता ४० सीटर बस साठी अंदाजे रु.१,३४,९६६ /- प्रति दिन उत्पन्न् गृहीत धरल्यास रु.१,३४,९६६ X३० = ४०,४८,९८०/- प्रति महा आणि उत्पन्न्रु. ४०,४८,९८०X १२ =रु.४,८५,८७,७६०/- प्रति वर्ष उत्पन्न् मनपाला मिळणे अपेक्षित आहे.

'ब' तक्ता ३२ सीटर बस साठी अंदाजे रु.१,००,९६४/- प्रति दिन उत्पन्न् गृहीत धरल्यासरु.१,००,९६४X३० = ३०,२८,९२०/- प्रति महा उत्पन्न्आणि रु. ३०,२८,९२०X १२ =रु.३,६३,४७,०४०/- प्रति वर्ष उत्पन्न् मनपाला मिळणेअपेक्षित आहे.

तक्ता अ व ब मिळून ४,८५,८७,७६० + ३,६३,४७,०४० = रु ८,४९,३४,८००/- प्रति वर्ष उत्पन्न् मनपाला मिळणेअपेक्षित आहे.

सदर उपक्रमास बस सेवासुरु असताना मनपाचा लोगो, वाहनाचा आरटीओ नंबर.इत्यादि बाबीचा काही भाग वगळून पुर्णबसचे आतील व बाहेरील जाहिरातीचे उत्पन्न् प्रति चौरस फुटाला रु.१५/- दर मनपाकडून आकारण्यात येईल. एका बसचे दोन्ही बाजु, आतील काही भाग व बसची मागील बाजुची जाहिरातीचे उत्पन्न् अंदाजे प्रति बस प्रति महिना रु. ५,०००/- तसेच २० बसचे २०X५०००X १२ महिने = रु.१२,००,०००/- एवढ वार्षीक उत्पन्न् मनपाला मिळणेअपेक्षित आहे.

उक्त बाब पाहता मनपाला २० बसमध्ये प्रवासी व जाहिराती द्वारे मनपाला अंदाजे एकुण रु.८,४९,३४,८०० + १२,००,००० = रु.८,६१,३४,८००/- एवढे अंदाजे वार्षिक उत्पन्न् मिळण्याची अपेक्षा आहे.

या उपक्रमात सदरच्या २० बसवर कंडक्टर व तिकीट तपासणीस (टी.सी) मनपाकडुन नियुक्त करायचे आहेत. सदर कंडक्टर व तिकीट तपासणीसयांना २४ फेब्रुवारी २०१५ नुसार मुळ वेतन मंजुर करण्यात आलेले आहे. तसेच कामगार आयुक्त् यांचे कार्यालयाकडून क्र. ग्रा.वि/कि.वे.अ/वि.भ/२०२०-१/कार्या - १०/९२० किमान वेतन अधिनियम १९४८ अंतर्गत विशेष भत्तयाची रक्कम् रु.५,७०५/- मात्र दि. ०५/२/२०२१ नुसार जाहिर केल्यानुसार Minimum wages Act च्या दरानुसार पगार प्रति महिना अंदाजे रु. २६,०००/- देय आहे. सदर २० बस वर कमीत कमी ४७कंडक्टर व ७तिकीटतपासणीस (टी.सी) वर खर्च अंदाजे ५४ X २६०००= रु. १४,०४,०००/-एवढा प्रति महिना खर्च् आणिरु.१४,०४,००० X १२ = १,६८,४८,०००/- एवढा खर्च वार्षीक भार मनपाला उचलावा लागेल असे अपेक्षित आहे.

उपरोक्त् सर्व वस्तुस्थिती पाहता मनपाला कोणतीही भांडवली गुंतवणुक न करता मनपा क्षेत्रात बस सेवा सुरु करता येणार आहे.तसेच केंद्र् व राज्य् शासनाचे ई बसेस चालवीण्याच्या निर्देशाचे ही पालन करणे शक्य् होणार आहे. सबब " निर्वाणा" या संस्थेमार्फत एकुण लहान मोठया २० बसेसची सेवा उपलब्ध् करुन घेतल्यास खालील प्रमाणे मनपाला दर महा भार उचलणे आवश्यक् रहाणार आहे. (रु. ४९ /- दर कीमी दर गृहीत धरल्यास) २०X१५०X४९X३० =रु. ४४,१०,०००/- प्रति महा खर्च अंदाजे रु. ५,२९,२०,०००/-एवढा रक्कम प्रति वर्ष् इतके अंदाजे अनुज्ञेय ठरवतील. असे अपेक्षित आहे.

उक्त बाब पाहता मनपाला २० बसमध्ये ४७कंडक्टर व ७तिकीटतपासणीस (टी.सी) यांच्यावर अंदाजे एकुण रु.१,६८,४८,००० + ५,२९,२०,००० = रु.६,९७,६८,०००/- एवढा वार्षिक खर्च् होण्याची शक्यता आहे.

बस सेवाकरीता मनपाला मिळणारे उत्पन्न् व खर्च यांचा ताळमेळ केला असता.या सेवेतुन मनपाला अंदाजे वार्षीक १.६३ कोटी फायदा होण्याची अपेक्षा आहे.

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात बससेवा बंद असुन, लोकांना सार्वजनिक वाहतुक व्यवस्था उपलब्ध् करुन देण्याबाबत पर्यावरण संरक्षण व हित संवर्धनासाठी केंद्र आणि राज्य् शासन आग्रही आहे. याकरीता मनपास अनुदानही दिले जात आहे.लोक कल्याणकारी योजना राबविणे हे स्थानिक स्वराज्य् संस्थाचे मुख्य् कर्तव्य् आहे.स्थानिक स्वराज्य् संस्था व्यापारी संस्था नसल्याने अशा कल्याणकारी योजना राबविताना सर्वच ठिकाणी नफा क्षमता गृहीत धरता येत नाही.

उपलब्ध् होणाऱ्या सुविधेमुळे जनसामान्यांना त्याची खुप उपयुक्तता ठरेल असे अपेक्षित आहे.तसेच लोकांना आर्थिक दुष्टया लाभदायक ठरणार आहे. लोकांच्या वेळेची बचत होवून प्रवासात सुकरता येणार आहे.सार्वजनिक बस व्यवस्था आल्यास स्वंतत्र् खाजगी वाहनांचा वापर कमी होवून रस्ते वाहतुकीवरील तनाव कमी होण्याची शक्यता आहे. सर्वसामान्य् जनतेकडून प्रवासी भाडे जास्त् वसुल करण्यात येते तथापी मनपाकडून बस सेवा सुरु झाल्यावर भाडयाचे दर परवडणारे असल्याने सामान्य् लोक या सेवाचा वापर जास्त् प्रमाणात करतील यामुळे रस्त्यावरील वाहतुकीवरील ताण कमी होण्यास मदत होईल परिणामी देशाच्या इंधनाची व परिणामी आर्थिक बचत होणेही अपेक्षित आहे. तसेच बस सेवा विद्युत असल्याने हवा व पर्यावरणाचा ऱ्हास होणार नसुन त्याची शुध्द्ता उत्तम् रहाण्यास मदत होईल.मनपाचे कोणत्याही आर्थिक कायमस्वरुपी मोठया गुंतवणूकी शिवाय प्रस्तुत प्रकल्प् उभारला जाणार आहे. संपुर्ण ईलेक्ट्रीक बससह परिवहन सुविधा मनपाकडुन दिली जाणार आहे हे गौरवस्पद् ठरणार आहे.

सबब मनपा मार्फत विहित कार्यपध्दती द्वारे पात्र् निविदाकार यांच्या मार्फत इलेक्ट्रीक बस सेवा सुरु करण्यासाठीची कार्यवाही करण्यासाठी सदर प्रस्तावास मा.महासभेची मान्यता देण्याची विनंती करण्यात येत आहे.

<u>**महासभा ठराव क्र:२९**</u> <u>**दिनांक:—**</u>२/१२/२०२१

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी, श्री. राजेश वदारिया

अनुमोदकाचे नाव :— श्री.कलवंतसिंह सोहता, श्री. रमेश चव्हाण

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेकरीता पात्र् निविदाधारक कंपनीकडून विहीत पध्द्तीद्वारे इलेक्ट्रीक बस सेवा सुरु करणेस मान्यता देत आहे.

या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>**सर्वानुमते**</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>**महापालिका सचिव :—**</u> विषय क्र. ९ वाचुन दाखवितात

————————————————————————————————————————————

⇨ **विषय क्र. ९ :— वाहतुक समस्यांचे निवारण करणेसाठी उल्हासनगर महानगरपालिकेचे रस्तांवर पे ॲन्ड पार्क पॉलिसी राबविण्यास मान्यता मिळणेबाबत.**

---

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** इतिवृत्ताची वाट न पहाता पास..पास..

**सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-** रिजेक्ट,रिजेक्ट.

**सदस्य, राजेश वदारिया:-** पास..पास..

**सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-** रिजेक्ट,रिजेक्ट.

**महापालिका सचिव:-** कृपया सदस्यांनी एक ऐकाने बोलावे, शांतता राखावी.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** अशा प्रकारे सभा चालेल का?

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-** मा. महापौरजी, जो पर्यंत विषय समजायला येत नाही, तो पर्यंत तुम्ही पास का म्हणतात.

**सदस्य, श्री. जीवन इदनानी:-** हा घोटाळा काय आहे, ते तर सांगा.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-** जवळच्या लोकांना समजावा ना जमनुजी.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** ९ वा विषय चालू आहे.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-** विषय रिजेक्ट करायला पाहीजे.

**सदस्य, श्री. जीवन इदनानी:-** ८ नंबरचा विषय चालू आहे ना.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-** विष्य क्र.९ रिजेक्ट करायचा आहे.

**सदस्य, श्री. जीवन इदनानी:-** ८ नंबरचा विषय काय आहे? तो तर समजावा.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-** विषय क्र. ८वा पुर्ण झाला आहे. ९ वा विषय रिजेक्ट करायचा आहे.

**सदस्य, श्री. जीवन इदनानी:-** परंतु ८ नंबरचा काय आहे?

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-** ९ वा रिजेक्ट १० नंबरचा घ्या.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** ९ वा पास..पास..

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** ९ वा पास..पास..

**सदस्य, श्री. जीवन इदनानी:-** घोटाळा काय आहे?

**सदस्य, श्री. अरुण आशान:-** मा. महापौर, मा. उप महापौर, मा. आयुक्त साहेब,

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-** संपुर्ण शहरामध्ये पार्किंग आहे.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** २५ विषय आहेत.

**सदस्य, श्री. अरुण आशान:-** उप महापौर साहेब, ऐकुन घ्या.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** असे पास हो? होऊ शकत नाही.

**सदस्य, श्री. जीवन इदनानी:-** समजवा तरी विषय काय आहे?

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-** विषय क्र. कोणता आहे? कोणी सांगणार आहे का?

**सदस्य, श्री. शंकर लुंड:-** ९ नंबरचा विषय आहे.

**सदस्य, श्री. जीवन इदनानी:-** हा घोटाळा काय आहे?

**सदस्य, श्री. अरुण आशान:-** मा. महापौरजी, मा. उप महापौर,मा. आयुक्त साहेब, हा जो क्र. ९ नंबरचा विषय आहे, या विषया संदर्भात मी आयुक्त साहेबांना सांगू इच्छितो की, आपण हे जे धोरण आणलेले आहे.परंतु या विषयावर चर्चा होणे आवश्यक आहे, आपण प्रशासनाच्या मार्फत आणलेले काही धोरण निश्चितच या शहरासाठी, शिस्तीसाठी योग्य आहे. परंतु या १३ किलो मिटरचे शहर बघता, आपण या संपुर्ण शहरामध्ये ज्या ज्या ठिकाणी रस्ते कुठे मोठे कुठे छोटे थोडेफार दिसतात. त्या सगळयाच रस्त्यांवर आपण पे अॅन्ड पार्क केल्या नंतर आज आपण या शहराची परिसिमा बघता, हे संपुर्ण पे अॅन्ड पार्कसाठी मला वाटते उचित नाही. उप आयुक्त साहेबांनी या बाबत खुलासा करावा की, हे धोरण या शहरामध्ये आणण्याच्या अगोदर आपल्या शहराची परिस्थिती अजून पर्यंत सर बिकट आहे. काही रस्ते अजून एम.एम.आर.डि.ए. कडून मंजुर झालेले आहेत. काही प्रस्तावीत आहेत, त्याचे टेंडर होणे आवश्यक आहे. मोठया मोठया रस्त्यांमध्ये आता मघाशी चर्चा केल्या नंतर आता एक रस्त्यांची रुंदीकरण करणे आम्हांला बाधा येते. अशा प्रकारे उत्पन्नाचे साधन म्हणून जर आपण पे अॅन्ड पार्किंगचे आणले असेल. परंतु या विषयावर सरसकटपणे प्रभाग समितीमध्ये आपण जे एक, दोन, तीन मध्ये प्रस्तावीत केले आहे. यामध्ये कुठे ना कुठे अडचण आहे. आपण जे दर आकारले आहेत, हा नंतरचा विषय आहे. दर आकारणीचा परंतु मुळातच पार्किंगची समस्या असतांना आपण जवळ जवळ प्रभाग समितीमध्ये १५, प्रभाग समिती क्र.२ मध्ये १४, प्रभाग समिती क्र.३ मध्ये २२ आणि प्रभाग समिती क्र. ४ मध्ये २३ रस्ते प्रस्तावीत केले आहेत. मला वाटते नाईकवाडे साहेब हे सगळेच रस्ते जवळ जवळ उल्हासनगरच्या शहरामध्ये महत्वाच्या रस्त्यांमध्ये...

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-** सन्माननिय महापौरजी, या विषयाला रिजेक्ट करा, कारण की, या विषयावर दंड वसुली करण्यासाठी आपण पहिले ठराव केला आहे. ज्या गाडया रोडमध्ये उभ्या असतात. आपण ते इम्पलीमेंट केले आहे का? जरा सांगा. याच्या पहिले ठराव झाला आहे, त्याचे इम्पलीमेंशन झाले आहे का?

**सदस्या, श्रीम. मिना सोनेजी:-** जरा शांत रहा काय आहे, काहीच समजायला येत नाही. तुमच्या लोकांची सगळयांची सेटींग चालू आहे का?

**उप आयुक्त, मुख्यालय, श्री. अशोक नाईकवाडे:-** मा. महापौर, उप महापौर, आयुक्त साहेब, सन्माननिय सदस्य, मा. सभागहाच्या मी निदर्शनास आणू इच्छितो की,..

**सदस्य, श्री. जीवन इदनानी:-** महापौर मॅडम ५ नंबरमध्ये जीवन इदनानी, दिप्ती दुधानी आणि ज्योती चैनानीचा विरोध आहे.

**उप आयुक्त, मुख्यालय, श्री. अशोक नाईकवाडे:-** मा. सभागहाच्या मी निदर्शनास आणू इच्छितो की आपण हे जे प्रस्ताव आणलेले आहेत, आपल्या मनपाच्या महसुली उत्पन्न वाढीचा विचार घेऊन आपल्या महानगरपालिकेस...

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** अरुण आशान, आपणच उत्तर मागतात आणि आपणच बडबड करतात.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:-** सगळयांनी जागेवर बसून घ्या.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-** मा. महापौरजी, मी बोलू का? ९ नंबर विषयावर. बोलू का?

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-** डिफर करा.

**सदस्य, श्री. कलवंतसिंग सोहता:-** डिफर, डिफर.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-** सन २०१७ मध्ये पण होता परत परत आणण्याची गरज काय आहे?

या वेळी काही सदस्य एकत्रित बोलत असल्यामुळे कोण काय बोलत होते ते स्पष्ट समजून आले नाही.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:-** सगळयांनी जागेवर बसा.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-** या लोकांना काहीच माहीती नाही आहे.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-** मला माहीती आहे, तुम्ही मला सांगू नका.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:-** आता बस झाले.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-** संपुर्ण शहराला माहीती आहे, तुम्ही काय करतात ते?

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-** डॉक्टर पर्सनल एक मिनीटात सांगून टाकेल. सभागहामध्ये सगळयांसमोर बोलेल. जास्त पर्सनल बोलू नका.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:-** शांत बसा.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-** मा. महापौरजी, या विषयावरच बोलायचे आहे. निर्णय सभागृह घेईल ते बोलतात की, तुला अधिकार नाही. हे कोण आहेत, आम्हांला सांगण्यासाठी तुम्हांला अधिकार नाहीत. संविधानने आम्हांला अधिकार दिले आहेत. इज्जत करतात तर डोक्यावर चढतात.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** मनोजराव मुदयावर बोला आता. शेरीजी जाग्यावर बसा.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-**मा. महापौरजी, हा जो विषय प्रशासनाकडून आला आहे.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:-** सगळयांनी जागेवर बसून घ्या.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** प्रदिप रामचंदानी आवाज करु नका.

**सदस्य, श्री. शंकर लुंड:-** डिफर, डिफर.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-** मा. महापौरजी हा जो प्रशासनाकडून संपुर्ण शहरामध्ये आपल्याला रोड गोषवा-यामध्ये दाखवले आहेत, त्या रोडवर शुल्क आकारले आहेत आणि हे शुल्क महापालिका कशाप्रकारे वसुल करणार आहे, हे संपुर्ण गोषवा-यामध्ये दिले आहे. जे शुल्क घेणार आहेत आणि जे रोड दर्शविले आहेत. यावर पुर्णपणे विचार विनिमय झाले पाहिजे. या धोरणाला मी पुर्णपणे पाठिंबा देत आहे. कारण की, आज आपले शहर पुर्णपणे गर्दीचे झाले आहे. आपल्याकडे पहिले रस्ते छोटे आहेत, तिथे दोन्ही बाजूनी वाहने उभी असतात. ते दोन चाकी असतील, चार चाकी असतील, पाच चाकी असतील, मी सांगतो संपना गार्डनमध्ये एक नविन रोड बनला आहे, खासदार निधीतून जो सपना टॉकिज पासून लिंकरोड पर्यंत जातो, पहिले तिथे एका बाजुलाच ऑटो रिक्षा उभ्या राहत होत्या. त्यांनी सांगितले रोड बनवा आम्ही पाच गाडया उभ्या करु आज दोन्ही बाजुनी ५० गाडया उभ्या रहात आहेत. जो रोड बनवला आहे, ऑटो रिक्षासाठी आज मी माहीती देतो की, तिथे ५० ऑटो रिक्षा रात्रभर उभ्या असतात आणि त्या ५० अॅटो रिक्षापेक्षा ज्या छोटा हत्ती ३६ गाडया शहापूर, कर्जत, कसारा, टिटवाळा, मोने, आंबिवली सर्व तिकडचे राहणारे आहेत. गाडी इथे पार्किंग करतात आणि टू व्हीलरवर घरी निघून जातात. तर आपल्या शहरामध्ये अवैध पार्किंग होत आहे, यावर कुठे ना कुठे नियंत्रण राहणे गरजेचे आहे. आज आपल्या शहरामध्ये किती तरी ट्रान्स्पोर्टच्या गाडया प्रत्येक ठिकाणी उभ्या आहेत. ट्रान्स्पोर्टच्या गाडया वर्षे ना वर्षे उभ्या असतात भंगार होतात आणि भंगारवाले व्यवहार करतात. म्हणजे मोफत शहरामध्ये गाडया लावल्या जातात आणि आम्हांला त्रास दिला जात आहे. शहराच्या सुंदरतेला त्रास होत आहे आणि प्रदुषण पण होत आहे. तर यावर पुर्णपणे चर्चा करुन हा जो धोरण प्रशासनाने आणले आहे, हे येणा-या भविष्यामध्ये गोलमैदान हे आपले छोटेशे क्षेत्र आहे, त्यावर राजकारण झाले नाही पाहिजे. नाही तर आपण गोलमैदान सडक याच्यातून काढून टाका. परंतु संपुर्ण धोरणाच्या विरुध्द जाणे मला वाटते हे चुकीचे आहे, यावर सकारात्मक विचार व्हायला पाहीजे.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:-** पहिले प्रभाग समितीमध्ये आले, आम्हांला नगरसेवकांना पण माहीती झाले पाहीजे ना.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** दादा विषयावर बोला.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:-**आपण थांबवू शकत नाहीत, नगरसेवकांना माहिती पण नाही होत, पास..पास.. हे काय आहे, जनता आम्हांला विचारण्यासाठी बसले आहेत की, काय पास करुन आले. पहिले पहिले प्रभाग समितीमध्ये यायला पाहिजे. लोकांना माहिती झाले पाहिजे.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** दादा एक मिनीट ऐकुन तर घ्या. आपण खाली फोन करुन वरती येतात, हे पहिलेच उभे होते.

**<u>सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:-</u>** मी कधीच मध्ये बोलत नाही.

**<u>उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-</u>** पहिले यांना बोलू दया, नंतर आपण बोला.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:-</u>** सभा खुप चांगली चालली आहे, तुमचे पर्सनल जे काही असेल ते इथे सभागृहामध्ये आणू नका. चर्चा केली तर आपले विषय १०, १० मिनीटांत सगळे संपतील भांडणामध्ये अर्धा-अर्धा तास जातो. अरुण आशानजीनी हा प्रश्न किंवा हा मुददा आला तेव्हाच सांगितले होते की, प्रशासनाची भुमिका काय वास्तविक तसे असले पाहिजे. अगोदरच पास अगोदरच रिजेक्ट म्हणजे तुमचे वैयक्तिक मत आहे, ते नंतर ठेवा ना काय आहे ते? दुस-याचे आवाज का बंद करतात लगेच रिजेक्ट, लगेच पास झाला असेल. तर प्रदिपसारखे रिजेक्ट रिजेक्ट असे कसे? जो चुकीचा आहे, त्याला चुकीचा सांगा ना.

**<u>उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-</u>** बोडारे साहेब, आता तुम्ही बोला फक्त्.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:-</u>** तर प्रशासनाची भुमिका या बाबत काय आहे? या ठिकाणी स्पष्ट ठरवा नंतर या बाबतीत आपली चर्चा होईल. त्याच्यामध्ये रिजेक्ट करता येईल.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-</u>** प्रशासनाने हेही सांगायला पाहिजे, पहिले जो ठराव केला आहे, दंड लावण्यासाठी त्यात मी सुचक आहे, आता पर्यंत किती दंड वसुल केला आहे, ते ही सांगा. प्रशासनाने पहीले सांगितले पाहीजे.

**<u>उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-</u>** एक मिनीट महाराजजी पहिले चर्चा करा.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-</u>** पहिले प्रशासनाने सांगावे की, आपण आता पर्यंत किती दंड वसुल केला आहे.

**<u>उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-</u>** महाराजजी पहीले इथे बघा जर समाधान झाले नाही तर सांगा.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-</u>** नाही, नाही, पहिले किती दंड वसुल केला आहे, ते सांगा.

**<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-</u>** सन २०१७ मध्ये पण विषय आला आहे. चेक करा.

**<u>सदस्य, श्री. भारत राजवानी:-</u>** हा जो प्रस्ताव आणला आहे, मी या प्रस्तावाच्या बाजूने आहे. जसे की, श्री. मनोज यांनी सांगितले की, बाहेरचे लोक इथे येऊन आपल्या शहराच्या जमीनीचा वापर करतात. तर यामध्ये आपले उत्पन्न पण वाढेल आणि प्रदुषण या पासून सुटका पण होईल. अशा प्रकारे हातगाडयांची हीच अडचण आहे. आपल्या शहराचे लोक कमी आहेत आणि बाहेरचे लोक जास्त येत आहेत. आम्ही जेव्हा नेताजी चौक इथून गाडया हटविल्या होत्या तेव्हा फक्त एक गाडी उल्हासनगरची होती, १९ गाडया, काही बदलापुरच्या होत्या, टिटवाळयाच्या होत्या, काही कल्याणच्या होत्या तेथून येऊन लोक हातगाडया लावतात आणि आपल्या शहरामध्ये दुर्गंधी करतात आणि प्रदुषण पण करतात. तरी अशा प्रकारे हा प्रस्ताव पास झाला पाहिजे.

**<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-</u>** भारतजी हा पे ॲन्ड पार्कचा मुददा वेगळा आहे. हातगाडीचा मुददा वेगळा आहे. प्रत्येक जण बोलेल होय होय, मी पण बोलेल होय, हातगाडीचा मुददा वेगळा आहे सर.

**<u>सदस्य, श्री. भारत राजवानी:-</u>** गाडयांचा प्रस्तावाचे मी बोलत आहे.

**<u>उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-</u>** महाराजजी एक मिनीट सन्माननिय सदस्य, तुम्हांला मुददे मांडायचे असतील तर मुददे मांडा आणि एकादाच उत्तर देतील तुम्ही प्रत्येक जण विचारेल उत्तर दया, तर अधिकारी कमी पडतील. त्यामुळे सगळया सदस्यांनी आपले मुददे मांडा ते अधिकारी एकत्रच उत्तर देतील.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-</u>** मी एकच मुददा मांडला आहे की, पहिले आपण ठराव केला होता, अनधिकृत पार्किंगवाल्यांकडून दंड वसुल करणेसाठी आजपर्यंत किती दंड वसुल केला आहे, ते सांगा. बस आम्ही पास करतो, दाखवा किती दंड वसुल केला आहे.

**<u>सदस्य, श्री. राजू जग्यासी:-</u>** मा. महापौरजी, भुल्लर महाराजने जी गोष्ट सांगितली आहे, फुटपाथ असतो तेव्हा अनधिकृत पार्किंग होते. पहिले आपण शहरामध्ये जी अनधिकृत पार्किंग होत आहे, जेथून जे लोक वसुली करतात, पहीले ते उत्पन्न आपण आपल्याकडे आणा त्याच्या नंतर हा प्रस्ताव घेऊन या. शहरामध्ये किती तरी

जागी अनधिकृत पार्किंग होत आहे. बाकी लोक अनधिकृत पध्दतीने वसुली करीत आहेत. ही माहिती आहे, ती माहिती आपण दया. त्याच्या नंतर आपण प्रस्ताव आणा.

**उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-** मी सदस्यांच्या निदर्शनास आणून देत आहे की, सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे, त्याचे मी फक्त उत्तर देतो की आम्ही उल्हासनगर स्टेशनला अनधिकृत पार्किग होते ते चालू होते, शहाडला पण अनधिकृत पार्किंग होते. तेही आपल्याला माहिती होते की नाही माहीत नाही. परंतु आम्ही या दोन महिन्यामध्ये दोन्ही ठिकाणचे पार्किंग पोलिसांना घेऊन बंद केले आहेत. त्या ठिकाणी आम्ही टेंडर प्रोसेसमध्ये आहे.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** विठलवाडीची पार्किंग आहे, ती तुम्ही बंद केली का?

**उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-** विठलवाडीची असेल तर तीही मी तपास करतो. एक लक्षात घ्या, रेल्वेच्या जागेवर जर पार्किंग असेल तर त्यात आपण काहीच करु शकत नाही. रेल्वेच्या जागेवर पार्किंगला ..

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** रेल्वेच्या जागेवर आपण बोलत नाही, उल्हासनगर महानगरपालिकेच्या जागेवर अनधिकृत पार्किंग.

**सदस्य, श्री. राजू जग्यासी:-** उल्हासनगर स्टेशनच्या बाजुची आपण पार्किंग आपण बंद केली आहे का?

**उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-** महापालिकेच्या जागेवर जिथे पण अनधिकृत असेल, तर आमच्याकडे माहीती दया, आम्ही तिथे बंद करण्याचा प्रयत्न करु. दोन ठिकाणी आपण बंद केले आहे.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:-** साहेबजी, मी तर पहिले धन्यवाद देतो आपल्याला सर्वांना अधिका-यांना पण खुप वर्षानंतर आपल्याला नगरसेवकाच्या मागणी, जनतेची मागणी याच्यासाठी विचार करण्यासाठी वेळ मिळाला आहे, धन्यवाद. परंतु पार्किंग त्या जागेवर करा की, जिथे पार्किंगसाठी जागा असेल. ज्या रोडवर आपण पार्किंग करण्यासाठी जात आहेत, नगरसवेकांना काहीच माहीती होत नाही. नगरसेवक बोलतात पास..पास.. हे काय आहे? पहिले प्रभाग समितीमध्ये घेऊन या. तिथे आम्ही २० नगरसेवक आहेत, पाच नंबरमध्ये, चार नंबरमध्ये पहिले त्यांना सांगा नंतर विषय घेऊन या. नगरसेवकांना काहीच माहीती पण नाही. चौधरी साहेब हे बघा मी पण नविन नाही आहे. आपण रोडची परिस्थिती बघा काय आहे? चौधरी साहेब जसे आपण जुने आहेत, तसे मी पण जुना आहे. मी नविन आलो नाही. जे पण रोड आहेत, त्या रोडची परिस्थिती बघा आपण एक बार येऊन जा, आयुक्त साहेबांनी यावे आणि बघावे रोडची परिस्थिती काय आहे, जिथे पार्किंग करणार आहेत. मी तर पहिले सगळयांना धन्यवाद दिला आहे. परंतु अशा जागेवर पाकिंग करा की, जिथे रिकामे प्लॉट आहे. १६ नंबर शाळेची जागा रिकामी आहे, तिथे पार्किंग करा ना. किती वेळा लिखीत दिले आहे. शंभर वेळा दिले आहे. माझी हात जोडून विनंती आहे की, आपण जिथे पण पार्किंग करण्यासाठी जात आहेत, ते नगरसेवकांना पण सांगा. त्यांच्या बरोबर जाऊन बघा, प्रभाग समितीमध्ये नगरसेवकांना विचारुन करा. एक मिनीटामध्ये इथे पास होऊन जाईल. कोणाला बोलण्याची गरज पडणार नाही.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** आपला विरोध आहे की, प्रस्तावाच्या बाजूने आहे.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:-** माझा विरोध आहे.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** ठिक आहे, चला डॉक्टर साहेब बोला.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-** जशा प्रकारे हा विषय आणला आहे, पार्किंगचा तो जागेनिहाय आणला आहे का? म्हणजे संपुर्ण शहराच्या आतमध्ये आहे की, ऑफिसच्यासमोर एका बिल्डींगच्या समोर पार्किंग होते तुम्ही पैसे घ्या किंवा नका घेऊ परंतु ती पार्किंग झाली. म्हणजे तुम्हांला वाटते की, शहराच्या मधील एक उदाहरण देतो की, गोल मैदान येथे पार्किंग देणार आणि जाऊन वाहन उभे करा. मी अहमदाबादहून दोन गाडया घेऊन येतो बीकॉज चार्जीग आय रेडी टू पे. मी पैसे भरण्यासाठी तयार आहे. मुददा गंभिरपणे ऐकण्यात यावा. मी अहमदाबादहून दोन कार घेऊन येतो, दहा कार घेऊन येतो. गोल मैदान येथे उभे करतो आणि माझा धंदा आहे सेल ॲन्ड कार पर्चेसचा जेव्हा माझी गाडी विकली जाईल तेव्हा मी विकून टाकील तेव्हा मी दुसरी उभी करेल. परंत मी त्याचे पैसे भरेल. तुम्हांला उत्पन्न पाहिजे ना, तर मी उत्पन्न देतो मध्येच कोणी बोलू नका. मी मध्येच बोलत नाही. त्याच्या नंतर डी.पी. प्लॉन येत असतो, डी.पी. प्लॉनमध्ये कुठे पार्किग आहे. याच महासभेमध्ये डी.पी. प्लॉन पास झाला होता. जेव्हा प्लॉन पास झाला होता, तेव्हा आपण विचार करायला पाहिजे होता,

पार्किंगचा, पार्किंगचा एक वेळा विषय आला होता, तुम्हांला माहिती झाले पाहिजे. सन २०१७ मध्ये पार्किंचा विषय आला होता. तो पण डिफर झाला, रिजेक्ट झाला. आज ऑल लोकेशन ऑफ दि सेम तर मला वाटते सदस्यांचे लक्ष नाही, तर मी ब्रेक घेऊ त्याच्या नंतर शहरामध्ये जी पार्किंग आहे.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** डॉक्टर साहेब आपला विरोध आहे की फेवरमध्ये आहेत काय आहे?

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-** विरोध आहे, ऐकुन घ्या.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** ठिक आहे, चला. राजेश वदारिया बोला.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-** विरोध का आहे, ऐकुन घ्या.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** ठिक आहे, विरोध आहे तर विरोध बोलल्या नंतर पण विरोध आहे ना.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-** ऐकुन घ्या, आपल्याकडे भरपूर सरकारी जमीन आहे, महापालिकेची जमीन आहे.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** डॉक्टर साहेब, विरोध ओह तर विषय संपला. ठिक आहे, राजेश वदारिया बोला.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:-** डॉक्टर साहेब आता भरपुर झाले.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-** वर्ल्ड क्लबमध्ये जागा आहे, तिथे पार्किंग करा. तिथे भरपुर जमीन आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-** महापौरजी हा विषय डिफर करा, नंतरच्या महासभेमध्ये घेऊन या.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** राजेश वदारिया आपण बोला.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-** डिफर करा, नंतरच्या महासभेमध्ये घेऊन या.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** यांना बोलू तर दया. राजेश वदारिया बोला.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** मा. महापौरजी, इथे माझी मानसिकता आहे, ती सगळया नगरसेवकांची मानसिकता आहे. तर भरपूर लोकांचे म्हणणे आहे की, डिफर करा.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** डॉक्टर साहेब, आता आपण बोलले ना आता यांना बोलू दया. माईक पण बंद करा, आवाज पण बंद करा. यांना बोलू दया.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** माझी प्रशासनाला विंनती आहे की, आज हा विषय डिफर करुन काही आठ दिवसा नंतर आपण आणून सर्व सदस्यांना दाखवा. सर्व गटनेत्यांची मिटींग घेऊन आपल्या सदस्यांना याची माहीती दया. सर्वांना याची माहीती होईल आणि सर्व अभ्यास करुन येतील तरच एक पॉझिटीव्ह होईल.

**सदस्य, श्री. शंकर लुंड:-** तो पर्यंत डिफर.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** डिफर.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** भारतीय जनता पार्टी...

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** बस झाले भारतीय जनता पार्टी नाही. सर्व पार्टीनी विरोध केला आहे.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** पार्टीच्यातर्फे विरोध केला तर पाहीजे.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** सर्व पाटर्यांनी विरोध केला आहे.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** वेळेवर असे मुददे आणायला नाही पाहीजे. आम्ही विरोध करीत आहेत.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-** उप महापौरजी धन्यवाद.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** प्रदिपजी सर्व पार्टीनी विरोध केला आहे, फक्त भारतीय जनता पार्टीने विरोध केला नाही.शिवसेनेने पण केले आहे, आम्ही पण केला आहे, सर्वांनी केला आहे.

**महापालिका सचिव:-** सर्वांनी डिफर सांगितले आहे, हा विषय डिफर करण्यात येत आहे.

**काही सदस्य :—**पास—पास......

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ९:—**वाहतुक समस्यांचे निवारण करणेसाठी उल्हासनगर महानगरपालिकेचे रस्तांवर पे ॲन्ड पार्क पॉलिसी राबविण्यास मान्यता मिळणेबाबत.

**प्रस्तावना**

उल्हासनगर शहराचे क्षेत्रफळ हे 13 चौ कि.मी.असुन हे व्यापारी शहर म्हणून ओळखले जाते. सदर शहराची भौगोलिक रचना पाहता या शहराच्या क्षेत्रफळात आजुबाजुला वाढ होण्यास वाव नाही शहरातील अरूंद रस्ते वाढती लोकसंख्या व वाढती वाहन संख्या यामुळे रस्त्यावरील वाहतुकीत मोठया प्रमाणात वाढ झालेली आहे. उल्हासनग रशहरात सर्व रस्त्यावर अनाधिकृत पणे वाहने पार्किग केली जातात व त्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे.

यास्तव शहरातील रस्त्यावरील वाहतुककोंडी दुर करण्यासाठी व वाहतुकीस शिस्त लावण्यासाठी शहरात ठीकठीकाणी रस्त्यांवर पार्क केल्या जाणाऱ्या वाहन धारकांकडून पार्किंग शुल्क आकारणी करणे आवश्यक वाटते.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 243 अआयुक्तास महानगरपालिकेच्या संमतीने त्यांना योग्य वाटतील अशा अटीच शर्तीयांच्या अधीन राहुन कोणत्याही व्यक्तीकडून तिने वाहन उभी करून ठेवण्यासाठी किंवा थांबविण्यासाठी अशा जागेच्या किंवा ठिकाणाच्या केलेल्या वापरा करिता प्रत्येक दिवसासाठी किंवा त्यांच्या भागासाठी त्याला योग्य वाटले अशी फी किंवा शुल्क आकारता येईल अशी तरतुद आहे. अधिनियमातील वरिल तरतुदीनुसार शहरातील रस्त्यांवर ठिकठिकणी उभ्या केल्या जाणाऱ्या वाहनांद्वरे पार्किंग शुल्क आकारणी करणेसाठी महापालिकेकडे पुरेसा कर्मचारी वर्ग उपलब्ध नसलयाने सदर पार्किंग शुल्क आकारणीचे काम खाजगी अभिकतामार्फत करणे ऊचीत राहिल.

रस्त्यांवर उभ्या केल्या जाणाऱ्या वाहनांसाठी खालील दराने पार्किंग शुल्क आकारणी करणे प्रस्तावित आहे.

| अ.क्र. | वाहनाचा प्रकार | वाहन पार्किंगचा काल | दर प्रतिदिन रू | मसिक पास फक्त 24 तासाकरी |
|---|---|---|---|---|
| 1 | टू व्हिलर | 0-5 तास | 10/- | 500/- |
| | | 5-10 तास | 15/- | |
| | | 10 तासाच्या पुढे | 20/- | |
| 2 | थ्री व्हिलर | 0-5 तास | 15/- | 625/- |
| | | 5-10 तास | 20/- | |
| | | 10 तासाच्या पुढे | 25/- | |
| 3 | फोर व्हिलर कार जीप, इत्यादी | 0-5 तास | 25/- | 2500/- |
| | | 5-10 तास | 50/- | |
| | | 10 तासाच्या पुढे | 100/- | |
| 4 | बस,ट्रक,टेम्पो जड वाहनासाठी | 0-5 तास | 100/- | 5000/- |
| | | 5-10 तास | 150/- | |
| | | 10 तासाच्या पुढे | 200/- | |

वाहन पार्किंग शुल्क वसुलीची कार्यपध्दती खालील प्रमाणे

1) महापालिका किंवा अभिकर्ता यांनी याकरिता आवश्यक पुरेसा कर्मचारी वर्ग नेमणे आवश्यक राहिल.
2) रस्त्यांवर पार्किंग केलेल्या वाहनांकडून नमुद केलेल्या दरानुसार अभिर्कता/महापालिकेला प्रतिदिन वसुल केलेल्या एकुण रक्कमेच्या 40 टक्के रक्कम प्रतिदिन महापालिकेकडे भरणा करणे आवश्यक राहिल.

3) ज्या वाहनाना मासिक पास देण्यात येणार आहे.त्या वाहनावर पार्किंग स्थळ् शुलक तसेच मासिक पासचा कालावधी नमुद करणारे स्टिकर लावणे बंधनकारक आहे.
4) रस्त्यावरील वाहनांकडून मासिक पार्किंग शुल्क वसुली केल्यास त्यावर आकरणी केलेले पार्किंग स्थळ शुल्क व पार्किंगचा कालावधी वाहनांवर नमुद असलेले स्टिकर लावणे बंधनकारक आहे.
5) अभिर्कता यांना शहरातील ठिकठिकाणी नियमित वाहने पार्किग असल्यास वाहतुकीस अडथळा निर्माण होणार नाही यांची दक्षता घेऊन पार्किग शुलक वसुल करणे आवश्यक राहील अशा जागांची पाहणी करावयाची आहे.
6) अभिर्कता यांने पार्किंग वसुलीसाठी नियुक्त केलेला कर्मचारी वर्ग हा सुदृढ व सुशिक्षीत असावे तसेच सदर कर्मचारी चारित्र्यहीन व गुन्हेगारी प्रवृत्तीचा नसावा त्याच प्रमाणे त्यांना विशिष्ठ गणवेश परिधान करणे आवश्यक राहिल.
7) अभिकर्ता यांने नियुक्त केलेल्या कर्मचारी वर्गास पगार व भत्तेदेण्याची जबाबदारी अभिकर्त्याची राहिल.
8) अभिकर्ता यांना पार्किंग शुल्क वसुलीसाठी वसुली करावयाच्या रक्कमेकरीता दयावयाची पावती पुस्तके व मासिक पास महापालिकेकडून पुरविण्यात येतील महापालिकेने पुरविलेल्या पावती पुस्तका व्यतीरीक्त् दुसरे पावती पुस्तक वापरता येणार नाही. किवा शक्य असल्यास ई-टिकिटिंग प्रणालीचा वापर अभिकर्ता स्वखर्चाने करावा व सदर मशिन मनपाकडून प्रमाणित करून घ्यावी.
9) शहरातील रस्त्यावर नियमित उभ्या केल्या जाणाऱ्या वाहनासाठी पार्किंग शुल्क वसुली करताना मासिक पास देण्याची तरतुद असेल.
10) अभिकर्त्याने सुरक्षा अनामत रक्कम म्हणून महापालिकेकडे प्राप्त् निविदेच्या 5% रक्कम् जमा करावी सदर रक्कमेवर महापालिकाकडून कोणत्याही प्रकारचे व्याज देय असणार नाही तसेच निविदा कालावधी पुर्ण झाल्यास सदर अनामत रक्कम बिनव्याजी अभिकर्त्यास महापालिकाकडून परत करण्यात येईल.

11) अभिकर्ता व वाहनधारक यांच्यामध्ये कोणत्याही प्रकारचा वाद निर्माण झाल्यास त्यास महापालिका जबाबदार रहाणार नाही.

**उल्हासनगर शहरातील जास्त रहदारीचे रस्ते खालील प्रमाणे आहे.**

**<u>प्रभाग समिती 1.</u>**

| अ.क्र. | रस्त्याचे नाव | रस्त्याचा प्रकार | लांबी | रुंदी |
|---|---|---|---|---|
| 1 | Gulshan nagar to idea factory | BT | 1200 | 24 |
| 2 | shahad ROB Murbad naka | CC | 2000 | 36 |
| 3 | sai baba temple to a blcok chowk | BT | 800 | 36 |
| 4 | Shahad ROB to umc road | CC | 1800 | 18 |
| 5 | wallness store ( court) to goal maidan | BT | 250 | 18 |
| 6 | Road surrounding goal maidan komal park to sank nirankari bhawan waya sadhu vasowani stachu | CC | 550 | 18 |
| 7 | for K.C wine store to sant nirankari bhawan | CC | 250 | 24 |
| 8 | From madhuban chowk to shirlabh chowk ulhasngar 3 | CC | 450 | 24 |
| 9 | For pt kalalni college to Dr. natahani dispencrey via vaibhav wadi | BT | 280 | 18 |
| 10 | From shahad station( naka) to ses 1 school ulhasnagar | CC | 750 | 18 |
| 11 | From Nilkantha Mandir to via camp 1 bus stop | CC/BT | 700 | 24 |
| 12 | From side to Nirakanri bhawan to bharat chowk | CC | 500 | 24 |
| 13 | Goal maidan to nehru chowk | CC | 300 | 24 |
| 14 | From Niraj apartment to bank of baroda via heera marage hall | BT | 600 | 12 |
| 15 | From Murbad road to fish market at ulhasnagar 1 | BT | 1150 | 36 |

## प्रभाग समिती 2.

| | प्रभाग समिती २ रस्त्यांची यादी | | | |
|---|---|---|---|---|
| Sr. No. | Sr. No. | Name of Work | Length (In Mtr.) | Width (In Mtr.) |
| 1 | From Narayan Weigh Bridge to Shantinagar | BT | 1250 | 36 |
| 2 | From Narayan Weigh Bridge to Sec.17 | BT/CC | 700 | 24 |
| 3 | Rd. From Boat Club To Havakmotu Chowk | BT | 650 | 18 |
| 4 | From Saibaba Mandir, Shantinagar To Saibaba Mandir Ordnance Factory Road | CC | 3000 | 30 |
| 5 | Shivaji Chowk to Nehru Chowk | CC | 550 | 18 |
| 6 | Shastri Chowk To UMC | CC | 385 | 24 |
| 7 | Nehru Chowk To Flyover Lane | BT | 1200 | 18 |
| 8 | Nehru Chowk to Siru Chowk | CC | 385 | 24 |
| 9 | Siru Chowk To ESI | CC | 500 | 12 |
| 10 | Siru Chowk to 1 No. Police Station | CC | 525 | 24 |
| 11 | Red Cross Society To Nani | CC | 280 | 18 |
| 12 | Mukane House To Rubani Satsang | BT/CC | 600 | 12 |
| 13 | Khemani to Amardham | BT | 245 | 12 |
| 14 | Khemani to Punjabi Colony | BT/CC | 550 | 18 |

## प्रभाग समिती 3 रस्त्यांची यादी

| Sr. No. | Name of Road | Name of Work | Length (In Mtr.) | Width (In Mtr.) |
|---|---|---|---|---|
| 1 | Venus Chowk to Rob Via O.T. Sec | C.C. | 188 | 18 |
| 2 | Venus Chowk to S.S.T College | BJ | 350 | 30 |
| 3 | Venus Chowk to ROB | BJ | 1100 | 30 |
| 4 | S.S.T College to Waco Compound | BJ | 2100 | 36 |
| 5 | Mahavir Hospital to Kalyan Kunj Apt. | C.C. | 500 | 18 |
| 6 | Sec. 27 to Manera Gaon Road Via Sant Ramdas Hospital | BJ/CC | 550 | 12 |
| 7 | Sec. 30 to VTC Ground | C.C. | 350 | 12 |
| 8 | TDS Bank to Hindustan Pencil Factory | C.C. | 350 | 24 |
| 9 | Asha Silicate to Janta Confessionary via Santosh Ngr. | C.C. | 425 | 12 |
| 10 | Sonara Chowk to Kkoyande Statue | C.C. | 350 | 18 |
| 11 | From Jijamata Garden to Railway Station | C.C. | 600 | 18 |
| 12 | Dr. Lalwani Dispensary to Jungle Hotel | BJ/CC | 350 | 12 |
| 13 | Jungle Hotel to Shani Mandir | C.C. | 350 | 18 |
| 14 | Radhaswami Stasang to Gulraj Chowk | C.C. | 600 | 12 |
| 15 | O.T. Chowk to Godhu Kisnani Bunglow | C.C. | 600 | 18 |
| 16 | Gulraj Tower to O.T. Chowk via Nepture apt. | BJ | 350 | 18 |
| 17 | Shivaji Chowk to CHM Colltge | C.C. | 1000 | 24 |
| 18 | Sec. 17 to R.O.B. (Shriram Chowk) | C.C. | 650 | 24 |
| 19 | Boat Club to Hadakmata Chowk | BJ | 900 | 18 |
| 20 | Narayan Weigh Bridge to Shantinagar | BJ | 1400 | 36 |
| 21 | Cremation Ground to Kajal Petrol Pump | C.C. | 250 | 18 |
| 22 | Alok Talkies to Khatri Bhawan | BJ | 400 | 12 |

**प्रभाग समिती** 4.

प्रभाग समिती ४ रस्त्यांची यादी

| Sr. No. | Name of Work | Type | Length (In Mtr.) | Width (In Mtr.) |
|---|---|---|---|---|
| 1 | Netaji Chowk to Kailash Colony, Ulhasnagar-4 | CC | 2000 | 24 |
| 2 | Lal Chakki chowk Ulhasnagar-5 to Kailash colony | CC | 1450 | 24 |
| 3 | Venus chowk to Lal Chakki Chowk | CC | 1000 | 24 |
| 4 | Shanti Prakash Statue to Dhoodh Naka Via Ashok Pickle Dhood naka | BT | 1000 | 24 |
| 5 | Netaji Chowk to Mutt Mandir Via Tehsil Office | BT | 850 | 12 |
| 6 | Shiv Mandir to Lal Chakki Nr. Bk. 2108 via Durga Pada | CC | 2000 | 36 |
| 7 | Dhhodh Naka to Swami Shanti Prakash Ashram | CC | 700 | 24 |
| 8 | B.G. Tilak to Tanker Point | CC | 600 | 18 |
| 9 | From Mutt Mandir Chowk to Gaikwad 630 | CC | 630 | 12 |
| 10 | From Lal Chakki 2108 to Netaji School | BT | 875 | 36 |
| 11 | Swami Shanti Prakash Statue to Dhoodh Naka Via Ashok Pickle | BT | 1000 | 24 |
| 12 | From Nijdham Ashram to Gandhi Road | BT | 400 | 18 |
| 13 | From Chaliya Saheb Mandir to Jai Baba Dham | BT | 450 | 18 |
| 14 | From Chaliya Saheb Mandir to Minerva Apartment | CC | 400 | 12 |
| 15 | Kailash Colony to Netaji Chowk | BT | 2000 | 24 |
| 16 | Kali Mata Mandir Chowk to Sewal house via D.T.School | BT | 750 | 18 |
| 17 | Bk.No.926 Nirmal Kunj Hanuman Mandir | BT | 500 | 18 |
| 18 | Venus to Netaji | CC | 300 | 18 |
| 19 | HDFC Bank to SST Collage | CC | 450 | 18 |
| 20 | Venus to SST College | BT | 350 | 30 |
| 21 | Venus Ro ROB | CC | 1000 | 24 |
| 22 | Opp. Swami Shanti Prakash statue to | CC | 1900 | 18 |
| 23 | From Main Entrance gate to Manish Apt. Via Shmashan Bhumi UNR-04 | BT | 500 | 12 |

सध्या उल्हासनगर शहरातील नागरिक वाहने कोठेही पार्क करतात व त्यामुळे वाहतुकीची कोंडी होते.जर वरिल नमुद केलेल्या रस्त्यांवर पे अॅन्ड पार्क पॉलिसी राबविली तर नक्कीच वाहतुकीची कोंडी टाळता येईल व महापालिकेस उत्पन्न ही प्राप्त होईल.तरी सदर प्रस्ताव मा.महासभे पुढे निर्णयास्तव सादर करण्यात येत आहे.

**महासभा ठराव क्र:२९** **दिनांक:—**२/१२/२०२१

सुचकाचे नाव :— श्री. शंकर लुंड

अनुमोदकाचे नाव :— श्री. कलवंतसिंह सोहता

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणेवाहतुक समस्यांचे निवारण करणेसाठी उल्हासनगर महानगरपालिकेचे रस्त्यांवर पे अॅन्ड पार्क पॉलिसी राबविण्याच्या कामास कार्यसुचीवरुन वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी

सर्वसाधारण महासभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव:—** विषय क्र. १० वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १० :— महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम** १९६६ **चे कलम** ३७ (१) **अन्वये आरक्षण क्र** १२१ **पब्लीक युटीलिटी सर्विसेस, वाहनतळ, ट्रान्सपोर्ट, मॉल आणि ट्रक टर्मीनसह्या आरक्षणा ऐवजी महानगरपालिका वसाहत असे किरकोळ फेरबदल करुन शासनास प्रस्ताव सादर करणेबाबत...**

---

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:-** त्याचेमध्ये खास करुन उल्लेख करा. निवडणूकीच्या वेळी असे मुददे आणायला नाही पाहीजे. खास करुन निवडणूक आली की, असे मुददे येतात.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:-** एका वेळेस एकानेच बोला आणि मी सांगितल्या नंतरच बोला. कोणाला बोलायचे आहे, त्यांनी बोलावे.

**सदस्य, श्री. जीवन इदनानी:-** सचिव मॅडम विषय क्र.१० रिजेक्ट. सचिव मॅडम नोट करा.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** जीवनभाई आपण खाली बसून बोलत आहेत.

**सदस्य, श्री. जीवन इदनानी:-** आपण बोलूनच देत नाहीत, सभागहामध्ये एकच आवाज आहे, श्री. भगवान भालेराव यांचा. दादागिरी चालते का?

**सदस्य, श्री. शंकर लुंड:-** रिजेक्ट, रिजेक्ट.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:-** नगररचनाकार बोलत आहेत, भालेरावजी सगळयांना संधी दया.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** राजेशभाई बोला.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** मा. महापौरजी, नगररचनाकार काही बोलत असतील तर त्यांना बोलू दया, त्याच्या नंतर मी बोलतो.

**नगररचनाकार, श्री. प्रकाश मुळे:-** विषय नंबर १० च्या टायटलमध्ये चेंज आहे, आरक्षण क्र.१२१ च्या ऐवजी आरक्षण इपी ५ ट्रक टर्मिनलच्या आरक्षणात बदल करुन ...

**सदस्य, श्री. शंकर लुंड:-** परत प्रस्ताव घेऊन या.

**नगररचनाकार, श्री. प्रकाश मुळे:-** म्युनसिपल सिव्हील सर्व्हिसेस असे आपल्याला नमुद करायचे आहे.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** आपण जो फेर बदल करीत आहेत, तो प्रस्ताव संपुर्ण वाचून दाखवा.

**नगररचनाकार, श्री प्रकाश मुळे:-** महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ **चे कलम** ३७ (१) **अन्वये** आरक्षण क्र.इपी ५ ट्रक टर्मिनस या आरक्षणा ऐवजी महानगरपालिकेचा वापर आणि नागरी सुविधा असा किरकोळ फेर बदल करुन प्रस्ताव सादर करणे बाबत.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** प्रदिपजी हे बोलत आहेत ना.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** मा. महापौरजी, पहिले तर नगररचनाकार यांना हे माहीती असायला पाहीजे की डी.पी. कसा बनतो, सेक्शन २६ पासून चालू होऊन ३१ (१) पर्यंत चालतो एम. आर.टी.पी. बनते हरकती, सुचना येतात, महासभेमध्ये येतो त्याच्या नंतर सगळे झाल्या नंतर महाराष्ट्र शासन परत डीपी देतो आणि बाकीचा भाग मंजुर करतात आणि आपला डी.पी. मंजुर झाला आहे. तर मग डीपी कुठून आला? इट इज दी सेंगशन मॉडीफिकेशन दॅट हॅज बीन एप्रुड माय गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्रा.

**नगररचनाकार, श्री प्रकाश मुळे:-** ईपी जो आहे, दोन पार्टसाठी हरकती होत्या सन २०१७ मध्ये जो प्लॉन मंजूर झाला, तो काढून परत सन २०१९ मध्ये मंजूर केले आहे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** आज सन २०२१ चालला आहे, डिसेंबर, ची २ तारीख आहे. आजच्या तारीखेला पोझिशन काय आहे, एस,एम किंवा ईपी आहे.

**नगररचनाकार, श्री प्रकाश मुळे:-** इपी आहे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** साहेब, परत इपी बोलत आहेत. आपण आताच सांगितले आरक्षण क्र लेट..

**नगररचनाकार, श्री प्रकाश मुळे:-** माझेकडे डी.पी. आहे. त्याची मंजूर कॉपी आहे. यामध्ये नमुद केले आहे, ट्रक टर्मिनल १२ हजार स्केअर मिटर आरक्षण...

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** जे मला समजले आहे, ते मी तुम्हांला सांगतो, इपी नंतर मंजूर मॉडीफिकेशन पण आले आहे.

**नगररचनाकार, श्री प्रकाश मुळे:-** सर एस.एम. असा आहे, सन २०१७ ला..

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** मुददा काय आहे, जाऊ दया,

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** मुददा हा आहे, पहिले इपीचा उल्लेख झाला नाही पाहीजे. इट इज दि सेंगशन मॉडीफिकेशन इंटर टर्मिनल आता ज्यासाठी आपण ३७ (१) मध्ये आले आहेत, आरक्षण क्र. आपण इथे लिहीले १२१ त्याला फेर बदल करुन ८५ सांगत आहेत.

**नगररचनाकार, श्री प्रकाश मुळे:-** होय.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** आता आपण इथे लिहीले आहे की, उल्हासनगरची लोकसंख्या एवढी आहे, वगैरे हे तपशिल आपण दिले आहेत. शिरु चौक ते सैजानंद चौक तर मी तुम्हांला माहीती देतो सैजानंद चौक उल्हासनगरमध्ये माझे माहीती प्रमाणे उल्हासनगरमध्ये नाही, कल्याणमध्ये आवश्यक आहे.

**नगररचनाकार, श्री प्रकाश मुळे:-** नोंद करतो.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** ठिक आहे, दुसरे आपण हे आणले आहे, उल्हासनगर महानगरपालिकेच्या मागे फायरब्रिग्रेट आताच इमारत बनली आहे, तिथे अग्निशमन दल आहे. आपण मोठे अग्शिमनदल आणायला बघतात, आपल्याला उल्हासनगर महानगरपालिकेचे मुख्यालय आणि उल्हासनगर महानगरपालिकेचा एक्सटेंशन जिथे तरणतलाव बनला आहे, बाजुलाच अग्निशमन विभाग बनला आहे. त्याच्या बाजुला सेंट्रल नाका होता, तो एक प्लॉट आहे, मागच्या बाजूला दोन पाण्याच्या टाक्या बनल्या आहेत. पंपिंग स्टेशन आहे आणि बाकीच्या प्लॉटचा आपल्याला सनद मिळाली आहे.

**नगररचनाकार, श्री प्रकाश मुळे:-** जर आपली परवानगी असेल तर मी आपल्याला काही सांगू इच्छितो.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** त्यांचे पहिले पुर्ण होऊ दया.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** माझे म्हणणे आहे की, तिथे झाले पाहीजे. हा रिजेक्ट झाला पाहीजे. दुसरे आज आपल्या अग्निशमन विभागामध्ये किती अधिकारी/कर्मचारी आहेत? माझे माहीती प्रमाणे अग्शिमन विभागाचे चे मुख्य अधिकारी होते, ते सेवानिवत्त झाले आहेत, आपण् सुरक्षा अधिकाऱ्यालाच अग्शिमन अधिकारी बनवले आहे आणि कर्मचारी ठेक्यावर घेतात. तर त्या कर्मचा-यांना घर दयायचा नाही आपल्याला जर तुम्हांला गाडी उभी करायला जागा पाहीजे, महापालिकेच्या मागे जागा आहे, ती बघा नाही तर अजून दुसरी बघा आपला शहर हा एक व्यापारी शहर आहे. इथे ट्राफिकची खुप मोठी समस्या आहे. त्याचे सर्वात मोठे कारण आहे, व्यापारी शहर असल्यामुळे मोठ मोठे ट्रक शहरामध्ये येतात, तर शहराच्या बॉड्रीमध्ये किंवा शहराच्या कोप-याला जर एक ट्रक टर्मिनल झाला, तर तिथे मोठे ट्रक रिकामे करुन छोटे टेंम्पो भरुन शहरामध्ये येतील तर जास्त सुविधा होतील अणि आतमध्ये मोठया गाडयांना दिवसा येण्यास मनाई आहे. आज पण परंतु त्याचे पालन होत नाही. ट्रक टर्मिनस बनवणे खुप आवश्यक आहे. आपण जो प्लॉट निवडला आहे, त्याच्याशी मी सहमत नाही. तिसरी गोष्ट आपण लिहीले आहे की, कल्याण बदलापुर रोडवर मोठ मोठे बिल्डींग,टॉवर येत आहेत. आताच आपण कल्याण बदलापूर रोडवर एकाटॉवरला मंजुरी दिली आहे, त्याचे काम चालू झाले आहे. राधा स्वामी हॉल होता एके काळी आज तिथेटॉवरचे काम चालू आहे. तर आज शहरामध्ये कुठे पण आजटॉवर बनतील असे नाही की, हा रोड ३६ मिटरचा आहे तर तिथेच बनणार आहेत. अजून कुठे पण बनू शकतात.त्यासाठी मी जो एरिया सेजेशन करीत आहे, तो सेंटर आहे शहराचा गरज असेल तर १ नंबर, २ नंबर, ३ नंबरला पण गाडी जाऊ

शकते. गरज पडली तर एंटीलियाकडे पण गाडी जाऊ शकते. गरज पडली तर कल्याण बदलापूर रोडवर पण गाडी जाऊ शकते. तर माझी सभागृहाला विनंती आहे की, हा मॉडीफिकेशन रिजेक्ट करुन प्रशासनाला निर्देश दया की ट्रक टर्मिनस बनवण्याची कारवाई चालू करण्यात यावी.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:-** राजू जग्यासी यांना बालू दया.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानीर:-** विषय वेगळा आहे.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** नंतर अरुण आणि नंतर डॉक्टर

**सदस्य, श्री. राजू जग्यासी:-** सन्माननिय महापौरजी,

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** विषय रिजेक्ट जर करायचा असेल तर चर्चा कशाला करायची

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-** रिजेक्ट करा.

**सदस्य, श्री. अरुण आशान:-** नाही, नाही, चर्चा झाली पाहीजे.

या वेळी काही सदस्य एकत्रित बोलत असल्यामुळे कोण काय बोलत होते ते स्पष्ट समजून आले नाही.

**सदस्य, श्री. जीवन इदनानी:-** रिजेक्ट रिजेक्ट.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** रिजेक्ट, रिजेक्ट चला पुढचा विषय घ्या.

**महापालिका सचिव:-** हा विषय रिजेक्ट केला आहे, मा. महापौरांनी मला पुढचा विषय घ्यायला सांगितला आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-** १० नंबरचा विषय रिजेक्ट झाला आहे, पुढचा विषय घ्या.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथनी:-** धन्यवाद, धन्यवाद.

**काही सदस्य :—**पास—पास……

**महापौर तथा पीठासीन अधिकारी:—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑

**विषय क्र. १०:—** महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये आरक्षण क्र १२१ पब्लीक युटीलिटी सर्विसेस, वाहनतळ, ट्रान्सपोर्ट, मॉलआणि ट्रक टर्मीनसह्या आरक्षणाऐवजी महानगरपालिका वसाहत असे किरकोळ फेरबदल करुन शासनास प्रस्ताव सादर करणेबाबत...

**प्रस्तावना**

उल्हासनगर शहराची मुळ मंजूर विकास योजना १९७४ मध्येमंजूर करण्यात आली असून सुधारीत विकास आराखडा महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चेकलम ३१ (१) अंतर्गत दिनांक २१.०४.२०१७ रोजी भागश: मंजूर शासनाचा करण्यात आला. तदनंतर सदर आराखडयातून वगळलेल्या क्षेत्राची विकास योजना (E. P.) दिनांक ०१.०३.२०१९ रोजी मंजुर करण्यात आली. सदर विकास योजनेच्या आराखडयात आरक्षण E.P.५. व फेरबदल ११-C अंतर्गत ट्रक टर्मिनल्स या शिर्षकाखालील क्षेत्र १२००० चौ. मी. आरक्षित ठेवण्यात आले आहे.

उल्हासनगर महानगरपालिका ही १९९६ साली स्थापन करण्यात आली असून त्याचे एकूण क्षेत्र १३.५ चौ.मी. इतके आहे. विद्यमान अंदाजानुसार महानगरपालिका क्षेत्रातील कायमस्वरूपी निवासी नागरिकांची

संख्या सुमारे ६.५० लाख इतकी असून यात उल्हासनगर शहरातील उद्योग व वाणिज्य संस्थामध्ये कामासाठी ये - जा करणाऱ्या कामगार वर्गाचा समावेश नाही. उल्हासनगर शहरात निर्यात अभिमुख असणाऱ्या व होजिअरी आणि गारमेंट्स तयार करणाऱ्या कुटीर उद्योग व लघु उद्योग मोठ्या प्रमाणात कार्यरत आहेत. उल्हासनगर शहरात वाणिज्य व होलसेल इलेक्ट्रॉनिक वस्तू, भांडे, कपडे इत्यादी वस्तूंचे ठोक व किरकोळ व्यापारी मोठ्या प्रमाणात आहेत. महामुंबई व महाराष्ट्रातील बऱ्याच भागातून कपडे यासारख्या वस्तू घेण्यासाठी ठोक व किरकोळ व्यापारी उल्हासनगरमध्ये येतात. उल्हासनगर शहराच्या मुख्य बाजारपेठ असलेल्या सिरू मार्केट, सहजानंद चौक इत्यादी लोकवस्त्यांमध्ये छोटे छोटे व्यापारी व ठोक व्यापारी यांची दुकाने व त्यांच्या दुकानातील सामानाची साठवण व्यवस्था मोठ्या प्रमाणावर आहे. सदर व्यापाराच्या स्वरूपामध्ये उल्हासनगर शहरात आग व त्यासंबंधी दुर्घटना होण्याचे प्रमाण वाढत असून त्यांचा प्रतिकार करण्यासाठी सुसज्ज अग्निशमन यंत्रणा शहरात मुख्य ठिकाणी असणे आवश्यक आहे. तसेच अग्निशमन स्थानक व आगीचे ठिकाण यातील अंतर कमीत कमी राहणे आवश्यक आहे. जेणेकरून आग विझविण्याचे प्रमाण वाढून होणाऱ्या दुर्घटना टळतील. या हेतूने किमान दोन ठिकाणी अग्निशमन केंद्र असणे आवश्यक आहे. अग्निशमन यंत्रणा सुसज्ज ठेवण्यासाठी अद्यावत अग्निशमन वाहने खरेदी करून ती उभी करण्यासाठी तसेच “अग्निशमनकेंद्र, महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी यांची निवासस्थाने व इतर महानगरपालिका अत्यावश्यक सेवा” यासाठी स्वतंत्र जागेची व्यवस्था करणे आवश्यक होते. ते विद्यमान विकास योजनेत किंवा विद्यमान महापालिका योजनेत जागेअभावी दिसून येत नाही.

उल्हासनगर शहरातील महानगरपालिकेच्या अग्निशमन केंद्राकरिता ०२ इमारती विद्यमान अवस्थेत वापरण्यात येतात. परंतु उल्हासनगर शहराचे वाढती लोकसंख्या प्रमाण तसेच इमारतींचे वाढते प्रमाण व त्यानुसार अग्निशमन व्यवस्थेची अपुरी यंत्रणा व अग्निशमन केंद्रासाठी उपलब्ध जागा कमी पडत आहे. तसेच उपआयुक्त, यांचे निवासस्थान महापालिका कर्मचा-यांसाठी निवासस्थाने व इतर सार्वजनिक सुविधा यासाठी कोणतीही जागा उपलब्ध नाही. तसेच उल्हासनगर शहर हे व्यापारी केंद्र असून त्यासाठी मागवण्यात आलेले सामान छोट्या लॉरी व छोट्या ट्रकद्वारे मागविण्यात येते. तसेच उल्हासनगर शहरात मोठे गोडाऊन व वखारी उपलब्ध नसून छोट्या व्यापाऱ्यांचे दुकानी व त्यातील साठवण व्यवस्थायांचा विचार करिता उल्हासनगर शहरात मोठे ट्रक कंटेनर्स व १२ टायरपेक्षा जास्त चाकांचे मोठे ट्रक यांची वाहतुक अल्पप्रमाणात होते. तसेच उल्हासनगर शहरातील अरुंद रस्ते विचारात घेता मोठ्या ट्रकची वाहतुक अवघड असून त्यामुळे फीक जाम इत्यादी प्रश्न उपस्थित होतील. यासाठी सर्व बाबींचा विचार करता उल्हासनगर शहरातील अत्यावश्यक सार्वजनिक सुविधा यासाठी कोणतेही क्षेत्र उपलब्ध नाही.

उल्हासनगर शहराच्या मंजूर विकास योजनेत आरक्षण क्रमांक (E.P.५) सुधारणा क्रमांक ११-C अंतर्गत ट्रक टर्मिनलची तरतूद केलेली आहे. मात्र उपरोक्त विवेचनाच्या पार्श्वभुमीवर उल्हासनगर शहरात माल वाहतुकीसाठी मोठ्या ट्रकचा वापर करणे अशक्य असून त्याऐवजी कमी क्षमतेची छोटी व्यावसायिक वाहने वापरण्याकडे लोकांचा कल आहे. उल्हासनगर शहरातील अरुंद रस्ते व वाढती रहदारी यांचा विचार करता व्यापारी मालाची ने आण करण्यासाठी छोटी व्यावसायिक वाहने वापरणे व्यावहारिकदृष्ट्या तसेच वाहतूक शास्त्रानुसार योग्य आहे. मोठे ट्रक्स व अवजड वाहने याद्वारे शहराअंतर्गत मालवाहतूक करणे व रस्त्यांच्या अरुंदतेमुळे व कमी उपलब्धतेमुळे शक्य नसून, तरीही त्यासाठी आग्रह धरल्यास रहदारीचे प्रश्न गंभीर स्वरूपाचे होतील. त्यामुळे शहरात किंवा शहराच्या बाहेर ट्रक टर्मिनलसाठी जागा आरक्षित ठेवणे व्यवहार्य होत नाही. तसेच उपरोक्त विवेचनाच्या पार्श्वभुमीवर ट्रक टर्मिनल हे अनावश्यक आरक्षण ठरते.

सबब आरक्षण क्रमांक (E.P.५) सुधारणा क्रमांक ११-C अंतर्गत १२००० चौ. मी. क्षेत्र “ट्रकटर्मिनल” च्याआरक्षणातून वगळून ते “अग्निशमनकेंद्र, महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी यांची निवासस्थाने व इतर महानगरपालिका अत्यावश्यक सेवा” यासाठी आरक्षित ठेवणे योग्य वाटते.

सदर आरक्षण विकास योजनेच्या सेक्टर १ मध्ये असून त्याजागेच्या उत्तरेसस्थित औद्योगिक झोन हा इंडस्ट्रीज-१ झोनमध्ये समाविष्ट आहे. तसेच सदर जागेत ३६ मी. रुंद रस्त्याचे उत्तरेकडून फ्रंटेज असून पुर्व व दक्षिण बाजुस निवासी क्षेत्र प्रस्तावित आहे. सदर जागेच्या पश्चिमेस वाणिज्य विभाग झोन असून सदर जागेच्या सभोवती असलेल्या निवासी

विभागात मोठ्या प्रमाणावर उंच इमारती (Higher Building) चे बांधकाम सुरु आहे व इतर निवासी भागातही उच्च इमारती होतील असे विचारात घेता येतील.

उल्हासनगर महानगरपालिकेचे एकुण क्षेत्र १३.५ चौ. कि. असून त्यापैकी सुमारे ३९%क्षेत्र निवासी विभागात समाविष्ट आहे. शहरातील जुन्या इमारती असलेले दाटीवाटीचे क्षेत्र यापुढे पुनर्विकास होऊन सुनियोजित असलेले क्षेत्र होईल. मात्र उपरोक्त आरक्षणाअंतर्गत असलेल्या जागेचे स्थलमान पाहता व उल्हासनगर शहरातील जागेच्या कमी उपलब्धतेच्या अनुषंगाने शहराचा उभ्या दिशेने (Vertical) विकास होण्यास काहीही पर्याय दिसून येत नाही.उल्हासनगर शहराच्या विकासाचा कल पाहता सदर जागेच्या सभोवताली असलेल्या इमारती एकत्रित विकास नियंत्रण नियमावलीतील चटईक्षेत्राच्या अनुज्ञेय वापर करून उंचच राहणार आहे, तसेच एकत्रित विकास नियंत्रण नियमावलीत ७५ मी. उंचीपर्यत इमारती अनुज्ञेय आहे. त्यामुळे अग्निशमन यंत्रणेवर ताण येणार असून७५मी. उंचीच्या इमारतीतील रहिवाशांचा विचारकरता सुधारीत अग्निशमन वाहने व उंच शिड्यायांची आवश्यकता असून भविष्यात महानगरपालिकेद्वारे त्यांची तरतुद होणार आहे. त्यादृष्टीने अग्निशमन केंद्रासाठी जास्त क्षेत्र आवश्यकआहे.

सदर बदलासाठी सुधारित अग्निशमन वाहने, उंच शिड्या असलेली अग्निशमन वाहने व त्यासाठी आवश्यक यंत्रणा तसेच कुशल अग्निशमन दलाची आवश्यकता वाढणार आहे. उल्हासनगर महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचारी कल्याण, अंबरनाथ, बदलापूर, येथे निवास करतात,ज्यामुळे कर्मचाऱ्यांना येण्या जाण्यास वेळ लागत असून त्यामुळे महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता पुर्णत्वे वापरणे शक्य होत नाही.महानगरपालिकेतीलअधिकारी/कर्मचा-यांना उल्हासनगर महानगरपालिका हद्दीत निवास स्थानाची तरतुद नाही किंवा त्यांच्यासाठी महानगरपालिका हद्दीत जागा उपलब्ध नाही या सर्व बाबींचा विचार करता उपरोक्त “ट्रकटर्मिनस” याजागेचे आरक्षण वगळून ती जागा “अग्निशमन सुविधा, महानगरपालिका अधिकारी/कर्मचा-यांची निवासस्थाने व इतर आवश्यक सुविधा” या हेतूसाठी आरक्षित करणे योग्य होईल. सबब उपरोक्त आरक्षण क्रमांक (E.P.५) सुधारणा क्रमांक ११-C ट्रक टर्मिनलया खालील क्षेत्र वगळून ते “महानगरपालिका अधिकारी/कर्मचा-यांची निवास स्थाने व इतर आवश्यक सुविधा व अग्निशमन केंद्रे” यासाठी आरक्षित करणे योग्य होईल. यासाठी विकास आराखडयांत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चेकलम ३७ (१) अन्वये फेरबदल करण्यास मा. महासभेची मंजुरी मिळणे आवश्यक आहे. सदर फेरबदल दर्शविणारा विकास योजनेचा भाग नकाशा सोबत सादर करीत आहे. सदर बदलास मा. महासभेची मान्यता मिळाल्यानंतर कलम ३७ (१) अंतर्गत विहीत कार्यवाही करता येईल. सदर फेरबदलास मा. महासभेची मान्यता मिळवण्याच्या हेतूने सदर गोषवारा मान्यतेसाठी सादर.

**महासभा ठराव क्र: ३०** **दिनांक:—**२/१२/२०२१

सुचकाचे नाव :— श्री. कलवंतसिंह सोहता

अनुमोदकाचे नाव :— श्री. शंकर लुंड

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वयेआरक्षण क्र १२१ पब्लीक युटीलिटी सर्विसेस, वाहनतळ, ट्रान्सपोर्ट, मॉलआणि ट्रक टर्मीनसह्याआरक्षणाऐवजी महानगरपालिका वसाहत असे किरकोळ फेरबदल करण्याचा विषय अमान्य करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ११ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ११ :— विस्तारित मुंबई नागरी पायाभुत सुविधा प्रकल्पांतर्गत मंजूरी मिळालेल्या कामांना मा.महासभेची मान्यता मिळणे.**

---

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-** पास..पास.. इतिवत्ताची वाट न पहाता.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** इतिवत्ताची वाट न पहाता, पास..पास..

**काही सदस्य :—**पास—पास……

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ११:—विस्तारित मुंबई नागरी पायाभुत सुविधा प्रकल्पांतर्गत मंजूरी मिळालेल्या कामांना मा.महासभेची मान्यता मिळणे.**

**प्रस्तावना**

मुख्य अभियंता, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे संदर्भिय पत्रान्वये विस्तारित मुंबई नागरी पायाभुत सुविधा प्रकल्पांतर्गत उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील खालील रुपये १०१.८२ कोटींच्या विविध कामांना प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली असून खालील दाखल्यांची व प्रमाणपत्रांची पुर्तता करुन कामांचे तपशिलवार अंदाजपत्रक नकाशासहित प्राधिकरणास सादर करणेबाबत कळविले आहे.

**आवश्यक दाखले**

१) उल्हासनगर महानगरपालिकेने सर्व कामांची तपशिलवार अंदाजपत्रक नकाशासहित प्राधिकरणास सादर करावे.

२) जागा उपलब्धतेचा दाखला

३) केंद्र / राज्य शासनाच्या अन्य कोणत्याही योजनेनुसार काम न झाल्याचा दाखला

४) तसेच सर्व कामांसाठी उल्हासनगर महानगरपालिकेअंतर्गत महासभेच्या मंजूरीची आवश्यकता असल्यास तशी मान्यता घ्यावी.

**कामांची नावे**

| अ.क्र. | कामाचे नाव | मंजूर रक्कम (कोटीमध्ये) | अंदाजित प्राकलनिय किंमत | रस्त्याची लांबी व रुंदी | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | उल्हासनगर-१ येथील ए ब्लॉक ते साईबाबा मंदीर व्हाया डॉल्फीन क्लब ते सेंच्युरी ग्राऊंड ते गुरुद्वारा पर्यंत रस्त्याचे एम ३५० सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे व दुतर्फा नाली बांधणे. | २६.०२ | २६,०२,००,०००/- | लांबी ९८२.५ मीटर रुंदी ३६ मीटर | स्तंभ ५ मध्ये नमुद केलेल्या लांबीचे काम पूर्ण होईल. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | उल्हासनगर-४ सोनारा चौक व्हाया शारदा केस्टल ते कोयंडे रस्त्याचे एम ३५० ने सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे व दुतर्फा नाली बांधणे. | ७.१९ | ७,१९,००,०००/- | लांबी ४१४.५० मीटर रुंदी १८.३० मीटर | स्तंभ ५ मध्ये नमुद केलेल्या लांबीचे काम पूर्ण होईल. |
| ३ | उल्हासनगर-४ वाको कंपाउंड ते व्हीनस चौक पर्यंत रस्त्याचे एम ३५० ने सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे व दुतर्फा नाली बांधणे. | ५२.११ | ६५,००,१७,०००/- | **भाग –A**<br>लांबी २१०० मी., रुंदी ३६ मी.<br>**भाग –B**<br>लांबी ३५० मी., रुंदी ३० मी. | मंजूरी मिळालेल्या रक्कमेत रस्त्याच्या भाग –A लांबी २१०० मीटर, रुंदी ३६ मीटर चे काम पूर्ण होईल.उर्वरीत कामाकरीता रक्कम अपुरी आहे. |
| ४ | उल्हासनगर-३ येथील हिराघाट मंदीर ते डर्बी हॉटेल मार्गे समर्पण अपार्टमेंट येथील रस्ता सि.सि.करणे. | ४.०० | ४,००,००,०००/- | लांबी २९७.४ मीटर रुंदी १२.२० मीटर | स्तंभ ५ मध्ये नमुद केलेल्या लांबीचे काम पूर्ण होईल. |
| ५ | उल्हासनगर-३ येथील शामा प्रसाद मुखर्जी चौक ते शांतीनगर मार्गे विठ्ठलवाडी रेल्वे स्टेशन पर्यंतचा रस्ता सि.सि. करणे. | १२.५ | ३२,५६,७७,०२६/- | लांबी १२५० मीटर<br>रुंदी ३६ मीटर | मंजूरी मिळालेल्या रक्कमेतून विकास आराखडयाप्रमाणे ४७९ मीटर रस्त्याचे काम पूर्ण होईल. उर्वरीत लांबीच्या रस्त्याकरीता रक्कम अपुरी आहे. |
| | **एकूण** | **१०१.८२** | **१३४,७७,९४,०२६/-** | | |

मुख्य अभियंता, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी त्यांचे संदर्भिय पत्रात उल्लेख केल्याप्रमाणे वरील अनु.क्र.१ ते ३ वरील दाखले प्रस्तावासोबत सादर करण्यात येत आहेत. तसेच अनु.क्र.४ ची पुर्तता करण्याकरीता सदर कामांना मा.महासभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. जेणेकरुन दाखले व ठरावासहित परिपूर्ण प्रस्ताव मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचेकडे सादर करण्यात येईल.

तरी वरील रस्त्यांच्या कामांचे परिपूर्ण प्रस्ताव मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचेकडे सादर करणेकरीता सदर प्रस्तावास मा.महासभेची मान्यता मिळणेकरीता महासभेच्या पटलावर ठेवणेस प्रस्तावित.

महासभा ठराव क्र: ३१ — दिनांक:–२/१२/२०२१

**सुचकाचे नाव :– श्री. प्रमोद टाले**

**अनुमोदकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी**

**ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे** विस्तारित मुंबई नागरी पायाभुत सुविधा प्रकल्पांतर्गत मंजूरी मिळालेल्या कामांना मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचेकडे पाठविण्याचे निर्देश **देत आहे.**

**या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.**

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

**महापालिका सचिव :—** विषय क्र. १२ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १२ :— महापालिका कार्यक्षेत्रा करीता आगीच्या दृष्टीने Fire bike With Water Mist कंपनीव्दारा खरेदी करण्याऐवजी (८ ते ९ लाख) कमी खर्चात अग्निशमन विभागा व्दारे नाविण्यपूर्ण उपक्रम राबविण्यास मंजुरी मिळणेबाबत.**

---

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-** पास..पास..

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** पास..पास..

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** एक मिनीट एक विषय तुम्ही रिजेक्ट करतात, गाडी ठेवण्यासाठी जागा नाही आणि एवढी मोठी २६ माळयासाठी तुम्ही गाडी घेत आहेत तर मग हा विषय पण रिजेक्ट करायला लागेल.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** ही बाईक आहे,बाईक.

**सदस्य, श्री. शंकर लुंड:-** मोटर सायकल आहे.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-** फायरची मोटर सायकल आहे, त्यासाठी आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-** इतिवत्ताची वाट न पहाता, पास..पास..

**काही सदस्य :—**पास—पास……

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. १२**:—महापालिका कार्यक्षेत्रा करीता आगीच्या दृष्टीने Fire bike With Water Mist कंपनीव्दारा खरेदी करण्याऐवजी (८ ते ९ लाख) कमी खर्चात अग्निशमन विभागा व्दारे नाविण्यपूर्ण उपक्रम राबविण्यास मंजुरी मिळणेबाबत.

**प्रस्तावना**

उपरोक्त संदर्भिय विषयानुरूप सादर करणेत येते की, आग विझविणेसाठी व आगीपासून जीवीत मालमत्ता यांचे संरक्षण करणेसाठी यंत्रणा सुसज्ज असे अग्निशामक पथक तयार ठेवणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ६ कलम ६३/५ अन्वये तसेच महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव सरंक्षक उपाययोजना अधिनियम २००६ व नियम २००९ ची अंमलबजावणी करणे महानगरपालिकेचे कर्तव्य आहे.

आज रोजी उल्हासनगर शहरात अरूंद रस्ते घनदाट वस्ती, स्मॉल स्केल इंडस्ट्रिज व रहिवाशी विभाग आहेत परंतु अरूंद रस्ते असल्याकारणाने अग्निशमन विभागाच्या फायरव्हॅनला थेट घटनास्थळापर्यंत पोहचण्यास विलंब होतो तसेच कधी कधी फारच अडचणीच्या ठिकाणी फायरव्हॅन पोहचू शकत नाही अशावेळी घटनास्थळापर्यंत पोहचणारे वाहन अग्निशमन सेवेत असणे आवश्यक आहे.

करीता आगीच्या प्राथमिक अवस्थेत आग विझविणारे वाहन म्हणजे Fire Bike With Water Mist हे वाहन अग्निशमन विभागात असणे गरजेचे आहे. सबब Fire Bike With Water Mist सारखी नवीन अद्यावत यंत्रणा आज रोजी बाजारात आलेली आहे. त्याअनुषंगाने उल्हासनगर महानगरपालिका अग्निशमन विभागासाठी घेणे विचाराधीन आहे.

सदर वाहनाच्या खरेदीकरीता रक्कम रू १२,५०,०००/- + IGST/GST रू २,२५,०००/ = एकूण अंदाजित खर्चरूपये १४,७५,०००/- इतका खर्च येणार असून सदरचा खर्च भागविणेकरीता अंदाजपत्रकातील लेखाशीर्ष Part I(II) अग्निशमन वाहन खरेदीमध्ये सन २०२१-२०२२ च्या अंदाजपत्रकामध्ये रूपये १३ कोटीची तरतूद करणेत आलेली आहे.

सबब उपरोक्तबाबत अधिकृत एजन्सीकडून आग विझविणेसाठी Fire Bike With Water Mist वाहन खरेदी केल्यास आवश्यकतेपेक्षा जास्त खर्च वाटतो आहे. माझ्या माहितीनुसार बाजार भावानुसार स्पेअर पार्ट खरेदी करुन तयार केल्यास उल्हासनगर महापालिकेस नाविन्य पुर्ण प्रकल्प तयार होऊन अंदाजे ८,००,०००/- ते ९,००,०००/- लाखामध्ये उपरोक्त प्रमाणे फायर बाईक तयार होईल असा अंदाज आहे.

तरी सदर बाबत उपरोक्त प्रमाणे फायर बाईक महानगरपालिका मार्फत प्रायोगिक तत्वावर विहीत कार्यपध्दती नुसार नव्याने विकसीत करुन घेण्याची जबाबदारी मुख्य अग्निशमन अधिकारी यांची असेल करीता सदरचा प्रस्ताव धोरणात्मक निर्णयास्तव मा. महासभेपुढे मंजुरीकरीता प्रस्तावित करणेत येत आहे.कृपया मान्यतेस्तव सविनय

**महासभा ठराव क्र:३२** **दिनांक:—**२/१२/२०२१

सुचकाचे नाव :— श्री. कलवंतसिंह सोहता

अनुमोदकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे महापालिका कार्यक्षेत्रा करीता आगीच्या दृष्टीने Fire bike With Water Mist कंपनीव्दारा खरेदी करण्याऐवजी (८ ते ९ लाख) कमी खर्चात अग्निशमन विभागाव्दारे नाविण्यपूर्ण उपक्रम राबविण्यास मान्यता देत आहे.

या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. १३ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १३ :— उल्हासनगर शहरात असलेले सर्व मोबाईलटॉवर वर अग्निशमन सेवा शुल्क लागु करणेबाबत**

---

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** पास..पास..

**सदस्य, श्री. जीवन इदनानी:-** कशाला एवढी घाई का?

**सदस्य, श्री. अरुण आशान:-** मा. महापौरजी, मला बोलायचे आहे.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** जीवनभाई बोला.

**सदस्य, श्री. जीवन इदनानी:-** भगवान दादा प्रस्ताव कोणाचा आहे, त्याला स्टेजवर बोलवा.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** आपण पहिले बोला ना.

**सदस्य, श्री. जीवन इदनानी:-** पहिले ज्यांनी प्रस्ताव आणला आहे, त्यांनी सांगावे.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** याटॉवरच्या संदर्भात कोणी अधिकारी असतील त्यांनी माहीती दयावी.

**सदस्य, श्री. जीवन इदनानी:-** गोषवा-यावर सही कोणाची आहे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** उप आयुक्त मुख्यालय यांची आहे.

**सदस्य, श्री. जीवन इदनानी:-** सर कपया करुन सांगा प्रस्ताव काय आहे?

**उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-** आपल्या महानगरपालिकेच्या ज्या मोकळया जागा आपल्याकडे आहेत, शहरामध्ये मोबाईल टॉवर लावले जातात. विविध कंपन्याकडून अशा कंपन्यांची मागणी आहे की, महानगरपालिकेच्या जर सुटेबल जागा असतील, त्या जागांवर त्यांना जर आपण परवानगी दिली तर १०x10 च्या आताच्या नविन टेक्नॉलॉजीनुसार जागा लागते. अशा जागेमध्ये जर आपण त्यांना परवानगी दिली तर मोबाईल टॉवर लावल्या नंतर आपल्याकडे जी जागा पडून आहे, तीला रेट मिळू शकेल आपल्याला दुसरी गोष्ट आपण त्यांना लायसन्स देतो, १ लाख २५ हजार लायसन्स फी लावतो. तिसरी बाब त्याला आपण टॅक्स लावतो. टॅक्स लावण्यासाठी आपल्याला जे पैसे मिळणार आहेत, ते प्राप्त होणार आहेत. त्याच बरोबर आणखी पुढचा एक ठराव आहे अग्निशमन विभागा मार्फत ..

**सदस्य, श्री. जीवन इदनानी:-** साहेब तुम्ही काय वाचत आहेत?

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-**टॉवरचाच चालले आहे.

**सदस्य, श्री. जीवन इदनानी:-टॉवर**चा नाही, हा अग्शिमन विभागाचा आहे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** मा. महापौरजी, विषय क्र.१३ व १४ एकत्र घ्यायला पाहिजे सारखेच आहेत.

**सदस्य, श्री. जीवन इदनानी:-** पहिले १३ चे सांगा.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** वेगवेगळा घ्या, पहिले १३ नंबरचा घ्या, नंतर १४ नंबरचा.

**उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-** माफ करा, मी पुढचा विषय याच्यासाठी सांगत होतो, आपल्या शहरामध्ये एकंदरीत १८० मोबाईल टॉवर आहेत आणि या मोबाईल टॉवरचे जिथे वापर होतो, फेस कनेक्शन असतो लाईट, म्हणजे जास्त प्रभाराच्या लाईट वापरल्या जातात. तिथे फायरची जास्त शक्यता असते. तिथे डिझेल, पेट्रोलचा सुध्दा वापर होतो आणि काही तिथे स्फोट होऊन आगीची शक्यता जास्त असते. या अनुषंगाने इतर महापालिकेमध्ये त्या ठिकाणी आपल्याला अग्शिमन विभागामार्फत जी सेवा पुरवावी लागते त्या अनुषंगाने फायर शुल्क लावले जाते…

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** राजेशभाई तुमचा आवाज येत आहे.

**उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-** फायर शुल्क लावले आहे, २० हजार रुपये प्रत्येक वर्षाला अशा पध्दतीने प्रत्येक वर्षी, प्रत्येक टॉवरला २० हजार रुपये मिराभाईदर, कल्याण डोबिंवली महानगरपालिकेने अग्शिमन शुल्क आकारला आहे. आपल्या महानगरपालिकेच्या क्षेत्रामध्ये अशा प्रकारे शुल्क आकारणी केली जात नव्हती. त्याचा भार आपल्या कुठल्याही नागरीकांवर येत नाही. हा भार आपल्याला मोबाईल टॉवर कंपन्यांकडून आपल्याला प्राप्त होणार आहे आणि तो आपल्या महसुली उत्पन्नाचा मोठा स्त्रोत तयार होऊ शकतो. या अनुषंगाने आपण हा प्रस्ताव आणलेला आहे, यामध्ये आणखी एक थोडी सुधारणा आवश्यक आहे. या टॉवरला आपण मान्यता देतांना त्याचे आपण फायर ऑडीट करावा म्हणून आपण मान्यतेमध्ये दिलेले असते आणि फायर ऑडीट हे दर पाच वर्षानी करावे लागते. ते फायर ऑडीट करतांना देखील इतर महानगरपालिकेमध्ये ऑडीट शुल्क लावले जाते. आपल्याकडून जे ऑडीट केले जाईल

त्याच्यासाठी सुध्दा ११ हजार रुपये एका वेळी शुल्क आकारणी करावी अशी आमची प्रशासनाची इतर महापालिकेच्या धर्तीवर हा ठराव आम्ही आणलेला आहे. हा महापालिकेच्या महसुली उत्पन्नाचा चांगला एक भाग आहे. म्हणून आम्ही हा प्रस्ताव आपल्या समोर आणलेला आहे.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** एक मिनीट जीवनभाई यांना बोलू दया.

**सदस्य, श्री. जीवन इदनानी:-** अशोकराव आपण प्रस्ताव आणला आहे, उत्पन्न वाढवण्यासाठी खुप चांगला विचार आहे. बुडत असलेली नाव वाचवण्यासाठी आपण काय प्रयत्न करीत आहेत? परंतु आपल्या महाराष्ट्रामध्ये एक अ‍ॅक्ट आहे, अ‍ॅक्टनुसारच संपुर्ण कारभार चालत असतो. बरोबर ना कायदयानुसारच कारभार चालतो ना. आपण इथे लिहीले आहे, महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षण योजना अधिनियम २००६ हे मला मान्य आहे. या अ‍ॅक्टमध्ये मला थोडक्यात फक्त तुम्ही तरतुद दाखवा, तुम्ही शुल्क लावतात पण मला तरतुद दाखवा. तरतुद आहे, नाही तर माझेकडे अ‍ॅक्ट आहे, तुम्ही आता वाचून घ्या. याच्यात तरतुद दाखवा. कायदयाच्या प्रमाणे वागा. साहेब थोडक्यात कलम सांगा.

**मुख्य अग्निशमन अधिकारी, श्री. बाळू नेटके:-** सर वास्तविक पाहता, महाराष्ट्र फायर लाईफ सेप्टी मेजर हा महाराष्ट्रा आग प्रतिबंधक योजना हा फक्त् जीवन सुरक्षा आणि फायर सुरक्षा करता आहे आणि फायर सुरक्षा आणि लाईफ सुरक्षा हे पुरवणे ही आपली वैयक्तिक जबाबदारी आहे, त्या अनुषंगाने आपल्याला ही अंमलबजावणी करीत असतांना पैशाची आर्थिक अडचण नक्कीच भासत असते. ही व्यावसायिक बाब असल्याने याला मान्यता देणे अत्यंत आवश्यक वाटते.

**सदस्य, श्री. जीवन इदनानी:-** नाही, नाही, मला तरतुद दाखवा. कलम सांगा. ही दुकानदारी नाही, किराणा दुकान नाही, ते देणार. तरतुद सांगा.

**मुख्य अग्निशमन अधिकारी, श्री. बाळू नेटके:-** सर संपुर्ण महाराष्ट्रामध्ये सर्व महानगरपालिकेमध्ये या अ‍ॅक्टच्या ...

**सदस्य, श्री. जीवन इदनानी:-** मिरा भाईदर महापालिकेने चुकीचे केल, कल्याण डोबिंवली महानगरपालिकेने चुकीचे केले आहे, तर आपण का चुकीचे करायचे?

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-** सन्माननिय महापौरजी, या अधिका-याने महापैरांचा उच्चार केला नाही, महापौरांचा अपमान केला आहे. सन्माननिय महापौर, सन्मानिय उप महापौर, सन्माननिय आयुक्त साहेब असा उच्चार केला नाही. बोलणे चालू करण्याच्या पहिले उच्चार केला नाही. हे चुकीचे आहे.

**मुख्य अग्निशमन अधिकारी, श्री. बाळू नेटके:-** सॉरी सर.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-** यासाठी महापौरांची माफी मागायला पाहीजे.

**मुख्य अग्निशमन अधिकारी, श्री. बाळू नेटके:-** सर मी माफी मांगत आहे.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** ठिक आहे, बोडारे साहेब बोला.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:-** एक आहे, इथे प्रत्येक सदस्य अशी भावना ठेवतात की मी म्हणजे सभागह प्रत्येकाने आपले विचार ठेवा. चर्चा आल्या नंतर त्याच्यावर चर्चा झाली पाहीजे, सकारात्मक असेल नाकारात्मक त्याच्यात दोघांचे नंतर मतदान घ्या, त्याच्या अगोदर मी बोलत आहे तसे झाले पाहीजे, ही भावना कशासाठी तुम्ही प्रत्येकाने तुमचे मत व्यक्त केलेले आहे. आमचे मत व्यक्त करु दया, प्रत्येकाचे होईल त्याच्या नंतर निर्णय महासभा घेईल ना. इथे आपले वैक्तिक कोणाचेच काही नाही. जे होणार ते शहरासाठी.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** मा. महापौरजी,

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:-** मला त्या पुर्वी जर टॉवर उभारल्याने लोकांच्या मनामध्ये एक प्रश्न निर्माण होतो की, रेडीएशनचा त्रास होतो हा आहे का? होतो की, नाही हे महापालिकेने स्पष्ट करायला पाहीजे. दुसरे मागच्या वर्षी दोन वर्षा पुर्वी एका टॉवरची चोरी केली जाते किंवा जे टॉवर आहेत, त्या पेक्षा कमी दाखवले जातात म्हणून आपण एक एजन्सी नेमली होती. त्यामुळे महापालिकेला फायदा झाला. कारण महापालिकेला पैसे मिळत होते. त्या एजन्सीमुळे फायदा झाला का नुकसान झाले किंवा आहे तेवढेच आहे आणि जीवन महाराष्ट्र शासन आग प्रतिबंधक १९६६ हे फक्त त्यांनी नमुद केलेले आहे. पण कुठे काय लावायचे हा अधिकार महापालिकेला आहे,

कारण स्थानिक स्वराज्य संस्था आमची आहे. त्यामुळे प्रशासनाचे उत्पन्न वाढवण्यासाठी नागरीकांवर भुर्दंड न पडता कंपन्यांवर भुर्दंड पडत असेल तर वसुली करायला काही हरकत नाही, त्यासाठी करायला काही हरकत नाही, असे माझे वैयक्तिक मत आहे. त्यामुळे पास करण्यात यावा. या पुर्वी रेडीएशनचा जो त्रास होतो तो होतो की नाही, आमच्या गट नेत्यांनी प्रश्न विचारला हे महापालिकेने स्पष्ट करायला पाहीजे आणि प्रत्येक ठिकाणी उभारल्या नंतर लोक घाबरणार. महापनगरपालिने जर रेडीएशन होते, जर होत नसेल तर …

**सदस्य, श्री. शंकर लुंड:-** महापौर महोदया, आयुक्त साहेब, सगळयांना माहीती आहे की, आपल्या शहराचा कचरा ४ तारखेला उचलणे बंद होणार आहे. हा विषय लवकरात लवकर पुर्ण करण्यात यावा आणि १६ नंबरचा व १८ नंबरचा लवकरात लवकर घेण्यात यावा. कारण काय आहे तुम्हांला माहीती आहे नाही तर ५ तारखे नंतर आम्ही सगळे रस्त्यावर उतरणार आहेत, आपल्याला माहीती आहे. कचरा कोण उचलणार आहे.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** चला हा विषय पास इतिवत्ताची वाट न पाहता, पास..

**सदस्या, श्रीम. अंजली साळवे:-** एक मिनीट मला एक प्रश्न विचारायचा आहे. महापौर मॅडम मला एकच प्रश्न साहेबांना विचारायचे आहे, आपण या खाजगी मालमत्तेवर हे मोबाईल टॉवर लावत आहेत,

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** विषय क्र. १३ व १४ दोन्ही पास.

**सदस्य, श्री. जीवन इदनानी:-** मतदान घ्या, मतदान घ्या. दादागिरी बंद करा, मतदान घ्या.

**सदस्या, श्रीम. अंजली साळवे:-** मा. महापौर मॅडम मला एक प्रश्न विचारायचा आहे, नाईकवाडे साहेब

**महापालिका सचिव:-** मतदानाची चार जणानी मागणी केली पाहीजे.

**सदस्य, श्री. जीवन इदनानी:-** मॅडम मतदान घ्या.

**सदस्या, श्रीम. मिना सोनेजी:-** प्रत्येक विषय शहरासाठी गरजेचा आहे. अंजली मॅडम बोलत आहेत, लेडीजला बोलू दया.

**सदस्य, श्री. शंकर लुंड:-** पास..पास..

**सदस्या, श्रीम. मिना सोनेजी:-** असे कसे पास.

**सदस्या, श्रीम. अंजली साळवे:-** मा. महापौर मला एक प्रश्न विचारायचा आहे, आपण खाजगी मालमत्तेवर महापालिकेशी संबंध आहे. खाजगी मालमत्तेवर जर आपण मोबाईलटॉवर लावले तर आपण त्यांच्याकडून ५ टक्के कर वसुली करतो का? भाडेतत्वावर आपण देतो.

**महापालिका सचिव:-** मतदानासाठी चार जण लागतील चार सदस्यांनी हात वर केले तरच मतदान होईल.

**सदस्य, श्री. अरुण आशान:-** तुम्ही आम्हांला खाली बसायला सांगतात आणि एक महिला सदस्या सभागृहामध्ये बोलत असतांना शांतता पाहीजे की नाही.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:-** खाली बसा त्या बोलत आहेत ना.

**सदस्या, श्रीम. अंजली साळवे:-** मा. महापौर मला एक प्रश्न विचारायचा आहे, आपण खाजगी मालमत्तेवर जो मोबाईल टॉवर लावत आहेत, त्यांचे महापालिके मार्फत जो सर्व सामान्यांना कर लावला जातो तो त्यांना लावला जातो का? भाडेतत्वावर आपण ज्या मालमत्ता देतो त्यांच्याकडून आपण कर वसुल करतो तो मोबाईलटॉवर कडून वसुल करतो का?

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** किशोरभाई शांत बसा.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:-** भाडेतत्वावर जी मालमत्ता आपण देतो, समजा माझी प्रॉपर्टी आहे मी मालक आहे एक लाख रुपये भाडयाने दिले आहे, तर माझेकडून महापालिका ७५ हजार रुपये वसुल करते तर त्याच प्रकारे कर घेतो का?

**उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-** होय आपण त्यांच्याकडून पण घेतो.

**सदस्य, श्री. शंकर लुंड:-** पास..पास..

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>** मतदानासाठी चार सदस्यांनी मागणी केली पाहिजे आम्ही चार सदस्य आहेत.

**<u>सदस्य, श्री. जीवन इदनानी:</u>**- १३ नंबरच्या विषयाला आमचा विरोध आहे, मतदान घ्या.

**<u>महापालिका सचिव:-</u>** मतदानासाठी चार सदस्यांनी मागणी केली पाहिजे.

**<u>उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-</u>** मतदानासाठी चार सदस्य पाहिजेत. चार सदस्य नाहीत.

**<u>सदस्य, श्री. जीवन इदनानी:</u>**- हे चुकीचे आहे.

**<u>उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-</u>** जीवनभाई मतदानासाठी नियमानुसार चार सदस्य पाहिजेत. फक्त तीनच आहेत. पास..पास.. १५ नंबरचा विषय घ्या.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:-</u>** १४ नंबरचा आहे.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-</u>** इतिवत्ताची वाट न पहाता.

**<u>उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-</u>** विषय क्र.१३ व १४ दोन्ही पास झाले आहेत.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-</u>** इतिवत्ताची वाट न पहाता.

**<u>महापालिका सचिव:-</u>** विषय क्र.१३ मध्ये वोटींग नसल्यामुळे इतिवतेच्या चर्चेचा विरोध येईल, इतिवत्ताची वाट न पहाता हा विषय पास झाला आहे.

**<u>काही सदस्य :—</u>**पास—पास……

**<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी:—</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. १३ :—उल्हासनगर शहरात असलेले सर्व मोबाईलटॉवर वर अग्निशमन सेवा शुल्क लागु करणेबाबत.**

**<u>प्रस्तावना</u>**

उपरोक्त विषयानुरूप सादर करणेत येते की आज रोजी उल्हासनगर शहरात ७० ते ८० पेक्षा जास्त विविध कंपन्यांचे मोबाईल टॉवर्स इमारतीवर उभारणी करणेत आलेली आहे. संबंधीत मोबाईल टॉवर्स धारकांनी आज पर्यंत अग्निशमन विभागा मार्फत आगीच्या सुरक्षितेच्या दृष्टीने अग्निशमन ना हरकत दाखला घेतलेला नाही त्यामुळे महापालिकेचे आर्थीक नुकसान होऊन महसुल बुडत आहे ही बाब अयोग्य आहे.

महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक योजना अधिनियम २००६ मधील तरतूदी अन्वये सदर ठिकणी पुरेशी आग प्रतिबंधक उपाय योजना करण्यात आलेल्या नाही भविषात आगी सारखी दुर्घटना होऊ नये अधिनियमाचे तरतूदी अन्वये आग प्रतिबंधक उपाय योजना करुन अग्निशमन सेवा फी वसुल करणे गरजेचे आहे.

मा.मोहदय आपले निदर्शनास आणू इच्छीतो की मिरा भाईंदर महानगरपालिका आणि कल्याण डोंबिवली महानगरपालिका कार्यक्षत्राकरीता मोबाईल टॉवर्सचे अग्निशमन सेवा शुल्क रक्कम रूपये २०,०००/- (वीस हजार) प्रमाणे प्रती वर्षी वसुली करणेत येत आहे त्याच धर्तीवर उल्हासनगर महानगरपालिका अग्निशमन विभागा मार्फत रक्कम रुपये २०,०००/- मात्र प्रती वर्षी अग्निशमन सेवा शुल्क वसुल करणे करीता प्रस्तुत अग्निशमन सेवा शुल्क मालमत्ता कर विभागा मार्फत वसुल करून आग सुरक्षा निधी (FIRE PROTECTION FUND) मध्ये जमा करणे करीता मा. महासभेपूढे प्रस्ताव धोरणात्मक निर्णयास्तव सादर करणेत येत आहे.
कृपया मान्यतेस्तव सविनय सादर

**महासभा ठराव क्र:३३** **दिनांक:—**२/१२/२०२१

सुचकाचे नाव :— श्री. कलवंतसिंह सोहता

अनुमोदकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्यानुसार महापालिका क्षेत्रातील मोबाईलटॉवरना अग्निशामन शुल्कम्हणून रु.२०,०००/- प्रतीवर्ष आकारण्यास तसेच फायर ऑडीट करण्यास रु.११,०००/- इतके शुल्क आकारण्यास मान्यता देण्यात येत आहे.

या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. १४ वाचुन दाखवितात

—————————————————————————————————————

⇨ **विषय क्र. १४ :— उल्हासनगर महानगरपालिकेच्या मालकिच्या जागांवर मोबाईलटॉवर उभारण्याकरीता परवानगी तसेच दरनिश्चिती करून मिळणेबाबत**

—————————————————————————————————————

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** पास..पास..

**काही सदस्य :—**पास—पास......

**महापौर तथा पीठासीन अधिकारी:—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र.** १४:—उल्हासनगर महानगरपालिकेच्या मालकिच्या जागांवर मोबाईलटॉवर उभारण्याकरीता परवानगी तसेच दरनिश्चिती करून मिळणेबाबत.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिकेच्या मालकीच्या जागांवर मोबाईल टॉवर उभारण्याकरीता परवानगी मिळणेबाबत इंडस टॉवर्स कंपनीमार्फत विनंती अर्ज प्राप्त झाला आहे.

महोदय खाजगी मालकिच्या जागांवर मोबाईलटॉवर उभारण्याकरीता ना हरकत प्रमाणपत्र देण्याची कारवाई नगररचना विभागामार्फत करण्यात येते. मात्र सदर विनंती प्रस्ताव हा महापालिकेच्या मालकी असलेल्या जागांवरटॉवर उभारण्यासाठीचा आहे.

महापालिकेच्या ताब्यात समाजमंदीरे, मैदाने इ. असे जवळपास १०५५ मालमत्ता असून या जागांवर टॉवर उभारण्यासाठी परवानगी दिल्यास महापालिकेच्या उत्पन्नात भरीव वाढ होउ शकते असे या विभागाचे मत आहे.

शासन निर्णय क्र. मा.त.स.०६५/प्र.क्र.१ /२०१८ अन्वये शासनाने दुरसंचार पायाभुत सुविधा धोरण निर्गमित केले असून त्यामध्ये स्थानिक संस्थांच्या मालकीच्या जागांवर मोबाईलटॉवर उभारणेची परवानगी देण्यात आली आहे.

महापालिकेच्या मालकीच्या जागांवर मोबाईलटॉवर उभारण्याकरीता भाडयाची आकारणी करणे व त्याप्रमाणे भाडे रक्क्म निश्चित करणे आवश्यक असल्याने परवानगीचा कालावधी एक वर्ष इतका निश्चित करून प्रचलित रेडीरेकनर नुसार येणा-या जमिनीच्या मुल्याच्या ८ टक्के प्रतिवर्ष याप्रमाणे येणारे मासिक भाडे किंवा प्रतिमहिना रु.१०,०००/- यापैकी जे जास्त्ा असेल त्याप्रमाणे भाडयाची रक्क्ाम आकारणी करण्यास व तद्नंतर येणारे परवानगीचे नुतनीकरण करतांना जमिनीची मूल्य्ा प्रचलित रेडीरेकनर विचारात घेउन जमिनीच्या मुल्याच्या ८ टक्के अथवा रु.१०,०००/- मध्ये १० टक्के वाढ करून येणारी रक्क्म यापैकी जे जास्त्ा असेल ते भाडे रक्क्म आकारणी करण्यास ठाणे महापालिकेच्या महासभेने सभेने मान्यता दिली आहे.

त्याचधर्तीवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७३ (क) अन्वये संविदा करण्यासाठी खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन मा.स्थायी समितीची मान्यता घेण्यासाठी सदर प्रस्ताव प्रस्तावित करण्यात येत आहे.

**अटी व शर्ती**

१) सदर जागा कंपनीमार्फत निश्चित केल्यावर सार्वजनिक बांधकाम विभागाकडुन प्रचलित रेडीरेकनर दरानुसार किंवा प्रतिमहिना रु.१०,०००/- यापैकी जे जास्त्ा असेल ती दरनिश्चिती करून भाडे आकारले जाईल.

२) प्रथम मागणी करणा-या कंपनीस प्रथम प्राधान्य दिले जाईल.

३) मोबईलटॉवर व कॅबीन ज्या उददेशासाठी परवानगी देण्यात आलेली आहे त्याच उददेशाकरीता वापर करण्यात यावा.

४) मोबईलटॉवरच्या ठिकाणी कोणत्याही कारणास्तव जिवीत अथवा वित्तहाणी होणार नाही, याची सर्व जबाबदारी कंपनीची राहील. महानगरपालिका याबाबत कोणतीही नुकसान भरपाई देणार नाही.

५) मोबाईलटॉवर संरचनेचे स्थिरता (Structure Stability Certificate) प्रमाणपत्र घेणे बंधनकारक राहिल.

६) मोबईलटॉवर उभारणेकरीता लागणा-या वाहतुक पोलीस विभागाची व इतर शासकीय विभागाच्या परवानग्या घेण्याची जबाबदारी कंपनीची राहील.

७) मालमत्ता विभागाकडुन देण्यात येणारी नाहरकत परवानगी ५ वर्ष वैध असेल मात्र दरवर्षी १० टक्के या दराने दरवाढ करण्यात येईल. वैध कालावधी संपण्याच्या एक महिन्याआधी कंपनीने रीतसर अर्ज टाकुन नुतनीकरण करून घेणे गरजेचे राहील.

८) मोबाईलटॉवर असलेल्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे / विद्युत जोडणी करणे व बिल अदा करणेची जबाबदारी कंपनीची राहील.

९) सबळ कारणास्त्व आपणांस दिलेली परवानगी कोणत्याही क्षणी रदद करण्याचे अधिकार मा.आयुक्त्ा सो. यांचे राहतील.

१०) भविष्यात नैसर्गिक आपत्तीमुळे मोबाईलटॉवरचे नुकसान होउन कोणत्याही प्रकारची हानी झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कंपनीची राहील.

११) मोबाईलटॉवर करीता लागणारा विद्युतपुरवठा हा महापालिकेच्या खांबावरून न घेता महाराष्ट्र राज्याविद्युत वितरण कं.मर्या यांच्याकडून घ्यावा.

१२) मोबईलटॉवर उभारताना सदर जागी कोणतीही झाडे तोडता येणार नाही किंवा झाडाच्या फांद्या छाटता येणार नाही.

१३) मोबाइलटॉवरच्या आजुबाजुला सुरक्षिततेच्या दृष्टीने कुंपन घालणे बंधनकारक राहील.

१४) मोबईलटॉवरमुळे आसपासच्या नागरीकांना त्रास/गैरसोय /मार्गात अडथळा निर्माण होणार नाही याची

खबरदारी घेण्याची जबाबदारी कंपनीची राहील.

१५) मोबाईलटॉवर उभारण्याच्या वेळी लागणाऱ्या पाण्याची व बांधकाम साहित्याची व्यवस्था कंपनीने करावी.महापालिकेच्या पाण्याचा वापर करता येणार नाही.

१६) मोबाईल टॉवर उभारतांना निर्माण होणारा मलबा रस्त्यावर/ फुटपाथवर पडून नागरीकांना त्रास होणार नाही याची काळजी घ्यावी.

१७) मोबाईलटॉवरच्या ठिकाणी पाणी साचुन मलेरीया , डेंग्यु सारखे रोग पसरणार नाही याची दक्षता घ्यावी व नियमितपणे निर्जतुकीकरण करण्याची जबाबदारी परवानगी धारकाची राहील.

१८) टॉवर बांधकाम करण्यासाठी रस्ते खोदकाम करावयाचे असल्यास सार्व.बांधकाम विभागाची परवानगी घेणे बंधनकारक राहील.

१९) परिसरातील नागरिकांच्या रेडिएशन संबंधित तक्रारी निवारण्याची जबाबदारी कंपनीची राहील.

२०) मालमत्ता विभागाकडुन दिली जाणारी सदर परवानगी ही फक्त जागा वापरासंदर्भात असूनटॉवरसाठी लागणारी इतर तांत्रिक मान्यता व ना-हरकत दाखला नगररचना विभागाकडुन घेणे बंधंणकारक राहील.

२१) मालमत्ता विभागाच्या परवानगी नंतर सदर मोबाईलटॉवरचे मालमत्ता कर देय असल्यास तो संबंधितांनी तात्काळ भरणे आवश्यक राहील.

**महासभा ठराव क्र:३४** **दिनांक:—**२/१२/२०२१

सुचकाचे नाव :— श्री. कलवंतसिंह सोहता

अनुमोदकाचे नाव :— श्री. शंकर लुंड

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या अटी व शर्तीनुसार उल्हासनगर महानगरपालिकेच्या मालकीच्या जागांवर मोबाईलटॉवर उभारण्याकरीता परवानगी व दरनिश्चिती करणेस मान्यता देत आहे.

या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. १५ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १५ :— उल्हासनगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक - २०२२ अर्थ संकल्प २०२१-२०२२ मध्ये निवडणूक खर्चासाठी एकूण रुपये १३.५० कोटीची तरतुद करणेबाबत.**

---

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** मी अधिका-यांस निवेदन करतो की, एवढी मोठी रक्कम ठेवली आहे, १३.५० करोड रुपये ठेवले आहेत तर खुलासा करण्यात यावा. मागच्या वेळचा खर्च अर्ध्याहून कमी आहे. ५ करोड ९८ लाख ६ करोड आणि आता पाच वर्षामध्ये १३.५० करोड रुपये खर्च कसा झाला?

**सदस्य, श्री. भारत राजवानी:-** केंद्र सरकारने दर वाढवले आहेत.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** हा विषय समजावून सांगावा.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** मनिष हिवरे बोला.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** मा. महापौरजी, पहिले अधिका-यांना बोलू दया.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-** पास..पास..

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** १३.५० करोड मधून किती करायचे आहेत, ८ करोड.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** असे कसे मनानेच करणार?

**सदस्य, श्री. भारत राजवानी:-** महागाई वाढली आहे.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-** डिझेलचे भाव वाढले आहेत, एल.पी. जी. गॅसचे भाव वाढले आहेत.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** जीवनभाई यांना बोलू दया, १३.५० करोड पाहिजेत का?

**सदस्य, श्री. जीवन इदनानी:-** मनिषभाई हे किती आहेत, १३.५० करोड आहेत का? हे कुठून आणार आहेत.

**सहा. आयुक्त, निवडणूक, श्री. मनिष हिवरे:-** मा. महापौर, सन्माननिय सभागृह..

**सदस्य, श्री. जीवन इदनानी:-** आयुक्त साहेब, तुम्हांला माहीती आहे का १३.५० करोड जरा लक्ष दया. इथे कोणी ऐकत नाही, बोलू देत नाहीत, अत्याचार आहे. १३.५० करोड कुठून येणार आहेत हे पहिले सांगा.

**सहा. आयुक्त, निवडणूक, श्री. मनिष हिवरे:-** मा. महापौर, मा. उप महापौर, मा. आयुक्त, सन्माननिय सदस्य, आता उल्हासनगर महापनगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक येत आहे. त्यांचा निवडणूक आयुक्तांनी कार्यक्रम जाहीर केलेला आहे. हा कार्यक्रम कधीही जाहीर होऊ शकतो. आपल्याला निवडणूक लढवण्यासाठी आपल्याला गेल्या वेळेला सार्वत्रिक निवडणूक सन २०१७ मध्ये आपल्याला जो खर्च आला होता तो ५ करोड ९८ लाख एवढा खर्च आला होता. त्याचेच विश्लेषण करुन त्याचेच सुधारीत करुन निवडणूक अधिकारी आणि कर्मचारी यांचे मानधन आता सर्वांना ७ वा वेतन आयोग लागू झाला आहे आणि सर्वांना ७ वा वेतननुसारच मानधन दयावे लागणार आहे. म्हणून त्याच्यामध्ये वाढ झालेली आहे. ती गेल्या वेळेला आपण १ कोटी रुपये खर्च केले होते आणि त्याच्यात आपण २ कोटी वाढीव कलेले आहेत, ३ कोटी केले आहेत. इतर साहीत्य आणि छपाई खर्च गेल्या लॉकडाऊनमध्ये दर वाढ झाली असल्यामुळे त्यातही वाढ झालेली आहे, त्यात १.२५ कोटी होते ते आपण २.७५ कोटी पकडलेले आहेत. प्रशिक्षणावरील खर्च वाढलेला आहे. जिथे ५ लाख रुपये प्रशिक्षणावर केला होता आता २० लाख रुपये पडकलेला आहे आणि मतदार जागतीवरील खर्च, अभियानावरील खर्च, वाहनावरील खर्च, वाहनावरील मेजर आता पेट्रोल आणि डिझेलचे भाव वाढलेले आहेत, कार्यालयीन खर्चामध्ये वाढ झालेली आहे, इतर खर्चामध्ये वाढ झालेली आहे, असे आपण एकुण १३.५० कोटी पकडले आहेत.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** पास इतिवत्ताची वाट न पहाता.

**सदस्य, श्री. शंकर लुंड:-** पास..पास..

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** १६ नंबरचा विषय घ्या.

**सदस्य, श्री. कलवंतसिंह सोहता:-** जीवनभाई यांना बोलू दया.

**सदस्य, श्री. जीवन इदनानी:-** हे पैसे कुठून येणार आहेत?

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** आपण खुप चांगल्या प्रकारे खुलासा केला आहे. सगळे संतुष्ट झाले आहेत, इतिवत्ताची वाट न पहाता, पास..पास..

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** खुल्या वातावरणात निवडणूका झाल्या पाहिजेत आणि चांगल्या पध्दतीने झाल्या पाहिजेत.

**सदस्य, श्री. शंकर लुंड:-** पास..पास.. इतिवत्ताची वाट न पहाता.

**सदस्य, श्री. जीवन इदनानी:-** आयुक्त साहेब मला सांगा

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** सचिव मॅडम विषय क्र.१६ घ्या.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:-** मॅडम दुसरा विषय वाचायला घ्या.

**महापालिका सचिव:-** हा विषय पास झाला आहे, पण इदनानी साहेबांचा विरोध आहे.

**सदस्य, श्री. राजेश वानखेडे:-** हा विषय मागे घ्यायला लावा. कोण विरोध करीत आहे, नाव सांगा.

**महापालिका सचिव:-** हा विषय पास झाला आहे, ज्यांचा विरोध आहे, इदनानी साहेबांचा विरोध आहे इतिवत्तात चर्चेच येईल वेगळ नाही.

**काही सदस्य :—**पास—पास……

**महापौर तथा पीठासीन अधिकारी:—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

विषय क्र. १५:—उल्हासनगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक - २०२२

अर्थ संकल्प २०२१-२०२२ मध्ये निवडणूक खर्चासाठी
एकूण रुपये १३.५० कोटीची तरतुद करणेबाबत...

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिकेच्या अर्थ संकल्प २०२१-२०२२ मध्ये लेखा शिर्ष ई संकीर्ण उपलेखा शिर्ष **'अ'** अंतर्गत निवडणूकीच्या खर्चासाठी एकूण रुपये ३.५० कोटीची आर्थिक तरतुद केलेली आहे.

सन फेब्रुवारी २०१७ मध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणूकीनंतर महानगरपालिकेची मुदत एप्रिल २०२२ मध्ये पूर्ण होत असुन त्यापूर्वी फेब्रुवारी २०२२ पर्यत आगामी सार्वत्रिक निवडणूक अपेक्षित असुन सार्वत्रिक निवडणूक २०२२ साठी प्रारुप प्रभाग रचनेचा कच्चा आराखडा तयार करण्याचे कामकाज या पुर्वीच सुरू झाले असुन प्रशासनातर्फे निवडणूकीची पुर्व तयारीचे कामकाज सुरू झालेले आहे.

संपुर्ण निवडणूक प्रक्रिया पार पाडण्यासाठी अर्थसंकल्पातील ई - संकिर्ण उपलेखा शिर्ष **'अ'** अंतर्गत रुपये ३.५० कोटिची तरतुद केलेली आहे ती अपुरी असून वाढविण्याची आवश्यक्ता आहे.

सन २०१७ च्या सार्वत्रिक निवडणूकीसाठी एकूण रुपये ५.९९ कोटी खर्च झालेले आहेत. त्यातील महत्वाचे मुद्येपुढिलप्रमाणे :-

| अ.क्र. | विषय | सन २०१७ मध्ये झालेला खर्च | सन २०२२ मध्ये अपेक्षित खर्च | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | निवडणूक अधिकारी / कर्मचारी यांचे मानधन | ९९.८७ लक्ष | ३.०० कोटी | सदरचे मानधन व अतिकालनभत्ता ६ व्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणी प्रमाणे अदाकेलेले आहेत आता शासकीयकर्मचाऱ्यांना ७ व्या वेतन आयोग लागु झालेला असल्याने मानधन व भत्यासाठी एकूण रुपये ३ कोटी रुपये अंदाजित खर्च अपेक्षित आहे. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | मतदान साहित्यावरील खर्च | १.२५ कोटी | १.७५ कोटी | आगामी सार्वत्रिक निवडणूक २०२२ साठी एकूण रुपये २.५० कोटी खर्च अपेक्षित आहे. |
| | प्रशिक्षणावरील खर्च | ५.७० लक्ष | १०.०० लक्ष | |
| | आचारसंहिता | ३३.३५ लक्ष | ६५.०० लक्ष | |
| ३ | मतदान जागृती अभियानावरील खर्च व | ३३.६७ लक्ष | ६०.०० लक्ष | आगामी सार्वत्रिक निवडणूक २०२२ साठी एकूण रुपये २.०० कोटी रुपये अंदाजित खर्च अपेक्षित आहे. |
| | स्विप करीता खर्च | | १.४० कोटी | |
| ४ | वाहनावरील खर्च | १.१५ कोटी | ३.०० कोटी | सन २०१७ च्या तुलनेने पेट्रोल/डिझेल मध्ये दुपटीने दर वाढ झालेली आहे. तसेच भाडेतत्वावरील वाहनासाठी देखील भाडे वाढ झालेली आहे. त्यामुळे यावेळेस वाहनावरील एकुण वाढीव खर्च रुपये ३ कोटी अंदाजित अपेक्षित आहे. |
| ५ | कार्यालयीन खर्च | ७४.७५ लक्ष | १.०० कोटी | आगामी सार्वत्रिक निवडणूक २०२२ साठी एकूण रुपये १.०० कोटी रुपये अंदाजित खर्च अपेक्षित आहे. |
| ६ | इतर खर्च | ६७.३६ लक्ष | २.०० कोटी | आगामी सार्वत्रिक निवडणूक २०२२ साठी एकूण रुपये २.०० कोटी रुपये अंदाजित खर्च अपेक्षित आहे. |
| ७ | एकुण खर्च | ५,९८,४४,०९२/- | अंदाजे १३.५० कोटी | |

उपरोक्त नमुद सर्व मुद्दे तसेच सर्वसाधारण चलनवाढ व महागाईचा दर विचारात घेता सन २०२१ - २०२२ च्या अर्थसंकल्पामध्ये निवडणूक खर्चासाठीची ई- संकिर्ण मध्ये केलेली रु. ३.५० कोटींची तरतुद आगामी सार्वत्रिक निवडणूक २०२२ करीता अपुरी असल्याने ई- संकिर्ण अंतर्गत उपलेखा शिर्ष अ या लेखाशिर्षात रुपये १०.०० कोटीची अतिरीक्त तरतुद करुन एकत्रित रु. १३.५० कोटीची तरतुद करण्याकरीता महासभेसमोर प्रस्ताव मान्यतेस्तव ठेवण्यात येत आहे.

**महासभा ठराव क्र:३५** **दिनांक:—**२/१२/२०२१

सुचकाचे नाव :— श्री. कलवंतसिंह सोहता

अनुमोदकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे सर्व मुद्दे तसेच सर्वसाधारण चलनवाढ व महागाईचा दर विचारात घेता सन २०२१ - २०२२ च्या अर्थसंकल्पामध्ये निवडणूक खर्चासाठीची ई- संकिर्ण मध्ये केलेली रु. ३.५० कोटींची तरतुद आगामी सार्वत्रिक निवडणूक २०२२ करीता अपुरी असल्याने ई- संकिर्ण अंतर्गत उपलेखा शिर्ष अ या लेखाशिर्षात रुपये १०.०० कोटीची अतिरीक्त तरतुद करुन एकत्रित रु. १३.५० कोटीची तरतुद करण्यास मान्यता देत आहे.

या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**<u>महापालिका सचिव :—</u>** विषय क्र. १६ वाचुन दाखवितात

———————————————————————————————————————

⇨ **विषय क्र. १६ :— घनकचरा व्यवस्थापन अधिनियम २०१६ अंतर्गत शहरात दैनंदिन निर्माण होणारा घनकचरा घरोघरी जाउन वर्गीकृत घनकचरा गोळा करून वाहतुक करण्यासाठी DPR अंतर्गत खरेदी करण्यात येणा-या वाहनासह नविन अतिरीक्त वाहने उपलब्ध करुन घेवून वाहनांचा मनुष्यबळासह देखभाल दुरुस्ती (O&M) चा आठ वर्षासाठी अभिकर्ता नेमणुकीबाबत महासभेच्या धोरणात्मक निर्णयास्तव सविनय सादर.**

———————————————————————————————————————

**<u>उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-</u>** अरुण आशान १६ नंबर विषयावर बोला.

**<u>सदस्य, श्री. अरुण आशान:-</u>** उल्हासनगर शहरामध्ये घनकचरा व्यवस्थापन बाबत हा जो विषय आलेला आहे, खरे म्हणटले तर सर्व सदस्यांनी या विषयावर गांर्भीयाने घ्यायला पाहीजे कारण काय याची जी मुदत आहे, ती ४ डिसेंबरला संपत आहे, प्रशासनाकडून विषय आला ४ डिसेंबरला मुदत संपत असल्यामुळे डीपीआर काढून आपल्याला तातडीने हे काम करणे आवश्यक आहे. महापौर मॅडम, उप महापौर साहेब, यामध्ये काही अटी शर्ती टाकून लवकरात लवकर करायला पाहिजे. यामध्ये प्रशासनाच्या माध्यमातून काही तरी कमतरता दाखवून गाडयाच्यामध्ये कमतरता दाखवली आहे. परंतु आता पुर्वी ८ वर्षाच्या टेंडरमध्ये आणि आता कच-याचे प्रमाण बघता आपण लवकरात लवकर हा डिपीआर मंजुर करुन देण्या करीता आपण टेंडर प्रक्रिया अटी शर्तीनुसार करावा आणि यामध्ये मनुष्यबळासह प्रशासनाने जे केले आहे,मला वाटते की, हा प्रशासनाकडून थोडा उशिरा आलेला आहे. परंतु या विषयावर जास्त चर्चा न करता ४ तारखेला टेंडर संपत आहे, त्या नंतर संपुर्ण शहरामध्ये हा कचरा दिसणार आहे. त्यामुळे या डीपीआरला मंजूरी करण्यात यावी.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-</u>** ही गोष्ट खरी आहे की, अरुणजीने सांगितले आहे की, महत्वाचा मुददा आहे, याला पास करायला पाहीजे. परंतु माझी भावना वेगळी आहे. जर आल्याकडे एवढा वेळ होता तर चर्चा न करता पास का करीत आहेत आणि हा मुददा ८ वर्षाचा डीपीआर आणला आहे. यामध्ये काही राजकीय पक्ष रस्त्यावर उतरले आहेत की, उल्हासनगरचा ५ नंबरचा डंपिंग ग्राउंड जो आहे तो ट्रान्सफर होईल आणि उसाटणे गाव येथे होईल. त्यासाठी भरपूर राजकारण झाले. राजकारण असे झाले की, विरोधी पक्षाने सत्ता पक्षावर आरोप केले, सत्ता पक्षाने विरोधी पक्षावर आरोप केले. संपुर्ण महाराष्ट्रामध्ये संपुर्ण शहर कचरामुक्त होईल तर ८ वर्षासाठी कचराकुडी मुक्त करण्यासाठी डिपीआर आणला आहे. कचराकुंडी मुक्त करण्यासाठी डिपीआर आणला जावा. कारण की, सत्तेवाले बोलत आहेत की, कचरा कुंडीमुक्त होईल आणि कच-याची जिथल्या तिथे विल्हेवाट लावली जाईल. तर मग अजून ८ वर्षे उल्हासनगरची जनता कचराकुंडीवर कचरा बघणार का? हा ८ वर्षासाठी डिपीआर आणणे हा मोठा अपराध आहे.उलहासनगरच्या लोकांबरोबर आपण अन्याय करीत आहेत. आपल्या जवळच्या नगरपालिकेत बदलापूर, अंबरनाथ, कर्जत या प्रत्येक नगरपालिकेत सोर्च आहेत. कच-याची विल्हेवाट लावण्याचा प्रयत्न केला आहे. डिपीआर पास करण्याच्या पहिले विचार केला पाहीजे. उप महापौरजी दोन मिनीटात पास करण्याचा विषय नाही.

**<u>उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-</u>** आपला विरोध समजण्यात आला.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-</u>** मला शहरातील लोकांच्या भविष्याची चिंता आहे. या चिंतेवर महापौर काय करीत आहेत, उप महापौर काय करीत आहेत? आणि अरुण आशान म्हणतात की, ४ तारखेला मुदत संपणार आहे, मग या डिपीआरला माझा विरोध आहे.

या वेळी काही सदस्य एकत्रित बोलत असल्यामुळे कोण काय बोलत होते, ते स्पष्ट समजून आले नाही.

**सदस्य, श्री. शंकर लुंड:-** माझे म्हणणे आहे की, हा टेंडर एक महिन्याच्या आतमध्ये करीत नाहीत तर याच्यावर काही ना काही दंड लावण्यात यावा.आयुक्त साहेबांवर आणि अधिका-यांवर का उशीर होत आहे. माझे असे म्हणणे आहे की, टेंडर लवकरात लवकर पास करुन एक महिन्याच्या आतमध्ये...

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:-** महापौर महोदया, एक विनंती करतो की, हा ज्वलंत मुददा याच्यावर विचार केला पाहिजे आणि मार्ग निघाला पाहीजे.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** मी सभागृहाला विनंती करतो की, हा विषय संपेपर्यंत ही महासभा स्थगित होणार नाही.

**सदस्य, श्री. शंकर लुंड:-** महापौर मॅडम, आयुक्त साहेब, माझे म्हणणे आहे की, आपण कुठे तरी कमी पडलो आहे, एवढा उशिरा अजून पर्यंत टेंडर झाला नाही, तर मी आयुक्त साहेबांना, मनिष हिवरेना, केणेना....

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** भारतीय जनता पार्टीचा कार्यालय नाही, हे सभागृह आहे, खाली बसा.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:-** आपण ऐकून का घेत नाहीत. सगळे एका जागेवर बसा.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** मा. महापौरजी, जसे की, सभागृहाचे सदस्य अरुण आशानजीने बोलले की, हा टेंडर आता संपत आहे, याच्या पहिले पण ८ वर्षासाठी टेंडर दिला होता ते ८ वर्षे संपली आहेत. पहिलेही टेंडर काढायला पाहीजे होता, परंतु शासनाची समस्या होती की, गाडया किती घेण्यात याव्यात, किती गाडयांचा टेंडर करण्यात यावा, कशा प्रकारे टेंडर बनवण्यात यावा. तर आज हा जो विषय आला आहे, त्याला विलंब न करता पास करायला पाहिजे आणि आज भारतीय जनता पार्टीन...

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** पास करायला नाही पाहिजे, माझा विरोध आहे.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथनी:-** अधिका-यानी पहीले खुलासा करायला पाहिजे. इथे पास.. रिजेक्ट हे काय चालले आहे? अधिका-यानी समोरा समोर सांगावे. मा. महापौरजी.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** या टेंडरमध्ये अटी आहेत.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** पहिले सदस्यांना माझी विनंती आहे, हा विषय मान्यतेसाठी आलेला नाही आहे, माहितीसाठी आलेला आहे, हे प्रत्येकाने लक्षात ठेवा.

**सदस्य, श्री. राजेश वानखेडे:-** माहितीसाठी आहे, तर माहिती दया.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** ठिक आहे, जमनुजी आपले विचार ठेवा आणि संपवून टाका

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** जेव्हा मी बोलेल तेव्हा कोणीच बोलणार नाही टेंडरसाठी काही अटी आहेत की, चांगले कार्य शहरामध्ये झाले पाहीजे. मी बोलत आहे,

**सदस्य, श्री. जीवन इदनानी:-** कोणार्कसाठी अटी टाकू नका.

या वेळी काही सदस्य एकत्रित बोलत असल्यामुळे कोण काय बोलत होते ते स्पष्ट समजून आले नाही.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** डोर टू डोर वसुली करण्यासाठी अनुभव असला पाहिजे, ३०० लेबरला लोकल बॉडीचा अनुभव असला पाहीजे.

**सदस्य, श्री. जीवन इदनानी:-** कोणार्कसाठी अटी टाकू नका.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-**२५ करोड..

**सदस्य, श्री. जीवन इदनानी:-** घोटाळा, घोटाळा

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** जमनादास पुरस्वानी यांनी लेखी स्वरुपात दिलेल्या सगळया मागण्या मान्य करण्यात येत आहेत.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** कंपनी नोंदणीकृत असली पाहिजे या सगळया गोष्टी हे मी सचिव मॅडमला देतो आणि सर्व सदस्यांना देत आहे की, हा विषय पास करण्यात यावा.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** पास..पास..

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-** पास..पास..

**सदस्य, श्री. राजेश वानखेडे:-** माहिती दया, अधिकारी कोण आहेत?

**सदस्य, श्री. शंकर लुड:-** इतिवत्ताची वाट न पहाता पास..पास..

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** बाकी विषयाची सभा अनिश्चित कालावधीसाठी स्थगित करण्यात येत आहे.

**सदस्या, श्रीम. अंजली साळवे:-** मा. महापौरजी माझा विरोध आहे,

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** इतिवत्ताची वाट न पहाता पास..पास..

**महापालिका सचिव:-** एक मिनीट ज्यांचा विरोध आहे, त्यांनी हात वर करावे.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** सदरची सभा अनिश्चित कालावधीसाठी स्थगित करण्यात आलेली आहे.

**सदस्या, श्रीम. अंजली साळवे:-** ही कंपनी शुन्य कचरा मोहीम राबवण्यासाठी अपयशी ठरली आहे.

**सदस्या, श्रीम. कविता बागुल:-** माझा विरोध आहे.

**महापालिका सचिव:-** ठराव दिला आहे, ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे घनकचरा व्यवस्थापण अधिनियम २०१६ अंतर्गत शहरात दैनंदिन निर्माण होणारा घनकचरा घरोघरी जाउन वर्गीकृत घनकचरा गोळा करून वाहतुक करण्यासाठी DPR अंतर्गत खरेदी करण्यात येणा-या वाहनासह नविन अतिरिक्त वाहने उपलब्ध करुन घेवून वाहनांचा मनुष्यबळासह देखभाल दुरुस्ती (O&M)चा आठ वर्षासाठी अभिकर्ता नेमणुक करणेस खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून मान्यता देत आहे.

**अटी व शर्ती**

१. कंपनीची एकूण मुल्य – १०० करोडची असावे.

२. वार्षिक उलाढाल- २५ करोडची असावी.

३. किमान एक कामाचे कार्यादेश ३०० टन/दिवस असावे.

४. घरोघरी कचरा गोळा करणे .

५. महानगरपालिका/नगरपरिषद कामगारामध्ये किमान ३०० कामगारांचा अनुभव असणे आवश्यक आहे.

६. कामगारांचे परवाना सक्रिय असले पाहिजे.

७. बँक गॅरेंटी २५ कोटीची असली पाहिजे

८. ३०० कामगारांचे पी.एफ. व ई.एस.आय.सी. कपात करीत असल्याबाबत कागदपत्र असणे आवश्यक आहे.

९.किमान ४० वाहनांच्या मालकीचे कागदपत्र (Dp/RC/Tipper/RB)

१०. कामाच्या सबलेटरला परवानगी नाही.

११. कोणत्याही (ULB) द्वारे कोणतेही काम बंद केले जाणार नाही, गेल्या १० वर्षातील कामगिरींच्या आधारा पंचायत.

१२. कोणत्याही जॉइंट वेंचरला परवानगी नाही.

१३. आवश्यकतेनुसार मनुष्यबळ व गाडया कमी जास्त करता येतील.

१४. १५ ते २० कि.मी.कार्यशाळा आवश्यक आहे.

१५.कंपनी कायदयाअंतर्गत कंपनी नोंदणी असावी.

या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** आठ वर्षासाठी मुदतवाढ देण्यात येत आहे.

**सदस्य, श्री. शंकर लुंड:-** इतिवत्ताची वाट न पहाता, पास..पास..

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** ही सभा अनिश्चित कालावधीसाठी स्थगित करण्यात येत आहे.

**महापालिका सचिव:-** हा विषय पास झाला आहे, साळवे मॅडम, बगाडे मॅडम, बागुल मॅडम यांचा विरोध लिहीला जाईल.

**सदस्या, श्रीम. अंजली साळवे:-** मतदान घ्या, मतदान.

**काही सदस्य :—**पास—पास……

**महापौर तथा पीठासीन अधिकारी:—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. १६:—**घनकचरा व्यवस्थापण अधिनियम २०१६ अंतर्गत शहरात दैनंदिन निर्माण होणारा घनकचरा घरोघरी जाउन वर्गीकृत घनकचरा गोळा करून वाहतुक करण्यासाठी DPR अंतर्गत खरेदी करण्यात येणा-या वाहनासह नविन अतिरीक्त वाहने उपलब्ध करुन घेवून वाहनांचा मनुष्यबळासह देखभाल दुरुस्ती (O&M)चा आठ वर्षासाठी अभिकर्ता नेमणुकीबाबत महासभेच्या धोरणात्मक निर्णयास्तव सविनय सादर.

**प्रस्तावना**

उल्हासनगर शहरात सद्यास्थित मे.कोणार्क इ. प्रो.प्रा.लिमिटेड, उल्हासनगर घनकचरा वाहतुक ठेकेदार यांच्या मार्फत दैनंदिन घनकचरा वाहतुकीचे काम सुरु आहे.सदर ठक्याचा कालावधी आठ वर्षाचा असून सदर खाजगी ठेक्याची मुदत दिनांक ५ डिसेंबर २०२१ रोजी संपुष्टात येत आहे. उल्हासनगर शहरात दैनंदिन निर्माण होणारा अंदाजीत ३६० मे.टन वर्गीकृत घनकचरा गोळा करुन वाहतूकीसाठी नमूद साधने व वाहने दिलेल्या तांत्रिक तपशिला नूसार खरेदीसाठी रुपये ८,५७,९७,७४७/- (आठ कोटी सत्तावन लाख सत्यान्नव हजार सातशे सत्तेचाळीस मात्र.) मात्र खर्च शासनाकडून मंजूर झलेला आहे. (सन २०१८ च्या मंजुर डीपीआर नुसार अंदाजीत खर्च) त्याचा तपशिल खालिलप्रमाणे आहे.

| Sr.No. | Particulars (For Collection and Transportation Vehicles and other infrastructure) | Specification | Quantity in Nos | Estimated Amount in Rs. (AS per Sanctioned DPR) |
|---|---|---|---|---|
| 1 | Ghantagadis (Four wheeler auto tipper) | **Ghantagadis/GARBAGE TIPPER MOUNTED ON FOUR WHEELER** : Providing erecting garbage tipper mounted on four wheeler i.e TATA,Ashoka Leyland or any other equivalent for having capacity of Garbage up to 2 ton with carrying Dry and wet garbage in separate compartment it should be operated through 12 V Battery operated power pack hydraulic system . it should be convenient for door to door collection of garbage. Capacity of container 1.1 cum to 4.5 cum. Rates are inclusive of all taxes and one year guarantee with third party coverage etc, complete as directed by Engineer- in-charge | 41 nos. | 2,69,06,250.00 |
| 2 | Tricycles | **DOOR TO DOOR SEGRAGATION TRICYCLE**: Providing & supplying at site door to door segregation tricycle including loading unloading at site, including all taxes and one year guarantee with third party coverage etc, complete. i.e. : 1 Cum Capacity Made from M.S.Angle 25mm & crca sheet of 16 guage one removable segregation & rear side door to unload waste with handlw and lock provision, I front with brass bell and near side open able door to unload the waste complete with two coats as per directed by | 54 nos. | 10,20,600.00 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | Engineer. | | |
| 3 | Compactor | **GARBAGE COMPACTOR :** Supply of Garbage Compactor with 7 Cum capacity Fixed on Either TATA , Ashoka layland or any other equivalent Chassis powered by reputed company engine for hydraulic with necessary FBV & container body of following specification , gear box, heavy duty standard co.,tyres including all taxes, transportation , loading, unloading at site and one year guarantee with third party coverage etc, complete as directed by Engineer- in – Charge | 16 nos. | 4,83,00,000.00 |
| 4 | Wheel Barrows | **SEGREGATION HANDCART (Cap 360 liter ) :** Providing & supplying at site segragaton handcart of following capacity including all taxes and one year insurance with third party converage etc, complete. Segregation handcart having capacity 360 liter \ Made from Angle 25mm × 03mm & orca sheet of 16 Guage , two nos iron wheel of 500mm dia made from 32mm flat with double ball bearings of 62058 and ane removable segregation partition with 3 equal provision for segregation & rear side door to unload wate with handle and lock provision, onefront wheel of HDFE 200 mm complete with two shade color and ready for use as per requirement as directed by engineer incharge | 97 nos. | 9,77,760.00 |
| 5 | Garbage Tipper | **GARBAGE TIPPER MOUNTED ON FOUR WHEELER :**Providing erecting garbage tipper mounted on four wheeler i.e TATA, Ashoka layland, Mahindra or any other equivalent for having capacity of Garbage up to 3 ton with carrying Dry and garbage separate. It should be operated through 12 V Battery operated power pack hydraulic system. Rate are inclusive of all taxes and one year guarantee with third party coverage etc, complete as directed by Engineer- in-Charge. | 3 nos. | 33,62,625.00 |
| 6 | Garbage Containers | Technical Specification Overall Dimensions in mm : (W) 1050 X (L) 1200X(H) 1100 (without wheels) Volumetric Capacity : 1.1 M3<br>Material of Construction : 1.00mm HRCA sheet<br>Reinforcement Section : 3 mm thk. Channel 50 X 50 X 25<br>Lifting lug : Ø 38 mm<br>Drain holes :Ø 25 mm holes X 6 NoS.<br>Welding : Stich Welding for reinforcing member and inside corners of container.<br>Caster Wheels : Fixed Wheel 5 – Ø 200 X 50 -2 Nos.<br>Swivel Wheels – Ø 200 X 50 – 2 Nos.<br>Finishing and Painting : All M.S. exposed surface to be painted with enamel paint, duly after grinding and finishing.<br>Handling : Suitably Handled by Dumper4 placer or Rear End loading compactor. | 120 nos. | 52,30,512.00 |
| Total Amount in RS.- | | | | 8,57,97,747 |

उक्त नमुद वाहने व साहित्ये खरेदीसाठी ई-निविदा प्रकीया सुरु आहे. मंजुर घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प अहवालात नमुद केलली उक्त वाहने घनकचरा व्यवस्थापन अधिनियम २०१६ व स्वच्छ भारत अभियान अंतर्गत करावयाची कामे लक्षात घेता सद्यासिथतीत अपुरी पडणार आहेत. तसेच घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प अहवालानुसार शासनाकडुन वाहने व इतर यंत्र सामुग्री खरेदीसाठी मंजुर केलेली रक्कम अपुरी पडणार असल्यसाने सदर उक्त वाहने व इतर यंत्रसामुग्री खरेदीसाठी लागणारा अतिरीक्त खर्च महापालिका फंडातून करावा लागणार आहे. त्याचप्रमाणे घरोघरी जाउन वर्गीकृत कचरा गोळा करण्यासाठी तसेच नियमीत शुन्य कचरा ठेवण्यासाठी खालीलप्रमाणे किमान वाहने व साधन सामुग्रीची आवश्यकता आहे. तसेच शासन मार्गदर्शक सुचनांनुसार जास्तीत जास्त शक्य होईल तेवढी वाहने CNG इंधनावर चालणारी असावित. त्यामुळे कचरा वाहतुकीच्या वाहनांची कचरा वाहतुक करण्याची क्षमता व उल्हासनगर शहराची भौगोलीक रचना लक्षात घेता किमान अतिरीक्त लागणारी घंटागाडी CNG इंधनावर चालणारी घेण्याचे प्रस्तावित करणे योग्य वाटते. सन २०१८ DPR व्यतिरिक्त अतिरिक्त लागणारी वाहने व त्यासाठी अंदाजित येणा-या खर्चाचा तपशिल खालिलप्रमाणे अपेक्षित आहे.

| Sr. No. | Particulars (For Collection and Transportation Vehicles and other infrastructure) | Specification | Required additional vehicle (AS on today) |
|---|---|---|---|
| 1 | Ghantagadis (Four wheeler auto tipper) | Ghantagadis/GARBAGE TIPPER MOUNTED ON FOUR WHEELER | 45 |
| 2 | Compactor | GARBAGE SMALL COMPACTOR | 1 |
| 3 | Compactor | GARBAGE LARGE COMPACTOR | 9 |
| 4 | Garbage Tipper | GARBAGE TIPPER MOUNTED ON FOUR WHEELER | 6 |
| 5 | JCB | JCB 4DX ECOXCELLENCE Backhoe Loader | 2 |

| Sr. No. | Particulars (For Collection and Transportation Vehicles and other infrastructure) | Specification | Quantity (AS per Sanctioned DPR) | Required Quantity in Nos (AS on today) | Estimated Amount in Rs. | Requirement of manpower | Remark |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Ghantagadis (Four wheeler auto tipper) | **Ghantagadis/GARBAGE TIPPER MOUNTED ON FOUR WHEELER** :Providing erecting garbage tipper mounted on four wheeler i.e TATA,Ashoka Leyland or any other equivalent for having capacity of Garbage up to 2 ton with carrying Dry and wet garbage in separate compartment it should be operated through 12 V Battery operated power pack hydraulic system . it should be convenient for door to door collection of garbage. Capacity of container 1.1 cum to 4.5 cum. | 41 nos. | 86 (41+ 45) | 4,32,00,000 (Per vehicle 9,60,000) | 78 Driver + 78 cleaner/heper = 156 | 78 ward wise and 8 standby |
| 2 | Tricycles | **DOOR TO DOOR SEGRAGATION TRICYCLE**: Providing & supplying at site door to door segregation tricycle including loading unloading at site, including all taxes and one year guarantee with third party coverage etc, complete. i.e. : 1 Cum Capacity Made from M.S.Angle 25mm & crca sheet of 16 guage one removable segregation & rear side door to unload waste with handlw and lock provision, I front with brass bell and near side open able door to unload the waste complete with two coats as per directed by Engineer. | 54 nos. | (54-14) 40 | -- | 40 labour | Zone wise, 10 each Zone |
| 3 | Compactor | **GARBAGESMALL COMPACTOR** : Supply of Garbage Compactor with 7 Cum capacity Fixed on Either TATA , Ashoka layland or any other equivalent Chassis powered by reputed company enginer hydraulic with necessary FBV & container body of following specification , gear box, heavy duty standard co.,tyres including all taxes, transportation , loading, unloading at site. | 16 nos. | (16+ 1) 17 | 31,12,000 (Per compactor 31,12,000) | 16 Driver + 16 cleaner/ helper = 32 | For dust bin garbage collection (zonewise 3x4= 12, and collection ) from ghantagadi for ZoneIV = 4 ) and 1 standby |
| 4 | Compactor | **GARBAGE LARGE COMPACTOR** : Supply of Garbage Compactor with 14 Cum capacity Fixed on Either TATA , Ashoka layland or any other equivalent Chassis powered by reputed company engine for hydraulic with necessary FBV & container body of following specification , gear box, heavy duty standard co.,tyres including all taxes, transportation , loading, unloading at site. | — | 9 | 3,96,00,000 (Per compactor 44,00,000) | 8 Driver + 8 cleaner/helper = 16 | Zonewise , garbage collection from ghantagadi (zone wise 2x4= 8, ) and 1 standby |
| 4 | Wheel Barrows | **SEGREGATION HANDCART (Cap 360 liter )** : Providing & supplying at site segragaton handcart of following capacity including all taxes and one year insurance with third party converage etc, complete. Segregation handcart having capacity 360 liter \ Made from Angle 25mm × 03mm & orca sheet of 16 Guage , two nos iron wheel of 500mm dia made from 32mm flat with double ball bearings of 62058 and ane removable segregation partition with 3 equal provision for segregation & rear side door to unload | 97 nos. | (97-57) 40 | -- | 40 labour | Zone wise, 10 each Zone |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | wate with handle and lock provision, onefront wheel of HDFE 200 mm complete with two shade color and ready for use as per requirement. | | | | | |
| 5 | Garbage Tipper | **GARBAGE TIPPER MOUNTED ON FOUR WHEELER :**Providing erecting garbage tipper mounted on four wheeler i.e TATA, Ashoka layland, Mahindra or any other equivalent for having capacity of Garbage up to 3 ton. It should be operated through 12 V Battery operated power pack hydraulic system. | 3 nos. | 6 (3+3 ) | 60,00,000 (Per Tipeer 20,00,000) | 6 Driver + 6 cleaner/heper = 12 | |
| 6 | JCB | JCB 4DX ECOXCELLENCE Backhoe Loader | — | 2 | 60,00,000 (Per JCB 30,00,000) | 2 operator + 2 cleaner= 4 | |
| 7 | Garbage Containers | Technical Specification Overall Dimensions in mm : (W) 1050 X (L) 1200X(H) 1100 (without wheels) Volumetric Capacity : 1.1 M3<br>Material of Construction : 1.00mm HRCA sheet<br>Reinforcement Section : 3 mm thk. Channel 50 X 50 X 25<br>Lifting lug : Ø 38 mm<br>Drain holes :Ø 25 mm holes X 6 NoS.<br>Welding : Stich Welding for reinforcing member and inside corners of container.<br>Caster Wheels : Fixed Wheel 5 – Ø 200 X 50 - 2 Nos.<br>Swivel Wheels – Ø 200 X 50 – 2 Nos.<br>Finishing and Painting : All M.S. exposed surface to be painted with enamel paint, duly after grinding and finishing.<br>Handling : Suitably Handled by Dumper4 placer or Rear End loading compactor. | 120 nos. | 120 | | (120 dust bins at 60 Market places ) 10 Bin attendent | |
| 8 | Other | 1. QR code system,<br>2. GPS tracking system,<br>3. Monthly Awarness programme at Cable TV and Zone wise Hordings,<br>4. Parking and vehicle garage for maintenance.<br>5. Project manager and Supervisor. Etc. | | | | 1 Project Manager + 13 Supervisor | |
| Total Amount in RS.-Nine crore nineteen lakh twelve thousand only. | | | | | 9,19,12,000 | 324 | |

उक्त तपशिलानुसार सर्व वाहने यंत्रसामुग्री खरेदी करण्यासाठी अदांजीत रुपये ९,१९,१२,०००/- खर्च अपेक्षित आहे. शिवाय सदर वाहनासाठी लागणारे अंदाजीत ३२४ मनुष्यबळ, वाहन चालक इत्यादी महापालिकडे उपलब्ध नसल्याने दैनंदिन कचरा गोळा करुन वाहतुकीसाठी खाजगी ठेकेदारामार्फत कामे करुन घ्यावी लागणार आहेत. त्याच प्रमाणे मोठया प्रमाणात वाहने व यंत्रसामुग्री खरेदी करण्यासाठी निधीची आवश्यकता आहे. याचा विचार करता, शहरात दैनंदिन निमार्ण होणारा घनकचरा घरोघरी जाउन वर्गीकृत करुन डंपिंग ग्राउंड/ट्रान्सफर स्टेशनवर वाहतुक करण्यासाठी खाजगी अभिकर्ता नेमणुक करणे आवश्यक वाटते. करीता शासनाने मंजुर केलेली वाहनांव्यतीरीक्त उक्त तपशिलात नमुद केलेली वाहनांदवारे दैनंदिन घनकचरा गोळा करुन वाहतुक करण्यासाठी ८ वर्षांसाठी अभिकर्त्याची नेमणुक करणे योग्य होईल. करीता घनकचरा वाहतुकीसाठी DPR अंतर्गत शासनाकडून प्राप्त होणारी रक्कमेतून खरेदी केलेली वाहने व इतर आवश्यक अतिरीक्त वाहने, यंत्रसामुग्री व मनुष्यबळ यासह दैनंदिन घनकचरा गोळा करुन वाहतुकीसाठी प्रति टन खर्च यांचे दर मागविण्यासाठी ई-निविदा प्रसिध्द करणे आवश्यक राहिल. तरी सदरचा निर्णय धोरणात्मक स्वरुपाचा असुन सदरचा प्रस्ताव मा. महासभेपुढे सविनय सादर.

करीता त्यानुसार खालिल बाबींवर धोरणात्मक निर्णय होणे आवश्यक असुन याबाबत महासभेसमारे धोरणात्मक निर्णयाकरीता सदरचा प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

अ) दैनंदिन घनकचरा गोळा करुन वाहतुक करण्यासाठी ८ वर्षांसाठी अभिकर्त्याची नेमणुक करण्याचे प्रस्तावित करण्यात येते. करीता घनकचरा वाहतुकीसाठी शासनाकडून मंजुर घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प (DPR) अहवाला अंतर्गत प्राप्त वाहने व इतर आवश्यक अतिरीक्त वाहने, यंत्रसामुग्री व

मनुष्यबळ यासह दैनंदिन वर्गीकृत घनकचरा गोळा करुन वाहतुकीसाठी प्रति टन खर्च मागविण्यासाठी ई-निविदा सुचना प्रसिध्द करण्यास मान्यता मिळावी.

ब) मनपा अंदाजपत्रकातील लेखाशिर्ष क-१ (१) घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत कचरा वाहतुक खर्च साठी प्रतिवर्षी अंदाजे रुपये ३० कोटी एवढी आर्थिक तरतुद करणेबाबत निर्णय घेणे.

**महासभा ठराव क्र:३६** **दिनांकः—**२/१२/२०२१

सुचकाचे नाव :— श्री. दिपक सिरवानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. कलवंतसिंग सोहता

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणेघनकचरा व्यवस्थापण अधिनियम २०१६ अंतर्गत शहरात दैनंदिन निर्माण होणारा घनकचरा घरोघरी जाउन वर्गीकृत घनकचरा गोळा करून वाहतुक करण्यासाठी DPR अंतर्गत खरेदी करण्यात येणा-या वाहनासह नविन अतिरिक्त वाहने उपलब्ध करुन घेवून वाहनांचा मनुष्यबळासह देखभाल दुरुस्ती (O&M)चा आठ वर्षासाठी अभिकर्ता नेमणुक करणेस खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून मान्यता देत आहे.

**अटी व शर्ती**

१. कंपनीची एकूण मुल्य — १०० करोडची असावे.

२. वार्षिक उलाढाल- २५ करोडची असावी.

३. किमान एक कामाचे कार्यादेश ३०० टन/दिवस असावे.

४. घरोघरी कचरा गोळा करणे .

५. महानगरपालिका/नगरपरिषद कामगारामध्ये किमान ३०० कामगारांचा अनुभव असणे आवश्यक आहे.

६. कामगारांचे परवाना सक्रिय असले पाहिजे.

७. बँक गॅरेंटी २५ कोटीची असली पाहिजे

८. ३०० कामगारांचे पी.एफ. व ई.एस.आय.सी. कपात करीत असल्याबाबत कागदपत्र असणे आवश्यक आहे.

९.किमान ४० वाहनांच्या मालकीचे कागदपत्र (Dp/RC/Tipper/RB)

१०. कामाच्या सबलेटरला परवानगी नाही.

१२. कोणत्याही (ULB) द्वारे कोणतेही काम बंद केले जाणार नाही, गेल्या १० वर्षातील कामगिरींच्या आधारा पंचायत.

१२. कोणत्याही जॉइंट वेंचरला परवानगी नाही.

१३. आवश्यकतेनुसार मनुष्यबळ व गाडया कमी जास्त करता येतील.

१४. १५ ते २० कि.मी.कार्यशाळा आवश्यक आहे.

१५.कंपनी कायदयाअंतर्गत कंपनी नोंदणी असावी.

या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**मंजूर**

महापौर / पीठासीन अधिकारी

**<u>उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-</u>** माझी सर्व सदस्यांना विनंती आहे की, आज हरितक्रांती दिवस आहे आणि शपथ घ्यायची आहे.

**<u>उप आयुक्त, पर्यावरण विभाग, डॉ.सुभाष जाधव:-</u>** मा. अध्यक्ष मोहदय, सर्व सन्माननिय सदस्य, आज जागतीक पर्यावरण दिवस आहे त्या निमित्ताने माझी वसुंधरा अभियानातील हरित शपथ आज आपण घेणार आहोत. सर्व सभागहाला विनंती आहे की, आपण ही शपथ घेऊ या. माझे मागे आपण म्हणणायचे आहे.

## <u>हरित शपथ</u>

**वसुंधरा मातेन मला भरभरुन दिले आहे!**

**वृक्ष आपला श्वास आणि आपल्या भविष्याचा आधार आहे!**

**माझया सभोतालचे पशु, पक्षी आणि झाडे**

**हे मला रक्ताच्या नात्यासारखे आहेत!**

**त्यांच्याकडून माझया गरजांपुरते मह जरुरी घेईन!**

**परंतु, अधिक घेण्याचा कदापिही प्रयत्न करणार नाही!**

**पाऊस येतो, तो हिरवाईचे स्वप्न घेऊन!**

**या अभियानात मी अंत: करणापासून सहभागी होत आहे!**

**आप्टेष्ट आणि इतरांना या कार्यक्रमात सहभागी होण्यास प्रवृत्त करण्याचा**

**मी निर्धार करतो / करते!**

**फळफळावळ, शोभिवंत आणि सावली देणारी झाडे**

**मोठया संख्येने लावण्याचा मी सातत्याने प्रयत्न करेन!**

**वृक्षरोपणानंतर संरक्षण, पाणी पुरवठा, संगोपण देखभाल इत्यादी**

**जबाबदारी घेण्याची मी शपथ घेतो / घेते!**

**वन, वन्यजीव, जैवविविधता, सामाजिक वनीकरण, पर्यावरण यांच्याशी**

**संबंधित कार्यक्रमांत मी भाग घेईन!**

**एकंदरीतच वृक्ष क्रांतीची ही मोहीम निरंतरपणे सुरु ठेवण्याचा**

**दढ संकल्प मी करतो / करते!**

………………………………………………………………………………………………………………………………………………

**<u>काही सदस्य :—</u>**पास—पास……

**<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

☑

**<u>स्थगीत प्रस्ताव:—</u>**

दिनांक १८/११/२०२१, व दिनांक २५/११/२०२१रोजीची स्थगीत केलेली सभा दिनांक ०२/१२/२०२१रोजी दुपारी ३.०० वाजता सुरू केलेली सभा काही कारणास्तव स्थगीत करण्यास प्रस्तावीत.

**<u>महासभा ठराव क.३६ अ</u>** दिनांक: ०२/१२/२०२१

सुचकाचे नाव:—श्री. कलवंतसिंह सोहता

अनुमोदकाचे नाव:—श्री. जमनादास पुरस्वानी

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता दिनांक ०२/०९१२/२०२१ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित केलेल्या सभेचे कामकाज अनिश्चित कालावधी पर्यंत स्थगित करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर/पीठासिन अधिकारी

सर्वसाधारण महासभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सांयकाळी 4.37 वाजता महापौर, श्रीम. लिलाबाई आशान यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः- २४-१२-२०२१

**उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.२४-१२-२०२१ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.**

३-क

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा गुरुवार, दिनांक १८/११/२०२१ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेचे कामकाज स्थगीत केल्याने सदरची सभा गुरुवार दिनांक २५/११/२०२१ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित सभेचे कामकाज पुन्हा स्थगीत केल्याने सदरची सभा गुरुवार दिनांक ०२/१२/२०२१ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित सभेचे कामकाज पुना स्थगीत केल्याने सदरची सभा शुक्रवार दिनांक २४/१२/२०२१ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली. सदर सभेत महापौर, श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या व खालील दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते/होत्या.मा.अवर सचिव, महाराष्ट्रशासन, नगरविकास विभाग यांचेकडील शासनाचे क्रमांक कोरोना- २०२०/प्र.क्र. ७६ / नवि-१४, दिनांक २२ ऑक्टोंबर २०२१ पत्रान्वये विहित कार्यपध्दती पालन करुन प्रत्यक्ष सहभागाने/उपस्थितीने खालील विषयावर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित केली होती.

१. श्रीमती. लिलाबाई लक्ष्मण आशान – महापौर

२. श्री. भगवान भालेराव- उपमहापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | २३ | श्री. गजानन प्रल्हाद शेळके |
| ४ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | २४ | श्री. सुमित सागर सोनकांबळे |
| ५ | श्रीमती आशा नाना बिराडे | २५ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| ६ | श्रीमती चरणजितकौर राजेंद्रसिंह भुल्लर | २६ | श्रीमती संगिता नितीन सपकाळे |
| ७ | श्री. राजेंद्रसिंह विरसिंग भुल्लर | २७ | श्रीमती ज्योती रमेश चैनानी |
| ८ | श्री. कलवंतसिंग गुरुदेव सोहता | २८ | श्रीमती कांचन अमर लुंड |
| ९ | डॉ. प्रकाश घनश्यामदास नाथानी | २९ | श्री. शंकर गोविंदराम लुंड |
| १० | श्रीमती सरोजिनी टेकचंदानी | ३० | श्री. सतरामदास पुतनदास जेसवानी |
| ११ | श्री. महेश पहिलराज सुखरामनी | ३१ | श्री. प्रमोद नामदेव टाले |
| १२ | श्रीमत अपेक्षा भगवान भालेराव | ३२ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| १३ | श्रीमती शुभांगीनी निकम | ३३ | श्री. किशोर नारायणदास वनवारी |
| १४ | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग | ३४ | श्रीमती मिना चंद्रगुप्त सोनेजी |
| १५ | श्री. राजेश नानिकराम वदारिया | ३५ | श्री. विजय चाहू पाटील |
| १६ | श्रीमती डिम्पल नरेंद्र ठाकुर (कुमारी) | ३६ | श्रीमती कविता सुरेश गायकवाड |
| १७ | श्रीमती दिपा नारायण पंजाबी | ३७ | श्री. विकास परशुराम पाटील |
| १८ | श्री. राजेंद्र शांताराम चौधरी | ३८ | श्री. मनोज दिलीपकुमार सयानी |
| १९ | श्री. रवी किशनचंद जग्यासी | ३९ | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |
| २० | श्रीमती इंदिरा जमनादास उदासी | ४० | श्री. अरुण लक्ष्मण आशान |
| २१ | श्रीमती कविता लाल पंजाबी | ४१ | श्रीमती आशा जीवन इदनानी |
| २२ | श्री. जीवन चंद्रभान इदनानी | | |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते / होत्या.

२. श्रीमती. अर्चना गोकुळ करणकाळे, २. श्री. मंगल बालकृष्ण वाघे, ३. श्रीमती जयश्री ज्ञानेश्वर पाटील, ४. श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड, ५. श्रीमती मिनाकौर अजितसिंग लबाना, ६.श्री. रविंद्र दशरथ बागुल, ७.श्री.स्वप्नील मिलींद बागुल, ८.श्रीमती सुरेखा हनुमंत आव्हाड, ९.श्रीमती अंजना अंकुश म्हस्के, १०.श्री. राजू किशनचंद जग्यासी, ११.श्रीमती मिना कुमार आयलानी, १२.श्रीमती गीता लालचंद साधनानी,

१३.श्रीमती रेखा अशोक ठाकुर, १४.श्रीमती जया प्रकाश माखिजा, १५.श्रीमती छाया सुजित चक्रवर्ती उर्फ अडसुळ, १६.श्रीमती ज्योती प्रशांत पाटील, १७. श्रीमती पुष्पा नाना बागुल, १८. श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी, १९. श्रीमती शुभांगी मनोहर बेहनवाल, २०. श्रीमती सविता प्रविण तोरणे (रगडे), २१. श्रीमती ज्योती प्रकाश बठिजा, २२. श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी (साई), २३. श्रीमती ज्योत्स्ना सुरेश जाधव, २४. श्रीमती ज्योती शामराव माने, २५. श्री. चंद्रशेखर केशव यादव, २६. श्रीमती मिताली राजेश चान्पूर, २७. श्रीमती शीतल चंद्रकांत कदम, २८. श्रीमती वसुधा धनंजय बोडारे, २९. श्री. धनंजय बाबुराव बोडारे, ३०. श्रीमती दिप्ती नविन दुधानी, ३१. श्रीमती सुनिता बाबुराव बगाडे, ३२. श्रीमती सुमन राजेश सचदेव, ३३. श्री. भारत रामचंद राजवानी (गंगोत्री), ३४. श्रीमती अंजली चंद्रकांत साळवे, ३५. श्रीमती कविता सुधिर बागुल, ३६. श्रीमती मिनाक्षी रवी पाटील, ३७. श्री. आकाश परशुराम पाटील, ३८. श्री. सुरेंद्र बाळकृष्ण सावंत,

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

५. डॉ. राजा दयानिधी, आयुक्त
२. श्री. अशोक नाईकवाडे, उप आयुक्त (मुख्यालय / महापालिका सचिव)
३. श्री. प्रकाश मुळे, नगररचनाकार
४. श्री. महेश सितलानी, शहरअभियंता
५. श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
६. श्री. मनिष हिवरे, आरोग्य अधिकारी
७. श्री. के.जे. रहेजा, कार्यकारी अधिकारी
८. श्री. हनुमंत खरात, उप अभियंता
९. श्री. दिपक ढोले, उप अभियंता
१०. श्रीम. श्रध्दा सपकाळे, सिस्टम ॲनेलेसिस मॅनेजर
११. श्री. संतोष लोणे, कनिष्ठ अभियंता
१२. श्री. विनोद केणे, मुख्य स्वच्छता निरीक्षक
१३. श्री. दत्तात्रय जाधव, भांडार विभाग प्रमुख
१४. श्री. राजेश घनघाव, लिपीक

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

८. श्रीम. नर्गीस खान, लिपीक
९. श्री. बाळू भांगरे, लिपीक
१०. श्रीम. विद्या आढळ, लिपीक

सायंकाळी ४.०९ वाजता वंदे मातरम म्हणून सभेचे कामकाज सुरु करण्यात आले.

या वेळी उप महापौर, श्री. भगवान भालेराव हे महापौरांच्या स्थानी पिठासिन अधिकारी म्हणून आसनस्थ होते.

या वेळी अतिरिक्त आयुक्त्, श्रीम. करुणा जुईकर हया आयुक्तांच्या स्थानी आसनस्थ होत्या.

**उप आयुक्त (मुख्यालय) तथा महापालिका सचिव, श्री. अशोक नाईकवाडे:-** विषय वाचून दाखवतो,

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** एक मिनीट फक्त, श्रध्दाजली दयायची आहे, तीन्ही सेना दलाचे प्रमुख, श्री. बिपीन रावत यांचे दुर्घटना होऊन त्यांचे निधन झाले आहे, त्याच बरोबर त्यांचे १४ साथीदार यांचे पण निधन झाले आहे. हा देशासाठी खुप मोठा अघात आहे. श्री. बिपीन रावत यांनी भरपूर वर्षापासून देशाची सेवा केली आहे आणि आपल्या देशाच्या सिमा सुरक्षित ठेवल्या. आज ते आपल्यामध्ये नाही आहेत. मी सभागृहाच्यातर्फे आणि भारतीय जनता पार्टीच्या वतीने त्यांना आणि सैनिकांना या दुर्घटनेमध्ये मारले गेले त्यांना श्रध्दांजली सुमन अर्पित करतो आणि देवाला प्रार्थना करतो की, त्यांच्या परिवाराला दु:ख सहन करण्याची शक्ती देण्यात यावी आणि त्यांच्या आत्म्यास शांती प्रदान करीण्यात यावी, हरी ओम.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-** हेलीकॅप्टर दुर्घटनेमध्ये भारतीय दलाचे प्रमुख व त्यांचे सहकारी हेलीकॅप्टर दुर्घटनेमध्ये मारले गेले नाहीत, ते शहीद झाले आहेत. अगोदरच्या वक्त्यांनी मारले गेले असा शब्द वापरला, मी

दुरुस्ती करतो आणि शहीद झालेल्या सर्वच भारतीय सेवादलातील अधिकारी व त्यांचे सर्व सहकारी या सर्वांना सभागृहामध्ये आपण त्यांना श्रध्दांजली अर्पीत करु या. आणि शहिद झालेले बिपीन रावत सेवादलातील वरिष्ठ अधिकारी होते. त्यांच्या सोबत त्यांच्या सौभाग्यवती यांनाही वीर मरण आले आहे. या दुर्घटनेला निमित्त झालेले आहे. पण वीरमरण आलेले आहे, या सर्व शहीदांना मी शिवसेना पक्षातर्फे भावपुर्ण श्रध्दांजली अर्पीत करतो, धन्यवाद.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-** मा. महापौरजी, आयुक्त मॅडम, सचिव मॅडम आणि सन्माननिय सदन ही दु:खद घटना आहे, तीन्ही सेनादलातील प्रमुख जनरल श्री. बिपीन रावत हेलिकॅप्टर दुर्घटनेमध्ये मृत्यु झाला आणि ते शहीद झाले. देशाच्या सर्वोच्च पदावर त्यांनी सेवा दिली. त्यांच्या बरोबर जे त्यांचे सहकारी होते. मेजर होते आपले २० सैनिक होते, त्या सर्वांनी या दुर्घटनेत आपला जीव गमावला आहे. मी समस्त राष्ट्रवादी कॉग्रेसतर्फे श्रध्दांजली अर्पीत करतो की देवाने त्यांच्या आत्म्यास शांती देवो आणि त्यांच्या सहकार्यांच्या आत्म्यास शांती देवो.

---

**सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्र चौधरी**

**अनुमोदकाचे नाव :— श्री. मनोज सयानी**

**शोक प्रस्ताव**

तिन्ही सेनादलाचे प्रमुख श्री. बिपीन रावत यांचे दुर्घना होऊन निधन झाले आहे. त्याच बरोबर त्यांचे १४ साथीदार यांचे पण निधन झाले आहे. हा देशासाठी खुप मोठा अघात आहे. श्री. बिपीन रावत यांनी भरपूर वर्षापासून देशाची सेवा केली आहे आणि आपल्या देशाच्या सिमा सुरक्षित ठेवल्या आहेत. त्यांचे अपघाती निधन झाले आहे.

श्री. बिपीन रावत व १४ साथीदार यांचे निधन झाल्याने. त्यांच्या कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असून हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्मास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

**विशेष महासभा ठराव क्र.३६अ —१** **दिनांक:—२४/१२/२०२१**

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. बिपीन रावत व १४ साथीदार यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे आणि त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

---

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी

विशेष महासभा

उल्हासनगर महानगरपालिका

**<u>उप आयुक्त (मुख्यालय) तथा महापालिका सचिव, श्री. अशोक नाईकवाडे:-</u>** या नोटीसद्वारे सवर् महापालिका सदस्यांना कळविण्यात येते की, उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा गुरवार दिनांक १८/११/२०२१ रोजी दुपारी ३. वाजता आयोजित करण्यात आली होती, सदर सभेचे कामकाज स्थगित केल्याने सदरची सभा गुरुवार दिनांक २५/११/२०२१ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित सभेचे कामकाज पुन्हा स्थगित केल्याने सदरची सभा गुरुवार दिनांक ०२/१२/२०२१ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित सभेचे कामकाज पुना स्थगित केल्याने सदरची सभा शुक्रवार दिनांक २४/१२/२०२१ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली आहे, या प्रथम विषय आहे, विषय सुचीनुसार

**<u>उप आयुक्त (मुख्यालय) तथा महापालिका सचिव, श्री. अशोक नाईकवाडे:-</u>** विषय क्र.१७ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. १७:— उल्हासनगर महानगरपालिकेतील वाहन विभागा अंतर्गत ई निविदा प्रक्रियाद्वारे निर्लेखीत जुनी भंगार वाहनाची विक्री करण्यास मान्यता मिळणेबाबत**.

---

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:-</u>** इतिवृत्ताची वाट न पहाता पास..पास..

**<u>काही सदस्य :—</u>**पास—पास……

**<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑ **विषय क्र. १७:—** उल्हासनगर महानगरपालिकेतील वाहन विभागाअंतर्गत ई निविदा प्रक्रियाद्वारे निर्लेखीत जुनी भंगार वाहनाची विक्रि करण्यास मान्यता मिळणेबाबत**.**

**<u>प्रस्तावना</u>**

उपरोक्त् विषयान्वये उल्हासनगर महानगरपालिकेची १४ वाहने जुनी झालेली आहे.तसेच वाहनाचे विहित निर्धारीत वयोमान १० वर्षापेक्षा जास्त् आहे.जुने झालेली वाहने निर्लेखीत करणेसाठी वाहन विभागामार्फत वेळोवेळी उप प्रादेशिक परिवहन कार्यालयात पत्र् व्यवहार करण्यात आला त्यानुसार मा. उप प्रादेशीक परिवहन अधिकारी, उप प्रा.प.का कल्याण यांनी सर्व वाहनांची सद्यस्थिती भंगार जुने वाहनांचे मुल्यांकनदर निश्चित करुन दिलेल्या वाहनाची वाहन विभागातर्फे सदर निर्लेखीत वाहनाचे प्राकलन तयार करुन प्रशासकिय व वित्तीय मान्यता घेण्यात आली व नियमाप्रमाणे सदर कामाची ई निविदा प्रक्रिया करण्यात आली त्याची सविस्तर् माहिती खालीलप्रमाणे.

| अ.क्र | | |
|---|---|---|
| १ | निविदा प्रसिध्द् केलेली वर्तमानपत्रे | १) दैनिक यशोभुमी, २) दैनिक ठाणे वैभव, ३)दैनिक नगर न्युज |
| २ | निविदा प्रसिध्द् करण्याची दिनांक | दिनांक ०६-०९-२०२१ |
| ३ | निविदा विक्रि कालावधी | दिनांक ०६/९/२०२१ ते दिनांक २७/०९/२०२१ |
| ४ | भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम दिनांक | दिनांक २८/०९/२०२१ |
| ५ | प्रथम मुद्दत वाढ | - |
| ६ | द्वितीय मुद्दत वाढ | - |
| ७ | तृतीय मुद्दत वाढ | - |
| ८ | तांत्रिक भाग उघडण्याचा दिनांक | दिनांक २८/०९/२०२१ |

| | | |
|---|---|---|
| ९ | आर्थिक भाग उघडण्याचा दिनांक | - |
| १० | विक्रि केलेल्या निविदांची संख्या | ३ |
| ११ | प्राप्त् झालेल्या निविदांची संख्या | ३ |

सदर निविदेचा तांत्रिक भाग दिनांक २८/०९/२०२१ रोजी निविदा समिती समोर उघडण्यात आला. त्यामध्ये **१) मे. अब्दुल्ला स्क्रॅप ट्रेडर्स, २) मे. दिपक ट्रेडर्स ३) मे.नॅशनल इंटरप्राईजेस**. यांनी निविदा सादर केल्या आहेत. त्याची सविस्तर माहिती खालील प्रमाणे:-

**तक्ता क्र. २**

| अ.क्र. | निविदा अटी व शर्ती | मे. अब्दुल्ला स्क्रॅप ट्रेडर्स | मे. दिपक ट्रेडर्स | मे.नॅशनल इंटरप्राईजेस |
|---|---|---|---|---|
| १ | संस्था नोंदणी प्रमाणपत्र् | आहे | आहे | आहे |
| २ | शासकिय/निमशासकिय संस्थामध्ये वाहन निर्लेखनचा अनुभवाचा दाखला अथवा कार्यादेशाच्या प्रती सादर करणे आवश्यक् आहे. | आहे | आहे | आहे. |
| ३ | जी.एस.टी नोंदणी प्रमाणपत्र् | आहे | आहे | आहे |
| ४ | पॅन काड्र्ची प्रत | आहे | आहे | आहे |
| | शेरा | पात्र | पात्र | पात्र |

उक्त् तक्त्यात नमुद केलेल्या माहिती नुसार निविदाकांराच्या कागदपत्रांची छाननी केली त्यामध्ये १) मे. अब्दुल्ला स्क्रॅप ट्रेडर्स, २) मे. दिपक ट्रेडर्स,३) मे.नॅशनल इंटरप्राईजेस निविदाकार पात्र ठरत आहेत.

प्रस्तावित कामाकरीता करण्यात आलेल्या निविदा प्रक्रीयेमध्ये तक्ता क्र. २ मध्ये नमुद केलेल्या निविदाकारंच्या कागदपत्रांची वरील निविदा छाननी समितीने तपासणी केली आहे.

उक्त् तक्त्यात नमुद केलेल्या माहितीनुसार **१**) मे.अब्दुल्ला स्क्रॅप ट्रेडर्स, २) मे. दिपक ट्रेडर्स,३) मे.नॅशनल इंटरप्राईजेस हे तीन निविदाकार पात्र ठरत असल्याने त्यांचे निविदेचा आर्थिक भाग (Financial Bid) दिनांक ३०/९/२०२१ रोजी उघडण्यात आला त्याची माहिती खालील प्रमाणे.

| **अ. क्र.** | **वाहनाचा नोंदणी क्र.** | **वाहनाचा प्रकार** | **वाहन खरेदी वर्ष** | **वाहनाची अंदाजे किंमत (बाजारभावप्रमाणे)** | **मे. दिपक ट्रेडर्स** | **मे.नॅशनल इंटरप्राईजेस** | **मे. अब्दुल्ला स्क्रॅप ट्रेडर्स** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **१** | **MH ०५ H १३२२** | **११८ एन.इ** | **१९९७** | **१२,०००/-** | १२,५००/- | १४,०००/- | **२०,०००/-** |
| **२** | **MH ०५ C २२१७** | **११८ एन.इ** | **१९९४** | **१०,०००/-** | १०,५००/- | १३,०००/- | **२०,०००/-** |
| **३** | **MH ०५ A ७७५०** | **जिप** | **१९९६** | **१०,०००/-** | २५,०००/- | १५,०००/- | **४०,०००/-** |
| **४** | **MH ०५ P १७** | **पीक-अप** | **२०००** | **१५,०००/-** | २५,०००/- | १५,१००/- | **७०,०००/-** |
| **५** | **MH ०५ S- ७०८** | **जिप** | **२००१** | **१५,०००/-** | ३५,०००/- | ३५,०००/- | **७०,०००/-** |
| **६** | **MH ०५ S २९८४** | **टाटा एस** | **२००५** | **२०,०००/-** | २७,००० | ५०,०००/- | **६०,०००/-** |
| **७** | **MH ०५ A ९४६२** | **जे.सी.बी.** | **१९९८** | **२,५०,०००/-** | २,००,०००/- | २,५०,०००/- | **२,५०,०००/-** |
| **८** | **MH ०५ P १०१०** | **हॉन्डा सीटी** | **२००६** | **७०,०००/-** | २५,०००/- | ००/- | ४०,०००/- |
| **९** | **MH ०५ N ३८** | **अशोक लेलन (फायर व्हॅन)** | **२००४** | **१,२०,०००/-** | २,००,०००/- | **३,००,०००/-** | २,७३,१३०/- |
| **१०** | **MH ०५ P ६४** | **टाटा इंडीगो** | **२००९** | **१,२०,०००/-** | २०,०००/- | ००/- | ४०,०००/- |
| **११** | **MH ०५ P ६५** | **टाटा इंडीगो** | **२००९** | **१,१०,०००/-** | २०,०००/- | ००/- | ४०,०००/- |
| **१२** | **MH ०५ R ६३४** | **फोर्स मोटर्स (रुग्णवाहीका)** | **२००८** | **५०,०००/-** | ५५,०००/- | **६५,०००/-** | ४०,०००/- |
| **१३** | **MH ०५ R ६५१** | **फोर्स मोटर्स (शव वाहिका)** | **२००८** | **५०,०००/-** | ५१,०००/- | **५१,०००/-** | ५०,०००/- |
| **१४** | **MH ०५ S ३३८७** | **टाटा मोटर्स** | **२००६** | **१२,०००/-** | २५,०००/- | ५०,०००/- | **५०,०००/-** |
| | | | | **८,६४,०००/-** | ७,३१,०००/- | ८,५८,१००/- | **१०,६३,१३०/-** |

वरील तुलनात्मक् तक्त्यानुसार उप प्रादेशीक परिवहन अधिकारी, कल्याण यांनी १४ वाहनाचा बाजार मुल्यांकन रक्कम् रु. ८,६४,०००/- आहे. त्यानुसार १) मे. दिपक ट्रेडर्स, उल्हासनगरयांनी सादर केलेले दर रु ७,३१,०००/-२) मे.नॅशनल इंटरप्राईजेस उल्हासनगर यांनी सादर केलेले दर रु.८,५८,१००/- ३)मे. अब्दुल्ला स्क्रॅप ट्रेडर्स, उल्हासनगर यांनी सादर केलेले दर रु.१०,६३,१३०/- सादर केलेले दर आहे.

उक्त् पाहता मे. अब्दुल्ला स्क्रॅप ट्रेडर्स, उल्हासनगर यांनी उप प्रादेशीक परिवहन अधिकारी, कल्याण यांनी दिलेल्या मुल्य् निधा्रीत रक्कमेपेक्षा दर जास्त् म्हजेच रु १०,६३,१३००/- आहे. परंतु निविदामध्ये अट क्र, ८ नुसार सदर निविदा प्रक्रियात वाहनाचा ॲटमवाईज /वैयक्तिक वाहनाचा दर भरणेत यावे. असे दर्शविले असताना तरीही सदर निविदाकारानीअनुक्रमे ८,१०,११ व १२ यांचे दर आर.टी.ओ. च्या दरापेक्षा कमी किंमत दर्शवली असल्याने सदर निविदाकारानावाटाघाटी करण्यासाठी उप आयुक्त (वाहन) यांनी दिलेल्या आदेशान्वये वाहन विभागामार्फत जा.क्र. उमपा/वाहन/८४/२१ दिनांक ३०/९/२०२१ रोजी पत्रान्वये सदर निविदाकाराना दिनांक ०४/१०/२१ रोजी पत्रान्वये बोलविण्यात आले.

सदर निविदाकारानी वाहनाबाबत कळविले असता.अनुक्रमे ८,१० व ११ या वाहनाचे दर जास्त् असल्यामुळे निविदाकार सदरच्या वाहनाचे जास्तीचे दर भरु शकत नाही. बाकी वाहनाचे खरेदी करण्यास ते तयार आहेत. असे दिनांक ०८/१०/२०२१ रोजीच्या पत्रान्वये मनापास कळविलेले आहे.

अ) वाहनाची दराचा तक्ता पाहिला असता मे.नॅशनल इंटरप्राईजेस उल्हासनगर यांनीवाटाघाटी करुन सादर केलेलेदर खालीलप्रमाणे आहेत.

| अ. क्र. | वाहनाचा नोंदणी क्र. | वाहनाचा प्रकार | वाहन खरेदी वर्ष | वाहनाची अंदाजे किंमत (बाजारभावप्रमाणे) | मे. दिपक ट्रेडर्स | मे.नॅशनल इंटरप्राईजेस यांचे दर | | मे. अब्दुल्ला स्क्रॅप ट्रेडर्स |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | निविदेतील दर | वाटाघाटीचे दर | |
| १ | **MH ०५ A ९४६२** | **जे.सी.बी.** | **१९९८** | **२,५०,०००/-** | २,००,०००/- | २,५०,०००/- | **२,९६,१८०/-** | २,५०,०००/- |
| २ | **MH ०५ N ३८** | **अशोक लेलन (फायर व्हॅन)** | **२००४** | **१,२०,०००/-** | २,००,०००/- | **३,००,०००/-** | ३,००,०००/- | २,७३,१३०/- |
| ३ | **MH ०५ R ६३४** | **फोर्स मोटर्स (रुग्णवाहीका)** | **२००८** | **५०,०००/-** | ५५,०००/- | **६५,०००/-** | ६५,०००/- | ४०,०००/- |
| ४ | **MH ०५ R ६५१** | **फोर्स मोटर्स (शव वाहिका)** | **२००८** | **५०,०००/-** | ५१,०००/- | ५१,०००/- | **६१,३६०/-** | ५०,०००/- |
| ५ | **MH ०५ S ३३८७** | **टाटा मोटर्स** | **२००६** | **१२,०००/-** | २५,०००/- | ५०,०००/- | **६०,१८०/-** | ५१,०००/- |
| | | | | **४,८२,०००/-** | | | **७,८२,७२०/-** | |

ब) वाहनाची दराचा तक्ता पाहिला असता मे. अब्दुल्ला स्क्रॅप ट्रेडर्स, उल्हासनगर यांनी वाटाघाटी करुन सादर केलेलेदर खालील प्रमाणे आहेत.

| अ. क्र. | वाहनाचा नोंदणी क्र. | वाहनाचा प्रकार | वाहन खरेदी वर्ष | वाहनाची अंदाजे किंमत (बाजारभावप्रमाणे) | मे. दिपक ट्रेडर्स | मे.नॅशनल इंटरप्राईजेस | मे. अब्दुल्ला स्क्रॅप ट्रेडर्स यांचे वाटाघाटी नंतरचे दर | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | निविदेतील दर | नंतरचे दर |
| १ | **MH ०५ H १३२२** | **११८ एन.इ** | **१९९७** | **१२,०००/-** | १२,५००/- | १४,०००/- | **२०,०००/-** | **२०,०००/-** |
| २ | **MH ०५ C २२१७** | **११८ एन.इ** | **१९९४** | **१०,०००/-** | १०,५००/- | १३,०००/- | **२०,०००/-** | **२०,०००/-** |
| ३ | **MH ०५ A ७७५०** | **जिप** | **१९९६** | **१०,०००/-** | २५,०००/- | १५,०००/- | **४०,०००/-** | **४०,०००/-** |
| ४ | **MH ०५ P १७** | **पीक-अप** | **२०००** | **१५,०००/-** | २५,०००/- | १५,१००/- | **७०,०००/-** | **७०,०००/-** |
| ५ | **MH ०५ S- ७०८** | **जिप** | **२००१** | **१५,०००/-** | ३५,०००/- | ३५,०००/- | **७०,०००/-** | **७०,०००/-** |
| ६ | **MH ०५ S २९८४** | **टाटा एस** | **२००५** | **२०,०००/-** | २७,००० | ५०,०००/- | **६०,०००/-** | **६०,०००/-** |
| | | | | **८२,०००/-** | | | | **२,८०,०००** |

तसेच वाहन क्र.१) MH-०५-P-९०९०, २) MH-०५-P-६४, ३) MH-०५-P- ६५ या वाहनाची विक्रिची किंमत पुन्हा उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, कल्याण यांच्याकडून निर्धारीत करण्यातसाठी दिनांक २७/१०/२०२१ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. त्यानंतर उर्वरीत वाहनाची नव्याने निविदा प्रक्रिया करण्यात येईल.

वरील बाब लक्षात घेता १) मे.नॅशनल इंटरप्राईजेस उल्हासनगर यांनी सादर केलेले ५ वाहनांचे दर रु.७,८२,७२०/- २)मे. अब्दुल्ला स्क्रॅप ट्रेडर्स, उल्हासनगर यांनी सादर केले ६ वाहनाचे दर रु. २,८०,०००/- सर्वात जास्त् दर वाहन निहाय प्राप्त् झाले आहेत. सदरच्या प्रक्रियेनुसार संबधित निविदाधारकाला अ व ब प्रमाणे निर्लेखीत एकुण ११ वाहने देण्यास मा. महासभेची मंजुरी आवश्यक् आहे.

वरील बाब लक्षात घेता जर सर्वाधिक दराच्या निविदा धारकाने निर्लेखीत वाहन घेण्यास नकार दिला तर त्याची EMD जप्त् करुन दुसऱ्या निविदाधारकाला अपेक्षित दरानुसार निर्लेखीत वाहनाची विल्हेवाट करण्यासाठी मा. आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास ही मान्यता आवश्यक आहे.

तरी सदरचा प्रस्ताव मा.महासभेपुढे मंजुरी करीता सादर करण्यात येत आहे.

**महासभा ठराव क्र:३८** **दिनांक:—** २४/१२/२०२१

सुचकाचे नाव :— श्री. प्रमोद टाले

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेतील वाहन विभागाअंतर्गत ई निविदा प्रक्रियाद्वारे सर्वाधिक दराच्या निविदा धारकाने निर्लेखीत वाहन घेण्यास नकार दिला तर त्याची EMD जप्त् करुन दुसऱ्या निविदाधारकाला अपेक्षित दरानुसार निर्लेखीत एकुण ११ जुने भंगार वाहनाची विल्हेवाट करुन विक्री करण्यासाठी आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

पीठासीन अधिकारी

सर्वसाधारण महासभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** इतिवृत्ताची वाट न पहाता हा विषय पास झाला आहे. मी पॉईंट ऑफ ऑर्डरवर बोलू इच्छितो की, याच्या पहिले जी महासभा झाली, तेव्हा मी एक ठराव आणला होता की, उल्हासनगरमध्ये कल्याण-बदलापुर रोड आणि कल्याण-मुरबाड रोडमध्ये जे अनाधिकृत बांधकाम झाले आहे. काही काम टेलीकम कंपनीने केले आहे. त्यासाठी त्यांच्यावर कारवाई पण केली होती, केबल कट केली होती, पाईप कट केले होते. त्यामुळे त्यांनी उल्हासनगर महानगरपालिकेचा करोडो रुपयाचे बुडवले आहेत. त्या वेळी शहर अभियंता, श्री. महेश सितलानी व्यवस्थात उत्तर देवू शकले नाहीत. तेव्हा आयुक्तांनी कमिटमेंट केले होते की, मागच्या तीन चार दिवसामध्ये मी एफ. आय. आर. करेल. परंतु मला दु:खाने सांगावे वाटत आहे की, आज पर्यंत कोणताही एफ. आय. आर. दाखल झाला नाही. दाखवण्यासाठी शहर अभियंता यांनी दोन पत्र वरिष्ठ पोलिस निरीक्षक उल्हासनगर पोलिस स्टेशनमध्ये २१ सप्टेंबर, २०२१ आणि दुसरा पत्र २९ ऑक्टोंबर २०२१ ला लिहीले आहे. वरिष्ठ पोलिस निरीक्षक मध्यवर्ती पोलिस स्टेशन. परंतु जो पंचनामा सोबत जोडला आहे, या पंचनाम्यामध्ये माझ्याकडे एक प्रत उपलब्ध आहे. पहिला पंचनामा त्यांनी बनवला आहे. २२ सप्टेंबर, २०२२ दुसरा पंचनामा १९ ऑगस्ट २०२० दोन्ही पंचनाम्यामध्ये एक फोटो त्यानी एका सिनियर पोलिस निरीक्षकाला लिहीला आहे की, त्यामध्ये कुठे पण रुंदी आणि लांबी किती खडा खोदला ते कुठेच लिहीले नाही आणि महानगरपालिकेचा किती रिवेन्युचे नुकासान झाले? ते कुठेच लिहीले नाही आणि एफ.आय.आर. असा केला जात नाही. अशा प्रकारे पत्र देवून करोडो रुपयाचे जर आपण तीन किलो मिटर एका बाजुला आणि तीन किलो मिटर दुस-या बाजुला जर पकडले तर ६ किलो मिटर १० हजार रुपये मिटरचा आपला दर आहे. तर एक करोड ते सहा करोड रुपये आपले नुकसान झाले आहे, कमीत कमी. परंतु नुकसान किती झाले आहे याची शहानिशा करण्याची जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभागाची आहे. त्यांनी आपली जबाबदारी बरोबर निभावली नाही आणि आयुक्तांच्या कमेंटमेंटच्या नंतर पण आज पर्यंत एफ.आय.आर. झाला नाही. तर मी पिठासिन अधिकारी या नात्याने मॅडम आपण आयुक्तांच्या स्थानी बसल्या आहेत. मला तुमच्याकडून माहीती पाहीजे की, ही कारवाई कधी होईल आणि जर होत नाही तर त्याच्या मागे काय कारण आहे?

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-** मा. महापौरजी, मा. आयुक्तजी, मा. सदस्य, मी याच्या बदल माहीती सांगतो की, दोन्ही पोलिस स्टेशनमध्ये दोन्ही कंपनी विरुध्द पत्र दिले आहे आणि त्यांनी सांगितले की, आम्ही चौकशी करुन आम्ही त्यांच्यावर एफ.आय.आर. करु. आपल्याकडे स्टाफ कमी असल्यामुळे आपला जो

कन्सलटंट आहे, तो ७ टक्के फी घेत असतो. त्यांना आम्ही आयुक्तांच्या सांगण्या वरुन पत्र दिले होते की, संपुर्ण चौकशी करुन आम्हांला डिटेल देण्यात यावे की, महानगरपालिकेचे किती नुकसान झाला आहे? त्यांना पण पत्र दिले आहे, पण अजून त्यांचा अहवाल आला नाही. त्या हिशोबाने आयुक्तांनी सांगितले की, त्यांना अजून एक रिमाईडर देवून त्यांच्याकडून माहीती घेऊन आम्ही पोलिस स्टेशनला जाणार आहेत.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** तुम्ही आपली जबाबदारी कोणत्याही कन्सलटंटवर ढकलू शकत नाहीत. माझे ऐकुन घ्या, जी कन्सलटंटचा वाचवत नाही पण कन्सलटंटला आपण जो टेंडर दिला आहे, त्याच्याकडून काम करुन घ्यायचे आहे का? जर घ्यायचे आहे तर जर तो अहवाल देत नाही तर त्याच्यावर कारवाई करा.

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-** सर आयुक्त साहेबांनी...

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** तुम्हांला कोणी थांबवले आहे की, त्याच्यावर कारवाई करु नका?

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-** आयुक्त साहेबांनी स्वत: सांगितले आहे की, त्याला ब्लॅक लिस्ट करा, सर त्यांच्यावर ब्लॅक लिस्ट करण्याची कारवाई चालू आहे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** का करीत नाही?

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-** तयारी चालू आहे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** काय तयारी केली आहे? मी कन्सलंटला वाचवत नाही. त्यांना आपण जो टेंडर दिला आहे, त्यांच्याकडून काम करुन घ्यायचे आहेत का? जर घ्यायचे असेल तरी पण तो रिपोर्ट देत नाही तर त्यांच्यावर कारवाई करा. तुम्हांला कोणी थांबवले आहे की, त्यांच्यावर कारवाई करु नका.

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-** आयुक्त साहेबांनी स्वत्: सांगितले होते की, त्याला ब्लॅक लिस्ट करा, तर आम्ही त्यांला ब्लॅक लिस्ट करण्यासाठी तयारी केली आहे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** तुम्ही का करीत नाहीत.

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-** सर ब्लॅक लिस्ट करण्याची तयारी चालू आहे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** तुम्ही तयारी केली आहे.

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-** त्यांच्याकडून उत्तर आले तर आम्ही आयुक्तांकडे सादर करु.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** आता आपण विधी अधिकारी यांना बोलवा, मला माहीती पाहिजे की, एफ.आय.आर. समोरा समोर पत्र दिल्यानंतर केला जातो. आपण पत्र दिले आहे, याला फक्त अर्जच बोलतात. एफ.आय.आर. समोरासमोर केला जातो. एक मर्डर झाला आहे, तर मर्डरसाठी आपण अर्ज करणार का? याच्या पहिले पण जियो इन्फोटेकवर आपण एफ.आय.आर. केला आहे. त्यावेळी श्री. सुधाकर दुशमुख आयुक्त होते. तेव्हा लगेच एफ.आय.आर. केला होता आता वेगळी प्रक्रिया का केली जात आहे. इंजिनियरने जायला पाहीजे आपले सगळे कागदपत्र दिले पाहिजे आणि स्थायी समितीचे ठराव त्यांना दया. पंचनाम्याची प्रत दया, आपल्या पंचनाम्यामध्ये लांबी रुंदी लिहीलीच नाही. तुम्ही काय करणार आपण कसे सांगणार की, महापालिकेचे नुकसान किती झाले आहे?

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-** सर आपण बरोबर बोलत आहेत, त्यासाठी आम्ही त्यांना पत्र दिले आहे ना.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** हे बघा तुमच्याकडे मुकादम आहेत, मिस्त्री आहेत, जुनियर इंजिनियर आहेत, उप अभियंता आहेत, ते काय करीत आहेत? ठिक आहे सुमन काम करीत नाही, त्याच्यावर कारवाई करा.

कारवाई चालतच राहील पण कारवाईच्या याच्यात एफ.आय.आर. थांबेल. आयुक्तांची जी कमेंटमेंट आहे, महासभेच्या समोर त्याची काय पात्रता आहे, पुढे कसे विश्वास करणार? कमेंटमेंट करीत आहेत आणि ती पुर्ण होत नाही आणि महानगरपालिकेचा कर बुडत आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-** मा. महापौरजी, आयुक्त मॅडम, श्री. राजेश वदारिया यांनी सांगिल्याप्रमाणे आपल्या महानगरपालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागाचे कनिष्ठ अभियंता, जुनियर इंजिनियर काम न झाली त्याचे बिल बरोबर बनवतात आणि त्या ठेकेदाराला फायदा कसा होईल ते काम बरोबर करतात.

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:-** १६ कोटी जमा केले आहे. त्यांचे टेंडर पण काढणार आहेत.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-** याचे उत्तर दयायला पाहीजे.

**सदस्य, श्री. शंकर लुंड:-** माझी एक विनंती आहे, आमच्या इथे खोदलेले आहे, प्रभागवारी हे आहे, जिथे जिथे नुकसान झाले आहे, त्या हिशोबाने टेंडर बनवण्यात यावे. एकच बनवण्यात येऊ नये.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** आताच शहर अभियंता यांनी सांगितले की, १६ करोड रुपये महापालिकेला आले आहेत. तर पैसे ज्या कामासाठी आले आहेत, चारही प्रभाग समितीमध्ये ४, ४, करोड रुपयाचे टेंडर काढले पाहीजेत आणि त्वरीत जो खडडा झाला आहे आणि रोडवायडींग तुटली आहे, ते बनवण्यासाठी कारवाई करायला पाहिजे. ते काम करायला पाहीजे.

**सदस्य, श्री. शंकर लुंड:-** जमनुजी चार करोडच का आमच्या प्रभागामध्ये जास्त रोड तोडलेले आहेत, तर रोडवारीस जेवढे नुकसान झाले आहेत, तेवढे एस्टीमेट बनवा.

**पिठासिन अधिकारी, श्री. भगवान भालेराव:-** सन्माननिय सदस्य, एक सदस्य बोलले दोन सदस्य बोलले ठिक आहे. आता श्री. राजेश वदारिया यांनी मुददा उपस्थित केला खुप गंभीर बाब आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाचे उप आयुक्त आणि शहर अभियंता दोघांनीही आठ दिवसाच्या आता संबंधितावर गुन्हे दाखल झाले पाहिजेत असे आदेश देण्यात येत आहेत.

**सदस्य, श्री. अरुण आशान:-** मा. पिठासिन अधिकारीजी, सभागृहाच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर जर प्रशासन कारवाई करीत असेल तर त्या अगोदर आपण एवढे पैसे खर्च करुन डांबरीकरण केले पावसाळयामध्ये जास्त पाऊस पडला लोकांची बोंबाबोब झाली, अपघात झाले. मग बनवलेले रस्ते खोदून परत पैसे देवून बनवायचे मग ते पैसे आल्याचा उपयोग काय आणि आता त्याच्यामध्ये ११५५१ लांबीचा रस्ता खडडे भरा म्हणून पत्र दिलेले आहे. म्हणजे ज्या ठिकाणी आपण साईड पटटी भरलेली आहे. ती परत जेवढी खोदली आणि परत ती साईड पटटी भरायची मग हे प्रशासनाच्या अगोदर लक्षात आले नाही का? भरायच्या अगोदर हा पैसा का वाया गेला जर का तुम्हांला कामच करायचे होते तर त्या रस्त्यावर तुम्ही साईड पटटी भरायच्या अगोदर तुम्ही का वर्क ऑर्डर दिली नाही. हा रस्ता बाकीआहे हया रस्तेचे पहीले काम करा मग साईड पटटी भरा. आजही पवई चौकाच्या पुढे तिथे खडे पडलेले आहेत, तिथे अजून डांबरीकरण झाले नाही. असे असतांना झालेले काम तोडायचे परत साईड पटटी भरायची त्या करीता परत निविदा प्रक्रिया काढायची म्हणजे प्रशासन आमच्या डोळयामध्ये धूळ फेकते साहेब. महापौर महोदया यांनी जो पॉईंट ऑफ ऑर्डरवर विषय घेतलेला आहे.

**पिठासिन अधिकारी, श्री. भगवान भालेराव:-** पुढचा विषय घ्या, आता भरपूर झाले.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** मा. महापौरजी, अरुण आशान यांनी जो विषय घेतला आहे, तर मला वाटते की, शासनाची पकड संपुर्णणे ढिली झाली आहे. प्रशासनाला बघणारा कोणीच नाही. हे जो काम आहे, हे बघणे आणि आम्ही इथे असाहय झालो आहेत.

**पिठासिन अधिकारी, श्री. भगवान भालेराव:-** पुढचा विषय घ्या.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** नाही, नाही पॉईड ऑफ ऑर्डरचा विषय दुसरा आहे.

**पिठासिन अधिकारी, श्री. भगवान भालेराव:-** नाही, नाही दुसरा येणार नाही.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** यशवंत सगळे अॅन्टीकरप्शनमध्ये पकडलेले आहेत.

या वेळी काही सदस्य, एकत्रित बोलत असल्यामुळे कोण काय बोलत होते, ते स्पष्ट समजून आले नाही.

**पिठासिन अधिकारी, श्री. भगवान भालेराव:-** आपण बोला. बोला.

**महापालिका सचिव :—** विषय क्र. १८ वाचुन दाखवितात

---

⇨ विषय क्र. १८ :— **मेसर्स कोणार्क इ.प्रा.प्रा.लिमिटेड, उल्हासनगर, घनकचरा वाहतुक ठेकेदार यांच्या खाजगी ठेक्याची मुदत दिनांक ५ डिसेंबर, २०२१ रोजी संपुष्टात येत आहे, तरी ३१ मार्च, २०२२ पर्यंत अथवा नविन अभिकर्त्याची नेमणूक होऊन नविन परिपुर्ण व्यवस्था कार्यान्वित होईपर्यत त्यांना मुदत वाढीस मा. महासभेची मान्यता मिळणेबाबत.**

---

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** अहो साहेब चार नंबरचा रस्त्याच्या बाबतीत मला पॉईंट ऑफ ऑर्डरवर बोलायचे आहे. नाईकवाडे साहेब, यशवंत सगळे लाचलुच विभागाने पकडले आहेत. त्यावर खुली चर्चा करण्यात यावी. जो पर्यंत यावर आपण चर्चा करणार नाहीत

**सदस्य, श्री.राजेंद्रसिंह भुल्लर:-** विषय क्र.१८ २ तारखेला महासभेमध्ये पेडींग होता.

**पिठासिन अधिकारी, श्री. भगवान भालेराव:-** पॉईंट ऑफ आर्डरने नंतर बोला. एकदा विषय झाला आहे ना.

**सदस्य, श्री.राजेंद्रसिंह भुल्लर:-** विषय क्र.१८ जो २ तारखेच्या महासभेमध्ये प्रलंबित होता,

**पिठासिन अधिकारी, श्री. भगवान भालेराव:-** फक्त माहितीसाठी आहे.

**सदस्य, श्री.राजेंद्रसिंह भुल्लर:-** माहितीसाठी नाही, मान्यतेसाठी आहे, जरा वाचा. तुम्हाला वाचता येत नाही का? जरा वाचा मान्यतेसाठी आहे. माहितीसाठी नाही हे बघा.

**पिठासिन अधिकारी, श्री. भगवान भालेराव:-** त्यांनी विषय मागे घेऊन परत आणला आहे.

**उप आयुक्त (मुखलय) तथा महापालिका सचिव:-** त्यांचा नंतर पत्र आलेले आहे. आजच पत्र आलेले आहे.

**पिठासिन अधिकारी, श्री. भगवान भालेराव:-** ठिक आहे, पुढे चला.

**सदस्य, श्री.राजेंद्रसिंह भुल्लर:-** १८ नंबरचा विषय २ तारखेच्या महासभेमध्ये प्रलंबित होता, जादुगार आहे का १ तारखेला गोषवारा स्थायी समितीमध्ये पाठवला. याला जबाबदार कोण आहे? अधिकारी कोण आहेत?

**पिठासिन अधिकारी, श्री. भगवान भालेराव:-** ठिक आहे, ठिक आहे राजेशभाई बोला.

**सदस्य, श्री.राजेंद्रसिंह भुल्लर:-** मला या विषयावर बोलू दया, पिठासिन अधिकारीजी मला बोलू दया आणि अधिकारी यांना उत्तर दयायला सांगा. अधिका-यानी उत्तर दयावे की, २ तारखेला विषय प्रलंबित होता आणि १ तारखेला गोषवारा स्थायी समितीमध्ये कसा गेला? अजेडावर विषय कसा आला सांगा. कोण सांगणार?

**सदस्य, श्री. जीवन इदनानी:-** मा. महापौर साहेब, हे तर खुप मोठे करप्शन आहे.

**<u>सदस्य, श्री.राजेंद्रसिंह भुल्लर:-</u>** एसी.पी. कडून चौकशी करा. अधिका-यांनी सही केली आहे, ते आतमध्ये जाणार.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:-</u>** मा. महापौरजी....

**<u>सदस्य, श्री.राजेंद्रसिंह भुल्लर:-</u>** आपण गप्प बसा मध्येच बोलू नका.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:-</u>** मी हेच सांगत आहे की, आपण आपले बोलणे पुर्ण करा, मी नंतर बालेल.

**<u>सदस्य, श्री. जीवन इदनानी:-</u>** महाराजजी बरोबर बोलत आहेत.

**<u>सदस्य, श्री.राजेंद्रसिंह भुल्लर:-</u>** १ तारखेला स्थायी समितीमध्ये विषय कसा गेला?

**<u>सदस्य, श्री. जीवन इदनानी:-</u>** आपले प्रशासन अंतऱ्यामी आहे. वरुन आले का?

**<u>पिठासिन अधिकारी, श्री. भगवान भालेराव:-</u>** मध्येच का बोलत आहेत जीवनभाई

**<u>सदस्य, श्री. जीवन इदनानी:-</u>** आम्ही सहाय्य करीत आहेत ना, का करणार नाही आपण कोण आहेत, थांबवणारे आपण काही घेतले आहे का?

**<u>सदस्य, श्री.राजेंद्रसिंह भुल्ल्लर:-</u>** मला हे माहिती पाहिजे की,

**<u>सार्वजनिक आरोग्य अधिकारी, श्री. मनिष हिवरे:-</u>** मा. महापौर, उप महापौर, सन्माननिय सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे, त्यात २ तारखेला जी महासभा होती, त्या महासभेमध्ये आपण मान्यतेसाठी नसून माहितीसाठी हा प्रस्ताव आहे. गोषवारा चुकून मान्यतेसाठी पाठवण्यात आला होता, त्या नंतर ...

**<u>सदस्य, श्री.राजेंद्रसिंह भुल्लर:-</u>** मान्यतेसाठी आहे, जरा बघा. तुम्हांला वाचता येत नाही का?

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>** मा. महापौरजी हा विषय महासभेमध्ये आला होता, हे बरोबर आहे. माहीतीसाठी आला किंवा मान्यतेसाठी आला आहे, परंतु मा. आयुक्तांनी तो स्थायी समितीमध्ये पाठवला आणि स्थायी समितीमध्ये प्रत्येक पक्षाचा सदस्य उपस्थित आहे. सर्वांनी पास केला आहे. आता महाराजजींना विचारले नाही, जिल्हाध्यक्षांना विचारले नाही, गटनेत्यांना विचारले नाही.

**<u>सदस्य, श्री.राजेंद्रसिंह भुल्लर:-</u>** मला गटनेत्यांना विचारायची गरज नाही. या विषयामध्ये भ्रष्टाचार झाला आहे, मी बोलणार. हा मान्यतेसाठी आहे, माझ्या पक्षामध्ये जमनादास का बोलत आहेत?

**<u>सार्वजनिक आरोग्य अधिकारी, श्री. मनिष हिवरे:-</u>** सदरचा विषय हा चुकून मान्यतेसाठी महासभेपुढे आला होता. हे लक्षात आल्यानंतर तात्काळ २ तारखेला...

**<u>सदस्य, श्री.राजेंद्रसिंह भुल्लर:-</u>** त्याच दिवशी महासभेच्या दिवशी तुम्ही पत्र दिले का?

**<u>सार्वजनिक आरोग्य अधिकारी, श्री. मनिष हिवरे:-</u>** होय.

**<u>सदस्य, श्री.राजेंद्रसिंह भुल्लर:-</u>** कुणाला दिले? कोणाची सही आहे का त्याच्यावर.

**<u>सार्वजनिक आरोग्य अधिकारी, श्री. मनिष हिवरे:-</u>** सचिवांना पत्र दिलेले आहे.

**<u>सदस्य, श्री.राजेंद्रसिंह भुल्लर:-</u>** सचिवांनी मला दिले त्याची पोच पावती आहे का तुमच्याकडे?

**सार्वजनिक आरोग्य अधिकारी, श्री. मनिष हिवरे:-** नाही, नाही.

**सदस्य, श्री.राजेंद्रसिंह भुल्लर:-** नाही ना, मग हे मान्यतेसाठीच आहे. माहितीसाठी नाही. माझा ठराव आहे, ठराव आहे, ठराव वाचा तुम्ही. या विषयावर माझा ठराव आहे, तुम्हांला वाचून दाखवतो. तर महासभेला मंजर असेल. ही महासभा वरील प्रस्तावनेत झालेल्या सविस्तर चर्चे अंती दिनांक ०२/१२/२०२१ च्या महासभेमध्ये प्रस्ताव प्रलंबित असतांना महासभेने प्रशासनाने मेसर्स कोणार्क इ.प्रा.प्रा.लिमिटेड उल्हासनगर या अभिकर्त्यास व्यक्तीस आर्थिकस्वार्थ, हित साधण्यासाठी महासभेच्या एक दिवस अगोदर म्हणजे ०१/१२/२०२१ रोजी स्थायी समितीच्या पटलावर विषय आणून दिनांक ०३/१२/२०२१ रोजी स्थायी समितीची मिटींग आयोजित करुन स्थायी समिती ठराव क्र.९३ दिनांक ०३/१२/२०२१ रोजी ठराव मंजुर करण्यात आला.

**सदस्य, श्री. जीवन इदनानी:-** पास..पास..

**सदस्य, श्री.राजेंद्रसिंह भुल्लर:-** त्यामुळे मोठया प्रमाणात संशय करण्यात येत आहे.

**सदस्य, श्री. जीवन इदनानी:-** ठराव पास करण्यात येत आहे.

**सदस्य, श्री.राजेंद्रसिंह भुल्लर:-** सदरची बाब ही महासभा...

**सदस्य, श्री. जीवन इदनानी:-** महाराजजीचा ठराव पास करण्यात यावा.

**सदस्य, श्री.राजेंद्रसिंह भुल्लर:-** म्हणून ही महासभा स्थायी समिती ठराव क्र. ९३ दिनांक ०३/१२/२०२१ रोजीचा रदद करीत आहे. तसेच सदर प्रकरणी जबाबदार असलेले स्थायी समितीचे अधिकारी यांची लाचलुचपत प्रतिबंध जिल्हा, ठाणे यांच्याकडून तात्काळ चौकशी करण्याचे मान्यता देत आहे. हा माझा ठराव आहे, मला कोणी कायदा सांगावा.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** मला हे सांगा, हा ठराव कसा आणला दोन तास पहिले आला, चार तास पहिले आला ही आजची मिटींग आहे, स्थगित महासभेमध्ये कसे आणू शकतात हे मला जरा नियम सांगा. काय आणत आहेत, समजायला काहीच येत नाही.

**सदस्य, श्री.राजेंद्रसिंह भुल्लर:-** हा ठराव आहे, महासभेचा.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** कशा बाबतीत आहे. विषय कुठे आहे? विषयाशिवाय ठराव आता १९ नंबरचा झाला आता कोणता विषय चालला आहे. विषय कुठे आहे.

**सदस्य, श्री.राजेंद्रसिंह भुल्लर:-** विषय क्र. १८ चालू आहे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** तुम्ही मला एक सांगा, जो विषय अगोदरच स्थायी समितीमध्ये झाला आहे.

**सदस्य, श्री.राजेंद्रसिंह भुल्लर:-** स्थायी समिती मोठी ओ की महासभा मोठी आहे, ते सांगा. अधिका-यांनी काय सांगितले...

**पिठासिन अधिकारी, श्री. भगवान भालेराव:-** महाराजजी आपण ठराव वाचला आहे, आता त्यांना बोलू दया.

**सदस्य, श्री.राजेंद्रसिंह भुल्लर:-** नाही नाही, महासभा मोठी की स्थायी समिती मोठी पिहले ते सांगा

**पिठासिन अधिकारी, श्री. भगवान भालेराव:-** आपण बसून घ्या, राजेश वदारिया बोला.

**सदस्य, श्री.राजेंद्रसिंह भुल्लर:-** महासभा मोठी आहे की स्थायी समिती सचिवांनी सांगावे.

**<u>पिठासिन अधिकारी, श्री. भगवान भालेराव:-</u>**आपण ठराव वाचला आहे तर आपण बसून घ्या.

**<u>सदस्य, श्री.राजेंद्रसिंह भुल्लर:-</u>** नाही, नाही पहिले सचिवांनी सांगावे.

**<u>पिठासिन अधिकारी, श्री. भगवान भालेराव:-</u>** त्यांना बोलू दया.

**<u>सदस्य, श्री.राजेंद्रसिंह भुल्लर:-</u>** मला सचिवांनी सांगावे की, महासभा मोठी की स्थायी समिती मोठी.

**<u>पिठासिन अधिकारी, श्री. भगवान भालेराव:-</u>** हे तुम्हांलाच सांगावे लागेल, त्यांना पण बोलू दया.

**<u>सदस्य, श्री.राजेंद्रसिंह भुल्लर:-</u>** जमनादास यांना कमी ऐकायला येते. सचिवांना बोलू दया की, स्थायी समिती मोठी आहे की महासभा मोठी आहे.

**<u>सदस्य, श्री. रमेश चव्हाण:-</u>** मा. पिठासिन अधिकारी महाराज दोन मिनीटे विचारतात तर तुम्हांला का टेंशन येत आहे

**<u>पिठासिन अधिकारी, श्री. भगवान भालेराव:-</u>** प्रत्येक गोष्टीला अधिका-यांना बोलावायचे का? प्रत्येक नगरसवेकाला त्यांना बोलू दया आपण आता खाली बसा.

**<u>सदस्य, श्री.राजेंद्रसिंह भुल्लर:-</u>** तुम्हांला टेंशन का होत आहे? पहीले सांगू दया, महासभा मोठी की स्थायी समिती मोठी.

**<u>सदस्य, श्री. रमेश चव्हाण:-</u>** त्यांना उत्तर देवू दया.

**<u>सदस्य, श्री.राजेंद्रसिंह भुल्लर:-</u>** त्यांना सांगू दया, महासभा मोठी की स्थायी समिती मोठी.

**<u>पिठासिन अधिकारी, श्री. भगवान भालेराव:-</u>** मग त्यांना बोलू दया ना.

**<u>सदस्य, श्री.राजेंद्रसिंह भुल्लर:-</u>** महासभा मोठी की स्थायी समिती सभा मोठी सचिव महोदय यांनी सांगावे.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:-</u>** मा. महापौरजी, मी आपले सगळयाचे लक्ष महाराष्ट्र म्युनिसिपल कॉप्रोरेशन सेक्शन ७३ सी कडे देवू इच्छितो की, त्यामध्ये स्पष्ट लिहीले आहे पॉवर टू कमिशनर टू एक्झिट कॉन्टॅक ऑन आफ कॉप्रोरेशन विथ रिस्पेक्ट टू मेकिंग ऑफ कॉन्ट्रेक अन्डर ऑर फॉर एनी प्रपोजल ऑफ धिस साईड इन्कुल्डींग कॉन्ट्रेक ॲपोजिशियल ऑफ दि गोबोल प्रॉपर्टी ऑफ एनी इन्ट्रेस देयर इन फॉलाईंग प्रोव्हिजन छल विल  टू बिल इफेक्ट नेमली ए एवरी सच कॉन्ट्रेक शाल बि मेड ऑफ कॉप्रोरेशन बाय दि कमिशनर बी नो सच कॉन्ट्रेक्टर एनी प्रपोजल विच धिस ॲक्ट दि कमिशनर दे नॉट केरी आउट विध्दाउट दि ॲप्रुल सेक्शन आफ ऑदर म्युनिसिपल ऑथॉरिटी शाल बी मेड बाय डिमांड नेमली सच ॲप्रुल ऑर सेक्शन हॅज बिन टूलीफ गीव्हन सी नो कॉन्ट्रॅक्ट ऑदर दॅन ....

**<u>सदस्य, श्री.राजेंद्रसिंह भुल्लर:-</u>** आपण इंग्लिशमध्ये वाचत नाही आम्ही एवढे शिकलेले नाहीत, आम्हांला येत नाही. याचे हिंदीमध्ये अनुवाद करा आणि मराठीमध्ये सांगा. ॲग्रेजी आम्हांला कोणालाच येत नाही. आयुक्तांना पॉवर सांगत आहेत ना, तर आयुक्तांनी असे का केले स्थायी समितीमध्ये पाठवण्यासाठी, महासभेमध्ये पाठवण्यासाठी जर आयुक्तांना पॉवर आहे तर.

**<u>सदस्य, श्री. राजेश वानखेडे:-</u>** हा पॉईंट मराठीमध्ये वाचून दाखवा. हा जो यांचा मुददा आहे, पॉईंट आहे त्याला मराठीमध्ये भाषांतर करुन दया. महाराजांना तो पॉईंट समजलेला नाही. तो समजावून सांगा.

**<u>सदस्य, श्री.राजेंद्रसिंह भुल्लर:-</u>** मला समजून सांगा.

**<u>सदस्य, श्री. राजेश वानखेडे:-</u>** मराठीमध्ये सांगा.

**<u>सदस्य, श्री.राजेंद्रसिंह भुल्लर:-</u>** मराठीत किंवा हिंदीमध्ये आम्हांला समजून सांगा.

**<u>सदस्य, श्री. राजेश वानखेडे:-</u>** सचिव तुम्ही अहात ना तुम्ही आम्हांला सांगा. मराठीमध्ये कारभार करायचा आहे मराठीमध्ये सांगा.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:-</u>** माझ्या जवळ जे आहे, ते इंग्लिशचे वर्जन आहे. माझ्याकडे मराठीचे वर्जन नाही आहे.

**<u>सदस्य, श्री. राजेश वानखेडे:-</u>** मराठीत सांगा.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:-</u>** सचिवांना सांगा, सेक्शन ७३ सी मराठीमध्ये सांगायला. ही गोष्ट आहे महापौरजी स्थायी समितीचे सभापती राहीले आहेत. काही वेळा सदस्य राहीले आहेत. त्यांना पण माहिती आहे की आयुक्त कोणताही ठेका स्थायी समितीशिवाय मंजू करु शकत नाही. महासभा मोठी या छोटी असे होऊ शकत नाही. महासभेचे अधिकार वेगळे असतात पॉलिसी बनवण्याचे मी एक गोष्ट प्रत्येक वेळी या सभागृहामध्ये सांगत आलो आहे, महासभा मोठी नाही आणि स्थायी समिती मोठी नाही. आपल्या महाराष्ट्र म्युनिसिपल कॉप्रोरेशन ॲक्टमध्ये प्रत्येकाचे आपले रोड, आपली डयुटी, आपली जबाबदारी दिली आहे. सेक्शन ७३ सी मध्ये स्थायी समितीची जबाबदारी दिली आहे, ठेका करायचा आहे, त्याचे अधिकार आयुक्तांना देवू शकतो. सेक्श्न ४८१ मध्ये वाटाघाटी करण्याची कोणतीही केस चालली आहे, त्याचे सेटलमेंट करण्याचा किंवा जे पण आहे, सेक्शन ९९ मध्ये बजेट बनवण्याचे जे अधिकार आहेत, ते स्थायी समितीला आहेत. महासभेला पॉलिसी बनविण्याचे सेक्शन ९९ मध्ये बजेट पास झाल्या नंतर महासभा फायनल करते. अशा प्रकारचे अधिकार महाभेला आहेत. तर स्थायी समिती मोठी नाही किंवा महासभा लहान नाही. प्रत्येक कामे सेक्शन ७३ सी मध्ये जे आयुक्तांनी स्थायी समितीला गोषवारा पाठवला होता, त्याला स्थायी समितीने मंजुर केले आहे आणि तो ठेका साईन झाला आहे. हा जर माहीतीसाठी आहे, जर पाठवत नव्हते, जर कंम्पसरी त्यांच्यासाठी नाही.

**<u>सदस्य, श्री. जीवन इदनानी:-</u>** महापौर साहेब, हा विषय पहिलेच महासभेमध्ये आला आहे. याच्या नंतर माहिती नाही यांना कुठून आला वरुन बोलवणे आले आहे, दिव्यदृष्टी आली आहे. त्यांना माहिती आहे की, ही महासभा होणार नाही. स्थायी समितीमध्ये विषय आला आहे. हा विषय महासभेमधून वगळण्यात आला आहे का? जो पर्यंत नाही तो पर्यंत ही महासभेची प्रॉपर्टी आहे. आपण काहीच करु शकत नाही.

**<u>पिठासिन अधिकारी, श्री. भगवान भालेराव:-</u>** त्यांनी आपल्याला माहितीसाठी दिला आहे.

**<u>सदस्य,श्री. जीवन इदनानी:-</u>** माहितीसाठी नाही आहे.

**<u>पिठासिन अधिकारी, श्री. भगवान भालेराव:-</u>** पहीले दिले आहे, माहितीसाठी दिला आहे.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:-</u>** आपण माहितीची नोंद करीत आहेत. माहिती नोंद केली.

**<u>पिठासिन अधिकारी, श्री. भगवान भालेराव:-</u>** ओके माहितीची नोंद केली.

**<u>सदस्य, श्री.राजेंद्रसिंह भुल्लर:-</u>** माहितीची नोंद होणार नाही, मोठा भ्रष्टाचार आहे.

**<u>सदस्य, श्री. जीवन इदनानी:-</u>** कुठे लिहीले आहे, माहीतीसाठी.

**<u>सदस्य, श्री.राजेंद्रसिंह भुल्लर:-</u>** पिठासिन अधिकारी ठरावाचे अनुमोदक आहेत. त्यामुळे त्यांना राग येत आहे, यामध्ये त्यांचा स्वार्थ आहे. ही माहिती नोंद होणार नाही माझा विरोध आहे.

**सदस्य, श्री. जीवन इदनानी:-** माहितीसाठी कुठे लिहीले आहे.

**पिठासिन अधिकारी, श्री. भगवान भालेराव:-** पास..पास..

**सदस्य, श्री.राजेंद्रसिंह भुल्लर:-** विरोध आहे, विरोध आहे.

**सदस्य, श्री. जीवन इदनानी:-** पास नाही, मतदान घ्या, मतदान

**सदस्य, श्री.राजेंद्रसिंह भुल्लर:-** मतदान घ्या, मतदान दहा लोक विरोधात आहेत.
**सदस्य, श्री.राजेंद्रसिंह भुल्लर:-** मतदान घ्या सचिव साहेब.

**सदस्य, श्री. राजेश वानखेडे:-** हे काय चालले आहे?

**सदस्य, श्री.राजेंद्रसिंह भुल्लर:-** उभे राहून बोला, बसून बोलता येत नाही.

**सदस्य, श्री. जीवन इदनानी:-** वोटींग घ्या.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** मा. सभापतीजी हा २० नंबरचा विषय...

**सदस्य, श्री. राजेश वानखेडे:-** २० नंबरचा विषय नाही, १८ नंबरचा चालू आहे.

**पिठासिन अधिकारी, श्री. भगवान भालेराव:-** २० नंबरचा विषय घ्या.

**सदस्य, श्री. राजेश वानखेडे:-** २० नंबरचा नाही, १८ नंबरचा आहे.

**सदस्य, श्री. जीवन इदनानी:-** मतदान घ्या.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** मा. महापौरजी, हा महापौरांच्या वार्डाचा विषय आहे.

**पिठासिन अधिकारी, श्री. भगवान भालेराव:-** २० नंबरच्या विषयावर बोलायचे आहे का कोणाला?

**सदस्य, श्री. जीवन इदनानी:-** मतदान घ्या, मतदान.

**पिठासिन अधिकारी, श्री. भगवान भालेराव:-** फायरच्या विषयावर बोलायचे आहे का? पास..पास..

**सदस्य, श्री.राजेंद्रसिंह भुल्लर:-** कोणता विषय आहे?

**पिठासिन अधिकारी, श्री. भगवान भालेराव:-** २० नंबरचा विषय आहे.

**सदस्य, श्री. राजेश वानखेडे:-** १८ नंबरचा विषय चालू आहे महाराज त्यासाठी उभे आहेत. १८ नंबरचा अजून संपला कुठे आहे.

**सदस्य, श्री.राजेंद्रसिंह भुल्लर:-** १८ नंबरचा विषयावर मतदान घ्या.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** मा. महापौरजी हा जो २० नंबरचा विषय आहे, खुप महत्वाचा विषय आहे. जो प्रशासनाने विषय आणला आहे, खुप महत्वाचा विषय आहे.
या वेळी काही सदस्य एकत्रित बोलत असल्यामुळे कोण काय बोलत होते, ते स्पष्ट समजून आले नाही.

**<u>सदस्य, श्री. अरुण आशान:-</u>** २० नंबरच्या विषयावर मला बोलायचे आहे. हा जो विषय आहे.

**<u>सदस्य, श्री. राजेश वानखेडे:-</u>** २० नंबरचा विषय वाचला आहे, तुम्ही स्टेज जवळ नव्हते. तुमची रेकॉर्डींग काढा.

**<u>पिठासिन अधिकारी, श्री. भगवान भालेराव:-</u>** अरुणजी बोला.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:-</u>** २० नंबरच्याच विषयावर बोलत आहे, हा विषय महत्वाचा आहे. यामध्ये प्रॉब्लेम झाला आहे. हा संपुर्ण शहरासाठी विषय आणला पाहीजे.

**<u>पिठासिन अधिकारी, श्री. भगवान भालेराव:-</u>** १८ नंबरचा माहीतीसाठी सादर आहे.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-</u>** जर महासभा चालवायची असेल तर १८ नंबरच्या विषयावर चर्चा झाली पाहिजे. प्रशासनाची चुकी आहे. प्रशासनाने तो विषय महासभेमध्ये का आणला? १८ नंबरचा तो विषय आणला का?

**<u>सदस्य, श्री.राजेंद्रसिंह भुल्लर:-</u>** १८ नंबरवर मतदान का घेत नाहीत?

**<u>पिठासिन अधिकारी, श्री. भगवान भालेराव:-</u>** प्रशासनाने पत्र दिले आहे, माहितीसाठी सादर म्हणून.

**<u>सदस्य, श्री.राजेंद्रसिंह भुल्लर:-</u>** आता पत्र आम्हांला नको.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-</u>** १८ नंबरचा विषय मंजूर होण्याच्या अगोदर महासभेमध्ये आणला होता.मग महासभेमध्ये तो विषय होत नाही. महासभेमध्ये येत नाही मग आणला का होता? ते उत्तर प्रशासनाने दयायला पाहिजे ना.

**<u>पिठासिन अधिकारी, श्री. भगवान भालेराव:-</u>** प्रशासनाने माहितीसाठी म्हणून दाखवला आहे.

**<u>सदस्य, श्री. राजेश वानखेडे:-</u>** माहितीसाठी नाही, मंजुरीसाठी आहे.

**<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-</u>** महासभेमध्ये कधीच माहितीसाठी विषय नसतो. आयुक्त साहेब महासभेमध्ये निर्णय होत असतो. माहिती होत नाही.

**<u>सदस्य, श्री. जीवन इदनानी:-</u>** गोषवारा वाचा गोषवारा.

**<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-</u>** महापौरजी ही कोणती महापालिका आहे, इथे फक्त माहितीसाठी विषय येत असतो. टू बी नोटेड हाऊस

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:-</u>** डॉक्टरजी इंग्लिश बोलू नका, सगळयांना समजायला येत नाही.

**<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-</u>** ही माहिती असू शकत नाही. मराठीत बोलतो तुम्हांला समजते का?

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:-</u>** मा. पिठासिन अधिकारीजी, बसून बोलत आहेत, ही शिस्त नाही.

**<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-</u>** मी मराठीत सांगतो, सिंधीमध्ये सांगतो, हिंदमध्ये सांगतो माहितीसाठी महासभा होऊ शकत नाही.

**<u>सदस्य, श्री. जीवन इदनानी:-</u>** गोषवारा वाचा, गोषवारा

**<u>सदस्य, श्री.राजेंद्रसिंह भुल्लर:-</u>** १८ नंबरचा विषय, जबाबदारीने बोला नाही तर ॲन्टीक्रप्शन होईल.

**पिठासिन अधिकारी, श्री. भगवान भालेराव:-** १८ नंबरवर बोलू दया ना त्यांना.

**सदस्य, श्री. अरुण आशान:-** १८ नंबरवर मी बोलतो.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** जीवन इदनानी आतमध्ये जाऊन बोलत आहेत, हे शिस्तीच्या विरुध्द आहे.

**सार्वजनिक आरोग्य अधिकारी, श्री. मनीष हिवरे:-** मा. महापौर, सन्माननिय सदस्य, सदरचा विषय प्रशासन मागे घेत आहे.

**पिठासिन अधिकारी, श्री. भगवान भालेराव:-** हा विषय मागे घेतलेला आहे, विषय संपलेला आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-** एक मिनीट प्रशासनाने विषय मागे घेतला आहे, पण प्रशासनाची चुक आहे की नाही.
**पिठासिन अधिकारी, श्री. भगवान भालेराव:-** प्रशासनाने विषय मागे घेतला आहे, विषय संपला आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-** ही प्रशासनाची चुक आहे.

**सदस्य, श्री.राजेंद्रसिंह भुल्लर:-** मागे घेण्यासाठी का बोलत आहेत?

**पिठासिन अधिकारी, श्री. भगवान भालेराव:-** प्रशासनाने मागे घेतला आहे, विषय संपला.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-** कोणत्या नियमाने मागे घेतला आहे?

**सदस्य, श्री.राजेंद्रसिंह भुल्लर:-** कोणता नियम, नियम सांगा.

**पिठासिन अधिकारी, श्री. भगवान भालेराव:-** प्रशासन मागे घेऊ शकतो.

**सदस्य, श्री.राजेंद्रसिंह भुल्लर:-** १८ नंबर पुर्ण करा.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-** १८ मध्येच धोका आहे.

**सदस्य, श्री.राजेंद्रसिंह भुल्लर:-** १८ नंबरचा पहीले पुर्ण करा. ही महासभेची मालमत्ता आहे.

**पिठासिन अधिकारी, श्री. भगवान भालेराव:-** महाराजजी १८ नंबरचा विषय मागे घेतला आहे.

**सदस्य, श्री.राजेंद्रसिंह भुल्लर:-** अधिका-याचा विषय नाही मागे घेण्याचा.

**सदस्य, श्री. राजेश वानखेडे:-** तुम्ही कसे बोलत आहेत, संपुर्ण सभागृह ऐकत आहे. हा महापौरांचा अपमान आहे. हे असे प्रशासन शासन चालले आहे.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** जीवन इदनानीने माफी मागितली पाहीजे. आमच्या महापौरांचा अपमान केला आहे.

**सदस्य, श्री. जीवन इदनानी:-** महापौरांचा अपमान केला आहे.

**पिठासिन अधिकारी, श्री. भगवान भालेराव:-** घ्या २० नंबरचा विषय.

**सदस्य, श्री.राजेंद्रसिंह भुल्लर:-** १८ नंबरच्या विषयावर नंतरच्या महासभेमध्ये स्थगन प्रस्ताव आणेल.

**पिठासिन अधिकारी, श्री. भगवान भालेराव:-** ठिक आहे.

**महापालिका सचिव :—** विषय क्र. १९ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १९ :— अग्निशमन विभागाकरीता Aerial Ladder Platfrom फायरव्हॅन खरेदी करणेबाबत**

---

**पिठासिन अधिकारी, श्री. भगवान भालेराव:-** पास..पास.. चला पुढचा विषय घ्या.

**काही सदस्य :—**पास—पास……

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. १९**:— अग्निशमन विभागाकरीता Aerial Ladder Platform फायरव्हॅन खरेदी करणेबाबत.

**प्रस्तावना**

उपरोक्त संदर्भिय विषयानुरूप सादर करणेत येते की, शासनाच्या विकास नियंत्रण नियमावलीनुसार दिनांक ०२/१२ /२०२० अन्वये UDCPR लागू करणेत आलेला आहे. उल्हासनगर शहरामध्ये बहुमजली इमारतीचे प्रस्ताव नगररचना विभागामार्फत मंजुर करणेत येत आहे. त्यानुसार बहुमजली इमारतीमध्ये राष्ट्रीय भवन संहिता (N.B.C.) २०१६ अन्वये आणि UDCPR अन्वये ७० मीटर पेक्षा जास्त उंचीच्या प्रस्तावास मान्यता देणेत आलेली आहे.

अग्निशमन विभागामार्फत आज रोजी एकूण ११ इमारतींना ४५ मीटर ते १०० मीटर पर्यंत उंचीच्या इमारतीकरीता आग प्रतिबंधक उपाययोजना करणेसाठी ना हरकत दाखला देणेत आलेला आहे. सदर विकासक व इतर इमारत धारकामार्फत रक्कम रू ३,१५,८१,३३५/- एवढी अग्निशमन सेवा फी डी.डी.द्वारे वसूल करून Fire Protection Fund मध्ये लेखा विभागात जमा करणेत आलेला आहे.

शासन UDCPR नुसार २४ मी. पेक्षा जास्त उंचीच्या इमारतीमध्ये उल्हासनगर महानगरपालिकेतील अग्निशमन विभागामार्फत आग विझविण्यासाठी **Aerial Ladder Platform** यंत्रसामग्री खरेदी करणे आवश्यक आहे.

उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रात उपरोक्त शासन निर्णयाचे अनुषंगाने ९१ मीटर पेक्षा जास्त म्हणजे ३० मजल्यापेक्षा उंच इमारती बनविण्यात येणार आहेत. करीता उंच शिडी ५५ मी. असल्याने सदरची शिडी अंदाजे १५ ते १७ माळयापर्यंत अग्निशमन व विमोचन कार्य करणेस पोहचू शकेल. उर्वरीत कार्य महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव सरंक्षक उपाययोजना अधिनियम २००६ अन्वये आग प्रतिबंधक उपाययोजना पूर्तता करणेत येईल.

करीता शहरातील आज रोजी असलेले अरूंद रस्ते लक्षात घेता ५५ मीटर उंचीची Aerial Ladder Platform घेणे योग्य वाटते.

**Aerial Ladder Platform चे विनिर्देश व दर खालीलप्रमाणे आहे**

| Sr. | Height in Meters | Bronto Sky Lift | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | Chasis | Model No. | Rate In Euro $ for | Remarks |
| १. | ५५ Meters | Volvo FM -400 (6X4)Mercedes/ Scania | F-55 RLX | Euro —VI 13,15,000 EURO | सोबत Specification जोडून देत आहे. |

एक ५५ मीटर **Aerial Ladder Platform** खरेदी करीता एवढा खर्च होणार आहे. सन २०२१-२०२२ च्या अदांजपत्रकामध्ये रूपये १३ कोटीची तरतूद करणेत आलेली आहे. असून अधिक ०५ कोटीची तरतूद करणे अपेक्षित आहे.

यापूर्वी दिनांक २/१२/२०१४ रोजी उंच शिडीची गाडी खरेदी करणेचा प्रस्ताव सादर करणेत आला होता. परंतु आर्थिक तरतूद नसल्याने सदरची गाडी खरेदी होऊ शकली नाही.

सदर वाहनाच्या खरेदीकरीता रक्कम रू १२,४९,२५,०००/- + Custom duty @ ३०% (including १८% IGST) रू ३,७५,७७,५००/- + Local charges for customs clearing, handling, transport, insurance, training रू ८८,५०,००० = **एकूण अंदाजित खर्च रूपये १७,१२,५२,५००/-** इतका (Guaranty and Warranty (AMC व CMC) चा खर्च वगळून) खर्च येणार असून सदरचा खर्च भागविणेकरीता अंदाजपत्रकातील लेखाशीर्ष Part I(II) अग्निशमन वाहन खरेदीमध्ये सन २०२१-२०२२ च्या अंदाजपत्रकामध्ये रूपये १३ कोटीची तरतूद करणेत आलेली आहे.

आज रोजी आग विझविणेसाठी व आगीपासून जीवीत मालमत्ता यांचे संरक्षण करणेसाठी यंत्रणा सुसज्ज असे अग्निशामक पथक तयार ठेवणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ६ कलम ६३/५ अन्वये तसेच महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव सरंक्षक उपाययोजना अधिनियम २००६ व नियम २००९ ची अंमलबजावणी करणे महानगरपालिकेचे कर्तव्य आहे.

तरी सदरची Aerial Ladder Platform वाहन खरेदीकरणेसाठी मा.संचालक महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचलनालय मुंबई, यांचे कडून दिनांक २/९/२०२१ रोजी तांत्रिक मान्यता प्राप्त झालेली आहे.

सबब उपरोक्तबाबत अधिकृत एजन्सी कडून उंच इमारतीमध्ये आग विझविणेसाठी व विमोचन कार्य करणेसाठी Aerial Ladder Platform वाहन खरेदी करणेकामी ई-निविदा प्रक्रिया राबविणेकरीता सदरचा प्रस्ताव धोरणात्मक निर्णयास्तव मा. महासभेपुढे प्रस्तावित करणेत येत आहे. कृपया मान्यतेस्तव सविनय सादर.

**महासभा ठराव क्र:३९** **दिनांक:—**२४/१२/२०२१

सुचकाचे नाव :— श्री. प्रमोद टाले

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणेअग्निशमन विभागाकरीता अधिकृत एजन्सी कडून उंच इमारतीमध्ये आग विझविणेसाठी व विमोचन कार्य करणेसाठी Aerial Ladder Platform फायरव्हॅनवाहन खरेदी करणेकामी ई-निविदा प्रक्रिया राबविणेसमान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. २० वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. २० :— उल्हासनगर शहराच्या मंजुर विकास योजनेतील आरक्षण क्रमांक १७९ (१९४ चौ. मी) व आरक्षण क्रमांक १८० (२९६ चौ. मी) यांच्या मधोमध असलेल्या १२ मी. रुंद रस्त्याची विकास योजनेमध्ये दर्शविलेली आखणी अंशत: वगळुन**

**आरक्षण क्रमांक १७९ च्या उत्तर सीमेलगतच्या विद्यमान रस्त्यात समाविष्ट करण्याकरीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये किरकोळ फेरगदल करणेबाबत.**

---

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** मा. महापौरजी मी पहिलेच या विषयावर बोलण्यासाठी उभा आहे. अरुणजी दोन मिनीट मला बोलू दया, कृपया. मी पहील्यापासून या विषयावर बोलत आहे. तुम्हांला निवेदन आहे. हा महापौरांचा माल आहे, परंतु मला पण बोलू दया ना.

**सदस्य, श्री. अरुण आशान:-** मला पहिले बोलू दया.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** मी पहिलेच बोलत आहे. या विषयावर

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-** अजून कोणाला अनुमती दिली नाही.

**पिठासिन अधिकारी, श्री. भगवान भालेराव:-** माझी विनंती आहे, पहिले सादरीकरण होऊ दया, नंतर बोला. डॉक्टर साहेब पहिले सादरीकरण होऊ दया.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-** इथे दोन सदस्य, लढत आहेत,

**पिठासिन अधिकारी, श्री. भगवान भालेराव:-** सुक्षित आहेत आपण पहिले सादरीकरण तर बघा.

**नगररचनाकार, श्री. प्रकाश मुळे:-** मा. महासभेच्या अवलोकनासाठी आणि मा. सदस्यांच्या माहितीसाठी हा जो ठराव आहे अणि अजून पुढचा पण एक आहे, त्या दोघांचाही सादरीकरण केले आहे. आता सध्या मी विषय क्र.२० चे सादरीकरण दाखवत आहे. तर त्याच्यामध्ये आरक्षण क्र.२०..

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** हा २१ नंबरचा आहे.

**नगररचनाकार, श्री. प्रकाश मुळे:-** २१ आहे, हा जो रस्ता आहे, ती टायपिंग चुक आहे. सर आरक्षण क्र. १७९ आणि आरक्षण क्र.१८० च्या मधला जो १२ मिटर रुंद रस्ता आहे.तो प्रस्तावीत रस्ता जागेवर नाही. सध्या त्याची आखणी या पध्दतीने आहे. हे जे काळया रंगाने बाण करुन दाखवले आहेत, तेवढा भाग आपल्याला डिलीट करायचा आहे.आणि प्रपोजल दुस-या साईडवरुन दाखवतो. १२ मिटरचा रस्ता थोडासा वर्ग करायचा आहे आणि हिरवे जे आरक्षण आहेत, ते डायरेक्शन आहेत, १२ मिटर विनंती आहे की, समजून घ्यावे. हा जो १२ मिटरचा रस्ता दाखवलेला आहे, हा प्रपोजल आहे. डी.पी.मध्ये आता प्रत्येक्ष जागेवर जावून पाहीले तर तिथे पाच सहा मोठमोठया बिल्डींग आणि झोपडपटटी आहे. त्याच्या थोडया अंतरावर उत्तरेला एक १२ मिटरचा रस्ता आहे, तो विद्यमान रस्ता आहे. जर आपण हा वगळून तिकडे जर हलवला केला तर वाहतुकीला फरक पडत नाही आणि प्रकल्पाचा पुनर्वसनाचा पण खर्च वाचेल. त्या हिशोबाने आपण हा रस्ता ठेवलेला आहे, धन्यवाद.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** मा. महापौरजी, आज २१/०४/२०१७ ला जो आपला डिपी मंजुर झाला होता आणि त्यामध्ये एक क्लू डेड पोर्सन इपी ०१/०३/२०१९ ला पास झाला होता. जो दिनांक २१/०४/२०१७ चा नोटीफिकेशन आहे. त्यामध्ये क्लीयरकट शासनाने लिहीले आहे की, कोणतेही आरक्षण बॅरेक, ब्लॉक्स, गव्हर्नमेंट बिल्ट ऑफ प्रॉपर्टीच्यावर मान्य होणार नाही. रोड पण एक आरक्षणच आहे. तर ज्या प्रमाणे आपण प्रभाग १४ चा एक विषय घेऊन आले आहेत, तर आपल्याला हे बघायला पाहीजे की, संपुर्ण उल्हासनगरमध्ये किती रोड, बॅरेक्स, ब्लॉक्स, गव्हर्नमेंट गव्हर्नमेंट बिल्ट ऑफ प्रॉपर्टीच्यावरुन जातात आणि सर्वांना एकत्र घेऊन या. एक एक रस्ता करण्याचे काहीच अर्थ नाही.

**सदस्य, श्री. अरुण आशान:-** मा. महापौरजी सदना समोर…

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** माझे बोलणे चालू आहे, आपण मध्येच का बोलत आहेत. यामध्ये आपण लिहीले आहे की, पेन्सिल फॅक्टरी ते उल्हासनगर स्टेशनपर्यंत इमारती, बॅरेक मोठया प्रमाणात बाधित होत

आहेत. तर अशी परिस्थिती प्रत्येकाच्या वार्डामध्ये आहे. सगळे नगरसेवक बसले आहेत. सर्व नगरसेवकाच्या वार्डामध्ये मी तर फक्त बॅरेक, ब्लॉक्स, गव्हर्नमेंट बिल्ट ऑफ प्रॉपर्टीचेच बोलत आहे. मला काही त्रास नाही, आपण सेनेच्या वार्डचे, आर.पी.आय. च्या वार्डचे, बीजेपीचे वार्डचे सर्वांचे एकत्र घेऊन या. एक एक वाडर्च का?

**सदस्य, श्री. अरुण आशान:-** मा. महापौर साहेब, मी या बाबत मा. सदस्यांना सांगू इच्छितो की, प्रशासनाच्या निदर्शनास हे आणून देण्यासाठी कोणी तरी एकाने पुढाकार घ्यायला पाहीजे होता. खरे म्हणजे ही सुरुवात आहे. मी संपुर्ण शहरासाठी बोलत आहे. परंतु ज्या प्रभागाचे नेतृत्व मा. महापौर करतात त्या महापौरांनी हा विषय प्रशासनाच्या निर्देशनास आणून दिले आहे. त्यामुळे सुरुवात इथून करावी आणि संपुर्ण शहराचा प्रस्ताव जर सदस्य देत असतील तर ते करायला हरकत नाही. परंतु हा प्रशासनाचा आणलेला विषय ठराव मजूंर करावा.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-** मा. महापौरजी हा जो ठराव होईल, या ठरावामध्ये अशी नोंद करण्यात यावी बाकी जेवढे पण बॅरेक, ब्लॉक, गव्हर्नमेंट बिल्ट ऑफ प्रॉपर्टी अजून ज्या प्रॉपर्टी आहेत, त्यांच्यावर जो आरक्षण येत असेल, ते पण लवकरात लवकर महासभेच्या समोर आणण्यात यावे. महापौरजी एक खुप मोठी समस्या २ नंबर ओ.टी. पासून ते सुभाषनगर, आझादनगर, धोबीघाट पर्यंत जातो जिथे साडेचार हजार घरे रिंगरोडमध्ये जातात तर ठरावामध्ये असे झाले पाहीजे. ठराव सुधारण्यात यावा.

**सदस्य, श्री. अरुण आशान:-** मा. महापौरजी ठरावाचा मसुदा उल्हासनगर शहरातील विकास मंजूर आराखडयात आरक्षण क्र.१७९ व आरक्ष्ण क्र.१८० या मधील असलेला १२ मिटर रुंद रस्त्याची विकास आखणी बदलून तो रस्ता रद करुन सदर रस्त्याच्या उत्तरेला आरक्षण क्र.११९ याच्या उत्तर सिमेलगतच्या विद्यमान रस्ता १२ मिटर रुंद रस्ता असा दरर्शण्यासाठी महाराष्ट प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये विकास योजनेत किरकोळ फेर बदल करण्यास ही सभा मान्याता देत आहे. सदरचा ठराव दिनांक १८/१२/२०२१ रोजीच्या विषय पत्रिकेत समाविष्ट करण्याबाबत पुढील कारवाई व्हावी व सदर ठराव मंजूर होण्यासाठी मान्यतेस्तव सादर.

**सदस्य, श्री. जीवन इदनानी:-** मा. महापौरजी, बोलून तर दया, नंतर परत बोलत असतात.राजेशभाई यांनी सांगितले आहे की, सर्व एकत्र घेऊन या. तुम्हांला किती अर्ज आले आहेत.

**नगररचनाकार, श्री. प्रकाश मुळे:-** आदरणीय सभागृहाच्या भावनांचा विचार करता, तुमच्या बरोबर एकत्र कॉम्पेसिव प्रोग्राम आपण घेऊ शकतो. हा ठराव मंजूर करण्यात यावा अशी महासभेला विनंती आहे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** हा जो विषय आला आहे, एक सरळ गोष्ट आहे, सभागृहाचे सर्व सदस्यांना समजावून सांगण्यात यावे. यामध्ये स्पष्ट लिहीले आहे की, आरक्षण क्र. ११९, १९४ मिटर एक छोटासा प्लॉट आहे, २०० मिटरचा, दुसरा आहे, आरक्षण क्र. १८० जो २९६-६४ मिटर हा पण ३०० मिटरचा प्लॉट आहे. या दोन प्लॉटसी आपल्या महापालिकेचे काय घेणे-देणे आहे? आणि आम्हांला कोणी तरी सांगितले की, एवढा मोठा शहर आहे १३ स्केअर मिटरचा एका प्लॅटमधून एक ४० फुटाचा रोड जात आहे, तो डिलीट करायचा आहे. तर शहरामध्ये भरपूर बॅरेक, ब्लॉक भरपूर असे स्थान आहेत तेथून रोड जात आहेत. ते आणले आहेत, पंरतु या ब्लॉकच्यावरुन रोड जात आहे. त्याच्यावर आपली नजर का गेली? त्यामुळे यामध्ये काही तरी "डाळ मे काळा है"

**सदस्य, श्री. अरुण आशान:-** नाही, नाही, मा. महापौरांनी याच्यासाठी पत्र दिले आहे, जर आपल्या वार्डमधून तुम्हांला घेऊन जायचे आहे तर आम्हांला काहीच अडचण नाही.

**नगररचनाकार, श्री. प्रकाश मुळे:-** आशान साहेब बरोबर बोलतात, मा. महापौरांचे पत्र दिले आहे, जर तुमचे पत्र आले आपण करु शकतो.

**सदस्य, श्री. अरुण आशान:-** जर हा प्रस्ताव शहराच्या एखादया भागातून आणायचे असेल तर मला मनाई नाही. हा विषय प्रशासनाच्या समोर ठेवला आहे. जर बाजूने रोड आहे, त्याच्या उत्तर दिशेला रोड आहे आणि सिमिलन रोड घेतला आहे, त्यामुळे ठराव घेण्यात यावा.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** माझा विकासासाठी, चांगल्या कामासाठी आम्ही सहयोग सत्ता पक्षाला देण्यास तयार आहेत. परंतु असे मुददे जेव्हा सभेच्या पटलावर येत असतात, तर विरोधी पक्षाला आपण

विश्वासात घेतला असता, तर शंका उत्पन्न झाली नसती. आज अचानक असे विषय येतात, तर तुलना हात असते की, माझा कपडा यांच्या कपडयापेक्षा कमी का आहे. माझ्या क्षेत्रामध्ये काही अशा गोष्टी आहेत की, ज्या मला करायच्या आहेत, परंतु होऊ शकत नाहीत. महापौर जे असतात त्या संपुर्ण शहराच्या असतात. यांनी सामुहिक रुपाने सदस्यां बरोबर गटनेता यांच्या बरोबर मिटींग घेऊन सर्व पक्षांना विश्वासात घेऊन जर असे विषय आणले तर पाच मिनीटांच्या आतमध्ये पास केले जातील. आपले अरुण आशानजी आहेत, ज्यांनी महापौरांद्वारा हे पत्र दिले आहे. होऊ शकते त्यांची भावना पवित्र असेल. त्यामध्ये काही शंका नाही. परंतु मी निवेदन करतो की, हा विषय मागे घेऊन एक बार सर्व सदस्यांना बरोबर बसून एका चांगल्या वातावरणामध्ये पारीत केले जावे. आपण या महासभेमध्ये सदस्य आहेत, ही सुरुवात आहे. आपण चांगली सुरुवात करा आम्ही तुमच्या बरोबर आहेत.

**सदस्य, श्री. अरुण आशान:-** आमच्या सदस्यांनी जो उपाय दिला आहे, त्याच्याशी मी सहमत आहे. परंतु हा विषय न घेता, दुसरा विषय घेऊन या, हा विषय मागे घ्या. एक विषय झाल्या नंतर संपुर्ण शहराचा विषय पुढे चालेल. जर चांगली गोष्ट असेल आणि आपण सांगितले आहे त्याच्याशी आम्ही सहमत आहे. परंतु हा मागे घ्या, तो पढे घ्या याच्याशी मी सहमत नाही. परंतु विषय आपण किती वेळा महासभा चालवली आहे, एवढे सर्व सदस्य महासभेमध्ये बसतात. त्यांनी का विषय आणला नाही? हा महापौरांच्या प्रभागातील विषय होता, जेव्हा त्यांना माहीती झाले की, हा आणणे गरजेचे आहे आणि त्याच्या बाजूल रोड आहे. यामुळे विषय आणला आहे, पुढे पण असे विषय येणार आहेत.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-** महापौरजी, मी इथे किती वेळेपासून उभा आहे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** मी मतदानाची मागणी करीत आहे.

**सदस्य, श्री.राजेंद्रसिंह भुल्लर:-** मतदान करा, मतदान करा.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-** ठरावामध्ये टाका बाकीचे पण घेऊन या.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:-** मा. महापौरजी मी पण खुप वेळेपासून उभा आहे. डॉ. साहेब आपण बोला.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-** मा. महापौरजी, इतिहास साक्षी आहे, हे सभागृह साक्षी आहे, आपण पण सदस्य होते आणि सदस्य आहेत, महापौरजी सभागृहामध्ये काय झाले आहे, हे मी आपल्याला सांगतो. बाकी लोक फिरत आहेत तर वायु मंडल खराब करीत आहेत. मी अरुणजीला सांगतो की, हा पहिला प्रश्न नाही आहे. जे हे बोलत आहेत की, पहिल्यावेळेस आला आहे, तर हे चुकीचे आहे. पहिले पण ३७ (१) मध्ये एक कमेंटमेंट आले होते. त्याला आम्ही विरोध केला होता. मा. महापौरजी लक्ष दया. जमनुजी विषय चालला आहे, सर्व लोक त्रस्त आहेत. तेव्हा सेंच्युरी रियॉनचा एक रस्ता आला होता, " सुट बुटमध्ये कोणी पैसे घेऊ आला होता, तेव्हा मी बोललो होतो की, सुट बुटमध्ये जो पैसे घेऊन येईल त्याचा रोड बनला जाईल" तुम्हांला माहिती असेल चार वर्षापुर्वीची गोष्ट आहे. आपण सांगतात की, पहिल्या वेळेस सुरुवात झाली पाहीजे. सुरुवात कधीच झाली आहे. आपण सगळे सभागृहामध्ये विसरुन गेले आहेत. जेव्हा निवडणूक होते सभागृहामध्ये इतिवृत्त ठेवून इतिवृत्त वाचा सेंच्युरी रियॉनचे काय झाले? जेव्हा रोडचा विषय आला होता त्यावेळी विरोध झाला होता. तेव्हा सुट बुटमध्ये जो पैसे घेऊन आला, त्याचा रोड पास झाला. त्याच बरोबर गोरगरीबांसाठी रोड बनणार होता, तो १२० फुटाचा रोड आहे गोरगरीबांची घरे तुटणार आहेत, तो नामंजूर करण्यात यावा किंवा ३१(७) मध्ये पाठविण्यात यावा. काहीच काम झाले नाही, आपण चर्चा करु नका पहिले ऐकून घ्या. सभागृहामध्ये मी आज एकटा बोलणार आहे. तुम्हांला ऐकायला लागेल हे बघा महापौर असे आहे. सर यु आर नॉट टेकिंग सिरीयस ऑफ सिटी, हा शहराचा विषय आहे, मी स्वत: त्रस्त आहे. माझ्या वार्डचा विषय आहे.

**पिठासिन अधिकारी, श्री. भगवान भालेराव:-** आपण बोला ना तुमचा काय विषय आहे?

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-** तुम्ही मध्येच गप्पा मारत आहेत.

**<u>पिठासिन अधिकारी, श्री. भगवान भालेराव:-</u>** तुम्ही सुरुवात करा.

**<u>सदस्य, श्री. अरुण आशान</u>**:- डॉक्टर साहेब, तुमच्या भावना आम्हांला समजल्या आहेत.
**<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-</u>** आपण सेंच्युरीचे जे केले होते, ते घातक काम केले होते.

**<u>पिठासिन अधिकारी, श्री. भगवान भालेराव:-</u>** हा विषय आता नाही,

**<u>सदस्य, श्री. अरुण आशान:-</u>** जो विषय पटलावर आहे, त्याच्या बददल मी म्हटले आहे, तो ठराव करण्यात यावा.

**<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-</u>** भारत चौकामध्ये जमनुच्या पॅनलमध्ये जो रोड आहे, जुना आराखडा नव्हता आणि ...

**<u>पिठासिन अधिकारी, श्री. भगवान भालेराव:-</u>** आपण एक काम करा,

**<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-</u>** ऐकुन घ्या, ऐकण्याची शक्ती ठेवा, महापौर तुम्हांला ऐकण्याची शक्ती नाही आणि माझी तबीयत आपण खराब करीत आहेत...

**<u>सदस्य, श्री. अरुण आशान:-</u>** मा. महापौरजी, हा विषय पास करण्यात यावा.

**<u>सदस्य, श्री. स्वप्नील बागुल:-</u>** पास..पास..

**<u>पिठासिन अधिकारी, श्री. भगवान भालेराव:-</u>** २१ नंबरचा विषय घ्या, चला २१ नंबर.

**<u>सदस्य, श्री. मनोज सयानी:-</u>** बाकीचे रस्त्याचे पण लवकरात लवकर घेऊन यावे.

**<u>सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:-</u>** महापौर साहेबा, मी किती वेळेपासून उभा आहे. मध्येच बोलत नाही.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-</u>** पास..पास..

**<u>सदस्य, श्री. राजेश वानखेडे:-</u>** महापौरांचा मान ठेवून पास करुन घ्या.

**<u>पिठासिन अधिकारी, श्री. भगवान भालेराव:-</u>** अशा संदर्भातले जे जे विषय येतील, तेच विषय पुढच्या महासभेमध्ये आणून..

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:-</u>** हे ठरावामध्ये यायला पाहीजे.

**<u>पिठासिन अधिकारी, श्री. भगवान भालेराव:-</u>** ठरावामध्ये येईल.

**<u>सदस्य, श्री. मनोज सयानी:-</u>** धन्यवाद, ठराव वाचून घ्या.

**<u>पिठासिन अधिकारी, श्री. भगवान भालेराव:-</u>** २१ नंबरचा विषय घ्या.

**<u>सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:-</u>** महापौरजी मी पण एक नगरसेवक आहे, तुम्हांला धन्यावाद देत आहे, हा विषय पास केला आहे. माझे बोलणे तुम्हांला ऐकायला लागेल मी पण जन प्रतिनिधी आहे. ऐकुन घ्या, उल्हासनगर-५ मध्ये रोड बनत आहे, धन्यवाद. परंतु ज्या पण दुकानदारांची दुकाने तुटली आहेत. गरीबांची सर्व दुकाने गेली आहेत. त्यांना पर्यायी जागा मिळाली पाहीजे. कारण की, हा नियम आहे, जोपर्यंत त्यांना आपण पर्यायी जागा देत नाहीत, तोपर्यंत त्यांना हटवू शकत नाही. परंतु त्यांना हटवले आहे, ठिक आहे, जे झाले ते झाले त्यांना पर्यायी जागा मिळाली पाहिजे. जसे त्यांचा घर परिवार चालला पाहिजे, धन्यवाद.

**पिठासिन अधिकारी, श्री. भगवान भालेराव:-** २१ नंबरचा घ्या माहिती झाली आहे. त्यांच्या भावना आपण समजलो आहे.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:-** तुम्ही समजून तर घ्या.

**पिठासिन अधिकारी, श्री. भगवान भालेराव:-** ऐकले आहे आपण. तो कोणता पॉईंट ऑफ आर्डर आहे, तो विषय आहे का? कोणत्या विषयाच्या अनुषंगाने आपण बोलत आहे.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:-** ते बोलत आहेत की, वसंत बहार येथील जी दुकाने तुटत आहेत, ज्यांचे १०० टक्के जात आहे. त्यांना पर्यायी जागा मिळाली पाहिजे आणि जे तुटून बाकी भाग वाचला आहे, त्यांना महासभेमध्ये वन बाय टू प्लस बनवायला परवानगी दिली पाहीजे.

**पिठासिन अधिकारी, श्री. भगवान भालेराव:-** कल्याण-अंबरनाथ रोडला आपण आजपर्यंत कोणाला दुकान दिले आहे का?

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:-** नाही, नाही, आपण सगळयांना बेघर करुन टाकणार आहेत, हा कोणता नियम आहे? किती तरी लोकांना उल्हासनगरमध्ये दिले आहे, असे कसे बोलत आहेत की, दिले नाही. माझ्या डोळयांसमोर दिले आहे. सनद दिली आहे, नियम आहे, दयायला पाहिजे. असे बोलू नका आपण महापौर असतांना बोलत आहेत की, नाही देवू शकत. चुकीचे आहे हे नियमाच्या विरुध्द आहे.

काही सदस्य :—पास—पास……

**महापौर तथा पीठासीन अधिकारी:—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. २०:—**उल्हासनगर शहराच्या मंजूर विकास योजनेतील आरक्षण क्रमांक १७९ व आरक्षण क्रमांक १८० यांच्या मधोमध असलेल्या १२ मी. रूंद रस्त्याची विकास योजनेमध्ये दर्शविलेली आखणी अंशत: बदलून आरक्षण क्रमांक १७९ च्या उत्तर सीमेलगतच्या विद्यमान रस्त्यात समाविष्ट करण्याकरीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये किरकोळ फेरबदल करणे बाबत...

**प्रस्तावना**

उल्हासनगरशहराची मुळ मंजूर विकास योजना १९७४ मध्ये मंजूर करण्यात आली असून सुधारीत विकास आराखडा महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३१ (१) अंतर्गत दिनांक २१.०४.२०१७ रोजी भागश: मंजूर शासनाचा करण्यात आला. तदनंतर सदर आराखडयातून वगळलेल्या क्षेत्राची विकास योजना (E. P.) दिनांक ०१.०३.२०१९ रोजी मंजुर करण्यात आली.सदर आराखड्यामध्ये आरक्षण क्र. १७९ व आरक्षण क्र. १८० यांच्या मधोमध असलेल्या १२ मी. रूंद रस्त्याने उल्हासनगर-४, पॅनल क्र. १४ मध्ये ओ.टी सेक्शन येथील पेन्सिल फॅक्टरी ते उल्हासनगर स्टेशन पर्यंत जाणाऱ्या भागाने विद्यमान इमारती व बॅरेक मोठ्या प्रमाणात बाधित होतात. मा. महापौर, उल्हासनगर महानगरपालिका यांनी सदर रस्त्याबाबत स्थानिक नागरिकांचा विरोध आहे व विद्यमान परिस्थितीत सदर रस्ता जागेवर अस्तित्वात नाही, अशी वस्तुस्थिती निदर्शनास आणुन दिलेली आहे. उपरोक्त विकास योजना रस्त्याच्या उत्तरेस विद्यमान १२ मी.रूंदीचा पुर्व-पश्चिम रस्ता असून सदर विकास योजना रस्त्याचा काही भाग वगळून तो उत्तरेकडील विद्यमान रस्त्यास विकास योजना रस्ता असे दर्शवून स्थलांतरीत करता येईल.त्या अनुषंगाने विकास योजना रस्त्याची आखणी बदलण्याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये विकास योजनेत किरकोळ फेरबदल करणे आवश्यक्र आहे.या अनुषंगाने दि.१८/११/२०२१ रोजी होणाऱ्या सर्वसाधारण सभेच्या विषय पत्रिकेत सदर बदलाबाबत ठराव मंजूर करण्याबाबत सादर.

**ठरावाचा मसुदा**

उल्हासनगर शहराच्या मंजूर विकास योजनेतील आरक्षण क्र. १७९ व आरक्षण क्र. १८० यामधील असलेल्या १२ मी.रूंद रस्त्याची विकास आखणी बदलून तो रस्ता रद्द करून सदर रस्त्याच्या उत्तरेस असलेल्या आरक्षण क्र. १७९ च्या उत्तर सीमेलगतच्या विद्यमान रस्त्यास १२ मी. रूंद विकास रस्ता असे विकास योजनेत दर्शवण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये विकास योजनेत किरकोळ फेरबदल करण्यात ही सभा मान्यता

देत आहे. सदर ठराव दि.१८/११/२०२१ रोजीच्या विषय पत्रिकेत समाविष्ट करण्याबाबत पुढील कार्यवाही व्हावी व सदर ठराव मंजूर होण्याबाबत मान्यतेस्तव सादर.

**महासभा ठराव क्र:४०** **दिनांक:—**२४/१२/२०२१

सुचकाचे नाव :— श्री. प्रमोद टाले

अनुमोदकाचे नाव :— श्री. शंकर लुंड

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणेउल्हासनगर शहराच्या मंजूर विकास योजनेतील आरक्षण क्र. १७९ व आरक्षण क्र. १८० यामधील असलेल्या १२ मी.रूंद रस्त्याची विकास आखणी बदलून तो रस्ता रद्द करून सदर रस्त्याच्या उत्तरेस असलेल्या आरक्षण क्र. १७९ च्या उत्तर सीमेलगतच्या विद्यमान रस्त्यास १२ मी. रूंद विकास रस्ता असे विकास योजनेत दर्शवण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये विकास योजनेत किरकोळ फेरबदल करण्यात मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. २१ वाचुन दाखवितात

———————————————————————————————————

⇨ **विषय क्र. २१ :— आरक्षण क्रमांक २४५ (२४८ चौ. मी) च्या आरक्षणाच्या उत्तरेस असलेल्या विद्यमान कैलास कॉलनी शमशान भुमी Designeted Reservation मधील सदर आरक्षणाच्या पश्चिमेस असलेल्या ३६ मी रुंद रस्त्यास लागुन M.S.E.B स्वीच स्टेशन करीता ११०० चौ.मी क्षेत्रफळाची जागा देण्याकरीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये किरकोळ फेरबदल करुन M.S.E.B करीता आरक्षित क्षेत्र असे नविन आरक्षण प्रस्तावित करणे बाबत.**

———————————————————————————————————

**सदस्य, श्री. रमेश चव्हाण:-** मा. पिठासिन अधिकारी नगररचनाकार यांना उत्तर देवू दया.

**नगररचनाकार, श्री. प्रकाश मुळे:-** विद्यमान कैलास कॉलनी शमशान भुमी जी आहे, त्याच्यामध्ये मधीच रस्ता दाखवला आहे वाय सेफमध्ये, वाय सेफमध्ये उजवी बाजू तिथे आरो दाखवला आहे. तिथे त्याला लागून _M.S.E.B स्वीच स्टेशन करीता ११०० चौ.मी क्षेत्रफळाची जागा प्रस्तावीत आहे. याच्यासाठी पार्श्वभुमी सांगायची आहे, परवानगी मिळाली तर मी बोलतो. M.S.E.B चे सुपे्रडेंड इंजिनियर, अधिक्षक अभियंता, उप अभियंता आणि कार्यकारी अभियंता हे तीघेजन इथे आले होते. आपल्याकडे त्यांनी तीन चार जागा बघितल्या त्याच्यात त्यांनी ही जागा पसंद केली आहे, त्यांचे म्हणणे आहे, चार नंबर आणि पाच नंबरचा लोढ एवढा वाढलेला आहे, त्याच्यामुळे पुर्ण २८०० चौ.से.मी. क्षेत्रळाचे M.S.E.B चे सबस्टेशन आवश्यक आहे. परंतु आपण त्यांना विनंती केली की, आपल्याकडे जागेचा तुटवडा आहे. म्हणून त्यांनी १०० ११०० चौ.मी. चे स्विच स्टेशन बाधायला ही जागा पसंद केली आहे. M.S.E.B ने सुचविल्या प्रमाणे आपण हा प्रस्ताव मांडला आहे, बाकी सभागृहाचे मत सांगावे.

**सदस्य, श्री. राजेश वानखेडे:-** तुम्ही प्रत्येक वेळेस त्याच प्रभागामध्ये स्विच स्टेशनचे का आग्रह धरतात. तुम्ही लाला लोही गार्डनमध्ये घेतले मग आता मुस्लिम कब्रस्तानची जागा आहे ते तुम्ही मागत आहेत, हिंदु स्मशान भुमीची जागा मागत आहेत.

**नगररचनाकार, श्री. प्रकाश मुळे:-** परवानगी असेल तर बोलू कॅम्प क्र.४ आणि कॅम्प क्र.५ ..

**सदस्य, श्री. राजेश वानखेडे:-** कॅम्प क्र.४ आणि कॅम्प क्र. ५ मध्ये फक्त एवढयाच जागा आहेत का?

**नगररचनाकार, श्री. प्रकाश मुळे:-** सर मला सादर करुदया, कॅम्प नंबर ४ आणि ५ मध्ये विजेचे सगळयात जास्त मागणी आता वाढत चालली आहे आणि भविष्यकाळामध्ये येत्या १० वर्षामध्ये आपल्याला म्हणजे M.S.E.B चे असे म्हणणे आहे कॅम्प नंबर ४ आणि ५ मध्ये जे सबस्टेशन तिथे आहे..

**सदस्य, श्री. शंकर लुंड:-** एकच जागा तिथे रिकामी आहे का?

**सदस्य, श्री. राजेश वानखेडे:-** फक्त त्याच प्रभागामध्ये ती जागा रिकामी आहे का? दुसरी जागा नाही का?

**नगररचनाकार, श्री. प्रकाश मुळे:-** कॅम्प ५ मध्ये सबस्टेशन आहे, ४ मध्ये सब स्टेशन आवश्यक आहे.

**सदस्य, श्री. शंकर लुंड:-** ४ नंबरमध्ये दुसरा नाही का?

**सदस्य, श्री. राजेश वानखेडे:-** त्या ४ नंबरमध्ये दुसरा प्लॉट नाही का तो प्रभाग सोडून.

**नगररचनाकार, श्री. प्रकाश मुळे:-** आपल्याकडे दोन सुचना आल्या होत्या. दोन्ही जागा गार्डनसाठी आरक्षित आहेत.

**सदस्य, श्री. राजेश वानखेडे:-** दोन्ही नाहीत, तिन्ही जागा गार्डनसाठी आरक्षित आहेत आणि तिथे हिंदु, मुस्लिम, ख्रिश्चन लोकांच्या स्मशान भुमी आहेत. तिथे तुम्ही स्विच स्टेशन बनवणार. तो उच्च न्यायालयात प्रकरण चालू आहे ना.

**नगररचनाकार, श्री. प्रकाश मुळे:-** सर आपण ख्रिश्चन व मुस्लिम स्मशान भुमीत घेत नाहीत, कारण प्रत्येक्ष पुरावे लागतात.

**सदस्य, श्री. राजेश वानखेडे:-** लोकांची घरे तोडून तिथे बांधणार आहेत का?

**नगररचनाकार, श्री. प्रकाश मुळे:-** नाही, नाही मृतदेह **ति**थे पुरावे लागतात, म्हणून जागा पाहिजे तर त्यांना M.S.E.B ने जागा मागितली होती. आपण त्यांना जशी सोयीची असेल त्या पध्दतीने देवू शकतो.

**सदस्य, श्री. राजेश वानखेडे:-** नाही, नाही तिथे नाही करायचे, आमचा विरोध आहे.

**नगररचनाकार, श्री. प्रकाश मुळे:-** त्यासाठी आरक्षित जागा असावी लागते.

**सदस्य, श्री. शंकर लुंड:-** त्यांना दुसरी कुठलीही जागा देण्यात यावी. स्मशान भुमी असेल, कब्रस्तान असेल, त्या जागा सोडून आपण दुसरी जागा दया.

**सदस्य, श्री. राजेश वानखेडे:-** तुम्ही दुस-या प्लॉटवर करा. जे ४ नंबरमध्ये अजून काही प्लॉट असतील...

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-** मा. महापौरजी आणि आयुक्त मॅडम, हा जो प्रस्ताव या महासभेमध्ये आलेला आहे, प्रस्ताव खुप चांगला आहे. या प्रस्तावाच्या बाबतीत एवढेच म्हणता येईल. पुढील जो येणार काळ आहे, त्या काळामध्ये विजेची गरज आहे आणि खास करुन ४ नंबरवाल्यांना विजेची गरज आहे. तो सबस्टेशन तिथे झाल्यास तर लोकप्रतिनिधींना त्याचा फायदा होईल आणि म्हणून तो जर M.S.E.B ने ही जागा दिली असेल, यांचा त्या जागेला विरोध असेल, तर दुसरी जागा आपल्याकडे कुठे आहे का? तो पण आपण शोध घेऊन यांचा विरोध नसेल आणि लोकांनाही त्याचा फायदा होईल. M.S.E.B च्या माध्यमातून येणा-या काळामध्ये या विषयाची फार गंभिरता लक्षात

घेऊन हा विषय पण झाला पाहीजे. लोकांचे विजेचे प्रश्न पण सुटले पाहिजेत आणि लोक प्रतिनिधीनी आता त्या जागेला जो विरोध केला आहे. त्या बदल्यात आपल्याला दुसरी जागा कुठे देता येईल का?

**सदस्य, श्री. राजेश वानखेडे:-** चौधरी साहेबांनी जे सांगितले आहे, ते बरोबर आहे. तुम्ही लोकांना पहीले विश्वासात घ्यायला पाहिजे. तिथले जे स्थानिक लोक आहेत, त्यांना पहिले विश्वासात घ्यायला पाहिजे. तिथल्या नगरसेवकांना तुम्ही विश्वासात घ्यायला पाहिजे होते. तुम्ही घेतल का?

**नगररचनाकार, श्री. प्रकाश मुळे:-** मा. सभासदांनी तीन सुचना आल्या होत्या, त्यातील एक जागा होती, ती आपण पुर्वी बस स्टॉपला दिली होती. परंतु त्या जागेचे आरक्षण बदल होऊन तिथे कब्रस्तानच्या आरक्षणासाठी समावेश झालेले आहे. बाकीच्या दोन जागा आपल्याकडे ३१४ व ३१५ प्रपोजल आले होते त्या दोन्ही जागा…

**पिठासिन अधिकारी, श्री. भगवान भालेराव:-** राजेश वदारिया शांत बसा त्यांना बोलू दया, तुम्ही नंतर बोला.

**नगररचनाकार, श्री. प्रकाश मुळे:-** ३१४ व ३१६ या दोन्ही जागा ग्रीन झोनमध्ये आहेत, शासन करीत नाही, मा. सभासदानी जर दुसरी जागा सुचवली तर तसा M.S.E.B शी संपर्क करुन करता येईल.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** मला फक्त एकच प्रश्न विचारायचा आहे. आपण जी ही जागा शोधून दाखवलेली आहे. या जागेची वाणिज्य किंमत आहे. ते वाणिज्य किंमत आम्ही फुकटमध्ये M.S.E.B ला देतो बरोबर आहे, जरा ऐका आपल्या महानगरपलिकेमध्ये जेव्हा कधी तरी आमच्याकडे विषय नसले तेव्हा आमच्या बिलाची कटींग करतात. पैसे कमवणारी कंपनी आहे. त्यांच्याकडून कर्मशिअल किंमत सांगितली आहे का किती आहे? ती श्रीमंत कंपनी आहे, असे नका समजू का ती आपल्याला फुकट सेवा देतात. जेवढे बिले ते घरासाठी देतो, त्यांना आपण सबस्टेशनसाठी देत आहोत. त्यांना धंदा करण्यासाठी देतो. एक मिनीट त्यासाठी आम्ही अगोदरच गायकवाड पाडयामध्ये मोठी जागा त्यांना फुकट दिलेली आहे आणि तिथे अजून जागा शिल्लक आहे, तिथे अजून एक स्विच स्टेशन बांधू शकतात. मला माहीती आहे, त्याची अर्धे पण त्यांनी त्याचा उपयोग केलेला नाही. अपेक्षापेक्षा तिथे जागा रिकामी आहे. पण ते ठिक आहे, असो, दयायला आम्हांला काही हरकत नाही. आपली महानगरपालिका आपली स्वत:ची ट्रस्टी आहोत. आपण हे कधी विचार केला का? त्यांना आपण जागा देवू आणि त्यांच्याकडूनही पैसे घेऊ कर्मशिअल किंमत उल्हासनगरमध्ये किती आहे? हेही तुम्हांला लक्षात घ्यायला पाहिजे.

**नगररचनाकार, श्री. प्रकाश मुळे:-** मा. सभासदांची अनुमती असेल तर बोलू शकतो का? आपण ही जागा M.S.E.B ला देण्याचा प्रस्ताव आणला नाही. आपण त्याचे आरक्षण बदलत आहोत. M.S.E.B ला कोणत्या अटी आणि शर्तीवर दयायचे त्यांना भाडयाने दयायचे का अलाउड करायचे हा प्रश्न नंतरचा असणार आहे. प्रथम ती जागा आपल्याला आरक्षणाखाली घ्यावी लागणार आहे. ती जागा स्मशान भुमीत असल्यामुळे ती जागा आपण घेऊ शकणार नाही. त्या जागेचे आपण M.S.E.B ला आरक्षण बदलून आरक्षण बदल झाल्या नंतर त्यांना कुठल्या अटीआणि शर्तीवर दयायची आहे हे मा. महासभा, सभासद आणि मा. महापौर यांच्या सगळयांच्या मान्यतेने आपण ठरवू शकतो. त्याच्या बदल माझे काही मत नाही.

**सदस्य, श्री. राजेश वानखेडे:-** सर्वात पहिले म्हणजे आम्हांला तिथे करायचाच नाही, आमचा त्याला विरोध आहे.

**सदस्य, श्री. अरुण आशान:-** मा. महापौरजी, मा. आयुक्तजी…

**सदस्य, श्री. राजेश वानखेडे:-** तुम्ही दुसरा कुठे तरी प्लॉट बघा आणि तिथे करा.

**सदस्य, श्री. अरुण आशान:-** मा. महापौरजी, मा. आयुक्तजी सध्या आपण बघत असाल की, गेल्या दोन वर्षाच्या काळामध्ये कोरोनामध्ये वर्क फॉर्म असल्यामुळे आणि शालेय शिक्षण हे घरातून असल्यामुळे वीजेवर जास्त जोर आल्यामुळे, वीज सतत जाणे ४ नंबरला आणि ५ नंबरला प्रमाण खुप वाढलेले आहे. त्यातल्या त्यात अंबरनाथमध्ये जर का त्या लाईटचा फॉल झाला, तर ४ नंबरला आणि ५ नंबरला ४-४ तास, ८-८ तास, एक दिवस १३ तास वीज नव्हती आणि पेपरमध्ये पण आले होते. खरे म्हटले हे सबस्टेशन कुठे टाकायचे? यापेक्षा तिथे राहणा-या लोकांना,

त्या रहिवाशांना सुविधा मिळाली पाहिजे. या करीता सातत्याने हा प्रयत्न करीत होतो. प्रशासनाने सांगितल्यानंतर त्यांनी त्यांना पर्यायी जागा दिली, पर्यायी जागा सुचविली ती महासभेच्या पटलावर आणलेली आहे. परंतु माझे असे म्हणणे आहे की, सभागृह एका साईटला सदस्य विरोध करीत आहेत आणि नागरीकांना सुविधा मिळाली पाहिजे म्हणूनही सांगत आहेत. मला असे वाटते, हे स्विच स्टेशन ४ नंबरमध्ये होणे अत्यावश्यक आहे. आजही आपण बघितले की, १ नंबर,२ नंबर, ३ नंबर पेक्षा ४ नंबर, ५ नंबरला लाईट जाण्याचे प्रमाण खुप जास्त आहे. आपले सभासद, सदस्य, ५ नंबरच्या प्रभागातील आहेत, त्यांना विचारा जर आमच्याकडे वीज गेली, महापौर साहेब, तर कमीत कमी ४ तास तरी वीज येत नाही. अशा वेळेस त्यांचे नेहमी हेच म्हणणे असते की स्विचिंग स्टेशन असणे आवश्यक आहे. मग स्विचींग स्टेशन कुठे पाहिजे? तर ते अंबरनाथ आणि ४ नंबरच्या मध्येभागी कुठे तरी असले पाहिजे.

**सदस्य, श्री. राजेश वानखेडे:-** तुमचे म्हणणे आहे, मध्यभागी असले पाहिजे तर ४ नंबरचा मध्यभाग जिथे असेल तिथे करा.

**सदस्य, श्री. अरुण आशान:-** ठिक आहे, ४ नंबर, ५ नंबरमध्ये येणारा स्विचींग स्टेशनचा जो एरिया आहे, मा. विरोधी पक्ष नेता साहेब तुमचा पण प्रभाग तिथेच आहे, तिथे पण वीज जाते असे मला वाटते आणि तुम्हांला पण त्या स्विचींग स्टेशनची आवश्यकता आहे. आपल्याला आता स्विचींग स्टेशनची आवश्यकता नाही का? आपल्यालाही आवश्यकता आहे. परंतु याच्यामध्ये वाद घालून हे स्विचींग स्टेशन दयायचे नाही आणि दुसरीकडे सुचवायचे सभासद विरोध करीत आहात, दुसरी पर्यायी जागा त्यांच्याकडे आहे का? जे सुचवित आहेत ते पर्यायी जागा देवू शकतात का? याकरीता प्रशासनाने जर दुस-या जागेची निवड करता येत असेल, तर मला वाटते, दुस-या जागेची निवड हे लक्षात घेता, सर्व सदस्यांना विनंती आहे, आपण कुठल्याही ठिकाणी होण्यापेक्षा ते स्विचींग स्टेशन झाले पाहीजे. या करीता मी आग्रही आहे. आपण स्मशान भुमीत नाही व्हायला पाहिजे. दुसरीकडे कुठेतरी व्हायला पाहिजे. लाला लोही गार्डन दिले होते. परंतु दुसरीकडे झाले पाहिजे. आता माझ्याकडे महाराष्ट्र महावितरणाचे पत्र आहे, त्या पत्रामध्ये नमुद केलेले आहे की, आम्हांला कुठली तरी जागा सुचवा. तर याच्यामध्ये जी जागा अशी आपण सुचवावी जेणेकरुन त्या ठिकाणी कोणाचाही विरोध होणार नाही आणि विरोध म्हणण्यापेक्षा त्या जागेला कोणाचाही अडथळा येणार नाही, सन्माननिय सदस्य आपल्या प्रभागामध्ये नेतृत्व करीत आहेत, त्यांच्या कुठल्या ना कुठल्या प्रभागामध्ये हे स्विच स्टेशन येणार आहे. या ४ नंबरमध्ये आणि ५ नंबरमध्ये जे व्यापारी शहर आहे, जिथे कारखाने आणि उद्योगधंदे जास्त आहेत. त्या ठिकाणी होणार आहे. तर मला वाटते महापौरजी या विषयावर गांर्भीयाने लक्ष दयावे.

**पिठासिन अधिकारी, श्री. भगवान भालेराव:-** राजेश वदारिया बोला.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** मा. महापौरजी, जो विषय आहे, त्याला पर्याय मी सुचवतो, आरक्षण क्र.२४३ त्याच्या बाजूला २२ x ८६, १८ x २६ मिटरची जागा आपण डी.पी. दाखवला तर मी तिथे पण दाखवू शकतो. नाही तर माझ्याकडे मार्किंग केलेले प्लॉट आहे.जो मी देत आहे, सेंगशन मोडीफिकेशनमध्ये पब्लिक प्रपोज आहे. ती जागा बाजुला आहे आणि मला नाही वाटत की, कोणाला ऑब्जेक्शन असेल.दुसरी गोष्ट उल्हासनगर ४ आणि ५ नंबरची आहे, तर मला प्रशासनाकडू ही माहीती पाहीजे आणि हे ३७ (१) मॉडीफिकेशनच्या नंतर याला अलाइडमेंट कसे करणार? घेऊन करणार किंवा फ्रीमध्ये करणार?

**गररचनाकार, श्री. न प्रकाश मुळे:-** सदस्य, महोदय, मा. महासभा ठरवेल त्या प्रमाणे. महासभा ज्या प्रमाणे अलाउड करणार आहे, त्या प्रमाणे आज फक्त आरक्षण बदल करण्याचा प्रस्ताव आहे.

**सदस्य, श्री. राजेश वानखेड:-** तो प्रभाग माझा आहे, हे जे प्लॉट सांगत आहेत, तिथे लोकांची घरे आहेत, ती घरे तोडून तुम्ही तिथे बनवणार स्विच स्टेंशन.

**गररचनाकार, श्री. नप्रकाश मुळे:-** अगोदरच तिथे अलायमेंट झालेले आहे.

**सदस्य, श्री. राजेश वानखेड:-** तुम्ही एक ठरवा तिथे काय आहे?

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-** मा. विरोधी पक्ष नेता एक मिनीट तुम्ही सदस्याचे ऐकुन घ्या काय आहे ते? त्यांनी प्रस्ताव दिलेला आहे ना, त्यांना दाखवायला पाहीजे ना घरे आहेत की नाही. घरे पण नाही गेली पाहिजे, स्मशान भुमी पण नाही गेली पाहिजे.

**सदस्य, श्री. राजेश वानखेड:-** दफन भुमी  आहे की काय ते ठरवा तुम्ही.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** मा. महापौरजी, मी मध्येच बोलत आहे, माझी विनंती आहे, तर तुम्हांला वाटत असेल हे बघा तिथे २४३ मध्ये आरक्षण काय आहे? आपण सांगा.

**गररचनाकार, श्री. न प्रकाश मुळे:-** तिथे कब्रस्तान आहे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** ठिक आहे, वानखेडेजी.

**सदस्य, श्री. राजेश वानखेड:-** तुम्ही स्मशान भुमीतील आतामधला जो प्रस्ताव आणला आहे, त्याला आमची मंजुरी आहे. पण लोकांची घरे तोडून करु नका.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** हा जो २४३ आरक्षणाचे आम्ही सजेशन देत आहेत, यामध्ये कोणाचेही घर तुटणार नाही. या वेळी महानगरपालिकेचा त्या वेळी केस्ट्रल कंपनीला बस चालवण्यासाठी ठेका दिला होता. तिथे डेपो होता.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-** आता कब्रस्तान आहे ना,

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** ही जागा देण्यासाठी कोणालाही त्रास झाला नाही पाहीजे.

**गररचनाकार, श्री. नप्रकाश मुळे:-** तो आरक्षण बदलला आहे सर. आरक्षण बदल होऊन कब्रस्तानमध्ये इनकुल्ड झाले आहे.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:-** मा. महापौरजी, आयुक्त मॅडम, सचिव भाईसाहेब,आणि सर्व सदस्य, आजा हा विषय आला आहे, हा खरच गंभीर विषय आहे. पहिले पहिले मी तुम्हांला सांगतो की, जो गोषवारा महाराष्ट्र महावितरण कंपनीने बनवला आहे, तुमच्याकडे त्यांनी पत्र पाठवले आहे. त्यामध्ये चार प्लॉट मागितले आहेत. त्यांनी लिहीले आहे लाला लोही, शिवमंदीर महाराष्ट्र महावितरण कंपनीने स्वत: चार प्लॉट मधून एक मागितला आहे. आपण वाचा सर आणि आपला गोषवारा बघा, २१ नंबरवर आपण गोषवारा प्रस्तावित करीत आहेत. त्याचा इथे उल्लेख नाही तो आपण तिथे केला आहे. सर्व सन्माननिय सदस्यांनी लक्ष दयावे जो मी बोलत आहे, आपण जो गोषवारा सादर केला आहे, पहिले स्मशान भुमीच्या उत्तरेला मागितला होता. आता पश्चिमेला मागितला आहे. गोषवारा बघा, आता त्यांनी मागणी केली होती उत्तरेला आता ते मागत आहेत पश्चिम बाजुला. स्मशान भुमीला पहीले उत्तरेला आणि उत्तरेला लिहीले आहे पश्चिमेला. यांनी चार प्लॉट मागितले आहेत. महाराष्ट्र महावितरण कंपनीने एकच मागितला नाही आणि आपण देवून टाकले. मी जो प्लॉट पसंद केला ३१४ व ३१६ गायकवाड पाडयामध्ये आणि जे वानखेडे साहेब बालत आहेत, मी स्पष्ट बोलतो लोकांच्या बाजूने लिहीले नाही. २४३ प्लॉट आपला जो पहिले बसेससाठी होता, त्या प्लॉटच्या प्रागंणामध्ये गणेशघाटच्या मागे तिथे कोणीही घर बांधले नाही आणि तो साईडला आहे. आपण तिथे प्रस्तावित केले आहे. एक पण घर तुटणार नाही, वानखेडे साहेबांना समजले नाही आणि अजून इथे लिहिले आहे की, चार, पाच वर्षामध्ये कॅम्प नंबर ४ व ५ मध्ये लाईटची भरपूर समस्या होणार आहे. परंतु आम्ही एकाच्या बदल्यात तीन प्रस्तावित करीत आहेत आणि शेरीजी बोलत होते की, संतोषनगरच्या इथे पण एक प्लॉट आहे, तो पण देण्यात येईल. ४ नंबर ओ.टी. मध्ये पण रिकामा प्लॉट पडला आहे. आज आपण ३१४ व ३१६ रिकामा आहे. सबस्टेशन ८० टक्के रिकामा आहे. आपण त्या दिवशी पाहणी केली आहे ना आकाश कॉलनीमध्ये ८० टक्के सबस्टेशन पण रिकामा आहे. तर आपली जी भावना आहे, आता स्मशान भुमीमध्ये किशोर वनवारी आतमध्ये दुकान बनवणार आहे, वानखेडे साहेब आतमध्ये दुकान बनवणार आहे. पहिले स्मशान भुमी १०० टक्के होती. ४० टक्के आता ख्रिश्चन लोकांनी घेतले आहे. बाकी ६० टक्के वाचली आहे.६० टक्केमध्ये स्मशान भुमी पण आहे आणि साहेबांनी पहीले उत्तर बाजू मागितली आता पश्चिम बाजू मागितली आहे, तिथे इलेक्ट्रीकसाठी प्रपोजल केले आहे. तर सर्व स्मशान भुमीमध्ये इलेक्ट्रीक शिग्री पण लावणार आहेत. तर आम्ही हे बोलत नाही की, तुम्हांला प्लॉट देणार नाही, पर्याय देणार नाही. तो आम्हांलाच पाच नंबरवाल्यांना दयायचे आहे. अजून दोन चार प्लॉट देणार आहेत. परंतु कृपया करुन स्मशान भुमीच्या आतमध्ये कधीच कुठे पण स्विच स्टेशन नाही. तिथे लोकांना जाळले जाते,

आज पण तिथे गेले तर गरम हवा येते आणि आपण तिथे स्विच स्टेशन बनवणार जिथे सेग्री बनली आहे. तर कृपया करुन मी जे प्रस्तावित केले आहे, ते पास करण्यात यावे आणि ठराव असा करा की, सबस्टेशन स्मशान भुमीमध्ये न करता, जे दुसरे प्लॉट आम्ही केले आहेत, तिथे करा. आम्ही गणेशघाट इथे मागच्या बाजुला तिथे प्लॉट रिकामा आहे, ३१४ व ३१६ तीन जागेचा प्रस्ताव दया. आपण जे बोलले तेच दादा सतरामदासजी पण बोलेले आहेत.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:-** महापौर बोलत आहेत, त्यामुळे मी थांबलो आहे, आता महासभा चालू आहे आणि आपल्या समोर सदस्य बसलेले आहेत, निवडलेले सदस्य, त्यांना काही तरी बोलायचे आहे. त्यांना पण वेळ दया.

**पिठासिन अधिकारी, श्री. भगवान भालेराव:-** आता तुम्ही बोला.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:-** महापौरजी, जे लोक मृत्यु पावतात, त्यांचा अग्निसंस्कार करण्यासाठी किंवा त्यांना दफन करण्यासाठी किती वर्षापासून समाज वारंवार आंदोलन करीत आले आहेत की, त्यांना जमीन मिळाली पाहीजे आणि खुप प्रयत्नानंतर त्यांना जमीन मिळाली आहे. ही जमीन वयस्कर लोकांनी वाचवून ठेवली होती बाकी कोणीच वाचवून ठेवली नाही. एक परशुराम मसंद म्हणुन नगरसेवक होते, त्यांच्या कृपेने ही जमीन वाचली आहे. इथे उल्हासनगर ४ आणि ५ चे लोक अग्निसंस्कार करण्यासाठी येत असतात. आताच अंबरनाथचा शहर वसले आहे. ज्याला शिवगंगानगर बोलतात, बाजूला रिलायन्सवाले ते पण सर्व तिथेच येतात. आम्हीच मागणी केली आहे की, वारंवार वीज बंद होते, त्यामध्ये सुधारणा करण्यात यावी. धन्यवाद हा विषय लाईट ऑफिसकडून आणला आहे. परंतु आपण अशी जागा मागणी करीत आहेत की, तिथे लोकांना त्रास होणार नाही. आपण बघत आले आहेत की, वेळो वेळी लाकडांची समस्या निर्माण होते. महापौर आणि लोकप्रतिनिधींनी लाईटची मशिन बसविण्यात यावी, त्यामुळे लाकडांची समस्या सुटेल. तर अशी योजना,असे प्रस्ताव पास केले आहेत. ते पण तिथे लावण्यात यावेत, जर एक वेळा स्मशान भुमीची जागा गेली तर नंतर परत मिळू शकत नाही. तरी आपण कृपया करुन जेवढे पण लोकप्रतिनिधी बोलत आहेत, तिथे जावून बघा आम्हांला लाईटची सुविधा पाहिजे. लोकांना लाईट पासून वंचित ठेवायला नाही पाहिजे. कारण की पाणी भरण्यासाठी, टाक्या भरण्यासाठी पण लाईटची गरज आहे. लोकप्रतिनिधींनी मी काय बोलत आहे, हे तुमच्या लक्षात आले पाहिजे, धन्यवाद. माझी विनंती ही आहे की, लाईटचे काम झाले पाहिजे. स्मशान भुमी आपली मालमता नाही, आपल्या कोणत्याही लोकप्रतिनिधींची मालमत्ता नाही. परंतु सुविधा मिळाली पाहिजे, यासाठी मी सगळयांना हात जोडून विनंती करीत आहे. शासन आणि प्रशासन दोघांनाही विनंती आहे की, लोकांना त्रास झाला नाही पाहिजे, धन्यवाद.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-** मा. महापौरजी, हा जो स्मशान भुमी उल्हासनगर ५ चा मुददा आणला आहे, तिथे राहणारे जेवढे पण नेतागण आहेत, विरोधी पक्ष नेता असतील, सतरामदासजी असतील, किशोर वनवारी असतील, त्या सगळयांची भावना इथे समजण्यात आली आहे. तर माझा सभागृहाला निवेदन आहे की, हा जो स्विचींग स्टेशन आहे, तो पण अतिआवश्यक आहे, गरजेचे आहे. जीवंत लोकांना आपल्याला सुविधा दयायच्या आहेत. आपण इथे कब्रस्तानच्या स्मशान भुमीची चर्चा करीत आहेत. परंतु ज्या गोष्टीला लोकप्रतिनिधींचा विरोध आहे, स्थानिक लोकांचा विरोध आहे, बाकी समाजाच्या लोकांचा विरोध आहे. तर त्यावर परत एक वेळा दुसरा मत घ्यायला पाहिजे. माझी संपुर्ण सभागृहाला विनंती आहे, जे नगररचनाकर यांनी बाजूबाजुचे आरक्षण सांगितले आहेत, किशोर वनवारी यांनी सांगितले आहे, तिथे वस्ती आहे का, तिथे ग्रीन झोन आहे का? जवळपास कुठे असा भुखंड आहे का? जिथे आपण स्विचींग स्टेशन करु शकतो. टेक्नीकली महाराष्ट्र विद्युत वितरण विभागाने जशी मागणी केली आहे. अंबरनाथ आणि कॅम्प नंबर ४ मध्ये झाले पाहीजे. तर माझे संपुर्ण सभागृहाला निवेदन आहे की, हा मुददा डिफर करण्यात यावा आणि प्रशासनाने विचारविनिमय करुन हा भुखंड सोडून जवळपास जे चार, पाच भुखंड आहेत, तिथे कशा प्रकारे स्विच स्टेशन टेक्नीकली आणि इमोशनली बसू शकते असा प्रस्ताव आणण्यात यावा.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** यासाठी मा. महापौरांकडे एक बैठक ठेवण्यात यावी, त्यामध्ये सर्व गट नेता आणि संबंधित नगरसेवक जे खास करुन कॅम्प नंबर ५ चे आहेत, त्यांना बोलावून त्यांचे मत घेऊन हा जो प्रस्ताव आहे, तो फेरसादर करण्यात यावा, असा आमचा ठराव आहे.

**<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-</u>** मा. महापौरजी, या विषयावर मला बोलायचे आहे. याचे वेळ लिमिटेड ठेवा येणार आहे, होईल तो पर्यंत आपली बॉडीची मुदत संपणार आहे. आपल्याला याच टर्ममध्ये पुर्ण करायचा आहे. तर वेळेची सिमा दया सर आणि आपण वेळेची सिमा दया.

**<u>सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:-</u>** डॉक्टरजी धन्यवाद.

**<u>सदस्य, श्री. अरुण आशान:-</u>** मा. महापौरजी, आयुक्त साहेब, सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे बरोबर आहे. तर हा विषय ज्वलंत आहे, येणा-या पुढच्या महासभेच्या अगोदर येत्या या आठ दिवसामध्ये प्रशासनाने हा विषय महापौरांकडे घेऊन यायचे आहे. त्या ठिकाणी आपण बैठक लावू याचा निर्णय घ्यायचा आहे.

**<u>नगररचनाकार, श्री. प्रकाश मुळे:-</u>** विद्युत वितरण विभागाचे अधिका-यांना पण बोलवा.

**<u>सदस्य, श्री. अरुण आशान:-</u>** मा. महापौरजी, आपण तसा आदेश दया.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-</u>** महापौर महोदय, हा विषय संपलेल आहे. मी पॉईंट ऑफ ऑर्डरवर दुसरा काही बोलत आहे.

**<u>सदस्य, श्री. अरुण आशान:-</u>** बोला, बोला.

**<u>पिठासिन अधिकारी, श्री. भगवान भालेराव:-</u>** सन्माननिय सदस्यांच्या भावना लक्षात घेता. आठ दिवसाच्या आत मा. महापौरांकडे संबंधित प्रभागातले नगरसेव, सामाजीक कार्यकर्ते यांची एक बैठक होईल आणि त्या नंतर निर्णय घेण्यात येईल. हा विषय तात्पुरता डिफर करण्यात येत आहे.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-</u>** महापौर साहेब, मला पॉईंट ऑफ ऑर्डरवर बोलायचे आहे. मागच्या वेळेस आपले कर्मचारी श्री. यशवंत सगळे यांना ॲन्टीक्रप्शनने रंगेहाथ पकडला आहे आणि भ्रष्टाचाराच्या दलदलीमध्ये उल्हासनगर महानगरपालिका एक वेळा परत डुबत आहे, असे दिसून येत आहे. आज आपण बघत आहेत की, संपुर्ण महानगरपालिकेमध्ये नाईकवाडे साहेब हा आपला डिपार्टमेंट होता. इथे आयुक्त प्रामाणिकपणे काम करीत आहेत. या महापालिकेमध्ये श्री. यशवंत सगळे, व्यक्ती भ्रष्टाचारामुळे पकडला जातो. तर महानगापालिकेवर खुप मोठा डाग लागतो. माझे असे म्हणणे आहे की, भ्रष्टाचार केवळ यशवंत सगळे करीत होते, असे नाही. त्यांनी तीन हजार रुपये घेतले होते असे पण नाही. संपुर्ण महानगरपालिकेमध्ये भ्रष्टाचाराचा अडा बनला आहे. जर आपण विभागवारीस जाल तर पाणी पुरवठा विभागामध्ये काही दिवसापुर्वी २० लाखाचा टेंडर काढला होता...

**<u>पिठासिन अधिकारी, श्री. भगवान भालेराव:-</u>**प्रदिपजी आपण भ्रष्टारावर पॉईंट ऑफ ऑर्डरवर बोलत आहेत तर बाकी टेंडरच्या बाबतीत बोलू नका. टेंडर हा भ्रष्टाचाराचा विषय नाही. पॉईंटऑफ ऑर्डरवर तुम्हांला काय पाहीजे. तेवढेच बोला आपण बसून घ्या, बाकीच्या विषयावर बोलू नका. श्री. यशवंत सगळयांचा विषय फक्त बाकीचे तुम्ही इकडे तिकडे फिरुन सगळया विभागांना भ्रष्टाचारामध्ये गीणती करत आहेत. हे चुकीचे आहे, आपण खाली बसून घ्या.

**<u>सदस्य, श्री. अरुण आशान:-</u>** मा. महापौरजी, विषय दुसरा घ्या, पॉईंट ऑफ ऑर्डरचा विषय हा सर्वांना बदनाम करण्याचा विषय आहे.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-</u>** पॉईट ऑफ ऑरच्या विषयावर आपण मला थांबवू शकत नाहीत.

**<u>पिठासिन अधिकारी, श्री. भगवान भालेराव:-</u>** आपण बसून घ्या, पॉईंट ऑफ आर्डरचा काहीच विषय होत नाही. हा विषय स्थायी समितीमध्ये झाला आहे. आपण बसून घ्या.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** जो पर्यंत माझे बोलणे पुर्ण होत नाही, तो पर्यंत महापौर कोणाचीही दादागिरी चालणार नाही. दादागिरी करुन किंवा दडपशाही करुन आपण माझा आवाज दाबू शकत नाही. आपण आवाज थांबवण्याचा प्रयत्न करणार तर हे शक्य नाही. निर्णय आपण कोणता पण घ्या.

**पिठासिन अधिकारी, श्री. भगवान भालेराव:-** तुम्ही लिखीत पत्र दया. तुम्हांला काही त्रास असेल तर लेखी तक्रार दया.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** लेखी तक्रार देण्यासाठी सामान्य व्यक्ती/नागरीक करेल. एक नगरसेवक महासभेमध्ये बोलणार नाही तर कुठे बोलणार?

**सदस्य, श्री. राजेश वानखेडे:-** बोलत आहे तर बोलू दया.

**पिठासिन अधिकारी, श्री. भगवान भालेराव:-** ते काही पण बोलतात.

**सदस्य, श्री. राजेश वानखेडे:-** त्यांची भावना काय आहे, हे बघा ना.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** आपण निर्णय काही पण घ्या, पण माझे बोलणे आपण थांबवू शकत नाही. अशा प्रकारे दबंगशाही चालणार नाही. आपण माझा आवाज दाबू शकत नाही. याचा अर्थ असा आहे की, आपण स्वत: भ्रष्टाचारमध्ये डुबले आहेत.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** भ्रष्टाचारा बदलचा आवाज आपण थांबवू शकत नाही. मी बोलल्या नंतर आपण निर्णय घ्या, परंतु आपण....

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-** सदस्यांना बोलू दया.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** बाबासाहेब आंबेडकर यांनी आम्हांला स्वातंत्र्य दिले आहे.

**सदस्य, श्री. राजेश वानखेडे:-** ते बोलत आहेत तर त्यांना बोलू दया.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** मला बोलण्यासाठी तुम्ही मला थांबवू शकत नाहीत. कोणीच थांबवू शकत नाही. मला बोलू दया. नाही तर कोणताही विषय होणार नाही.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-** मा. महापौरजी, सदस्यांना बोलू दया.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** भ्रष्टाचाराचा आवाज आपण दाबू शकत नाही. इथे पॉईंट ऑफ ऑर्डरवर ठराव होतात, आपण हे थांबवू शकत नाही. पॉईंट ऑफ ऑर्डरवर मला बोलायचे आहे. हाय हाय भगवान भालेराव हाय हाय. भ्रष्टाचार चालणार नाही.

**काही सदस्य :—**पास—पास……

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. २१ :—** आरक्षण क्रमांक २४५ च्या आरक्षणाच्या उत्तरेस असलेल्या विद्यमान कैलास कॉलनी स्मशान भूमी Designated Reservation मधील सदर आरक्षणाच्या पश्चिमेस सदर आरक्षणाच्या पश्चिमेस असलेल्या ३६ मी. रूंद रस्त्यास लागून M.S.E.B स्वीच स्टेशन करीता ११०० चौ.मी क्षेत्रफळाची जागा देण्याकरीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना

अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये किरकोळ फेरबदल करून M.S.E.B करीता आरक्षित क्षेत्र असे नवीन आरक्षण प्रस्तावित करणे बाबत...

**प्रस्तावना**

उल्हासनगरशहराची मुळ मंजूर विकास योजना १९७४ मध्ये मंजूर करण्यात आली असून सुधारीत विकास आराखडा महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३१ (१) अंतर्गत दिनांक २१.०४.२०१७ रोजी भागश: मंजूर शासनाचा करण्यात आला. तदनंतर सदर आराखडयातून वगळलेल्या क्षेत्राची विकास योजना (E. P.) दिनांक ०१.०३.२०१९ रोजी मंजुर करण्यात आली. उल्हासनगर शहरातील कॅम्प़-४ व कॅम्प़-५ या भागामध्ये लोकवस्ती वाढली असल्यामुळे व विद्युत भार वाढलेला असल्यामुळे विद्यमान विद्युत संरचनेमध्ये भाराचे विभाजन करण्याच्या दृष्टीकोनातून कॅम्प़-४ व कॅम्प़-५ मध्ये स्वीच गियर स्टेशन बनवण्याची आवश्यकता कार्यकारी अभियंता M.S.E.B यांनी प्रतिपादीत केलेली आहे. उल्हासनगर शहराच्या कॅम्प़-४ व कॅम्प़-५ मध्ये विद्युत भार मोठा वाढला असल्याने भावी १० वर्षात वाढणाऱ्या भाराचा अंदाज पाहता मोठे सबस्टेशन आवश्यक्र आहे.मात्र जागेच्या कमतरतेमुळे स्वीच गियर स्टेशन बांधणे आवश्यक्र असल्याचे दिसून आले.

कार्यकारी अभियंता M.S.E.B यांनी उल्हासनगर शहरात स्वीच गियर स्टेशन बनविण्याकरीता विद्यमान कैलास नगर, स्मशान भूमी यामधील ११०० चौ.मी जमीन देण्याबाबत मा. आयुक्त यांच्याकडे विनंती अर्ज सादर केलेला आहे. सदर स्वीच गियर स्टेशनसाठी M.S.E.B ने सुचविलेली जागा विद्यमान विकासयोजनेत त्या आरक्षणासाठी राखीव ठेवण्याकरीता कैलास नगर स्मशान भूमीकरीता राखीव असलेल्या क्षेत्रातून ११०० चौ.मी क्षेत्र वगळून M.S.E.B करीता राखीव ठेवण्याकरीता उल्हासनगर शहराच्या मंजूर विकासयोजनेत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये किरकोळ फेरबदल करणे आवश्यक्र आहे. या दृष्टीकोनातून उल्हासनगर शहराच्या विकास योजनेतील आरक्षण क्र. २४५ च्या उत्तरेस "विद्यमान कैलास कॉलनी स्मशान भूमी या Designated Reservation" मधील जागेपैकी सदर स्मशान भूमीच्या पश्चिमेस असलेल्या ३६ मी. रूंद रस्त्यास लागून ११०० चौ.मी क्षेत्रफळाची जागा M.S.E.B स्वीच गियर स्टेशनकरीता देण्याकरीता विषय पत्रिकेत खालील प्रमाणे विषय समाविष्ट करणे आवश्यक्र आहे. त्या अनुषंगाने आवश्यक्र ठरावाचा मसुदा सादर करत असून त्याचा समावेश दि. १८/११/२०२१ रोजीच्या सभेत विषय पत्रिका समाविष्ट होण्याच्या दृष्टीने मान्यतेकरीता सादर.

**ठरावाचा मसुदा**

उल्हासनगर शहराच्या मंजूर विकास योजनेतील "विद्यमान कैलास कॉलनी स्मशान भूमी या Designated Reservation" मधील आरक्षित जागेपैकी सदर आरक्षणाच्या पश्चिमेस असलेल्या ३६ मी. रूंद रस्त्यास लागून ११०० चौ.मी क्षेत्रफळाची जागा "M.S.E.B" चा वापर या नवीन आरक्षणाखाली समाविष्ट करण्यासाठी सदर जागा विद्यमान आरक्षणातून वगळण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये किरकोळ फेरबदल करणेस ही सभा मान्यता देता आहे.

सदर ठरावाचा समावेश मा. सर्वसाधारण सभेच्या दि. १८/११/२०२१ च्या विषय पत्रिकेत करणेबाबत आवश्यक्र कार्यवाही करीता सादर.

**महासभा ठराव क्र:४०अ** **दिनांक:—**२४/१२/२०२१

सुचकाचे नाव :— श्री. प्रमोद टाले

अनुमोदकाचे नाव :— श्री. शंकर लुंड

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणेउल्हासनगर शहराच्या मंजूर विकास योजनेतील "विद्यमान कैलास कॉलनी स्मशान भूमी या Designated Reservation" मधील आरक्षित जागेपैकी सदर आरक्षणाच्या पश्चिमेस

असलेल्या ३६ मी. रूंद रस्त्यास लागून ११०० चौ.मी क्षेत्रफळाची जागा "M.S.E.B" चा वापर या नवीन आरक्षणाखाली समाविष्ट करण्यासाठी सदर जागा विद्यमान आरक्षणातून वगळण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये किरकोळ फेरबदल करणेच्या प्रस्ताव कार्यसुचीवरुन वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**<u>सर्वानुमते</u>**

पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**<u>महापालिका सचिव :—</u>** विषय क्र. २२ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. २२ :— <u>अशासकीय प्रस्ताव:-</u>**

**उमंग मटेर्निटी होम हॉस्पिटल, सत्य जीवन सोसायटी, ओ.टी. चौक, उल्हासनगर-४ येथील परीसर १०० मिटर पर्यंत शांतता क्षेत्र म्हणून घोषित करण्याबाबत. पालिका सदस्य, श्री. किशोर वनवारी, सुचक व श्री. जमनादास पुरस्वानी व अरुण आशान अनुमोदक यांचा प्रस्ताव विचारात घेणे.**

---

**<u>सदस्य, श्री. अरुण आशान:-</u>** मा. महापौरजी हा प्रस्ताव मागे घेत आहे. अशासकीय प्रस्ताव मागे घेत आहे.

**<u>महापालिका सचिव तथा उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-</u>** हा अशासकीय प्रस्ताव मागे घेतला आहे.

**<u>पिठासिन अधिकारी, श्री. भगवान भालेराव:-</u>** २३ नंबरचा विषय घ्या.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-</u>** भ्रष्टाचारा बदलचा आवाज आपण थांबवू शकत नाही. मी बोलल्या नंतर आपण निर्णय घ्या, परंतु आपण....

**<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-</u>** सदस्यांना बोलू दया.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-</u>** बाबासाहेब आंबेडकर यांनी आम्हांला स्वातंत्र्य दिले आहे.

**<u>सदस्य, श्री. राजेश वानखेडे:-</u>** ते बोलत आहेत तर त्यांना बोलू दया.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-</u>** मला बोलण्यासाठी तुम्ही मला थांबवू शकत नाहीत. कोणीच थांबवू शकत नाही. मला बोलू दया. नाही तर कोणताही विषय होणार नाही.

**<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-</u>** मा. महापौरजी, सदस्यांना बोलू दया.

**<u>महापालिका सचिव:—</u>** विषय क्र. २३ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. २३ :— <u>अशासकीय प्रस्ताव</u>**

**उल्हासनगर रेल्वे स्टेशनचे नाव स. बाळासाहेब ठाकरे तसेच विठ्ठलवाडी रेल्वे स्टेशनचे नाव डॉ. बाबासाहेब आंबेडकर अशी नावे प्रस्तावीज करुन प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठविणेबाबत. पालिका सदस्य, श्री. राजेश वानखेडे सुचक व अनुमोदक श्रीम. ज्योत्सना सुरेश जाधव यांचा प्रस्ताव विचारात घेणे.**

---

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-</u>** भ्रष्टाचाराचा आवाज आपण दाबू शकत नाही. इथे पॉईंट ऑफ ऑर्डरवर ठराव होतात, आपण हे थांबवू शकत नाही. पॉईंट ऑफ ऑर्डरवर मला बोलायचे आहे. हाय हाय भगवान भालेराव हाय हाय. भ्रष्टाचार चालणार नाही.

**<u>काही सदस्य :—</u>**पास—पास……

**<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. २३:—**<u>अशासकीय ठराव</u>

उल्हासनगर रेल्वे स्टेशनचे नाव स. बाळासाहेब ठाकरे तसेच विठ्ठलवाडी रेल्वे स्टेशनचे नाव डॉ. बाबासाहेब आंबेडकर अशी नावे प्रस्तावित करुन प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठविणेबाबत.पालिका सदस्य सुचक म्हणुन श्री. राजेश वानखेडे व अनुमोदक श्रीम ज्योत्स्ना जाधव याच्या प्रस्ताव विचारात घेणे.

<u>प्रस्तावना</u>

वरील विषयानुसार विनंती पूर्वक सांगू इच्छितो की, उल्हासनगर महापालिका क्षेत्रात उल्हासनगर रेल्वे स्टेशन व विइलवाडी रेल्वे स्टेशन हे दोन रेल्वे स्टेशन येत असून दररोज लाखो प्रवासी प्रवास करत आहेत. आमच्या शहरातील नागरकांची अशी मागणी आहे की, वंदनीय हिंदू हदयसम्राट बाळासाहेब ठाकरे असे उल्हासनगर रेल्वे स्टेशन चे नामकरण करण्यात यावे तसेच विठ्ठलवाडी रेल्वे स्टेशनचे नाव संविधान निर्माते परम पुज्य डॉ. बाबासाहेब यांचे नाव देण्यात यावे. तसे नामकरणाचे अशासकीय प्रस्ताव येत्या महासीैत चर्चा विचार विनिमय करण्यात येवून प्रस्ताव पास करुन राज्य सरकारकडे पाठविण्यात यावे, हि विनंती.

**महासभा ठराव क्र.४०ब** **दिनांक २४/१२/२०२१**

सुचकाचे नाव :— श्री. राजेश वानखेडे

अनुमोदकाचे नाव :— श्री.कलवंतसिंह सोहता

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर रेल्वे स्टेशनचे नाव स. बाळासाहेब ठाकरे तसेच विठ्ठलवाडी रेल्वे स्टेशनचे नाव डॉ. बाबासाहेब आंबेडकर अशी नावे प्रस्तावित करुन प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठविणेच्या प्रस्ताव कार्यसुचीवरुन वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**<u>पिठासिन अधिकारी, श्री. भगवान भालेराव:-</u>** २३ नंबरचा पास झाला आहे, आता २४ नंबरचा घ्या.

**<u>महापालिका सचिव :—</u>** विषय क्र. २४ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. २४ :— <u>अशासकीय प्रस्ताव</u>**

**समाज मंदिर हडप करण्यासाठी सदर जागेवर स्वत:ची टॅक्स पावती काढल्या बददल संबंधितावर कार्यवाही करणे करीताअ शासकीय प्रस्ताव मंजुर करणे बाबत. पालिका सदस्य,सुचक श्री. अरुण आशान, व अनुमोदक श्री .सुरेंद्र सावंत,व श्री. चंद्रशेखर यादव यांचा प्रस्ताव विचारात घेणे.**

---

**<u>पिठासिन अधिकारी, श्री. भगवान भालेराव:-</u>** २४ नंबरवर श्री. अरुण आशान बोला.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-</u>** नाही चालणार, नाही चालणार दादागिरी चालणार नाही.

**<u>महापालिका सचिव तथा उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-</u>** २४ नंबरचा विषय चालला आहे.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-</u>** भ्रष्टाचार आपण दाबू शकत नाहीत. तुमच्या पसंतीचा विषय नाही.

**<u>सदस्य, श्री. राजेश वानखेडे:-</u>** २३ नंबरचा चालू आहे, २४ नंबरचा नाही.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-</u>** भगवान भालेराव हाय, हाय.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-</u>** तुम्हांला विरोध आहे.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-</u>** नाही चालणार दादागिरी नाही चालणार

**<u>पिठासिन अधिकारी, श्री. भगवान भालेराव:-</u>** पॉईंट ऑफ ऑर्डरवर दोनच मिनीटे बोलायचे असते, तुम्हांला आता किती मिनीटे झाली आहेत.

**<u>सदस्य, श्री. अरुण आशान:-</u>** २२ नंबरचा विषय मागे घेतला आहे.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-</u>** नाही चालणार दादागिरी नाही चालणार.

**<u>सदस्य, श्री. अरुण आशान:-</u>** २२ आणि २४ नंबरचा विषय मागे.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-</u>** नाही चालणार दादागिरी नाही चालणार. भगवान भालेराव हाय, हाय.

**<u>सदस्य, श्री. राजेश वानखेडे:-</u>** २४ नंबरचा मागे घेतला आहे.

**महापालिका सचिव :—** विषय क्र. २५ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. २५ :— अशासकीय प्रस्ताव**

**उल्हासनगर महापालिका शाळा क्र. १९ व २४ नाममात्र रु. १ या भाडेतत्वार मिळणेबाबत.पालिका सदस्या, सुचक श्रीम. रेखा ठाकुर व अनुमोदक श्री. मनोज सयानी यांचा प्रस्ताव विचारात घेणे.**

---

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-** २५ नंबरचा विषय मागे घेतला आहे.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** गरीबांवर अन्याय केला आहे. महापौर हाय, हाय. पिठासिन अधिकारी हाय, हाय.

**महापालिका सचिव:—** विषय क्र. २६ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. २६:— प्रस्तावाची सूचना क्रमांक.१**

निविदा क्र. UMC/PHD/07/2021-22 (2021-UMC-735867-1) मधील टाकण्यात आलेल्या अटी व शर्ती शिथिल करण्याबाबत.पालिका सदस्या सुचक म्हणुन श्रीम. दिप्ती नविन दुधानी व अनुमोदक श्री. गजानंन प्रल्हाद शेळके यांची प्रस्तावाची सूचना विचारात घेणे.

---

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-** २६ नंबरचा विषय वाचला आहे, सुचक नाहीत, विषय संपुष्टात येत आहे.

**महापालिका सचिव तथा उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-** सुचक आणि अनुमोदक नाही, त्यामुळे विषय संपुष्टात येत आहे.

**महापालिका सचिव:—** विषय क्र. २७ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. २७ :— आयत्या वेळचा विषय**

पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण समिती व गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती व वृक्ष प्राधिकरण समिती मधील एका सदस्याची जागा रिक्त झाल्याने त्या जागी नवीन सदस्याची नियुक्ती करणे.

---

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-** हे चुकीचे काम करीत आहेत, भारतीय जनता पार्टी चुकीची आहे. वरुन आदेश आहे, भ्रष्टाचार इथे पण आहे. भ्रष्टाचार करतात.

**पिठासिन अधिकारी, श्री. भगवान भालेराव:-** पाणी पुरवठा कमिटीवर श्री. किशोर वनवारी, गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती, श्री. राजेश वदारिया, पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण समिती, ज्योती पिंटो भठीजा, वृक्षप्राधिकरण, श्री. भगवान भालेराव

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-** चेक करा, दोन दोन, तीन तीन समितीमध्ये येणार नाही, ज्योती भटीजाचे नाव तीन तीन समितीमध्ये आहे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** मा. महापौरजी, मा. आयुक्त मॅडम, एक समितीमध्ये एक सदस्य दोन कमिटीपेक्षा जास्त जाऊ शकत नाही. या गोष्टीची माहीती घ्यायला पाहीजे. हा विषय पाच मिनीट थांबवून चेक करुन घ्या,

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-** मी कोणत्याच समितीमध्ये नाही. मी कोणत्याच समितीमध्ये सदस्य नाही, गट नेताजी. भारतीय जनता पार्टीचे गट नेताजी मी कोणत्याही समितीमध्ये सदस्य नाही. तरी सुध्दा आपण चुकीचे काम केले.

**<u>पिठासिन अधिकारी, श्री. भगवान भालेराव:-</u>** लासीजी जर माझ्या लेटर हेडवर श्रीम. पंचम कालानीचे नाव टाकेले.

**<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-</u>** चुकीचे काम करीत आहेत. सदस्यावर अन्याय करतात, पाच पाच वर्षे....

**<u>सदस्य, श्री. अरुण आशान:-</u>** मा. महापौरजी, पॉईंट ऑफ ऑर्डरवर बोलायचे आहे.

**<u>पिठासिन अधिकारी, श्री. भगवान भालेराव:-</u>** पाणी पुरवठा समितीवर, किशोर वनवारीच्या जागेवर डॉ. प्रकाश नाथानी.

**<u>सदस्य, श्री. मनोज सयानी:-</u>** ज्योती पिंटो भटीजाचे मला वाटते दोन दोन समितीमध्ये नाव आहे. असे वाटते तर कृपया चेक करण्यात यावे.

**<u>महापालिका सचिव तथा उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-</u>** विषय क्र. २७ व २८ नुसार....

**<u>सदस्य, श्री. अरुण आशान:-</u>** मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, पॉईंट ऑफ ऑर्डरवर एक बोलायचे आहे. उल्हासनगर शांतीप्रकाश आश्रमशाळेचा जो रोड आहे, त्या रोडवर काही लोकांची दुकाने बाधित झालेली आहेत. काही ४-५ दुकानदार आहेत, त्यांची १०० टक्के दुकाने बाधित झालेली आहेत. तर त्यांचा प्रशासना मार्फत पंचनामा करुन त्यांना पर्यायी व्यवसाय देणेबाबत, विचार महासभेने करावा.

**<u>सदस्य, श्री. मनोज सयानी:-</u>** मा. महापौरजी पॉईंट ऑफ ऑर्डर दिनांक २६/०२/२०२१ ला...

**<u>पिठासिन अधिकारी, श्री. भगवान भालेराव:-</u>** विषय पुर्ण होऊ दया,

**<u>महापालिका सचिव तथा उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-</u>** विषय क्र. २७ नुसार पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण समिती व गलिच्छ वस्ती निर्मुलन समितीसाठी....

**<u>काही सदस्य :—</u>**पास—पास......

**<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **<u>विषय क्रं. २७-आयत्यावेळचा विषय</u>**

पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण समिती व गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती व वृक्ष पाधिकरण समिती मधील एका सदस्याची जागा रिक्त झाल्याने त्या जागी नवीन सदस्याची नियुक्ती करणे.

**<u>प्रस्तावना</u>**

उपरोक्त विषयान्वये सविनय सादर करण्यांत येते की, उल्हासनगर महानगरपालिकेच्या सन २०१७ च्या सार्वत्रिक निवडणुकीत सर्वसाधारण महिलासाठी राखीव असलेल्या प्रभागातून श्रीम. पंचम ओमेश कालानी (भा.ज.प) पालिका सदस्या प्रभाग क्र. २(क) मध्ये निवडून आल्या होत्या. श्रीम. पंचम ओमेश कालानी यांनी दिनांक २७/१०/२०२१ रोजी मा. आयुक्तांकडे महापालिका सदस्य पदाचा राजीनामा दिलेला आहे. (सोबत पत्र जोडत आहे.)

उल्हासनगर महानगरपालिकेच्या महासभा ठराव क्र. ०८, दिनांक १८/०१/२०२१अन्वये उल्हासनगर महानगरपालिकेच्या ९ विशेष समित्यांची पुर्नरचना करण्यात आली आहे.सदर सभेत पूर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण समिती व गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती मधील ०९ सदस्यांची नेमणुक करण्यात आली. या ०९ सदस्यांमधुन भारतीय जनता पक्षाचे एक सदस्याश्रीम पंचम ओमेश कालानी यांनी दिनांक २७/१०/२०२१ रोजी सदस्य पदाचा राजीनामा दिला आहे.

त्यामुळे पूर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण समिती व गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती मधीलएक सदस्य पदाची जागा रिक्त झाली आहे.

**उल्हासनगर महानगरपालिका नियम १९९७ महापालिका, स्थायी समिती, परिवहन समिती इत्यादीचे कामकाजा विषयी नियम ४(अ) विशेष समित्यांची रचना,यामधील उर्वरित मुदतीसाठी नैमित्तीक रिक्त पद भरणे : ४ मध्ये**

"कोणत्याही ही विशेष समितीवर नेमण्यात आलेल्या कोणत्याही पालिका सदस्याने पद स्विकारले नाही किंवा अशा सदस्याचा मृत्यु झाला, त्याने राजीनामा दिला किंवा पालिका सदस्या म्हणुन चालु राहण्यास तो अनर्ह ठरला किंवा असमर्थ झाला तर, महानगरपालिकेडून असे रिक्त पद, पोट नियम (२) अन्वये शक्य तितक्या लवकर, सोयीनुसार भरण्यात येईल आणि त्या सदस्यांचे जागी त्यांची नेमणुक झाली त्या सदस्याने पद रिक्त झाले नसते तर, ज्या मुदेतीपर्यत पद धारण केले असते, त्याच मुदतीपर्यत असा पालिका सदस्य पद धारण करील".

''**महापालिका, स्थायी समिती, परिवहन समिती इत्यादीचे कामकाजा विषयी नियम ४(ओ) सदस्य असण्याचे बंद होईल अशा पालिका सदस्यांची नावे कळविणे:**

"नगरपालिका सचिव, विशेष समितीचा सदस्य असण्याचे बंद झाले असेल अशा प्रत्येक नगरपालिका सदस्यांची नांवे महापालिकेस कळवील, त्यामुळे त्याच्या जागी दुस—या सदस्याची नेमणुक करणे महापालिकेस शक्य होईल".

सदर समितीचा कालावधी १७/०१/२०२२ रोजी संपुष्टात येणार आहे. त्यामुळे सदर समितीत नव्याने सदस्य नेमणे आवश्यक आहे.

तरी पूर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण समिती,व गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती सदस्य श्रीम पंचम ओमेश कालानी,भारतीय जनता पक्ष यांच्या रिक्त झालेल्या जागी पक्षीय बलाबल पुर्वीप्रमाणे असल्याने ज्या पक्षाचा सदस्य पुर्वी होता त्याच पक्षाचा सदस्य नेमणूक करता येईल,

तसेच श्रीम पंचम ओमेश कालानी सदस्या यांनी दिनांक २७/१०/२०२१ रोजी सदस्य पदाचा राजीनामा दिल्याने वृक्ष प्राधिकरणावर देखील त्यांच्या जागा एकाकोणत्याही सदस्याची नेमणूक करणे आवश्यक आहे. तरी तिन्ही समितीच्या रिक्त झालेल्या जागेवर नविन सदस्य नेमणूक करणेसाठी प्रस्ताव महासभेपुढे प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र:४१** **दिनांक:—२४/१२/२०२१**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. कलवंतसिंह सोहता

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणेपुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण समिती व गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती व वृक्ष प्राधिकरण समिती मधील एका सदस्याची जागा रिक्त झाल्याने त्या जागी पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण समिती मध्ये श्री. किशोर वनवारी, व गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती मध्ये श्री. राजेश वदारिया व वृक्ष प्राधिकरण समिती मध्ये श्री. भगवान भालेराव यांची नियुक्ती करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

पीठासीन अधिकारी

सर्वसाधारण महासभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** नाईकवाडे साहेब, महानगरपालिकेमध्ये पाणी पुरवठा विभागामध्ये १० कोटीचा भ्रष्टाचार झाला आहे आणि या भ्रष्टाचाराला पाच वर्षे बजेट नसतांना महासभेची अनुमती न घेता भ्रष्टाचार केलेले आज खुर्चीवर बसलेले आहे. या १० कोटीच्या भ्रष्टाचाराला पाच वर्षाची महासभेची मंजुरी घेतलेली नाही. तरी पाच वर्षाचा टेंडर कसा केला?

**महापालिका सचिव :—** विषय क्र. २८ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. २८ :—आयत्या वेळचा विषय:-**

पाणी पुरवठा व जलनि:सारण समितीमधील एका सदस्याची जागा रिक्त झाल्याने त्याजागी नवीन सदस्याची नियुक्ती करणे.

---

**काही सदस्य :—**पास—पास......

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्रं. २८-आयत्या वेळचा विषय:-**

पाणी पुरवठा व जलनि:सारण समितीमधील एका सदस्याची जागा रिक्त झाल्याने त्याजागी नवीन सदस्याची नियुक्ती करणे.

**प्रस्तावना**

महासभा ठराव क्र.०८ दिनांक १८/०१/२०२१ अन्वये उल्हासनगर महानगरपालिकेच्या ९ विशेष समित्यांची पुर्नरचना करण्यात आली आहे. सदर सभेत पाणी पुरवठा व जलनि:सारण समिती ०९ सदस्यांची नेमणुक करण्यात आली. या ०९ सदस्यांमधील एक सदस्य कै.अजित प्रभुनाथ गुप्ता सभापती यांचे दिनांक १२/११/२०२१ रोजी निधन झाल्याने पाणी पुरवठा व मलनिसारण समितीमधील एका जागा रिक्त झाली आहे.

**उल्हासनगर महानगरपालिका नियम १९९७ महापालिका, स्थायी समिती, परिवहन समिती इत्यादीचे कामकाजा विषयी नियम ४ (ब) विशेष समित्यांची रचना, यामधील उर्वरित मुदतीसाठी नैमित्तीक रिक्त पद भरणे:४ मध्ये,**

"कोणत्याही ही विशेष समितीवर नेमण्यात आलेल्या कोणत्याही पालिका सदस्याने पद स्विकारले नाही किंवा अशा सदस्याचा मृत्यु झाला, त्याने राजीनामा दिला किंवा पालिका सदस्या म्हणुन चालु राहण्यास तो अनर्ह ठरला किंवा असमर्थ झाला तर, महानगरपालिकेडून असे रिक्त पद, पोट नियम (२) अन्वये शक्य तितक्या लवकर, सोयीनुसार भरण्यात येईल आणि त्या सदस्यांचे जागी त्यांची नेमणुक झाली त्या सदस्याने पद रिक्त झाले नसते तर, ज्या मुदेतीपर्यत पद धारण केले असते, त्याच मुदतीपर्यत असा पालिका सदस्य पद धारण करील".

'**'महापालिका, स्थायी समिती, परिवहन समिती इत्यादीचे कामकाजा विषयी नियम ४(ओ) सदस्य असण्याचे बंद होईल अशा पालिका सदस्यांची नावे कळविणे:**

"नगरपालिका सचिव, विशेष समितीचा सदस्य असण्याचे बंद झाले असेल अशा प्रत्येक नगरपालिका सदस्यांची नांवे महापालिकेस कळवील, त्यामुळे त्याच्या जागी दुस—या सदस्याची नेमणुक करणे महापालिकेस शक्य होईल".

तरी सदस्य कै.अजित प्रभुनाथ गुप्ता हे पाणी पुरवठा व जलनि:सारण समितीचे सभापती असुन सदर समितीच्या कालावधी १७/०१/२०२२ रोजी संपुष्टात येणार आहे. त्यामुळे सदर समितीत नव्याने सदस्य नेमुन सभापती निवडणुक घेणे आवश्यक आहे.

तरी पाणी पुरवठा व जलनि:सारण सदस्य श्री. अजित प्रभुनाथ गुप्ता, भारतीय जनता पक्ष यांच्या रिक्त झालेल्या जागी पक्षीय बलाबलपुर्वीप्रमाणे असल्याने ज्या पक्षाचा सदस्य पुर्वी होते त्याच पक्षाचा एका सदस्य नेमणूक करणेसाठीप्रस्ताव महासभेपुढे प्रस्तावित.

**<u>महासभा ठराव क्र:४२</u>** **<u>दिनांक:—२४/१२/२०२१</u>**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. कलवंतसिंह सोहता

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे पाणी पुरवठा व जलनि:सारण समितीमधील एका सदस्याची जागा रिक्त झाल्याने त्याजागी सदस्य डॉ. प्रकाश नाथानी यांची नियुक्ती करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**<u>सर्वानुमते</u>**

पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**<u>महापालिका सचिव तथा उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-</u>** कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सायंकाळी ७.०० वाजता महापौर श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

सही/

(अशोक नाईकवाडे)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:- २०-०१-२०२२

**उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २०-०१-२०२२ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.**

**०४**

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा गुरुवार, दिनांक २०/०१/२०२२ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली. मा. अवर सचिव, महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांचेकडील दिनांक ३ जानेवारी, २०२२ रोजीचे पत्रान्वये ऑनलाईन ॲपद्वारे सभा आयोजित केली आहे. सदर सभेत मा. श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होते व खालील दर्शविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान - महापौर

२. श्री. भगवान शंकर भालेराव - उप-महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती अर्चना गोकुळ करणकाळे | ३६ | श्रीमती ज्योती प्रकाश बठिजा |
| ४ | श्री. मंगल बालकृष्ण वाघे | ३७ | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी |
| ५ | श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड | ३८ | श्री. सुमित सागर सोनकांबळे |
| ६ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ३९ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| ७ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | ४० | श्री. चंद्रशेखर केशव यादव |
| ८ | श्रीमती आशा नाना बिराडे | ४१ | श्रीमती संगिता नितीन सपकाळे |
| ९ | श्री. राजेंद्रसिंह विरसिंग भुल्लर | ४२ | श्रीमती शीतल चंद्रकांत कदम |
| १० | श्री. स्वप्नील मिलींद बागुल | ४३ | श्रीमती वसुधा धनंजय बोडारे |
| ११ | श्रीमती सुरेखा हनुमंत आव्हाड | ४४ | श्री. धनंजय बाबुराव बोडारे |
| १२ | श्रीमती अंजना अंकुश म्हस्के | ४५ | श्रीमती दिप्ती नविन दुधानी |
| १३ | श्री. कलवंतसिंग गरुदेव सोहता | ४६ | श्रीमती ज्योती रमेश चैनानी |
| १४ | श्रीमती मिना कुमार आयलानी | ४७ | श्रीमती कांचन अमर लुंड |
| १५ | श्रीमती गीता लालचंद साधनानी | ४८ | श्री. शंकर गोविंदराम लुंड |
| १६ | डॉ. प्रकाश घनश्यामदास नाथानी | ४९ | श्रीमती सुमन राजेश सचदेव |
| १७ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | ५० | श्री. भारत रामचंद राजवानी (गंगोत्री) |
| १८ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | ५१ | श्री. गजानन प्रल्हाद शेळके |
| १९ | श्री. महेश पहिलराज सुखरामनी | ५२ | श्री. सतरामदास पुतनदास जेसवानी |
| २० | श्रीमती अपेक्षा भगवान भालेराव | ५३ | श्रीमती अंजली चंद्रकांत साळवे |
| २१ | श्रीमती शुभांगीनी निकम | ५४ | श्री. प्रमोद नामदेव टाले |
| २२ | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग | ५५ | श्रीमती कविता सुधिर बागुल |
| २३ | श्रीमती ज्योती प्रशांत पाटील | ५६ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २४ | श्री. राजेश नानिकराम वदारिया | ५७ | श्री. किशोर नारायणदास वनवारी |
| २५ | श्रीमती डिम्पल नरेंद्र ठाकुर (कुमारी) | ५८ | श्रीमती मिना चंद्रगुप्त सोनेजी |
| २६ | श्रीमती दिपा नारायण पंजाबी | ५९ | श्रीमती मिनाक्षी रवी पाटील |
| २७ | श्रीमती पुष्पा नाना बागुल | ६० | श्री. विजय चाहू पाटील |
| २८ | श्रीमती शुभांगी मनोहर बेहनवाल | ६१ | श्रीमती कविता सुरेश गायकवाड |

| | | | |
|---|---|---|---|
| २९ | श्री. राजेंद्र शांताराम चौधरी | ६२ | श्री. आकाश परशुराम पाटील |
| ३० | श्री. रवी किशनचंद जग्यासी | ६३ | श्री. विकास परशुराम पाटील |
| ३१ | श्रीमती इंदिरा जमनादास उदासी | ६४ | श्री. मनोज दिलीपकुमार सयानी |
| ३२ | श्रीमती कविता लाल पंजाबी | ६५ | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |
| ३३ | श्री. जीवन चंद्रभान इदनानी | ६६ | श्री. अरुण लक्ष्मण आशान |
| ३४ | श्रीमती सविता प्रविण तोरणे (रगडे) | ६७ | श्रीमती आशा जीवन इदनानी |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते / होत्या.

१. श्रीमती जयश्री ज्ञानेश्वर पाटील, २. श्रीमती मिनाकौर अजितसिंग लबाना, ३. श्री. रविंद्र दशरथ बागुल, ४. श्रीमती चरणजितकौर राजेंद्रसिंह भुल्लर, ५. श्री. राजू किशनचंद जग्यासी ६. श्रीमती सरोजिनी टेकचंदानी, ७. श्रीमती छाया सुजित चक्रवर्ती उर्फ अडसुळ, ८. श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी, ९. श्रीमती ज्यात्स्ना सुरेश जाधव, १०. श्रीमती ज्योती शामराव माने, ११. श्रीमती मिताली राजेश चान्पूर, १२. श्रीमती सुनिता बाबुराव बगाडे, १३. श्री. सुरेंद्र बाळकृष्ण सावंत.

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

१.डॉ. राजा दयानिधी, आयुक्त

२. श्रीमती करुणा जुईकर, अतिरिक्त आयुक्त

३. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, महापालिका सचिव

४. श्री. अशोक नाईकवाडे, उप आयुक्त(मुख्यालय)

५. डॉ. सुभाष जाधव, उप आयुक्त, सार्वजनिक आरोग्य विभाग

६. श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखा अधिकारी

७. श्री. विजय खेडकर, मुख्य लेखा परिक्षक

८. श्री. सुर्यकांत खटके, लेखाधिकारी

९. श्री. अशोक मोरे, उप लेखा परिक्षक

१०. डॉ. दिपक पगारे, वैदकीय आरोग्य अधिकारी

११. श्री. मोहीते, शिक्षणाधिकारी

१२.श्री. अच्युत सासे, सहा. आयुक्त

१३.श्री. एकनाथ पवार, मुख्य स्वच्छता निरीक्षक

१४. श्री. विनोद केणे, मुख्य स्वच्छता निरीक्षक

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्रीमती नर्गीस खान, लिपीक

२. श्री. बाळू भांगरे, लिपीक

३. श्रीम विद्या आढळ, लिपीक

४.श्री. अंकुश कदम, महापौरांचे स्विय्य सहाय्यक

सायंकाळी ४. १५ वाजता वंदे मातरम म्हणून सभेची सुरुवात करण्यात आली.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-**सचिव मॅडम, एक मिनीट श्रध्दांजली प्रस्ताव आहे, सिंधुताई सपकाळ, यांचे काही दिवसापुर्वी निधन झालेले आहे. तर त्यांना आपल्या सभागृहाच्या माध्यमातून भावपुर्ण श्रध्दांजली अर्पीत करण्यात यावी.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** तसेच प्राध्यापक एन.डी.पाटील, शेतकरी संघटनेचे नेते यांचे पण निधन झाले आहे, त्यांना पण श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

---

सुचकाचे नावः— श्री. भगवान भालेराव

अनुमोदकाचे नावः— श्री. मनोज सयानी

## शोक प्रस्ताव

जेष्ठ समाजसेविका व अनाथांची माय सिंधूताई सपकाळ यांचे नुकतेच काही दिवसापुर्वी निधन झाले आहे व श्री.एन.डी. पाटील, प्राध्यापक व शेतकरी संघटनेचे नेतेयांचे आज निधन झाले आहे. त्यांचे कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असून हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी, अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

महासभा ठराव क्र.४२ अ                दिनांकः—२०/०१/२०२२

हीमहासभावरील प्रस्तावनेनुसारजेष्ठ समाजसेविका व अनाथांची माय सिंधूताई सपकाळ व श्री.एन.डी. पाटील, प्राध्यापक व शेतकरी संघटनेचे नेते यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांचे कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

सर्वानुमते

महापौर / पिठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव:-**विषय क्र.१ प्रश्नोत्तरे प्रश्न क्र.३४ प्रलंबित आहे. श्री. प्रमोद टाले यांचा आहे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** प्रश्नोत्तराचा तास वगळण्यात यावा.

**महापालिका सचिव:-**प्रश्नोत्तराचा तास वगळण्यास मागणी झाली आहे, मा. पिठासिन अधिकारी यांनी आदेश दयावेत.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:-** प्रश्नोत्तराचा तास वगळण्यात यावा.

**महापालिका सचिव:-** ठिक आहे, प्रश्नोत्तराचा तास वगळण्यात येत आहे.

**विषय क्र. १ :- प्रश्नोत्तराचा तास वगळण्याबाबत.**

**सुचकाचे नाव:- श्री. कलवंतसिंह सोहता**

**अनुमोदकाचे नाव :- श्री. स्वप्नील बागुल**

**महासभा ठराव क्र. ४२ ब** **दिनांक २०/०१/२०२२**

**ही महासभा आज दिनांक २०/०१/२०२२ रोजीच्या महासभेतील प्रश्नोत्तराचा काळ वगळण्यास मान्यता देत आहे.**

**सुचकाची सही/-**

**अनुमोदकाची सही /-**

**सर्वानुमते**

**महापौर/पीठासीन अधिकारी**
**सर्वसाधारण महासभा**
**उल्हासनगर महानगरपालिका**

**महापालिका सचिव:-** आता आपल्यापुढे एक स्थगन प्रस्ताव आला आहे. श्री. भुल्लर महाराज सरांचा आणि मी तुम्हांला ई-मेलद्वारे पाठवला आहे, व्हॉटस् ॲपवर पण पाठवला आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-** मॅडम, मी माझा प्रस्ताव परत घेत आहे.

**महापालिका सचिव:-** ठिक आहे, विषय परत घेतल्यामुळे संपुष्टात आला आहे. प्रशासनाकडून एक आयत्या वेळेचा विषय आला आहे.

**विषय:-** वारसा पध्दतीने सेवानिवृत्त / द्विवंगत सफाई कामगार यांच्या रिक्त जागेवर त्यांच्या वारसास नियुक्ती देणे. जर तुमची संमती असेल तर विषय सुचीवर सामावून घेण्यात येईल.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** समावेश करण्यात यावा.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-** समावेश करा.

**महापालिका सचिव:-** ठिक आहे, विषय समावेश करण्यात येत आहे.

विषय:—आयत्यावेळचे विषय सभेच्या कामकाजात सामावून घेणेबाबत.

सूचकाचे नांव :—श्री. कलवंतसिंह सोहता

अनुमोदकाचे नांव :— श्री. स्वप्नील बागुल

महासभा ठराव क्र.४२ क दिनांक:— २०/०१/२०२२

ही महासभा प्रशासनाच्यावतीने प्राप्त झालेल्या आयत्यावेळच्या खालील एक विषयास या सभेच्या कामकाजात सामावून घेण्यास मान्यता देत आहे.

**विषय क्र. १**वारसा पध्दतीने सेवानिवृत्त / द्विवंगत सफाई कामगार यांच्या रिक्त जागेवर त्यांच्या वारसास नियुक्ती देणे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर/पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिवः— विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

---

⇨ विषय क्र. २ः—**उल्हासनगर-२ प्रभाग क्र.६ मधील खेमाणी चौक ते आंबेडकर चौक पेव्हमेंट रोड व नाली बनविणे या कामाचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणे.**

---

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-** पास, पास.

**महापालिका सचिव:-** सिंग मॅडम आपण बोला.

**सदस्या, श्रीम. लक्ष्मी सिंग:-** मा. महापौर मॅडम, मा. आयुक्त साहेब....

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-**तुमचा आवाज येत नाही.

**सदस्य, श्री. राजेश वधारिया:-** मॅडम शहर अभियंता यांना बोलवा.

**महापालिका सचिव:-** सिंग मॅडम आपला आवाज येत नाही.या प्रस्तावाबाबत सिंग मॅडम बोलणार होत्या, त्यांनी परत बोलावे.

**सदस्य, श्री. राजेश वानखेडे**:- मॅडम आवाज येत नाही.

**महापालिका सचिव:-** माझा आवाज येत आहे का वानखेडे साहेब तुमचा आवाज येतो.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंहभुल्लर :**- मॅडम आवाज येत नाही.

**महापालिका सचिव:-**सर्वांचा आवाज येतो विजु पाटील सरांचापण आवाज येतो.

**सदस्य, श्री. विजय पाटील:-** मॅडम, यांना जाणूनबजुन सर्वाना सभेत काही तरी करावयाचे असते म्हणूनच मध्ये मध्ये बोलतात.

**महापालिका सचिव:-** लक्ष्मी सिंग मॅडम तुमचा आवाज येत आहे जोरात बोला. मॅडम आपण माईक व्यवस्थीत ठेवा तुमचा आवाज येत नाही.

**सदस्य, श्री. राजेश वानखेडे:-** मॅडमचा आवाज येत नाही.

**महापालिका सचिव:-** बोलत आहेत जरा थांबा त्यांच्या काही तांत्रिक अडचणीअसतील. कृपया आपण शांतता ठेवा लक्ष्मी सिंग मॅडम बोलत आहेत.

**<u>सदस्या, श्रीम.लक्ष्मी सिंग:-</u>** मा. महापौरजी, आंबेडकर चौक ते लाला चायवाला पर्यंत इंडस्ट्रीज एरिया आहे, तिथपर्यंत वाढवण्यात यावा.

**<u>महापालिका सचिव:-</u>** मॅडमचे म्हणणे आहे की, जो रस्ता दिला आहे तो आंबेडकरचौक वाढवून लालाचौक पर्यंत करावा, तुम्हाला मंजुर असेल तर सांगा तसा ठरावा करायला.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-</u>** पास..... पास....

**<u>सदस्य, श्री. भारत राजवानी:-</u>** जसे लक्ष्मी सिंगने सांगितले तसा प्राकलन तयार करावयाला पाहिजे.

**<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-</u>** पास.... पास....

**<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंहभुल्लर:-</u>** करायला पाहीजे. महापौर व आयुक्त् साहेबांनी पास केला पाहीजे.जसे लक्ष्मी सिंगने सांगितले तसे केले पाहिजे.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी</u>**:- समर्थन करत आहे.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंहभुल्लर:-</u>** समर्थन करत आहे.

**<u>उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-</u>** मा. सदस्य,२ कोटी, ८० लाख रुपयाचे खेमानी पासून डॉ. बाबासाहेब चौकापर्यंत मंजुरी दिली आहे. स्थायी समितीने त्याला मान्यता दिलेली आहे. आता महासभेची मान्यता अपेक्षित असल्याने मा. आयुक्त् साहेबांनी शासनाकडे प्रस्ताव पाठविलेला आहे. प्रस्तावामध्ये दुरुस्ती करावयाची असेल तर, त्याचे इस्टीमेट बनविले पाहिजे. त्याची मान्यता घेतलेली पाहिजे. त्याचा नंतर हा रस्ता पुढे करता येईल. परंतु रस्त्याची परिस्थिती अशी आहे. खेमानी ते डॉ. बाबासहोब आंबेडकर चौक् पर्यंत हा रस्ता हा डी.पी प्रमाणे केला पाहिजे अशी मान्यता निदर्शनास आणली पाहिजे आणि दुसरी लक्ष्मी सिंग यांनी सुचविला आहे. तो १२० फुटाचा रिंग रोड आहे. रिंगरोड संदर्भात आपण ठराव शासनाकडे पाठविलेला आहे. ८० फुटाच्या संदर्भामध्ये करण्याबाबत त्याचा निर्णय अद्याप आलेला नाही. त्याचा निर्णय प्राप्त झाल्यानंतर हा रस्ता घेण्यात यावा. अशी माझी सभागृहालाआणि सर्वांना विनंती आहे. आता जो रस्ता खेमानी पासून बाबासाहेब आंबेडकर चौकापर्यंत करावयाचा आहे. तो डी.पी प्रमाणे करावा डी.पी रोड अस्तित्वात असलेल्या डी.पी रोड प्रमाणे असे मला वाटते प्रशासनाने गांर्भीय लक्षात घ्यावे. आणि श्रीम. लक्ष्मी सुरेंद्र सिंगने जो रस्ता सांगितला आहे तो रस्ता भविष्यकाळात लवकरात लवकर करण्यासंदर्भात विचार व्हावा, हि विनंती.

**<u>सदस्य, श्री. किशोर वनवारी:-</u>** पास..... पास.....

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-</u>** डी.पी. प्रमाणे पास. पास...... डी.पी. प्रमाणे करायला हरकत नसावी. जी सुचना लक्ष्मी सिंग मॅडम दिलेली आहे याची पुर्तता करण्यात यावी.

**<u>सदस्य,श्री. महेश सुखरामनी:-</u>** जसे उप महापौर, भगवान भालेराव यांनी सांगितले आमचे पण हेच म्हणणे आहे की, डी.पी प्रमाणे हा रस्ता बनला पाहिजे. भविष्यामध्ये ...

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-</u>**जसे की, लक्ष्मी सिंग मॅडम ने सांगितले आहे, ते डी.पी. प्रमाणे करण्यात यावे व प्रशासनाच्या त्या हिशोबाने ईस्टीमेट बनवुन पुन्हा सादर करायला पाहिजे.

**<u>सदस्य, श्री. मनोज सयानी:-</u>** पास..पास..

**<u>महापालिका सचिव:-</u>** मी ठराव वाचते आहे. कृपया ठरावऐका ठराव एकदा वाचत आहे.हि महासभा वरील प्रस्तावात नमूद केल्या प्रमाणे...

**<u>सदस्या, श्रीम.लक्ष्मी सिंग:-</u>**पत्र दिले आहे.

**महापालिका सचिव:-** आपण पत्र दिले आहे. परंतु टेक्नीकल सांगत आहे, मी ठराव वाचत आहे. सदस्य जसे बोलणार तसा ठराव होईल सर्व संमतीने. हि महासभा वरील प्रस्तवानुसार उल्हासनगर – २ प्रभाग क्र.६ मधील खेमानी चौक ते आंबेडकर चौक पेव्हमेंट रोड व नाली बनविण्यासाठी या कामाची अंदाजीत रक्कम २,८०५४६०० करोड रुपये इतक्या रक्कमेचे सन २०२१-२०२२ च्या अर्थ संकल्पात तरतुद करणेस मान्यता देत आहे.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-** पास...... पास.....

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-**नाही, नाही असे नाही.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** तसेच सदरचा रस्ता डी.पी.नुसार करण्यात यावा.

**महापालिका सचिव:-** मी पुढे वाचते. तसेच मा. सदस्या श्रीम.लक्ष्मी सुरेंद्र सिंग सुचविलेल्या रस्त्याचे प्राकलन लवकरात लवकर प्रमाणे सदर रस्ता लवकर बनविण्यास मान्यता देत आहे.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-** आदरणीय उप महापौरजी गोल मैदान येथील रस्तापण २.५० आहे.

**सदस्य, श्री.मनोज सयानी:-** श्रीम. लक्ष्मी सिंग यांनी सांगितल्याप्रमाणे प्रशासनास निर्देश दयावे. सचिव मॅडम सदर रोड डी पी प्रमाणे झाला पाहिजे.

**महापालिका सचिव:-** तसा ठराव मी वाचला आहे, मा. सदस्यांनी सुचविल्याप्रमाणे तसे प्राकलन लवकरात लवकर बनविणेस प्रशासनास निर्देश देत आहे. पास.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:-** पास..पास..

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** पास..पास..

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** सदरचा रस्ता उप महापौर साहेबांनी सांगितल्याप्रमाणे सुचविले पाहिजे.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:-**आपण सर्वानी एकावेळेस बोलल्यास मला कसे समजणार. आपण एक-एक करुन बोला.

**महापालिका सचिव:-** हा विषय सर्व संमतीने पास झाला आहे आणि काम करण्यासाठी प्राकलन आणण्यासाठी प्रशासनास निर्देश दिले आहे.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-**मंजुर..... पास..... पास.....

**सदस्य, श्री. राजेश वानखेडे:-** मंजुर, मंजुर.

काही सदस्य :—पास—पास......

महापौर तथा पीठासीन अधिकारी:—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**☑ विषय क्र.२ :- उल्हासनगर-२ प्रभाग क्र.६ मधीलखेमाणीचौकतेआंबेडकरचौक पेव्हमेंटरोडवनालीबनविणेया कामाचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यतामिळणे.**

**प्रस्तावना**

उपरोक्त विषयांकीतउल्हासनगर-२ प्रभागक्र.६ मधीलखेमाणीचौकपेव्हमेंटरोडवनालीखराब झाल्याने सदर ठिकाणचा रस्ता व नाली बनविणे अत्यंत आवश्यक आहे.

सदर रस्ता हा मुख्य रस्ता आहे. उक्त रस्त्यावर एस.ई.एस.शाळा,उमपा शाळा क्र.१८ व २४, झुलेलाल शाळा, बाल्कनजीबारी शाळा परिसरात असल्याने शाळेलाजाण्याकरितायापरिसरातीलमुख्यरस्ताआहे. तसेचसदर रस्त्याच्या दोन्ही बाजूस मे. कोणार्क कंपनीच्या पाण्याच्या पाईप लाईन गेल्याने रस्ता कमकुवत झालेला आहे. सदर ठिकाणी मोठया प्रमाणावर लोकवस्ती वसलेली असून या रस्त्यावर वाहनांची वर्दळ मोठ्या प्रमाणात सुरु असते. परंतू सदर रस्ता खराब झाल्यामुळे दरवर्षी महापालिकेचा खड्डे भरणेकरीता डांबरीकरणावर करावा लागणा-या खर्चाची बचत होईल. त्यामुळे उक्त ठिकाणचा रस्ता बनविणे आवश्यक आहे.
उल्हासनगर-२ प्रभागक्र.६मधीलखेमाणीचौकपेव्हमेंटरोडवनालीबनविणेयाकामाचे रुपये २,८०,५४,६००/- एवढ्या खर्चाचे प्राकलन तयार करण्यात आले आहे. सदर प्राकलन प्रशासकीय व वित्तीय मान्यतेकरीता सादर केले असता मा.आयुक्त यांनी सदर कामाचा प्रस्ताव वर्ष २०२१-२२ मध्ये अर्थसंकल्पीय तरतूदीकरीता स्थायी समिती व त्यानंतर मा.महासभेच्या मान्यतेकरीता सादर करणेबाबत शेरा लिहिला आहे.

उल्हासनगर-२ प्रभागक्र.६ मधीलखेमाणीचौकपेव्हमेंटरोडवनालीबनविणेप्राकलनिय खर्च रुपये २,८०,५४,६००/- (अक्षरी रु.दोन कोटी ऐंशी लाख चौप्पन हजार सहाशे) या कामास स्थायी समिती ठराव क्र.९१ दिनांक ०३/१२/२०२१ अन्वये मान्यता प्राप्त झालेली आहे.

सबब उपरोक्त कामांचे अंदाजित खर्च रु.२,८०,५४,६००/- इतक्या रक्कमेची सन २०२१-२२ च्या अर्थसंकल्पात तरतूद करणेसाठी मा.महासभेची मान्यता मिळण्यासाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

**महासभा ठराव क्र.४३** **दिनांक २०/०१/२०२२**

**सुचकाचे नाव :- श्री. कलवंतसिंह सोहता**

**अनुमोदकाचे नाव :- श्री. राजेंद्र चौधरी**

**ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर-२ प्रभाग क्र.६ मधील खेमाणी चौक ते आंबेडकर चौक पेव्हमेंट रोड व नाली बनविणे या कामांचे अंदाजित खर्च रु.२,८०,५४,६००/- इतक्या रक्कमेची सन २०२१-२२ च्या अर्थसंकल्पात तरतूद करणेस प्रशासनास निर्देश देत आहे. सदरचा रस्ता डी.पी. नुसार तयार करण्यात यावा.**

**तसेच**

**मा. सदस्या, श्रीम. लक्ष्मी सुरेंद्र सिंग यांनी सुचविलेल्या प्रमाणे रस्त्याचे प्राकलन लवकरात लवकर तयार करुन सादर करणेस प्रशासनास निर्देश देत आहे.**

**या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.**

**सुचकाची सही /-**

**अनुमोदकाची सही /-**

**सर्वानुमते**

**महापौर/पीठासीन अधिकारी**
**सर्वसाधारण महासभा**
**उल्हासनगर महानगरपालिका**

---

महापालिका सचिव:— विषय क्र. ३ वाचुन दाखवितात.

———————————————————————————————————

⇨ विषय क्र. ३:—**उल्हासनगरमहापालिकाहद्दीत १५ व्याकेंद्रीयवित्तआयोगाअतंर्गत Million Plus Cities गटासाठीसन २०२०-२१ याआर्थिकवर्षातीलपाणीपुरवठा व व्यवस्थाबाबत सुधारणाअतंर्गतप्रस्तावितकामाबाबत.**

———————————————————————————————————

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** इतिवृत्ताची वाट न पहाता पास..पास..

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-** पास..पास..

**सदस्य, श्री. राजेश वधारिया:-** नाही, नाही हे चुकीचे आहे.

**सदस्य, श्री. राजेश वानखेडे:-** याची कोण माहिती देणार आहे.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-**पुढचा विषय घ्या.

**महापालिका सचिव:-** इतिवृत्ताची वाट न पहाता प्रस्ताव पास.

काही सदस्य :—पास—पास......

महापौर तथा पीठासीन अधिकारी :—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑**विषय क्र.३ :-** उल्हासनगर महापालिका हद्दीत १५ व्या केंद्रीय वित्त आयोगा अतंर्गत Million Plus Cities गटासाठी सन २०२०-२१ या आर्थिक वर्षातील पाणी पुरवठा व व्यवस्था बाबत सुधारणा अतंर्गत प्रस्तावित कामा बाबत.

**प्रस्तावना**

उपरोक्त विषयांकित प्रकरणी सादर करण्यात येते की, शासन निर्णय क्र.एफ.एफ.सी. २०२०/प्र.क्र.८६/ नवि-२, दिनांक ०९/११/२०२० अनुषंगाने व मा.महापौर उमपा यांनी या बाबत आयोजित बैठकित मा.आयुक्त सो यांनी दिलेल्या निर्देशानुसार उल्हासनगर शहरातील कॅम्प १ ते ५ मधील पाणी पुरवठा व व्यवस्थापनात सुधारणा अतंर्गत सोबत जोडलेल्या यादीतील नमुद कामे प्रस्तावित करण्यात आली आहेत. या अतंर्गत जे.एन.एन.यु.आर.एम योजनेतील झोन कार्यान्वित करणेसाठी विविध व्यासाच्या डी.आय जलवाहिन्या टाकणे, साठवण टाक्यांच्या ठिकाणी संरक्षक भिंत बाधणे, उंचसाठवण टाकी बायपास व्यवस्था करणे, जुन्या साठवण टाक्याना रंगरंगोटी करणे, अस्तिवातील कुपनलिका दुरुस्त करणे इत्यादी कामे प्रस्तावीत करण्यात आली आहेत. त्या अनुषंगाने या प्रस्तावित कामांची यादी तयार करणेत आली असुन, मा.महासभेपुढे शिफारसाठी सादर करणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | रक्कम |
|---|---|---|
| **कॅम्प नं.१** | **अ) नविन कामे** | |
| १ | जे.एन.एन.यु.आर.एम. योजनेतील उर्वरीत काम करणेसाठी २५० मी.मी. व्यासाची एम. एस. जलवाहिनी टिळकनगर, उल्हासनगर-०१ ई.एस.आर. जवळ टाकणे. | रु.१२,१२,९७२/- |
| २ | उल्हासनगर-०१ येथील कटकेश्र्वर मंदिर शहाड पुला जवळ तसेच व्हिनस बार, बॅरेक .नं. ९०, पॅनेल.नं.३ येथे २०० व ३०० मी. मी. व्यासाची एम.एस. जलवाहिनी टाकणे. | रु.१०,००,३४३/- |
| | **एकुण किंमत** | **रु.२२,१३,३१५/-** |
| | **ब) दुरुस्तीची कामे** | |
| १ | उल्हासनगर-०१ मधील गोल मैदान ई.एस.आर. येथे संरक्षक भिंत बांधणे. | रु.९,१२,८१५/- |
| २ | उल्हासनगर-०१ मधील टिळक नगर ई.एस.आर. भोवती संरक्षक भित बांधणे व टाकीसाठी गळती प्रतीबंधक उपाय योजना करणे. | रु.२१,७०,३४८/- |
| | **एकुण किंमत** | **रु.३०,८३,१६३/-** |
| **कॅम्प नं.२** | **अ) नविन कामे** | |
| १ | उल्हासनगर-०२ मधील पॅनेल नं. ७ येथील आझाद सोप फॅक्टरी ते बुध्द नगर पंप हाऊस येथे ३०० मी.मी. व २०० मी.मी. व्यासाची डी.आय. व १०० मी.मी. व्यासाची जी.आय. पाईप लाईन टाकणे व मुख्य जलवाहिनी वरील गळत्या काढणे. | रु.२२,९२,३३१/- |

| | | |
|---|---|---|
| | **एकुण किंमत** | **रु.२२,९२,३३१/-** |
| | **ब) दुरुस्तीची कामे** | |
| १ | उल्हासनगर-२ मधील नवीन रमाबाई पंपीगस्टेशन करिता संरक्षक भिंत, रंगरंगोटी करणे | रु.५,१९,०००/- |
| २ | उल्हासनगर-०२ मधील बालकंजी बारी टाकीची सेरक्षक भिंत दुरुस्ती करणे व नविन एम.एस. गेट बसविणे. | रु.११,०६,५१२/- |
| ३ | उल्हासनगर-०२ मधील रमाबाई एम.बी.आर.साठी कॉक्रीटीकरण करणे व रेलिंग बसविणे. | रु.५,३८,५१०/- |
| ४ | उल्हासनगर-२ मधील बजरंग आईस फॅक्टरी जवळ मेन पाईप लाईनवर कॉंक्रीटीकरण करणे व रमाबाई टाकी येथे रॅलींग बसविणे. | रु.६,५७,५०६/- |
| | **एकुण किंमत** | **रु.२८,२१,५२८/-** |
| **कॅम्प नं.३** | **अ) नविन कामे** | |
| १ | उल्हासनगर-०३ मधील नविन व चोपडा ई.एस.आर ते टेकडी परिसरातील जी.एस.आर. भरणेसाठी १५० मी.मी व्यासाची एम.एस. गुरुत्व वाहिनी टाकणे. | रु.२६,४६,०३५/- |
| २ | उल्हासनगर-३ मधील शिवाजी पाडा, शांतीनगर येथील पाणी समस्या सोडविणेसाठी १०० मी. मी. व्यासाची जी. आय. जलवाहिनी टाकणे. | रु.६,०५,०४९/- |
| | **एकुण किंमत** | **रु.३२,५१,०८४/-** |
| | **ब) दुरुस्तीची कामे** | |
| १ | उल्हासनगर-०३ मधील आनंद नगर व बोट क्लब ई.एस.आर. येथे बायपास व्यवस्था करणे व पंजाबी कॉलनी येथील ४५० मी.मी व्यासाचा स्लुस व्हॉल्व बदलणे . | रु.७,४०,२०६/- |
| २ | उल्हासनगर-०३ मधील दसरा मैदान व चोपडा (जुनी) ई.एस.आर. ला रंगरंगोटी करणे. व संरक्षक भिंतीची उंची वाढवणे. | रु.१५,१७,१६५/- |
| ३ | उल्हासनगर-३ मधील श्रीमती मिनाताई ठाकरे नगर व परिसरात जीर्ण जलवाहिनी बदलुन नवीन ५०/८० मी. मी. व्यासाची नवीन जलवाहिनी टाकणे. | रु.५,३५,१४७/- |
| | **एकुण किंमत** | **रु.२७,९२,५१८/-** |
| | **ब) दुरुस्तीची कामे** | |
| १ | उल्हासनगर कॅम्प. १,२,३ मधील बोअर वेल दुरुस्ती करणे. | रु.१२,६९,०००/- |
| | **एकुण किंमत** | **रु.१२,६९,०००/-** |
| **कॅम्प नं.४** | **अ) नविन कामे** | |
| १ | उल्हासनगर-४ मधील पॅ.क्र.१३ लाल चक्की ई.एस.आर. मधील झोन क्रं.S/3B कार्यान्वीत करणेसाठी पाणी पुरवठा ऑफिस ते शिव मंदिर लाल चक्की रोड व अलब्रर्ट पाकिंग स्टेशन रोड, येथे १०० मी.मी. व्यासाची डी.आय जलवाहिनी टाकणे. | रु.५,६०,०००/- |
| २ | उल्हासनगर-४ मधील रोमा ई.एस.आर. मधील झोन क्रं. S/2A कार्यान्वीत करणेसाठी भिम नगर ते स्टेशन रोड पर्यंत १०० मी.मी. व्यासाची डी.आय. जलवाहिनी तसेच बॅरेक नं. १२९८, १३०१ व ओ.टी चौक ते पंचायत हॉल येथे १५० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकणे. | रु.१४,९०,०००./- |
| ३ | उल्हासनगर-४ मधील तक्षशिला पंपगृह व उंच साठवण टाक्याचे ठिकाणी सुरक्षा भिंत बांधणे. (उंची वाढविणे व गेट बसविणे) | रु.१४,३६,२९०/- |
| ४ | उल्हासनगर-४ मधील पॅ.क्रं.१५ अंतर्गत सेक्शन नं. २६, २७ येथे जे.एन.एन.यु.आर.एम. योजनेतील गॅप काढणेसाठी १०० मी. मी. व्यासाची डी.आय. वितरण वाहिनी टाकणे. | रु.१५,१४,७५९/- |
| ४ | उल्हासनगर-४, पॅ.क्रं.१५ सेक्शन-३० येथे डाव्या साईडला नारायण गल्ली व परीसरातील जे.एन.एन.यु.आर.एम योजने अतंर्गत वितरण व्यवस्था नसल्याने झोन कार्यान्वित करण्यासाठी १०० मी.मी. व्यासाची डी.आय. जलवाहिन्या टाकणे. | रु.१७,६०,५१३/- |
| ५ | उल्हासनगर ४ पॅ.क्र.१५ से.२७ येथे बॅ.नं. १५६९, १५७०, १५७२ येथील व सेक्शन-३० येथे डाव्या साईडला परिसरात वितरण व्यवस्था नसल्याने झोन कार्यान्वीत करण्यासाठी १०० मी.मी. व्यासाची डी.आय. जलवाहिनी टाकणे. | रु.२३,५२,४१८/- |
| ६ | उल्हासनगर ४ मधील पॅ.क्र. १८ अतंर्गत नागसेननगर, समतानगर, सोग्यांची वाडी, भरत नगर, सिध्दार्थनगर, गणेशनगर येथे १०० मी.मी. व्यासाची डी.आय. | रु.१३,८५,४०३/- |

| | | |
|---|---|---|
| | जलवाहिणी टाकणे. | |
| ७ | उल्हासनगर ४ मधील जिजामाता टाकीचा झोन नं.S/३A पुर्णत: कार्यान्वीत करणेसाठी उर्वरित जलवाहिन्या टाकणे. | रु.६,२२,१६२/- |
| ८ | उल्हासनगर-४ मधील नेताजी टाकीसाठी झोन नं. S /५B १०० मी. मी. व्यासाची डी.आय.के-७ पाईप टाकणे. | रु.७,०४,९९४/- |
| | **एकुण किंमत** | **रु.१,१८,२६,५३९/-** |
| **कॅम्प नं.५** | **अ) नविन कामे** | |
| १ | उल्हासनगर-५ मधील विविध झोन मधील भागात १००/१५० डी. आय पाईप लाईन टाकणे. | रु.१९,९४,३५५/- |
| | **एकुण किंमत** | **रु.१९,९४,३५५/-** |
| | **ब) दुरुस्तीची कामे** | |
| १ | उल्हासनगर ४ व ५ मधील अस्तीत्वातील कुपनलिका दुरुस्त करुन कार्यान्वित करणेसाठी लागणारे साहित्य पुरवठा करणे. | रु.१९,६९,८३२/- |
| | **विद्युत यांत्रिकी विभाग** | |
| १ | उल्हासनगर कॅम्प १ ते ५ मधील विंधन विहीरीचे विद्युत जोडणीकरीता प्राप्त विद्युत देयके भरणा करणे. | रु.३,९७,८७०/- |
| | **एकुण किंमत** | **रु.३,९७,८७०/-** |
| | **एकुण** | **रु.३,३९,११,५३८/-** |

**नविन कामांची एकुण किंमत** रु. २,१५,७७,६२४/-

**दुरुस्तीच्या कामांची एकुण किंमत रु. १,१९,३६,०४१/-**

**विंधन विहीरीचे विद्युत देयकांसाठी एकुण किंमत** रु. ३,९७,८७०/-

**महासभा ठराव क्र. ४४ दिनांक २०/०१/२०२२**

**सुचकाचे नाव :- श्री. राजेश वानखेडे**

**अनुमोदकाचे नाव :- श्री. प्रमोद टाले**

**ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणेउल्हासनगर महापालिका हद्दीत १५ व्या केंद्रीय वित्त आयोगा अतंर्गत Million Plus Cities गटासाठी सन २०२०-२१ या आर्थिक वर्षातील पाणी पुरवठा व व्यवस्था बाबत सुधारणा अतंर्गत उल्हासनगर शहरातील कॅम्प १ ते ५ मधील प्रस्तावित कामास मान्यता देत आहे.**

**<u>तसेच</u>**

**महासभेमध्ये इतर सदस्यांनी सुचविलेले प्रमाणे १५ व्या केंद्रीय वित्त आयोगा अतंर्गत Million Plus Cities गटासाठीप्रस्ताव आणण्याचे प्रशासनास निर्देश देत आहे.**

**या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.**

**सुचकाची सही/-**

**अनुमोदकाची सही /-**

**सर्वानुमते**

**महापौर/पीठासीन अधिकारी**
**सर्वसाधारण महासभा**
**उल्हासनगर महानगरपालिका**

<u>महापालिका सचिव:—</u> विषय क्र. ४ वाचुन दाखवितात.

---

⇨ विषय क्र. ४:—**उल्हासनगरमहापालिकाअधिकारी/कर्मचा-यांनावर्ष २०२०—२०२१ साठीसानुग्रह अनुदानदेणेसमंजुरी देणे.**

---

**<u>उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-</u>** पास..पास..

**<u>सदसय्, श्री. किशोर वनवारी:-</u>** पास करायचा आहे.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>** मा. महापौर जी,...

**<u>महापालिका सचिव:-</u>** मा. महापौरांनी पुढचा विषय घ्यायला सांगितला आहे.

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र.४ :-** उल्हासनगर महापालिका अधिकारी/कर्मचा-यांना वर्ष २०२० — २०२१ साठी सानुग्रह अनुदान देणेस मंजुर देणे.

**प्रस्तावना**

सालाबादाप्रमाणे उल्हासनगर महापालिकामध्ये कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांना वर्ष २०२० — २१ या वर्षा करिता सानुग्रह अनुदान देणेबाबत दिनांक २०/१०/२०२१ रोजी मा. महापौर, यांच्या अध्यक्षते खाली महापालिकेचे पदाधिकारी व कामगार संघटनेचे पदाधिकारी यांच्याबरोबर झालेल्या चर्चेनुसार वर्ष २०२०- २१ करिता सानुग्रह अनुदान रु. १५,०००/- देण्याचे सर्व संमतीने मान्य करण्यात आलेले आहे. सदर सानुग्रह अनुदान दिवाळी पुर्वी अधिकारी व कर्मचारी यांना देणेत येते.

उपरोक्त नमुद केलेप्रमाणे सादर करणेत येते की, वित्तीय वर्ष २०२० — २०२१ साठी सर्व महापालिका कर्मचा-यांना खालील अटी व शर्तीस अधिन राहुन सानुग्रह अनुदान अदा करणेस प्रस्तावित करण्यात येत आहे.

१. सन २०१९ — २० मध्ये रु. १२,५००/- इतके सानुग्रह अनुदान उल्हासनगर महानगरपालिकेत कार्यरत सर्व अधिकारी व कर्मचारी (यात मानधन व कंत्राटी तत्वावर कार्यरत कर्मचारी यांचा समावेश आहे) मंजूर करण्यात आले होते. मा. महापौर, उल्हासनगर महानरपालिका यांचे दालनात कामगार संघटना प्रतिनिधी व गटनेते पदाधिकारी यांच्या समवेत झालेल्या चर्चेनुसाररू. १५,०००/- वाटप करावयाचे असल्यास, कर्मचाऱ्यांची संख्या अंदाजे २५०० आहे. त्यानुसार अंदाजित रक्कम रू. ३.५० कोटी इतकी रक्कम लागणार आहे.
२. दिनांक ०१/०४/२०२० ते ३१/०३/२०२१ या कालावधीत संपूर्ण वर्ष निलंबीत असलेले कर्मचारी सानुग्रह अनुदान मिळण्यास अपात्र असतील.
३. सदर सानुग्रह अनुदान ही प्रत्यक्ष हजर असलेल्या दिवसाच्या प्रमाणात खालील सुत्रानुसार देण्यास मान्यता देण्यात आली होती. रूपये १५,०००/- ................................ हजर दिवस
   ३६५ दिवस
४. कर्मचा-यांच्या सेवा कालवधीचा विचार करता, सर्व प्रकारच्या मंजूर रजा गृहीत धरण्यात याव्यात परंतु विना वेतन रजेचा विचार करण्यात येवू नये.
५. सानुग्रह अनुदानासंदर्भात शासनाने वसूलीबाबत निकाल दिल्यास सदर रक्कम एक रकमी वसूल करण्यात येईल.
६. जे अधिकारी/कर्मचारी ३१ मार्च २०२० नंतर सेवेत होते असे गट अ, ब, क, व ड मधील सर्व महापालिकासेवेत नियमित कार्यरत असणाऱ्या अधिकारी /कर्मचारी तसेच शिक्षण मंडळतील अधिकारी/शिक्षक कर्मचारी यांना उपरोक्त सर्व २०२० — २०२१ साठी दिवाळी पुर्वी सानुग्रह अनुदान वाटप करणेसाठीमान्यता देण्यात आली होती त्यानुसार सानुगृह अनुदानाचे वाटप करण्यात ओले आहे. तरी या धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी प्रस्ताव मा. महासभेच्या कार्योत्तर मान्यतेसाठी विनंती करण्यात येत आहे.

**महासभा ठराव क्र. ४५** **दिनांक २०/०१/२०२२**

**सुचकाचे नाव :- श्री. राजेश वदारिया**

**अनुमोदकाचे नाव :- श्री. गजानन शेळके**

**ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे अटी व शर्तीस अधिन राहून उल्हासनगर महापालिका अधिकारी/कर्मचा-यांना** जे अधिकारी/कर्मचारी **३१** मार्च **२०२०** नंतर सेवेत होते असे गट अ, ब, क, व ड मधील सर्व महापालिका**सेवेत नियमित कार्यरत असणाऱ्या** अधिकारी /कर्मचारी तसेच शिक्षण मंडळतील अधिकारी/शिक्षक कर्मचारी **यांना वर्ष २०२० — २०२१ साठी सानुग्रह अनुदान देणेस मान्यता** देत आहे.

**या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.**

**सुचकाची सही/-**

**अनुमोदकाची सही /-**

**सर्वानुमते**

**महापौर/पीठासीन अधिकारी**

**सर्वसाधारण महासभा**

**उल्हासनगर महानगरपालिका**

---

महापालिका सचिव:— विषय क्र. ५ वाचुन दाखवितात.

---

⇨ विषय क्र. ५:—**महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान योजनेअंतर्गत उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील विविध विकास कामांचे प्रकल्पास निधी उपलब्ध होणे व प्रशासकीय मान्यता मिळणेकरीता प्रस्तावशासनास सादर करणेबाबत.**

---

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी**:- मा. महापौर जी…

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी**:- मा. महापौर जी,

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:-** विषयावर बोलून तर दया.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-**मध्ये चर्चा करु नका बोलायला द्या.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:-** बोला, बोला.

या वेळी काही सदस्य एकत्रित बोलत असल्यामुळे कोण काय बोलत होते ते स्पष्ट समजून आले नाही.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** तुम्ही ग्रुपमध्ये बसले आहेत, त्यामुळे आवाज येत नाही.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** मा. महापौरजी..

**महापालिका सचिव:-** पुरस्वानी सर आपण बोला.

**<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-</u>** अधिका-यांचे काम आहे, अधिकारी सांगतील.शहराचा विषय आहे अधिका-याला उत्तर दयायचे आहे.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:-</u>** पुढचा विषय घ्या.

**<u>सदस्य, श्री. राजेश वानखेडे:-</u>** अधिका-यांना बोलवा. माहिती घ्या.

**<u>महापालिका सचिव:-</u>** पुरस्वानी सर तुम्हांला मॅडमने बोलायला सांगितले आहे, नंतर नाथानी सर बोलतील. पुरस्वानी सर आपण बोला.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>** मा. महापौरजी, जेव्हा एखादा विषय आपण वाचतात, सचिव मॅडम आपण जेव्हा एखादा विषय वाचतात, तर महापौरांनी सांगितले पाहिजे कोणाला बोलायचे आहे, कोणाला नाही बोलायचे

**<u>महापौर तथा पठिासिन अधिकारी:-</u>**एक एक करुन बोला ना.

**<u>उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-</u>** बिटूजी बोला.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>** जेव्हा सचिव मॅडम विषय वाचतात, तेव्हा आपले सत्ताधारी पक्षाचे काही लोक विषय पास.... पास.... करतात माझी आपणास विनंती आहे की, विषयाची माहीती सभागृहात दिली पाहिजे. आणि या विषयाची माहिती दिल्यानंतर आम्ही सर्व विषय पास करु गरज नाही की सर्व विषय नापास करु. परंतु कोणी समजायला मागते कोण बोलायला मागते, त्या अगोदरच ओरडण्यास सुरुवात होत आहे. पास.... पास.... तर मी निवेदन करतो की..

**<u>उप महापौर,श्री. भगवान भालेराव:-</u>** जमनुजी आपले लोक सर्व ग्रुपमध्ये बसतात, चर्चा चालु असते, मोबाईल चालु असते, तरी आपण गटनेता आहेत, जरा आपल्या नगरसेवकांना समज दया. एकजण बोलल्यास दुसरा व्यक्ती गप्प् बसायला पाहिजे.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी</u>**:- मी एकटा बसलो आहे. बघा मी एकटा बसलो आहे.

**<u>उप महापौर,श्री. भगवान भालेराव</u>**:- आपणास जे बोलायचे आहे तर बोला, ५नंबरच्या विषया संदर्भात बोला.

**<u>सदस्य, श्री. राजेश वानखेडे:-</u>** ४४ नंबरचा विषय कुठे घेतलाआहे?३नंबरचा विषय अजून घेतला नाही. त्याच्यावर माहिती द्या.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>** — मा. महपौरजी सदरचा विषय

**<u>महापालिका सचिव:</u>** — विषय क्र. ५ पास झाला आहे. मॅडमनी पुढचा विषय घेण्यास सांगितला आहे.

**<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:-</u>** ६ नंबरचा विषय घ्या.

<u>काही सदस्य :—</u>पास—पास……

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**☑विषय क्र.५ :- महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान योजनेअंतर्गत**

**उल्हासनगरमहानगरपालिका क्षेत्रातील विविध विकास कामांचे प्रकल्पास निधी उपलब्ध होणे व प्रशासकीय मान्यता मिळणेकरीता**

**प्रस्ताव शासनास सादर करणेबाबत.**

**प्रस्तावना**

राज्यातील नागरी भागात मुलभूत पायाभूत सुविधा उपलब्ध करण्यासाठी व त्यांचा दर्जा वाढविण्याकरीता संदर्भ क्र.१ चे शासन निर्णय क्र.शासन निर्णय क्र.एनयुआर-२००८/प्र.क्र.२०३/नवि-३३ दिनांक २०/०२/२०१० च्या तरतूदीच्या अधीन राहुन महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान योजना राबविण्यात येत होती. तथापी संदर्भाधीन क्र.२ चे शासन निर्णयान्वये, सदरहू दिनांक २०/०२/२०१० चा शासन निर्णय अधिक्रमित करण्यात येऊन महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानाच्या वित्तीय आकृतीबंधात व व्याप्तीमध्ये सुधारणा करण्यात आली आहे.

सदर महाभियानाअंतर्गत नागरी दळणवळण साधनांचा विकास, घनकचरा व्यवस्थापन सामाजिक सोई सुविधांचा विकास, नागरी तिर्थक्षेत्रांचा विकास, गिरीस्थानाचा विकास, नागरी भागातील सार्वजनिक पुरातन वास्तुचे जतन, पाणी पुरवठा व मलनि:स्सारण, शालेय शिक्षणाशी निगडीत पायाभुत सुविधांचा विकास, नागरी आरोग्य पायाभुत सुविधांचा विकास, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी आवास योजना, नागरी क्षेत्रात पर्यावरण सुधारणा इत्यादी पायाभुत सुविधांचा विकास करण्याचा प्राथम्य क्रमांकानुसार समावेश करण्यात आलेला आहे.

उल्हासनगर शहर हे उल्हास नदी किनारी वसलेले शहर आहे. सन २०११ च्या जनगणनेनुसार उल्हासनगर शहराची लोकसंख्या ५,०६,०००/- एवढी असून क्षेत्रफळ १३ चौ.किमी आहे. उल्हासनगर शहर हे देशाची आर्थिक राजधानी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या व महाराष्ट्राची राजधारी असलेल्या मुंबई शहरापासून ६० किलोमिटर अंतरावर आहे. शहराच्या माध्यभागातून कल्याण अंबरनाथ रस्ता जातो व उत्तरेकडील सरहद्दीवरुन जवळून कल्याण मुरबाड रस्ता हा राष्ट्रीय महामार्ग जातो. उल्हासनगर शहर छोट्या मोठ्या विविध उद्योगांसाठी प्रसिध्द आहे. उद्योगांच्या नि मित्ताने बाहेरच्या शहरांमधून जड हलक्या वाहनांची ये-जा मोठ्या प्रमाणात चालु असते. गेल्या दहा वर्षामध्ये शहरातील वाहनांच्या संख्येमध्ये जवळपास चौपट वाढ झालेली आहे. परंतू अस्तित्वातील रस्त्यांची लांबी व रुंदी तेवढीच असल्याने या वाढलेल्या लोकसंख्येसाठी व वाहनांसाठी हे रस्ते अपुरे व अरुंद ठरतात. त्यातच रस्त्याच्या दुतर्फा व्यापारी गाळे असल्याने सध्याचे डांबरी रस्ते पावसाळयात लवकर खराब होतात. त्यामुळे वाहतूक कोंडीची समस्या वारंवार निर्माण होते.

शहरातील एकूण १२९.१४ किमी रस्त्यांपैकी फक्त ६७.०२ किमी रस्त्याचे काँक्रिटीकरण झाले आहे. उर्वरीत रस्त्यांचे काँक्रीटीकरण होणे बाकी आहे. बहुतांश रस्त्यांच्या दुतर्फा गटारांची, फुटपाथची व मध्यभागी दुभाजकांची सोय नाही. ती करणे आवश्यक आहे. या सर्व बाबींची पुर्तता झाल्यास रस्त्याचा पृष्ठीय दर्जा सुधारेल तसेच रस्त्यांची वाहन वाहण्याची क्षमता ही वाढेल. उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे एकात्मिक विकास रस्ते योजनेअंतर्गत ३३ रस्त्यांचे अंदाजे २० वर्षापूर्वी डांबरीकरण व रुंदीकरण करण्यात आले. तद्नंतर दरवर्षी रस्त्यांवरील खड्डे पावसाळयापूर्वी व पावसाळयानंतर भरण्यात येतात.

परंतू संपूर्ण रस्त्यांचा विकास होणे आवश्यक आहेशहरातील उद्योगांच्या विकासासाठी वाहतूकीची समस्या सोडविणे हा . .रस्त्यांचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे दृष्टीकोन समोर ठेऊन शहरातील खालील मुख्यतसेचउल्हासनगर शहरातील धोकादायक व अतिधोकादायक इमारतींचे प्रमाण जास्त असून शहरातील बहुतांश इमारती या १९९० ते २००० या कालावधीतील आहेत. या काळात उल्हासनगर शहरात मोठया प्रमाणात अनधिकृत बांधकामे झाल्याचे निदर्शनास आले आहेत. तसेच दरम्यानच्या काळात रेती बंद असल्याने उलवा रेती / ग्रीटचा वापर होत होता. त्यामुळे सदर बांधकामे निकृष्ठ दर्जाची झाली असल्याने इमारती कोसळण्याच्या घटना घडत असतात. इमारती कोसळल्यामुळे इमारतींमधील विस्थापित होणाऱ्या रहिवाशांसाठी उल्हासनगर शहरात पर्यायी व्यवस्था नाही. त्यामुळे या रहिवाशांची अत्यंत गैरसोय होते. त्यामुळे शहरात ट्रान्झीट कॅम्प असणे अत्यंत आवश्यक आहे. उल्हासनगर-१ वाल्मीकी नगर, फीश मार्केट जवळ ट्रांन्झीट कॅम्प उभारणेचे प्रशासनातर्फे निश्चित करण्यात आले आहे. सदर ट्रांन्झीट कॅम्प उभारणेकरीता अंदाजित खर्च खालील तक्त्यात नमुद आहे.

| अ.क्र. | रस्त्याचे नाव | लांबी (मिटर) | रुंदी (मिटर) | अंदाजित खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | उल्हासनगर-१ येथील नाका क्र.१० ते चार्ली वेफर मार्गे गुलशन नगर पर्यंतच्या रस्त्याचे सिमेंट काँक्रीटीकरण करणे. | २०० | २४ | ६,००,००,००० |
| २ | उल्हासनगर-१ येथील फिश मार्केट ते मुरबाड नाका पर्यंतच्या रस्त्याचे सिमेंट काँक्रीटीकरण करणे. | ११०० | ३६ | ३,८५,००,०००० |
| ३ | उल्हासनगर-२ येथील फॉलवर लाईन ते नेहरु चौक पर्यंतच्या रस्त्याचे सिमेंट काँक्रीटीकरण करणे. | १५०० | १८ | ३०,००,००,००० |
| ४ | उल्हासनगर-२ येथील फिश मार्केट ते आशाराम बापू आश्रम वाया राम मालिश पर्यंतच्या रस्त्याचे सिमेंट काँक्रीटीकरण करणे. | १२०० | १८ | २४,००,००,००० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | उल्हासनगर-३ येथील आर.ओ.बी. ते ओ.टी.चौक मार्गे पिंटो पार्क पर्यंतच्या रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे. | २५० | १८ | ८,१२,५०,००० |
| ६ | उल्हासनगर-४ येथील श्रीराम चौक ते हनुमान मंदीर पर्यंतच्या रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे. | ६० | ३६ | २,१०,००,००० |
| ७ | उल्हासनगर-४ येथील ओ.टी.चौक ते व्हीनस चौक पर्यंतच्या रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे. | १००० | १८ | २०,००,००,००० |
| ८ | उल्हासनगर-४ येथील हिरापुरी चौक ते एस.एस.टी.कॉलेज पर्यंतच्या रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे. | ३५० | ३६ | १२,२५,००,००० |
| ९ | उल्हासनगर-४ येथील सोनारा चौक ते कोयंडे पुतळयापर्यंत रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे. | ३५० | १८ | ७,००,००,००० |
| १० | उल्हासनगर-४ येथील देना बँक ते फीश मार्केट पर्यंतच्या रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे. | १००० | १८ | २०,००,००,००० |
| ११ | उल्हासनगर-४ येथील लालचक्की चौक ते कैलाश कॉलनी पर्यंतच्या रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे. | १५०० | २४ | ४५,००,००,००० |
| १२ | उल्हासनगर-१ वाल्मीकी नगर, फीश मार्केट जवळ ट्रांन्झीट कॅम्प उभारणे. | | | २५,००,००,००० |
| | | **८५१०** | **२६४** | **२३७,९७,५०,०००/-** |

वरील एकूण ११ रस्त्याचा विकास झाल्यास व शहरात ट्रान्झीट कॅम्प उभारल्यास उल्हासनगर शहराचा दर्जा सुधारेल व शहरातील वाहतूक समस्या सुटण्यास मोठ्या प्रमाणावर मदत होणार आहे. तरी वरील एकूण रु.२१२,९७,५०,०००/- रक्कमेच्या रस्त्यांच्या प्रस्तावास महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान योजनेअंतर्गत मंजूरी मिळून निधी उपलब्धतेकरीता व प्रशासकीय मान्यतेकरीता प्रस्ताव मा.प्रधान सचिव, नगरविकास विभाग व मा.आयुक्त, नगरपालिका प्रशासन संचालनालय, वरळी यांचेकडे पाठविणे आवश्यक आहे. तत्पुर्वी महानगरपालिकेच्या महासभेची मान्यता मिळणे आवश्यक आहे.

तरी सदर प्रस्ताव मा.महासभेच्या मान्यतेस्तव प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र. ४६** **दिनांक २०/०१/२०२२**

**सुचकाचे नाव :- श्री. कलवंतसिंह सोहता**

**अनुमोदकाचे नाव :- श्री. धनंजय बोडारे**

**ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणेरकान्यातील रक्कमेत व खालील परिच्छदेत झालेल्या फरक दुरुस्ती करुन महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान योजनेअंतर्गत उल्हासनगरमहानगरपालिका क्षेत्रातील विविध विकास कामांचे प्रकल्पासएकूण रु.२,१२,९७,५०,०००/-निधी उपलब्ध होणे व प्रशासकीय मान्यता मिळणेकरीता सदर प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यास प्रशासनास निर्देश देत आहे.**

**तसेच**

**अनु कमांक ९ मधील काम यापूर्वीच झाल्याने सदर रक्कमेच्या कामाबाबतसदस्य, श्री. अरुण आशान यांनी सार्वजनिक बांधकाम विभागास दिलेल्या तेवढयाच रक्कमेच्या कामाच्या यादीचा समावेश करणेस प्रशासनास निर्देश देत आहे.**

**या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.**

**सुचकाची सही/-**

**अनुमोदकाची सही /-**

**सर्वानुमते**

**महापौर/पीठासीन अधिकारी**
**सर्वसाधारण महासभा**
**उल्हासनगर महानगरपालिका**

महापालिका सचिवः— विषय क्र. ६ वाचुन दाखवितात.

---

⇨ विषय क्र. ६ :—**वाहतुक समस्यांचे निवारण करणेसाठी उल्हासनगर महानगरपालिकेचे रस्तांवर पे ॲन्ड पार्क पॉलिसी राबविण्यास मान्यता मिळणेबाबत.**

---

**सदस्य, श्री. विजय पाटील:-** श्री. प्रदिप रामचंदानी, आपली दादागिरी चालणार नाही.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** मुकाबला करण्यास तयार आहे.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:-** मा. महापौरजी, ५ नंबरच्या विषयावर मला बोलायचे आहे.

**सदस्य, श्री. अरुण आशान:-** ९ नंबरच्या विषया संदर्भात..

**महापालिका सचिव:-** विषय क्र.६ चालू आहे.६ वर बोलावे.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-** सभागृहात एक नगरसेवक दुस-या नगरसेवकांची इज्जतकाढतात. .........

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** विषय क्र. ३ वर बोला ताई...

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-** आता सध्या जो ५ नंबरचा विषय चालू आहे.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** मला विषय क्र. ३वर बोलायचे आहे.

**उप महापौर,श्री. भगवान भालेराव:-** विषय क्र. ३ झालेला आहे. विषय क्र. ६ सुरु आहे.

**सदस्य, श्री. राजेश वानखेडे:-** ६ नंबरचा विषय पास..

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-** पास..पास..

काही सदस्यः—पास—पास......

महापौर तथा पीठासीन अधिकारीः—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ६ :- वाहतुक समस्यांचे निवारण करणेसाठी उल्हासनगर महानगरपालिकेचे रस्तांवर पे ॲन्ड पार्क पॉलिसी राबविण्यास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्तावना**

उल्हासनगर शहराचे क्षेत्रफळ हे13 चौ.कि.मी.असुन हे व्यापारी शहर म्हणून ओळखले जाते.सदर शहराची भौगोलिक रचना पाहता या शहराच्या क्षेत्रफळात आजुबाजुला वाढ होण्यास वाव नाही शहरातील अरूंद रस्ते वाढती लोकसंख्या व वाढती वाहन संख्या या मुळे रस्त्यावरील वाहतुकीत मोठया प्रमाणात वाढ झालेली आहे. उल्हासनगर शहरात सर्व रस्त्यावर अनाधिकृतपणे वाहने पार्किग केली जातात व त्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे.

यास्तव शहरातील रस्त्यावरील वाहतुक कोंडी दुर करण्यासाठी व वाहतुकीस शिस्त लावण्यासाठी शहरात ठीक ठीकाणी रस्त्यांवर पार्क केल्या जाणाऱ्या वाहनधारकांकडून पार्किंग शुल्क आकारणी करणे आवश्यक वाटते.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 243अ आयुक्तास महानगरपालिकेच्या संमतीने त्यांना योग्य वाटतील अशा अटी व शर्तीयांच्या अधीन राहुन कोणत्याही व्यक्तीकडून तिने वाहन उभी करून ठेवण्यासाठी किंवा थांबविण्यासाठी अशा जागेच्या किंवा ठिकाणाच्या केलेल्या वापरा करिता प्रत्येक दिवसासाठी किंवा त्यांच्या भागासाठी त्याला योग्य वाटले अशी फी किंवा शुल्क आकारता येईल अशी तरतुद आहे. अधिनियमातील वरिल तरतुदीनुसार शहरातील रस्त्यांवर ठिकठिकणी उभ्या केल्या जाणाऱ्या वाहनांद्वरे पार्किंग शुल्क आकारणी करणेसाठी महापालिकेकडे पुरेसा कर्मचारी वर्ग उपलब्ध नसलयाने सदर पार्किंग शुल्क आकारणीचे काम खाजगी अभिकतामार्फत करणे ऊचीत राहिल.

रस्त्यांवर उभ्या केल्या जाणाऱ्या वाहनांसाठी खालील दराने पार्किंग शुल्क आकारणी करणे प्रस्तावित आहे.

| अ.क्र. | वाहनाचा प्रकार | वाहन पार्किंगचा काल | दर प्रतिदिन रू | मसिक पास फक्त 24 तासाकरं |
|---|---|---|---|---|
| 1 | टू व्हिलर | 0-5 तास | 10/- | 500/- |
| | | 5-10 तास | 15/- | |
| | | 10 तासाच्या पुढे | 20/- | |
| 2 | थ्री व्हिलर | 0-5 तास | 15/- | 625/- |
| | | 5-10 तास | 20/- | |
| | | 10 तासाच्या पुढे | 25/- | |
| 3 | फोर व्हिलर कार जीप, इत्यादी | 0-5 तास | 25/- | 2500/- |
| | | 5-10 तास | 50/- | |
| | | 10 तासाच्या पुढे | 100/- | |
| 4 | बस,ट्रक,टेम्पो जड वाहनासाठी | 0-5 तास | 100/- | 5000/- |
| | | 5-10 तास | 150/- | |
| | | 10 तासाच्या पुढे | 200/- | |

वाहन पार्किंग शुल्क वसुलीची कार्यपध्दती खालील प्रमाणे

1) महापालिका किंवा अभिकर्ता यांनी याकरिता आवश्यक पुरेसा कर्मचारी वर्ग नेमणे आवश्यक राहिल.
2) रस्त्यांवर पार्किंग केलेल्या वाहनांकडून नमुद केलेल्या दरानुसार अभिर्कता/महापालिकेला प्रतिदिन वसुल केलेल्या एकुण रक्कमेच्या 40 टक्के रक्कम प्रति दिन महापालिकेकडे भरणाकरणे आवश्यक राहिल.
3) ज्या वाहनाना मासिक पास देण्यात येणार आहे.त्या वाहनावर पार्किंग स्थळ् शुलक तसेच मासिक पासचा कालावधी नमुद करणारे स्टिकर लावणे बंधनकारक आहे.
4) रस्त्यावरील वाहनांकडून मासिक पार्किंग शुल्क वसुली केल्यास त्यावर आकरणी केलेले पार्किंग स्थळ शुल्क व पार्किंगचा कालावधी वाहनांवर नमुद असलेले स्टिकर लावणे बंधनकारक आहे.
5) अर्भिकता यांना शहरातील ठिकठिकाणी नियमित वाहने पार्किग असल्यास वाहतुकीस अडथळा निर्माण होणार नाही यांची दक्षता घेऊन पार्किग शुलक वसुल करणे आवश्यक राहील अशा जागांची पाहणी करावयाची आहे.
6) अर्भिकता यांने पार्किंग वसुलीसाठी नियुक्त केलेला कर्मचारी वर्ग हा सुदृढ व सुशिक्षीत असावेत तसेच सदर कर्मचारी चारित्र्यहीन व गुन्हेगारी प्रवृत्तीचा नसावा. त्याच प्रमाणे त्यांना विशिष्ठ गणवेश परिधान करणे आवश्यक राहिल.
7) अभिकर्ता यांने नियुक्त केलेल्या कर्मचारी वर्गास पगार व भत्ते देण्याची जबाबदारी अभिकर्त्याची राहिल.
8) अभिकर्ता यांना पार्किंग शुल्क वसुलीसाठी वसुली करावयाच्या रक्कमे करीता दयावयाची पावती पुस्तके व मासिक पास महापालिकेकडून पुरविण्यात येतील. महापालिकेने पुरविलेल्या पावती पुस्तका व्यतीरीक्त् दुसरे पावती पुस्तक वापरता येणार नाही .किवा शक्य असल्यास ई-टिकिटिं गप्रणालीचा वापर अभिकर्ता स्वखर्चाने करावा व सदर मशिन मनपाकडून प्रमाणित करून घ्यावी.
9) शहरातील रस्त्याव नियमित उभ्या केल्या जाणाऱ्या वाहनासाठी पार्किंग शुल्क वसुली करताना मासिक पास देण्याची तरतुद असेल.
10) अभिकर्त्याने सुरक्षा अनामत रक्कम म्हणून महापालिकेकडे प्राप्त् निविदेच्या 5% रक्कम् जमा करावी सदर रक्कमेवर महापालिकाकडून कोणत्याही प्रकारचे व्याज देय असणार नाही तसेच निविदा कालावधी पुर्ण झाल्यास सदर अनामत रक्कम बिन व्याजी अभिकर्त्यास महापालिकाकडून परत करण्यात येईल.
11) अभिकर्ता व वाहनधारक यांच्यामध्ये कोणत्याही प्रकारचा वाद निर्माण झाल्यास त्यास महापालिका जबाबदार रहाणार नाही. उल्हासनगर शहरातील जास्त रहदारीचे रस्ते खालील प्रमाणेआहे.

**प्रभाग समिती 1.**

| अ.क्र. | रस्त्याचे नाव | रस्त्याचाप्रकार | लांबी | रुंदी |
|---|---|---|---|---|
| 1 | Gulshan nagar to idea factory | BT | 1200 | 24 |
| 2 | shahad ROB Murbad naka | CC | 2000 | 36 |
| 3 | sai baba temple to a blcok chowk | BT | 800 | 36 |
| 4 | Shahad ROB to umc road | CC | 1800 | 18 |
| 5 | wallness store ( court) to goal maidan | BT | 250 | 18 |
| 6 | Road surrounding goal maidan komal park to sank nirankari bhawan waya sadhu vasowani stachu | CC | 550 | 18 |
| 7 | for K.C wine store to sant nirankari bhawan | CC | 250 | 24 |
| 8 | From madhuban chowk to shirlabh chowk ulhasngar 3 | CC | 450 | 24 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 9 | For pt kalalni college to Dr. natahani dispencrey via vaibhav wadi | BT | 280 | 18 |
| 10 | From shahad station( naka) to ses 1 school ulhasnagar | CC | 750 | 18 |
| 11 | From Nilkantha Mandir to via camp 1 bus stop | CC/BT | 700 | 24 |
| 12 | From side to Nirakanri bhawan to bharat chowk | CC | 500 | 24 |
| 13 | Goal maidan to nehru chowk | CC | 300 | 24 |
| 14 | From Niraj apartment to bank of baroda via heera marage hall | BT | 600 | 12 |
| 15 | From Murbad road to fish market at ulhasnagar 1 | BT | 1150 | 36 |

**प्रभाग समिती** 2.

| | प्रभाग समिती २ रस्त्यांची यादी | | | |
|---|---|---|---|---|
| **Sr. No.** | **Sr. No.** | **Name of Work** | Length (In Mtr.) | Width (In Mtr.) |
| 1 | From Narayan Weigh Bridge to Shantinagar | BT | 1250 | 36 |
| 2 | From Narayan Weigh Bridge to Sec.17 | BT/CC | 700 | 24 |
| 3 | Rd. From Boat Club To Havakmotu Chowk | BT | 650 | 18 |
| 4 | From Saibaba Mandir, Shantinagar To Saibaba Mandir Ordnance Factory Road | CC | 3000 | 30 |
| 5 | Shivaji Chowk to Nehru Chowk | CC | 550 | 18 |
| 6 | Shastri Chowk To UMC | CC | 385 | 24 |
| 7 | Nehru Chowk To Flyover Lane | BT | 1200 | 18 |
| 8 | Nehru Chowk to Siru Chowk | CC | 385 | 24 |
| 9 | Siru Chowk To ESI | CC | 500 | 12 |
| 10 | Siru Chowk to 1 No. Police Station | CC | 525 | 24 |
| 11 | Red Cross Society To Nani | CC | 280 | 18 |
| 12 | Mukane House To Rubani Satsang | BT/CC | 600 | 12 |
| 13 | Khemani to Amardham | BT | 245 | 12 |
| 14 | Khemani to Punjabi Colony | BT/CC | 550 | 18 |

**प्रभाग समिती** 3 रस्त्यांची यादी

| Sr. No. | Name of Road | Name of Work | Length (In Mtr.) | Width (In Mtr.) |
|---|---|---|---|---|
| 1 | Venus Chowk to Rob Via O.T. Sec | C.C. | 188 | 18 |
| 2 | Venus Chowk to S.S.T College | BJ | 350 | 30 |
| 3 | Venus Chowk to ROB | BJ | 1100 | 30 |
| 4 | S.S.T College to Waco Compound | BJ | 2100 | 36 |
| 5 | Mahavir Hospital to Kalyan Kunj Apt. | C.C. | 500 | 18 |
| 6 | Sec. 27 to Manera Gaon Road Via Sant Ramdas Hospital | BJ/CC | 550 | 12 |
| 7 | Sec. 30 to VTC Ground | C.C. | 350 | 12 |
| 8 | TDS Bank to Hindustan Pencil Factory | C.C. | 350 | 24 |
| 9 | Asha Silicate to Janta Confessionary via Santosh Ngr. | C.C. | 425 | 12 |
| 10 | Sonara Chowk to Kkoyande Statue | C.C. | 350 | 18 |
| 11 | From Jijamata Garden to Railway Station | C.C. | 600 | 18 |
| 12 | Dr. Lalwani Dispensary to Jungle Hotel | BJ/CC | 350 | 12 |
| 13 | Jungle Hotel to Shani Mandir | C.C. | 350 | 18 |
| 14 | Radhaswami Stasang to Gulraj Chowk | C.C. | 600 | 12 |
| 15 | O.T. Chowk to Godhu Kisnani Bunglow | C.C. | 600 | 18 |
| 16 | Gulraj Tower to O.T. Chowk via Nepture apt. | BJ | 350 | 18 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 17 | Shivaji Chowk to CHM Colltge | C.C. | 1000 | 24 |
| 18 | Sec. 17 to R.O.B. (Shriram Chowk) | C.C. | 650 | 24 |
| 19 | Boat Club to Hadakmata Chowk | BJ | 900 | 18 |
| 20 | Narayan Weigh Bridge to Shantinagar | BJ | 1400 | 36 |
| 21 | Cremation Ground to Kajal Petrol Pump | C.C. | 250 | 18 |
| 22 | Alok Talkies to Khatri Bhawan | BJ | 400 | 12 |

**प्रभाग समिती** 4.

प्रभाग समिती ४ रस्त्यांची यादी

| Sr. No. | Name of Work | Type | Length (In Mtr.) | Width (In Mtr.) |
|---|---|---|---|---|
| 1 | Netaji Chowk to Kailash Colony, Ulhasnagar-4 | CC | 2000 | 24 |
| 2 | Lal Chakki chowk Ulhasnagar-5 to Kailash colony | CC | 1450 | 24 |
| 3 | Venus chowk to Lal Chakki Chowk | CC | 1000 | 24 |
| 4 | Shanti Prakash Statue to Dhoodh Naka Via Ashok Pickle Dhood naka | BT | 1000 | 24 |
| 5 | Netaji Chowk to Mutt Mandir Via Tehsil Office | BT | 850 | 12 |
| 6 | Shiv Mandir to Lal Chakki Nr. Bk. 2108 via Durga Pada | CC | 2000 | 36 |
| 7 | Dhhodh Naka to Swami Shanti Prakash Ashram | CC | 700 | 24 |
| 8 | B.G. Tilak to Tanker Point | CC | 600 | 18 |
| 9 | From Mutt Mandir Chowk to Gaikwad 630 | CC | 630 | 12 |
| 10 | From Lal Chakki 2108 to Netaji School | BT | 875 | 36 |
| 11 | Swami Shanti Prakash Statue to Dhoodh Naka Via Ashok Pickle | BT | 1000 | 24 |
| 12 | From Nijdham Ashram to Gandhi Road | BT | 400 | 18 |
| 13 | From Chaliya Saheb Mandir to Jai Baba Dham | BT | 450 | 18 |
| 14 | From Chaliya Saheb Mandir to Minerva Apartment | CC | 400 | 12 |
| 15 | Kailash Colony to Netaji Chowk | BT | 2000 | 24 |
| 16 | Kali Mata Mandir Chowk to Sewal house via D.T.School | BT | 750 | 18 |
| 17 | Bk.No.926 Nirmal Kunj Hanuman Mandir | BT | 500 | 18 |
| 18 | Venus to Netaji | CC | 300 | 18 |
| 19 | HDFC Bank to SST Collage | CC | 450 | 18 |
| 20 | Venus to SST College | BT | 350 | 30 |
| 21 | Venus Ro ROB | CC | 1000 | 24 |
| 22 | Opp. Swami Shanti Prakash statue to | CC | 1900 | 18 |
| 23 | From Main Entrance gate to Manish Apt. Via Shmashan Bhumi UNR-04 | BT | 500 | 12 |

सध्या उल्हासनगर शहरातील नागरिक वाहने कोठेही पार्क करतात व त्यामुळे वाहतुकीची कोंडी होते. जर वरिल नमुद केलेल्या रस्त्यांवर पे अॅन्ड पार्क पॉलिसी राबविली तर नक्कीच वाहतुकीची कोंडी टाळता येईल व महापालिकेस उत्पन्न ही प्राप्त होईल. तरी सदर प्रस्ताव मा. महासभे पुढे निर्णयास्तव सादर करण्यात येत आहे.

महापालिका किंवा अभिकर्ता यांनी या करिता आवश्यक पुरेसा कर्मचारी वर्ग नेमणे आवश्यक राहिल.

**महासभा ठराव क्र.४७** **दिनांक २०/०१/२०२२**

**सुचकाचे नाव :- श्री. मंगल वाघे**

**अनुमोदकाचे नाव :- श्री. प्रमोद टाले**

**ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद खालील 'अटी व शर्तीच्या अधिन राहून वाहतुक समस्यांचे निवारण करणेसाठी उल्हासनगर महानगरपालिकेचे रस्तांवर पे अॅन्ड पार्क पॉलिसी राबविण्यास मान्यता देत आहे.**

1. महापालिका किंवा अभिकर्ता यांनी या करिता आवश्यक पुरेसा कर्मचारी वर्ग नेमणे आवश्यक राहिल.

2. रस्त्यांवर पार्किंग केलेल्या वाहनांकडून नमुद केलेल्या दरानुसार अभिकर्ता/महापालिकेला प्रतिदिन वसुल केलेल्या एकुणर क्कमेच्या 40 टक्के रक्कम प्रति दिन महापालिकेकडे भरणा करणे आवश्यक राहिल.
3. ज्या वाहनाना मासिक पास देण्यात येणार आहे.त्या वाहनावर पार्किंग स्थळ् शुलक तसेच मासिक पासचा कालावधी नमुद करणारे स्टिकर लावणे बंधनकारक आहे.
4. रस्त्यावरील वाहनांकडून मासिक पार्किंग शुल्क वसुली केल्यास त्यावर आकरणी केलेले पार्किंग स्थळ शुल्क व पार्किंगचा कालावधी वाहनांवर नमुद असलेले स्टिकर लावणे बंधनकारक आहे.
5. अभिकर्ता यांना शहरातील ठिकठिकाणी नियमित वाहने पार्किग असल्यास वाहतुकीस अडथळा निर्माण होणार नाही यांची दक्षता घेऊन पार्किग शुलक वसुलकरणे आवश्यक राहील अशा जागांची पाहणी करावयाची आहे.
6. अभिकर्ता यांने पार्किंग वसुलीसाठी नियुक्त केलेला कर्मचारी वर्ग हा सुद्दढ व सुशिक्षीत असावेत तसेच सदर कर्मचारी चारित्र्यहीन व गुन्हेगारी प्रवृत्तीचा नसावा. त्याच प्रमाणे त्यांना विशिष्ट गणवेश परिधान करणे आवश्यक राहिल.
7. अभिकर्ता यांने नियुक्त केलेल्या कर्मचारी वर्गास पगार व भत्ते देण्याचीजबाबदारी अभिकर्त्याची राहिल.
8. अभिकर्ता यांना पार्किंग शुल्क वसुलीसाठी वसुली करावयाच्या रक्कमे करीता दयावयाची पावती पुस्तके व मासिक पास महापालिकेकडून पुरविण्यात येतील. महापालिकेने पुरविलेल्या पावती पुस्तका व्यतीरीक्त् दुसरे पावती पुस्तक वापरता येणार नाही .किवा शक्य असल्यास ई-टिकिटिंग प्रणालीचा वापर अभिकर्ता स्वखर्चाने करावा व सदर मशिन मनपाकडून प्रमाणित करून घ्यावी.
9. शहरातील रस्त्यावर नियमित उभ्या केल्या जाणाऱ्या वाहनासाठी पार्किंग शुल्क वसुली करताना मासिक पास देण्याची तरतुद असेल.
10. अभिकर्त्याने सुरक्षा अनामत रक्कम म्हणून महापालिकेकडे प्राप्त् निविदेच्या 5% रक्कम् जमा करावी सदर रक्कमेवर महापालिकाकडून कोणत्याही प्रकारचे व्याज देय असणार नाही तसेच निविदाकालावधी पुर्ण झाल्यास सदर अनामतरक्कम बिनव्याजी अभिकर्त्यास महापालिकाकडून परत करण्यात येईल.

अभिकर्ता व वाहनधारक यांच्यामध्ये कोणत्याही प्रकारचा वाद निर्माण झाल्यास त्यास महापालिका जबाबदार रहाणार नाही.

**सुचकाची सही/-**

**अनुमोदकाची सही /-**

**सर्वानुमते**

**महापौर/पीठासीन अधिकारी**
**सर्वसाधारण महासभा**
**उल्हासनगर महानगरपालिका**

---

**<u>उप महापौर,श्री. भगवान भालेराव</u>**:-७ नंबरचा विषय घ्या .

<u>महापालिका सचिव</u>:— विषय क्र. ७ वाचुन दाखवितात.

---

⇨ विषय क्र. ७:—**महानगरपालिका क्षेत्रात पर्यावरण विभागाच्या निधीतून अल्प भाडेदराने सायकल योजना राविण्यासाठी ३०० सायकल घेणेकरिता महासभापुढे धोरणात्मक निर्णय घेवून मान्यता देणेबाबत.**

---

**<u>महापालिका सचिव:-</u>** विषय क्र. ७ वाचला आहे, कोणाला बोलायचे असल्यास बोलू शकतात.

**<u>सदस्या, श्रीम. मिना सोनेजी:-</u>** मा. महापौरजी, महासभा ठेवायची कशाला? जर चर्चा करुन देत नाही.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी</u>**:-विषय क्र. १ ते १६सर्व पास... तशीच चालवा मिटींग

**<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:-</u>** सर्वच बोलले तर उत्तर कसे देणार, एक एक करुन बोला.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-</u>**ही जी पध्दत आहे, ती लोकशाहीचा गळा घोटणारी आहे.

**<u>सदस्य, श्री. स्वप्नील बागुल:-</u>** पास..पास..

या वेळी काही सदस्य एकत्रित बोलत असल्यामुळे कोण काय बोलत होते, ते स्पष्ट समजून आले नाही.

**<u>महापालिका सचिव:-</u>** विषय क्र. ७ वर बोला.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-</u>**मला विषय क्र.३ वर बोलायचे आहे. बोलण्याची काय गरज नाही. आपल्या दालनात मिटींग बोलवायला पाहीजे. बाकीच्यांना काय गरज आहे बोलवायची.

या वेळी काही सदस्य एकत्रित बोलत असल्यामुळे कोण काय बोलत होते, ते स्पष्ट समजून आले नाही.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:-</u>** दादागिरी नाही चालणार.

**<u>महापालिका सचिव:-</u>** बोला ना मॅडम तुम्ही विषयावर बोलतच नाहीत.

**<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-</u>** मा. महापौरजी, आपण मिटींग कशी चालवत आहेत.

**<u>महापालिका सचिव:-</u>** मीना मॅडम आपण विषयावर बोला.

**<u>सदस्य, श्री. अरुण आशान:-</u>** मा. महापौरजी, ८ नंबरचा विषय घ्या.

**<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:-</u>** ऐकायला काहीच येत नाही, कृपया सगळयांनी शांत बसा.

**<u>उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-</u>** पा.. पास..विषय क्र.८ घ्या.

<u>काही सदस्य:—</u>पास—पास......

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी:—</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**☑ विषय क्र.७ :- महानगरपालिका क्षेत्रात पर्यावरण विभागाच्या निधितून अल्प भाडे दराने सायकल योजना राबविण्यासाठी ३०० सायकल घेण्याकरीता महासभेपुढे धोरणात्मक निर्णय घेवून मान्यता देणेबाबत.**

**प्रस्तावना**

उपरोक्त विषयान्वये, पर्यावरणपुरक वातावरणासाठी शहरात विविध योजना राबविण्याचे शासनाने धोरण आखले आहे.त्यासाठी शासनाकडून निधि उपलब्ध झालेला आहे.नॅशनल क्लीन एअर प्रोग्राम तसेच १५ व्या वित्त आयोगाअंतर्गत हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी विविध योजना राबवुन नागरीकांसाठी सुविधा पुरविणे आवश्यक आहे.

त्यानुसार राज्यातील विविध महापालिका क्षेत्रात नागरीकांना ये-जा करण्यासाठी/वाहतुकीसाठी व प्रदुषण मुक्त वातावरण मिळण्यासाठी सायकल प्रकल्प राबवित आहेत.

याच धर्तीवर उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात सदरची योजना पे ॲण्ड युझ् तत्वावर राबविण्याचा मानस आहे.हि योजना नागरीकांसाठी स्वस्त वाहतुकीची सुविधा उपलब्ध् करुन देईल तसेच शहरातील छोटया रस्त्यांवरील वाहतुकीची कोंडी कमी करण्यास मदत होणार आहे, अशी धारणा आहे.हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी प्राप्त निधितून ३०० सायकल खरेदी करणे प्रस्तावित आहे. उक्त सायकलचे मनपा क्षेत्रात प्रथमत: ५० ठिकाणी सायकल स्टॅण्ड उभारणार असून तेथून रुपये २ प्रति तास या अल्पदराने सायकल डिजीटल पध्दतीने शुल्क अदा केल्यानंतर नागरीकांना उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. नागरीकांची आवक जावक जास्त प्रमाणात असलेल्या ठिकाणी सायकल स्टॅण्ड उभारण्यात येणार आहेत. सदर ५० ठिकाणी सायकल स्टॅण्ड उभारणीसाठी आवश्यक जागा महापालिकेमार्फत उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. सदर योजने अंतर्गत सायकल खरेदी महानगरपालिके मार्फत करण्यात येणार असुन त्याचे व्यवस्थापन देखभाल व दुरुस्ती अभिकर्त्यामाफ्रत करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. तरी सायकल खरेदी साठी व अभिकर्ता नेमणुकीसाठी ई-निविदा काढण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.सदर संपुर्ण प्रकल्प सुरु करणे व त्याची ३ वर्षांसाठी देखभाल दुरुस्तीसह प्रकल्प चालविण्यासाठी अभिकर्ता नेमणुक करणे आवश्यक आहे.सदर सायकल खरेदीसाठी अंदाजित खर्च रू.४८.०० लक्ष इतका आहे.सदर प्रकल्पासाठी येणारा खर्च १५ व्या वित्त आयोगाअंतर्गत प्राप्त निधीतून करण्याचे प्रस्तावित करण्यात येत

आहे.करीता सदर प्रस्ताव धोरणात्मक स्वरुपाचा असल्याने मा.महासभेची मान्यता आवश्यक आहे.करीता सदरचा प्रस्ताव मान्यतेसाठी सविनय सादर.

**महासभा ठराव क्र. ४८** **दिनांक २०/०१/२०२२**

**सुचकाचे नाव :- श्री. कलवंतसिंह सोहता**

**अनुमोदकाचे नाव :- श्री. राजेश वदारिया**

**ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे महानगरपालिका क्षेत्रात पर्यावरण विभागाच्या निधितून अल्प भाडे दराने सायकल योजना राबविण्यासाठी येणारा अंदाजीत खर्च रु.४८.०० लक्ष १५ व्या वित्त आयोगाअंतर्गत प्राप्त निधीतून धोरण राबविणेस मान्यता देत आहे.**

**सुचकाची सही /-**

**अनुमोदकाची सही /-**

**सर्वानुमते**

**महापौर/पीठासीन अधिकारी**
**सर्वसाधारण महासभा**
**उल्हासनगर महानगरपालिका**

---

महापालिका सचिव:— विषय क्र. ८ वाचुन दाखवितात.

———————————————————————————————————————

⇨ विषय क्र. ८:—**आरक्षण क्रमांक २४५ (२४८ चौ. मी) च्या आरक्षणाच्या उत्तरेस असलेल्या विद्यमान कैला सकॉलनी शमशान भुमी Designeted Reservation मधील सदर आरक्षणाच्या पश्चिमेस असलेल्या ३६ मी रुंद रस्त्या सलागुन M.S.E.B स्वीच स्टेशन करीता ११०० चौ.मी क्षेत्रफळाची जागा देण्याकरीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये किरकोळ फेरबदल करुन M.S.E.B करीता आरक्षित क्षेत्र असे नविन आरक्षण प्रस्तावित करणेबाबत.**

———————————————————————————————————————

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** मा.महापौरजी, सभागृह चालविण्याची ही पध्दत खुप चुकीची आहे.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** ८ नंबरच्या विषयावर जर कोणाला बोलायचे असेल तर बोला, श्री. किशोर वनवारी ८ नंबरच्या विषयावर बोला.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** महापौरजी, या विषयावर मतदान घ्या.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:-**ऐकायला अजिबात येत नाही.

**सदस्य, श्री. राजेश वधारिया:-**मी राजेश वधारिया मतदानाची मागणी करीत आहे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-**मतदानाची मागणी केली आहे.

**सदस्य,डॉ. प्रकाश नाथानी:-** स्मशान भुमिचा विषय डिफर करा.

**सदस्य, श्री. राजेश वानखेडे:-**मा. महापौर मॅडम एक-एका ला बोलण्यास सांगा आवाज समजायला येत नाही.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** मोबाईलचा नेट बंद केला आहे, सेम, सेम.

या वेळी काही सदस्य एकत्रित बोलत असल्यामुळे कोण काय बोलत होते, ते स्पष्ट समजून आले आहे.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>** मुर्दाबाद, मुर्दाबाद.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:-</u>**भ्रष्टाचार झाला आहे. विकून देणार नाही.

**<u>महापालिका सचिव:-</u>** पुरस्वानी सर आपण जो प्रस्ताव दिला आहे. आपण बोलुन तर घ्या, आपला प्रस्ताव मी दिला आहे. मी प्रस्ताव वाचला आहे.

**<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-</u>** डिफर करा, डिफर करा.

**<u>सदस्य, श्री. अरुण आशान:-</u>** सब स्टेशन कुठे होणार आहे? हे प्रशासनाने जाहीर करावे.

**<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-</u>**हा विषय डिफर करण्यात यावा, स्मशान भुमिमध्ये होणार नाही, तिथे ब्लास्ट होऊ शकतो, मोठे नुकसान होईल, लोक शहर सोडून जातील, पार्किंगचा पण विषय चुकीचा आहे.

**<u>सदस्य, श्री. मनोज सयानी:</u>**- मा. महापौरजी हा जो विषय आला आहे, ५ नंबरच्या स्मशान भुमिमध्ये

**<u>सदस्य, श्री. अरुण आशान:-</u>** मा. महापौर, उप महापौर, आयुक्त साहेब...

**<u>महापालिका सचिव:-</u>** आशान सर तुमचा आवाज काहीच ऐकायला येत नाही.

**<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:-</u>** एक ऐकानेच बोलायला पाहीजे.

**<u>सदस्य, श्री. राजेश वानखेडे:-</u>** हा विषय रिजेक्ट करा, रिजेक्ट करा.

**<u>सदस्या, श्रीम. कांचन लुंड:-</u>** कॅन्सल करा,

**<u>उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-</u>** श्री. किशोर वनवारीजी तुम्ही बोला.

या वेळी काही सदस्य एकत्रित बोलत असल्यामुळे कोण काय बोलत होते, ते स्पष्ट समजून आले नाही.

**<u>महापालिका सचिव:-</u>** मा. महापौरांनी काही आदेश दिला आहे सर्वात प्रथम पुरस्वानी सर बोलतील आपण शांतता राखावी, आपण निर्णय घ्यावा काय करावयाचे आहे ते वनवारी सर बोलतील वनवारी सरांना या विषयावर बोलायचे आहे. नंतर राजेश वधारिया सरांना बोलायचे आहे. पुरस्वानी सर आणि आणखिन कोणाला बोलायचे असेलतर बोला या क्रमानुसार बोलावे.आपण शांतपणे बोलावे.

**<u>सदस्य, श्री. जमनदास पुरस्वानी</u>**:- मा. महापौरजी हा जो अनुक्रमांक ८ नंबरचा विषय आहे. स्विचींग स्टेशन बसवणे बाबतचा..

**<u>सदस्या, श्रीम. अंजली साळवे:-</u>** मलापण बोलायचे आहे. मलापण बोलायचे आहे.

**<u>महापालिका सचिव:-</u>**यांचे बोलणे झाल्या नंतर बोला मॅडम.

**<u>उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-</u>** साळवे मॅडम नंतर बोला.

**<u>सदस्य, श्री. जमनदास पुरस्वानी</u>**:- मा. महापौर जी आणि आपणांस विदयुत विभाग आणि नगररचनाकर यांनी हिंदु स्मशानभुमीला सोडून मी आपणास विनंती करतो की, किशोर वनवारींनी जो प्रस्ताव दिला आहे.

**<u>सदस्य, श्री. मनोज सयानी:-</u>** हिंदु बिंदुकी बात करु नका. येथे सर्वचजण हिंदु आहेत. हिंदुचे ठेकेदार नाहीत.

**<u>सदस्य, श्री. जमनदास पुरस्वानी:-</u>**हा जो स्मशान भुमीचा प्रस्ताव आहे तो रदद् करण्यात यावा.

**सदस्या, श्रीम. मिना सोनेजी:-** श्री. जमनुजी पहिले श्री. किशोर वनवारीजींना बोलु द्या.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-** हिंदु हिंदुची बात करु नका शहराचा मुददा आहे.लाईटीची खुप अडचण आहे.

**महापालिका सचिव:-** आता आपणास महापौर मॅडमने आदेश दिले आहे की, एक-एक करुन बोला सर्वचजण एकत्र बोलतात तर समजणार नाही, ऐकुपण येणार नाही. पहिले वनवारी सर बोलतील नंतर राजेश वदारिया बोलतील. नंतर साळवे मॅडमने बोलावे आणि नंतर सगळयांनी बोलावे. आशान सर तुमचा आवाज आजिबात ऐकायला येत नाही.वनवारी सर आपण जरा बोला आपला आवाज येत नाही.आपण बोला. आपला आवाज येत नाही. आता आपण बोला पुरस्वानी सरांचे झाले आहे.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी**:- मा. महापौरजी, उप महापौरजी, आयुक्तजी....

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-** महापौरांचा अधिकार तुम्ही कसे घेत आहेत.

**महापालिका सचिव:-** महापौरांनी सांगितले आहे. मी काय माझा अधिकार वापरत नाही. महापौरांनी सांगितले आहे. असे बालावे.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:-**हे स्विच स्टेशन ४ नंबरसाठी व्हायला पाहीजे. पंरतु स्मशान भुमीमध्ये स्विच स्टेशन झाले नाही पाहिजे. परंतु स्विचींग स्टेशन ४ नंबरसाठी बनायला पाहीजे. पश्चिमेला समतानगर येथे जो रिकामा प्लॉट आहे, तिथे बनविण्यात यावा.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-** मा. महापौर जी...

**सदस्य, श्री. किशोर वनवारी**:- सगळे आपले भाऊ आहेत मी सर्वांना विनंती करतो की,...

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-** मा. महापौर हा जो८ नंबर चा विषय अजेंटावर ........

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी**:- मी मोठया विनम्रतेने बोलतो मला संधी द्यावी या विषयावर बोलण्यासाठी पुर्ण सत्तापक्षाकडुन विनंती करतो की, ही जी स्मशानभुमी आहे. त्यास्मशान भुमीमध्ये एक दिवस जेव्हा जनसंख्या वाढणार तेव्हा हयाच स्मशानभुमी एकेदिवशी सर्वांना जायचे आहे.

**महापालिका सचिव:-** रामचंदानी सर आपण जरा शांत रहा.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-**स्वीच स्टेशन बनविणे ही जर तुमची मागणी असेल पण ते झाले पाहिजे, प्रत्यक्षात झाले पाहिजे. विषय समोर आला पाहिजे आणि त्याठिकाणी ते होऊ शकते का ? त्याच्यामध्येकाही अडचणी आहेत का ?जिथेस्टेशन होणार आहेतीजागा शासनाची आहे का ? महापालिकेची आहे का ? याचा सर्वांचा विचार करुन, स्विच स्टेशन होण्यासाठी पुन्हा महासेभेमध्ये दुस-या जागेची निवड करुन प्रशासनाने लवकरात लवकर प्रस्ताव महासभेपुढे आणला पाहीजे. विजेचा गंभीर प्रश्न आहे. त्या गंभीर प्रश्नाचा विचार रहिवाश्यांना दिलासा देण्यासाठीप्रयत्न केले पाहिजे.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** माझी विनंती आहे महापौर मॅडम या विषयावर मला बोलायची संधी मिळाली पाहीजे.

**सदस्या, श्रीम. अंजली साळवे:-** मॅडम मी बोलु का ?

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-** स्मशान भुमिमध्ये सबस्टेशन बनविण्याची गरज नाही, लोकेशन बदल करण्यासाठी जे यांनी प्रस्ताव ठेवला आहे. तो मान्य आहे. राजेंद्रजी यांना धन्यवाद करीत आहे की, त्यांनी हे सर्व मित्रांची भावना बघुन हे लोकेशन बदल करण्यासाठी प्रस्ताव टाकला आहे. मी भारतीय जनतापार्टीकडुन आभार मानत आहे.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी**:- महापौर मॅडम मी तुमच्याकडे विनंती करतो की, मला २ मिनाटींचा वेळ दयावा.

**सदस्या, श्रीम. अंजली साळवे:-** मा. महापौर मॅडम मी बोलू का?

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव**:- प्रदिपजी जरा अंजली साळवे मॅडमचे चालु आहे. त्याच्या नंतर बोला.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी**:- ठिक आहे. ठिक आहे.

**सदस्या, श्रीम. अंजली साळवे**:- मा. महापौर, आयुक्त सर आणि सर्व सन्मानिय सदस्य सिटी स्टेशनचा विषय आहे तो अतिशय महत्वाचा आहे. ४ नंबर, ५ नंबरसाठी आणि ब-याच वर्षापासून हा विषय प्रलंबित आहे. ४ नंबर, ५ नंबर मध्ये मोठयाप्रमाणात लो व्हाल्टेजचा प्रोबलेम आहे. आणि सारखे विज खंडीत होत असते. त्यासाठी ब-याच वर्षापासून हा विषय प्रलंबित आहे. महाआघाडी सरकार आल्यानंतर आमचे सन्मानिय उर्जा मंत्री डॉ. नितिन रावतसर यांचेकडे आमचे जिल्हाध्यक्ष, श्री. रोहित साळवे यांनी हा विषय मांडला आहे. व त्याचा पाठपुरावा केला आहे. त्याच्या नंतर मी आयुक्त साहेबांनकडे सुध्दा महामंडाळाच्या अधिकारी यांची मिटींग लावण्यात आली आहे आणि त्याच्या नंतर हि जागा प्रशासनाने फाईनल केलेली आहे. प्रशासनाने कोणतीजागा फाईनल केली हे महत्वाचे नाही. सीटी स्टेशन होणे हे अत्यंत महत्वाचे आहे. हे जर नसेल करायचे असेल तर प्रशासनाने जागा सुचवावी. आणि नंतर मग आपण दुसरे जागेमध्ये हे करणे खुप गरजेच आहे. नविन जागा आम्ही सुचवुन सांगु शकतो. लालसाई गार्डनच्या बाजुला असलेला खुला भुखंड, कुर्ला कॅम्प रोडवरील एम.जे.पी.टी. चा हा खुला भुखंड हे दोन भुखंड आहेत.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** साळवे मॅडम थांबा.

**सदस्या, श्रीम. अंजली साळवे:-** पहिले बोलू तर दया.सबस्टेशनसाठी भुखंड आणि पुढच्या महासभेत हा प्रस्ताव फायनलकरण्यात यावा.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव**:- सन्मानिय सदस्य, महापौरांचा आदेश आहे प्रशासनाने सदर जागेची शहानिशा करणे. आता ती जागा सरकारची आहे. त्यामुळे सर्व नगरसेवकांची भावना लक्षात घेता, इथे कुठल्याप्रकारे सबस्टेशनसाठी जागा देण्यात येऊ नये. त्यामुळे दुसरी जागा सुचित करावी. आणि येणा-या पुढच्या महासभेला त्या जागेचा प्रस्ताव महासभेपुढे आणावा. असे आयुक्तांना महापौरांच्यावतीने निर्देश देण्यात येत आहे.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी**:-धन्यवाद,धन्यवाद.

**महापालिका सचिव:-** सदर जागेची शहानिशा करुन असे ठरावामध्ये येईल.

काही सदस्य :—पास—पास……

महापौर तथा पीठासीन अधिकारी :—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ८ :-** आरक्षण क्रमांक २४५ च्या आरक्षणाच्या उत्तरेस असलेल्या विद्यमानकैलास कॉलनी स्मशान भूमी Designated Reservation मधील सदर आरक्षणाच्या पश्चिमेस सदर आरक्षणाच्या पश्चिमेसअसलेल्या ३६ मी.रूंद रस्त्यास लागून M.S.E.B स्वीच स्टेशन करीता ११०० चौ.मी क्षेत्रफळाची जागादेण्याकरीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये किरकोळ फेरबदल करून M.S.E.B करीता आरक्षित क्षेत्र असे नवीन आरक्षण प्रस्तावित करणे बाबत...

**प्रस्तावना**

उल्हासनगर शहराची मुळ मंजूर विकास योजना १९७४ मध्ये मंजूर करण्यात आली असून सुधारीत विकास आराखडा महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३१ (१) अंतर्गत दिनांक २१.०४.२०१७ रोजी भागश: मंजूर शासनाचा करण्यात आला. तदनंतर सदर आराखडयातून वगळलेल्या क्षेत्राची विकास योजना (E. P.) दिनांक ०१.०३.२०१९ रोजी मंजुर करण्यात आली. उल्हासनगर शहरातील कॅम्प़-४ व कॅम्प़-५ या भागामध्ये लोकवस्ती वाढली असल्यामुळे व विद्युत भार वाढलेला असल्यामुळे विद्यमान विद्युत संरचनेमध्ये भाराचे विभाजन करण्याच्या दृष्टीकोनातून कॅम्प़-४ व कॅम्प़-५ मध्ये स्वीच गियर स्टेशन बनवण्याची आवश्यकता कार्यकारी अभियंता M.S.E.B यांनी प्रतिपादीत केलेली आहे. उल्हासनगर शहराच्या कॅम्प़-४ व कॅम्प़-५ मध्ये विद्युत भार मोठा वाढला असल्याने भावी १० वर्षात वाढणाऱ्या भाराचा अंदाज पाहता मोठे सबस्टेशन आवश्यक्र आहे. मात्र जागेच्या कमतरतेमुळे स्वीच गियर स्टेशन बांधणे आवश्यक्र असल्याचे दिसून आले.

कार्यकारी अभियंता M.S.E.B यांनी उल्हासनगर शहरात स्वीच गियर स्टेशन बनविण्याकरीता विद्यमान कैलास नगर, स्मशान भूमी यामधील ११०० चौ.मी जमीन देण्याबाबत मा. आयुक्त यांच्याकडे विनंती अर्ज सादर केलेला आहे. सदर स्वीच गियर स्टेशनसाठी M.S.E.B ने सुचविलेली जागा विद्यमान विकासयोजनेत त्या आरक्षणासाठी राखीव ठेवण्याकरीता कैलास नगर स्मशान भूमीकरीता राखीव असलेल्या क्षेत्रातून ११०० चौ.मी क्षेत्र वगळून M.S.E.B करीता राखीव ठेवण्याकरीता उल्हासनगर शहराच्या मंजूर विकासयोजनेत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये किरकोळ फेरबदल करणे आवश्यक्र आहे. या दृष्टीकोनातून उल्हासनगर शहराच्या विकास योजनेतील आरक्षण क्र. २४५ च्या उत्तरेस "विद्यमान कैलास कॉलनी स्मशान भूमी या Designated Reservation" मधील जागेपैकी सदर स्मशान भूमीच्या पश्चिमेस असलेल्या ३६ मी. रूंद रस्त्यास लागून ११०० चौ.मी क्षेत्रफळाची जागा M.S.E.B स्वीच गियर स्टेशनकरीता देण्याकरीता विषय पत्रिकेत खालील प्रमाणे विषय समाविष्ट करणे आवश्यक्र आहे. त्या अनुषंगाने आवश्यक्र ठरावाचा मसुदा सादर करत असून त्याचा समावेश दि. १८/११/२०२१ रोजीच्या सभेत विषय पत्रिका समाविष्ट होण्याच्या दृष्टीने मान्यतेकरीता सादर.

**<u>ठरावाचा मसुदा</u>**

उल्हासनगर शहराच्या मंजूर विकास योजनेतील "विद्यमान कैलास कॉलनी स्मशान भूमी या Designated Reservation" मधील आरक्षित जागेपैकी सदर आरक्षणाच्या पश्चिमेस असलेल्या ३६ मी. रूंद रस्त्यास लागून ११०० चौ.मी क्षेत्रफळाची जागा "M.S.E.B" चा वापर या नवीन आरक्षणाखाली समाविष्ट करण्यासाठी सदर जागा विद्यमान आरक्षणातून वगळण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये किरकोळ फेरबदल करणेस ही सभा मान्यता देता आहे.

सदर ठरावाचा समावेश मा. सर्वसाधारण सभेच्या दि. १८/११/२०२१ च्या विषय पत्रिकेत करणेबाबत आवश्यक्र कार्यवाही करीता सादर.

**महासभा ठराव क्र.४९** **दिनांक २०/०१/२०२२**

**सुचकाचे नाव :- श्री. राजेश वानखेडे, श्री. किशोर वनवारी**

**अनुमोदकाचे नाव :- श्री.गजानन शेळके**

**ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे व सभेत झालेल्या चर्चेअंती उल्हासनगर शहराच्या मंजूर विकास योजनेतील "विद्यमान कैलास कॉलनी स्मशान भूमी या Designated Reservation" मधील आरक्षित जागेपैकी सदर आरक्षणाच्या पश्चिमेस असलेल्या ३६ मी. रूंद रस्त्यास लागून ११०० चौ.मी क्षेत्रफळाची जागा "M.S.E.B" चा वापर या नवीन आरक्षणाखाली समाविष्ट करण्यासाठी सदर जागा विद्यमान आरक्षणातून वगळण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये प्रशासनास सदर जागेत किरकोळ फेर बदल करणेस मान्यता देत नाही. तसेच प्रशासनाने दुसरी जागा शोधून जागांची शहानिशा करुन तसा प्रस्ताव महासभेपूढे आणणेस प्रशासनाला निर्देश देत आहे.**

**सुचकाची सही/-**

**अनुमोदकाची सही /-**

**सर्वानुमते**

**महापौर/पीठासीन अधिकारी**
**सर्वसाधारण महासभा**
**उल्हासनगर महानगरपालिका**

---

महापालिका सचिव:— विषय क्र. ९ वाचुन दाखवितात.

———————————————————————————————————

विषय क्र. ३:—सन २०२२ मध्ये राष्ट्र पुरूष/थोरव्यक्ती यांची जयंती/पुण्य तिथी दिन व अन्य राष्ट्रीय कार्यक्रम उल्हासनगर महानगरपालिकेत साजरे करणेबाबत.

———————————————————————————————————

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-**पास..पास..

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-** गोषवारा दिला आहे त्या प्रमाणे.

**महापालिका सचिव:-** पास..

काही सदस्य :—पास—पास......

महापौर तथा पीठासीन अधिकारी:—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र.९ :-** सन २०२२ मध्ये राष्ट्र पुरूष/थोर व्यक्ती यांची जयंती/पुण्यतिथी दिन व अन्य राष्ट्रीय कार्यक्रम उल्हासनगर महानगरपालिकेत साजरे करणेबाबत.

**प्रस्तावना**

उपरोक्त संदर्भ व विषयान्वये सविनय सादर करण्यात येते की, शासन परिपत्रक क्र. जपुती-२२२१/ प्र.क्र.११२/कार्या.२९, दिनांक ३१ डिसेंबर, २०२१ व महासभा ठराव क्र. १४, दिनांक १७/०२/२०२१ अन्वयेराष्ट्र पुरूष/थोर व्यक्ती यांची जयंती, राष्ट्रीय दिनाचे कार्यक्रम उल्हासनगर महानगरपालिकामध्ये**lktjs dj.;kps vkns'k vkgsr- R;kvUo;s [kkyh n'kZfoysys dk;Zdze lu 2022 e/;s egkuxjikfydsr lktjs djko;kps vkgsr-**

| अ.क्र. | जयंती/पुण्यतिथी | दिनांक |
|---|---|---|
| १ | सावित्रीबाई फुले जयंती | ०३ जानेवारी, २०२२ |
| २ | जिजाऊ मॉसाहेब जयंती | १२ जानेवारी, २०२२ |
| ३ | स्वामी विवेकानंद जयंती | १२ जानेवारी, २०२२ |
| ४ | नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती | २३ जानेवारी, २०२२ |
| ५ | बाळासाहेब ठाकरे जयंती | २३ जानेवारी, २०२२ |
| ६ | संत सेवालाल महाराज जयंती | १५ फेब्रुवारी, २०२२ |
| ७ | छत्रपती शिवाजी महाराज जयंती | १९ फेब्रुवारी, २०२२ |
| ८ | संत गाडगेबाबा जयंती | २३ फेब्रुवारी, २०२२ |
| ९ | संत रविदास महाराज जयंती (तिथीनुसार) | २३ फेब्रुवारी, २०२२ |
| १० | यशवंतराव चव्हाण जयंती | १२ मार्च, २०२२ |
| ११ | शहीद दिन | २३ मार्च, २०२२ |
| १२ | महात्मा ज्योतिबा फुले जयंती | ११ एप्रिल, २०२२ |
| १३ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती | १४ एप्रिल, २०२२ |

| | | |
|---|---|---|
| १४ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जयंती | ३० एप्रिल, २०२२ |
| १५ | महात्मा बसवेश्वर जयंती (तिथीनुसार) | ०३ मे, २०२२ |
| १६ | दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवस | २१ मे, २०२२ |
| १७ | महाराणा प्रतापसिंह जयंती (तिथीनुसार) | २५ मे, २०२२ |
| १८ | स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती | २८ मे, २०२२ |
| १९ | अहिल्यादेवी होळकर जयंती | ३१ मे, २०२२ |
| २० | राजर्षि शाहू महाराज जयंती | २६ जुन, २०२२ |
| २१ | वसंतराव नाईक जयंती | ०१ जुलै, २०२२ |
| २२ | लोकमान्य बाळ गंगाधर टिळक जयंती | २३ जुलै, २०२२ |
| २३ | साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंती | ०१ ऑगस्ट, २०२२ |
| २४ | क्रांतिसिंह नाना पाटील जयंती | ०३ ऑगस्ट, २०२२ |
| २५ | सद्भावना दिवस | २० ऑगस्ट, २०२२ |
| २६ | राजे उमाजी नाईक जयंती | ०७ सप्टेंबर, २०२२ |
| २७ | केशव सीताराम उर्फ प्रबोधनकार ठाकरे जयंती | १७ सप्टेंबर,२०२२ |
| २८ | पंडीत दिनदयाळ उपाध्याय जयंती—अंत्योदय दिवस | २५ सप्टेंबर, २०२२ |
| २९ | महात्मा गांधी जयंती | ०२ऑक्टोंबर, २०२२ |
| ३० | लाल बहादूर शास्त्री जयंती | ०२ ऑक्टोबर, २०२२ |
| ३१ | महर्षि वाल्मिकी जयंती (तिथीनुसार) | ०९ ऑक्टोबर,२०२२ |
| ३२ | डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम जयंती | १५ ऑक्टोंबर, २०२२ |
| ३३ | इंदिरा गांधी पुण्यतिथी व राष्ट्रीय संकल्प दिवस | ३१ ऑक्टोंबर, २०२२ |
| ३४ | वल्लभभाई पटेल जयंती व राष्ट्रीय एकता दिवस | ३१ ऑक्टोंबर, २०२२ |
| ३५ | पंडीत नेहरू जयंती | १४ नोव्हेंबर, २०२२ |
| ३६ | बीरसा मुंडा जयंती | १५ नोव्हेंबर, २०२२ |
| ३७ | इंदिरा गांधी जयंती व राष्ट्रीय एकात्मता दिन | १९ नोव्हेंबर, २०२२ |
| ३८ | संविधान दिवस | २६ नोव्हेंबर, २०२२ |
| ३९ | संत संताजी जगनाडे महाराज जयंती | ०८ डिसेंबर, २०२२ |
| ४० | डॉ.भाऊसाहेब उर्फ पंजाबराव देशमुख जयंती | २७ डिसेंबर, २०२२ |

राष्ट्रीय कार्यक्रम :—

| | | |
|---|---|---|
| १ | प्रजासत्ताक दिन | २६ जानेवारी, २०२२ |
| २ | स्वातंत्र्य दिन | १५ ऑगस्ट, २०२२ |
| ३ | महाराष्ट्र दिन | ०१ मे, २०२२ |

तसेच मा. महापालिका ठराव क्र.१४, दिनांक १७/०२/२०२१ अन्वये १) दिनांक २७ फेब्रुवारी रोजी मराठी भाषा दिवस, २) दिनांक २३ मार्च रोजी शहीद हेमू कालानी जयंती, ३) दिनांक १० एप्रिल रोजी सिंधी भाषा दिवस, ४) दिनांक १९ ऑक्टोबररोजी फ्लाईंग ऑफिसर शहीद प्रेम रामचंदानी जयंती, ५) दिनांक २५ नोव्हेंबर रोजी साधु वासवानी जयंती (मिट लेस डे), ६) दिनांक २५ डिसेंबर रोजी माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी जयंती असे एकूण ४९ कार्यक्रम महापालिकेत साजरे करणे. सर्व जयंती/पुण्यतिथीचे कार्यक्रम त्या-त्या दिवशी सकाळी ११:०० वाजता साजरा करणे, तसेच वरील ०३ राष्ट्रीय कार्यक्रम शासन आदेश/नियम/ परिपत्रक/मार्गदर्शक सूचनांनुसार वेळोवेळी साजरे/आयोजित करणेत येतील, याबाबत माहितीची नोंद घेणेकरीता मा. महासभेसमोर सविनय सादर.

**महासभा ठराव क्र.५०** **दिनांक २०/०१/२०२२**

**सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी**

**अनुमोदकाचे नाव :- श्री. अरुण आशान**

**ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे सन २०२२ मध्ये राष्ट्र पुरुष/थोर व्यक्ती यांची जयंती/पुण्यतिथी दिन व अन्य राष्ट्रीय कार्यक्रम नियमानुसार उल्हासनगर महानगरपालिकेत साजरे करणेस मान्यता देत आहे.**

**या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.**

**सुचकाची सही/-**

**अनुमोदकाची सही /-**

**सर्वानुमते**

**महापौर/पीठासीन अधिकारी**
**सर्वसाधारण महासभा**
**उल्हासनगर महानगरपालिका**

---

महापालिका सचिवः— विषय क्र. १० वाचुन दाखवितात.

---

⇨ विषय क्र. १०:—**प्रस्तावाची सुचना**

**महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांचेकडील शासन निर्णय दि. ८/०७/२१ नुसार १० लाखाचे पुढील सर्व प्रकारची कामे इ-निविदा पध्दतीने देणे संबंधी व १० लाखाचे आतील कामे, काम वाटप समितीनुसार पुर्वीच्या पध्दीने महापालिका कामवाटप समितीमार्फात मंजूर संस्थांना देणेबाबत. पालिका सदस्य, सुचक म्हणुन श्री. प्रमोद टाले व अनुमोदक श्रीम. सुनिता बाबुराव बगाडे यांचा प्रस्ताव विचारात घेणे.**

---

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-**नियमा प्रमाणे करण्यात यावे.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-**नियमा प्रमाणे.

**महापालिका सचिव:-** पास..

काही सदस्य :—पास—पास……

महापौर तथा पीठासीन अधिकारी :—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. १० :- प्रस्तावाची सुचना**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग याचे विभाग याचे कडील शासन निर्णय दि. ०८/०७/२०२१ नुसार १० लाखाचे पुढील सर्व प्रकारची कामे इ-निविदा पद्धतीने देणेसंबंधी व १० लाखाचे आतील कामे कामवाटप समितीनुसार पूर्विच्या पद्धतीने महापालिका कामवाटप समितीमार्फत मंजूर संस्थांना देणेबाबत पालिका सदस्य, सुचक म्हणून श्री. प्रमोद टाले व अनुमोदक श्रीमती सुनिता बाबुराव बगाडे यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

**प्रस्तावना**

आपणास नम्रपणे नमुद करू इच्छितो की महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग याचे विभाग याचे कडील शासन निर्णय दि. ०८/०७/२०२१ नुसार १० लाखाचे पुढील सर्व प्रकारची कामे इ-निविदा पद्धतीने देणेसंबंधी व १० लाखाचे आतील कामे कामवाटप समितीनुसार पूर्विच्या पद्धतीने महापालिका कामवाटप समितीमार्फत मंजूर संस्थांना देणेबाबत विषय सदर महासभेत समाविष्ट करणेस विनंती आहे. नगरविकास विभागाचे दि. ८ जुलै २०२१ शासकिय आदेशाची अंमलबजावणी तातडीने उल्हासनगर महानगरपालिका प्रशासनाने करण्यात यावी.

सदर विषय महासभेमध्ये ठेवून तो एकमताने पारीत करावी व इतिवृत्ताची वाट न बघता कार्यान्वीत करावी ही विनंती.

**महासभा ठराव क्र.५१** **दिनांक २०/०१/२०२२**

**सुचकाचे नाव :- श्री. प्रमोद टाले**

**अनुमोदकाचे नाव :- श्री. सुनिता बगाडे**

**ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग याचे विभाग याचे कडील शासन निर्णय दि. ०८/०७/२०२१ नुसार १० लाखाचे पुढील सर्व प्रकारची कामे इ-निविदा पद्धतीने देणेसंबंधी व १० लाखाचे आतील कामे कामवाटप समितीनुसार पूर्वीच्या पद्धतीने महापालिका कामवाटप समितीमार्फत मंजूर संस्थांना नियमाप्रमाणे देणेस मान्यता**देत आहे.

**सुचकाची सही /-**

**अनुमोदकाची सही /-**

**सर्वानुमते**

**महापौर/पीठासीन अधिकारी**
**सर्वसाधारण महासभा**
**उल्हासनगर महानगरपालिका**

---

महापालिका सचिवः— विषय क्र. ११ वाचुन दाखवितात.

———————————————————————————————————————

⇨ विषय क्र. ११ :—**प्रस्तावाची सुचना**

**ल्हासनगर रेल्वे स्टेशनचे नाव मा.स. बाळासाहेब ठाकरे तसेच विठठेलवाडी रेल्वे स्टेशनचे नावडॉ. बाबासाहेब आंबेडकर अशी नावे प्रस्तावीत करुन प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठविणेबाबत. पालिका सदस्य, श्री. राजेश वानखेडे व अनुमोदक श्रीम. ज्योत्सना सुरेश जाधव यांचा प्रस्ताव विचारात घेणे.**

———————————————————————————————————————

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** पास..पास..

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** हा प्रस्ताव पास करण्यात येऊ नये. बाबासाहेबांचे नाव त्या स्टेशनला देण्यापेक्षा तेवढी बाबासाहेबांची पातळी नाही. त्यामुळे हा विषय रदद करण्यात यावा.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:-** रिजेक्ट, रिजेक्ट.

**सदस्य, श्री. राजेश वानखेडे:-**मतदान घ्या, मतदान.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-**वानखेडे साहेब, चुकीची गोष्ट पाळू नका, चुकीची गोष्ट करु नका. चौधरी साहेबांनी बोलावे काय बोलायचे आहे ते.

**सदस्य, श्री. राजेश वानखेडे:-**याच्यामध्ये चुकीचे आहे, फक्त स्टेशनला नाव दयायचे आहे.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-**चौधरी साहेब बोला काय बोलायचे आहे ते.

**सदस्य, श्री. राजेश वानखेडे:-**ठाणे जिल्हाला नाव दया मग.

**महापालिका सचिव:-** सर आवाज येत नाही, मास्क काढून बोला नाही तर.

**सदस्य, श्री. राजेश चौधरी:-** पहिले तिथे नाव देण्यात येईल का?महासभेने नाव दिल्या नंतर ते देण्यात येईल का याचाही विचार करावा आणि प्रशासनाने ...

**सदस्य, श्री. राजेश वानखेडे:-**आवाज येत नाही, आवाज. ठराव पास करुन शासनाला पाठवा. नंतर झाले तर झाले नाही तर नाही. नाही तर मतदान घ्या आणि ज्यांचा विरोध आहे, त्यांचा विरोध दर्शवावा.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** बाबासाहेबांचे नाव कुठे लावतात.

**सदस्य, श्री. राजेश वानखेडे:-**माझी भावना आहे, मी माझी भावना व्यक्त केलेली आहे. साध्या साध्या गोष्टीला तुम्ही नाव देत नाहीत का?

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-** मा. महापौरजी हा जो विषय आला आहे, माझा पण एक प्रश्न आला होता. शहाड स्टेशन जो आहे, त्याला संत भगत कंवारामजी ठेवण्यात यावा...

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** पास..पास..

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-**शहाड स्टेशनला संत भगत कंवाराम नाव दिले जावे.

**सदस्य, श्री. राजेश वानखेडे:-** पास केला आहे.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** पास..पास..

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-**मला वाटते राजेश वानखेडे पंतप्रधान भारतीय जनता पार्टीचे आहेत, आपण तिथे सुचना करावी आणि मला वाटते सदरचा विषय भारत सरकारशी असल्यामुळे आपण पंतप्रधाना बरोबर पत्रव्यवहार करावा....

**सदस्य, श्री. राजेश वानखेडे:-**इकडन पास करा, तिकडून पास करुन आणण्याची जबाबदारी आमची.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-**जर तुम्हांला नाव दयायचेच असेल तर मुंबई सेंर्टला नाव देण्याबाबत शिफारस करा.

**सदस्य, श्री. राजेश वानखेडे:-**पास..पास..

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-**माझा विरोध असेल.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** पास..पास..

**सदस्य, श्री. राजेश वानखेडे:-**मतदान घ्या, मतदान घ्या.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-** शहाड स्टेशनला शहीद भगत कंवाराम नाव देण्यात यावे.

**सदस्य, श्री. शंकर लुंड:-** शहाडचा पण पास..

**सदस्य, श्री. राजेश वानखेडे:-**पास..पास.. ज्यांना विरोध आहे, त्यांनी विरोध करावा.

**सदस्य, श्री. शंकर लुंड:-**पास..पास..

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-** दोन्ही पास.

**सदस्य, श्री. राजेश वानखेडे:-**चौधरी साहेब आणि बोडारे साहेबांचे अभिनंदन आहे.

**महापालिका सचिव:-** हा विषय पास करण्यात येत आहे.

काही सदस्य :—पास—पास……

महापौर तथा पीठासीन अधिकारी :—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र.११ :-प्रस्तावाची सुचना**

**येत्या महासभेमध्ये उल्हासनगर रेल्वे स्टेशनचे नाव स्व.बाळासाहेब ठाकरे तसेच विठ्ठलवाडी रेल्वे स्टेशनचे नाव डॉ. बाबासाहेब आंबेडकर अशी नावे प्रस्तावीत करून प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठविणेबाबत.**

**प्रस्तावना**

वरील विषयानुसार विनंती पूर्वक सांगू इच्छितो की, उल्हासनगर महापालिका क्षेत्रात उल्हासनगर रेल्वे स्टेशन व विठ्ठलवाडी रेल्वे स्टेशन हे दोन रेल्वे स्टेशन येत असून दररोज लाखो प्रवासी प्रवास करतआहेत.आमच्या शहरातील नागरिकांची अशी मागणी आहे की, वंदनीय हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे असे उल्हासनगर रेल्वे स्टेशनचे नामकरण करण्यात यावे तसेच विठ्ठलवाडी रेल्वे स्टेशनचे नाव संविधान निर्माते परम पुज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यात यावे. तसे नामकरणाचे अशासीकय प्रस्ताव येत्या महासभेत चर्चा विचार विनिमय करण्यात येवून प्रस्ताव पास करून राज्य सरकारकडे पाठविण्यात यावे हि नम्र विनंती.

**महासभा ठराव क्र. ५२** **दिनांक २०/०१/२०२२**

**सुचकाचे नाव :- श्री. राजेश वदारिया**

**अनुमोदकाचे नाव :- श्री. मनोज सयानी**

**ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे येत्या महासभेमध्ये उल्हासनगर रेल्वे स्टेशनचे नाव स्व.बाळासाहेब ठाकरे तसेच विठ्ठलवाडी रेल्वे स्टेशनचे नाव डॉ. बाबासाहेब आंबेडकर तसेच शहाड रेल्वे स्टेशनला शहीद 'भगत कंवरराम नाव देण्याची शिफारस करुन सदर प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यास प्रशासनास निर्देश देत आहे.**

**सुचकाची सही/-**

**अनुमोदकाची सही /-**

**सर्वानुमते**

**महापौर/पीठासीन अधिकारी**
**सर्वसाधारण महासभा**
**उल्हासनगर महानगरपालिका**

---

महापालिका सचिव:— विषय क्र. १२ वाचुन दाखवितात.

---

⇨ विषय क्र. १२:—**प्रस्तावाची सुचना**

**दिनांक ०१ जानेवारी २०२२ ते ३१ जानेवारी २०२२ मालमत्ता कर भरण्याकरिता अभय योजना राबविणे बाबत. पालिका सदस्य, सुचक म्हणुन श्री. राजेंद्र चौधरी व अनुमोदक श्री. राजेश वानखेडे यांचा प्रस्ताव विचारातघेणे.**

---

**<u>सदस्य, श्री. शंकर लुंड:-</u>** विषय काय आहे, पहिले प्रस्ताव तर सांगा.

**<u>उप आयुक्त (कर), श्रीम. प्रियंका राजपुत:-</u>** विषय क्र. १२ मध्ये प्रशासनाला मत नोंदवायचे आहे.

**<u>सदस्य, श्री. राजेश वानखेडे:-</u>**विषय क्र. १२ पण पास.

**<u>महापालिका सचिव:-</u>** राजपुत मॅडमला बोलायचे आहे.

**<u>सदस्य, श्री. राजेश वानखेडे:-</u>**१२ वा विषय पण पास करुन घ्या.

**<u>महापालिका सचिव:-</u>**प्रियंका मॅडम तुम्हांला महापौर मॅडमने बोलायला सांगितले आहे.

**<u>उप आयुक्त (कर), श्रीम. प्रियंका राजपुत:-</u>**१२ नंबर विषयावर मला सभागृहाला माहीती दयायची आहे,

**<u>सदस्य, श्री. राजेश वानखेडे:-</u>**नाही, नाही मुख्यमंत्री यांनी सांगितले आहे की, टॅक्स माफ होणार आहे. पालकमंत्री यांनी पण सांगितले आहे माफ करा म्हणून.

**<u>उप आयुक्त (कर), श्रीम. प्रियंका राजपुत:-</u>**लागू असलेली विलंब शास्ती माफ करण्याचे अधिकार फक्त् आणि फक्त् आयुक्तांना आहेत. आयुक्त् महानगरपालिका यांना आहेत. त्यामुळे पहिले मत प्रशासनाचे असे आहे की अभय योजना लागू करण्याचे सर्व अधिकार नियमाप्रमाणे आयुक्तांना आहेत. तसा निर्णय आयुक्तांनी घेतला पाहिजे. सर्व साधारण सभेवर हा विषय मांडता येत नाही.त्याचा निर्णय घेणे आणि त्याचयावर ...

**<u>सदस्य, श्री. राजेश वानखेडे:-</u>**मॅडम पास करुन टाका.

**<u>उप आयुक्त (कर), श्रीम. प्रियंका राजपुत:-</u>**आता पर्यंत

**<u>सदस्य, श्री. राजेश वानखेडे:-</u>**आम्ही पास करणार आहेत, तुम्ही विखंडीत करा.

**<u>उप आयुक्त (कर), श्रीम. प्रियंका राजपुत:-</u>**आता पर्यंत ७ वर्षे गेली अभय योजना लागू करण्यात आली होती. सन २०१४-२०१५ पासून आपण अभय योजना लागू केली आहे. आता ७ वर्षे झाली ७ वर्षात् अभय योजनेमागे महापालिकेचे ६८ करोड ८२ लाख रुपये नुकसान झालेले आहे. म्हणजे जवळ जवळ..

**<u>सदस्य, श्री. राजेश वानखेडे:-</u>**संपुर्ण महापालिका नुकसानीमध्ये आहे.

**<u>सदस्य, श्री. शंकर लुंड:-</u>** लोकांकडे पैसे कुठे आहेत?

**<u>उप आयुक्त (कर), श्रीम. प्रियंका राजपुत:-</u>**दोन प्रकारची सुट देण्यात आली आहे. सप्टेंबर पर्यंत भरणा केला तर ३ टक्के सुट देतो. जे प्रमाणिकपणे कर भरतात, त्यांच्या बरोबर आपण हे चुकीचे करीत आहोत. त्यांना वाटते मार्चमध्ये अभय योजना येईल. त्यामुळे प्रशासनाचे स्पष्ट मत आहे की अभय योजना लागू करण्यात येऊ नये. प्रशासन सक्षम आहे, जो काही कर आहे, त्याची आपण वसुली करु.

**<u>सदस्य, श्री. शंकर लुंड:-</u>** ठराव विखंडीत करायचा असेल तर आयुक्त साहेब विखंडीत करु शकतात.

**<u>सदस्या, श्रीम. वसुधा बोडारे:-</u>** आपल्याकडे जे टॅक्स वसुल होते, त्या टॅक्स पावत्या महीला वाटतात, त्यांना पगार मिळत नाही, तर तुम्ही जे काही वसुल कराल, त्याच्या आधी त्या बिचा-या महीला टॅक्स पावत्या वाटतात त्यांना पगार देण्यात यावे. योजना लागेल तेव्हा लागेल ठिक आहे पण अगोदर वसुल केलेले असून त्यांनी बिले वाटलेले आहेत, त्यामुळे तुमचे कलेक्शन झाले आहे. त्यामुळे त्यांचे पगार पहीले करण्यात यावे.

**<u>सदस्या, श्रीम. अंजली साळवे:-</u>** सहा सहा महिने मॅडम त्यांचे पगार होत नाही.

**<u>सदस्या, श्रीम. वसुधा बोडारे:-</u>**बचत गटाच्या महिलांनी टॅक्स वसुल पण केले आहे, तर त्यांना सहा सहा महिने पगार दिले नाही.

**<u>सदस्या, श्रीम. अंजली साळवे:-</u>**त्यांना पगार लवकर कसे मिळेल ते बघा.

**<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-</u>** मा. महापौरजी, आपण मागच्या वेळेचा रेकॉर्ड बघितला तर चांगला प्रतिसाद मिळाला आहे, लोकांनाकडे उत्पन्न आले आहे. लोक भरण्यासाठी तयार झाले आहेत. मॅडम आपल्याला धन्यवाद देतो की, आपण सक्तीने काम करीत आहेत. लोकांकडे पैसे नाहीत. त्यामुळे ते भरु शकत नाहीत. शास्ती जास्त आहे आणि मागचया चार वर्षाचा रेकॉर्ड बघितला तर जेव्हा अभय योजना लागली आहे, तेव्हा वसुली वाढले आहे. आपण वसुली वाढवा आणि अभय योजना लागू करा. जर अभय योजना येईल तर लोक पैसे भरतील. कोरोनाकाळामध्ये लोकांकडे पैसे कमी होते. पैसे कमवले नव्हते, आता लोकांकडे पैसे आहेत. असे वाटेल की, आपण कोरोनाकाळामध्ये मदत केली आहे. शहरासाठी लोकप्रतिनिधी जसे की, श्री. राजेंद्र चौधरी यांनी प्रस्ताव आणला आहे. हे कारोना काळामध्ये लागू झाले पाहीजे तर मी त्यांना धन्यवाद देतो आणि हे शहर हितासाठी विचार करीत आहेत, त्यांना पण धन्यवाद देतो. जनता पैसे भरायला तयार आहे. आम्हाला फक्त् व्याज माफ करुन दया. आता शहरामध्ये पैसे आले आहेत. लोक आपल्यासाठी पैसे घेऊन बसले आहेत.फक्त् एकच गोष्ट मागत आहेत की, टॅक्सचा फक्त् व्याज माफ करा. तर मी प्रशासनाला विनंती करतो की, कृपया करुन अभय योजना २१ दिवसासाठी आणण्यात यावी. ही शेवटची अभय योजना आहे आणि नंतर निवडणूक आली आहे. आपल्याला उत्पन्न मिळेल आणि मागचा रेकॉर्ड बघितला तर जेव्हा अभय योजना लागली आहे, त्यासाठी लाखो करोडो रुपये मिळाले आहेत. आम्ही आमच्या वार्डामधून करोडो रुपये आणून दिले आहेत. आता पण लाखो, करोडो रुपये आणून देवू त्यासाठी लोकांना सवलत दया आणि अभय योजना लागू करा, धन्यवाद.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-</u>** महापौर मॅडम माझी एक विनंती आहे की,६७ करोडचे नुकसान झाले आहे. आपली महानगरपालिका व्यापार करण्यासाठीच बसली आहे. मुंबई महानगरपालिकेने ५०० स्केअर फुटाची टॅक्स माफ केली आहे. लोकांच्या मागणीचा विचार करा, नुकसान किती झाले आहे त्याचा विचार करु नका. दोन वर्षापासून लोक कोरोनाशी लढत आहेत. सरकारने कोणाच्या खात्यामध्ये पैसे टाकले नाहीत. जे लोक शहरामध्ये राहत आहेत, त्यांना व्याजामध्ये माफी दया. हे आयुक्त साहेबच करु शकतात. आम्ही आपल्याला प्रस्ताव दिला आहे. आम्ही जनतेच्या प्रती जबाबदार आहे. आयुक्तांच्या प्रती जबाबदार नाही. त्यामुळे माझी सभागृहाला विनंती राहील की, श्री. राजेंद्र चौधरी व श्री. राजेश वानखेडे यांनी हा प्रस्ताव आणला आहे. आशा वेळी आणला आहे की, जनता आपल्याला आर्शिवाद देईल. आपण दंडात्मक पैसे वसुल करु शकणार नाही. कमीत कमी दोन वर्षे कारोनामुळे लोकांना त्रास झाला आहे. जनतेसाठी कठिण वेळ आहे, त्यावेळी लोक प्रतिनिधी जनतेसमोर उभा राहणार नाही तर जनतेचा विश्वास राहणार नाही. तरी आपण अभय योजनेचा लाभ देण्यात यावा.

**<u>सदस्य, श्री. राजेश वानखेडे:-</u>** विषय पास करण्यात यावा.

**<u>सदस्य, श्री. शंकर लुंड:-</u>** विषय पास करा आणि लवकरात लवकर अभय योजना लावा.

**<u>महापालिका सचिव:-</u>** महापौर मॅडमने श्री. आशान सरांना बोलायला सांगितले आहे.

**<u>सदस्य, श्री. शंकर लुंड:-</u>**पब्लिकसाठी लवकरात लवकर अभय योजना लागली पाहीजे. गरीबांना फायदा देवू शकतो.

**<u>महापालिका सचिव:-</u>** आशान साहेब तुमचा आवाज येत नाही. तुमचा आवाज मध्येच ब्लॉक होत आहे, आवाज येत नाही. शांत रहा मॅडमने अरुण आशान साहेबांना बोलायला सांगितले आहे.

**<u>सदस्य, श्री. राजेश वानखेडे:-</u>** उप महापौर तुम्ही बोला.

**<u>सदस्य, श्री. अरुण आशान:-</u>** माझा आवाज येत आहे का?

**<u>महापालिका सचिव:-</u>** होय येत आहे, तुम्ही बोला. बाकीच्यानी कृपया करुन शांत रहावे.

**<u>सदस्य, श्री. अरुण आशान:-</u>**हा जो प्रस्ताव श्री. राजेंद्र चौधरी साहेबांनी व वानखेडे साहेबांनी आणलेला आहे. खरे म्हटले तर या प्रस्तावाचे स्वागतच आहे. कारण आता कोरोनाची तिसरी लाट जगामधून निघून गेली आहे. दोन वर्षे लोक घरी बसून आहेत. अशा वेळेस काही लोक पैसे भरायला तयार असतांना आता आशा वेळेस त्यांना दंडमाफी करुन जर का त्यांना अभय योजना दिली....

**<u>महापालिका सचिव:-</u>** रामचंदानी सर आपण जे बोलत आहेत, ते ऐकायला येत आहे.

**<u>सदस्य, श्री. अरुण आशान:-</u>**०१ फेब्रुवारी, २०२२ एक महीन्या करीता जर का अभय योजना आणली तर मला वाटते या एका महीन्याच्या कालावधीमध्ये बरेच लोक या अभय योजनेचा लाभ घेतील आणि कालावधी कमी असल्यामुळे या महानगरपालिकेच्या तिजोरीमध्ये पैसे जमा होईल. तर मला वाटते या दोन कोरोनाच्या, तिस-या कोरोनाच्या लाटेचा विचार करता आणि लोकांच्या परिस्थितीचा विचार करता, महासभेने हा प्रस्ताव सर्व संमतीने सदस्यानी सांगितले की, अभय योजना लागली पाहीजे. तर प्रशासनाला माझी अशी विंनती आहे की, लोकांचा जनतेचा विचार करता, या कोरोनाचा विचार करता ०१ फेब्रुवारी ते २८ फेब्रुवारी पर्यंत अभय योजना लागू करण्यात यावी. अशी मी प्रशासनाला विनंती करतो.

**<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-</u>**मा. महापौरजी, इतिहासामध्ये पहीली वेळ असेल की, सत्ताधारी व विरोधी पार्टी यांनी मिळून हा प्रस्ताव आणला आहे. इतिहास आहे की, शहराच्या हितासाठी प्रस्ताव आणला आहे.

**<u>सदस्य, श्री. राजेश वानखेडे:-</u>** धन्यवाद, धन्यवाद.

**<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-</u>**मी चौधरी साहेबांना अभिनंदन करतो आज टॅक्स वसुलीसाठी लोक घरोघरी जात आहेत आणि नंतर लोक स्वत: तुमच्या जवळ चालून येतील. पैसे आपल्याकडे चालत येईल लोक स्वत: भरण्यासाठी येतील. आज उलटे होत आहेत की, आपण वसुलीसाठी जात आहेत. तर कृपया करुन १ फेब्रुवारी ते ३१ मार्च पर्यंत अभय योजना लागू करण्यात यावी.

**<u>सदस्य, श्री. मनोज सयानी:-</u>** मा. महापौरजी, शहराची आजची स्थिती जर बघितली तर, आपला शहर व्यापारी शहर आहे. संपुर्ण विश्वामध्ये मंदीमुळे त्याचा प्रत्येक आपल्या व्यापारी शहरावर पडत आहे आणि सर्वांत जास्त कर भरणारे व्यापारी लोक आहेत. तर आजची परिस्थिती बघितली तर त्यांच्या वरील बोजा कमी करण्याचा प्रयत्न करण्यात यावा. मोठमोठया महानगरपालिका मुंबई महानगरपालिका, पी.एम.सी. आणि इतर महानगरपालिकेमध्ये नोव्हेंबरमध्ये अभय योजना चालू आहे आणि या अभय योजनेचा फायदा कोव्हीड मधला व्याज माफ करायचा आहे. जसे की, श्री. अरुण आशान यांनी सांगितले की, ०१ फेब्रुवारी, ते २८ फेब्रुवारी अभय योजनेचा लाभ दयायला पाहीजे आणि जे पण थकबाकीदार आहेत, ते अभय योजनेचा लाभ जर घेणार नाहीत तर त्यांच्यावर ठोस कारवाई करायला पाहीजे. आपला आर्थिक वर्षे संपेपर्यंत जर कोणी अभय योजना लागू केल्यानंतर भरत नसतील तर त्यांच्यावर सक्त् कारवाई करायला पाहीजे. २८ फेब्रुवारी पर्यंत लोकांना लाभ देण्यात यावा आणि कोरोनाच्या काळामध्ये लोकांनी व्याज भरला नाही, किंवा मागच्या तीन वर्षापासून लोकांनी कर भरला नाही, मंदी आल्यानंतर भरले नाही. या गोष्टींमुळे लोकांना लाभ देण्यात यावा, धन्यवाद.

**<u>सदस्य, श्री.प्रदिप रामचंदानी:-</u>** २८ दिवसाची संधी शहराला दयायला पाहीजे.अशी माझी कळकळीची विंनती आहे.

**<u>सदस्य, श्री. शंकर लुंड:-</u>** सर्वसंमतीने पास आशान सरांनी सांगितले आहे की, २८ फेब्रुवारी पर्यंत लागू करण्यात यावी.

**<u>सदस्य, श्री.मनोज सयानी:-</u>** इतिवृत्ताची वाट न पहाता पास..

**<u>सदस्य, श्री. शंकर लुंड:-</u>**इतिवृत्ताची वाट न पहाता पास..

**<u>महापालिका सचिव:-</u>** ठराव वाचत आहे, ही महासभा अभय योजनेसाठी दिनांक ०१ फेब्रुवारी ते २८ फेब्रुवारी पर्यंत राबवण्यासाठी ...

**<u>उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-</u>** जरा ऐकुन घ्या, शांत रहा.

**<u>महापालिका सचिव:-</u>**०१ ते २८ फेब्रुवारी पर्यंत १०० टक्के शास्ती माफ.

**<u>सदस्य, श्री. अरुण आशान:-</u>**पहीला ठराव रदद करुन.

**<u>महापालिका सचिव:-</u>** पहीला ठराव रद करुन हा ठराव मान्य करण्यात येत आहे.

**<u>सदस्य, श्री. अरुण आशान:-</u>**पास..पास.. धन्यवाद.

**<u>सदस्य, श्री.प्रदिप रामचंदानी:-</u>**पास..पास.. धन्यवाद.

**<u>सदस्य, श्री. मनोज सयानी:-</u>** इतिवृत्ताची वाट न पहाता, पास..पास..

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी:—</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र.१२:- <u>प्रस्तावाची सुचना</u>**

**दि.०१ जानेवारी २०२२ ते ३१ जानेवारी २०२२ मालमत्ता कर भरण्याकरीता अभय योजना राबविणेबाबत. पालिका सदस्य, सुचक म्हणून श्री. राजेंद्र चौधरी व अनुमोदक श्री. राजेश वानखेडे यांचा प्रस्ताव विचारात घेणे.**

**प्रस्तावना**

उपरोक्त विषयान्वये उल्हासनगर शहराचे प्रमुख उत्पन्् हे जकात /एलबीटी मार्गातून मिळणारे प्रमुख उत्पन्न यापूर्वी होते परंतु शासन धोरणेनुसार जकात/एलबीटी बंद झाल्याने आता महापालिकेचे प्रमुख उत्पन्न हे मालमत्ता कर व इतर उत्पन्न असून या मिळणाऱ्या उत्पन्नावर विकासाची व इतर खर्चाची देणीची तोंडमिळवणी करण्यास अडचणींना सामोरे जावे लागत आहे. असे असताना सद्या मालमत्ता कराची वसूली देखील कमी प्रमाणात होत असल्याने 100 टक्के वसूली करीता महापालिका प्रशासन प्रयत्न करीत असून, दि. 01 जानेवारी 2022 ते जानेवारी 2022 पर्यंत अभय योजना राबविल्यास नागरिक त्या संधीचा फायदा घेवून आपल्याकडील थकित मालमत्ता कर वेळेत भरतील व महापालिकेच्या उत्पन्नात भर पडेल.

तरी उल्हासनगर शहरात अभय योजना राबविण्याबाबत या अशासकिय प्रस्तावाद्वारे प्रस्तावित करीत आून, येत्या महासभे मध्ये चर्चा होवून धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा, हि विनंती.

**महासभा ठराव क्र. ५३** **दिनांक २०/०१/२०२२**

**सुचकाचे नाव :- श्री. राजेंद्र चौधरी, श्री. किशोर वनवारी**

**अनुमोदकाचे नाव :- श्री. राजेश वानखेडे, श्री. कलवंतसिंह सोहता**

**ही महासभा वरील प्रस्तावनेनुसारयापुर्वी झालेला महासभा ठराव क्र.३२, दिनांक ९/१०/२०१७ निरस्त करुनदि.०१ फेब्रुवारी २०२२ ते २८ फेब्रुवारी२०२२ पर्यंत १०० % शास्ती माफ करुन मालमत्ता कर भरण्याकरीता अभय योजना राबविणेबाबत मान्यता देत आहे.**

**या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.**

**सुचकाची सही /-**

**अनुमोदकाची सही /-**

**सर्वानुमते**

**महापौर/पीठासीन अधिकारी**

**सर्वसाधारण महासभा**

**उल्हासनगर महानगरपालिका**

---

महापालिका सचिव:— विषय क्र. १३ वाचुन दाखवितात.

---

⇨ विषय क्र. १३:—**प्रस्तावाची सुचना**

**स्ट्रक्चरल ऑडिट पॅनल चे मार्फत जुन्या इमारतीचे अहवाल देता नादुरुस्तीसाठी अवाच्या सवा खर्च दर्शवु नत्यांचे स्वत:च्या व मर्जीच्या ठेकेदारांकडुन इमारत दुरुस्ती बांधकाम करण्याची अटशिथिल करणेबाबत. पालिका सदस्य, सुचक श्री.राजेंद्रसिंह भुल्लर यांचा प्रस्ताव विचारात घेणे.**

---

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-** सन्माननिय महापौरजी, महापालिकेने स्ट्रक्चरल ऑडीटर ठेवले आहेत, इतर बिल्डींगवाल्याना अर्ध्या साईटने ऑडीट करतात.

**सदस्य, श्री. अरुण आशान:-** महापौरजी, भुल्लर महाराजांनी जो अशासकीय प्रस्ताव आणला आहे, महाराजांचे स्वागत करायला पाहीजे.

**सदस्य, श्री. राजेश वानखेडे:-** भुल्लर महाराजांनी आणलेला विषय पास करा. महापौर मॅडम भुल्लर महाराजांनी आणलेला विषय पास करुन घ्या. महाराजांनी खुप चांगला प्रस्ताव आणला आहे.

**महापालिका सचिव:-** आशान साहेब तुमचा आवाज येत नाही.

**सदस्य, श्री. राजेश वानखेडे:-**भुल्लर महाराजांनी आणलेला विषय पास..

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** विषय पास झाला आहे, पुढचा विषय घ्या १४ नंबरचा घ्या.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-**१३ नंबरचा पास ना.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-**पास..पास..

**महापालिका सचिव:-** पास झाला आहे, तुम्ही लिहीले आहे, अटी शिथील करणेस कोणत्या अटी आहेत?

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-**आता स्ट्रक्चरल ऑडीट ठेवले आहेत..

**महापालिका सचिव:-**अट शिथील करायची आहे, कोणती अट शिथील करायची आहे?

**सदस्य, श्री. राजेश वानखेडे:-**महाराजजीचा प्रस्ताव पास करा.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-**१३ नंबर, १४ नंबर विषय मागे घेत आहे.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** १३ नंबर आणि १४ नंबरचा एकच आहे का?

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-**१४ नंबरचा विषय मागे घेत आहे.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** महाराजजी दोन्ही विषय मागे घेत आहेत.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-**१३ नंबरचा मागे घेतला नाही.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-**महाराजांचे अभिनंदन १३ मागे घेतले आहेत.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-**१३ मागे घेतला नाही.

**महापालिका सचिव:-** स्ट्रक्चरल ऑडीट विषय कोणती अट शिथील करावयाची आहे? आपण ठराव वाचा.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-**मॅडम ठराव तुम्हांला बनवून देतो.

**महापालिका सचिव:-**परंतु ठराव इथे वाचायला लागेल. थोडेफार वाचा नंतर हे लोक बोलतील की, आपण...

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-**कोणीच बोलणार नाही मॅडम.

**महापालिका सचिव:-** सर्वांना मान्य असेल तर बोला मी नंतर ठराव लिहील.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-**सर्वांना मान्य आहे. पास..पास..

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-**महाराजजींने दोन्ही विषय मागे घेतले आहे, त्यांचे अभिनंदन.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:-** प्रदिपजी तुम्हांला काही समज आहे की नाही.

**सदस्य, श्री. शंकर लुंड:-** महाराजजी अभिनंदन.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:-**कसे फायदेशिर ठरेल एवढच फक्त् त्याच्यामध्ये आहे, पुर्वी आम्ही ठराव पारीत केलेला आहे. तो ठराव कायम करण्यात यावा. कारण मध्यतरी आम्ही पॅनलवरील घेतले. त्यामुळे त्यांची मक्तेदारी झालेली आहे. त्यामुळे ते लोक त्यांचे ठेकेदार घेतात, त्यांच्या ठेकेदारांकडून काम करुन घेतले तर कमी खर्चामध्ये ...

**महापालिका सचिव:-** ठिक आहे, तुम्ही मला मागचा ठराव दया, त्यानुसार अटी शर्तीनुसार ठराव करता येईल.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:-**परवानाधारक सिव्हील इंजिनियरकडून ऑडीट करुन घेऊन देण्यात यावा. अशा प्रकारचा आमचा प्रस्ताव आहे.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** ठिक आहे,१३ नंबर पास झालेला आहे, १४ नंबरवर बोला.

काही सदस्य :—पास—पास......

महापौर तथा पीठासीन अधिकारी :—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

## ☑ विषय क्र.१३:-<u>प्रस्तावाची सुचना</u>

स्ट्रक्चरल ऑडिट पॅनलचे मार्फत जुन्या इमारतीचे अहवाल देताना दुरुस्तीसाठी अवाच्यासवा खर्च दर्शवून त्यांचे स्वत:च्या व मर्जीच्या ठेकेदारांकडून इमारत दुरुस्ती बांधकाम करण्याची अट शिथिल करणेबाबत.पालिका सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

**प्रस्तावना**

उपरोक्त अशासकीय प्रस्तावाद्वारे लक्ष वेधु इच्छितो की, उल्हासनगर महानगरपालिका हददीत निकृष्ट बांधकाम असलेल्या ५०५ जुन्या इमारती अस्तित्वात असल्याची खात्रीदायक माहिती आहे. शहरातील १० वर्षे जुन्या इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याचा महापालिकेने निर्णय घेतला आहे. अशा सर्व इमारतींना नोटीसा पाठवल्या जात त्यांना योग्य स्ट्रक्चरल इंजिनियर मार्फत स्ट्रक्चरल ऑडिट करण्यास सांगितले आहे. इंजिनियरच्या अहवालानुसार इमारतीचे वर्गीकरण केले आहे. १९९५ च्या आसपास बांधलेल्या सर्व असुरक्षित /धोकादायक इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याची गरज अधोरेखित केली होती. टप्प्याटप्प्याने अतिधोकादायक इमारतीचे तोडण्याचा निर्णय घेण्यात आला. दुरुस्त करण्या योग्य असतील तर संरचनात्मक अहवाल लवकर सादर करुन इमारती बांधकाम दुरुस्ती करावी.

यासाठी महापालिकेने स्थापन केलेल्या पॅनलद्वारे या इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याची प्रक्रिया सुरु झाली. या अगोदर देखील इमारत बांधकाम नियमाधीत (रेग्युलाईजेशन) करण्यासाठी नागरीकांना भुर्दंड बसला आहे. तेच प्रलंबित असताना कोरोना महामारीचे संकट, सलग वर्षभर लॉकडाउन, रोजगार नसल्याने नागरीकांना प्रपंच चालवणे मुश्किल झाले आहे. अशात इमारत कोसळून जीवीत हानी होण्याची भितीने नागरीक धासतावले आहेत. इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यासाठी सुध्दा सदनिकाधारकांना पैसा गोळा करण्यासाठी दमछाक करावी लागत आहे.

स्ट्रक्चरल इंजिनियर अहवालात सुचवलेल्या जुन्या इमारतीचे दुरुस्तीचा खर्च अवाच्यासवा आहे. जो नागरीकांना पेलवणार नाही. स्ट्रक्चरल इंजिनियरने सुचवलेल्या बांधकाम दुरुस्ती त्यांच्या मर्जीतल्या ठेकेदारामार्फत करण्याची जी अट बंधनकारक केली आहे ती अत्यंत चुकीचे व जाचक आहे. त्यांचेकडून मोठया प्रमाणात सदनिकाधारकांची फसवणुक व लुट सुरु आहे. सदनिकाधारकांनी परवानाधारक सिव्हील इंजिनियर/परवानाधारक इमारत बांधकाम तज्ञ मार्फत सदर इमारतीचे बांधकाम करण्याची मुभा देण्यात आली पाहिजे जेणेकरुन सदनिकाधारकांनासाठी तो खर्च किफायतशीर व फायदेशीर ठरेल.

तरी यावर येत्या महासभेत सविस्तर सखोल चर्चा होवून धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा, ही विनंती.

**महासभा ठराव क्र. ५४** **दिनांक २०/०१/२०२२**

**सुचकाचे नाव :- श्री. राजेंद्रसिंह चौधरी**

**अनुमोदकाचे नाव :- श्री. धनंजय बोडारे**

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे प्रशासनास निर्देश देत आहे की, उल्हासनगर महानगरपालिका हददीतील जुन्या निकृष्ट व धोकादायक इमारतीचे स्थापत्य अभियांत्रिकी बांधकामाचे संरचनात्मक लेखा परिक्षण (स्ट्रक्चरल ऑडीट) करण्यास मुंबई महानगर प्रदेश प्राधिकरण क्षेत्रातील किमान १० वर्षाचा इमारत स्थापत्य अभियांत्रिकी बांधकामाचे अनुभव असलेल्या (BE) अभियांत्रिकी पदवी अनुभव असलेल्या तसेच बांधकामाचा आणि स्ट्रक्चरल ऑडिटचा शासकिय /निमशासकिय /खाजगीसंस्था व सोसायटीचा अनुभव असलेल्या स्थापत्य अभियंतांचा उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील स्ट्रक्चरल ऑडिट करण्यास मान्यता देत आहे. यापुर्वी महापालिकेने नियुक्त केलेल्या पॅनेलमध्ये याचा समावेश करण्यात येत आहे. तसेच त्यांचा संरचनात्मक बांधकाम परिक्षण अहवाल ग्राहय धरण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही /-

अनुमोदकाची सही /-

सर्वानुमते

महापौर/पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

महापालिका सचिवः— विषय क्र. १४ वाचुन दाखवितात.

---

➪ विषय क्र. १४:—**प्रस्तावाची सुचना**

**दिनांक ०२/१२/२०२१ रोजी महासभा ठराव क्रं. ३६ मधील अटी व शर्तीमध्ये अंशत: बदल करणेबाबत. पालिका सदस्य, सुचक श्री.राजेंद्रसिंह भुल्लर यांचा प्रस्ताव विचारात घेणे.**

---

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** १४ नंबरचा पास..पास..

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-**१४ नंबरचा मागे घेतला आहे.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-**नाही, नाही, मागे नाही पास.. पास..

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-**मागे घेतला आहे.

**महापालिका सचिव:-** भुल्लर महाराजांनी प्रस्ताव मागे घेतला आहे, त्यामुळे विषय संपुष्टात आला आहे.

महापालिका सचिवः— विषय क्र. १५ वाचुन दाखवितात.

---

➪ विषय क्र. १५:—**प्रस्तावाची सुचना**

**६ व्या व ७ व्या वेतन आयोगामध्ये काही नमुद असले तरी, प्रशासकीय कामाच्या दृष्टीने एल.एस.जी.डी, (LSGD), एल.जी.एस (LGS), डी.उल.जी.एफ.एम (DLGFM), एम.ए. मराठी (MA- Marathi) अभ्यास क्रमपुर्ण केलेल्या महानगरपालिका आस्थापनेवर कार्यरत अधिकारी /कर्मचा-यांना देण्यात आलेल्या वेतनवाढी कायम ठेवुनया पुढे सदरच्या योजना रदद करणेबाबत. .पालिका सदस्य,सुचक श्री. धनंजयबोडारे, श्री. किशोरवनवारी, श्री.दिपकसिरवानी, डॉ. प्रकाश नाथानी, व अनुमोदक श्री. शेखर यादव,श्री. शंकर लुंड, श्रीम. डिम्पल ठाकुर यांचा प्रस्ताव विचारात घेणे.**

---

**सदस्या, श्रीम. डिम्पल ठाकुर:-** मा. महापौर, नमस्कार माझी विनंती आहे की, हा जो **एल.एस.जी.डी, (LSGD), एल.जी.एस (LGS), डी.उल.जी.एफ.एम (DLGFM), एम.ए. मराठी (MA- Marathi).....**

**महापालिका सचिव:-**मॅडम तुमचा आवाज येत नाही. ठाकुर मॅडम.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:-** माझा आवाज येत आहे का?

**महापालिका सचिव:-** होय तुमचा आवाज येत आहे. तुम्ही बोला.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:-** तुमचा आवाज येत आहे, बोला.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:-** हे जे परिक्षा पास झालेल्या लोकांना आम्ही ज्या वेतनवाढ दिल्या होत्या, परंतु ६ व्या व ७ व्या वेतन आयोगामध्ये असे स्पष्ट नाही लिहीले की, त्या परत मागे घेण्यात याव्या म्हणून परंतु आस्थापनेवरचा खर्च वाढत आहे म्हणून अशा वेतनवाढ रदद करावी अशा प्रकारची मानसिकता प्रशासनाची आहे म्हणून तशा सुचना किंवा नोटीस काढलेल्या आहेत. तर माझी एक विनंती आहे की, अशा प्रकारच्या परिक्षा पास झालेल्या यापुर्वीच्या महासभेच्या ठरावानुसार त्या कर्मचा-यांना/अधिका-यांना ती वेतनवाढ दिली आहे ती रदद करु नये. कारण की, महासभेचा अपमान होईल. त्या पुढील पाहीजे तर रदद करा. परंतु या पुर्वी जे

चालू आहेत, ते रदद करु नये अशी माझी विनंती आहे आणि तशा प्रकारचा प्रस्ताव आम्ही महासभेमध्ये तुम्हांला देत आहे.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:-** मा. महापौरजी, या विषयावर मी बोलू इच्छितो की, आयुक्त साहेब, सचिव मॅडम, जसे की, कर्मचा-यांना शासनाच्या निर्णयानुसार एल.एस.जी.डी, (LSGD), एल.जी.एस (LGS), डी.एल.जी.एफ.एम (DLGFM), एम.ए. मराठी (MA- Marathi) दिले होते आणि शासन निर्णयानुसार दोन वेतनवाढ दिली आहे. आज पर्यंत ९० कर्मचा-यांना शासन निर्णयानुसार दिली गेलेली वेतनवाढ आता महानगरपालिका कोणत्या नियमानुसार थांबवत आहे.आपण शासनाकडून तसा प्रस्ताव आणला आहे का? परवानगी घेतली आहे का? कर्मचा-यांना सुचना दिली आहे का? कोणत्या नियमानुसार कपात करणार आहेत? त्याची सुचना किंवा जी.आर. सन २००६ च्या निर्णयानुसार त्याच्या नंतरही महापालिकेने कर्मचा-यांना परवानगी कशी दिली. माझ्या माहीती नुसार अगाऊ वेतनवाढ व चांगल्या कामासाठी दिली गेलेली वेतनवाढ गव्हर्नमेंटच्या नियमाने वेतनवाढ आपण आता रदद करु शकत नाहीत. महासभा ठराव खंडीत न करता डायरेक्ट अशी वेतन कपात करु शकत नाही. हा महासभेचा अपमान आहे. आपण प्रथम महासभेपुढे प्रस्ताव आणला पाहीजे. महासभेचा ठराव आपण डायरेक्ट उल्लंघन करु शकत नाहीत. आज पर्यंत दिलेली वेतनवाढ ही शासन निर्णयानुसार दिली आहे. आपल्याच शासन निर्णयाला आपण रदद केले आहे का? आता जी.आर. मध्ये लिहीले आहे की, ही वेतनवाढ रदद करा आणि अगाऊ वेतनवाढ थांबवण्यासाठी सुचना काढली आहे, ती चुकीची आहे. मुंबई महापालिकेचे कर्मचारी या विषयी कोर्टामध्ये गेले होते. कोर्टाने महासभेला आदेश दिले आहेत की, मा. पालकमंत्री यांनी पण ही गोष्ट शासनाकडे ठेवली आणि या विषयी शासन निर्णय काढला आहे. तर कृपया करुन आज पर्यंत कर्मचा-यांना जेवढी पण वेतनवाढ, दिली आहे, ती रदद करु शकत नाही. हा महासभेचा, शासनाच्या जी.आर. चा अपमान आहे. तर कृपया करुन दिलेली सुचना ही महासभा रदद करावी. ही महानगरपालिका आहे, आतापर्यंत दिलेली वेतनवाढ रदद न करता याच्यानंतर लागू करण्यात यावी, धन्यवाद.

**महापालिका सचिव:-** प्रशासन आपले मत मांडत आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-** मॅडम प्रशासन आपले मत मांडत आहे, परंतु कोणाला तरी उत्तर देवू दया.

**महापालिका सचिव:-** नाईकवाडे साहेब आले आहेत.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-**नाईकवाडे साहेब, उत्तर दया.

**उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-** मा. महापौर, उप महापौर, आयुक्त साहेब आणि सन्माननिय सदस्य गण, हा जो अशासकीय प्रस्ताव आणलेला आहे, या अनुषंगाने मी प्रशासनाच्या वतीने बाजू मांडत आहे. महानगरपालिकेत राज्य शासनाने सर्व शासनाचे कर्मचारी आणि अधिकारी यांना ६ वा आणि ७ वा वेतन आयोग लागू करण्यात आलेला आहे. या वेतन आयोगामध्ये कोणत्याही प्रकारच्या विशेष वेतनवाढ अनुज्ञेय नाही. हा शासनाचे धोरण आहे, शासनाचे धोरण बदलण्याचे अधिकार मला वाटते महासभेस नाही.आपण ते शासनाचे धोरण सुप्रसिध्द करु शकत नाही.त्या नंतर ....

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-**नाईकवाडे साहेब, एक मिनीट तुम्हांला थांबवतो, प्रशासन महासभेपेक्षा मोठे आहे का?

**उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-**मला प्रशासनाची बाजू मांडून दिली तर बरे होईल.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-**तुम्ही प्रशासनाची बाजू जरुर मांडा आपण महासभेला मार्गदर्शन बोलू नका.

**उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-**जो निर्णय मी महासभेचा मार्गदर्शन देत नाही, फक्त् प्रशासनाची जी तरतुद आहे, ती आपल्या निदर्शनास जाणीव पुर्वक आणत आहे. यामध्ये मी आपल्याला कोणत्याही प्रकारे मार्गदर्शन किंवा दिशादर्शक सांगत नाही. या अनुषंगाने आपल्या महापालिकेत ६३ लोकांना वेतनवाढ मंजूर करण्यात आलेल्या आहेत.कर्मचारी/अधिकारी यांना ५ ते ६ वेतनवाढी अशा प्रकारे देण्यात आलेल्या आहेत. प्रशासनाला दर महिन्याला ५ ते ६ हजार रुपये आर्थिक भार येत आहे आणि वेतन जे अनुज्ञेय

आहे, ते प्रोटेक्ट होते. जे वेतन अनुज्ञेय नाही ते कधीही प्रोटेक्ट होत नाही, आपण न्यायालयात गलो तरी सुध्दा. मिळत नाही. त्यामुळे अशा प्रकारे अनुज्ञेय नसलेल्या वेतनवाढी दिल्या गेलेल्या आहेत. त्या अनुज्ञेय नसलेल्या वेतनवाढी प्रशासनाने जर कमी केल्या तर आपल्याला साधारणत: महिन्याला ५ ते ६ लाख रुपये अतिरिक्त भार सोसावे लागत आहे. शिवाय अनुज्ञेय नसलेल्या वेतनाचा तो भार कमी होईल आणि वार्षिक ५० लाखापेक्षा आपल्या महापालिकेकडून अनधिकृत दिलेली रक्कम ही कमी होणार आहे. त्यामुळे आपण आपणास विंनती करतो की, शासनाचे जे धोरण आहे. त्या धोरणाची काटेकोरपणे अंमलबजावणी व्हावी आणि ते होण्यासाठी आपण सहकार्य करावे अशी मी प्रशासनाच्या वतीने आपल्याला विनंती करतो.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-**नाईकवाडे साहेब, आम्ही इथे अधिका-यांचे हित बघण्यासाठी बसले आहेत.धंदा करण्यासाठी बसलो नाहीत. महासभेला अधिकार आहे आपल्या कर्मचा-यांचा व अधिका-यांचा हित बघणे आणि त्यांच्या हितासाठी आम्ही ठराव करणार आहेत. तुम्हांला जायचे असेल तर शासनाकडे जावू शकतात. सन्माननिय सचिव मॅडम .

**महापालिका सचिव:-** बोला सर.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-**मी आपल्याला ठराव देत आहे, आपण वाचून दाखवा.

महापालिका सचिव:- **ठराव वाचत आहे. ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे६ व्या व ७ व्या वेतन आयोगात काहीही नमुद असले तरी, उल्हासनगर महानगरपालिका आस्थापनेवर कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांनी या ठरावापुर्वी शासन निर्णयानुसार महानगरपालिकेच्या परवानगीने एल.एस.जी.डी.** [LSGD] **व एल.जी.एस.** [LGS] **डी.एल.जी.एफ.एम.** [DLGFM] **एम.ए.**[M.A.] **मराठी अभ्यासक्रम पुर्ण केले आहे. अशा सर्व महापालिका अधिकारी/कर्मचारी यांना वेतनवाढ देण्यात यावी. तसेच यापुर्वी वेतनवाढ देण्यात आलेल्या ६३ अधिकारी/कर्मचारी यांना देण्यात आलेल्या वेतनवाढी रदद न करता पुर्ववत चालू ठेवणेस व प्रशिक्षणधारक सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना त्यानुसार पेन्शनमध्ये लाभ देणेस प्रशासनास निर्देश देत आहे.**

**तसेच**

**उल्हासनगर शहर हे सिंधी भाषिक शहर आहे. ते उल्हासनगर मधील निर्वासित म्हणून आले आहे. सिंधी भाषेचा दर्जा उंचावण्यासाठी उल्हासनगर महानगरपालिका आस्थापनेवर कार्यरत अधिकारी व कर्मचारी त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी सिंधी भाषेत एम.ए.पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या प्रत्येकी २ विशेष वेतनवाढ देण्यात यावी. नागरी व्यवस्थापन (पोस्ट ग्रॅज्युएट अर्बन मॅनेजमेंट डिपोल्मा), कायदयाचा अभ्यास केलेले (एल.एल.बी.), सार्वजनिक उपक्रम (एम.ए.इन पब्लिक पॉलिसी), नेतृत्वविज्ञान (एम.ए.इन लिडर चिफ सायन्स), समाजशास्त्र (एम.ए.इन सोसालॉजी) हे विविध अभ्यासक्रम मान्यताप्राप्त विद्यापिठातून पुर्ण केलेल्या सर्व पदविधारकांना प्रत्येकी अभ्यासक्रमानुसार प्रत्येकी २ विशेष वेतनवाढ देण्यात यावी. उल्हासनगर महानगरपालिका ही स्थानिक स्वराज्य संस्था असून ती सार्वभौम आहे. आम्हांला आमच्या कर्मचारी व अधिका-यांचे कल्याण करावयाचे आहे, हा महासभेचा अधिकार आहे.**

**या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.**

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:-**ओके, पास..पास..

काही सदस्य:—पास—पास......

महापौर तथा पीठासीन अधिकारी:—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र.१५:-प्रस्तावाची सुचना**

**६ व्या व ७ व्या वेतन आयोगामध्ये काही नमुद असले तरी, प्रशासकीय कामाच्या दृष्टीने** एल.एस.जी.डी. [LSGD] व एल.जी.एस. [LGS] **डी.एल. जी. एफ.एम.** [DLGFM]

**एम.ए.[M.A.] मराठी अभ्यासक्रम पुर्ण केलेल्या महानगरपालिका आस्थापनेवर कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांना देण्यात आलेल्या वेतनवाढी कायम ठेवून यापुढे सदरच्या योजना रदद करणेबाबत. पालिका सदस्य, सुचक श्री. धनंजय बोडारे, श्री. किशोर वनवारी, श्री. दिपक सिरवानी, डॉ. प्रकाश नाथानी, व अनुमोदक श्री. शेख्र यादव श्री. शंकर लुंड, श्रीमती डिम्पल ठाकूर यांचा प्रस्ताव विचारात घेणे.**

**प्रस्तावना**

उपरोक्त विषयांकित प्रकरणी प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिका ही स्थानिक स्वराज्य संस्था असुन ती सार्वभौम आहे. त्यामुळे विविध विषय/उपक्रमांची व नेतृत्व गुणांची गरज वाढण्याच्या दृष्टीने कर्मचारी वर्गाला त्या त्या क्षेत्रातील प्रशिक्षण /अभ्यासक्रमाची नितांत आवश्यकता आहे. यामुळे कर्मचाऱ्यांचे बौद्धिक विकास व शैक्षणिक पात्रता उंचावून आधुनिक युगामध्ये प्रशासनाच्या कामास गती मिळून उत्तम प्रशासकीय व्यवस्थापन चालवून शहरातील नागरिकांचे/जनतेचे काम त्वरीत होणेस हातभार लागेल.

उल्हासनगर महानगरपालिका सेवा शर्तीनुसार आस्थापनेवरील अधिकारी/ कर्मचारी यांना विविध प्रशिक्षण अनिवार्य करण्यात आले होते. याबाबत शासनाने देखील वारंवार आदेश/ सुचना निर्गमित केलेल्या आहेत. त्याद्दष्टीने उल्हासनगर महानगरपालिका आस्थापनेवर कार्यरत अधिकारी / कर्मचाऱ्यांचे मनोबल वाढवणेकरीता एल.एस.जी.डी. [LSGD] व एल.जी.एस. [LGS] अभ्यासक्रम तसेच महासभा ठराव क्र.43 दिनांक 24/08/2011 नुसार डी.एल.जी.एफ.एम.[DLGFM] अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर वेतनवाढी देण्यात आलेल्या आहेत.

महाराष्ट्र शासनाने महानगरपालिकेच्या दैनंदिन कामकाज 100 टक्के मराठी भाषेत व्हावे व मराठी भाषेचा अभ्यास करण्यास प्रोत्साहन मिळावे म्हणून मराठी सह एम.एम. या विषयात पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या/घेणाऱ्या उल्हासनगर महानगरपालिका आस्थापनेवरील अधिकारी /कर्मचाऱ्यांना महासभा ठराव क्र.66, दिनांक 09/01/2015 अन्वये वेतनवाढ देण्यात आली आहे.

६ व्या व ७ व्या वेतन आयोगामध्ये प्रशिक्षणासंबंधी देण्यात आलेल्या वेतनवाढी रदद करणेबाबत तरतुद दिसुन येत नाही. तसेच प्रशिक्षण पुर्ण करणारे अधिकारी/कर्मचारी यांना वेतनवाढीपासुन वंचित ठेवणे अथवा त्यांना देण्यात आलेल्या वेतनवाढी रदद करणे म्हणजे मा. महासभेचा अवमान होईल. त्याअनुषंगाने ६ व्या व ७ व्या वेतन आयोगामध्ये काही नमुद असले तरी, एल.एस.जी.डी. [LSGD] व एल.जी.एस. [LGS] डी.एल.जी.एफ.एम. [DLGFM] एम.ए.[M.A.] मराठी अभ्यासक्रम पुर्ण केलेल्या उल्हासनगर महानगरपालिका आस्थापनेवर कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांना देण्यात आलेल्या वेतनवाढी कायम ठेवून यापुढे सदरच्या योजना रदद करणेबाबतचा प्रस्ताव मंजूर करण्यात यावा.

**महासभा ठराव क्र. ५५** **दिनांक २०/०१/२०२२**

**सुचकाचे नाव :-श्री.धनंजय बोडारे, श्री. किशोर वनवारी,**

**श्री.दिपक सिरवानी, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर**

**अनुमोदकाचे नाव :-श्री. शंकर लुंड , श्री. चंद्रशेखर यादव**

**ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे ६ व्या व ७ व्या वेतन आयोगात काहीही नमुद असले तरी, उल्हासनगर महानगरपालिका आस्थापनेवर कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांनी या ठरावापुर्वी शासन निर्णयानुसार महानगरपालिकेच्या परवानगीने एल.एस.जी.डी. [LSGD] व एल.जी.एस. [LGS] डी.एल.जी.एफ.एम. [DLGFM] एम.ए.[M.A.] मराठी अभ्यासक्रम पुर्ण केले आहे. अशा सर्व महापालिका अधिकारी/कर्मचारी यांना वेतनवाढ देण्यात यावी. तसेच यापुर्वी वेतनवाढ देण्यात आलेल्या ६३ अधिकारी/कर्मचारी यांना देण्यात आलेल्या वेतनवाढी रदद न करता पुर्ववत चालू ठेवणेस व प्रशिक्षणधारक सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना त्यानुसार पेन्शनमध्ये लाभ देणेस प्रशासनास निर्देश देत आहे.**

**तसेच**

**उल्हासनगर शहर हे सिंधी भाषिक शहर आहे. ते उल्हासनगर मधील निर्वासित म्हणून आले आहे. सिंधी भाषेचा दर्जा उंचावण्यासाठी उल्हासनगर महानगरपालिका आस्थापनेवर कार्यरत अधिकारी व कर्मचारी त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी सिंधी भाषेत एम.ए.पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या प्रत्येकी २ विशेष वेतनवाढ देण्यात यावी. नागरी व्यवस्थापन (पोस्ट ग्रॅज्युएट अर्बन मॅनेजमेंट डिपोल्मा), कायदयाचा अभ्यास केलेले (एल.एल.बी.), सार्वजनिक उपक्रम (एम.ए.इन पब्लिक पॉलिसी), नेतृत्वविज्ञान (एम.ए.इन लिडर चिफ सायन्स), समाजशास्त्र**

**(एम.ए.इन सोसालॉजी) हे विविध अभ्यासक्रम मान्यताप्राप्त विद्यापिठातून पुर्ण केलेल्या सर्व पदविधारकांना प्रत्येकी अभ्यासक्रमानुसार प्रत्येकी २ विशेष वेतनवाढ देण्यात यावी. उल्हासनगर महानगरपालिका ही स्थानिक स्वराज्य संस्था असून ती सार्वभौम आहे. आम्हांला आमच्या कर्मचारी व अधिका-यांचे कल्याण करावयाचे आहे, हा महासभेचा अधिकार आहे.**

**या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.** **सुचकाची सही /- १)**

**२)**

**३)**

**अनुमोदकाची सही /- १)**

**२)**

**३)**

**सर्वानुमते**

**महापौर/पीठासीन अधिकारी**
**सर्वसाधारण महासभा**
**उल्हासनगर महानगरपालिका**

---

महापालिका सचिवः— विषय क्र. १६ वाचुन दाखवितात.

---

⇨ विषय क्र. १६:—**प्रस्तावाची सुचना**

**उल्हासनगर महापालिका शाळा क्रं. १९ व २७ नाम मात्र रु. १ या भाडे त्तवावर मिळणे बाबत पालिका सदस्य,सुचक श्रीम.जया माखिजा व अनुमोदक श्री . मनोज सयानी यांचा प्रस्ताव विचारातघेणे.**

---

**सदस्या, श्रीम. वसुधा बोडारे:**-विरोध आहे,भाडयाने देणे आम्हांला मंजुर नाही.

**सदस्या, श्रीम. शुभांगी बेहनवाल:-** या प्रस्तावाला मी विरोध करीत आहे. मा. महापौर, उप महापौर, आयुक्त साहेब, जर आपल्या मालकीची शाळा आपण भाडेतत्वावर दिले तर खुप नुकसान आहे. कारण गोरगरीब व्यक्ती आपण आपल्या मुलांना या शाळेत शिकवतच असतो. आपण जर या शाळा खाजगी तत्वावर दिले तर खुप नुकसान होते. तर या दिवशी हा प्रस्ताव या सभेत आणला आहे, हा चुकीचा आहे.कारण शिक्षण सभापती म्हणून तुम्ही हा विषय कमीत कमी या सदस्यां समोर त्याच वेळेला हा विषय एका बंद खोलीमध्ये तुम्ही प्रस्ताव बनवून तुम्ही महासभेत आणला आहे, हे खुप चुकीचे आहे. तर मी या प्रस्तावाला विरोध करीत आहे किंवा या प्रस्तावाच्या विरोधाला मला पुढे जायला लागले तरी चालेल....

**सदस्या, श्रीम. जया माखिजा:-** महापौर मॅडम ही संस्थेची शाळा आहे, तर मला वाटते की, १ रुपयाच्या भाडेतत्वावर दिले पाहीजे.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** डॉक्टर बोला, बोला.

या वेळर काही सदस्य एकत्रित बोलत असल्यामुळे कोण काय बोलत होते, ते स्पष्ट समजून आले नाही.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-** मा. महापौरजी, जर ही शाळा भाडेतत्वावर दयाल तर मुलांना शिकवण्याची जबाबदारी कोण घेणार? पहीलेच शाळा क्र. १८ व २४ नंबर तुटलेले आहेत. महापौर मॅडम आपण मागचा ठराव बघा.

**सदस्या, श्रीम. जया माखिजा:-**१ रुपया भाडेतत्वावर दयायला पाहीजे.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-**महापौरजी, मला या संदर्भामध्ये बोलायचे आहे. माध्यमिक शाळा क्र.३ एज्युकेशन ट्रस्टचे कमी दराने १ रुपया भाडेतत्वावर करुन सदर संस्थेला मान्यता देत आहे, सदर एज्युकेशन ट्रस्टला शासनाकडे पाठविण्यासाठी प्रस्ताव तयार करुन मंजुरीसाठी पाठविण्यात यावे. या महासभेने १ रुपया या दराने भाडेतत्वावर देण्याचा ठराव पारीत केला आहे. त्या प्रमाणे सदरचा ठराव १ रुपया दराने कर आकारणी करुन शिक्षण संस्थेला देण्यास मान्यता दयावी. तसेच सदर विद्यार्थ्यासाठी कॅटींग इतर सेवा ...

**सदस्या, श्रीम. जया माखिजा:-** मॅडम हा विषय पास करा.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-**त्यासाठी लागणा-या इतर सुविधा बाबत. महापालिकेने कारवाई करावी असे प्रशासनाने निर्देश दयावे.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:-** महापौर साहेब, ज्यांच्या एरियामध्ये ही शाळा आहे, त्यांनाच बोलून देत नाहीत...

**सदस्या, श्रीम. शुभांगी बेहनवाल:-** मा. महापौर मॅडम हा प्रस्ताव एकदम चुकीचा आहे.

**सदस्य, श्री. राजेश वानखेडे:-** श्री. जमनादास पुरस्वानी यांचे मोठे बंधू वारले आहेत, ही सभा इथेच स्थगीत करा. महापौर मॅडम जमनु साहेबांचे मोठे बंधू आता वारले आहेत. त्यांना श्रदाजंली देवून मिटींग स्थगीत करा.

**सदस्या, श्रीम. शुभांगी बेहनवाल:-**हा विषय इथेच संपवा.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-** हा विषय पास करुन सभा स्थगीत करण्यात यावी.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:-** महापालिकेच्या मालमत्ता भाडयाने देण्यात येवू नयेत.

या वेळी काही सदस्य एकत्रित बोलत असल्यामुळे कोण काय बोलत आहेत, ते समजून आले नाही.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** सगळयानी शांत बसा.

**उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-** महापनगरपालिकेकडे सध्याला भुखंडाची संख्या अतिशय कमी आहे. आपल्या प्रशासनिक कामासाठी असे भुखंड वापरासाठी उपलब्ध होत नाहीत. आपल्याकडे सनद देखील त्या भुखंडाची उपलब्ध नाही. आपल्याला सनद मिळवण्यासाठी अतिशय जिकिरीने प्रयत्न करीत आहोत आणि या भुखंडाचे....

**सदस्य, श्री. राजेश वानखेडे:-** महापौर मॅडम जमनादास पुरस्वानी यांचे बंधू वारले आहेत.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** राजेश वानखेडे जरा शांत बसा.

**उप आयुक्त (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-**महानगरपालिकेला महसुली उत्पन्नाचे साधन म्हणून आपल्याला पहावे लागणार आहे. त्यामुळे त्या भुखंडाला अशा प्रकारे शासनाच्या १ रुपया भाडयाने देण्याचे धोरण सुध्दा नाही. मी सर्व सदस्यांना विंनती करतो की, अशा स्तरावर या महापालिकेच्या भुखंडावर असा शासकीय ठराव करु नये.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:-** या मालमत्ता महापालिकेच्या मालकीच्या आहेत आणि आहेत त्या भाडेतत्वावर देणार....

**<u>सदस्या, श्रीम. शुभांगी बेहनवाल:-</u>** आपल्या मालकीच्या मालमत्ता भाडेतत्वावर देवू नये. आपले उल्हासनगर मधील बरेच भुखंड काबिज केले आहेत.

**<u>सदस्या, श्रीम. शितल बोडारे:-</u>** मा. महापौर मॅडम हा जो प्रस्ताव आहे, याला माझा पुर्ण विरोध आहे. या दोन्ही शाळा ज्या आहेत त्या स्लम एरियामध्ये आहेत आणि दोन्ही शाळा व्यवस्थित आहेत, आपण त्यांच्यामध्ये प्रगती करायला पाहीजे. त्या टिकवल्या पाहीजेत त्यासाठी आपण प्रयत्न केले पाहीजेत. मुंबई महापालिकेमध्ये...

**<u>उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-</u>** सगळयांनी शांत बसा.

**<u>महापालिका सचिव:-</u>** शितलबोडारे मॅडम आता आपण बोला आपला आवाज काय स्पष्ट येत नव्हता, बोडारे साहेब तुम्ही बोला तुमचा आवाज येत नाही.

**<u>सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:-</u>** सचिव मॅडम मला आपण कधी बोलायला दयायल?

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:-</u>** आवाज येत आहे का?

**<u>उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-</u>**बोला बोडारे साहेब.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:-</u>**आयुक्त साहेब, या बाबतीत तुमची भुमिका काय, असे अशासकीय प्रस्ताव आले तर तुमची भुमिका काय असणार आहे.देणार आहेत का?

**<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-</u>** यापुर्वी १ रुपया भाडेतत्वावर दिलेले आहेत.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:-</u>**अशा प्रकारचे प्रस्ताव येतात, प्रशासनाने त्या ठिकाणी भुमिका मांडली पाहीजे. सगळे फुकट गेलेले आहे. सिंगल कुठल्या संस्थेला अशाप्रकारचे देता येत नाही, एक वाचनालय देवू शकत नाही. तयार झालेले वाचनालय संस्थेने महापालिकेला दिलेले आहे. इथे अख्या शाळा, दोन दोन शाळा मागत आहेत. प्रशासनाची तुमची नेमकी भुमिका काय आहे?

**<u>उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-</u>** भुल्लर महाराजजी बोला.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-</u>**याच्या पहीले महापालिकेने १ रुपया भाडेतत्वावर शाळा दिलेली आहे. मग आता परत दयायला काही हरकत नाही, देण्यात यावे.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:-</u>**मी ठराव घेऊन येतो.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-</u>**घेऊन या मी समर्थन करतो.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:-</u>**एक वेळा दिले म्हणजे १० वेळा दयायला पाहीजे हा कोणता प्रकार आहे.

**<u>सदस्या, श्रीम. सविता तोरणे:-</u>** मी या प्रस्तावाला विरोध करीत आहे.

**<u>सदस्या, श्रीम. शुभांगी बेहनवाल:-</u>** माझा पण या प्रस्तावाला विरोध आहे.

**<u>सदस्या, श्रीम. वसुधा बोडारे:-</u>** या प्रस्तावाला विरोध आहे. या सगळया शाळा तुम्ही अशा दयायला लागल्या तर कसे चालणार, महानगरपालिकेच्या मुलांनी शिकायचे कुठे?

**<u>सदस्या, श्रीम. ज्योती गायकवाड:-</u>**गरीबांच्या मुलांनी शिक्षण घ्यायची नाहीत का?

**<u>सदस्या, श्रीम. वसुधा बोडारे:-</u>** सगळया शाळा चालू आहेत, लॉकडाऊनमुळे बंद आहेत. नंतर पुर्वपदावर चालू होतील त्यामुळे देण्याचा विचार करु नका.

**<u>सदस्या, श्रीम. शुभांगी बेहनवाल:-</u>**आपण आपल्या शाळांचाविकास केला तर बरे होईल, भाडेतत्वावर देण्याची गरज नाही.

**<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-</u>** लवकरात लवकर पास करावे.

**<u>सदस्या, श्रीम. वसुधा बोडारे:-</u>**आमचा या प्रस्तावाला पुर्णपणे विरोध आहे. शाळा व्यवस्थित चालू आहे, दुसरे कोणीही येऊन शाळा चालवू शकत नाही. लॉकडाउनमध्ये बंद असतील पण नंतर त्या पुर्वपदावर येऊन चालू होणार आहेत. त्यामुळे असे प्रस्ताव आणू नये.

**<u>सदस्या, श्रीम. शुभांगी बेहनवाल:-</u>**या प्रस्तावाला विरोध आहे.

**<u>महापालिका सचिव:-</u>** महापौरांनी सांगितले आहे की, प्रस्ताव ..

**<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-</u>** मॅडम नेटवर्कीग बंद आहे.

**<u>महापालिका सचिव:-</u>** या प्रस्तावाला चार सदस्यांनी मागणी केली तर मतदान घेण्यात येईल. विरोध आहे तर मतदान घ्यायचा असेल तर चार सदस्यांनी बोलावे. या विषयावर मतदान होईल तुम्ही मतदानाची मागणी करु शकतात.

**<u>सदस्य, श्री. भारत राजवानी:-</u>** विरोधामध्ये मतदान.

**<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-</u>** पास करण्यात यावा.

**<u>सदस्या, श्रीम. जया माखिजा:-</u>** महापौर मॅडम हा विषय पास करण्यात यावा.

**<u>उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-</u>** विरोधामध्ये कोण कोण लोक आहेत. विरोधाच्या बाजूने जे लोक आहेत त्यांनी हात वर करावे.

**<u>महापालिका सचिव:-</u>** ज्यांचा विरोध आहे, त्यांनी हात वर करावे,

**<u>प्रस्तावाच्या बाजूने एकुण मते:-२६</u>**

१) श्रीम. लिलाबाई आशान
२) श्री. भगवान भालेराव
३) श्रीम. जया माखिजा
४) श्री. राजेंद्रसिंह भुल्लर
५) श्रीम. रेखा ठाकुर
६) श्रीम. सविता तोरणे
७) श्री. गजानन शेळके
८) श्री. राजेश वदारिया
९) श्री. किशोर वनवारी
१०. श्रीम. कविता पंजाबी
११. श्रीम. अंजना म्हस्के
१२.श्रीम. अपेक्षा भालेराव
१३.श्रीम. ज्योती भटीजा
१४.श्रीम. अंजली साळवे
१५. डॉ. प्रकाश नाथानी
१६. .श्रीम. मिना सोनेजी
१७. श्रीम. शुभागिनी निकम
१८. श्री. शंकर लुंड
१९. श्रीम. संगिता सपकाळे
२०. श्रीम. कांचन लुंड
२१. श्रीम. कविता गायकवाड
२२. श्री. महेश सुखरामनी
२३. श्री. दिपक सिरवानी

२४. श्रीम. दिपा पंजाबी
२५. श्री. हरेश जग्यासी
२६. आशा बि-हाडे

**<u>प्रस्तावाच्या विरोधात एकुण मते:- १२</u>**

१. श्री. धनंजय बोडारे
२. श्रीम. शुभांगी बेहनवाल
३. श्री. जीवन इदनानी
४. श्री. भारत राजवानी
५. श्रीम. शितल बोडारे
६. श्रीम. वसुधा बोडारे
७. श्रीम. ज्योती गायकवाड
८. श्री. सतरामदास जेसवानी
९. श्री. प्रमोद टाले
१०. श्रीम. कविता बागुल
११. श्रीम. ज्योती चैनानी
१२. श्रीम. दिप्ती दुधानी

**<u>महापालिका सचिव:-</u>** हा प्रस्ताव बहुमताने पास झाला आहे. विरोधात कमी मते आहेत, प्रस्ताव बहुमताने पास.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:-</u>** जया माखिजा प्रस्तावाच्या बाजूने किती आहेत? आणि विरोधात किती ओहत.

**<u>महापालिका सचिव:-</u>** प्रस्तावाच्या बाजूने आहेत २६

**<u>सदस्या, श्रीम. वसुधा बोडारे:-</u>** २६ लोक आहेतच नाहीत.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:-</u>** विरोधात किती आहेत. तुम्ही सगळयांना विचारले नाही, तुम्ही सगळयांना गृहीत धरलेले आहे.

**<u>महापालिका सचिव:-</u>** नाही, नाही मी सगळयांना विचारले आहे.

**<u>उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-</u>** चला पुढचा विषय घ्या.

**<u>सदस्य, श्री. मनोज सयानी:-</u>** मा. महापौरजी, पॉईंट ऑफ ऑर्डरवर बोलायचे आहे.

**<u>सदस्या, श्रीम. शुभांगी बेहनवाल:-</u>** तुम्ही मुलांचे भविष्य धोक्यात टाकलेले आहे. चुकीचा प्रस्ताव तुम्ही पास करुन घेतले आहे.

या वेळी काही सदस्य एकत्रित बोलत असल्यामुळे कोण काय बोलत होते, ते स्पष्ट समजून आले नाही.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी:—</u>सदरचा विषयाबाबत बहुमतानेपुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र.१६:- <u>प्रस्तावाची सुचना</u>**

**उल्हासनगर महापालिका शाळा क्र.१९ व २७ नाममात्र रु.१ या भाडे तत्वावर मिळणेबाबत. पालिका सदस्य, सुचक श्रीमती जया माखिजा व अनुमोदक श्री. मनोज सयानी यांचा प्रस्ताव विचारात घेणे.**

**प्रस्तावना**

उपरोक्त अशासकीय प्रस्तावाद्वारे लक्ष वेधू इच्छिते की, उल्हासनगर शहरातील एक प्रतिष्ठीत संस्था म्हणून सिंधू एज्युकेशन सोसायटीचे नाव घेतले जात आहे. या संस्थेच्या उल्हासनगर शहरात प्राथमिक शाळा, माध्यमिक, कनिष्ठ

महाविदयालय व वरिष्ठ महाविदयालयात मोठया संख्येने विदयार्थी शिक्षण घेत आहेत. उल्हासनगर कॅम्प नं. १ येथे एस.ई.एस. इंग्लिश मिडीयम हायस्कुल व एस.डी. ओचानी कनिष्ठ महाविदयालय याला लागून उल्हासनगर महानगरपालिकेची शाळा क्र.२७ असून सदयस्थितीत तेथे विदयार्थी संख्या कमी असल्याने वर्ग खोल्या अतिरिक्त आहेत. तसेच उल्हासनगर-५ येथील बी.जी.तिलक (हिंदी) हायस्कूल व बी.जी. तिलक इंग्लीश मिडीयम हायस्कूल या शाळा झुलेलाल मंदिर समोर आहे. शाळेला लागूनच उल्हासनगर महानगरपालिकेची शाळा क्र.१९ आहे. सदयस्थितीत तेथे विदयार्थी संख्या कमी असल्याने तेथे अतिरिक्त वर्ग खोल्या असल्याने नाममात्र रु.१ भाडे तत्वावर मिळणेबाबत सदर संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी माझ्याकडे विनंती केली आहे. सदर म.न.पा. शाळेतील विदयार्थ्यांना कोणत्याही प्रकारचे शुल्क न आकारता विनामुल्य शिक्षण व त्या शाळेतील शिक्षकांना सामावून घेण्यास देखील तयार असल्याने सदर दोन्ही शाळा नाममात्र भाडे तत्वावर देण्यात यावे.

महापालिकेने यापुर्वी महासभा ठराव क्र.७९, दिनांक १४/०३/२०१८ रोजीच्या ठरावानुसार उल्हासनगर महानगरपालिका शाळा क्र. ४ शारदा शिक्षण प्रसारक मंडळास सेक्शन ७९ जी रेडीरेकनर दराने कमी करुन प्रतीमहा रु.१ नाममात्र भाडे आकारणी करुन ३० वर्षासाठी काही अटी व शर्ती वर देण्याबाबत तसा ठराव पारीत करण्यात आला आहे. (सोबत प्रत जोडत आहे)

तरी सदर संस्थेने नमूद केल्याप्रमाणे वरील संस्थेस यापुर्वीच्या ठरावान्वये नाममात्र भाडेतत्वावर दिल्याने वरील संस्थेच्या शाळेमध्ये शिक्षण घेत असलेल्या विदयार्थ्यांचा विचार करता म.न.पा. शाळा क्रमांक १९ व २७ या दोन्ही शाळा क्र.१ भाडे तत्वावर देण्याबाबतचा या अशासकीय प्रस्तावाद्वारे प्रस्तावित करीत असून, यावर येत्या महासभेमध्ये चर्चा होवून धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा, हि विनंती.

**महासभा ठराव क्र. ५६** **दिनांक २०/०१/२०२२**

**सुचकाचे नाव :-श्रीम. जया माखिजा**

**अनुमोदकाचे नाव :-डॉ. प्रकाश नाथानी**

**ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार यापुर्वी महासभा ठराव क्र. ७९, दिनांक १४/०३/२०१८ रोजीच्या धर्तीवर सिंधी माध्यमिक शाळा क्रमांक १९ व माध्यमिक शाळा क्र.२७ सिंधु एज्युकेशन ट्रस्ट यांना प्रतीमहा १/- रुपये नाममात्र दराने भाडे आकारणी करुन सदर संस्थेस तीस (३०) वर्षासाठी चालविण्यास मान्यता देत आहे.**

**परंतु,**

**१) जर सिंधु एज्युकेशन ट्रस्टला तीस (३०) वर्षापेक्षा जास्त कालावधी हवा असेल, तर महानगरपालिकेतर्फे तसा प्रस्ताव तयार करुन शासनाच्या मंजुरीसाठी पुढील निर्णयासाठी पाठविण्यात यावा.**

**२) सदर संस्थेने विदयार्थ्यांसाठी सदर जागेवर कॅन्टीन सेवा, क्रिडा शैक्षणिक साहित्य (स्टेशनरी) व विदयार्थ्यांसाठी लागणाऱ्या इतर सुविधा बाबत निर्णय घ्यावा व याबाबत महानगरपालिकेला कृती आराखडा मंजूर करुन त्याप्रमाणे कारवाई करावी असे प्रशासनास निर्देश देत आहे.**

**या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.**

**सुचकाची सही/-**

**अनुमोदकाची सही /-**

**बहुमताने**

**महापौर/पीठासीन अधिकारी**
**सर्वसाधारण महासभा**
**उल्हासनगर महानगरपालिका**

---

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** पुढचा विषय घ्या.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** सभा संपवून घ्या आणि श्रध्दांजली घ्या.

महापालिका सचिव:— विषय क्र. १७ वाचुन दाखवितात.

---

⇨विषय क्र. १७:—<u>प्रस्तावाची सूचना</u>

रास्ता रूंदी करण्याच्या नावा खाली व विकासकाच्या हितासाठी महापालिका प्रशासनाने १ नं. भाजी मार्केटवर केलेल्या बेकायदेशिर कारवाई बाबत तसेच संबंधित दोषी अधिका—यांवर कायदेशिर कायवाई करणे बाबत पालिका सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लर यांची प्रस्तावाची सूचना विचारात घेणे.

---

**<u>उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-</u>** चला पुढचा विषय घ्या.

**<u>सदस्य, श्री. मनोज सयानी:-</u>** मा. महापौरजी, पॉईंट ऑफ ऑर्डरवर बोलायचे आहे.

**<u>सदस्या, श्रीम. शुभांगी बेहनवाल:-</u>** तुम्ही मुलांचे भविष्य धोक्यात टाकलेले आहे. चुकीचा प्रस्ताव तुम्ही पास करुन घेतले आहे.

या वेळी काही सदस्य एकत्रित बोलत असल्यामुळे कोण काय बोलत होते, ते स्पष्ट समजून आले नाही.

**<u>सदस्या, श्रीम. शुभांगी बेहनवाल:-</u>**हा चुकीचा प्रस्ताव तुम्ही पास करुन घेतला आहे.

**<u>महापालिका सचिव:-</u>** दोन प्रस्ताव प्रलंबित राहीले आहेत, ते पुढच्या महासभेत घेण्यात येतील आणि श्री. जमनादास पुरस्वानी यांच्या भावाचे निधन झाल्यामुळे त्यांना श्रध्दांजली देवून ही सभा स्थगीत करण्यात येईल असे पिठासिन अधिकारी यांनी सांगितले आहे.

**<u>सदस्य, श्री. किशोर वनवारी:-</u>** सभेतील विषय संपले आहेत तर प्रलंबित कसे राहतील.

**<u>महापालिका सचिव:-</u>** नाही, नाही दोन विषय प्रलंबित आहेत. आता तुम्ही कृपया श्रध्दांजली साठी दोन मिनीटे उभे रहावे.

---

सुचकाचे नाव :— श्री. राजेश वानखेडे

अनुमोदकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी

<u>शोक प्रस्ताव</u>

भारतीय जनता पार्टीचे गट नेता/नगरसेवक, श्री. जमनादास पुरस्वानी यांचे मोठे बंधू यांचे आज निधन झाले आहे. त्यांचे कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असून हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र.४२ अ (१)</u> <u>दिनांक:— २०/०१/२०२२</u>

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार भारतीय जनता पार्टीचे गट नेता/नगरसेवक, श्री. जमनादास पुरस्वानी यांचे मोठे बंधू यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांचे कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पिठासीन अधिकारी

सर्वसाधारण महासभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** आता ही सभा स्थगीत करण्यात येत आहे.

---

स्थगीत प्रस्ताव:—

दिनांक २०/०१/२०२२, रोजी सायंकाळी ४.०० वाजता सुरू केलेली सभा सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी यांचे मोठे बंधू यांचे आकस्मित निधन झाल्यामुळे स्थगीत करण्यास प्रस्तावीत य

विशेष महासभा ठराव क्र.५६ अ दिनांक: २०/०१/२०२२

सुचकाचे नाव:— श्री. कलवंतसिंहसोहता

अनुमोदकाचे नाव:— श्री. शंकर लुंड

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता दिनांक २०/०१/२०२२ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित केलेल्या सभेचे कामकाज सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी यांचे मोठे बंधू यांचे आकस्मित निधन झाल्यामुळे अनिश्चित कालावधीपर्यंत स्थगीत करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानु मते

महापौर/पीठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव:— कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सायंकाळी ६.०२ वाजता महापौर श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(प्राजक्ता मि. कुलकर्णी)**
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:- १८-०२-२०२२

**उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. १८-०२-२०२२ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.**

**४-ब**

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा गुरुवार, दिनांक २०/०१/२०२२ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेचे कामकाज स्थगीत केल्याने सदरची सभा शुक्रवार दिनांक १८/०२/२०२२ रोजी दुपारी ३.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील सभागृहात येथे मा. अवर सचिव, महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांचेकडील दिनांक ३ जानेवारी, २०२२ रोजीचे पत्रान्वये ऑनलाईन अॅपद्वारे सभा आयोजित केली आहे. सदर सभेत मा. श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होते व खालील दर्शविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान - महापौर

२. श्री. भगवान शंकर भालेराव - उप-महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती अर्चना गोकुळ करणकाळे | ३४ | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी |
| ४ | श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड | ३५ | श्री. सुमित सागर सोनकांबळे |
| ५ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ३६ | श्रीमती ज्योती शामराव माने |
| ६ | श्रीम. मिनाकौर अजितसिंग लबाना | ३७ | श्री. चंद्रशेखर केशव यादव |
| ७ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | ३८ | श्रीमती संगिता नितीन सपकाळे |
| ८ | श्रीमती आशा नाना बिराडे | ३९ | श्रीमती शीतल चंद्रकांत कदम |
| ९ | श्रीमती चरणजितकौर राजेंद्रसिंह भुल्लर | ४० | श्रीमती वसुधा धनंजय बोडारे |
| १० | श्री. राजेंद्रसिंह विरसिंग भुल्लर | ४१ | श्री. धनंजय बाबुराव बोडारे |
| ११ | श्री. स्वप्नील मिलींद बागुल | ४२ | श्रीमती दिप्ती नविन दुधानी |
| १२ | श्रीमती सुरेखा हनुमंत आव्हाड | ४३ | श्रीमती ज्योती रमेश चैनानी |
| १३ | श्रीमती अंजना अंकुश म्हस्के | ४४ | श्रीमती कांचन अमर लुंड |
| १४ | श्री.कलवंतसिंग गरुदेव सोहता | ४५ | श्री. शंकर गोविंदराम लुंड |
| १५ | श्री. राजू किशनचंद जग्यासी | ४६ | श्रीमती सुनिता बाबुराव बगाडे |
| १६ | श्रीमती मिना कुमार आयलानी | ४७ | श्री. भारत रामचंद राजवानी (गंगोत्री) |
| १७ | श्रीमती गीता लालचंद साधनानी | ४८ | श्री. सतरामदास पुतनदास जेसवानी |
| १८ | डॉ. प्रकाश घनश्यामदास नाथानी | ४९ | श्रीमती अंजली चंद्रकांत साळवे |
| १९ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | ५० | श्री. प्रमोद नामदेव टाले |
| २० | श्रीमती जया प्रकाश माखिजा | ५१ | श्रीमती कविता सुधिर बागुल |
| २१ | श्री. महेश पहिलराज सुखरामनी | ५२ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २२ | श्रीमती अपेक्षा भगवान भालेराव | ५३ | श्री. किशोर नारायणदास वनवारी |
| २३ | श्रीमती शुभांगीनी निकम | ५४ | श्रीमती मिना चंद्रगुप्त सोनेजी |
| २४ | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग | ५५ | श्री. विजय चाहू पाटील |
| २५ | श्री. राजेश नानिकराम वदारिया | ५६ | श्रीमती कविता सुरेश गायकवाड |
| २६ | श्रीमती दिपा नारायण पंजाबी | ५७ | श्री. आकाश परशुराम पाटील |
| २७ | श्री. राजेंद्र शांताराम चौधरी | ५८ | श्री. विकास परशुराम पाटील |
| २८ | श्री. रवी किशनचंद जग्यासी | ५९ | श्री. मनोज दिलीपकुमार सयानी |

| | | | |
|---|---|---|---|
| २९ | श्रीमती इंदिरा जमनादास उदासी | ६० | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |
| ३० | श्रीमती कविता लाल पंजाबी | ६१ | श्री. सुरेंद्र बाळकृष्ण सावंत |
| ३१ | श्री. जीवन चंद्रभान इदनानी | ६२ | श्री. अरुण लक्ष्मण आशान |
| ३२ | श्रीमती सविता प्रविण तोरणे (रगडे) | ६३ | श्रीमती आशा जीवन इदनानी |
| ३३ | श्री. गजानन प्रल्हाद शेळके | | |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते / होत्या.

१. श्री. मंगल बालकृष्ण वाघे, २. श्रीमती जयश्री ज्ञानेश्वर पाटील, ३. श्री. रविंद्र दशरथ बागुल, ४. श्रीमती सरोजिनी टेकचंदानी, ५. श्रीमती छाया सुजित चक्रवर्ती उर्फ अडसुळ, ६. श्रीमती ज्योती प्रशांत पाटील, ७. श्रीमती डिम्पल नरेंद्र ठाकुर (कुमारी), ८. श्रीमती पुष्पा नाना बागुल, ९. श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी, १०. श्रीमती शुभांगी मनोहर बेहनवाल, ११. श्रीमती ज्योती प्रकाश बठिजा, १२. श्रीमती ज्योत्स्ना सुरेश जाधव, १३. श्री. रमेश महादेव चव्हाण, १४. श्रीमती मिताली राजेश चान्पूर, १५. श्रीमती सुमन राजेश सचदेव, १६. श्रीमती मिनाक्षी रवी पाटील.

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

१. आयुक्त, डॉ. राजा दयानिधी

२. श्रीमती करुणा जुईकर, अतिरिक्त आयुक्त (सेवा), आयुक्तांच्या स्थानी आसनस्थ

३. श्री. जमिर लेंगरेकर, अतिरिक्त आयुक्त (शहर)

४. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, महापालिका सचिव

५. श्री. अशोक नाईकवाडे, उप आयुक्त(मुख्यालय)

६. डॉ. सुभाष जाधव, उप आयुक्त, सार्वजनिक आरोग्य विभाग

७. श्रीम. प्रियंका राजपूत, उप आयुक्त (कर)

८. श्री. प्रकाश मुळे, नगररचनाकार

९. श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखा अधिकारी

१०. श्री. विजय खेडकर, मुख्य लेखा परिक्षक

११. श्री. सुर्यकांत खटके, लेखाधिकारी

१२. डॉ. दिपक पगारे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी

१३. डॉ. दिपक पगारे, वैदकीय आरोग्य अधिकारी

१४. के.जे. रहेजा, कार्यकारी अभियंता (पा.पु.वि.)

१५. श्री. मोहीते, शिक्षणाधिकारी, शिक्षण विभाग

१६.श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी

१७. श्री. अजय एडके, सहा. आयुक्त

१८. श्री. महेंद्र पंजाबी, सहा.आयुक्त

१९. श्री. तुषार सोनवणे, सहा. आयुक्त

२०.श्री. हनुमंत खरात, उप अभियंता

२१. श्री. मनीष हिवरे, सहा. अरोग्य विभाग

२२. श्री. महेंद्र धिंडे, कनिष्ठ अभियंता

२३. श्री. अच्युत सासे, सहा. आयुक्त

२४. श्री. राजा बुलानी, विधी अधिकारी

२५. श्री. जेठा ताराचंद, उप करनिर्धारक व संकलक

२६. श्री. विजय मंगलानी, विशेष कार्यकारी अधिकारी

२७. श्री. विशाल कदम, अधिक्षक

२८. श्री. विनोद केणे, मुख्य स्वच्छता निरीक्षक

२९. श्री. राजेश घनघाव, मालमत्ता व्यवस्थापक

३०. श्री. सोहम बोंबे, उप अग्निशमन अधिकारी

३१. श्री. दत्तात्रय जाधव, भांडार विभाग प्रमुख

३२. श्री. सचिन जाधव, वरिष्ठ लिपीक

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

५. श्रीमती नर्गीस खान, लिपीक

६. श्री. बाळू भांगरे, लिपीक

७. श्रीम विद्या आढळ, लिपीक

८. श्री. अंकुश कदम, महापौरांचे स्विय्य सहाय्यक

दुपारी ३. १६ वाजता वंदे मातरम म्हणून सभेची सुरुवात करण्यात आली.

**महापालिका सचिव:-** ही स्थगीत सभा आहे...

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-** मा.महापौरजी, आयुक्त साहेब, सचिव मॅडम एक शौक प्रस्ताव आहे, आपल्यांना सर्वांना माहीतीच आहे, काही दिवसापुर्वी भारतरत्न लता मंगेशकरजी यांचे निधन झालेले आहे. त्याच बरोबर काल संध्याकाळी माजी मंत्री, शिवसेना नेते श्री. सुधीरभाऊ जोशी यांचेही निधन झालेले आहे. तरी या दोन्ही नेत्यांना, दोन्ही वक्तांना आजच्या या महासभेमध्ये श्रध्दांजली देण्यात यावी.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** आपले संगीतकार व गायक श्री. बप्पी लहरी, यांचेही निधन झालेले आहे. यांनाही श्रध्दाजली देण्यात यावी.

**सदसय, श्री. जमनादास पुरस्वानी:-** भारतीय जनता पार्टीचे अध्यक्ष श्री. प्रकाश गिधवानी....

**सदस्य, श्री. अरुण आशान:-** आवाज येत नाही.

**सदसय, श्री. जमनादास पुरस्वानी:-** प्रकाश गिधवानीजी यांनी पवई चौक येथे खुप मोठा शिव मंदीर निर्माण केले आहे, त्यांना पण श्रध्दांजली देण्यात यावी.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-** मा. महापौरजीख, भारतरत्न देशाची शान आणि संपुर्ण विश्वामध्ये कोकीळाच्या नावाने ओळखल्या जाणा-या लता मंगेशकरजीचे निधन झाले आहे. मी राष्ट्रवादी पार्टीच्या तर्फे त्यांना भावपुर्ण श्रध्दांजली अर्पित करतो.

**महापालिका सचिव:-** सर्वांनी दोन मिनीटे श्रध्दांजलीसाठी उभे रहावे.

---

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्र चौधरी

अनुमोदकाचे नाव :— श्री. मनोज सयानी

शोक प्रस्ताव

भारतरत्न, देशाची शान, भारताची कोकीळा या नावाने संपुर्ण विश्वामध्ये ओळखल्या जाणा-या गायीका, लता मंगेशकर यांचे काही दिवसापुर्वी ९२ व्या वर्षी मुंबई या ठिकाणी निधन झाले आहे तसेच आपले संगीतकार/गायक श्री. बप्पी लहरी यांचे पण काही दिवसापुर्वी निधन झाले आहे आणि भारतीय जनता पार्टीचे अध्यक्ष, श्री. प्रकाश गिधवानी यांचेही निधन झाले आहे.

वर उल्लेखलेल्या कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असुन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्मास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

महासभा ठराव क्र.५६ब दिनांक:—१८/०२/२०२२

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार गायीका, भारतरत्न, लता मंगेशकर व संगीतकार/गायक श्री. बप्पी लहरी तसेच भारतीय जनता पार्टीचे अध्यक्ष, श्री. प्रकाश गिधवानी यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे आणि त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

सर्वानुमते

महापौर/पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव:-** विषय क्र. आहे १७ वा मागच्या सभेचा आहे….

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** मा. महापौरजी, मी दोन मिनीटे बोलू इच्छितो की, …

**महापालिका सचिव:-** होय मॅडमने तुम्हांला बोलायला सांगितले आहे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-**मा. महापौरजी, ..

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:-** जमनादास भाऊ बोला.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-**स्थायी समितीच्या आठ सदस्यांनी तुम्हांला दोन पत्र दिले होते. पहीले पत्र दिले आहे की, शहरामध्ये व्यापारी लोकांनी आंदोलन केले होते. पे ॲन्ड पार्कचा विषयावर आम्ही लोकांनी चर्चा

न करता आमच्या सदस्यांनी आवाज करण्याचा प्रयत्न केला पण आमचे म्हणणे कोणी ऐकुन घेतले नाही. त्यावर आम्ही पुन:विचार करण्यासाठी पत्र दिले आहे की विशेष महासभा लावण्यात यावी. परंतु अजून पर्यंत विशेष महासभेचे आयोजन केले नाही. तर मी आपल्याला निवेदन करतो की, आपण विशेष महासभा का बोलवण्यात आली नाही, याचा खुलासा करण्यात यावा. विशेष महासभा न लावता आपण पहीले दुसरी महासभा बोलवली आहे. ती ४. ०० वाजता आहे. परंतु आज विशेष महासभा लावण्यात आली पाहीजे. स्थायी समितीच्या आठ सदस्यांनी मागणी केली आहे. तर कृपया या गोष्टीचा खुलासा करण्यात यावा. आपण विशेष महासभा न लावता ही सर्वसाधारण सभा का ठेवली आहे? मा. महापौरजी, माझा विषय हा आहे की विशेष महासभेचा आम्ही जी नोटीस दिली होती की विशेष महासभा बोलवा. परंतु ती विशेष महासभा का बोलवण्यात आली नाही. कृपया सभागृहातील सर्व सदस्य यांनी व्यापा-यांनी केलेल्या आवाहानावर ४० पेक्षा जास्त सदस्यांनी सही केली होती की, आम्ही पे अॅन्ड पार्क लागू करणार नाही. शहरातील सर्व लोकांचे लक्ष आहे की आज विशेष महासभा का बोलवण्यात आली नाही?

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी:-** मा. महापौरजी, स्थायी समितीच्या सदस्यांनी पत्र दिले आहे की, विशेष महासभा लावण्यात यावी, ती पण आपण बोलावली नाही.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:-**अशासकीय प्रस्तावावर सहा लोकांची सही घेऊन दिली होती. त्याला पण १५ दिवस झाले आहेत आणि हाच विषय आहे. पे अॅन्ड पार्कचा असा नियम आहे की, महासभेचा अजेडा जेव्हा निघेल तेव्हा अशासकीय प्रस्ताव कोणी चार दिवसांनी दिला तरी महासभेमध्ये येत असतो. तो आला नाही आणि रोडचा पण दिलेला आहे ३७१ चा तो पण आला नाही. याचे कारण काय आहे, ते सांगा.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-** मा. महापौरजी,

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:-** बोला, बोला.

**महापालिका सचिव:-** मा. आयुक्त् साहेबा आणि सन्माननिय सदस्य, मा. पिठासिन अधिकारी यांनी मला विशेष महासभे बदल बोलायला सांगितले आहे. विशेष महासभा जो विषय आहे, पे अॅन्ड पार्कचा त्या विषयी कालच अनुमोदक आणि सुचकांच्या सहया प्राप्त झाल्या आहेत. महापौर मॅडम आता गेल्या आहेत, महापौर मॅडम आल्यावर सही करुन ही सभा तात्काळ बोलवण्यात येईल, असे महापौर मॅडमने सांगितले आहे.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:-** दुसरा एक पत्र दिले होते, स्थायी समिती सदस्यांनी.

**महापालिका सचिव:-** नाही, नाही तो दुसरा आहे.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** सन्माननिय महापौर मॅडम मी स्वत: सही केलेली आहे. तुम्ही सभेचा अपमान करीत आहेत. कुठल्याही परिस्थितीमध्ये तुम्ही ती सभा डिक्लेअर करावी. नाही तर माझी इथे बसण्याची आजीबात इच्छा नाही. मी समोर जाऊन तिथे बसेल. कारण ही परिस्थिती चुकीची आहे. आम्ही सही केलेली आहे, उप महापौर म्हणून मी प्रत्येक सभा तुमच्या बरोबर चालवतो. तुमच्या बरोबर खांदयाला खांदा लावून तुमच्या बरोबर काम करीत आहे आणि मग तुम्ही जर मी दिलेल्या गोष्टीला मान्यता देत नाही, विशेष सभा बोलवत नसतील तर मला इथे बसण्यास काही इन्ट्रेस नाही, मी खाली जाऊन बसतो. तुम्ही काय करायचे ते सांगा आणि दोन दिवसात नाही, आता इथे डिक्लेअर करा. नाही तर मी खाली जाऊन बसतो.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:-** नंतर लावण्यात येईल ना.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-**अजेडा काढण्याच्या आधी आम्ही पत्र दिले आहे. पत्र अगोदर दिले आहे. त्याच्या नंतर सभेची सुचना काढलेली आहे.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:-** भालेराव साहेब पुढे चला आम्ही तुमच्या बरोबर आहे.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** तुम्ही आता डिक्लेअर करा, नाही तर मी खाली जाऊन बसतो.

**सदस्य, श्री. कलवंतसिंह सोहता:-** नाही, नाही, हे ब्लॅकमेन करायचे काम आहे.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-**ब्लॅकमेल करण्याचा प्रश्नच नाही. तो विषयच नाही.

**सदस्य, श्री. कलवंतसिंह सोहता:-**हे काय तुमचे चालले आहे.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:-** तुम्हांला कॅबिनला बोलावून घेऊ.

**सदस्य, श्री. कलवंतसिंह सोहता:-** उप महापौर सोब ही पध्दत तुमची बरोबर नाही.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-**पध्दतची गोष्ट नाही उम महापौरांनी सही दिलेली आहे, प्रत्येक गोष्टीला उप महापौर कामाला लागतो आणि एखादा विषय आम्ही घेतला तर तो घेत नाहीत. हा कुठला न्याय आहे. महापौर मॅडम आताच तुम्ही सभा डिक्लेअर करा, नसाल करीत तर मी खाली येऊन बसेल.

**सदस्य, श्री. कलवंतसिंह सोहता:-**ही चुकीची पध्दत आहे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** जो पर्यंत पे ॲन्ड पार्कचा विशेष महासभा डिक्लेअर करीत नाहीत, तो पर्यंत ही सभा चालली नाही पाहीजे. श्री. किशोर वनवारीजीने पण प्रस्ताव दिला आहे. पे ॲन्ड पार्कचा का घेतला नाही? नियमाच्या हिशोबाने महासभा चालत असते. महासभा नियमाशिवाय चालत नाही. बी.पी.एमसी ॲक्टमध्ये हे प्रावधान आहे की...

**सदस्य, श्री. कलवंतसिंह सोहता:-**सचिव मॅडमने उत्तर दिले आहे ना जमनु साहेब.

या वेळी काही सदस्य एकत्रित बोलत असल्यामुळे कोण काय बोलत होते, ते स्पष्ट समजून आले नाही.

**सदस्य, श्री. कलवंतसिंह सोहता:-**पे ॲन्ड पार्कचा जो विषय आहे, तो सर्व संमतीने पास केला आहे.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:-** आम्ही लोक त्या वेळेस ओरडत होतो की, पास करु नका चर्चा करा.

**सदस्य, श्री. कलवंतसिंह सोहता:-**किशोरजी हे आरोप प्रत्यारोप करु नका की आम्ही ओरडत होतो. हा जो विषय झाला होता, तो सर्व संमतीने झाला आहे, तुम्हांला पण माहीती आहे. सर्व संमतीने पास झालेला विषय आहे.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:-** तुम्ही खोटे बोलत आहेत.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** बिटूभाई दोन मिनीट चर्चा करा आता. पे ॲन्ड पार्कवर त्या ठरावावर तुम्ही लोक सही का करीत नाहीत?

**महापालिका सचिव:-** महापौरांनी सांगितले आहे की, सगळयां बरोबर चर्चा केली जाईल आणि पे ॲन्ड पार्कवर सुचक आणि अनुमोदकची सही झाली आहे. तो इश्यु राहीला नाही. सुचक आणि अनुमोदकची सही नव्हती त्यामुळे सही घेऊ शकत नव्हतो. तर आपण काय रदद करणार आहेत, ठराव करणार का? आपण प्रस्ताव रदद करु शकत नाहीत.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** सुचक, अनुमोदक सही का करीत नाहीत? ज्यांनी पास केला आहे. आता चर्चा करा.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** पास केला आहे, मग सहया का करीत नाहीत?

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-**जर सर्व संमतीने पास झाला आहे, तर तुम्ही लोक आतमध्ये बसले होते, आम्ही बसलो नाहीत. आपण सही करा आणि पे ॲन्ड पार्कवर चर्चा करा. नाही तर ही मिटींग स्थगीत करुन दोन्ही मिटींग बरोबर घेऊन या.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:-</u>** भगवान भालेराव यांच्या लेटरहेडवर स्थायी समितीच्या सात सदस्यांनी सही केली होती आणि दिपक सिरवानी, स्थायी समिती सभापती यांच्या लेटरहेडवर सात सदस्यांनी सही करुन विशेष महासभेची मागणी केली आहे. ती पण या बरोबरच घेतली पाहीजेत. मॅडम आवाज येत नाही.

**<u>सदस्य, श्री. महेश सुखरामनी:-</u>** मा. महापौरजी, आवाज येत नाही.

**<u>महापालिका सचिव:-</u>** आशान सर उप महापौर विचारतात की, तुम्ही सभा कधी लावणार आहेत, ते सांगा. म्हणजे ही सभा चालू करता येईल.

**<u>सदस्य, श्री. अरुण आशान:-</u>** सर्वात प्रथम म्हणजे मा.महापौरजी, उप महापौरजी, मा. आयुक्त् साहेब, या विशेष महासभे करीता पत्र दिल्या नंतर त्या संदर्भातील चौकशी काय झालेले आहे. त्यासाठी सर्व गटनेत्याची बैठक, विरोधी पक्ष नेता, उप महापौरांची महापौरांबरोबर बैठक महापौरांच्या दालनामध्ये आयोजित करणार आहे आणि पत्र दिले आहे, त्याची चौकशी करुन मग विशेष महासभा लगेच लावण्यात येईल. विशेष महासभा न लावण्याबाबत आमचे काहीच दुमत नाही. परंतु झालेला प्रकार काय आहे? कशा बददल लावायचा आहे. अधिकारी आणण्या करीता आम्ही नगरविकास विभागाकडे वारंवार मागणी केली होती की या उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये अधिकारी आले पाहीजेत. आता आलेले अधिकारी परत का पाठवायचे? त्या करीता चचार् करणे आवश्यक आहे. विरोधीपक्ष नेता, सभागृहनेता, सव गटनेते यांना बोलावून मा. महापौरांच्या दालनामध्ये बैठक आयोजित करु आणि मग बैठक झाल्या नंतर ४ दिवसात महासभा बोलवण्यात येईल.

**<u>उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-</u>** अरुणभाई तुम्ही सभा लावणार नसाल तर हा सदस्यांचा अपमान आहे.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-</u>** अधिका-यांकडून कामे करुन घ्या.

**<u>महापालिका सचिव:-</u>** सर तुम्ही बोलले ते काहीही ऐकायला आले नाही, वेगवेगळे बसा. म्हणजे तुमचा आवाज मिक्स होणार नाही.

**<u>सदस्य, श्री. अरुण आशान:-</u>**आता ऐकायला येते का?

**<u>महापालिका सचिव:-</u>**होय, बोला सर.

**<u>सदस्य, श्री. अरुण आशान:-</u>** मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, मा. उप महापौर साहेब, ही विशेष महासभा लावण्या करीता जे पत्र आम्हांला दिलेले आहे, त्याबाबत योग्य ती चौकशी करुन सर्व गटनेते, विरोधीपक्ष नेता, उप महापौरसहीत महापौरांच्या दालनामध्ये बैठक आयोजित करु काय झालेला प्रकार आहे? या बदल महापौरांना काही माहीती नाही. आपण या सगळया प्रकारची माहीती घेऊन त्या नंतर हा विषय करुन नंतर ताबोडतोब या सत्रामध्ये आपण महासभा लावू या. परंतु मला सभागृहाला सांगायचे आहे की, आपल्याकडे महानगरपालिकेमध्ये अधिकारी नसतांना वेळोवेळी सांगून नगरविभागाने एवढे अधिकारी आपल्याकडे पाठवले आहे. मग आलेल्या अधिका-यांना आपण काढून टाका, जाऊ दया. ताबोडतोब त्यांच्या बदल पत्र दयायचे त्यांच्याकडून काय झाले काय नाही. अशी शंका, कुशंका काहीच विचारपुस न करता डायरेक्ट हा निर्णय घ्यायचा? त्या करीता आम्ही अधिकारी एका ठिकाणी यावेत म्हणून नगरविकास विभागाकडे मागणी करीत आहे की, आम्हांला कामाकरीता अधिकारी पाहीजेत आणि आता आलेले अधिकारी त्यांना लगेच काढून टाका हा दुजाभाव होतो, जर का अधिका-यांकडून चुका झाल्या असतील तर चुकांच्या बाबतीत, जर त्यांच्याकडून काही घडले असेल? अप्रितीता तर त्याबाबत आपण चौकशी करुन तर आपण या बाबतीत नक्कीच बैठक आयोजित करु, धन्यवाद.

**<u>उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-</u>** अगोदर आम्ही पत्र दिलेले आहे, आपण १० दिवस का झोपा काढल्या? का तुम्ही चौकशी करु शकले नाहीत. १० दिवस तुम्ही काय करीत होता, आज पर्यंत काय करीत होता? आम्ही तुमच्याशी वारंवार चर्चा करीत होतो, तुम्ही आम्हांला सांगिले नाही की आम्ही उदया करतो.

**सदस्य, श्री. अरुण आशान:-**आम्ही नाही असे बोललो नाही, आम्ही शंभर टक्के मिटींग लावणार आहोत. विशेष महासभा आपण बोलल्या नंतर सात दिवसांनी आपण लावणार आहोत.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-**आम्ही तुम्हांला प्रत्येक वेळा सहकार्‍य केले आहे. एकदा आम्ही तुम्हांला सांगितले आहे. त्याच्यावर सही माझी आहे. तुम्हांला त्या अजेडाच्या संदर्भात वारंवार तुमच्याशी बोललो तरी तुम्ही त्याच्यावर अजेडा काढत नाही.

**सदस्य, श्री. अरुण आशान:-**उप महापौर साहेब आपली सही बघितल्या नंतरच आम्ही निर्णय घेतलेला आहे की, विशेष महासभा लावायला पाहीजे. परंतु या विशेष महासभा लावण्याच्या अगोदर हे सगळयांना माहीती झाले आहे. उप महापौर साहेब ब-याचशा वेळेला असे झाले आहे की, बरेच जण अधिका-यांच्या तक्रारी करतात. मग सगळयाच अधिका-या बदल असे घडू नये. परंतु आपण सही केलेली आहे. हा विचार करुन बैठक आयोजित करुन मग विशेष महासभा लावू याबाबतीत सांगतो.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-**तुम्ही फक्त् तारीख ठरवा आमचे काही म्हणणे नाही.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** मा. महापौरजी, मी या विषयावर बोलू इच्छितो की, पहीली गोष्ट जेव्हा चार स्थायी समितीचे चार सदस्य सही करुन पत्र देतात, मागणी करतात की, विशेष महासभा बोलवली पाहीजे. तर यामध्ये तरतुदमध्ये कोणताही इन्क्वारी असा शब्द नाही. आपण काय चौकशी करणार आहेत? कोणाकडून चौकशी करणार आहेत? सी.बी.आय. कडून चौकशी करणार का? कोणाकडून चौकशी करणार? आणि ज्या पण नगरसेवकांनी, स्थायी समितीच्या सदस्यांनी पत्रावर सही केली आहे, ते आपली बाजू महासभेमध्ये सर्वासमोर ठेवेल की, त्यांचयावर काय बितली आहे, त्यांच्या बरोबर काय व्यवहार झाला आहे. त्यांना कशा प्रकारे वागणूक दिली गेली आहे, त्यांना कशा प्रकारे अपमानीत केले आहे? त्यांना कशा प्रकारे थ्रिट केले आहे. तर हे सर्व बोलण्यासाठी आज आपण तारीख, वेळ दोन्ही विशेष महासभेचा डिक्लेअर करण्यात यावी. तो पर्यंत ही महासभा चालू देणार नाही.

**सदस्य, श्री. अरुण आशान:-**मा. महापौरजी, आता आमचे मित्र श्री. राजेश वदारिया यांनी जे सांगितले की, कुठे चौकशी करायची आहे, कशी चौकशी करायची आहे, सी.बी.आय.कडून चौकशी करायची आहे. परंतु आपण पण त्या पत्रामध्ये असे काही लिहीले नाही फक्त् गैर वर्तणूक असे आपण लिहीले आहे आणि आपण सही करुन दिले आहे. असे मी मा. महापौरांतर्फे बोलत आहे. त्याची चौकशी काय बोलणे झाले आहे, काय बोलणे झाले नाही? हे जो पर्यंत माहीत होत नाही आणि त्याची शहानिशा होणार नाही. कोणी काय बोलले आहे, आम्ही महासभा जरुर बोलावू. आपण सात लोकांनी पत्र देवून लगेच महासभा यांच्या विरोधात घ्या, त्याच्या विरोधात घ्या. जे घडले आहे ते ऐकुन आम्ही महासभेमध्ये सर्व सदस्यांच्या समोर ठेवले जाईल. मा. महापौरजी, मी सांगू इच्छितो की, जे राजेश वदारिया साहेबांनी सांगितले की आपण चौकशी काय करणार? या शहराच्या प्रथम नागरीक महापौर जर सभागृह चालवण्यासाठी हक्कदार पण आहेत. तर त्यांना माहीती व्हायला पाहीजे की, कोणत्या अधिका-यां बरोबर काय बोलणे झाले आहे आणि कुठ पर्यंत तय आहे. त्या जर महीला अधिकारी आहेत तर एक कर्तव्य आहे. तर महीला अधिकारी मा. महापौरांबरोबर चर्चा करुन आणि सर्व पदाधिकारी, मित्रपक्ष,विरोधी पक्ष, सर्व गटनेता यांच्याशी चर्चा करुन जर त्यांनी काही चुकीचे काम केले आहे किंवा चुकीचे त्यांच्या बरोबर झाले आहे. त्याची चौकशी करुन विशेष महासभा आम्ही त्वरीत बोलावू.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** मा. महापौरजी, परवा स्थायी समितीमध्ये जे प्रकरण झाले होते, तेव्हा आपले सदस्य पण उपस्थित होते आणि थोडया वेळेने मी मा. महापौरांच्या कार्यालयामध्ये येऊन...

**सदस्य, श्री. अरुण आशान:-** सदस्यांचे नाव सांगा.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-**कोणाचे सदस्य, कोणता सदस्य.

**सदस्य, श्री. अरुण आशान:-**स्थायी समितीमध्ये सदस्य होते, राजेशभाई नाव सांगा.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:-</u>**साहेब स्थायी समितीमध्ये सेनेचे बागुलजी आहेत, बिटूजी आहेत सदस्य ऑनलाईन उपस्थित होते. आयुक्तांच्या समोर घटना झाली आहे. अतिरिक्त आयुक्त, जुईकर मॅडम तिथे उपस्थित होत्या.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-</u>** ही कालची घटना नाही आहे, घटना पहीलेच घटली आहे.

**<u>सदस्य, श्री. अरुण आशान:-</u>**राजेशभाई ही कालची घटना आहे का?

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:-</u>**पहीलेची पण घटना आहे आणि कालची पण घटना आहे.

**<u>सदस्य, श्री. अरुण आशान:-</u>**अरुणराव दिपक सिरवानीच्या चेंबरमध्ये, स्थायी समितीच्या चेंबरमध्ये हा प्रकार घडला आहे. तेव्हा महापौर तिथे उपस्थित होत्या, ते महापौरांकडे आले आयुक्त साहेब पण उपस्थित होते, स्थायी समितीच्या सभापतींनी सर्व हकीगत सांगितली. मग आता नविन काय सांगायला पाहीजे. सगळा प्रकार तुमच्या निदर्शनास आणून दिलेला आहे.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:-</u>**मा. महापौरजी, जर तुम्हांला शहानिशा करायची असेल, १० दिवस झाले आहेत, आज मी आपल्याकडे आलो तुम्हांला माझी व्यथा ऐकवली. माझ्या बरोबर काय झाले हे मी सर्व सांगितले आहे. तिथे आपले स्थायी समितीचे सदस्य बिटूजी आणि बागुलजी पण होते. त्यांनी पण सांगितले की, काल कशी वर्तणूक झाली आहे. स्थायी समितीमध्ये, स्थायी समितीच्या सदस्यांना थ्रिड केले आहे. आपण कलेक्शन विषयी बोलाल तर मी अनाधिकृत बांधकाम काढून टाकेल, हे करेल, ते करेल...

**<u>सदस्य, श्री. कलवंतसिंह सोहता:-</u>** राजेशजी एक मिनीट मी सुधारुन सांगत आहे की, स्थायी समितीमध्ये तुम्ही माहीती दिली. तुम्ही आम्हांला माहीती दिली, काल आम्ही नव्हतो, काल काय झाले आम्हांला माहीत नाही.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:-</u>**साहेब मी हेच सांगत आहे की, बागुलजी तिथे उपस्थित होते, मी महापौरांना, तुम्हांला, बोडारेजी यांना सगळयांना माहीती दिली की, काल हे प्रकरण झाले आहे. जर महापौरांनी विचार केला तर आताच ही महासभा स्थगीत करुन आम्हांला आपल्या चेंबरमध्ये बोलावून घ्या. आयुक्तांना तिथे बोलवा, विरोधीपक्ष नेता यांना पण तिथे बोलवा आणि उप महापौरजी यांना बोलवा. त्यांच्या समोरच या सगळया गोष्टी झाल्या आहेत. अतिरिक्त आयुक्त, जुईकर मॅडम स्थायी समितीमध्ये होत्या त्यांना पण बोलवा, त्याच्या समोर ही गोष्ट झाली आहे. एक अधिकारी स्थायी समितीमध्ये बसून स्थायी समितीच्या सदस्यांचे अपमान करीत आहे. माझे आपणाला निवेदन आहे की, ही मिटींग स्थगीत करुन आपण लगेच तुमच्या चेंबरमध्ये मिटींग बोलवा. पे ॲन्ड पाक्रवर पण बोला आणि या विषयावर पण बोलवा.

**<u>सदस्य, श्री. किशोर वनवारी:-</u>** ३७१ चा पण प्रस्ताव दिला आहे, त्यावर पण चर्चा करण्यात यावी.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-</u>** तुमची जी सुचना आहे, १० मिनीटासाठी मिटींग स्थगीत करुन सर्वांना महापौरांच्या चेंबरमध्ये बोलावून चर्चा करा, अशी तुमची सुचना आहे. महापौरांना विनंती करतो की, ही मिटींग स्थगीत करुन, मा. आयुक्त, अतिरिक्त आयुक्त, उप महापौर, स्थायी समिती सभापती आणि विरोधी पक्ष नेता यांना महापौरांच्या दालनामध्ये बोलावून आपण चर्चा करु काय झाले काय नाही, घटना काय आहे? कशी घडली आहे, का घडली आहे? चर्चा करण्यात यावी.

**<u>सदस्य, श्री. दिपक सिरवानी:-</u>** चौधरीजी महानगरपालिकेचा कोणताही कर्मचारी किंवा अधिकारी असेल त्यांच्या विषयी तक्रार दिली आहे. त्यांचे वर्तन कसे आहे? नगरसेवका बरोबर, क्लासवन अधिकारी यांच्या बरोबर पण यांचे वर्तन असे आहे.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-</u>** ठिक आहे ना आपण चर्चा करु आताच राजेशजीने बोलले आहे.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:-</u>**होय माझी पण तीच विनंती आहे की, मिटींग स्थगीत करा आणि सगळयांना बोलवा आपल्याकडे.

**<u>सदस्य, श्री. गजानन शेळके:-</u>** महापौर मॅडम आता ही सभा चालू आहे, ही सभा संपल्या नंतर महापौर कार्यालयामध्ये सर्वांना बोलावून मिटींग घ्यावी. आता ही सभा चालू ठेवावी.

**<u>सदस्य, श्री. अरुण आशान:-</u>** सचिव मॅडम ही महासभा १५ मिनीटांसाठी तहकुब करा आणि परत चालू करु.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:-</u>** ही महासभा संपल्या नंतर बैठक आयोजित करण्यात यावी.

**<u>महापालिका सचिव:-</u>** ही मिटींग संपवून नंतर बैठक घ्यावी, असे बोडारे साहेबांचे म्हणणे आहे, मला ऐकु आले आहे.

**<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-</u>** ऐकायला येत नाही.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:-</u>**महापौर मॅडम आमची विनंती आहे की...

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-</u>** महापौर मॅडम, अरुण आशान साहेबांनी आदेश दिले आहे की, मिटींग १५ मिनीटांसाठी स्थगीत करा, अरुण आशानजीने म्हणणे मान्य करुन लवकरात लवकर स्थगीत करण्यात यावी.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:-</u>**१५ मिनीटांसाठी स्थगीत करुन चर्चा करण्यात यावी.

**<u>महापालिका सचिव:-</u>** १५ मिनीटासाठी सभा स्थगीत करण्यात येत आहे आणि पुन्हा हीच सभा सुरु करण्यात येईल.

**<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-</u>** मिटींगमध्ये कोणकोण आहे? अपेक्षीत कोणकोण आहेत? आमचा अपमान होईल तेव्हा आम्हांला बोलवणार का?

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:-</u>**जर तुम्हांला पण यायचे असेल तर या.

या वेळी मा. महापौरांनी १५ मिनीटांसाठी महासभा स्थगीत करण्यात आली.

**<u>महापालिका सचिव:-</u>** सभा सुरु करण्यात येत आहे. आता उप महापौर बोलत आहेत, मिटींग स्थगीत केल्याबाबत.

**<u>उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-</u>** सन्माननिय महापौरांच्या आदेशान्वये आपण १५ मिनीटांसाठी सभा स्थगीत केली होती. प्रमुख् दोन मुदde जे विशेष होते, त्यामध्ये पे ॲन्ड पार्कच्या संदर्भामधला विशेष महासभेच्या संदर्भातला आणि उप आयुक्त प्रियंका राजपुत यांच्या संदर्भातला मुददा या दोन मुददयांच्या संदर्भामध्ये विशेष महासभा बोलवावी असे सगळया सदस्यांचे मत होते. मा. महापौरांनी १५ मिनीटे घेतले आणि त्याच्यामध्ये चर्चा केली. आम्ही आयुक्त साहेबांबरोबर चर्चा केली आणि २५ तारखेला दुपारी १२.०० वाजता विशेष महासभेचे आयोजन करण्यात आलेले आहे. विशेष महासभा यांच्या संदर्भामध्ये प्रियंका राजपुत दुपारी १२.०० वाजता घेण्यात येईल आणि ठरावाची प्रत आता उपलब्ध झालेली आहे. त्याच्या नंतर विषय पटलावर येण्या नंतर आपला पे ॲन्ड पार्क संदर्भातला महासभा घेण्यात येईल. म्हणून हा विषय आता संपलेला आहे. नियमाप्रमाणे आता आपण सभा सुरु करु या, धन्यवाद.

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. १७ वाचुन दाखवितात.

---

⇨ विषय क्र. १७:—<u>प्रस्तावाची सूचना क्रमांक.१</u>

रास्ता रूंदी करण्याच्या नावा खाली व विकासकाच्या हितासाठी
महापालिका प्रशासनाने १ नं. भाजी मार्केटवर केलेल्या बेकायदेशिर
कारवाई बाबत तसेच संबंधित दोषी अधिका—यांवर कायदेशिर कायवाई

करणे बाबत पालिका सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लर यांची प्रस्तावाची सूचना विचारात घेणे.

---

**महापालिका सचिव:-** श्री. भुल्लर महाराज यांचा प्रस्ताव आहे, कृपया त्यांनी बोलावे.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-** सन्माननिय महापौरजी, आवाज ऐकायला येत आहे का मॅडम? आपला कॅम्प नंबर १ चा भाजी मार्केट आहे, तो एक साईडने तोडला आहे, बिल्डरला फायदा पोहचवण्यासाठी तिथे डी.पी. रोड नव्हता. एक साईडचा अधिका-यांनी तोडला आहे, बिल्डरला फायदा पोहचवण्यासाठी त्याला जबाबदार कोण आहे? याचे उत्तर कोण देणार आहे?

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** अतिक्रमण विभागाच्या उप आयुक्त, श्रीम. प्रियंका राजपुत यांनी भुल्लर महाराज यांना उत्तर दयावे. उप आयुक्त अतिक्रमण जेष्ठ नगरसेवक, श्री. भुल्लर महाराज यांना उत्तर दयावे.

**उप आयुक्त (अं.बा.नि.वि.), श्रीम. प्रियंका राजपुत:-** नमस्कार सर, मला प्रश्न समजला नाही, परत एकदा सांगाल का?

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** प्रश्न सांगा भुल्लर महाराजजी.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-**कॅम्प नंबर १ चा भाजी मार्केट आहे, महापालिकेचा खुप जुना मार्केट आहे. अतिक्रमण विभागाने एक साईडचा समोरच्याला फायदा पोहचवण्यासाठी तोडला आहे, तो का तोडला आहे, हे सांगा.

**उप आयुक्त (अं.बा.नि.वि.), श्रीम. प्रियंका राजपुत:-**सर व्यवस्थती ऐकायला येत नाही, १ नंबर भाजी मार्केट एवढेच मला ऐकायला आले आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-**भाजी मार्केटमध्ये २५ ते ३० दुकाने आहेत, तुमच्या विभागाने तोडले आहेत आणि तो रोड डि.पी. मध्ये नाही. डी.पी. मध्ये नसल्याने समोरच्या बिल्डरला फायदा पोहचवण्यासाठी एक साईडने दुकाने तोडली आहेत, फक्त एकच साईड का तोडली आहे, याचे उत्तर दया.

**उप आयुक्त (अं.बा.नि.वि.),** श्रीम. प्रियंका राजपुत:- सरजी, मला बघून सांगावे लागेल हा विषय अजेडावर नव्हता मला माहीती घेऊन सांगावे लागेल.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-**मॅडम १४ एप्रिलचा आहे.

**उप आयुक्त (अं.बा.नि.वि.), श्रीम. प्रियंका राजपुत:-**सर डी.पी. मार्किंग करुन रस्त्याचे तोडकाम होते, जर आपण सांगत आहेत तर मला त्याची चौकशी करायला लागेल. चेक करायला लागेल चेक करुनच मी तुम्हांला सांगेल.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-**मॅडम तुमच्या विभागाडून तोडफोड झाली नाही, हे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून तोडले गेले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने उत्तर दयायला पाहीजे. त्यांनी आपल्याला उत्तर दयायला लावले आहे. त्यांनी बिल्डरला फायदा पोहचवण्यासाठी तोडले आहे.

**उप आयुक्त (अं.बा.नि.वि.), श्रीम. प्रियंका राजपुत:-**सर मला बोलावले उत्तर देण्यासाठी म्हणून मी आले. याच्यातील मला माहीत नाही.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-**हे सार्वजनिक बांधकाम विभागाने तोडले आहे.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** सार्वजनिक बांधकाम विभागाचे कोण आहेत, सितलानीजी उत्तर दया.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-** मा. महापौरजी, जेवढी माहीती मला या विषयावर आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-**याचे उत्तर मी तुम्हांला विचारले नाही, सार्वजनिक बांधकाम विभागाला विचारले आहे.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-**आपण ज्या विषयावर उत्तर मागत आहेत ना, त्याचाच खुलासा मी करीत आहे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** महाराजजीने सार्वजनिक बांधकाम विभागाला विचारले आहे, त्यांना उत्तर दया.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-**राजेशजी तुम्हांला पण विचारले नाही, तुम्ही पण शांत रहा. महाराजजी तुमच जो विषय आहे, मला वाटते की, यामध्ये जमनादास पुरस्वानी यांचा या मुदयामध्ये सहभाग आहे. कारण की मला माहीती आहे की, ते या मुददयासाठी धावपळ करीत होते. रोड मोठा बनवण्याच्या चक्करमध्ये १ नंबरच्या भाजी मार्केटचा काही भाग तोडले आहे. तेथील भाजी विके्रते माझ्याकडे पण आले होते. या विषयामध्ये चर्चा चालू होती, त्यामुळे मी थोडासा खुलासा करीत आहेत.

**सदस्य, श्री. अरुण आशान:-** तो विषय भुल्लर महाराज यांनी मांडलेला आहे. खरे म्हणटले तर सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत खुलासा होणे आवश्यक आहे. रस्त्याच्या रुंदीकरणामध्ये डायरेक्ट काही दुकाने बांधीत होत आहेत. तो रस्ता किती फुटाचा होता? त्याच्यावर काय कारवाई करण्यात आली? एकदम सिंपल प्रश्न आहे. या शिम्पल प्रश्नाचे उत्तर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून देण्यात यावे. सचिव मॅडम

**महापालिका सचिव:-** बोला, बोला. सार्वजनिक विभागाचे कोणी असतील तर मा. महापोरांनी उत्तर दयायला सांगितले आहे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** सार्वजनिक बांधकाम विभागाचे कोणीच उपलब्ध नाही, त्यांना नोटीस दया. महासभेला हजर राहत नाही. हा महासभेचा अपमान आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-**सार्वजनिक बांधकाम विभागाचे उप आयुक्त् कोणी असेल ना.

**सदस्य, श्री. अरुण आशान:-** सचिव मॅडम काय झाले?

**सदस्या, श्रीम. मिना सोनेजी:-** महासभेमध्ये चेष्टा चालली आहे का? कोणाकडेच उत्तर उपलब्ध नाही. आपण शहराच्या हितासाठी इथे बसलेले आहोत. जेव्हा महासभाअसेल तेव्हा सर्वांनी हजर राहणे गरजेचे आहे.

**उप आयुक्त, (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-** मा. महापौर, उप महापौर, आयुक्त साहेब, सन्माननिय सदस्य गण महापालिकेच्या कॅम्प नंबर १ भाजी मार्केटमधील गाळे अंशत: तोडण्यात आले आहेत. कारण त्या रस्त्याचे रुंदीकरण करायचे होते. म्हणून रस्ता रुंदीकरण करण्यासाठी आडचण होती तेवढया पुरते ते गाळे आर्धे काही प्रमाणात तोडलेले आहेत आणि परत त्या गाळयांना शटर वैगेरे रोडच्या साईटला लावून तो रोड जे लोक वापरत होते, त्यांच लोकांना वापरण्यासाठी तयार करुन देण्यात आलेले आहे. कोणाचाही गाळा पुर्णत: तुटलेला नाही.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-**उप आयुक्त साहेब आपण खोटे बोलत आहेत. पुर्णपणे गाळे गेलेले आहेत. हा रोड डी.पी. मध्ये आहेच नाही. आपण लोकांनी देवाणघेवाण करुन रोड तोडला आहे. बिल्डरला फायदा देण्यासाठी समोर ज्यांनी बॅरेक घेतले आहेत ना, ते तुमच्या समोर बसले आहेत. मला दिसत आहे.

**उप आयुक्त, (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-**आपल्याकडे जी माहीती असेल ती माहीती दया, आम्ही चौकशी करु

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-**चौकशी काय करणार, आपण तिथे समोरची बॅरेक कोणाची आहेत, विचारा. तुम्हांला लहान मुल पण सांगतील.

**उप आयुक्त, (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-**आम्ही जाऊन चौकशी करु. चौकशी करुन जो स्टेटस आहे तो महासभेपुढे ठेवण्यास आम्ही तयार आहेत. त्यामध्ये शंका नाही.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-**आपण डी.पी. नसतांना रोड तोडला कसा?

**उप आयुक्त, (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-**डी.पी. शिवाय रोड बनूच शकत नाही.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-**तिथे डी.पी. रोड आहेच नाही.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-** भाजी मार्केट महानगरपालिकेचा आहे ना.

**उप आयुक्त, (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-**होय.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-**का तोडला?

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-**होय बरोबर आहे, का तोडला?

**उप आयुक्त, (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-**हा विषय आयत्यावेळी आता आलेला आहे,माझ्याकडे पुर्ण माहीती नाही.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-** आयत्यावेळेचा विषय नाही.

**उप आयुक्त, (मुख्यालय), श्री. अशोक नाईकवाडे:-**या विषयी पुर्ण माहीती घेऊन आम्ही महासभेला देवू, सादर करु. परत अजून तिथे प्रत्येक्ष तळ पाहणी करुन आणि स्थळ पाहणी केल्या नंतर तिथे जी वस्तुस्थिती आहे, ती आम्ही महासभेसमोर कार्यवाही करणेसाठी ठेवू.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-**हा आयत्या वेळेचा विषय नाही, हा दिनांक १४/०१/२०२२ ला दिलेला विषय आहे. आज पासून सव्वा महीना पहीले दिलेला नाही. हा आयत्या वेळेचा विषय नाही. मला उत्तर दयायला लागेल.

**सदस्य, श्री. अरुण आशान:-** मा. महापौरजी, मा.उप महापौरजी, मा. आयुक्त साहेब, संबंधित अधिका-याने जे उत्तर दिलेले आहे. त्याबाबत मी सांगू इच्छितो की, तो रस्ता डी.पी. च्या मापात करण्यात आलेला आहे. तो रस्ता तिथे करीत असतांना महापालिकेचे मार्केट तिथे होते आणि ते तोडण्यात आलेले असेल,

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-**असेल नाही तोडले गेले आहे.

**सदस्य, श्री. अरुण आशान:-**तोडले गेलेले आहे, तर ते कोणाच्या परवागीने तोडले? का तोडले? रस्ता किती फुटाचा होता? आणि तो रस्ता सार्वजनिक बांधकामाच्या मार्फत मजुर झाला तेव्हा का सुचना दिली नाही, आता माहीती घेण्याची काय आवश्यकता आहे? अगोदरच याची माहीती असायला पाहीजे ना. आयुक्त साहेब खुलासा करा याचा.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-**अजेडावरचाच विषय आहे. या महासभेचा नाही मागच्या महासभेचा आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-** माहीती पाहीजे अजेडा आला आहे, त्याची माहीती ठेवणार नाही तर कशाची ठेवणार आहे.

**सदस्या, श्रीम. मिना सोनेजी:-** मला एक गोष्ट सांगायची आहे, यामध्ये ॲड करुन.

**सदस्य, श्री. अरुण आशान:-**बोला मिना मॅडम बोला.

**सदस्या, श्रीम. मिना सोनेजी:-**जसे महारजजीने सांगितले की, प्रत्येक गोष्ट नगरसेवकांना सांगायला लागते. जसे की आता उप आयुक्त यांनी सांगितले की, मला माहीती नाही. पाण्याची लाईन तुटली तर आम्हांला सांगावे लागते. गटार तुटतात कुठे लिकेज होतात ते पण सांगावे लागते.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** मा. महापौरजी,

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-** राजेशजी मिना मॅडमने आयुक्तांना विचारले आहे, तुम्हांला नाही.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-**मला पण काही तरी विचारायचे आहे ना.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-**तुम्हांला विचारले नाही मिना मॅडमने आयुक्तांना विचारले आहे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-**तुम्ही पण विचारा, तुम्हांला कोणी थांबवले आहे.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-**मिना मॅडमला विचारु दया, आयुक्तांकडून उत्तर मागत आहेत.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** सन्माननिय सदस्य मा. महापौरांच्या आदेशान्वये आयुक्त साहेब उत्तर देत आहेत. शांत बसा तुम्ही. आताच चर्चा करु नका.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:-** तुम्हांला उत्तर ऐकायचे आहे तर आयुक्त साहेब उत्तर देत आहेत, तुम्ही शांत रहा.

**आयुक्त, डॉ. राजा दयानिधी:-** मा. पिठासिन अधिकारी मोहदय, सर्व सनमाननिय सदस्य, या प्रकरणामध्ये मी प्रशासनाच्या वतीने असे सांगू इच्छितो की, जे घडलेल्या प्रकरणाचे निरीक्षण कलेले आहे. त्याच्यामध्ये प्रशासनाकडून एक वस्तुस्थिती अहवाल ते पुढच्या सभेमध्ये सादर करण्यात येईल. त्यावर निर्णय घेणे योग्य राहील असे आमचे मत आहे, धन्यवाद.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-**हा विषय पुढच्या महासभेमध्ये घेण्यात यावा.

**सदस्या, श्रीम. मिना सोनेजी:-**साहेब इतर विषय आहेत, त्याचे उत्तर आम्हांला कधीच मिळत नाही.

उप महापौर, श्री. भगवान भालेराव:- पुढचा विषय घेण्यात यावा.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-**पुढचा विषयघेण्याच्या पहीले आमचे म्हणणे ऐकून घ्या. हा विषय पुढच्या महासभेमध्ये ठेवाल तेव्हा.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** मा. महापौरजी, क्रिटीकेअर हॉस्पिटलपासून ए.टी.पी. स्कुल पर्यंत तो रोड १२ ते १५ फुटाचा बनत आहे आणि ए.टी.पी. स्कुल पासून वडार कॉलनी चौकापर्यंत २५ ते ३० फुटाचा रोड बनला आहे. मी आयुक्त साहेबांना निवेदन केले होते की, आयुक्तांनी सितलानी व नगररचनाकार यांना सांगितले होते की, मार्किंग देण्यात यावी, परंतु आज पर्यंत मार्किंग दिली नाही. याच्या मागे काय कारण आहे.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** सन्माननिय भुल्लर महाराजजी हा विषय डिफर करायला लागेल.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-**पुढच्या महासभेत घेऊ या.

**महापालिका सचिव:-** हा विषय डिफर करुन पुढच्या महासभेत सादर करणेस प्रशासनास निर्देश देत आहे.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:-** महापौर साहेबा, सचिव मॅडम,

**सदस्य, श्री. अरुण आशान:-** बोला दादा बोला.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:-**महापौर साहेबा, आयुक्त् साहेब, सर्व लोकप्रतिनिधींना माझा नमस्कार, आज जसे भुल्लर महाराजांनी महानगरपालिकेच्या मालमत्तेचे नुकसान होत होते, ते आयुक्त साहेबांना लक्षात आणून दिले आहे. भुल्लर साहेबांना धन्यवाद देतो. तसेच मी आयुक्त् साहेबांना, तसेच मी सभागृहाला पण एक माहीती देवू इच्छितो की,

स्कुल नंबर २२ तिथे १२०० वॉलचा प्लॉट महानगापालिकेचा जात आहे, त्याला कोण वाचवणार आहे, त्याला वाचवण्यासाठी कोण लक्ष देणार आहे. स्कुल नंबर २२ आमच्या वयवृध्द लोकांनी, शहरातील नेत्यांनी मागच्या ६० वर्षापासून हा प्लॉट वाचवून ठेवला आहे. त्या प्लॉटवर शाळेतील मुले खेळत असतात. आज तो प्लॉट चोरी होणार आहे. बाजारपेठमध्ये याची चर्चा चालू आहे, त्यामुळे मी माहीतीसाठी सर्वांना लक्षात आणून दिले आहे. तो प्लॉट वाचवण्यासाठी कारण की, १२०० वॉल पेक्षा जास्त तो प्लॉट आहे. आजच्या जमान्यामध्ये कोणी एक इंच जमिन सोडण्यासाठी तयार नाहीत. तरी कृपया आयुक्त् साहेबांनी यावर लक्ष देण्यात यावे, कारण की आपण आमचे नेतागण आहेत, शहरातील नेतागण यांनी सुध्दा या विषयावर लक्ष देण्यात यावे. हा प्लॉट उल्हासनगर महानगरपालिकेची मालमत्ता आहे, धन्यवाद.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:-</u>** मा. महापौरजी, मला एक प्रश्न विचारायचा आहे.

या वेळी काही सदस्य एकत्रित बोलत असल्यामुळे कोण काय बोलत होते ते स्पष्ट समजून आले नाही.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:-</u>**क्रिटीकेअर हॉस्पिटल आहेआणि ए.टी.पी स्कुल आहे.

**<u>सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:-</u>**महानगरपालिकेच्या मालमत्तेचा प्रश्न आहे. तेथील नगरसेवकांना शिव्या खाव्या लागत आहेत. तुम्ही काय केले? तुम्ही का डोळे बंद करुन बसले होते? तुम्ही का तोंड बंद करुन बसले होते? तरी कृपया ही उल्हानगर महानगरपालिकेची करोडो रुपयाची मालमत्ता आहे. आयुक्त साहेब यावर उत्तर देतील तर कृपा होईल, धन्यवाद.

**<u>सदस्य, श्री. मनोज सयानी:-</u>** आयुक्त साहेब बोला दादा सतरामजीना उत्तर दया.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:-</u>**माझे निवेदन आपण ऐकले असेल तर कृपया आपण त्याचे निवारण करा.

**<u>सदस्य, श्री. किशोर वनवारी:-</u>** दोन्ही प्रश्नाचे उत्तर देतील आयुक्त साहेब श्री. राजेश वदारिया यांचे व श्री. सतरामदासजीने पण.

**<u>सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:-</u>**महानगरपालिच्या मालमत्तेचे प्रश्न आहे.

**<u>आयुक्त, डॉ. राजा दयानिधी:-</u>** मा. महापौरजी, मा. सर्व सन्माननिय सदस्य, सन्माननिय सदस्यांनी जो मुददा उपस्थित केला आहे, याच्या बाबतीत मी खालील प्रमाणे कळू इच्छितो की, सन्माननिय सदस्यानी उपस्थित केलेल्या मुददयाच्या बाबतीत, संबंधित अधिकरी, संबंधित वार्ड ऑफिसर यांना सुचना देण्यात येते की, तात्काळ सदर जागेवर त्यांना कारवाई करण्यासाठी सुचना देण्यात येत आहे.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:-</u>**नगररचकार व शहर अभियंता यांना मार्किंग देण्यासाठी सांगण्यात यावे.

**<u>सदस्या, श्रीम. अंजली साळवे:-</u>** मा. महापौर मॅडम, आयुक्त साहेब,...

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:-</u>**साळवे मॅडम दोन मिनीट थांब मी बोलत आहे, प्लीज. मी पहीलेपासून बोलत आहे.

**<u>सदस्या, श्रीम. अंजली साळवे:-</u>**ठिक आहे तुम्ही बोला.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:-</u>**मा. महापौरजी, या गोष्टीचा जरा खुलासा करण्यात यावा.

**<u>सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:-</u>**विषय क्लियर करा, मी बोलण्यासाठी तयार आहे, सर्व लोकप्रतीनिधींना माहीती देण्यात यावी.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑**विषय क्र.१७:- <u>प्रस्तावाची सुचना</u>**

रस्ता रुंदीकरण्याच्या नावाखाली व विकासकाच्या हितासाठी महापालिका प्रशासनाचे 1 नं. भाजीमार्केटवर केलेल्या बेकायदेशीर कारवाई बाबत तसेच संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करणे बाबत. पालिका सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांची प्रस्तावाची

सुचना विचारात घेणेबाबत.

**प्रस्तावना**

उपरोक्त विषयान्वये उल्हासनगर महानगरपालिका हद्दीतील उल्हासनगर शहरातील सर्वात जुने भाजी मार्केट उल्हासनगर-1 या ठिकाणी अस्तित्वात आहे. विकासकाच्या अमिषाला बळी पडून महापालिका प्रशासाने सदर भाजी मार्केट रस्त्याच्या एका बाजूला निष्कासित करून जवळपास 25/30 गाळेधारकांना बेराजगारीच्या खाईत टाकले आहे.सदरचे लाभार्थी अत्यंत गरीब व कष्टकारी आहेत. त्यांचेवर उपासमारीची वेळ आली आहे.सदर रस्ता हा प्रारूप विकास आराखड्यात नसूनसुद्धा विकासकाच्या फायद्यासाठी सदर रस्ता लगत जुने महापालिकेचे भाजीमार्केटवर नििष्कासण्याची कारवाई करण्यात आली आहे. रस्त्याचे रुंदीकरण दुतर्फा करणे आवश्यक होते. फक्त भाजीमार्केट तोडून महापालिकेने काय साध्य केले? डीपी रोड नसतानाही सार्व.बांधकाम विभागाने विकासकाच्या इशाऱ्यावर सदर रस्त्याचे प्राकलन तयार केल्याचे समजते.यावरून स्पष्ट होते की प्रशासनाने विकासकाचे हीत लक्षात घेवुन सदर ठिकाणचे जुने भाजीमार्केट तोडण्याची कारवाई करून सदर सदर रस्त्याचे प्राकलन तयार करण्यात आले आहे.सदर निष्कासित करण्यात आलेल्या गाळेधारकांना कोणत्याही पर्यायी जागा देण्यात आली नाही.

आवश्यकता काय होती? तसेच कोणत्या आधारे सदरचे भाजीमार्केट तोडण्यात आले आहे? याबाबत प्रशासनाने खुलासा होणे आवश्यक आहे. सदर नाहक तोडण्यात आलेले भाजीमार्केट पुन्हा त्याच ठिकाणी बनवण्यात यावे अगर महापालिका आर्थीकदृष्टा सक्षम नसेल तर सदर भाजीमार्केट बेकायदेशीर तोडणाऱ्या संबंधित अधिकारी व ज्याच्या इशाऱ्यावर तोडण्यात आले तो विकासक यांचेकडून नव्याने भाजीमार्केट त्याच ठिकाणी बनवुन घेण्यात यावे. तरी सेत्या महासभेत या पुरक सुचनेवर चर्चा होवुन ठराव करणे ही विनंती

**महासभा ठराव क्र. ५६ क** **दिनांक १८/०२/२०२२**

**सुचकाचे नाव:- श्री. जमनादास पुरस्वानी**

**अनुमोदकाचे नाव :- श्री. स्वप्नील बागुल**

**ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार झालेल्या चर्चेअंती रस्ता रुंदीकरण्याच्या नावाखाली व विकासकाच्या हितासाठी महापालिका प्रशासनाचे १ नं. भाजीमार्केटवर केलेल्या बेकायदेशीर कारवाई बाबत तसेच संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्याचे प्रस्ताव कार्यसुचीवरुन वगळण्यास मान्यता देत आहे.**

**सुचकाची सही/-**

**अनुमोदकाची सही /-**

**सर्वानुमते**

**महापौर/पीठासीन अधिकारी**
**सर्वसाधारण महासभा**
**उल्हासनगर महानगरपालिका**

---

**महापालिका सचिव:-** मा. महापौरांनी पुढचा विषय घ्यायला सांगितले आहे, कृपया शांत रहा.

महापालिका सचिव :— विषय क्र. १८ वाचुन दाखवितात.

———————————————————————————————————

⇨ विषय क्र. १८:—आयत्यावेळी विषय

वारसा पध्दतीने सेवा निवृत्त/दिवंगत सफाई कामगार यांच्या
रिक्त जागेवर त्यांच्या वारसास नियुक्ती देणेबाबत.

———————————————————————————————————

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** पास..पास..

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** पास..पास..

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र.१८:- <u>आयत्यावेळी विषय</u>**

**वारसा पध्दतीने सेवा निवृत्त/दिवंगत सफाई कामगार यांच्या रिक्त जागेवर त्यांच्या वारसास नियुक्तीदेणेबाबत.**

**प्रस्तावना**

**उल्हासनगर महानगरपालिकेत लाड पागे कमिटीच्या शिफारशीनुसार वारसा पध्दतीच्या अंमलबजावणीबाबत, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, परिपत्रकक्रमांक — सफाई २०११/प्र.क्र. ३२७/विघयो — २, मुंबई - ३२, दिनांक २१ ऑक्टोंबर २०११ नुसार, महानगरपालिकेतील सफाई कामगार/मुकादम यांच्या निवृत्ती, मृत्यु, तसेच स्वेच्छा किंवा वैद्यकिय सेवा निवृत्तीनंतर त्यांचे जागी वारसा हक्काने नियुक्ती करण्यात येते.**

**उल्हासनगर महानगरपालिकेतील खालील सेवा निवृत्त/ दिवंगत सफाई कामगार/मुकादम यांचे जागी वारसा हक्काने नियुक्ती मिळणेबाबत खालीलप्रमाणे त्यांचे वारसाचे विनंती अर्ज सादर केलेले आहेत.**

| अ.क्र | मुळनोकरदाराचे नांव | सेवा निवृत्तीचा प्रकार | सेवा निवृत्तीचा दिनांक | अर्जदाराचे नांव | अर्जदाराचे कर्मचा-याशी नाते व जात |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. प्यारेलाल शेमीयल भगवाने | वैद्यकिय | दि. १७/०१/१७ | श्रीम. बबली सेमीयल भगवाने | मुलगा |
| २ | श्री. आनंद रामजी परमार | वयोमानानुसार | दि. ३१/०८/१९ | श्रीम. शारदा रामजी परमार | मुलगा |
| ३ | कु. लविंगा रामजी परमार | स्वेच्छा सेवा | दि. १५/१२/१९ | श्री. रामजी नारायण परमार | मुलगी |
| ४ | श्री. प्रकाश रामपाल चंडालिया | स्वेच्छा सेवा | दि. १९/१२/१९ | श्री. करण प्रकाश चंडालिया | मुलगा |
| ५ | श्री संजय सुरेश महरोलिया | वैद्यकिय | दि. २३/१२/१९ | श्रीम. मीना सुरेश महरोलिया | मुलगा |
| ६ | श्री. चेतन चंद्रपाल सौदे | स्वेच्छा सेवा | दि. २२/०४/२० | श्रीम. सरोज चंद्रपाल सौदे | मुलगा |
| ७ | श्री. महेश प्रकाश वीर | स्वेच्छा सेवा | दि. १६/०२/२० | श्री. प्रकाश भुषण वीर | मुलगा |
| ८ | श्री. राहुल नामदेव पाखरे | स्वेच्छा सेवा | दि. २५/०२/२० | श्रीम. गयाबाई नामदेव पाखरे | मुलगा |
| ९ | श्री. सुनिल लक्ष्मण परमार | स्वेच्छा सेवा | दि. १६/०३/२० | श्रीम. कमला लक्ष्मण परमार | मुलगा |
| १० | श्री. जयकुमार चंडालिया | वयोमानानुसार | दि. ३१/०३/२० | श्री. धरमविरसिंग चंडालिया | मुलगा |
| ११ | श्री. विशाल किशन चंडालिया | स्वेच्छा सेवा | दि. ०२/०४/२० | श्रीम. लता किशन चंडालिया | मुलगा |
| १२ | कु. नेहा विनोद छजनाले | स्वेच्छा सेवा | दि. १९/०४/२० | रीम. सुनिता विनोद छजनाले | मुलगी |
| १३ | श्री. संतोष भगवान अंगुरे | स्वेच्छा सेवा | दि. ४/०५/२० | श्री. इंदुबाई भगवान अंगुरे | मुलगा |
| १४ | श्री. मिलींद रंगनाथ मुगुटमल | वयोमानानुसार | दि. ३१/०५/२० | श्री. रंगनाथ दामु मुगुटमल | मुलगा |
| १५ | कु. रीबेका मायकल थोरात | वयोमानानुसार | दि. ३०/०६/२० | श्रीम. पुष्पा मायकल थोरात | मुलगी |
| १६ | कु. पुजा राजु पारचा | वयोमानानुसार | दि. ३१/०७/२० | श्रीम. सावत्री राजु पारचा | मुलगी |
| १७ | श्रीम. अनिता रवि वाल्मिकी | वैद्यकिय | दि. ११/१०/२० | श्री. रवि कालीचरण वाल्मिकी | पत्नी |

**लाड कमिटीचा मुळ उद्देश कुटुंबावर आलेले संकट उपासमार टाळणे असा आहे.**

**तसेच महाराष्ट्र शासन परिपत्रक क्रमांक — सफाई — २२१/प्र.क्र. १३७/नवि — ६ नगरविकास विभाग, दिनांक १०/१२/२०२१ रोजीच्या परिपत्रकामध्ये पुढील प्रमाणे नमुद आहे "सफाई कर्मचारी हे वर्ग -४ चे पद असुन वर्ग — ४ पदांसंदर्भातील नगरपालिका/नगरपंचायती महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी पहाता या पदावरील नियुक्त्यांचे अधिकार संबंधित मुख्यधिकारी/आयुक्त यांना आहेत. ही बाब विचारात घता शासन असे आदेश देत आहे की, सफाई कर्मचाऱ्यांच्या जागी वारसा हक्कांने नियुक्तीबाबतच्या शासनाने निर्गमित केलेल्या तसेच नगरपरिषद प्रशासन संचालनालयाने निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील अटीची पुर्तता होत**

**असल्यास, संबंधित मुख्याधिकारी/आयुक्त यांनी संबंधित वारसास नियुक्ती देण्याची कार्यवाही तात्काळ, याबाबतचा अर्ज प्राप्त झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत करावी व नियुक्ती आदेशानंतरच्या लगतच्या, नगरपारिषदा/नगरपंचायतीच्या बाबतीत सर्वसाधारण सभेत तर महानगरपालिकांच्या बाबतीत स्थायी समितीच्या सभेत या नियुक्त्या कार्योत्तर मंजूरीस्तव ठेवाव्यात" उक्त निंदेशास अनुसरून विहित नियमान्वये १७ कर्मचाऱ्यांच्या वारसांना दि. १३/०१/२०२२ रोजीच्या आदेशान्वये नियुक्ती देण्यात आली आहे. त्यास कार्योत्तर मान्यता मिळण्याबाबत मा. महासभेस विनंती करण्यात येत आहे.**

**महासभा ठराव क्र. ५७** **दिनांक १८/०२/२०२२**

**सुचकाचे नाव:- श्री. राजेश वदारिया**

**अनुमोदकाचे नाव :- श्री. राजेश वानखेडे**

**ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे विहित नियमान्वये १७ कर्मचाऱ्यांच्या वारसांना दि. १३/०१/२०२२ रोजीच्या आदेशान्वये वारसा पध्दतीने सेवा निवृत्त/दिवंगत सफाई कामगार यांच्या रिक्त जागेवर त्यांच्या वारसास नियुक्तीदेणेस मान्यता देत आहे.**

**या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.**

**सुचकाची सही/-**

**अनुमोदकाची सही /-**

**सर्वानुमते**

**महापौर/पीठासीन अधिकारी**
**सर्वसाधारण महासभा**
**उल्हासनगर महानगरपालिका**

---

**सायंकाळी ४.५३** वाजता महापौर श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:- २८-०२-२०२२

**उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २८-०२-२०२२ रोजीच्या विशेष महासभेचे इतिवृत्त.**

**०२**

उल्हासनगर महानगरपालिकेची विशेष महासभा सोमवार, दिनांक २८/०२/२०२२ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली. मा. अवर सचिव, महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांचेकडील दिनांक ३ जानेवारी, २०२२ रोजीचे पत्रान्वये ऑनलाईन अॅपद्वारे सभा आयोजित केली आहे. सदर सभेत मा. श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होते व खालील दर्शविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान - महापौर

२. श्री. भगवान शंकर भालेराव - उप-महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती अर्चना गोकुळ करणकाळे | २७ | श्रीमती ज्योती प्रकाश बठिजा |
| ४ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | २८ | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी |
| ५ | श्री. राजेंद्रसिंह विरसिंग भुल्लर | २९ | श्री. सुमित सागर सोनकांबळे |
| ६ | श्री. स्वप्नील मिलींद बागुल | ३० | श्रीमती ज्योत्स्ना सुरेश जाधव |
| ७ | श्रीमती सुरेखा हनुमंत आव्हाड | ३१ | श्रीमती शीतल चंद्रकांत कदम |
| ८ | श्रीमती अंजना अंकुश म्हस्के | ३२ | श्रीमती वसुधा धनंजय बोडारे |
| ९ | श्री. कलवंतसिंग गरुदेव सोहता | ३३ | श्री. धनंजय बाबुराव बोडारे |
| १० | श्रीमती मिना कुमार आयलानी | ३४ | श्रीमती ज्योती रमेश चैनानी |
| ११ | श्रीमती गीता लालचंद साधनानी | ३५ | श्रीमती कांचन अमर लुंड |
| १२ | डॉ. प्रकाश घनश्यामदास नाथानी | ३६ | श्री. शंकर गोविंदराम लुंड |
| १३ | श्री. महेश पहिलराज सुखरामनी | ३७ | श्रीमती सुनिता बाबुराव बगाडे |
| १४ | श्रीमती शुभांगीनी निकम | ३८ | श्रीमती सुमन राजेश सचदेव |
| १५ | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग | ३९ | श्री. सतरामदास पुतनदास जेसवानी |
| १६ | श्रीमती ज्योती प्रशांत पाटील | ४० | श्री. प्रमोद नामदेव टाले |
| १७ | श्री. राजेश नानिकराम वदारिया | ४१ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| १८ | श्रीमती डिम्पल नरेंद्र ठाकुर (कुमारी) | ४२ | श्री. किशोर नारायणदास वनवारी |
| १९ | श्रीमती दिपा नारायण पंजाबी | ४३ | श्रीमती मिना चंद्रगुप्त सोनेजी |
| २० | श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी | ४४ | श्रीमती कविता सुरेश गायकवाड |
| २१ | श्री. राजेंद्र शांताराम चौधरी | ४५ | श्री. मनोज दिलीपकुमार सयानी |
| २२ | श्रीमती इंदिरा जमनादास उदासी | ४६ | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |
| २३ | श्रीमती कविता लाल पंजाबी | ४७ | श्री. सुरेंद्र बाळकृष्ण सावंत |
| २४ | श्री. जीवन चंद्रभान इदनानी | ४८ | श्री. अरुण लक्ष्मण आशान |
| २५ | श्रीमती सविता प्रविण तोरणे (रगडे) | ४९ | श्रीमती आशा जीवन इदनानी |
| २६ | श्री. गजानन प्रल्हाद शेळके | | |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते / होत्या.

१. श्री. मंगल बालकृष्ण वाघे, २. श्रीमती जयश्री ज्ञानेश्वर पाटील, ३. श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड, ४. श्री. हरेश परमानंद जग्यासी, ५. श्रीमती मिनाकौर अजितसिंग लबाना, ६. श्रीमती आशा नाना बिराडे, ७. श्री. रविंद्र दशरथ बागुल, ८. श्रीमती चरणजितकौर राजेंद्रसिंह भुल्लर, ९. श्री. राजू किशनचंद जग्यासी, १०, श्रीमती रेखा अशोक ठाकुर, ११. श्रीमती सरोजिनी टेकचंदानी, १२. श्रीमती जया प्रकाश माखिजा, १३. श्रीमती अपेक्षा भगवान भालेराव, १४. श्रीमती छाया सुजित चक्रवर्ती उफर् अडसुळ, १५. श्रीमती पुष्पा नाना बागुल, १६. श्रीमती शुभांगी मनोहर बेहनवाल, १७. श्री. रवी किशनचंद जग्यासी, १८. श्रीमती ज्योती शामराव माने, १९. श्री. रमेश महादेव चव्हाण, २०. चंद्रशेखर केशव यादव, २१. श्रीमती मिताली राजेश चान्पूर, २२. श्रीमती संगिता नितीन सपकाळे, २३. श्रीमती दिप्ती नविन दुधानी, २४. श्री. भारत रामचंद राजवानी (गंगोत्री), २५. श्रीमती अंजली चंद्रकांत साळवे, २६. श्रीमती कविता सुधिर बागुल, २७. श्रीमती मिनाक्षी रवी पाटील, २८. श्री. विजय चाहू पाटील, २९. श्री. आकाश परशुराम पाटील.

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

१.डॉ. राजा दयानिधी, आयुक्त

२. डॉ. करुणा जुईकर, अतिरिक्त आयुक्त

३. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, महापालिका सचिव

४. श्री. अशोक नाईकवाडे, उप आयुक्त (मुख्यालय)

५. डॉ. सुभाष जाधव, उप आयुक्त, सार्वजनिक आरोग्य विभाग

६. श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखा अधिकारी

७. डॉ. विजय खेडकर, मुख्य लेखा परिक्षक

८. श्री. सुर्यकांत खटके, लेखाधिकारी

९. श्री. अशोक मोरे, उप लेखा परिक्षक

१०. डॉ. दिपक पगारे, वैदकीय आरोग्य अधिकारी

११. श्री. बाळू नेटके, मुख्य अग्निशमन अधिकारी

१२. श्रीम. श्रध्दा सपकाळे,

१३.श्री. अच्युत सासे, सहा. आयुक्त

१४. श्री. एकनाथ पवार, मुख्य स्वच्छता निरीक्षक

१५. श्री. विनोद केणे, मुख्य स्वच्छता निरीक्षक

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्रीमती नर्गीस खान, लिपीक

२. श्री. बाळू भांगरे, लिपीक

सायंकाळी ४.१५ वाजता वंदे मातरम म्हणून सभेची सुरुवात करण्यात आली.

<u>महापालिका सचिव:—</u> विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ विषय क्र. १ :— **वाहतुक समस्यांचे निवारण करणेसाठी उल्हासनगर महानगरपालिकेचे रस्तांवर पे अॅन्ड पार्क पॉलिसी राबविण्यास आलेला ठरावास चर्चा व पूर्नविचार करुन ठराव रदद करणे बाबत.**

---

**सदस्य, श्री.अरूण आशान:-** सचिव मॅडम मला वाटते आज ही सभा आपण तकहूब केली पाहिजे, आपले सदस्य आकाश पाटील यांचे आकस्मिकपणे निधन झाले आहे. खर तर एवढ्या तरूण वयामध्ये जाणारा हा मुलगा अतिशय मनमिळावू, चांगला असा हा नगरसेवक, कार्यकर्ता हा आपल्यामधून आज गेलेला आहे. या कोरानाच्या काळामध्ये आपले बरेचसे सहकारी आपल्याला साथ सोडून गेले.मध्यंतरी आपले एक सहकारी यांचे आकस्मिक निधन झाले, गुप्ता यांचे पण निधन झाले.आणि आज हा तरूण मुलगा यांचे ८ दिवस आधी हृदय विकाराने निधन झाले. आपण त्यांना श्रद्धांजलीपर ही सभा तकहूब केली पाहिजे. कारण की आपण आपल्या सदस्याच्या बिना सभा चालविणे, म्हणजे एखादा सदस्य नसेल तर त्याचे किती दु:ख असते आणि आज त्यांच्या या पाटील कुटुंबावर एवढा मोठा घात झाला आहे. परशुराम पाटील यांचा मुलगा अचानकपणे हृदय विकाराच्या झटक्याने त्याचे निधन झाले आहे. खरतर त्यांना श्रद्धांजली आपण अर्पित करत आहोत.आजची ही सभा सर्व सन्माननीय सदस्यांना मी विनंती करतो की आजची सभा आपल्या तरूण तडफडार नगरसेवकाचा झालेल्या आकस्मात निधनामुळे ही तकहूब करण्यात यावी अशी मी सभागृहाला विनंती करतो. आणि मी माझ्या वतीने, माझ्या परिवाराच्या वतीने, शिवसेना परिवाराच्यावतीने आकाश पाटील यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पित करतो.धन्यवाद.

**सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी:-** मा. महापौरजी काही दिवसापूर्वी आपले या सभागृहाचे सदस्य्, स्थायी समितीचे सदस्य् आकाश परशुराम पाटील यांचे हृदय  विकाराच्या झटक्याने निधन झाले.आणि पाटील कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळलेला आहे. तरूण तडफदार असा नगरसेवक आपल्यातून गेला. आपण कधी विचारही केला नव्हता की, आकाश पाटील यांचे निधन होईल. आणि ते आपल्यातून जातील. या त्यांच्या निधनाने पाटील कुटुंबाची फार मोठी हानी झालेली आहे. तशीच शिवसेना पक्षाचे खास करून नुकसान झालेले आहे. आकाश पाटील यांचा स्वभाव हासरा आणि मिळून मिसळून सर्वांशी चांगले संबंध ठेवणारा नगरसेवक आपल्यातून गेलेला आहे. मी माझ्या शिवसेना पक्षाच्यावतीने त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पित करतो. सर्व सन्माननीय सदस्यांना मी विनंती करतो, श्रद्धांजली अर्पण करून आजची ही सभा आपण अॅडजर्ण करूया.आणि पुढची तारीख महापौर ठरवतील त्या तारखेला सभा होईल. पाटील कुटंबावर दु:खाचे डोंगर कोसळले आहे त्यांच्या दु:खात आपण सर्व शामील होवूया आणि भावपूर्ण श्रद्धांजली अर्पित करूया. त्याच बरोबर पाटील कुटुंबियांना आकाश पाटीलच्या पश्च्यात दोन मुले आहे आणि त्यांच्या पत्नी आहेत. त्यांना मदत म्हणून आतापर्यंत एक

महिन्याचे मानधन आपण देत आलेलो आहात. ते मानधन सर्व सन्माननीय सदसय मिळून त्यांच्या कुटुंबियांना देवूया. मी पुन्हा एकदा माझ्या परिवारातर्फे आणि शिवसेना पक्षातर्फे भावपूर्ण श्रद्धांजली अर्पित करतो.

**महापालिका सचिव:-** माननीय महापौर यांनी बोडारे साहेबांना बोलायला सांगीतले आहे.

**सदस्य, श्री.धनंजय बोडारे:-** माननीय महापौरजी २२ तारखेला सकाळी ६-६.३० वाजता बातमी समजली आणि धक्का बसला. सकाळी ४.३० वाजता आकाश पाटील शुभ सकाळचा मेसेज करतात आणि ७ वाजता असे फोन आले की आकाश पाटील आपल्यात नाही आहे. प्रचंड धक्का बसला,आमच्या प्रत्येकाची अशी अवस्था होती तर त्या कुटंबाची अवस्था काय असेल त्या दिवशी,म्हणजे अर्ध्या तासात आकाशनी सर्व खेळ आटोपला.अगदी तरूण,साधारण ३५-३६ वय असलेला हा मुलगा नगरसेवक म्हणून या महानगरपालिकेमध्ये पहिल्याच टर्ममध्ये आला आणि सगळ्यांशी हसून खेळून,मनमिळावू मुलगा, नगरसेवकांशी वागणे तसेच होते अधिकाऱ्यांशी वागणे तसेच होते आणि वार्डमधल्या लोकांशी पण तसेच होते. पाटील परिवार हा पहिलेपासून फक्त शिवसेनेशी जोडलेला आहे त्यामुळे चौधरीजींनी सांगीतल्याप्रमाणे आमचे उपशहरप्रमुख परशुराम पाटील यांचा मुलगा, आपल्या उल्हासनगर महानगरपालिकेच्या माजी महापौर अपेक्षा पाटील यांचे दीर,आणि विकास पाटील व विकास पाटील दोघे भाऊ हे सध्या नगरसेवक होते. म्हणजे संपूर्ण परिवार शिवसेनेचे म्हणून शिवसेनेचे प्रचंड नुकसान झालेले आहे त्याबरोबर असा तरूण मुलगा तरूण नगरसेवक आपल्यातून गेलेला आहे त्यामुळे आपल्या महापालिकेचे नुकसान झालेले आहे. म्हणजे अर्ध्या तासामध्ये असे कोणी आटोपले विश्वासच बसत नाही यावर. फोन आल्यानंतर विश्वास बसला नाही. मी माझ्या परिवाराच्या वतीने, शिवसेनेच्या वतीने, आणि महापालिकेच्या वतीने आकाशला श्रद्धांजली अर्पित करतो. आणि पाटील कुटंबावर जे दु:खाचे डोंगर सावरले आहे त्यातून सावरण्याची त्यांना शक्ती मिळो, अशी ईश्वर चरणी प्रार्थना करतो. आणि त्यांच्या पश्चात दोन मुले आणि पत्नी आणि बाकीचा परिवार आहे. आपण आपली प्रथा आहे की प्रत्येक वेळी आपण महापालिकेचे एक योगदान म्हणून ते नगरसेवक गेल्यानंतर त्यांच्या पश्चात त्यांच्या कुटुंबियांना मानधन देतो, चौधरीजींनी जो प्रस्ताव ठेवला आहे, तो योग्य आहे आणि परंपरेप्रमाणे आपण त्यांना द्यावा आणि आपली प्रथा आहे की कोणताही सन्माननीय सदस्य गेल्यानंतर आपण सभा ॲडजॉंइट करतो. तर ही मिटींग सुद्धा रद्द करावी माझ्यावतीने आणि संपूर्ण परिवाराच्या वतीने, शिवसेना पक्षातर्फे त्यांना आदरांजली, श्रद्धांजली अर्पण करतो.

**सदस्य, श्री.प्रदिप रामचंदानी:-** महापौर मॅडम,मी सर्वात पहिले आपल्याला विनंती केली आहे,की मला बोलून दिले जावे.

**सदस्य, श्री.मनोज सयानी**:- पहिले मी पहिले तूम्ही काय, कोणीही बोलू शकत ना.

**सदस्य, श्री.प्रदिप रामचंदानी:-** नाही नाही मी तुम्हाला पण आग्रह करतो, विनंती करतो सर, तुम्ही पण बोला, हा काही असा विषय नाही आहे ज्यावर आपण झगडा करू, कारण आयुष्यात खूप गोष्टींवर झगडा करू शकतो पण आज आपल्यामध्ये जेव्हा समजले, दोन विषयांमुळे आज ही सभा स्थगित केली पाहिजे, पहिला विषय हा आहे की एक जवान नगरसेवक ३५ वर्षाचा, तो आयुष्यात पहिल्यांदा नगरसेवक बनून उल्हासनगर

महापालिकेत पोहोचला. याआधी पाहिले तर त्यांचे खूप पारिवारीक संबंध आहे राजकारणाशी. त्यांचे वडील परशुराम पाटील हे अनेक वर्षे शिवसेनेचे शाखाप्रमुख राहीले, उपशहरप्रमुख राहीले आहे अंबरनाथचे आणि त्यांच्यासोबत जेव्हा भाजापची युती होती तेव्हा आम्हाला पण त्यांच्यासोबत काम करण्याची संधी मिळाली. पण एक असे कुटंब जे एक मजबूत कुटंबातून शहरात एक महापौर बनला, दोन्ही मुले नगरसेवक होते,आणि यांचा काका प्रधान पाटील पण नगरसेवक राहीला आणि अशा स्थितीत असे कुटंब ज्यांचे योगदान उल्हासनगरच्या राजकारणात राहीले आहे आणि अचानक ही बातमी ऐकणे, की त्यांचे निधन झाले ते पण ऐवढ्या लहान वयात, पाहिले तर त्यांची राजनिती खूप उज्वल होती,पण ३५ वर्षाच्या वयात त्यांचा आयुष्याचा प्रवास संपला, देवापुढे कोणाची नाही चालत, म्हणून मी या दुखद घटनेसाठी पूर्ण भाजप परिवारकडून मी त्या दिवंगत आत्म्याला श्रद्धांजली अपर्ण करतो. आणि मी हे इच्छितो की, त्यांच्या कुटुंबियांना एवढे मोठे दु:ख सहन करण्याची शक्ती भेटो. त्यांच्या कुटुंबात त्यांची मुले,पत्नी, यांचे एक चांगले भविष्य होवो, कारण खूप मोठे दु:ख आहे ती झेलण्याची शक्ती त्यांना भेटो.आणि मी या गोष्टीवर पण सहमत आहे की नगरसेवकाचा मृत्यू झाला आहे तर त्यांना श्रद्धांजली देण्यासाठी सभा स्थगित केली पाहिजे आणि दुसरा विषय हा आहे की सोबत आपण हे पण पाहिले पाहीजे, या दिवसात महाराष्ट्राच्या राजनितीमध्ये एक खूप मोठे राजा, जे की छत्रपती आहे ते भूख हडताळ वर बसले आहे, मी महाविकास आघाडीला विनंती करतो की, त्यांची तब्येत दिवसेंदिवस खराब होत चालली आहे, मराठा समजासाठी ते एक न्याय मागत आहेत. म्हणून माझी विनंती आहे की, महाविकास आघाडी लवकरात लवकर त्यांना उठवतील, आणि मराठ्यांना न्याय देतील. या दोन कारणांसाठी ही सभा स्थगित केली पाहिजे. धन्यवाद, माझी श्रद्धांजली येथे समाप्त होते.

**महापालिका सचिव:-** साळवे मॅडमला बोलायला सांगितले आहे मॅडमनी.

**सदस्या,श्रीम.अंजली साळवे:-** मा. महापौर मॅडम आणि सर्व सभागृह, आज आपल्यातील अत्यंत तडफदार तरूण नगरसवेक,आकाश पाटील यांचे दुर्दैवी निधन झालेले आहे, ही घटना अत्यंत दुर्दैवी अशी आहे, माझ्या तर्फे, माझ्या परिवारातर्फे, आणि माझ्या काँग्रेस पक्षातर्फे त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करते, धन्यवाद.

**सदस्या,श्रीम.सुनिता बगाडे:-** मा. महापौरजी, मा.आयुक्त साहेब,सन्माननीय नगरसेवक आज आपले नगरसेवक आकाश पाटील यांचे दु:खद निधन झाले आहे.तर माझ्यातर्फे, माझ्या कुटंबियांतर्फे,आणि माझ्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी तर्फे, भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करते.

**सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी:-** मा. महापौरजी मी माझ्या भाजप पक्षातर्फे भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. आमचे मित्र, स्थायी समिती मधले आमचे साथीदार,मृदू स्वभावाचे,जे जास्त नाही बोलायचे,नेहमी शांत राहायचे असे मित्र आकाश पाटील जी यांच्या दुखद निधनावर मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. मा. महापौरजी सोबतच भाजपचे उल्हासनगर मंडल क्र.१ चे महासचिव, सुनिल सुंद्रानी जी जे गोलमैदान जवळ राहत होते,त्यांचे पण हार्ट अटॅक ने मृत्यू झाला आहे, मी इच्छितो की त्यांना पण श्रद्धांजली अर्पण करून आजची सभा स्थगित करू. आणि मा. महापौरजी एक दिवस निश्चित केला जावो,तो महासभेत आजच निश्चित केला जावो, मी

माझ्या कुटंबियांतर्फे माझ्या भाजप कुटंबियांतर्फे आकाश पाटीलजी यांच्या कुटुंबाला देव अशा मोठ्या दुख सहन करण्याची  शक्ती प्रदान करो अशी कामना करतो.

**<u>सदस्य, श्री.मनोज सयानी</u>**:- मा. महापौरजी,आपल्या महानगरपालिकेचे नगरसेवक, एक सदस्य,आकाश पाटीलजी यांचे निधन झाल्यामुळे आजची ही महासभा तहकूब करायची मी पण शिफारस करतो आणि सोबतच पाटील परिवार यांना अशा वेळी सांत्वना देणे, श्रद्धांजली देणे आपण एवढेच करू शकतो. त्यांच्या परिवारावर,परिजन ज्यातून जात आहे किंवा त्यांच्यावर अचानक ही वेळ जी आली आहे. आम्ही पूर्ण मनापासून, आमच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे, आणि संपूर्ण कुटुंबियांकडून त्यांना श्रद्धांजली देतो. आणि पाटील परिवाराला ह्या दुखाच्या प्रसंगी ईश्वर शक्ती देवो आणि त्यांच्यावर जी वेळ आली आहे ती लवकरात लवकर जावो आणि त्यांचा बाकी परिवार व सदस्य शहर हितासाठी, आपल्या व्यवसायीक जीवन आणि सामाजिक जीवनात पुढे जावो. आजची ही महासभा तहकूब करायची मी पण मागणी करतो आणि जसे शिवसेना शहरप्रमुख आणि नगरसेवक राजेंद्र चौधरींनी सांगितले सर्व नगरसेवकांचे एक महिन्याचे मानधन पाटील कुटुंबियांना देण्यात यावे अशी मी पण मागणी करतो. आणि माझ्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे मी मागणी कबूल करतो आणि मागणी करतो. धन्यवाद.

**<u>सदस्या, श्रीम.मिना सोनेजी:-</u>** मा. महापौरजी, आपले नगरसेवक आकाश पाटील जी यांचे आकस्मात निधन झाले आहे. त्यासाठी आम्ही पण श्रद्धांजली अर्पण करतो, राजनितिक मित्र ते आधी पारिवारीक मित्रता आहे आमची, खूप वेळ आम्ही सोबत आहोत, तर त्यांच्यावर हे जे दु:ख आले आहे किंवा त्या दुखात आम्ही पण सहभागी आहो,आणि चौधरी साहेबांनी जो प्रस्ताव ठेवला आहे मानधनाचा त्यला मी पण पाठींबा देते आणि त्यांच्या परिवाराला या दु:खाच्या क्षणात शांती प्रदान होवो,त्यांना ताकद भेटो की ते या दुखातून बाहेर पडतील,माझ्या समस्त पॅनलतर्फे मी  श्रद्धांजली अर्पण करते.

**<u>सदस्य, श्री.किशोर वनवारी:-</u>** मा. महापौरजी, मी पण आपले मित्र, आपले साथी,भाऊ, आकाश पाटील, मी समजतो पाटील कुटंबात एवढा सभ्य व्यक्ती कोनी नव्हता,सर्व सभ्य आहेत पण हा जेवढा बोलायचा सर्वांशी, सर्वांचा आदर करून,असा व्यक्ती कोणी नाही पाहीला मी, अशा तरूण व्यक्तीचा ३५ वर्षाच्या वयात जे निधन झाले,त्याने मला खूप धक्का बसला,आणि आमचे भाऊ, परशुराम, जे पाटील साहेब आहेत,माझे भावापेक्षा जास्त संबंध आहे, मी त्यांना मोठा भाऊ मानतो, आणि जसे चौधरी साहेबांनी सांगीतले एक महिन्याचे मानधन दिले पाहीजे, आणि सोबतच यामध्ये पक्षपाताचा काही संबंध नाही, कधी पण कोणत्याही पक्षाचा नगरसेवकाचे निधन झाले तर आपण सभा तकहूब करतो, आमचे मित्र आकाश पाटील यांना ईश्वरआपल्या चरणी स्थान देवो.जय झुलेलाल.

**<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-</u>** मा. महापौरजी,उपमहापौरजी, आयुक्त साहेब,दुखाची गोष्ट आहे,४० पेक्षा कमी वयात आकाश पाटील यांचे निधन झाले,खूपच दुखद ही घटना होती, अत्यंत कमी वयात, शांत स्वभावाचे, शांत, सुशील,खूप कमी शब्दात बोलणारे,आकाश पाटीलजी जगात नाही राहीले आहे, मी डॉ.प्रकाश नाथानी, माझ्यातर्फे,माझ्या परीवारातर्फे,भाजपा परीवारातर्फे तर्फे मी भावपूर्ण श्रद्धांजली देतो.आणि भविष्यात मी सांगतो एक छोटीसे वाक्य आहे,जेवढेपण ५० वर्षाच्या वरचे लोक आहे,सर्व जण आपले लिपीड प्रोफाईल ,कोलेस्ट्राल टेस्ट करून घ्यावे,त्याने आपल्याला माहीती पडेल आणि भविष्यात अशी घटना घडणार नाही. तर मी दोन शब्द इथेच थांबवतो,त्यांच्या आत्म्याला शांती भेटो. ओम शांती.

**<u>महापालिका सचिव:-</u>** आपले मानधन देण्यास सांगितले आहे पण असे बहुतेक वेळा असे होते की, काही नगरसेवक पत्र देतात तर माझी विनंती राहील की असे असेल तर त्यांनी दोन दिवसात लेखी कळवावे नाहीतर सर्वांचे पगार,मानधन माननीय सदस्य दिवंगत आकाश पाटील साहेब यांच्या नावे केले जावे.

**<u>सदस्या, श्रीम.मिना आयलानी:-</u>** मा.महापौरजी खुप दु:खाने सांगावे लागतय की, आपल्यात आकाश पाटील भाई नाही राहीले आहे, डॉ. नाथानी जसे सांगितले ज्यांचे वय ५० आहे त्यांनी लिपीड प्रोफाईल केले पाहिजे. कारण कोणाच्याही घरात अशी दुखत घटना नाही घडो, तर मी सर्वांना विनंती करते की लिपीड प्रोफाईल चेक करून घ्यावे आणि मी आकाश पाटीलजी यांच्या कुटुंबा सोबत आहे,देवाला प्रार्थना करते की हे दु:ख सहन करण्याची त्यांना शक्ती दे.ओम शांती.

**<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-</u>** मा. महापौरजी,उपमहापौरजी, आयुक्त साहेब, हे जेवढे पण आपल्याकडे गटनतो आहेत,गटनेता जर बोलतील तर सर्वांकडून होवून जाईल.लेटर द्यायची गरज पडणार नाही.जसे आमचे भाजपचे गटनेता जमनूजी बोलतील, तर आम्ही त्यांच्यासोबत राहू, मानधनची गोष्ट आहे तर आमचे गटनेता बोलतील तर आमच्या भाजपाचे पूर्ण परिवार  होवून जाईल.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>** मा. महापौरजी, भाजपा नेहमी सर्वाच्या सोबत असते, जसे शिवसेना आहे,राष्ट्रवादी आहे, सर्व आहेत तसे भाजपा पण आहे, तर आम्ही पण सर्व नगरसेवक आपले मानधन देवू,जेव्हा आपले वरीष्ठ आणि शिवसेनेचे नगरसेवक चौधरीजींनी सांगीतले, आमची सहमती असते आपसांत सर्व पक्षांमध्ये, कधी आम्ही बोलतो तर शिवसेना सपोर्ट करते, तर आम्ही पण सर्व मिळून त्यांच्या परिवारासाठी त्यांच्या सोबत आहे वेगळे वेगळे नाही आहे.

**<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-</u>** धन्यवाद जमनू जी.

**<u>महापालिका सचिव:-</u>** कृपया सर्वजण श्रद्धांजली देणे साठी दोन मिनीटे उभे राहावे. ही सभा ९ तारखेला होईल. कृपया सर्वजण श्रद्धांजली अर्पित करणे साठी दोन मिनीटे उभे राहावे ही सभा ९ तारीखे पर्यंत स्थगित राहणार ४ वाजे पर्यंत.कृपया सर्वांनी दोन मिनिटे मौन पाळावे व त्या नंतर राष्ट्रगित होईल आणि सभा समाप्त होईल.

---

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्र चौधरी , श्री.धनंजय बोडारे, श्री. जमनादास पुरस्वानी,

श्री. किशोर वनवारी, श्री. मनोज सयानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. अरूण आशान, श्रीम. अंजली साळवे, श्रीम. मिना सोनेजी,

श्री. प्रदिप रामचंदानी, श्रीम. सुनिता बगाडे

<u>शोक प्रस्ताव</u>

उल्हासनगर महानगरपालिकेचे तरूण तडफदार नगरसेवक, स्थायी समितीचे सदस्य, श्री. आकाश परशुराम पाटील, यांचे नुकतेच दिनांक २२/०२/२०२२ रोजी आकस्मीत निधन झाले आहे.

कै. आकाश परशुराम पाटील हे एक चांगले नगरसेवक होते. त्यांचा स्वभाव हसरा व अतिशय मनमिळावू सर्वांशी चांगले संबंध ठेवणारे व नगरसेवक, अधिकारी, लोकांशी व्यवस्थीत वागणारे. पाटील परिवार हा पहील्यापासून फक्त शिवसेनेशीच जोडलेला आहे. परशुराम पाटील यांचा मुलगा आणि

महापालिकेच्या माजी महापौर, श्रीम. अपेक्षा विकास पाटील यांचे दिर, विकास पाटील व आकाश पाटील हे दोघेही नगरसेवक होते. पुर्ण परिवार शिवसेनेचाच होता. मनाला चटका लावून जाणारे त्यांचे व्यक्तीमहत्व होते. यांचे निधन झाल्याने दु:खाचा डोंगरच कोसळला आहे.

त्यांच्या कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असुन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

विशेष महासभा ठराव क्र.६७ **क** दिनांकः– २८/०२/२०२२

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार नगरसेवक, कै. आकाश परशुराम पाटील यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे आणि त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

तसेच उल्हासनगर महानगरपालिकेच्या नगरसेवकांच्या मागणीनुसार त्यांच्या पश्चात कुटूंबियांच्या भविष्यासाठी सर्व नगरसेवकांचे १महिन्याचे मानधन कै. आकाश परशुराम पाटील यांच्या पत्नी व मुलांना देणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सर्वानुमते

महापौर/पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

सुचकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. मनोज सयानी

शोक प्रस्ताव

भारतीय जनता पार्टीचे उल्हासनगर परिमंडळ १ चे महासचिव, श्री. इंदरानीजी, ते गोल मैदान येथे राहत होते त्यांचे आकस्मित निधन झाले आहे.

श्री. इंदरानीजी यांचे निधन झाल्याने. त्यांच्या कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असून हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्मास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

विशेष महासभा ठराव क्र.६७**ब** दिनांकः–२८/०२/२०२२

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. इंदरानीजी यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे आणि त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

<u>सर्वानुमते</u>
महापौर / पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>स्थगीत प्रस्तावः—</u>

दिनांक २८/०२/२०२२, रोजी सायंकाळी ४.०० वाजता सुरू केलेली सभा महापालिका सदस्य, श्री. आकाश परशुराम पाटील यांचे आकस्मित निधन झाल्यामुळे स्थगीत करण्यास प्रस्तावीत.

<u>विशेष महासभा ठराव क्र.२० अ</u> दिनांकः २८/०२/२०२२

सुचकाचे नावः— श्री. कलवंतसिंहसोहता

अनुमोदकाचे नावः— श्री. शंकर लुंड

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता दिनांक २८/०२/२०२२ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित केलेल्या सभेचे कामकाज सदस्य, श्री. आकाश परशुराम पाटील यांचे आकस्मित निधन झाल्यामुळे ९ तारखेला सायंकाळी ४.०० वाजे पर्यंत स्थगीत करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानु मते

महापौर/पीठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**<u>महापालिका सचिव:-</u>** कृपया राष्ट्रगितासाठी उभे रहावे, मा. महापौरांनी आदेश दिले आहेत.

जन गण मन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सायंकाळी ५.४६ वाजता महापौर श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(**प्राजक्ता मि. कुलकर्णी**)**
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:- ०९-०३-२०२२

**महानगरपालिकेच्या दि. ०९-०३-२०२२ रोजीच्या विशेष महासभेचे इतिवृत्त.**

२अ

उल्हासनगर महानगरपालिकेची विशेष महासभा सोमवार, दिनांक २८/०२/२०२२ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेचे कामकाज स्थगित केल्याने सदरची सभा बुधवार, दिनांक ०९/०३/२०२२ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली. मा. अवर सचिव, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग यांचेकडील दिनांक ३ जानेवारी, २०२२ रोजीचे पत्रान्वये ऑनलाईन ॲपद्वारे सभा आयोजित केली होती. सदर सभेत मा. श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होते व खालील दर्शविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्या.

१.श्रीमती. लिलाबाई लक्ष्मण आशान — महापौर

२. श्री. भगवान भालेराव- उप महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती अचर्ना गोकुळ करणकाळे | ३६ | श्री. गजानन प्रल्हाद शेळके |
| ४ | श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड | ३७ | श्री. दिपक लक्ष्मदास सिरवानी (साई) |
| ५ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ३८ | श्री. सुमित सागर सोनकांबळे |
| ६ | श्री. जमनादास पुरस्वानी | ३९ | श्रीमती ज्योत्स्ना सुरेश जाधव |
| ७ | श्रीमती आशा नाना बिराडे | ४० | श्रीमती ज्योती शामराव माने |
| ८ | श्रीमती चरणजितकौर राजेंद्रसिंह भुल्लर | ४१ | श्री. चंद्रशेखर केशव यादव |
| ९ | श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर | ४२ | श्रीमती मिताली राजेश चान्पूर |
| १० | श्री. स्वप्नील मिलींद बागुल | ४३ | श्रीमती संगिता नितीन सपकाळे |
| ११ | श्रीमती सुरेखा हनुमंत आव्हाड | ४४ | श्रीमती शीतल चंद्रकांत कदम |
| १२ | श्रीमती अंजना अंकुश म्हस्के | ४५ | श्रीमती वसुधा धनंजय बोडारे |
| १३ | श्री. राजू किशनचंद जग्यासी | ४६ | श्री. धनंजय बाबुराव बोडारे |

| | | | |
|---|---|---|---|
| १४ | श्रीमती मिना कुमार आयलानी | ४७ | श्रीमती दिप्ती नविन दुधानी |
| १५ | श्रीमती गीता लालचंद साधनानी | ४८ | श्रीमती ज्योती रमेश चैनानी |
| १६ | डॉ. प्रकाश घनश्यामदास नाथानी | ४९ | श्रीमती कांचन अमर लुंड |
| १७ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | ५० | श्री. शंकर गोविंदराम लुंड |
| १८ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | ५१ | श्रीमती सुनिता बाबुराव बगाडे |
| १९ | श्री. महेश पहिलराज सुखरामनी | ५२ | श्रीमती सुमन राजेश सचदेव |
| २० | श्रीमती अपेक्षा भगवान भालेराव | ५३ | श्री. भारत रामचंद राजवानी (गंगोत्री) |
| २१ | श्रीमती शुभांगीनी निकम | ५४ | श्री. सतरामदास पुतनदास जेसवानी |
| २२ | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग | ५५ | श्रीमती अंजली चंद्रकांत साळवे |
| २३ | श्रीमती ज्योती प्रशांत पाटील | ५६ | श्री. प्रमोद नामदेव टाले |
| २४ | श्री. राजेश नानिकराम वदारिया | ५७ | श्रीमती कविता सुधिर बागुल |
| २५ | श्रीमती डिम्पल नरेंद्र ठाकुर (कुमारी) | ५८ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २६ | श्रीमती दिपा नारायण पंजाबी | ५९ | श्री. किशोर नारायणदास वनवारी |
| २७ | श्रीमती पुष्पा नाना बागुल | ६० | श्रीमती मिनाक्षी रवी पाटील |
| २८ | श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी | ६१ | श्री. विजय चाहू पाटील |
| २९ | श्रीमती शुभांगी मनोहर बेहनवाल | ६२ | श्रीमती कविता सुरेश गायकवाड |
| ३० | श्री. राजेंद्र शांताराम चौधरी | ६३ | श्री. विकास परशुराम पाटील |
| ३१ | श्री. रवी किशनचंद जग्यासी | ६४ | श्री. मनोज दिलीपकुमार सयानी |
| ३२ | श्रीमती इंदिरा जमनादास उदासी | ६५ | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |
| ३३ | श्रीमती कविता लाल पंजाबी | ६६ | श्री. सुरेंद्र बाळकृष्ण सावंत |
| ३४ | श्री. जीवन चंद्रभान इदनानी | ६७ | श्री. अरुण लक्ष्मण आशान |
| ३५ | श्रीमती सविता प्रविण तोरणे (तोरण) | | |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते / होत्या.

१ .श्री. मंगल बालकृष्ण वाघे, २. श्रीमती जयश्री ज्ञानेश्वर पाटील, ३. श्रीमती मिनाकौर अजितसिंग लबाना, ४. श्री. रविंद्र दशरथ बागुल, ५.श्री. कलवंतसिंग गुरुदेव सोहता, ६. श्रीमती सरोजिनी टेकचंदानी, ७. श्रीमती छाया सुजित चक्रवर्ती उर्फ अडसुळ, ८. श्री. रमेश महादेव चव्हाण, ९. श्रीमती ज्योती प्रकाश बठिजा, १०.श्रीमती मिना चंद्रगुप्त सोनेजी, ११. श्री. आकाश परशुराम पाटील, १२. श्रीमती आशा जीवन इदनानी.

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

१. डॉ. राजा दयानिधी, आयुक्त

२. श्रीमती करुणा जुईकर, अतिरिक्त आयुक्त (सेवा)

३. श्री. जमीर लेंगरेकर, अतिरिक्त आयुक्त (शहर)

४. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र.महापालिका सचिव

५. श्री. अशोक नाईकवाडे, उप आयुक्त (मुख्यालय)

६. डॉ. सुभाष जाधव, उप आयुक्त (आरोग्य)

७. श्रीम. प्रियंका राजपुत, उप आयुक्त (कर)

८. डॉ. दिपक पगारे, वैदयकीय आरोग्य विभाग

९. श्री. बाळू नेटके, मुख्य अग्निशमन अधिकारी

१०. श्री.अजयकुमार एडके, सहाय्यक आयुक्त

११. श्री. तुषार सोनवणे, सहाय्यक आयुक्त

१२. श्री. गणेश शिंपी, सहाय्यक आयुक्त

१३. श्री. के.जे. रहेजा, कार्यकारी अभियंता (पा.पु.वि.)

१४. श्री. हनुमंत खरात, उप अभियंता, विदयुत विभाग

१५. श्री. बी.एम. मोहिते, शिक्षण अधिकारी

१६. श्री. मनिष हिवरे, सहाय्यक आरोग्य अधिकारी

१७. श्रीम. श्रध्दा सपकाळे, सिस्टम ॲनेलेसिस मॅनेजर

१८. श्री. राजा बुलानी, विधी अधिकारी

१९. श्री . संतोष लोणे, कनिष्ठ अभियंता

२०.श्री. दत्तात्रय जाधव, भांडार विभाग प्रमुख

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्रीम. नर्गीस खान, लिपीक

३. श्री. बाळू भांगरे, लिपीक

४. श्रीम. विद्या आढळ, लिपीक

सायंकाळी ०४. १५ वाजता वंदे मातरम म्हणून सभा सुरु करण्यात आली.

महापालिका सचिवः— विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ विषय क्र. १ :— **वाहतुक समस्यांचे निवारण करणेसाठी उल्हासनगर महानगरपालिकेचे रस्तांवर पे ॲन्ड पार्क पॉलिसी राबविण्यास आलेला ठरावास चर्चा व पूर्नविचार करुन ठराव रदद करणे बाबत.**

---

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-** मा. महापौरजी आणि सन्माननीय आयुक्त जी, मागच्या महासभेत पे आणि पार्क परंतु काही कारणास्तव हा प्रस्ताव रदद करावा असे काही सन्माननीय सदस्यांनी आजच्या या विशेष महासभेत आणला आहे. परंतु उल्हासनगर शहरामध्ये बाकी समस्या सुटण्यासाठी वाहतुक कोंडी सोडविण्यासाठी जो काही प्रस्ताव प्रशासनाने आणला. त्याचवेळेला सन्माननीय सदस्यांनी व इतर काही पदाधिकाऱ्यांनी त्याच्यामध्ये दुरुस्ती करुन किंवा त्यामध्ये काही बदल करुन आपण तो प्रस्ताव आणायला पाहिजे होता. प्रस्तुत केला आणि नंतर हा प्रस्ताव तो मंजूर झालेला प्रस्ताव का व्यापाऱ्यांना रदद करावा. परंतु रदद का करावा. त्याचे कारण व्यापाऱ्यांनी केला आहे, व्यापाऱ्यांना राग आहे, त्यांना प्रचंड पडणार आहेत, पे आणि पार्कचे लागू. काही व्यापारी त्यांचे शिष्टमंडळ आम्हांलाही भेटले होते. परंतु या प्रस्तावामध्ये त्यांनी अशी मागणी केली होती की, आम्हांला त्रास होणार आहे. परंतु हे पाऊल उचलले नाही. त्याच्यांशी चर्चा करत असताना मी त्यांना काही सुचना केल्या, आज या शहराची वाहतूक समस्या फार बिकट आहे. वाहतूक समस्यांचे बाबतीत बोलायचे झाले तर या शहरामध्ये फार म्हणजे खुप तुम्हांला कल्याण अंबरनाथ रस्त्याच्या कोणाची घरे तुटली आणि आता रुंदीकरण केल्यानंतर रस्ता बनवला. त्यानंतरही वाहतूकीस अडथळा होतो. वाहतूक अडथळा दुर झाला पाहिजे. म्हणून आपण लोकांची दुकाने तोडली लोकांची घरे तोडली, त्यांना आपण मोबदला दिलाच नाही. आणि आता आपण त्याच रस्त्याचे भुमीपुजन त्याच रस्त्यावर अतिक्रमण जे

काही वाहनांचे अतिक्रमण आहे ते पण झाले नाही पाहिजे. त्याच्यावर पण कारवाई झाली पाहिजे. आणि त्यांच्यावर कारवाई नाही करत तर आपण जे होते त्यांच्यावर कारवाई करुन का अन्याय केला हा माझा प्रश्न आहे. दुसरा विषय बोलायचा झाले तर माझ्या प्रभागातून पवई चौकापासून विठठलवाडी शांतीनगरला जाणारा जो रस्ता आहे. या रस्त्यावर ट्रक, लक्झरी बसेस, गॅरेजच्या गाडया, भंगारवाले उभे असतात, त्यांच्यावर महापालिका कधी कारवाई करताना दिसत नाही. आणि तिथे लोकांना पायी चालता येत नाही. जर लोकांना पायी चालायचे असेल तर अपघात होतात. काजल पेट्रोल पंपाच्या बाबतीत बोलायला गेले तर काजल पेट्रोल पंपाकडे जाणारा रस्ता आहे. त्या रस्त्यावर अतिक्रमण झालेले आहे. तिथे मोठेमोठे टँकर उभे आहेत त्यांच्यावर महापालिका कोणतीही कारवाई करत नाही. भंगारवाल्याची एक गाडी लावली की त्याच्या बाजूला दुसरी गाडी लावलेली आहे. त्यांच्यावर कारवाई केली जात नाही. त्याचा त्रास होतो. विठठलवाडी स्टेशनवरुन लोक प्रवास करतात आणि त्या प्रवासातुन लोकांना ट्रॉफिकचा सामना करावा लागतो. वेळ प्रसंगी आपला जीव गमवावा लागतो. अशा वेळेला आमच्या पे आणि पार्क आले पाहिजे ही भुमिका आहे आणि जे काही अतिक्रमण आहे किंवा अनधिकृत बांधकाम केले आहे त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे. ही आमची भुमिका आहे. आपल्या शहराबाबत काय निर्णय घ्यायचा आहे तो घ्या. लोकांना नाहक त्रास देणारे जे काही गॅरेज वाल्यांच्या गाडया, त्यांचे सामान, भंगारवाल्यांच्या गाडया उभ्या आहेत टँकर, टॅक्टर उभे आहेत त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे बाकी शहराबाबतीत काय काय निर्णय घ्यायचे आहेत बाकीचे सदस्य ते बोलतील पण माझ्या या प्रभागात पे आणि पार्क लागू झाले पाहिजे.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>** मा. महापौरजी जेव्हा हा विषय सभागृहात आला होता. तर त्यावेळेस या विषयावर चर्चा झाली नव्हती. सर्व सदस्यांना बोलण्याची संधी मिळाली पाहिजे होती. किंवा मा. महापौर जी यांच्याकडे सर्व गटनेता, सर्व पदाधिकारी यांनी कोणता तरी उपाय काढायला पाहिजे होता. आमचे वरिष्ठ सदस्य श्री. राजेंद्र चौधरीजी नी सांगितले की, चक्के उभे असतात, गाडया उभ्या असतात, ते काम अनधिकृत बांधकाम विभागाचे आहे त्यांनी काढले पाहिजे याबाबत आमचा कोणताही विरोध नाही. रात्री च्या ज्या गाडया असतात त्यांचा पण प्रस्ताव महासभेत आलेला आहे. त्यांच्यावर दंडात्मक कारवाई केली पाहिजे आणि ती आम्ही रु.८,०००/-, ५,०००/-, ४,०००/-, ३,०००/-, असा दंड पण लावणार. परंतु पे आणि पार्क वेगळा विषय आहे. पे आणि पार्क कुठे असले पाहिजे आणि कुठे नसले पाहिजे, मल्टीपेस पार्किंग झाली पाहिजे. वाहतुक समस्याचे निवारण कसे केले पाहिजे, यावर गंभीरपणे विचार केला पाहिजे. आज विना चर्चा करता हा एक मिनिटात पास झालेला आहे. त्याला दुरुस्त नाही केले जाऊ शकत. यासाठी माझे सभागृहास निवेदन आहे की, यावर जास्त चर्चा न करता या प्रस्तावाला रदद केले जावे. आणि परत राजेंद्र चौधरींचा जो रोड आहे किंवा दुसऱ्या कोणाचा रोड आहे एक एक करुन आपला घेऊन येतो. किंवा आणले जाऊ शकते. चौधरीजी प्रभाग अधिकाऱ्यांने, कारवाई केली पाहिजे. आणि दंडात्मक कारवाई केली पाहिजे. आणि त्याचे आपण निवारण केले पाहिजे. व्यापाऱ्यांना मोटार सायकल आणि गाडया उभ्या करतात त्यांना पे आणि पार्क करणे उचित आहे. फेवरमध्ये भारतीय जनता पार्टी आहे. शहरात तीन किंवा चार जागांवर पे आणि पार्क बनले पाहिजे. जेथे लोकांच्या जाण्यावर सुरक्षा पण होईल. आणि पे आणि पार्क वसूल केले जाईल. त्यासाठी या विषयास लवकरात लवकर रदद केले जावे व परत त्यावर चांगल्याप्रकारे विचार विनिमय करुन लावले जावे.

**<u>सदस्य, श्री. दिपक सिरवानी</u>**:- मा. महापौरजी, जमनूजींच्या गोष्टीवर मी पण सहमत आहे. चौधरी जी, हा जो आपला विषय आहे पार्किंगसाठी कोणतीच ना जागा राहणार नाही. ती प्रत्येकाची समस्या आहे.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-</u>** मा. सभापतीजी, आता आपल्याजवळ वेळ शिल्लक राहिला नाही. नंतर कोण सर्वांना एकत्र घेऊन बसेल, ४ तारखेला....

**<u>सदस्य, श्री. दिपक सिरवानी</u>**:- चौधरी जी आम्ही पुढच्या आठवडयात परत मिटिंग लावू शकतो.

**<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी</u>**:- हा विषय डिफर करा. आणि आपआपसांत बसून ठरवा.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>** मा. महापौरजी हा डिफर कसा होईल. डिफर करणार म्हणजे पे आणि पार्क लागू होणार. या डिफर करुन परत आणू शकतो. यासाठी माझे सभागृहाला निवेदन आहे की, याला रदद केले जावे.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-</u>** मा. महापौरजी भारतीय जनता पार्टीचे स्पष्ट मत आहे. की ज्याप्रकारे हा प्रस्ताव बरोबर नाही. सर्व व्यापारी, सर्व राजनैतिक लोकांजवळ गेले त्यांनी विनंती केली, याला सरसकट रदद केले पाहिजे आणि श्री. राजेंद्र चौधरी आहेत शहर प्रमुख त्यांच्या भावनांना लक्षात ठेवता नवीन प्रस्ताव आणला पाहिजे आणि या प्रस्तावास सरसकट रदद केले पाहिजे. जन भावनेचा आदर करता, आम्हां लोकांना काम करणे आहे. आणि ज्याप्रकारे जन आक्रोश आहे. सर्व राजनितिक पक्षांसाठी बरोबर नाही. सर्व व्यापारी गण व आम्ही सर्व व्यापाऱ्यांशी भेटलो हे आम्ही  वादा केला. कारण की जेव्हा हा प्रस्ताव आणला गेला होता तेव्हा पण आम्ही याचा विरोध केला होतो. परंतु चला जे झाले ते झाले.

**<u>सदस्य, श्री.मनोज सयानी:-</u>** चुकीचे बोलत आहेत. चुकीचे बोलत आहेत.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-</u>** आपल्याला बोलायला मिळेल. डिसेंबरच्या महिन्यात पुज्य प्रकाश नाथानी, प्रदिप रामचंदानी, आणि राजू जग्यासीने स्वत: याचा विरोध केला होता. नंतर महापौर यांनी त्याला डिफर केला होता. त्यानंतर जेव्हा जानेवारीची बैठक आली. त्या बैठकीत चर्चा न करता पास केले गेले. आणि त्यानंतर सर्व व्यापाऱ्यांचा जन आक्रोश आला आणि जन आक्रोशाने सर्व व्यापारी जवळ गेले आणि आम्ही सर्व व्यापाऱ्यांजवळ गेलो. आणि जेव्हा महानगरपालिकेमध्ये जर आम्ही जनहिताचे काम करण्यासाठी आणि जर आम्ही जनहिताचे काम करत आहोत तर कोणाची ही इच्छा नाही आहे याप्रकारे कर लादण्याचा. आम्ही अपेक्षा करतो की, जर आपण अजून काही ट्रक आहेत, भंगार आहेत, त्यासाठी प्रस्ताव आणा. त्यासाठी आम्ही आपल्याला समर्थन देऊ. परंतु या प्रस्तावास जो आपण आणला आहे स्कुटर पासून कारपर्यंत कारपासुन ट्रकपर्यंत सर्व वाहनांना आपण जे पैसे लावले आहेत रोजचे एवढे, महिन्याचे एवढे हे पुर्णपणे रदद झाले पाहिजे. आपण बाहेरच्या गाडयांना व भंगारवाल्यांना आणि जे व्यवसाय करतात त्यांना कर लावा पाहिजे. आमची कोणतीही हरकत नाही. परंतु आम्ही लोक स्पष्ट बोलतो की, प्रस्ताव आहे तो रदद झाला पाहिजे, हि आमची स्पष्ट भुमिका आहे. धन्यवाद!

**<u>सदस्य, श्री. मनोज सयानी:-</u>** ४ ते ५ नगरसेवक ५ नंबरचा जो एमईसीबीचा विषय होता तो घेऊन सभागृहाबाहेर आंदोलन करत होते. आत जाण्याचा प्रयत्न करत होते. ४ ते ५ बाकी सर्वच्या सर्व ऑनलाईन होते. त्यापण बीजेपीचे सर्व ऑनलाईन होते कोणीही याचा विरोध केला नाही. चला त्या गोष्टीला जाऊ दया. दिशाभुल केली जात आहे ती वेगळी गोष्ट आहे. व्यापाऱ्यांना माहित आहे कोण त्यांच्या हिताचा आहे कोण हिताचा नाही. माझे यावर असे मत आहे, हा जो पे आणि पार्कचा मुदद‌ा आलेला आहे. पुर्ण शहरात पे आणि पार्क वसुल केले जाणार आहे. हा मुदद‌ा आला होता तेव्हा शिवसेना आणि एनसीपीने बैठक घेतली होती. आणि आमच्या आग्रहाखातर सहमती दर्शविली होती. त्यापैकी टू व्हिलर पार्किंग शुल्क वसूली नाही करायची जो शासनाचा प्रस्तावाला नाकारले होते. व त्यासोबत ४० फुटचे जेवढे पण शहरात रस्ते असतील पार्किंगचा प्रस्ताव आला होता. जो ठराव सर्व संमतीने पास झाला आहे. त्यात असे आहे की, ४० फुट पेक्षा जास्त् जेवढया पण दुसऱ्या गाडया उभ्या असतील, चार चाकी गाडया उभ्या असतील, बाहेरच्या ज्या भंगार गाडया उभ्या असतील त्याच्यांकडून पण शुल्क वसूल केले जाईल. परंतु  कुठे ना कुठे व्यापाऱ्यांची  विरोध आहे. सर्व व्यापारी

संघटनांनी आपला एक मंच बनवला. आमचे आदरणीय नेता पप्पु कालानीजी सर्वांना एकजुट केले. एक मंच बनवले व एक आंदोलन केले. आम्ही खुप साऱ्या गोष्टी करत आहेत. परंतु असे वाटते की, शहर कुठे ना कुठे शहर लोकांना पसंत होत नाही. एक आणखी कर वसूल केला जाईल. आम्हांला लोकांनी व व्यापाऱ्यांनी निवडून दिले आहे आम्हांला त्यांच्या कामाच्या मंदीला बघुन खुप कर वसूल केला गेला. कुठे ना कुठे आम्हांला शहरातील लोकांनी निवडून पाठविले आहे. आम्हांला त्यांच्या भावनांना विचारात घेऊन त्यांच्या सोबत जायला पाहिजे. मला तर असे वाटते की, व्यापाऱ्यांना समजले नाही आम्ही काय ठराव केला आहे. शहरात एक भावना बनली आहे. सर्व व्यापारी संघटना व शहरातील लोक वाटते की, व्यापारी शहर व्यापाऱ्यांचा शहर आहे त्यांच्या भावनांचा आदर ठेवावा लागेल. त्यांच्या गोष्टीची सहमती ठेवावी लागेल तर मी सर्व सदस्यांना मग ते शिवसेनेचे असो,भाजपचे असो,कॉंग्रेसचे असो, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे असो, माझ्या पक्षाचे असो आम्ही सर्वांना आग्रह करतो या मुद्याला येथे रद्द केले जावे आणि राहीली गोष्ट जे शहरात बाहेरच्या गाड्या येतात, बाहेरचे ट्रक येतात, ते रोडच्या बाजूला उभे राहतात ही पण एक मोठी समस्या आहे.आज शहरातील व्यापारी शहरच्या समस्याची झुंजत आहे, शहरातील नागरिकही झुंजत आहे,तर त्याच्यासाठी एक फेरसादर करून एक नविन प्रस्ताव आणला पाहीजे,तो शासनाकडून नाही आपल्या सर्वांकडून असला पाहीजे,सर्व पार्टींचा समावेश त्यात असला पाहीजे, ही जी पॉलीसी बनते आहे,ती दिर्घकाळासाठी बणनार आहे,तर यात व्यापाऱ्यांची सहमती, ऑटो रिक्शा वाल्यांची सहमती,आपल्या शहरातील राहणाऱ्या लोकांची सहमती, ट्रॅफीक विभागाची सहमती, सर्व करून मसूदा बनवून एक नविन योजना आणली पाहीजे. चौधरी साहेबांचे बोलणे आहे की आज वेळ नाही आहे,जर आपण खरच या शहराला एक पॉलीसी देवू इच्छितो तर तर येणाऱ्या ८-१०-१५ दिवसात एक विशेष महासभा घेण्यासाठी महापौरांना आग्रह करूया सर्व पार्टीतर्फे की यासाठी विशेष महासभा आणली पाहीजे आणि विशेष महासभामध्ये ४ एप्रीलच्या आधी नागरिकांसाठी प्लॅन बनवून ज्याने राजस्व पण येईल. शहरच्या लोकांकडून राजस्व नाही पाहीजे आहे आपल्याला पण बाहेरून जे व्यापार साठी येतात, बाहेरून जे ट्रक येतात, व्यापार करतात, थांबतात, किंवा बाहेरून जे टॅम्पो येतात जे नो पार्कींग झोन मध्ये थांबतात, तर त्यावर दंड व दंडा दोघांचा उपयोग करून या शहरात जी वाहतूकची जी समस्या आहे त्याचा पण आपल्याला रस्ता काढला पाहीजे.

**सदस्य, डॉ.प्रकाश नाथानी:-** मा.महापौरजी, उप महापौरजी बोलायला संधी मिळेल का? शहरातील गंभीर विषय आहे, एकच वेळी निर्णय घेतला पाहीजे.

**उप महापौर, श्री.भगवान भालेराव:-** नाथानी जी, डिफर करतायेत बोला मग आपण तसे करूया ना.

**सदस्य, डॉ.प्रकाश नाथानी:-**मी त्या हिशोबाने बोलतो आहे,

**उप महापौर,श्री.भगवान भालेराव:-** डिफर करायचे की रद्द करायचे तसा निर्णय घेवू,

**सदस्य, डॉ.प्रकाश नाथानी:-**एक एक करून बोलू ना, मी पण बोलतो आहे, तुम्ही पण बोलणार कसे चालणार

**उप महापौर, श्री.भगवान भालेराव:-** कोणी बोलते डिफर करायचे कोणी बोलतो रद्द करा.

**सदस्य,श्री. शंकर लुंड:-** रद्द करायचा आहे, रद्द करायचा आहे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** सर्वसंमतीने रदद करण्यात यावा.

या वेळी काही सदस्य एकत्रित बोलत असल्यामुळे कोण काय बोलत होते ते स्पष्ट समजून आले नाही.

**सदस्य,श्री. मनोज सयानी:-** ऐका, रद्द करायचा अर्थ काय आहे, की ही पॉलीसी रद्द करून कोणती चांगली पॉलीसी आणली पाहीजे, म्हणजे तूम्हाला वाटते जेव्हा जनता जागृत होवून रस्त्यावर येणार तेव्हा रद्द करणार का? राजेंद्र जी ने सांगीतले तर त्यांची पण समस्या ऐकली पाहीजे,प्रत्येक माणसाची समस्या ऐकली पाहीजे,सर्व जिंकलेले जन प्रतिनिधी आहे,शहर हितासाठी बोलतायेत,कोणी स्वत:साठी नाही करत आहे,मी यासाठी सांगतो हे २०० टक्के रद्द केले पाहीजे,मागच्या वेळी पण लासीजींनी फक्त डिफर करवून घेतले होते,मी लासीजींना वाईट नाही बोलत आहे, आता आपण बोलले रद्द केले पाहीजे तर मी आभारी आहे आपला.मी बोलतो भाजपा तर्फे सर्वात जास्त लढाई मी लढली होती, त्यासाठी मी बोलतो की आणन फानन मध्ये नाही केले पाहीजे,सध्या रद्द केले जावे आजच्या तारखेला,भगवान भालेरावजी मी तूम्हाला विनंती करतो की हा मुद्दा इथेच रद्द केला जावा.आणि जर आपल्याला वाटते हे शहराच्या हिताचे आहे, मोठा ज्वलनशिल मुद्दा आहे,शहर हिताचा मोठा मुद्दा आहे,तर याला आरामात शांतीने, असे आनन फानन मध्ये नाही केले पाहीजे,आपल्या शहरात ९८ टक्के  आपल्याच नागरिकांच्या गाड्या आहे, जनतेच्या गाड्या आहेत, मतदारांच्या गाड्या आहे,कोणता शहरात मोठा हल्ला गुल्ला नाही झाला आहे,याला रिजेक्ट करून घ्या, नंतर आरामात बसून कायदेशीर पणे तसे करा, एवढ्या मोठ्या पुणे सारख्या ऐवढ्या जास्त रहदारीच्या शहरात दुचाकी वर कोणते चार्जेस नाही आहे,तूम्ही पूर्ण भारतात पाहा कुठे कुठे चार्जेस आहे, तूम्ही पूर्ण भारताचे बघा फक्त उल्हासनगर मध्ये असे करने योग्य नाही.

**उप महापौर,श्री.भगवान भालेराव:-** डॉ. नाथानी हा विषय आता डिफर करू, महापौरांच्या दालनात एक सभा करू, सर्व सदस्यांचे एक मत करू की कुठले कुठले रस्ते घ्यायचे या संदर्भात चर्चा करु.

**महापालिका सचिव:-** सन्माननीय सदस्यांनी कृपया एक एक करून बोलावे ऐकू येत नाही आहे.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-** कोणती पार्टी बोलते पास करो? पार्टीने फक्त आपले नाव सांगावे, कोणती पार्टी पास करू इच्छिते नाव सांगावे, मग दूधचे दूध पाणीचे पाणी होवू द्या, शहराला माहिती झाले पाहिजे,उद्या बातम्यंमध्ये येईल की कोणत्या पार्टीला पास करायचे आहे.मग बघू आपण निवडणूकांमध्ये काय होते.आम्ही निवडणूकांचा मुद्दा बनवू त्याला. कोणत्या पार्टीचा नगरसेवक पास करायच्या पक्षामध्ये आहे,नाव सांगावे त्या नगरसवेकाने हात वर करून बोला,उभे रहावून बोला,

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:-** मा. महापौरजी, मला पण बोलायचे आहे.

**उप महापौर,श्री.भगवान भालेराव:-** रद्द करायचे की डिफर करायचे ऐवढ्यावर फक्त चर्चा करा.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** वोटींग करा, वोटींग.

**महापालिका सचिव:-** पुरस्वानी सर ठराव काय करायचा आहे?

**सदस्य,श्री. जमनादास पुरस्वानी:-** ठराव हा करायचा आहे की जो आधी प्रस्ताव  पास झाला आहे तो रद्द करीत आहे.जर हा डिफर होतो म्हणजे जुना पस्ताव पास होतो ह्याचा अर्थ.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** रद्द, रद्द, रद्द.

**महापालिका सचिव:-**आणि इतर सदस्यांनी देखील आपले मत सांगावे.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-** रद्द करा, रद्द करा.

**<u>सदस्य,श्री. राजेश वदारिया:-</u>** मनोज जी आपण एकदा बोलले आहात, पुन्हा पुन्हा आपण बोललात तर आम्ही कधी बोलणार, दुसऱ्यांना ही बोलू द्या.

**<u>सदस्य, श्री. मनोज सयानी:-</u>** बोला चांगले बोलता येत तुम्हांला.

**<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-</u>** मी सर्व सदस्यांना विनंती करतो की या विषयाला व्यक्तीगत घेवू नये,लास्सी जी, राजेशजी व्यक्तीगत घेवू नये.

**<u>सदस्य, श्री.राजेश वधारीया:-</u>**मा.महापौरजी, २० जानेवरी २०२२ ला ज्या सभेत हा विषय पास झाला त्यामध्ये विषय नंबर ३ ते ७ पास पास करत हा विषय पास केला होता आणि आम्हांला बोलण्याची संधी नव्हती मिळाली. त्यामुळे हा विषय परत आणला, आणि हा विषय यासाठी आणला आहे की २० जानेवरी २०२२ चा ठराव पूर्णपणे रद्द होवो आणि रद्द करण्याचा बाजूने कोणी नसेल तर मी वोटींगची मागणी करतो.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-</u>** वोटींग वोटींग

**<u>सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी:-</u>**मा.महापौर जी या विषयाला डिफर नाही केले जावू शकत कारण डिफर केले तर मागचा प्रस्ताव कायम राहणार म्हणून या विषयाला रद्द करा आणि जो पण प्रस्ताव पास झाला आहे त्याला रद्द करा.

**<u>सदस्य, श्री.धनंजय बोडारे:-</u>** हे बोलणारे तूम्ही कोण आहात जमनूजी? ही घोषणा कोण करणार महापौर करतील ना.

**<u>सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी:-</u>**जुना प्रस्ताव पास झाला आहे जर हा विषय रद्द केला तर तो लागू होईल तूम्ही तांत्रिक माहिती घ्या.

**<u>सदस्य, श्री.धनंजय बोडारे:-</u>** त्यासाठी चर्चा सूरू आहे ना. आपण प्रस्ताव ठेवला म्हणून झाले का?

**<u>सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी:</u>**-हा प्रस्ताव आम्ही आणला आहे कारण जुना प्रस्ताव पास झाला आहे, हा विषय डिफर केला म्हणजे पे अँन्ड पार्क लागू होणार हे आमच्या भारतीय जनता पार्टीचे मत आहे.

**<u>सदस्य, श्री.धनंजय बोडारे:-</u>** त्यावर महासभा विचार करून निर्णय घेईल.तूम्ही जे बोलतायेत प्रस्ताव आणला आहे पास पास असे नाही

**<u>सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी:</u>**-आम्ही रद्द करतो आहे,जुन्या प्रस्तावाला रद्द करण्यासाठी विषय आणला आहे.

**<u>सदस्य, श्री.धनंजय बोडारे:-</u>** मा. महापौर महोदया मागच्या महासभेत हा प्रस्ताव एकमताने पास झाला कसा झाला प्रत्येक जण धावण्याचा प्रयत्न करतो जसे जनमत आहे. त्यात आली निवडणूक, निवडणूक आल्यावर सर्वजण आपल्या मतदारांना खुष ठेवण्यासाठी असे बोलतायेत. पहीले तर पास करण्यासाठी सर्वांची धवपळ सूरू होती, नंतर विरोध वाढला तर सर्वजण मागे हटले.त्यात शिवसेनेला पुढे केले की शिवसेनेने पास केले शिवसेनेने पास केले, राजकीय अजेंडा करून टाकला.त्यानंतर विशेष महासभा बोलवली, पण हे शहर हितमध्ये नाही आहे अशाप्रकारे पकडणे आणि सोडणे,शहरासाठी हे खूप हानीकारक आहे सर्व पार्ट्यांसाठी, तर निर्णय घेतला तर त्यावर ठाम राहायला शिका,आणि लोकांना पटवून द्या की हे योग्य आहे.हे महासभेत पास होण्या आधी १० मिटींग झाल्या होत्या महापौर कार्यालयात,आयुक्तांकडे. हा प्रस्ताव प्रशासनाने आणला होता, हा प्रस्ताव शिवसेनेचा नव्हता, राष्ट्रवादीचा नव्हता,बिजेपीचा नव्हता, प्रशासनाला शहर

हितासाठी वाटले त्यांनी आणला, त्यवर ॲमेंडमेंट होणे गरजेचे होते की त्यात काय काय सुधार करायचे आहे, त्यावर तेव्हा काही चर्चा नाही झाली कारण ऑनलाईन होते म्हणून सर्वांनी एकमताने पास केले आणि जेव्हा व्यापाऱ्यांनी विरोध केला तेव्हा शिवसेनेने पास केले शिवसेनेने पास केले अशाप्रकारे, तूम्ही वागले हे चूकीचे आहे.शहरहितमध्ये नाही आहे.जे शहरहिताचे काम आहे ते केलेच पाहीजे.जसे चौधरीजींनी सांगितले त्यांच्या वार्डसाठी, शहरात असे झाले पाहीजे पण नाही बोलले तरी ठिक आहे.यामध्ये काही सुधारणा झाली पाहीजे किंवा नाही झाली पाहीजे की पूर्ण ,खारीज झाले पाहीजे.खारीज होते तर जसे कल्याण अंबरनाथ रोड वर तूम्ही लोक पण अनेक वेळा ज्या गाड्या उभ्या असतात किंवा अमन टॉकीज रोड वर स्कूटर वाले गाड्या उभ्या ठेवतात त्याला विरोध केला.मागच्या वेळी सर्व पक्षांनी आयुक्त साहेंबाकडे तक्रार केली की त्रास होतो. आपण ५० लोकांचा विचार करणार की ५ लाख लोकांचा,ज्यांना त्रास होतो त्यांचे काय? रोड मोठा आहे १०० फूटचा पण त्यावर २-२ गाड्या पार्क करणार, ३-३ गाड्या पार्क करणार तर त्याच्यामुळे फक्त ४० फूटचा शिल्लक राहणार तर सामान्य नागरिकांना त्रास होतो,व्यापारी खूष होतील पण सामान्य नागरिकांनाआम्हाला बददुवा देतील.उल्हासनगर काय आहे?जेव्हा जावो तेव्हा ट्रॅफीक असते,काही साफसुधरे नाही, झाडूवाले ह्याच्यामुळे गाड्या उभ्या असल्यामुळे झाडू लावता येत नाही. यावर आपण काही विचार केला पाहीजे की नाही.व्यापाऱ्यांना पण आम्ही पटवून देवू इच्छितो की तूम्ही शिस्त लावा,ते काही होत नाही आहे. व्यापाऱ्यांनी विरोध केला, ठिक आहे विरोध केला आम्ही नाही लावत.पण शहराच्या हितासाठी काही तर केले पाहीजे. विचार केला पाहीजे.ना सफाई होवू शकत आहे त्याच्यामुळे ट्रक चे ट्रक उभे आहेत. काजल पेट्रोल पंप वाला रोड घ्या,तर कधी पण बघा एकदा आम्ही स्वच्छता अभियान केले होते,तर टोईंग करून ट्रक आम्हाला खेचावा लागला होता,तेव्हा त्याच्या खालचा कचरा साफ केला. ही शहराची अवस्था आहे, डॉल्फीन वाला रोड बघा,वर्षानूवर्षे गाड्या उभ्या आहेत त्यावर धूळ चडली आहे.त्यासाठी आपण काय विचार करतो आहे काहीच नाही.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** त्यासाठी ठराव केला आहे,५०००,३०००,२००० रू.चा दंड करण्याचा ठराव केला आहे.

**सदस्य, श्री. विजय पाटील:-** आम्हांला बोलून दयायचे नाही का? फक्त तुम्हीच बोलणार का?

**सदस्य, श्री.धनंजय बोडारे:-** बोलून द्या, आम्हाला बोलून द्या. हे बघा आम्हाला बोलून नाही द्यायचे आहे का? फक्त तुम्ही लोकच बोलनार का?

**सदस्य, श्री. मनोज सयानी:-** मा. महापौर मॅडम प्लीज बोडारे साहेबांना बोलून द्या.

**सदस्य, श्री.धनंजय बोडारे:-** मा. महापौर महोदया, आयुक्त साहेब, आपण एक प्रस्ताव आणला पण आमच्या शहराचे असे आहे की आम्ही फक्त यावर राजकारण करतो आहे. आपण चांगलाच प्रस्ताव आणला होता.

**उप महापौर, श्री.भगवान भालेराव:-** बोडारे साहेब काय करायचे आहे नक्की? रद्द करायचे असेल तर चर्चा नको आहे, डिफर करायचे असेल तरी चर्चा नको आहे.

**सदस्य, श्री. चंद्रशेखर यादव:-** मा. उपमहापौर साहेब अगोदर बोडारे साहेबांना बोलून द्या.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-** बोडारे साहेब पण रद्द करू इच्छितात तर त्यांच्या मनाचे गोष्टी ऐकल्यास पाहीजे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:-** जमनूला घाई आहे वोटींग घ्यायची.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-**नाही नाही आपण बोला सर, आपण पण जनप्रतिनिधी आहेत, वरीष्ठ नगरसेवक आहे, तूमचापण मानसन्मान आहे शहरामध्ये,तुमच्याकडेपण शहरातील उद्योगपती आले असतील, मार्केटवाले आले असतील,आपण पण ४ नंबर ५ नंबर चालवतात सर.

**सदस्य, श्री. चंदशेखर यादव:-** व्यापारी लोकांना पण खर काय ते कळलय.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-** ठिक आहे ठिक आहे,नव्याने आणाला पॉलीसी सर, बोडारे जी ही रद्द करून नव्याने आणाना परत त्यात व्यापाऱ्यांना पण आपण सोबत बसवू,बोडारे जी आपल्या सोबत व्यापारी पण बसतील, जनप्रतिनिधी पण असतील

**सदस्य, श्री. विजय पाटील:-** नाथानीजी कमीत कमी त्यांना बोलून तर द्या.बोडारेजींना तर बोलून द्या ना. त्यांना बालून का देत नाही?

**महापालिका सचिव:-** आपण कोणालाही बोलून पण देत नाहीत आणि ऐकत पण नाहीत.पहीले पुर्ण बोलून तर होऊ दया.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:-** माझी एक विनंती आहे की, जसे बोडारे साहेबांनी सांगितले...

**सदस्य, श्री. विजय पाटील:-** त्यासाठी ऐकुण पण घ्या.

**महापालिका सचिव:-** जमनू जी बोलताना कोणाचे बोलणे नाही कापले पाहीजे,तूम्ही लोक दुसऱ्यांना बोलूनच नाही देत आहे.कोणाचे पण पूर्ण बोलने तर होवू द्या ना.तूमचे आम्ही ऐकले ना तर असे नाही केले पाहीजे ना.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-** माझी सदन ला विनंती आहे, बोडारे साहेबांनी जे बोलले ते कोणत्या पक्षावर आरोप नाही आहे.त्यासाठी ऐकूण घेण्याचे पण शिका जरा.

**सदस्य, श्री.अरूण आशान:-** मा. महापौरजी

**उप महापौर, श्री.भगवान भालेराव:-** बोला बोला ,काय करायचे आहे?

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:-** मा. महापौरजी काही नगरसवेकांच्या बाजूला गैर नगरसेवक पण बसले आहे आणि ते स्क्रीनवर ताकझाक करत आहेत तर त्यांना दूर करा आणि दुसरी गोष्ट जी बोराडेजींनी सांगीतली काच्छोमल पूतळा,अमन टॉकीज रोड,केबी रोड, काजल पेट्रोल पंप येथे जेवढे पण फेरीवाले आहे, अनधिकृत गॅरेज आहे,टपरी आहे त्यांना काढायला प्रभाग अधिकारी यांना अधिकार दिले आहे. १ हजार ते हजार पर्यंतचा दंड आकारण्याचा अधिकार देखील दिला आहे.तर प्रभाग अधिकारी आपला तो अधिकार का वापरत नाही आहे.पहिले तर त्यांना विचारले पाहीजे की तूम्ही तूमचा अधिकार वापरा.ज्या गाड्या चुकीच्या ठिकाणी उभ्या आहेत. एका बाजूला वेगळ्या उभ्या आहेत ज्यामूळे सफाई नाही होत आहे तर त्यांना जप्त करा आणि त्यांच्यावर ५००० रू पेनल्टी लावा. ते का नाही करत आहे.

**सदस्य, श्री.अरूण आशान:-** मा. महापौरजी, आयुक्त साहेब,आवाज येतो आहे का ऐकायला? खर म्हटले तर सर्व सदस्यांना सांगू इच्छितो की चौधरी साहेबांनी सांगीतले, बोडारे साहेबांनी सांगीतले, आता हा ठराव घेतल्यानंती काही रस्त्यांची परिस्थिती अत्यंत वाईट आणि दयनिय आहे.जसे आता राजेश वधारीया बोलतायेत काही काही ठिकाणी गाड्या कायमस्वरूपी उभ्या आहेत. कचरा पण काढता येत नाही.मग त्या गाड्या कोणाच्या आहेत? कोणी पार्क केल्या

आहेत?किती दिवसापासून पार्क केलेल्या आहेत?ऐवढे मोठे मोठे रस्ते केल्यानंतर त्याच्यावर पे अॅन्ड पार्क केले पाहीजे की नाही? लोकांना रस्ता मोठा करून दिला पण लोकांना चालता येते का? नाही येत. व्यापाऱ्यांचा व्यापार होतो का? मिथे गाड्या लावून टाकल्यानंतर, कारण व्यापारी पण त्रस्त आहेत. हा जो प्सताव आणला होता, नंतर त्यामध्ये टू व्हीलर वगळून तो प्रस्ताव घेतला. आपण ऐवढे मोठे मोठे रस्ते बनवतो आहे,कालांतराने अजून काही एमएमआरडीए च्या माध्यमातून, खासदार साहेबांच्य माध्यमातून,पालकमंत्री यांनी दिलेल्या निधीच्या माध्यमातून आपण इथे शहरातले रस्ते मोठे करतो आहे.मग असे रस्ते मोठे करून त्याच्यावर पार्कींग करून लोकांचे दुकाने तोडायचे आणि बाकीच्या लोकांना गाड्या उभ्या करायला द्यायच्या.हा न्याय कुठपत योग्य आहे?लोकांचे तूम्ही दुकाने तोडले, व्यापाऱ्यांची तूम्ही बाजू घेता, मग व्यापाऱ्यांना जेवढ्या लोकांचे दुकाने तोडले त्यांना आपण आतापर्यंत दुकाने दिलेली नाही आहे.असे असताना पे अॅन्ड पार्कला विरोध करायचा,फक्त काहीतरी व्यापाऱ्यांनी सांगीतले म्हणून सांगायचे पण त्याच्यावर ठोस निणर्य घ्यायचा नाही. मग हे रस्ते मोठे करायचे कोणासाठी? मला असे वाटते, की हा विषय तूर्तास डिफर करून प्रशासनाने याच्यावर अंमलबजावणी करू नये,आणि येत्या काळामध्ये, या येत्या दोन चार दिवसांमध्ये याच्यावर पुन्हा महासभा बोलावून, योग्य तो निर्णय घेण्यात यावा असे माझे मत आहे.

**सदस्य, श्री. शंकर लुंड:-** प्रस्ताव रद्द करण्यात यावा.

**सदस्य, श्री.मनोज सयानी:-**पहिले जो पास झाला आहे तो रद्द करण्यात यावा .

**सदस्य, श्री. अरुण आशान:-**नाही रद्द करण्याची काही आवश्यकता नाही. याच्यामध्ये डिफर करा, याच्यात डिफर करून प्रशासनाला आदेश द्या.प्रशासनाने याच्यावर कारवाई करू नये.

**सदस्य, श्री. शंकर लुंड:-**पहिला रद्द करून नंतर नविन आणा.

**सदस्य, श्री. अरुण आशान:-**रद्द करण्यापेक्षा जो आहे तो ठराव डिफर करा मला असे वाटते.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** प्रस्ताव रदद करणे म्हणजे तो प्रस्ताव लागू होईल.

**सदस्य, श्री.राजेश वधारीया:-**अरूणजी पहीले पण सांगीतले की जर हा प्रस्ताव आपण डिफर करतो तर मग जुना लागू होतो.

**सदस्य, श्री जमनादास पुरस्वानी:-**नाही नाही नाही लागू होणार, आपण प्रशासनाला आदेश करतो की याच्यावर कोणतीही कारवाई नाही करा,येणाऱ्या ७ दिवसांत आम्ही महासभा बोलवून आम्ही चर्चा करून यावर निर्णय घेवू. आम्ही प्रस्ताव रद्द करण्याच्या बाजूने आहो, प्रस्ताव रद्द करण्यासाठी वोटींगची मागणी करीत आहेत.

**सदस्य, श्री.राजेश वधारीया:-** मी राजेश वदारीया २० जानेवारी २०२० च्या प्रस्तावला रदृद करण्याचा बाजूने आहे आणि वोटींगची मागणी करतो.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी:-**याला रद्द करून वोटींग घेतली जावी नाही तर.

**सदस्य, श्री.महेश सुखरमानी:-** महापौर मॅडम मी महेश सुखरमानी या प्रस्तावाला रद्द करण्याच्या बाजूने आहे,मी वोटींगची मागणी करतो.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-</u>** या विषयावर आपले एक मत होत नाही, तर माझी सभागृहाला विनंती आहे….

**<u>सदस्य, श्री. शंकर लुंड:-</u>**भालेराव साहेब वोटींग करा. वोटींग करा अन्यथा रद्द करा.

**<u>सदस्य, श्री. महेश सुखरामानी:-</u>** महापौरजी, उपमहापौरजी वोटींग करा अन्यथा रद्द करा अशी महेश सुखरमानीची मागणी आहे.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-</u>** माझे असे मत आहे की आपल्याला एकमत होता येत नसेल तर यावर वोटींग घ्यायला पाहीजे.

**<u>सदस्य, श्री.सतराम जेसवानी:-</u>** महापौरजी माझा हात आपल्याला दिसत नाही आहे का? मला बोलायचे आहे.

**<u>उप महापौर,श्री.भगवान भालेराव:-</u>** थांबा दादा वोटींग सूरू होवू द्या.

**<u>सदस्य, श्री.सतराम जेसवानी:-</u>** मी माझा हात वर केला आहे मला काही बोलायचे आहे.

**<u>उप महापौर,श्री.भगवान भालेराव:-</u>** हा दादा बोला.

**<u>सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी:-</u>** माझे असा शुजाव आहे की हा प्रस्ताव रद्द केला पाहीजे कारण याला बिना रद्द करता दुरुस्ती पण करता येणार नाही.

**<u>सदस्य, श्री.सतराम जेसवानी:-</u>** मला बोलून द्या.

**<u>सदस्य, श्री. शंकर लुंड:-</u>** दादा बोला

**<u>सदस्य, श्री.सतराम जेसवानी:-</u>** महापौर साहेबजी, चौधरी साहेबजी, आपले बोडारे साहेबजी शहरातील जुने नगरसेवक आहे, शहरासोबत नेहमी उभे असतात, महापौरजी ऐका, मला बोलायला वेळ दिला आहे माझे ऐका.

**<u>महापालिका सचिव:-</u>**पिठासीन अधिकारी यांनी सांगीतले आहे या विषयावर वोटींग घ्यायचे आहे.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>** वोटींग घ्या, वोटींग.

**<u>सदस्य, श्री. मनोज सयानी:-</u>** मा.महापौरजी राष्ट्रवादी काँग्रेस चे सर्व नगरसेवक या प्रस्तावाला रद्द करायच्या बाजूने आहे.तर कृपया राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्व लोक वोटींगच्या वेळी रद्द करण्याच्या बाजूने हात वर करा.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>** भारतीय जनता पार्टीचा संबंध नाही, चार सदस्यांनी वोटींगची मागणी केली आहे.

**<u>महापालिका सचिव:-</u>**वोटींग घेतली जात आहे, कृपया शांतता राखा. जे लोक प्रसताव रद्द करण्याच्या बाजूने आहे ते कृपया आपला हात वरा आणि आपले नाव सांगा.

**<u>सदस्या, श्रीम.शुभांगीनी निकम:-</u>** रद्द

**<u>सदस्या, श्रीम.डिंपल ठाकूर:-</u>** रद्द केला जावा.

**सदस्य,श्री. राजू जग्यासी.:-**,रद्द केला जावा .

**सदस्या, श्रीम.कंचन लुंड:-** रद्द

**सदस्य,श्री. राजेश वदारीया.:-** मी रद्द करण्याचा बाजूने वोट करतो.

**सदस्या, श्रीम.अंजली साळवे:-** रद्द करण्यात यावा.

**महापालिका सचिव:-**मी नाव वाचते. अर्चना करनकाळे,

**सदस्या, श्रीम.ज्योती चैनानी:-** ज्योती चैनानी पण बोलते आहे रद्द

**महापालिका सचिव:-**हा हा रद्द, एक मिनीट मी नाव घेते कोणाला विरोध असेल तर हात वर करा .कृपया माझे ऐका. अचर्ना करनकाळे विरोधमध्ये,आशा बिऱ्हाडे रद्द, राजू जग्यासी, मिना आयलानी नाही आहेत,गिता साधनानी

**सदस्य, श्री. चंद्रशेखर यादव:-** या प्रस्तावाला विरोध कोणाचा आहे, ज्यांचा विरोध असेल त्यांनी हात वर करावा.
**महापालिका सचिव:-**असे नसते वोटींग दोन्ही बाजूने घ्यावी लागते.प्रस्तावाच्या बाजूने आणि नंतर प्रस्तावाच्या विरोधात वोट.

**सदस्य, डॉ.प्रकाश नाथानी.:-** मॅडम मी डॉ. प्रकाश नाथानी ,विरोधात.

**सदस्या, श्रीम.सविता तोरणे:-** रद्द

**सदस्य, श्री.अरूण आशान:-** महापौर मॅडम, सचिव मॅडम माझे एक मिनीट ऐका

**महापालिका सचिव:-**हा बोला सर,

**सदस्य, श्री.अरूण आशान:-** माझे म्हणणे ऐका तर, वोटींगची मागणी कोणी केली आहे? वोटींग करायची नाही, जमनू पुरस्वानी काय बोलले,की हा प्रस्ताव पुन्हा नव्याने आणायचा आहे.

**उप महापौर,श्री.भगवान भालेराव:-** अरूण राव जरा शांत रहा.वोटींग चालू आहे.

**सदस्य, श्री.अरूण आशान:-** वोटींगची मागणी, आम्ही बोलतो आहे इथे, वोटींगची मागणी कोणी केली आहे?

**उप महापौर,श्री.भगवान भालेराव:-** मागणी आठ सदस्यांनी केली आहे,

**महापालिका सचिव:-** वोटींगची मागणी बीजेपी च्या आठ सदस्यांनी नावा सोबत केली आहे.

यावेळी काही सदस्य् एकत्रीत बोलत असल्यामुळे कोण काय बोलत होते ते स्ष्ट समजून आले नाही.

**सदस्य, श्री.अरूण आशान:-** प्रस्ताव पुन्हा नव्याने आणायचा आहे असे ठरले ना, मग वोटींग आले कुठून. जमनू पुरस्वानीनी बोलल्यानंतर आपले ठरले आहे ना.

**सदस्य, श्री. शंकर लुंड:-** नाही नाही हा रदद करण्याचा प्रस्ताव आहे.

**<u>सदस्या, श्रीम. कविता पंजाबी:-</u>** अरूण भैया,तूम्ही बालले पाहीजे होते ना रद्द नाही करण्यासाठी.

**<u>सदस्य, श्री.अरूण आशान:-</u>** नाही नाही नाही, आपण माझी गोष्ट समजा.मी काय बोललो की नव्याने प्रस्ताव आणूया आपण. तोपर्यंत अंमलबजावणी नाही करायची.

**<u>सदस्य, श्री. किशोर वनवारी:-</u>** अरूणजी जे बोलले त्याच्याशी मी सहमत आहे.

**<u>सदस्या, श्रीम. डिम्पल ठाकुर:-</u>** ह्या विषयावर तूम्ही पण सोबत या हा विषय रदद करा.

**<u>सदस्य, श्री.मनोज सयानी:-</u>** अंमल बजावणी नाही करणार तर प्रशासन तूमचे का ऐकेल?

**<u>सदस्य, श्री.अरूण आशान:-</u>** कसे नाही करणार?

**<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-</u>** अभय योजनेचा अंमल बजावणी केला ना.

**<u>उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-</u>** तुमचे रदद करायचे ठरले आहे ना.

**<u>सदस्य, श्री.अरूण आशान:-</u>** हा प्रस्ताव नव्याने आता आणायला पाहीजे.त्याच्यामध्ये वोटींग घेण्याचा काही प्रश्नच नाही. सगळ्या सभागृहाचे मत आहे. आणि जर का याच्यामध्ये काही त्रुटी असतील तर त्या त्रुटी आपण काढून जमनू पुरस्वानीजींनी जसे सांगीतले आपल्याला काही फेरबदल करायचे असतील तर नव्याने आणू आपण प्रस्तावात.

यावेळी काही सदस्य् एकत्रीत बोलत असल्यामुळे कोण काय बोलत होते ते स्प्ष्ट ऐकू आले नाही.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-</u>** आपण एक मताने करा चांगली गोष्ट आहे.

**<u>सदस्य, श्री.धनंजय बोडारे:-</u>** राजेश वदारीया यांनी सांगीतल्या प्रमाणे, कल्याण अंबरनाथ रोड, काजल पेट्रोलपंप अमन टॉकीज ते तिथला रोड,या ठिकाणी त्यांनी सांगीतल्या प्रमाणे प्रशासन अधिकारी, वार्ड ऑफीसर अधिकारी आहे.त्यांना अधिकार आहे. ज्या ज्या ठिकाणी ट्रॅफीकचे कन्जेशन होतय त्या त्या ठिकाणी राजेश वदारीया यांनी केलेल्या सूचना प्रमाणे तातडीने आजपासूनच कारवाई करण्यात यावी.जो काय दंड आहे तो लावायचा, जो कोणी असेल असा राजेश वदारीया यांनी सूचना केलेल्या आहे.तर त्या काटेकोरपणे प्रशासनाने पालन करावे.अरे हा त्याचा वैयक्तिक विचार आहे.

यावेळी काही सदस्य् एकत्रीत बोलत असल्यामुळे कोण काय बोलत होते ते स्प्ष्ट ऐकू आले नाही.

**<u>सदस्य, श्री.धनंजय बोडारे:-</u>** मी बोलतो त्यांनी जो विचार ठेवला आहे त्याप्रमाणे कारवाई केली पाहीजे आणि सर्व संमतीने हा प्रस्ताव रद्द करा.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-</u>** ओके ओके सर्वसंमतीने रदद ही चांगली गोष्ट आहे.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>** धन्यवाद, खुप खुप धन्यवाद.

**<u>सदस्य, श्री. मनोज सयानी:-</u>** राजेश वदारिया यांचा कोणताही प्रस्ताव नाही आहे.

**<u>सदस्य, श्री. शंकर लुंड:-</u>** प्रस्ताव रदद करा.

**<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:-</u>** राजेंद्र चौधरी साहेब, धन्यवाद तुमचा प्रस्ताव सर्व संमतीने पास झाला आहे.

**<u>महापालिका सचिव:-</u>** ठिक आहे आता मी ठराव वाचते ही महासभा,वरील सभेत झालेल्या चर्चेअंती महासभा ठराव क्र.४७ दिनांक ३०/०१/२०२२ रद्द करीत आहे.

**<u>सदस्या, श्रीम. अंजली साळवे:-</u>** ठिक आहे मॅडम.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-</u>** महापौरांचे धन्यवाद एक मताने प्रस्ताव पास झाला आहे.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>** महापौरजी धन्यवाद.

**<u>महापालिका सचिव:-</u>** हा ठराव ऐवढाच येईल हा.

**<u>सदस्य् श्री.प्रदिप रामचंदानी:-</u>** सर्वांना धन्यवाद.

<u>काही सदस्य :—</u>पास—पास……

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **<u>विषय क्र. १ :-</u>** वाहतुक समस्यांचे निवारण करणेसाठी उल्हासनगर महानगरपालिकेचे रस्तांवर पे ॲन्ड पार्क पॉलिसी राबविण्यास आलेला ठरावास चर्चा व पूर्नविचार करुन ठराव रदद करणेबाबत.

**<u>प्रस्तावना</u>**

उपरोक्त् विषयानुसार आपणास कळविण्यात येते की, दि.२०/०१/२०२२ रोजी झालेल्या महासभेमध्ये विषय क्र.६ मध्ये उल्हासनगर शहरातील रस्त्यावर पे आणि पार्क चा विषय मंजूरी मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता. सदर महासभा ही ऑनलाईन पध्दतीने घेण्यात आली असून सदर विषयावर सन्माननीय नगरसेवकांकडून आपले विचार आपली मते मांडलेली नाहीत. असे असताना ही सदर विषयास मंजूरी देण्यात आली आहे. तदनंतर याबाबत शहरातील व्यापा-यामध्ये तीव्र असंतोष पसरला असून स्थानिक व्यापा-यांनी व नागरीकांनी नाराजी व्यक्त केली आहे.

सदर विषय हा नागरीकांच्या व व्यापा-यांच्या हिताच्या दृष्टीने महत्वाचा असल्याने तसेच सदर विषयावर सन्माननीय नगरसेवकांनी देखील आपली मते नोंदविली नसल्याने या विषयावर चर्चा व पुर्नविचार करुन हा ठराव रदद करणेसाठी विशेष महासभा बोलविण्यासाठी भारतीय जनता पार्टीचे स्थायी समिती सदस्य विनंती करीत आहेत.

**<u>महासभा ठराव क्र.</u> ६८** **दिनांक ०९/०३/२०२२**

**सुचकाचे नाव :- श्री. दिपक सिरवानी**

**अनुमोदकाचे नाव :- श्री. जमनादास पुरस्वानी, श्री. स्वप्नील बागुल, श्री. शंकर लुंड**

**ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे व सभेत झालेल्या चर्चेअंती वाहतुक समस्यांचे निवारण करणेसाठी उल्हासनगर महानगरपालिकेचे रस्तांवर पे ॲन्ड पार्क पॉलिसी राबविण्याबाबत करण्यात आलेला महासभा ठराव क्र. ४७, दिनांक २०/०१/२०२२ हा रदद करीत आहे.**

**सुचकाची सही /-**

**अनुमोदकाची सही /-**

**सर्वानुमते**

**महापौर/पीठासीन अधिकारी**
**सर्वसाधारण महासभा**
**उल्हासनगर महानगरपालिका**

---

**महापालिका सचिव:-** विषय क्रमांक २ वाचून दाखवितात.

---

⇨विषय क्र. २:— **श्रीम.प्रियंका राजपुत, उपायुक्त (कर) पदावर असल्या पासुन पदाधिकारी व नागरिकांच्या हिताच्या दृष्टीने यांच्या वागणूकी बाबत योग्य तो निर्णय होणेबाबत.**

---

**उप महापौर,श्री.भगवान भालेराव:-** राजेश वदारीया, टोनी सिरवानी. अरे टोनीजी.

**सदस्य् श्री.राजेश वदारीया:-** भाजपाच्या सर्व नगरसेवकांची मागणी आहे की ह्याला रद्द केले पाहीजे. जर याला डिफर केले तर जुना ठराव लागू होईल.

**सदस्य, श्री. शंकर लुंड:-** झाला रद्द दुसरा विषय सुरू आहे.

**सदस्य् श्री.राजेश वदारीया:-** ऐकू आले नाही मला.

**उप महापौर,श्री.भगवान भालेराव:-** दुसरा विषय सूरू झाला आहे.

**महापालिका सचिव:-** विषय क्रमांक २ मी वाचला आहे ज्यांना त्याच्यावर चर्चा करायची आहे ते कृपया करू शकतात.

**सदस्य, श्री.दिपक सिरवानी:-** मा.महापौरजी,हा जो विषय आम्ही ५ स्थायी समिती सदस्यांनी जे आपणांस निवेदन दिले आहे.या विषयावर मला काही गोष्टी बोलायच्या आहे.जे आपले मॅडम आहेत प्रियंका राजपूतजी सूरवातीला त्यांनी चांगले काम केले होते आम्ही त्यांची प्रशंसा सुद्धा केली होती.कदाचित त्यांनी तूम्हाला पत्र पण दिले आहे तसे,ते झाले पण पाहीजे चांगले काम केल्यावर.पण मागच्या दिड दोन महिन्यात आपल्याकडे सुद्धा तक्रारी आल्या असतील.भालेरावजींनी तक्रार केली, भरत गंगोत्रीजींनी सुद्धा तक्रार केली.महापौरजी मॅडमची जी वर्तणूक आहे मागच्या दिड दोन महिन्यात आमच्याकडे तक्रारी आल्या आहेत सदस्यांच्या, कर्मचाऱ्यांच्या,पदाधिकाऱ्यांच्या, नगरसेवकांच्या, त्यागोष्टी आपल्या

लक्षात आणून देता जसे की स्थायी समितीजी बैठक होते,मॅडम गैरहजर असतात, ना त्यांचा मेसेज येतो, आयुक्त साहेब स्वत: कधी गैरहजर रहायचे असल्यास समितीची परवानगी घेतात, विनंती करतात. पण मॅडमची ही वर्तणूक आहे, ठिक आहे आम्ही एक दोन वेळा दुर्लक्ष केले,त्यानंतर भरत गंगोत्रीजीं सोबत त्यांचे काही वादविवाद झाले,त्यांनी सुध्दा तक्रार केली आहे,भालेरावजी सूरवातीपासूनच त्यांच्या वर्तणूकीमूळे नाराज आहेत.आपले जे,कर्मचारी आहेत,पदाधिकारी आहेत क्लास वन अधिकारी आहेत त्यांच्या पण तक्रारी माझ्याकडे आल्या, महापौरजी आपल्याकडे पण आल्या असतील, आयुक्त साहेब आपल्याकडे पण आल्या असतील. काही दिवसांपूर्वी यांनी वर्तमानपत्रात एक कटींग दिली होती की माजी उपमहापौर यांचे दुकान मी,टॅक्स विभागाने सिल केले आहे,सिल करणे आपल्या अधिकार कक्षेत नाही आहे, अट्याचड् करू शकतो. त्यांनती मला सूत्रांकडून जी बातमी समजली की वाटूमल कॉलेज जे आपल्या शहरातील सर्वात मोठे कॉलेज आहे,त्याला पण या मॅडमनी सिल केले होते १५ दिवसांसाठी.शहरातील ऐवढ्या मोठ्या कॉलेजला बंद करणे हे योग्य की अयोग्य् यावर नंतर येवू. करदाता ज्यांना आपण दाता बोलतो,त्यांच्याकडे जावून यांची वागणूक, पंचायतची आमच्याकडे जी तक्रार आहे तोंडी आणि लेखी त्यापण मी तूमच्याकडे देतो.यांची जी गैरवर्तणूक आहे,हे जे शहर आहे, हे करदात्यांचे शहर आहे,आपल्याकडे दुसरे काही नाही आहे,जिथून आपल्याला स्त्रोत येईल. यांची जी गैरवर्तणूक आहे त्यांच्याप्रती ती मान्य नाही केली जाणार,आम्ही लोकप्रतिनिधी आहे, निवडून येतो, आमच्याकडे पण तक्रारी येतात, पहिले तर हे पाच-पाच दिवस तूमचा फोन नाही घेणार, त्यानंतर आले तर मी जावू? अरे आमचे जे प्रशन आहेत, किंवा तूम्ही विचारा, की आम्हाला यांना पत्र लिहून द्यावे लागेल रोज की आमचे पत्र आहेत हे.टॅक्सच्या विषयात ,किती टॅक्स आला आहे किती बाकी आहे,८ दिवस यांनी आपले दिले रोजचे टॅक्स कलेकशन त्यानंतर बंद, या मॅडमला फक्त आणि फक्त टॅक्स विभागासाठी  इकडे पाठविले आहे.मागच्या दहा वर्षात जे सर्वात कमी टॅक्स कलेक्शन झाले आहे, मी माफी मागंतो,सर्वात कमी, नाही तर आकडेवारी द्या की यांनी किती कलेक्शन केले आहे, मी निवेदन करतो की अशी गैरवर्तणूक कुठल्याही अधिकारीची आम्ही सहन नाही करू शकत. विशेषत: शहरातील करदात्यासोबत, आमच्या कॉलेज सोबत, चार दिवस,आठ दिवस पहिले यांनी तीन वेळचे निवडून आलेले गणपत गायकवाडजीं सोबत जे केले ते सर्व शहराने पाहीले,भालेरावजी, गंगोत्रीजी, किंवा माझ्या कक्षात येवून यांनी जो तमाशा केला पदाधिकाऱ्यांसोबत जे गैरवर्तणूक केली त्यात शेरी जी, जमनू जी, लाल पंजाबी जी, ते पाहून मी हैरान झालो, आम्ही जे महिला अधिकारीची इज्जत करतो, आणि त्यांचा शिवीगाळ करून बोलण्याची पद्धत आम्हाला मंजूर नाही आहे,बाकी तुम्ही सर्व निर्णय घ्या कसा करायचे आहे.धन्यवाद.

**<u>सदस्य, श्री.मनोज सयानी:-</u>** मा.महापौरजी टोनी सिरवानीजींनी जी सूरवात केली त्यात त्यांनी सांगीतले की त्यांनी एक पत्र महापौरांना पण दिले आहे.तर असे कोणते पत्र जर प्रियंका राजपूत मॅडम चे महापौरांकडे आले असेल किंवा आयुक्तांकडे आले असेल,तर कृपया मी सांगतो ते सदन समोर ठेवण्यात यावे.आणि त्या पत्रामध्ये त्यांनी काय स्पष्टीकरण केले आहे कृपया ते सांगीतले जावे.

**<u>उप महापौर,श्री.भगवान भालेराव:-</u>** मीना आयलानीजी बोला.

**<u>सदस्य, श्री.मनोज सयानी:-</u>** एक पत्र दिले आहे त्याचा खुलासा करा आधी.

**<u>उप महापौर,श्री.भगवान भालेराव:-</u>** शेवटी करूया, सदस्यांना बोलून द्या.

**<u>सदस्य, श्री.धनंजय बोडारे:-</u>** मी बोलू का? मा.महापौरजी, आयुक्त साहेब,

**उप महापौर, श्री.भगवान भालेराव:-** मीना आयलानीजी बोला.बोडारे साहेब त्यानंतर बोला मग.

**सदस्या, श्रीम.मीना आयलानी:-** मा.महापौर, आयुक्त साहेब,आता टोनी सिरवानीजी जे बोलले त्याच्याशी मी सहमत आहे.आता काही दिवासांआधी टाऊन हॉल मध्ये सजेशन ऑबजेक्श्नचे सुरू होता, तर आमच्या गणपत गायकवाडजी च्या विषयात खूप गैरवर्तणूक केली हा त्यांचा हक्क् नाही. एक आमदार सोबत गैरवर्तणूक करणे कोणत्याही अधिकाऱ्याचा हक्क नाही बनत. त्यांना येवू नाही दिले गेले.जास्त जेव्हा वाद झाला तेव्हा आत घेतले.तर असे अधिकारी आम्ही उल्हासनगरमध्ये नाही चालवून घेणार.

**उप महापौर,श्री.भगवान भालेराव:-** बोडारे साहेब बोला.

**सदस्य, श्री.धनंजय बोडारे:-** आयुक्त साहेब, बऱ्याच वर्षानंतर कुठल्याही अधिकारी विषयी अशा प्रकारची चर्चा होते आहे महासभेमध्ये.उल्हासनगर हे व्यापाऱ्यांचे शहर आहे.लोकपरतीनिधींना अगोदर व्यापाऱ्यांची मग सामान्य नागरिकांची, नागरिकांच्या मनाचा कानोसा घेतला तर वाटचाल करतात आपण हे पे ॲन्ड पार्कचे बघीतले असेल. अगोदर एकमताने पास केलेला प्रसताव नंतर व्यापाऱ्यांनी विरोध केल्यामुळे आम्ही एकमताने रद्द केला यावरून आम्ही किती संवेदनशील आहोत हे आपल्याला दिसतय प्रशासन कसे आहे हे आम्हाला माहीत नाही.पण आतापर्यंत प्रशासन सुद्धा संवेदनशील आहे असे आतापर्यंत वाटत होते पण ते संवेदनशील नाही आहे, याचे जिवंत उदाहरण म्हणजे युवराज भदाणे.त्यांच्यावर आता दोन दोन तीन तीन केसेस झालेल्या आहे.सर्व लोकप्रतिनिधी आयुक्तांना सांगत होते पण आयुक्तांचा त्याच्यावर विश्वास होत नव्हता.शेवटी ते सिद्ध झालेले आहे आणि त्याचे परिणाम त्याला भोगावे लागतील.लोकांशी, लोकप्रतिनिधींशी, सामान्य नागरिकांशी व्यवस्थित वागले नाही तर काय होते हे भदाणेला माहिती आहे हे इतर अधिकाऱ्यांनी समजून घ्यावे.प्रियंका राजपूत यांच्याविषयी बोलायचे झाले तर ६ महिन्याच्या कालावधीत त्यांची कारकीर्द ही वादग्रस्त कारकीर्द राहीली आहे.पहिल्यांदा आमचे मित्र कमलेश निकम यांच्या बाबतीत सुद्धा कमलेश निकम यांना तोच अनुभव आला.त्यांच्या चेंबरमध्ये गेल्यानंतर जर लोकप्रतिनिधींना अशा प्रकारची वागणूक असेल तर सामान्य लोकांना काय करत असतील.दुसरे उदाहरण टोनी सिरवानी यांनी सांगीतले.आम्ही महापौर चेंबरमध्से बसलेलो असताना महापौर चेंबरमध्ये तक्रार घेवून आले,आयुक्तांना भेटले,आयुक्तांना त्यांनी सांगितले असे दोन वेळा प्रकार झाले.असे जर महानगरपालिकेमध्ये सर्व अधिकारी ,चार पाच अधिकारी आले तर महापालिकेमध्ये ना महापौरांना व्यवस्थित बसता येईल ना आयुक्तांना बसता येईल आणि मग नगरसेवक तर कुठल्याकुठे. जर अशाप्रकारची वागणूक नगरसेवकांना, लोकप्रतिनिधींना देत असतील तर सामान्य नागरिकांना हे लोक कशी वागणूक देत असतील.आणि असेच प्रकार त्यांनी वारंवार लोकांमध्ये केले तर प्रशासनाला किती परिणाम भोगावे लागतील. पूर्ण प्रशासनाला हलवून टाकायची क्षमता लोकांमध्ये आहे.जेव्हा लोकांचा आक्रोश वाढेल,किती भयानक असतो, आपण वांरवार पाहीले आहे तेव्हा लोकांच्या आक्रोशाची वाट बघू नये, तर अशा लोकांवर कारवाई करण्याची त्यांना समज देण्याची किंवा लोकांशी आदबीने वागण्याची समज देवू ,काय बोलू आपण तेवढेही नाही , नाहीतर आतापर्यंत कारवाई केली असती, ऐवढ्या वेळा तक्रारी येवूनसुद्धा आणि कार्यक्षम म्हटले तर एकदाच मिटींग महापौरांनी बोलवली होती तेव्हा मला पण निमंत्रित केले होते.एकदा दिव्यांगाला साहित्य देण्याचा प्रस्ताव होता तो यांच्या डिपार्टमेंट कडून आला होता.त्या डिपार्टमेंटच्या प्रस्तावानंतर दिव्यांगाला सर्व द्यायचे आहे असे ठरले होते आणि शेवटी बघीतले तो जो प्रस्ताव त्यांनी मंजूर केला होता किंवा ज्याआधारे आणला होता तो ग्राम विकासचा जी.आर. होता.मी पाच मिनीटांमध्ये बघीतले ऐवढे दिवस लावले प्रस्ताव तयार करण्यासाठी महानगरपालिका आणि नगरपालिकेला ग्रामविकासचा जी.आर. चालतो का? हा साधा प्रश्न मी केला, त्यांना त्यांचा जळफळाट झाला, चूका तूमच्या लक्षात आणून दिल्या, चूका करायच्या, व्यवस्थित समजत नाही, चूका

तूमच्या दाखवल्या तर तूम्हाला राग येतो त्याच्या परिणाम वैयक्तिक दुश्मनी काढल्या सारखे होईल.त्यानी काही फरक पडणार नाही. वैयक्ति दुश्मनी नाही, अशा प्रकारे वागणूक कशी असते ती बालीश सारखी, त्याला मॅच्युअर अधिकारी कोणीच बोलू शकत नाही. आणि अशा बालीश अधिकाऱ्याकडून शहराचे काम करून घेताना शहराचे नुकसान होईल. दुसरा त्या डिपार्टमेंट मध्ये खास उल्लेख करून आले की टॅक्स डिपार्टमेंट, टोनी सिरवानी नी सांगीतल्याप्रमाणे मागील दहा वर्षांमध्ये कधीही अशा प्रकारचे इ-वॅल्युऐशन झालेले नव्हते.११० कोटीच्या वर गेलेले मला वाटते पहिल्यांदा ९९ साली जेव्हा टी चंद्रशेखर जेव्हा या ठिकाणी आले तेव्हा ९० कोटींच्या वर टॅक्सचे उत्पन्न या ठिकाणी झाले. त्यानंतर दरवर्षी वाढत गेल. १५० कोटीवर असलेले टॅक्सचे उत्पन्न आता या वेळेस मला वाटते ३० टक्के एवढेच उत्पन्न झाले, मला सांगा किती झाले? ३६ कोटी काहीतरी, १५० कोटी असलेले ३६ ते ४० कोटींपर्यंत झाले तर यांची क्षमता काय?म्हणजे यांची क्षमता फक्त लोकांना उद्धट बोलायची,अरेरावी करायची. आणि अभय योजना, चौधरींनी अगदी प्रामाणिकपणे प्रयत्न केला या इलेक्शनच्या काळात लोकांची कामे होणेसाठी अभय योजना लागावी असा प्रचार आम्ही केला बर मिडीयावर या लोकप्रतिनिधींनी आणलेल्या प्रस्तावाच्या विरोधात मुद्दामून आणि वारंवार किती, आपण सुद्धा मिडीयावर कधी इतक्या वेळा आला नाही. ऐवढी प्रसिद्धीची हाव असलेली या अधिकारी, अशा प्रकराच्या अधिकारी या तूमच्या कंट्रोल मध्ये नाही किंवा तूम्हाला कंट्रोल करता येत नाही तुम्हाला. अशा प्रकारचे प्रशासन उल्हासनगर महानगरपालिकेला नाही चालणार. आतापर्यंत कधी नव्हे ते अधिकारी आलेले आहेत, एक आयुक्त एक उपायुक्त अशा प्रकारची परिस्थिती येथे होती.आज तीन उपायुक्त तुमच्या बरोबर आहेत आणि दोन अतिरिक्त आयुक्त आहेत, टाऊन प्लॅनर आहेत,ऐवढे सर्व अधिकारी असतांना ३६ ते ४० कोटी, ५० कोटीच्या आतमध्ये म्हणजे ३० टक्के सुद्धा तूमचे टॅक्स उत्पन्न होत नाही.एका बाजूला लोकांशी गैरवर्तन. ज्याला मर्यादा कळत नाही. अमार्यद वागायला लागले तर त्याचे परिणाम गंभीर होतात. त्याचे परिणाम तुम्हाला पण भोगावे लागतील आणि अशा प्रकारचा गंभीर परिणाम या महापालिकेच्या लोकांवर होऊ नये, लोकांना नागरी सुवीधा देताना अशा प्रकारचे उद्धट अधिकारी असू नयेत म्हणून मला वाटते प्रशासनाने कारवाई केली पाहीजे ऐवढ्या तक्रारी आल्या आहेत तर. प्रशासनाने तूम्ही काय कारवाई केली? का करू शकत नाही ? का केली नाही ? मला वाटत तुमचे असे आहे धरल तर चावतय सोडले तर पळतय अशी तुमची अवस्था आहे. हातभर प्रशासनात लोक आहे नियंत्रण एकतर आयुक्तांचे असले पाहीजे, लोक प्रतिनिधी कोणताही असू दे, आमदार कोण आहे कसा आहे ते महत्वाचे नाही, नगरसेवक कोण आहे तेही महत्वाचे नाही,नगरसेवकही लोकांचे प्रतिनिधी आहे.वैयक्तिक कामात ते इकडे येत नाही. स्थायी समिती सभापती बोलवत असतील आणि येत नसतील तर की काय मर्यादा झाली. असे अमर्याद वागणे ह्या महापालिकेत चालणार नाही. अशा अधिकाऱ्यांवर तुम्ही कारवाई का करत नाही? मला असे आठवतय टी चंद्रशेखर होते,एक अधिकारी उद्धट बोलला होता आर डी शिंदेंना, त्याचवेळी त्याला गाडीतून उतरवले आणि लगेच त्यांना जागच्या जागेवर परत पाठवले.तर असे अधिकारी असले पाहीजे.ऐवढ्या तक्रारी येवून सुद्धा तूम्ही ऐकून घेतायेत.तूम्ही एकतर हतबल आहात किंवा तूम्ही जाणूवपूर्वक करत नाही. माझी संपूर्ण अधिकारी कोण आहे ते महत्वाचे नाही,त्याचे वर्तन कसे आहे आणि शेवटी रिझल्ट देणारा आहे का?आम्हाला कामाचे नको, फक्त खायला घाल आणि जमिनीला भार अशा प्रकारचे अधिकारी आपल्याला नको आहे. उर्मटपणे बोलायचे उर्मटपणे वागायचे रिझल्ट मात्र काही नाही.परिमापण काही केले का यांचे कार्यक्षमतेचे, गेल्या सहा महिन्यात यांनी उल्हासनगरला काय दिले? आपण का ठेवायचे यांना?जे चांगले त्यावर शाबासकी मारलीच पाहीजे पण जे उद्धटपणे, विचित्रपणे वागतात त्यांना आयुक्तांनीच घालवले पाहीजे अशा प्रकारचा ठराव यायची गरज नाही. मला वाटते गेल्या दहा वर्षाच्या कालखंडामध्ये पहिला असा अधिकारी आहे ज्याच्यावर परत जाण्यासाठी अशा प्रकारचा प्रस्ताव केला आहे.ही महासभा आहे, याच्या काही मर्यादा आहेत, आम्ही सुद्धा आमच्या मर्यादा ओळखतो. आतापर्यंत कोणत्याही अधिकाऱ्याच्या विरोधात अशा प्रकारचा ठराव आलेला नाही. हा ठराव का आला याचे मंथन आपण करा चिंतन आपण करा, अशी माझी भूमिका आहे.धन्यवाद.

**<u>सदस्य,श्री.प्रदीप रामचंदानी:-</u>** महापौर मॅडम मला संधी द्या या विषयावर बोलायची.

**<u>उप महापौर,श्री.भगवान भालेराव:-</u>** प्रदीपजी शितल बोडारे मॅडम बोलतायेत नंतर तूम्ही बोला.

**<u>सदस्य, श्रीम.शितल बोडारे:-</u>** महापौर मॅडम, आयुक्त साहेब माझे ऐवढेच म्हणणे आहे की बोडारे साहेब आता जे बोलेले त्याच्याशी मी सहमत आहे.आणि राजपूता मॅडमचे जे बोलणे आहे, वागणे आहे ते कोणत्याही प्रकारचे असू द्या. आपल्या स्टाफशी असेल किंवा जे जे त्यांच्या संपर्कात जे जे आलेले आहे त्यांच्याशी असू द्या, त्यांचे वागणे बोलणे अजिबात बरोबर नाही, अपमानास्पद वागणूक देतात त्या.तरी याच्यासाठी त्यांना लवकरात लवकर रिलीव करा.असा अधिकारी काय कामाचा आहे जो लोकांना सन्मान देत नाही.आणि अधिकाऱ्याचे बोलणे वागणे असे असावे की लोकांनी पण त्याला ॲक्सेप्ट करावे.

**<u>सदस्य,श्री.प्रदीप रामचंदानी:-</u>** उपमहापौर साहेब मला बोलण्याची संधी द्या.

**<u>उपम हापौर,श्री.भगवान भालेराव:-</u>** बोला.

**<u>सदस्य,श्री.प्रदीप रामचंदानी:-</u>** उपमहापौर साहेब आज हा जो विषय आहे,अधिकारी प्रियंका राजपूत यांच्या विषयी

**<u>सदस्य,श्री.अरूण आशान:-</u>** महापौर मॅडम,आयुक्त साहेब,

**<u>सदस्य,श्री.प्रदीप रामचंदानी:-</u>** उपमहापौर साहेब तूम्ही मला बोलायला वेळ दिली आहे, उपमहापौर साहेब मला संरक्षण द्या उपमहापौर साहेब, अरूण आशान कडून मला संरक्षण द्या.

**<u>उप महापौर,श्री.भगवान भालेराव:-</u>** अरूण आशानजी तुम्ही नंतर बोला, प्रदिप रामचंदानींना बोलून द्या.

**<u>सदस्य,श्री.प्रदीप रामचंदानी:-</u>** उपमहापौर साहेब माझे असे म्हणणे आहे की अधिकार आणि कर्तव्य या दोन गोष्टी आपल्या अधिकाऱ्यांमध्ये असायला पाहीजे.आणि त्या दोन्ही गोष्टींची आपण चाचणी केली तर प्रियंका राजपूत कर्तव्य आणि अधिकारामध्ये दोन्ही विषयात कमी पडताना दिसतायेत.कारण आपण एक विषय मांडला होता, अभय योजना, सर्व सदस्यांनी एकमताने तो ठराव पास केला होता.मा.राजेंद्र चौधरी आणि राजेश वानखेडे साहेबांनी आणला होता,पण आपले अधिकारी प्रियंका राजपूत यांनी काय केले, म्हटले की आपण हे काय करणार नाही आहे.तुम्ही नाही केले पण त्याच्यानंतर त्याचा परिणाम काय झाला, त्याचा परिणाम असा झाला की ते तुम्ही केले नाही, तुम्ही तो प्रस्ताव रद्द करण्यासाठी मत्रालयात पाठविला आणि तूम्ही सांगीतले की मला या योजेनेची गरज नाही आहे.पण नाही त्यांनी कोणता टार्गेट नाही पूर्ण केला आणि लोकतंत्राची परिभाषा नेहमी हे सांगते की जे जनप्रतिनिधी असतात ते जनताचे प्रतिनिधीत्व करतात आणि जनतेच्या लोकप्रतिनिधींचा असा अपमान केला जात असेल.ही असहनशिलता आहे. मी असे मानतो की ही कोणी अधिकारी खूप जास्त् प्रामाणिक असेल आणि तो आमच्या गोष्टी नाही ऐकत, त्याला वाटत आमच्या गोष्टी चुकीच्या आहेत.पण त्याने तेवढे कर्तव्य करून दाखवल असे पण काही नाही आहे.आपण पाहीले आहे वेळोवेळी आमच्या मॅडम जनप्रतिनिधींचे अपमान करताना दिसून आल्या आहे. जेव्हा एका जनप्रतिनिधीचा अपमान होतो तेव्हा सर्व जनप्रतिनिधींचा अपमान होतो. जसे एक रिक्षा युनियन वाला पण असतो, एका रिक्षावाल्याचा अपमान होतो तर सर्व रिक्षा वाले एक होतात. कारण त्यांना वाटते सर्व रिक्षावाल्यांचा आपल्या समुदायाचा अपमान झाला आहे.तर आपण असे नाही का, एक सदय्स नाही दोन सदस्य नाही तीन चार पाच सदस्यांचा त्यांनी अपमान केला आहे.माझ्या हिशोबाने माझा व्यक्तीगत अनुभव असा नाही राहीला. माझ्याशी कधी त्यांनी अपमानची भाषा नाही केली. परंतू माझे सदस्य कोणत्याही दलाचे असो, पक्षाचे

असो,पण ते निवडून आलेले सदस्य् आहेत.जन प्रतिनिधी आहेत, लोकांनी लोकशाही प्रक्रियेतून त्यांना निवडून दिले आहे, त्यांचा अपमान म्हणजे माझा अपमान आणि जेव्हा माझा अपमान होतो तो मी तोपर्यंत सहन करेल जोपर्यंत मला वाटेल माझा जो अधिकारी आहे,तो कर्तव्यदक्ष अधिकारी आहे,आपले कर्तव्य पार पाडतो आहे. माझा अपमान होतोय तर होवू द्या पण शहराचे भले होतय. इकडे दोन्ही नुकसान आहे.आम्ही आमचा अपमान पण सहन करतो आहे आणि कर्तव्य पण पूर्ण नाही होत आहे आणि ज्याप्रकारे ते आपले निर्णय घेतात,त्या निर्णयात जर ते यशस्वी झाले असते, १०० चे १५० करोड वसूली केली असती तर आमच्या तोंडावर टाळे लागले असते.आम्ही त्या अपमानाला प्रसाद समजून सहन केले असते.पण आज तो अपमान पण सहन करायची स्थिती यासाठी नाही आहे कारण आज त्यांनी आपल्या कर्तव्याची पण पूर्ती नाही केली आहे.सर्वात कमी टॅक्स ह्या वर्षी जमा झाला आहे.जर आज अभय योजना लागू केला असती तर आज आपल्या महानगरपालिकेची आर्थिक स्थिती खूप चांगली असती. त्यांनी एक विधान दिले होते, उप महापौर साहेब ऐका,मी जेव्हा त्यांना बोललो होता की कोरोनाची वेळ आहे लोकांना आपण काही नाही दिले आहे,जर अभय योजनेमूळे लोकांना काहीना काही फायदा करून दिला तर जनप्रतिनिधींची लाज वाचली असती. तर त्यांनी सांगीतले आपल्याला चार वर्षात ६४ करोडचे नुकसान झालेले आहे.याचा अर्थ राजपूत मॅडम येथे व्यापार करायला बसली आहे.महानगरपालिका कधी व्यापार नाही करत आपण जनहितची योजना करतो.जर जनहितच्या योजनेत जर महापालिकेचे नुकसान पण होत असेल तर जनतेशी आमची बांधीलकी आहे.जनताच्या बांधीलकीशी आम्ही कामे करतो.पण त्यांनी नाही केले आिण त्यांनी एक अडयल वृत्ती ठेवून अभय योजनेत कचरा कुंडीत टाकले यापेक्षा जास्त वाईट, भले आम्ही विरोधी पक्षात असलो आम्ही हसू शकतो की सत्तेतील पक्षाची नाही चालत,सत्ता पक्षाच्या अध्यक्षाची नाही चालत अशी गोष्टी आम्ही करू शकतो,पण इथे राजकारण नाही करायचे आहे.इथे जेव्हा शहराचा प्रश्न येतो तेव्हा राजेंद्र चौधरी असो किंवा माझ्या सर्वात मोठ्या दुश्मनाचे असो, अपमान होतो तर सर्व जनप्रतिनिधींचा होतो, सर्वांनी या गोष्टीला समजले पाहीजे, असे तोडून तोडून नाही बोलले पाहीजे, आज आपला तूमचा कुठल्या सदस्याचा अपमान झाला, उद्या तूमची वेळ येईल.आज तूम्ही साथ नाही दिली तर उद्या एकटे राहाल,मी विनंती करतो याच्यावर तूम्ही एकदम ठोस निर्णय घ्या. टोनी सिरवानीद्वारा हा जो प्रस्ताव आणला आहे त्याचे मी पूर्णपणे समर्थन करतो.

**सदस्य, श्रीम.वसूधा बोडारे:-** महापौर मॅडम मला बोलायचे आहे

**उपम हापौर,श्री.भगवान भालेराव:-** बोला बोडारे मॅडम

**सदस्या, श्रीम. वसूधा बोडारे:-** एक महिला असून, ज्या महिलांनी टॅक्स पावत्या वाटल्या,त्यांच्यासाठी पैसे द्या पैसे द्या म्हणून मागे लागलो आहे,हे लेटर द्या, ते लेटर द्या. आयुक्तांनी आमच्या समोर सांगीतले की लवकरात लवकर त्या महिलांचे पैसे द्या टॅक्स पावत्या वाटलेल्या पण त्याचे पण त्यांनी पुढे काय केले नाही.आम्ही गेलो की तूम्ही नगरसेवक लेटर द्या हे द्या नको ती कारणे,इथे दुसरी टॅक्स पावती वाटायचा टाईम आला, म्हणजे कुठल्याही महिलेची कदर नाही, कुठल्याही महिलेचा मान नाही आहे,अशा वागणाऱ्या आम्हाला मान्य नाही त्या मॅडम, त्यांना लवकरात लवकर रिल्हीव करून माझ्या महिलांचे टॅक्स पावतीचे पैसे अगोदर देण्यात यावे आणि त्यांना रिल्हीव करण्यात यावे.

**सदस्या, श्रीम.शुभांगीनी बेहनवाल:-** महापौर मॅडम,मा.आयुक्त साहेब आणि उपमहापौर साहेब, या एकच मॅडम नसून महानगरपालिकेत भरपूर असे काही अधिकारी आहेत, त्यामध्ये महिलाही शामील आहेत.मॅडम कालचीच घटना आहे,काल मी पीडब्लूडी मध्ये गेली होती,आपल्या वार्डाच्या कामासाठी गेली होती, माझ्या काही फाईल्स आहेत,लिपीक

म्हणून ज्या दिप्ती आहेत, त्या एकदम उद्धटपणे बोलतात, लेडीज सुद्धा गेल्या तर त्यांच्याशी उद्धटपणे बोलतात बर पूरूष कोणी गेला असेल आपल्या कामासाठी,

**उप महापौर,श्री.भगवान भालेराव:-** विषयावर बोला

**सदस्या, श्रीम. शुभांगीनी बेहनवाल:-** हाच विषय आहे कारण महानगरपालिकेमध्ये अधिकारी आहेत,विशेष महासभा लावली जाते आहे, तर बाकीचे पण जे अधिकारी आहेत, त्यांचे पण जे वागणूक आहे,नगरसेवकां विंषयी ते पण महासभेपुढे आणने गरजेचे आहे,म्हणून मी हा विषय आणला आहे,

**उप महापौर,श्री.भगवान भालेराव:-** तूम्ही या विषयावर बोला तूमचे मत काय आहे तेवढे

**सदस्या, श्रीम. शुभांगीनी बेहनवाल:-** विषयांतर नाही आहे कारण हा विषय पर्सनली न घेता मी जे सांगतेय.

**सदस्या, श्रीम.मिना सोंडे:-** मी सपोर्ट करते या गोष्टीवर शुभांगीनीजी ला,विषयात जास्त अंतर नाही आहे.ते पण ऑथोरिटीज आहे आणि ही समस्या मला पण होत आहे,सभापती असून सुद्धा हे सर्व समस्या मला सहन कराव्या लागल्या आहेत.मलापण या विषयी बोलायचे आहे की डिपार्टमेंटमध्ये काही ॲडमिनीस्ट्रेशन राहीले नाही आहे,मी सरळ नाव पण घेते, सितलानीजींना चार-पाच वेळा मी आज पण फोन केला आहे,फोन पाहून कॉलबॅक न करणे सुद्धा एक अपमान आहे.आणि जे पण अधिकारी आहेत, तूम्ही मला सांगा जे पण तूम्ही अर्ज आणि पत्र दिले आहेत कोणीही असो नगरसेवक,कोणाला पण वेळेवर उत्तर भेटले आहे?

**सदस्या, श्रीम. शुभांगीनी बेहनवाल:-** फोन सुद्धा उचलत नाही.

**सदस्या, श्रीम.मिना सोनेजी :-** हा जो मुद्दा आपण उचलला आहे मी त्याचे समर्थन करते,तरी मला हे बोलायचे आहे, दुसरे जे पण स्टाफ मध्ये आहे,जे पण अधिकारी आहेत, कोणीही सपोर्टीव नाही आहे, वेळेवर उत्तर देत नाही,आयुक्तांना तक्रार केल्यानंतरही, त्यांना आयुक्त आदेश देतात त्याच्या नंतर सुद्धा ते उत्तर देणे योग्य नाही समजत. आज आपण हा एक चांगला निर्णय घेणार,तर दुसऱ्या अधिकाऱ्यांना देखील एक शिकवण भेटेल.ते काम करू शकतात,परंतू आम्ही धैर्य ठेवून वारंवार विचारणार याचा अर्थ हा नाही की त्यांनी उत्तर नाही द्यावी. आम्ही उत्तर मांगतोय आणि आम्हाला वारंवार नाही भेटत तर हा पण आमचा अपमान आहे ना.मी शुभांगीनीजींच्या सोबत आहे या गोष्टीत. कृपया या विषयावर भले या महासभेत नाही

**सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी:-** मा. महापौरजी मी राजेंद्र चौधरी बोलतोय,मोबाईल मध्ये नेटवर्क पकडत नसल्यामुळे बिट्टू भाईंच्या मोबाईल मधून बोलतोय.

**सदस्या, श्रीम.मिना सोनेजी:-** सर मी बोलते आहे आपण म्यूट नाही करू शकत,

**सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी:-** बोलतायेत का,बोला बोला मला वाटले तूमचे झाले बोलून.

**सदस्या, श्रीम.मिना सोनेजी:-** हा सर मी बोलत होते, आपल्याला नाही मी होस्टला बोलले,त्यांनी मध्ये म्यूट केले,चौधरी सर मी तूम्हाला नाही बोलली. हा पण तर अपमानच झालाना आम्ही बोलते आहो आणि म्यूट करणे,

**सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी:-** अनम्यूट करा मॅडम,

**<u>सदस्या, श्रीम.मिना सोनेजी:-</u>** नाही आता झाले माझे बोलून, ही जी वर्तणूक आहे ती योग्य नाही आहे.चार पाच जण बोलतात तेव्हा त्यांना कोणी म्यूट नाही करत.मी बोलते तर म्यूट करतात. हे चूकीचे आहे, हे अपमानजनक आहे.

**<u>महापालिका सचिव:-</u>** मॅडम म्यूट नाही करत आहे, तूमचा आवाज एक मिनीट ऐकू नाही आला, म्हणून चौधरी साहेबांना बोलायला लावले. तूम्हाला म्यूट नाही केले आहे कोणी.

**<u>सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी:-</u>** मा. महापौरजी आजचा हा अशासकिय प्रस्ताव आणि विशेष महासभा, विशेष महासभेमध्ये मा.सभापती स्थायी समिती,टोनी सिरवानी यांनी आणलेला आहे,या प्रस्तावाच्या बाबतीत त्यांनी आपली खंत व्यक्त केली आहे.एखाद्या अधिकाऱ्यांनी जेव्हा कुठल्याही डिपार्टमेंट मध्ये काम करत असतांना,तेथे जे काही पदाधिकारी आहेत, पदसिद्ध अधिकारी असतील,किंवा इतर सन्माननीय सदस्य् असतील,त्यांचा मान सन्मान ठेवला पाहीजे,१.२६.००

**<u>सदस्य, श्री.राजेश वदारीया:-</u>** अधिकाऱ्यांना एक आणखी गोष्ट सांगीतली.अमर डाय कंपनीचे मॅटर आहे,ज्यात डिसेंबर २०२० ला, १८ डिसेंबर २०२० ला डिप्युटी ऑफीशियल लिक्वीडेटर, हायकोर्टने एक आदेश पास केला आहे,ज्यात आपल्या एक करोडपेक्षा जास्त रक्कमेला, १८ लाख ७१ हजार १७२ रूपये चा क्लेम पास केला आहे.तर मला त्यांच्याकडून माहिती करायचे होते,की अमर डाय च्या मॅटरमध्ये पुढे काय कारवाई झाली ? पुढे मला डिपार्टमेंटने सूचित केले १४ कोटी ८४ लाख २९ हजार ४६६ रूपये त्यांच्यावर थकबाकी आहे.तर मी त्यांना विचारले की जर हे डिसेंबर २०२० चे ऑर्डर आहे,त्या ऑर्डर नंतर आपण काय कारवाई केली? तर त्यावेळी प्रभारी विधी अधिकारी राजा बुलानी तेथे उपस्थित होते, तर त्यांनी सांगीतले की मला कोणताही कागद नाही भेटला आहे.ऑर्डरचे तीन पानच दिले गेले आहे मला कर विभागाकडून,ज्याच्यामुळे मी त्यांना बोलून बोलून थकलो आहे की मला पूर्ण फाईल द्या.तर जे डिप्युटी ऑफीशियल लिक्वीडेटरचे आदेश आहेत,तर त्याच्यावर मी अपील किंवा काही कायदेशीर कारवाई करू,पण त्यांना १८ डिसेंबर २०२० चा ऑर्डरच्या नंतर त्या दिवशीपर्यंत मला फाईल नाही दिली. दुसरी एक कंपनी आहे आयडीआय लिमीटेड, तिच्यावर ८ करोड ५ लाख ४१ हजार ३०६ रूपये आपले थकबाकी आहे.मी त्यांना हे पण विचारले होते की यावर तूम्ही काय कारवाई केली आहे.तर स्टाफने सांगीतले आम्ही ,सिल करण्याचा अधिकार नाही आहे तर त्यांचे सील नाही केले आहे तर अॅटेच केले आहे.मी बोललो अॅटेचमेंट नंतर आपण काय कारवाई केली? यात आम्ही जे तथ्य शोधून आणतो आहे,डिपार्टमेंट आणि मॅडमनी ते वैयक्तिक नव्हते घ्यायला हवे,पण त्यांनी घेतले आणि मला बोलले की तुम्ही मला आज फोन केला होता,आणि माझ्या कामात तूम्ही आज हस्तक्षेप केला आहे.मी त्यांना सांगीतले मॅडम मी तुम्हाला फोन केला होता,तो यासाठी केला होता की एक आशा सोप च्या दुकानात तूम्ही गेला होता,जे एक विधवा महीला चालवत आहे,आणि त्या महिलेच्या मुलाने तुम्हाला विनंती केली होती, की मॅडम माझे चालू वर्षाचे बिल आहे,मागील काही थकबाकी नाही आहे,तर मागील काही थकबाकी नसल्यामूळे मी ३१ मार्च ला भरून टाकेल. तुम्ही त्यांच्या काऊंटर कडे जावून बसले, आमच्यासाठी ज्याचे महत्व आहे,ज्याला आम्ही पुजतो तुम्ही तिथेच जावून बसले, तुमचा हा व्यवहार अशोभनिय आहे. त्या महिलेने तुम्हांला बसण्यासाठी खूर्ची दिली होती ती सोडून तुम्ही काऊंटर वर जावून बसले.तर त्यांनी मला स्थायी समितीच्या सभेमध्ये बोलले की तूम्ही मला फोन केला आणि या या गोष्टी बोलल्या, मी बोललो की मॅडम हे चालू वर्षाचे बिल आहे,कोणती मागची थकबाकी नाही आहे, १० वर्ष, २० वर्ष ,५ वर्षाची,ज्याला तूम्ही यातना देण्यासाठी गेले की तुमचे दुकान सिल करू.तर ते बोलले आपण मला दुपारी सुद्धा फोन केला होता, मी त्यांना सांगीतले की मी तुम्हाला दुसऱ्यांदा फोन नाही केला, ते बोलले मी तुमच्या वार्डमध्ये आली होती तुम्ही मला दुसऱ्यांदापण फोन केला. मी त्यांना सांगीतले की मी तुम्हाला दुसऱ्यांदा फोन नाही केला तुम्ही तुमचा कॉल रेकोर्ड अतिरिक्त आयुक्त मॅडम ला दाखवा.मी माझा फोन आयुक्तांना दाखवू शकतो.मग ते बोलले नाही तुम्ही माझ्या अधिकाऱ्यांना फोन केला होता, अधिकाऱ्यांचे पण कॉल

रेकोर्ड दाखवा.मी माझे कॉल रेकोर्ड दाखवतो, मी कोणत्याही अधिकाऱ्याला फोन नाही केला. त्यांनी माझ्यावर खोटे आरोप स्थायी समितीच्या सभेमध्ये लावले. आयुक्त, सभापती आणि बाकी सदस्यांच्या समोर.मुद्दा हा आहे की,कलेक्शन कमी होत आहे, आम्ही त्यांना सूजाव देत आहे,की कुठे कुठे कलेक्शन करू शकतो,पण ते मुद्याला वैयक्तिक घेतात.आता जे चौधरीजींनी सांगीतले की त्यांची नियुक्ती उपायुक्त कर म्हणून झाली आहे.एकदम योग्य् गोष्ट आहे आपली, ०३ मे २०२१ चा आदेश आहे,ज्यात प्रियंका राजपूत मॅडमला उपायुक्त कर चे, फक्त कर चे उपायुक्त म्हणून उल्हासनगर महानगरपालिकेत पाठवले आहे.मी आपल्या सर्व लोकांचे लक्ष कलम ६९ कडे आणू इच्छितो,जर आयुक्तांना स्वत:चे अधिकार कोणत्याही अधिकाऱ्याला द्यायचे आहे,तर त्यांना स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे.मला वाटते ही गोष्ट त्यांच्या लक्षात कोणी नाही आणून दिली.तर त्यांनी मॅडमला आणखी बरेच डिपार्टमेंट दिले, यात ६९ (२) मी वाचतो, the commissioner shall not they can order under subsetion १,which is .....

**<u>महापालिका सचिव:-</u>** बरोबर ऐकू नाही येत आहे, प्रदिप जी कृपया मोबाईल बंद ठेवा.

**<u>सदस्य, श्री.राजेश वदारीया:-</u>** सेक्शन १२(१), १८(१), २६(२), ४३ (२), ४३ (५), ५१ (२), ६७ (३), ६७ (३क), ६७ (३ड), ७१(२), ७३, ७७, ७८(१), ८५ ,८६, ८७, ९०, ९२ (२), ९४, ९५, १२१,१२२, १२५, १२६, १३१(ब), १३१(१), १३४, १३७, १४४, १५२, १५४, १६०, १७४, १७६, १७७, १८८, १९५, १९६, १९७, २०१, २०५, २०७, २०८, २०९, २१०, २१२, २१३, २१६, २२०, २२४, २३२, २४३, २४६, २४९, २७०, २७२(२), २७३, २७४, २७५, २७५(१), २७७, २८०, २८१, २९८, ३००, ३०१, ३०३, ३०५, ३१०, ३१७, ३१८(२), ४३३, ४४१, ४४२, ४४५, ४४६, ४८१, १.४३.४१. याचा अर्थ असा होतो की जर आयुक्तांना त्यांना दुसऱ्या डिपार्टमेंटचा चार्ज द्यायचा असेल तर त्यांना अगोदर स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. मी मागील पाच वर्षापासून स्थायी समितीचा सदस्य् आहे, तर मला माहिती आहे असा कोणताही प्रस्ताव आम्ही पास केलेला नाही.तर यासाठी मी आयुक्त आणि मा.महापौर यांना निवेदन करतो की मॅडम प्रियंका राजपूत यांना फक्त उपायुक्त कर ठेवून बाकी त्यांचे कार्य, बाकी त्यांचे सर्व विभाग,अधिकार वापस घेतले जावे.धन्यवाद.

**<u>सदस्या, श्रीम. सुरेखा आव्हाड:-</u>** मा.महापौर मॅडम माझा एक प्रश्न आहे आपल्या शहरात कोणार्क कंपनीच्या गाड्या बोट क्लब मध्ये लावल्या जातात.त्याच्यावरती ५-६ करोडची वसूली बाकी आहे,त्याच्यावरती कारवाई कधी केली जाईल? हा प्रश्न संबंधित अधिकाऱ्यांसाठी आहे.

**<u>सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी:-</u>** मा.महापौरजी ज्या उपायुक्तां विरूद्ध आज महासभेमध्ये चर्चा होतेय, त्यांनी कशी वर्तणूक केली आहे सन्माननीय सदस्यां बरोबर व काही पदाधिकाऱ्यां बरोबर,तर त्याचा खुलासा उपायुक्त मॅडम यांनी या महासभेत केला तर बरे होईल.कारण सत्यता काय आहे ती पण लोकांसमोर येईल आणि खरोखर त्यांनी लोकांचा अपमान केला असेल तर महापौरांनी त्यांच्यावर कारवाई करावी.

**<u>सदस्य, श्री.मनोज सयानी:-</u>** मा.महापौरजी काय होते त्या पत्रामध्ये याचा खुलासा करणार का सदन मध्ये

**<u>उप महापौर,श्री.भगवान भालेराव:-</u>** अवश्य करणार पण पहिले राजेश वदारिया यांचे संपले आहे, भरत गंगोत्री

**<u>सदस्य, श्री.राजेश वदारीया:-</u>** मी पहिले चौधरी साहेबांच्या गोष्टीचे उत्तर देवू इच्छितो, मी त्यांना सांगू इच्छितो की महापालिका अधिनियम मध्ये असा कोणताही कलम नाही ज्याने महापौर उपायुक्तांवर कारवाई करू शकतात तर महापौरांकडे हा विषय नेवून काहीच उपयोग नाही.

**सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी:-** मी काय बोलतो आहे मॅडम ज्यांच्यावर ही चर्चा सूरू आहे त्यांना येथे येवून आपली बाजू मांडण्याची संधी द्यावी.

**सदस्य, श्री.राजेश वदारीया:-** तो महापौरांचा अधिकार आहे, महापौर कोणत्याही अधिकाऱ्यांना बोलवू शकतात त्याबद्दल दुमत नाही.

**सदस्य, श्री.मनोज सयानी:-** महासभेमध्ये कोणत्याही अधिकाऱ्यांकडून स्पष्टीकरण मांगू शकतात हे मा.महापौरजी यांना पिठासीन अधिकारी म्हणून अधिकारात येत.

**सदस्य, श्री.राजेश वदारीया:-** हा सामान्य न्याय आहे की ज्या अधिकाऱ्यावर आरोप लावते जात आहे त्यांना पण संधी भेटली पाहीजे.

**उप महापौर,श्री.भगवान भालेराव:-** मा.महापौरांनी सांगीतले आहे की त्यांचा खुलासा झाल्यावर ठरावा संदर्भात मुद्दा उपस्थित होईल पण त्यांचा खुलासा होईल सर्व सदस्यांना बोलून द्या. मा. महापौर जी, आयुक्त साहेब,आणि सन्माननीय सदस्य, आठ सदस्यांनी सह्या करून हा प्रस्ताव आणलेला आहे. सन्माननीय उपायुक्त राजपूत मॅडम यांचे पदाधिकाऱ्यां बरोबर जे वागणे आहे,त्या वागण्या संदर्भातला एक प्रस्ताव आपण महासभेसमोर आणलेला आहे.वैयक्तिक जो एक दोन वेळा माझा त्यांच्या बरोबर जो अनुभव आला आहे,त्या बाबत मी मा. आयुक्त साहेबांना सांगीतले, एकदा त्यांच्या ह्या व्यवहाराबाबत मी उपोषणाला सुद्धा बसलो होतो. या सर्व भूमिका जर बघीतल्या तर त्यांचे जे वागणे आहे ते पदाधिकाऱ्यांच्या, नगरसेवकांच्या पूर्णपणे विरोधातले आहे.विशेष म्हणजे आज तूम्ही बघीतले असेल या चेअर वर तूम्ही वारंवार माननीय महोदया, माननीय महापौर,म्हणून तूम्ही संबोधता आमच्या या उपायुक्त प्रियंका राजपूत मॅडमने महापौर महोदयांना पण सोडले नाही तर त्याचे उदाहरण तूम्हाला सांगतो. तूम्ही निवडणूकीच्या काहामध्ये पूर्ण शहरामध्ये बॅनर लावले आहे. त्या बॅनर मध्ये कुठेही मा. महापौर किंवा पाच पदाधिकाऱ्यांचा कुठेही उल्लेख नाही.अजून आचार सहिंता लागलेली नाही. ज्या महानगरपालिकेमध्ये महापौर पदावर बसलेले आहेत ,त्यांचा जर अपमान होत असेल आणि बाकी सदस्यांचा अपमान होत असेल तर याचा पेक्षा खालची बाब कुठलीही नाही. मला त्या भाषेत बोलायचे नाही पण जी परिस्थिती आहे जे बॅनर शहरामध्ये लावले, ज्या ज्या भिंती रंगवल्या गेल्या, त्या सर्व भिंतींवर आयुक्त आणि उपायुक्त निवडणूक. का महापौर गेले आहेत? इथून पदावरून रद्द झाले आहेत? उप महापौर गेलेले आहेत? स्थायी समिती आणि पाच पदाधिकारी गेलेले आहेत? अशी परिस्थिती आहे का? अतिरिक्त आयुक्त निवडणूक आहेत त्यांचे नाव कुठे उल्लेख नाही. म्हणजे नक्की चाललय काय? पैसा महानगरपालिकेचा आणि महानगरपालिकेच्या प्रशासकीय बॉडीला विचारायचे नाही आणि आपल्या मनाने ज्या पद्धतीने काम करायचे असेल तर ही सर्व गोष्ट चूकीची आहे. आणि मला वाटते शिवसेनेचे जे सदस्य् जोरजोरात बोलतात तर मला वाटत महापौरांचा अपमान तुम्ही सहन करणार आहात का?

**सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी:-** थांबा थांबा आता नाव घेतले आहे म्हणून मला बोलून द्या.

**उप महापौर, श्री.भगवान भालेराव:-** तुम्ही आमचे बोलणे झाल्यावर बोला आणि विषय असा आहे की या परिस्थितीमध्ये की तुम्ही भिंती रंगवल्या, तुम्ही हे केल पण कुठेही महापौरांचा उल्लेख केला नाही. कुठेही पाचही पदाधिकाऱ्यांचा उल्लेख केला नाही. दुसरी गोष्ट दोन कोटी रूपयांची बिल, निवडणूकीच्या संदर्भातली दोन कोटींची बिल, लेखा विभागामध्ये पडलेली आहेत. त्याच्यावर कोणाचीच सही नाही. फक्त खटके आणि प्रियंका राजपूत या दोनच माणसांची, विभाग प्रमुखाची सही नाही असे असतांना आयुक्त कुठल्याही प्रकारे संकीर्ण संचिकेवर परवानगी घेतलेली

नाही. असे असतांना आपण १५ कोटी दिले, त्यातली दोन कोटीची बिल आता तुमच्या टॅक्स ऑडीटमध्ये येवून पडलेली आहे, ही चिंतेची बाब नाही आहे? आपण जेव्हा बालतो तेव्हा या सर्व गोष्टी विचारात घेतल्या पाहीजेत.आपण महानगरपालिकेमध्ये पदाधिकारी आहोत, ट्रस्टी आहोत. हा पैसा कुठे जातो, कसा खर्च होतो, कशा प्रकारे त्याची विल्हेवाट लावली जाते, याची काय आपली जबाबदारी नाही आहे का? या सर्व गोष्टींचा विचार करण्याची गरज आहे. आयुक्तांना पण या गोष्टी माहीत नाही आयुक्तांना आताही आमची चर्चा झाली त्यांना ताबडतोब चव्हाण साहेबांना सांगून ती बिल थांबवायला लावली. हा जो अनागोंदी कारभार चालू आहे प्रियंका राजपूत यांच्या माध्यमातून. टॅक्सच्या बाबतीत तशीच भूमीका आहे,एकाला टॅक्स ला नोटीस द्यायची,दुसऱ्याला बोलवून घ्यायचे, त्याच्या कडून आर्थिक व्यवहार करायचे, ह्या ज्या गोष्टी चालू आहे त्या थांबल्या पाहीजेत. निवडणूक हा विषय नाही किंवा एखाद्या महिला अधिकाऱ्यावर सुदबुद्धीने आमचे ऐकत नाही म्हणून अशा काही भूमिका असतील तर ते चूकीचे आहे. आमची कोणतीही त्यांच्या बाबतीत देवाण घेवान नाही.किंवा आम्ही कोणते काम सांगीतले आणि त्यांनी ते केले नाही त्याचा काही राग असेल मनात अशी कुठलीही भावना नाही. फक्त त्यांची वर्तणूक, त्या अमरावती महानगरपालिकेत असताना त्या वेळचे आपले जे सचिव आहेत त्यांनी असेच पत्र त्यांना पाठविले होते की त्या मनमानी पणाने कारभार करतात. कोणाचा विचार करत नाही, लोकप्रतिनिधींची इज्जत करत नाही.त्यांच्या बाबतीत अशा प्रकारचे पत्र एक आदेश तिकडे निर्गमित झाला होता. सेवा पुस्तकामध्ये तशी नोंद मला वाटते झालेली आहे असे मला समजल, नक्की काय ती खात्री नाही. मग अशा वेळी प्रत्येक ठिकाणी मधल्या काळामध्ये किती वर्ष निलंबित होत्या? कशामुळे निलंबित होत्या? याचाही आपण लोकप्रतिनिधींनी गांर्भीयाने विचार करण्याची गरज आहे. म्हणून माझी तूम्हाला एक विनंती आहे की हा कुठला जसे बोडारे साहेबांनी सांगीतले हा विचार करण्याची गरज आहे की अधिकारी कुठल्या प्रकारे आपल्याशी वागतात, कुठल्या पद्धतीने बोलतात, त्यांच्या फेसबूक लाईव्ह वर काय करतात.एखाद्या पदाधिकाऱ्याच्या चेंबरमध्ये आल्यावर, माझ्याच चेंबर मध्ये, एखाद्याच्या चेंबरमध्ये जावून त्याला संबोधून कुत्ते भोकते हे अशी भाषा कुठल्या अधिकाऱ्याला शोभते,कुठल्या डिक्शनरी मध्ये आहे? या सर्व गोष्टींचा विचार गांर्भीयाने सर्व पदाधिकाऱ्यांनी करावा. सर्व लोकांचा पाचही पदाधिकाऱ्यांचा अपमान झालेला आहे. कुठल्याही निवडणूकीचा काळ नसताना जे शहरामध्ये निवडणूकीच्या संदर्भात, मतदानाच्या संदर्भात जे जाहीर आव्हान केलेले आहे.किंवा कोणतेही पत्रके काढले असतील, टॅक्सच्या संदर्भातील असू द्या,तिथे महापौरांचे, उप महापौरांच किंवा पाचही पदाधिकाऱ्यांचे नाव नाही.म्हणून मला वाटते अशा मगरूर पणे वागणाऱ्या अधिकाऱ्याला आपण ताबडतोब महानगरपालिकेतून कार्यमूक्त केले पाहीजे.किंवा कार्यमुक्त करण्यात काही अडचण असेल तर त्यांचे फक्त टॅक्स डिपार्टमेंट ठेवावे, बाकी डिपार्टमेंट काढून टाकावे.आणि त्यांच्यावरती विभागीय चौकशी करून हे सर्व निवडणूकीचे आणि बाकी सर्व गोष्टींमध्ये चौकशी करावी अशी माझी मागणी आहे.सर्व सदस्यांनी याला पाठींबा द्यावा, अशी मी नम्र विनंती करतो.धन्यवाद.

**सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी:-** सन्माननीय महापौर जी जे मुद्दे मा.उपमहापौरांनी उपस्थित केलेले आहे त्या मुद्यांचे उत्तर माननीय आयुक्तांनी द्यावे ही परिस्थिती सत्य आहे का? आणि खरोखर असे झाले आहे का? या सर्वांचे उत्तर मा.आयुक्तांकडून मिळणे अपेक्षित आहे. आयुक्त साहेब जर असे होत असेल तर ते चूकीचे आहे परंतू महापौरांचा अपमान आम्ही कधीच सहन करणार नाही.कोणी तरी करत असतील तर ते करतील, परंतू कोणावर तरी दोष ठेवायचा, कोणाला तरी तो नालायकच आहे बोलून जर कोण त्याच्यावर आरोप करणार असेल तर ते पण चूकीचे आहे.

**उपायुक्त (कर), श्रीम.प्रियंका राजपूत:-** मा.महापौर मॅडम,मा. आयुक्त, सन्माननीय सर्व सदस्य माझी अशी विनंती आहे हा विषय माझ्या विषयी आहे. मला माझी बाजू मांडण्यासाठी बोलण्याची परवानगी द्यावी.

**उप महापौर, श्री. भगवान भालेराव:-** बोला.

**आयुक्त, डॉ.राजा दयानिधी:-** परवानगी देतो तुम्हाला बोला तूम्ही.

**उपायुक्त (कर), श्रीम.प्रियंका राजपूत:-** सर्व प्रथम मा.महापौर मॅडम, आयुक्त सर व सर्व सदस्यांना नमस्कार. मी प्रियंका राजपूत उपायुक्त बोलते आहे. हा विषय जो माझ्या विषयी चालू आहे, त्यावर आधीच सन्माननीय सदस्यांनी काही आरोप केलेले आहेत. प्रथमत: मी सांगू इच्छिते के हे सर्व आरोप खोटे आहे. माझे संस्कारच असे नाही आहे की मी कोणाशी उर्मटपणे किंवा हे जे बालीशपणे किंवा जे काही शब्द माझ्या विरोधात वापरले गेलेले आहे. असे संस्कार माझ्यावर झालेले नाही त्यामुळे अशाप्रकारे मी कधीच कोणाशी बोललेली नाही. दुसरे म्हणजे मी जेव्हा हा विषय आला. तेव्हा मला मा.महापौर आईंनी एक पत्र दिले होते की तुम्ही तुमचा काही जो खुलासा असेल तो मांडावा. तो खुलासा मी त्यांना लेखी दिलेला आहे. आणि त्यामध्ये विनंती पण केली होती की येत्या महासभेत आपण माझा खुलासा सर्व सदस्यांना कृपया वाचून दाखववावा. म्हणून मी विनंती केली होती. तर माझी पुन्हा विनंती असेल की माझा खुलासा कोणी वाचणार असतील किंवा मी वाचून दाखवेल. दुसरी गोष्ट म्हणजे आता काही सन्माननीय सदस्् बोलले पण त्यांनी माझ्यावर काही वैयक्तिक आरोपही केले.सर्वात महत्वाचे म्हणजे उप महापौर साहेबांनी देखील काही अगदी टोकाचे वैयक्तिक आरोप केले. तर महिला अधिकारी म्हणून तुम्ही जेव्हा एखाद्या अधिकारी विषयी बोलतात.तेव्हा अशी विनंती राहील, महिला अधिकारीच नाही, कोणी अधिकारी असो, साधा शिपाई जरी असले तरी ते कर्तव्य करत आहेत, काम करून त्यांचा पगार मिळवत आहेत, तर तो त्यांचा सन्मान ठेवून कृपया पूर्ण माहिती घेतल्याशिवाय कुठेतरी काहीतरी आले म्हणून कृपया करून कोणावर आरोप करू नये अशी माझी त्यांना नम्र विनंती आहे.आणि दुसरे म्हणजे मी इथे जॉईन झाल्यापासून आदरणीय कमीशनर सरांनी विश्वासाने किंवा त्यांना वाटले की मी काम करू शकेल ते डिपार्टमेंट त्यांनी स्वत:हून मला दिलेले आहे. मी कोणतेही डिपार्टमेंट आज पर्यंत मागीतलेले नाही आणि मागणारही नाही. माझ्या ऑर्डरमध्ये मालमत्ता कराची आर्डर वरतूनच आली होती तेव्हा ही मी त्यांना कुठलेही डिपार्टमेंट द्या असे सांगीतले नव्हते. मी येथे येण्यापूर्वी मालमत्ता कर विभागात काही ज्या गोष्टी झाल्या होत्या त्यामूळे आमच्या अधिकाऱ्यांनाही नगर विकासच्या चिफ ऑफीसर कॅडरच्या, शिक्षा झाली होती.खूप काही अडचणी होत्या, उलट मी येथे येण्यापूर्वी मला जेव्हा सांगीतले गेले  की टॅक्स डिपार्टमेंट तूम्हाला टाकूनच पाठवणार तेव्हा मी त्यांना विनंती केली की असू करू नका, कारण मला कुठे अडकायचे नाही आहे.चुकीच्या गोष्टी मी केल्या नाही करणारही नाही. परंतू शासनाचे ऑर्डर होते ते माणने माझे काम आहे.यापूर्वीही मी जिथे जिथे काम केले आहे, शासन ऑर्डर जशी आली त्यानुसार मी तिथे काम केले आहे.आम्ही शासकीय अधिकारी आहोत, गॅजेटेड अधिकारी आहोत,महाराष्ट्र शासनाचे अधिकारी आहोत. महाराष्ट्र शासन जेव्हा जिथे पाठवेल तिथे जाणे आमचे काम आहे. आज मी उल्हासनगरला आहे,उद्या दुसरीकडे कुठेतरी असेल. जिथे मी जाणार तिथे मी माझे कर्तव्य करणार.आणि माझे नियम स्पष्ट आहे,चूकीचे काम मी करणार नाही.आणि चूकीच्या कामासाठी दबून तर बिलकूल जाणार नाही. माझी अशी तूम्हाला माहिती द्यायची आहे आता तूम्हाला जे जे वैयक्तिक आरोप झाले मला असे वाटते, सर्व वैयक्तिक आरोप मला माहित नाही त्यांनी  का केले? कुठल्या आधारावर केले? तर माझी अशी विनंती राहील तूम्ही जे काही आरोप कराल कृपया त्याला आधार असू द्या. म्हणजे जे आधार असेल जसे चौधरी साहेब पण म्हणाले, मला आईंनी पण पत्र दिले की खुलासा द्या मी त्यांना खुलासा दिलेला आहे. आणि मला असे म्हणायचे आहे की कुठलेही आरोप करताना त्याची पडताळणी करा. मी सन्माननीय सदस््, नागरिक किंवा ज्या व्यक्तींच्या संपर्कात मी येते काम करत असताना ,त्यांच्याशी माझ चांगलेच वागणे असते.चुकीचे वागणे नसते. पुन्हा एकदा सांगते माझे तसे संस्कार नाही.आणि मला अभिमान आहे माझ्या आई वडीलांनी चांगलेच संस्कार केलेले आहे माझ्यावर.त्यामुळे हे जे काही बोलले जात आहे ते बिनबुडाचे आहे. आणि कामाचे म्हटले तर मी जे काम करते ते आयुक्त साहेबांना माहिती

आहे.स्टाफला माहीत आहे.त्यामुळे त्या कामाचे इव्यालुशन कधीही करू शकतात.रिझल्ट कधीही तूम्हाला मिळेल.दुसरे फक्त एक गोष्ट सांगते जे उपमहापौर साहेब म्हणाले निवडणूकी विषयी, निवडणूक ही त्रयस्त संस्था आहे.सर्वांनाच माहिती आहे. त्यामुळे निवडणूकीचे बॅनर आम्ही अशा प्रकारे बनविले होते की त्यामध्ये कुठल्याही राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्याचे नाव नसावे हा नियम आहे त्यामुळे ते तसे केले होते.निवडणूक आहे, निवडणूकीच्या वेळी पक्षाचे जर कोणी पदाधिकारी असेल तर त्यांचे नाव किंवा काही छापणे हे निवडणूकीच्या याच्यावर आपण नाही करत. इतर कोणत्याही डिपार्टमेंटचे जे काम असतात त्यावर पदाधिकाऱ्यांचे, सन्मानीय पदाधिकाऱ्यांचे आवर्जून नाव नोंदले जाते.फक्त हे निवडणूकीचे असल्यामुळे, या विषयी आयुक्त साहेबांशी देखील माझे बोलणे झाले होते तर फक्त प्रशासनाची नावे त्याच्यावर आहे आणखी काही नाही. बाकी तुम्ही जे काही आरोप केले आहे माझी नम्र विनंती राहील की, सर प्लीज त्याला काही तरी आधार द्या. आणि माझ्याकडून काहीतरी गैरसमजूतीतून, अवधानाने, कुठल्या क्षणी माझ्याकडून कोणत्याही सन्माननीय सदस्याचा किंवा नागरिकांचा अपमान झाला असेल तर मी त्यांची नम्रपणे माफी मागत आहे.आणि अशा प्रकारे पुन्हा कोणतेही आरोप माझ्यावर होऊ नये म्हणून मी पण काळजी घेईल.धन्यवाद.

**<u>उप महापौर, श्री.भगवान भालेराव:-</u>** बोडारे साहेब बोला.

**<u>महापालिका सचिव:-</u>** बोडारे साहेब,आपला फोन म्युट आहे.

**<u>सदस्य, श्री.धनंजय बोडारे:-</u>** आवाज येतो आहे का?

**<u>महापालिका सचिव:-</u>** येतो आहे.

**<u>सदस्य, श्री.धनंजय बोडारे:-</u>** अपेक्षेप्रमाणे उत्तर आले. साचेबद्ध उत्तर म्हणजे एवढ्या वर्षाची आमची कारकिर्द फुकअ गेली.आरोप आम्ही बिनबुडाचे करतो आहे.संस्कार आहेत पण आम्हाला संस्कार कळत नाही.अशा प्रकारे म्हणजे पहिले जे वाक्य टोनी सिरवानी यांनी म्हटले ॲटीट्युड, याला ॲटीट्युड म्हणतात. आणि शेवटी पाणीच पाजलेले आहे, ही अधिकारीची भाषा नाही, ज्याला आत्मचिंतन कळत नाही, ज्याला चिंतन नाही तो अधिकारी बदलूच शकत नाही.आणि मी लिहून देतो महापौर महोदया, आणि चौधरीजी तूम्ही कितीही सांगीतले तरी अशा अधिकाऱ्यांमध्ये बदल होणार नाही. ऐकवेळ म्हातारी मेली तर दुःख नाही आज तुम्ही जे सुपात आहे. आज जात्यात आहात उद्या तुम्ही सुपात आहांत. अशा प्रकारचे वर्तन नगरसेवकांशी करून प्रशासन काय चालणार आहे. आणि असे करून सुद्धा त्याच्या पश्चाताप नाही, कुठे चुकलेलेच नाही.अशा प्रकारची भावना, म्हणजे ज्या पद्ध्तीने बोलतात हत्ती चले बाजार कुत्ते भोके हजार. म्हणजे आता पर्यंत महासभेत चर्चा झाली त्याचे काय? आयुक्त साहेब तुम्हाला तक्रारी किती आल्या असतील त्याचा पश्चाताप नसेल तर सुधारणा होणार नाही. पश्चाताप होत असेल की मी चूकले, चूकले हे जर कळत नसेल तर सुधारणा काय होणार त्याच्यात.यात माझी चूक माझ्या लक्षात येणार नाही तो पर्यंत माझी सुधारणा होणार नाही. सुधारणा नसेल तर त्याचा काही उपयोग होणार नाही. मागे होजते सायमन गो बॅक तशा पक्रारे करणे गरजेचे आहे. चूक लक्षात आली तर त्याच्यात सुधारणा आहे.अनावधानाने असे मागे कुठेतरी ऐकले होते मग याच्यात सुधारणा कुठे आहे? आणि कशा बाबतीत बोलतो आहे. बाकी जे अधिकारी आहे त्यांच्या बद्दल बोलत नाही. जुईकर मॅडम आहे त्यांच्या विषयी कोणी बोलते आहे का इकडे? नायकवाडे साहेब आहेत, जाधव साहेब आहेत किंवा इतर अधिकारी आहेत ,त्यांच्या विषयी तक्रारी आहेत का? किंवा आयुक्तांविषयी नाही केली आहे. वादग्रस्त बाब निंबाळकर साहेबांच्या बाबतीत झाली त्यांची वागणूक होती तशी. ज्यांची उद्धट वागणूक असेल अशाच अधिकाऱ्यांच्या बाबतीत अशी होते. यापुर्वी माझ्याकडून अवधानाने चुकीने झाले, पण या संस्कारापर्यंत आल्या.आम्ही संस्कार काढले होते का तुमचे? संस्कार काढलेच नाही कोणाचे, आम्हाला कळते

कोणाचे काय काढायचे कोणाविषयी किती बोलायचे ते संस्कार आहेत की नाही ते वर्तणूकीतून कळतात काढायची गरज पण नाही काढले पण नाही.एक वडीलकीच्या नात्यातून आज २५ वर्षे नगरसेवक आहे म्हणून एक अधिकारी बालीश झाला असेल हा शब्द काढलेला आहे. त्यातूनसुद्धा अशा पक्रारचे उत्तर.हे बरोबर नाही आयुक्त साहेब. आणि कारवाई तुम्ही केली पाहीजे. आज आम्ही पोटतीडकीने बोलतो आहे. महापौरांचा अपमान केला नाही केला, स्थायी समितीचा केला, स्थायी समितीच्या सभापतीचा केला या पलीकडे काय पाहीजे तुम्हाला. महापौरांचा अपमान झाला, निवडणूकच आम्हाला कळत नाही का? आचार संहिता लागू झाल्यानंतर पाच लोकांचे नावे टाकत नाही. आतापर्यंत कोणत्याही आयुक्तांने अशा प्रकारचे वर्तन केलेले नाही आणि त्यात समजून घ्यायचे नाही की चुक झाली माझी, त्यात महापौरांचे नाव, उपमहापौरांचे नाव टाकले नाही. एवढाही शब्द नाही. निवडणूक आचारसंहिता लागेल तेव्हा लागेल पण आता तुम्ही काय केले? लोकांना आग्रह करणे प्रथम कर्तव्य महापौरांचे आहे प्रथम नागरिक म्हणून. माझ्या शहरातील नागरीकांनी काय केले पाहीजे, कोणाला मतदान केले पाहीजे. आचारसंहिता लागलेली नाही, आचारसंहिता लागल्यानंतर महापौर आणि पाच लोकप्रतिनिधींचे नावे टाकायची की नाही. पण महापौर लोकांना आवाहन करू शकतात लोकांच्या बरोबर. महापालिकेचा फंड आहे, आयुक्त किंवा उपायुक्तांचा नाही. महापालिकेचा निधी तुम्ही वापरता आहेत. त्यावर पहिला अधिकार महापौरांचा आहे. आम्ही केलेला आरोप हा आरोप नाही आहे ती व्यथा होती. असे पाच अधिकारी आले तर महापालिका चालणार नाही. ना आयुक्त चालवू शकणार ना महापौर चालवू शकणार. नगरसेवक तर रोज इथे कुत्र्या सारखे फिरत असतील, स्पष्ट शब्दात बोलतो कुत्राच बोलतील.खालचे शिपाई देखील बोलतील तुम्हाला.प्रत्येकाने गांर्भीयाने घ्या.ऐकाला बोलले म्हणून हसू आले असे नाही.ही उद्या वेळ तूमच्यावर येईल.तुमच्यावर आल्यानंतर दुसरे कोणी साथ देणार नाही तुम्हाला.इतर अधिकारी देखील अशा प्रकारे वागणूक करतील. एक अधिकाऱ्याला तुम्ही समज दिली नाही,वर्तमानपत्रात आलय.उद्या बाकीचे अधिकारी देखील तसे करतील.मग आयुक्त विचारतील तुम्हाला ना खालचे शिपाई विचारतील तुम्हाला.पुढच्या पिढ्याना पिढ्या नगरसेवक निवडून आले अशाच प्रकारची वर्तणूक प्रत्येक अधिकारी करेल हे लक्षात ठेवा.कोणाला बोलतायेत तो प्रश्न नाही आहे,ते कसे बोलतात, नगरसेवकांना कशी वागणूक देतात हे महत्वाचे आहे.उद्या तुमच्या बाबतीत असे झाल्यानंतर त्याची क्लिप अपलोड करू नका कोणी साथीला येणार नाही. हे लक्षात ठेवा. पुन्हा सांगतो म्हातारी मेली तरी दु:ख नाही, आयुक्त साहेब जबाबदारी तुमची आहे, प्रशासन कसे चालवायचे आम्हाला येत. सुधारणे तूमचे काम आहे, नाही सुधारेल तर आम्ही आमच्या पद्धतीने करू काय करायचे ते?

**सदस्य, श्री. शंकर लुंड:-** महापौरजी आयुक्त साहेबांकडे माझा आग्रह आहे की इच्छा नसताना देखील आमचे जे मॅडम आहेत, त्यांच्या जो व्यवहार आहे, स्थायी समिती सभापतीकडे जेव्हा ते आले होते माझ्यावेळी, माझ्या समोरचा अनुभव जो मी बघतो आहे, की इथून चालले जाणे, समजा इच्छा नसताना देखील त्यांचा वाद झाला. माझी फक्त ऐवढेच म्हणणे आहे, राजेशजींनी जसे सांगीतले की त्यांना तूम्ही पद आणि कार्यभार दिले आहे ते बेकायदेशीर आहेत. माझी सर्वांना विनंती आहे की त्यांचे बाकीचे पद काढून घेवून त्यांना फक्त टॅक्स डिपार्टमेंट मध्येच ठेवा.

**सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी:-** महापौर जी सभागृहामध्ये सर्व सदस्यांनी उपायुक्त प्रियंका राजपूतजी यांच्या बद्दल सांगीतले की त्यांची वर्तणूक ठिक नाही आहे. एक अधिकाऱ्याला सहनशिल, शांत आणि मृदुभाषी असले पाहीजे मग तो कोणत्या नगरसेवकाचे बोलण ऐको किंवा नाही ऐको.परंतू सहनशिल रित्या त्यांना ऐकणे, मृदुभाषी राहून उत्तर न देणे असे असले पाहीजे. छोट्या छोट्या घटना ज्या घडल्या त्या बिना कोणताही झगडा न करता प्रियंका राजपूत मॅडम वाद मिटवू शकत होत्या. पहिला विषय आहे की गणपत गायकवाडजी जेव्हा सुचना-हरकती आले जर प्रियंका राजपूतजींना ते आत जाण्याचा आग्रह करत होते,आणि प्रियंका राजपूतजी ने तिथे टाउॅन हॉलच्या आतमध्ये एक कार्यालय आहे,त्यांना विनंती केली असती की सर या इथे बसावे मी आतमध्ये जे सुचना-हरकती सूरू आहे तर आयुक्त साहेबांना विचारून येते तोपर्यंत

तूम्ही चही घ्या.तर ही गोष्ट घडली नसती. म्हणजे एक छोटीसी गोष्ट सहनशिलतेने मिटू शकत होती.जसे राजेश वदारियाजींनी सांगीतले, जेव्हा त्यांनी टॅक्सच्या विषयावर फोन केला की चालू वर्षाचा टॅक्स, चालू वर्ष आहे, आपण दोन दोन वर्ष, पाच पाच वर्षाचे टॅक्स वसूल नाही केले आहे.आज आपली टॅक्स कलेक्शन पण शून्य आहे.जेव्हा त्यांना फोन केला तेव्हा त्यांनी ना फक्त जबरदस्ती टॅक्स वसूल केला त्याचवेळी चालू वर्षाचा साडेतीन लाख रूपये तर स्थायी समितीमध्ये माझ्या समोर प्रियंका राजपूतजींने त्यांना डबल डोस दिला की काल तूम्ही ज्यांचा टॅक्स नाही घेण्यासाठी मना केले त्यांच्या तर टॅरेसवर टर्फ बनले आहे.त्यांना तर काल मी नोटीस पाठवली आहे.या सर्व गोष्टी दाखवतात की कोणी पण नगरसेवक, जनप्रतिनिधी कोणतीही गोष्ट सांगूच नये. मग ती योग्य असो किंवा अयोग्य त्यांच्यासमोर बोलूच नये. बोडारे साहेबांनी पण सांगीतले.पाचही संविधानिक पदाधिकाऱ्यांनी जवळजवळ तक्रार केली आहे.मग ते उपमहापौर असो, सभागृह नेता असो, स्थायी समिती सभापती असो.अनेक नगरसेवकांची अशा तक्रारी आल्या आहेत.या गोष्टीला नजर अंदाज करू नाही शकत. त्यांनी त्यांच्या स्वभावात परिवर्तन केले पाहीजे.नेहमी नेहमी एकच गोष्ट उत्तर देणे.मी तूम्हाला अजून एक गोष्ट सांगतो. जी गोष्ट टोनी सिरवानी ने राजपूत मॅडमला सांगीतली तीच गोष्ट त्यांनी आयुक्त साहेबांना पण सांगीतली. दोघांचे उत्तर काय होते,आणि आयुक्त साहेबांनी किती सुंदरपणे टाळले. राजपूत मॅडमला सांगीतले ही जे वार्ड सिमा आहे त्या बरोबर नाही. पण त्यांनी ऐकले नाही आणि आपसात वाद झाले,काही अशी उद्धत भाषा वापरून प्रियंका राजपूत मॅडम तिथून निघून गेले. पण हीच गोष्ट टोनीजींनी जेव्हा आयुक्त साहेबांना सांगीतली. तर त्यांनी काय सांगीतले की ठिक आहे आता बनली आहे पण तूम्ही काळजी का करता तूम्ही सजेशन ऑबजेक्शन मध्ये टाका. तर गोष्ट तिथेच संपली.एका गोष्टीला कशा प्रकारे हँडल केले पाहीजे, लगेच एखाद्याला उत्त देवून, एखाद्याचा अपमान करून कसला मार्ग नाही निघत.तर या भाषेत बदलाव आला पाहीजे. जसे राजेंद्र चौधरीजींनी सांगीतले यांची नियुक्ती वरतून झाली आहे तर यांना टॅक्सचर जबाबदारी दिली आहे तर त्यांना गोबॅक नाही केले पाहीजे.आम्ही कोणीही सदस्य असे नाही इच्छा ठेवत की, त्यांना वापस पाठवले जावे. कोणीही नाही. ज्या त्यांच्या वरती गोष्टी आहेत, मी ठराव वाचेल जर तूमची सहमती असेल तर त्याच्यात हे आहे की महापालिका अधिनियमचे कलम ५६ च्या अनुसार महाराष्ट्र नागरिक सेवा वर्तणूक नियम ३ च्या अनूसार महानगरपालिकेमध्ये जे माननीय उपायुक्त मॅडम सांगतायेत मी असा चूकीचा व्यवहार नाही केला आहे.त्याच्यावर एक चौकशी बसली पाहीजे एक अधिकारी मार्फत आणि त्या चौकशीचा अहवाल एक महिना दोन महिन्यात सभागृहात आला पाहीजे की जे आरोप सदस्य् लावत आहेत, ते योग्य आहे की नाही किंवा मॅडम जे सांगतायेत ते योग्य आहे.तर चौकशीसाठी एक अधिकारी नियुक्त केला पाहीजे आणि जो पर्यंत चौकशीचा अहवाल सभागृहात नाही येत तो पर्यंत शासनाने त्यांच्यावर जी जबाबदारी दिली आहे उपायुक्त कर ते ठेवून बाकीचे जे पद आहेत, कार्यभार आहेत ते काढले पाहीजे. चौकशीचा अहवाल महानगरपालिका अधिनियम कलम ५६, नागरिक सेवा वर्तणूक नियम ३ च्या अनुसार एक अधिकारी मार्फत झाली पाहीजे.तो अहवाल महासभेमध्ये आली पाहीजे आणि जे आरोप लावले आहे त्याची सत्यता समोर आली पाहीजे.जर त्यांच्यावरचे आरोप खोटे आहे असे सिद्ध झाले तर आयुक्त त्यांना कोणतेही पद देवू शकतात. पण तो पर्यंत मा.आयुक्तांनी एवढ्या लोकांनी तक्रारी केल्या आहे त्या ऐकल्यानंतर त्यांना सर्व पदातून मुक्त केले पाहीजे फक्त जे शासनातर्फे त्यांना तीन वर्षासाठीचे टॅक्सचे कार्य ठेवा. याचा फायदा पण आहे टॅक्सचा भार त्यांच्याकडे आहे, टॅक्सची वसूली नाही होत आहे, याच विषयावर त्यांचे पूर्ण लक्ष असेल तर टॅक्सची वसूली पण वाढेल.आणि सर्व प्रश्नांचे उत्तर जसे दिले जाते जसे सर्व सदस्यांनी मागणी केली की अभय योजना लागू झाली पाहीजे.जरी मा. आयुक्तांनी तो ठराव विखंडीत करण्यासाठी पाठवला आहे. तो विखंडीत होवून अजून आला नाही आहे. जोपर्यंत शासनाने विखंडीत केले नाही त्याच्या आधीच लोकांना सांगणे की अभय योजना लागू होणार नाही, ठराव विखंडीत झाला आहे. अरे कसा विखंडीत झाला अजून शासनाने विखंडीत केला नाही आहे.अशा गोष्टी नाही झाल्या पाहीजे.आपल्या उपायुक्त मॅडम आहे त्यांनी त्यांच्या वागण्यात, बोलण्याच्या पद्धतीत बदल केला पाहीजे. दोघे जे आहेत,नगरसेवक आणि अधिकारी हे एका नाण्याचे दोन बाजू आहेत. दोघांना एकमेकांना धरून चालले पाहिजे.तर मी हा ठराव सभागृहामध्ये ठेवतो.आणि मी उपमहापौरजी, महापौरजी यांना विनंती करतो की याला सर्व संमतीने पास करा.

**<u>सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी:-</u>** महापौरजी गटनेते जमनूजी यांनी जो प्रसताव ठेवला त्यात त्यांनी सांगितले की चौकशी वगेरे केली पाहीजे.परंतू आमचे असे मत आहे की चौकशी वगैरे न करता त्यांचे जे शासनाने उपायुक्त कर म्हणून त्यांच्या ऑर्डर मध्ये नमूद केलेले आहे तो चार्ज त्यांच्याकडून ठेवून बाकी चार्ज काढून घ्या. जसे जमनूजींनी सांगीतले की टॅक्सची वसूली होईल.बाकी कामे

त्यांच्याकडून काढल्यामुळे टॅक्सवर त्यांचे लक्ष राहील.या प्रस्तावामधले जे काही त्यांनी एक वाक्य लिहीले आहे की चौकशी समिती नेमावी. ती समिती काढून बाकी प्रस्तावाला आमचे समर्थन आहे.

**सदस्य, श्री.मनोज सयानी:-** पास पास चौधरी साहेबांच्या प्रस्तावाला संमती.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:-** चौधरी साहेब एक मिनीट, जसे चौधरी साहेबांनी सांगीतले चौकशी, आता बघा, सदस्य बोलतायेत वर्तणूक बरोबर नाही आहे,व्यवहार बरोबर नाही झाला आहे.मॅडम बोलतायेत मी असे काही नाही केले आहे.तर या दोघांमध्ये खरे कोण बोलते आहे? तर चौकशी अधिकारी जो पर्यंत नाही करत तो पर्यंत त्याचा रिजल्ट कसा येईल. की सर्व पदाधिकाऱ्यांनी त्यांच्यावर आरोप खरे लावले की चूकीचे.

**उप महापौर, श्री.भगवान भालेराव:-** चौधरी साहेब डिपार्टमेंटल चौकशी तर झाली पाहीजे ना. त्यामुळे चौकशी गरजेची आहे.मी प्रस्ताव वाचतो. ही महासभा वरील प्रस्तावनेत झालेल्या चर्चाअंती श्रीमती प्रियंका राजपूत उपायुक्त (कर) यांच्याकडील कर विभाग व्यतिरिक्त इतर सर्व विभागांचे कार्यभार काढून घेण्याचे तसेच त्यांच्याविषयी असलेल्या तक्रारींबद्दल अतिरिक्त आयुक्त यांच्या मार्फत करून अहवाल महासभेपुढे आणण्याचे प्रशासनाला निर्देश देत आहे. इतिवृत्ताची वाट न पाहता.

**सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी:-** आमचा त्याला विरोध आहे चौकशी समिती सोडून त्यांच्याकडे टॅक्स डिपार्टमेंट ठेवावे. त्यांच्याकडे टॅक्स डिपार्टमेंट दिलेले आहे शासनाने. टॅक्स डिपार्टमेंट त्यांच्याकडे ठेवावे बाकी त्यांचे डिपार्टमेंट काढून टाका. चौकशी समितीला आमचा विरोध आहे.

**उप महापौर, श्री.भगवान भालेराव:-** चौकशी तर झालीच पाहीजे. या सर्व भ्रष्टाचाराची चौकशी तर झालीच पाहीजे. ही जा भाषा वापरली त्याची चौकशी तर झालीच पाहीजे.

**सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी:-** एवढी चर्चा जर शहराच्या विकास कामांसाठी केली असती तर शहराचा विकास झाला असता.एखाद्या उपायुक्ता करीता एवढा वेळ वाया घालवता.

**उप महापौर, श्री.भगवान भालेराव:-** निवडणूकीच्या काळामध्ये जी बिल काढली. त्या बिलाच्या आता माझ्याकडे कॉपी पण दाखवू शकतो.चौकशी तर झालीच पाहीजे, त्याची चौकशी का नको व्हायला.

**सदस्य, श्री.प्रदिप रामचंदानी:-** त्या अधिकाऱ्याने सावजनिक माफी मांगीतली आहे. सर्वांकडून मी अपमान केला आहे तर माफी मागीतली आहे.तर या मुद्यावर खेचण्यात काही अर्थ नाही आहे.त्यांनी सर्वांसमोर माफी मागीतली आहे.

**सदस्या, श्रीम. सविता तोरणे:-** मा.महापौर जी या सर्वांचे आरोप बिनबुडाचे नाही प्रत्येकाला हा अनुभव आलेला आहे. यांचेवर कोणीहा संस्कार झालेले नाहीत, संस्कार तर त्यांच्या वागण्यातून दिसतायेत ना.

**उपम हापौर,श्री.भगवान भालेराव:-** चौकशी तर झालीच पाहिजे. पण सगळे अधिकार काढून निवडणूकीच्या काळामध्ये बिले झाली आहेत, त्याची चौकशी झाली पाहीजे.

**सदस्या, श्रीम. सविता तोरणे:-** चालेल पुन्हा पुन्हा चौकशी झाली तरी चालेल.

**सदस्य,श्री. शुभांगी बेहनवाल:-** मा.महापौरजी, उप महापौर साहेब जर राजपूत मॅडम माफी मांगत आहेत, कशाला चौकशी तर आपण पण मन मोठे करूया. टॅक्स सोडून बाकी कार्यभार काढून घ्या.

**उप महापौर, श्री.भगवान भालेराव:-** आता विभागीय चौकशीचा मुद्दा सोडून फक्त चौकशी ठेवले आहे. पास इतिवृत्ताची वाट न पहाता.

**<u>सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी:-</u>** नाही नाही चौकशी नाही पाहीजे त्याच्यामध्ये चौकशीला आमचा विरोध आहे.

**<u>उप महापौर,श्री.भगवान भालेराव:-</u>** मतदान घ्या मग.

**<u>सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी:-</u>** होय मतदान घ्या, चौकशीला आमचा विरोध आहे.

**<u>सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी:-</u>** मा.महापौरजी,सर्व सदस्य या विषयावर माझे मत हे आहे की, वोटींग वगैरे नाही घेतले पाहिजे.आपसांत सहमती करून जर असे घडत असेल की कर विभाग त्यांच्याकडे राहील आणि बाकी विभाग काढण्यात येतील.परंतु जसे मॅडमनी स्वत: सांगितले की हे सर्व आरोप चूकीचे आहे.म्हणजे नगरसेवक, पदाधिकारी बोलतात ते चूकीचे आहे.तर चौकशीचे यासाठी ठेवले जर तुम्हाला नसेल हवे तर आयुक्तांवर जबाबदारी सोडा याची की चौकशी केली पाहीजे. चौकशी जर नाही होणार तर स्थायी समिती सभापती,उपमहापौर, सभागृह नेता आणि ज्या पण लोकांनी आरोप लावले आहे ते सर्व बरोबर आहे की उपायुक्त प्रियंका राजपूत बरोबर आहे या गोष्टीची जाणकारी कशी भेटणार? यासाठी आम्ही चौकशीचा शब्द वापरला आहे.जो पण निर्णय घ्यायचा आहे तो सर्व संमतीने घेतला पाहीजे.

**<u>सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी:-</u>** जसे तुम्ही सांगितले की आयुक्तांवर जबाबदारी सोडून द्या.

**<u>सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी:-</u>** होय आयुक्तांवर जबाबदारी सोडून द्या. सर्व पद हटविण्यात यावी.

**<u>महापालिका सचिव:-</u>** वरील महासभेत झालेल्या चर्चेअंती श्रीमती प्रियंका राजपूत उपायुक्त (कर) यांच्याकडील कर विभागाकडील कारभारा व्यतिरिक्त इतर सर्व विभागांचे कार्यभार काढून घेण्याचे निर्देश देत आहे व आलेल्या तक्रारींवर आयुक्तांना चौकशी करणेस प्राधिकृत करत आहे. चौकशी करून फक्त सर्व कार्यभार काढून घेण्याचे प्रशासनास निर्देश देत आहे. इतिवृत्ताची वाट न पाहता.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:-</u>** पास.. पास.. पास..

**<u>सदस्य, श्री.सतरामदास जेसवानी:-</u>** उप महापौर साहेब,चौधरी साहेब, बोडारे साहेब कृपया अभय योजना साठी विचार करा. कृपया अभय योजनेसाठी विचार करा.

**<u>सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी:-</u>** अभय योजना होवून जाणार.

**<u>उपायुक्त, (पर्यावरण विभाग), डॉ.सुभाष जाधव.:-</u>** मा.महापौर महोदया, उप महापौर महोदय,आयुक्त महोदय, अतिरिक्त आयुक्त व सर्व सन्माननीय सदस्य् मी डॉ.सुभाष जाधव उपायुक्त पर्यावरण विभाग या निमित्ताने मी आपल्या सर्वांना या सभागृहात विनंती करू इच्छितो की, परवाच्या दिवशी म्हणजे ११ तारखेला सकाळी ७ वाजता.पर्यावरण संवर्धानासाठी व वायू प्रदुषण टाळण्यासाठी जो संदेश आम्हाला द्यायचा आहे त्यासाठी सायकल रॅलीचे आयोजन आपण केलेले आहे. त्यासाठी आपली सर्वांची उपस्थिती प्रार्थनिय आहे. आपण सर्वांनी सकाळी ७ वाजता हजर राहण्याची विनंती विभागातर्फे करण्यात येत आहे. धन्यवाद.

**<u>महापालिका सचिव:-</u>** कृपया राष्ट्रगितासाठी उभे रहावे.सभेचे विषय संपले आहे. कृपया राष्ट्रगितासाठी उभे रहावे.

<u>काही सदस्य :—</u>पास—पास……

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी:—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑ **<u>विषय क्र.</u> २ :- श्रीम.प्रियंका राजपुत, उपायुक्त (कर) पदावर असल्यापासुन पदाधिकारी व नागरिकांच्या हिताच्या दृष्टीने यांच्या वागणूकीबाबत योग्य तो निर्णय होणेबाबत.**

**<u>प्रस्तावना</u>**

उपरोक्त विषयानुसार आपणास कळविणेत येते की, श्रीम. प्रियांका राजपुत उल्हासनगर महानगरपालिकेत उपायुक्त(कर) पदावर कार्यरत असून त्यांच्याकडे महापालिकेच्या महत्वाच्या विभागांची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. महापालिका क्षेत्रातील नागरीकांच्या अडीअडचणी, समस्या सोडवून त्यांचे निवारण करणे, अत्यावश्यक सेवा पुरविणे ही लोकप्रतिनिधी/महापालिका सदस्य म्हणून जबाबदारी असून नागरीकांच्या कामा संदर्भात त्यांच्या कार्यालयात किंवा पत्रव्यवहार केला असता त्याची काम करण्याची पध्दत बरोबर वाटत नाही. महिला अधिकारी असून पदाधिकारी व नागरीक यांच्याबरोबर वागणे व बोलणे बरोबर वाटत नसून हे श्रीमती प्रियांका राजपुत उपायुक्त असल्यापासुन प्रतिनिधीना, पदाधिका-यांना योग्य प्रकारे मान सन्मान देत नाहीत. त्यामुळे नागरीकांना त्रास होत आहे.

तरी पदाधिकारी व नागरीकांच्या हिताच्या दृष्टीने यांच्या वागणुकीबाबत योग्य तो निर्णय होणेसाठी विषेश महासभा बोलविणेसाठी भारतीय जनता पार्टी व आर.पी.आय.चे स्थायी समिती सदस्य विनंती करीत आहेत.

**<u>महासभा ठराव क्र.६९</u>** **दिनांक ०९/०३/२०२२**

**सुचकाचे नाव :- श्री. दिपक सिरवानी**

**अनुमोदकाचे नाव :- श्री. जमनादास पुरस्वानी, श्री. स्वप्नील बागुल.**

**ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे व सभेत झालेल्या चर्चेअंती श्रीम. प्रियंका राजपुत, उपायुक्त (कर) यांचेकडील कर विभागाकडील कार्यभारा व्यतिरिक्त इतर सर्व विभागाचे कार्यभार काढून घेण्याचे प्रशासनास निर्देश देत आहे.**

**या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.**

**सुचकाची सही /-**

**अनुमोदकाची सही /-**

**सर्वानुमते**

**महापौर/पीठासीन अधिकारी**
**सर्वसाधारण महासभा**
**उल्हासनगर महानगरपालिका**

**<u>महापालिका सचिव:-</u>** कृपया राष्ट्रगितासाठी उभे रहावे, मा. महापौरांनी आदेश दिले आहेत.

जन गण मन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सायंकाळी ६.४० वाजता महापौर श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(**प्राजक्ता मि. कुलकर्णी**)**
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका